भारतवर्षीय

# मध्ययुगीन

# चरित्र-कोश

920.03
Cit
32311

सि. वि. चिंतामण

भारतवर्षीय

# मध्ययुगीन चरित्रकोश

( मौर्य चंद्रगुप्तापासून पेशवाईअखेर ख्रि. पू. ३२१–इ. स. १८१८ )

विद्यानिधि

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

32311

920.03
Cil-

920.03-CHI
0 32311

१९ ]

[ इ. स. १९३७

किंमत पंधरा रुपये

प्रकाशकः—

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, मॅनेजिंग डायरेक्टर,
भारतवर्षीय चरित्रकोश-मंडळ, लि०,
५८ शनवार पेठ, पुणें २.

या ग्रंथाचें पुनर्मुद्रण, भाषान्तर व रूपान्तर
इत्यादींचे सर्व हक्क भारतवर्षीय चरित्र-
कोश-मंडळानें राखून ठेविले आहेत.

हासाचें महत्त्व राष्ट्राच्या इतिहासांत फार आहे. एक एक वीट रचून सुंदर आणि भव्य प्रासाद तयार होतो, त्याप्रमाणें अशा प्रांतिक व वांशिक इतिहासाच्या तयार झालेल्या एक एक भागानें संपूर्ण राष्ट्राचा इतिहास तयार होतो. या दृष्टीनें सर डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा 'दक्षिणेचा प्राचीन इतिहास' आणि पं. गौरीशंकर हिराचंद ओझा यांचा 'राजपुतानेका इतिहास' हा प्रसिद्ध झालेला हिंदी ग्रंथ हे आदर्श म्हणून दाखवितां येण्यासारखे आहेत. आणखीहि कांहीं प्रयत्न दाखवितां येतील. आंध्र व कुशान साम्राज्यें नष्ट झाल्यावर गुप्तांच्या साम्राज्याची प्रस्थापना होईतों मधल्या काळांत सर्व हिंदुस्थानावर सत्ता गाजविणारीं सम्राट् घराणीं नव्हतीं असें व्हिन्सेंट स्मिथनें लिहिलें आहे. पण त्याच स्मिथच्या वाक्यानें आरंभ करून डॉ. काशीप्रसाद जयस्वाल यांनीं आपला हिंदुस्थानचा इतिहास लिहिला आणि त्यांत किलकिला म्हणजे नाग, भारशिव आणि वाकाटक घराण्यांचा इतिहास शोधपूर्वक प्रगट करून हिंदुस्थानच्या इतिहासांतील त्रुटि भरून काढली आणि हिंदुस्थानच्या इतिहासाशीं आपलें नांव कायमचें निगडित केलें.

घराण्यांच्या इतिहासांत मौर्य, शालिवाहन, गुप्त, मौखरी, राष्ट्रकूट, कदंब, चोल, शिलाहार, पाल, सेन आणि आरविदु वगैरे घराण्यासंबंधीं प्रसिद्ध झालेले स्वतंत्र ग्रंथ फार महत्त्वाचे आहेत. पण या ग्रंथांत राजकीय घडामोडीच्या ढोबळ माहितीपेक्षां वर निर्दिष्ट केलेल्या इतर विषयांची फारच थोडी माहिती आलेली आहे.

इतर विषयांच्या बाबतींत साहित्य, धर्मशास्त्र, समाज, युद्ध, संस्कृत, प्राकृत आणि प्रांतिक भाषांतील साहित्यांचे इतिहास वगैरेचे प्रयत्न सर्वांगपूर्ण इतिहासाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत.

महाराष्ट्रांतील जनता स्वाभिमानी आहे, आणि त्यांना आपल्या इतिहासाबद्दलचा अभिमान मूळचाच दिसतो. ऐतिहासिक घटनांची नोंद करण्याची त्यांच्यांत परंपरागत वहिवाट आहे असें जेधे, शिवापूरकर देशपांडे, गदाधर प्रल्हाद, घोडेगांवकर यांच्या शकावल्या आणि देशपांडे व धडफळे यांच्या प्रसिद्ध झालेल्या याद्यांवरून दिसून येतें. त्यांत धडफळे वगैरे घराण्यांत तर स्वयंस्फूर्तीनें वंशपरंपरेनें अशा नोंदी करण्याची पद्धत होती, व त्यावरूनच पुरंदरे व पेशवे यांच्याहि रोजनिशा लिहिल्या जात, असें आतां सिद्ध होत आहे. सभासद, चित्रगुप्त, चिटणीस वगैरेनींहि बखरी लिहिण्याचें काम शिवाजीमहाराजांपासून चालू ठेवलें असून, मल्हार रामराव चिटणिसांनीं तर आपल्या सर्व बखरींचें काम अत्यंत परिश्रमपूर्वक केलें आहे; आणि त्यांना छत्रपति प्रतापसिंहाची प्रेरणाहि असावी. तसेंच त्यांना अस्सल कागदपत्रांचीहि महती कळत होती. त्यानंतर ग्रँड डफनें आपली बखर लिहिली. तिलाहि माहिती कशी पुरविली गेली यासंबंधीं पेशवे दप्तरांत माहिती आली आहे. त्यानंतर कीर्तने, न्यायमूर्ति रानडे आणि निबंधमालाकार यांनीं इतिहासाच्या अभ्यासाची जोपासना केली आणि अस्सल कागदपत्र एकत्र करण्यास सुरुवात केली. मोडक, साने वगैरेनीं काव्येतिहाससंग्रहाच्या द्वारां अस्सल कागदपत्रें व बखरी प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली; आणि यानंतर पारसनीस, खरे, राजवाडे आणि सध्यां सरदेसाई वगैरेनीं अस्सल कागदपत्रांची प्रसिद्धि आणि संकलन यांच्या द्वारां मराठ्यांच्या इतिहासाला शास्त्राची पदवी प्राप्त करून दिली. या चौघांचें काम वरील क्रमानें पण स्वयंस्फूर्तीनें वेगवेगळ्या ठिकाणीं सुरू झालें. राजवाड्यांना प्रथम प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर यांचें, पारसनिसांना डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीचें आणि सरदेसाई यांना ब्रिटिश सरकारचें साहाय्य झालेलें दिसतें. पण खरेशास्त्री स्वावलंबीच दिसतात. मराठी इतिहासाच्या या चार मुनींपैकीं तिघेजण भरपूर कष्ट करून कायमची विश्रांति घेत आहेत, पण चवथे सरदेसाई अदम्य उत्साहानें आपलें काम करीत आहेत. यांपैकीं आपला सांप्रदाय उत्पन्न करण्याचा मान अनाहूतपणें राजवाड्यांना लाभला असून त्यांची परंपरा त्यांचे शिष्य नेटानें चालवीत आहेत. पारसनिसांच्या प्रचंड कार्याचें संरक्षण सरकारनें स्वीकारलें असून संप्रदायाचें स्वरूप न येतां त्यांचें काम पारसनीस म्युझियम सातारा, या संस्थेतर्फे अखंड चालणार असें दिसतें. खरेशास्त्र्यांचें काम त्यांचे चिरंजीव यशवंतराव पुढें चालवीत आहेत. मराठ्यांच्या इतिहासाप्रमाणेंच गुरखे, बुंदेले, जाट आणि शीख यांचा इतिहासहि नुकताच घडलेला आहे आणि त्याबद्दल भरपूर साहित्य उपलब्ध होऊन त्याचें योग्य संकलन होईल तर तो त्यांच्या आणि राष्ट्राच्या गौरवांत भर घालण्यासारखा आहे. पण तिकडे अद्यापि संशोधन करण्याची प्रवृत्ति झालेली दिसत नाहीं.

ऐतिहासिक साधनें शिलालेख, ताम्रपट, नाणीं, पत्रव्यवहार, बखरी, आख्यायिका, काव्यें वगैरे अनेक प्रकारचीं असतात. त्यांत पहिल्या चोहोंचें महत्त्व विशेष असून पुढल्यांना आनुषंगिक प्रामाण्य आहे. पुनश्च समकालीन साधनांचें महत्त्व विशेष असून साधन उत्तरकालांतील असेल तर त्याचें महत्त्व कमी कमी होत जातें. प्रशंसात्मक

लिखाणांतील बराचसा भाग बाद करावा लागतो. लेखक, स्थल, काल आणि परस्पर संबंध यांच्याहि बाबतींत विसंवाद उत्पन्न होतां उपयोगी नाहीं. अशा स्थितींत लेखकानें कोणच्या दृष्टीनें लिहिलें आहे हें सर्व पाहून लेखाचें प्रामाण्य स्वीकारावयास पाहिजे. शिवाय पाठाचा, वाचनाचा व कालनिश्चयाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्याबद्दल अतिशय मतभेद होऊं शकतात, आणि त्यामुळें नव्या माहितीनंतर पहिली अनुमानें पार लयास जातात. एवंच अस्सल लेखावरून इतिहास जुळविण्याचें काम वरील अनेक अडचणींमुळें सर्वसाधारण इतिहासज्ञाच्या आवांक्याबाहेरचें आहे. त्याकरितां तज्ज्ञाचीच जरूर आहे.

नित्यशः अनेक ऐतिहासिक लेख प्रसिद्ध होत असले आणि त्यांचें वाचन वगैरेहि प्रसिद्ध होत असलें तरी त्यामुळें सध्यां उपलब्ध असलेल्या इतिहासाच्या तपशीलांत कोणती भर पडली, बदल झाला किंवा जुना तपशील खोटा ठरला हें सांगणें बरेंच अभ्यासाचें काम असतें. त्या त्या प्रसंगाचीं सर्व साधनें कालक्रमानें मांडूनच नवा कोणता धागा हातीं लागला किंवा कोणत्या तपशीलाचा अधिक खुलासा झाला हें ठरवावें लागतें. अगदीं हाताच्या बोटावर मोजण्यासारखीं अल्प साधनें असतील तेव्हांची गोष्ट निराळी. पण, विपुल साधनें असल्यास त्यांची मांडणी क्रमवार केलीच पाहिजे, आणि प्रथम साधनांची मांडणी आणि नंतर कालक्रमानें शोधपूर्वक लेखन हा इतिहासलेखनाचा राजमार्ग होय. मराठींत शिवचरित्राच्या साधनांची जुळवणी श्री. द. वि. आपटे यांच्या नेतृत्वाखालीं याच पद्धतीनें चालू आहे. यापूर्वी 'सोर्सेस ऑफ दि विजयनगर हिस्टरी' हा ग्रंथहि कानडी, संस्कृत, तेलगू व तामीलमधील साधनें एकत्र करून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. पण त्यावरून इतिहासाचा कोणता भाग जुळवला गेला किंवा कोणत्या भागावर नवा प्रकाश पडला हें दाखविण्याचें काम अजून पूर्ण झालेलें दिसत नाहीं. प्रसिद्ध झालेले शेंकडों शिलालेख व ताम्रपट अद्यापि अशास्त्र कच्च्या मोलाच्या अवस्थेंत आहेत. मराठींतील प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक पत्रव्यवहारावरून ही गोष्ट अधिक स्पष्ट होते. कालक्रमविरहित आणि पुष्कळावर कालाचीहि नोंद नसलेला पत्रव्यवहार मराठींत प्रसिद्ध आहे, आणि तो कोठें उपलब्ध झाला किंवा त्याचा संदर्भ काय आहे याचाहि खुलासा पुष्कळ ठिकाणीं केलेला नाहीं. त्याचप्रमाणें सूच्यादि साधनें नसल्यामुळें पुष्कळसा पत्रव्यवहार असून नसल्यासारखा झालेला आहे. तसेंच कांहीं ग्रंथांचें पुनर्मुद्रण करतांना त्यांचे क्रमांक वगैरे पार बदलून टाकले आहेत. त्यामुळें संदर्भ शोधतांना किंवा देतांना अतिशय घोटाळा उडतो. पण आतां ती स्थिति पालटत आहे.

**साधनांचा एक नवा प्रकार**—मध्ययुगापैकीं मौर्य चंद्रगुप्तापासून हर्षाच्या मृत्यूपर्यंतचा काळ हिंदुस्थानचें सुवर्णयुग समजला जातो. या कालांत धर्म व राजकारण या दृष्टीनें हिंदुस्थानांतल्या लोकांचा सर्व जगाशीं संबंध आला. येथील व्यापारी आपलीं गलबतें युरोपांत नेत असत आणि येथील धर्मप्रचारक जगांतील सर्व प्रदेशांत जात. आशिया खंडांतील चीन, तिबेट किंवा पारसीक देशाशीं हिंदुस्थानचें पूर्ण दळणवळण चालू होतें. चिनी प्रवाशांची व राजकारणी लोकांची हिंदुस्थानांत सारखी रहदारी सुरू असे. आणि या देशांतील मोठमोठे शास्त्रज्ञ त्या देशांत सन्मानानें बोलावले जात. इकडून तिकडे नेलेल्या शेंकडों शास्त्रीय ग्रंथांचीं भाषान्तरें तिकडे उपलब्ध झालीं आहेत. डॉ. सतीशचंद्र विद्याभूषणांच्या न्यायशास्त्राच्या इतिहासावरून ही गोष्ट आपणास पूर्वीच कळली होती. आणि आतां राहुल सांकृत्यायन यांनीं तिबेट व चीन येथें राहून व तेथील भाषांचा स्वतः अभ्यास करून तेथें उपलब्ध व भाषांतरित झालेल्या ग्रंथांची जी माहिती प्रसिद्ध केली आहे, त्यावरून आपल्याला हिंदुस्थानच्या इतिहासाचें एक अगदीं नवेंच निधान उपलब्ध झालें आहे. सांकृत्यायनजीनें आपल्या अचाट साहसानें तरुणांना साहस करण्याचा एक अगदीं नवा रस्ता दाखवून दिला आहे. मोहेंजोदारो, हरपा वगैरे ठिकाणच्या उत्खननामुळें हिंदुस्थानांतल्या उच्च दर्जाच्या प्राचीन संस्कृतीची जगाला माहिती झाली. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या वैभवशाली कालाची अधिक ओळख सांकृत्यायनजीनें घालून दिलेल्या मार्गानें पटणारी आहे. मात्र अमेरिकेंत उपलब्ध होणारे हिंदु संस्कृतीचे अवशेष मध्ययुगापेक्षां प्राचीन दिसतात.

**साधनांची भाषा**—संस्कृत नंतर प्राकृत व त्यापासून उत्पन्न झालेल्या प्रांतिक भाषा यांना प्रत्यक्ष व्यवहारांतल्या म्हणून महत्त्व आलें असलें तरी मूळ भाषा म्हणून संस्कृतकडेहि सर्व प्रांतांतील लोकांचें लक्ष कायम राहिलेलें दिसतें. वैदिक हिंदूंची तर ती धार्मिक भाषा होती आणि तिला ते देववाणी म्हणत. त्यांचें सर्व महत्त्वाचें लिखाण मधल्या काळांतहि संस्कृतांतच चालू होतें आणि आजहि अंशतः चालू आहे. वास्तविक हिंदूंची राष्ट्रभाषा संस्कृत होय. आणि हिंदूंची सांस्कृतिक भाषा तीच राहणार यांत शंका नाहीं. अशोकानें आपलीं शासनें जरी प्राकृत भाषेंत काढलीं असलीं तरी कनिष्कासारख्या परकीय कुशान वंशांतील

राजानें आपलीं आज्ञापत्रें संस्कृतांत लिहिण्यास सुरुवात केली, त्या वेळीं समिति भरून बौद्ध वाङ्मयाची नवी प्रत तयार करण्यांत आली आणि महायान पंथ अस्तित्वांत आला. त्यानें सर्व वाङ्मय संस्कृतांत लिहिण्याची प्रथा पाडली. गुप्तांनीं वैदिक धर्माला उत्तेजन देऊन आपलीं शासनें संस्कृतांत लिहिलीं. त्याचेंच पुढील सर्व वैदिक, जैन व इतर पंथीयांनींसुद्धां अनुकरण केलें. त्यामुळें प्रांतिक भाषेच्या तुलनेनें संस्कृतांतहि पुष्कळच लेख प्राप्त होतात. दक्षिणेंतहि बहुतेक मोठाल्या राजांचीं आज्ञापत्रें कानडी वगैरे भाषांप्रमाणें संस्कृतांतहि उपलब्ध होतात. गुप्तांच्या वेळेपासून राजाश्रयांतहि संस्कृत ग्रंथकारांना महत्त्वाचें स्थान प्राप्त होऊं लागलें. मुसलमानांच्या भरभराटीच्या काळांतहि पंडितांची व संस्कृत ग्रंथकारांची परंपरा अखंडित राहून जगन्नाथपंडितासारखीं पंडितरत्नें अत्यंत सन्मानानें राहिलीं. त्यापूर्वीच तोडरमल्लासारखे राजकारणी पुरुष दरबारची भाषा फार्सी असावी असें प्रतिपादीत आणि संस्कृत, हिंदी, फार्सी वगैरे सर्व भाषांत ग्रंथरचना करीत. पहिल्या पठाण वगैरे राजांच्या नाण्यांवर देवनागरींत नांवें लिहिलेलीं आढळतात.

पूर्वीच्या प्राकृत आणि अलीकडील पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रजी या भाषांच्या मधल्या काळांत मुसलमानांचा हिंदुस्थानाशीं निकट संबंध आला. प्रथम त्यांना येथील भाषेचा व लिपीचा स्वीकार करावा लागला. त्यांची सत्ता जों जों दृढ होत चालली तों तों प्रथम अरबी आणि नंतर फार्सी भाषेचें महत्त्व एकंदर सर्व व्यवहारांत अत्यंत वाढलें. प्रथम दरबारांत सर्व व्यवहार हिंदीमध्यें चाले, पण बादशाहाच्या खास व्यवहारांत फार्सी किंवा हिंदुस्थानाबाहेरील बादशाहा ज्या प्रांतांतील असे त्या भाषेचें महत्त्व असे. पण यामुळें हिंदुस्थानांतील लोक राजकारणांतील प्रत्यक्ष व्यवहारापासून दूर राहूं लागले आणि परक्यांचें महत्त्व वाढूं लागलें. ही गोष्ट लक्षांत आल्यावर राजा तोडरमल्लसारख्या मुत्सद्यानें दरबारची भाषा फार्सी असावी असें बादशाहाकडून ठरविलें आणि फार्सीचें शिक्षण घेण्यास उत्तेजन दिल्यानें बादशाहाच्या खास राजकारणांत येथील स्थानिक लोकांचा प्रवेश झाला आणि त्या मानानें परक्यांचा दरबारांतील वर्चस्मा कमी होत चालला. सध्यांच्या इंग्रजीप्रमाणें फार्सी भाषेशिवाय राजकीय व्यवहार करणें त्या कालीं कमीपणाचें समजत. कवि वगैरे वाङ्मयांतील लोकहि इतर भाषेंत काव्यादि करणें कमीपणाचें मानीत.

अल्बेरुनीचा मूळ हिंदुस्थानविषयक ग्रंथ अरबींत आहे. बाबरचें विख्यात आत्मचरित्र मूळ तुर्की भाषेंत आहे आणि पुढील मोगल बादशाहांच्या आणि दक्षिणेंतील सुलतानांच्या तवारिखा व फर्मानें प्रायः फार्सींत आहेत. पण पुढें दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहा आणि गोवळकोंड्याचा अबदुल कुत्बशाहा यांच्या कारकीर्दीपासून मराठी व फार्सी-मिश्रित दक्षिणी ऊर्दूंत काव्यें निपजूं लागलीं आणि उत्तरेंतहि शेवटीं शेवटीं ऊर्दूनें बादशाही दरबारचा पूर्णपणें कबजा घेतला. शिवाय सर्वसामान्य व्यवहारांतहि उत्तरेंत ऊर्दू भाषेचें महत्त्व वाढलें. त्याचप्रमाणें दक्षिणेंत महाराष्ट्राबाहेरहि सर्वसामान्य व्यवहारांत मराठी भाषा आणि मोडी लिपी यांनीं आपला पगडा बसविला. सामान्यतः सर्व खासगी आणि सरकारी जमाखर्च मोडी लिपींत लिहिले जात आणि पत्रव्यवहाराकरितांहि मराठी भाषा व मोडी लिपी वापरली जाई. या प्रकारचीं मराठींतील टिपूचीं पत्रें, म्हैसूर दरबारचे जमाखर्च, खासगी, व्यापारी आणि सरकारी पाटीलकुलकर्ण्यासारख्या गांवकामगारांचें शंभर वर्षांपूर्वीचें मराठींतील भरपूर लिखाण उपलब्ध आहे.

मात्र या सर्व साधनांचा परामर्ष घेतांना अत्यंत सावधगिरी ठेवली पाहिजे. जैमिनीनें वेदाचा अर्थ करतांना श्रुति, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान आणि समाख्या हीं प्रमाणें सांगून एकापुढें एक कमी दर्जाचें ठरविलें आहे. आणि वरच्या दर्जाचा आधार मिळत गेल्यास त्यावरून निश्चय करावयास पाहिजे असें लिहिलें आहे. तोच न्याय इतिहासाच्या प्रमाणांची पारख करतांना स्वीकारावयास पाहिजे. इंग्रजी, फ्रेंच, डच व पोर्तुगीज भाषेंत आपल्या इतिहासाचें साहित्य असलें तरी त्याला पहिल्या दर्जाचें महत्त्व कधींच लाभण्यासारखें नाहीं. कारण, त्यांत ऐकीव माहितीवर भर फार असतो. त्यामुळें खुद्द त्यांच्या हालचालीशिवाय इतर माहिती त्यावरून स्वीकारतांना फारच सावधगिरी ठेवावयास पाहिजे.

**शब्दोच्चार**—हें काम करतांना शब्दोच्चाराबद्दलहि बरीच अडचण भासली. ग्रीक, अरबी, तुर्की, फार्सी, ऊर्दू, चिनी, तिबेटी, तार्तर, पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रजी शब्दांच्या उच्चाराबद्दलची अडचण तर आहेच पण हिंदुस्थानांतील प्रांतिक भाषांतील व्यक्ति, ग्रंथ, स्थलें किंवा पदार्थांच्या नांवांचे उच्चार बहुतेक इंग्रजीद्वारां आमच्या कानावर येत असल्यामुळें प्रांतिक उच्चारांपेक्षां इंग्रजी उच्चारांचा मनावर पगडा बसलेला असतो. वास्तविक इंग्रजी भाषेपेक्षां लोकरूढ उच्चार आम्हीं स्वीकारावयास पाहिजेत. शिवाय प्रांतिक बोलींत एकाच शब्दाचा भिन्नभिन्न उच्चार आढळतो

आणि इंग्रजी वगैरे भाषेंतील स्पेलिंग एकच असतां प्रांतिक लोक त्याचे उच्चार वेगळाल्या पद्धतीनें करतात. मराठींतहि कांहीं शब्दांचे उच्चार जसे असावयास पाहिजेत त्यापेक्षां निराळेच उच्चार रूढ झाले आहेत. त्यामुळें मोठीच अडचण भासते. आमच्या या ग्रंथांत कानडी, फार्सी व ऊर्दू शब्दांचे उच्चार ठरविण्याच्या कामीं बहुभाषाकोविद ग. ह. खरे यांचा आम्हांस फार उपयोग झाला. तथापि कांहीं रूढ उच्चार बदलण्याचें आम्हांस साधलें नाहीं. कारण त्यामुळें निराळेच घोटाळे होऊं लागले. हिंदींतून आम्हीं जो मजकूर घेतला तेथेंहि उच्चारवैचित्र्याचा प्रकार आढळलाच. तथापि हिंदुस्थानांतील स्थलांचीं आणि व्यक्तींचीं नांवें मात्र आम्हीं प्रांतिक उच्चाराप्रमाणें देण्याचा प्रयत्न केला आहे. गंगेबद्दल गँजीस, आमूबद्दल ऑक्सस, अयोध्येबद्दल औध, मथुरेबद्दल मुत्रा किंवा उरीयाबद्दल ओरिसा म्हणणें अगदीं बरोबर नाहीं.

**इतिहासाची उपयुक्तता**—इतिहासाच्या उपयुक्ततेबद्दल शंका प्रदर्शित करणारा एक वर्ग आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जुनीं मढीं उकरीत बसण्यापेक्षां कांहींतरी नवीन करावयास पाहिजे, तसेंच इतिहासाची पुनरावृत्ति कधींच होत नसल्यामुळें व नव्या कालांत उत्पन्न होणाऱ्या अडचणींना तोंड देण्याकरितां प्रतिभाबलानें हस्तगत होणारीं नवीनच साधनें उपयोगांत आणावयास पाहिजेत, असें असल्यामुळें इतिहासाच्या अभ्यासाचा खटाटोप व्यर्थ आहे. पण ही सर्व विचारसरणी गृहीत गोष्टीवर उभारलेली असल्यामुळें हेत्वाभासपूर्ण आहे. इतिहास हा कर्तृत्व करण्याला उत्तेजनच देत असतो. आणि तसें उत्तेजन देतांना मागील चुकांची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून सूचना देतो. इतिहासाची पुनरावृत्ति अक्षरशः किंवा प्रसंगशः होत नसली तरी सामान्य मनुष्यस्वभाव पुरातन कालापासून प्रायः आतांपर्यंत सारखाच असल्याचें आढळून येतें. राग, लोभ किंवा द्वेष, मत्सर या भावना अनादि कालापासून आतांपर्यंत अबाधित आहेत. आणि पुढेंहि त्या टिकणार आहेत असें दिसतें. फार तर त्या भावना व्यक्त करतांना नवीन साधनें उपयोगांत आणलीं जातात असें दिसतें. अशा स्थितींत जास्तींत जास्त घटना आणि त्यावरील उपाययोजना आणि परिणाम आम्हांला ठाऊक असतील तर त्यांचा उपयोग प्रतिभेनें उपाययोजना करितांना खांचखळगे टाळण्याकरितां झाल्याशिवाय कसा राहील? जुन्या राज्यक्रांत्याचे किंवा धर्मपरिवर्तनाचे इतिहास आमच्यापुढें असल्यानें नवीन राज्यक्रांतीची भाषा बोलतांना किंवा धर्मपरिवर्तन प्रतिपादितांना आम्हांला बिलकुल संकोच वाटत नाहीं. शास्त्रज्ञहि आपल्या प्रयोगशाळेंत नवा शोध लावतांना जुन्याचा अभ्यास करीतच नवे शोध प्रसवीत असतो.

**इतिहासलेखन**—आपल्याकडे इतिहासलेखनाकडे प्रायः दुर्लक्ष आहे असा प्रवाद आहे. तथापि आपलें नांव दीर्घकाळ आपल्यामागें टिकावें, आपल्या हातून महत्त्वाच्या गोष्टी घडाव्यात आणि त्यांची नोंद केली जावी अशी इच्छा प्राचीन काळापासून या देशांतील लोकांत दिसून येते. आपल्याजवळचें ज्ञान व धन पुढच्या पिढीपर्यंत पोंचविण्याचा मनुष्यस्वभाव आहे. आणि त्या दृष्टीनें शिलाशासनें, मंदिरें, ताम्रपत्रें, स्मारकें, ग्रंथ वगैरे अनेक मार्गांनीं इकडील पूर्वकाळच्या लोकांनीं प्रयत्न केले. वेगळाले जे मतवादी लोक निघाले, त्यांत वेदान्त्यांनीं प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति आणि अनुपलब्धि हीं सहा प्रमाणें मानलीं. पण, पौराणिकांनीं संभव आणि ऐतिह्य अशा दोन प्रमाणांचा समावेश करून इतिहासालाहि धर्माधर्मविचारांत प्रमाणपदवीला नेऊन पोंचविलें. अथर्ववेदाचा उपवेद इतिहास हा आहे आणि अनेक वेदवाक्यांत इतिहासाला पुराणापेक्षांहि आद्यस्थान दिलेलें आहे. आजहि पुराणावरून पुष्कळ ऐतिहासिक गोष्टींचा उलगडा होतो व नवा इतिहास कळतो हें आपण पाहतच आहोंत. मौर्य चंद्रगुप्ताच्या पूर्वीच्या इतिहासासाठीं तर अद्यापि पुराणाशिवाय आपणांस दुसरा साधन-ग्रंथच नाहीं. त्यानंतर मुसलमानांच्या उदयापर्यंतच्या इतिहासाचीं साधनें श्री. ओझांच्या 'भारतवर्ष के प्राचीन इतिहास की सामग्री' या पुस्तकांत पाहावयास मिळतात. राजा किंवा त्या योग्यतेच्या पुरुषानें प्रेरणा देऊन लिहवलेलें कवींद्र परमानंदाचें शिवभारत, पर्णालपर्वताख्यान, शंभूचरित किंवा राजारामचरित वगैरे संस्कृत व अनंत फंदीकृत 'माधवनिधन' मराठी भाषेंत लिहिलेले ऐतिहासिक ग्रंथ आपल्यापुढें आहेत आणि त्यांतले कांहीं ऐतिहासिक कसोटीलाहि उतरत आहेत.

शाहूमहाराजांच्या व पेशव्यांच्या रोजनिशा आजहि आपणांस उपलब्ध आहेत. मधल्या काळांतील ग्रंथ, शिलालेख, कांहीं ताम्रपट, शिल्प व नाणीं याशिवाय अन्य साहित्य नष्ट झाल्यामुळें थोडें उपलब्ध होतें. त्यामुळें अनुमानावर भर ठेवावा लागतो. तथापि असें कांहीं इतिहासलेखनाचें साहित्य पूर्वकालीं असें आणि त्याचें महत्त्व जाणून तें योग्य इतिहासलेखकाला पुरवलें जाई याचा अनेक चरित्रांतून उल्लेख आला आहे (उत्बी, बाण, कल्हण, मुहणोत नेणसी, फेरिस्ता, अमृतराय). मधल्या काळांतहि असा इतिहासलेखकांचा वर्ग होता आणि त्यांनीं लिहिलेलें प्रामाणिक लेखन इतिहास या पदवीला योग्य असावें, पण तें राज्यक्रांतीच्या

विनाशक उलाढालींत टिकूं शकलें नाहीं आणि इतिहास-लेखनाच्या बाहेरच्या क्षेत्रांतील कवींचीं काव्यें जीं आमच्या-पुढें आलीं आहेत, त्यावरून आम्हीं त्यांना इतिहास-लेखनाची कल्पना नव्हती असें म्हणतों. पण तें विधान वास्तविक होऊं शकणार नाहीं असें वाटतें. सूत, चारण किंवा भाट आणि मुसलमान अमदानींतील तवारिखनवीस यांना तर दरबारांत राजकीयच काय पण धार्मिक महत्त्वहि प्राप्त झालें होतें आणि त्यांनीं लिहिलेल्या अनेक ग्रंथांत त्यांना राजांकडून पुरविल्या जाणाऱ्या साधन-ग्रंथांचाहि निर्देश आहे, ही गोष्ट विसरतां उपयोगी नाहीं. शिवाय हेंहि ध्यानांत धरलें पाहिजे कीं, लेखनाच्या पद्धतींतहि रोज बदल होत आहे. काल टॉड, ग्रँड डफ वगैरेंनीं लिहिलेले इतिहास आज अपूर्ण, चुकीचे व जुने वाटूं लागले आहेत. मग मध्ययुगांतील इतर इतिहासाची गोष्ट काय सांगावी ?

**हिंदुस्थानावरील सत्ता**—या ग्रंथांतील माहिती-वरून हिंदुस्थानाच्या जवळ असणाऱ्या अरब, अफ-गाण, इराण, मध्य आशिया, तार्तर, तिबेट आणि चीन या प्रांतांतील पराक्रमी व्यक्तींनीं एक-एकदां हिंदुस्थानावर साम्राज्य गाजविलें आहे हें दिसून येईल. पण चंद्रगुप्त मौर्यानंतर खरा सम्राट् असा कोणी हिंदूंत अगर मुसलमानांतहि झालेला नाहीं आणि आज इंग्रजांनाहि हिंदुस्थानाच्या दृष्टीनें अफगाण व हिंदुकुशाच्या भोंवतालचे प्रदेश काबीज करतां आलें नाहीं. समुद्रगुप्त, हर्ष हे मोठे सम्राट् होते. पण चंद्रगुप्तापेक्षां त्यांच्याहि राज्याचा विस्तार कमीच होता. अकबर व राज्य-विस्ताराच्या दृष्टीनें सर्वांत मोठा मोगलसम्राट् औरंगजेब याची तीच स्थिति होती. मुहम्मद तुघ्लकाच्या वेळीं मदुरेपर्यंत त्याचे सुभेदार ठाणीं देऊन राज्य करीत असत आणि बंगालमधून चीनवर त्यांनीं स्वारी केली असली तरी त्याच्या सत्तेला राजकीय संघटनेचा पाया नव्हता. त्यामुळें बंडाचे वणवे सारखे पेटून पसरत असत. विजयनगरचें महत्त्व मुसलमानांच्या ऐन माध्यान्हकालीं हिंदुसंस्कृतीच्या रक्षणार्थ पराक्रमानें पुढें येण्यांत आहे. मराठ्यांनीं त्यापेक्षांहि थोडें अधिक यश प्राप्त केलें. त्यांनीं दक्षिण ताब्यांत घेऊन दिल्लीच्या सिंहासनावरहि अनभिषिक्त सत्ता गाजविली. स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची धडाडी त्यांनीं दाखविली असली तरी दुसऱ्याचा राजमुगुट स्वतःच्या डोक्यावर चढविण्याचें राजकीय कौर्य किंवा नीति त्यांच्या-पाशीं नसल्यानें त्यांनीं फक्त बादशाहाच्या वजीरीवर संतोष मानला; आणि उलट इतरांच्या सत्ता मात्र नामशेष करून इंग्रजांचा मार्ग साफ करून दिला. पण आपल्यापेक्षां वरचढ शत्रु घरांत शिरत असतां तिकडे मात्र द्यावें तितकें लक्ष त्यांनीं दिलें नाहीं.

पूर्वी सम्राट्पद हा सन्मानाचा व कांहीं विशेष जबाब-दारीचा भाग होता. देशांत शांतता ठेवून परक्यांच्या लुटारू आक्रमणापासून देशांतील धर्मसंस्था, ग्रामसंस्था आणि कुटुंबसंस्था यांच्यांत हात न घातल्यास कोणाहि पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी माणसाला सम्राट्पद घेतां येई आणि तें पद सत्कृत्यें, औदार्य, नीति आणि पराक्रम यांच्या जोरावर लोकानुरंजन करून संभाळतां येई. पण मुसलमानांनीं तें वरील सर्व धोरणें संभाळून कांहीं वेळां उघड पण पुष्कळ वेळां पर्यायानें धर्मप्रसाराचें साधन बनविलें. पण युरोपियन लोकांनीं त्यांत व्यापाराचीहि दृष्टि ठेवलेली दिसते. आपल्या देशांत उत्पन्न होणारा माल परदेशांत राजसत्तेचें पाठबळ घेऊन त्यांनीं खप-विण्यास सुरुवात केली, आणि त्याच पद्धतीनें आपल्यावर आक्रमण होऊं नये म्हणून देशाभिमान किंवा राष्ट्रीयता यांचें कवच उत्पन्न केलें. सम्राट् हर्षाच्या मृत्यूपर्यंत लोक फक्त सांस्कृतिक बंधनानें संघटित झालेले दिसतात. मुसलमानांच्या आक्रमणाला सुरुवात झाल्यापासून धार्मिक बंधनानें संघटनेला सुरुवात झाली, आणि युरो-पियनांच्या आक्रमणापासून व्यापार किंवा व्यावसायिक बंधनानें लोकांची संघटना होत असल्याचें दिसतें. मग त्याला देशाभिमान, राष्ट्रीयता किंवा स्वदेशप्रेम यांपैकीं कोणचेंहि नांव दिलेलें असो. हे सर्व आत्मसंरक्षणार्थ संघटित होण्याचे मार्ग आहेत. पण याच विचारानें ताब्यांतील देश वागूं लागल्यास आणि स्वातंत्र्याची इच्छा करूं लागल्यास मर्यादित लोकसत्ताहि निर्माण करण्याची त्यांची तयारी आहे. शस्त्रानें धर्माधर्मनिर्णय करण्याचें युग संपलें असून बुद्धीनें कोणत्याहि कठीण प्रश्नाचा निर्णय लावण्याचें युग अवतरलेलें दिसतें.

पण अशा अनेक घटना, त्यांची कारणपरंपरा आणि परिणाम यांचा उलगडा करण्यास सर्व हिंदुस्थानचा एकात्मतेनें विचार करण्याची आपणास संवय पाहिजे. सर्वप्रांतिक किंवा जागतिक दृष्टीच्या व भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या अभावीं मध्ययुगांत हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालें आहे.

**मध्ययुगीन चरित्रकोश**—या कालांतील इति-हासाचें काम विशेष अवघड, त्याचीं साधनें अनेक भाषांत, लिपींत व प्रांतांत विखुरलेलीं आणि त्यांचें संकलनहि अद्यापि अपूर्ण; मग संशोधन आणि

प्रश्न तर दूरच. वेगवेगळ्या प्रांतांत रोज नवे शोध लागत असून ते लोकांपुढेंहि मांडले जात आहेत. अशा स्थितींत आजतागायत वाचन असलेल्या त्या त्या क्षेत्रांत सतत व्यासंग करणाऱ्या माणसांची अशा कामाला आवश्यकता. पण तशा साहाय्याची योजना प्रयत्न करून शेवटपर्यंत पूर्ण यशस्वी करितां आलेली नाहीं. तसा थोडासा प्रयत्न केल्याचें या ग्रंथाचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां ध्यानांत येईल. पण शेवटीं तसा प्रयत्न आवांक्याच्या बाहेरचा वाटल्यामुळें सोडून देऊन ग्रंथनिविष्ट झालेली आजतागायतची माहिती नमूद करण्याकडे लक्ष ठेवावें लागलें. आणि ग्रंथमर्यादा लक्षांत घेऊन ती माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. जरूर तेथें आधारहि दिले आहेत. पण आमचा हा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे हें बिनचूक व हजरजबाबी उपयोगावरून ठरणार आहे. स्थलसूचि, कांहीं परिशिष्टें व नकाशे तयार असूनहि ग्रंथाची पृष्ठसंख्या मर्यादेबाहेर वाढल्यामुळें देतां आलीं नाहींत.

**कार्य व आभार**—बाहेरून लिखाण मिळविण्याच्या बाबतींत विशेष यश प्राप्त झालेलें नसलें तरी श्री. बाळकृष्णशास्त्री महानुभाव यांनीं केवळ आम्हीं केलेल्या जाहीर विनंतीवरून महानुभावसांप्रदायाचे आद्यसंस्थापक चक्रधर यांचें चरित्र आम्हांकडे पाठविलें. तसेंच येथील शिवचरित्रकार्यालयाचे प्रमुख श्री. द. वि. आपटे, बी. ए., यांनीं शहाजीराजे व शिवाजीमहाराज यांचीं चरित्रें लिहून दिलीं. श्री. मा. ग. बावडेकर यांनीं आपले पूर्वज कृष्णाजी नाईक व बाबूजी नाईक बारामतीकर यांचीं चरित्रें लिहून दिलीं आणि अलीबागचे श्री. डबू वकील यांनीं आंगरे घराण्यांतील कांहीं व्यक्तींचीं चरित्रें लिहून पाठविलीं. याशिवाय भारत-इतिहास-संशोधक मंडळांतील वर निर्देश केलेले प्रसिद्ध इतिहाससंशोधक द. वि. आपटे, ग. ह. खरे, शंकरराव जोशी वाईकर आणि कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांनीं चर्चा करणें, सूचना देणें या बाबतींत आपलेपणानें साहाय्य केलें. वरील मंडळाचे चिटणीस प्रो. द. वा. पोतदार यांनीं तर संदर्भ-पुस्तकांच्या बाबतींत बिलकुल अडचण भासूं दिली नाहीं. मंडळांतील आणि मंडळाचीं सर्व पुस्तकें मुक्तहस्तानें वापरण्यास दिलीं. तसेंच ओरिएंटल बुक सप्लाइंग एजन्सीचे चालक डॉ. न. गो. सरदेसाई यांनींहि आम्हांला पुस्तकांची उणीव भासूं दिली नाहीं.

पण या कामाकडे आपलेपणानें सतत लक्ष ठेवून काम निर्दोष करण्याच्या कामीं श्री. गजानन शंकर देशमुख, एम्. ए., आमची पुतणी सौ. आनंदीबाई लोणकर, बी.ए. (ऑनर्स), डॉ. गणेश रंगनाथ धडफळे आणि त्यांच्या पत्नी सौ. शारदाबाई धडफळे, राधारमण बाळकृष्ण देव, के. ह. कुलकर्णी यांनीं आणि जैन आचार्य व ग्रंथकार यांचीं चरित्रें निर्दोष व बिनचूक वठविण्याच्या बाबतींत येथील व्यासंगी व्यापारी मोतीराम लाधाजी यांनीं वाचनादिकाचें साहाय्य केलें. तसेंच आमचे मित्र श्री. त्रिंबक बाळकृष्ण भोपळे, बी.ए., यांनीं भाषांतर, रूपांतर व उच्चार वगैरे बाबतींत सतत लक्ष दिलें.

तसेंच श्री. ज. स. करंदीकर, श्री. श्री. ना. ताडपत्रीकर आणि श्री. वि. के. खासनीस यांनीं तयार झालेला मजकूर वाचून पाहिला.

श्री. श्रीधर गणेश भालेराव, बी. एजी., नडियाद; गुलबर्ग्याच्या वैश्य-समाजाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मण्या जाजी, श्री. वा. गो. विजापूरकर, एम्. ए., एल्एल्. बी., न्या. एम्. व्ही. भिडे, आय. सी. एस., केसरीसंस्था, लोकमान्य ज्युबिली नॅशनल फंड व श्री. ना. गो. चाफेकर, बी. ए., एल्एल्. बी., यांनीं आम्हांस प्रारंभीं आर्थिक साहाय्य केलें आणि केवळ याच भागाकरितां श्री. पांडुअण्णा शिराळकर, एम्. एल. ए., कऱ्हाड, यांनीं दोनशें रुपयांची मदत केली.

आम्हांला आरंभिलेल्या कामांत नेहमीं आपलेपणानें मदत करणारे हैदराबादचे धर्मवीर वामनरावजी नाईक निवर्तल्याचें नमूद करण्यास आम्हांस फार दुःख वाटतें.

हा ग्रंथ सुबक व शुद्ध स्वरूपांत प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत समर्थ भारत छापखान्याचें मालक श्री. स. रा. सरदेसाई यांनीं आम्हांस मदत केली.

या सर्वांच्या मदतीबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

एकंदर चरित्रकोशाच्या संकल्पित दोन हजार पृष्ठांपैकीं पूर्वी प्रसिद्ध केलेला प्राचीन चरित्रकोश आणि हा मध्ययुगीन चरित्रकोश मिळून सोळाशें पृष्ठें वाचकांना सादर केलीं आहेत. अत्यंत मेहनतीचें आणि महत्त्वाचें काम झालें आहे. प्रकृतीची प्रतिकूलता आणि कागद वगैरेची महागाई यामुळें अर्वाचीन चरित्रकोशाचें काम या मध्ययुगीन चरित्रकोशाच्या स्वागतावर अवलंबून ठेवावें लागत आहे.

श्रावण, शुद्ध १५।१८५९. **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.**

# कोश कसा पहावा ?

१. या कोशांत व्यक्तींचा निर्देश अकारादि क्रमानें केला आहे. अनुस्वार बाराखडींतील प्रत्येक वर्णाच्या शेवटीं घेतला आहे. म्हणजे अचा अनुस्वार अच्या शेवटीं, आचा अनुस्वार आच्या शेवटीं याप्रमाणें दिला आहे. आणि क्ष व ज्ञ हीं संयुक्त व्यंजनें क किंवा ज मध्यें न देतां मराठीप्रमाणें सर्वत्र शेवटीं स्वतंत्र घेतलीं आहेत. तात्पर्य, अनुस्वार हा सोयीकरितां आम्हीं स्वतंत्र दिला आहे आणि क्ष व ज्ञ हे मराठीप्रमाणें स्वतंत्र जोडले आहेत.

२. प्रारंभीं मूळ शब्द जाड्या ठशांत आणि त्याचा पाठभेद किंवा प्रचारांतील उच्चार तेथेंच कंसांत दिला आहे आणि इतर पाठभेद शेवटीं किंवा आरंभीं दिले आहेत.

३. शक्य तोंपर्यंत मूळ ग्रंथोक्त व लोकरूढ उच्चार देण्याचा प्रयत्न केला आहे. सन्मानदर्शक उपपदें गाळलीं आहेत. तथापि क्वचित् लोकरूढ उच्चाराचें संस्कृतीकरण झालें आहे; आणि सन्मानदर्शक व सहज ओळख पटण्यास आवश्यक उपपदें गाळलीं गेलीं आहेत.

४. जाड्या ठशांतील शब्दानंतर कंसांत कालाचा निर्देश सनांत केला आहे. जेथें जन्ममृत्यूचा काल देतां आला नाहीं तेथें कारकीर्दीचा, ग्रंथकर्तृत्वाचा किंवा जो उपलब्ध झाला तो दिला आहे. जेथें अदमासानें काळ काढावा लागला तेथें सुमार असा शब्द जोडला आहे. सुमार म्हणून दिलेला काळ आयुष्याच्या कर्तृत्वाचा काळ धरला आहे. शक्य तोंवर प्रत्येक चरित्रांत काळ, स्थळ आणि वंश यांचा निर्देश करण्याची काळजी घेतली आहे. सनाला शक व संवताची बहुतेक ठिकाणीं जोड दिलेली आहे. शक व संवतावरून सन काढतांना एकाद्या वर्षाची चूक होण्याचा संभव असतो. बहुतेक सर्व उपलब्ध कालगणना शेवटीं परिशिष्टांत दिल्या आहेत. आणि त्यावरून सन, शक काढण्याची पद्धतिहि दिली आहे.

५. प्रत्येक चरित्र देतांना प्रथम नांव, काल, वंश, आईबाप, जन्मस्थळ, शिक्षण, विवाह, कर्तृत्व, संतति, वैशिष्ट्य, ग्रंथ वगैरे क्रमानें माहिती नमूद करण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष विवेचन न करितां समकालीनता, परिस्थिति व परिणाम नमूद करण्यांत आला आहे.

६. शक्य तोंपर्यंत नक्की ठरलेली माहिती देण्याचा प्रयत्न केला असून कांहीं मतभेदहि नमूद केले आहेत.

७. एकाच नांवाच्या अनेक व्यक्ती असतां त्या काल-क्रमानें देण्याचा प्रयत्न केला आहे.

८. पुनरुक्ति टाळण्याकरितां, विशेष माहितीकडे लक्ष वेधण्याकरितां व सारखेपणाची जाणीव होण्याकरितां 'अमुक शब्द पाहा' असें कंसांत म्हटलें आहे. अनेक शब्द असल्यास कितवा शब्द पाहा हेंहि लिहिलें आहे.

९. बरेच वंशवेल या ग्रंथांत दिले आहेत. बरींच राज-घराणीं वंशवेल न देतां केवळ कालक्रमानें गादीवर आलेल्या व्यक्ति देऊन दाखविलीं आहेत. आणि कांहींच्या राजवटींचें समालोचन करणारी माहिती जोडली आहे. त्यांची प्रारंभीं अनुक्रमणिका दिली आहे.

१०. जात, धर्म, प्रांत किंवा कोणत्याहि उच्च-नीचतेच्या भावनेचा स्पर्श होऊं न देतां माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

११. जुन्या पाली, मागधी वगैरे दहा प्रकारच्या प्राकृत आणि त्यांपासून उत्पन्न झालेल्या सध्यांच्या प्रांतिक भाषा, तसेंच कानडी, तेलगू, तामील आणि मल्याळि आणि प्राचीनकाळीं संबंध आलेली ग्रीक, मधल्या काळांत संबंध आलेल्या अरबी, तुर्की, फार्सी आणि ऊर्दू या भाषेंतील व्यक्ति, व ग्रंथ वगैरेंचीं विशेषनामें आम्हीं शोधपूर्वक वापरण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच चिनी, तिबेटी व क्वचित् तार्तर शब्द आले आहेत. त्यांच्या शुद्धतेबद्दल काळजी घेणें अशक्य झालें आहे.

१२. आधारग्रंथांचे संक्षेप प्रस्तावनेनंतर दिले आहेत. बाकीचे महत्त्वाचे ग्रंथ जेथल्या तेथें नमूद करण्याची काळजी घेतली आहे.

१३. क्वचित् माहिती अपुरी, विवेचन न पटणारें, मतप्रदर्शन बोचक किंवा नामोल्लेख रूढ पद्धतीला सोडून झालेला असल्यास त्याबद्दल ग्रंथकर्त्यांवर कोणत्याहि हेतूचा आरोप न करितां वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

१४. अशा तऱ्हेनें व्यक्तींच्या चरित्राची मांडणी कर-णाऱ्या ग्रंथाची कल्पना नवीन आहे. तसेंच शेंकडों थोर लोकांच्या चरित्राची इतिहासांतील प्रासंगिक उल्लेखापलीकडे कोणालाहि माहिती नाहीं. आम्हीं स्वीकारलेल्या मध्य-युगांतील प्रारंभींचा दीड पावणेदोन हजार वर्षांचा काल इतिहासाच्या दृष्टीनें अगदींच त्रुटित आणि साधन-अवस्थेंत आहे. त्यामुळें अशा ग्रंथांत कांहीं त्रुटि राहणें स्वाभाविक आहे. पण हें सर्व लक्षांत घेऊनहि झालेल्या कामाची आवश्यकता आणि त्याबद्दल समाधान वाटल्याशिवाय राहणार नाहीं असा विश्वास आहे.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| १ प्रस्तावना ... ... ... ... ... | १– ८ |
| २ कोश कसा पहावा ? ... ... ... ... | ९ |
| ३ अनुक्रमणिका ... ... ... ... ... | १० |
| ४ आधारभूत ग्रंथांचे संक्षेप ... ... ... ... | १०– १२ |
| ५ मध्ययुगीन चरित्रकोश ... ... ... ... | १–८४० |
| ६ परिशिष्ट पहिलें—कालगणनापद्धति ... ... ... | ८४१–८४६ |
| ७ परिशिष्ट दुसरें—वंशावळी, वंशावरील टीपा व राजवंश यांची सूचि ... | ८४७–८४८ |


---

# ग्रंथसंक्षेप

खालीं फक्त आम्हीं ज्यांचे संक्षेप वापरले आहेत, तेवढेच दिले आहेत. बाकीचे आधार-ग्रंथ पूर्ण नांवानें जेथल्या तेथें नमूद केले असल्यामुळें त्यांची येथें पुनरुक्ति केली नाहीं.

| | |
|---|---|
| अ. को. | अर्वाचीन कोश |
| इ. सं. | इतिहाससंग्रह |
| —ऐ. टि. | — ऐतिहासिक टिपणें<br>— ऐतिहासिक गोष्टी<br>— ऐतिहासिक चरित्रें |
| इ. आर्. | एपिग्राफिकल ॲन्युअल रिपोर्टस् ( गव्हर्नमेंट ऑफ मद्रास ) |
| इलियट | इलियट ॲंड डौसन यांची हिस्टरी ऑफ इंडिया सीरीज |
| इंडि. ॲंटि. } इं. ॲं. } | इंडियन ॲंटिक्वरी |
| इं. हि. क्वा. } हि. क्वा. } | इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली. |
| एपि. इंडि. | एपिग्राफिया इंडिका |
| एपि. कर्ना. | एपिग्राफिया कर्नाटिका |
| एस्. आय्. आय्. | साउथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स. |
| ऐ. गो. | ऐतिहासिक गोष्टी ( इ. सं. पाहा ) |
| ऐ. प. | ऐतिहासिक पत्रव्यवहार ( चित्रशाळा व समर्थ भारत छापखाना ) |
| ऐ. पो. | ऐतिहासिक पोवाडे ( शाळिग्राम व य. न. केळकर ) |
| ऐ. ले. सं. | ऐतिहासिक लेखसंग्रह ( खरे ) |
| ऐ. स्फु. ले. | ऐतिहासिक स्फुट लेख |
| क. क. च. | कर्नाटक कविचरित्र ( कानडी ) ( आर्. नरसिंहाचार्यप्रणीत ) |
| क. कौ. | कविताकौमुदी ( हिंदी ) |
| क. च. | कविचरित्र ( मराठी ) |
| काणे | १ हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र<br>२ संस्कृत साहित्याचा इतिहास |
| का. दो. | काव्यदोहन ( गुजराथी ) |
| का. प्र. इ. सा. | कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें |
| काव्यमी. | काव्यमीमांसा ( संस्कृत ) |
| काव्यें. } का. सं. प. या. } | काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें, यादी वगैरे |
| कुमार. | कुमारसंभवकाव्य ( संस्कृत ) |
| कें. हि. | हिस्टरी ऑफ इंडिया, व्हॉ. ३ |
| कोटा द. | कोटादप्तर |
| ख्रि. पू. | ख्रिस्तशकापूर्वी |
| ज. रा. ए. सो. किंवा जे. आर. ए. एस. | जर्नल ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी |
| जा. ऐ. का.गु. डा. | जॉन ऐलनकृत कॉइन्स ऑफ दि गुप्त डिनॅस्टीज |
| जे. श. | जेधेशकावली |
| जे. क. शि. च. प्र. | जेधे करिना, शिवचरित्रप्रदीप |

| | |
|---|---|
| टॉड | टॉडचें राजस्थान म्हणजे ॲनल्स ऑफ मेवार |
| टि. ए. एस. | त्रावणकोर अर्कालॉजिकल सर्वे रिपोर्ट |
| डफ | मिस् माबेल डफची क्रॉनॉलजी |
| ग्रँड डफ् | हिस्टरी ऑफ दि मराठाज ( दोन भाग, दुसरी आवृत्ति ) |
| तं. किंवा त. | तंजूर |
| तं. रा. घ. | तंजावरचें राजघराणें ( इ. सं. ) |
| द. इ. सा. | दक्षिणेंतील इतिहासाचीं साधनें |
| ना. सा. रो. | नानासाहेब पेशव्यांची रोजनिशी |
| ना. भो. ब. | नागपूरकर भोसल्यांची बखर |
| ना. प्र. प. | नागरी-प्रचारिणी पत्रिका |
| ना. प्रां. इ. | नागपूर प्रांताचा इतिहास |
| प. सा.<br>पत्र. सा.<br>प. सा. सं. | पत्रसारसंग्रह |
| पं. सं. वृ. | पंचमसंमेलनवृत्त |
| पु. द. | पुरंदरे दप्तर |
| पे. द. | पेशवे दप्तर |
| फ्ली. गु. इं. | फ्लीटस् गुप्त इन्स्क्रिप्शन्स |
| बंगा. रा. ए. सो. | बंगाल रॉयल एशिआटिक सोसायटी |
| बार्नेट | इंडियन क्रॉनॉलजी बार्नेटकृत |
| बॉ. ब्रँ. रा. ए. सो. | बॉबे ब्रँच रॉयल एशिआटिक सोसायटी |
| बील | बायोग्राफिक डिक्शनरी ऑफ एन्शन्ट इंडिया |
| बेन्द्रे | कुत्बशाहीचा इतिहास |
| बौ. सं. प. | बौद्ध संघाचा परिचय |
| ब्र. स्वा. च. | ब्रह्मेंद्रस्वामीचें चरित्र ( पारसनीस ) |
| ब्रि. रि. | ब्रिटिश रियासत (पूर्वार्ध व उत्तरार्ध) |
| ब्रि. रि. पू. | ब्रिटिश रियासत पूर्वार्ध |
| भक्त. वि.<br>भक्ति. वि. | भक्तविजय |
| भा. इ. सं. मं.<br>किंवा मं. | भारत-इतिहाससंशोधक मंडळ |
| भा. ज्यो. | भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास |
| भा. व. | भारतवर्ष |
| भा. व. श. | भारतवर्षशकावलि |
| भा. सा. ब. | भाऊसाहेबांची बखर |
| भांडारकर | अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन ( इंग्रजी ) |
| म. इ. सा. | मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें |
| म. क. च. | महाराष्ट्र कविचरित्र |
| म. द. | मराठी दप्तर |
| म. द. बा. | महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें (पारसनीस) |
| म. भा.<br>म. यु. भा. | मध्ययुगीन भारत ( वैद्य ) |
| म. रि. पू. | मराठी रियासत पूर्वार्ध ( राव-साहेब गो. स. सरदेसाई, बी. ए. कृत ) |
| म. रि. म. १, २, ३ व ४ भाग | मराठी रियासत मध्यविभाग |
| म. रि. उ. १, २, ३, भाग | मराठी रियासत उत्तरविभाग |
| म. वा. इ. | मराठी वाङ्मयाचा इतिहास १–२ (ह. भ. प० ल. रा. पांगारकर-कृत ) |
| म. सा. | महाराष्ट्र सारस्वत १–२ (वि.भावे) |
| मं. अ. | भारत-इतिहाससंशोधक मंडळ अहवाल |
| मं. इ. वृ. | भारत-इतिहाससंशोधक मंडळ इतिवृत्त |
| मं. वा. इ. | भारत-इतिहाससंशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त |
| मं. त्रै. | भारत-इतिहाससंशोधक मंडळ त्रैमासिक |
| मं. तृ. सं. वृ. | भारत-इतिहाससंशोधक मंडळ–तृतीय संमेलनवृत्त |
| मा. पे. रो. | माधवराव पेशवे रोजनिशी |
| मु. रि. | मुसलमानी रियासत दुसरी आवृत्ति |
| रघु. | रघुवंश ( कालिदासकृत ) |
| रा. इ. | राजपुतानेका इतिहास ( हिंदी ) |
| रा. खं. | मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें |
| रा. तं. | राजतरंगिणी |
| रा. मा. चं. | राधामाधवविलासचंपू |
| रा. प्र. | राजवाडे यांच्या प्रस्तावना |
| राष्ट्रकूट (आळतेकर) | राष्ट्रकूट ( इंग्रजी ) |
| ले. श. | लेखन शक |
| लेनपूल | मिडीव्हल पीरियड अंडर महॉमेडन रूल ( स. ७१२-१७६४ ) |
| वि. वि. | विविधज्ञानविस्तार |

| | |
|---|---|
| शक. | शालिवाहनशक |
| शा. च.,शा. म. च. | शाहूचरित्र |
| शा. श. | शालिवाहनशक |
| शाहू म. ब. | शाहूमहाराज बखर |
| शि. च. सा. | शिवचरित्र-साहित्य |
| शिवाजी | ( गो. स. सरदेसाईकृत ) |
| स. | इसवी सन |
| स. मा. रो. | सवाई माधवराव रोजनिशी |
| स. प्र. | सनदापत्रें |
| सं. सू. | संतकविकाव्यसूचि ( गो. का. चांदोरकरकृत ) |
| संभाजी | ( गो. स. सरदेसाईकृत ) |
| सा. इ. | साहित्यशास्त्राचा इतिहास ( काणे-मराठी प्रत ) |
| सिवेल व आयंगार— | दि हिस्टॉरिकल इन्स्क्रिप्शन्स ऑफ सदर्न इंडिया (कलेक्टेड टिल १९२३) रॉबर्ट सिवेल आणि एस. कृष्णस्वामी आयंगार, एम्.ए., पीएच्. डी. |
| सि. सं. ग्रामर | सिस्टिम ऑफ दि संस्कृत ग्रामर ( डॉ. बेलवलकर ) |
| सी. सी. | कटलॉगस कॅटलागोरम ( इंग्रजी ) |
| स्मिथ | अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया एन्शन्ट ( इंग्रजी ) |
| हिस्टरी इं. लॉ. हि. ऑ. इं. लॉ. | हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक ( सतीशचंद्र विद्याभूषणकृत इंग्रजी ) |
| हि. का. | इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली |
| हि. सं. लि. | हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर ( डॉ. विंटर्निट्झ १-२ ) |
| ज्ञा. का. | ज्ञानकोश |
| Annals of the B. O. R. I. | भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट |
| B. | बार्नेट कॉलॉजी |
| B. B. R. A. S. | जर्नल ऑफ बॉबे ब्रँच रॉयल एशियाटिक सोसायटी |
| C. C. | Catalogus Catalogorum |
| Ep. In. | Epigraphia Indica |
| Ep. Carn. | Epigraphia Carnatica |
| History of India | 150 A. D. to 350 A. D. by K. P. Jayaswal, M.A., Ph. D. (1933) |
| I. A. | Indian Antiquary |
| I. H. Q. | इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली |
| J. A. S. B. | Journal of the Asiatic Society of Bengal |
| J. B. B. R. S. | जर्नल ऑफ दि बॉबे ब्रं. रॉयल ए. सो. |
| J. B. O. R. S. | जर्नल ऑफ दि बिहार ओरिसा रिसर्च, सोसायटी |
| J. R. A. S. | जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, ग्रेटब्रिटन |
| J. R. A. S. B. | जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, बंगाल |
| J. R. A. S. P. | जर्नल ऑफ दि रॉ. ए. सो. पंजाब |
| S. S. | जिन-विजय |
| V. Smith | The Early History of India, Ancient–Fourth Edition, revised by S. M. Edwardes, C. S. I., C. V. O. |
| Lanepool | Mediaeval India under Mahomedan rule ( A. D. 712–1764 ) |

# मध्ययुगीन चरित्रकोश

# भारतवर्षीय

# मध्ययुगीन चरित्रकोश

## अ



**अकण्णा**—कुत्बशाहीच्या अखेरच्या कालांतील एक मुत्सद्दी. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. शाखा आश्वलायन, गोत्र भारद्वाज, त्रिप्रवर. याचें आडनांव पिंगळी. यांचे वंशज वारंगळनजीक हनमकोंडा येथें व आसपास आपल्या देशमुखी वृत्तीवर उपजीविका करितात. निजाम सरकारचे हद्दींत भानजी पेठ म्हणून गांव आहे. हें गांव यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ वसलेलें असावें, असा तर्क आहे ( मादण्णा पाहा ).

**अकनिष्ठ**—बौद्ध मताचा एक साधु.

**अकबर**—हा दिल्लीच्या मोगल घराण्यांतील तिसरा बादशहा. याचा बाप हुमायून वनवासांत असतां ता. १५ आक्टोबर सन १५४२ रोजीं याचा उमरकोट येथें जन्म झाला. याच्या आईचें नांव हमीदाबानू. याचें संपूर्ण नांव जलालुद्दीन मुहम्मद अकबर असें होतें. हा चौदा महिन्यांचा असतांना याची आईबापांपासून ताटातूट होऊन हा आपल्या चुलत्याच्या ताब्यांत गेला. पुढें दोन वर्षांनीं हा आपल्या आईबापांस भेटला. लहानपणीं यास अनेक वेळां कडक कैदहि भोगावी लागली व जिवावरचे प्रसंग कित्येक आले; परंतु त्या सर्व संकटांतून याचा बचाव झाला. या संकटांमुळें लहानपणीं याचा विद्याभ्यास मुळींच झाला नाहीं. हुमायुनानें याच्यासाठीं एक शिक्षक ठेविला होता. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. हुमायुनानें याची फारशी काळजी घेतली नाहीं. धामधुमीच्या वेळीं प्रत्यक्ष अनुभवानें मिळणारें शिक्षण मात्र अकबरास बरेंच मिळालें. बुद्धि चलाख असल्यामुळें, अशा शिक्षणाचा यास चांगला उपयोग झाला. बहरामखान हा एकनिष्ठ व शूर असल्यामुळें हुमायुनानें अकबरास त्याच्या स्वाधीन केलें होतें. त्यानें अकबराचें उत्तम प्रकारें पालन केलें. हुमायूनच्या मरणसमयीं अकबराचें वय अवघें तेरा वर्षे तीन महिने इतकेंच होतें. त्यामुळें राज्याचा सर्व कारभार बहरामखान पाहूं लागला. त्या वेळीं दिल्ली व आग्रा या शहरांपलीकडील फारसा मुलूख अकबराकडे नव्हता; परंतु पुढील ५० वर्षांत अकबरानें उत्तर हिंदुस्थानचा सर्व भाग आपल्या अमलाखालीं आणिला, त्यामुळें, व चांगल्या राज्यव्यवस्थेमुळें याची जगांतील थोर राज्यकर्त्यांमध्यें गणना करण्यांत येते.

अवघ्या चौदा वर्षांच्या वयांत अकबरास अनेक संकटांस तोंड द्यावयाचें होतें. पंजाबांत सिकंदरशाह सूर, पूर्वेकडील प्रांतांत मुहम्मदशाह आदिली व हिमू, मध्यहिंदुस्थानांत व राजपुतान्यांत हिंदू राजे, जुने पठाण सरदार व अफगाणिस्थानांतील अंमलदार हे सर्व अकबराचे शत्रु असून ते याच्याशीं लढाई करण्याच्या तयारींत होते. पण अकबरानें वरील सर्व शत्रूंशीं मोठ्या धिम्मेपणानें तोंड देऊन त्यांचें पारिपत्य केलें आणि आपला राज्यविस्तार वाढविला. या वेळेपर्यंत सर्व राज्यकारभार बहरामखानाच्या हातीं होता. पण अकबर व बहरामखान यांस एकत्र काम करण्याचा प्रसंग आल्यावर त्यांचा मतभेद होऊं लागला. बहराम हा निष्ठुर, एककल्ली व खुनशी असून त्यानें अनेक लोकांचीं मनें दुखविलीं होतीं. त्यामुळें पुष्कळ लोकांनीं बहरामविरुद्ध तक्रारी केल्या. तेव्हां अकबरानें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन बहरामास कामावरून बडतर्फ केलें. त्यामुळें बहरामखानानें बंड केलें, पण त्याचा अकबरानें मोड केला. शेवटीं बहराम मक्केस जात असतां एका पठाणानें त्यास ठार मारिलें. स. १५६१ सालीं अकबरानें जेव्हां बहरामखानापासून राज्यकारभार आपल्या हातीं घेतला, तेव्हां याजकडे पंजाब, वायव्येकडील प्रांत, ग्वाल्हेर, अजमीर, लखनौ व अलाहाबादसुद्धां जौनपूरपर्यंत बाकीचा अयोध्या प्रांत एवढा मुलूख होता. नंतर स. १५६२ सालीं यानें

माळवा, विजागड व बऱ्हाणपूर हे प्रांत काबीज केले आणि रावळपिंडीच्या कांहीं भागांतील गखर लोकांचीं बंडें मोडलीं. स. १५६४ मध्यें चुनारचा किल्ला, नरसिंगपूर जिल्हा, व हुशंगाबादचा कांहीं भाग यानें आपल्या राज्यास जोडला. स. १५६५ च्या उन्हाळ्यांत यानें आग्र्याचा किल्ला बांधण्यास सुरवात केली व ३५ लक्ष रुपये खर्च करून आठ वर्षांत तो पुरा केला. स. १५६८ त चितोड व स. १५६९ त जयपूरच्या राजाचा रतनभोर किल्ला यानें काबीज केला. स. १५६९ मध्यें फत्तेपूर-शिक्री हें शहर वसविलें. स. १५७२ पर्यंत बहुतेक रजपूत संस्थानिक याच्या अमलाखालीं आले. याच्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षाच्या अखेरीस याच्या अमलाखालीं पंजाब व काबूल यांसुद्धां वायव्य, मध्य व पश्चिम हिंदुस्थानचा बहुतेक भाग आला होता. पूर्वेस कर्मनाशा ही नदी याच्या राज्याची मर्यादा होती. पुढें स. १५७५ त बहुतेक सर्व बंगाल व बहार प्रांत मोंगल सत्तेखालीं आला. स. १५८१ मधील महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिझिया कर माफ करण्यांत आला. स. १५८४ पासून स. १५९८ पर्यंत याची राजधानी लाहोर ही होती. स. १५८८ मध्यें सिंध प्रांत यानें आपल्या राज्यास जोडला. अशा रीतीनें यानें एकामागून एक असे प्रांत घेऊन उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रदेश आपल्या सत्तेखालीं आणला. दक्षिणेंतील अहमदनगरवरसुद्धां यानें आपली फौज पाठविली होती. पुढें स. १६०० मध्यें अहमदनगर घेऊन खानदेश, वऱ्हाड वगैरे प्रांत काबीज करून स. १६०१ मध्यें हा आग्र्यास परत आला.

याचीं शेवटचीं वर्षें फार त्रासांत गेलीं. याच्या नातलगांपैकीं व मित्रमंडळींपैकीं बरेच लोक एकामागून एक मरण पावल्यामुळें यास फार दुःख झालें. याला मुलांपासून कांहींच सुख झालें नाहीं. याला प्रथम दोन जुळीं मुलें झालीं तीं बालपणांतच मेलीं. याचा तिसरा मुलगा सेलीम ऊर्फ जहांगीर, चौथा दानियाल व पांचवा मुराद. यांपैकीं दानियाल हा हुशार असून हिंदुस्थानींत कविता करीत असे. मुराद हा थोड्याच वर्षांपूर्वी दक्षिणेकडील मोहिमेंत जालना येथें मरण पावला होता, व १६०५ मध्यें दानियाल हाहि त्याच कारणानें मरण पावला. तेव्हां अकबर अगदीं भ्रमिष्ट बनला व आजारी पडून लवकरच आग्रा येथें मरण पावला ( १६ आक्टोबर १६०५ ). याची कबर शिकंदरा येथें आहे. हा अतिसारानें मेला. पण कांहीं लोक म्हणतात, याच्यावर विषप्रयोग झाला होता. पुढें स. १६९१ मध्यें जाट लोकांनीं बंड करून याचें थडगें उकरून याचीं हाडें जाळलीं. हा आजारी असतांना गादीविषयीं तंटे सुरू झाले होते. परंतु सेलीमनेंच गादीवर बसावें, असें अकबरानें अखेरीस ठरविलें.

याला १ मानबाई, २ जोधबाई, ३ खाजाहसनची मुलगी, ४ राठोडबाई अशा चार प्रमुख बायका होत्या. मानबाईपासून खुश्रु, जोधबाईपासून शहाजहान, खाजाहसनच्या मुलीपासून पर्विझ व राठोडबाईपासून शहर्यार असे पुत्र होते. शिवाय सेलीम, मुराद व दानियाल असे पुत्र होते.

हा लठ्ठ व गोरा असून याचें कपाळ रुंद होतें व चेहरा पाणीदार होता. याची राहणी अगदीं साधी असून हा फार नियमितपणें वागे. नेहमीं उद्योगांत निमग्न असे; फार थोडा वेळ झोंप घेई. हा लहानपणीं फार खादाड होता, परंतु हळुहळूं फारच मिताहारी बनला. हा कधीं कधीं मद्य, अफू व गांजा यांचें सेवन करी. मर्दानी खेळ याला फार आवडत. शिकार करण्याचा याला फार नाद होता. हा मोठा शोधक बुद्धीचा असून याला यांत्रिक कलेची आवड होती. यानें अनेक युक्त्या स्वकल्पनेनें बसविल्या होत्या.

मनुष्याचा मूळ धर्म कोणता हें पाहण्यासाठीं यानें कांहीं अगदीं लहान मुलांस एकत्र कोंडून ठेवून तेथें कोणीहि जाऊन बोलूं नये, अशी व्यवस्था केली. पुढें तीन चार वर्षांनीं त्या मुलांस बाहेर काढण्यांत आलें, त्या वेळीं तीं मुकीं असल्याचें आढळून आलें. यानें गंगेच्या उगमाचा शोध केला. यास चित्रकलेची आवड असून त्या कलेस उत्तेजन देऊन यानें तींत अनेक सुधारणा केल्या. यास गाण्याचाहि नाद होता. याच्या वेळेस हिंदुस्थानांत तंबाखू प्रथम आली व यानें ती स्वतः वापरून पाहिली. हा मित्र संपादण्यांत फार कुशल होता. हा स्वतः शिकलेला नव्हता, तरी सर्व प्रकारच्या विद्वान् लोकांशीं फार खुबीनें भाषण करी. तथापि स्वतःची विद्वत्ता बेताचीच असल्यामुळें कोणत्याहि गोष्टीवर याचा सहज विश्वास बसे. याचा मोठा गुण म्हणजे प्रजावात्सल्य हा होय. हा सशक्त व धीट असून निशाण मारण्यांत फार कुशल होता. मृदुपणा व कठोरता यांचें विलक्षण संमेलन याच्या स्वभावांत झालें होतें. तरी एकंदरींत हा दयालू व मनमिळाऊच होता. सरदार व बडे लोक यांवर मात्र याचा वचक होता.

यानें हिंदूंना खूष करण्याकरितां अनेक कृत्यें केलीं. तथापि, याला न आवडणाऱ्या अशा ज्या चाली त्यांच्यामध्यें प्रचलित होत्या त्या यानें बंद करविल्या. बालविवाह, पशुयज्ञ वगैरे बंद केले व पुनर्विवाहास परवानगी देऊन सती जाण्याविषयीं कोणत्याहि बाईवर सक्ती केली जाऊं नये,

असा नियम केला. तसेंच वधूवर व त्यांचे आईबाप यांच्या संमतीशिवाय लग्नें होऊं नयेत, असाहि यानें कायदा केला. मुसलमान व हिंदु यांच्या हाडांमांसाचें मिश्रण झाल्यानें फार फायदा होईल, असें याला वाटलें. परंतु ही योजना तडीस नेतांना मुसलमानी धर्म आडवा आल्यामुळें यानें आपल्या धर्मसमजुतींत फेरफार केला.

प्रथम मुसलमानी धर्माचा अकबर अनादर करी व पुढें तर त्या धर्मावरील त्याचा विश्वासहि उडाला. तेव्हां हा दुसऱ्या धर्माची माहिती करून घेऊं लागला. आत्म्याचें जन्मांतर व त्याचा मूल प्रकृतींत लय होणें, सूर्य व अग्नि यांस परमेश्वराचे अंश मानणें या गोष्टींवर याचा विश्वास बसला, व ख्रिस्ती धर्माकडेहि याचा थोडासा कल दिसूं लागला ( अक्काविया पहा ). तेव्हां सर्व धर्मांतून चांगल्या गोष्टी निवडून घेऊन अकबरानें एक नवीन धर्म स्थापिला. त्याचें नांव 'दीने इलाही' असें ठेविलें व स्वतः त्या धर्माचा पैगंबर झाला. सर्व धर्मांतील चांगल्या चांगल्या तत्त्वांचा यांत समावेश केलेला होता. सर्व जातींच्या लोकांस एकछत्री अमलाखालीं आणावयाचें, हा याचा मुख्य उद्देश होता. पण नवीन धर्म स्थापण्याचें काम यास साधलें नाहीं. याचा नवीन धर्म एकानेंहि मनापासून न स्वीकारल्यामुळें तो याच्याबरोबरच समाप्त झाला. राज्यव्यवस्थेच्या बाबतींत आपल्या नवीन धर्माचा अडथळा येतो, असें दिसतांच आपल्या नवीन धर्माचा प्रचार करण्याचा वेग यानें स्वतःच कमी केला.

यानें आपल्या राज्याचे एकूण मुख्य सोळा सुभे केले होते. जमीनमहसुलाचा महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळें त्यावर तोडरमलसारख्या हुषार माणसाची नेमणूक करून त्याच्याकरवीं जमिनीची मापणी करून तिची प्रतवारी ठरविण्यांत आली; व कुळांकडून रोकड रक्कम घेण्याची वहिवाट यानें प्रचारांत आणली. सामान्यतः उत्पन्नाचा तृतीयांश सरकारांत घेण्याचा प्रघात होता. जमिनीच्या साऱ्याशिवाय शेतकऱ्यास इतर सर्व कर माफ केले आणि गांवें मक्त्यानें देण्याची पद्धतहि बंद करण्यांत आली. हिंदु व मुसलमान यांपासून सारख्या प्रमाणांत कर घेण्यांत यावेत, हिंदूंवर करांचें जास्त ओझें पडूं नये, असें अकबराचें मत होतें. यानें आपल्या लष्कराची व्यवस्था चांगली ठेविली होती. रजपूत राजांस लष्करांत मोठमोठ्या जागा देऊन खूष ठेवलें होतें व विश्वासांत घेतलें होतें. रजपूतांशीं विरोध कायम ठेवून राज्य टिकविणें कठिण आहे असें जुन्या इतिहासावरून लक्षांत घेऊन यानें त्यांच्याशीं विवाहसंबंध करण्यासहि सुरुवात केली.

कित्येकांच्या मतें अकबर औरंगजेबाहूनहि अधिक क्रूर होता. हा गरीब व दयाळू दिसतो, याचें कारण हा रागाच्या आवेशांत क्रूर कर्म करीत नसे, हें होय. आरंभीं व चितोडच्या वेढ्यानंतर अकबरानें कठोर आचरण केलें असलें ( २ उदयसिंग व दुर्गावती पाहा ) तरी पुढील वयांत यानें प्रजाहिताच्या अनेक गोष्टी केल्या. यानें स्वतः दुसऱ्यांच्या बायकांविषयीं अभिलाष धरून त्यांस भ्रष्ट केलें आहे. तथापि व्यभिचार बंद करण्यासाठीं यानें अनेक उपाय योजून मद्यप्राशनाच्या अतिरेकाबद्दल शिक्षा ठरविली. एकंदरींत अकबर हा फार थोर राज्यकर्ता होऊन गेला, यांत शंका नाहीं.

हा गुणग्राही व लोकसंग्रही असल्यामुळें सद्गुणी माणसें याच्यापाशीं जमा झालीं. अबुल फज्ल व त्याचा भाऊ फैजी हे दोघेहि विद्वान् व हुशार इसम अकबरापाशीं होते. फैजी हा मोठा कवि होता, म्हणून त्यास अकबरानें कविराज ही पदवी दिली होती. अबुल फज्ल याची बुद्धिमत्ता फार विलक्षण असून त्यानें आपल्या विद्वत्तेची छाप बादशाहावर बसविली. 'अकबरनामा' नामक एक मोठा ग्रंथ त्यानें लिहिला. त्या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर झालें आहे. याचा सेनापति राजा मानसिंग होता. त्यास 'मिर्झा' म्हणजे 'राजपुत्र' ही मुसलमानी पदवी बादशाहानें दिली होती. राजा तोडरमल या सुप्रसिद्ध पुरुषाकडे अकबरानें जमाबंदीचें काम सोपविलें होतें. त्याचप्रमाणें याच्या पदरीं सुप्रसिद्ध बुद्धिमान् पुरुष राजा बिरबल हा होता. यांशिवाय तानसेनसारखा उत्कृष्ट गवई आणि बदाऊनी नामक हुशार व विद्वान् गृहस्थ याच्या पदरीं होते. यानें लीलावती, जातक, हरिवंश, नलदमयंती वगैरे अनेक ग्रंथांचीं फारशी भाषांतरें करविलीं.

हा सूर्योपासक होता. राजा बिरबलापासून हा सूर्योपासना करण्यास शिकला. याच्या जैन गुरूंपैकीं एकाकडून हा 'सूर्यसहस्रनाम' शिकला. ( V. Smith's *Akbar the Great Mogal*, pp. 164-5, 237; *Sarasvati*, 1912, pp. 289 ff. ), अबुल फज्लनें आपल्या यादींत याचे तीन जैन गुरु दिलेले आहेत. हीरविजय सूरीची आणि अकबराची भेट झाल्यानंतर हीरविजय सूरीनें अकबराजवळ भानुचंद्र यास ठेविलें आणि त्या भानुचंद्राबरोबर अकबर 'सूर्यसहस्रनाम' वाचीत असे, असें कादंबरीवरील भानुचंद्राच्या टीकेच्या शेवटील मजकुरावरून सिद्ध होतें. भानुचंद्राचा शिष्य सिद्धिचंद्र हाहि याचा एक गुरु होता. याच्या जैन गुरूंनीं यास जैन धर्मांतील सांगितलेलीं तत्त्वें यास मान्य असून त्याप्रमाणें हा आचरणहि करी. उदाहरणार्थ, यानें मांसभक्षण करण्याचें सोडून दिलें.

त्यामध्ये सूर्यदेवतेचीं १००० नांवें आहेत, असें अकबराच्या वेळचें एक चक्र उपलब्ध असून, तें इंडियन हिस्टॉरिकल क्वॉर्टर्लीच्या १९३३ च्या मार्चच्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. हिंदु हे सूर्य-उपासक आहेत, आणि वास्तविक पाहतां हिंदूच गुरु अकबरास 'सूर्यसहस्रनाम' शिकविण्यासाठीं पाहिजे होता. असें असतांहि अकबरानें जैन साधूस आपला गुरु केलें. परंतु जैन हे सूर्योपासक नाहींत. तेव्हां याच्या गुरूविषयीं कांहीं जरी असलें तरी अकबर हा सूर्योपासक असून 'सूर्यसहस्रनाम' वाचीत असे, हा त्यांतील मुख्य मुद्दा होय.

वरील माहिती बेंगलोर येथील जैनमुनि श्रीविचक्षणविजय यांच्याजवळ असलेल्या हस्तलिखितावरून मिळाली आहे (*Indian H. Quarterly*, 1933 March, pp. 137–140 ).

**२.** हा औरंगजेबाचा मुलगा होय. कांहीं कारणावरून ह्या दोघांचें बिनसलें व हे एकमेकांपासून वेगळे राहूं लागले. कांहीं दिवसांनंतर यानें औरंगजेबाबरोबर लढाई पुकारली. यानें जर आपल्याकडून दिरंगाई केली नसती तर औरंगजेबाचा पराभव झाला असता. राजपुतान्यामध्यें पराभव झाल्यानंतर हा दक्षिणेंत संभाजीकडे आश्रयाला येऊन राहिला होता. त्याच्या अगोदर हा स्वतंत्र राजा असून यानें आपल्या नांवाचें व शिक्क्याचें नाणेंहि पाडलें होतें.

याचा जन्म औरंगाबाद येथें ११ सप्टेंबर १६५७ त झाला व इराणामध्यें नोव्हेंबर स. १७०६ मध्यें हा मरण पावला.

**३.** हा मोंगल घराण्यांतील जो शहाअलम त्याचा पुत्र होय. हा इंग्रजांकडून नेमणूक घेऊन बादशहा म्हणून दिल्लीस राहत असे. स. १८३७ त हा मरण पावला.

**अकलंकदेव**—अकलंक, अकलंकदेव अथवा अकलंकचंद्र असें यास म्हणत असत. हा एक मोठा तर्कज्ञानी असून जैन धर्मापैकीं दिगंबर पंथाचा होता. याला कवि अशी पदवी होती. यानें समंतभद्राच्या आप्तमीमांसेवर अष्टशती नांवाची टीका लिहिली. जैनांच्या तर्कज्ञानग्रंथांमध्यें याचा हा ग्रंथ फार मोठा समजला जातो. माणिक्यनंदीचा परीक्षामुखसूत्र हा ग्रंथ याच्या न्यायविनिश्चय या ग्रंथावरच उभारलेला आहे. अकलंकानें इतरहि अनेक ग्रंथ लिहिले आहेत. उ० अकलंकस्तोत्र, लघीयस्त्रय, स्वरूपसंबोधन व प्रायश्चित्त. लघुसमंतभद्र हा आपल्या अष्टसहस्रीविषमपदतात्पर्यटीका या ग्रंथांत अकलंकास सकलतार्किकचक्रचूडामणि असें म्हणतो. यानें तत्त्वार्थराजवार्तिक या ग्रंथांत जैनेन्द्र सूत्राचा निर्देश केला आहे असें डॉ. एस्. के. बेलवलकरकृत सिस्टिम ऑफ दि संस्कृत ग्रामर या पुस्तकांत म्हटलें आहे ( पा. ६३ ).

पांडवपुराणांत अशी एक दंतकथा आहे की, अकलंकाचा एका बुद्ध तर्कज्ञान्याशीं वादविवाद चालला असतां याच्या प्रतिस्पर्ध्यास त्याच्याजवळ असलेल्या भांड्यांतील मायादेवी मदत करीत आहे. ही गोष्ट याला कळतांच यानें त्या भांड्यास लाथ मारून तें उपडें केलें व अशा रीतीनें आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या स्फूर्तीस आळा घातला.

अकलंकाचा धर्मकीर्तीबरोबर निर्देश केला जातो. हा राष्ट्रकूट राजा शुभतुंग अथवा पहिला कृष्णराज याचा समकालीन होता. हा स. ७५० च्या सुमारास होऊन गेला. ( सतीशचंद्र विद्याभूषणकृत हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक, पा. १८५-१८६ ).

यानें कांची येथील हिमशितल राजाच्या दरबारांत बौद्धांचा पराभव केला. या पराभवानें दक्षिणेंतून बौद्धांची हकालपट्टी झाली ( रामस्वामी आयंगारकृत दक्षिणेंतील जैनधर्माचा इतिहास ). हें वरील पांडवपुराणांतील दंतकथेवरून लिहिलेलें दिसतें.

**अकंपित**—महावीर नांवाच्या चौविसाव्या तीर्थंकराचा शिष्य.

**अक्कादेवी**—कल्याणीच्या चालुक्य राजघराण्यांतील दुसऱ्या जयसिंहाची वडील बहीण. हिचा उल्लेख बऱ्याच कागदपत्रांतून व अंकित लेखांतून सांपडतो. हिला 'गुणदबे डंगी' ( सद्गुणांची नवलाई ) व 'एकवाक्ये' ( एकवचनी ) अशीं विशेषणें लावलेलीं आहेत. शिवाय 'लढाईंत आणि शत्रुपक्षीय राजांना मारण्यांत भैरवी' असें हिचें वर्णन केलें आहे. स. १०२१ किंवा १०२२ मध्यें दुसऱ्या जयसिंहाच्या सार्वभौमत्वाखालीं किसुकाड ( सप्तती ) वर ही राज्य करीत होती. ( इं. अँ. पु. १८ पा. २७५ ). पुढें पहिल्या सोमेश्वराच्या अमदानींतसुद्धां ही अधिकारारूढ असलेली दिसते. कारण, स. १०४७ च्या एका लेखांवरून बेळगांव जिल्ह्यांतील गोकागे ( गोकाक ) च्या किल्ल्याला वेढा देऊन बसलेली आढळते ( विजापुर जिल्ह्यांतील अरसिबिडी येथील शिलालेख ). स. १०५० किसुकाड ( सप्तती ), तोरगरे ( पद ) आणि मासवाडि ( एकशतचत्वारिंशत् ) या मुलुखावर हिचें राज्य होतें ( धारवाड जिल्ह्यांतील सूडि गांवचा शिलालेख ). पुनः स. ११५३ किसुकाड ( सप्तती ) वर हिच्या वर्चस्वाचा उल्लेख आढळतो ( अरसिबिडी येथील दुसरा एक शिलालेख ) व त्याच लेखांत विक्रमपुर ( हल्लीचें अरसिबिडी गांव, हुनगुंद तालुका,

विजापुर जिल्हा ), ही हिची राजधानी असल्याचें ध्वनित होतें. स. १०६६ मधील जी एक नोंद आहे तींत बनवासी ( द्वादशसहस्र ) आणि पानुंगल ( पंचशत ) यांचा अधिपति, कादंब महामंडलेश्वर तोयिमदेव याची मातोश्री म्हणून अक्कादेवीचें नांव आहे ( धारवाड जिल्ह्यांतील होत्तूर गांवचा शिलालेख ). त्यावरून हिचा नवरा हानगळच्या कदंबांपैकीं असावा, असें दिसतें. पण त्याचें नांव मात्र सांपडत नाहीं.

( बॉम्बे ग्या. दि डिनॅस्टीज ऑफ दि कनरीज डिस्ट्रिक्ट ऑफ बॉंबे, पु. १. भा. २. पा ४९५ ).

**अक्काविया**—मध्यंतरीं अकबराचा कल थोडासा ख्रिस्ती धर्माकडे होता. तेव्हां एवढ्या मोठ्या बादशहास आपल्या धर्मांत ओढण्याची ही संधि चांगली आहे असें वाटून पोर्तुगीज सरकारनें अक्काविया, हेन्रीक व मान्सेराट अशा तिघा असामींस फत्तेपूर-शिक्रीस पाठविलें. त्याचा परिणाम जरी अकबराचें धर्मांतर होण्यांत झाला नाहीं, तरी पण अकबराच्या विचारांत अक्काव्रियाच्या सान्निध्यानें थोडासा बदल झाला (मु. रि. भाग २ रा. पृ. ९५ व १०५).

**अखंडानंदसरस्वती**—यानें तत्त्वदीपन नांवाचा शंकराचार्यांच्या मताचा ग्रंथ लिहिला.

**अगस्त्य**—प्राचीन कवि. हा जातीनें शूद्र असून पुराणप्रसिद्ध अगस्त्य ऋषीचा हा अवतार होता, असें कांहींचें मत आहे. तामिळ भाषेचें व्याकरण प्रथम यानेंच रचिलें. व त्यामुळें त्या व्याकरणास ' अगस्त्य-व्याकरण ' हें नामाभिधान लावतात. न्याय, वैद्यक, रसायनशास्त्र इत्यादिकांवरहि याचे पुष्कळ ग्रंथ आहेत, असें म्हणतात. वर जो याचा काल दाखविला आहे, तो डॉ. कॉल्डवेल यांच्या मतानुसार आहे, अशी माहिती ग्यारेट कोश वगैरे ग्रंथांवरून अर्वाचीन कोशकारानें दिली आहे.

**अग्निमित्र**—मगधच्या शुंग घराण्यांतील पुष्यमित्राचा हा मुलगा होय.

स. पू. १७० मध्यें हा विदिशा ( भेलसा ) येथील सुभेदारीवर होता. त्या वेळीं यानें यज्ञ-सेन शातकर्णी याचा पराभव केला. पुढें स. पू. १४८ मध्यें हा आपला बाप पुष्यमित्र हा मरण पावल्यावर गादीवर आला.

स. पू. १४० त अग्निमित्र मरण पावला व याच्यानंतर सुज्येष्ठ हा मगध देशांत राज्य करूं लागला ( बार्नेट ).

विदर्भ देशचा राजा यज्ञसेन याची मुलगी मालविका हिच्याशीं याचें लग्न ठरलें होतें. परंतु ही गोष्ट मालविकेच्या माधवसेन नांवाच्या भावास पसंत न पडून त्यानें मालविकेला आणण्याकरितां अग्निमित्रानें पाठविलेल्या सैन्यावर हल्ला केला. त्यांत मालविका पळून अग्निमित्राकडे आली. परंतु तिला कोणींच न ओळखल्यामुळें धारिणी राणीनें तिला आपल्याजवळ ठेविली व तिला नृत्य शिकवण्याची व्यवस्था केली. पुढें विदूषकाच्या मध्यस्थीनें यानें तिचें नृत्य पाहिलें व हा खूष झाला. पुढें तिच्या भेटीचा योग विदूषकानें दोनदां जुळवून आणला. परंतु इरावती राणीनें विघ्न उपस्थित केल्यामुळें तो बेत सफल न होतां तिला धारिणी राणीनें तुरुंगांत टाकलें. पुढें विदर्भ देश जिंकण्याकरितां गेलेल्या सैन्याचा जय झाला व त्यांतील दूतांनीं मालविकेला ओळखल्यामुळें तिची तुरुंगांतून सुटका झाली व अग्निमित्रानें तिच्याशीं विवाह केला, अशी कथा कालिदासाच्या मालविकाग्निमित्रांत आहे. परंतु यांत काव्य किती आणि ऐतिहासिक सत्य किती, याचा उलगडा करण्यास साधन नाहीं.

**अग्निशर्मा**—ईश्वर कृष्णाचें नामान्तर.

**अचबेसिंग**—हा यशवंतरावाच्या एका रक्षेचा पुत्र असून अतिशय शूर होता. यशवंतराव होळकरास यानें प्रत्येक मोहिमेंत मदत केली होती ( म. रि. उ. वि. ३ पृ० ३५२).

**अचलोजी मोहिते**—सुवर्णदुर्गाचा किल्लेदार. हबशांशीं लढतांना कच खाऊन किल्ला ताब्यांत देऊं लागला, तेव्हां तुकोजी आंग्रे यानें पराक्रम करून किल्ला संभाळला म्हणून किल्लेदारी त्याच्याकडे गेली.

**अर्चेतिपा**—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं अडतिसावा सिद्ध ( सिद्ध पाहा ). हा जातीनें लकडहारा होता. धनिरूप ( ? ) हें याचें राहण्याचें ठिकाण होय. यानें तीर्थिकचंडालिका नांवाचा ग्रंथ लिहिला आहे ( त. ४८-६७ ).

**अच्युत नायक**—हा यादव घराण्यांतील रामचंद्र यादवाचा एक संस्थानिक. हा ब्राह्मण असून यानें दिलेल्या देणग्यांचा उल्लेख ठाणें येथील शिलालेखांत आढळतो ( रा. गो. भांडारकरकृत अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन, पा. १६२ ).

**अच्युतप्पा नायक**—हा सेवाप्पा नायकाचा पुत्र. हा तंजावरचा एक नायक होय. याचा मुलगा प्रसिद्ध रघुनाथ नायक यानें विजयानगरचा वेंकटपतिदेवराय २ रा याला वेळोवेळीं मदत केली. बापाच्या उतारवयांत हाच कारभार पाहत असे. यानें सोनारांना कांहीं जमिनी इनाम दिल्या.

**अच्युतराय**—हा विजयानगरच्या तुळुव घराण्यांतील कृष्णदेवरायाचा सावत्र भाऊ होय. हा नरसा किंवा नरसिंह यास अंबाबिकेच्या पोटीं झाला. याला रंगराय नांवाचा एक सख्खा भाऊ होता. याचा काल स. १५३० ते १५४१ असा आहे.

याला व याच्या दुसऱ्या बंधूंना व एका पुतण्याला, फंदफितुरी होऊं नये म्हणून, कृष्णदेवरायानें चंद्रगिरीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. हा गादीवर बसतो न बसतो तोंच अपशकुनादाखल, रायचूर व मुदगल हे सरहद्दीवरील महत्त्वाचे किल्ले हातचे गेले. यानें क्रूर व जुलमी वर्तनानें सारी प्रजा व स्नेही यांचीं मनें विटविलीं. याचा उपजत भागूबाईपणा साऱ्या साम्राज्यभर महशूर होऊन गेला. 'याचें वर्तन व राज्यकारभाराची तऱ्हा यांच्यामुळें दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदु लोकांचा अधिकार व राजकारण यांचा समूळ नाश होण्याला साधन होऊन, परकीयांना साऱ्या देशांत धुमाकूळ घालण्याला चारी वाटा मोकळ्या झाल्या. पुरता उच्छेद पाहण्याला मात्र हा उरला नाहीं.' वगैरे वर्णन 'नुनीज'नें याच्याविषयीं केलें आहे. कृष्णरायाचा मुख्य मंत्री जो 'साळुवा तिम्मा' तोच याचा प्रधान होता. साळुवा तिम्मानंतर रामराय हाच मुख्य प्रधान झाला. याच्या कारकीर्दीत मंत्री प्रबल होऊन राजा नुसता नामधारी बनला. याला मुसलमानांशीं सारखें झगडावें लागलें.

यानें देवस्थानांना बऱ्याच देणग्या दिल्या आणि पुष्कळसा धर्मादाय केला. याच्या वेळीं विठ्ठलरायाचें मंदिर बांधलें गेलें. हा स. १५४१ मध्यें मरण पावला व याच्यानंतर याचा पुत्र वेंकट १ ला हा विजयानगरच्या गादीवर आला. पण तो १ वर्षभरसुद्धां गादीवर नव्हता (एक नष्टस्मृतिसाम्राज्य).

**अच्युत रावजी मोडक**—हा एक संस्कृत कवि होय. हा नाशिक मुक्कामीं राहत असे. रघुनाथभट्टजी हे त्यांचे गुरु होत. याची कृष्णलीला म्हणून संस्कृत कविता मनोवेधक आहे. शिवाय इतर सुंदर काव्यें बरींच आहेत. त्र्यंबकराज बाबा गोसावी–नाशिककर हे याचेच शिष्य होत.

याचा जन्म शके १७०० मध्यें झाला व वयाच्या ५५ व्या वर्षी शके १७५५ मध्यें नाशिक क्षेत्रींच मरण पावला, असें लोक सांगतात.

**अच्युताश्रम**—हा एक कवि होता. याचा 'वैरागर' नांवाचा एक (व्याकरण) ग्रंथ अप्रकाशित आहे. तो अपूर्ण असून त्याची प्रत आपचंद मठांत आहे. याच्या गुरूचें नांव सहजानंद असें होतें. हा कवि श्रीएकनाथकालीन होता (मं. श. १८३५ वा. इ. ले. ३०).

२. हे स्वतःस चिदानंदानुचर म्हणवितात. यावरून यांचे गुरु चिदानंद. यांचे शिष्य गोपाळ याज्ञवल्की (कृष्ण याज्ञवल्कीचे पुत्र). यांचे विनंतिवरून शिवकल्याणांनीं अनुभवामृतटीका रचली (श. १५५७).

ग्रंथ—भगवद्गीता (१६१४ ?), ब्रह्मकथा, रामवोवीया (सं. सू.). (४ ब्रह्मानंद पाहा).

**अजमशाह**—हा औरंगजेबाचा दुसरा मुलगा. यासच अजम असेंहि म्हणत. लहानपणीं यानेंच औरंगजेबाच्या आज्ञेनुसार झोंपलेल्या मुरादचा खंजीर काढून आणला होता. सातारचा किल्ला प्रयागजी लढवीत असतां शेवटीं तो औरंगजेबाच्या स्वाधीन करणें त्यास भाग पडलें. याची मेहनत त्याला उपयोगी पडली म्हणून किल्ल्याचें नांव अजीमतारा असें ठेवण्यांत आलें.

हा जरी वडील मुलगा नव्हता, तरी पण हा मुसलमान स्त्रीपासून औरंगजेबास झाला असल्यामुळें बादशहाचे पश्चात् यासच गादी मिळवून द्यावी, असें रोशनआरा हिला वाटत होतें. कारण त्यामुळें तिचें महत्त्व कायम राहणार होतें. त्याप्रमाणें तिनें मोठमोठ्या अमीर उमरावांना अनेक पत्रें लिहिलीं व बादशहा बेसावध असतां एक दिवस त्याच्या बोटांतील आंगठी काढून तिनें तीं पत्रें मोर्तब केलीं. पण औरंगजेब बरा झाल्यावर त्याला आपल्या बहिणीचा या बाबतींत जबर संशय येऊं लागला. ही सर्व खटपट केवळ यास गादीवर बसविण्यासाठींच होती.

पुढें औरंगजेबाचे पश्चात् गादीविषयीं तंटे होऊन वडील भाऊ मुअज्जम व हा यांचें आग्रा येथें निकराचें युद्ध झालें, त्यांतच हा शत्रूकडून मारला गेला (मु. रि. भाग २ पृ. २७६ व ३८६).

**अजयदेव**—हा माळव्याच्या दुसऱ्या जयवर्म्याचा महाप्रधान होता. याला तेथें राजा असें म्हटलें आहे.

**अजयदेव चव्हाण**—हा चव्हाण घराण्यापैकीं तिसऱ्या दुर्लभराजाचा मुलगा. यानें स. ११०० च्या सुमारास अजमेर येथें राज्य स्थापन केलें. याच्या पत्नीचें नांव सोमलादेवी. यानें आपल्या व पत्नीच्या शिक्क्यांचीं नाणीं पाडलीं होतीं (स्मिथ).

**अजयपाल**—(स. ११७३–११७७) गुजराथच्या (सोळंकी) चालुक्यवंशांतील कुमारपालानंतरचा राजा. याच्या बापाचें नांव महीपाल. कुमारपाल निपुत्रिक मेल्यामुळें अजयपाल हा त्याच्या भावाचा पुत्र विक्रमसंवत् १२२९ मध्यें गादीवर आला (द्याश्रयकाव्य व वेरावळ येथें असलेला पाटणचा अंकित लेख पाहा). कुमारपालप्रबंधांत म्हटलें आहे कीं, कुमारपालाच्या मनांत आपल्या मुलीचा मुलगा प्रतापमल्ल यास राज्य द्यावयाचें होतें. पण अजयपालानें बंड करून विषप्रयोगानें कुमारपालाचा खून केला. सुकृतसंकीर्तनाचा कर्ता लिहितो कीं, अजयपालाच्या

दरबारीं असलेलें रुप्याचें छत सपादलक्षा( शिवालिक )च्या राजाकडून आलेली नजर होती. जैन ग्रंथांत याचा उल्लेख सांपडत नाहीं. कारण हा जैनधर्माच्या विरुद्ध होता. कीर्तिकौमुदींत अजयपालाचा केवळ नांवाला उल्लेख आला असून प्रबंधचिंतामणिकारानें तर अजयपालानें आपल्या चुलत्यानें बांधलेलीं जैन देवालयें उध्वस्त केलीं, असें स्पष्टच म्हटलें आहे. आंबडा वगैरे कुमारपालाचे जैन अमात्य याच्या मर्जीत नव्हते. अजयपाल हा निर्दय व गर्विष्ठ स्वभावाचा होता, असें दिसतें. उदयपूरच्या अंकित लेखांत स. ११७३ च्या सुमारास सोमेश्वर हा अजयपालचा कारभारी होता, असा उल्लेख आहे. यानें कपर्दि नांवाच्या इसमास तो ब्राह्मणानुयायी होता म्हणून आपला कारभारी नेमलें होतें. पण त्याचें पटेनासें झालें, तेव्हां यानें त्याला उकळत्या तेलाच्या कढईत टाकण्याचा हुकूम केला. दुसऱ्या एका प्रसंगीं यानें रामचंद्र नांवाच्या जैन पंडितास तांब्याच्या तापलेल्या पत्र्यावर बसण्याची शिक्षा दिली. उपर्युक्त आम्रभट ऊर्फ आंबडा नामक याच्या सरदारानें याचा हुकूम मान्य करण्याचें नाकारल्यानें दोघांची लहानशी लढाई होऊन आंबडा मारला गेला. मेवाडचा राजा सामंतसिंह याच्याबरोबर झालेल्या युद्धांत हा जखमी झाला. पण त्या वेळीं आबूच्या प्रल्हादन परमारानें गुजराथचें संरक्षण केलें ( ना. प्र. प. १ पा. १७८ ). संवत् १२३३ ( स. ११७६ ) मध्यें अजयपालाच्या विजलदेव नांवाच्या द्वारपालानें खंजीर खुपसून याचा वध केला. अजयपाल मुसलमान झाला होता, हें टॉडचें विधान खरें मानण्यास सबळ पुरावा पाहिजे. याच्या पश्चात् याचा पुत्र दुसरा मूळराज हा पाटणच्या गादीवर बसला. मूळराज अल्पवयस्क असल्यामुळें त्याची आई नैकीदेवी कादंबराजा परमादि ( स. ११४७–११७५ ) याची कन्या ही सर्व कारभार पाहूं लागली, व तिचा भाऊ भीमदेव हा सेनापति झाला. भीमदेव हा मोठा शूर होता. परंतु दोन वर्षांच्या आंतच बालवयी मूळराजा मरण पावला ( बॉंबे गॅझेटियर, गुजराथ; यशःपाल पाहा ).

**अजयवर्मा**—माळव्याच्या परमारांपैकीं यशोवर्म्याचा दुसरा पुत्र. हा जयवर्म्याचा उत्तराधिकारी होता किंवा त्याचें राज्य यानें घेतलें होतें हें समजत नाहीं. याच्या वेळेपासून माळव्याच्या परमारांच्या दोन शाखा झाल्या. मोठ्या शाखेचे लोक आपणांस माळव्याचे स्वामी मानीत होते, आणि छोट्या शाखेचे आपणांस महाकुमार म्हणवीत असत. महाकुमार उदयवर्म्याचे वि. सं. १२५६ ( स. १२०० ) मधील दानपत्रांत म्हटलें आहे कीं, 'परमभट्टारक महाराजाधिराज परमेश्वर जयवर्मा यांचें राज्य नष्ट झाल्यावर महाकुमार लक्ष्मीवर्म्यानें आपल्या तलवारीच्या जोरावर राज्य कमावलें.' यावरून असें अनुमान निघतें कीं, अजयवर्म्यानें जयवर्म्याचें राज्य घेतलें त्या वेळीं लक्ष्मीवर्मा हा जयवर्म्याच्या पक्षांत होता व त्यानें राज्याचा कांहीं भाग ताब्यांत घेतला होता. महाकुमार हरिश्चंद्रवर्माच्या दानपत्रांत जयवर्म्याच्या कृपेनें राज्य मिळाल्याचा निर्देश वरील म्हणण्याला पोषक आहे. अजयवर्म्याचा पुत्र विंध्यवर्मा हा नंतर गादीवर आला ( रा. इ. पा. १९७-१९८ ).

**अजयसिंह**—( इ. स. १२९०–१३०१ ) चितोडच्या राणा लखमसीच्या पश्चात् चितोडचा खरा वारस अजयसिंह हा मेवाडच्या पश्चिम सरहद्दीवर अरवली डोंगराच्या खोऱ्यांत केळवाडा नामक जें स्थळ आहे तेथें जाऊन राहिला. लखमसीनें जोहारास निघते समयीं जयसिंगास असें सांगितलें होतें कीं, तूं वृद्ध होऊन राज्य पाहण्यास असमर्थ होशील तेव्हां मागून तुझा वडील भाऊ अरिसिंग हा प्रारंभीं या लढाईत मेल्यामुळें त्याच्या पुत्रास ( हंमीरास ) राज्यावर बसीव. अलाउद्दीनाच्या हातीं चितोड आल्यावर तो कांहीं दिवस तेथें राहिला व तेथील देवळें वगैरे उध्वस्त करून त्यानें तो झालोरच्या मालदेव नांवाच्या आपल्या एका सामंताच्या स्वाधीन केला. मेवाडांत दिल्लीचे शिपाई व स्वार जिकडे तिकडे रक्षणास ठेविले होते. त्यांच्याशिवाय अजयसिंहास डोंगरांतील भिल्ल वगैरे लोकांच्या नायकांशींहि झगडावें लागे. या सर्वांत मूंजा भिल्ल म्हणून एक अतिशय बलिष्ठ नाईक होता. त्यानें एकदां शेरोनाल्यावर स्वारी करून अजयसिंहाच्या मस्तकावर भाल्याचा वार केला. यास सज्जनसिंह व क्षेमसिंह असे अनुक्रमें दोन पुत्र होते, परंतु ते या संकटप्रसंगीं कामास आले नाहींत. म्हणून अजयसिंहानें हंमीर अजोळीं होता त्यास बोलावणें पाठविलें व मूंजाचा सूड घेण्याची त्यास आज्ञा केली. तेव्हां थोड्याच अवधींत हंमीरानें मूंजाचें शिर कापून आपल्या चुलत्यापुढें ठेवलें. तेव्हां अजयसिंह खूष झाला व 'तुझ्या कपाळीं दैवानें साम्राज्योपभोग लिहिला आहे' असें म्हणून त्यानें आपल्या पुतण्याच्या कपाळीं रक्ताचा टिळा लावला. याच्या पुत्रांपैकीं धाकटा लवकरच केळवाडा येथें मरण पावला. दुसऱ्या सज्जनसिंहानें राज्याकरितां हंमीराशीं भांडूं नये म्हणून त्यास यानें हद्दपार केलें. हद्दपार केल्यावर सज्जनसिंह दक्षिणेस आला व पुढें त्याच्याच कुलांत शिवाजी झाला. मेवाडच्या बखरींत अजयसिंहापासून शिवाजीपावेतों अजयसिंह, सज्जनसिंह, दलीपसिंह,

शिवजी, भोराजी, देवराज, उग्रसेन, माहूलजी, खेलजी, जनकोजी, सटवाजी, संभाजी आणि नंतर छत्रपति शिवाजी असा वंशवृक्ष दिला आहे. लोकहितवादींनीं माहूलजीच्या जागीं मालोजी व संभाजीच्या जागीं शहाजी अशीं निराळीं नांवें दिलीं आहेत ( रा. इ. पा. ५१४ ).

२. त्रिपुरीच्या कलचुरी घराण्यापैकीं हा विजयसिंहाचा मुलगा.

**अजातशत्रु**—हा शिशुनागवंशांतील राजा. पुराणांत भविष्यकालीन म्हणजे भारतीय युद्धोत्तरकालीन राजे सांगतांना याचा निर्देश आला आहे. ब्रह्मांडपुराणांत हा विंधिसाराचा पुत्र दिला असून विष्णुपुराणांत बिंदुसाराचा म्हणून दिला आहे. मत्स्यपुराणांत भूमिमित्राचा पुत्र आणि वायुपुराणांत क्षेमवर्मन्‌चा पुत्र म्हणून दिला आहे. जैन ग्रंथांत याच्या आईचें नांव वैदेही असें दिलेलें आढळतें.

याला कूणिक किंवा कूणिय अशीं नामान्तरें आहेत. याचा पिता बिंबिसार यानें आपल्या वृद्धापकाळीं राज्य याच्या स्वाधीन केलें, अशी जैन ग्रंथांत दंतकथा आहे. पण राज्य मिळविण्याच्या उत्कण्ठेनें यानें पित्याचा वध केला, असें बौद्ध व ब्रह्मी दन्तकथा प्रतिपादन करितात. पुराण बौद्ध-कथांत हें कृत्य गौतमबुद्धाचा शालक देवदत्त याच्या चिथावणीवरून झालें, असें सांगितलेलें आढळतें ( व्हीस डेव्हिड्स, बुद्धिस्टिक इंडिया ). अखेरीअखेरीस व्हि. स्मिथचें, अजातशत्रूच्या पितृवधाची हकीगत बनावट असावी, असें मत झालें होतें ( ऑक्स्फर्ड हिस्टरी ऑफ इंडिया पाहा ). मात्र एवढें खरें कीं, बापाला तुरुंगांत टाकून यानें राज्य बळकावलें आणि तो तुरुंगांतच मेला.

बिंबिसाराच्या कारकीर्दीत वर्धमान महावीर व गौतम बुद्ध हे महान् धर्मसंस्थापक मगध देशांत स्वमतप्रचार करीत होते. महावीर हा अजातशत्रूच्या आईचा एक जवळचा आप्त होता. महावीर व गौतम बुद्ध हे दोघेहि अजातशत्रूच्या कारकीर्दीतच निवर्तलेले दिसतात. सामञ्ञ फळसुत्तांत अजातशत्रु व गौतमबुद्ध यांच्या भेटीची कथा आहे. त्यांत अजातशत्रूनें आपल्या पितृघाताच्या अपराधाबद्दल पश्चात्ताप दर्शवून बुद्धावर आपली असलेली भक्ति व्यक्त केल्यावरून गौतमानें याला क्षमा केली, असें वर्णन आहे. बर्हुतस्तूपावर या प्रसंगाचें चित्र आहे.

कोसल राजाची बहीण अजातशत्रूची सावत्र आई होती. ती नवऱ्याच्या खेदप्रद मृत्यूनें दुःख पावून मृत्यु पावली. तेव्हां कोसल राजा अजातशत्रूवर चालून आला. पुष्कळ दिवस लढाई चालून शेवटीं यानें कोसलावर मात केली व कोसल राजकन्येचें पाणिग्रहण करून त्याच्याशीं तह केला ( ज्ञा. को. बुद्धोत्तर जग पा. १६८ पाहा ).

या जयानें अजातशत्रूची आकांक्षा न शमतां यानें गंगेच्या उत्तरेकडील-हल्लीं ज्याला तिरहूत म्हणतात त्या-लिच्छवींच्या राज्यावर स्वारी केली. या देशाची राजधानी वैशाली असून तेथील राजकन्या अजातशत्रूची आईच होती. तरी यानें अजोबाचा मुलूख आपल्या ताब्यांत घेतला. पुढें यानें हिमालयाच्या पायथ्यापर्यंतचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला, व अशा रीतीनें गंगा व हिमालय यांमधील भाग मगध राजाच्या अंकित करून सोडला. यानें लिच्छवींना अटकाव करण्याकरितां शोणतीराच्या उत्तरेस त्याच्या गंगेशीं होणाऱ्या संगमाजवळ पाटली गांवीं एक किल्ला बांधला; व पुढें याचा नातू उदय यानें पाटली नगराची स्थापना केली. पुढें हें नगर कुसुमपुर, पुष्पपुर किंवा पाटलीपुत्र या नांवानें प्रसिद्धीस आलें; मौर्यांच्या अमदानींत हें मगधाचेंच नव्हे तर अखिल भारताचें केन्द्र बनलें. या नगररचनेचा निर्देश पुराणांत आहे.

अजातशत्रु सुमारें स. पू. ५२७ मध्यें वारला. पण परंपरागत महावीर निर्वाणाशीं ( ५२७ ) हा काळ जमत नाहीं. खारवेलच्या शिलालेखामुळें सर्व शैशुनागांचा काळ मागें गेला आहे. पण त्यावरूनहि नीट उलगडा होत नाहीं. बार्नेटनें बापाच्या खुनाचा काळ स. पू. ५०० व याच्या मृत्यूचा काळ स. पू. ४७५ हा दिला आहे.

बिहार-ओरिसा रिसर्च सोसायटीच्या जर्नल ( स. १९१९ डिसेंबर ) च्या अंकांत रा. के. पी. जयस्वाल यांनीं राजा अजातशत्रूची मूर्ति शोधून काढल्याचें वृत्त दिलें आहे ( मॉडर्न रिव्ह्यू, फेब्रुवारी १९२० ). पूर्वी ही यक्षाची मूर्ति म्हणून समजत. पण त्या मूर्तीच्या आसनावर एक लेख आहे. त्यांत सेनि ( श्रेणि ) अज ( ात ) शत्रू कुणिक सेवासिनगो ( शिशुनाग ) मगधनम् राज इत्यादि अक्षरें स्पष्ट आहेत. त्यांवरून शंका घेण्याचें कारण नाहीं, असें जयस्वाल यांनीं दाखविलें आहे. आनंदाच्या स्मरणावर यानें स्तूप उभारला.

हा राजा झाल्यावर आठ वर्षांनीं बुद्ध मरण पावला. यानें एकूण ३२ वर्षे राज्य केलें. जेव्हां जैन धर्माचा मुख्याधिकारी सुधर्मन् हा याच्या शहरास भेट द्यावयास आला, तेव्हां हा स्वतः अनवाणी शहराबाहेर गणधर पाहण्याकरितां गेला. बिंबिसारच्या मृत्यूनंतर यानें आपली राजधानी चंपा शहरीं नेली. पण याच्या मृत्यूनंतर याचा मुलगा उदायीन यानें तेथून बदलून पाटलीपुत्र ही आपली राजधानी केली. यानें प्रथम महावीराला आश्रय दिला होता.

पण नंतर यानें बुद्धाला आपला आश्रय दिला होता. जैन लोक याला ' कूनीय ' या नांवानें संबोधतात.

हा एकदां आपला मुलगा उदय किंवा उदायीन याला आपल्या मांडीवर घेऊन जेवावयास बसला असतांना उदायीन याचे ( कूनीय ) ताटांत मुतला. या गोष्टीकडे अजातशत्रूनें दुर्लक्ष केलें आणि आपलें जेवण तसेंच पुढें चालूं ठेविलें. त्या वेळीं याची आई चेल्लना याचे शेजारीं बसली होती. तेव्हां कूनीय आईला म्हणाला, ' आई ! माझ्याइतकें प्रेम, दुसऱ्या कोणत्याहि बापानें आपल्या मुलावर केलें आहे काय ? ' तेव्हां आईनें उत्तर दिलें, ' ए मूर्खा ! ज्या वेळीं तूं जन्माला आलास, त्या वेळीं मी तुझा अव्हेर केला आणि तुला अशोक झाडामध्यें लपवून ठेविण्यास सांगितलें. ही बातमी तुझ्या बापास मिळतांच त्यानें स्वतः आपणास अशोक झाडामध्यें लपवून घेतलें आणि तुझी मुक्तता केली. आणखी दुसरी एक अशाच प्रकारची गोष्ट आहे. एकदां तुझें बोट नासलें होतें. त्यामुळें तुला वेदना होत होत्या. तेव्हां तुझा बापानें तुझें बोट, रक्त आणि पू वाहत असतांही, आपल्या तोंडांत धरलें, कारण तुला वेदना होऊं नयेत. ' हें आईचें भाषण ऐकल्यावर कूनीयला आपण आपल्या बापास विनाकारण कैद केल्याबद्दल पश्चात्ताप झाला व याच्या मनांत आपल्या बापाविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला अशी माहिती चंदुलाल शहाकृत जैनिझम इन नॉर्थ इंडिया या पुस्तकांत आढळते.

**अजितनाथ**—हा जैनांचा दुसरा तीर्थंकर होय ( तीर्थंकर पाहा ).

**अजितसिंग**—(स. १६७८-१७३१) हा मारवाडच्या यशवन्तसिंगाचा पराक्रमी मुलगा. फर्रुखसियर गादीवर असतांना त्यानें यास पुढील आशयाचें एक पत्र धाडलें. ' तुम्हीं हुसेन सय्यदास मारून टाकावें म्हणजे त्याची सर्व संपत्ति आम्हीं तुम्हांस देऊं ! ' वास्तविक अजितसिंग ह्यानें बादशाहीचा सुभा हस्तगत केला म्हणून याच्यावर स्वारी करण्याकरितां बादशहानें सय्यदास पाठविलें व आंतून अजितसिंगास वरील पत्र लिहिलें. परंतु अजितसिंगानें सय्यदाचा पाडाव न करितां तहच केला व बादशहास आपला मुलगा व मुलगी दिली. मुलीला मुसलमानी दीक्षा ( स. १७१५ ) देण्यांत आली. मुलास बादशहाच्या तैनातीस ठेविला. पुढें कांहीं वर्षांनीं यानें व याच्याच मुलांनीं गुजराथ व मोंगलांचा बराच मुलूख काबीज केला. हा मोठा कपटी व स्वार्थी होता.

ता. २३-२-१७३१ मध्यें बादशहा व सय्यद यांची भेट ज्या वेळेस सरकारवाड्यांत झाली, त्या वेळेस सबंध रात्र हा त्यांच्याजवळ जाग्रण करून होता. याच्या सांगण्यावरून सय्यदानें जिजिया कर पुढें बंद केला. याच्या मुलानें ( अभयसिंग ) पिलाजी गायकवाडाचा खून केला. हा पुढें आपल्या मुलाच्या हस्तें मारला गेला. यानें बादशहाचा भरपूर सूड घेतला. कारण बादशहानें याच्या बापास वाईट रीतीनें वागविलें होतें ( म. रि. म. १, पृ. ७६-९१ ).

**२.** बुंदी संस्थानचा हा एक राजा होय. हा, याच घराण्यांतील उमेदसिंग याच्यानंतर गादीवर आला.

याच्या हातून उदेपूरचा राणा शिकारीच्या वेळीं चुकीनें मारला गेला. त्यामुळें ह्या दोन घराण्यांत हाडवैर आलें. स. १८१८ सालीं हें संस्थान ब्रिटिश अंमलाखालीं आलें.

**अजितसेनाचार्य**—या जैन ग्रंथकारानें अलंकारचिंतामणि व यक्षसेनाच्या चिंतामणीवर चिंतामणिप्रकाशिका टीका असे दोन ग्रंथ संस्कृतांत लिहिले आहेत ( चावुण्डराय व राजमल्ल पाहा ).

**अजितापीड**—प्रदीपकार कैयटाच्या वेळीं असलेला काश्मीरचा राजा.

**अजोगिपा**—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं सव्विसावा सिद्ध होय. जात गृहपति, गांव सालिपुत्र. याचे ग्रंथा-चित्तसंप्रदाय, व्युदस्थान ( त. ४८।१२ ).

**अझीझ कोका**—हा अकबराचा दूधभाऊ होय. हा अतिशय लहरी असे. यानें अनेक वेळां अकबरास चीड येण्यासारखीं कृत्यें केलीं, तथापि अकबर यास नेहमीं क्षमा करी. अझीझच्या बापानें अकबराचे लहानपणीं फार लाड केले, हें स्मरून तो याच्या दुष्कृत्याकडे दुर्लक्ष करी. जहांगिर म्हणतो, ' अकबरानें स्वप्नांत येऊन मला सांगितलें कीं, बाबारे ! कसेंहि करून अझीझचे अपराध पोटांत घाल. त्यास शासन करूं नको. ' ( मु. रि. भाग २ पृ. १०५; झैनखान कोक पाहा ).

**अझीझ खम्मार**—माळव्याचा सुभेदार ( १३४४ ते १३४५ ). मुहंमद तघ्लक यानें १३४४ मध्यें दख्खनचा लोकप्रिय सुभेदार कुतलघखान यास बडतर्फ करून दक्षिणेंतील आपल्या राज्याचे चार विभाग केले व त्या प्रत्येक विभागावर एकएक स्वतंत्र सुभेदार नेमला. माळव्याचे सुभेदारीवर अझीझ खम्मारची याच वेळीं नेमणूक झाली. अझीझ खम्मार हलक्या कुळांत जन्मास आलेला अविचारी अधिकारी होता. सुभेदार होण्यापूर्वी हा अम्रोहा प्रांतांतील हजार खेड्यांच्या एका गटावरील वसुलीचे कामावरील अधिकारी होता. व त्या कामावर असतां अनन्वित छळ करून सारा ठराविक रकमेइतका वसूल करण्याची कामगिरी यानें बजाविली होती,

म्हणून यास बढती मिळाली. या बढतीमुळें अझीझ फारच शेफारला. त्यांतून सुलतानानें सारा ठराविक रकमेइतका वसूल करण्याकरितां वाटेल तो उपाय योजण्याची मुभा दिल्यामुळें तर निष्ठुर व कठोर मार्गाचा ह्यानें सर्रास सार्वत्रिक उपयोग केला. सुलतानाचें असें मत होतें कीं, दक्षिणेकडे उत्पन्न झालेल्या परिस्थितीस वसूलकामगारच कारणीभूत आहेत व म्हणून त्यांचा प्रथम समाचार घेतल्याशिवाय दक्षिणेंत स्थिरस्थावर व्हावयाचें नाहीं. दक्षिणच्या बंदोबस्ताची कामगिरी यशस्वी करण्याकरितां सुलतानानें अझीझला पुरेसें सैन्य व पैसा दिला होता, त्यामुळें हा बेसुमार निष्ठुर बनला. त्या कालीं जमाबंदीचे कामाकरितां १०० खेड्यांचा एक याप्रमाणें गट करून एकएका गटावर वसुली अधिकारी नेमलेले असत. त्यास थोडेफार पण वसुली कामास आवश्यक असें सैनिकसामर्थ्य व सैन्याधिकारहि दिलेले असत. ते आपल्या गटांतील खेड्यांचा वसूल करण्यास जबाबदार असत. या कामाबद्दल त्यांस शेंकडा ५ प्रमाणें मुशाहिरा मिळे.

अझीझ खम्मार आपल्या नव्या अधिकारक्षेत्रांतील ठाण्यावर धारला आल्याबरोबर यानें ९० जमाबंदी अधिकारी पकडून आणिले व आपल्या सरकारी वाड्यासमोर त्या सर्वांची यानें कत्तल केली. या अमानुष मनुष्यवधामुळें माळव्यांत जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. जमाबंदी कामावरील अधिकारी तर फारच चिडले. या अमानुष कृत्याबद्दल सुलतान अझीझला शासन करील अशी लोकांस अपेक्षा होती ती खोटी ठरली. सुलतानानें या अमानुष कृत्याबद्दल यास दरबारी पोषाक नजर करून व त्या कृत्याबद्दल याची स्तुति करणारें बादशाही फर्मान जाहीर करून याचा गौरव केला. आतां मात्र जमाबंदी खात्यांतील अधिकारी फार चिडले व त्यांनीं या कृत्याबद्दल सूड घेण्याचा निश्चय केला. अशा प्रकारें एके बाजूस सुलतान व दुसरे बाजूस जमाबंदी कामावरील अधिकारी यांमधील यादवीस आरंभ झाला. याच सुमारास गुजराथचे सुभेदारानें आपल्या प्रांतांतील वार्षिक वसुलाची रक्कम दिल्लीस पोहोंचती करण्याकरितां संरक्षक सैन्याबरोबर पाठविली. या संधीचा फायदा घेऊन या असंतुष्ट लोकांनीं त्या खजिन्यावर हल्ला करून तो लुटला व बंडास आवश्यक तें द्रव्य मिळविलें. सुलतानास ही बातमी कळतांच ५ फेब्रुवारी १३४५ रोजीं तो दिल्लीहून बंडखोरांचें पारिपत्य करण्याचे उद्देशानें निघाला, तो पुन्हा दिल्लीस परत गेला नाहीं. दक्षिणेकडील राज्यास तर त्यास मुकावेंच लागलें. सुलतान माळव्यांत येण्यापूर्वीच अझीझनेंहि बंडखोरांवर स्वारी केली, परंतु यास त्यांना वठणीवर आणतां आलें नाहीं. उलट बंडखोरांनींच याचा पराभव केला व यास ठार मारलें ( कें. हि. ).

**अझीझखान**—शिवनेरीचा विजापूरकरांचा किल्लेदार. स. १६७३ मध्यें याच्याशीं गुप्त तह करून शिवाजीनें किल्ला घेण्याचा घाट घातला होता, पण हा ऐन वेळीं फिरल्यामुळें तो घाट फसला ( चित्रमय शिवाजी पा. ९ ).

तसाच स. १६७८ मध्येंहि वर चढलेल्या मराठ्यांची कत्तल होऊन बेत फसला.

**२.** हा बेदरच्या बहामनी राज्यांतील एक सरदार होय. मुहंमद गवानानें युसफ आदिलशाहास ( विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा संस्थापक ) व्यापाऱ्याकडून विकत घेतल्यावर युसफास अझीझखान या सरदाराचे हाताखालीं ठेविलें. अझीझखानानें युसफची हुशारी पाहून त्याचेवर आपलें सर्व काम सोंपविलें. त्यामुळें युसफचा आणि बेदरच्या बहामनी राजाचा वारंवार संबंध येऊं लागला, व बहामनी राजास युसफची हुषारी कळून आली. अझीझखान मरण पावल्यावर याचें काम बहामनी राजानें युसफवर सोंपविलें ( विजापूरचें आदिलशाही घराणें-मोडककृत ).

**अझीमुश्शान**—दिल्लीच्या मोगल घराण्यांतील बहादुरशहाचा हा मुलगा होय. याला फर्रुखसियर नांवाचा मुलगा होता.

स. १७१२ मध्यें याला ठार मारण्यांत आलें.

मुअज्जमचें व अजमचें जेव्हां युद्ध झालें, त्या वेळीं हा युद्धांत बापाकडे होता. हा बंगाल्यांत असे ( मु. रि. भाग २ पृ. ३८५ ).

**अझ्झुद्दीन**—दिल्लीचा बादशाह जहांदार-शाह त्याचा हा मुलगा होय. फर्रुखसियरनें याचे डोळे काढून याला कैद केलें होतें.

**अझ्झुद्दीन खालिद खानी**—सुलतान फीरूझशाह तुघ्लकाचे कारकीर्दीतील दरबारी कवि.

१३५१ चे सुमारास सुलतान फीरूझशाहानें कांग्राकडे जात असतां वाटेंत ज्वालामुखी येथील सुप्रसिद्ध देवालयास भेट दिली. कांहीं बखरकारांचें असें म्हणणें आहे कीं, सुलतानानें देवळांतील देवाकरितां छत्र नजर केलें. दुसरे कांहीं म्हणतात कीं, पूर्वी असलेलें छत्र वापरण्यास मनाई केली. कसेंहि असलें तरी येवढें खरें कीं, या देवालयांत सुमारें १३०० संस्कृत ग्रंथ होते, त्यांचेपैकीं कांहींचें पर्शीयन भाषेंत भाषांतर करण्याचें काम सुलतानानें दरबार कवि अझ्झुद्दीन खालिद खानी याजवर सोंपविलें. या राजकवीनें हुकुमास अनुसरून ग्रंथ लिहिला. त्याचें नांव ' दला इल् फीरूझशाही.' फेरिस्तानें या पुस्तकासंबंधानें

असें नमूद करून ठेविलें आहे कीं, हा ग्रंथ संग्राहक स्वरूपाचा आहे. यांत अनेक शास्त्रांची व कलांची माहिती संग्रहित केलेली आहे. बदाउनी हा कर्मठ मुसलमान असल्यामुळें परधर्मी लोकांच्या ग्रंथांची स्तुति करण्याचें पातक सहसा करावयाचा नाहीं, तरी त्यानें या ग्रंथासंबंधानें काढलेल्या 'ग्रंथ सर्वसाधारणपणें बरा आहे, दोष असले तरी गुणहि त्यांत आहेत,' अशा उद्गारांवरून ग्रंथ चांगलाच असला पाहिजे असें दिसतें ( कें. हि. ).

**अँडॉस** ( कर्नल )—हा इंग्रजांचा उत्तमपैकीं लढवय्या सरदार होता. शिवनीच्या लढाईत यानें बराच पराक्रम करून दुसऱ्या बाजीरावास पळतां भुई थोडी केली. ही लढाई १०-४-१८१८ त झाली. त्यांत बाजीरावाच्या सैन्याची फार वाताहात झाली ( म. रि. उ. वि. भा. ३ पृ. ५०१ ).

**अण्णाजी दत्तो**—शिवाजीच्या अष्ट प्रधानांतील एक अधिकारी. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून स. १६४७ च्या सुमारास शिवाजीस येऊन मिळाला. हा संगमेश्वर तालुक्यांतील कुलकर्णी होता. याचें आडनांव प्रभुणेकर.

अफझलखानास भेटण्यास शिवाजी प्रतापगडावरून निघाला ( १० नोहें. १६५९ ), तेव्हां याला गडावर जिजाबाई व संभाजी वगैरेंच्या संरक्षणास ठेवलें होतें. अफझलखानास चीत केल्यावर यास पन्हाळा घेण्यास पाठविलें. नंतर २८ नोहें. १६५९ रोजीं शिवाजीनें स्वतः जाऊन पन्हाळा घेतला. याच्या कर्तबगारीची शिवाजीला चांगली जाणीव झाल्यामुळें त्यानें यास २९ आगष्ट १६६१ रोजीं वाकनिशी सांगितली आणि पालखी दिली. हिशेबी व लेखनकुशल असणाऱ्या या माणसास हें योग्य क्षेत्र मिळालें. वाकनिशींत खासगीचा कारभार, पत्रव्यवहार, दप्तर संभाळणें इत्यादि कामें असत. भोजनाची तजवीज, आमंत्रणें करणें इत्यादि कामेंहि वाकनिसासच करावीं लागत. शिवाय हा दादोजी कोंडदेवाच्या मागें जमिनीची पाहणी व सारावसुलाचीं कामें जरूर पडेल तेव्हां करीत असे. त्या कामांतहि याचा लौकिक चांगला होता. 'राज्याची चांगली मशागत केली यास्तव शिवाजीनें कृपाळू होऊन यास ता. ३ एप्रिल १६६२ रोजीं सुरनिशी देऊन याचा यथोचित सन्मान केला.' सुरनीस किंवा सचिव यानें राजपत्रें होतील त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर शोध करून नीट करावीं व तसेंच महाल, परगणे यांच्या हिशेबाचे शोध करावे, राजपत्रावर संमत करून बार चिन्ह रूजू करावें, युद्धादि प्रसंग करून राजहित करावें, असें होतें.

यानें युद्धप्रसंगहि कांहीं केलेले आढळतात. शिवाजीनें सुरत लुटली त्या वेळीं हा शिवाजीबरोबर होता ( ६ जानेवारी १६६४ ). प्रतापराव कर्नाटकच्या स्वारीवर गेला तेव्हां यानें हुबळी लुटली ( १८ जून १६७३ ). हुबळीस बरीच लूट मिळाली असावी. स. १६५९ मध्यें मिळविलेला पन्हाळा विजापूरकरांनीं स. १६६२ मध्यें पुनः परत घेतला. पण मराठ्यांनीं आपल्या अमलांत आणलेल्या मुलुखांत खवासखान अधिक व्याप करूं लागला म्हणून शिवाजीनें दक्षिणेंतील बंदोबस्ताचें मुख्य ठिकाण पन्हाळा १६७३ मध्यें परत घेण्याचें ठरविलें आणि याला आज्ञा केली. बाबाजी नाईक पुंडे विजापुरास वकिल होता, त्यास बोलावून माघारें आणलें आणि कोंडाजी फर्जंदास पालखी देऊन पन्हाळ्यावर रवाना केलें. अण्णाजी २ मार्च १६७३ रोजीं जाऊन हेराकडून बातमी आणणें वगैरें काम करीत होता. ५ मार्चला कोंडाजी वगैरेंनीं निबिड अंधकारांत किल्ल्यावर छापा घालून किल्ला सर केला. अण्णाजी सैन्यासह मागील अरण्यांत पिछाडीचें संरक्षण करण्याकरितां लपून राहिला होता. अशा प्रकारें पन्हाळा सर करण्यांत यानें भाग घेतला होता. स. १६७४ सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत फोंड्यावर अचानक छापा घालण्याकरितां हा कुडाळास गेला होता, पण गुप्तपणा न राहिल्यामुळें याला प्रथम अपयश आलें, पण पुढें तो किल्ला याच्या नेतृत्वाखालीं सर झाला.

शिवाजीनें राज्याभिषेकाच्या वेळीं अष्ट प्रधानांना कारभार वांटून दिले. त्यांत यास चेऊलपासून दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदे, फोंडा, अकोल्यापर्यंत सर्व कोंकणचा कारभार सांगितला होता. हा मुलूख समुद्रकांठीं असल्यामुळें युरोपियन व्यापाऱ्यांशीं याचा नेहमीं संबंध येई व ते लोक यास सुभेदार ( व्हाइसरॉय ) असें म्हणत. शिवाय जमीनमहसुलाचें काम पूर्वीप्रमाणें याच्याकडे होतेंच. याच्याकडे रत्नागिरी तालुक्याचें देशपांडेपण व कोल्हापूर इलाख्यांतील भूधरगडाजवळील सामानगडाची सबनिशीहि दिली होती. यानेंच सामानगड बांधला, असें म्हणतात.

शिवाजी संभाजीसह दिल्लीस गेला तेव्हां ज्या तिघांवर राज्याची जबाबदारी सोंपविली होती, त्यांत हा एक होता. ५ मार्च ते २० नोहेंबर १६६६ पर्यंत शिवाजी दिल्लीकडे असतां राज्य उत्तम सांभाळलें म्हणून 'तुम्ही राज्याचे आधारस्तंभ' असा याचा गौरव केला आहे. तसेंच राज्याभिषेकाच्या वेळीं हा अन्तर्गत व्यवस्थेचा अधिकारी असल्यानें छत्र धरण्याचा मान याच्याकडे आला होता. त्या प्रसंगीं याला वस्त्रें, पोषाख, कंठी, चौकडा, तुरा, शिरपेंच, शिक्केकट्यार, ढाल, तलवार, हत्ती, घोडा असें देऊन याचा

असें नमूद करून ठेविलें आहे कीं, हा ग्रंथ संग्राहक स्वरूपाचा आहे. यांत अनेक शास्त्रांची व कलांची माहिती संग्रहित केलेली आहे. बदाउनी हा कर्मठ मुसलमान असल्यामुळें परधर्मी लोकांच्या ग्रंथांची स्तुति करण्याचें पातक सहसा करावयाचा नाहीं, तरी त्यानें या ग्रंथासंबंधानें काढलेल्या 'ग्रंथ सर्वसाधारणपणें बरा आहे, दोष असले तरी गुणहि त्यांत आहेत,' अशा उद्गारांवरून ग्रंथ चांगलाच असला पाहिजे असें दिसतें ( कें. हि. ).

**अँडॉस** ( कर्नल )—हा इंग्रजांचा उत्तमपैकीं लढवय्या सरदार होता. शिवनीच्या लढाईत यानें बराच पराक्रम करून दुसऱ्या बाजीरावास पळतां भुई थोडी केली. ही लढाई १०-४-१८१८ त झाली. त्यांत बाजीरावाच्या सैन्याची फार वाताहात झाली ( म. रि. उ. वि. भा. ३ पृ. ५०१ ).

**अण्णाजी दत्तो**—शिवाजीच्या अष्ट प्रधानांतील एक अधिकारी. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून स. १६४७ च्या सुमारास शिवाजीस येऊन मिळाला. हा संगमेश्वर तालुक्यांतील कुलकर्णी होता. याचें आडनांव प्रभुणेकर.

अफझलखानास भेटण्यास शिवाजी प्रतापगडावरून निघाला ( १० नोहें. १६५९ ), तेव्हां याला गडावर जिजाबाई व संभाजी वगैरेंच्या संरक्षणास ठेवलें होतें. अफझलखानास चीत केल्यावर यास पन्हाळा घेण्यास पाठविलें. नंतर २८ नोहें. १६५९ रोजीं शिवाजीनें स्वतः जाऊन पन्हाळा घेतला. याच्या कर्तबगारीची शिवाजीला चांगली जाणीव झाल्यामुळें त्यानें यास २९ आगष्ट १६६१ रोजीं वाकनिशी सांगितली आणि पालखी दिली. हिशेबी व लेखनकुशल असणाऱ्या या माणसास हें योग्य क्षेत्र मिळालें. वाकनिशींत खासगीचा कारभार, पत्रव्यवहार, दप्तर संभाळणें इत्यादि कामें असत. भोजनाची तजवीज, आमंत्रणें करणें इत्यादि कामेंहि वाकनिसासच करावीं लागत. शिवाय हा दादोजी कोंडदेवाच्या मागें जमिनीची पाहणी व सारावसुलाचीं कामें जरूर पडेल तेव्हां करीत असे. त्या कामांतहि याचा लौकिक चांगला होता. 'राज्याची चांगली मशागत केली यास्तव शिवाजीनें कृपाळू होऊन यास ता. ३ एप्रिल १६६२ रोजीं सुरनिशी देऊन याचा यथोचित सन्मान केला.' सुरनीस किंवा सचिव यानें राजपत्रें होतील त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर शोध करून नीट करावीं व तसेंच महाल, परगणे यांच्या हिशेबाचे शोध करावे, राजपत्रावर संमत करून बार चिन्ह रूजू करावें, युद्धादि प्रसंग करून राजहित करावें, असें होतें.

याने युद्धप्रसंगहि कांहीं केलेले आढळतात. शिवाजीनें सुरत लुटली त्या वेळीं हा शिवाजीबरोबर होता ( ६ जानेवारी १६६४ ). प्रतापराव कर्नाटकच्या स्वारीवर गेला तेंव्हां यानें हुबळी लुटली ( १८ जून १६७३ ). हुबळीस बरीच लूट मिळाली असावी. स. १६५९ मध्यें मिळविलेला पन्हाळा विजापूरकरांनीं स. १६६२ मध्यें पुनः परत घेतला. पण मराठ्यांनीं आपल्या अमलांत आणलेल्या मुलुखांत खवासखान अधिक व्याप करूं लागला म्हणून शिवाजीनें दक्षिणेंतील बंदोबस्ताचें मुख्य ठिकाण पन्हाळा १६७३ मध्यें परत घेण्याचें ठरविलें आणि याला आज्ञा केली. बाबाजी नाईक पुंडे विजापुरास वकिल होता, त्यास बोलावून माघारें आणलें आणि कोंडाजी फर्जंदास पालखी देऊन पन्हाळ्यावर रवाना केलें. अण्णाजी २ मार्च १६७३ रोजीं जाऊन हेराकडून बातमी आणणें वगैरें काम करीत होता. ५ मार्चला कोंडाजी वगैरेंनीं निबिड अंधकारांत किल्ल्यावर छापा घालून किल्ला सर केला. अण्णाजी सैन्यासह मागील अरण्यांत पिछाडीचें संरक्षण करण्याकरितां लपून राहिला होता. अशा प्रकारें पन्हाळा सर करण्यांत यानें भाग घेतला होता. स. १६७४ सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत फोंड्यावर अचानक छापा घालण्याकरितां हा कुडाळास गेला होता, पण गुप्तपणा न राहिल्यामुळें याला प्रथम अपयश आलें, पण पुढें तो किल्ला याच्या नेतृत्वाखालीं सर झाला.

शिवाजीनें राज्याभिषेकाच्या वेळीं अष्ट प्रधानांना कारभार वांटून दिले. त्यांत यास चेऊलपासून दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदे, फोंडा, अकोल्यापर्यंत सर्व कोंकणचा कारभार सांगितला होता. हा मुलुख समुद्रकांठीं असल्यामुळें युरोपियन व्यापाऱ्यांशीं याचा नेहमीं संबंध येई व ते लोक यास सुभेदार ( व्हाइसरॉय ) असें म्हणत. शिवाय जमीनमहसुलाचें काम पूर्वीप्रमाणें याच्याकडे होतेंच. याच्याकडे रत्नागिरी तालुक्याचें देशपांडेपण व कोल्हापूर इलाख्यांतील भूधरगडाजवळील सामानगडाची सबनिशीहि दिली होती. यानेंच सामानगड बांधला, असें म्हणतात.

शिवाजी संभाजीसह दिल्लीस गेला तेव्हां ज्या तिघांवर राज्याची जबाबदारी सोंपविली होती, त्यांत हा एक होता. ५ मार्च ते २० नोहेंबर १६६६ पर्यंत शिवाजी दिल्लीकडे असतां राज्य उत्तम सांभाळलें म्हणून 'तुम्ही राज्याचे आधारस्तंभ' असा याचा गौरव केला आहे. तसेंच राज्याभिषेकाच्या वेळीं हा अन्तर्गत व्यवस्थेचा अधिकारी असल्यानें छत्र धरण्याचा मान याच्याकडे आला होता. त्या प्रसंगीं याला वस्त्रें, पोषाख, कंठी, चौकडा, तुरा, शिरपेंच, शिक्केकट्यार, ढाल, तलवार, हत्ती, घोडा असें देऊन याचा

सन्मान करण्यांत आला. याला पालखी, सालीना १०००० होनांचीं व मासिक ३००० होनांचीं नेमणूक होती. याच्या अष्टकोनी व लांबट शिक्क्यांत पुढील अक्षरें असत. ' १ श्री शिवचरणी २ निरंतर दत्त ३ सुत अनाजिपं ४ त तत्पर.' जोडावर मारण्याचा किंवा लेखनसीमेचा शिक्का लहान व वर्तुळाकार असून त्यांतील मजकूर ' १ लेख २ नावधिरे ३ धते ', असा आहे ( आकडे ओळीचे आहेत ).

स. १६७४ नंतर शिवाजीनें पुनः सर्व पाहणी करण्याचें ठरविलें आणि त्यांतच अण्णाजीचीं ४।५ वर्षे गेलीं. स. १६७८ मध्यें शिवाजी कर्नाटकांत जावयास निघाला. त्या वेळीं मागें यासच राज्यरक्षणार्थ ठेविलें होतें. हा बहुतेक रायगडींच असे. हा जेव्हां गांवें पाहण्यास जात असे तेव्हां मागें याचा मुतालिक सुरनिशीचें सर्व काम पाही.

शिवाजीमहाराजांना संभाजी व राजाराम असे दोन मुलगे होते. त्यांपैकीं संभाजी हा वडील होता, तरी दुर्वर्तनामुळें शिवाजीच्या मनांतून उतरलेला होता. त्याचप्रमाणें शत्रूला जाऊन मिळणें या दोषामुळें त्याला शिवाजीनें पन्हाळ्यावर ठेवलें होतें. अशा स्थितींत राजारामाला गादी मिळावी अशी त्याच्या आईस-सोयराबाईस-इच्छा होणें साहजिक आहे. संभाजी कैदेंत आहे आणि शिवाजी वारला अशा स्थितींत या योजनेला जोर आला आणि त्यांत यानें पुढाकार घेतला. शिवाजीच्या मृत्यूनंतर अठरा दिवसांनींच म्हणजे २१ एप्रिल १६८० रोजीं यानें सर्वाधिकार आपल्याकडे घेऊन नऊ दहा वर्षांच्या राजारामास ' मंचकारोहण ' करविलें आणि मोरोपंतास आपल्या मसलतींत अनुकूल करून घेऊन दोघे संभाजीस कैद करण्यास निघाले. पण सेनापति हंबीरराव मोहिते यानें यांना विरोध करून संभाजीस गादीवर बसविलें. याला कैद केलें होतें तें ४।५ महिन्यांनीं ( सप्टेंबर ) मुक्त करून मजमूहि याजकडे दिली. पण याला आपलें कारस्थान हाणून पाडलें गेलें, यामुळें समाधान नव्हतें. औरंगजेबाचा मुलगा संभाजीकडे आश्रयार्थ होता. त्याच्यामार्फत शिरक्यांना चिथावण्याचें यानें काम केलें. तें अकबरानें संभाजीच्या भीतीस्तव स्वतःच संभाजीस कळविलें. त्यामुळें संभाजीचा क्रोध जागृत झाला आणि त्याला शिरके मंडळी, दरबारांतील जुने मातबर सरदार आणि अण्णाजी हे बळी पडले. याला परळीच्या खालीं हत्तीच्या पायाखालीं तुडवून ठार केलें. अशा रीतीनें या पुरुषाचा शेवट स. १६८१ च्या ऑगष्ट महिन्याच्या अखेरीस झाला.

**अतिराव यज्वन्**—हा नारायण दीक्षिताचा पुत्र, अप्पया दीक्षिताचा पौत्र, नीलकंठ दीक्षिताचा कनिष्ठ बंधु ( स. १६३६ ). यानें रामाचा पुत्र कुश व त्याची भार्या कुमुद्वती यांच्या संबंधींचें एक पंचांकी नाटक ' कुश-कुमुद्वतीय ' या नांवाचें संस्कृतांत लिहिलें आहे.

**अतिविरराम ऊर्फ श्रीवल्लभ**—( स. १५५७ ते १५९६ पर्यंत ) याच्याबरोबर अभिराम वरतगुण ऊर्फ वीरपांड्य राज्य करीत होता. यानें जे अयोग्य रीतीनें कर घेऊन पैसे जमा केले होते, ते सर्व देवळाला खर्च केले.

**अतिवीर**—हा पाण्ड्यांच्या तिसऱ्या शाखेंतील जो तिसरा सुंदर त्याचा बाप होय. हा तामिल कवि व विद्वान् होता. याची तामिल प्रांतांत अद्यापि प्रख्याति आहे. याचा याच्या मुलानें ( तिसरा सुंदर ) खून केला.

**अतीतानंद** ( अतीत )—याचे ग्रंथावरून याचे गुरु ब्रह्मानंद, स्वानंदानंद कीं शिवानंद हें निश्चित सांगतां येत नाहीं. रा. चांदोरकरांचें मत, शिवानंद असावें, असें आहे. ग्रंथ-योगवासिष्ठ ( सं. सू. )

**अतीश**—अतीश किंवा दीपंकर हा बौद्धधर्मीय साधु हिंदुस्थानचा रहिवाशी होता, तरी यानें तिबेटांत जाऊन तेथें लामाधर्मांत बरीचशी सुधारणा घडवून आणिली. स. १०३८ त जेव्हां यानें तिबेटांत पाऊल टाकलें, तेव्हां त्या वेळचा तेथील बौद्ध धर्म अनीतिमान् भिक्षुकांच्या हातांत असून त्यांतील पिशाचभक्तीमुळें तो अवनतीस पोंचला आहे, असें याला आढळून आलें. शुद्धतम बौद्धधर्माचा नमुना पुढें ठेवून यानें एक नवीन कादम नांवाचा पंथ काढिला. या पंथांतूनच पुढें हल्लीं तिबेटचा राष्ट्रधर्म असणारा गेलुग ( पीत-शिरस्त्राण ) पंथ निघाला. ब्रह्मचर्यपालन व पिशाचभक्तीचें उच्चाटण या अतीशानें केलेल्या कांहीं धार्मिक सुधारणा होत. यानें जे अनेक तात्त्विक ग्रंथ लिहिले, त्यांमध्यें ' बोधिपंथप्रदीप ' हा प्रख्यात आहे. यानें हिंदुस्थानांतील बौद्ध ग्रंथांचीं तिबेटींत भाषांतरें केलीं. अतीशाच्या उपदेशाचा हितकारी परिणाम म्हणजे सस्क्य व कर्म्यु नांवांचे दोन अर्धवट सुधारलेले पंथ पुढें निर्माण झाले व त्यांमध्यें सस्क्य पंथाचें वर्चस्व तर बरेच दिवस टिकून होतें. स. १०५२ त अतीश ल्हासाजवळ ने-टंग ( Ne-tang ) येथें मरण पावला. तेथें याच्या समाधीवर उभारलेला स्तूप अद्याप दिसतो ( ज्ञानकोश ).

हा पाल राजांपैकीं रामपालाच्या वेळीं त्याच्या उत्तेजनावरून बौद्धधर्मप्रसारार्थ तिबेटांत गेला होता.

अतीश हें दीपंकर श्रीज्ञान याचें तिबेटी नांव असावें व

हा विक्रमणीपूरच्या राजाचा मुलगा असावा, असें पं. हरप्रसादशास्त्री यांचें मत आहे ( Intro. to Mr. N. N. Vasu's *Modern Budhism and Its followers in Orisa*, Calcutta 1911 and *Lit-Hist. of Pala Period* in J. B. and O. Res. Soc. Vol. V. P. II. P. 171 ).

**अत्तालू रूपय्या**—तैलंगणांतील एक प्रख्यात कवि. तेलगू भाषेंत याची कविता बरीच आहे. याच कवीच्या ग्रंथांचें अध्ययन करून कावेल्ली व्यंकट बोरय्या नांवाचा ब्राह्मण विद्वान् झाला ( कविचरित्र ).

**अत्रिदाम**—वल्लभीच्या रुद्रशहाचा मुलगा. याच्या एका नाण्यावर २१४ वें वर्ष आहे ( असा दाम पाहा ).

**अथर्वण गंगाधर**—हा एक मराठी कवि होता. यानें 'शिवरात्रि' या नांवाचें एक प्रकरण रचलेलें आहे. हें श्लोकबद्ध असून त्याची संख्या ४२ आहे. लिखाईवरून हा फार जुना असावा असें दिसतें ( मं. वा. इ. श. १८३७ ले. १६७ ).

**अथर्वणाचार्य**—तेलगू जुना कवि. हा तेलंगी ब्राह्मण होता. संस्कृत व तेलगू या दोनहि भाषा यास उत्कृष्ट येत असत. महाभारताच्या सारांशावर लिहिलेला याचा ग्रंथ तुटक उपलब्ध आहे. पुढील कवींनीं याचा पुष्कळ भाग उतारे म्हणून दिलेला दिसतो ( तेलगू वाङ्मय, जनार्दन रामचंद्रकविचरित्र ).

**अदीदेम्म**—हा प्रतापरुद्राचा तिसरा सेनापति होता. यानें मनुमगंद गोपाल ( तेलगू चोंड राजा ) याचा खून केला. व मिशरगंद ही पदवी घेतली ( एन्शन्ट डेक्कन-सुब्रह्मण्य अय्यरकृत ).

**अद्वैतानंद**—काशीक्षेत्रांतील सुप्रसिद्ध संन्यासी. हा मूळचा महाराष्ट्रीय ब्राह्मण असून मोठा विद्वान् होता. याच्याजवळ शिकण्याकरितां पुष्कळ विद्यार्थी असत म्हणून काशींत याची प्रसिद्धि गुरुस्वामी या नांवानें असे. हा शंकराचार्यांच्या मताचा असून 'ब्रह्मविद्याभरण' नांवाचा याचा ग्रंथ आहे. सदानंदकृत वेदांतसारावर याची संस्कृत टीका आहे. मध्वमुनीश्वर व कटाव करणारा अमृतराय हे याचे शिष्य होते. हा श. १६८७ पार्थिव नाम संवत्सरीं समाधिस्थ झाला ( अर्वाचीन कोश ). अमृतरायाचा गुरु अंबिकासरस्वती होता, असें त्याच्याच 'अविनाशसंदेहहरण' ग्रंथांत आढळतें. मध्वमुनींनीं आपला गुरु अद्वैतानंद याजकडून रायास उपदेश देवविला, अशी एक दन्तकथा आहे. अविनाशसंदेहहरण ग्रंथाची भाषा कटावाच्या भाषेहून फारच साधी दिसते. त्याअर्थी तो कटावकार अमृतरायाचा नसून दुसऱ्या एखाद्या अमृतरायाचा असावा, हें आजगांवकरांचें म्हणणें बरोबर दिसतें ( म. क. च. १ पा. ३५४ ).

**अधिराज मारवर्मन् अवनिशुलुंमणि**—हा कडुंगण ( इ. स. ५६०–५९० ) याचा मुलगा होय. यानें ५९० ते ६२० पर्यंत राज्य केलें. याचा काल भरभराटीचा गेला.

**अधिराज राजेन्द्र**—हा चोल घराण्यांतील वीर राजेन्द्राचा पुत्र. वीरसोळीयम् नांवाचें बुद्धमित्रानें केलेलें तामिळ व्याकरण याच्याच आश्रयानें झालें. यानें एक वर्ष राज्य केलें. याला गादीवर बसविण्यांत याचा मेहुणा विक्रमादित्य चालुक्य यानें फार मदत केली होती. पुढें याच्या प्रजेनें बंड करून याला ठार केलें. एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, यास राजेन्द्र कुलोत्तुंग ऊर्फ राजीग केशरी वर्मा यानें बंड उभारून ठार केलें व याचें राज्य घेतलें. तेव्हां विक्रमादित्यानें त्याच्यावर स्वारी करून कुलोत्तुंगाला पिटाळून लावलें. पण याला पुत्र नव्हता, त्यामुळें कुलोत्तुंग हा राजा झाला आणि पूर्व चालुक्याच्या वंशांत चोळराज्य कायमचें सामील झालें. कारण कुलोत्तुंग हा पूर्व चालुक्यांपैकीं असून त्याची पत्नी मदुरान्तकी ही चोल राजाची कन्या होती. यानें स. १०७०–७४ पर्यंत राज्य केलें असावें, असें हिंदुभारताचा अन्त या ग्रंथावरून दिसतें.

**अनघडशाह**—हा एक अवलिया फकीर होऊन गेला. याचा तकिया पुणें येथें भवानी पेठेंत आहे. या तकियांत असलेल्या विहिरींत रामेश्वरभट्ट नांवाच्या ब्राह्मणानें याच्या परवानगीवांचून स्नान केल्यामुळें त्याच्या अंगाचा दाह झाला व तो तुकारामाच्या अभंगानें शांत झाला. ही गोष्ट यास कळल्यावर याला आश्चर्य वाटून यानें तुकारामाची भेट घेतली व त्याशीं कांहीं संभाषण केल्यावर आनंदानें परत आला.

**अनहिन**—( चाहमान पाहा. )

**अनंगपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक्यांशीवा सिद्ध होय. हा जातीनें शूद्र असून गौड देशचा राहणारा होता.

**अनंगपाल**—महमूद गिझनीनें ज्याचा अनेकदां पराभव केला, तो लाहोरचा राजा. महमूदानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली, तेव्हां ( स. १००१ ) याचा बाप जयपाल यानें प्रथम त्याला तोंड दिलें. पण या लढाईत जयपालाचा पराभव झाला व त्याला बरीच खंडणी देऊन आपली सुटका करून घ्यावी लागली.

नंतर अनंगपाल हा कांहीं दिवस महमूदाशीं सलोख्यानें वागून त्याला निमूटपणें दरसाल खंडणी पाठवीत असे. पण पुढें हा महमूदास विचारिनासा झाला.

तेव्हां महमूदानें याच्यावर स्वारी करून याला पळवून लाविलें. महमूद परत गेल्यावर यानें उज्जैन, ग्वाल्हेर, कनोज, दिल्ली, अजमीर, इत्यादि ठिकाणच्या राजांचा एक संघ स्थापून महमूदाला पार हाकून लावण्याची जंगी तयारी केली. शेवटी पेशावरचे मैदानांत लढाई होऊन तींत पंजाबांतील गोखर लोकांनीं मदत न केल्यामुळें हिंदूंचा पराभव झाला. स. १०२१-२३ त महमूदानें लाहोर प्रांत खालसा केला. अनंगपाल कधीं वारला याचा उलगडा होत नाहीं. एके ठिकाणीं हा १०१३ च्या सुमारास निवर्तल्याचें लिहिलें आहे, तर दुसऱ्या एका इतिहासांत महमूदानें लाहोर प्रांत खालसा केला, त्या वेळीं ( १०२१-२३ ) हा जिवंत असल्याचें दृष्टीस पडतें.

अनंगपालाचें पुष्कळ ठिकाणीं 'आनंदपाल' असें दुसरें नांव सांपडतें. हें दुसरें नांव बरोबर आहे असें वाटतें. लल्ली यानें स्थापन केलेल्या काबूलच्या ब्राह्मणी राज्याच्या घराण्यांत ( स. ८८०-१०२१ ) जयपाल, नंतर अनंगपाल, नंतर त्रिलोचनपाल असे शेवटचे तिघे राजे होऊन गेले व १०२१ त महमूदानें तें घराणें बुडविलें, असा उल्लेख सांपडतो व या राजांचा कालहि वरील जयपाल, अनंगपाल यांच्या काळांशीं जुळतो. तेव्हां अनंगपाल किंवा आनंदपाल हा काबूलच्या ब्राह्मणी घराण्यांतील असला पाहिजे, हें उघड झालें ( स्मिथ व म. भा. २ प्र. ११ ).

**अनंगपाल तोमर**—तुवर किंवा तोमर घराण्याचा संस्थापक अनंगपाल हाच असून याचा राज्याभिषेक स. ७३६ मध्यें झाला.

यानें प्रथम दिल्लीस गादी स्थापिली. पण याच्या वंशजांनीं ती तेथून हलवून कनोजला नेली. तेथून त्यांना राठोडांचा मूळ पुरुष चंद्रदेव यानें हांकून दिल्यावर, तिसरा अनंगपाल दिल्लीस आला व त्यानें दिल्ली आपली राजधानी केली. अनंगपालानें दिल्लीस राज्य केल्याचा सन तेथें असलेल्या प्रख्यात लोहस्तंभावर 'संवत् दिहली ११०९ अनंगपाल बही' अशा अक्षरांनीं दिला आहे. यावरून स. १०५२ मध्यें अनंगपाल दिल्लीस राज्य करीत होता, हें उघड दिसतें. पण तो तिसरा होय.

**२.** यानें नवव्या शतकांत दिल्ली शहर वसविलें. शिलालेखांत तोमर असें नांव असलें तरी लोकांत तुवर असा उच्चार आहे. हे तोमर किंवा तुवर इंद्रप्रस्थ स्थापणाऱ्या पांडवांचे वंशज मानतात. टॉडच्या राजस्थानांत असें म्हटलें आहे कीं, स. ७९२ मध्यें पांडवांचा वंशज अनंगपाल यानें इंद्रप्रस्थास पुनः पांडवांची गादी स्थापली ( म. यु. भा. २.२५८; टॉड. ९१-९२ ). तोमरांचा अद्यापि एकहि लेख सांपडला नाहीं. मात्र इतरांच्या लेखांत तोमरांचा निर्देश येतो. अल्बेरुनीच्या वेळीं दिल्ली हें शहर महत्त्वाचें नव्हतें. तसेंच कुतुबुद्दीनच्या वेळीं दिल्लीजवळ इंद्रपत नांवाचें खेडें होतें. हें तत्कालीन इतिहास ताळ-उल्-मासर् यावरून स्पष्ट आहे ( इलियट २. पान २१० ). तोमरांचें नांव चव्हाणांच्या लेखांत आलें आहे.

**३.** दिल्ली येथील प्रसिद्ध लोहस्तंभ मथुरेहून उपटून आणून जुन्या दिल्लीजवळ स. १०५२ मध्यें ज्यानें उभा केला असें ल्या स्तंभावरील लेखांत म्हटलें आहे, तो अनंगपाल तिसरा होय.

तसेंच दिल्ली गॅझेटियरमध्यें यानें लालकोटचा किल्ला बांधल्याचेंहि लिहिलें आहे.

**४.** हा तुवरवंशी असून दिल्ली येथें राज्य करीत होता. याच्या वेळीं शहाबुद्दीन घोरी हा हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत होता.

पृथ्वीराज चव्हाण यानें याचा पराभव करून दिल्लीचें राज्य जिंकलें. तेव्हां यानें वानप्रस्थाश्रम स्वीकारला. याला दोन मुली होत्या. पहिली कमलादेवी ही अजमीरच्या सोमेश्वर राजास दिली होती व दुसरी कनोजच्या विजयपाल राजास दिली होती. याच्याविषयीं पृथ्वीराजरासामध्यें खालील कथा दिलेली आहे. 'तुवर वंशांतील ( तोमर वंशांतील ) हाच शेवटचा राजा होय. कारण हा निपुत्रिक असल्यामुळें यानें आपलें राज्य आपल्या मुलीचा मुलगा ( नातू ) जो पृथ्वीराज चव्हाण त्यास दिलें व आपण स्वतः बदरिकाश्रमास प्रयाण केलें.' पण हें वरील विधान काल्पनिक आहे, असें चिंतामणराव वैद्य यांनीं म्हटलें आहे. कारण पृथ्वीराजांची आई तोमर कुलांतील नसून चेदी कुलांतील होती.

कनोजच्या सम्राटांची सत्ता महमूदानें तोडल्यामुळें तोमर प्रबळ झाले. एक शतकभर यांची भरभराट होती. शेवटीं पृथ्वीराज चव्हाणाचा चुलता वीसलदेव ऊर्फ विग्रहराज यानें तोमरांचा स. ११५२ मध्यें पराभव केला. ( हिं. भा. अ. ३. पा. ४५२ ).

**अनंगभीम**—हा कलिंग देशाचा राजा होय. यास लांडदेव असेंहि दुसरें नांव होतें. यानें शके १०९४ मध्यें जगन्नाथाचें देऊळ बांधिलें, अशाबद्दलचा एक शिलालेख त्या देवळांतील एका खांबावर आहे. याच्या पदरीं जे लेखक व ग्रंथकर्ते होते, त्यांत प्रसिद्ध कल्याणमल्ल हाहि होता. कल्याणमल्लाकडून यानें मुद्दाम अनंगरंग नांवाचा ग्रंथ करविला होता, असें सांगतात.

**अनंगहर्ष मात्ररात**—हा नरेन्द्रवर्धनाचा मुलगा असून यानें तापसवत्सराजचरित्र नांवाचें नाटक संस्कृतांत लिहिलें. आनंदवर्धन व त्याचा टीकाकार अभिनवगुप्त यांच्या ग्रंथांत या नाटकाचें नांव आलेलें आहे. तापसवत्सराजचरित्राचें कथानक भासाच्या स्वप्नवासवदत्तेवरून घेतलें असलें, तरी त्यांत कांहीं निराळे प्रसंगहि आहेत. याचें हें नाटक सातव्या व नवव्या शतकाच्या दरम्यान लिहिलें असावें.

**अनंगापीड**—हा कर्कोटक घराण्यांतील शेवटचा राजा होय. याच्या कारकीर्दीत या घराण्यास उतरती कळा लागली. याला स. ८५५ मध्यें उत्पल घराण्यांतील अवान्तिवर्मा यानें पदच्युत करून स्वतः गादी बळकावली ( म. भा. १. २. पा. ९८ ).

**अनंत**—क्षेमेन्द्रकवीचा आश्रयदाता काश्मीरचा राजा.

**२.** हा कात्यायन श्रौतसूत्राचा टीकाकार होय. यानें 'प्रतिज्ञापरिशिष्टभाष्य' नामक ग्रंथ लिहिला. यानें वसुदेव, कर्क, पितृभूति, यशोगोमिन् व भर्तृयज्ञ यांच्या ग्रंथांतून उतारे घेतलेले आहेत, परंतु देवभद्र व याज्ञिकदेव यांनीं अनंताच्या ग्रंथांतून उतारे घेतले आहेत ( सी. सी. व पिटरसन-रिपोर्ट ४ ).

**३.** ( शक १४४७ ). याच्या पित्याचें नांव श्रीकांत होतें. यानें अनंतसुधारस नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. सुधाकर म्हणतात कीं, हा सारिणी ग्रंथ आहे.

बऱ्याचशा आधारावरून हा मुहूर्तमार्तंडकाराचा पिता असावा असें वाटतें, परंतु अनंतकृत सुधारस ग्रंथावर सुधारस-करण-चषक नांवाची टीका ढुंढिराजाची आहे. तेव्हां हा ग्रंथ करणग्रंथ असून त्यांत पंचांगोपयोगी सारण्याहि आहेत, असें दिसतें. यानें दोन ठिकाणीं वंशवर्णन केलें आहे. त्यांत अनंताच्या पित्याचें नांव सर्वत्र हरि असेंच आहे, श्रीकांत असें कोठेंहि नाहीं; यामुळें हा मुहूर्तमार्तंडकाराचा पिताच कीं काय, याविषयीं संशय आहे ( भा. ज्यो. २७२ ).

**४.** कामधेनु या नांवाचा तिथ्यादिक पंचांगसाधनाचा ग्रंथ आहे, त्यावर या अनंताची टीका आहे. या टीकेचा काल सुमारें शक १४८० असावा. जातकपद्धति या नांवाचा अनंताचा एक जातकग्रंथ आहे.

याचें गोत्र गार्ग्य होतें. विदर्भ देशांतील गोदाथडींत धर्मपुरी येथील अनंत हा रहिवासी होता. याच्या पत्नीचें नांव पद्मा. तेथून पुढें अनंत हा काशीस राहण्यास गेला. याच्या पुढील पुरुष काशीस होते. नीलकंठ व राम असे याला दोन विद्वान् पुत्र होते. अनंत-नीलकंठ-गोविंद-माधव असा यांचा वंश आहे ( भा. ज्यो. पा. २७४ ).

**५.** एक कवि. हा शिरपूरचा ( सरस्वतीतीरस्थ ) राहणारा. यानें गर्भगीताप्रकरण लिहिलें. श. १६८७ ( मं. वार्षिक श. १८३४ ले. १५७ ).

**६.** हा जयरामस्वामी वडगांवकराचा शिष्य. हा व याचा गुरुबंधु गोपाल या दोघांनीं मिळून काव्य केलें आहे ( सं. सू. ).

**७.** ( श. १५८०-१६४५ ). रामदासस्वामींचा शिष्य. हा साताऱ्याजवळील मेथवडचा. याचे ग्रंथ रामचरित्र, बभ्रुवाहनाख्यान, सुधन्वाख्यान, सुलोचनाख्यान, सीतास्वयंवर, गोपीगीत, रामदासस्तुति, सुलोचनागहिवर, लहुकुशाख्यान, श्रियाळचरित्र, सिंहध्वजाख्यान, गरुडगर्वपरिहार, गजगौरीव्रत, अहिल्योद्धार, अहिमहिआख्यान, याशिवाय ब्रह्मस्तुति, माधवगुण, द्रौपदीस्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, रुद्रयामल हे ग्रंथ अनंत नांवाच्या एका कवीचे आहेत ( सं. सू. ).

**८.** रंगनाथस्वामीच्या शिष्यांपैकीं एक. याचीं कांहीं पदें आहेत ( सं. सू. ).

**अनंतगुण**—हा पाण्ड्य घराण्यांतील जो कुलोत्तुंग त्याचा मुलगा होय. हा आपल्या बापाच्या मागून गादीवर बसला. हा जैनांचा फार द्वेष्टा होता.

**अनंततनय**—यानें महाभारताचें उद्योगपर्व मराठींत केलें ( सं. सू. ).

**अनंतदास**—यानें वेताळपंचविंशी मराठींत कवितेंत लिहिली ( सं. सू. ).

**अनंतदेव**—हा ठाण्याच्या शिलाहार राजांपैकीं नागार्जुनाचा पुत्र. हा आपला चुलता मामवानीनंतर गादीवर आला. याचा स. १०९४ मधील लेख खारेपाटण येथें सांपडला आहे ( एपि. इंडि. ९ पा. ३३ ). एका मेल्याचीं जहाजें कोंकणच्या बंदरांत आलीं असतां त्यांवरील जकात माफ केल्याबद्दल हा ताम्रपट आहे. या राजाचें नांव अनंतपाल असेंहि आढळतें. यानें स. १०८५-११२५ पर्यंत राज्य केलें असावें. याच्या राज्यांत आपसांत तंटे होऊन देवब्राम्हणांचा छळ झाला, असें बाँबे गॅझेटियरमध्यें शिलाहारांच्या एकत्र जुळवून लिहिलेल्या हकीगतीवरून दिसतें ( व्हा. १ भा. १ ). हा कोंकणांतील तंटा राजघराण्यांतील असून त्या संधीस मुसलमानांनीं देवब्राम्हणांचा छळ केला असावा. परंतु शेवटीं अनंतपाल विजयी झाला व यानें बंडाचा बिमोड करून गुन्हेगारांना जबर शिक्षा केल्या ( एपि. इंडि. ९

पा. १७ ). यामुळें कोंकण आणखी दोन शतकें हिंदु राहिलें ( हिं. भा. अ. पा. ३६५-३६६ ).

**२.** हा भास्कराचार्याचा नातू. यानें ब्रह्मगुप्ताच्या सिद्धान्तांतील विसाव्या अध्यायावर आणि बृहज्जातकावर टीका केली आहे. याचा शककाल ११४४ होय, असें वहाळ येथील शिलालेखावरून दिसतें ( भा. ज्यो. पा. २५४ ). याच्या बापाचें नांव गणपति. हा यादव घराण्यांतील दुसऱ्या सिंघणाच्या पदरीं होता.

**३.** कृष्णभक्तिचंद्रिका नाटकाचा कर्ता. याच्या बापाचें नांव आपदेव होतें. अनंतदेव हा बाजबहादूर चंद्राचा आश्रित होता. याचा पिता आपदेव हा एका पूर्वकालीन अनन्तदेवाचा पुत्र व एका पूर्वकालीन आपदेवाचा नातू होता ( सी. सी. व पीटर्सन रिपोर्ट ४ ).

**४.** हा स. १७ वे शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला असावा. कारण याचा धाकटा भाऊ जीवदेव यानें आपल्या आशौचनिर्णय यामध्यें निर्णयसिंधु हा ग्रंथ स. १६११-१२ चे सुमारास लिहिला, असा उल्लेख केला आहे. यावरून याचा काल १७ वे शतकाच्या उत्तरार्धांत असावा, असें ठरतें.

यानें स्मृतिकौस्तुभ हा ग्रंथ लिहिला. याचे संस्कार आचार, राजधर्म, दान, उत्सर्ग, प्रतिष्ठा, तिथि आणि संवत्सर असे विभाग केले आहेत. याच्या मताप्रमाणें बहिणीचा मुलगा किंवा मुलीचा मुलगा दत्तक घेतां येत नाहीं. फक्त शूद्र लोकांस मुलीचा किंवा बहिणीचा मुलगा दत्तक घेण्यास हरकत नाहीं. याशिवाय यानें दत्तकाविषयीं बरीच माहिती दिलेली आहे. यानें आपल्या स्मृतिकौस्तुभ नांवाच्या ग्रंथांत पुष्कळ ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख केलेला आहे. याच्या राजधर्मकौस्तुभ ग्रंथाचे बरेच भाग आहेत. यामध्यें राज्याविषयीं सर्व गोष्टींचें स्पष्टीकरण केलें आहे. यानें आपल्या ग्रंथांत आपल्यास आश्रय देणाऱ्या राजाच्या घराण्याविषयीं माहिती दिलेली आहे.

वरील ग्रंथांशिवाय यानें भगवद्भक्तिनिर्णय किंवा विवेक, मथुरासेतु, प्रायश्चित्तप्रदीपिका, अन्त्येष्टिपद्धति, ऋत्विग्वरणनिर्णय, दत्तकपुत्रविधान असे ग्रंथ लिहिले आहेत.

याच्या घराण्याचा मूळ पुरुष एकनाथ होय. त्याचा मुलगा आपदेव, त्याचा मुलगा अनन्त, त्याचा मुलगा आपदेव आणि या आपदेवास दोन मुलगे, एक अनंतदेव व दुसरा जीवदेव.

**५.** ( सूर्यमती पाहा ).

**अनंतदेवी**—गुप्तवंशांतील कुमारगुप्ताची पत्नी. हिला स्कंदगुप्त व पुरगुप्त असे दोन पुत्र होते.

**अनंतनाथ**—हा जैनांचा चवदावा तीर्थंकर होय ( तीर्थंकर पाहा ).

**अनंतपाल**—पहिल्या अनंतदेवाचें नामांतर.

**अनंतफंदी**—नगर जिल्ह्यांतील संगमनेरचा हा राहणारा होय. याचें गोत्र कौंडिण्य असून हा वाजसनेयी ब्राह्मण होता. भवानीबाबा हे याच्या बापाचें नांव असून राजूबाई हे याच्या आईचें नांव होतें. यांचें आडनांव घोलप. मलीकफंदी म्हणून एक चमत्कारिक फकीर संगमनेरास होता. याचा व त्याचा फार स्नेह जमल्यावरून लोकांनीं त्याचे फंदी हे उपपद यास जोडलें. याचा जन्म शके १६६६ रक्ताक्षीनाम संवत्सरीं झाला व हा ७५ वर्षांनीं म्हणजे शालिवाहन शक १७४१ त वारला.

हा पूर्वी तमाशे करीत असे. स्वतः रचलेल्या लावण्या तमाशांत म्हणून पोऱ्यांस नाचवीत असे. एकदां अहल्याबाई होळकरीण संगमनेरास येऊन तिनें याला असें सांगितलें कीं, ' तुम्ही जें कृत्य करतां तें ब्राह्मणांस अयोग्य आहे.' तेव्हां यानें तमाशाचा नाद सोडून दिला, व हा कथा करूं लागला. परंतु एकदां लोकाग्रहास्तव फंदी तमाशा करीत असतां अहल्याबाई अवचित संगमनेरास आली, तेव्हां तिला हें वृत्त कळतांच तिनें फंदीचें डोकें उडविण्याचा हुकूम दिला. परंतु हें वृत्त याला कळतांच यानें तमाशाचें रूपांतर लगेंच कीर्तनांत केलें. तेव्हां बाई खूष होऊन याला बक्षीस दिलें.

याची कविता कटाव, फटके, लावण्या व क्वचित् श्लोक, आर्या आणि ओंव्या अशा प्रकारची असून ती प्रायः सर्व मराठी भाषेंत आहे. याला श्रीपति ऊर्फ सवाई फंदी व बापु फंदी असे दोन पुत्र होते.

याचा एक 'माधवनिधन' नांवाचा एक ग्रंथ आहे. त्यांत फंदीनें सवाई माधवरावाच्या मृत्यूची कथा वर्णन केली आहे. याचे अध्याय ६ असून ३६० ओंव्या आहेत. याला ऐतिहासिक कवि म्हणतात. खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा चांगला प्रसिद्ध आहे. सवाई माधवराव, नाना फडणीस, दुसरा बाजीराव, होळकर वगैरे त्या वेळच्या थोर व्यक्तींवर फंदीनें फटके रचिले आहेत.

सवाई फंदीचा राव बाजीवरचा पोवाडा सर्वांच्या तोंडीं होता. त्यांत तत्कालीन दुःस्थिति, व पेशव्यांचे दुर्गुण चांगले रेखाटले आहेत. यानें चेंडुफळी व विठ्ठलस्तुति लिहिलेली आहे.

याप्रमाणें याच्याविषयीं माहिती आजपर्यंत प्रसिद्ध होती. रा. य. न. केळकर यांनीं आपल्या ' ऐतिहासिक पोवाडे ' या पुस्तकांत ( प्रस्तावना पृ. ७३-७९ ) वरील

साथीदार यासंबंधीं वरीलपेक्षां थोडी निराळी माहिती देऊन याची योग्यता दाखविणारें पुढील अर्थाचें वर्णन केलें आहे.

याच्या पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा व सराफीचा असा सजोड असे. याच्या वडिलाविषयीं कांहींच माहिती मिळत नाहीं. पण फंदीबुवाच्या बाळपणाच्या वगैरे ज्या आख्यायिका उपलब्ध आहेत त्यांवरून फंदीबुवाचे वडील याच्या लहानपणींच निवर्तले असून याच्या आईनें म्हणजे राऊबाईनेंच नंतर या एकुलत्या एक लहानग्याचा प्रतिपाळ केला असावा असें म्हणतां येतें. लहानपणीं याला कोणाचाच दाब नव्हता. त्यामुळें हा लवकरच गांवांतला एक खोडकर उनाड पोरगा बनला. यानें लिहिणें पुसणें अगदीं सोडलें. व सगळा दिवस उनाडक्यांत घालवावा आणि नंतर सगळी रात्र उजाडून येईपर्यंत तमासगिरांच्या फडांत काढावी हा क्रम यानें धरिला. याच वेळीं एक दिवस आईशीं भांडून रागारागानें हा भवानीबोवाच्या मठांत जाऊन बसला असतां याची आई तेथें आली व भवानीबोवाजवळ आपल्या मुलाचीं गाऱ्हाणीं सांगूं लागली. तेव्हां अकस्मात् त्या वरदी पुरुषाच्या कृपेनें फंदीबोवाला कवित्वस्फूर्ति झाली, अशी आख्यायिका आहे.

या विद्येच्या जोरावर तरुणपणांतच फंदीबोवानें आपला तमाशाचा फड निर्माण केला आणि राजरोस रीतीनें लावण्या रचून त्या म्हणण्याचा किंवा म्हणविण्याचा उद्योग करून यानें चरितार्थाची सोय केली. या कामांतले याचे मुख्य साथीदार मलकफंदी, रतनफंदी व राघवफंदी असे तिघेजण असत, असें याच्या लावण्यांवरून दिसतें. आपल्या उमेदींत असतां यानें निरनिराळ्या प्रांतांत अनेक वेळां मुलुखगिऱ्या केल्या. दुसऱ्या बाजीरावाचे कारकीर्दीत याचा फारच गौरव झाला. खुद्द बाजीरावाची याच्यावर बहाल मर्जी इतकी बसून गेली कीं, आपल्या पत्रव्यवहारावरून स्वतःच्या राज्यारोहणाच्या राजकारणाची सर्व हकीकत लिहून दऊन त्यानें फंदीबोवाकडून ' माधवनिधन ' काव्य लिहून घेवविलें. या काव्याच्या प्रत्येक अध्यायाचे शेवटीं " ही कथा बाजीराव रघुनाथें । लिहोनि दिधली आपुल्या हातें । त्या बाबरहुकुम टीका येथें । कवित्व केलें कवीनें" अशी किंवा " ही कथा राघवात्मजें । लिहिली आपुल्या स्वकरीं कर्ता. खांबरहुकूम काय जें । कवित्व केलें फंदीनें " अशी **अनाथ** दिली असल्यामुळें ऐतिहासिक पुराव्याचे दृष्टीनें सदर रुपये भगानाचें महत्त्व पहिल्या प्रतीचें मानावें लागतें. या दृष्टीनें विचाराकरितां जोंवरील पत्रांच्या पुराव्यानें हें काव्य सरून जमिनीं सत्य व सुसंगत आहे असें दिसून येतें.

' माधवनिधन ' काव्यांतला सहावा अध्याय यशवंतराव होळकरानें पुणें लुटल्यानंतरच यानें जोडला. कारण त्या अध्यायांतील स्वतःला दूषणात्मक असा मजकूर बाजीराव अनंतफंदीला कसा लिहून देईल ? पण सहाव्या अध्यायांतील भाषा थेट पहिल्या पांच अध्यायांसारखी आहे. म्हणून अनंतफंदीनें स्वतः पाहिलेली व ऐकिलेली हकीकत एकत्र करून तो अध्याय मागाहून जोडला असें दिसतें.

याची पुणें प्रांतांत केवढी छाप बसली होती, यासंबंधीं दुसराहि एक महत्त्वाचा पुरावा उपलब्ध आहे. महाराष्ट्रांतील अतिविख्यात शाहीर होनाजी बाळ यानें फंदीबोवाच्यावर एक उत्कृष्ट लावणी रचलेली आहे. त्यांत त्यानें याचें सुंदर चित्र काढलें आहे. ' फंदी अनंत कवनाचा सागर,' ' वाचा वाचस्पतीसारखी बहुतांचें तनमन हरकी । लांगेलुंगे कवि भेदरले अवघ्यावर त्याची गुर्की,' ' समोर गाता कोणी टिकेना,' ' धन ज्याचा हातचा मळ,' ' फंदी अनंदी छंदी वरदी ब्राह्मण त्यावर गुरुकृपा,' 'अकट निकट कवनाच्या चाली नित्य नव्या अक्षयि थापा,' 'विद्याअभिमान नाहीं जयाला असा कवि कंचा धुंडा,' ' कीर्तनरंगीं सडा घालिती मानवला सर्वत्रासि असे । पुढें मागें ऐसा नसे दुसरा मृत्युलोकींचा रहिवासी,' ' पहावें रत्न पंधरावें ' इत्यादि वर्णनानंतर जास्त कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं. समकालीन प्रसिद्ध कवींकडून स्तुतीचा करभार मिळविण्याचे आणि प्रत्यक्ष पेशव्याच्या हातानें काव्यसामग्री लिहून मिळण्याचें परमभाग्य मराठे शाहीरांतील दुसऱ्या कोणासहि लाभलेलें नाहीं.

**अनंत रामचंद्र बडवे**--अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हा कवि होऊन गेला. हा प्रल्हाद शिवाजी बडवे या कवीचा नातू होय. याच्या पित्याचें नांव रामचंद्र. यानें आपल्या आजापासून कवित्वशक्ति उचलली होती. यानें आपल्या गुरूवर गोपाळाष्टक नांवाचें रचिलेलें कवन फार मधुर आहे.

यानें लिहिलेले ग्रंथ--( १ ) मल्लारिमाहात्म्य ( ओव्या १३८ ); ( २ ) श्रीमद्भागवताच्या पंचमस्कंधांतील भरताख्यान ( ओ. १०२ ); ब्रह्मोत्तरखंडाच्या आधारानें लिहिलेलें ( ३ ) शिवरात्रीमाहात्म्य ( ओ. ७३ ) व ( ४ ) प्रदोषमाहात्म्य ( ओ. ७५ ). यांखेरीज कांहीं स्फुट पदेंहि आहेत ( महाराष्ट्रकविचरित्र, भा. १, पा. ३१५-३१६ ). काव्यसंग्रहांत ज्या अनंतांचीं काव्यें छापलीं आहेत, तो रामदासशिष्य अनंत कवीहून वेगळा होय. याचा रामचंद्र हा मुलगाहि कवि होता. यानेंच मुकुंद-

राजाचा विवेकसिंधु संस्कृतमध्यें भाषान्तरित केला ( श. १६७५ च्या सुमारास ). याच्या आजोबानें म्हणजे प्रल्हाद शिवाजी बडवे यानें अमृतानुभव संस्कृतमध्यें केला.

२. ( आनंदमूर्ति पाहा ).

३. चोखामेळ्याची कविता लिहून ठेवणारा ब्राह्मण.

**अनंतराज**—हा काश्मीरच्या संग्रामराजाचा उत्तराधिकारी. यानें स. १०२९-१०३९ पर्यंत राज्य केलें. याच्या वेळीं एका देशद्रोही काश्मीरी सरदारानें काश्मीरावर तुर्कांची स्वारी आणली व तीस दरदांनीं मदत केली. पण यानें त्यांचा पराभव केला. याची राणी त्रिगर्तराजकन्या सूर्यमती होय. शेवटीं यानें आपला पुत्र कलश याला गादीवर बसवून आपण वनवास पत्करला, पण कलशानें याचे फार हाल केले ( हि. भा. अ. ४५८-४५९ ). राजतरंगिणीवरून असें दिसतें कीं, यानें चंपावर स्वारी करून सालवर्मन् यास जिंकलें ( पा. ४६२ ).

**अनंतराम**—याचें एक संस्कृतांत अन्योक्तिपर नाटक लिहिलें आहे. त्याचें नांव ' स्वानुभूति नाटक ' असें आहे.

**अनंतवर्मन्**—हा त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगांपैकीं राजराज व रूपसुंदरी यांचा मुलगा. हा चोलगंग नांवानें विशेष प्रसिद्ध आहे. कारण हा गंग वंशांतील असून याची माता रूपसुंदरी ही वेंगीची सत्ता नष्ट करणाऱ्या प्रसिद्ध राजेन्द्र चोलाची मुलगी होती. म्हणून दोनहि मोठ्या घराण्यांचें निदर्शक चोलगंग असें नांव हा वापरी. यानें पश्चिमेच्या उत्कलराज्यास व पूर्वेच्या वेंगीराज्यास मदत केली. याचे स. १०८१, १०८८, ११३५ वगैरे सालांतील बरेच लेख प्रसिद्ध झाले आहत ( एपि. इंडि. १८. १६३-१६५ ). यांपैकीं एका लेखांत राजराजेश्वर नांवाचें याच्या पित्यानें बांधलेलें एक शिवालय होतें, त्यास यानें गांव दिल्याचा निर्देश आहे.

तसेंच दुसऱ्या एका लेखांत उत्कल व ओरिसा जिंकून आपल्या राज्यांत सामील केल्याचा व त्यामुळें भूमि, द्रव्य, हत्ती, घोडे वगैरे विपुल संपत्ति मिळाल्याचा निर्देश आहे. तसेंच जगन्नाथाचें मंदिर यानें बांधलें, असें त्या लेखांत अठ्ठाविसाव्या श्लोकांत म्हटलें आहे. हा आपणास परमवैष्णव म्हणवतो. यानें एका मंदार राजाला पराभूत करून गंगेपार घालविलें. पण हा मंदार कोण हें समजत नाहीं. यानें सत्तर वर्षे राज्य केलें, असें या लेखांत म्हटलें आहे. याचा मुलगा कामार्णव याला स. ११४२ मध्यें राज्याभिषेक झाला ( हिं. भा. अ. पा. ४३९-४०१ ). त्याप्रमाणें यानें जयपुर येथें गंगेश्वर नांवाचें देऊळ बांधलें. स्मिथनें स. १०७६-११४६ असा याचा राज्यकाल दिला आहे.

२. ( ४५०-४७५ ) मौखरी वंशांतील जो शार्दूलवर्मन् त्याचा हा मुलगा होय. हा आपल्या बापाप्रमाणेंच कुशल योद्धा असून विशेषतः तीर मारण्यांत याची फार ख्याती होती. बापाबरोबर यानें पुष्कळशा लढायांमध्यें आपली मर्दुमकी गाजविली. हा अतिशय लोकप्रिय असून मौखरी वंशांतील एक दागिना होता असें म्हणतात. याच्या अंगीं याच्या बापाइतकें दातृत्व नव्हतें. तरी पण याच्याविषयीं जनतेला सहानुभूति वाटत होती. असें सांगतात कीं, हा जर शिकारीस गेला तर हरीण, याच्या हातून आपण मरावें या हेतूनें, स्तब्ध उभें राहत असे.

याच्या मागून हरिवर्मन् हा गादीवर आला. परंतु याचें व हरिवर्मनचें नातें समजत नाहीं. याला पुत्र वगैरे कांहीं नव्हतें. तेव्हां हरिवर्मन् हा याच्या बहिणीचा किंवा भावाचा मुलगा असावा ( मौखरी By E. A. Pires, P. 51-53 ).

**अनंतवीर्य**—हा जैनधर्मी दिगंबरपंथी होता. यानें माणिक्यनंदीच्या परीक्षामुख या ग्रंथावर परीक्षामुखपंजिका अथवा प्रमेयरत्नमाला या नांवाची एक टीका लिहिली आहे. तसेंच यानें अकलंकाच्या न्यायविनिश्चय या ग्रंथावरहि न्यायविनिश्चयवृत्ती नांवाची एक टीका लिहिली आहे. पैकीं पहिली टीका यानें शांतिसेनाकरितां विजय आणि नन्दाम्बा यांचा पुत्र हिरपाच्या सांगण्यावरून लिहिली.

शांतिसेन व शांतिसूरी हे एकच होत, असें समजलें जातें. हा शांतिसेन संवत् १०९६ अथवा स. १०३९ मध्यें मरण पावला. तेव्हां याचा समकालीन असा हा अनंतवीर्य याच सुमारास झाला असावा. हा १४ व्या शतकाच्या अगोदर झाला असावा एवढें मात्र निर्विवाद आहे. कारण माधवाचार्यानें आपल्या सर्वदर्शनसंग्रहामध्यें जैनदर्शन या भागांत याचा उल्लेख केला आहे ( हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक, पा. १९८ ).

**अनंतसुत** ( मुद्गल )—हाच कृष्णदास मुद्गल आहे कीं काय असा संशय आहे. हा नाथ महाराजांपूर्वी एक वर्ष समाधिस्थ झाला असावा असें महिपतिबाबा म्हणतात. त्यावरून समाधिशक १५२० निघतो. यांनी चार ग्रंथ:— रामायण, रुक्मिणीस्वयंवर व कालियामर्दन लिहिलेले होत ( सं. सू. ).

**अनंतसुत त्र्यंबक**—याचें ओवीबद्ध होतें. उपलब्ध आहे आणि तें सरस आहे ( मं. पोवाडे ' १८३७ पा. १०२-१०६ ). ) वरील

२. रुक्मिणीस्वयंवराचा कर्ता.

३. काळेयामर्दन गाणारा.

४. विठ्ठलस्तुति व चेंडूफळी लिहिणारा.

**अनंतसुत विठ्ठल**—हा कवि सुमारें ७० वर्षांपूर्वी बडोदे येथें होऊन गेला. याचे वडील अनंत हांगा नदीच्या काठी पिंपळगांव (माहूरजवळ) येथें राहत असत. त्यांच्याकडे एकंदर तीन गांवचें जोशीपण व कुळकर्णपण होतें. विठ्ठलाच्या आईचें नांव राधाबाई. विठ्ठलानें वडिलांनाच गुरु केलें होतें. याचा दत्तप्रबोध हा एकच ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याचे पहिले ३७ अध्याय शिवपुराण, नारदपुराण, पद्मपुराण यांच्या आधारें लिहिले असून त्यांत यानें दत्तात्र्याच्या कथा वर्णिल्या आहेत. पुढील २४ अध्यायांत दत्तसांप्रदायांतील संतांच्या कथा वर्णिल्या आहेत. त्यांत कवीनें आपली दत्तभक्तांची गुरुपरंपरा दिली आहे. यानें आपल्या तीर्थरूपांची भक्ति व त्यांना झालेला साक्षात्कार चांगला वर्णिला आहे. यानें आपली गुरुपरंपरा, जनार्दन-एकनाथ-नरहरी-निंबराज-नारायण-जयराम-नारायण-अनंत-विठ्ठल अशी दिली आहे. या परंपरेंतील बहुतेक पुरुष प्रसिद्ध आहेत ( महाराष्ट्र कविचरित्र भा. २, पा. २२९ ).

२. संत-कविकाव्य-सूचीकार एका अनंतसुत विठ्ठलाची माहिती देतात तो व हा एक नसावेत. कारण याचे ग्रंथ-वस्त्रहरण ( श. १५९४ ), गजगौरीव्रत, सुधन्वाख्यान व मारकावध, गरुडहनुमंतभेट वगैरे होत.

**अनंतसुत संत पुरोहित तुकदेव**--यानें स्वात्मानुभवतरंगिणी नामक सप्ततरंगात्मक प्राकृत ग्रंथाची स्वहस्ताने लिहिलेली अशी संपूर्ण पोथी आहे. ग्रंथसंख्या ८६१ असून ग्रंथ वेदान्तपर आहे ( मं. श. १८३५ इ. इ. ले. ३५ ).

**अनंताचार्य**—याच्या पित्याचें नांव नागदेवभट्ट असें होते. हा शुक्लयजुर्वेदापैकीं कण्वशाखेचा असून यानें आपल्या स्वप्न संहितेवर भाष्य लिहिलें आहे.

**अनंतोपाध्याय**—पंढरपूरचे बाबा पाध्ये व तात्या पाध्ये यांचा पिता.

**अनाथ**—हिन्दीतील विचारमाला व सर्वसार या ग्रंथांचा कर्ता.

**अनाथ पिण्डक**—यानें गृहपति असूनहि शंभर कोटि रुपये भगवान् बुद्धाकरितां दान केले. यानें गौतम बुद्धाकरितां जेतवन पाहिजे होतें म्हणून जमिनीवर रुपये पसरून जमिनीइतके रुपये दिले. त्याचें एक प्राचीन चित्र बर्हुतस्तूपावर उपलब्ध आहे. अशोकावदान या ग्रंथांतहि या कथेचा निर्देश आहे. याचें नांव सुदत्त असें होतें ( सुदत्त पाहा ).

**अनामक**—हा एक मराठी कवि होता. यानें द्रौपदीस्वयंवर नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. श्लोकांची रचना आनंदतनयासारखी असून भाषा सवाई माधवरावाच्या कालांतील आहे. ह्या दोन बाबींवरून हा कवि दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीच्या सुमारास होऊन गेला असावा. यानें आर्या सुद्धां रचिल्या आहेत ( मं. श. १८३६ वा. इ. ले. ८४ ).

**अनार्कली**—( डाळिंबाची कळी ) हें एका स्त्रीचें नांव होतें. हिचेंच दुसरें नांव नादिरा बेगम असें होतें. ही जहांगीर बादशहाच्या कारकीर्दीत होऊन गेली. हिची कबर लाहोर येथें अनार्कली नांवाच्या ठिकाणीं आहे. या नांवासंबंधानें अनेक निरनिराळ्या गोष्टी सांगण्यांत येतात. कोणी म्हणतात कीं, जहांगीरच्या राजकन्येचें हें एक नांव होतें व कोणी म्हणतात कीं, ही एक दासी होती. हिच्यावर जहांगीरचें प्रेम बसलें म्हणून हिला अकबरानें जिवंत पुरून टाकली. ही जरी दंतकथा असली तरी एवढें मात्र खरें कीं, वर निर्देश केलेली एक स्त्री होती व ती अकबर अथवा जहांगीर यांच्या कारकीर्दीत होती. आणि हिच्यावर कोणी तरी राजपुत्र मोहित झाला होता व हिला अशा परिस्थितींत मृत्यु आला कीं, त्या योगानें त्या प्रेमी पुरुषाचें हृदय विदीर्ण होऊन त्यानें पुढील अर्थाच्या पद्यमय ओळी हिच्या थडग्यावर लिहून ठेवल्या आहेत.

"अरेरे ! जर माझ्या नष्ट प्रियेचें मुख मला पुनः पाहावयास मिळेल, तर मी सृष्टीच्या अन्तापर्यंत देवाचे आभार मानीत राहीन" ( बील ).

'अर्ली ट्रॅव्हेल्स इन् इंडिया' या ग्रंथांत विल्यम फिंच यानें ही कबर प्रत्यक्ष पाहून तिचें वर्णन येणेंप्रमाणें दिलें आहेः—

"अनार्कली ही अकबराची एक बायको व राजपुत्र दानियल याची ही आई होती. राजपुत्र सेलीमशीं हिचा कांहीं संबंध उघडकीस आल्यानें अकबरानें हिला भिंतींत चिणून ठार मारलें. पुढें सेलीम बादशहा झाल्यावर हिच्या स्मरणार्थ त्यानें ही सुंदर कबर बांधली."

वरील ग्रंथांत एडवर्ड टेरी नांवाच्या दुसऱ्या प्रवाशानेंहि फिंचसारखेंच लिहिलें आहे.

**अग्निग**--पल्लव घराण्यांतील एक राजा. याचा राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या कृष्णानें पराभव केला ( स. ९४० ).

यालाच अंतिग असें म्हटलेलें आहे (Bhand. P. 290,304). याच्यानंतर याचा भाऊ दिलिपय्य हा गादीवर आला.

**अनियक भीम**--हा त्रिकलिंगाच्या प्राच्यगंगांपैकीं अनंतवर्मन् ऊर्फ चोडगंग याचा चौथा पुत्र. याला अनंग-भीम असेंहि म्हणत. ओरिसा या वेळीं गंगाच्या पूर्ण ताब्यांत होता. कारण याचा एक मांडलिक स्वप्नेश्वर यानें ओरिसांत स्वप्नेश्वर मेघवाहन नांवाचें देवालय बांधलें. याच्याकरितां स्वप्नेश्वरानें अनेक लढाया जिंकल्या होत्या. स्वप्नेश्वर येथें मंदिरावर लावलेल्या प्रशस्तींत बरीच माहिती मिळते ( JRASP ६१.१८; वज्रहस्त चवथा पाहा).

**अनिरुद्ध**--हा उदायीनंतर मगधच्या गादीवर आला असें बुद्धांनीं केलेल्या परंपरेत आहे. त्याच परंपरे-प्रमाणें याच्यानंतर मगधच्या गादीवर मुंद हा राजा आला.

**२.** बुद्धाचा चुलत भाऊ. हा दिव्यचक्षु होता.

**३.** हा गंगेच्या तीरावरील विहारपाठक या गांवचा रहिवासी होय. यानें कुमारिलभट्टाच्या तत्त्वांचा चांगला अभ्यास केला होता. याच्या ग्रंथावरून हा धर्माध्यक्ष होता असा निष्कर्ष निघतो. हा बंगाली ब्राह्मण होता. हा स्वतःला धर्माधिकारी असें म्हणवीत असे. हा बंगालच्या बल्लाळसेन राजाचा गुरु होता, त्याच्या ( राजा )-पासून त्याला ग्रंथ लिहिण्यास बरीच मदत मिळाली.

याचा हारलता हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ कलकत्ता येथें प्रसिद्ध झालेला आहे. या ग्रंथामध्यें जन्माशौच, मृताशौच यांचे नियमांविषयीं विवरण केलेलें आहे. पितृदयिता हा ग्रंथ सामवेदी लोकांच्या करितां लिहिलेला आहे. यामध्यें स्नान, संध्या, तर्पण वगैरे गोष्टींचें स्पष्टीकरण आलेलें आहे.

हा १२ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला. कारण गोविंदानें आपल्या श्राद्धक्रियाकौमुदी या ग्रंथांत याचा वेळोवेळीं उल्लेख केलेला आहे. शिवाय यानें भोजदेव, गोविंदराज यांचा उल्लेख केलेला आहे ( हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र, पा. ३३७-३३९ ).

**४.** हा ब्रह्मदेशांतील अकराव्या शतकांत राज्य करणाऱ्या वगान घराण्यांतील प्रसिद्ध पुरुष होय. ब्रह्मदेशांत नवीन मन्वंतर घडवून आणण्यासाठीं अनेक राष्ट्राहिताचीं कामें यानें केलीं. यानें देशांतील बौद्ध धर्माची सुधारणा करून मोठमोठीं देवस्थानें बांधलीं. हें एक काम होय. हीं देवळें बांधण्यासाठीं खेड्यांतून शेतकीवरील पुष्कळशा लोकांना जबरीनें धरून आणून त्यांच्याकडून यानें काम करून घेतलें. देवस्थानांची झाडलोट व रक्षण करण्यासारखीं इतर कांहीं कामें हीं सक्तीनें घेण्याची पद्धति तिकडे आहे. उत्तरेकडे इरावती नदीचे कांठीं पगार येथें अनिरुद्ध नांवाच्या ब्रह्मी जातीच्या राजानें जेव्हां पहिली ब्रह्मी बादशाही स्थापिली, तेव्हां दक्षिणेंत थटून येथें मनुहा राज्य करीत होता. याच्या प्रांतांत द्रविड देशांतून कांची येथें गेलेला हीनयान पंथ जोरावत होता. अनिरुद्धाला उत्तरेकडील भ्रष्ट बौद्ध धर्माची सुधारणा करावयाची होती. अनायासेंच त्यास एक बौद्ध भिक्षु मार्गदर्शक मिळाला. त्यानें थटून येथें त्रिपिटक नांवाच्या ग्रंथाच्या प्रति आणण्याची अनिरुद्धास सल्ला दिली. सामोपचारानें मागूनहि मनुहा ग्रंथाच्या प्रति देण्यास तयार होत नाहीं, असें पाहून यानें त्यावर मोठी स्वारी केली व ग्रंथासहित त्याचें सर्वस्व हरण केलें. मौल्यवान् चिजांबरोबर प्रजेसहि गुलाम केलें. तेव्हां-पर्यंत दक्षिण ब्रह्मदेशांतील संस्कृति आंध व द्रविड देशांतून आलेल्या हीनयान बौद्ध धर्मानें व्यापिली होती. ती संस्कृति या युद्धामुळें उत्तरेस फैलावूं लागली.

थटूनचे प्रजाजन व राजघराणें यांना गुलामाप्रमाणें वागविण्यांत येऊन त्यांना पॅगोडांमध्यें राहणें भाग पाडिलें. पश्चिम भागांत श्वझिंगो यानें पॅगोडा बांधण्यास सुरुवात केली ( १०४४-७७ ). त्याची पूर्ति त्याच्या मानलेल्या मुलानें म्हणजे काझिंटा राजानें केली. जिंकून आणिलेल्या मनुहानें 'मनुहाचें देऊळ' म्हणून प्रसिद्ध असलेला पॅगोडा बांधिला. पुढें मनुहास मोकळें ठेवणें इष्ट न वाटल्या-वरून त्यास गुलाम बनविण्यांत येऊन एका देवळाची व्यवस्था करण्याचें काम त्याजकडे सोपविलें ( मि. जी. ई. हार्पे यांनीं लिहिलेला 'ब्रह्मदेशाचा इतिहास' ).

**अनीस**--एक उर्दू कवि. याचें नांव मीर बबरअली असून अनीस हें उपनांव होय. याच्या बापाचें नांव मुस्त-हसन खलीक असें असून आजोबाचें नांव मीर हसन होतें. याचा जन्म लखनौ येथें स. १८०२ मध्यें झाला.

याचें प्राथमिक शिक्षण मौलवी हैदरअलीपाशीं झालें. कविता तर याची वडिलार्जित संपत्ति होती. कवितेचें बीज याच्यामध्यें पूर्णपणें बिंबलें होतें. जोंपर्यंत याचे वडिल हयात होते, तोंपर्यंत याला वडिलांच्या कविता पाहा-वयास आणि ऐकावयास मिळत. त्यांचे पश्चात् हा स्वतः कविता करूं लागला.

ही एक संतोषी व्यक्ति असून मितभाषिणी होती. आणि जें कांहीं बोलत असे तें मोहक आणि त्यामध्यें योग्य शब्दांचाच उपयोग केलेला असे. हिंदीमध्यें याच्या नांवावर एक घनाक्षरी छंद नांवाचें पुस्तक फार लोक-प्रिय आहे. पण तें यानेंच आहे कीं आणखी दुसऱ्या कोणाचें आहे हें मात्र निश्चित ठरलेलें नाहीं.

हा जन्मभर लखनौ येथेंच राहिला. पण आपली बागणूक दिल्लीबरहुकूम ठेवीत असे. याला गर्व होता.

याचा, मुलें, स्त्रिया, पुरुष, योद्धा, प्रेमी त्याचप्रमाणें सेवक इत्यादिकांच्या मनोभावना व्यक्त करण्याचा प्रयत्न सरस वठला आहे. कांहीं ठिकाणीं सृष्टीचीं वर्णनें फार उत्तम साधलीं आहेत.

याचा मृत्यु स. १८७४ मध्यें झाला ( क. कौ. भा. ४ था ).

**अनुभूति स्वरूपाचार्य**—यानें सारस्वतप्रक्रिया नांवाचें व्याकरण रचिलें. याच्याविषयीं एक गोष्ट अशी सांगतात कीं, हा एकदां सभेंत भाषण करीत असतां याच्या मुखावाटें एक अशुद्ध प्रयोग निघाला. यास पंडितांनीं आधार विचारतांच यानें 'उद्या सांगेन' असें सांगून घरीं जाऊन सरस्वतीची आराधना केली. त्या वेळीं यास जें व्याकरण सरस्वतीकडून मिळालें तें पंडितांना दुसरे दिवशीं सांगून त्यांची शंका यानें निरसन केली.

सारस्वतप्रक्रियेशिवाय आख्यातप्रक्रिया व धातुपाठ हेहि यानें केले होते असें दिसतें ( सी. सी. ). हा स. १२५०-१४५० पर्यंतच्या काळांत होऊन गेला असावा ( सिस्टिम ऑफ दि संस्कृत ग्रामर, पा. ९६ ).

**अनुला**--ही महानग राजाची पत्नी होय. हिला बौद्ध धर्माचीं तत्त्वें पूर्णपणें पटलीं होतीं. व त्याप्रमाणें हिनें सिलोनमध्यें ह्या धर्माचा प्रचार प्रथम सुरू केला. धर्म स्वतः पाळून तो लोकांकडून कसा पाळला जाईल हें पाहण्याची हिला फार आवड असे. संघमित्रा नांवाच्या हिच्या नणंदेनें हिला बौद्धधर्माची आचार्या असें वारंवार संबोधिलें आहे ( ग्यारे. कोश ).

**२.** ही कोरांग राजाची राणी होय. ही अत्यंत दुर्वर्तनी असल्याचा उल्लेख सांपडतो. हिनें आपल्या पतीस व पुत्रास विष घालून मारल्याविषयींची आख्यायिका प्रसिद्ध आहे; व त्यानंतर एकामागून एक असे चार उपपतीहि तसेच हिनें मारिले. शेवटीं हिचा पुतण्याच विरुद्ध जाऊन त्यानें इ. स.च्या पूर्वी ४१ व्या वर्षी हिचा खून करविला व गादी आपणाकडे घेतली ( ग्यारे. कोश ).

**अनूपसिंग**--बिकानेर संस्थानचा एक राजा. हा त्याच घराण्यांतील करणसिंग याच्यानंतर गादीवर आला. यानें गोवळकोंडा घेण्याचे कामीं मोंगलास मदत केली म्हणून यास महाराजा हा किताब देण्यांत आला.

**अनूबाई घोरपडे**—बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची चुलत धाकटी कन्या. हिच्या वयाच्या ६ व्या वर्षी सातारा मुक्कामीं इचलकरंजी घराण्यांतील व्यंकटराव नारायणराव घोरपडे यांच्याशीं विवाह झाला. अनूबाईस वर्षातून बरेच दिवस आपणाजवळ राहतां यावें म्हणून पेशव्यांनीं स. १७२२ सालीं पुण्यास एक वाडा बांधून दिला व मौजे वडगांव तर्फ चाकण हा सबंध गांव व आणखी कांहीं बागा इनाम करून दिल्या. हिला पूर्ववयांतच नारायणराव व वेणूताई हीं अपत्यें झालीं. वेणूताई त्रिंबकराव पेठे यांस दिली होती.

अनूबाईच्या पतीस क्षयरोग होऊन तो वारला. त्याच्या कारकीर्दीत इचलकरंजी संस्थान जें वैभवाच्या शिखरास जाऊन पोंहोचलें तें अनूबाईच्या योगानें. हिनें आपल्या पेशव्यावरील वजनामुळें आपल्या मुलास लाखों रुपये मिळवून दिले व त्याला पतीच्या सरदारकीस योग्य असा तयार केला.

अनूबाईस बाळाजीमुळें शाहूमहाराजहि बरेच मानीत होते. अनूबाईचा नवरा वारल्यावर शाहूनें हिला सबंध अजरेमहाल इनाम करून दिला. पुढें हिनें ३१ खेड्यांची रीतसर सनद मिळविली. १७५६ सालीं सावनुरावरील मोहिमेंत ही पेशव्याबरोबर हजर होती. पुढें हिनें आपल्या कर्तृत्वावर धारवाडच्या विस्तृत सुभ्याची मामलत किल्ल्यासह मिळविली.

हिचा मुलगा नारायणराव हा वयांत आला तेव्हां आईच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें न रुचून माता-पुत्रांत वितुष्ट आलें. हिच्या प्रांतासच जोडून कोल्हापूर प्रांत असल्यामुळें व संभाजी मृत्यु पावल्यामुळें हिनें ती हकीकत पेशव्यास कळवून तें राज्य खालसा करण्याची सल्ला दिली. नारायणराव व्यसनाधीन बनला व त्यामुळें त्याची जबाबदारी पेशव्यांनीं काढून घेण्याचें ठरविलें. परंतु हिनें पुण्यास येऊन भीड खर्चून मामलतीचें देणें चार महिन्यांत देण्याचा करार केला. परंतु पुढें हिचा मुलगा वारला. पुढें लगेच १७७४ सालीं त्रिंबकराव मामा मारले गेले. व मुलीच्या वैधव्याची भर हिच्या पुत्रशोकांत पडली. पुढें आयुष्याच्या शेवटीं शेवटीं हिनें एक मोठी चूक केली. भाऊसाहेबांच्या तोतयाची चौकशी केली असतां तो भाऊसाहेबच आहे असें समजून हिनें त्याला मदत केली. तेव्हां पेशव्यांनीं हिची सर्व जहागीर व मामलत जप्त केली. तेव्हां कांहीं प्रमुख लोकांच्या सांगण्यावरून तें प्रकरण सव्वा लाख रुपये दंड भरून मिटलें. शेवट असा झाल्यामुळें ही काशीस गेली व स. १७८३ त तुळापुरास वारली.

पतीच्या निधनानंतर मुलगा ४६ वर्षांचा व त्यानंतर नातू या दोघांनाहि पोर समजून व त्यांचें कांहींएक चालूं

न देतां हिनें ३८ वर्षे संस्थानचा कारभार केला. हिनें मोठमोठ्या सर्व मसलती अंगावर घेऊन पार पाडल्या. हिची हिंमत, धोरण व महत्त्वाकांक्षा जबरदस्त होती (ज्ञा.को.).

**अन्नपूर्णाबाई**--गंगाधर यशवंत चंद्रचूड याची बायको. ही मोठी हुशार व दक्ष होती. ती नेहमीं राजकारणांत लक्ष घालीत असे ( म. रि. म. ४, पा. ८ ). मोंगलांनीं पुणें जाळलें, तेव्हां चंद्रचूड घराण्यांतील बायकामंडळीवर कठीण प्रसंग आला होता. गंगोबा, अज्याबा वगैरे मंडळी हैदराबादेकडे गुंतलेली, दादाजी वगैरे मुलें लहान व तशांत हिची धाकटी सवत आजारी पडून मृत्यु पावली. असें चहूंकडून आकाश कोसळलें असतां हिनें धैर्य खचूं दिलें नाहीं. उलट धीराचें पत्र लिहिलें. 'देशांत थोर अनर्थ झाला,' 'कित्येक स्त्रियांच्या इज्जती घेतल्या,' 'इकडे अतिशय गलबल झाली आहे,' 'चिठीचें कार्य ( हुंडीचे पैसे मिळणें ) होत नाहीं,' वगैरे हकीकत लिहून आपल्या संरक्षणाकरितां निघून येण्याबद्दल न लिहितां 'बहुत सावधपणें बुद्धीनें वर्तणूक करोन शरीर संरक्षण करणें,' असा शांतपणें हिनें स्वारीवर गेलेल्या घरच्या मंडळीस उपदेश केला आहे ( चंद्रचूड दप्तर ले. ७७ ).

**२.** ही बीडचे निंबाळकराची मुलगी व महादजी शिंदे याची पत्नी. हिला यमुना नांवाची मुलगी होती.

**अन्नमदेव**--हा दुसऱ्या प्रतापरुद्राचा धाकटा बंधु होय. प्रतापरुद्रानेंच स्वतः गादीवरून खालीं होऊन भावास गादी दिली. अन्नमदेव हा मुद्दां सुज्ञ असल्यामुळें प्रत्येक गोष्ट भावाच्या सल्ल्यानें करीत असे. पण भावाला मलिक काफूरनें पकडून नेल्यावर यानें बस्तर येथें राज्य स्थापिलें.

विद्यानाथानें प्रतापरुद्रावर एक नाटक लिहिलें होतें व तें प्रतापानें गादी सोडल्यावर पुरें झालें. त्या नाटकाबद्दल बक्षीस म्हणून प्रतापानें त्यास एक आंगठी दिली व ती अन्नमदेवाकडे घेऊन जाण्यास सांगून लागेल तितकें द्रव्यहि देण्यास अन्नमदेवास सांगितलें. त्याप्रमाणें अन्नमदेवानें विद्यानाथास द्रव्य देऊन तृप्त केलें. त्यास पुढें एक विद्यालय काढून देऊन मुख्य अध्यापकाची जागा दिली ( २ प्रतापरुद्र पाहा ).

**अन्नलदेव**—हा प्रतापरुद्राचा सेनापति होता. याचा उल्लेख स. १२९१ च्या शिलालेखांत आढळतो. हा महाप्रधान गन्नयप्रेग्गड याचा मुलगा. अन्नयप्रेग्गड आणि गन्नयप्रेग्गड हे एकच असावेत. याचा उल्लेख स. १३०६ ( प्रेद गल्लपल्लेच्या ) व स. १३१७ च्या ( तिरुचीच्या ) शिलालेखांत आढळतो ( सुब्रमणि अय्यर कृत एन्शन्ट डेक्कन भा. १, पा. २९७ ).

**अन्नय्याचारी**—तेलंगी भाषेंत दोन भागांनीं रचलेलें यांचें पितामहचरित्र प्रसिद्ध आहे. त्यांत सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाचें यानें वर्णन केलें आहे.

**अन्नवेमरेड्डी**—तैलंगणांतील कोंडवीडू येथें हा राज्य करीत होता. एकदां तेनाल रामलिंगानें कृष्णदेव रामलुकरितां कंदाहारी घोडा आणविला होता. तो घोडा ह्याच अन्नवेमरेड्डीचा होय ( कविचरित्र ).

हा संस्कृत आणि आन्ध्र भाषेंत अत्यंत प्रवीण होता. अमरु शतकावरील याची संस्कृतमध्यें लिहिलेली व्याख्या प्रसिद्ध आहे. यानें आन्ध्र प्रांतांतील प्रसिद्ध कवित्रयांपैकीं एराप्रगड यास आश्रय दिल्यामुळें याची कीर्ति अजरामर झाली आहे ( तेलगू वाङ्मय पा. १५ ).

**अन्नंभट्ट**--हा जातीचा तैलंग ब्राह्मण. हा मोठा नैय्यायिक होता. गरिकपाद ( तेलंगण ) येथें याचा जन्म झाला. कौंडिण्यपूर ज्यास कोंडवीडू असें म्हणतात, तेथील संस्कृत शाळेंत यानें १२ वर्षे राहून न्यायशास्त्राचें पूर्ण ज्ञान संपादिलें.

यानें वैशेषिक तर्कज्ञानावर तर्कसंग्रह नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. तशीच त्या ग्रंथावर दीपिका नांवाची टीकाहि लिहिली आहे. या दोनहि ग्रंथांस मिळून अन्नंभट्टीयम् असें म्हणतात. उदयनाच्या न्यायपरिशिष्ट'वरील न्यायपरिशिष्टप्रकाश नांवाची टीकाहि यानेंच लिहिली, असें म्हणतात. हा आंध्र ( तेलगू ) असून दक्षिण अर्काट ( चित्तूर ) येथील रहिवासी होता. १७ व्या शतकाच्या सुरवातीस हा बनारस येथें राहण्यास गेला. यानें आपल्या दीपिकेंत कांची येथील पल्लव राजा त्रिभुवनातिलक याचा उल्लेख केला आहे. वेबरच्या कॅटलॉगवरून असें कळून येतें कीं, तर्कसंग्रहाच्या एका हस्तलिखितावर स. १७२४ ( संवत् १७८१ ) हें साल आहे [ No. 683 p. 203 ]. प्रो. J. R. Ballantyne यानें तर्कसंग्रहाचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. अन्नमभट्टानें तत्त्वचिंतामणीवरहि टीका लिहिली, असें कांहींचें म्हणणें आहे. हा १७ व्या शतकाचे पूर्वी होऊन गेला नसावा ( हिस्टरी ऑफ इंडियन् लॉजिक, पा. ३८८ ).

हा आपल्या वयाच्या ५५ व्या वर्षी फक्त श्रीक्षेत्र मल्लिकार्जुनाच्या दर्शनास गेला. याशिवाय यानें प्रवास असा केला नाहीं. हा कोणत्याहि राजाकडे द्रव्याच्या आशेनें गेला नाहीं. हा संतोषवृत्तीचा असल्यामुळें वडिलांच्या वेळच्या मिळकतीवरच आनंदी असे. पुढें उरलेला काळ यानें स्नानसंध्येंत व विद्यार्थ्यांना शिकविण्यांत घालविला. याला

मुलें पुष्कळ होतीं, पण तीं याच्या मरणापूर्वीच निवर्तलीं, असें सांगतात.

**अन्वरुद्दीनखान**—हा स. १७२५ च्या सुमारास दिल्लीहून दक्षिणेकडे आला. हा निजामच्या माहितीचा होता. हुशार असल्यामुळें याची नेमणूक निजामानें हैदराबादच्या कारभारावर केली ( म. रि. मध्य. १ पृ. १७० ).

**२.** हा कर्नाटकचा नबाब होय. शिपाईगिरीवर यानें आपलें नशीब उघडलें. हा प्रथम कर्नाटकच्या बालराजाचा कारभारी होता. नंतर बालराजाचा खून झाल्यावर यानें स्वतःच ती गादी बळकाविली. प्रथम हा मोंगलांच्या पदरीं होता. परंतु याच्या हलगर्जीमुळें याला नेमलेल्या प्रांताचा वसूल करतां येईना, म्हणून हा ती नोकरी सोडून गाजिउद्दीनाकडे आला. त्यानें याला सुरतेस जबाबदारीच्या जागेवर नेमलें. गाझीउद्दीननंतर त्याच्या मुलानें याला कर्नाटकच्या व राजमहेंद्री प्रांतावर नेमलें. पुढें त्याच प्रांताचा हा नबाब झाला. मुजफरजंगाशीं झालेल्या लढाईत हा मारला गेला. त्या वेळीं याचें वय १०७ वर्षांचें होतें, असें म्हणतात. अबदी नांवाच्या कवीनें याच्यावर एक वीररसप्रधान काव्य केलें आहे. पुढें याचा मुलगा महंमदअली कर्नाटकच्या सुभेदारीवर कायम झाला ( इ. सं. पु. ३ पृ. ६७. ).

**अन्सारी**—हा एक प्रसिद्ध फारसी कवि होय. हा गजनीच्या महंमूदाच्या पदरीं होता; व त्याच्याच आश्रयाखालीं हा प्रसिद्धीस आला ( मु. रि. भा. १ पृ. ७५ ).

**अपग्गा**—अव्हेयरची ही भगिनी होय.

**अपराजित**—मेवाडांतील उदेपूरच्या गादीवर हा शीलादित्यानंतर आला. याच्या वेळच्या वि. सं. ७१८ ( स. ६६१ ) मार्गशीर्ष शुद्ध ५ चा शिलालेख नागद्याजवळ कुंडेश्वराच्या मंदिरांत पडलेला मिळाला. तो आतां उदेपूरच्या अजबखान्यांत आहे. याच्या पुढें अनेक राजे मस्तक नमवीत होते. यानें महापराक्रमी शिवसिंहाचा पुत्र वराहसिंहाला आपला सेनापति बनविलें. वराहसिंहाची पत्नी यशोमती हिनें विष्णूचें मंदिर बांधलें ( एपि. इंडि. ४. ३१-३२ ). या प्रशस्तीचें महत्त्व असें कीं, ही कविता खोदकामाची कला या दृष्टीनें अत्यंत सुंदर आहे. याच्यानंतर महेन्द्र दुसरा गादीवर आला.

**२.** पल्लवांपैकीं नृपतुंगाचा मुलगा. याचें राज्य आदित्य चोलानें हस्तगत केलें.

**३.** हा कोंकणच्या शिलाहारांपैकीं पहिला स्वतंत्र राजा. याचा एक ताम्रपट शा. श. ९१५ ( स. ९९३ ) चा सांपडला आहे. त्यांत हा आपणास राष्ट्रकूटांचा मांडलिक असें अभिमानानें म्हणवीत असून त्यांची प्रशंसायुक्त वंशावळहि यानें दिली आहे. यांत राष्ट्रकूटांना रट्टराज्य हा शब्द वापरला आहे (म. यु. भा. २. ४४७). दुसऱ्या एका स. ९९७ मधल्या लेखांत आपणास महामंडलेश्वर असें यानें म्हणवून घेतलें आहे. शिवाय राष्ट्रकूटांची पुनः वंशावळ देऊन कक्कल राष्ट्रकूटास मारून तैलप चालुक्यानें राज्य घेतलें म्हणून दुःखोद्गार काढले आहेत ( एपि. इंडि. ३ पा. २५७ ). याच वेळीं हा स्वतंत्र झाला असावा. तथापि मांडलिकदर्शक महामंडलेश्वर हा किताब यानें कायमच ठेवला होता. या कुलाच्या पुढील लेखांत यास मृगांक व बिरुदकराम या पदव्या लावलेल्या आढळतात. गोमराजाचा यानें उत्तम सत्कार केला. ऐय्यपदेवाशीं लढाई केली व सेऊण देशाच्या भिल्लमास मदत केली. याचें राज्य 'कोंकण चोदाशें राजधानी पुरी' असें वर्णिलेलें असतें. पण पहिल्या लेखावरून कुलाबा, रत्नागिरी, ठाणें व डोंगरावरील मावळ याच्या राज्यांत होतें, असें दिसतें. हा स्वतंत्र झाला होता व याचें राज्य प्रमुख राज्यांत गणलें जाऊं लागलें ( हिं. भा. अ. पा. ३६१-३६४. ). हा सुमारें स. ९९० पासून स. १०१० पर्यंत गादीवर असावा.

तैलपाचा पुत्र सत्याश्रय यानें याचा पुरा मोड केला, असें रन्न कवीच्या कानडी काव्यांत म्हणजे गदायुद्धांत आहे. पण तें बरोबर नसावें असें दिसतें.

**अपरादित्य**—हा कोंकणचा शिलाहारवंशी राजा. याचा स. ११३८ ( शक १०६० ) च्या उरणनजीक सांपडलेल्या शिलालेखांत उल्लेख सांपडतो. डॉ. बुल्हर यास काश्मीरमध्यें सांपडलेल्या मंखाच्या श्रीकण्ठचरितांत ज्या अपरादित्य नामक कोंकणच्या ( कुंकुणेश्वर ) राजाचा उल्लेख आला आहे तो हाच होय असें मानतो ( श्रीकण्ठचरित सर्ग २५ श्लो. १०९-१११ ). या पुस्तकाचा काळ डॉ. मजकुरांनीं ११३५-४५ असा ठरविलेला आहे. सदरहू श्रीकण्ठचरितोल्लिखित अपरादित्यानें शूर्पारकाहून (सोपारा) तेजकंठ नामक पंडितास काश्मीर येथें भरलेल्या पंडितांच्या सभेस आपल्या देशातर्फे प्रतिनिधि म्हणून पाठविलें होतें. ही गोष्ट काश्मीर येथील जयसिंह राजाच्या कारकीर्दीत घडली ( बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो. जादा अंक १२, १८७७; बॉ. गॅ. व्हॉ. १. पा. २ ). यानें स. ११२५ ११४५ पर्यंत राज्य केलें असावें ( हिं. भा. अ. पा. ३६५ ).

**२.** कोंकणचा शिलाहारवंशी राजा. याचे भूमिदान

केल्याचे पांच शिलालेख उपलब्ध आहेत. स. ११८४ त भिवंडी तालुक्यांत एक, स. ११८७ त तीन, पैकीं एक परळा व दोन वसई तालुक्यांत. स. १२०३ च्या मांडवीजवळील सांपडलेल्या केशिदेवाच्या शिलालेखांत ज्याचा अपरार्क असा उल्लेख आला आहे तो हाच असावा. केशिदेव हा अपरार्काचा मुलगा होता. हा याज्ञवल्क्यस्मृतीवरील अपरार्कटीकेचा कर्ता होता. हेमाद्रीनें याच्या टीकेचा निर्देश केला आहे. यानें मिताक्षरेचा अभ्यास केलेला दिसतो.

परळच्या शिलालेखांत अपरादित्यानें स्वतःचा राजाधिराज व कोंकणचा चक्रवर्ती, असा उल्लेख केला आहे. पश्चिम चालुक्य घराण्यांतील राजांच्या आपसांतील भांडणांचा फायदा घेऊन हा स्वतंत्र झाला असावा ( बॉ. गॅ. व्हॉ. १, पा. २; बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो. ज. पु. ९; १२ व जादा अंक; इं. ॲं. ९ ). अपरार्क हा याचा ग्रंथ काश्मीरसारख्या दूरच्या देशांत प्रमाण मानतात. पहिल्या व दुसऱ्या अपरादित्याच्या माहितीवरून कोंकणचें व काश्मीरचें दळणवळण दिसून येतें. याचा राज्यकाल स. ११७५–१२०० असा दिसतो ( हि. भा. अ. ३६८ ).

**ॲप्टन**––हा स. १७७६ पासून स. १७७७ पर्यंत पुणें दरबारीं इंग्रजांचा वकील म्हणून होता. यानें ता. १–३–१७७६ रोजीं पुरंदर येथें पुणें दरबारशीं तह केला ( म. रि. उत्तर वि. १, पा. ५७–६५ ).

**अप्पय्य दीक्षित**—हा जातीचा द्रवीड ब्राह्मण होता. हा कांचीच्या अग्नेय दिशेस अग्रहारांत राहत असे. हा सामवेदी होता. गोत्र भारद्वाज, पित्याचें नांव रंगराज व आजाचें आचार्य दीक्षित म्हणजे वक्षस्थलाचार्य. विजयनगरचा कृष्णराज, नरस ऊर्फ नरसिंह, चिन्नबोम्म व वेंकट यांचा आश्रयदाता म्हणून किंवा उदाहरण म्हणून दिलेल्या स्वकृत श्लोकांत यानें उल्लेख केला आहे. सिद्धान्तकौमुदीकार भट्टोजी दीक्षित याचा शिष्य होता. हा निर्मत्सरबुद्धि असल्यानें शैव व वैष्णव या दोघांसहि मान्य असे. याला तीन बायका व ११ मुलें होतीं.

याचें नांव अप्प दीक्षित किंवा अप्पय्य दीक्षित असें आहे. यानें शंभरांवर ग्रंथ लिहिले असून त्यांतील तीन साहित्यशास्त्रावर आहेत. वृत्तिवार्तिक, कुवलयानंद, आणि चित्रमीमांसा हे ते तीन ग्रंथ आहेत. वृत्तिवार्तिक काव्यमालेंत छापला असून बाकीचे दोन स्वतंत्रपणें प्रसिद्ध आहेत. वृत्तिवार्तिकांत दोन परिच्छेद आहेत. त्यांत रूढि, योगरूढि व योग या तीन प्रकारची अभिधा व चार प्रकारची लक्षणा या दोन प्रकारच्या शब्दशक्तींचें सविस्तर विवेचन केलें आहे. कुवलयानंद हा विद्यार्थ्याच्या उपयोगी असा अलंकारग्रंथ आहे. चंद्रालोकांत शंभर अलंकार सांगितले असून यानें त्यांत अधिक चोवीसांची भर घातली आहे. कुवलयानंदांत अलंकारांचीं लक्षणें व उदाहरणें बहुधा चंद्रालोकांतून घेतलीं आहेत. बाकीचीं यानें रचलीं आहेत. आणि त्यावर इतर कवींचीं उदाहरणें देऊन यानें सुबोध विवेचन केलें आहे. हा ग्रंथ वेंकटपती राजाच्या आज्ञेवरून लिहिला. चित्रमीमांसा हा ग्रंथ यापेक्षां अधिक शास्त्रीय आहे. चित्रमीमांसा हा ग्रंथ अतिशयोक्तींचें विवेचन चालू असतांच ग्रंथकारानें संपविला आहे; आणि अरुणाची व अर्धचंद्राची उपमा दिली आहे. या चित्रमीमांसेचें खंडन जगन्नाथ पंडितानें केलें आहे. तोहि ग्रंथ उपलब्ध चित्रमीमांसेच्या कांहीं भागाचें खंडन करणारा आहे. याला आश्रय देणारा वेंकटपति हा विजयनगरचा पहिला राजा होय. त्याचें स. १६०१–२ मधील एक दानपत्र उपलब्ध आहे ( एपि. इंडि. ४. २६९ ). त्यावरून याचा काल ठरतो. जगन्नाथ पंडिताचा ग्रंथकर्तृत्वकाळ स. १६२०–१६५० आहे. महालिंगशास्त्री यांनीं याचा काळ स. १५२०–१५९२ असा निश्चित केला आहे ( जर्नल ऑफ ओरिएन्टल रिसर्च, मद्रास व्हा. ३, पा. १४८ ). याच त्रैमासिकांत याच्या रक्षणरत्नावलि या ग्रंथाचा थोडासा भाग छापला आहे. त्यांत नाट्यांतील नान्दी वगैर संज्ञांचें विवेचन आहे. त्यावर वेंकटपतीच्या आज्ञेनें एक टीकाहि यानें लिहिलेली दिसते. शिवार्कमणिदीपिका ग्रंथाच्या शेवटीं चिनवीराचा पुत्र चिन्नबोम्म हा अप्पय्य दीक्षिताचा आश्रयदाता होता, असें सांगितलें आहे. तो वेलोरचा राजा होता. व त्याच्या शिलालेखांचा काळ शके १४७१ व १४८८ (स.१५६६) आहेत ( इंडि. अंटी. व्हा. १३. पा. १४५; एपि. इंडि. व्हा. ३. पा. २३८ ).

यानें कित्येक ग्रंथ लिहिले आहेत. शिवाचेनचंद्रिका, शिवतत्त्वविवेक, शिवार्कमणिदीपिका, शिवकर्णामृत, वीरशैवग्रंथ, आत्मार्पणग्रंथ, सिद्धान्तलेशसंग्रह, रामायणतात्पर्यसंग्रह आणि नामसंग्रहमाला. शिवाय कल्पतरुपरिमळ याचाच होय. मुक्तामाला, राजनीतिशास्त्र, रसमंजरी, सकलकथासार वगैरे ग्रंथ यानें लिहिले असें म्हणतात. आत्मार्पण ग्रंथाविषयीं हिंदुस्थानांतील सर्व लोक आश्चर्यचकित झाले आहेत. हा लिहिण्याकरितां यानें धोंड्याच्या बिया खाण्याचा उपक्रम सुरू ठेवला होता. हा मोठा नैष्ठिक असल्यानें यानें कावेरी नदीतीरीं अनेक यज्ञ केले.

याचें एक वसुमतीचित्रसेनविलास नांवाचें नाटकहि आहे.

हा प्रत्येकाजवळ शिवाची स्तुति करीत असे. एकदां चुकून हा विष्णूच्या देवळांत गेला व तेथें शिवाचें नमन यानें म्हटलें. त्याबरोबर विष्णुमूर्ति अदृश्य होऊन शिवमूर्ति तेथें प्रगट झाली. तेव्हां लोकांनां हें यास सांगितलें, म्हणून यानें पुनः विष्णुनमन केलें असतां पूर्ववत् विष्णुमूर्ति त्या ठिकाणीं दिसूं लागली, अशी आख्यायिका आहे.

यानें संस्कृतांतहि कांहीं पदें रचिलीं आहेत. हा पुढें काशीस जावें व तेथेंच राहावें, या हेतूनें तयारी करीत होता. पण लोकाग्रहास्तव हा गेला नाहीं. याची जन्मभूमि चिदंबर येथें हा जाऊन राहिला. याच्याजवळ पांच स्फटिकाचीं लिंगें होतीं, तीं यानें ब्राह्मणास दोन, पुतण्यास एक, मुलांस एक देऊन एकाची चिदंबर येथें स्थापना केली. हा वयाच्या ९० व्या वर्षी चिदंबर येथें मरण पावला ( जगन्नाथ पंडित पाहा ).

**अप्पर**--एक शैव साधु. यानें पल्लव राज्यांतून जैनांस हाकलून दिलें. ही गोष्ट सनाच्या आठव्या शतकाच्या प्रारंभीं झाली.

**२.** हा तामिळपैकीं कवि असून जैनधर्मी होता. याला गणाविषयींच्या वादांत पराभूत झाल्यानें पुनः वैदिकधर्म स्वीकारावा लागला. तामीळ भाषेंतील याची कविता उपलब्ध नाहीं.

**अप्परस**--( तिम्मरस पाहा ).

**अप्पलंबा**—विजयनगरच्या रामरायाची दुसरी पत्नी. ही जिल्लेल्ला घराण्यांतील पेद्दनंदी राजूची मुलगी. हिला पुत्र नव्हता.

**अप्पाकवि**--हा जातीचा तैलंग होय. हा उत्तम कवि म्हणून म्हटला जात असे. मात्र याच्या जन्माचा नक्की सन कळत नाहीं. तैलंगी भाषेंत आंध्रप्रयोगरत्नाकर व वृंदासंभावना असे याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यांतील पहिला छंदशास्त्रावर आहे ( कविचरित्र ).

**अप्पाजी माणकेश्वर**--(दामाजी माणकेश्वर पाहा).

**अप्पादेवी**—ही रघुवंशी प्रतिहारांपैकीं रामभद्राची पत्नी. हिचा पुत्र भोज.

**अप्पानाथ**—तंजावरचा राजा शहाजी (१७३८-३९) याच्या वेळीं असलेला टिप्पा अध्वरिन् व नरसाम्बा यांचा पुत्र व रसविलासभाण याचा कर्ता. यानें एक पंचांकी क्रान्तिगतीपरिणय नांवाचें नाटक संस्कृतांत लिहिलें आहे ( ज्ञा. को. वि. १६ पृ. १३५ ).

**अप्पायिका**—एक राजा. यानें चालुक्य घराण्यांतील कीर्तिवर्मनपुत्र पुलकेशी याजवर स्वारी केली होती, पण पराभव झाल्यामुळें हा पळून गेला.

**अप्पाशास्त्री**--यानें लवलीपरिणय आणि सारस्वतादर्श नांवाचीं नाटकें लिहिलीं. शिवाय आप्पाशास्त्रीवादार्थ आणि चिल्करवादाः हे ग्रंथ लिहिल्याचे उल्लेख आढळतात. ( सी. सी. ).

**अफजलखान**--अबदुल्ला भटारी अफजलखान हा आदिलशाहाचा दासीपुत्र असावा, असें बांई येथें सांपडलेल्या हुकूमनाम्यांत आढळतें. याच्या बापाकडे आदिलशाहाच्या मुदपाकखान्यावरील देखरेखीचें काम होतें. म्हणून यास भटारी असें संबोधितात.

हा चांगला धिप्पाड पुरुष असून मुहम्मद आदिलशाहाच्या कारकीर्दीत उदयास आला. याची पहिल्या प्रतीच्या सरदारांत गणना होत होती. स. १६४४ त रणदुल्लाखान वारल्यावर वाईची सुभेदारी अफजलखानास मिळाली. हिंदूंच्या देवस्थानाचीं उत्पन्नें चालवीत होता असें याच्या, ' निंबच्या मठाचीं उत्पन्नें पूर्वीप्रमाणें चालूं द्यावींत, ' या हुकमावरून समजून येतें.

विजापूरच्या मुहम्मदशाहाच्या हुकमानें कर्नाटक जिंकण्याचें काम चालू होतें. सेनापति रणदुल्लाखानाचे हाताखालीं अफजलखान व शहाजी हे दोन मुख्य सरदार होते. कर्नाटकांत प्रवेश केल्यावर रणदुल्लानें अफजलखानास शिऱ्यावर पाठविलें. शिरें येथें मजबूत किल्ला असून तेथें कस्तुरीरंग नाईक याचा अंमल होता. यानें किल्ल्यास वेढा घालून नायकास जेर केलें. तेव्हां नाइलाज होऊन त्यानें खानाकडे तहाची याचना केली. यानें त्यास अभयवचन देऊन भेटीस बोलावलें. पुढें भेटीच्या प्रसंगीं विश्वासघात करून यानें नायकाचा शिरच्छेद केला आणि किल्ला व संपत्ति घेऊन पुढें प्रयाण केलें. याच्या या विश्वासघातकीपणाचा चहूंकडे अत्यंत बोभाटा होऊन आदिलशाही दरबारावरील लोकांचा विश्वास उडाला आणि पुढें वीस वर्षांनीं शिवाजीनें याच्यासंबंधीं जें वर्तन केलें, तें याच्या अशा कृत्याभुळेंच होय. ही स्वारी स. १६३८ मध्यें झाली ( शहाजीचें चरित्र, पा. ६४ ).

मीरजुम्ला, मुस्ताफाखान, असदखान आणि रुस्तुमजमा आणि शहाजी हे जिंजीवर चालून गेले. तेथें मुस्ताफाशीं बाकीच्या सर्वांचा विरोध सुरू झाला. शहाजीनें कुत्बशहाकडे ता. २३-१२-१६४७ मध्यें नोकरींत घेण्याविषयीं अर्ज केला. हीहि बातमी मुस्तफास कळली. तेव्हां त्याला पकडण्याचें ठरवून त्याप्रमाणें हुकूम आणवला. ता. २५-७-१६४८ मध्यें शहाजीस पहांटे पकडून

अफजलखानाच्या देखरेखीखालीं विजापूरकडे रवाना करण्यांत आलें.

कनकगिरीचा पाळेगार आपाखान आदिलशाहीचा तावेदार होता. त्यानें बंडखोरी केली म्हणून पारिपत्य करण्याकरितां याची रवानगी झाली. अफजलखान व संभाजी ( शिवाजीचा ज्येष्ठ बंधु ) एकत्र होऊन कनकगिरीवर चालून गेले. त्या प्रसंगीं तोफेचा गोळा लागून संभाजी मेला ( स. १६६४ ). अफजलखानानें प्रथम संभाजीस लढाईत पुढें करून मागून त्याचा पाठपुरावा बरोबर केला नाहीं म्हणून शहाजीस खानाचा भारी राग आला. शहाजीनें पुढें किल्ला सर केला. शिवाजीला हें चांगलें माहीत असलें पाहिजे.

पुढें विजापूर दरबारनें याचीच शिवाजीवर रवानगी केली व हाहि तेथून "शिवाजीस उंदरासारखा धरून आणतों" असा विडा घेऊन निघाला होता. यानें स्वारीवर निघण्यापूर्वी आपल्या हातानें आपल्या ६३ बायकांना मारलें व त्यांच्या कबरा बांधल्या, अशी आख्यायिका आहे.

पुढें हा शिवाजीवर चालून येत असतां वाटेंत यानें अनेक देवालयें भ्रष्ट केलीं. हा शिवाजीस 'उंदरासारखा पकडतों,' अशी नेहमीं बढाई मारीत असे. पुढें यानें कृष्णाजी भास्करास शिवाजीस भेटीस येण्याविषयीं सांगण्यास सांगितलें. शेवटीं त्यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशीं व्हावी असें ठरलें. या भेटींत खानाचा सद्धेतु मुळींच नाहीं, असें शिवाजीस अगोदरच कृष्णाजीपंतानें सांगितलें होतें. याप्रमाणें ते परस्पर तयारींत होते. भेट झाली तेव्हां खानानें शिवाजीस मारण्याचा प्रयत्न केला, परंतु शिवाजीनें आपल्या वाघनखाच्या माऱ्यानें याचा कोथळा बाहेर काढला. आणि तशाच स्थितींत हा निघाला असतां याला शिवाजीच्या हस्तकानें दुपारीं दोनच्या सुमारास ठार करून ( १० नवं. १६५९ ) याच्या सैन्याची दाणादाण केली ( जिऊ महाला पाहा ).

**अबदाली**--( अहमदशाहा अबदाली पाहा ).

**अबदुल अझीझ**--तारीख-इ-हुसैनी या ग्रंथाचा कर्ता. या ग्रंथांत गुलबर्गा येथें मशिद ( थडगें ) असलेल्या शहदुद्दीन हुसैनी याचें चरित्र वर्णिलें आहे.

वरील ग्रंथ यानें अहमदशा बहामनी या राजास स. १४४५ मध्यें अर्पण केला ( बील. ).

**२.** ( शेख ) हा एक पंडित असून दिल्ली येथें राहत असे. दिल्लीचा मोंगल बादशहा अकबर याचा हा समकालीन होय. याचा मृत्यु स. १५६७ मध्यें झाला ( बील ). बदाऊनीनें याची प्रशंसा केली आहे.

**३.** ( शेख )--काव्यामध्यें हा इझ्झत या नांवानें ओळखिला जातो. दिल्लीच्या औरंगजेबाचे कारकीर्दीत याला ७०० स्वारांची मनसब मिळाली होती. यानें साकीनामा या नांवाचें काव्य लिहिलें. हा स. १६८० मध्यें मरण पावला ( बील ).

**४.** हा सिदी जोहार ऊर्फ सलाबतखान याचा मुलगा. हा पन्हाळ्याच्या वेढ्यांतून शिवाजी निसटल्यानंतर त्याचा पाठलाग करीत होता ( १६६० ऑगष्टनंतर ).

**५.** ( मौलन शाह )--दिल्लीच्या शाह-वलीउल्लाह या मुसलमान विद्वानाचा मुलगा होय. यानें कुराणावर फारसीमध्यें एक टीका लिहिली आहे. त्या टीकेचें नांव तफसीर-फदूल-अझीझ असून याशिवाय याचीं पुष्कळ पुस्तकें आहेत. याचा मृत्यु स. १८२४ च्या जून महिन्यांत झाला ( बील ).

**अबदुल करीम**--हा एक सिंधचा रहिवाशी. हा स. १४४१ च्या सुमारास उदयास आला. हा महमूद गावानच्या पदरीं दक्षिणेंत नोकर होता. यानें तारिख-इ-महमूदशाही या नांवाचा दुसऱ्या महमूदशाहा बहामनीचा इतिहास लिहिला आहे.

**२.** हा दिल्लीचा राहणारा होय. नादिरशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली, तेव्हां हा त्याच्याबरोबर इराणला गेला. तेथें यानें बयान-इ-बाकी नांवाचा नादिरशाहाचा इतिहास लिहिला आहे ( १७५४ ).

**३.** हा एक मुनशी होता. यानें तारिख-इ-अहमद ( अहमदशहा दुराणीचा इतिहास ), मुहारब-इ-काबूल-व कंदाहार, ( दोस्त मुहम्मदाचा मुलगा अकबरखान याचीं शूर कृत्यें यांत वर्णिलीं आहेत ) व तारिख-इ-पंजाब तुहफतन लिल-अहबाब ( शीख युद्धावर ग्रंथ ) असे याचे प्रसिद्ध ग्रंथ होत. हा गेल्या शतकाच्या मध्यांत वारला ( बील ).

**४.** कुत्बशाहीपैकीं सुलतान कुलीचा चौथा मुलगा. यानें बंड केल्यावरून यास ठार करण्यांत आलें ( बेन्द्रे ).

**५.** हा मूळचा अफगाणिस्थानचा पठाण फिरत फिरत हिंदुस्थानांत आला. मोंगल सरदार खानजहान याजकडे हा आश्रयार्थ गेला. यालाच बहलूलखान असें नांव होतें. खानजहानची दाक्षिणच्या सुभेदारीवर शहाजादा पर्वीझचा मदतनीस या नात्यानें स. १६०९ त नेमणूक झाली. त्याच वेळीं अबदुल करीम आपल्या धन्याबरोबर दक्षिणेंत आला. खानजहाननें पुढें बादशहा शहाजहानविरुद्ध बंड केलें. परंतु बादशाही सैन्यापुढें त्याचा टिकाव न लागून तो पळून

गेला, व पुढें स. १६२९ त कलिंजर येथें मारला गेला. त्या वेळीं खानजहानची उरलीसुरली संपत्ति अबदुल करीमला मिळाली. नंतर हा विजापूर दरबारीं गेला. पूर्वी खानाबरोबर हा तेथें एकदां गेला होताच. दरबारनें याला बंकापुरचा नबाब नेमून याची कर्नाटकांत रवानगी केली. स. १६३६ पासून स. १६७२ पर्यंतच्या काळांत विजापूरच्या इतिहासांत जे तीन क्रांतिकारक प्रसंग आले त्या तीनहि प्रसंगीं हा हजर होता. त्यांपैकीं तिसऱ्या प्रसंगीं याचा दरबारीं चंचुप्रवेश झाला. पुढें विजापूरच्या गादीवर सिकंदर आल्यावर राज्यांत दोन पक्ष पडले. एक दक्षिणी मुसलमानांचा पुढारी खवासखान त्याचा व दुसरा पठाण लोकांचा पुढारी हा म्हणजे बहलूलखान याचा. नंतर संधि मिळतांच बहलूलखानानें ता. ११ नोव्हें. स. १६७५ रोजीं खवासखानास कैद करून बंकापूर येथें कैदेंत ठेविलें. अशा प्रकारें यानें आपल्या हातीं विजापूरची सर्व सत्ता घेतली. याचा सल्लागार खिजरखान पन्नी हा होता. तो स. १६७६ त दक्षिणी मुसलमानांकडून मारला गेला. त्यामुळें चिडून जाऊन बहलूलनें खवासखानाचा वध केला. तेव्हां खवासखानाची बाजू घेऊन सर्जाखान उघडपणें युद्धास तयार झाला. मरहूम पन्नीचे दोन पुत्र व बहलूलखान यांनीं लढाई दिली. सर्जाखानाचा मोड होऊन तो बहादुरखानाकडे गेला. बहादुरखानानें जंगी फौज घेऊन सर्जाखानास पाठीशीं घातलें व बहलूलखानास झुंजाची सलामी दिली. तथापि या युद्धाचें पर्यवसान आदिलशाही पूर्णपणें मोंगल सत्तेच्या अंकित होण्यांत झालें, आणि सीदी मसाऊद यास बादशाही मान्यतेनें वजिरीचे अधिकार देण्यांत आले. मात्र बहलूलखानाची महत्त्वाकांक्षा जागच्याजागींच राहिली. तह पक्का होऊन मसाऊद वजीरीच्या पदावर आरूढ होण्यापूर्वीच बहलूलखान ता. २३ डिसेंबर १६७७ रोजीं हिरापूर येथें मृत्यु पावला ( का. सं. इ. या. ४३८ ).

**अबदुल कादिर**—हा लखनौ प्रांतांतील देवी गांवचा राहणारा. स. १८२३ च्या मे महिन्यांत मेजर हर्बर्टच्या विनंतीवरून जामि-उत्-तवारिख या रसिदउद्दीनच्या ग्रंथांतून सोप्या फारसी भाषेंत पतंजली ग्रंथ असें ज्याला म्हणतात, त्या भागाचें यानें भाषांतर केलें आहे. यांत सर्व शास्त्रें आलीं असून हिंदुस्थानांतील मोठ्या अमूल्य ग्रंथांपैकी हा एक ग्रंथ आहे. निरनिराळ्या पंथांची माहिती, प्राचीन राजांचा इतिहास आणि शाक्यमुनीचें चरित्र यांत आहे ( ज्ञा. को. ).

२. गोवळकोंड्याच्या कुत्बशाही घराण्यांतील इब्राहिमचा मुलगा. देवरकोंड्याच्या कैदेंत वारला ( बा. सी. बेंद्रेकृत कुत्बशाही, पा. ४६ ).

३. अहमदनगरच्या निजामशाहींतील पहिल्या बुऱ्हाणचा मुलगा. केंब्रिज हिस्ट्री व सिवेल लिस्टमध्यें फक्त याचा उल्लेख आढळतो.

**अबदुल कादिर बदाऊनी**—याच्या बापाचें नांव मलूकशाहा असून हा नागोरच्या शेख मुबारकचा शिष्य होता. यानें मुंतखबुत्तवारीख नांवाचा ग्रंथ लिहिला. हा मोठा विद्वान् होता. अकबर राजानें याला पुष्कळ वेळां संस्कृत आणि अरबी या भाषांचें भाषांतर फारसीमध्यें करावयास सांगितलें होतें. याशिवाय यानें नीतिपर आणि धार्मिक पुस्तकें लिहिलीं. स. १५९१ मध्यें यानें काश्मीरचा इतिहास थोडक्यांत लिहिला. याचा मृत्युकाल उपलब्ध नाहीं. पण हा स. १५९६ मध्यें जिवंत होता. काव्यामध्यें हा कादिरी या नांवानें उल्लेखिला जातो ( बील ).

मुल्ला अबदुल कादिर बदाऊनी हा बदाऊन येथें स. १५४० त जन्मास आला. त्यास गायन, इतिहास व ज्योतिष यांचा फार नाद असे. बदाऊनीची व बादशहाची मुलाखत करून देण्यास जलालुद्दिन कुडची हा कारण झाला.

बदाऊनी हा अबुल फज्ल व फैजी यांच्या संगतींत ४० वर्षें होता, परंतु यास त्यांच्या विचाराचें वारें सुद्धां लागलें नाहीं. हा मुळांत त्या दोघांचाहि द्वेष करीत असे. अकबराच्या सांगण्यावरून यानें रामायणाचें व महाभारताच्या कांहीं भागांचें भाषांतर फारसींत केलें. वास्तविक हें काम करण्याची याला हौस नव्हती, परंतु केवळ हुकमाखातर हा करीत असे. एवढेंच काय पण यानें म्हटलें सुद्धां आहे कीं, 'खऱ्या मुसलमानानें असलें काम करावें ! मी एक दोन प्रकरणांचें भाषांतर केलें. त्यांतील बालिश व असंबद्ध प्रलाप ऐकूनहि सर्व जगताला आश्चर्य वाटेल ! असलीं वचनें कधीं कोणीं ऐकलीं सुद्धां नसतील. काय म्हणे, निषिद्ध पदार्थांची यादी ! पण माझें नशीब केवढें बलवत्तर ! माझ्याच कपाळीं असलें काम कां यावें ? ह्या पातकापासून अल्लाच आमचें रक्षण करो.'

यानें मुन्तखबुत्तवारीख म्हणजे ( इतिहासांतील उतारे ) अकबराच्या कारकीर्दीचा इतिहास लिहिला. बदाऊनी हा अकबराचा द्वेष्टा असल्यामुळें इतर ग्रंथांच्या पडताळ्यास याचा फार उपयोग होतो ( मु. रि. भाग २ रा. पृ. १४६ ).

**अबदुल कादिर बेदिल ( मिर्झा )**—हा एक कवि होय. याची बेदिल या नांवानें फार प्रसिद्धि आहे.

बिर्लास येथील हा तार्तर वंशांतील होय. औरंगजेबाचा मुलगा जो अजमशाह त्यानें याला तरुणपणीं नोकरीस ठेविलें होतें. पण एकदां राजपुत्रानें स्तुतिकाव्य लिहिण्यास याला सांगितलें, तेव्हां यानें राजीनामा देऊन यापुढें यानें कोणाचीहि नोकरी केली नाहीं.

यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं मुहीत-इ-अजम, चार उनसूर, इन्शा-इ-बेदिल हे ग्रंथ आणि कांहीं काव्यें केलीं आहेत. रुकात-इ-बेदिल हाहि ग्रंथ यानेंच लिहिला आहे. याचा मृत्यु स. १७२० मध्यें झाला ( बील ).

**अबदुल गनी**—( मिर्झा ) हा काश्मीरचा राहणारा होय. ग्रंथामध्यें हा आपणास कबूल या नांवानें उल्लेखितो. याचा मृत्यु स. १७२६ मध्यें झाला ( बील ).

**अबदुल गफूर**—अब्दुर्रहमान जामीचा हा शिष्य होय. हा लाहोरचा राहणारा असून हा एक फारसी ग्रंथकार होय. स. १५०६ त हा मरण पावला.

**२** ( शहा ) अबदुल गफूर या साधूस बाबा कपूर असें नेहमीं म्हणत असत. हा काल्पीचा राहणारा असून हा शहामदारचा एक शिष्य होता. स. १५७१ त हा मरण पावला. याची कबर ग्वाल्हेर येथें आहे ( बील).

**अबदुल चक**—काश्मीर राजा युसुफखानाचा चुलता. हा त्याच्यानंतर गादीवर आला. अकबराचा समकालीन.

**२.** ( मीर सय्यद )—हा अयोध्या प्रांतांतील बिलग्रामचा राहणारा होय. हा मोठा विद्वान् आणि कवि होता. काव्यामध्यें याचा वासितीं या नांवानें उल्लेख केला आहे. हा बिलग्रामच्या सय्यद अहमदचा मुलगा होय. याचा जन्म स. १६६१ मध्यें झाला.

ज्या वेळीं औरंगजेबाची छावणी विजापूर येथें होती, त्या वेळीं यानें औरंगजेबाची भेट घेतली. तेव्हां औरंगजेबानें याला पगार वांटणीचे कामावर ठेविलें; व नंतर त्या जागेवरून याची नेमणूक गुजराथमधील बातमीदाराचे कामावर झाली. पण पुढें फर्रुखसियरचे कारकीर्दीत येथील कोर्टांत कांहीं भानगड झाल्यामुळें याला पुनः परत बोलाविलें ( स. १७१४ ). यापुढें हा स. १७२१ पर्यंत दिल्ली येथेंच होता.

शेवटीं यानें आपला मुलगा मीर सय्यद मुहंमद यांच्या नांवानें अधिकार करून दिला. हा स. १७२४ मध्यें मरण पावला. याची कबर याच्या बापाशेजारीं बिलग्राम येथें आहे. यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं आदाब-उल-मुसलीन नांवाचा फारसी ग्रंथ प्रख्यात आहे ( बील ).

**अबदुल नबी**—विजापूरच्या अली आदिलशाहीच्या कारकीर्दीतील एक प्रसिद्ध ( फारसी ) कवि.

**अबदुल बकी**—मासिर-इ-रहीमी ( अबदुल रहिमान खान-खानान याचें चरित्र ) या ग्रंथाचा कर्ता. हा एक दिल्लीच्या अकबर बादशहाचा आश्रित असून वरील ग्रंथ यानें स. १६१६ मध्यें पूर्ण केला. हा स. १६४२ मध्यें शहाजहानच्या कारकीर्दीत मरण पावला ( बील ).

**अबदुल मजीद**—एक फारशी पंडित. शहाजहाननामा नांवाचा इतिहासग्रंथ यानें लिहिला आहे ( बील ).

**अबदुल मुहम्मद**—विजापूरच्या दुसऱ्या अलीचा दिवाण. हा इब्राहिम दिवाणचा मुलगा. त्यानंतर हा दिवाण झाला ( विजापूरचें आदिलशाह घराणें ).

**अबदुल रहमान**—हा लोकप्रिय कवि होता. हा पेशावरचा राहणारा होता. याची कविता फार ओजस्वी व जोरदार आहे. वीरवृत्तीच्या लोकांना ती फार आवडते. ओजाबरोबरच सहजताहि भरलेली असल्यानें काव्यलोलुपांनाहि ही फार आवडते. पेशावरपासून जवळच असणाऱ्या हजरखान नांवाच्या याच्या जन्मस्थानाच्या रस्त्यावर याचें थडगें आहे ( बील ).

**२.** हा अकबर बादशहाच्या पहिल्या प्रधानाचा मुलगा होय. खान मिर्झा या टोपण नांवानें हा प्रसिद्ध होता. ता. १० डिसेंबर १५५६ रोजीं हा जन्मला. याच्या बापाचा खून झाला, तेव्हां हा अवघा चार वर्षांचा होता. पुढें वयांत आल्यावर याला फौजेंत नोकरी मिळाली. गुजराथवरील स्वारींतील सैन्याच्या एका भागाचा हा मुख्य होता. पुढें हा वाढत जाऊन शेवटीं तोडरमल्लानंतर मुख्य प्रधान झाला. राजपुत्र दानियालशीं याच्या मुलीचें लग्न झालें होतें. यानें बाबरानें तुर्की भाषेंत लिहिलेल्या आत्मचरित्राचें फारसी भाषेंत भाषांतर केलें. अकबरानंतर यानें जहांगीरचीं २१ वर्षें नोकरी केली. स. १६२७ मध्यें ७२ वर्षांचा होऊन हा मरण पावला. याची कबर दिल्लीनजीक दर्ग्यांत आहे ( बील ).

**३.** बादशहा जहांगीर याच्या विरुद्ध खुस्रवनें जेव्हां बंड केलें, तेव्हां यानें खुस्रवास मदत केली. परंतु बंड मोडून खुस्रवबरोबर हाहि पकडला गेला. पुढें याला शिक्षा म्हणून गाढवाच्या ओल्या कातड्यानें घट्ट शिवण्यांत येऊन तें कातडें नेहमीं ओलें ठेवण्याची व्यवस्था केली. अशा वाईट स्थितीमध्यें २४ तास ठेवल्यावर याला सोडून देण्यांत आलें.

**४.** झजरचा हा नबाब होय. १८५७ सालच्या बंडांत हा

दोषी ठरून याला २३ डिसेंबर रोजीं फाशीं देण्यांत आलें. हा नजाबत अलीखान याचा वंशज होय. याला सर जॉर्ज बार्लो यानें १८०६ त झज्जर, बदली, करौंद इत्यादि १२॥ लक्षांची जहागीर देऊन शिवाय ४०० घोडेस्वार ठेवण्याकरितां वडवान आणि दद्रि हीं गावें दिलीं. १८५७ पर्यंत हा इंग्रजांचा पक्का दोस्त होता, परंतु बंड उपस्थित होतांच हा बंडांत सामील झाला.

**अबदुल लतीफ**—मीर अबदुल लतीफ हा लहानपणीं अकबराचा शिक्षक होता. याला मोठमोठ्या कवींचे ग्रंथ तोंडपाठ येत असत. त्यांपैकीं पुष्कळशीं कवनें यानें अकबराकडून गाण्याच्या सुरावर पाठ म्हणवून घेतलीं ( मु. रि. भाग २ पृ. ९७. ).

**अबदुल हकीम**—( सियाळकोटचा ) हा काश्मीरच्या कमालउद्दीन मौलानाचा शिष्य होता. यानें तफशीर-बैझावी यावर हाशिया ( टीका ) लिहिली आहे. याशिवाय अबदुल गफर यावरहि याची हाशिया आहे. हा स. १६५६ मध्यें मरण पावला ( बील ).

**अबदुल हक**—(शेख) सैफउद्दीनचा हा पुत्र दिल्लीस राहत असे. हा तैमूरलंगाबरोबर आलेल्या एका त्याच्या अनुयायाचा वंशज होय. स. १५९६ त तारीख-इ-हकी या नांवाचा यानें एक ग्रंथ लिहिला. यात्रेसाठीं मक्का व मदीना येथें जाऊन हा फार दिवस राहिला होता. यानें तेथें अनेक विषयांवर सुमारें शंभर ग्रंथ लिहिले. यांपैकीं अतिप्रख्यात म्हणजे मदीना सकीना, मझ उल-अनवार, मदारीज-उन-तुबुवत, जइब-उल-कुलूब, अखबार-उल-अखयार, हे होत. स. १५५१ च्या जानेवारींत हा जन्मला. वयाच्या नव्वदाव्या वर्षींहि याची प्रतिभा कमी झाली नाहीं. हा स. १६४२ त मरण पावला. दिल्लीस ( जलाजशाच्या ) काठावर याची कबर आहे. याची साधुपुरुषांत गणना होते. याच्या शेख नूर-उल-हक नांवाच्या मुलानें झुब्दुत तवारीख नांवाचा ग्रंथ लिहिला आहे ( बील ).

**अबदुल हमीद**—( लाहोरचा ) हा पादशाह-नामा-इ-शाहजहानी या नांवाच्या ग्रंथाचा कर्ता होय ( बील ).

**अबदुल हसन**—विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील जो इब्राहीम दुसरा त्याचा हा एक सरदार होय.

जेव्हां अहमदनगर, गोवळकोंडें आणि वऱ्हाड या तीन प्रांतांचे राजे एकत्र होऊन त्यांनीं विजापुरास सतत बारा महिने वेढा घातला होता, तेव्हां एकट्या अबदुल हसनानें आपल्या बुद्धिवैभवानें फार थोड्या मुदतींत वीस हजार सैन्य जमविलें आणि त्याच्या बळावर शत्रूच्या सैन्याची फजिती उडवून त्यांतील एकाची तर त्याच्या राज्याच्या वेशीपर्यंत पाठ पुरविली आणि शेकडों हत्ती व दुसरी लूट मिळविली ( विजापूरचें आदिलशाही घराणें मोडकळ्त ).

**अबदुल्ला**—विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील जो इस्माईल त्याचा हा मुलगा होय.

याला अल्लू, मल्लू व इब्राहिम असें तीन भाऊ होते. त्यांपैकीं मल्लू व इब्राहिम गादीवर आले. पुढें हा गोव्यांस पळून गेला.

**अबदुल्ला कुत्बशाह**—( स. १६११-१६५८ ) हा गोवळकोंड्याच्या कुत्बशाही घराण्यांतील सहावा सुलतान होय. शहाजहाननें अहमदनगर घेऊन विजापूरच्या राजापासून खंडणी घेण्याचा ठराव केला, तेव्हां यानेंहि खंडणी देण्याचें कबूल केलें. परंतु स. १६५६ मध्यें शहाजहानचें व याचें वांकडें आलें, व त्यामुळें याच्यावर आपत्ति आल्या.

याचा प्रधान मीरजुम्ला हा तैलंगणांत गेला असतां त्याच्या मुलानें कुत्बशहाशीं गैरशिस्तीचें वर्तन केलें. तें यास न आवडून यानें त्याला कैदेंत टाकलें. पुढें मीरजुम्लानें आपल्या मुलास सोडविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. तेव्हां तो औरंगजेबास जाऊन मिळाला. औरंगजेबास संधीच पाहिजे होती. त्यानें आपल्या बापाकडून मीरजुम्ल्याच्या मुलास सोडून देण्याविषयीं हुकूम आणून तो कुत्बशाहाकडे पाठविला. परंतु कुत्बशाहानें उलट चिडून जाऊन मीरजुम्ल्याच्या मुलाची कैद सक्त केली व त्याची सर्व दौलत जप्त केली. पुढें शहाजहाननें अबदुल्लास वठणीवर आणण्यासाठीं औरंगजेबाची रवानगी केली. औरंगजेबानें आपल्या मुलाच्या लग्नाचें सोंग करून एकदम हैदराबादेवर चाल केली. गैरसावध असल्यानें अबदुल्लास बचाव करतां आला नाहीं. हा कसाबसा मीरजुम्ल्यास त्याची संपत्ती देऊन व त्याच्या मुलास मोकळें करून गोवळकोंड्याच्या किल्ल्यांत गेला. विजापूरकरांची मदत मागितली पण ती येण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां अबदुल्लानें औरंगजेबाच्या सर्व अटी मान्य केल्या. दरसाल एक कोट रुपये देण्याचें यानें कबूल केलें. याच्यानंतर याचा जावई अबुल हसन कुत्बशाह यास गादी मिळाली.

**अबदुल्लाखान सय्यद**—हा मुहम्मद पैगंबराच्या वंशजांपैकीं एक होय. औरंगजेबाच्या वेळीं याचा बाप विजापूर व अजमीर या प्रांताचा सुभेदार होता. याला दोन मुलें होतीं. तींच सय्यदबंधू म्हणून पुढें प्रसिद्धीस आलीं. पैकीं एक अबदुल्लाखान-कुत्ब-उल्मुल्क या नांवानें

प्रसिद्ध आहे. हा प्रथम स. १६९७-९८ मध्यें खानदेश, बागलाण, वगैरे ठिकाणीं फौजदारीवर होता. पुढें बहादुरशाहानें याला स. १७२१ त अलाहाबादची सुभेदारी दिली. याच्या साहाय्यानेंच फर्रुखसियर हा गादीवर बसला. त्यानें याला आपला मुख्य प्रधान नेमलें. पुढें या दोघां सख्यदबंधूंनीं ७ वर्षे पुढील राजांस बाहुलीं बनवून कारभार केला. पुढें मुहंमदशहाच्या चिथावणीवरून याच्या भावाचा खून झाला; व हाहि त्याच्या सैन्याच्या हातीं लागून मारला गेला ( ११ ऑक्टोबर १७२२ ) ( सख्यदबंधु पाहा ).

**अबदुल्ला बिन अली**—यानें फारसी भाषेंतील ग्रंथांचें उर्दूमध्यें भाषांतर करून सिरक अल हिंद नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ मूळचा फारसी भाषेंतील नसून संस्कृत ग्रंथाचें फारसींत भाषांतर करून हा लिहिलेला होता ( बील ).

**अबुल फज्ल**—अबुल फज्ल ऊर्फ अल्लामी हा शेख मुबारिक याचा मुलगा. स. १५५१ त आग्र्याजवळ जन्मला. याचा बाप विद्वान् असल्यानें त्यानें याला चांगलें शिक्षण दिलें. याचा थोरला भाऊ मोठा कवि होता व हाहि पुढें फार मोठ्या योग्यतेस चढला.

अकबरानें याची विद्वत्ता ओळखून याला आपल्या दरबारीं ठेविलें. वडील भावाच्या कवनानें बादशहा खूष झाला होता. त्यायोगानें यानेंहि आपली बादशाहाशीं दाट ओळख करून घेतली होती. याचा स्नेह जमला तेव्हां अकबर मोठ्या पेंचांत सांपडला होता. धर्मनिष्ठ उलेमा हे फार मगरूर झाले होते. तेव्हां सर्व धार्मिक प्रश्नांचा निकाल आपल्या देखत लागावा, असें अकबरानें ठरविलें आणि अबुल फज्लच्या मदतीनें त्यानें उलेमांचा पाडाव केला. तेव्हां बादशहास कुराणास अनुसरून नवीन सुधारणा घडवून आणण्याचा अधिकार आहे, असें उलेमांनीं कबूल केलें. याचें सर्व श्रेय अबुल फज्ल यासच होतें. तेव्हां बादशहास याच्याविषयीं फारच आदर वाटूं लागला. बादशहानें याच्या सल्ल्यानें दीने-इलाही नांवाचा नवीन धर्म स्थापन केला. पण तो पंथ पंचवीस वर्षांनीं याचा खून झाल्यामुळें नष्ट झाला. अकबरलाहि त्याचा पश्चात्ताप झाला.

या कृत्यानें फज्ल मुसलमानांस अत्यंत दुःसह झाला. प्रत्यक्ष राजपुत्र सेलीम हाहि याच्याविरुद्ध होता. त्यानें एक वेळ अकबरास फज्लची कुराणावर भक्ति आहे, असें दाखवून दिलें. तेव्हां अकबराची फज्लवर थोडी इतराजी झाली. परंतु हें कृत्य फज्लच्या शत्रूंनीं मुद्दाम केलें आहे, असें कळून येतांच अकबर व फज्ल यांचें पूर्ववत् प्रेम जुळलें.

पुढें सेलीमनें बापाविरुद्ध केलेल्या बंडांत फज्ल सामील झाला नाहीं म्हणून त्यानें याला जगांतून नाहींसा करण्याचा बेत केला व वीरसिंहाच्या साहाय्यानें त्यानें तो तडीस नेला. हें अकबरास कळतांच तो एकदम बेशुद्ध पडला व त्याला हें मरेपर्यंत दुःख झालें. कांहीं लोकांचें म्हणणें कीं, हा सुधारक असल्यानें कर्मठ मुसलमानांनीं याचा खून केला ( स. १६०० ).

अबुल फज्लची योग्यता याचा बाप व भाऊ या दोघांपेक्षांहि श्रेष्ठ होती. याचें लेखनकार्य याच्या अनेक ग्रंथांवरून दिसून येतें. याच्या लेखांत अपशब्द बिलकुल सांपडत नाहींत. अकबरनामा हा याचा सर्वांत मोठा ग्रंथ होय. यांत उलेमांच्या कृत्यांची भरपूर चर्चा आहे. प्रतिपक्षावर द्वेषमूलक शब्दांचा वर्षाव केलेला कोठेंहि दिसत नाहीं. ब्लॉकमनचा अबुल फज्लविषयीं अभिप्राय येणेंप्रमाणें—" अबुल फजलची सत्यप्रीति, परमसहिष्णुता, त्याचा दरबारचा फार दिवसांचा अनुभव, त्याची सुंदर भाषा व बादशाहाचा त्याजवरील भरंवसा यांमुळें त्याच्या ग्रंथास विशेष किंमत आली आहे. हें त्यानें आपल्या बादशाहाच्या थोरपणाचें व स्वतःच्या विद्वत्तेचें एक प्रकारचें कायमचें स्मारकच करून ठेवलें आहे. "

अबुल फज्लचें वैर मनांत न ठेवतां जहांगीरनें ( सेलीमनें ) याच्या मुलास बहार प्रांताचा कारभार दिला होता.

यानें अनेक संस्कृत ग्रंथांचीं फारशींत भाषान्तरें केलीं. तसेंच हिंदु, फारशी व ख्रिस्ती धर्माचे विद्वान् आग्र्यास आणवून त्यांच्याशीं धर्मसंबंधीं वादविवाद केले.

**अबुल फैझी**—हा सुफीपंथी कवि अकबराच्या दरबारांत प्रसिद्ध होता. याचा जन्म ता. १६ सप्टेंबर सन १५४७ त आग्रा येथें झाला. याचीं कवनें वाचून अकबरास समाधान वाटलें व त्यानें फैजीस आपल्या भेटीस बोलाविलें. त्या वेळीं याला आपणास बादशहानें शिक्षा करण्यास बोलाविलें, असें वाटलें. पण उलट याचा तेथें सत्कारच झाला.

फैजी याचेकडे कांहीं दिवस राजपुत्र मुराद यास पढविण्याचें काम होतें. पुढें याची आग्र्याच्या सदरेच्या जागीं नेमणूक झाली. स. १५८८ त याला कविराज या अर्थाचा किताब मिळाला. हिंदुस्थानांत दोनच मोठे फारसी कवि होऊन गेले. पहिला अमीर खुस्रव व दुसरा फैजी. इतिहास, तत्त्वज्ञान, वैद्यकी, पत्रव्यवहार व कवित्व या विषयांत याचा हात धरणारा कोणी नव्हता. प्रथम प्रथम

यानें आपल्या कवितेंत फैजी असें नांव घातलें. परंतु मृत्युपूर्वी एक दोन वर्षे हा फैयाजी असें नांव घालीत असे.

बादशहाच्या आज्ञेवरून यानें महाभारतांतील नलदमयंती-आख्यानावर फारसीमध्यें काव्य केलें होतें. हिंदु वाङ्मयाचा व शास्त्राचा काळजीपूर्वक अभ्यास करणारा पहिला मुसलमान, फैजी हाच होता. यानें एकंदर १०१ ग्रंथ रचिले, असें म्हणतात. याची वकील म्हणूनहि कधीं कधीं नेमणूक होत असे.

हा बापाच्या पश्चात् अवघ्या दोन वर्षांनींच मरण पावला ( स. १५९५ ). मरणापूर्वी थोडा वेळ अकबर आपला विद्वान् हकीम घेऊन फैजीच्या समाचारास गेला असतां फैजीचें बोलणें बंद झालें होतें. बादशहा बोलला, 'शेखजी, माझे हकीम औषध द्यायला आणले आहेत, औषध घ्या.' त्यावर कांहींच उत्तर आलें नाहीं. असें पाहून बादशाहास कळवळा आला. त्यानें वैतागानें डोकीचें पागोटें आपटलें व पुष्कळ शोक केला, असें म्हणतात.

**अबुल हसन** (ऊर्फ **तानाशाहा**)—गोवळकोंड्याच्या कुत्बशाहींतील शेवटला राजा. हा अबदुल्ला कुत्बशाहाचा जांवई होय. त्याची तिसरी मुलगी ताजमहाल यास दिली होती. याचें पूर्ववृत्त विशेषसें उपलब्ध नाहीं. फार काय याच्या बापाचें नांवहि अद्यापि माहीत झालेलें नाहीं.

याचा बाप अरब असून चांगल्या प्रसिद्ध घराण्यांतील होता. त्याचा इराणी पेहेराव व फारसी बोली यांवरून अबदुल्लानें त्याला आपल्या नोकरींत ठेवून घेतलें. तो बराच वाढला पण त्याला जहागिर वगैरे नसल्यानें त्याच्यामागें अबुल हसनला गरीबींत दिवस घालवावे लागले. अबदुल्ला कुत्बशाहाच्या घोडदळांत यानें दरमहा पंधरा पागोड्यांचे वेतनावर नोकरी पत्करली. बापाच्या मृत्यूनंतर चवदा वर्षे अशा हलाखींत यानें दिवस काढले.

याच वेळीं अबदुल्ला कुत्बशाहानें आपल्या तिसऱ्या व धाकट्या मुलीकरितां सुलतान मुहम्मद नांवाच्या एका सय्यद घराण्यांतील तरुणाची योजना केली होती. पण त्याच्या उद्दामपणामुळें मुत्सद्दी लोकांनीं ती मुलगी याला दिली. सर्वांची मर्जीहि यानें संपादन केली. अशीं अकरा वर्षे गेलीं. याला दोन मुली व एक मुलगाहि झाला. ठरल्याप्रमाणें अबदुल्लानंतर हा कुत्बशाहीच्या तख्तावर बसला. हा २१ एप्रिल १६७२ मध्यें मुसाखान, सय्यद मुझावर व त्याचे दोन पेशकर मादण्णा व अकण्णा यांच्या साहाय्यानें तख्तनशीन झाला ( २१ एप्रिल १६७२ ).

याच सुमारास शिवाजीचा हेजीब निराजीपंत भागानगरास जाऊन एक लक्ष होनांचा तह करून भागानगरीहून ( हैद्राबादहून ) सहासष्ट हजार होन घेऊन शिवाजीकडे ज्येष्ठ शु. ५ ( २१ मे १६७२ ) रोजीं परत आला.

हा गादीवर येण्यापूर्वीच नेकनामखान वारला होता. त्याचे जागीं मुसाखानाची ता. २५ एप्रिलपूर्वीच नेमणूक झाली होती. त्यास खान-इ-खानन अशी पदवी दिली. सय्यद मुझावर याजकडे सरखैली होती. सय्यद मुझावरखानास पेशवाई व दिवाणीचें काम सांगितलें व मीरजुम्ला हा किताब दिला. मादण्णा यास मुजुमदारी व अकण्णा यास सबनविसी दिली.

हा आळशी व विलासी होता. तरी राज्य चांगलें चालवून प्रजेस सुख देण्याच्या कामीं हा नेहमीं तत्पर असे. त्यामुळें लोकांची याच्यावर प्रीति होती.

यानें मदनपंत नामक ब्राह्मणास आपला वजीर नेमलें होतें. मदनपंतानें सर्व बंदोबस्त चांगला ठेवला होता. शाहाचा त्याजवर पूर्ण विश्वास होता व त्याच्याविरुद्ध मुसलमानांनीं केलेल्या कागाळ्या शाहा ऐकत नसे. या मत्सरी मंडळींत शाहाचा सेनापतिहि सामील होता. त्यास मदनपंताचें वजन सहन होईना. औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी केली तेव्हां शाहानें संभाजीशीं मैत्रीचा तह केला. त्यामुळें औरंगजेब रागावून त्यानें गोवळकोंड्याचें राज्य जिंकण्यास फौजा पाठविल्या. तेव्हां कुत्बशाहाचा सेनापति इब्राहिमखान त्या फौजेस मिळाला व या गडबडींत मदनपंत मारला गेला. शाहानें तात्पुरता तह करून कसेंबसें राज्य वाचविलें. परंतु औरंगजेबानें, 'तुम्हीं ब्राह्मण दिवाण नेमला, परधर्मी संभाजी राजाशीं दोस्ती केली व स्वतः बदफैली वर्तन सुरू ठेवलें म्हणून आम्हीं तुम्हांशीं लढाई करणार,' असें सांगितलें. व शेवटीं गोवळकोंड्यास वेढा दिला. अबू हसनास पदच्युत करून दौलताबादेस कैदेंत टाकलें व याचें राज्य खालसा केलें. याच्या शौर्याच्या शेकडों गोष्टी त्या प्रांतीं अद्यापि लोकांच्या तोंडीं आहेत.

ता. १२ सप्टेंबर १६८६ रोजीं विजापूरची आदिलशाही बुडविल्यानंतर औरंगजेबानें गोवळकोंड्याच्या कुत्बशाहीकडे लक्ष फिरविलें. अबुल हसननें सामोपचाराचें धोरण स्वीकारलें, पण त्याचा कांहीं-एक उपयोग झाला नाहीं. संभाजीराजास मदत केल्याचा आरोप ठेवून तहाचें बोलणें धुडकावण्यांत आलें. शेख मिनाज, सर्जाखान, अबदुल रझ्झक लारी ऊर्फ मुस्तफाखान यांनीं मोंगली सैन्यावर हल्ले करून ते चांगलेच यशस्वी करण्यास सुरवात केली. पावसानेंहि याला उत्तम साहाय्य केलें. मोंगली सैन्यानें गोवळकोंड्यास वेढा दिला.

पण दुष्काळामुळें त्यांना धान्याचा पुरवठा होईना. संभाजीनें १२००० घोडदळ व ५० हजार पायदळ याला मदत म्हणून पाठविलें. त्यांनी तर मोंगलांची रसदच बंद केली. रोगराई, सुलतान अकबरानें हिंदुस्थानांत चालवलेला दंगा यांमुळें बादशहा अगदीं त्रस्त झाला. फितुरीचा प्रयत्नहि फारसा यशस्वी होईना. शेख निजाम मोंगलांस मिळाला. त्याचा फारच सन्मान झालेला पाहून अबुल हसनचा भाचाहि मोंगलांस मिळाला. उलट मोंगलांचे सरदारहि लढाईतून अंग काढून पळूं लागले. कांहीं याला उघड व कांहीं गुप्तपणें मिळाले. पण औरंगजेबानें तहाचें बोलणें पुनः झिडकारून युद्धाचाच मार्ग स्वीकारला. अबदुल रझ्झकनें शौर्याची कमाल केली. सुरुंगाचा प्रयत्नहि दारूंत पाणी ओतून व वाती तोडून अयशस्वी करण्यांत आला. तेव्हां मोंगली सैन्याचें सेनापतित्व मुहंमद अझमकडे देण्यांत आलें. आणि फितुरीनें भोंवतालचा प्रान्त काबीज करण्याकडे लक्ष पुरविण्यांत आलें. शेवटीं अबदुल्लाखान पणी हाहि फितुर झाला आणि अबदुल रझ्झकखान हा एकच शूर सरदार याचा राहिला. यानें मोंगली सैन्य पणीच्या फितुरीनें खिडकीदरवाज्यांतून आंत शिरतांच शौर्याची कमाल केली. सर्व शरीर जखमांनीं भरून गेलें तरी तोंड दिलें. औरंगजेबानेंहि यांचें कौतुक करून याची योग्य शुश्रूषा केली. हाहि शान्तपणें राज्य सोडून औरंगजेबास भेटला. त्यानेंहि चांगल्या रीतीनें वागविण्याचा हुकूम केला. याला दरबारांत येण्याची माफी दिली. ही गोष्ट २२ सप्टेंबर १६८७ च्या सुमारास घडली ( प्रो. सरकार-औरंगजेब व्हा. ४ पृ. ३५६-८६ ). याप्रमाणें कुत्बशाहीचा नाश केल्यावर त्याचा मानलेला मुलगा अबदुल्ला यास मनसबी देऊन याला वार्षिक ५० हजारांची नेमणूक देऊन दौलताबादेस ठेवलें. तेथें हा चवदा वर्षे कारागृहांत होता. हा स. १७०० मध्यें आवेच्या विकारानें वारला असावा. दौलताबादेस याचें दफन सय्यद राजू कातलच्या शेजारीं करण्यांत आलें ( परिशिष्ट २-१८१-२ ).

यास बंदी सुलतान नांवाचा एक मुलगा होता. तो औरंगजेबांच्या गोटांत राहत असे. मोठा झाल्यावर त्याला दरबारांतहि जावें लागे. परंतु दक्षिणी सरदार त्याला बादशहाप्रमाणें लवून सलाम करीत, हें पाहून त्यास दरबार मना करण्यांत आला. अबुल हसनची एक बहीण त्याचेजवळच होती. तिचा नवरा व मुलगा मात्र शेवटीं औरंगजेबास जाऊन मिळाला.

अबुल हसनचें एका धनगरणीच्या मुलीशीं लग्न झालें होतें व ती याची फार आवडती होती. त्यामुळें याची पट्टराणी ताजमहाल हिला तिचेविषयीं असूया उत्पन्न झाली व तिनें तिला ठार केलें.

२. हा अरबी ज्योतिषी होय. यानें बऱ्याच संस्कृत ग्रंथांचें अरबींत भाषांतर केलें. याचे ग्रंथ सध्यां उपलब्ध आहेत.

**अबुल फतह दाऊद**—स. १००५ चे दरम्यान मुलतानचें राज्य कमावलेल्या शेख हमीद लोदीचा नातू. शेख हमीद लोदी गझनीच्या सबक्तगिनाशीं मित्रभावानें वागत असे. परंतु त्याच्या नातवानें इस्माएलीपंथाची दीक्षा घेतल्यामुळें महमूद गझनवीस हिंदु मूर्तिपूजकाइतकाच तिरस्करणीय वाटूं लागला. वज्र राजाचा पराभव करून उच्छहून लूट घेऊन महमूद गझनवी गझनीकडे परत जात असतां वाटेवर दाऊदनें त्याजवर हल्ले करून त्याचें पुष्कळच नुकसान केलें. स. १००५ मध्यें महमूदानें त्याजवर स्वारी केली. तेव्हां भिऊन दाऊदनें मुलतान शहरांत स्वतःस कोंडून घेतलें. महमूदानें मुलतानला वेढा देण्याची धमकी देतांच दाऊदनें महमूद गझनवीस २०००० दिनार वार्षिक खंडणी देण्याचें कबूल करून व इस्मायली पंथाच्या काफीर मतांचा त्याग करण्याचें कबूल करून त्याच्याशीं तह केला ( कें. हि. ).

**अबु होला**—ही मथुरेच्या राजुल क्षत्रपाची सासू. हिच्या मुलींचें नांव नदसी अकसा. ( नदसी अकसा पाहा ).

**अबू तालिब कलीम**—इराणांतील हमदानचा हा प्रसिद्ध कवि जहांगीर बादशहाच्या वेळीं हिंदुस्थानांत आला व स. १६१९ मध्यें परत स्वदेशास गेला. परंतु पुनः हा शहाजहान बादशाहाचे वेळीं आला. बादशहानें त्याला 'राजकवि' पदवी देऊन पदरीं ठेवलें. याची दोनदां सुवर्णरौप्य तुला करण्यांत येऊन ती याला बक्षीस देण्यांत आली. १९ नोव्हेंबर १६५१ रोजीं हा दिवंगत झाला. झफर-नामा-इ-शहाजाहान हें याचें एक शहाजहानवरचें काव्य आहे.

**अबू तालिबखान**—हा हाजी मुहंमद बेगखानाचा मुलगा लखनौ येथें स. १७५२ त जन्मला. असउद्दौल्याच्या दिवाणानें याला गंगा-यमुना नद्यांमधील अनेक जिल्ह्यांचा अधिकारी नेमलें. तेथें यानें दोन वर्षे काम केलें. पुढें दिवाणाच्या मृत्यूमुळें याची बढती होईना तेव्हां हा लखनौला परत आला. नबाबानें याला साठ हजारांचें वर्षासन दिलें. पुढें आपला दुश्मन म्हणून कर्नेल हेनेवे यानें याला नबाबापासून मागून घेतलें. तेथें तीन वर्षे

काम केल्यावर याला लखनौच्या रेसिडेंटानें राजा बलभद्रसिंगावर पाठविलें. पुढें हा राजा बलभद्रसिंगाच्या वधानंतर संकटांत सांपडला, व एका ब्रिटिश अधिकाऱ्याबरोबर यूरोपला गेला. इराणी राजपुत्र म्हणून तिकडे हा ओळखला जाई. प्रवासांचीं टांचणें करून ठेवून तीं यानें कलकत्त्यास परत आल्यावर प्रसिद्ध केलीं. त्याचें नांव मआसिर-उत्-तालिबी-फी बिलादी-इफ्रंजी. याचें भाषांतर चार्लस स्टुअर्टनें लंडन येथें प्रसिद्ध केलें. याचा आणखी एक ग्रंथ आहे. हा १८०६ च्या सुमारास वारला ( बील ).

**अबू तालिब हुसेन**—यानें तुझुक-इ-तैमूरी नांवाचा ग्रंथ लिहिला. तैमूरलंगानें चघताइ तुर्की भाषेमध्यें आपल्या पहिल्या सत्तेचाळीस वर्षांची माहिती असलेला हा ग्रंथ लिहिला; त्याचें फारशी भाषांतर म्हणजे वरील तालिबचा ग्रंथ होय. हा ग्रंथ यानें शहाजहानला अर्पण केला. या ग्रंथाचें भाषांतर मेजर चार्लस स्टुअर्ट यानें इंग्रजीमध्यें केलेलें आहे ( बील ).

**अबू बकर**—हा एक सुलतान होता. अमीर तैमूरचा मुलगा जो शाहरुख मीर्झा त्याचा हा मुलगा होय. याचा खून याचा भाऊ मीर्झा उलूघ बेग यानें स. १४४८ मध्यें केला ( बील ).

**अबू बकरशाह**—सुलतान फीरूझशाह तुघ्लकाचा पुतण्या.

स. १३८८ मध्यें सुलतान फीरूझशाह तुघ्लक वारल्यावर वंशपरंपरासंबंधानें त्याचे मुलगे घियासुद्दीन तुघ्लकशाह व मुहम्मदखान यांजमध्यें तंटे लागले. दरबारचा अधिकारीवर्ग मुहम्मदखानाचे विरुद्ध असल्यानें घियासुद्दीन तुघ्लकशाहास गादीवर बसविण्यांत आलें. गादीचे सर्व वारसांचा बंदोबस्त करण्याचे उद्देशानें घियासुद्दीननें आपला भाऊ सालरशाह यास कैदेंत ठेविलें. त्यामुळें घियासुद्दीनचा चुलतभाऊ अबू बकर यास स्वतःचे जीविताबद्दल भीति वाटूं लागली. यानें दिल्लीतील कांहीं समर्थ लोकांस अनुकूल करून घेऊन दिल्लीचें तख्त हस्तगत करण्याचा कट केला. घियासुद्दीन तुघ्लकानें मलीक फीरूझ अलीस वजीर केलें होतें. त्याच्या हाताखालील अधिकारी रुक्नुद्दीन अबू बकरला अनुकूल झाला. तेव्हां अबू बकरचे कारस्थानास जोर चढला. रुक्नुद्दीनचे राजवाड्यांतील संरक्षक फौजेवर वजन होतें, त्यामुळें अबू बकर जवळ जवळ सत्ताधीश झाला. घियासुद्दीन तुघ्लक व मलीक फीरूझ अली यांस अबू बकरला मिळालेल्या यशाची खबर लागतांच दोघेहि राजवाड्याचे यमुनेकडील मोठा दरवाजानें बाहेर पडून राजवाड्यांतून निसटले. पण लवकरच रुक्नुद्दीनचे हातीं लागले व ठार झाले.

१३ फेब्रुवारी १३८९ रोजीं दिल्लींतील सरदारांनीं व अमीरउमरावांनीं अबू बकरला दिल्लीचा सुलतान होण्यास संमति देऊन तख्तावर बसविलें. अबू बकरनें रुक्नुद्दीनची वजीराचे जाग्यावर नेमणूक करावी, हें क्रमप्राप्तच होतें. त्याप्रमाणें त्यानें केलें, पण लवकरच रुक्नुद्दीननें अबू बकर यास पदच्युत करण्याचें केलेलें कारस्थान उघडकीस आलें. त्यामुळें त्याचा वध करण्यांत आला. दिल्लीस अबू बकरची सत्ता सुस्थिर झाली खरी, तरी प्रांतोप्रांतींच्या सुभेदारांनीं याचे तख्ताधिष्ठत्वास मान्यता दिली नव्हती. शिवाय मुहम्मदखान जालेसर येथें राहून दिल्लीचें तख्त मिळविण्यास योग्य संधीची वाट पाहत होताच. पुष्कळशा सुभेदारांनीं मुहम्मदखानास मदतीचीं आश्वासनें देऊन अबू बकरशाहाचें उच्चाटण करण्यास त्यास प्रोत्साहन दिलें. मुहम्मदखान जालेसरहून दिल्लीस यावयास निघाला तेव्हां वाटेंत त्यास सुभेदारांनीं पाठविलेल्या कुमकेमुळें त्याजबरोबर ५०,००० सैन्य होतें. अबू बकरनें मुहम्मदखानावर हल्ला केला व त्याचा पुरा मोड केला. मुहम्मदखानास फक्त २००० सैनिक बरोबर घेऊन परत जावें लागलें. पुनः सैन्य जमवून मुहम्मदखान दिल्लीवर चालून आला तरीहि कोंढली येथें अबू बकरनें त्याचा पुनः पराभव केला. या विजयामुळें अबू बकरला मुहम्मदखानाचे ठाण्यावर स्वारी करण्याचा हुरूप आला. १३९० मध्यें फेब्रुवारीचे सुमारास अबू बकरशाहा जालेसरवर चालून गेला. मुहम्मदखानानें यास चुकवून ४००० सैन्यानिशीं दिल्लीकडे जाऊन राजवाड्यांत ठाणें दिलें. अबू बकरशाहा जालेसरहून ताबडतोब परत आला. तेव्हां यास तोंड देण्याचें धैर्य नसल्यानें मुहम्मदखान दिल्ली सोडून पुन्हां जालेसरला परत गेला. या घडामोडीनंतर दिल्लींतील अबू बकरशाहाचे शत्रूंपैकीं इस्लामखानानें आपल्या पक्षाचे सर्व लोकांस एकत्र जमवून मुहम्मदखानास दिल्लीस बोलविलें. इस्लामखानाचें कारस्थान अबू बकरला कळलें तेव्हां हा इतका घाबरला कीं आपले शक्य तेवढे सर्व अनुयायी व मदतनीस बरोबर घेऊन हा मेवाडमध्यें निघून गेला. ३१ ऑगस्ट १३९० रोजीं मुहम्मदखानानें दिल्लींत प्रवेश केला व प्रथम अबू बकरशाहाच्या पक्षाचे लोकांची कत्तल केली. पुढें डिसेंबरमध्यें मुहम्मदखानाचा मुलगा युवराज हुमायून अबू बकरशाहाचें पारिपत्य करण्याकरितां मेवाडमध्यें गेला. अबू बकरशाहास शरण जावें लागलें. यास जीवदान देऊन मीरतला कैदेंत ठेवण्यांत आलें, पण पुढें लवकरच हा मरण पावला ( कें. हि. )

**अबू रैहान अल्बीरूनी**—याचा अलबीरूनी या नांवानेंहि उल्लेख करितात किंवा अबू रैहन मुहम्मद असेंहि

म्हणतात. याचा जन्म ख्वारझ्मा (खिव) प्रांतांतील बीरून शहरीं स. ९७१ मध्यें झाला.

ज्योतिष, भूमिति, इतिहास व तर्कशास्त्र वगैरे विषयांत हा तज्ज्ञ होता. याशिवाय हा जादूचे प्रयोगांत निष्णात होता. यानें निरनिराळ्या देशांत प्रवास केला होता. आपल्या आयुष्याचा बराचसा काल यानें हिंदुस्थानांत घालविला व हिंदूंच्या संस्कृत भाषेंतील ग्रंथांशीं दाट परिचय करून घेतला.

यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले. जर याचे सर्व ग्रंथ एकत्र केले असते तर तें ओझें एका उंटाला गेलें नसतें, असें म्हणतात. याचे तारीखुल-हिंद (तहकीके-हिंद) आणि कानून-इ-मस्ऊदी हे दोन ग्रंथ सर्वोत्कृष्ट होत. यानें आपला 'कानून-इ-मस्ऊदी' हा ग्रंथ गझनीचा सुलतान मसूद याला अर्पण केला. त्याबद्दल सुलतानानें याला एका हत्तीला जाईल इतकें चांदीचें नाणें देणगीदाखल दिलें. हा सुलतान महमूद आणि मसूद यांचा समकालीन होता. यानें आपल्या जादूच्या प्रयोगानें सुलतानास खुष केलें होतें.

याच्या अरबींतील तारीखुल-हिंद याचें इंग्रजी भाषान्तर सचौनें जर्मनींत (स. १८८४) व इंग्रजींत (स. १८८८) केलें आणि तें प्रसिद्धहि आहे.

हा एक विद्वान् आणि इतिहासकार होता. याचा मृत्यु स. १०३९ मध्यें झाला (बील).

**अब्जदी**—हा एक कवि होता. अब्जदी हें याचें टोपण नांव असून, मीर मुहम्मद इस्माइलखान हें याचें पूर्ण नांव होतें. उमदत-उल-उमरा याचा हा शिक्षक होता. यानें नबाब अनवरखान याचा इतिहास लिहून उमदत उल उमराकडून ६७०० रु. बक्षीस मिळविले. हा इतिहास अनवरनामा म्हणून प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ १७६० मध्यें समाप्त झाला. याला पुढें १७७४ मध्यें मलिक-उश-शुअरा हा किताब नबाबानें दिला. या ग्रंथांत इंग्रज व फ्रेंच यांच्या पहिल्या पहिल्या लढायांचें सुद्धां वर्णन आहे. मेजर लॉरेन्सचाहि पराक्रम यानें यांत वर्णिला आहे (बील).

**अब्दुल्ला सय्यद**—औरंगजेबाच्या पदरीं हा एक हुशार सरदार होता. हा कांहीं दिवस विजापूर व पुढें अजमीर व अलाहाबाद या प्रांतांचा सुभेदार झाला. याला बरींच मुलें होतीं. पैकीं हसनअल्ली व हुसेनअल्ली हे दोन प्रसिद्धीस आले. तेच इतिहासांत सय्यदबंधु या नांवानें ओळखले जातात. याचें दुसरें नांव सैयदमिया असें होतें. याला बादशहानें कुत्बुल्मुल्की असा किताब व वजिरी दिली. हा बहुतेक राजधानींतच असे. ज्या वेळेस बादशहा व सय्यदबंधु यांची सरकार वाड्यांत भेट झाली, त्या वेळेस (१७१९) मध्यें हा तेथें होता. हा विलासी व थंड होता. पुढें याचें व बादशहाचें वांकडें आलें. यानें दुसरा शहाजादा तख्तावर बसवून लढाईची तयारी केली. परंतु पुढें हसनापूर येथें ता. १४-११-१७२० रोजीं लढाई होऊन हा कैद झाल्यामुळें याची कारकीर्द संपली. पुढें दोन वर्षांनीं ता. ११-१०-१७२२ रोजीं याचा खून झाला (म. रि. म. १ पृ. ७५-१५०).

**अब्बास अली**—याचें काव्यात्मक नांव बेताब असें आहे. गुलाब मुहम्मदखानाचा मुलगा जो नबाब सयादत अलीखान त्याचा हा मुलगा होय. हा स. १८ वे शतकांत रामपूर येथें नबाब होता.

**अब्बास बिन अली शीरवानी**—यानें शेरशाहाचा इतिहास लिहिला असून त्यांत यानें हुमायुनाला हाकलून देऊन शेरशहा दिल्लीच्या गादीवर बसल्याचें वर्णन केलें आहे.

वरील इतिहास यानें अकबरास नजर केला व त्याचें नांव 'तुहफ-इ-अकबरशाही' असें दिलें. या फारसी ग्रंथाच्या पूर्व भागाचें उर्दू भाषांतर मजहर अलीखान यानें लॉर्ड कॉर्नवॉलीस याच्या वेळीं केलें व त्यास 'तारीख-इ-शीरशाही' असें नांव दिलें (बील).

**अब्बास मीर्झा**—नबाब इक्तिदार उद्दौला ही याची पदवी असून याला उर्दू काव्यांत मस्नवी असें म्हणतात. हा स. १८४९ मध्यें लखनौ येथें जिवंत होता. त्या वेळीं याचें वय ८० वर्षांचें होतें.

**अभयदेवसूरि**—(स. १००० सुमारें) हा जैन-धर्मी श्वेतांबरपंथी राजगच्छ शाखेचा असून प्रद्युम्नसुरीचा शिष्य होता.

याच्या मागाहून मुंजराजाचा समकालीन जिनेश्वर-सुरि होऊन गेला. स. ११८५ मध्यें प्रवचनसारोद्धारवृत्ती नांवाचा ग्रंथ करणाऱ्या सिद्धसेनसूरीचा हा ९ वा पूर्वज होता.

अजितसेनाच्या चरित्रांत याचा उल्लेख आलेला आहे. नैय्यायिकग्रंथकाननांत स्वैर केसरीप्रमाणें संचार करीत असल्याबद्दल याचें वर्णन केलेलें आहे. अनेक परस्पर-विरुद्ध मतांनीं सन्मार्गाचा नाश होऊं नये, या उद्देशानें यानें वादमहार्णव ग्रंथ रचिला. याच्यानंतर जिनेश्वर अधिकारी झाला. संवत् १२७६ त पार्श्वनाथचरित्राचा कर्ता माणिक्यचंद्र हा अभयदेवसूरीपासून मी नववा उत्तराधिकारी आहें, असें म्हणतो. या अधिकारवंशावली-प्रमाणें अभयदेवानंतर धनेश्वरसूरी झाला. याच अभय-देवानें संमतिसूत्रावर टीका लिहिली असून 'तत्त्वार्थबोध-

विधायिनी' असें तिचें नांव आहे. शांतिसूरीच्या दोन अध्यापकांपैकीं अभयदेवसूरि हें नांव असलेला, जगप्रसिद्ध सूरी व प्रस्तुतचा अभयदेवसूरि हे दोघे एक असावेत.

शांतिसूरि स. १०३९ मध्यें हा मरण पावला असावा ( हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक, पा. १९६ ).

**२.** हा बृहत् खरतर गच्छाचा संस्थापक होता. ३ ते ११ या नऊ अंगांवर यानें टीका लिहिल्या म्हणून याला नवांगवृत्तिकार असें म्हणतात. हा धार येथें जन्मला. याच्या बापाचें नांव धन व आईचें धनदेवी असें होतें. याचा बाप व्यापारी होता. याचें दीक्षा घेण्यापूर्वीचें नांव अभयकुमार असें होतें. याचा कुष्ठरोग केवळ दैवी उपायानें बरा झाला. १६ व्या वर्षी यानें आचार्यपद संपादन केलें. वर्धमानसूरीच्या विनंतीवरून जिनेश्वरसूरीनें यास सूरि केलें. हा गुजराथेंत कप्पडवंज गांवांत मरण पावला. याचा प्रमाणभूत मरणकाल संवत् ११३९ स. १०८३ आहे. यानें अनेक ग्रंथ तयार केले. स्थानांगावरील टीका, भगवतीसूत्रावरील टीका, ज्ञाताधर्मकथांगावरील टीका, समवायांगावर टीका, उपासकदशांगटीका, प्रश्नव्याकरणांगावरील टीका वगैरे अशा अनेक आहेत.

**३.** याला मलधारिन् ही पदवी गुजराथच्या राजापासून मिळाली. सौराष्ट्राच्या खेंगार राजावर याचें फार वजन होतें. अभयदेवसूरीनें खेंगार राजाला जैनधर्माची दीक्षा दिली. याच्या सांगण्यावरूनच गिरनारच्या यात्रेकरूंवरील कर खेंगार राजानें माफ करविले. हा अभयदेवसूरि प्रश्नवाहन कुलांतला होय. जयसिंहसूरीचा हा शिष्य असून भवभावना ग्रंथ रचणाऱ्या चंद्रदेवसूरीचा हा गुरु होता. यानें अनेक ब्राह्मणांना जैन दीक्षा दिली. यानें मदेरा शहरीं एक महावीराचें देवालय बांधविलें.

**४.** जिनशेखरापासून अभयदेवसूरि हा पट्टावलींतील तिसरा पुरुष होय. हा संवत् १२०४ सालीं होऊन गेला अशी प्रसिद्धी आहे. याला दुसरा अभयसूरी असें नांव आहे. याच्याच हाताखालीं रुद्रपल्लीयगच्छ महत्त्वाला चढला. संवत् १२०४ त रुद्रपल्ली येथें जिनशेखराचार्यांनीं रुद्रपल्लीय खरतर शाखा स्थापिली. हा दुसरा गच्छभेद होता. काशीच्या राजानें याला वादीसिंह अशी पदवी दिली होती असा उल्लेख आहे. जयंतविजयकाव्य नांवाचा ग्रंथ यानें संवत् १२७८ सालीं लिहिला.

**५.** हा गुणाकरसूरीचा समकालीन होता. संवत् १४२६ सालीं गुणाकरसूरीनें सरस्वतीपट्टण येथें भक्तामरस्तोत्रटीका लिहिली. याच अभयदेवसूरीनें संवत् १४५१ सालीं विजयपहुत्तस्तोत्र रचिलें.

**अभयमल्ल**—हा नेपाळच्या ठाकूरी घराण्यांतील एक राजा होय. हा अरिदेव याच्यामागून गादीवर बसला. यानें एकंदर ९ वर्षें राज्य केलें.

**अभयसिंग**—( स.१७३०–१७४९ ) मारवाडांतल्या जोधपूरच्या अजितसिंहाचा हा मुलगा. हा मोठा चळवळ्या असून दिल्लीच्या कारस्थानांत विशेष लक्ष ठेवून स्वतःचा फायदा करण्यांत निमग्न असे. बापलेकांनीं बादशाहाचा प्रदेश उद्ध्वस्त करून थेट दिल्ली–आग्रापावेतों चाल केली. सरबुलंदचे पारिपत्यास कोण जातो असें बादशाहानें विचारलें असतां भर दरबारांत विडा उचलून यानें ही कामगिरी उचलली. या प्रसंगाचें रसभरित वर्णन टॉडनें केलें आहे. वाटेंत जयसिंगाची भेट घेतली. स. १७३० मध्यें गुजराथेंत येऊन अहमदाबाद काबीज करून सरबुलंदखानास पकडून नेलें. अभयसिंगानें जातांना गुजराथेंतून चार कोटी रुपये व एक हजार लोकांइतकी लूट जोधपुरास आणली असें टॉड म्हणतो. यास गुजराथचा लोभ होता. त्यामुळेंच याचें व गायकवाडांचें पुढें वांकडें येऊन यानें पिलाजी गायकवाडाचा खून करविला ( स. १७३२ ). पण पिलाजीचा पुत्र दमाजी यानें गुजराथेंत खूपच दंगल केल्यामुळें अभयसिंगानें दमाजी गायकवाडास चौथाई व सरदेशमुखी देण्याचा करार लिहून दिला. शिवाय अहमदाबादच्या खजिन्यांतून ८० हजार रुपये रोख देण्याचें ठरविलें. रक्कम पदरांत पडेपर्यंत जवानमर्दखान यास ओलीस ठेविलें. जोधपूरचा बचाव होण्यासाठीं याला गुजराथ सोडून तिकडे जावें लागलें. शेवटीं हा स. १७४९ मध्यें अमजेर येथें वारला.

**अभिनवकालिदास**—हा काश्यपगोत्रोत्पन्न होता. यानें शृंगारकोशभाण लिहिलें.

**२.** यानें अभिनवभारतचंपू व भागवतचंपू हीं काव्यें लिहिलीं.

**अभिनवगुप्त**—हा वराहगुप्ताचा नातू व चुखलचा पुत्र. मनोहरगुप्त नांवाचा याला एक धाकटा भाऊ होता ( डॉ. बुल्हरचें काश्मीरग्रंथसंशोधन, पा. १५७ ). याचे गुरु बरेच असावेत, असें दिसतें. भट्टेन्दुराज हा त्यांतील एक गुरु असून त्याचा उल्लेख लोचनांत आला आहे. हा मोठा ग्रंथकार असून याचे विसाहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याची ध्वन्यालोकावरील लोचन नांवाची टीका प्रसिद्ध आहे. भगवद्गीतेवर याची टीका आहे.

याचे गुरु–१ भट्टेन्दुराज, २ भट्टतौत, ३ उत्पल, हा याचा परम गुरु, ४ लक्ष्मणगुप्त ( शैवविद्येंतील गुरु ), ५ तंत्रालोकांतील ( आह्निक १० श्लोक २८७ ) श्लोकावरून

सुमतिनाथ हा अभिनवगुप्ताचा परमगुरु होता, असें जयरथ टीकाकार म्हणतो.

काश्मीरीय शैवसिद्धान्ताची (प्रत्यभिज्ञाशास्त्राची) गुरु-परंपरा पुढीलप्रमाणें आहे:—वसुगुप्त-सोमानंद-उत्पल-लक्ष्मणगुप्त- अभिनवगुप्त.

अभिनवगुप्ताचा ग्रंथ लिहिण्याचा काल स. ९९३ पासून १०१५ पर्यंत होता. याचा प्रत्यभिज्ञाविमर्शिनी नांवाचा प्रत्यभिज्ञाशास्त्रावरील सविस्तर टीकाग्रंथ ( बृहती वृत्ति ) लौकिक शक ९० व गतकाली ४११५ ( स. १०१५ ) या वर्षी लिहिलेला आहे आणि याचें भैरव-स्तोत्र स. ९९३ या वर्षातील आहे ( बुल्हर काश्मीर-ग्रंथवृत्त, पा. १६२. )

भट्टनारायण, भट्टदिवाकरवत्साचा विवेकांजन ग्रंथ, विद्यापतिसोमनंदाचा शिवदृष्टिसार ग्रंथ यांचा गुप्तानें आपल्या बृहत्प्रत्यभिज्ञाविमर्शिनींत उल्लेख केला आहे. आणि क्षेमेंद्र, मम्मट, माधवाचार्य इत्यादींनीं याचाहि उल्लेख आपल्या ग्रंथांतून केला आहे. ईश्वर-प्रत्यभिज्ञानविमर्शिनी, घटकर्परकुलकत्ती, तंत्रसार, तंत्रालोक, ध्वन्यालोकलोचन ( सहृयालोकलोचन, काव्यालोक-लोचन ), परमार्थसंग्रह, परमार्थसार ( आधानकारिका ), भैरवस्तव, बिंबप्रतिबिंबवाद, अभिनवभारती ( नाट्यशास्त्रावरील टीका ), काव्यकौतुकविवरण, परात्रिंशिकाविवरण, शाक्तभाष्य, स्पंद इत्यादि ग्रंथ यानें रचिले आहेत.

हा जातीचा ब्राह्मण असून आसामामधील राहणारा होय. श्रीमत् शंकराचार्य दुसरे, यांचा याच्याशीं वाद होऊन यास हार खावी लागली. त्यामुळें बाह्यांगीं यानें शंकराचार्यांचें शिष्यत्व पत्करलें. परंतु मनाशीं पक्कें ठरविलें कीं, मी दैवी उपायानें तरी शंकराचार्यांस पराभूत करीन; व त्याप्रमाणें यानें केलेंहि. वैद्यासहि असाध्य असा भगंदर रोग शंकराचार्यांचे ठिकाणीं यानें उत्पन्न केला. पण आचार्यांच्या समाधानी वृत्तीमुळें व शंकराच्या प्रार्थनेनें अश्विनीकुमार त्या ठिकाणीं प्रगट होऊन त्यानें ही करणी आहे असा इषारा दिला. तात्काळ शिष्यमंडळीपैकीं एकानें मांत्रिक उपाय योजून रोग बरा केला. पण इकडे अभिनवगुप्त तात्काळ मरण पावला, असें माधवपंडितानें शांकर दिग्विजयांत लिहिलें आहे. पण यांत ऐतिहासिक सत्य नाहीं.

**अभिनवचंद्र**—( स. १४०० सुमार ) कानडी कवि. ब्राह्मण. पिता–काळपय्य, आई–अत्तिमब्बे, स्थळ–बागेवाडी. ग्रंथ–अश्वशास्त्र. चंद्रकवीचे वाजीशास्त्राचा हा आपल्या अश्वशास्त्रांत उल्लेख करतो. म्हणून यानें अभिनवचंद्र असें नांव घेतलें असावें ( क. क. च. भा. १ पा. ४४५ ).

**अभिनवमंगराज**—( स. १३९८ ) कानडी कवि. ब्राह्मण. गोत्र–विश्वामित्र. पिता–रेम्मार्य रामरस. यानें शशिपूरच्या सोमेश्वराच्या कृपेनें आपला निघंटु लिहिला आहे. याचे ग्रंथ– अभिनवनिघण्टु अथवा कविमंगाभिधान, चिंतामणिप्रतिपद. यानें आपल्या कोशांत संस्कृत शब्दांचा कानडींत अर्थ दिला आहे ( क. क. च. भा. १ पा. ४३८).

**अभिनववाण**—( वामनभट्ट पाहा ).

**अभिनंद**—योगवासिष्ठसार व कादंबरीकथासार या संस्कृत ग्रंथांचा कर्ता. गौडकवी. याच्या वडिलांचें नांव भट्टजयंत असें होतें. याचा काल स. ८४० हा असावा. कारण त्याच्या मागील ४ थ्या पिढींतील पूर्वज ( खापर पणजा ) शक्तिस्वामिन् हा काश्मीरच्या मुक्तापिडाच्या अमदानींत ( स. ७२६ ) होता. अभिनंदाचा जन्म काशी येथें झाला होता. धर्मपालच्या वंशांतील विक्रमशिलाचा मुलगा युवराज हारवर्ष हा याचा आश्रयदाता होता. भवभूति, बाण, कमलायुध, केशव, वाक्पतिराज (?) यांचा नामनिर्देश अभिनंदानें केला आहे (सी. सी.).

**२.** रामचरित महाकाव्याचा कर्ता अभिनंद निराळा असावा. हा रामचरित महाकाव्य करणारा अभिनंद सनाच्या अकराव्या शतकांत झाला. त्यांत यानें कालिदासाचा निर्देश ' ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना ' असा केला आहे.

**अभिनंदभू**—या नांवच्या एका श्रीमंत दरबारी गृहस्थानें एक मोठें देऊळ बांधून त्याच्या साफसफाईसाठीं स्वतःला, आपल्या बायकोला व मुलांना गुलाम म्हणून वाहिलें ( हार्पेकृत ब्रह्मदेशाचा इतिहास ).

**अभिमन्यु**—राष्ट्रकूट घराण्यांतील एक राजा. हें राष्ट्रकूट घराणें महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या घराण्यांहून निराळें होतें. याच्या वेळच्या देणगीचा उल्लेख पंडित भगवान्लाल यांनीं केला आहे ( Bhand. P. 206).

**अभिराम वरतुंगराम ऊर्फ वीर पांड्य**— हा कदाचित् जटिलवर्मन् त्रिभुवनचक्रवर्तिन्च असावा. याचें १० वें वर्ष शके १५१७ ( स. १५९५ ) होतें, असें करीवलम् वदनल्लुर येथें आढळतें. यावरून हा स. १५८५-६ मध्यें राज्यावर आला. हा अतिवीरराम श्रीवल्लभ याबरोबर राज्य करीत होता ( एन्शन्ट डेक्कन, भा. १ पा. १८० ).

**अभिषेक**—हा पांडव घराण्यांतील एक राजा होय. हा या घराण्यांतील जो वीर राजा त्याच्यामागून गादीवर बसला असावा.

**अमजद अलीशाह**–अयोध्येचा नबाब मुहम्मदअल्ली-शाहानंतर त्याचा पुत्र अमजदअल्ली गादीवर येऊन त्यानें स. १८४७ पावेतों राज्य केलें. हा विषयासक्त निघाल्यानें अयोध्येची स्थिति फार बिघडली. याच्या कारकीर्दीतील सार्वजनिक महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे गोमती नदीवरील लोखंडी पूल व कानपूर-लखनौ रस्ता या होत.

**अमर**—पश्चिम चालुक्य घराण्यांतील दुसऱ्या पुलकेशीचा मुलगा ( Bhand. P. 263 ). यालाच अंबेरा म्हणत असावेत.

**अमर गांगेय**—यादव घराण्यांतील मल्लुगीचा पुत्र. हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

**अमरचंद्र**—यानें जिनेंद्रचरित्र लिहिलें. हा जिनदत्तसूरीचा शिष्य होता. याचा मित्र अरिसिंह यानें काव्यकल्पलता नांवाचा ग्रंथ अर्धाच लिहिला होता. तो अमरचंद्रानें पूर्ण करून त्या साग्र ग्रंथावर टीका केली. तिचें नांव कविशिक्षावृत्ति असें आहे. यानें छंदोरत्नावली, कलाकलाप व बालभारत हीं पुस्तकें संस्कृतांत लिहिलीं. अरिसिंह व अमरचंद्र सहाध्यायी होते. हे वीसलदेवाच्या काळीं असावेत ( स. १२४३ ).

**अमरचंद्रसूरि**—( आनंदसूरि पाहा. )

**अमरदास**—( स. १५०९–१५७४ ) हा तिसरा शीख गुरु होय. याचा जन्म १५०९ त झाला. याला १५५२ त राज्याधिकार प्राप्त झाला. हा अंगद ऊर्फ अंगडशाहाचा विश्वासू शिष्य होता. क्षमा व सहनशीलता धारण करण्याविषयीं याचा सर्वांना उपदेश असे. यानें जातिभेद मोडण्याचा प्रयत्न चालविला होता. कारण जात्यभिमान हा अनेक पापांच्या मुळाशीं असतो असें याचें म्हणणें होतें. कोणी तुम्हांस वाईट रीतीनें वागविलें तर तें निदान तीन वेळा सहन करा म्हणजे देव त्याला आपोआप शिक्षा करील, अशी याची शिकवण होती. यानें सतीची चाल बंद पाडण्याचा प्रयत्न केला. यानें कजरावळ नांवाचा किल्ला बांधला. याच्या मनांत स्वतंत्र राज्य स्थापन करावयाचें होतें. परंतु राज्याच्या नादीं लागलें म्हणजे धर्म बुडतो या समजुतीनें याच्या पुष्कळ अनुयायांनीं यास सोडलें. हा स. १५७४ त मृत्यु पावला.

**अमर मल्लुगी**—हा यादव घराण्यांतील एक राजा होय. हा या घराण्यांतील बल्लाळ राजाच्या मागून गादीवर आला.

**अमरसारसूरि**—( स. १६३८–१७०६ ) मूळ नांव अमरचंद्र. उदयपूरचा राहणारा. हा धोलका येथें वारला. याच्या कारकीर्दीत उपदेशचिंतामणीची एक हस्तलिखित प्रत लिहिली गेली.

**अमरसिंग**—( पतियाळा ) पतियाळाचा जो अलासिंग त्याचा हा नातु होय. हा स. १७६५ मध्यें गादीवर बसला.

याला अहमदशाह दुराणीकडून राजा-इ-राजगान हा किताब मिळाला होता. स. १७८१ सालीं याच्या मृत्यूपर्यंत यानें, पैल, तिब्बा, पिंजोर, फत्तेहाबाद, सिरस वगैरे मुलूख व किल्ले सर केले होते. स. १७७९ सालीं मोंगल सैन्यानें पतियाळा घेण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. याच्या मागून याचा ५ वर्षांचा साहेबसिंग नांवाचा मुलगा गादीवर आला.

**अमरसिंह**—विक्रमादित्याच्या सभेमध्यें जीं पंडित रत्नें होतीं त्या नवांपैकीं हा तिसरा होय, असें एका प्रसिद्ध श्लोकावरून लोक समजतात. याच्या नांवापुढें सिंह हे उपपद असल्यामुळें हा क्षत्रिय होता, हें दिसून येतें. अमरकोश आरंभितांना जैन किंवा बौद्ध सांप्रदायाप्रमाणें केलेल्या प्रारंभीच्या श्लोकावरून हा जैन किंवा बौद्ध असावा. याच्या अमरकोशावर पुष्कळ पंडितांनीं टीका लिहिल्या आहेत.

उज्जयिनीच्या गुणरात पंडितानें सनाच्या सहाव्या शतकांत अमरकोशाचें चिनी भाषेंत भाषांतर केल्याचें मॅक्समुल्लरनें नमूद केलें आहे. तिबेटी भाषेंतहि एक भाषांतर झाल्याचा शोध लागला आहे. याचा काळ स. ४००-४५० हा आहे. हा शबरस्वामीला शूद्र जातीच्या स्त्रीपासून झाला, असें एका सुप्रसिद्ध श्लोकांत म्हटलें आहे.

ह्वएनत्संगाच्या उल्लेखावरून या अमरसिंहाचा आश्रयदाता विक्रमादित्य, हा चंद्रगुप्त विक्रमादित्य असला पाहिजे, असें दिसून येतें.

**२.** ( स. १५९७-१६२० ) हा प्रतापसिंहाचा ज्येष्ठ पुत्र. स. १५९७ त उदेपूरच्या गादीवर आला. यानें लहानपणापासून वडिलांच्या बरोबर काळ घालविल्यानें संकटांचा याला चांगला सराव झाला होता. हा गादीवर आला त्यानंतर अकबर पुढें आठ वर्षे हयात होता. परंतु तो मेवाडच्या राज्याच्या वाटेस गेला नाहीं.

या शांततेच्या काळांत यानें खर्चवेंचादि सर्व व्यवस्था नवीन करून सरदारांचा दर्जा ठरवून त्यांनीं पगडी कशी बांधावी हें सुद्धां ठरविलें. अमरसिंहाची पगडी अद्याप प्रसिद्ध आहे. यानें आपल्या बापाच्या मरते वेळच्या शब्दांकडे दुर्लक्ष करून तळ्याकाठीं अमरमहाल नांवाचा महाल बांधला.

जहांगीरनें आपले अंतस्थ कलह मिटवून मेवाडचें राज्य घेण्याचें अकबराच्या वेळेपासून पार न पडलेलें काम पुरें करण्याचा निश्चय केला. जहांगीरचें सैन्य मेवाडवर चालून आलें तेव्हां ऐषआरामामुळें अमरसिंहास त्याच्याशीं तह करण्याची फार इच्छा झाली. परंतु याच्या चोंडावत कारभाऱ्यानें राण्यास याच्या बापाच्या मरते-वेळच्या शब्दांची आठवण करून दिली. तेव्हां राण्यास अवसान येऊन हा आपल्या सरदारांसह शत्रूस तोंड देण्यास निघाला. या दोन्ही सैन्यांची देवारी घाटाच्या तोंडाशीं गांठ पडून त्यांत मुसलमानांचा पराजय झाला. परंतु यांत निष्पन्न कांहीं झालें नाहीं. पुन्हा स. १६१० त दुसरी लढाई रानपूरच्या घाटांत झाली व ह्यांतहि मुसलमानांस यश मिळालें नाहीं. अशा यानें एकंदर सतरा लढाया दिल्या व त्या सर्वांत यश संपादिलें. परंतु पुढें खुर्रम ऊर्फ शहाजहाननें मोठें सैन्य घेऊन स्वारी केली व या वेळेस रजपूत लोकांची संख्या घटत आल्या-मुळें मुसलमानांस जय मिळाला. पुढें राण्यानें जहांगीरशीं तह केला. याचा मुलगा कर्ण याला पांच हजारांची मन-सब देण्यांत आली. परंतु अमरसिंहास दरबारीं हजर राहण्याचा कधींच आग्रह करण्यांत आला नाहीं. उलट याच्याबद्दल आदरबुद्धि व्यक्त करण्यासाठीं जहांगीरनें याचा व याच्या मुलाचा असे दोन संगमरवरी दगडाचे पूर्ण आकाराचे पुतळे तयार करवून ते आग्र्यास बागेंत बस-विले. अमरसिंहानें तह केला खरा, परंतु उदेपूरच्या घराण्याची सर्वस्वी मानहानि झाली असें पाहून यानें सर्व कारभार मुलाच्या स्वाधीन करून उदेपूर शह-रांतील नौचौकी वाडयांत तो जो शिरला तो आमरण उंबरठ्याबाहेर आला नाहीं. हा स. १६२१ त मरण पावला ( टॉडचें राजस्थान, पा. ३६४-३८१ ).

**३.** राठोड घराण्यांतील गजसिंहाचा वडील पुत्र. हा शहाजहान बादशाहाच्या फौजेंत नोकर होता. हा उद्दाम-पणें वागत असे. एकदां रजेशिवाय हा १५ दिवस बाहेर राहिला. म्हणून बादशहानें याला दंड करून तो मीरबक्षीला वसूल करण्यास सांगितलें. हा मीरबक्षीला आपल्यापुढें येऊं देईना, तेव्हां याला दरबारांत बोलावलें. परंतु तेथें यानें मीरबक्षीस ठार केलें व हा पळाला. वाटेंत लढाई होऊन आग्रा किल्ल्याच्या दरवाजापाशीं हा फार शौर्यानें लढून मेला. त्या दरवाजाला अद्याप 'अमरसिंह दरवाजा' असें म्हणतात. याच्या तेरा बायका याच्या समवेत सती गेल्या.

मोगल बादशहा शहाजहानच्या कारकीर्दीत राजा अमर-सिंग यांनीं उदेपूरच्या महाराण्यापासून दोन लाख रुपये देऊन फार उत्तम असे दोन मारवाडी घोडे खरेदी केले होते. त्या काळांत ही किंमत फार मोठी समजली जात असे. या दोन घोड्यांपैकीं एका घोड्याची हकीगत खालीं देण्यांत येत आहे.

राजा अमरसिंग हा शहाजहान बादशहाच्या पदरीं घोडदळाचा सेनापति होता व या वेळीं तो आग्रा किल्ल्याचा किल्लेदार होता. एके रात्रीं आग्रा किल्ल्यांत कांहीं सरदारां-बरोबर जुगार खेळत असतां भांडण होऊन त्या भांडणांत राजा अमरसिंग यानें बादशहाच्या आवडत्या मेहुण्यास ठार मारलें. त्यामुळें राजा अमरसिंगासहि त्याच वेळीं बाद-शहाच्या एका सरदारानें तेथेंच ठार केलें.

हा बनाव ज्या वेळीं बनला त्या वेळीं राजा अमर-सिंगाची स्त्री आग्रा शहरांत आपल्या वाड्यांत राहत होती. आपल्या पतीच्या मरणाची हकीगत तिला समजतांच तिनें आग्रा शहरांत राहत असलेल्या सर्व रजपूत सरदारांस बोलावून विनंति केली कीं, माझ्या पतीचें शव कसेंहि करून किल्ल्यांतून आणून माझ्या स्वाधीन करावें. हें काम करणें अशक्य होतें; तरी कानसिंग या नांवाच्या एका रजपूत सरदारानें हें काम करण्याचें आपल्या शिरावर घेतलें.

राजा अमरसिंगाच्या ज्या प्रसिद्ध घोड्याची हकीगत देण्यांत येणार आहे तो घोडा या वेळीं आग्रा किल्ल्यांत राजाच्या तबेल्यांत होता.

सरदार कानसिंग यानें गुप्त रीतीनें आग्र्याच्या किल्ल्यांत प्रवेश केला व तबेल्यांत जाऊन राजा अमरसिंगाच्या घोड्या-वर सामान ठेवून तो तयार केला. नंतर ज्या ठिकाणीं अमरसिंगाचें शव पडलें होतें तेथें तो गेला व आपल्या जिवावर उदार होऊन जवळच्या लोकांशीं लढून त्यानें राजा अमरसिंगाचें शव घेऊन घोड्यावर जलदीनें स्वार झाला. या गडबडीनें सर्व किल्ला जागा झाला व किल्ल्यां-तून बाहेर पळून जाण्याचे सर्व मार्ग बंद करण्यांत आले व त्या ठिकाणीं शिपायांचा पक्का बंदोबस्त ठेवण्यांत आला. कित्येक स्वार त्यास धरण्याकरितां त्याच्या मागें लागले. कानसिंगानें हा प्रकार पाहतांच आपला घोडा किल्ल्याच्या तटावर चढविला व तेथून राजाच्या शवासह खालीं कुद-विला. तटाखालीं ७० फुटांवर हा घोडा जमिनीवर उत-रला. या घोड्याच्या मरणासंबंधीं दोन आख्यायिका सांग-ण्यांत येतात.

पहिली आख्यायिका अशी आहे कीं, ७० फूट खालीं जमिनीवर उतरल्यावर तो घोडा तोंडावर पडला; परंतु त्यास फारशी इजा झाली नव्हती. तो तसाच उठून आपल्या

मालकिणीच्या वाड्यांत आपल्या मालकाचें शव घेऊन गेला व नंतर त्यानें तेथें प्राण सोडला.

दुसरी आख्यायिका अशी सांगण्यांत येते कीं, जमिनीवर उतरतांच तो घोडा ठार झाला, तरी पण कानसिंगानें तेथून राजा अमरसिंगाचें शव नेऊन याच्या स्त्रीच्या स्वाधीन केलें. दुसरी आख्यायिका खरी वाटते.

कानसिंगाचा पाठलाग चालला असतां बादशहा शहाजहान आपल्या राजवाड्यांतून ही मजा पाहत होता. घोड्यानें किल्ल्याच्या तटावरून खालीं उडी घेतलेली पाहतांच बादशहास फार आश्चर्य वाटलें व त्यानें हा घोडा ज्या ठिकाणीं खालीं जमिनीवर उतरला होता त्या ठिकाणीं या घोड्याचा पुतळा--त्यावर राजा अमरसिंग स्वार झालेला असा--तयार करून बसविला आणि या घोड्याच्या अजब कर्तबगारीबद्दल आपलें प्रेम व्यक्त करून त्याचें कायमचें स्मारक करून ठेविलें.

यावरून मोगल आणि रजपूत लोकांस घोड्यांची किती आवड होती हें उघड होत आहे. या घोड्याचा पुतळा--त्याचा मालक त्यावर स्वार झालेला असा--अद्याप आग्रा किल्ल्याच्या बाहेर रेल्वे स्टेशनचे समोर पाहण्यांत येतो. राजा अमरसिंगापेक्षां कानसिंगाचा जर पुतळा या घोड्यावर बसविला असता तर तें अधिक योग्य झालें असतें; कारण कानसिंगानें हिंमत करून या घोड्यास जिवाची पर्वा न करितां किल्ल्याच्या तटावरून खालीं ७० फूट खोल कुदविलें होतें. या घोड्यावर पुष्कळ कवनें करण्यांत आलीं आहेत. देशी घोडे पूर्वी किती उत्तम असत, याचें हें एक ठळक उदाहरण आहे ( हॉर्स ब्रीडिंग मॅगेझिन, एप्रिल १९३१ वरून-जनरल नानासाहेब शिंदे, बडोदें ).

आग्र्यास किल्ल्यासमोर असणारा पुतळा दुसऱ्या अमरसिंहाचा असावा.

४. (स. १७००-१७१०) उदेपूरचा राणा. हा जयसिंहाचा पुत्र असून याला स. १७०० त गादी मिळाली. हाहि पहिल्या अमरसिंहाप्रमाणें शूर व तडफी स्वभावाचा होता ( २ अमरसिंह पाहा ). परंतु याच्या वडलांशीं केलेल्या भांडणांत याचें नैतिक दृष्ट्या वजन कमी झालें.

यानें औरंगजेबाच्या मुलांच्या तंट्याचा फायदा घेऊन राजपुत्र मुअज्जमशीं एक गुप्त तह केला. मुअज्जम सिंधच्या पश्चिमेकडील मोहिमेंत असतां याच्या पथकानें उत्तम साहाय्य केलें होतें. परंतु पुढें याला लवकरच मोगलांविरुद्ध शस्त्र उपसावें लागलें. चंबळा नदीकडील एक रजपूत जहागीरदार दक्षिणेंत औरंगजेबाच्या मदतीस होता. परंतु त्याच्या मुलानें जहागीर सर्व हातांत घेऊन स्वतः मुसलमान झाला; तेव्हां अर्थातच जहागीरदाराच्या म्हणण्याकडे औरंगजेबानें लक्ष दिलें नाहीं. परंतु जहागीरदार राण्यास येऊन मिळाला व त्यानें आपली जहागीर मिळवून देण्याची राण्यास विनंति केली. परंतु औरंगजेबास हें कृत्य पसंत पडलें नाहीं. त्यानें अजम याला राण्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यास सांगितलें. परंतु मध्यंतरींच औरंगजेब मरण पावला व हा सर्व तंटा मिटला.

पुढें राजपुत्र मुअज्जम यानें आपला भाऊ अजम याचा पराभव करून रजपुतांच्या साहाय्यानें गादी मिळविली. परंतु पुढें मात्र रजपूत त्याच्या ताब्यांत राहिले नाहींत. कारण औरंगजेबाच्या वर्तनानें त्यांचा मुसलमानांवरील विश्वास पार उडून गेला होता. मारवाड व अंबर येथील राजे बादशाहास न विचारतांच छावणींतून निघून जाऊन मेवाडच्या राण्यास येऊन मिळाले. या तिघांनीं एक संघ स्थापन केला. मेवाडच्या राण्यानें इतर रजपुतांच्या मुलींशीं लग्नव्यवहार सुरू करून मुलीच्या संततीस वारस नेमण्याची अट कायद्यानें मान्य केली. परंतु ही मोठी चूक होऊन यामुळें मराठ्यांस पुढें रजपुतांच्या भानगडींत पडण्यास अवसर मिळाला.

पुढें बहादुरशाहानें रामपुऱ्याच्या बाटग्या जहागिरदारास मदत केली. परंतु जयपूर, जोधपूर व उदेपूर या तिन्ही ठिकाणच्या सैन्यांनीं एकत्र जमून शत्रूशीं टक्कर दिली व जेवढ्या म्हणून मुसलमानी अमदानींत देवळांच्या मशीदी झाल्या होत्या त्या सर्व जमीनदोस्त केल्या व सर्व काजी अधिकाऱ्यांस अपमान करून वागविण्यांत आलें. या प्रसंगीं रजपुतांनीं जशास तसें या नात्यानें वर्तन केलें.

परंतु पुढें लवकरच पहिला शहाअलम वारला व या वरील त्रिकूटांतहि एकी राहिली नाहीं. मारवाडचा राजा अजितसिंह यानें पुनः मोंगलांशीं मैत्री केली व बादशाहा फर्रुखसियर याचें त्याच्या मुलीशीं लग्न झालें. जरी ही मैत्री झाली तरी हिंदूंवरील मध्यंतरीं उठलेला जिझिया कर पुनः बसविण्यांत आला.

इतकें झालें तरी अमरसिंह हताश न होतां त्यानें रजपुतांचें एक स्वतंत्र राष्ट्र करण्याचे प्रयत्न दुप्पट जोमानें केले. बादशाहाशीं झालेल्या तहांत सुद्धां त्याचा स्वतंत्र बाणा दृष्टोत्पत्तीस येतो. त्यांतील दुसरेंच कलम जिझिया कर उठवा, असें होतें. वरील तह हें त्याच्या आयुष्यांतील शेवटचेंच कृत्य होतें. हा स. १७१० त मरण पावला. हा मोठा तडफदार व उदार अंतःकरणाचा राणा होता.

तशा काळांतहि यानें आपल्या राज्याचा बडेजाव कायम राखून तें बरेंच भरभराटीस आणलें. मेवाडच्या लोकांत याच्याबद्दल आदर अद्यापहि वसत आहे. ( टॉड, पा. ४१०-४२० ) याच्या मृत्यूचा काल टॉडनें १७१६ दिला आहे. पण गौरीशंकर ओझा यांनीं स. १७१० दिला आहे आणि तो बरोबर आहे.

५. ( तंजावरचे राजे ) स. १७८७ मध्यें तंजावरचे तुळाजीराजे मृत्यु पावल्यानंतर त्यांचे सापत्न बंधू हे तंजावरच्या गादीवर आपला हक्क सांगण्यास सिद्ध होऊन ते तंजावर येथें दाखल झाले. त्यांनीं मद्रासचे गव्हर्नर सर आर्चिबॉल्ड कॅम्बेल यांशीं पत्रव्यवहार करून गादीचे खरे वारस आपण आहोंत व सरफोजीचें दत्तविधान अशास्त्र आहे, असें सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केला. सर आर्चिबॉल्ड कॅम्बेल ह्यांनीं तंजावरास येऊन चौकशी केली व कांहीं विद्वान् पंडितांच्या साक्षी घेऊन अमरसिंग राजे यांस तंजावरच्या गादीवर बसविण्याचें ठरविलें. व त्यांच्याबरोबर एक नवीन तह केला. तो फार महत्त्वाचा असून त्यायोगानें तंजावरचें राज्य बहुतेक ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यींत आलें ( इ. सं. पु. ३ रें, तं. रा. घ. पृ. ९६ ).

सरफोजीस व त्याच्या मातोश्रीस अमरसिंह राजानें चांगलें वागवलें नाहीं अशी तक्रार मि. स्वार्झ ह्यांनीं मद्रास सरकारचे कानावर घालून स. १७९३ मध्यें सरफोजी व त्याची आई ह्यास मद्रासेस नेऊन ठेवलें.

मद्रास येथें गेल्यावर सरफोजीच्या आईनें तंजावरच्या गादीवर आपल्या मुलाचा हक्क आहे म्हणून ग. ज. लॉर्ड कॉर्नवॉलीस याजकडें बोलणें लावलें. या कामीं तिला रे. स्वार्झ ह्यांचें चांगलें पाठबळ मिळालें. याच वेळीं राजे अमरसिंह याजकडील खंडणीची बाकी थकली व राज्यकारभारांत पुष्कळ अव्यवस्था झाली, असा बोभाटा मद्रास सरकारचे कानावर गेला. पुढें ३० डिसेंबर १७९६ रोजीं सरफोजीचें दत्तविधान सशास्त्र आहे व अमरसिंग हे गादीस लायक नाहींत, असा सर जॉन शोअर यांनीं निकाल दिला.

मद्रासचे गव्हर्नर होबर्ट ह्यांनीं वरिष्ठ सरकारच्या म्हणण्यास पुष्टि देऊन, हें प्रकरण मंजुरीसाठीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे पाठवलें. स. १७९८ मध्यें डायरेक्टर्सनीं या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल सरफोजीच्या वतीनें देऊन अमरसिंहास पदच्युत केलें व त्यास तंजावरपासून २९ मैलांवर मध्यार्जुन म्हणून एक ठिकाण आहे तेथें नेऊन ठेवलें. ते तेथें दरसाल पाऊण लाख नेमणूक घेऊन पुढें बरींच वर्षे राहत होते. ते स. १८०२ मध्यें मृत्यु पावले.

यास प्रतापसिंह या नांवाचा मुलगा होता. तो स. १८४९ मध्यें मेला. त्यास औरस संतति नसल्यामुळें त्यानें एकोजी नांवाचा एक पुत्र दत्तक घेतला. त्यास ब्रि. सरकाराकडून दरमहा १ हजार ६० नेमणूक मिळत असे. तो १८८३ पर्यंत विद्यमान होता.

अमरसिंह राजे यांच्या कारकीर्दीचें गुणावगुणवर्णन करण्याचें काम फार कठीण व नाजूक आहे. यांच्याबद्दल तंजावर व मध्यार्जुन येथें अद्यापपर्यंत जो लौकिक ऐकूं येतो त्यावरून ते मोठे सात्त्विक, दयार्द्रबुद्धीचे आणि उदार असे राजे होते असें दिसून येतें; परंतु रे. स्वार्झ व इतर इंग्रज लेखक यांनीं यांच्याविरुद्ध ज्या कागाळ्या लिहिल्या आहेत, त्यांवरून ते अतिशय जुलमी, क्रूर, राज्यकारभार करण्यास अयोग्य असे होते, असें मानणें भाग पडतें ( तं. रा. घ. पृ. १०१-११२. ).

६. काशीचा राहणारा. याचें टोपणनांव खुषगो असें होतें. कोएल जिल्ह्यांत याला सरकारी नोकरी होती. यानें अकबराचा राजवाडा व आग्र्याचा ताजमहाल यांचा संक्षिप्त इतिहास लिहिला असून तर्जुमा बहारदानिश हें काव्य फारसींत केलें. हें उर्दू इक्षारदानिशहून निराळें आहे ( बील ).

**अमरु**—शंकराचार्यांनीं ज्या वेळेस परकायाप्रवेश केला, तेव्हां हाच राजा मेला होता, व त्यांनीं याच्या मृत शरीरांत प्रवेश करतांच हा जिवंत झाला. याच्याच रूपानें शंकराचार्य कामशास्त्र शिकले. याची कथा शांकरविजयांतील ५८ व्या प्रकरणांत दिली आहे. याच्या नांवावर अमरुशतक नांवाचें शृंगाररसप्रधान काव्य आहे. अमरूच्या शरीरांत प्रवेश केला तेव्हां त्यानें अमरुशतक केलें असेल. अमरुशतकावर रसिकसंजीवनी नांवाची अर्जुनवर्म्यानें टीका लिहिली आहे ( शंकराचार्य पाहा ).

**अमलानंद**—हा कृष्ण यादवाच्या दरबारीं उदयास आला. वाचस्पतिमिश्राच्या भामती नांवाच्या ग्रंथावर यानें 'वेदान्त-कल्पतरु' या नांवाची टीका लिहिली आहे. शिवाय याचा शास्त्रदर्पण ( ब्रह्मसूत्रभाष्य ) हा ग्रंथ आहे. हा अनुभवानंदाचा शिष्य होता. याचा काळ सुमारें स. १२४७-६० असा आहे. यांचें नांव अमलानंद व्यासाश्रम असें दिलेलें आढळतें ( C. C. ).

२. यानें पंचपादिकादर्पण नांवाचा वेदांत ग्रंथ लिहिला आहे.

**अॅमहर्स्ट**—( स. १७७३-१८५७ ) हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता. हा बाथ ( इंग्लंड ) येथें १७७३ त जन्मला. अॅमहर्स्ट हें घराणें बरेंच जुन्यापैकीं

आहे. यांचें प्राथमिक शिक्षण वेस्टमिन्स्टर शाळेंत होऊन ऑक्सफर्ड येथील कॉलेजांत त्यानें एम्. ए. ची डिग्री संपादन केली. याची फिमथचा अर्ल व कौंटेस याच्याशीं ओळख झाली. पुढें कौंटेस मेला. तेव्हां त्याच्या विधवा बायकोबरोबर यानें स. १८०० त लग्न लावलें. पुढें याचा राजदरबारांत लवकरच प्रवेश झाला; व याच्या प्रामाणिकपणामुळें हा चीन दरबारीं वकील म्हणून नेमला गेला. परंतु चीनच्या बादशाहाला त्याच्या रिवाजाप्रमाणें यानें मुजरा करण्याचें नाकारलें. तेव्हां हा परत इंग्लंडांत गेला, व पुढें लवकरच स. १८२३ मध्यें हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होऊन आला.

यांचें येथें आल्यावर कंपनी सरकारतर्फे मोठें स्वागत करण्यांत आलें. लेडी ॲमहर्स्टनें देखील येथें असतांना निरनिराळ्या गोष्टींविषयीं दिनचर्या लिहिली आहे. ॲमहर्स्ट आला तेव्हां मुद्रणस्वातंत्र्याचा बिकट प्रश्न याचे पुढें होता. हा शांततापिय होता. परंतु नाइलाजानें याला ब्रह्मी युद्ध सुरू करावें लागलें. यानें अगोदर कमिशन नेमून सरहद्दीचा तंटा मिटवावा, असें सुचविलें होतें. तें ब्रह्मी सरकारांस न आवडून युद्ध सुरू झालें. यांत ॲमहर्स्ट सर्वस्वीं यशस्वी झाला व कंपनीसरकारास योग्य असा तह यानें घडवून आणला. या कामीं प्रथम त्याला १३कोट रु. खर्च आला, म्हणून दोष देण्यांत आला. परंतु चहाचे मळे व तांदळाचें आगर असलेला प्रांत मिळालेला पाहिल्यावर याची उलट वाखाणणीच करण्यांत आली. दुसरें महत्त्वाचें कृत्य म्हणजे भरतपूरच्या किल्ल्याचा पाडाव हें होय. तें यानेंच केलें.

ब्रह्मी युद्धावर जाण्यापूर्वी बंगाली शिपायांनीं योग्य वाहनें व पगारवाढीची मागणी केली होती, परंतु ती यानें नाकारून तिला बंडाचें स्वरूप देऊन त्या शिपायांची कत्तल करण्यांत आली, हें कृत्य तेवढें त्याच्या कारकीर्दीत वाईट घडलें. हा स्वदेशीं जाऊन स. १८५७ त मरण पावला.

**अमाई**—तुकारामाचा पूर्वज विश्वंभर याची पत्नी.

२. शहामुनीची आई व मानसिंहाची पत्नी.

**अमात्यांचा वंशवृक्ष**–

सोनभट बहुतकर

आबाजी — निळो

**रामचंद्र नीलकंठ अमात्य**

भगवंतराव ( स. १७१८-१७५५ )

ल. व्यंकूबाई-निळोपंत पिंगळे

कृष्णराव ( स. १७५०-१७६१ )

सुबराव ( स. १७६१-१८१० )

मोरेश्वर ( स.१८१३-२६ ) रामचंद्र ( स.१८११-१३ )

गोविंदराव ( स. १८२६-३४ )

रघुनाथ द. ( स. १८३५-४५ )

रामराव द. ( स. १८४७-४९ )

मोरेश्वर द. ( स. १८५०-६७ )

माधवराव द. ( स. १८६८-१९२९ )

परशुरामराव ( स. १९३१ चालू ).

हें घराणें सध्यां गगनबावडा येथें राज्य करीत आहे.

**अमानतखान**—ज्या वेळेस निजाम औरंगाबाद सोडून दिल्लीस जावयास निघाला त्या वेळेस दक्षिणचा कारभार त्यानें मुबारिझखान नामक सरदारचे हवालीं केला. हेंच ह्याचें मुळचें नांव. यांस अमानतखान व शाहमतखान हे वेळोवेळीं किताब मिळत गेले. केव्हां केव्हां यास कंमरजखान असें म्हणतात. हा निजामाप्रमाणें वृद्ध व अनुभवी होता. बारा वर्षे हा हैद्राबादच्या कारभारावर होता. हा पूर्वी सय्यदपक्षाचा असून निजामाचा द्वेष करी (१७२१). पण दक्षिणचा कारभार मिळतांच यानें मराठ्यांशीं निकाराचें धोरण आरंभिलें. आपण सय्यदाचे करार पाळत नाहीं व चौथाईचा वसूल साफ देत नाहीं, असें त्यांना कळविलें ( म. रि. म. १ पृ. १६२; मुबारिझखान पाहा ).

**अमार भुजंग**—वीरपांड्यानंतरचा राजा असावा; कारण वीरपांड्यानंतर राजराज १ ला (९८५ ते १०१३) चोल राज्य करीत असतां त्यानीं अमारभुजंग पांड्य व चेर यांचा पराभव केल्याचा उल्लेख तंजावर--शिलालेखांत आढळतो. चेर, पांड्य व चोल यांच्यामधील ही लढाई मलई नाडू येथें झाली.

मदुरा आणि तिन्नेवेली प्रांतांतील राजराजाच्या शिलालेखांत असा उल्लेख आढळतो कीं, स. ९९५ मध्यें पांड्याचा जय झाला, परंतु तो जय म्हणजे राजराजानें पांड्य राजावर वर्चस्व मिळवून सर्व पांड्यराज्य चोलांच्या स्वाधीन करून घेऊन पांड्य देशाला पांडीनाडू असें नांव दिलें व सर्व पांड्यराज्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली.



32311

तेव्हां पासून पांड्याराजांनीं चोलांच्या हाताखालीं राहण्याचें कबूल केलें.

राजराजानंतर त्याचा मुलगा राजेंद्र चोल स. १०११ ते १०४५ हा गादीवर होता. त्यानें सर्व पांड्य राज्यावर चोल मांडलिक ठेवून पांड्यांची सत्ता नष्ट केली. त्याच्या राज्यांत पांड्यांचा उल्लेख शिलालेखांत आढळत नाहीं.

**अमितगति**—हा जैनधर्मी दिगंबर पंथापैकीं एक साधू होता. हा नामांकित कवि व धर्मग्रंथकारहि होता. हा मुंजराजाच्या वेळेस होऊन गेला. या राजाच्या पदरीं अनेक कवि व धर्मग्रंथकार होते. त्या सर्वांत अमितगति, धनंजय व धनपाल यांनाच श्रेष्ठत्वाचा मान होता असें दिसतें.

धर्मपरीक्षा व श्रावकाचार या ग्रंथांमुळें याची धार्मिक वाङ्मयांत फार प्रसिद्धी आहे. यानें आपला सुभाषित-रत्नसंदोह हा ग्रंथ विक्रम संवत् १०५० पौ. शु. ५ ला पूर्ण केल्याचा उल्लेख दिला आहे. म्हणजे स. ९९४ मध्यें हा ग्रंथ रचिला गेला. धर्मपरीक्षा ग्रंथाच्या शेवटीं तो ग्रंथ संवत् १०७० मध्यें म्हणजे स. १०१४ त रचल्याचा उल्लेख आहे. यावरून हा कवि मुंजाच्या वेळीं म्हणजे दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत व ११ व्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला हें ठरतें. मुंजाच्या नंतरहि यानें ग्रंथरचना केलेली दिसते. यानेंच प्रथम संवताशीं संबद्ध असणारा विक्रम शब्द विक्रमादित्य नृप अशा अर्थाचा आहे असें निःसंदिग्ध लिहिलें आहे.

यांचें जन्मस्थान, आईबाप वगैरे माहिती मिळण्यास कांहींच साधन नाहीं. याच्या श्रावकाचार ग्रंथांत जैनांनीं पाळावयाचा आचार अथपासून इतिपर्यंत आहे. यांतील परिच्छेद १५ असून श्लोकसंख्या सुमारें १३।। शें आहे.

सुभाषितरत्नसंदोह हाहि याचा ग्रंथ नांवाप्रमाणेंच सुभाषितश्लोकरूपी रत्नांनी भरलेला आहे. कोप, माया, अहंकार, द्यूत, वेश्यासंग अशा अनेक अधोगतीला नेणाऱ्या मनोविकारांचें वर्णन यानें केलें आहे.

धर्मपरीक्षा हा ग्रंथ एकूण सुमारें दोन हजार श्लोकांचा आहे. हा यानें दोन महिन्यांत संपविला असें ग्रंथांतील उल्लेखावरून दिसतें ( ज्ञा. को. ).

**अमितभ**—बौद्ध लोकांत ज्या मुनींची विशेष ख्याती आहे त्यांत याची गणना होते.

**अमीनखान**—हा निजामुल्मुल्कचा चुलता. हा पूर्वीपासून सय्यदांचा शत्रू होता. स. १७१८ मध्यें मराठ्यांनीं माळवा प्रांतांत ठाणें दिलें. त्यांस काढून लावण्याकरितां बादशहानें याची नेमणूक केली. परंतु हा मध्येंच हुसेन-अली सय्यद येत आहे असे ऐकतांच कारभार सोडून दिल्लीस आला. त्यामुळें बादशाहाची याच्यावर मोठी इतराजी झाली. हाच पुढें सय्यदाच्या पाडावांत मुख्य असून कांहीं दिवस वजिरीवर होता. दिल्लीस याच्याशीं मराठ्यांची मारामारी झाली तींत १५०० मराठे कापले गेले. यानें रतनचंदास हालहाल करून मारलें. स. १७२० च्या नोव्हेंबरांत याला वजिरी मिळाली, पण पुढें हा अवघ्या ३ महिन्यांनीं मरण पावला.

**अमीर उमर**—हा सुलतान अलाउद्दीन खल्जीच्या बहिणीचा मुलगा. अमीर उमर व त्याचा भाऊ तंगूखान यांनीं अलाउद्दीन रतनभोरचें वेढ्यांत गुंतला असतां बदाऊन व अयोध्या येथें बंड केलें व स्वतंत्र सुलतान झाल्याची द्वाही फिरविली. त्या भागांतील राजनिष्ठ सरदारांनीं या दोघां भावास शह देऊन पकडिलें व दोघांसहि स्थायांचा मामा सुलतान अला उद्दीन यांकडे रवाना केलें. त्यानें यांचे डोळे काढून यांस आंधळें केलें.

**अमीरखान**—इराणांतील यज्द येथें राहणारा एक हुषार व शूर सरदार. हा औरंगजेबाच्या वेळीं अफगाणिस्थानच्या कामावर होता. याची बायको साहेबजीबाई होय ( मु. रि. भा. २ पा. ३२६ ).

**२.** हा मुरादाबाद जिल्ह्यांतील सुंबळ गांवचा राहणारा. याचा बाप मुल्ला असून त्याचा थोडा जमीनजुमला होता. यानें आपलें गांव सोडलें, त्या वेळेस हा वीस वर्षांचा होता. याच्या बरोबर याचे दहा विश्वासू अनुयायी होते. पुढें माळव्यामधील पेशव्यांच्या एका सरदारानें यांना शिबंदी म्हणून आपल्या जवळ ठेवलें. यांना तीनचार रुपये पगार मिळत असे. पुढें याला लवकरच चांगले दिवस आले. भोपाळ दरबारच्या दिवाणाचा अंत झाला व तेथें बरीच खळबळ माजली. तेव्हां हा आपले ६० स्वार व ६० शिपाई घेऊन मुहंमदखानाकडे नोकरीस राहिला. पुढें हा दुर्जनलाल व जयसिंग या राघवगडच्या संस्थानिकांच्या तैनातीस राहिला व त्यांचा जेव्हां मराठ्यांशीं तंटा झाला तेव्हां यानें आपली मर्दुमकी गाजवून दाखविली. त्यामुळें याला ५०० स्वारांचें आधिपत्य मिळून पालखीचा मान मिळाला व पंधरा हजार पेंढारी सैन्यामध्यें याला महत्त्वाचा दर्जा प्राप्त झाला. परंतु यानें रजपुतांशीं पुन्हां भांडण होऊन हा इंग्रजांच्या पदरीं राहिला. तेथें याला फत्तेगडच्या किल्ल्याची देखरेख

मिळाली. परंतु ती याला लवकरच सोडावी लागली. नंतर मात्र यशवंतराव होळकराशीं याची मैत्री जमून याचें चांगलेंच बस्तान बसलें. यशवंतरावाचें व याचें नातें जरी सेव्यसेवकाचें होतें तरी यशवंतराव याला भाऊ म्हणून संबोधी व इतर सरदारांपेक्षां याचा बडेजाव जास्त राखी.

अमीरखान अगदीं स्वतंत्र होता, तरी याची स्थिति तितकी चांगली नव्हती. एकदां तर याच्या सैनिकांनीं याला बेदम ठोकून पागोटयाचा फांस लावून ते याचा जीव घेणार होते. परंतु यशवंतरावानें ही बंडाळी मोडून बंडखोरांना शिक्षा ठोठावल्या. परंतु त्यांचा समूळ नायनाट करण्यास हा परवानगी देईना. प्रत्यक्ष पुण्याशेजारीं गोहत्या करून याचे शिपायी हिंदूंना चिडवीत असत. एवढ्यावरूनच याचे सैनिक किती उद्दामपणानें वागत होते याची कल्पना होते.

यानें यशवंतरावाला स. १८०४ त इंग्रजाशीं झालेल्या युद्धांत बरीच मदत केली; भरतपूरचा वेढा उठविण्यासाठीं यानें रोहिलखंडांत जाऊन जाळपोळ व लुटालूट आरंभिली. परंतु इंग्रज सैन्यानें यास गांठून याचा पराभव केला. तेव्हां हा पुनः होळकरास येऊन मिळाला. परंतु स. १८०५ मध्यें से. लेक याजबरोबर यशवंतरावानें तह केला. पुढें याचा संबंध यशवंतरावाशीं फारसा आला नाहीं. पुढें जयपूर व जोधपूर येथील राजे उदेपूरच्या राजकन्येसाठीं आपसांत भांडत असतां जयपूरच्या राजानें यशवंतरावाजवळ मदत मागितली तेव्हां त्यानें अमीरखानास मदतीस रवाना केलें.

या भांडणामुळें दोनहि संस्थानचें अतोनात नुकसान झालें. अमीरखानाची लायकी लुटारूंचा पुढारी होण्याकडे नव्हती. जय मिळाला असतांनाहि त्याचें मोठें बक्षीस घेण्याचें सोडून हा लुटालूट करण्यांत धन्यता मानीत असे. यानें अतिशय कपटानें सवाईजयसिंगास कठंस्नान घातलें. याच्या ठिकाणीं नीतिमत्ता बिलकुल वास करीत नव्हती.

पुढें यशवंतरावास वेड लागलें. तेव्हां तुळसाबाईस पुढें करून सर्व कारभार अमीरखानानें पाहावा, असें ठरलें. पुढें होळकर व भोसले यांच्यांत कांहीं हक्कांचे तंटे होते ते मिटविण्याचे उद्देशानें हा भोसल्यांच्या मुलखांत शिरला व यथेच्छ लुटालूट करूं लागला. परंतु तें कार्य तेवढी यास इंग्रज मध्यें पडल्यामुळें करतां आलें नाहीं. इंग्रजांनीं याला नर्मदापार हाकून लावलें.

हा नंतर पुनः रजपुतांकडे वळला व भांडणाचें जें मूळ कृष्णाकुमारी हिलाच जगांतून नाहींशी करावी म्हणजे झालें, असा यानें उदेपूरच्या मंत्र्यापुढें प्रश्न मांडला. परंतु ही गोष्ट प्रथम कोणासच रुचली नाहीं. परंतु कृष्णाकुमारीनेंच ही युक्ति मान्य केली व ती विष पिऊन जगांतून नाहींशी झाली.

पुढें हा दोन वर्षें राजपुतान्यांतच होता. परंतु सर डेव्हिड ऑक्टर लोनी हा पेंढाऱ्यांचा नायनाट करण्याकरितां जेव्हा राजपुतान्यांत उतरला तेव्हां यानें इंग्रजांपुढें आपलें कांहीं चालणार नाहीं हें ओळखून व १५ लक्षांवर जहागीर घेऊन यानें त्याच्याशीं तह केला. तरी हा तह करण्याचें कामीं यानें बरीच दिरंगाई केली. यानें एकदम इंग्रजांचे वैर सोडून त्यांच्याशीं दोस्ती कशी केली याचें जरा आश्चर्यच आहे. याच्यांत जर कोणता एक सद्गुण असेल तर तो मित्रप्रेम हा होय. यशवंतरावाशीं यानें अखंड मित्रत्वाचेंच नातें ठेविलें. यशवंतरावाच्याहि दुष्ट संवयी घालविण्याचा यानें आटोकाट प्रयत्न केला; याचें कारण मित्रप्रेम हेंच होय. धर्मकुवराशीं झालेल्या युद्धांत यानें आपल्या जिवाची पर्वा न करतां मित्राची बाजू सांभाळिली. याचे कट्टे दुष्मनहि याचा हा गुण कबूल करतात ( मालकमकृत मेमॉयर्स ऑफ सेंट्रल इंडिया ).

**अमीरखान अलीशाह**—याला केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत मीरखान अलीशाह असें म्हटलें आहे. काश्मीरच्या मुसलमानी राज्यांतील सिकंदर बुत्शिकनचा मुलगा. हा आपल्या बापानंतर गादीवर आला ( स. १४१६ ).

गादीवर येते वेळीं यानें अलीशाह हा किताब धारण केला. हिंदुस्थानांत प्रवास करण्याचें मनांत येऊन यानें आपल्या भावास राज्याची व्यवस्था सांगितली आणि काश्मीरांतून दक्षिणेंत प्रयाण केलें स. १४२२ ( मु. रि. भा. १ पा. ३१६ ).

**अमीर बरीद**—( स. १५०४-१५४९ ) बेदरच्या बरीदशाही घराण्यांतील कासीम बरीदाचा हा पुत्र. बापानंतर बेदरच्या गादीवर आला. बहामनी राज्याची अखेर करणाऱ्या पांच प्रमुख लोकांपैकीं हा एक होय.

यानें विजापूरच्या इस्माईल राजाचा दिवाण जो कमालखान त्यास मदत करण्याचें कबूल करून गुलबुर्ग्यास वेढाहि दिला होता. पण जेव्हां कमालखानाचा खून झाला तेव्हां याला गुलबुर्ग्याचा वेढा उठवून परत जावें लागलें.

यानें युसुफ आदिलशाह याला आणि इस्माईल याला फार त्रास दिला. इस्माईलचा एक सरदार असदखान यानें याच्या छावणीवर एकदां हल्ला करून हा दारू पिऊन धुंद

झाला असतां कैद केलें आणि इस्माईलपुढें उभें केलें. तेव्हां शाहानें याचें डोकें उडविण्याचा हुकूम दिला. त्या वेळीं यानें बेदरचा किल्ला देण्याचें कबूल करून जीवदान मागितलें. तें इस्माईलास पसंत पडून तसें करण्याचें ठरविलें. यापुढेंहि यानें विजापुरच्या राजास त्रास देण्याचें काम चालू ठेविलें. पण नंतर याला पश्चात्ताप झाला. तेव्हां यानें इस्माईलशीं वैरत्व सोडून देऊन त्याच्याशीं सख्य केलें, व शेवटीं तर हा इस्माईलचा परममित्र झाला. स. १५२९ त विजापूरच्या शाहानें याच्यावर हल्ला करून अमीर बरीद याचें बहुतेक राज्य हिरावून घेतलें. मात्र बेदर व सभोंवारचा चार पांच लाखांचा मुलूख याजकडे राहिला. हा स. १५४९ त मरण पावला ( मु. रि. भा. १ पा. २४० ). याला अली बरीद नांवाचा एक मुलगा होता ( विजापूरचें आदिलशाही घराणें, मोडककृत ).

**२.** बेदरच्या बरीद वंशांतील खानजहानचा हा पुत्र असावा. याचा काल स. १५८९ असा आहे. याचा संशयित उल्लेख केंब्रिज हिस्टरीशिवाय इतरत्र कोठें केलेला आढळत नाहीं.

**अमीशाह** ( ऊर्फ **दिलावरखान घोरी** )— हा स. १३८७ मध्यें फीरूजशाह तुघ्लकाच्या अमदानींत माळव्याच्या सुभेदारीवर होता. फीरूझशाहाच्या पश्चात् दिल्लींत बरेच बखेडे माजले व गुजराथ, खानदेश जौनपूर वगैरे प्रांतांच्या सुभेदारांनीं दिल्लीच्या बादशहाची सत्ता झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. परंतु त्यांच्याबरोबर दिलावरखानानें मात्र आपलें स्वातंत्र्य जाहीर करण्याची घाई केली नाहीं. हा मोठा घोरणी व मुत्सद्दी होता.

स. १३९८ त तैमुरलंगानें दिल्लीवर स्वारी केली असतां मुहम्मद तुघ्लक याजकडे आश्रयास आला. उदारहृदय दिलावरखानानें त्याला सन्मानपूर्वक तीन वर्षें आपणाजवळ ठेवून घेतलें व पुढें दिल्लीवरचें अरिष्ट टळून जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यावर त्याला परत दिल्लीस पोंचतें केलें. या सदुचित कृत्यामुळें पुढें दिलावरखानास आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्याच्या बाबतींत दिल्लीदरबाराकडून कोणताहि अडथळा न होतां उलट मोकळीकच मिळाली. यानंतर दिलावरखानानें योग्य संधि येतांच एकदम संपूर्ण राजचिन्हें धारण करून माळव्याचा स्वतंत्र सुलतान म्हणून आपल्या नांवाची सर्वत्र ग्वाही फिरविली व आपल्या नांवानें खुद्बा पढण्याविषयीं व स्वतंत्र नाणें पाडण्याविषयीं हुकूम सोडले. अशा प्रकारें स. १४०१ मध्यें माळव्यांत स्वतंत्र सुलतानी सत्तेची स्थापना दिलावरखानाच्या हातून झाली.

दिलावरखान हा जरी घोरणी, मुत्सद्दी होता तरी याचा स्वभाव अत्यंत धिम्मा होता. हा याचा स्वभाव याचा मुलगा अलफखान म्हणजे हूशंगशाह यास बिलकूल पसंत नसल्यामुळें या बापलेकांत बेबनाव होता. त्या बेबनावाचा शेवट पुढें मुलाच्या हातून बापास विषप्रयोग होण्यांत झाला. स. १४०५ ( क्षेत्रसिंह पाहा ).

**अमृत**—एक मराठी कवि. गुरु-निरंजन. ग्रंथ-सिद्धान्तबोध ( सं. सू. ).

**अमृतचंद्रसूरि**— कुंदकुंदाचार्याच्या समयसार ग्रंथावर यानें टीका लिहिली आहे. या टीकेचें नांव आत्मख्याती असें आहे. हा वि. सं. ९०६ त हयात होता व त्यानें खालील ग्रंथ लिहिले:—( १ ) समयसारटीका, ( २ ) प्रवचनसारटीका, ( ३ ) पंचास्तिकायटीका, ( ४ ) तत्त्वार्थसार, ( ५ ) पुरुषार्थ सिद्ध्युपाय आणि ( ६ ) तत्त्वदीपिका.

**अमृत ( चिन्मय )**—एक मराठी कवि. चिन्मय कृष्ण हें याच्या गुरूचें नांव असून तें गणेशभारतींना लावीत असत. याचा ग्रंथ-तुरजास्तवराज (श.१७१७) (सं. सू. ).

**अमृत जयानंद**—हा 'कर्मविपाक' ग्रंथाचा कर्ता होय. कर्मविपाक या नांवाचा ग्रंथ संस्कृतांत आहे. त्याचाच तर्जुमा आपण केला आहे, असें यानें स्वतःच लिहिलें आहे ( मं. अहवाल श. १८३४, पृ. ६२-६३ ).

**अमृत ( देवदास )**—पदें, अभंग वगैरे करणारा मराठी कवि ( सं. सू. ).

**अमृतदेवी**—आबूच्या परमारांपैकीं धुंधुकाची पत्नी.

**अमृतराय**—भक्तकथामृत ग्रंथांत हा औरंगाबादेचे विसामोरो ( मुत्सद्दी ) यांचा आश्रित होता, असें म्हटलें आहे. अमृतराय याचा जन्म शके १६२० व मृत्यु शके १६७५ ( स. १७५३ ) असें काव्यसंग्रहकार ओकांच्या आधारें आजगांवकर लिहितात.

मध्वमुनीश्वराकडून यानें उपदेश घेतला, अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. परंतु कुडची वीर म्हणतो कीं, यानें चैतन्यसांप्रदायांतील म्हणजे राघवचैतन्यापासून ५ वे पुरुष यशवंतराव याजपासून उपदेश घेतला होता. कुडची वीराचा अमृतराय हा आजे गुरु असल्यानें तें विश्वसनीय आहे ( म. क. च. भा. १ पा. ४७८ ).

ध्रुवचरित्रांत 'माता उमा परमशंकर तात झाला.' अशी अमृतराय स्वतःविषयीं माहिती देतो. मध्वमुनींच्या

उपदेशानें अमृतराय ईश्वरभक्तीकडे वळला, अशी आख्यायिका आहे. याचें मूळ नांव अंबाजी.

याच्या कवितांत 'श्रीगुरु मध्वनाथपर अमृतराय बलहारी' असेंहि आढळतें. शिवाय 'अमृत म्हणे तुम्ही भजा निरंतर श्रीधरगुरुचे पाय' असाहि उल्लेख आहे. अद्वैतानंद व ब्रह्मानंद हेहि गुरु आढळतात. या गुरुत्रयीवरून अनेक अमृतराय झाले असावेत, अशी आजगांवकर शंका काढतात. औरंगाबाद येथें याची समाधि आहे ( सं. सू. ).

याचे शिष्य पुष्कळ होते. पैकीं माधव व ब्रह्मगिरी हे कवी होते. अमृतरायाचीं काव्यें:—१ गणपतिवर्णन, २ जगदंबावर्णन, ३ ध्रुवचरित्र, ४ शुकचरित्र, ५ सुदामचरित्र, ६ नारदी, ७ कृष्णचरित्र, ८ द्रौपदीवस्त्रहरण, ९ रामचंद्रवर्णन, १० कृष्णवर्णन, ११ राधावर्णन, १२ कृष्णध्यान, १३ मृत्तिकाभक्षण, १४ वत्सलाहरण, १५ रासक्रीडा, १६ कुंजवनविहार, १७ कृष्णलीला, १८ चंद्रावळी, १९ दुर्वासयात्रा २० पारिजातकाख्यान, २१ जीवदशावर्णन, २२ उपदेश, २३ पूतनावध, इ०

यांशिवाय ३४ प्रकरणें व १५० पदें छापलीं आहेत. 'दामाजीची रसद' हें काव्य याचें नसून तें याचा शिष्य ब्रह्मगिरी याचें आहे.

अमृतरायाची वर्णनशैली फार अप्रतिम आहे. सुदामचरित्रांत कृष्णाच्या अप्रतिम ऐश्वर्याचें वर्णन, द्रौपदीवस्त्रहरणांत अनेक वस्त्रांचीं नांवें व तीं मिळणाऱ्या पेठांचींहि नांवें, भोजनांतील पदार्थ, रासक्रीडेंत रागरागिण्या वगैरे पाहिल्यास वरील वाक्याचें प्रत्यंतर येईल. याची कविता छंदोबद्ध असल्यानें ती वर्णनास फार साजेशी आहे. कीर्तनकार या कवितांचा फार उपयोग करतात.

**अमृतराव**—हा राघोबादादाचा दत्तक पुत्र. हा मुस्कुटे घराण्यांतून साडेतीन वर्षांचा असतांना दत्तक घेतला ( स. १७६८ मे महिना ). परंतु दत्तविधान झाल्यावर राघोबास दोन औरस पुत्र झाले ते दुसरा बाजीराव व चिमणाजीआप्पा. त्यामुळें अर्थातच अमृतरावाचा पेशवाईवरचा हक्क बुडाला.

अमृतराव बहुतेक राघोबाजवळच असे. परंतु पुढें आनंदीबाई, बाजीराव, चिमणाजी आप्पा यांना पेशव्यांच्या कैदेत राहावें लागलें, तेव्हां त्यांच्याबरोबर हाहि कैदेंत होता.

याची पहिली बायको मे स. १८०३ त बाळंत होऊन मेली. तिच्या मृत्यूपूर्वी ता. १८-३-१८०३ रोजीं यानें दुसरें लग्न केलें. याला पहिल्या बायकोपासून स. १७९२ मध्ये विनायकराव नांवाचा मुलगा झाला.

याचें लग्न टोकें मुक्कामीं मोठ्या थाटानें राघोबानें केलें. हा नाशकाजवळ आनंदवल्ली येथें राहत होता व पुढें हा शिवनेरीस नाना फडणिसांच्या प्रतिबंधांत होता.

सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर परशुरामभाऊ पटवर्धनांनीं बाजीरावास पुण्यास नेलें. परंतु याला मात्र शिवनेरीसच ठेवलें. पुढें शिंद्याच्या दिवाणांस ही हकीगत समजली तेव्हां त्यानें याला जांबगांवास प्रतिबंधांतच ठेवलें.

सन १७९६ त बाजीरावास जेव्हां छत्रपतीकडून पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं तेव्हां यालाहि मोठा उंची पोषाख ( रु. ११८२॥८ ) देण्यांत आला. बाजीरावानेंहि याच्या खर्चास बरेच महाल तोडून दिले. स. १७९७ सालीं नानास कैद करण्याच्या बाजीरावाच्या कटांत हाहि सामील होता. त्या सालच्या डिसेंबर महिन्यांत नानास कैद केल्यावर बाजीरावानें अमृतरावास आपला मुख्य कारभारी नेमलें व याच्या मदतीस विश्वासांतले दोन इसम दिले.

यानें राघोबाबरोबर इंग्रज सैन्याची शिस्त पाहिल्यामुळें तशी फौज तयार करण्यासाठीं यानें मि. वुइल्यम टोन नांवाचा एक युरोपियन सरदार नेमला. बाजीरावानें जर अमृतरावाशींच कायमचें सख्य ठेवून कारभार केला असता तरी त्याचें हित झालें असतें. परंतु त्यानें अमृतरावाशीं विरोध मांडला व दौलतरावाशीं सख्य केलें. पुण्यांतील लोकांकडून पैसे काढण्यास त्या वेळेस जे अत्याचार करण्यांत आले ते आपल्या भावांकडूनच करविण्यांत आले आहेत, याची कल्पनाहि अमृतरावास नव्हती. याला त्या कृत्याची फार चीड आली. इतकेंच काय, पण दौलतरावास कैद करण्याचाहि सल्ला बाजीरावानें अमृतरावास दिला. परंतु अमृतरावानें दौलतरावास तुम्हांस कैद करण्याचा बेत आहे असा स्पष्ट इषारा दिला. त्याच वर्षी घाटगे शिंद्याच्या बायका पकडण्याच्या खटपटींत असतां अमृतरावानें त्या बायांना आश्रय दिला व घाटग्याचा छापा उधळून लावला. अशा तऱ्हेनें बाजीराव आपल्या हस्तकांकरवीं अनन्वित कृत्यें करूं लागला, तेव्हां पुणें सोडून हा जुन्नर येथें राहिला.

पुढें होळकरानें आपल्या भावाच्या वधाचा सूड घेण्यासाठीं पुण्यावर चाल केली. तेव्हां बाजीराव पळून जाऊन सिंहगडास राहिला. पुणें लुटल्यावर यशवंतरावानें बाजीरावास पुण्यास आणण्याचा फार प्रयत्न केला. परंतु तो येईना. तेव्हां त्यानें अमृतरावास येण्याची विनंति केली. परंतु हा जरी आला तरी यानें गादीवर बसण्याचें नाकारलें व हा आपला दरबार तंबू ठोकून भांबुर्ड्यास भरवूं लागला. परंतु जेव्हां बाजीराव महाडास गेला तेव्हां

अमृतरावानें आपल्या मुलास गादीवर बसण्याची परवानगी दिली. परंतु दोनच महिन्यांनीं बाजीरावानें स. १८०२ त इंग्रजांशीं दोस्ती करून पेशवाई मिळविली. तेव्हां अमृतराव नाशकाकडे गेला व तिकडे यानें लुटालूट केली. यानें बाजीरावाशीं सख्य करण्याचा बराच प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला.

पुढें हा जनरल वेलस्लीशीं आपल्या पथकासह सामील झाला व त्याकरितां याला आठ लक्ष रुपयांचें वेतन करून देण्यांत आलें. यानें काशीक्षेत्र राहण्यास पसंत करून तेथें हा जाऊन राहिला. तेथें यानें पुष्कळ दानधर्म केला; घाट व देवालयें बांधलीं; अन्नसत्रें स्थापिलीं. अमृतराव पेशव्याच्या दानधर्माचा अद्यापि काशी येथें मोठा लौकिक आहे. याचा मृत्यु ६-९-१८२४ रोजीं झाला. याच्या पश्चात् याचा मुलगा विनायकराव हा त्याच्या जहागिरीचा व अपार संपत्तीचा मालक झाला ( इ. संग्रह पुस्तक ५ वें, अंक ४-६; भिऊबाई बारामतीकर पाहा ).

स. १८१४ त गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जनें अमृतरावाची भेट घेतली; त्याची मनोरंजक हकीकत त्यानें आपल्या खाजगी रोजनिशींत लिहून ठेविली आहे. ती अशी–

'ता. ३१-८-१८१४ रोजीं अमृतराव माझ्या भेटीस आले. ते हत्ती, घोड्यांच्या स्वारीनें प्रवेशद्वारापर्यंत येऊन तेथून पुढें पालखींतून बंगल्यांत आले. त्यांच्या अंगावर भलीमोठीं मौल्यवान् रत्नें होतीं. लॉर्ड वेलस्लीनें मराठ्यांचें राज्य लवकर नाहींसें करण्याकरितां अमृतरावास सात लाखांची नेमणूक देऊन भावापासून फोडलें. मी अमृतरावास एक नवीन कृतीची चांगली बंदूक व विनायकरावास दोन नळी पिस्तूल नजर केले, त्याबद्दल त्यास फार संतोष वाटला.'

ता. ५ सप्टेंबर १८१४ रोजीं हेस्टिंग्जनें अमृतरावाचे वाड्यावर जाऊन यास भेट दिली. गाडीजवळ सामोरे येऊन, बागेंतच उघड्या मंडपांत बैठकीवर अमृतरावानें पाहुण्यांस नेलें. पुढील बाजूस फवाऱ्यांचीं सुंदर कारंजीं चालूं असल्यामुळें मंडपाची हवा त्यास आल्हाददायक वाटली. लेडी हेस्टिंग्जनें अमृतरावच्या पत्नीची भेट आंतल्या बाजूस घेतली. अमृतरावाची एक नात सात वर्षांची असून मोठी चलाख व सुस्वरूप होती. ती धीटपणानें पुरुषांत येऊन साहेबांस भेटली, त्याबद्दल तिचें त्यास मोठें कौतुक वाटलें. हेस्टिंग्जनें रत्नाच्या ताटावरील सरपोस तेवढा घेऊन त्यानें अमृतरावाचे आभार मानले, आणि हा सरपोस तुमची आठवण माझे मनांत सदैव कायम ठेवील, असें कळविलें. उठण्यापूर्वी गुलाबपाण्याचा मृदुतुषार एकदम मंडपाचे छतांतून सर्वांचे अंगावर सुरू झाल्यामुळें मंडळास संतोष वाटला ( म. रि. उत्तर वि. ३ पृ. ५३२, ६३ ). याचा वंश सध्यां उत्तरहिंदुस्थानांत रायबरेली येथें नांदत आहे.

**२.** ( जत ) जत संस्थानांतील यशवंतरावाचा पुत्र. हा आपल्या बापानंतर जतच्या गादीवर आला.

याला पेशव्यांनीं देशमुखी वेतन व जहागीर कायम केल्याची सनद दिली होती. हा स. १७९० त वारल्यावर याचा मुलगा कान्होजीराव गादीवर बसला.

**अमृतराव शंकर**—हा बळवंतराव मेहेंदळे याचा कारभारी होता. त्याच्या स. १७५७-५८ त झालेल्या कर्नाटकांतील उद्योगांत हा विशेष प्रसिद्धीस आला होता. हा पेशव्यांचे विश्वासांतील इसम असून, अर्काटचे नबाबाकडून खंडणी वसूल करण्याचे बाबतींत याचा संबंध मद्रासकर इंग्रजांशीं आला. जॉन स्पेन्सर ( फॉरेस्ट ) लिहितो, अमृतराव हा पूर्वी पेशव्याचा चिटणीस असून अलीकडे तें काम आपला भाचा गोविंद शिवराम यांजकडे सोंपवून तो आतां ( स. १७९१ ? ) नाना व सदोबा यांचा कारभारी होऊन मुख्य सरदाराची पदवी पावला आहे. दरबारांत याचें वजन फार आहे. मुरारराबाकडील व कर्नाटकांतील सर्व काम याच्या हातीं आहे. कारण त्या बाजूची सर्व माहिती यास चांगली आहे ( म. रि. म. वि. २; पृ. ४१५-२४ ).

**अमृतानंद** ( माधवसरस्वती )—यानें आपली परंपरा देतांना पहिलें नांव श्रीआदिनाथ विष्णूचें दिलें आहे व गुरूचें नांव अंबिका असें दिलें आहे. कटावकार अमृतरायाचे गुरु अंबिकासरस्वती होते, अशी समजूत अमृत या नामसाद्दश्यामुळें झालेली दिसते. याचे ग्रंथ स्वरूपनिर्णय, योगराजतिलक ( ले. श. १६३०, सं. सू. ).

**अमृतेश्वर**—एक मराठी ग्रंथकार. गुरु, श्रीसमर्थ. ग्रंथ–आत्मबोध, तत्त्वबत्तिशी, गणेशगीता, उपासनाप्रकरण, तत्त्वझाडा ( सं. सू. ).

**अमेरदास**—नानकाचा अंगडशाह नांवाचा एक शिष्य होता. त्याचाच अमेरदास हा शिष्य होय. अंगडशाहाच्या मागून गादीचा हक्क याजकडेच आला.

**अमोघवर्ष**—( स. ८१४-८७८ ) राष्ट्रकूट वंशांतील तिसऱ्या गोविन्दराजाचा पुत्र. यास अगदीं सहा वर्षांचा असतांनाच राज्य मिळालें. त्यामुळें राज्यकारभार अर्थात् प्रतिनिधिमंडळ नेमून त्यामार्फत चालत होता. या प्रतिनिधिमंडळाचा मुख्य कर्क सुवर्णवर्ष–याचा चुलतभाऊ–हा होता.

प्रारंभीं बराच कालपर्यंत अमोघवर्षाची कारकीर्द शांततेची झाली. परंतु लवकरच आगामी संकटांचीं चिन्हें दिसूं

लागलीं. आतांपर्यंतच्या एकंदर काळांत जणूं काय राष्ट्रकूट घराण्यांत वहिवाटच पडून गेली होती कीं, कोणताहि नवीन राजा सिंहासनावर येई तो आपसांत लढाई अगर रक्तपात वगैरे केल्याशिवाय येतच नसे. अमोघवर्षच काय तो या नियमास अपवाद होता. परंतु बालराजा सिंहासनावर आला हें पाहतांच घराण्यांतील इतर महत्त्वाकांक्षी पुरुषांना राजपदाची अभिलाषा उत्पन्न झाली. इतकेंच नव्हे, तर प्रधानमंडळांतहि दुहीचीं चिन्हें दिसूं लागलीं. अमोघवर्षाच्या पित्यानें गंगराजावर स्वारी करून त्यास आपला अंकित करून टाकलें होतें. पण गोविंदराजाच्या मृत्यूनंतर हाच गंगराजा शिरजोर होऊन सार्वभौम सत्तेचें जूं झुगारून देण्याचा विचार करूं लागला. इतर मांडलिकांनींहि त्याचेंच अनुकरण आरंभिलें. सगळीकडे बेबंदशाही माजली; व शेवटीं अमोघवर्षावर राज्यसंन्यासाची पाळी आली.

ही स्थिति सरासरी तीन चार वर्षें टिकली असावी. पण लवकरच प्रतिनिधिमंडळाचा मुख्य कर्क यानें सर्व परिस्थिति कह्यांत आणली व अमोघवर्षास पुनः राजपद प्राप्त झालें. या वेळीं याचें वय सुमारें १२।१३ वर्षांचें असावें. अर्थात् यास पुनः राज्य मिळालें, त्याचें सर्व श्रेय कर्क व इतर मुत्सद्दी यांजकडेच आहे.

यानंतर यानें लवकरच वेंगी येथील चालुक्यावर स्वारी केली व विजयादित्याचा पूर्ण पाडाव करून तें राज्य यानें आपल्या राज्यास जोडलें. चालुक्यानंतर याची दृष्टि अंग, वंग व कलिंग या देशांकडे वळली; व तेथील राजांनाहि यानें आपलें मांडलिकत्व कबूल करावयास लावलें.

दक्षिणेकडे मात्र याचें धोरण चढाईचें नव्हतें. यानें दक्षिणेकडे ज्या थोड्या स्वाऱ्या केल्या त्यांचा उद्देश नवीन मुलूख जिंकणें हा नसून केवळ आत्मरक्षण हाच होता. इतकेंच नव्हे, तर गंगवाडीच्या राजानें याची सार्वभौम सत्ता झुगारून देऊन स्वातंत्र्य पुकारलें तरी त्याचें पारिपत्य यानें केलें नाहीं. त्याचप्रमाणें गंगराजाशीं सख्यत्व कायम ठेवण्याचे याचे प्रयत्न सारखे चालूच होते. आपली मुलगी चन्द्रोबेलब्बा ही गंगराज भूतुग यास देऊन यानें या दोन घराण्यांतील सख्य दृढ करण्याचा प्रयत्न केला.

याच वेळीं अमोघवर्षावर पदच्युत होण्याचा दुसरा प्रसंग आला. इतका वेळपर्यंत गुजराथच्या राष्ट्रकूटांशीं याचें सख्य होतें. पण पुढें या दोन्ही घराण्यांत वितुष्ट येऊन लढाईचा प्रसंग आला; व अमोघवर्षास पुनः एकदां राज्यास मुकावें लागलें. पण लवकरच यानें आपल्या बंकेय नांवाच्या शूर सेनापतीच्या साहाय्यानें राज्यपद परत मिळविलें; व दोन्ही घराण्यांचा समेट झाला. या समेटास एक तात्कालिक कारणहि घडलें. दोन्ही घराण्यांत यादवी माजली आहे हें पाहून पहिला भोज यानें राष्ट्रकूटांचा पाडाव करावयाचें ठरविलें. आपल्या भांडणामुळें अशा तऱ्हेनें परकाच शिरजोर होणार हें पाहून दोन्ही राष्ट्रकूट घराण्यांनीं अपापसांत समेट केला व भोजाचा पाडाव केला.

याप्रमाणें आपली सर्व कारकीर्द धामधुमींमध्यें घालवून अमोघवर्ष स. ८८० च्या सुमारास मरण पावला. यानें सरासरी ६४ वर्षें राज्याचा उपभोग घेतला. यास कृष्ण या नांवाचा एक पुत्र व चन्द्रोबेलब्बा ही कन्या एवढींच दोन अपत्यें होतीं. याच्या मागून कृष्ण हा गादीवर आला.

अमोघवर्षाची कारकीर्द बरीच मोठी ६४ वर्षांची झाली. परंतु लष्करी दृष्टीनें पाहतां ती तितकीशी उज्ज्वल नव्हती. वेंगीच्या चालुक्याचा पराजय हें एकच काय तें नांव घेण्यासारखें असें शौर्याचें कृत्य याच्या हातून झालें. पण एकंदरींत पाहतां याच्या ठिकाणीं याच्या बापाची अगर आजाची तडफ व युद्धलालसा दिसून येत नाहीं. युद्धापेक्षां शांतता व वाङ्मयाचें परिशीलन, हेंच याला जास्त आवडे. धर्माकडे याचा ओढा विशेष होता. यानें अनेक पंडितांना आपल्या पदरीं ठेवलें होतें. नृपतुंगाचा कविराजमार्ग हा कानडीतील छंदःशास्त्रावरील ग्रंथ याच्याच कारकीर्दीत झाला.

यानें मुख्यतः जैन धर्माचा पुरस्कार केला. आदिपुराणाचा कर्ता जिनसेन हा आपणास याचा गुरु म्हणवितो. त्याचप्रमाणें गणितसारसंग्रह या महावीराचार्यानें लिहिलेल्या गणितविषयक ग्रंथांत याचा उल्लेख स्याद्वाचा पुरस्कर्ता असा केला आहे. जरी याप्रमाणें जैन धर्माकडे याचा कल विशेष होता तरी हा हिंदुधर्माचा द्वेष्टा मुळींच नव्हता. इतकेंच नव्हे तर महालक्ष्मीचा हा निःसीम भक्त होता. एका प्रसंगीं विपत्तिनिवारणार्थ यानें आपलें बोटहि महालक्ष्मीस समर्पण केल्याचा उल्लेख आहे.

याला आपल्या कारकीर्दीत अनेक संकटें भोगावीं लागलीं. सिंहासन सोडून पळून जाण्याचा प्रसंग याच्यावर एकंदर तीन वेळा आला. शेवटच्या प्रसंगीं तर प्रत्यक्ष याचा मुलगा कृष्ण हा याच्या विरुद्ध बंडांत सामील होता. त्यामुळें सांसारिक गोष्टींसंबंधीं याचें मन उदासीन होऊं लागलें व धर्मावर याची विशेष श्रद्धा बसली. शेवटीं शेवटीं तर यानें राज्यपद नांवालाच आपल्याकडे ठेवलें होतें. वास्तविक राज्यकारभार युवराज कृष्ण हाच पाहत असे (राष्ट्रकूट, पान ७१-८९).

राज्यत्यागानंतर यानें प्रश्नोत्तरमालिका नांवाचा ग्रंथ लिहिला, असें दिगंबरपंथी जैन म्हणतात.

याला शर्व असें नांव होतें. हा बापाच्या पश्चात् गादीवर आला. नवसारीच्या शिलालेखांत याला वल्लभ असें म्हटलें आहे व राजांचा राजा असें उल्लेखिलें आहे. यानें चालुक्यांचें राज्य जाळलें. याच्या कारकीर्दीत मान्यखेट ( मालखेड, निजामस्टेट ) हें शहर अतिशय भरभराटीस असून तीं याची राजधानी होती. कान्हेरी शिलालेखावरून कोंकण प्रांत याचे अमलाखालीं होता, असें दिसतें. हा जैनधर्माचा भोक्ता होता, असें गुणभद्राच्या उत्तर-पुराणावरुन दिसतें. याचा देवळी येथील शिलालेखांत नृपतुंग असा उल्लेख आढळतो व यानें मान्यखेट म्हणजे मालखेड शहर स्थापिलें, असें म्हटलें आहे.

याला महाराजषंड व अतिशयधवल अशींहि नांवें होतीं. शिवाय याच्या अनेक पदव्या होत्या. याला लत्तालूर-पुरपरमेश्वर अशा अनेक शब्दांनीं गौरविलें आहे. लत्तलूर म्हणजे लातूर होय. लातूर हें उस्मानाबाद जिल्ह्यांतील लातूर तालुक्याचें मुख्य ठिकाण होय. सूडीच्या लेखावरून पश्चिम गंगराजांनीं दिलेल्या दान-पत्रावरून याला अब्ब लब्बे नांवाची मुलगी होती, असें ध्वनित होतें.

शिरूरच्या लेखांत असें म्हटलें आहे कीं, अंग, वंग, मगध, मालव व वेंगी येथील राजे याच्या सेवेला होते. परंतु ही अतिप्रशंसाच दिसते. तरी पण याच्या वेळेस सारखीं युद्धें मात्र चाललीं होतीं.

अमोघवर्षाच्या वेळची बरीच माहिती देणारे शिलालेख, ताम्रपट वगैरे उपलब्ध आहेत. अतिशय म्हातारपणामुळें यानें राज्यत्याग केला व आपला मुलगा दुसरा कृष्ण यास गादी दिली.

**२.** मालखेडच्या राष्ट्रकूट वंशांतील तिसऱ्या इन्द्राचा पुत्र. फ्लीटच्या मतें याला राज्यपद प्राप्त झालें नव्हतें. पण देवळी व कऱ्हाड येथील शिलालेखांवरून यानें राज्य केलें असावें, हें स्पष्ट दिसतें. याच्या मागून राज्यावर आलेल्या गोविन्दराजाचें सांगली येथील कोरविलेल्या शिलालेखांत नांव आढळत नाहीं. पण याचें कारण त्या दोघांमधील वैर हेंच असावें.

अमोघवर्षास राज्यपद फार कालपर्यंत लाभलें नाहीं. राज्यावर आल्यापासून एका वर्षाच्या आंतच हा मरण पावला. याच्या मागून त्याचा धाकटा भाऊ गोविन्दराज चवथा हा गादीवर आला ( राष्ट्रकूट, पान १०५-१०६ ). यानें चेर राजाचा पराभव केला होता ( इंडि. अंटि. व्हा. १६ पा. ३३२; भांडारकर पा. २८२, २८८, २९६, ३०९ ).

**३.** हा जगत्तुंगाचा पुत्र. हा चवथ्या गोविंदानंतर गादीवर बसला. याला वद्दिग असें म्हणत.

**४.** राष्ट्रकूट घराण्यांतील निरुपमाचा पुत्र. याला कक्कल, कारक इत्यादि नांवें होतीं ( भांडार. पा. १०८-११९ ).

**अयसिअ कुमुसअ**—हा मथुरेच्या पहिल्या राजुल क्षत्रपाचा सासरा. याच्या मुलीचें नांव नदसी अकसा ( नदसी अकसा पाहा ).

**अयाम**—हा नहपान क्षत्रपाचा मुख्य प्रधान. हा ब्राह्मण असून याचें गोत्र वत्स होतें. याचा उल्लेख जुन्नर येथील शिलालेखांत सांपडतो. त्या ठिकाणीं नहपानाच्या आज्ञेनें यानें एक दिवाणखाना व पाणी पिण्याकरितां टाकें बांधलें ( जुन्नरशिलालेख नं. २५ ).

**अयीन उद्दीन** ( शेख )—हा एक विजापूरचा रहिवाशी होता. यानें मुल्हिकत आणि किताब-उल-अन्-वर हे ग्रंथ रचिले. याच्या ग्रंथांत मुसलमानी सर्व साधूंचीं चरित्रें आलीं आहेत. हा सुलतान अलाउद्दीन हसन बहामनी याच्या कारकीर्दीत उदयास आला.

**अयीन-उल्-मुल्क** ( ख्वाजा )—हा दिल्लीचा सुलतान मुहंमदशाह तुघलख आणि फीरूझशहा बारबक यांच्या पदरचा एक प्रख्यात सरदार होता. यानें बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं तरसील-अयीन-उल्-मुल्क हा एक होय. सुलतान अलाउद्दीन शिकंदर सानी ( १२९६-१३१६ ) यानें संपादिलेल्या विजयाचा इतिहास ज्यांत आहे, तो फतहनामा ग्रंथ यानेंच लिहिला असावा.

**अय्यण**—पश्चिम चालुक्यांपैकीं तिसऱ्या विक्रमादित्यानंतरचा राजा.

फ्लीटच्या मतें हा दुसऱ्या भीमाचा मुलगा होय. यानें राष्ट्रकूट राजा दुसऱ्या कृष्णाच्या मुलीशीं लग्न लाविलें. याला विक्रमादित्य चवथा या नांवाचा एक मुलगा होता. याचा काल स. ८७७-९१३ असा आहे.

**२.** हा कल्याणीच्या पश्चिम चालुक्य घराण्यांतील यशोवर्मन् अथवा दशवर्मन् याचा मुलगा होय. याच्या आईचें नांव भाग्यवती असें होतें. याचा काल स. १०१४-१५ च्या सुमारास आहे.

**३.** मालखेडच्या राष्ट्रकूटांपैकीं दुसऱ्या कृष्णाचा मुलगा. पश्चिम चालुक्याच्या घराण्यांत दिलेली कृष्णनन्दना ही याची मुलगी.

**अय्यल राजु रामभद्र**—हा नियोगी ब्राह्मण कडाप्पा प्रांतांतील वोंटिमिट्टा येथील राहणारा होय. हें गांव

प्रसिद्ध आहे. कारण तेलगू भागवताचा कर्ता बम्मन पोतराज याची ही जन्मभूमि होय.

हा वैष्णव होता. यानें लहानपणीं वीरराघवस्वामी नामक देवावर रघुवीरशतक नामक शतक रचिलें. याला विजयनगरच्या कृष्णरायानें सकलकथासारसंग्रह ग्रंथाचें तेलगू कवितावद्ध भाषांतर करण्यास सांगितलें. परंतु तें पूर्ण होण्यापूर्वीच कृष्णराय मरण पावला. त्याचा उल्लेख यानें काव्याच्या प्रस्तावनेंत केला आहे. श्रीराम, पुरूरवा वगैरेची माहिती त्यानें वरील ग्रंथांत दिली आहे. हें काव्य यानें स. १५३० मध्यें लिहिण्यास सुरवात केली असावी, असें वाटतें. याला सुमारें १२ अपत्यें होतीं. हा फार गरीब होता ( तेलगूवाङ्मय पा. ३२ ).

**अय्या दीक्षित**—हा अप्पय दीक्षितांचा पुतण्या होय. यास सर्व शास्त्रांतील थोडें थोडें ज्ञान होतें. आपल्या बुद्धिचातुर्यानें हा मदुरेच्या राजाचा (तिरुपति मल्लनायकचा) प्रधान झाला.

यानें 'नीलकंठविजय' नांवाचा एक चंपु रचिला आहे व त्यांत नाना देशांचें वर्णन संवादरूपानें लिहिलें आहे.

**अय्याशास्त्री**—रामशास्त्री प्रभुणे यांच्यामागून हा पुण्याचा न्यायाधीश झाला. हा सवाईमाधवरावाच्या कारकीर्दीत फार प्रसिद्धीस आला. ग्रामण्याचा निवाडा करण्याचें काम याच्याकडे पुष्कळ वेळां सोंपविण्यांत आलें होतें.

हा द्रविड ब्राह्मण होता. श्रावणमासीं दक्षिणा देण्यासाठीं रमण्याच्या एका दरवाजावर हा बसत असे. हा मान फक्त कांहीं थोड्या थोर व्यक्तींनाच मिळत असे.

**अरिकुलकेसरी**–हा चोल घराण्यांतील पहिल्या परान्तकाचा पुत्र. हा बापाच्या व भाऊ अरिंजय याच्या कारकीर्दीत सेनापति असे.

**अरिकेसरी**—हा चालुक्य घराण्यापैकीं धारवाड प्रांतांतील जोल येथें राज्य करणाऱ्या घराण्यांतील युद्धमल्लाचा पुत्र. असा उल्लेख पंपानें लिहिलेल्या कानडी भारतांत आहे. याचा काल शके ८६३ असावा. त्यांत त्याचा वंशावळ आढळते.

युद्धमल्ल–अरिकेसरीन्–नरसिंह–दुग्धमल्ल–बडीग–युद्धमल्ल–नरसिंह–अरिकेसरीन् (Bhand. A. 110).

२. हा ठाण्याच्या शिलाहारांपैकीं वज्जडानंतर गादीवर आला. वज्जड हा याचा थोरला भाऊ होता. याचा एक ताम्रलेख सांपडला आहे ( ठाणा ताम्रपट ). हा ताम्रलेख स. १०१७ मधला आहे. याच्या वेळीं भोज परमारानें याचा पराभव केला असें त्याच्या एका स. १०२० मधल्या दानलेखावरून दिसतें ( एपि.इंडि. ११ पा.८१ ). याचा उत्तराधिकारी वज्जडाचा पुत्र छित्तराज याचा एक लेख स. १०२८ मधील सांपडला आहे ( भांडुपलेख, एपि. इंडि. ५ पा. २७७ ), त्यावरून हा स. १०१५-१०२५-पर्यंत राज्य करीत असावा असें दिसतें ( हिं. भा. अ. पा. ३६४ ).

३. यालाच लोक केशिदेव म्हणतात. नवसाहसांकचरितांत वर्णिलेला शशिखंडाचा पिता शिखण्डकेतु व हा एकच असावा.

**अरिमर्दन**—हा पांड्याच्या एका शाखेंतील राजा. याचा उल्लेख कुलशेनंतर आला आहे. याचा प्रधान माणिक्य हा फार विद्वान् आणि शैवपंथी होता. याच्या वेळीं जैनांच्या छळास सुरवात झाली.

**अरियारुक**—पंजाबचा एक तुर्की अधिकारी.स.१०३० चे सुमारास महमूद गझनवीनें अरियारुक यास पंजाब प्रांताच्या राज्यकारभारावर नेमिलें होतें. महमूदचा मुलगा मसूद गादीवर आल्यावर दरबारांत अरियारुक जुलमी व पैसेखाऊ आहे, असा बोभाटा झाल्यामुळें मसूदनें यास गझनींस येण्याचा हुकूम पाठविला. पंजाबांत याची सत्ता इतकी दृढमूल झाली होती कीं, अरियारुक मसूदचा हुकूम पाळील अशी कल्पना नव्हती. तरीहि हा बरोबर मोठें हिंदी सैन्य घेऊन बाल्खला गेला व दरबाऱ्यांशीं संधानें बांधून राज्यकारभाराची होणारी चौकशी यानें तहकूब करून घेण्याचा प्रयत्न केला. याच्या वाईटावर असणाऱ्या कांहीं दरबाऱ्यांनीं हा दारू पिऊन झिंगला असतां यास बोलावून मसूदला चौकशी करण्यास उद्युक्त केलें. बेभान असतांहि कांकूं करीत हा हजर झाला. तेव्हां यास विचारलेल्या प्रश्नांचीं उडवाउडवीचीं उत्तरें दिल्यामुळें मसूदनें कैद करण्याचा हुकूम केला. यास कैद झाल्याचें वर्तमान कळलें, तेव्हां हिंदी सैन्य बिथरलें व त्यांनीं अरियारुकला सोडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां त्यास धमकी देऊन व सुभेदार बदलला तरी त्याचें नुकसान होणार नाहीं, असें आश्वासन देऊन गप्प करण्यांत आलें. अरियारुकचा खजिना व कागदपत्र जप्त करण्यांत आलें. कागदपत्रांत हिशेबाच्या वह्या होत्या, त्यांवरून याच्या गुन्ह्याची शाबिती झाली. तेव्हां यास घोरला रवाना करून याचा वध करण्यांत आला.

**अरिष्टनेमि**—जैनांचा बाविसावा तीर्थंकर ( तीर्थंकर पाहा ).

**अरिसिंह**—हा सीसोदे येथील राणा शाखेपैकीं लक्ष्मसिंहाचा ज्येष्ठ पुत्र. हा चितोडच्या लढाईत अला उद्दीन खिलजीच्या लोकांकडून मारला गेला.

हा एकदां शिकारीस गेला असतां एक डुकर जखमी होऊन एका शेतांत शिरलें. हा शेतांत शिरूं लागला तेव्हां शेताची राखण करणाऱ्या एका मुलीनें याला सांगितलें कीं, शेतांत शिरून पिकाचा नास व्हायला नको. मीच डुकर बाहेर पिटाळतें. असें म्हणून तिनें हातांत काठी घेऊन शेतांतून डुकर बाहेर काढला. तेव्हां तिच्या धैर्याबद्दल याला आश्चर्य वाटलें. पुढें हा झाडाखालीं विश्रांति घेत बसला असतां तिच्या गोफणीच्या दगडानें याच्या मित्राच्या घोड्याचा पाय तुटला. पुढें ती दुधाची घागर व दोन म्हशींचीं पारडें घेऊन जातांना यानें पाहिलीं. तेव्हां याला तिच्या शक्तीचें कौतुक वाटलें. तिची जात विचारतां ती चंदाणे रजपूत आहे, असें कळलें. तेव्हां सहजच तिचा जो पुत्र होईल तो किती बलवान् होईल, याबद्दल याच्या मनांत विचार आला व याच्या मनांत तिच्याशीं लग्न करावें, असें आलें. तिच्या बापाची संमति खुषीनें मिळाली. लग्न केलें, पण पित्याच्या भीतीनें त्याला कळविलें नाहीं. शिकारीच्या मिषानें ऊनवां गांवीं हा तिच्यासह राहीं. तेथें तिला हंमीर नांवाचा मुलगा झाला ( १ हंमीर पाहा ).

**२.** लावण्यसिंह अगर लवणसिंह याचा हा मुलगा. याचा आश्रयदाता जैनमंत्री वस्तुपाल हा होता. त्याच्या सन्मानार्थ यानें सुकृत-संकीर्तन नांवाचा ग्रंथ लिहिला. हा वस्तुपाल, धोलक्याचा राणा वीरधवल आणि त्याचा मुलगा वीसलदेव या तिघांचाहि प्रधान होता. बालभारत, काव्यकल्पलता व पद्मानंद इ. ग्रंथांचा हा कर्ता होय. अमरपंडित हा अरिसिंहाचा समकालीन होता आणि अमरचंद्राचाहि हा सहाध्यायी होता. यानें अमरचंद्राला पुस्तकें लिहिण्याच्या कामीं मदत केली, असें दिसतें. अरिसिंहानें कवितारहस्य नांवाचें अलंकारशास्त्रावरील छोटें पुस्तक लिहिलें.

**३.** ( स. ११२७ ) हा विजयसिंहानंतर मेवाडच्या गादीवर आला. याच्यानंतर चोडसिंह आला.

**४.** उदेपूरचा राणा महाराणा राजसिंह हा निपुत्रिक मरण पावल्यामुळें त्याच्या कारभारी मंडळांत गादी कोणास द्यावी याबद्दल बराच वादविवाद होऊन, अखेर दुसऱ्या जगतसिंहाचा मुलगा अरिसिंह यास गादी देण्याचें ठरवून, याला तारीख ३ एप्रिल स. १७६१ त राज्याभिषेक झाला.

ह्याच्याविरुद्ध असलेल्या सरदारांनीं याला राज्यच्युत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण कांहीं फायदा झाला नाहीं. याला लालसिंहानें अतिशय त्रास दिला. याचा एक सरदार नाथसिंह यास लालसिंहानें ठार मारलें. यानें आपला एक हितचिंतक सालुंबरचा रावत जोधसिंह यास विष देऊन ठार केलें. ह्याच्या राज्यांत एकी नसल्यामुळें याचें अत्यंत नुकसान झालें.

बाजीरावानें बसविलेली खंडणी घेण्याच्या उद्देशानें होळकरानें उदेपूरवर स्वारी करून ५१ लक्ष रुपये नेले. याच वर्षी राज्यांत मोठा दुष्काळ पडून धारण रुपयास पाऊण शेर झाली ( स. १७६३ ).

पुढें लवकरच चार वर्षांनीं भाऊबंदी कलह माजून राज्यांत आपसांत लढाया सुरू झाल्या. याचें मूळ कारण कांहीं समजत नाहीं. परंतु याच्या उद्दाम वर्तनानेंच अशी स्थिति निर्माण झाली व दोनतीन ठाकूर सरदार खेरीज करून बाकीच्या सर्वांनीं याचा पुत्र रत्नसिंहास राणा करून यास पदच्युत करण्याचा विचार केला. त्यांनीं १। कोट रुपये बक्षीस लावलें व शिंद्यांची मदत मागितली.

राण्यानेंहि प्रतिपक्ष्याच्या कडेकोट तयारीस न जुमानतां शत्रूच्या छावणीवर हल्ला करून त्यांची दाणादाण केली व उज्जनीच्या दरवाजापर्यंत लोकांस पिटाळून लावलें. परंतु शत्रूकडील पक्षानें पुनः राण्याच्या लूट मिळविणाऱ्या सैन्यावर हल्ला केला व त्यांना उदेपूरला जाणें भाग पाडलें. पुढें शत्रुपक्षानें महादजीच्या मदतीनें उदेपुरास वेढा दिला. यानें अमरचंद नांवाच्या हुशार माणसाच्या साहाय्यानें वेढा सहा महिनेपर्यंत लांबविला. शेवटीं ६३॥ लाख रुपये घेऊन महादजी शिंद्याला हा वेढा कसातरी उठविणें भाग पडलें. पैकीं कांहीं रक्कम रोख मिळाली व कांहींचे बद्दल मुलूख तारण मिळाला. तो तसाच शिंद्यांनीं पुढें बळकावला. शिंद्यानें अशा तऱ्हेनें तोतयाचा पक्ष सोडतांच सर्व ठाकूर पुनः राण्यास येऊन मिळाले व तोतयाच्या खुळाचा समूळ नायनाट झाला ( स. १७६९ जुलै २१ ).

ह्याच्या वेळच्या सांपडलेल्या शिलालेखावरून याची तत्कालीन माहिती मिळते. याची राजनीति चांगली नव्हती. ज्याच्यावर विश्वास ठेवावयास पाहिजे त्यावर हा विश्वास ठेवीत नसे व भलत्यावरच विश्वास ठेवित असे. याचे स्वामिभक्त असे थोडेच सरदार होते. हा एककल्ली असल्यामुळें प्रजा असंतुष्ट बनली.

याच्या राज्यांत जास्त गोंधळ जर कशामुळें माजला असेल तर लालसिंह आणि अजितसिंह ह्या दोन पुरुषांमुळेंच होय. अजितसिंहाच्या गांवावर राण्यानें स्वारी करून त्याला त्या गांवांतून जाण्यास सांगितलें पण अजितसिंह गेला नाहीं. त्याचा विरोध शेवटपर्यंत वाढतच गेला.

महाराणा अरिसिंह हा फार शूर, अभिमानी पण कठोर हृदयाचा होता. अदूरदर्शी असल्यामुळें याला राज्य चालवितां आलें नाहीं. यानें आपल्या सरदारांना कठोर भाषण बोलून नाराज केलें. कांहीं स्वामिभक्त सरदारांचा नाश केला; यामुळें घरांत जास्त कलह झाल्यानें याच्या शत्रूस जास्त फावलें.

हा स्वतः कवि असून यानें रसिकचमन नामक हिंदी ( उर्दू मिश्रित ) काव्य केलें ( देवीप्रसादकृत राजरसनामृत पृ. १८ ). यानें कांहीं कविहि आपल्या आश्रयाला ठेवले होते.

हा शिकारीचा शोकी असल्यामुळें यानें राज्यकारभाराकडे जवळ जवळ निम्में लक्ष तिकडेच दिलें. शेवटीं बुंदीच्या अजितसिंहानें यास शरण आल्यासारखें करून सांगितलें कीं, मी तुम्हांला एका डुकराची शिकार दाखवितों; त्यावर हा फसला व यास बरेंच लांब नेल्यावर त्यानें याच्या छातींत बर्ची खुपसून याला ठार मारिलें ( ता. ६ मार्च स. १७७३ ).

याला आठ राण्या होत्या. त्यांच्यापासून याला दोन मुलगे हंमीरसिंह व भीमसिंह आणि दोन मुली चंद्रकुंवर व अनूपकुंवर ह्या झाल्या ( राजपुतानेका इतिहास पा. ९५६-९७६ ).

**अरिंजय**—( स. ९६५ सुमार ) हा चोल घराण्यांतील पहिल्या परान्तकाचा पुत्र. याला अर्जुन मधुरकोड राजकेसरी म्हणत. याचा पुत्र दुसरा परान्तक किंवा सुंदर परकेसरी होय.

गंडरादित्याचा मुलगा अल्पवयी असल्यानें हा थोडे दिवस गादीवर होता. याची लढण्याबद्दल ख्याति होती. याची पत्नी कोदुंबालुर राजकन्या होती. याच्या राज्यांत राज्यांनीं बंड केलें होतें.

**अरुण गिरिनाथ डिण्डिम**—हा संस्कृत कवि होता. याची सार्वभौम कवि म्हणून प्रसिद्धी होती. यानें सेवंतीयोगानंद नांवाचें प्रहसन लिहिलें.

**अरुणदत्त**—वाग्भटाचा टीकाकार. हा सनाच्या बाराव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत झाला.

**अरुणाश्व**—( १ अर्जुन पाहा ).

**अर्कलीखान जलालउद्दीन फीरूझ खल्जी**—या मलिक जलालुद्दीन फीरूझ खल्जीनें आपल्या घराण्यास राजवंशाचें महनीय स्थान प्राप्त करून दिलें, त्या प्रमाणें विनयशील व शांत स्वभावाच्या थोर राजपुरुषाचा अर्कलीखान हा मुलगा. बापाच्या मागें हाच दिल्लीच्या सुलतानी साम्राज्याचा सुलतान व्हावयाचा. सन १२९२ मध्यें सुलतान फीरूझनें आपल्या मागें अर्कलीखानासच सुलतानपदाचा मान मिळावा अशी आपली इच्छा असल्याचें जाहीर केलें होतें. स्वतः अर्कलीखान कर्तबगार व यशस्वी सेनानी होता. झझ्झूखान, हातिमखान वगैरे असंतुष्ट तुर्की सरदारांनीं सन १२९१ मध्यें राज्यक्रांतीचे हेतूनें बंड केलें होतें, तें अर्कलीखानानेंच बंडखोरांचा पराभव करून मोडिलें. सन १२९२ मध्यें एक लाख मोंगल लोकांनीं पंजाबावर स्वारी केली. तेव्हां या प्रचंड टोळधाडीचा पुरा मोड करण्याचे कामींहि अर्कलीखानाचे पराक्रमाचा विशेष उपयोग झाला होता. तरीहि सुलतान होण्याचें याचे नशीबीं नव्हतें. अर्कलीखानास दोन चुलत भाऊ होते त्यांपैकीं अला उद्दीन खल्जी हा पराक्रमी व कर्तबगार पण विश्वासघातकी होता. अर्कलीखानाचे वडील जलालुद्दीन फीरूझशाहाचें अला उद्दीनावर पुत्रवत् प्रेम असल्यामुळें अधिकाराचे जागेवर त्याची नेमणूक करून त्याचे महत्त्वाकांक्षेस योग्य अशी संधि देण्यांत आली. त्या संधीचा उपयोग विश्वासघातानें चुलत्याचा खून करून त्या सुलतानपदाचा अपहार करण्याकडे त्यानें केला. त्यामुळें अर्कलीखानास सुलतानपद मिळालें नाहीं ( अला उद्दीन पाहा ). जलालुद्दीनाचा माणिकपूरजवळ स. १२९६मध्यें खून झाला. तेव्हां अर्कलीखान मुलतानला होता. बहुतेक सुभेदार व सरदार अर्कलीखानाचे पक्षास अनुकूल होते. त्यामुळें अला उद्दीनास एकदम दिल्लीस जाऊन तख्त हस्तगत करणें शक्य नव्हतें. त्यामुळें दिल्लीवर स्वारी करावी कां बंगालमध्यें जाऊन योग्य संधीची वाट पाहावी, असा त्यास विचार पडला होता. अशा संधींत जलालुद्दीनाचे विधवा राणीनें मूर्खपणा केल्यामुळें त्याचा मार्ग मोकळा झाला. पिल्यानें अर्कलीखानास आपल्यामागें सुलतानपद देण्याचें जाहीर केलें होतें; तरी त्याचा खून झाला तेव्हां यास दिल्लीस बोलावून किंवा हा येण्याची वाट पाहून यासच तक्तावर बसविण्याऐवजीं राणीनें तक्त मोकळें राहतां कामा नये, अशा विचारानें सुलतान मारला गेल्याची बातमी समजतांच रुक्नउद्दीन इब्राहिम या अर्कलीखानाचे धाकट्या भावास राजपदाधिष्ठित केल्याचें जाहीर केलें. अर्कलीखानास दिल्लीस जाऊन आपल्या भावाकडून राजपद हिसकाऊन घेणें बरें वाटलें नाहीं म्हणून हा मुलतानला तसाच चरफडत राहिला व तिकडे दिल्लीस तेथील सरदार याच्या धाकट्या भावाला मान्य करीनात. या फाटाफुटीमुळें अला उद्दीनास दिल्लीवर चालून जाण्याचें धाडस करतां आलें. दक्षिणेंतून आलेल्या लुटीमुळें पैशाची खैरात करून लोकप्रियता संपादन करण्याची त्यास अनुकूलता होती. दिल्लीचे स्वारीचे वेळीं प्रत्येक मुकामाचे गांवीं पुढें

माणसें पाठवून मुक्कामाचे गांवीं त्यानें सोन्याची खैरात केली. अला उद्दीनाजवळच्या सोन्याच्या साठ्यांतून बक्षिसी मिळविण्याचे आशेनें दिल्लीस पोहोंचते वेळीं अनेक सरदार त्याचे पक्षास येऊन मिळाले. ६०००० घोडदळ व ६०००० पायदळ सैन्यानिशीं अला उद्दीन दिल्लीस पोहोंचला तेव्हां त्याचा इब्राहिमशिवाय कोणीहि प्रतिकार केला नाहीं व विशेष त्रास न पडतां दिल्लीचें सुलतानपद त्यास प्राप्त झालें. सुलतान झाल्यावर अला उद्दीनानें उलूघखान आणि हिजबरुद्दीन या दोघा सरदारांबरोबर ४०००० सैन्य देऊन सुलतानवर स्वारी करून अर्कलीखान, इब्राहिम व त्याची आई यांस पकडून आणण्याकरितां पाठविलें. शहर एकदम काबीज झालें व राजघराण्यांतील अर्कलीखान, रुक्नुद्दीन इब्राहिम, त्यांची आई व त्यांचे मदतनीस सर्व उलूघखानाचे हातीं लागले. राजाज्ञेस अनुसरून या राजपुत्रांचे, यांच्या आईचे व यांजबरोबर मोंगल सरदार उलूघखान व अहमद चाप यांचे डोळे काढून उलूघखानानें त्यांस आंधळे केलें ( कें. हि. ).

**अर्चत**—स. १४०९ मध्यें होऊन गेलेला षड्दर्शनसमुच्चयवृत्ति या ग्रंथाचा कर्ता सुप्रसिद्ध जैनधर्मी गुणरत्नसूरि, यानें अर्चताच्या तर्कटीका या ग्रंथाचा उल्लेख केला आहे. तसेंच स० ११८१ त होऊन गेलेला स्याद्वादरत्नाकरावतारिका या ग्रंथाचा कर्ता जैन तत्त्वज्ञ रत्नप्रभसूरि यानेंहि अर्चताचा निर्देश केला आहे [ अर्चतचर्चचतुरःपुनराह । इह प्रेक्षावतां प्रवृत्तिः प्रयोजनवत्तयाव्याप्ता... । स्याद्वदारत्नाकरावतारिका] ( Chap. I, p. 17 बनारसच्या जैन यशोविजय ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेली प्रत ). जैन न्यायावतारविवृत्तिवरून असें दिसून येतें कीं, अर्चतानें स० ८४७ च्या सुमारास होऊन गेलेल्या धर्मोत्तराचार्यावर टीका केलेली आहे असें कलकत्त्याच्या इंडियन रिसर्च सोसायटीनें प्रसिद्ध केलेल्या प्रतीवरून दिसून येतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हा सनाच्या ९ व्या शतकांत होऊन गेला.

अर्चतानें हेतुबिंदुविवरण नांवाची धर्मकीर्तीच्या हेतुबिंदु या ग्रंथावर टीका लिहिली आहे. या टीकेचें तिबेटी नांव Gtautshigs-thigs-pahi-hgrel-wa असें आहे. मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे ( Bstan-hgyur, Mdo, She, Folios 205-375 ). या टीकेचे ४ भाग आहेत. टीकेच्या सुरवातीस अर्चत हा ब्राह्मण असून शेवटीं हा काश्मीरचा रहिवाशी होता असें दिलें आहे ( हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३३१-३३२ ).

**अर्जुन** ( अथवा **अरुणाश्व** )—ठाणेश्वरच्या हर्षवर्धनाचा हा एक प्रधान ( सेनापति ) होय.

स. ६४७-८ च्या सुमारास हर्षवर्धन मेल्यावर यानें ठाणेश्वरचें राज्य बळकाविलें. त्या वेळीं वँगहुएन्सु हा चिनी वकील आपल्या परिवारासह हर्षवर्धनाकडे येत असतां अर्जुनानें त्याला लुटलें, तेव्हां तो पळून तिबेटांत गेला. आणि तिबेटचा राजा स्रोंग-बत्संगमपो ( Srong btsan-sgm-po ) याचें साहाय्य घेऊन त्यानें याचा पराभव केला व यास कैद करून नेलें. अशा प्रकारें ठाणेश्वरच्या राज्याचा निकाल लागला ( B ). याला हर्षवर्धनाचा बौद्ध धर्माचा अभिमान सहन होत नसे, कारण हा वैदिक धर्माचा अभिमानी होता.

**२.** हा यादव घराण्यांतील विसुर्गानंतर गादीवर बसला.

**३.** माळवा प्रान्ताचा एक राजा. याचा देवगिरीच्या यादव घराण्यांतील जैत्रपालपुत्र सिंघणानें पराजय केला Bhand.P.150; जल्हणकृत सूक्तिमुक्तावलीची प्रस्तावना.

**अर्जुनदेव**—हा वाघेल वंशांतील वीसलनंतर गादीवर आला. हा वीसलचा थोरला भाऊ प्रतापमल्ल नांवाचा होता त्याचा पुत्र. यानें निःशंकमल्ल अशी पदवी धारण केली होती. सिरोही राज्यांतील अजारी गांवीं गोपाळजीच्या मंदिरांतील फशींवर वि. सं. १३२० ( स. १२६३ ) चा याचा एक शिलालेख आहे. त्यावरून दिसून येतें कीं याच्या वेळपर्यंत आबूचे परमार याच्या ताब्यांत होते. यानें वि. सं. १३१८-१३३१ ( स. १२६१-१२७४ ) पर्यंत राज्य केलें. याला रामदेव आणि सारंगदेव असे दोन पुत्र होते ( राजपुतानेका इतिहास पा. २२३ ).

**अर्जुन मधुरकोंड**—( अरिंजय पाहा).

**अर्जुनमल्ल**—हा पांचवा शीख गुरु होय याला अर्जुन असेंहि म्हणत. चवथा शीख गुरु रामदास यानें आपल्या पहिल्या दोन मुलांच्या दुर्वर्तनामुळें आपला तिसरा मुलगा अर्जुन यास वारस केलें. परंतु अर्जुनानें आपल्या थोरल्या भावास गादीच्या वारसानें बांधावयाचें जें पागोटें असतें तें खुशाल निमूटपणें दिलें. तेव्हां ही गोष्ट शीखांना न आवडून त्यांनीं अर्जुनास आपल्या हक्काची जाणीव उत्पन्न करून दिली.

अर्जुनानेंच आदिग्रंथाची रचना केली. त्यांत पूर्वी होऊन गेलेल्या गुरूंचे लेख गोविले. यामुळें यानें गुन्हा केला असा याच्यावर आरोप येऊन याला पकडण्यांत आलें. परंतु परमतसहिष्णु अकबरानें याला दोषमुक्त केलें.

पुढें जहांगीरच्या वेळीं त्याचा मुलगा खुस्रव याला पळून जाण्यास मदत केली असा याच्यावर दोष ठेवून याची

सर्व संपत्ति जप्त करण्यांत आली. व याला मरेपर्यंत तुरुंगांत ठेवून याचे हालहाल करण्यांत आले.

राजपुत्र खुस्रव हा मोठ्या संकटांत सांपडला म्हणून त्यानें गुरु अर्जुन याजपाशीं भिक्षेची याचना केल्यावरून अर्जुनानें त्याला पांच हजार रुपये दिले. हें जहांगीरला कळल्यावर व गुरूचें अभिमानाचें उत्तर ऐकल्यावरून त्यानें गुरूला दोन लाख रुपये दंड केला. तो देण्याचें साफ नाकारल्यावरून अर्जुनाचा पांच दिवस हाल करून जीव घेण्यांत आला ( स. १६०६ ).

तरवारीच्या जोराशिवाय आपला पंथ टिकणार नाहीं हें जाणून यानें आपला मुलगा हरगोविंद याला मरतांना सशस्त्र गादीवर बसण्याचा व शक्य तेवढें सैन्य ठेवण्याचा उपदेश केला. या उपदेशामुळेंच शीखांच्या इतिहासाला निराळें वळण लागलें.

आतांपर्यंत शीखधर्म हा केवळ धार्मिक पंथ गणला जात असे. परंतु यापुढें मुसलमानांचा कट्टा द्वेष्टा व रणशूर असा प्रमुख पंथ म्हणून पुढें आला.

**अर्जुनमिश्र**—( स. १३००–१५०० सुमार ) हा महाभारताच्या गौडी प्रतीवरील टीकाकार. हा व याचा पिता ईशान हे आपणास भारताचार्य म्हणवून घेतात. हा उत्तर बंगालमधील वारेंद्र ब्राह्मण होय. बंगालच्या सत्यखान राजाच्या आश्रयाखालीं यानें आपली वरील टीका लिहिली. पुरुष-सूक्तावरहि याची टीका आहे.

**अर्जुनवर्मा**—( स. १२११-१२१६ ) माळव्याच्या परमारांपैकीं सुभटवर्म्याचा पुत्र. याच्या स. १२१६ मधील दानपत्रांत लिहिलें आहे कीं, यानें बाललीलेसारख्या युद्धांत जयसिंहाला पळावयास लावलें होतें ( जर्नल ऑफ दि अमेरिकन् ओरिएंटल सोसायटी, भा. ७., पृ. २५--२७ ). याचा गुरु मदन ( बालसरस्वती ) यानें रचलेली 'पारिजातमंजरी' ( विजयश्री ) नाटिकेवरून याचे गुजराथच्या जयसिंह राजाशीं पर्वपर्वता (पाळागढा) पाशीं युद्ध झाल्याची माहिती मिळते. गुजराथचा निर्बल राजा दुसरा भीमदेव याचें राज्य त्यापासून त्याच्याच कुटुंबांतील जयसिंहानें बुडालें होतें. तोच अर्जुनवर्म्यानें पराभूत केलेला जयसिंह असावा. त्याचे एक दानपत्र स. १२२४ मधील मिळालें आहे (इं. अँटि. भा. ६, पृ. १९६--९८). त्यांत याचें नांव जयसिंह असें लिहिलें आहे. तें जयसिंहाचें रूपान्तर दिसतें.

'प्रबंधचिंतामणि' मध्यें लिहिलें आहे कीं, दुसऱ्या भीमदेवाच्या वेळीं यानें गुजराथचा नाश केला होता ( इ. २५० ). हा विद्वान् कवि आणि गानविद्या यांत निपुण होता. याच्या वेळचीं तीन दानपत्रें मिळालीं आहेत. त्यांतलें एक वि. सं. १२६७ फाल्गुन शुद्ध १० ला मंडपदुर्ग ( मांडू ) येथून दिलेलें आहे. दुसरें वि. सं. १२७० वैशाख वद्य अमावास्या रोजीं भृगुकच्छ( भडोच )हून व तिसरें वि. सं. १२७२ भाद्रपद शुद्ध १५ चे रेवा (नर्मदा) व कपिला यांच्या संगमावर अमरेश्वर तीर्थाहून दिलेलें आहे. या तीनहि दानपत्रांची रचना राजगुरु मदन यानें केली आहे. पहिलीं दोन ताम्रपत्रें लिहिण्याच्या वेळीं याचा महासांधिविग्रहिक बिल्हण पंडित होता, पण तिसऱ्या दानपत्राच्या वेळीं त्या स्थानीं सलक्षण होता. याच्या प्रधानाचें नांव नारायण असें होतें. याचा देहान्त वि. सं. १२७२--७५ मध्यें झालेला दिसतो. कारण वि. सं. १२७५ मार्गशीर्ष शुद्ध ५ चे मध्य प्रदेशांतील हुशंगाबाद जिल्ह्यांतील हरसोडा येथून याचा उत्तराधिकारी देवपालाचा शिलालेख मिळाला आहे. त्यांत धारानगरीचा राजा परमभट्टारक इत्यादि राजांचीं उपपदें आढळतात ( रा. इ. पा. २०० ).

यानें अमरुशतकावर रसिकसंजीवनी नांवाची टीका लिहिली आहे.

**२.** माळव्याच्या परमारांपैकीं तिसऱ्या जयसिंहाचा उत्तराधिकारी. कोटा राज्यांतील कवालजीच्या कुंडावरील शिलालेखांत रणथंभोरच्या हंमीर चौहानानें याला जिंकून माळव्याची लक्ष्मी ताब्यांत घेतली असें लिहिलें आहे. हंमीर काव्यांत हम्मीर गादीवर बसण्याचा संवत् १३३९ व प्रबंधकोशांत शेवटल्या वंशावळींत वि. सं. १३४२ दिला आहे. वरील कुंडावरचा शिलालेख वि. सं. १३४५ मधला आहे. त्याअर्थी वि.स.१३३९-१३४५(स.१२८३-१२८९) च्या मध्यें केव्हां तरी माळव्याचा कांहीं भाग हंमीरानें आपल्या राज्याला जोडला असावा ( रा. इ. पा. २०३ ).

**अर्णवराज** —हा सपादलक्ष ( अजमीर ) येथील चौहान राजा. हा सिद्धराज जयसिंहाचा जांवई होता. सिद्धराजाची कांचनदेवी नांवाची मुलगी यास दिली होती. यानें सिद्धराजाचा दत्तकपुत्र बाहड यास गादीवर बसविण्याकरितां कुमारपालाशीं युद्ध केलें. पण त्यांत याचा पराभव झाला. ही लढाई अबूच्या पहाडांत झाली ( स. ११४४ ). तेव्हां यानें कुमारपालाची बहीण देवलदेवी हिच्याशीं लग्न केलें. पण तिला हा वाईट रीतीनें वागवूं लागला. म्हणून याच्याशीं त्याचें दुसरें युद्ध झालें. एकदां यानें तिच्या देखत कुमारपालाचा अपमान केला होता. त्याचा सूड उगविण्याकरितां कुमारपालानें याच्याशीं दुसरें युद्ध केलें व याचा पराजय करून याला गादीवरून काढून टाकलें. याला आनल्लदेव,आनक, आनाक किंवा आना असें म्हणतात.

**२.** हा वाघेल घराण्याचा संस्थापक होय. हा कुमार-

पालाच्या मावशीचा मुलगा. याच्या पित्याचें नांव धवल होय. याच्या जहागिरीचें गांव व्याघ्रपल्ली असें होतें आणि त्यावरून याच्या वंशास वाघेल हें नांव मिळालें. याचा मुलगा लवप्रसाद हा दुसऱ्या भीमाचा प्रधान होता. हा शूर असून यानें माळव्याच्या व मारवाडच्या राजांचा पराभव केला. याला अर्णोराज, अनाक किंवा आना असें म्हणत असत.

**अर्थपति**—हा कुबेरभट्टाचा पुत्र व बाणभट्टाचा आजा.

**अर्सलान**—गझनीच्या यामीनी घराण्यांतील तिसऱ्या मसूदचा हा मुलगा. याला शीरझाद व बहरामशाह असे भाऊ होते. हा शीरझाद याच्यानंतर गादीवर आला.

याचा काल स. १११६ च्या अगोदर असावा. कारण याच्यानंतर याचा भाऊ बहरामशाहा हा स. १११६ मध्यें गादीवर आला.

**अर्सेकस**—या ग्रीकांपैकीं असीरियन राजानें पार्थियाचें राज्य स्थापन केलें. ही गोष्ट स. पू. २४८ मध्यें झाली.

**अर्हद्दास** (अथवा **रट्टकवि**)—(स. १३०० सुमार) जैनधर्मी कानडी कवि. यानें रट्टमत नांवाचा पर्जन्य, भूकंप, शकुन, उत्पात, ग्रह वगैरे संबंधीं एक ग्रंथ लिहिला आहे. हा मारसिंह गंगराजाचा ( स. ९६१-९७४ ) चमूपति काडमरसाच्या वंशांतील आहे. हाहि आपणास जिननगरपति, गिरिनगराधीश्वर असें म्हणवून घेत असल्यामुळें हा एखाद्या नगराचा अधिपति असावा. याच्या पित्याचें नांव नागकुमार. नागकुमाराला भूतुग म्हणत असत. यानें आपला रट्टमत हा ग्रंथ चंद्रलेखा नांवाच्या आपल्या मुलीला सांगितला. याचें नांव अभयाम्बुधि असें असावें. चवदाव्या शतकांतील भास्कर नांवाच्या आंध्र कवीनें याच्या रट्टमताचें तेलगूंत भाषान्तर केलें आहे ( क. क. च. भा. १, पा. ४०० ).

**अलक**–हा संस्कृत भाषेतील एक अलंकारशास्त्रज्ञ होऊन गेला. रत्नाकाराच्या हरविजय नांवाच्या ग्रंथावर विषमपदोद्योत नांवाची अलकानें टीका लिहिली आहे. हा जयानक याचा मुलगा होता. मम्मटाचा अपूर्ण राहिलेला काव्यप्रकाश अलकानें परिकर अलंकारापासून पुढें पूर्ण केला. अलंकार सर्वस्वावर अलकानें टीका लिहिली आहे.

**अलकदत्त**—कल्याण कवीचा गुरु. हा कल्याण म्हणजे राजतरंगिणीकार कल्हण असावा. याचा उल्लेख जोनराजानें श्रीकंठचरितटीकेंत सांधिविग्राहिक असा केला आहे ( २५.७८-८० ).

**अलख बुलाखी**—हा कवि साठोदश गुजराथी ब्राह्मण जातीचा असून अमदाबाद येथें राहत असे. हा शांकरमतानुयायी होता. याची मान्यता लोकांत चांगली असल्यामुळें लोक याच्या पादुकांची पूजा करितात. यानें गुजराथी भाषेंत पदें वगैरे कविता पुष्कळ केलेली आहे व हा ( स. १८३८ ) १७६० शकामध्यें होता, अशाविषयीं झांगला पुरावा आहे ( अ. को. ).

**अलखान**—काबुलच्या लल्लीय शाही राजाचा सरदार. पंजाबांत चिनाबच्या पश्चिम भागावरील प्रदेशाला गुर्जर असें म्हणत असत. त्यांतच हल्लीचें टोकी खोरें म्हणजे पूर्वीचा टक्क प्रदेश याचा समावेश होत असावा. ह्या अलखानाचा काश्मीरच्या शंकरवर्म्यानें पराजय केला, तेव्हां अलखानानें टक्क प्रदेश शंकरवर्म्याला देऊन आपली सुटका करून घेतली (राजतरंगिणी तरंग ५ श्लोक १४०-६०).

**अलप्तगीन**—( सन ९६७-९७६ ) यामिनी राज्याच्या पडत्या काळांत तुर्क लोकांनीं आपलें महत्त्व वाढविलें. त्या वंशाचा पांचवा सुलतान अब्दुल मलीक ह्याजवळ अलप्तगीन नांवाचा हा एक तुर्क गुलाम द्वाररक्षक होता. याजवर राजाची मर्जी बसून यास सन ९६७ त खुरासान प्रांताची सुभेदारी मिळाली. सन ९६७ त अब्दुल मलीक मरण पावल्यानंतर, त्याचा मुलगा मनसूर यास बुखारा येथील गादी मिळूं नये अशी अलप्तगीनानें खटपट चालविली. त्यावरून मनसूरनें अलप्तगीनास खुरासानचे सुभेदारीवरून दूर केलें. तेव्हां हा पळून काबूलकडे गेला. आणि कांहीं फौज जमवून यानें गज्नी येथें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्या वेळीं पंजाबापासून काबूलपर्यंतच्या प्रदेशावर शाही ब्राह्मण राजा जयपाल राज्य करीत असल्यामुळें या नूतन गज्नवी राज्याचा विस्तार पूर्वेकडे होऊं लागतांच त्यांचा कलह जुंपला. जयपालाची राजधानी वाहिंद सिंधूच्या पश्चिमेस असून पूर्वेस लाहोर ही दुसरी राजधानी होती. हा स. ९७६ त मरण पावला ( मु. रि. भा. १ ला, पृ. ६२-६३ ).

**अलफखान**—खल्जी घराण्यांतील अला उद्दीनाचा हा एक सरदार होय. स. १२९६ मध्यें मध्य तुर्कस्थानाचा बादशहा, चंगीझखानाचा वंशज, अमीर दाऊद ह्यानें एक लाख लोकांनिशीं सिंध व पंजाब प्रांतावर स्वारी केली. त्यावर अला उद्दीनानें अलफखानास पाठविलें. तेव्हां लाहोरनजीक युद्ध करून यानें मोगलाचा पराभव केला, आणि त्यांचीं पुष्कळ बायकामुलें पकडून त्या सर्वांचा यानें शिरच्छेद केला.

अलाउद्दीनानें अलफखानाकडे मुलतान प्रांताची सरंजामी व सुभेदारी दिली होती ( स. १२९६ ). स. १३०५ मध्यें तेथून बदलून गुजराथचे सुभेदारीवर याची नेमणूक झाली. पुढें एक वर्षानें देवगिरीच्या

पालाच्या मावशीचा मुलगा. याच्या पित्याचें नांव धवल होय. याच्या जहागिरीचें गांव व्याघ्रपल्ली असें होतें आणि त्यावरून याच्या वंशास वाघेल हें नांव मिळालें. याचा मुलगा लवप्रसाद हा दुसऱ्या भीमाचा प्रधान होता. हा शूर असून यानें माळव्याच्या व मारवाडच्या राजांचा पराभव केला. याला अर्णोराज, अनाक किंवा आना असें म्हणत असत.

**अर्थपति**—हा कुबेरभट्टाचा पुत्र व बाणभट्टाचा आजा.

**अर्सलान**—गझनीच्या यामीनी घराण्यांतील तिसऱ्या मसूदचा हा मुलगा. याला शीरझाद व बहरामशाह असे भाऊ होते. हा शीरझाद याच्यानंतर गादीवर आला.

याचा काल स. १११६ च्या अगोदर असावा. कारण याच्यानंतर याचा भाऊ बहरामशाहा हा स. १११६ मध्यें गादीवर आला.

**अर्सेकस**—या ग्रीकांपैकीं असीरियन राजानें पार्थियाचें राज्य स्थापन केलें. ही गोष्ट स. पू. २४८ मध्यें झाली.

**अर्हद्दास** (अथवा **रट्टकवि**)—(स. १३०० सुमार) जैनधर्मी कानडी कवि. यानें रट्टमत नांवाचा पर्जन्य, भूकंप, शकुन, उत्पात, ग्रह वगैरे संबंधीं एक ग्रंथ लिहिला आहे. हा मारसिंह गंगराजाचा ( स. ९६१-९७४ ) चमूपति काडमरसाच्या वंशांतील आहे. हाहि आपणास जिननगरपति, गिरिनगराधीश्वर असें म्हणवून घेत असल्यामुळें हा एखाद्या नगराचा अधिपति असावा. याच्या पित्याचें नांव नागकुमार. नागकुमाराला भूतुग म्हणत असत. यानें आपला रट्टमत हा ग्रंथ चंद्रलेखा नांवाच्या आपल्या मुलीला सांगितला. याचें नांव अभयाम्बुधि असें असावें. चवदाव्या शतकांतील भास्कर नांवाच्या आंध्र कवीनें याच्या रट्टमताचें तेलगूंत भाषान्तर केलें आहे ( क. क. च. भा. १, पा. ४०० ).

**अलक**–हा संस्कृत भाषेतील एक अलंकारशास्त्रज्ञ होऊन गेला. रत्नाकाराच्या हरविजय नांवाच्या ग्रंथावर विषमपदोद्योत नांवाची अलकानें टीका लिहिली आहे. हा जयानक याचा मुलगा होता. मम्मटाचा अपूर्ण राहिलेला काव्यप्रकाश अलकानें परिकर अलंकारापासून पुढें पूर्ण केला. अलंकार सर्वस्वावर अलकानें टीका लिहिली आहे.

**अलकदत्त**—कल्याण कवीचा गुरु. हा कल्याण म्हणजे राजतरंगिणीकार कल्हण असावा. याचा उल्लेख जोनराजानें श्रीकंठचरितटीकेंत सांधिविग्राहिक असा केला आहे ( २५.७८-८० ).

**अलख बुलाखी**—हा कवि साठोदश गुजराथी ब्राह्मण जातीचा असून अमदाबाद येथें राहत असे. हा शांकरमतानुयायी होता. याची मान्यता लोकांत चांगली असल्यामुळें लोक याच्या पादुकांची पूजा करितात. यानें गुजराथी भाषेंत पदें वगैरे कविता पुष्कळ केलेली आहे व हा ( स. १८३८ ) १७६० शकामध्यें होता, अशाविषयीं चांगला पुरावा आहे ( अ. को. ).

**अलखान**—काबुलच्या लल्लीय शाही राजाचा सरदार. पंजाबांत चिनाबच्या पश्चिम भागावरील प्रदेशाला गुर्जर असें म्हणत असत. त्यांतच हल्लीचें टोकी खोरें म्हणजे पूर्वीचा टक्क प्रदेश याचा समावेश होत असावा. ह्या अलखानाचा काश्मीरच्या शंकरवर्म्यानें पराजय केला, तेव्हां अलखानानें टक्क प्रदेश शंकरवर्म्याला देऊन आपली सुटका करून घेतली (राजतरंगिणी तरंग ५ श्लोक १४०-६०).

**अलप्तगीन**—( सन ९६७-९७६ ) यामिनी राज्याच्या पडत्या काळांत तुर्क लोकांनीं आपलें महत्त्व वाढविलें. त्या वंशाचा पांचवा सुलतान अब्दुल मलीक ह्याजवळ अलप्तगीन नांवाचा हा एक तुर्क गुलाम द्वाररक्षक होता. याजवर राजाची मर्जी बसून यास सन ९६७ त खुरासान प्रांताची सुभेदारी मिळाली. सन ९६७ त अब्दुल मलीक मरण पावल्यानंतर, त्याचा मुलगा मनसूर यास बुखारा येथील गादी मिळूं नये अशी अलप्तगीनानें खटपट चालविली. त्यावरून मनसूरनें अलप्तगीनास खुरासानचे सुभेदारीवरून दूर केलें. तेव्हां हा पळून काबूलकडे गेला. आणि कांहीं फौज जमवून यानें गज्नी येथें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्या वेळीं पंजाबापासून काबूलपर्यंतच्या प्रदेशावर शाही ब्राह्मण राजा जयपाल राज्य करीत असल्यामुळें या नूतन गज्नवी राज्याचा विस्तार पूर्वेकडे होऊं लागतांच त्यांचा कलह जुंपला. जयपालाची राजधानी वाहिंद सिंधूच्या पश्चिमेस असून पूर्वेस लाहोर ही दुसरी राजधानी होती. हा स. ९७६ त मरण पावला ( मु. रि. भा. १ ला, पृ. ६२-६३ ).

**अलफखान**—खल्जी घराण्यांतील अला उद्दीनाचा हा एक सरदार होय. स. १२९६ मध्यें मध्य तुर्कस्थानाचा बादशहा, चंगीझखानाचा वंशज, अमीर दाऊद ह्यानें एक लाख लोकांनिशीं सिंध व पंजाब प्रांतावर स्वारी केली. त्यावर अला उद्दीनानें अलफखानास पाठविलें. तेव्हां लाहोरनजीक युद्ध करून यानें मोगलाचा पराभव केला, आणि त्यांचीं पुष्कळ बायकामुलें पकडून त्या सर्वांचा याने शिरच्छेद केला.

अलाउद्दीनानें अलफखानाकडे मुलतान प्रांताची सरंजामी व सुभेदारी दिली होती ( स. १२९६ ). स. १३०५ मध्यें तेथून बदलून गुजराथचे सुभेदारीवर याची नेमणूक झाली. पुढें एक वर्षानें देवगिरीच्या

राजानें एलिचपूर प्रांताचें उत्पन्न दिल्लीचे सुलतानास द्यावयाचें तें बरींच वर्षें दिलें नव्हतें, म्हणून त्यास वठणीवर आणण्याचे कामगिरीवर मलिक नायब काफूरचे मदतीस यास पाठविलें. गुजराथचा राजा कर्ण याची मुलगी देवलदेवी ही बापाबरोबर देवगिरीचे राज्यांत आश्रयार्थ गेली होती. तिला पकडून दिल्लीस तिची आई सुलतानाचे झनानखान्यांत होती तीस भेटण्यास आणण्याचीहि कामगिरी या स्वारींत पार पाडावयाची होती. या सुमारास राजा कर्ण नंदुरबारच्या किल्ल्यांत राहून आसपासच्या लहान मुलखाचा कारभार पाहत असे. मुसलमानांची स्वारी येत आहे असें समजतांच त्यानें देवलदेवीस देवगिरीच्या राजाचा भाऊ शंकरदेव यास देण्याचें ठरवून तिची देवगिरीकडे रवानगी केली. देवलदेवी देवगिरीचे वाटेवर असतांच यानें नंदुरबारवर स्वारी करून कर्णरायाचा पराभव केला व राजा देवगिरीकडे जात असतां त्याचा पाठलाग चालविला. वाटेंत वेरूळचे लेण्याजवळ आल्यावर ३००-४०० सैनिकांस लेणीं पाहावयास जाण्याची यानें परवानगी दिली. हे ३००-४०० सैनिक लेणीं पाहत असतां लेण्यांकडे येणारें एक लहानसें हिंदु सैन्य त्यांचे दृष्टीस पडलें. आपणास परत जाण्यास अटकाव करण्यास हिंदु सैन्य आलें असावें असें समजून सैनिकांनीं हिंदूंवर बाणांचा वर्षाव केला. हें हिंदु सैन्य देवलदेवीस पोहोंचविण्याकरितां तिच्या संरक्षणार्थ दिलेलें होतें. एक बाण चुकून देवलदेवीच्या घोड्यास लागला व घोडा कलंडला, तेव्हां देवी खालीं पडली. मुसलमान सैनिक देवलदेवीजवळ येऊन चौकशी करूं लागले. तेव्हां तिच्या संरक्षकांनीं मूर्खपणानें तिचें नांवगांव सांगून ही राजकन्या स्वतःच्या लग्नाकरितां देवगिरीस जात आहे म्हणून तिच्या अब्रूवर घाला न घालण्याविषयीं विनंति केली. देवलदेवीस लागलीच पकडून याच्याकडे नेण्यांत आलें. यानें तिची ताबडतोब दिल्लीकडे रवानगी केली. सुलतानास खूष करण्याचें हें नाजुक काम मलिक नायब काफूरनें करावयाचे ऐवजीं यानें त्याची संमतिसुद्धां न घेतां परस्पर पार पाडलें. त्यामुळें काफूर फार रागावला. तो खुनशी असल्यानें काफूरखानानें याचा पुढें चांगलाच सूड घेतला. सन १३१५-१६ चे सुमारास सुलतान अलाउद्दीन आजारी असतां त्यानें मलिक नायब काफूर जवळ युवराज खिजरखान व सुलताना हे आपल्याशीं निष्ठुरपणानें वागतात, आजारी असतांहि ख्यालीखुशालींत दिवस लावितात अशी कुरकूर केली. याच सुमारास राणीचे मनांत आपला मुलगा शादीखान यास याची मुलगी करून घेण्याची कल्पना आली व तिनें अला उद्दीनास परवानगी विचारली. अला उद्दीनानें शिरस्त्याप्रमाणें मलिक नायब काफूरचा सल्ला विचारला. मलिक नायबचे मनांतून तिघांचाहि सूड घ्यावयाचा होता, म्हणून त्यानें बादशहाच्या मनांत असें भरविलें कीं, युवराज खिजरखान, त्याची आई सुलताना यांनीं राज्यलोभानें सुलतानाविरुद्ध कटाची उभारणी केली आहे. या कटास निष्ठावंत मदतनीस मिळविण्याकरितां याशीं नातें जोडण्याची ही कारवाई आहे. अलाउद्दीनाचा यावर विश्वास बसला व त्यानें युवराजास हद्दपार केलें व आपले बायकोस नजरकैदेंत ठेविलें. पुढें युवराज खिजरखान बापाची प्रकृति सुधारल्याचें ऐकून परवानगी न घेतां दिल्लीस आला. तेव्हांहि काफूरनें अला उद्दीनास असें सांगितलें कीं, युवराजाची सुलतानाची आज्ञा मोडून कट सिद्धीस नेण्याची इच्छा आहे. अला उद्दीनास तें खरें वाटलें व त्यानें युवराजास ग्वाल्हेरचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें व स. १३१६ मध्यें अलफखानाचा वध केला ( कें. हि. ).

२. माळव्याचा सुलतान हूशंगशाहचें नामांतर.

३. पहिला मुहम्मद घियासुद्दीनचें नामांतर.

**अलफझारी**—यानें अरबी भाषेंत ज्योतिषविषयावर ग्रंथ लिहिले आहेत. याच्या ग्रंथांत कालमान, ग्रहकक्षा, योजनें वगैरे माहिती दिली आहे. खंडनखंडखाद्याचें भाषांतर अरबींत यानेंच केलें असावें.

**अलवेली अली**—हा हिंदी भाषेंतील कवि होय. हा विष्णुस्वामीच्या सांप्रदायांतील वंशीमालीचा शिष्य होय. यानें समयप्रबंधपदावली नांवाचा ३१३ पदांचा एक ग्रंथ केला आहे. सर्व पदें भक्तिपर आहे. हा सनाच्या अठराव्या शतकांतील होय.

**अलमेलम्मा**—श्रीरंगपट्टणच्या आरविदु घराण्यांतील तिरुमल ( विजयानगरच्या आरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटाचा हा पुतण्या होय ). राजाची ही एक बायको होय.

जेव्हां तिरुमल राज्यत्याग करून तालक्कड येथें राहिला त्या वेळीं हीहि त्याच्याबरोबर राहिली होती.

**अलंकार**—काश्मीरच्या जयसिंह (स. ११२९-५० ) राजाचा दिवाण. हा जातीचा ब्राह्मण होता. याच्या बापाचें नांव विश्वकर्ता. याचा भाऊ प्रख्यात मंख कवि होय. यानें श्रीकंठ-चरित्र नांवाचा संस्कृत ग्रंथ लिहिला व तो कसा काय झाला हें पाहण्यासाठीं अलंकारानें ३० पंडितांची सभा भरवली. जमलेल्या पंडितांचीं नांवें येणेंप्रमाणें:—आनंदनैयायिक, आनंदकवि दुसरा, कल्याणकवि, गर्गकवि, गोविंदकवि, जनकराजवैदिक,

वैयाकरणी जल्हण, जिंदुकमीमांसक, तेजकंठ, त्रैलोक्यकवि, दामोदर, नंदन, नागकवि, पद्मराजकवि, गुप्त ( प्रगट ), भुइमंडन ( मंखाचा गुरुबंधु ), रम्यदेव, रुय्यक ( मंखाचा गुरु ), लक्ष्मीदेव, लोष्टदेवकवि, श्रीकंठ, श्रीगर्भ, श्रीगुप्त, श्रीवत्स, षष्ठ व सुहल. ही माहिती मंख कवीच्या श्रीकंठचरित्राच्या पंचविसाव्या सर्गावरून मिळते. याचा श्रीकंठचरित्रांत लंकक या नांवानेंहि निर्देश आहे.

**अलंप्रभु**—( स. ११६० सुमार ). याला अल्लमप्रभु व प्रभुलिंग असेंहि म्हणतात. हा आराध्य जातीय तैलंग ब्राह्मण होता, अशी समजूत आहे. ह्या पुरुषाच्या ऐतिहासिकत्वाबद्दल शंका आहे. लिंगायतधर्माचा संस्थापक जो बसव त्याच्याहि अगोदरचा हा पुरुष होता, असें वीरशैव समजतात. 'प्रभुलिंगलिले' म्हणून जो कानडी भाषेंत चामरस कवीनें षट्पदी वृत्तांत रचलेला ग्रंथ आहे, त्यांत याचें वर्णन आढळतें. या काव्यांत प्रभुलिंग गणपतीचा अवतार मानला आहे व प्रत्यक्ष पार्वतीनें याची परीक्षा पाहण्याकरितां आपल्या अंशानें एक वनवासी राजकन्या उत्पन्न केली व त्याची परीक्षा पाहिली. हा अत्यंत पवित्र वर्तणुकीचा, शांत, पुष्कळ प्रवास केलेला व जागोजाग अनेक चमत्कार दाखविल्यामुळें लोकांत प्रख्यातीस आलेला असा होता. कोल्हापूर संस्थानांतील अळतें गांवीं जें अलंप्रभूचें देवालय आहे, तें याचें नसून औरंगजेबाच्या स्मरणार्थ देवीला नांव दिलें आहे ( कोल्हापूर गॅ. पाहा ). त्याची सांप्रदायिक कथा देणें म्हणजे प्रभुलिंगलीलेचा गोषवारा देणें होय. याची अल्लम नांवानें विशेष प्रसिद्धी आहे. याला मायाकोळाहळ अशी पदवी होती. लिंगायतांपैकीं प्रसिद्ध सत्पुरुष.

ग्रंथ–षट्स्थळज्ञानचारित्र्य, शून्यसंपादने, मंत्रगोप्य, सृष्टीयवचन, बेडगिनवचन ( सुंदर वचन ), मंत्रमाहात्म्य, कालज्ञानवचन.

चन्नबसवपुराणांतहि याचें चरित्र आहे. हा कदळी येथें मृत्यु पावला. याचें चरित्र चमत्कारप्रधान असून अनेक लिंगायत कवींनीं तें भक्तिपुरस्सर गायिलेलें आहे. याच्या वचनांत गुहेश्वर हें टोपण नांव वापरलें आहे ( क. क. च. भा १ पा. १८० ).

**अलसानी पेद्दण्ण**—सुप्रसिद्ध तेलगू कवि. हा जातीनें ब्राह्मण असून विजयानगरच्या नरसिंहराय व कृष्णदेवराय यांचा याला आश्रय होता. त्याच्या दरबारांतील अष्टदिग्गजांत याची गणना होती. स्वारोचिष–मनुचरित्र हें याचें लोकप्रसिद्ध काव्य होय. हें यानें मार्कंडेयपुराणाच्या आधारें रचलें. या काव्याच्या प्रस्तावनेंत कृष्णदेवरायानें मुसलमानांवर मिळवलेल्या जयाच्या वेळीं केलेल्या पराक्रमाचें वर्णन आहे. याची प्रसिद्धी विशेषतः माधुर्याबद्दल आहे. याच्या पूर्वीचे कवि केवळ संस्कृत ग्रंथांचे आधारें तुटक काव्यरचना करीत, पण यानें स्वतंत्रपणें प्रबंधात्मक काव्यरचना केली. म्हणून याला आंध्रकवितापितामह असें बहुमानाचें पद प्राप्त झालें. राजानें स्वतः याच्या पालखीला खांदा दिला होता व याच्या पायांत सोन्याचा तोडा घातला होता. यानें मुसलमानी शब्द तेलगू भाषेंत वापरण्यास प्रथम सुरवात केली. कृष्णदेवरायाच्या मृत्यूवर यानें लिहिलेलें काव्य आजहि वाचकांच्या डोळ्यांतून अश्रू काढतें. हा स. १५३५ मध्यें आपली जन्मभूमि दोरनाला येथें मृत्यु पावला ( तेलगूवाङ्मय पा. २६-२८ ). कृष्णदेवरायाच्या नांवावर असलेले आमुक्तमाल्यादा वगैरे काव्यग्रंथ यानेंच केले असावेत असें म्हणतात.

**अला उद्दीन खल्जी**—( स. १२९६-१३१६ ) दिल्लीच्या खल्जी घराण्याचा संस्थापक जो जलालुद्दीन त्याचा हा पुतण्या होय. याच्या बापाचें नांव शहाबुद्दीन मसूद असें होतें. जलालुद्दीन गादीवर आल्यापासून त्यानें यास व याच्या भावास आपल्याजवळ बाळगिलें होतें. अला-उद्दीनानें मोंगलांस हटविलें म्हणून त्यास जलालुद्दीनानें गंगा व यमुना या नद्यांमधील अंतर्वेदीतील कोरा प्रांताचा सुभेदार नेमिलें. स. १२९२ त अला उद्दीनानें माळव्याच्या स्वारींत भिलसा वगैरे कित्येक ठिकाणच्या हिंदु लोकांस जिंकलें म्हणून जलालुद्दीनानें यास आणखी अयोध्येचा सुभा सांगितला. माळव्यांत यानें पुष्कळ किल्ले व लूट मिळविल्यामुळें यास मोठी फौज बाळगितां आली.

पुढें स. १२९३ त यास दक्षिणेंतील देवगिरी नामक धनाढ्य शहराची खबर कळून याच्या तोंडास पाणी सुटलें. व आपला खरा बेत कोणास न कळवितां हा ८००० हजार स्वार घेऊन त्याच वर्षी कोराहून निघाला आणि बुंदेलखंडाच्या जंगलांतून दक्षिणेकडे गेला. सहा महिनेपर्यंत याचा मागमूस पाठीमागें कोणासहि कळला नाहीं. अशा रीतीनें अला उद्दीन नर्मदापार होऊन एकाएकीं देवगडच्या तटाखालीं उतरला. त्या वेळीं तेथील राजा रामदेवराव याची फौज दुसरीकडे गेली होती. शिवाय आयत्या वेळीं किल्ल्यांत धान्याच्या ऐवजीं मिठाचीं पोतीं भरलीं गेलीं असल्याचें रामदेवरावास आढळून आलें. तेव्हां घाबरून जाऊन त्यानें एकदम पुष्कळ द्रव्य देऊन याच्याशीं तह केला. इतक्यांत रामदेवरावाचा पुत्र शंकरदेव मोठी फौज जमवून बाहेरून आला. त्यानें वडिलांच्या तहास न जुमानतां अला उद्दीनाशीं लढाई दिली. या लढाईत मुसलमानांचा समूळ नाश होण्याची

वेळ आली होती. पण इतक्यांत किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेवलेला रामदेवरावाचा सरदार शंकरदेवरावाच्या मदतीस येत असतां, त्याच्या लोकांच्या पायांनीं उडालेली धूळ पाहून, अला उद्दीनाच्या मदतीस दिल्लीहून मोठी फौज येत आहे असें वाटून, हिंदु लोक रणांगण सोडून सैरावैरा पळूं लागले व अला उद्दीनास जय मिळाला. तेव्हां रामदेवरावानें याला अपरंपार द्रव्य देऊन शिवाय आणखी एलिचपूर व आसपासचे प्रांत देऊन आपला बचाव करून घेतला.

अशा प्रकारें विजय मिळवून हा कोरा येथें परत आला. त्या वेळीं जलालुद्दीन यास भेटावयास आला. परंतु अला-उद्दीनानें त्या प्रसंगीं जलालुद्दीनाचा आपल्या मारेकऱ्यांकडून खून करविला ( जुलै १२९६ ) व नंतर देवगिरीच्या लुटींत मिळालेल्या पैशाच्या साहाय्यानें जे सरदार व फौजेंतील अंमलदार कांकूं करीत होते त्यांस वश करून यानें छपन्न हजार स्वार व साठ हजार पायदळ एवढी फौज जमा केली. यामुळें स. १२९६ च्या ऑक्टोबर महिन्यांत यास दिल्लीचें तख्त बिनहरकत प्राप्त झालें ( अर्कलीखान पाहा ). नंतर अलफखान नामक आपल्या दूधभावाकडून यानें मुलतानहून दोघां राजपुत्रांस धरून आणून त्यांचे डोळे काढून त्यांस ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत बंदींत ठेविलें.

राज्यावर येतांच यानें लांचखाऊ अंमलदारांची पुरी खोड मोडली. ज्यांस यानें पैसे देऊन वश केलें होतें त्यांस त्यांच्या कृतघ्नतेबद्दल चांगलें शासन करून चुलत्याच्या वधाच्या घातकी कृत्यांत ज्यांनीं स्वतःस सहाय्य केलें होतें, त्यांची यानें अत्यंत दुर्दशा केली. ज्यांनीं याच्या लांचास न जुमानतां जलालुद्दीनास सोडलें नाहीं त्यांना अला उद्दीनानें कांहींएक त्रास दिला नाहीं.

स. १२९६ मध्यें मध्यतुर्कस्थानचा बादशहा व गीझचे खानाचा वंशज अमीर दाऊद हा पंजाब प्रांतावर चाल करून आला असतां त्याच्यावर आपला अलफखान नांवाचा सरदार पाठवून यानें अमीर दाऊदचा पराभव केला. नंतर अला उद्दीनानें स. १२९७ मध्यें अलफखान व वजीर नुसरतखान यास गुजराथ प्रांत जिंकण्यासाठीं पाठविलें. गुजराथेंत अनाहिलवाड येथें राजा कर्णराज राज्य करीत होता. मुसलमान फौज आल्याबरोबर तो पळून देवगडास रामदेवराव याजकडे आश्रय मागण्यासाठीं गेला. परंतु मागें त्याचें राज्य व बायकामुलें मुसलमानांनीं काबीज केलीं. शिवाय या स्वारींत मुसलमानांनीं सोमनाथाचें देवालय पुनरपि लुटलें व तेथील मूर्ति फोडून तिचे तुकडे दिल्लीस नेऊन मशिदीच्या पायास लाविले. त्या मूर्तीचा उपयोग यानें आपल्या सिंहासनाच्या पायरीप्रमाणें केला, असाहि कांहीं ठिकाणीं उल्लेख आला आहे.

कर्णराजाची लावण्यवती स्त्री कमलदेवी मुसलमानांनीं पकडून दिल्लीस नेली होती. तिला यानें आपली पट्टराणी केली. तिजवर याची फार मर्जी बसली.

मोंगलाची दुसरी स्वारी:—अमीर दाऊदची स्वारी होऊन दोन वर्षें होतात न होतात तोंच स. १२९९ च्या सुमारास दाऊदचा मुलगा कुतलघखान हा हिंदुस्थानांत प्रवेश करून दिल्लीनजीक यमुनेच्या काठीं तळ देऊन राहिला. तेव्हां अला उद्दीनानें स्वतः कुतलघखान याच्यावर बऱ्याच मोठ्या सैन्यानिशीं चालून जाऊन त्याचा पूर्ण मोड केला.

राजपुतान्यावरील स्वारी:—स. १२९८ मध्यें अला उद्दीनानें रतनभोर नांवाचा किल्ला काबीज केला. या स्वारींत याचा पुतण्या आकतखान यानें याचा खून करून राज्य बळकविण्याचा प्रयत्न केला, पण याच्या नशिबानें तो फसून आकतखानास देहान्तशासन भोगावें लागलें ( आकतखान पाहा ). स. १३०० त यानें पुनः राजपुताना जिंकण्याचा बेत ठरवून रतनभोरास वेढा घातला. माळवा व गुजराथ हे प्रांत याच्या ताब्यांत आले होते, परंतु राजपुतान्यांतील शत्रूंचा मोड केल्याशिवाय हे दूरचे प्रांत दिल्लीच्या सुलतानाच्या ताब्यांत राहणें दुरापास्त होतें. दिल्लीहून राजपुतान्यांत उतरतांना रतनभोराचा किल्ला लष्करी दृष्ट्या महत्त्वाचा आहे म्हणून पुढें जाण्यापूर्वी तो सर करणें जरूर होतें. तो किल्ला जिंकल्यावर यानें चितोडवर स्वारी केली. कारण चितोडचे राजे हे बाप्पा-रावळचे वंशज राजपुतान्यांत प्रमुख असून त्यांचा मोड झाला म्हणजे सर्वांना दरारा बसेल, असें यास वाटलें. चितोड येथें रत्नसिंह राज्य करीत होता. त्याची बायको पद्मिनी ही फार सुस्वरूप होती, तिचाहि लोभ अला उद्दीनास होताच. चितोडवर यानें दोन स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं पहिल्या स्वारीच्या वेळीं यानें दगलबाजी करून रत्नसिंगास कैद करून पद्मिनी मिळाल्या-शिवाय त्याची सुटका होणार नाहीं असें कळविलें. तेव्हां पद्मिनीनें एक युक्ति योजली व स्वतः येण्यास कबूल असल्याचें सुलतानास कळविलें. पद्मिनीचा लवाजमा म्हणून बुरखा घेतलेल्या अनेक पालख्या तिनें भोयांबरोबर पाठविल्या. वास्तविक त्यांत पद्मिनी नव्हती व दासीहि नव्हत्या. प्रत्येक पालखींत शूर हत्यारबंद शिपाई होते व भोईहि हत्यारबंद रजपूतच होते. त्यांनीं अला उद्दीनाचे गोटांत शिरून आयत्या वेळीं एकच गोंधळ उडवून दिला व रत्नसिंगास मुक्त केलें. या प्रकारामुळें अला उद्दीनास

तेथून कशीबशी सुटका करून घेणें भाग पडलें. पण पुढील वर्षी म्हणजे स. १३०३ सालीं यानें मोठ्या तयारीनिशीं चितोडवर स्वारी केली. या वेळीं चितोड जिंकलें जाणार असें पाहतांच सर्व रजपूत स्त्रियांनीं पुढील बेअब्रू टाळण्याकरितां खुषीनें अग्नींत उड्या टाकिल्या. त्या कृत्यास जोहार असें म्हणतात. यानें चितोड काबीज केलें. परंतु याच्या मृत्यूपूर्वीच स. १३१३ सालीं हंमीर नांवाच्या शूर रजपूत राजानें चितोडास पुनः स्वातंत्र्य मिळवून दिलें.

चितोडच्या स्वारींत हा गुंतला असतां मोंगलांनीं पुनः हिंदुस्थानांत स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. परंतु यानें मोंगलांची अत्यंत दुर्दशा केली. त्यामुळें त्यांचा धीर इतका खचला कीं, ते पुष्कळ दिवसपर्यंत हिंदुस्थानांत पाय ठेवण्यास धजले नाहींत. देवगिरीचा रामदेवराव खंडणी पाठविनासा झाला म्हणून स. १३०६ मध्यें यानें आपला सरदार मलीक काफूर व गुजराथचा अलफखान यास दक्षिणेंत पाठविलें. काफूरनें या स्वारींत सर्व महाराष्ट्रांत लुटालूट करून रामदेवरावास दिल्लीस आणलें. तेथें त्याचा अला उद्दीनानें चांगला सन्मान केला. स. १३०८ मध्यें काफूरनें पूर्व किनाऱ्यावर तैलंगण प्रांतावर स्वारी केली व वारंगळचा किल्ला सर केला. तेव्हां तेथील राजानेंहि दिल्लीच्या सुलतानाचें आधिपत्य कबूल करून त्यास खंडणी देण्याचें कबूल केलें. पुढें रामदेवरावाच्या मुलाकडून खंडणी वेळेवर न आल्यामुळें स. १३१२ मध्यें काफूरनें दक्षिणेंत शेवटची स्वारी केली व त्यानें रामदेवरावाच्या मुलास ठार मारून देवगड राजधानी घेतली व महाराष्ट्र पूर्णपणें मुसलमानांच्या ताब्यांत आणून तो अपार संपत्ति घेऊन दिल्लीस परत आला.

यास आरंभापासून एकामागून एक विजय मिळत गेल्यामुळें याचे डोळे धुंद झाले व हा मोठमोठे बेत करूं लागला. क्षणांत यास वाटे कीं, आपण एक निराळाच धर्म स्थापन करून प्रतिपैगंबर व्हावें तर दुसऱ्या क्षणांत यास वाटे कीं, पैगंबर होण्यापेक्षां सैन्य घेऊन जग जिंकण्यास निघावें व प्रतिअलेक्झांडर व्हावें. ह्या काळांत पाडलेल्या कांहीं नाण्यांवर यानें आपल्या नांवापुढें 'दुसरा अलेक्झांडर' अशी पदवी कोरलेलीहि आहे. परंतु लवकरच अलाउल्मुल्क या निर्मांड मुसलमान गृहस्थाच्या सल्ल्यावरून यानें आपले वरील दोन्ही बेत रद्द केले. अला उल्मुल्कनें अला उद्दीनास चक्क सांगितलें कीं, धर्मस्थापना करणें हें तुझें काम नव्हे. आणि तूं जग जिंकण्याची हांव बाळगतोस त्यापेक्षां तुझ्या अगदीं जवळच्या रजपुत राजांना तूं कां जिंकीत नाहींस ? व मोंगलाच्या हल्ल्यांचा अजिबात बंदोबस्त कां करीत नाहींस ? या बोलण्याचा यानें राग न मानतां उलट त्यास बक्षीस दिलें.

काफूरच्या शेवटच्या स्वारीनंतर अला उद्दीनाची सत्ता शिखरास पोंचली. ह्या वेळीं मुसलमानी साम्राज्य अगदीं कळसास पोहोंचलें. सबंध हिंदुस्थानभर अला उद्दीनास कोणीहि शत्रु उरला नाहीं. अशा प्रकारची परिस्थिती पुढील काळांतील मोंगली साम्राज्यांतहि आलेली नव्हती. काफूरवर याची बहाल मर्जी असे. या कृपेचा दुरुपयोग करून काफूरनें अला उद्दीनाजवळ आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाचें चालेनासें केलें. प्रत्यक्ष राणी व मुलगे यांच्याशीं सुद्धां सुलतानाचें वैमनस्य काफूरनें पाडून त्यांस अटकेंत ठेविलें. यामुळें उमराव लोक त्रासले, गुजराथेंत बंड झालें, चितोडगड हातचा गेला, दक्षिणेंत रामदेवरावाचा जांवई हरपाळदेव यानें मोठा उठावा करून तो मुसलमान किल्लेदारास हांकून लावून स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. इकडे अला उद्दीनाची तब्येत अव्यवस्थित राहण्यानें दिवसानुदिवस बिघडत चालली होती. वरील बातम्यांमुळें यास क्रोधाच्या लहरी येऊं लागल्या व दुखणें बळावून थोड्याच दिवसांनीं याचा अंत झाला. यानें वीस वर्षे राज्य केलें. कोणी म्हणतात काफूरनेंच याला विषप्रयोग केला. फेरिस्ताप्रमाणें याच्या मृत्यूची तारीख १९ डिसेंबर १३१६ ही आहे; पण (अमीर) खुस्रव हा याच्या कारकीर्दीतील कवि आपल्या दिवाणाच्या बकिय-इ-नकिय भागांत अजमासें ३० डिसेंबर १३१५ देतो. पण २ जानेवारी १३१६ हा दिवस केंब्रिज हिस्ट्रीच्या तिसऱ्या भागाच्या ११९ पानांत दिला आहे.

हा स्वभावानें छांदिष्ट, निर्दय व जुलमी होता, तथापि याचा राज्यकारभार प्रशंसा करण्यासारखा झाला. यानें दिल्ली येथें मजबूत किल्ला बांधला व नवीन तोफा ओतून हत्यारें तयार करवून राजधानीच्या बचावाचा चांगला बंदोबस्त केला. हातीं घेतलेल्या कामांत यास एकसारखें यश येत गेल्यामुळें हा उर्मट व बेपरवा झाला, व स्वतःच्या इच्छेस येईल तसे कायदे करूं लागला. चैनी लोकांस रिकामपणा मिळून मग ते राज्याविरुद्ध कारस्थानें करण्यास प्रवृत्त होतात हें लक्षांत घेऊन यानें एका लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं पुढील गोष्टी केल्या. सरकारच्या परवानगीशिवाय मेजवान्या, लग्नकार्ये वगैरे कोणीं करूं नयेत किंवा एकत्र जमून दरबारप्रकरणीं वादविवाद करूं नयेत. असे कायदे करून गुप्त हेरांची नवीन व्यवस्था सुरू केली. लोकांस गांव, जमिनी इनाम दिल्या होत्या त्या यानें

खालसा केल्या, व कांहींना कांहीं सबबीवर यानें सर्व लोकांस पिळून त्यांजपासून पैसा उकळला. शेतकरी लोकांनीं अमुकच जमीन, गुरें व नोकर ठेवावेत असें ठरविलें व घरावर, दुभत्या गाईम्हशींवर आणि कपड्यालत्त्यांवर कर बसविले. सरकारी वसूल सक्तीनें वसूल केला, तथापि वसुलाच्या बाबतींत लोकांवर जुलूम झाल्यास त्याची चौकशी करण्यास यानें योग्य कामगारहि नेमले होते. यानें जिनसांचे दर कायमचे ठरवून त्याच दरांनीं लोकांना माल विकण्यास लाविलें. हा सरकारी पैसा कर्जाऊ देई. यानें दरबारांत दारू पिण्याची बंदी केली. एकदां यानें शिल्लक असलेली सर्व दारू ओतून दिली. त्यामुळें रस्ताभर पावसाळ्याप्रमाणें चिखल झाला. हिंदूंचा छळ करण्यांत तर यानें कमाल केली. हा क्रूर व धर्मवेडा परंतु शूर, धाडसी व कर्तबगार पुरुष होऊन गेला. याच्या राज्यांत जिकडे-तिकडे वाडे, मशिदी, स्नानगृहें, किल्ले, कबरी, विद्यापीठें वगैरे बांधकामें यक्षिणीनें कांडी फिरविल्याप्रमाणें थोड्या अवधींत दिसूं लागलीं. याच्या कारकीर्दीत विद्वान् मंडळी बरीच पुढें आलेली दिसतात. यास स्वतःस आरंभीं लिहितां येत नव्हतें. तथापि यास पुढें ही गोष्ट लांछनास्पद वाटून हा लिहिण्यावाचण्यास शिकून हुशार झाला. याच्या पदरीं झियाउद्दीन बर्नी नांवाचा इसम होता. त्यानें याच्या कारकीर्दीचा इतिहास लिहिला आहे. याला खिजरखान, शादीखान, शहाबुद्दीन उमर व मुबारक कुत्बुद्दीन नांवांचे मुलगे होते. याच्या पत्नीचें नांव मलिकजहा असें होतें ( अलफखान, अला उल्मुल्क, अलीमर्दनखान खल्जी, कमलदेवी व खिजरखान पाहा ).

**अला उद्दीन इमादशाह**—( स. १४८४-१५२७ ) वऱ्हाडच्या इमादशाहींतील फत्तेउल्लाच्या नंतर हा इमादशाहाचे गादीवर आला ( १५१३ ). बापाचें नांव फत्तेउल्ला हें होय. याची पत्नी युसुफ आदिलशाहची मुलगी खदीजा होय.

यानें गाविलगड ही आपली राजधानी केली. कित्येक कारणांवरून अहमदनगरच्या निजामशाहाशीं अलाउद्दीनाचें वैर जडलें आणि त्याशीं युद्ध करण्याकरितां खानदेश व गुजराथ येथील राजांची यास मदत घ्यावी लागली. त्यासाठीं गुजराथच्या राजास यानें आपला बराच मुलूख दिला. स. १५२७ त हा मरण पावला आणि याचा ज्येष्ठ पुत्र दर्या इमादशाह तख्तावर बसला. हा स. १५३२ च्या सुमारास मरण पावला असें बीलनें म्हटलें आहे.

**अला उद्दीन तर्माशिरीन घियासुद्दीन मुहम्मद**—हा बगदादच्या अल्मुस्तन्सिर नांवाच्या स. १२२६ ते १२४२ मध्यें खिलाफतीचे गादीवर असलेल्या अब्बासीद वंशाच्या खलिफाचे घराण्यांतील एक पुरुष होता. हा ट्रान्सोक्सियानाचा सुलतान मुघलखान याचे आश्रयास असे. स. १३४०-४१ चे सुमारास यानें दिल्लीस सुलतान मुहंमद तुघ्लकाकडे भेटण्यास येण्याची परवानगी मिळविण्याकरितां दोन दूत पाठविले. सुलतान मुहम्मद तुघ्लकाची अशी समजूत होती कीं, कोणाहि सुलतानास त्याच्या सत्तेमागें धर्माचें व ईश्वराचें अधिष्ठान असल्याशिवाय खरी सत्ता गाजविण्याचा अधिकार नीतिदृष्ट्या प्राप्त होत नाहीं. धर्माचें व ईश्वराचें अधिष्ठान आपल्या सत्तेमागें निर्माण करावें असेंहि त्यास वाटे. ईश्वरी अधिष्ठानानें निर्माण झालेल्या खिलाफतीच्या सत्ताधारी खलिफाचा आशीर्वाद आपणास मिळाला व त्यानें आपली सत्ता मान्य केली तर ईश्वराचें अधिष्ठान आपल्या सत्तेमागें असल्याचें तें निदर्शक चिन्ह होईल. अशी मुहम्मद तुघ्लकाची कल्पना असल्यामुळें त्यानें हे दूत दिल्लीस आल्याबरोबर अल्लाउद्दीन तर्माशिरीन हा खरोखरच अब्बासिद वंशांतील आहे किंवा नाहीं याची खात्री करून घेतली व खात्री पटल्याबरोबर तर्माशिरीन याचें मोठ्या थाटानें व आदरानें स्वागत केलें. याच्या दूतांसच पांच पांच हजार तम्न दिलें. तर्माशिरीनकरितां दूतांजवळ ३०००० तम्न देऊन यास दिल्लीस घेऊन येण्यास सांगितलें. तर्माशिरीन हिंदुस्थानांत येऊन पोहोंचल्यावर दिल्लीचे वाटेवर याचें स्वागत करण्याकरितां दिल्लींतील मुख्य धर्माधिकाऱ्यांस लवाजम्यानिशीं शिर्सा येथें पाठविण्यांत आलें. स्वतः सुलतान मसुदाबाद ( बहादूरगड ) पर्यंत गेला. दरबारी पद्धतीस अनुसरून नजराणे झाले व नंतर दिल्लीकडे जावयास निघण्याची तयारी झाली. तेव्हां ज्या घोड्यावर तर्माशिरीन बसावयाचा होता त्याची रिकीबी सुलतानानें स्वतः हातीं धरून तर्माशिरीन यास घोड्यावर बसविलें; व मग दोघांवरहि राजछत्र धरण्यांत आलें. दिल्लीस आल्यावर तर्माशिरीन याचा सुलतानानें जो सन्मान केला तो तर अभूतपूर्व होता. याला एक राजवाडा राहावयास देण्यांत आला. या राजवाड्यांतील यच्चयावत् भांडींकुंडीं सोन्याचांदीचीं होतीं. स्नानाचें भांडें सोन्याचेंच होतें. ज्या दिवशीं राजवाड्यांत तर्माशिरीननें प्रथम स्नान केलें त्या दिवशीं या सन्मानाची भेट म्हणून ४०००० तम्न नजराणा देण्यांत आला. अनेक दासदासी गुलाम याच्या तैनातीस देण्यांत आले व रोजच्या हातखर्चाकरितां ३०० तम्नांची नेमणूक दिली. शिवाय रोजचा शिधा, नोकरांचा पगार राजावाड्यामार्फतच होई. अला उद्दीनानें बसविलेलें

शिरी शहर त्यांतील सर्व राजवाडे, बागा, मळे या सुद्धां यास जहागीर देण्यांत येऊन या जहागीरींत दिल्लीचे आसपासच्या ३०० खेड्यांचा समावेश करण्यांत आला होता. दिल्ली प्रांताच्या पूर्व भागाची सुभेदारीहि यास देण्यांत आली. इतका ज्याचा सन्मान करण्यांत आला व ज्यास तो केवळ एका पूज्य व उच्च कुळांत जन्मला म्हणूनच बहाल करण्यांत आला तो तर्माशिरीन मनानें कद्रु, कवडी-चुंबक व नादान होता. इब्न बतूतानें याच्या बागणुकीचें निरीक्षण करून खालील माहिती नमूद करून ठेविली आहे. " यास राजवैभव प्राप्त झालें असूनहि हा एकटाच भोजन करी. एकटा जेवण्याचें अभिमान हें कारण नव्हतें. हा स्वतःच असें सांगे कीं, दुसऱ्यांनीं आपलें अन्न खाल्लेलें आपणांस पाहवत नाहीं. " निष्कारण खर्च नको म्हणून रात्रीच्या आपल्या बसावयाच्या दालनांत दिवा न लावतां अंधारांतच हा बसे. जाळण्याकरितां बागेंतल्या काटक्या स्वतः जमा करी व त्या सांठवून ठेवी. याच्या दिमतीला दिलेल्या दासदासींस व हुजऱ्यांस हा शेतावरील काम करावयास लावी ( कें. हि. ).

**अला उद्दीन पूर्वी**—हा एक बंगालचा सुलतान होय. हा फीरूझ पूर्वी याच्यानंतर स. १४९६ मध्यें बंगालच्या गादीवर आला. हा पराक्रमी व सज्जन होता. हा मोठ्या ऐश्वर्यानें सन १५२३ पर्यंत राज्यकाभार करून मरण पावला. याच्यानंतर याचा मुलगा नशीब हा गादीवर आला ( मु. रि. भा. १, पृ. ३२० ).

**अला उद्दीनशाह बाहमनी**—(स. १३४७-१३५८) दक्षिणेंतील बाहामनी राज्याचा संस्थापक. याचेंच दुसरें नांव हसनगंगू ऊर्फ जाफरखान ( हसन गंगू पाहा ).

**२.** ( स. १४३५-१४५८ ) बाहामनी राज्याचा सुलतान अहमदशाहाचा हा मुलगा होय. हा अहमदशाहानंतर सुलतानाचे गादीवर आला.

विजयानगरच्या राजानें ५ वर्षे खंडणी न दिल्यामुळें त्याजवर यानें आपल्या भावास पाठविलें. परत येतांना याच्या भावानें बंड केलें. यानें त्याचा बेदरानजीक पराभव केला. विजयानगरच्या देवरायानें मुसलमानांचा पराभव करण्याच्या हेतूनें याजवर स्वारी केली. पहिल्या लढाईत हिंदूंचा व दुसऱ्या दोन लढायांत मुसलमानांचा जय झाला. देवरायानें दरसाल खंडणी देण्याचें कबूल केलें.

शेवटीं यानें आपल्या भावास क्षमा करून उदारपणानें रायचुरचा किल्ला व मुलूख दिला. यानंतर स. १४५८ मध्यें हा मरण पावला व याच्यानंतर याचा मुलगा हुमायूनशाह गादीवर बसला. यानें मुलकी व लष्करी खात्यांत सुधारणा केली.

गादीवर आल्यावर यानें एक मशीद बांधिली. यानें अनेक धर्मकृत्यें केलीं. हा दर शुक्रवारीं स्वतः खुत्बा पढून लोकांस धर्मोपदेश करी. यानें मद्यप्राशनाची बंदी केली. यानें अनेक बंदें मोडलीं. मुहंमद गवान प्रथमतः याच्या वेळीं प्रसिद्धीस आला. हा धूर्त व विद्येचा भोक्ता होता. याच्याच कारकीर्दीत नरसिंहसरस्वती हा साधु उदयास आला. गुरुचरित्रांतील बेदरच्या शाहाच्या पायाचा फोड बरा केल्याची गोष्ट याच्याच बद्दलची आहे, असें रा. चिं. वि. वैद्य म्हणतात.

**३.** ( स. १५२१-२३ ) हा दुसऱ्या महमूदशहा बाहामनीचा मुलगा होय.

हा बाहामनी राज्यांतील दुसऱ्या अहमदाचा भाऊ होय. हा आपल्या भावानंतर गादीवर बसला. परंतु वजीर अहमद बरीद यानें याला पदच्युत करून याचा वडील भाऊ वली-उल्लाह यास गादीवर बसविलें.

शेवटीं याचा खून झाला. याच वेळीं बाहमनी राज्याचे पांच तुकडे होऊन निजामशाही, आदिलशाही, कुत्बशाही, बरीदशाही व इमादशाही हीं पांच राज्यें अस्तित्वांत आलीं.

**अला उद्दीन मस्ऊद**—( स.१२४२-४६ ) दिल्लीच्या गुलामघराण्यांतील बहिरामचा पुतण्या. हा बहिराम नंतर गादीवर आला. हा रुक्नुद्दीनचा मुलगा.

याच्या वेळींहि दंगेधोपे चालून होते. हा क्रूर व चैनी असल्यामुळें राज्यकारभाराकडे याचें लक्ष नसे. दरबारच्या लोकांनीं याला कैद करून याचा चुलता नासिरुद्दीन यास राज्यपद दिलें. हा कैदेंतच मरण पावला. याच्या वेळीं मोंगलांनीं हिंदुस्थानावर दोन स्वाऱ्या केल्या. परंतु दोन्ही वेळां यास माघार घ्यावी लागली.

**अला उद्दीन सय्यद**—दिल्लीच्या सय्यद घराण्यांतील मुहंमदाचा हा मुलगा. हा आपल्या बापानंतर दिल्लीच्या गादीवर आला ( स. १४४५ ).

हा बापापेक्षांहि दुर्बळ निघाल्यामुळें दिल्लीपतीची सत्ता राजधानीच्या शहराबाहेर फारशी उरली नाहीं. तैमूरलंग परत गेल्यावर पुष्कळ सुभेदार स्वतंत्र झाले, तरी राजधानीचे सभोंवार बराच मुलूख राहिला होता. पण तोहि आतां गेला. तशांत बहलूलसारखा कावेबाज मनुष्य अनुकूल प्रसंगाची वाट पाहत होता. बदाऊन म्हणून अला उद्दीनानें स्वतः वसविलेलें व याच्या आवडीचें एक शहर होतें. तेथें हा जाऊन राहिला. हें

ह्याच्या वजीरास पसंत नव्हतें. त्यामुळें दोघांत वितुष्ट आलें. शेवटीं अला उद्दीननें स्वतःच खुशीनें सर्व राज्य बहलूल लोदी याच्या स्वाधीन करून आपण बदाऊन येथें राहण्याचें कबूल केलें. तेथें सन १४७८ त याचा अंत झाला ( मु. रि. भा. १ ला, पृ. १८७-८८ ).

**अला उद्दौला** ( ऊर्फ **अल् करीम गझनवी** )— ( स. १०९९ ते १११५ ) इब्राहिम गझनीचा हा २३ वा मुलगा. हा स. १०९९ मध्यें गझनीचा अमीर झाला. यानें १७ वर्षें शांततेनें राज्य केलें. याच्या कारकीर्दीतील दोनच गोष्टी महत्त्वाच्या अशा सांगण्यासारख्या आहेत. तुघासिगिन यानें गंगापार स्वारी केली, पण त्याची हकीगत उपलब्ध नाहीं. शंसबानी राजघराण्यांतील सामचा मुलगा हुसेन याची प्रप्रांतावर केलेली नेमणूक. या दुसऱ्या गोष्टीचें महत्त्व इतकेंच कीं, गझनीच्या साम्राज्याच्या या पडत्या काळांतही शंसबानी राजघराणें गझनीचें मांडलिक समजलें जात होतें. हा वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी स. १११५ त वारला ( कें. हि. ). गझनीच्या यामिनी वंशांतील तिसरा मसूद म्हणून हा प्रसिद्ध आहे.

**अला उल्मुल्क कोतवाल**—( स. १२९४-१२९९ ) अला उल्मुल्क हा अला उद्दीन खल्जीचे कारकीर्दीत त्यास ज्या चार सरदारांनीं विशेष मदत केली त्यांपैकीं एक होता. स. १२९४ चे सुमारास अला उद्दीनाचे मनांत देवगिरीवर स्वारी करून आपली सत्ता, सामर्थ्य, संपत्ति व कीर्ति वाढवून जमल्यास दिल्लीचे तक्तावर विराजमान होण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. देवगिरीवर स्वारी करण्यास जाण्यास आपला चुलता सुलतान जलालुद्दीन फीरूझशाह परवानगी देणार नाहीं म्हणून त्यानें अला उल्मुल्कला आपल्या मसलतींत घेतलें. अला उल्मुल्क याजकडे कोराच्या सुभेदारीचे आपले सर्व अधिकार त्यानें दिले. सुलतानास पाठवावयाच्या नियतकालिक अहवालांवरून अला उद्दीन काराहून कोठें पसार झाला आहे अशी शंका सुलतानास येणार नाहीं किंवा ज्या कामगिरीवर तो निघाला होता त्या कामगिरींत यश मिळाल्यास अला उद्दीन आपला घात करील अशीहि शंका सुलतानास येणार नाहीं, अशा खुबीनें अहवाल पाठविण्याची कामगिरीहि अला उल्मुल्ककडे सोपविण्यांत आली होती. दोन्हीहि कामगिऱ्या अला उल्मुल्कनें मोठ्या चातुर्यानें व खबरदारीनें पार पाडल्यामुळें अला उद्दीनास देवगिरीचे कारवाईंत यश मिळून तो प्रचंड लूट बरोबर घेऊन काराकडे परत फिरेपर्यंत त्याच्या देवगिरीच्या स्वारीची व कारस्थानाची यत्किंचितहि माहिती सुलतानास मिळाली नाहीं. स. १२९६ मध्यें विश्वासघात करून आपल्या चुलत्याचा माणिकपूरजवळ खून करून दिल्लीचे सुलतान पदावर विराजमान होण्याची महत्त्वाकांक्षा यशस्वी केल्यावर अला उद्दीनानें या यशाचें बक्षीस म्हणून दिल्लीच्या कोतवालाच्या मोठ्या अधिकारावर अला उल्मुल्कची नेमणूक केली. या सुमारास अला उल्मुल्कचे अंगांत वात शिरून हा बेसुमार लठ्ठ झाला असल्यामुळें सेनापतित्वास नालायक झाला होता. नाहींतर एखादी सुभेदारीहि यास अला उद्दीनानें खुषीनें दिली असती.

अला उद्दीनास सवाई सिकंदर होऊन जगज्जेत्यांच्या बरोबरीचें आपण व्हावें असें वाटत असे. त्याचप्रमाणें राजकीय सत्ताधीशत्वाबरोबर धार्मिक सत्ताधीशत्वहि आपणाकडेच असावें असेंहि त्यास वाटे. सिकंदराप्रमाणें जगज्जेत्याचें ऐहिक ऐश्वर्य व मुहंमदाप्रमाणें धर्मसंस्थापकाची राजर्षीची ऐहिकपारलौकिक थोरवी अशा दोन्हीहि सिद्धी प्राप्त होण्याची आपली लायकी आहे असें तो समजत असे. आपल्या जिगरदोस्तांस तो नेहमीं विचारी कीं, सिकंदर व मुहंमद या दोघांच्याहि ऐश्वर्याहून सरस ऐश्वर्य मिळविण्याची माझी धमक नाहीं का ?

त्याचे दोस्त जगज्जेता होण्याच्या त्याच्या महत्त्वाकांक्षेचें कौतुक करून त्यास प्रोत्साहन देत. परंतु राजर्षि होण्याचा त्याच्या इच्छेसंबंधीं मात्र मूकवृत्ति स्वीकारून त्यास तितकेंच नाउमेद करीत. धर्माध्यक्षाचा मुकुट धारण केल्याचें जाहीर करावें किंवा न करावें याची भवति न भवति करण्याकरितां अला उद्दीन राजवाड्यांत मजलसीहि करी. परंतु कोतवाल अलाउल्मुक वातबद्धतेमुळें याचें शरीर अस्ताव्यस्त वाढल्यानें या मजलसीस हजर राहत नसे. या विषयावर आपलें मत उघडपणें राजवाड्यांतील मजलसींत जाहीर करण्याचा यास एकदां हुकूम झाला. या धार्मिक विषयावरील मतप्रदर्शनाचे वेळीं दारूपान अयोग्य म्हणून दारूच्या सुरया उचलून ठेवण्यास प्रथम सांगून राजाच्या अत्यंत विश्वासांतील उमरावांशिवाय बाकीच्यांनीं सभागृह सोडून जावें, अशी यानें सर्वांस विनंती केली. अगदीं शेलके लोक शिल्लक राहिल्यावर हा म्हणाला, ' मी स्पष्ट बोलतों याबद्दल मजवर कृपा करून रागावूं नका. पण रागावलांत तरी या महत्त्वाच्या विषयावरील माझीं मतें स्पष्टपणें प्रदर्शित करतांना मी आपल्या रागाची पर्वा करणार नाहीं. धार्मिक सुधारणा करण्याचें काम प्रेषितांचें आहे, राजांचें नव्हें. आर्थिक अथवा सैनिक सत्तेचे जोरावर धर्मसुधारणा यशस्वी करतां यावयाच्या नाहींत. धर्मसुधारणा यशस्वी होणें न होणें ईश्वरी इच्छेवर सर्वस्वीं अवलंबून आहे. राजा कितीहि सामर्थ्यवान्

असला तरी नवधर्मसंस्थापना करण्याच्या प्रयत्नांत त्यास यश मिळावयाचें नाहीं.' हें विवेचन ऐकून अला उद्दीन विचारमग्न झाला व कांहीं वेळानें मस्तक वर करून म्हणाला, 'अला उल्मुल्कनें केलेल्या कानउघाडणीमुळें मी जागा झालों आहें. माझी चूक माझ्या चांगली ध्यानांत आली आहे. यापुढें नवधर्मसंस्थापनाचा धर्मद्रोही प्रयत्न मी कधींहि करणार नाहीं.' राजाचें हें आश्वासन ऐकून अला उल्मुल्कला धीर आला व यानें अला उद्दिनासमक्ष त्याच्या दुसऱ्या महत्त्वाकांक्षेसंबंधानें व त्याच्या कांहीं घातुक संवयींसंबंधानें आपले मत निर्भीडपणें व्यक्त केलें. 'सवाई सिकंदर होण्याची महत्त्वाकांक्षा नीति अनीतीचा संबंध नसल्यानें दोषार्ह नाहीं. तरी या महत्त्वाकांक्षेस मूर्त स्वरूप आणण्याचा विचार पुढचा आहे. हिंदुस्थानांत अद्याप दिल्लीचे सत्तेबाहेर असलेले पुष्कळ प्रांत आहेत.'

'मोंगल लोक स्वाऱ्या करून लोकांचे वारंवार हाल करीत आहेत व शिवाय, राजेसाहेब, आपण सिकंदरप्रमाणें मुलूखगिरीवर जाल, तेव्हां आपल्या सध्यांच्या राज्याचा कारभार मुत्सद्दीपणानें चालविण्यास सिकंदरप्रमाणें एखादा ॲरिस्टॉटलहि आपले पदरीं नाहीं. जिकाल त्या प्रांतांचा बंदोबस्त करावयास आपल्या पदरीं पुरेसें कर्तबगार सरदारहि नाहींत. तूर्त राजेसाहेबांनीं, दारूपान सोडून देऊन शिकारींत व्यर्थ जात असलेला वेळ राज्यकारभाराकडे खर्च करण्याची महत्त्वाकांक्षा धरावी हेंच उचित आहे.' सुलतान अला उद्दीनानें या निर्भीड सल्ल्याबद्दल अला उल्मुल्कचे आभार मानले व यास योग्य असें बक्षीसहि दिलें.

स. १२९९ मध्यें मोंगलांची स्वारी दिल्लीपर्यंत येऊन दिल्लीस वेढा घालण्याची मोंगलांनीं तयारी केली, तेव्हां अला उद्दीनानें मोंगलांचा मोड करावयास दिल्लीतून बाहेर पडतांना अला उल्मुल्कला दिल्लीचे राज्यकारभाराचे सर्वाधिकार दिले होते. यानंतर पुढें थोड्याच दिवसांनीं अला-उल्मुल्क वारला ( कें. हि. ).

**अला दाउद बंदरी**—फीरूजशाह बाहामनी यानें हिंदूंवर एकंदर चोवीस स्वाऱ्या केल्या. यांविषयीं सर्वांचें एकमत आहे. पण ह्यांपैकीं कांहीं स्वाऱ्यांचें वर्णन यानें तुहफत उसलातीन या ग्रंथांत केलें आहे ( बहमनी रा. इतिहास-मोडक, पान ८६ ).

**अलाविर्दीखान**—(स.१७४०–५६ ) अलाविर्दीखान असा शुद्ध उच्चार आहे. पण डचनें अलीवर्दीखान असें यांचें नांव दिलें आहे. अलीवर्दीखान याचा बाप अजमशाहाचा नोकर होता. हा प्रथम बंगालचा नबाब सुजाउद्दीनखान याच्या पदरीं होता. याला पुढें बहारचा सुभेदार नेमिलें. यानें डोईजड राजांची पुरी खोड मोडली. पुढें सुजाउद्दीनच्या मरणानंतर हा बंगाल, बहार, ओरिसा प्रांतांवर सत्ता गाजवूं लागला. यानें पहिलीं ११ वर्षें मराठ्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या परतविण्यांत घालविलीं. यानें वरील तीन प्रांतांवर १६ वर्षें राज्यकारभार केला. हा स. १७५६ त मरण पावला. यानें राजकारणांत फारच दुष्ट कृत्यें केलीं.

स. १७४४चा पावसाळा संपल्यावर भोसल्यानें बंगालवर स्वारी केली. तेव्हां यानें सलोखा करण्याच्या मिषानें भोंसल्याच्या मुख्य भास्करराम कोल्हटकर यास मेजवानीस बोलावून विश्वासघातानें त्याचा खून केला (स. १७५५).

**अलासिंग**—( पतियाळ ) हा पतियाळाचा संस्थानिक असून याला अहमदशाहा दुराणीनें स. १७६२ सालीं राजा हा किताब दिला. त्या वेळेपासून या संस्थानास खरी सुरवात झाली.

परंतु खरी सुरवात स. १७६३ सालीं शीख लोकांनीं अहमदशाहाच्या सुभेदारांपासून सरहिंदचा किल्ला घेऊन प्रांताची विभागणी केली तेव्हांपासून होते. या विभागणींत, सरहिंद व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश याच्या वांट्याला आला. हा स. १७६५ त वारला. याच्यानंतर याचा नातू अमरसिंग गादीवर आला.

**अलिकसुंदर**—अलेक्झांडर शब्दाचें संस्कृतीकरण ( सिकंदर पाहा ).

**अली बिन अझीझ उलूह तवातबा**—हा मुसलमान इतिहासकार. यानें बुर्हान-इ-मआसिर नांवाचा इतिहास लिहिला. त्यांमध्यें बाहमनी व अहमदनगरच्या निजामशाहीचा इतिहास आहे. इंडियन ॲंटिक्वेरीमध्यें किंग व हेग यांनीं त्याचें इंग्रजी भाषांतर केलें.

**अली अबुल हसन गझनवी**—(२९ डिसेंबर१०४९ ते १०५२ ) अली अबुल हसन हा मौदूद गझनवीचा भाऊ. मौदूद २९ डिसेंबर १०४९ रोजीं वारला. तेव्हां राजवाड्यांतील चाकरांनीं त्याच्या इच्छेस अनुसरून त्याचा अल्पवयी मुलगा मसूद तीन वर्षांचा होता त्यास अमीर केल्याचें जाहीर केलें व त्याचे आईस राज्यकारभार पाहण्यास सांगितलें. हा प्रकार गझनीच्या उमरावांस न विचारतां केलेला असल्यानें त्यांनीं मसूद यास पदच्युत केल्याचें व त्याचा चुलता अली अबुल हसन यास अमीर केल्याचा जाहीरनामा २९ डिसेंबर १०४९ रोजीं काढला. अलीनें आपल्या भावाची बायको सल्जूकराजकन्या इजबरोबर विवाह केला. अली दुबळा होता. राज्यकारभाराची जबाबदारी यास रेटेना. तेव्हां स. १०५२ मध्यें महमूदचा मुलगा इझ्झुद्दौला अब्दुल रशीद कैदेतून

सुटून गझनीवर चाल करून आला व अलीला त्यानें पदच्युत केलें. स. १०५२ ( कें. हि. ).

**अली आदिलशाह**— ( स. १५५७-१५८० ) विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील पहिल्या इब्राहीमचा हा पुत्र होय. हा असदखानाचे कन्येपासून इब्राहीमास झाला.

लहानपणीं याचा कल शियापंथाकडे असल्यामुळें याजवर राजाची गैरमर्जी झाली व याची रवानगी असदखानाकडे केली. याची असदखानाकडे रवानगी केल्यावर ' गादीचा वारस, आपला धाकटा पुत्र तहमास्प हा आहे ' असें इब्राहीमानें जाहीर करून अलीस विषप्रयोग करावा किंवा ठार मारून टाकावें, असा निरोप असदखानाकडे पाठविला. त्या वेळीं असदखानाचा पुत्र कीश्वरखान हा हुजूर चाकरीवर मिरजेस होता. त्यानें ज्योतिषास बोलावून तहमास्प आणि अली यांच्या दैवाची परीक्षा करविली. त्यांत तहमास्प हा दुर्दैवी दिसून बहुतेक ग्रह अनिष्ट व प्रतिकूल दिसले. अलीस ग्रहगणाची अनुकुलता व नक्षत्राची उत्तम दृष्टी दिसली, आणि मोठा दैववान् व यशस्वी होणार असें ज्योतिषांच्या गणितावरून समजलें. तेव्हां कीश्वरखानानें वरील ज्योतिष्याची माहिती गुप्त रीतीनें असदखानास कळवून त्यास सुरक्षित ठिकाणीं ठेवण्यास सांगितलें. तेव्हां असदखानानें बादशाहाचे समाधानाकरितां हरणाचे दोन डोळे काढून व मुलाचें एक बोट तोडून बादशाहाकडे रवाना केलें आणि विनंतिपत्रांत लिहिलें कीं, हुकुमाप्रमाणें अली याचे दोन्ही नेत्र काढून व एक बोट तोडून त्याजला ठार केलें आहे.

नंतर इब्राहीम वारला. तेव्हां जयदखान हवालदार विजापूरकर यानें बादशाहाचें प्रेत गोगीस पाठवून शाहाजादा तहमास्प याजला कैदेंत ठेविलें. आणि असदखानास लिहून पाठविलें. खानानें हें वर्तमान ऐकतांच अली याजला कैदेंतून मुक्त करून बादशाही पोषाखानिशीं त्यास बाहेर काढलें आणि सरंजामानिशीं मिरजेहून विजापुरास पाठविलें. अली विजापूरास आल्यावर सर्व सरदारांनीं आणि कामदारांनीं सामोरे येऊन यास नजर करणे केले व नंतर हा बादशाही ऐश्वर्यानें विजापूरच्या आदिलशाही तख्तावर बसला. पुढें यानें तहमास्प व त्याचे कुटुंबांतील मंडळींना प्रतिबंधांत ठेविलें.

याला लहानपणींच मोठ्या विद्वान् गुरूपासून चांगलें शिक्षण मिळालें होतें. अनेक लिपींचीं अक्षरें अली चांगलीं लिहीत असे. व्युत्पत्ति चांगली झाली असून हा अनेक ग्रंथ वाचत होता. याला बहुत वैता (कविता) आणि दृष्टांत पाठ येत असत. लहानपणापासून मोठा धर्मनिष्ठ व दयावंत होता. तख्तावर आल्यापासून यानें आपली वागणूक शिस्तवार ठेविली. जरी यानें शिया पंथ स्वीकारला होता तरी सुनी पंथाच्या लोकांना उपद्रव न होईल अशी व्यवस्था केली. याची दातृत्वशक्ति विलक्षण होती. जरी हिंदु जातीचा साधु आला तरी त्याची परीक्षा घेऊन त्याच्या योग्यतेनुरूप त्यास हा संभावना देत असे. हा स्वतः ऐषआराम व चैन कधीं भोगींत नव्हता व आपले अंगावर अलंकारभूषणें घालीत नसे. बादशाही तख्तावर बसून न्याय आणि इन्साफ अगदीं निःपक्षपातानें करी. या सद्गुणास यानें आरंभापासून अखेरपर्यंत सोडलें नाहीं. प्रजेच्या सुखाकडे व त्यांच्या हक्काकडे व मानापमानाकडे लक्ष देऊन अगदीं यथान्याय वसूल घेऊन पृथ्वीवरील मोठ्या न्यायी व नीतिमान राजांत यानें आपली गणना करून घेतली.

यानें गादीवर आल्यावर पहिल्याच वर्षी कीश्वरखान यास विजयानगरच्या रामराजाशीं तह करण्याकरितां पाठविलें. नंतर हा स्वतः विजयानगरास रामराजाच्या भेटीस गेला. रामराजानें याचा चांगल्या प्रकारें सत्कार करून याच्याशीं मैत्री संपादिली. हुसेन निजामशाहा यानें याच्याविरुद्ध युद्ध पुकारलें. तेव्हां यानें रामराजाची मदत घेऊन हुसेनचा पूर्ण पराभव केला व त्याचा बराचसा मुलूख ओसाड पाडला. नंतर हुसेननें कल्याणीचा किल्ला अली आदिलशाहास देऊन याच्याशीं तह केला. प्रत्येक वेळेस रामराजाची मदत मागितल्यामुळें रामराजास गर्व होऊन तो अलीस डोईजड होऊं लागला व मुसलमानांच्या मुलखास बेधडक उपद्रव देऊं लागला. यामुळें अली फार कंटाळला आणि रामराजाचा फडशा केल्याशिवाय मुसलमानी अमलाचा बचाव करण्यास दुसरा मार्ग नाहीं अशी याची खात्री झाली. तेव्हां यानें दक्षिणेंतील सर्व मुसलमानांची एकी करून रामराजाचा फडशा उडविण्याचा व्यूह रचिला. त्याप्रमाणें उभयतांची लढाई तालीकोट किंवा राक्षस-तागडी येथें होऊन त्यांत रामराजाचा पूर्ण पराभव झाला व त्याच लढाईंत रामराजा मारला गेला ( स. १५६५ ). रामराजाच्या मृत्यूनंतर यानें राज्यविस्तार बराच करून आपलें महत्त्व वाढविलें.

याला पुत्र नव्हता म्हणून यानें सन १५७९ मध्यें आपला बंधु तहमास्प याचा पुत्र इब्राहीम यास आपल्या मागें गादी मिळावी असा ठराव केला. पुढील सालीं स. १५८० मध्यें याचा एका खोजानें वध केला. (चांदबिबी पाहा.) याचें कारण त्यास बेदरच्या दरबारांतून त्याची खुषी नसतांना अली आदिलशाहानें जुल्लुमानें विजापुरीं आणलें होतें.

यास विजापूर शहरींच पुरलें. याचे कबरेस रोझाअली असें म्हणतात व ती अद्याप आहे. याजकडे अकबर बादशहाकडून दोन वकील आले होते. शेवटीं आलेला वकील, राजा मरण पावला त्या वेळीं विजापुरींच होता. जुम्मा-मशीद, हाबशी शहापूर, शहरचा तट आणि रस्तोरस्तीं पाणी नेण्याचे नळ हीं कामें अली आदिलशाहाच्या कारकीर्दीत झालीं ( विजापूरचें आदिलशाही घराणें, मोडककृत. ).

**२.** ( स. १६५७-१६७२ )—विजापुरच्या मुहंमद आदिलशाहाचा हा पुत्र होय. याचा जन्म स. १६३८ या सालीं झाला. याच्या वयास चार वर्षे चार महिने चार दिवस होतांच सुलतान मुहंमदानें ( याचा बाप ) याच्या विद्याभ्यासाकडे लक्ष पोहोंचवून व सर्व प्रकारच्या विद्या शिकविण्यास योग्य शिक्षक नेमून स. १६४२ मध्यें बिस्मील्लाचा समारंभ केला. स. १६४४ मध्यें म्हणजे याच्या वयाच्या सातव्या वर्षी याची सुन्नत केली. थोड्याच दिवसांत याला लिहिणें, वाचणें, कसरत, तीर, भाला, बर्ची, तलवार वापरण्यास व घोड्यावर बसण्यास शिकविलें. याला सुलतान मुहंमद मरण पावल्यावर व वयाच्या १९ व्या वर्षी स. १६५७ मध्यें तक्तावर बसविलें.

प्रथम मदारखान मुहंमद हाच याचा कारभार पाहत असे. पण त्याच्या मृत्यूनंतर दिवाणाच्या कामावर इब्राहीमखानाची नेमणूक केली. कांहीं दिवसांनीं इब्राहीम मक्केच्या यात्रेस गेला म्हणून इब्राहीमचा मुलगा अबदुल्ला मुहंमद हाच दिवाणाचें काम पाहूं लागला व याच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत याच्याच तंत्रानें सर्व कारभार चाले.

याला गादीवर येऊन एक वर्ष झालें नाहीं तोंच औरंगजेबानें याच्यावर स्वारी करून याचे दोन किल्ले घेतले. त्याच वेळीं मराठ्यांचा राजा शिवाजी यानेंहि याच्या राज्यांत धुमाकूळ चालविला होता. तेव्हां यानें औरंगजेबाचा बंदोबस्त करण्याकरितां खानखानान मुहंमद यास पाठविलें. खानखानानें औरंगजेबास चारी बाजूंनीं कोंडून त्याची दाणावैरण अजिबात बंद करून टाकली. तेव्हां निरुपायास्तव औरंगजेबानें खानखानाची विनवणी करून सुटका करून घेतली.नंतर यानें शिवाजीची बंडाळी मोडण्याकरितां अफझुलखानास दहा हजार निवडक सैन्यासह पाठविलें. पण शिवाजीनें मोठ्या युक्तीनें अफझुलखानाचा वध करून त्याच्या सैन्याचा पराभव केला ( स. १६५९ ). ही बातमी कळतांच यास फार वाईट वाटलें. नंतर अफझुलखानाच्या सूडाकरितां यानें शिवाजीवर सलाबतखानास पाठविलें. पण त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं अली मोठ्या फौजेनिशीं शिवाजीवर चालून गेला. अलीच्या स्वारीमुळें शिवाजीचें फारसें नुकसान न होऊन अलीस परत विजापुरीं यावें लागलें. याच वेळीं याला सिद्दी जोहाराशीं लढाया कराव्या लागल्या. वरील सर्व शत्रूंत शिवाजीनें विजापूरच्या राज्यांत फारच बंडाळी माजविली होती व शिवाजीमुळें मोंगलांच्या स्वाऱ्या विजापूरच्या राज्यावर झाल्या. मोगलांचा सरदार जयसिंग याच्या विजापूरच्या राज्यावर सारख्या स्वाऱ्या होत होत्या. पण त्याचा आदिलशाही सैन्याकडून वेळोवेळीं पराजय होत असे. स. १६६६ मध्यें याच्या सैन्यानें जयसिंग या मोंगली-सरदाराचा पूर्ण पराभव केला. अशा प्रकारें याला मोंगल व मराठ्यांचा शिवाजी असे दोन शत्रु होते.

याचें प्रजापालनाकडे चांगलें लक्ष होतें. हा विद्वान् असून गुणीजनांचा भोक्ता होता. ख्यालीं खुशालीकडे जरी याचें लक्ष होतें, तरी हा नियमित आचरणी होता. याला स्वतः कविता करितां येत असून याचा हिंदुस्थानी कवितेकडे ओढा फार असे. दरबारांत बहुतेक कविता करणारांचा भरणा जास्त होता. या कवींत मिया नसती हा सर्वांत श्रेष्ठ गणला जाई. त्याच वेळीं मियाहषम हा एक जन्मांध कवि होता. त्यानेंहि आपल्या कविता उर्दु भाषेंत फार नामी केल्या आहेत. दुसरे आणखी कांहीं कवि याच्या दरबारीं होते. हा जिवंत होता तोंपर्यंत दरबारांतील अंतर्गत वैमनस्यें उघडकीस आलीं नव्हतीं. स. १६७२ मध्यें याचा मृत्यु झाला.

हा तख्तावर बसला त्याच्या पहिल्या वर्षी यानें हसनी महाल बांधिला. स. १६६० त यानें शिवाजीकडून पन्हाळा घेतला. हा फार विषयी होता. याला तीनशें बायका असून त्यांच्याशीं सुखोपभोगाकरितां यानें शयनमंदिर बांधिलें व त्यास 'आरसेमहाल' असें नांव दिलें. स. १६६२ सालीं शाहा पेठ बांधिली.

मृत्युसमयीं याचें वय ३५ वर्षांचें असून यानें १६ वर्षे सहा महिने राज्य चालविलें ( मोडककृत-विजापूरचें आदिलशाही घराणें ).

**अली कुली**—शिवाजी आग्र्याहून पळून गेल्यावर बादशहानें सर्व अधिकाऱ्यांना तो सांपडेल तेथें पकडण्याचा हुकूम काढला. तेव्हां एके दिवशीं बैराग्याच्या वेषांत असणाऱ्या शिवाजीस व त्याचे लोकांना यानें पकडलें. तेव्हां अटकेंत असतां शिवाजीनें अलीच्या समोर जाऊन मीच तो शिवाजी असें सांगितलें आणि आपल्या जवळचा एक मौल्यवान हिरा याचे हातावर ठेवला.

एवज्यानें याचें समाधान झालें व शिवाजी सुरक्षितपणें निसटला. अली कुलीच्या गांवाचें नांव सांपडत नाहीं ( श्री. सरकारकृत शिवाजी अँड हिज टाइम्स, पृ. १८९ ).

**अलीखान**—काश्मीरच्या मुसलमान वंशांतील शीरशामक शिहाबुद्दीनाचा हा दुसरा मुलगा.

**अलीखान लूरी**—हा गोवळकोंड्याच्या मुहंमद-कुली कुत्बशाह याचा एक सरदार होता. पण यानें मुहंमदाचे विरुद्ध रंगराय ( विजयानगरचा राजा ) याचा जांवई जो मिकर तिम्म यास विजयानगरचे जिंकलेले प्रांत परत मिळविणेस मदत केली.

**अली गौहर**—( शहा अलम पाहा ).

**अली बरीद शाहा**—(स. १५४९-१५६२) बेदरच्या बरीदशाही वंशांतील अमीर बरीदाचा मुलगा. यानेंच प्रथमतः शाहा हा किताब धारण केला. अहमदनगरच्या निजामशाहानें याच्या राज्याचा बराच भाग हल्ला करून घेतला. हा स. १५६२ त मरण पावला. याच्यानंतर त्याचा पुत्र इब्राहीम बरीद शाहा हा बेदरच्या गादीवर आला.

**२.** ( स. १६०९-१९ ) बेदरच्या बरीद वंशांतील हा अली बरीदाचा मुलगा.

**अली बहादर**—( स. १७६०-१८०२) हा पहिल्या बाजीराव पेशव्याचा नातू व समशेर बहादरला मेहेरबाई नांवाच्या स्त्रीच्या पोटीं झालेला पुत्र. याला कृष्णसिंग असेंहि म्हणत. याचा जन्म सन १७५८ असा रियासतकार देतात. पण भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत याचा जन्म स. १७६० मध्यें झाल्याचें दिलें आहे ( ६.१०६ ).

यानें आपला शिक्षक जो यमाजीपंत यास आपणांस शिकविण्याबद्दल सरकारांतून पगार चालू व्हावा व आपला पहिला घोडा मेला असून दुसरा चांगला घोडा मिळावा, असें पत्र पेशव्यास ता. १९-११-१७६६ ( ? ) रोजी लिहिलें होतें ( पे. द. ३२, ३५ ). तेव्हां पेशव्यानीं ता. १२-१२-१७६६ रोजीं नाना फडणिसास पत्र लिहून कळविलें कीं, अली बहादरास जरूर असणाऱ्या सरकोळ गोष्टींचा सुद्धां पुरवठा करावा आणि त्यास लागणाऱ्या गोष्टींकडे लक्ष पुरवावें ( पे. द. ३२, ३६). यावरून पेशव्यांचे व याचे संबंध दिसून येतात.

सवाईपेक्षांहि हा शूर व पराक्रमी निघाला. महादजी शिंदे यांना मदत करण्याकरितां व बुंदेलखंडांतील पेशव्यांच्या मुलखाची व्यवस्था करण्याकरितां याला नानानीं पाठविलें. प्रत्यक्ष महादजी शिंदे व हा यांनीं सलोख्यानें कामेंहि केलीं. पण हिंमतबहादरच्या प्रकरणापासून महादजी याचा विरोध सुरू झाला. शेवटीं तर हा पेशव्यांसहि न जुमानतां स्वतंत्रपणें वागूं लागला असे दिसतें (मं. त्रै. ४.२२ व सप्तम संमेलनवृत्त). यानें बुंदेलखंडांत पराक्रम करून पाऊण कोटीचा मुलूख काबीज केला. त्या वेळचीं स. १७८८-१८०१ मधील पत्रें इतिहाससंग्रहांत व मराठीदप्तर रुमाल तिसऱ्यांत छापलीं आहेत. गुलाम कादरच्या छळापासून बादशाहची मुक्तता करण्याकरितां स. १७८८ मध्यें राणेखान दिल्लीस गेला तेव्हां त्याचेबरोबर हा होताच.

हिंमतबहादर गोसाव्यास शिंद्याचे शिपाई पकडून नेत असतां तो पळाला व याच्या आश्रयास आला. महादजीनें त्याला स्वाधीन करण्याविषयीं सांगितलें असतां यानें नाना फडणिसाचा हुकूम पाहिजे असें सांगितलें. आणि तसा हुकूम येण्यापूर्वीच त्याला पळून जाण्यास संधि दिली. हिंमतबहादरच्या प्रेरणेनें यानें बुंदेलखंड बहुतेक जिंकलें. त्या कामांत याचे बरेच दिवस गेले. पण पराक्रमानें तें काम यानें पार पाडलें ( स. १७९२ ). पुढें पेशव्यांच्या संमतीनें सागरच्या ईशान्येस बांदा येथें आपलें वास्तव्य केलें. व तेथें पुण्याहून लोक नेऊन अठरा कारखाने स्थापिले. गोरे नांवाचा एक इसम यानें आपला दिवाण नेमला होता. त्याचे वंशज अद्यापि बांदा येथें आहेत. अशा रीतीनें स. १७८८ मध्यें बांद्याची जहागीर उत्पन्न झाली. कालिंजरचा किल्ला घेत असतां हा मारला गेला ( स. १८०२ ).

याची पत्नी बादशहा बेगम लहानपणींच वारली. तिच्याशिवाय यास दुलन बेगम व बक्षी बेगम अशा दोन स्त्रिया होत्या. दुलन बेगमचा मुलगा दुसरा समशेरबहादर व बक्षी बेगमचा मुलगा झुल्पिकार अली. यांशिवाय रहिमत बिबी नांवाची यास एक रक्षा होती. याशिवाय दादा व प्यारी अशीं दोन मुलें आढळतात ( मराठी दप्तर ३.४०; १३५ ). याची मुद्रा—श्रीमाधव चरणीं तत्पर । अली बहादर निरंतर ॥ हे मुसलमान असूनहि पेशव्यांचे अभिमानी व कृष्णभक्त होते.

**अलीमर्दानखान**—हा एक हुशार मुत्सद्दी शहाजहानच्या पदरीं होता. हा जसा मुत्सद्दी तसा शूरहि होता. यानेंच इराणच्या शाहाकडे असलेला कंदाहारचा किल्ला काबीज केला ( स. १६३७ ) व तेव्हांपासून पुढें हा कंदाहारासच राहूं लागला. पुढील वर्षी बादशहानें लाहोर येथें याची भेट घेतली, व यास मोठी मनसब दिली. पुढें कांहीं वर्षे हा काश्मीरच्या सुभ्यावर होता. नंतर पंजाब प्रांताची सुभेदारीहि यालाच बहाल करण्यांत आली.

यानें लोकोपयोगी अशा बऱ्याच कामगिऱ्या केल्या. रावी नदीला एक मोठा फांटा फोडून एक दिल्लीस व एक लाहारास असे दोन कालवे तयार केले. अद्यापहि त्यास 'अलिमर्दानखान-कालवा' असेंच नामाभिधान देण्यांत येतें.

मध्य आशिया व इराण इकडील कारस्थानांत बादशहास याचा फार उपयोग झाला. तेव्हां यास 'अमिरूल-उमरा' हा किताब बहाल करण्यांत आला. यास सालीना तीस लाख रुपयांचें उत्पन्न होतें. हा स. १६५७ त मरण पावला. याची कबर लाहोरला आहे. बादशहास याच्या मृत्यूमुळें अनिवार दुःख झालें (मु.रि.भाग २ पृ.२४९-५०).

**अलीमर्दानखान खल्जी**—( स. १२१०-१२१३ ) बंगालमध्यें मुसलमानी सत्ता स्थापन करणाऱ्या इखत्यार उद्दीनच्या हाताखालील एक सरदार. इखत्यार उद्दीननें अचाट कृत्य करण्याच्या भरीस पडून स. १२०५ मध्यें तिबेटवर स्वारी केली. पण त्यांत सर्व सैन्याचा नाश झाला आणि अपयश आलें. यामुळें लखनावती राजधानींत असंतोष उत्पन्न झाला. या स्थितीचा फायदा घेऊन यानें इखत्यारचा खून केला. पण इखत्यारचे मागें मुहंमद शीरान हा बंगालचा सुभेदार झाला आणि याला त्याच्या कैदेंत राहावें लागलें. पण तेथून हा निसटला आणि कुतुबुद्दीन ऐबककडे गेला. ऐबककडून बंगालच्या मुलुखाची सरदारांत फेरवांटणी करण्याकरितां यानें अधिकारी नेमून घेतला. पण मुलुखाची वांटणी करण्याच्या गडबडींत मुहंमद शीरान हा याचा मुख्य शत्रु मारला गेला आणि ऐबकची मनधरणी करून यानें बंगालची सुभेदारी मिळवली. स. १२१०मध्यें ऐबक वारतांच यानें अलाउद्दीन असें नांव घेऊन आपण स्वतंत्र झाल्याचें जाहीर केलें. हा अत्यंत जुलमी होता. भोवतालचे हिंदु राजे याला स्वस्थ बसविण्याकरितां वाटेल तितका पैसा देत. त्यामुळें याच्या खजिन्यांत खूप पैसा साठला. अकस्मात् राज्य मिळून तें सहज वाढवतां आल्यामुळें हा आपणास जगज्जेता समजत असे. आपल्याकडे येणाऱ्या याचकास हा वाटेल त्या प्रांताचें राज्य लिहून देई. अशाच याचकांपैकीं इस्पाहानच्या एका गरीब व्यापाऱ्यास यानें त्याचें राहतें गांव इनाम म्हणून लिहून दिलें. तो वाटेंत चोरीस गेलेल्या आपल्या मालाची दाद मागण्यास आला होता. याच्या राज्यांत कोणालाहि आपल्या जीविताची शाश्वती वाटत नव्हती. शेवटीं याच्या कारभाराचीं दोन वर्षें पुरीं झाल्यावर याच्या जुलमास कंटाळलेल्या कांहीं सरदारांनीं याला ठार केलें ( कें. हि. ).

**अलीमुहिबखान** ( प्रीतम )–हा हिंदी कवि होय. हा आग्रा येथें राहत असे. यानें स. १६७३ मध्यें 'खटमलबाईसी' नांवाचें एक हास्यरसयुक्त पुस्तक लिहिलें. याच्या कांहीं भागांत साहित्तिक महत्त्व आढळतें. याची भाषा व्यावहारिक असून हास्यरस चोहोंकडे आहे. याची कल्पनाहि चांगल्या प्रकारची आहे.

**अली शाहकार बहिरा**—(स. १३३९-४०) दौलताबादचा सुभेदार कुतलघखान याच्या हाताखालीं हा असे. हा बहिरा होता. गुलबर्ग्याच्या अधिकाऱ्याकडे बराच वसूल थकला होता, तो वसूल करून दौलताबादेस पोंचविण्याचे कामावर स. १३३९ मध्यें याची नेमणूक झाली. गुलबर्ग्यास गेल्यावर स्वतंत्र राज्य स्थापण्याचा यास मोह झाला. तेथील भैरव नांवाच्या हिंदु अधिकाऱ्याचा यानें खून केला व वसुलाचे पैसे सैन्य तयार करण्यांत खर्च केले. यानें बेदरवर स्वारी करून तेथील सुभेदाराचा वध केला व शहरांत ठाणें दिलें. तेव्हां कुतलघखान याच्यावर चालून गेला, तेव्हां पराभूत होऊन हा शरण आला. पण याला कैद करून दिल्लीस पाठविण्यांत आलें. तेथें मुहंमद तुघ्लकनें फिरतीवरून आल्यावर यास बंडखोर म्हणून गझनीस हद्दपार केलें. पण हा बिगरपरवाना हिंदुस्थानांत आला म्हणून यास फाशी देण्यांत आलें ( कें. हि. ).

**अलीशीर खल्जी**—माळव्याच्या घोरी घराण्यांतील दिलावरखान घोरीची बहीण याला दिली होती. हें खल्जी घराणें माळव्यांत राज्य करीत होतें.

**अलीशेर अलाउद्दीन**—( स. १५३० ) काश्मीरचा राजा.

**अलेक्झांडर**—( सिकंदर पाहा ).

**अल् इस्तारवरी**—एक अरबी प्रवासी. हा स. ९५१ च्या सुमारास हिंदुस्थानांत आला होता. यानें राष्ट्रकूटांचा अम्मल खंबायतपासून चौल (चेउल) पर्यंत असल्याचें लिहिलें आहे. तसेंच त्यांचे पुष्कळ मांडलिक राजे असून त्यांत एक मुसलमान मांडलिक असल्याचेंहि यानें लिहिलें आहे. ( म. भा. २. २७० ). अल् हें नांवाच्या मागें लागणारें अरबी भाषेंतील उपपद आहे.

**अल्बीरूनी**—( अबू रैहान अल्बीरूनी पाहा ).

**अल्बुकर्क आल्फान्सो**—( स. १५०९-१५ ) हा हिंदुस्थानांतील एक पोर्तुगीझ अधिकारी. याचा जन्म स. १४५३ मध्यें एका उच्च कुलांत झाला. यासंबंधानें १४४४, १४५२, १४६१ व १४६२ असे सन निरनिराळ्या ग्रंथकारांनीं दिले आहेत. पांचव्या आल्फान्सो राजानें याला आपल्या मुलांबरोबर विद्या शिकवून वाढविलें. याला गणितशास्त्राचा विशेष नाद असे. तत्कालीन पद्धतीप्रमाणें युद्ध व साहस करून लौकिक मिळविण्याची यास हौस

होती. स. १४७१ त मोरोक्को जिंकण्याकरितां गेलेल्या फौजेबरोबर हा होता. तेथें दहा वर्षे यास राहावें लागल्यामुळें यास बहुमोल अनुभव मिळाला. स. १४८१ त स्वदेशीं परत आल्यावर यास घोडदळाची मुख्य जागा मिळाली. दुसऱ्या जॉन राजाची याजवर मेहेरनजर होती. स. १४९६त जॉन मरण पावल्यावर त्याचा मुलगा इमान्युएलची याजवर इतराजी होऊन पुनः याची नेमणूक मोरोक्कोच्या कामगिरीवर झाली. तेथें असतांना मुसलमानांविषयीं याचे मनांत अत्यंत वैर उत्पन्न झालें. तेथून परत आल्यावर राजानें यास स. १५०३ तील सफरीबरोबर हिंदुस्थानांत पाठविलें. या वेळीं याच्या हातून महत्त्वाचें कृत्य कांहीं झालें नाहीं. मात्र पुढें उपयोगी पडणाऱ्या परिस्थितीचा अनुभव मिळवून हा स. १५०४ त लिस्बन येथें परत आला. तांबडा समुद्र व इराणी आखात ह्यांतून चालणारा मुसलमानांचा संचार कायमचा बंद केला पाहिजे, अशी यानें राजास सल्ला दिली, व तदनुसार सोकोट्राचें बेट जिंकण्याकरितां स. १५०६ मध्यें राजानें याची रवानगी केली. कांस्टांटिनोपलच्या सुलतानानें पूर्वेकडील मुसलमानांस मदत करूं नये म्हणून इमान्युएल राजानें एक आरमार भूमध्यसमुद्रांतून तुर्कस्तानवर पाठविलें. तुर्कस्तान व इजिप्त ह्यांचें वैमनस्य होतें, ही गोष्ट पोर्तुगीझांस ठाऊक नसल्यामुळें, ते एक होऊन आपला नाश करतील अशी भीति पोर्तुगीझ राजास वाटत होती. सोकोट्रा जिंकल्यावर अल्बुकर्कनें मलबार किनाऱ्यावर जाऊन आल्मीडाची मुदत संपतांच प्रतिनिधीचें काम पाहावें, असा यास राजाचा हुकूम होता.

आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील मोंबासा, अंगोजा, [illegible] ठिकाणांचा यानें प्रथम समाचार घेऊन त्यांजकडून [illegible] घेतली. नंतर हा सोकोट्रावर आला. तेथें कांहीं [illegible] लोकांची वस्ती असून मुसलमानांचा एक मजबूत [illegible] होता, तो यानें तेव्हांच जिंकून घेतला, आणि त्यावर [illegible] अंमलदार नेमून नवीन व्यवस्था केली; तसेंच [illegible] नांच्या जमिनी व उत्पन्न खालसा करून तीं यानें [illegible] लोकांस दिलीं. सोकोट्राहून निघून अल्बुकर्क [illegible] येथें गेला. तेथच्या अधिकाऱ्यास जिंकल्यावर [illegible] अखातांत नाकें व व्यापाराचें उत्तम ठिकाण जें [illegible] ते जिंकण्यास हा आला. पण हाताखालचे लोक [illegible] झाल्यामुळें ओर्मझचें काम अर्धवट टाकून यास [illegible] यावें लागलें. अशा याच्या कृत्यांवरून यानें [illegible] होण्यासारखें आहे. आफ्रिकेच्या दक्षिण [illegible] मलाकापर्यंतचा सर्व किनारा, बेटें, व नाक्यांचीं बंदरें पोर्तुगीझांच्या ताब्यांत राहावीं, ठिकठिकाणीं किल्ले बांधून तेथें पोर्तुगीझ फौज ठेवावी, म्हणजे मुसलमानांचा व्यापार सर्वस्वीं बंद पडून पोर्तुगीझांचा उद्योग निर्वेध चालेल, असें यानें मत होतें. उलटपक्षीं पुष्कळ किल्ले वगैरे बांधून आपल्या सत्तेचा पसारा करून ठेवणें अनुचित होय, अशी आल्मीडाची यास ताकीद होती. कोचीन येथें असतांच अल्बुकर्क व आल्मीडा या दोघांची बरींच चकमक उडून अल्बुकर्क यास कांहीं दिवस कैदेंत कंठावे लागले. पुढें पोर्तुगालहून आणखी एक आरमार हिंदुस्थानांत आलें, तेव्हां आल्मीडा आपला कारभार सोडून स्वदेशास परत गेला (नोव्हेंबर स. १५०९). तेव्हांपासून हा हिंदुस्थानांतील पोर्तुगीझ राज्याचा मुख्य झाला. यानें कोचीनच्या राजास गादीवर बसविण्यास मदत करून कोचीन येथें पोर्तुगीझांचा किल्ला बांधिला.

मुख्याधिकार प्राप्त झाल्यावर यानें त्या वेळची हिंदुस्थानची परिस्थिति अवलोकन करून (१) हिंदु राजांशीं कायमचें सख्य करावयाचें, (२) मुसलमानांचा पाडाव करावयाचा, (३) आणि येणेंकरून पोर्तुगीझांचा व्यापार व अंमल दृढ करावयाचा, हे तीन उद्देश ठरविले. ओर्मझहून उत्तमोत्तम अरबी व इराणी घोडे मलबार किनाऱ्यावर येत, ते घोडे आपण आणून विजयानगरच्या राजास पुरवावे आणि त्या राजानें मुसलमानांशीं लढण्यास आपणांस मदत करावी, अशा प्रकारचा तह विजयानगरास आपला वकील पाठवून यानें सिद्धीस नेला.

स. १५१० मध्यें कालिकतच्या राजानें याचा पराभव केला. पुढें ता. १ मार्च स. १५१० मध्यें यानें इस्माईल आदिलशहाकडून पणजीचा किल्ला घेऊन पुढें दोन दिवसांनीं शहरहि हस्तगत केलें. यानें आपल्या कारकीर्दीत गोवें हस्तगत करून त्याचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेविला. गोव्याच्या पायीं अनेक संकटें येऊं लागलीं. त्यामुळें तें सोडून द्यावें, अशाबद्दलचा हुकूम पोर्तुगीझ राजाकडून यास आला होता. परंतु तसें करण्याचें यानें नाकारलें. एडन आपल्या ताब्यांत घेऊन तांबड्या समुद्रांतील मुसलमानांच्या व्यापाराचे रस्ते कायमचे बंद करून टाकावे हें आणखी एक मोठें काम अल्बुकर्क यास करावयाचें होतें, पण तें याच्या हातून तडीस गेलें नाहीं. यानें गोवा, गोव्याचें बेट, व पणजी ह्या सर्वांस मिळून एक मोठा मजबूत तट बांधिला. तसेंच कालिकतचा झामोरीन मरण पावला व त्याच्या मुलानें कालिकत येथें पोर्तुगिझांस किल्ला बांधून दिला. हा किल्ला विशेष मजबूद झाला. स. १५१४ साल अल्बुकर्कनें अंतर्व्यवस्था करण्यांत घालविलें. स. १५१५त

ओर्मुझवर स्वारी करून तें यानें काबीज केलें. हेंच याच्या कारकीर्दीचें शेवटचें कृत्य होय. ओर्मझहून परत येत असतां प्रवांत बिघडली आणि हा स. १५१५ च्या डिसेंबरांत गोव्याच्या बंदरांत येत असतां जहाजावर मरण पावला. त्या वेळीं याचा प्रेतसंस्कार गोवा येथें झाला, पण पुढें स. १५१६ त याचे अवशेष लिस्बन येथें नेऊन पुरण्यांत आले. यानें ६ वर्षे कारभार केला. शौर्य, मुत्सद्दीपणा, चातुर्य व स्वराष्ट्रसेवा इत्यादि गुणांनीं अल्बुकर्कचें नांव पोर्तुगीज इतिहासांत स्मरणीय आहे. त्यांचा इकडील सर्वांत मोठा अंमलदार हाच झाला ( ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध, पृ. १००-११६ ).

याच्या पक्षाचें म्हणणें, आरमाराऐवजीं किनाऱ्यावरील मोक्याचा बंदरें ताब्यांत घेऊन व तेथें शिबंदी वगैरे ठेवून आणि हिंदु बायकांशीं लग्नें लावून राज्यविस्तार करावा. त्यांत याच्या पक्षाचें म्हणणें अपुरें ठरलें. यानें मुसलमानी अधिकारी काढून त्यांच्या जागीं फिरंगी व हिंदू लोक नेमले. हिंदु शिपायांची पलटण प्रथम तयार करून सतीची चाल बंद केली; आणि ग्रामपंचायतीस उत्तेजन दिलें. राज्यविस्ताराबरोबरच हिंदुस्थानचा परदेशांशीं होणारा व्यापार जो मुसलमानांच्या (मूर) हातीं होता तो सर्वस्वीं आपल्या हातीं घेण्याचाहि यानें प्रयत्न चालविला व त्यांत याला थोडेंबहुत यशहि येत चाललें. विशेषतः मसाल्याचा व्यापार यानें बळकावला. मलाक्का हें बंदर या मसाल्याच्या व रबराच्या व्यापारासाठीं उतार पेठ म्हणून प्रख्यात होतें म्हणून तें यानें कार्बीज केलें (स. १५११). मिश्र लग्नें लावून आपल्या राज्यास बळकटी आणण्याचें याचें धोरण चुकलें. कारण या मिश्र प्रजेच्या ठिकाणीं युरोपियनांचे राज्यकर्त्यास आवश्यक असणारे गुण उत्पन्न न होतां उलट ते खालावत चालले. यानें झामोरिनला विषप्रयोग करविण्याचे कामीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.

**अलमसूदी**—एक अरब प्रवासी. यानें बारकाईनें हिंदुस्थानचें वर्णन केलें आहे. याचें प्रवासवृत्त स. ९५३ मध्यें लिहिलेलें आहे. मालखेडच्या वल्लभराय (बल्हारा) राष्ट्रकूटाशीं अरबांचें चांगलेंच सख्य होतें. कनोजच्या राजाचाहि चांगला दबदबा असे. त्याच्यापुढें अरब व राष्ट्रकूट यांचें कांहीं चालत नसे. यानें लिहिलें आहे कीं, मूर्तिपूजक जेव्हां मुलतानवर स्वारी करतात व मुलतानच्या लोकांची लढण्याची तयारी नसते तेव्हां ते सूर्याची मूर्ति फोडून टाकूं अशी धमकी देतात, तेव्हां हे युद्ध न करतांच परत येतात ( म. भा. २. २७०).

**अलमास बेग खल्जी**–हा अलाउद्दीन खल्जीचा भाऊ.

**अल्लट**—हा मेवाडचा राजा दुसरा भर्तृभट्ट याचा मुलगा. याच्या मातेचें नांव महालक्ष्मी. ख्यातकार याच्या नांवाचा उल्लेख आलु असा करतात. याच्या वेळचा एक शिलालेख मिळाला आहे. तो आहाडच्या नजीक सारणेश्वर नांवाच्या नवीन शिवालयांत बसविला आहे. प्रथम हा लेख याच्या वेळच्या एका वराहमंदिरावर बसविला होता. त्यांत राणी महालक्ष्मी ( याची माता ), राजा अल्लट, त्याचा पुत्र नरवाहन यांच्याशिवाय मंदिराशीं संबंध असलेल्या गोष्टींकांची ( मंदिराकरितां मदत देणारांची ) मोठी यादी जोडली आहे. त्यावरून याचा मुख्य मंत्री मंमट, सांधिविग्रहिक दुर्लभराज, अक्षपटलिक मयूर आणि समुद्र, ( अक्षपटल म्हणजे हिशेब ठेवणारा ), बंदिपति ( मुख्य भाट ) नाग आणि भिषगाधिराज ( मुख्य वैद्य ) रुद्रादित्य होता. या मंदिराचा प्रारंभ वि. सं. १००८ ( स. ९५१ ) मध्यें सूत्रधार अग्रटनें आणि वि. सं. १०१० ( स. ९५३ ) वैशाख शुद्ध ७ ला त्यांत वराहाची मूर्ति स्थापिली. मंदिराचा रोजचा खर्च चालण्याकरितां हत्ती विकला तर एक द्राम, घोड्यावर दोन रुपये, शिंगवालें जनावर एका द्रामाचा चालिसावा अंश, लाटे (बलुते) पैकीं पांच शेर, आठवड्याच्या बाजारावर आडक ( सोडतीन शेर ), शुद्ध एकादशीस प्रत्येक हलवायाकडून एक घागर दूध, जुगाऱ्याकडून एक वेळेला जिंकलेलें धन, प्रत्येक तेलाच्या घाण्यांतून एक पळीभर तेल, गांवजेवणावर एक रुपया, माळ्याकडून चांपदरी माळ मिळावी, अशी राजानें व्यवस्था केली होती. कर्नाटक, मध्यदेश, लाट आणि टक्क ( शाकल नगर राजधानी असलेला मद्र किंवा वाहिक या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश ) देशचे पण येथें राहणाऱ्या व्यापाऱ्यानेंहि या मंदिराला दान दिलें होतें. यावरून त्या वेळीं आहाड नगराची योग्यता काय होती हें समजेल. गंगोद्भेद तीर्थामुळें हें ठिकाण पूर्वीच प्रसिद्ध होतें. तरी याच्या वेळीं तें विशेष प्रसिद्धीस आलें; व यानें हें नगर वसाविलें, अशी प्रसिद्धी झाली. आहाडच्या एका जन मंदिराच्या देवकुलिकेला ( भोवतालच्या छोट्या मंदिराला ) शक्तिकुमाराच्या वेळचा एक शिलालेख लावला आहे. त्यांत याचें वर्णन आहे. यानें आपल्या गदेनें देवपालाला ठार केलें. देवपाल हा कनोजचा प्रतिहार राजा असावा. याहि लेखांत अक्षपटलाधीशाचें नांव मयूर असेंच दिलें आहे ( आहाडाचा अप्रकाशित लेख ). आहाड येथें मिळालेल्या शक्तिकुमाराच्या वि. सं. १०३४ ( स. ९७७ ) च्या लेखांत याच्या राणीचें नांव हरियदेवी असें दिलें आहे आणि ती हूण राजाची मुलगी होती.

हरियदेवीनें हर्षपुर नांवाचा गांव वसविला ( इंडि. अँटि. भा. ३९, पृ. १९१; रा. इ. पा. ४२६-४२८ ).

**अल्लू**—विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील इस्माईलाचा मुलगा. याला मल्लू, इब्राहीम व अबदुल्ला असे तीन भाऊ होते. त्यांपैकीं इब्राहीम व मल्लू हे विजापूरच्या गादीवर आले.

**अवचितसुत काशी**—( स. १६६२ सुमार ) एक मराठी कवि. हा जातीनें चंद्रवंशीय क्षत्रिय होता. याचा बाप अवचितराव हा भारम ( नाशिक जिल्हा ) गांवचा देशमुख होता. काशी कवि महानुभावपंथी होता. या कवीची वाणी प्रासादिक व रसाळ आहे. यानें ओवीबद्ध द्रौपदी-स्वयंवर लिहिलें. या ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या माहितीवरूनच याचें पुढील थोडें चरित्र देतां येतें. याची मराठी भाषेवर फारच भक्ति होती. याचें आडनांव सोळंखी व गोत्र अत्रि. अवचितराव हा पंढरीचा वारकरी होता. याच्या उपासनेमुळें भारम-गांवाला लोक विठ्ठलपुर म्हणूं लागले. पुढें यानें भारम-गांवजवळचा एक किल्ला हस्तगत केला व त्याचें नांव गोपाळगिरी ठेवलें. औरंगजेबाच्या सैन्यानें किल्ला युद्धानें सर होत नाहीं असें पाहून फितुरीनें किल्ला ताब्यांत घेतला व यांना दिल्ली येथें तुरुंगांत ठेवलें. तेथें अवचितराव मेला व हा कांहीं दिवसांनीं सुटून आला.

याचे द्रौपदीस्वयंवरावर एक ओवीबद्ध व दुसरा श्लोकबद्ध असे दोन ग्रंथ आहेत. याच्या द्रौपदीस्वयंवराच्या ग्रंथाचा काळ शके १६१८ पौष वद्य १० गुरुवार हा आहे.

'हरीची भगिनी म्हणे सुभद्रा' ही प्रसिद्ध लावणीहि याच कवीची आहे. तसेंच 'तारीं तारीं गुरुराया । गेला जन्म वांया' हें पदहि यांचेंच आहे. मुक्तेश्वराप्रमाणें याची ओवी अत्यंत प्रासादिक असून श्लोकरचना सरस, तर जरा ओबडधोबड आहे ( आजगांवकरकृत काव्येतिहास भा. १, पा. २८९-३०६ ).

**अवधूत**—( ज्ञानसागरेन्द्रसरस्वती ) हा सातारा जिल्ह्यांतील वटें गांवचा कुलकर्णी, चैतन्यसंप्रदायी असून याचे पूर्वीचे नांव भैरव असें होतें. हा ज्योतिर्लिंग व रामाबाई यांचा पुत्र.

याच्या ग्रंथावरून यांचें ज्ञानसागर असें आडनांव पडलें याच्या चुलत्यानें याला दत्तक घतलें होतें.

याची गुरुपरंपरा—कृष्णचैतन्य, तळशी, अद्वय, चिद्घन ( हे अद्वयाचे पुत्र व शिष्य), नागेश (पुत्र व शिष्य), बहीण निराबाई व पुत्र शिवलिंग, याचा बंधु ज्योतिर्लिंग, शिवलिंगाचा दत्तकपुत्र व शिष्य अवधूत, ( १७३४ चे पूर्वी ) अशी होती.

याचें कुलदैवत क्षेत्रपाल असून हा विश्वामित्रगोत्री होता. यानें शके १७३४ मध्यें 'ज्ञानसागर' व शके १७६४ मध्यें 'ज्ञानसागरानंद' असे ग्रंथ लिहिले (सं.सू.).

**२.** ( निरंजन ) याचे मूळ पुरुष जे चितात्पात ते चितेंतून निघाले, अशी हे आख्यायिका देतात. याचे पुत्र सिद्धेश्वर, त्याचे विश्वेश्वर, त्याचे श्रीधर व पुढें शामराज.

हें आपणा स्वतःस अवधूत निरंजन असें म्हणवीत असून याचे गुरु गोविंद हे होतें.

यानें कपिलगीता ( शक १६३० ), मूलस्तंभ, अभंग, फटके वगैरे ग्रंथ लिहिले ( सं. सू. ).

**अवधूतदास**–नृसिंहचरित्र या मराठी काव्याचा कर्ता ( सं. सू. ).

**अवधूत ( मल्यावृत्ति )**–( निवृत्ति अवधूत पाहा).

**अवधूतसुत**—गणपतिजन्म या मराठी काव्याचा कर्ता (सं सू. ).

**अवनिवर्मन**—हा सोरटच्या सोलंकीवंशापैकीं बाहुक धवलाचा पुत्र. याचा पुत्र बळवर्मा.

**२.** (योग)– चालुक्य महासामन्त घराण्यांतील बलवर्मन्चा मुलगा. स. ८९९ मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

यानें यक्ष-दास आणि धरणी-वराह ( बहुतेक वर्धमानचा बाप ) यांचा पराभव केला (B.), अशी बानटनें ज्याची माहिती दिली आहे, त्याचीच राजपुतानेका इतिहास या हिन्दी ग्रंथाचे कर्ते श्री. गौरीशंकर ओझा यांनीं पुढील माहिती दिली आहे. कालांतरांत फारच फरक आहे.

हा सोरटच्या सोलंकीवंशांतील बळवर्म्याचा पुत्र. याचें दुसरें नांव योग असें होतें. यानें यक्षदास वगैरे राजांच्या देशावर स्वारी केली, आणि त्यांना पराजित केलें. धरणीवराहाच्या सैनेला पळवून लावलें. हा धरणीवराह काठेवाडांतील चावडा राजा होता. तोहि कनोजच्या महेंद्रपाळ राजाचा सामंत होता. यानें वि. सं. ८५६ ( स. ८०० ) माघ शुद्ध षष्ठीला अंबळक गांव तरुणादित्य सूर्यमंदिराला दिलें ( ना. प्र. प. १, २१२-१५).

**अवंतिवर्मन् उत्पल**–(स. ८५७-८८४) काश्मीरचा एक राजा. यानें कर्कोटक घराण्यांतील अनंगपीडास पदच्युत करून काश्मीर येथें आपल्या उत्पल घराण्याची स्थापना केली. याच्या अंगीं कर्तृत्वशक्ति आणि जागृत सदसद्विवेकबुद्धि हे गुण होते. याची जमीनमहसुलाची पद्धत चांगली होती. हा फार धार्मिक होता. यानें शेतीची सुधारणा

केली, नवे कालवे काढले व वाङ्मयाला उत्तेजन दिलें (राज. ४. ७१५-७१९ ). यानें आपल्या राज्यांत प्राणीहिंसा बंद केली. हा स. ८८४ त मरण पावला.

**अवंतिवर्मन् गंग**—हा त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगापैकीं राजराजाचा पुत्र. यानें वेंगीच्या विजयादित्यास चोल राजाविरुद्ध मदत केली, व उत्कलाच्या राजासहि मदत केली. उत्कलराजे म्हणजे बहुधा सेन असावेत ( इंडि. अँटि. १८ पा. १६६ ). याच्या एका वनराज नांवाच्या मांडलिकानें चोलाशीं युद्ध केलें व वेंगी लुटून दानार्णवास ठार केलें, असें स. १०७५ मधल्या लेखांत आढळतें ( एपि. इंडि. ४ पा. ३१४ ). या सर्व गोष्टी राजराजाच्या कारकीर्दीत घडल्या. सिवेलकृत हिस्टॉरिकल इन्स्क्रिप्शन ऑफ सदर्न इंडियामध्यें याचें नांव नाहीं.कदाचित् जयवर्मन् म्हणून दिलेला हा असावा.

**अवंतिवर्मन् मौखरी**—( स. ५७९-६०० ) मौखरी वंशांतील हा एक होय. मौखरी राजा जो शर्ववर्मन् त्याच्या नंतर हा गादीवर आला. याचें व शर्ववर्मनाचें काय नातें होतें हें मात्र उपलब्ध नाहीं. हा कदाचित् शर्ववर्मनाचा मुलगा किंवा पुतण्या असावा. परंतु या म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. रा. वैद्य म्हणतात कीं, हा शर्ववर्मनाचा नातु होय Vaidya, History of Mediæval Hindu India I, p. 39 ). हा प्रभाकर वर्धनाचा समकालीन होता. यानें माळव्याचे महासेन राजास प्रोत्साहन देऊन पैसा आणि माणसें यांची मदत करून त्याला कामरूप येथील सुस्थितवर्मन या राजाचे विरुद्ध लढण्यास पाठविलें. अशा रीतीनें कामरूप येथील राज्य बाल्यावस्थेतच नाश करून टाकण्याची खटपट केली.

संस्कृतमधील मुद्राराक्षसाचा कर्ता जो विशाखदत्त तो याच्या पदरीं होता ( Aravamuthan, the Kaveri, the Maukharis and the Sangam Age, p. 95, Rapson. J. R. A. S., 1900. pp. 535-536 ). याला गृहवर्मन् आणि पूर्णवर्मन् असे दोन मुलगे होते. याची राजधानी पाटलीपुत्र येथें होती ( मौखरी by E. A. Pires, p. 102-106 ).

**अव्वनकवि**—एक तेलगू कवि. यानें पुरूरव्याचें चरित्र तेलगू व संस्कृत भाषेंत लिहिलें आहे.

**अव्वोका**—श्रीधराची माता व बळदेवाची पत्नी.

**अशरफ अलीखा**—( फुगा पाहा ).

**अशोक मौर्य**—( स. पू. २७२-२३२ ) या सम्राटाची जगांतील अत्यंत थोर पुरुषांत गणना होते. याचें साम्राज्य मोठें होतेंच. पण याचा मोठेपणा जगाचें धार्मिक स्वरूप बदलणारा थोर धर्मप्रसारक म्हणून आहे. यानें आशिया खंडभर बुद्धधर्माचा प्रसार केला. युरोपमध्येंहि यानें आपले धर्मप्रसारक धाडले होते. पुढें उत्पन्न झालेल्या एशू ख्रिस्तालाहि ख्रिस्ती धर्माची स्फूर्ति बुद्धधर्माच्या शिकवणीमुळें झाली असें पुराव्यावरून सिद्ध झालें आहे. हा प्रथम अत्यंत क्रूर होता पण पुढें हा इतका कनवाळू बनला कीं, कृमिकीटकांच्या हालअपेष्टेनेंहि याचें मन कळवळूं लागले. प्रथम यानें परधर्मीयांचा छळ करण्याकरितां यमपुरी स्थापन केली होती. पण पुढें यानें पशुपक्ष्याकरितांहि दवाखाने काढले आणि रस्त्यानें झाडें लावून सावलीची व्यवस्था केली. यानें आपल्या लेखांत आपणास देवांना प्रिय असें म्हणून घेतलें आहे.

मौर्यवंशांतील बिंदुसारचा मुलगा. वायु व ब्रह्मांडपुराणांत याच्या पित्याचें नांव भद्रसार असें दिलें आहे. भागवतांत पित्याचें नांव वारिसार असें दिलें आहे. विष्णुपुराण व भविष्यपुराण यांत याच्या पित्याचें नांव बिंदुसार असेंच दिलें आहे. भागवत व विष्णुपुराण यांत यांचें नांव अशोक असें दिलें नसून अशोकवर्धन असें दिलें आहे.

स. पू. २७२ बिन्दुसाराचा मृत्यु झाल्यामुळें हा नंतर गादीवर आला. बिन्दुसाराला सोळा राण्या व एकशेंएक पुत्र होते, असें महावंशांत म्हटलें आहे. त्यांपैकीं अठ्ठ्याण्णव किंवा नव्याण्णव भाऊ मारून यानें गादी मिळवली असें महावंश व दीपवंश या बौद्धग्रंथांत म्हटलें आहे. निदान दिव्यावदान ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें आपला ज्येष्ठ बंधु सुसीम यास मारून यानें गादी मिळवली असें दिसतें. शिलालेखांत अशा गोष्टींचा उल्लेख नसणें स्वाभाविक आहे. यानें नव्याण्णव भावांना ठार करून राज्य मिळविलें ही महावंशांतील गोष्ट दे. रा. भांडारकर ( अशोक पहिला भाग ) किंवा स्मिथ ( V. Smith, p. 163 ) यांच्याप्रमाणें सर्वांनींच अविश्वासार्ह मानली पाहिजे. कारण अशोकाच्या शिलालेखांत याच्या पुढें जिवंत असलेल्या अनेक भावांचा निर्देश आहे.

बिन्दुसाराच्या मनांत आपला वडील मुलगा सुसीम याला राज्य देण्याची इच्छा असणें स्वाभाविक आहे. बिन्दुसारानें याला आपल्या हयातींत उज्जयनीचा सुभेदार नेमलें होतें. हा बिन्दुसाराच्या मृत्यूच्या वेळीं पाटलीपुत्र येथें पोहोंचला होता व सुसीम हा तक्षशिलेकडे बंड मोडण्यास गेला होता, असें दिव्यावदान ग्रंथांत लिहिलें आहे.

राजाला हा एका ब्राह्मणकन्येपासून झाला व यावर बिन्दुसाराचें प्रेम नव्हतें. तसेंच हा कुरूप होता, असें दिव्यावदान ग्रंथांत वर्णन आहे. चेती.

बिन्दुसार मेला व अशोक गादीवर बसला. यांत कांहीं काळ गेला असला पाहिजे हें निश्चित आहे. पण बौद्ध ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें चार वर्षे गेलीं किंवा नाहीं, हें सांगतां येत नाहीं.

यानें राज्यावर येऊन आठ वर्षे पुरीं झाल्यावर कलिंग देशावर स्वारी केली. कलिंग देश म्हणजे बंगालच्या उपसागराला लागून महानदी व गोदावरी यांच्यामधील प्रदेश होय. मैगस्थनीजच्या म्हणण्याप्रमाणें तेथील राजाजवळ साठ हजार पायदळ, एक हजार घोडेस्वार व सातशें हत्ती होते. त्यावर अशोकानें स्वारी केल्यावर तुंबळ युद्ध झालें. चतुर्दशशिलालेखांतील तेराव्या शिलालेखांत पुढीलप्रमाणें कलिंगयुद्धाचें यानें वर्णन केलें आहे. "त्या युद्धांत दीड लाख लोक कैद केले, एक लाख लोक मारले गेले, व याच्यापेक्षां कितीतरी पटींनें अधिक लोक ( महामारी वगैरेनीं ) मेले. पण या संहाराचा याच्या मनावर फार परिणाम होऊन याला अत्यंत पश्चात्ताप झाला, व यानें युद्धानें विजय मिळवण्याचें सोडून धर्मानें विजय मिळवण्याचें ठरविलें" ( जनार्दनभट्ट, एम्. ए. कृत अशोकके धर्मलेख). नंतर कलिंगाच्या भोंवतालीं असलेल्या रानटी जातींनें उठाव केला असतां यानें युद्ध न करितां त्यांना धर्मानें विश्वासांत घेण्याचें ठरविलें. या युद्धानंतरच याचा बौद्धधर्माकडे कल झाला.

याशिवाय यानें काश्मीर प्रांत जिंकून तेथें श्रीनगर नांवाचें शहर वसविल्याचें राजतरंगिणीवरून कळतें. वास्तविक कलिंगविजयानंतर यानें युद्ध करण्याचें बंद केलें, त्याअर्थी हा त्यापूर्वीचा विजय असावा. राजतरंगिणींत काश्मीरावरील याच्या पूर्वीच्या राजांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत मौर्यवंशांतील कोणीहि नाहीं. कल्हणाचें हें लिहिणें विश्वासार्ह धरल्यास यानेंच काश्मीर जिंकून आपल्या राज्याला जोडलें असें दिसतें ( राजतरंगिणी ७. १०१-१०६ ).

गौतमबुद्धाच्या धर्माचा प्रसार त्याच्या हयातींत हिंदुस्थानच्या बाहेर झाला नव्हता. लंकेतील प्राचीन साहित्यांत बुद्ध लंकेत अनेक वेळां गेला असल्याची माहिती मिळते. पण ती विश्वासार्ह मानीत नाहींत. बुद्धाच्या वेळीं किंवा बुद्धानंतर शंभर वर्षे बुद्धधर्माचा हिंदुस्थानाबाहेर प्रसार झाला नाहीं. उलट हिंदुस्थानांत अन्तस्थ कलहानें या धर्माची अधोगति होत चालली होती. त्यामुळें अनेक पंथोपपंथांना जन्म मिळाला. वादांवाद सुरू झाले. आपआपल्या इच्छेप्रमाणें बुद्धवचनाचे अर्थ लावण्यांत येऊं लागले. यावर उपाय म्हणून तत्कालीन बुद्धांनीं महासभा भरवून निर्णय करण्याचें ठरविलें. बुद्धाच्या निर्वाणानंतर पहिली महासभा भरली, व दुसरी बुद्धनिर्वाणानंतर शंभर वर्षांनीं भरली. या महासभांमुळें अन्तर्गत झगड्यांना नियमबद्ध स्वरूप येऊन बजबजपुरी नाहींशी झाली. धर्म या दृष्टीनें विशेष पावित्र्य निर्माण करण्याचा या वेळीं मोठा शिस्तीचा प्रयत्न झाला. पण भारताच्या बाहेर या धर्माचा प्रचार करण्यास सुरुवात अशोकापर्यंत झाली नव्हती.

धर्मप्रचार करण्याची आवश्यकता गौतमबुद्धाला पूर्णपणें माहिती होती व पद्धत अवगत होती. हें त्याच्या धर्मचक्रप्रवर्तन करतांना केलेल्या भाषणावरून स्पष्ट होतें ( महावग्ग १. २. १, पृ. १८८ ). पण त्याची इच्छा पूर्ण करणारा अशोकासारखा सम्राट् निघावा हें त्याचें विशेष प्रकारचें सुदैव होय. शिवाय हा त्याच्या तत्त्वज्ञानाकडे राजकीय दृष्टीनें पाहत नसून धार्मिक पवित्रतेच्या भावनेनें आकृष्ट झाला होता. म्हणून याच्या सर्व प्रयत्नांत सात्त्विक जिव्हाळा दिसून येतो. यानें प्रथम बुद्धाच्या हालचालींचीं महत्त्वाचीं स्थळें पाहण्याकरितां धर्मविजयक्रम नांवाची वैभवशाली यात्रा काढली आणि प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणीं स्तूप, लेख, विहार अशा प्रकारें टिकाऊ स्मारकें उभारलीं. हा डोंगर, गुहा किंवा खडक पाहून त्यांवर शिलालेख कोरून ठेवीत असे. जेथें खडक मिळाले नाहींत तेथें भव्य स्तंभ उभारलेले आहेत. त्यांपैकीं अयोध्या प्रांतांतील एक स्तंभ सुमारें ५० फूट उंच असून एकसारखा चिरेबंद आहे. त्या स्तंभाचें वजन अजमासें ५० टन तरी भरेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. यानें विदेशीं प्रचार करण्याकरितांच बौद्ध लोकांची तिसरी महासभा भरवली. या सभेकरितां आपल्या राज्यांतील सर्व बौद्धांना एकत्रित करण्याचा प्रयत्न झाला. अशोकाचा गुरु मोग्गालपुत्त तिष्य हा या सभेचा अध्यक्ष होता. धर्मविषयक अनेक प्रश्नांवर विचार झाले व हजार भिक्षूंची एक परिषद् निश्चित झाली. या परिषदेचें अधिवेशन नऊ महिने चाललें होतें. तेथें धार्मिक ग्रंथांची पुनरावृत्ति झाली. तिष्याचा कथावत्थु हा ग्रंथ प्रामाणिक पुस्तक म्हणून मान्य करण्यांत आला. व देशोदेशीं प्रचारक पाठविण्याची योजना मान्य करण्यांत आली. दीपवंशांत दिलेली प्रचारकांची यादी व देश पुढें देत आहें.

| देश | मुख्य प्रचारक |
|---|---|
| १ काश्मीर व गान्धार | मज्झान्तिक |
| २ महीश-मण्डळ ( म्हैसूर ) | महादेव |
| ३ वनवासी ( उत्तर कानडा ) | रक्खित |

४ अपरान्तक ( कोंकण ) योनक धम्मरक्खित
५ महारट्ठ ( महाराष्ट्र ) महाधर्म रक्खित
६ योन (उत्तर पश्चिम हिंदुस्थान) महारक्खित
७ हिमवन्त मज्झिम, कस्सप इत्यादि
८ सुवन्न भूमि (पेगू व मालमीन) सोण, उत्तर
९ लंका ( सिलोन ) महीन्द इत्यादि
( दीपवंश ८.१-११; महावंश ५ ).

वरील माहितींत लंकेस पाठविलेल्या धर्मप्रचारकांचें नांव आलें आहे, त्याला पोषक असे कोरीव लेख सांपडले आहेत. सांचीच्या स्तूपांत एक पात्र सांपडलें आहे. त्याच्या आंतल्या बाजूवर ' मज्झिम ' असे शब्द आहेत, व बाहेरच्या बाजूवर ' कासपगोत ' असे शब्द कोरलेले आहेत. तसेंच दुसरा एक अवशेष तेथेंच उपलब्ध झाला आहे. त्यावर या दोनहि शब्दांबरोबर हेमवताचार्य असा शब्द उत्कीर्ण आहे. वरील दीपवंश व महावंश यांवरून दिलेल्या माहितीस त्यामुळें दुजोरा मिळतो. मज्झिम कस्सपगोत्त हा हिमालयावरील अशोकानें भरवलेल्या बौद्ध-महासभेनें नेमलेला प्रचारक होता, ही गोष्ट ऐतिहासिक ठरते. सांची येथें आणखी एक अवशेष सांपडला आहे त्यावर मोग्गलिपुत्र अशीं अक्षरें आहेत. तो बहुतेक मोगलि-पुत्र तिष्य असावा.

याशिवाय हिंदुस्थानांत याच्या विजयाला पाठिंबा देणाऱ्या देशांचीं नांवें अशोकाच्या शिलालेखांत आढळतात. तसेंच हिंदुस्थानच्या बाहेरच्या देशांचींहि नांवें शिलालेखांत आढळतात. सीरिया व पश्चिमेकडील आशिया-चा राजा अन्तियोक ( एन्टियोकस थियोस द्वितीय ), इजिप्तचा राजा तुरुमय ( टॉल्मी फिलाडेल्फस ), मगदू-नियाचा राजा ऐंटिगानस, साइरिनि ( उत्तरीय आफ्रिकेंत ) चा राजा मक ( मेगस ) व यूपिरसचा राजा अलिकसुन्दर (अलेक्झेण्डर) यांच्या राज्यांत अशोक धर्मविजयाकरितां गेला व त्यांच्याशीं याची मैत्री होती.

या पश्चिमेकडील लांबच्या देशांशिवाय दक्षिणकडेहि अशोकाचे लोक गेले होते. दक्षिणेंत अशोकाच्या राज्या-बाहेर चोल, पाण्ड्य, केरलपुत्र, सातियपुत्र व ताम्रपर्णी येथील स्वतंत्र राज्यें होतीं. ताम्रपर्णी हें लंकेचें प्राचीन नांव आहे, व सातियपुत्र शब्दानें केरलच्या नजीकचा प्रदेश घेतां येईल. याच्या साम्राज्यांत असणारे आंध्र, पुलिन्द वगैरे लोकांत यानें धर्माची स्थापना केली. पांचव्या शिलालेखांत गान्धार व राष्ट्रीक ( महाराष्ट्र ) हे दोन देश आणखी अधिक आढळतात. ( जनार्दन-भट्टसंपादित अशो-केके शिलालेख-दुसरा व पांचवा शिलालेख ).

अशोकानें आपल्या धर्माविजयाचें कार्य धर्ममहामात्र व धर्मयुत या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या आपल्या अधिकारी-वर्गाकडून चालविलें होतें. या अधिकाऱ्यांचें काम अशो-काचा संदेश घरोघर पोंचवणें हें होतें. संदेशांत लोकांचें हित व सुख, अनाथ व वृद्ध यांचें संरक्षण करणें, कैद व प्राणदंड नियंत्रित करणें हीं कामें मुख्य होतीं. या गोष्टींचा प्रचार करणें हा अशोकाच्या धर्मविजयांतील मुख्य भाग होता. तसेंच मनुष्य व पशु यांना औषध मिळावें अशीहि यानें व्यवस्था केली होती. ज्या देशांत औषधी नव्हत्या तेथें त्यांच्या लागवडीची व्यवस्था केली. रस्त्यावर मनुष्य व पशु यांना सावली मिळावी म्हणून वृक्ष लावले. धर्मशाळा बांधिल्या, विहिरी खोदल्या. आपल्या प्रजेची स्थिति प्रत्यक्ष कळावी म्हणून हा स्वतः राज्यांतून हिंडत असे. ' माझी प्रजा हीं माझीं मुलें आहेत ' असें हा म्हणे व ' मी दरबारांत, भोजनगृहांत, शयनगृहांत, किंवा कोठेंहि असलों तरी प्रतिवेदकांनीं ( हेरांनीं ) येऊन प्रजेच्या संबंधींची हकीकत सांगण्यास हरकत नाहीं,' असें यानें त्यांना बजा-वलें होतें. अशा पद्धतीनें परोपकार करण्यांत आपलें सामर्थ्य व ऐश्वर्य खर्च करणारा अशोक परक्या राज्यांतील लोकांनाहि आपलासा वाटूं लागल्यास आश्चर्य कसलें? केवळ प्रेम व परोपकाराच्या जोरावर अशोकाचा धर्म-विजय यशस्वी झाला यांत शंका नाहीं. आणि या परोप-काराच्या उच्च वर्तणुकीनें बुद्धधर्माचा प्रसार करणें सोपें झालें असलें पाहिजे यांत शंका नाहीं.

पण प्रचारक कशा पद्धतीनें काम करीत असत याची माहिती उपलब्ध नाहीं. सीलोनांत महेन्द्रानें कसा धर्म-प्रचार केला याची माहिती महावंश व दीपवंश यांत मिळते. चीन व खोतान या भागांत बुद्धधर्माचा प्रचार करण्या-करितां गेलेल्या लोकांची माहितीहि आढळते. चीन देशां-तील जुन्या ग्रंथांत स. पू. २१७ च्या सुमारास बौद्ध भिक्षु धर्मप्रसारार्थ चीनच्या राजधानींत आल्याचा निर्देश आहे. कांहीं ऐतिहासिकांचें म्हणणें आहे कीं, स. पू. २०० च्या पूर्वी चीनमध्यें बुद्धधर्माचा चांगला प्रचार झाला होता. ( एच्. जी. वेल्सचा ' दि आउटलाइन आफ् हिस्ट्री,' पा. २१३ ). खोतानमध्यें अशोकाचा पुत्र कुस्तन यानें धर्मप्रचार केला, अशी चिनी ग्रंथ व खोतानी पुस्तकें यांवरून माहिती मिळते.

ब्राह्मण, बौद्ध, आजीवक व जैन यांशिवाय अशोकाच्या वेळीं कोणचे साम्प्रदाय होते याची माहिती अशोकाच्या शिलालेखांवरून मिळत नाहीं. पण समकालीन साहित्या-वरून त्याचा बोध होतो. बौद्धग्रंथांतील निर्देशावरून पुढील

सांप्रदायांची माहिती मिळते. जटिल, परिव्राजक, अवरुद्धक, हत्तीचे उपासक, अश्व, गो, कुत्रा, काक, वासुदेव, बलदेव, पुण्णभद्द, मणिभद्द, अग्गि, नाग, सुपण्ण, यक्ष, असुर, गन्धर्व, महाराज, चन्द्र, सूर्य, इन्द्र, ब्रह्मा, देव व दिशांचे उपासक. यांतील वासुदेवसाम्प्रदायाचा निर्देश विशेष उल्लेखनीय आहे. अशोकानें त्याचा निर्देश केलेला नाहीं. तसेंच इतर यादीतहि त्याला महत्त्व दिलेलें नाहीं. पण तो भारतवर्षाचा एक दिवस मुख्य धर्म झाला. तो पाणिनीच्या पूर्वी उत्पन्न झाला होता, पण त्याचा उत्कर्ष गुप्तांच्या वेळीं झाला. पण मौर्यकालींहि वासुदेवसांप्रदायाचें अस्तित्व दाखविणारे दुसरेहि चांगले पुरावे उपलब्ध झाले आहेत. मौर्यकाळचा एक शिलालेख राजपुतान्यांतील गोसुण्डीनामक गांवीं सांपडला आहे. त्यांत संकर्षण व वासुदेव यांच्या मंदिराच्या चारी बाजूंस भिंत बांधल्याबद्दल निर्देश आहे. त्यावरून मौर्यकालीं वासुदेवसाम्प्रदाय रूढ झाल्याचें दिसून येतें. मौर्यकाळाच्या अखेरीस लिहिलेला वेसनगर येथें एक शिलालेख उपलब्ध झाला आहे. पूर्व माळव्याचा राजा भागभद्र याच्याकडे यवनराजा अन्तलिकित यानें हीलीओद्रा नांवाच्या इसमाला आपला राजदूत म्हणून पाठविलें होतें. हीलीओद्रा हा यवन होता तरी या भागवतधर्म किंवा वासुदेवधर्माचा उपासक होता. या शिलालेखांत त्यानें आपण गरुडध्वज केल्याचें सांगितलें आहे. त्यावरून केवळ त्याचें अस्तित्व ठरतें असें नाहीं, तर तो यवन लोकांनीं स्वीकारण्यासारखा शक्तिशाली व विस्तृत होता असें ठरतें ( Sir R. G. Bhandarkar, Vaishnavism, Saivism and Minor Religions of India, p. 3 ).

अशोकाच्या वेळीं समाजांत अन्धविश्वास कितपत होता हें अशोकाच्या पुढील लिहिण्यावरून स्पष्ट होतें. देवानांप्रिय प्रियदर्शी राजा लोकांना सांगतो कीं, लोक संकटांत असतां, पुत्र व कन्या यांच्या विवाहाच्या वेळीं, संतति झाल्यावर किंवा परदेशीं जाते वेळीं किंवा अशाच दुसऱ्या वेळीं अनेक प्रकारचे मंगलाचार करतात. अशा वेळीं स्त्रिया अनेक प्रकारचे क्षुद्र व निरर्थक मंगलाचार करतात. मंगलाचार जरूर करावेत पण असे मंगलाचार..... ( चतुर्दश शिलालेख, लेखसंग्रह ९ ).

यानें स्त्रियांच्या निवासस्थानाकरितां अवरोधन शब्द वापरला आहे. तसेंच कौटिल्यानें अन्तःपुर वापरला आहे व स्त्रियांना अनिष्कासिनी असें म्हटलें आहे ( कौ. अर्थ. ३. १ ). यावरून तत्कालीं पडद्याची चाल होती असें दिसतें.

अशोकाच्या वेळीं बरेच सांप्रदाय होते व त्यामुळें सांप्रदायिक वादविवादहि मोठ्या प्रमाणांत चालत. याला आळा घालण्याकरितां अशोकानें वादविवादापेक्षां धर्मतत्त्वें अंगांत बाणविण्याकडे लक्ष पुरविलें; दुसऱ्या धर्माची निंदा करणें त्याज्य ठरविलें आणि वाक्संयम हा धर्मप्रचार आणि धर्माचरण ठरविलें. याचा परिणाम स्वाभाविकच चांगला झाला ( चतुर्दश शिलालेख, १२ ). अशोकाला यामुळेंच ' ध्यानामुळें धर्माची वृद्धि, प्राण्यांची अहिंसा, व यज्ञांत प्राणिघात न होणें या गोष्टी वाढल्या ' म्हणून संतोष प्रदर्शित करतां आला ( सप्तस्तम्भलेखांतील सातवा लेख ). या गोष्टी सर्वांशीं सम बुद्धीनें वागून केल्या जात असल्यामुळें राज्यांत शांतता होती.

अशोककालीन अधिकारी पुढीलप्रमाणें आढळतात.
कुमार—प्रांताधिपति.
राजा—उपप्रांताधिपति.
महामात्र—धर्माधिकारी व जिल्हाधिकारी.
लाजुक ( रज्जुक ) राजूक.
पोदसिक ( प्रादेशिक ).
भांडागारिक—कोशाध्यक्ष.

याच्या मध्यवर्ति राजसत्तेच्या हाताखालीं प्रांतोप्रांतीं ' रज्जुक ' नांवाचे अधिकारी असत. रज्जुकांच्या हाताखालीं प्रादेशिक नांवाचे अधिकारी असत. प्रत्येक खात्यावरील अधिकाऱ्यास महामात्र असें म्हणण्यांत येत असून ज्या खात्यावर त्याची नेमणूक झाली असेल त्या खात्याचें नांव त्याच्या हुद्याला जोडण्यांत येई. कारभार चालविणाऱ्या कामगारांना ' पुरुष ' अशी संज्ञा असे, व जिल्ह्याचे मुख्यास स्थानिक म्हणत.

याचें राज्य म्हैसूर प्रांतापर्यंत पसरलें होतें असें दिसतें ( Mysore Gaz. 1897, 1,289 ). यानें पाटलीपुत्र आपली कायमची राजधानी केली होती ( Hiuen Tsang in Beal Records, 11, 85 ). हा स. पूर्वी २७२ त गादीवर बसला. यानें स. पूर्वी २६१ त कलिंगाचें राज्य जिंकलें व स. पूर्व २५९ त युद्धाचा विचार सोडून देऊन परप्रांतांत धर्मप्रसारार्थ भिक्षु पाठविण्याचें ठरविलें. हा स. पूर्व २३२ त मरण पावला ( V. Smith, p. 206–7 ). यानें स. पूर्व २४३ त एक कायदा पास करून त्यामुळें सर्व प्रकारची पशुहत्त्या राज्यांतील सर्व जातींच्या लोकांकडून बंद करविली व सदर कायदा मोडणारास ५० पण दंड ठेवला.

यानें राज्याचे चार भाग पाडून त्यांच्यावर सुभेदार नेमून व्यवस्था केली होती. पंजाब, सिंध, काश्मीर वगैरे उत्तरेकडील सुभेदार तक्षशिला येथें राहत असे. कलिंग प्रांताकडील सुभेदार तोसली येथें राहत असे. माळवा, गुजराथ, काठेवाड येथील सुभेदार उज्जयनीला होता. नर्मदेच्या पलीकडील प्रदेशावर चवथा सुभेदार होता ( V. Smith, p. 172 ).

यानें राज्यांत राजाचीं माणसें म्हणून कांहींजण ठेवले होते. त्यांनीं राज्यांत होणाऱ्या सर्व घडामोडींची बित्तंबातमी लिहून ठेवून ती वेळोवेळीं राजाला कळवावी, अशी व्यवस्था होती.

हा प्रत्येक वर्षी राज्यारोहणदिन साजरा करीत असे व त्या दिवशीं पुष्कळशा कैद्यांना शिक्षेची माफी देऊन सोडून देण्यांत येत असे. चिनी यात्रेकरू इत्सिंग हा अशोक बुद्ध भिक्षूंच्या वेषांत राहत असे असें म्हणतो (Takakusu's Trans. of I-tssing—A Record of Budhist Practices, p. 73). यानें नेपाळांत ५ स्तूप बांधविले. यानें आजीवकांना राहण्यासाठीं डोंगरांतून गुहा तयार केल्या व भिक्षूंना राहण्यासाठीं पाटलीपुत्र नगराजवळ अशोकाराम व कुक्कुटाराम नांवाचे दोन भव्य मठ बांधले. याच्या कारकीर्दीत काठेवाड येथील तुषास्प नांवाच्या ( इराणी ) पारसीक प्रांताधिकाऱ्यानें गिरनार पर्वताजवळ नद्यांचे प्रवाह अडवून सुदर्शन नांवाचा एक तलाव बांधला. यानें काश्मीरचें श्रीनगर व नेपाळांतील देवपाटण हीं शहरें वसविलीं.

याच्या कारकीर्दीत वाङ्मय व कला यांचा अभ्युदय उत्तम रीतीनें झाला. निरनिराळ्या स्तूपांवरून व बऱ्याच मूर्तींवरून तत्कालीन कारागिरांचें कला-नैपुण्य उत्तम तऱ्हेनें निदर्शनास येतें. सारनाथस्तम्भशिरावरील सिंहामध्यें दिसून येणारी कारागिरी इराणी अगर ग्रीक कारागिरांपेक्षां सरस आहे, असें सहज दिसतें. मौर्य शिल्पज्ञ फार निष्णात होते याविषयीं शंकाच नाहीं. अशोकाच्या वेळीं बौद्ध भिक्षू हे शिक्षणाचें पवित्र काम करीत असत, असें दिसतें. त्या वेळीं शिक्षणाचें प्रमाण समाधानकारक होतें. याच्या शिलालेखांतील भाषा जोरदार व उत्तम आहे. पुष्कळ ग्रंथहि याच्या कारकीर्दीत झाले असावेत.

यांचें एक चरित्र तारानाथानें तिबेटी भाषेंत लिहिलें आहे. त्या चरित्राचें भाषांतर जर्मन भाषेंत होऊन त्या जर्मनीचें भाषांतरहि क्वार्टर्लीच्या १९३० च्या जूनच्या अंकांत इंग्रजींत प्रसिद्ध झालें आहे. हें चरित्र विश्वासार्ह नसून त्यांत बहुतेक सर्व गोष्टी चमत्कारिक आहेत. उदाहरणार्थ, नेमित राजास एका व्यापाऱ्याच्या बायकोपासून मूल होऊन त्याचें नांव अशोक ठेवण्यांत आलें. कारण अशोकाच्या जन्माच्या वेळीं नेमित राजाच्या आईच्या मरणाच्या दुःखाचा शेवट झाला होता (Indian H. Quarterly, Vol. VI, pp. 334–344).

यानें अनेक विवाह केले होते. तीवरची माता कारुवाकी हिच्या दानाचें वर्णन अशोकानें आपल्या एका शिलालेखांत केलें आहे.

हा उज्जयनीला 'कुमार' ( गव्हर्नर ) असतांना सेट्टी जातीच्या वेदिसागिरी( वेसनगर )च्या देवी नांवाच्या मुलीशीं याचें लग्न झालें. तिच्यापासून याला महेन्द्र व संघमित्रा अशीं दोन मुलें झालीं. संघमित्रेचें लग्न 'अग्निब्रह्मा' नांवाच्या ब्राह्मणाशीं झालें व तिला सुमन नांवाचा मुलगा झाला.

याला महेन्द्र, कुस्तन,तीवर, कुनाल ( सुयशस् ) व जालौक नांवाचे मुलगे आणि संघरक्षिता व चारुमती नांवाच्या मुली होत्या. याच्यामागें कुनालाचा मुलगा दशरथ ऊर्फ बंधुपालित हा गादीवर आला.

अशोकानें आपली गादी आपला नातु दश-रथ यास देऊन आपण आपलें धार्मिक आयुष्य घालविण्याकरितां सुवर्ण-गिरी येथें जाऊन राहिला. पण एक वर्षातच हा तेथें मरण पावला (B.; कुनाल पाहा ). वास्तविक याच्या मृत्यूसंबंधाची माहिती उपलब्ध नाहीं. तिबेटी दंतकथेवरून असें दिसतें कीं, हा तक्षशिलेला वारला.

**२. बुद्धतर्कज्ञ**, पंडित अशोक अथवा आचार्य अशोक या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या या अशोकास तिबेटी भाषेंत Mya-nanomed असें नांव होतें. याच्या दैवी ज्ञानामुळें चंद्रगोमिन् यास परमदयालू अवलोकितेश्वर व देवी तारा यांचें दर्शन घडलें. अशोकानें धर्मोत्तराचार्याचा निर्देश केला आहे. यावरून हा स. ८४७ च्या नंतर झाला असला पाहिजे. हा स. ९०० च्या सुमारास बहुतेक होऊन गेला असावा.

यानें तर्कज्ञानावर दोन ग्रंथ लिहिले आहेत–( १ ) अवयविनिराकरण, ( २ ) सामान्य-दूषण-दिक्-प्रसारिता. अवयविनिराकरणाच्या शेवटच्या श्लोकावरून असें दिसतें कीं, अशोकास ब्राह्मण तत्त्वज्ञांशीं झगडावें लागलें ( हिस्ट्री इं. ला., पा. ३३२).

**अश्वघोष**—हा जातीनें ब्राह्मण असून मूळचा अयोद्धेचा राहणारा व कुशानवंशीय सम्राट् कनिष्क याचा हा समकालीन होता. पुष्कळ हिंदी व युरोपीय विद्वानांच्या मतें कनिष्कानें स. ७८ मध्यें सुरू होणारा सध्यांचा शालिवा-

हनशक सुरू केला. यावरून अश्वघोषाचा काळ ख्रिस्तोत्तर पहिलें शतक हा धरला आहे. याच्या गुरूचें नांव पार्श्व.

अश्वघोषाच्या ग्रंथांतील उताऱ्यांवरून यानें उपनिषदें, भगवद्गीता व सांख्यादि दर्शनें यांचा चांगला अभ्यास केला होता असें दिसतें. पुढें यानें बौद्धधर्माचा स्वीकार केला. संस्कृत वाङ्मयांत अश्वघोषाचें नांव त्याच्या 'सौंदरनंद' व 'बुद्धचरित' या काव्यांनीं चिरकाल राहील. यांपैकीं पहिल्या काव्याचे १८ सर्ग आहेत व त्यांत गौतमबुद्धानें नंद नामक आपल्या सावत्र भावास बौद्धधर्माची दीक्षा दिली त्या प्रसंगाचें सविस्तर वर्णन केलें आहे. 'बुद्धचरिता' चे १७ सर्ग आहेत, पण त्यांपैकीं पहिले १३ च अश्वघोषाचे असून बाकीचे गेल्या शतकांत अमृतानन्द नामक कवीनें रचले असा त्यांत स्पष्ट उल्लेख आहे. पहिल्या १३ सर्गांत गौतमबुद्धाच्या जन्मापासून मारविजयापर्यंतची कथा आली आहे.

'सौंदरनंद' काव्याच्या शेवटीं कवीनें हें काव्य आपण आनंदप्राप्तीकरितां लिहिलें नसून विषयोपभोगमग्न लोकांचें लक्ष बौद्धधर्मांत उपदेशिलेल्या मोक्षमार्गाकडे लागावें म्हणून रचलें आहे, असें स्पष्ट म्हटलें आहे. अश्वघोष स्वतः मोठा प्रतिभावान् कवि होता. शिवाय यानें रामायणादि पूर्वकालीन काव्यांचा चांगला अभ्यास केला होता, म्हणून याचीं हीं दोन्ही काव्यें सरस बठलीं आहेत. याची भाषा साधी, पण मनोहर आहे. यानें बुद्ध व नंद यांच्या चरित्रांतील वेचक काव्यमय प्रसंग घेऊन त्यांना उपमादि अलंकारांनीं भूषविलें आहे. नंदानें भिक्षु होण्याचा निश्चय केल्याचें समजल्यावर सुंदरीनें केलेला शोक, गौतम उद्यानांत जातांना पौरस्त्रियांची उडालेली धांदल, ज्या रात्रीं तो आपलें घर सोडून निघाला त्या रात्रीं त्यानें पाहिलेलें स्त्रियांचें किळसवाणें स्वरूप, गौतमाला वनांत पोंचवून छदक एकटाच कपिलवस्तूला आला त्या वेळीं पौरजनांस झालेलें दुःख वगैरे प्रसंग कवीच्या अप्रतिम वर्णनशैलीनें वाचकांच्या मनश्चक्षूंपुढें हुबेहूब उभे राहतात. तथापि अश्वघोषाचें व्याकरणशुद्धतेकडे फारसें लक्ष नव्हतें.

स. १९१० मध्यें हस्तलिखित ताडपत्रांचे कांहीं लहानमोठे तुकडे सांपडले. त्यांपैकीं एकाचें नांव 'शारिपुत्रप्रकरण' किंवा 'शारद्वतीपुत्रप्रकरण' असें होतें. तें अश्वघोषानें रचलें होतें, असा स्पष्ट उल्लेख त्या नाटकाच्या शेवटच्या [illegible] केलेला आढळतो. यांत शारिपुत्र व मौद्गलायन्य [illegible] बुद्धाचा उपदेश ग्रहण करून बौद्धधर्म स्वीकारला [illegible] विषय आला आहे.

अश्वघोषाच्या सूत्रालंकाराच्या चिनी भाषांतरांत एका मुलीची गोष्ट आलेली आहे. तिनें आपलें सर्वस्व म्हणून जवळ असलेलीं व पूर्वी मातींत सांपडलेलीं दोन पितळी नाणीं भिक्षूंना दिलीं. या देणगीचें महत्त्व श्रीमंतानें आपल्या सर्व संपत्तीचें दान केल्यापेक्षांहि अधिक आहे, असें बुद्धानें वर्णिलें. या दानप्रभावानें पुढें ती राजाची राणी झाली. हा सूत्रालंकार ग्रंथ सध्यां उपलब्ध असलेला दिसत नाहीं.

याशिवाय अश्वघोषाचा 'प्रबुद्धधर्म' नांवाचाहि एक ग्रंथ आहे. त्यामध्यें भगवद्गीतेसारखे विचार प्रदर्शित केले असून भगवद्गीतेंतल्या वचनांसारखीं वचनेंहि त्यांत आहेत. प्रबुद्धधर्मांत 'सुखवतीसूत्रा'चा उल्लेख आलेला आहे. सुखवतीसूत्राचें महत्त्व असें आहे कीं, त्यांत बुद्धाचें वर्णन अनादि अशा शब्दानें केलें असून त्याच्या मानवी अवताराची कल्पनाहि त्यांत मांडलेली आहे. म्हणजे अश्वघोषाच्या पूर्वी आणि सुखवतीसूत्राच्या काळीं बुद्धाला अवतारत्व प्राप्त झालें होतें.

अश्वघोष हा वसुमित्र अथवा वसुबंधु याचा समकालीन होता. कनिष्कानें जालंदर येथें जी समिती भरविली होती तिचा अध्यक्ष वसुमित्र होता. यावरून अश्वघोष व वसुमित्र यांचे काल निश्चित होतात.

कनिष्काच्या कारकीर्दीत एक धर्मसमिति भरविण्यांत आली होती. तिबेटी, चिनी, व मंगोली लेखकांनीं या समितीचा पूर्वीच्या काळांत उल्लेख केलेला आहे. या समितीचा राजकारणाशीं कांहींएक संबंध नव्हता.

कनिष्क एका भिक्षूच्या मदतीनें बौद्ध सांप्रदायिक ग्रंथाचा अभ्यास करीत असतां त्यांतील परस्परविरोधी मतें पाहून त्याचा गोंधळ उडाला. तेव्हां आपला सल्लागार पार्श्व याच्या संमतीनें कनिष्क राजानें बौद्ध सांप्रदायिक ग्रंथ जाणणाऱ्या विद्वानांची सभा बोलावली. त्या सभेंतील सर्व पंडित हीनयान पंथांतील सर्वास्तिवादी मताचे अनुयायी होते. या मंडळाच्या सभा काश्मीरच्या राजधानीनजीक कुंडलवन नामक मठांत भरल्या. त्या सभेचा वसुमित्र हा अध्यक्ष व पाटलीपुत्राहून आणलेला अश्वघोष हा उपाध्यक्ष होता. त्या सभेंत पांचशें सभासद होते. त्यांनीं अगदीं प्राचीन काळापासूनच्या सांप्रदायिक ग्रंथांचें नीट परीक्षण करून बौद्ध सांप्रदायिक तत्त्वांच्या तीन मुख्य विभागांवर मोठाले टीकाग्रंथ लिहिले. त्यांपैकीं महाविभाषा नांवाचा बौद्ध तत्त्वज्ञानाचा ज्ञानकोशासारखा मोठा ग्रंथ अद्याप चीनमध्यें आहे. याच्या वेळीं राजकीय व लौकिक व्यवहार संस्कृतमध्यें सुरू झाले असें दिसतें.

स. १०० च्या सुमारास सम्राट् कनिष्कानें बौद्ध सिद्धान्त-निश्चयाकरितां जी परिषद बोलाविली होती ती तारानाथादि-कांच्या मतें जालंदर येथील एका मठांत भरली होती. परंतु ह्यू-एन्-त्संग याचें म्हणणें असें कीं, ही सभा काश्मीरमध्येंच भरली. कदाचित् असेंहि असेल कीं, प्रथम जालंदर येथें ही सभा भरून पुढें उन्हाळ्यानिमित्त तिची अधिवेशनें काश्मीर येथें झालीं.

याच्या बुद्धचरित्रपर बुद्धचरित या संस्कृत काव्याचें चिनी व तिबेटी भाषांत भाषान्तर झालें आहे. सूत्रालंकार या ग्रंथांत हीनयानी धोरणाचीं अनेक कथानकें आहेत.

कनिष्कानें धार्मिक सभेकरितां आमंत्रण पाठविलें असतां हा अतिशय वृद्ध असल्यामुळें यानें आपला शिष्य ज्ञानयश यास पाठविलें, असा उल्लेख आढळतो. ( Journal of the Buddhist Text-Soc., 1893, Pt. III, p. 13 ). तर कनिष्कानें पाटलीपुत्रावर स्वारी करून यास आपले बरोबर नेलें असेंहि (Schiefer's Taranath, Ch. VII, and Watters XII, 104 ) आढळतें.

**अश्वमित्र**—जैनतीर्थंकर महावीराचा प्रतिस्पर्धी.

**अश्वसेन**—जैनधर्मांतील तीर्थंकर पार्श्वनाथाचा हा पिता होय. याच्या बायकोचें नांव यामा. यामा बायको-पासून याला पार्श्वनाथ नांवाचा मुलगा झाला.

हा राजा असून काशी ( बनारस ) येथें राज्य करीत होता. हा क्षत्रियांपैकीं 'इक्ष्वाकु' वंशांतील होय ( जैनिझम इन् नॉर्थ इंडिया ).

**असदखान**—हा प्रख्यात तुर्कोमान् घराण्यांतील होता. याचें खरें नांव इब्राहिम. याच्यावर शहाजहानाची फारच मर्जी होती. बादशहानें असफखानाची मुलगी यास दिली. पुढें हा वजीर झाला. बहादुरशहाच्या वेळीं हा वकील मुतलक झाला. त्याला पुढें फर्रुख्सियरनें कामावरून काढलें. हा स. १७१७ मध्यें वारला ( बील ).

**२.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील इस्माईल राजाचा एक सरदार. इस्माईल हा नेहमीं याच्याच सल्ल्यानें राज्यकारभार करी.

यानें राज्यकारभाराच्या बाबतींत इस्माईलला फार मदत केली. त्याचप्रमाणें यानें विजापूरचें राज्यविस्ताराचें काम फार जारीनें केलें. एकदां यानें अमीर बरीदच्या छावणीवर हल्ला केला. त्या वेळीं जिकडे तिकडे शांतता होती. यानें शांततेचा भंग न करतां ज्या ठिकाणीं अमीर बरीद झोंपला होता या ठिकाणीं गुपचुप आपल्या साथी-दारांसह गेला, आणि राजास पलंगासह उचलून आपल्या गोटांत आणलें. अशा प्रकारचीं यानें शूर कृत्यें केलीं होतीं.

जेव्हां इस्माईल मृत्यु पावला तेव्हां इस्माईलनें 'आपल्या पश्चात् आपला ज्येष्ठ पुत्र मल्लू यास गादीवर बसवावें, व आपण सर्व राज्यकारभार पहावा.' असें याला सांगितलें होतें. त्याप्रमाणें यानें मल्लूस गादीवर बसविलें, पण थोड्याच दिवसांत याचें व मल्लूचें वांकडें येऊन यानें आपल्या जागेचा राजिनामा दिला.

पुढें मल्लूनंतर इब्राहिम हा विजापूरचे गादीवर आला. त्या वेळीं यानें विजयानगरच्या रामराजाचा भाऊ व्यंक-टाद्री याचा चांगलाच पराभव केला. त्यामुळें इब्राहिमानें याला दिवाणाचीं आणि सेनापतीचीं वस्त्रें दिलीं व याच्या एका मुलीशीं लग्न लाविलें. अशा रीतीनें असदखानाचें वर्चस्व वाढूं लागलें. याचा हा उत्कर्ष दरबारांतील इतर लोकांस सहन न होऊन ते याचा द्वेष करूं लागले. दर-बारांतील इतर लोकांनीं राजाचें मन याच्याविषयीं कलु-षित करून याला राजाकडून बडतर्फ करविलें.

बडतर्फ केल्यावर हा इमामशाहास जाऊन भेटला व त्याला 'राजाचा आपल्याविषयीं गैरसमज झाला आहे' अशी खात्री पटवून दिली. तेव्हां इमामशाहानें इब्रा-हिमाची गांठ घेऊन त्याला असदखानाची खरीखरी हकीकत सांगितली. त्यावर राजाचा विश्वास बसून राजानें यास परत बोलाविलें. व नंतर याच्याविषयीं ज्या लोकांनीं मन कलुषित केलें त्यांना कैदेंत टाकलें. यापुढें राजा याच्याच तंत्रानें चाले.

हा वारला तेव्हां याचें वय शंभर वर्षांहून अधिक होतें. त्यांपैकीं सुमारें पन्नास वर्षे यानें बादशाहाचे सेवेंत खर्च केलीं. जे मोठमोठे योद्धे व मुत्सद्दी झाले, त्यांत गणना करण्याच्या योग्यतेचा हा पुरुष होता.

यश आणि विजय हे तर याचे जणूं काय आज्ञाधारक सेवकच होते. हा मोठा एकनिष्ठ, दृढनिश्चयी व दूरदृष्टि होता. हा मोठया थाटानें आणि मिजाशीनें राहत असे. यानेंच प्रथम हत्तीस अंकुशाच्या ऐवजीं लगाम घालून हत्तीवर बसण्याची चाल पाडली ( विजापूरचें आदिल-शाही घराणें, मोडककृत ).

**३.** औरंगजेबाचा वजीर व झुल्फिकारखानाचा पिता. जिंजीच्या वेढ्याच्या वेळीं हा मुलाच्या मदतीस आला होता.

**असदुद्दीन खल्जी**—हा खल्जी घराण्यांतील मद्य-शीखानाचा मुलगा. याला स. १३१८ मध्यें फाशीं दिलें.

**असफउद्दौला**—सुजा उद्दौल्याचा वडील पुत्र मीर्झा अमानी हा असफउद्दौला हें नांव धारण करून गादीवर

बसला. त्या वेळीं रेसिडेंटानें यांच्या बापाच्या वेळचा तह मोडून नवीन तह केला. त्यांत २३ लक्षांचा मुलुख तोडून मागितला व २,६०,००० रु. दरमहा लष्करी खर्च म्हणून देण्याचें ठरलें. असा हा घातुक तह झाला होता. व यानेंच पुढें याच्या कारकीर्दीत अयोध्या प्रांताचें वैभव नष्ट झालें.

असफउद्दौल्यानें आपल्या आईजवळून ६२ लक्ष रुपये घेतले. परंतु पुढें रेसिडेंटाच्या मध्यस्थीनें आईपासून आपण पैसे घेणार नाहीं असा कौलनामा लिहून दिला. यानें नंतर सहा वर्षे राज्यकारभार सुरळीत चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु रेसिडेंटानें नबाबाच्या सैन्यांत वाटेल तसे इंग्रज लोक भरले व मन मानेल तसा कारभार सुरू केला. त्यामुळें एतद्देशीय सैन्यानें बंड केलें. इतक्या सगळ्या भानगडींत कंपनीची बाकी तुंबत चालली. वॉरन हेस्टिंग्जनें नबाबाकडे ५५ लक्ष रोख व २० लक्ष कांहीं मुदतीनें इतक्या पैशाची मागणी केली. काशीच्या चेतसिंगास नबाबाच्या आईनें मदत केली असा खोटा पुरावा जमवून हेस्टिंग्जनें तिच्याकडून ७५ लक्ष रुपये काढले ( मि. मिलचा इतिहास पाहा ). अशा तऱ्हेनें हेस्टिंग्जच्या वेळीं अयोध्या प्रांतांत हाहाःकार उडाला. कॅप्टन एडवर्ड यानें असें म्हटलें आहे कीं, स. १७७४ त सुजाउद्दौल्याचे कारकीर्दीत अयोध्या प्रांत अतिशय भरभराटींत होता तो स. १७८३ मध्यें उध्वस्त व उच्छिन्न बनला.

कॉर्नवालिसच्या कारकीर्दीत मात्र त्यानें लष्करी खर्च मुक्रर केला व तो ५० लक्ष असावा असें ठरलें. इतर सर्व न लागणाऱ्या मोठ्या पगाराच्या जागा रद्द केल्या. व कंपनीच्या नांवाखालीं कित्येक युरोपियन व्यापाऱ्यांना जे हक्क प्राप्त झाले होते, ते सर्व काढून घेतले. नबाबानें दोन हिंदु मुत्सद्यांच्या कडून अयोध्या प्रांताची बरीच सुधारणा केली. परंतु पुनः सर जॉन शोअरनें ५॥ लक्षाचा लष्करी खर्च नबाबावर जादा लादला. तेव्हां या धक्क्यानें नबाब जो आजारी पडला तो औषधपाणी कांहीं न घेतां स. १७९७ त मरण पावला. हा फार दानशूर होता.

**असफखान**—हा एक सरदार असून याचें नांव अब्दल मजीद. स. १५६५ मध्यें यानें गढामंडळ येथील दुर्गावती राणीवर चाल करून तिचा पराभव केला. आपण शत्रूच्या हातीं लागूं नये म्हणून दुर्गावती राणीनें स्वतः खंजीर खुपसून घेऊन प्राणत्याग केला. तेव्हां तिचा सर्व खजिना याच्या हातीं लागला. यानें तो खजिना तसाच पुढें अकबराचे विरुद्ध बंड करतां आलें. परंतु अकबरानें यास क्षमा करून यानें जिंकिलेला वरील प्रांत यास जहागीर म्हणून दिला ( बील ).

**२.** नूरजहानचा भाऊ. याचें मूळचें नांव अबुल हसन. जहांगीर बादशहानें यास वझीर केलें. याची मुलगी मुम्ताजमहाल ही शहाजहान बादशहास दिली होती. हा १६४२ त मरण पावला. हा निजामशाही जिंकण्याकरितां दक्षिणेंत होता. १६३३ पर्यंत याला विजापूर वगैरे जिंकण्यांत यश आलें नाहीं.

**३.** हा मीर्झा जाफर या नांवानें प्रसिद्ध आहे. हा कझ्वीनचा रहिवासी होता. हा अकबराच्या पदरीं होता. हा उत्तम कवि होता. यानें 'शीरीन व खुश्रो' नांवाचें काव्य रचिलें. अकबरानें यास मुख्य दिवाणाची जागा दिली ( स. १५९८ ). हा १६१२ मध्यें वारला. याच्या बापाचें नांव मीर्झा-बदी-उद-झमान असून स. १५७७ मध्यें हिंदुस्थानांत आला. अकबरच्या दरबारीं यास असफखान हें नांव मिळालें. यानें 'तारीख-अल्फी' नांवाचा ग्रंथ लिहिला ( बील ).

**४.** शहाजहानचा आवडता खानखानन हाच बहुधा जगन्नाथ पंडिताच्या 'आसफ-विलासां'तील आसफ असावा. याच्या मृत्यूबद्दल पंडित जगन्नाथानें दुःख प्रदर्शित केलें आहे. हा स. १६४१ मध्यें मरण पावला. खानखानन हें नांव नसून सन्मानाची पदवी आहे.

**५.** अकबराचा एक प्रधान. हा मुसलमान असून सुद्धां संस्कृत चांगलें जाणत असे. उत्तम कविता करण्याचें याचे अंगीं कौशल्य होतें.

एकदां हा एका पंडिताकडे गेला असतां त्या पंडितानें "म्लेच्छक्षयोस्तु" असा कठोर आशीर्वाद दिला. त्यावर "म्लेच्छक्षयोस्तु, पंचमीतत्पुरुष एवास्तु" असें उत्तर दिलें व यावरून त्या दोघांचें सख्य झालें.

दुसऱ्या एका प्रसंगीं यानें दिलेल्या काव्याची समस्या इलेश्वरोपाध्यायानें पूर्ण केली अशी हकीकत आहे.

**असहाय**—एक धर्मशास्त्रावरील ग्रंथकार. हा ७ व्या शतकाच्या सुमारास होऊन गेला असावा. याचा काल निश्चित सांगतां येत नाहीं. तरी पण हा ६ व्या शतकानंतर झाला, असें कांहींचें म्हणणें आहे. यानें नारदस्मृतीवर भाष्य लिहिलें, असा उल्लेख आहे. त्याची संशोधित प्रत कल्याणभट्टांनीं केली आहे. पण त्यामध्यें व मूळ भाष्यामध्यें बराच फरक आहे. अद्भुतसागर ग्रंथाचा कर्ता म्हणतो कीं, यानें गौतम-धर्मसूत्रावर भाष्य लिहिलें.

यानें वारसासंबंधीं बरीच माहिती दिलेली आहे. याच्या म्हणण्याप्रमाणें निपुत्रिक बापाची मिळकत त्याच्या गुरूकडे,

नंतर गुरूच्या मुलाकडे ( निपुत्रिक असल्यास गुरूच्या बायकोकडे ), गुरूस संतति नसल्यास त्याच्या बायकोनंतर तो मिळकत शिष्याकडे जाते. नंतर शिष्याच्या मुलाकडे व नंतर त्याच्या नातवाकडे जाते. त्याचप्रमाणें ब्राह्मणाला क्षत्रिय स्त्रीपासून झालेल्या संततीच्या वारस, हक्कासंबंधी व सावत्र भाऊ-बहिणींच्या वारसासंबंधी माहिती दिलेली आहे. पुढें याचें लोकांना इतकें विस्मरण झालें कीं, बालंभट्टीनें याच्या नांवाचा विशेषणासारखा उपयोग केलेला आहे. बालंभट्टीनें मेधातिथीला महत्त्व देऊन याला मेधातिथीचें विशेषण केलें आहे.

**असंग**—( वसुबंधु पाहा ).

**असंद**—याचें पूर्वज समरकंद येथें राहत असत पण याचा जन्म आग्रा येथें झाला. याचें मूळ नांव असदुल्लाखान किंवा मीर्झा नौशाह असे होतें. हा प्रख्यात कवि व फारसी लेखक होता. शेवटचा मोंगल बादशहा बहादुरशाहा यानें यास नबाब अशी पदवी दिली व काव्यशास्त्राध्यापक नेमिलें.

**असादाम**—हा वलभी घराण्यांतील रुद्रशाहाचा पुत्र. यानें अत्रिदामपुत्र विश्वशाह याच्यानंतर ३३ वर्षे राज्य केलें असावें ( J. B. B. R. A. S., Vol. VII ). धरसेन दुसरा व शिलादित्य दुसरा यांचे दरम्यान ८४ वर्षांचा काळ गेला. त्या काळांत या लोकांनीं राज्य केलें असावें.

**असित**—एक ऋषि. चिनी प्रवाश्यांनीं याचें नांव 'आए' असें लिहिलें आहे. हा मोठा ज्योतिषी होता. हा हिमालयापाशीं राहत होता. यानें बुद्धाचा जन्म झाला तेव्हां त्याला प्रत्यक्ष पाहून त्याच्या धोरणाविषयीं भविष्य सांगितलें होतें. याच्या नांवाचा निर्देश प्राचीन ज्योतिषग्रंथांत मिळतो. वराहमिहिरानें याची संहिता पाहून बृहत्संहिता लिहिली (भा. ज्यो. ३, पा. ३४२ व ४६८ ).

**अस्करी**—हा बाबरचा मुलगा. याची आई गुलरुखबेगम. हुमायुनानें याला गुजराथ प्रांतावर नेमलें. हा विलासी असल्यानें गुजराथ बहादूरशाहनें पुनः परत घेतला तेव्हां हा पळून गेला. शेरखानाशीं झालेल्या युद्धांत हा हुमायुनाबरोबर होता. हा मक्का येथें स. १५५८मध्यें मेला.

**अहमद**—( स. १४०९-२७ ) बंगालचा सुलतान. जितमल्ल ऊर्फ जलालुद्दीनचा पुत्र. याला केंब्रिज हिस्ट्रीमधील वंशावळींत शम्सुद्दीन महमूदशाह असें म्हटलें आहे.

**अहमद आदिलशाह**—हा पहिल्या इब्राहिमाचा पुत्र ( कें. हि. ).

**अहमदखान घोरी**—( हुशंगशाह पाहा ).

**अहमदखान बंगष**—फरूकाबादचा नबाब. मुहंमदशाह बंगषचा हा पुत्र. याचा भाऊ काईमजंग वारल्यावर त्याची दौलत सफदरजंगानें आपल्याकडे ओढली. ती स्वारी करून यानें परत घेतली. पानपतानंतर मराठ्यांकडून आपला पूर्वीचा मुलूख मिळविण्याचा यानें प्रयत्न केला. पण रामचंद्र गणेश व महादजी शिंदे यांनीं फरुखाबादेवर स्वारी करून याला शरण येणें भाग पाडलें. पानपतच्या लढाईच्या वेळीं हा हजर होता. हा फार शूर होता. मृत्यु स. १७७१ ( ११ जुलै ).

**अहमद निजामशाह बहिरी**—(स.१४८९-१५०८) हा अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा मूळ पुरुष होय. हा ब्राह्मणकुलोत्पन्न होता. याचा आजा बहिरंभट नांवाचा ब्राह्मण असून तो गोदेच्या उत्तरेस वऱ्हाडांतील पाथरी नांवाच्या शहराचा देशपांडे होता. दुर्गादेवीच्या दुष्काळांत याचा आजा आपल्या तिमाजी नांवाच्या मुलास घेऊन विजयानगरकडे गेला. बाहामनी सुलतान अहमदशाहावली याच्या शिपायांनीं विजयानगरच्या स्वारींत तिमाजीस कैद केलें व गुलाम म्हणून सुलतानाकडे आणलें. सुलतानानें त्यास मुसलमानी धर्माची दीक्षा दिली व त्याचें मलीकनायन नांव ठेविलें ( स. १४६० ). पुढें सुलतान मुहंमद यानें त्यास आपला कारभारी जो खानजहान त्याच्या शिफारशीवरून मोठ्या योग्यतेस चढविलें व त्यास निजाम-उल्मुल्क ही पदवी देऊन तेलंगणच्या सुभ्याच्या जागीं त्याची नेमणूक केली ( स. १४७० ).

परंतु निजामउल्मुल्कनें मलिक महमद ( मलिक अहमद असेंहि अहमद निजामास म्हणत ) नांवाच्या आपल्या मुलास नेमणुकीच्या जागीं पाठविलें, व आपण स्वतः सुलतानाच्या दरबारींच राहिला. येथें त्यानें खानजहानाविरुद्ध कारस्थान रचून सुलतानाच्या हुकुमानें त्याचा वध करविला, व आपण स्वतः ( अहमद निजामशाहाचा बाप ) कारभारी झाला. यानंतरचा सुलतान मुहम्मदशाह याच्या कारकीर्दीत निजामउल्मुल्कानें आपल्या अगोदरच मोठ्या असलेल्या जहागिरींत बीड व दुसऱ्या कित्येक जिल्ह्यांची भर टाकली व आपल्या मुलास तेलंगणच्या सुभेदारीवरून परत बोलावून त्याची दौलताबाद सुभ्यावर नेमणूक केली.

पुढें निजामउल्मुल्काचा वध झाल्यावर हा बंड करून स्वतंत्र झाला ( स. १४८९ ) व स्वतःस निजामशाहा ही पदवी यानें लावून घेतली. तीच पुढें अहमदनगरच्या सर्व राजांनीं लाविली, व त्यांच्या राज्यास यामुळेंच निजामशाही असें नांव पडलें. शिवाय मूळ पुरुष बहिरंभट याच्या स्मरणार्थ या वंशांतील प्रत्येक शाहा आपल्याला 'बहिरी' अशी पदवी लावून घेत असे.

स्वतंत्र होण्यापूर्वीच यानें कोंडाणा (सिंहगड), शिवनेर, लोहगड, वगैरे पुण्याच्या आसपासचे सर्व किल्ले व कोंकणांत दंडराजपुरी पावेतोंच बरेचसे किल्ले बंडखोर किल्लेदारांपासून आपल्या कबजांत घेतले. पैकीं शिवनेरी किल्ल्यांत याला पुष्कळ द्रव्य सांपडलें. नंतर यानें चंदनवंदन हे किल्ले काबीज केले. यानें आपल्या मुलुखाची व्यवस्था इतकी उत्तम ठेवली होती कीं, याच्या राज्यांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत काठीला सोनें बांधून लोकांनीं खुशाल फिरावें अशी आख्यायिका होती. अहमद निजामशाहा याच्या हुकमाशिवाय राज्यांत पानदेखील हालत नसे.

बाहामनीशाहानें याजवर स्वारी केली, तींत त्या शहाचाच पराभव झाला. अखेरीस अहमद हा निजामशाहा या नांवानें स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. यानें दौलताबाद व जुन्नर यांचे दरम्यान अहमदनगर नांवाचें शहर वसविलें. स. १४९४ या वेळेस मराठे लोक दक्षिणेंत पुंडाई करूं लागले होते. तेव्हां यानें दौलताबादेस वेढा घालून तो किल्ला घेतला. पुढें अनेक पराक्रम करून हा स. १५०८ सालीं निवर्तला.

याच्या आंगचे गुण वर्णन करण्यास आपण असमर्थ आहों, असें फेरिस्ता म्हणतो. यानें एकपत्नीव्रत पाळलें. द्वंद्वयुद्ध करून तंट्याचा निकाल करण्याची चाल यानेंच दक्षिणेंत पाडिली. राजाचें अनुकरण करून सर्व लहान थोर लोकांत खेड्यापाड्यांतून सुद्धां या खेळाची अभिरुची वाढून, जिकडे तिकडे तलवारीचा पट्टा व बोथाटी खेळण्याचे आखाडे स्थापन झाले.

**२.** ( स. १५९४ ) हा शाहा ताहीरचा मुलगा. याचा उल्लेख मुसलमानी रियासतींत आहे.

**अहमदबक्षखान**—पंजाबांतील लोहारु संस्थानचा संस्थापक. एक मोंगल सरदार. अल्मोराच्या राजानें लॉर्ड लेकडे तहाचें बोलणें करण्याकरितां यास धाडलें होतें ( स. १८०३ ). ती कामगिरी चांगल्या प्रकारें बजावल्यामुळें यास त्यानें लोहारु गांव इनाम दिला, व लॉर्ड लेकनें सरकारी नोकरीच्या अटीवर यास फिरोजपूर परगणा सहस्यात दिला.

**अहमदशाहा**—( स. १४११-१४४२ ). हा एक गुजराथचा सुलतान होय. हा आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षी गुजराथच्या मुझफरशाहानंतर गादीवर बसला. हा तातारखानाचा मुलगा होय. फीरूझखान हा याचा चुलता होय असा उल्लेख केंब्रिज हिस्ट्रीमधील वंशावळींत आला.

याचा चुलतभाऊ फीरूझखान त्यानें बंड केल्यामुळें यानें त्याच्यावर स्वारी केली व त्याचा पराभव केला. त्या स्वारीहून परत येत असतां कर्णावती नगरास यानें आपलें नांव दिलें ( स. १४१२ ). कर्णावतीला श्रीनगर किंवा राजनगर असेंहि म्हणत असत. तें सध्यां अहमदाबाद या नांवानें प्रसिद्ध आहे. नंतर यानें पट्टण येथून आपलें तख्त उठवून तें अहमदाबादेस आणिलें. तेव्हांपासून अहमदाबाद शहर गुजराथची राजधानी झालें.

हा पराक्रमी असून यानें माळवा, सौराष्ट्र वगैरे सभोंवारच्या प्रांतावर आपली खंडणी बसविली व हिंदुधर्माचा पाडाव करण्याकरितां विशेष मेहनत घेऊन त्या कामीं यानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. यानें स. १४१४ त ताजुल्मुल्क नामक एक मोठा धर्माभिमानी गृहस्थ मुसुलमानी धर्मप्रसाराच्या स्वतंत्र खात्यावर मुख्य नेमून त्यास हिंदूंच्या देवालयांचा व मूर्तींचा दरोबस्त नाश करण्याची सक्त ताकीद दिली. त्याप्रमाणें ताजुल्मुल्कनें हुकुमाची अंमलबजावणी केला. देवस्थानांप्रमाणें राज्येंहि खालसा करण्याचा सपाटा चालू होता. सन १४२० पासून बरींच वर्षें स्वस्थ बसून यानें विश्रांति घेतली. कारकीर्दीच्या अखेरीस महाराष्ट्रांतील बाहामनी सुलतानाबरोबर उत्तर कोंकण प्रांतीं याचे युद्धप्रसंग झाले त्यांत बहुधा यासच जयप्राप्ति झाली. हा सन १४४३ त जुलईच्या ४ थ्या तारखेस अहमदाबाद येथें मरण पावला, असें सरदेसाई लिहितात, पण स्मिथ याचा मृत्युसन १४४१ हा देतो.

हा मोठा न्यायी होता अशी याची कीर्ति आहे. यानें रजपुतांशीं शरीरसंबंध केले. याच्या पश्चात् याचा पुत्र मुहंमदशाहा गुजराथच्या तख्तावर बसला.

**२.** ( स. १५५४-६१ ) गुजराथच्या सुलतान घराण्यांतील दुसऱ्या लतीफखानाचा मुलगा. हा याच घराण्यांतील जो तिसरा महमूद त्याच्या नंतर सुलतानपदावर आला ( कें. हि. ).

हा गादीवर आल्यावर सय्यद मुबारिक या सरदारानें आपणाकडे वजीरी घेतली. हा अल्पवयी असल्यामुळें दरबारांतील तंटे जास्तच वाढले. इतक्यांत खानदेशाच्या सुलतानानें गुजराथवर स्वारी केली, पण गुजराथच्या फौजेनें त्यास मागें हटविलें. सन १५८१ त उमराव लोकांकडून सुलतानचा खून झाला ( मु. रि. भा. १, पा. २१० ).

**अहमदशाहा अब्दाली**— स. १७२४ मध्यें याचा जन्म सद्दोझाई जातींमध्यें झाला. हाच पुढें अहमदशाहा अब्दाली या नांवानें प्रसिद्धीस आला. याच्या बापाचें नांव सम्मौनखान असें होतें.

हा लहानपणीं घिलजाईस या शत्रु टोळीच्या हातीं सांपडला असतां नादीरशाहानें याची स. १७६८ त सुटका केली व याला एका घोडदळाचा मुख्य केलें. नादीरशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां हा त्याजबरोबर होता. स. १७४७ च्या जूनमध्यें नादीरशाहाचे खुनानंतर हा स्वतंत्र झाला, व यानें नादीरशाहाची तीस लक्ष रुपयांची ठेव आणि कंदाहार काबीज केलें, व आपल्या टोळींचें नांव बदलून दुराणी असें ठेविलें. कारण अब्दाली हें नांव अपेशी आहे, अशी याची समजूत होती.

स. १७४८ मध्यें यानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. परंतु दिल्लीचा युवराज अहमद याजकडून याचा सरहिंद येथें पराभव झाला. पुनः स. १७४८ च्या हिंवाळ्यांत यानें दुसरी स्वारी केली, व नंतर स. १७५२ मध्यें तिसरी स्वारी केली. ही तिसरी लढाई लाहोरचा सुभेदार मीर मन्नु व हा यांच्यामध्यें झाली. तींत मीरमन्नुचा पराभव होऊन तो अब्दालीस शरण गेला. यानंतर स. १७५५-१७५६ मध्यें यानें चौथी स्वारी केली. मोगल बादशाहाचा वजीर मीर शहाबुद्दीन यानें मुलतान व काबूल हे याचे प्रांत घेतले होते ते यानें परत मिळविले. पुढें यानें दिल्ली व मथुरा हीं शहरें लुटलीं व तेथील लोकांची कत्तल करून स्त्रिया भ्रष्ट केल्या. स. १७५८ त राघोबादादानें याचे लाहोर व मुलतान हे प्रांत घेतल्यामुळें यानें स. १७५९-६१ मध्यें हिंदुस्थानावर स्वारी केली. तेव्हां मराठे व अब्दाली यांच्यांत युद्ध झालें. तें मराठ्यांचे इतिहासांत पानिपतचें घनघोर युद्ध म्हणजे पानिपतचें तिसरें युद्ध या नांवानें फार प्रसिद्ध आहे. यानें या लढाईंत मराठ्यांचा पूर्ण पराभव करून मराठ्यांच्या वाढत्या सत्तेस आळा घातला. यानंतर यानें स. १७६२ मध्यें साहवी, स. १७६४ मध्यें सातवी आणि स. १७६७ मध्यें आठवी अशा लागोपाठ हिंदुस्थानावर आठ स्वाऱ्या केल्या.

सन १७५२ सालीं त्यानें तिसरी स्वारी केली. तींत व पुढें स. १७६१ सालीं केलेल्या स्वारींत पुष्कळच साम्य आहे. या वेळीं अब्दालीचा मुक्काम रावी नदीच्या पलीकडील तीरास असून लाहोरचा सुभा मीरमन्नूहि अलीकडेस होता. पुढें लवकरच दोन्हीं सैन्यें समोरासमोर येऊन त्यांची लढाई झाली. तींत मीरमन्नू मागें सरला व त्यानें लाहोरचा आश्रय केला. यानें त्याची रसद बंद केली. तेव्हां मीरमन्नूच्या सैन्याची उपासमार होऊं लागली. शेवटीं ता. १२ एप्रिल १७५२ रोजीं मीरमन्नूनें आपल्या सैन्यासह अब्दालीवर चाल केली; व त्यांचा भयंकर संग्राम झाला. लढाई ऐन रंगांत आली व मीरमन्नूचा जय होईल असें अब्दालीला वाटूं लागलें. इतक्यांत मीरमन्नूचा सेनापति कौरमल्ल हा हत्तीवर बसून लढत असतां त्याच्या हत्तीचा एक पाय खळग्यांत गेला व तें जनावर एकदम खालीं बसलें. इतक्यांत एकानें कौरमल्लाचें डोकें कापून नेलें. सेनापतीची ही अवस्था होतांच सैन्यांत एकदम हाहाकार उडाला व जो तो जीव वांचवण्यासाठीं पळूं लागला, व याप्रमाणें मीरमन्नूचा पराजय झाला. या वेळीं मीरमन्नूचा याच्या प्रत्यक्ष भेटींत मनोरंजक संवाद झाल्याचें लतीफ यांनीं नमूद करून ठेविलें आहे. मीरमन्नूस अहमदशाहा म्हणाला, 'मीं पूर्वी तुझी लाहोरच्या सुभ्यावर स्थापना केली त्याअर्थी मीच तुझा खरा धनी असल्यानें, मी हिंदुस्थानांत येतांच खंडणी घेऊन तूं मला सामोरा कां आला नाहींस ?' हें ऐकून मीरमन्नूनें उत्तर दिलें, 'दिल्लीच्या बादशहाची चाकरी करावी लागत असल्यानें मला आपल्याकडेस येणें शक्य झालें नाहीं.' यावर हा म्हणाला, 'मग तो तुझा दिल्लीचा धनी आतां तुला संकटांतून सोडविण्यास कां आला नाहीं ?' यावर मीरमन्नूनें उत्तर दिलें, 'आपला (दिल्लीच्या बादशाहाचा) चाकर ( म्हणजे मीरमन्नू ) स्वतःचें रक्षण करण्यास समर्थ आहे अशी त्याची खात्री असल्यानें तो आला नाहीं.' नंतर पुनः अहमदशाहा म्हणाला, 'ज्याप्रमाणें आतां तूं पराभव पावून माझ्या हातांत सांपडला आहेस त्याप्रमाणें मी जर तुझ्या हातांत सांपडलों असतों तर तूं काय केलें असतेंस ?' हें ऐकून मीरमन्नू म्हणाला, 'आपलें डोकें कापून दिल्लीच्या बादशहाकडेस तें नजराणा म्हणून रवाना केलें असतें.' यावर अहमदशाहा म्हणाला, 'मग मीं तुझें आतां काय करावें ?' तेव्हां मीरमन्नूनें कुशलतेनें सांगितलें, 'आपण सौदागर असाल तर गुलाम म्हणून माझी विक्री करा, जुलमी राज्यकर्ते असाल तर डोकें कापा, पण खरोखरींचे राजे असाल तर राजासारखी दया दाखवून माझा जीव वांचवा.' मीरमन्नूचें हें समयसूचक, धीट व कुशलतेचें भाषण ऐकून अहमदशाहा खूष झाला, व त्यानें त्यास 'फर्जदखान बहादुर रुस्तमें हिंद' असा किताब दिला. असो. या स्वारींत मीरमन्नूला ज्याप्रमाणें त्यानें लाहोरास कोंडून त्याच्या फौजेची उपासमार केली त्याचप्रमाणें पानपतच्या स्वारींत भाऊसाहेबांच्या सैन्याची अन्नान्नदशा केली. हें युद्ध रावी नदीच्याजवळ झालें तर पानपतची लढाई यमुना नदीचे तीरावर झाली. या लढाईंत हत्तीवर बसलेला कौरमल्ल मारल्यामुळें अहमदशाहास जय मिळाला, तर

पानपतच्या युद्धांत हत्तीवर बसलेल्या विश्वासरावास मारल्यामुळें जयाचें पारडें अहमदशाहाकडे वळलें, असें या दोन स्वाऱ्यांत कांहीं महत्त्वाच्या गोष्टींत चमत्कारिक साम्य आहे.

यानें स. १७५५-५६ च्या सुमारास हिंदुस्थानावर चौथी स्वारी केली. सिंधु उतरून लाहोरचा सुभा अदिनाबेग यास हाकलून लावलें आणि दिल्लीपर्यंत हा सहज येऊन धडकला. यानें दिल्ली येथें दोन महिने मुक्काम केला. तेथें अत्यंत क्रूरपणें वागून लोकांना नादीरशाहाची आठवण करून दिली. मथुरा व आग्रा हीं शहरें लुटून हिंदु व मुसलमान अशा सर्व लोकांत यानें भयंकर दहशत उत्पन्न केली.

यानें कशी लूट केली याचें वर्णन देणारें एक पत्र नमुन्याकारितां पुढें दिलें आहे. हें वर्णन स. १७५६ मधल्या स्वारीबद्दलचें आहे.

'दोन शत ऊंट मालाचे आपले समागमे दिल्लीहून नेले ते द्रव्य व जवाहीरहि अबदालीचेच कपाळचे होते. ते गेले. अबदालीचे सरकारांत अठावीस हजार ऊंट, हाती व खेचरे व गाढवे व बईल व छकडे व गाड्या व यारेदी (लहान गाड्या) मालाचीं लादली गेलीं. याशिवाय ऐशी हजार स्वार प्यादे त्याजसमागमे होते. त्याही नेले ते वेगळे. चार शहरे दिल्ली, आगरा, मथुरा, वृंदावन सारखी त्यानें धून नेली. तेव्हा इतकी बारबारदार (ओझेवाले) त्यास लागले म्हणोन कोणाचे घरीं घोडा, ऊंट त्यानें सोडला नाहीं, परिटाचे गाढवहि सांपडले तेंहि घेऊन गेला. त्याचे स्वार जातीवेळेस पायीं गेलेत. आपले घोड्यावर माल लावून गेलेत. तोफखाना जाटाचे गड घेण्यास आणिला होता तोहि बैल मालाखाली लादला गेला म्हणून सोडून गेला. तो जाटानें आपले गडांत नेला. दिल्लीमध्यें कोणापाशीं तरवार सोडली नाहीं. तोफखाना पातशाही किल्ल्याचे बुरुजावर होता तो निवडून घेऊन गेला. बाकी खाली टाकला व मोडला' (पे. द. २. ७१).

पुनः दिल्लीस आला आणि आपला मुलगा तयमूर याचे बादशाहाच्या एका मुलीशीं लग्न केलें. आपणहि एका बादशहाच्या मुलीशीं लग्न लावलें. पुष्कळ खंडणी उकळली आणि आलमगीरला पुनः गादीवर बसवून हा स्वदेशीं परत गेला (स. १७५७). दिल्लीच्या बादशाहीचे संरक्षणाकरितां मराठ्यांशिवाय मुत्सद्यांना तरणोपाय राहिला नाहीं. रघुनाथरावानेंहि पंजाबांतील याची सत्ता उधळून लावून त्याला आव्हानच दिलें होतें. पण रघुनाथराव पेशवे पंजाबांतील याची सत्ता उलथून घाईनें दक्षिणेकडे निघून आला (स. १७५८ आक्टो.), तोंच हा हिंदुस्थानांत पुनः दाखल झाला (नवंबर स. १७५९). मराठ्यांपैकीं दत्ताजी शिंद्याशीं याचें निकराचें युद्ध होऊन त्यांत दत्ताजी पडला. नंतर मल्हारराव होळकर यांनीं गंगाधर यशवंत यांच्या साहाय्यानें लांबलांब मजला मारून गनिमीकाव्यानें अब्दालीला दमविण्याचा प्रयत्न केला, पण त्यालाहि अब्दाली पुरून उरला. बहुतेक मराठे सरदारांनां अब्दालीची दहशत खाली होती. गनिमी कावा, लांबच्या मजला किंवा समोरासमोर युद्धाच्या बाबतींत याच्यापुढें मराठे फिके पडले होते. म्हणूनच जुन्या सर्वांना बाजूस सारून उत्तरेकडे सदाशिवरावासारख्या अगदीं कोऱ्या माणसाला जबरदस्त तोफखाना देऊन पाठविण्यांत आलें. तेव्हां सदाशिवरावानें मोठ्या सैन्यासह दिल्लीवर स्वारी करून दिल्ली ताब्यांत घेतली. तेथून पुढें जाऊन यमुनातिरावरील कुंजपुराहि त्यानें सर केला. पण अब्दालीनें मोठ्या धैर्यानें दिल्ली व कुंजपुरा यांच्यामध्यें यमुना उतरून सदाशिवरावाचा दिल्लीशीं व दक्षिणेशीं असलेला संबंध तोडून टाकला. त्यामुळें अन्नान्नदशा होऊन पानपतावर याच्याशीं मराठ्यांना युद्ध करणें भाग पडलें.

त्या दिवशीं यानें रोहिल्यांना पुढें केलें त्यामुळें दुराण्याचा बचाव होऊन रोहिल्यांचा संहार झाला. पण ऐन वेळीं मराठे दमले आहेत असें पाहून ताज्या दमाच्या राखीव सैन्याला यानें युद्धाचा हुकूम दिला, तेव्हां मराठ्यांची पूर्णपणें वाताहत होऊन याला जय प्राप्त झाला (सदाशिवराव पेशवे पाहा).

होळकरानें सांगितल्यावरून नारो शंकरानें दिल्ली सोडली, ती सोडली नसती व ग्वाल्हेरपर्यंत आलेल्या दक्षिणेतील फौजा पुढें चालून येत्या तर अब्दाली परभारें पानपतावरून देशीं गेला असता. दिल्ली सोडून मराठे पळून गेले असें पाहून पानपतच्या संग्रामानंतर सातवे दिवशीं हा दिल्लीस आला. राजधानीचा कबजा घेऊन सुजास वजीरी व नजीबखानास बक्षीगिरी दिली. दीडदोन महिने याचा दिल्लीतच मुक्काम झाला. तेवढ्यांत सुजा यास सोडून गेला. नजीबखानानें आपले वकील पेशव्याकडे सलूखास पाठविले. सर्वांचें लक्ष पेशव्याकडे लागलें. याच्या सैन्याचा दोन वर्षांचा पगार थकला होता. त्यांनीं पगार चुकता करून देशीं चलावें अशी निकराची मागणी केली. आणि ती अमान्य होतांच बंडाचें निशाण उभारलें. अब्दालीच्या छावणींत एकच गोंधळ उडाला. हा प्रकार पाहून सुजाउद्दौला अब्दालीस सोडून अयोध्येस निघून गेला. पैशाची अडचण मिटविण्यासाठीं यानें नजीबास निकड लावली.

तेव्हां मोठ्या शिकस्तीनें त्यानें यास चाळीस लक्ष रुपये दिले. मध्यंतरीं इराणी फौजेनें अफगाणिस्थानावर चाल केल्याची खबर आली. तेव्हां अनेक विवंचनांनीं त्रासून यानें २२।३।१७६१ रोजीं शालिमारची आपली छावणी उठवून स्वदेशीं प्रयाण केलें.

पण शिखांनीं लाहोर घेतल्यामुळें स. १७६१ च्या अखेरीस हा पुनः पंजाबांत आला. यानें लाहोर परत हस्तगत केलें आणि लुधियानानजीक शिखांचा पराभव केला. पण हा परत गेला नाहीं तोंच शिखांनीं पुनः सर्व पंजाब परत घेतला. तेव्हां याचे गुलराज व आनंदराम नांवाचे दोन वकील हिंगण्यामार्फत थोडी वाटाघाट होऊन दक्षिणेंत पेशव्याकडे आले. फेब्रुवारी व मार्च ( स.१७६३ ) चे सुमारास एक महिना यांचा मुक्काम इकडे होता. त्यांजबरोबर करार झाला कीं ' ती. कैलासवासी यांच्या वेळेस ज्याप्रमाणें अमल होता, त्याप्रमाणें परगणियांत अंमल शहानीं ताकीद करून देवावा. याप्रमाणें झाल्यास वकिलास चाळीस हजारांची जहागीर अंतर्वेदींत देण्याचा करार ' पेशव्यानें लिहून दिला ( तारीख ८-३-१७६३. मा. पे. रो. १. १, ६, ७, इ. सं. ऐ. टि. १. ५६ ). या वकिलांचा बंदोबस्त पेशव्यांनीं अहमदनगरास ठेवला होता. वकिलांनीं पेशव्यास अब्दालीकडील पोषाख दिला, तसेंच पेशव्यांनीं भद्रगज हत्ती याला नजर केला. याप्रमाणें मराठ्यांशीं गोडी करूनहि पंजाबांत शिखांची लाट याला थांबवितां आली नाहीं. शिखांनीं पंजाब पूर्ण ताब्यांत घेतला. स. १७६७ मध्यें हा आणखी एकदां शिखांकरितां पंजाबांत आला. पण उपयोग झाला नाहीं.

अशा प्रकारें हिंदुस्थानच्या इतिहासांत कायमचें स्थान मिळालेला हा प्रसिद्ध पुरुष वयाचे ४८ वे वर्षी ता. १९-१०-१७७२ रोजीं काळपुळीच्या विकारानें चमननजीक मरण पावला. याचा मुलगा तयमूरशाहा ( म. रि. म. ३ पा. २०८-२१० ).

हा स्वभावानें अतिशय गरीब होता. कधीं कधीं या गरीबीचा कडेलोट होत असे; व याच्या हाताखालचे लोक याच्या हुकमाविरुद्ध वागत आणि याला ठाकून बोलण्यास कमी करीत नसत. अशा प्रसंगीं, हा मनाविरुद्ध बोलणाऱ्या व करणाऱ्याविषयीं क्षमावृत्तिच धारण करीत असे. याविषयीं एक मजेदार गोष्ट याचा चरित्रकार मुहम्मदखान बारूक्झाई यानें सांगितली आहे, ती अशीः—

एकदां अब्बास कुलीखान बयात याच्या ताब्यांत असलेलें इराणांतील निशापूर शहर घेण्यासाठीं हा गेला असतां याला बरेच दिवसपर्यंत आपल्या सैन्याचा पगार देणें शक्य झालें नाहीं. यामुळें चिडून जाऊन याच्या सैन्यांतील लोकांनीं एकत्र होऊन बादशाही खजिना लुटला. ही तक्रार खजीनदारानें याच्याकडे नेली. पण यानें कांहींच हालचाल केला नाहीं. त्यामुळें खजानजी रागावला व अपशब्द बोलूं लागला. त्यावर यानें येवढेंच सांगितलें कीं, ' अरे मूर्खा, मी त्यांच्याच मदतीनें महत्पदास चढलों आहें, व त्यांना मी स्वतःचे भागीदार म्हणत आलों आहें. तेव्हां हा खजिना माझा व त्यांचा दोघांचाहि आहे. अर्थात् त्यांना गरज लागेल त्या वेळीं खजिन्यांतून पैसे घेण्याचा अधिकारच आहे. मीं जर त्यांस पैसे घेऊं दिले नाहींत तर परमेश्वराचा अपराधी होईन.' या गोष्टीवरून याच्या ठिकाणीं सहनशीलता व गरीबी किती होती हें ज्याप्रमाणें दिसतें त्याप्रमाणेंच आपल्या शिपायांना खूष ठेवण्यासाठीं आपल्याच लोकांनीं केलेली मानहानिहि प्रसंगीं हा कशी गिळून टाकी हें समजून येतें.

याच्या अत्यंत गरीब स्वभावाचें याच चरित्रकारानें आणखीहि एक उदाहरण दिलें आहे. पानिपतच्या लढाईनंतर हा कंदाहाराला गेला. तेथें गेल्यावर याच्या मनांत उत्तम हवेच्या ठिकाणीं एक शहर वसविण्याचें आलें. पण त्यासाठीं यानें जी जागा पसंत केली, ती अलुक्झाई जातींतील एका पोटजातीच्या ताब्यांतील प्रदेशापैकीं होती व त्या जातीस यानें आपल्या जागेंत शहर वसवावें हें आवडेना. म्हणून यानें आपला हा बेत सोडून दिला. कारण, पूर्वीप्रमाणेंच या जातीलाहि आपण दुखवूं नये असें यास वाटलें. शेवटीं याचें नातें व याच्याविषयीं सहानुभूति असलेल्या पोपलझाई जातीनें जागा दिल्यावर तेथें यानें आपल्या इच्छेप्रमाणें अहमदशाही नांवाचें शहर वसविलें.

यानें आपल्या मुलकी व लष्करी नोकरींत पाश्चात्य व हिंदी कसबी लोक ठेविले होते. या लोकांच्या साहाय्यानें यानें आपला तोफखाना सुधारला होता असें म्हणण्यास जागा आहे. पण याच्या सैन्यांत कडक शिस्त होती असें वाटत नाहीं. कारण अनेक वेळां याच्या हुकमाशिवायच याचे लोक लुटालूट वगैरे करीत. पानिपतसारख्या लढाया मारूनहि त्यांचा फायदा यास घेतां आला नाहीं. याचें कारण म्हणजे याचे शिरजोर असलेले शिपाई व सेनापति येथें बरेच दिवस एकसारखें राहण्यास व विशेषतः उन्हाळ्याचे दिवस येथें काढण्यास अत्यंत नाखुष असत. शिपायांचा वारंवार अंत पाहणें हेंहि सेनापतीस फायदेशीर नसतें. यामुळें उत्तम लढाया मारून जो फायदा करून घ्यावयाचा तो यास घेतां आला नाहीं.

पण शत्रूशीं हा अत्यंत क्रूरपणें वागे. हिंदुस्थानांत हा ज्या ज्या वेळीं आला त्या त्या वेळीं यानें मथुरा, दिल्ली, पंजाब वगैरे ठिकाणीं भयंकर कत्तली, लुटालूट, जाळपोळ वगैरे गोष्टी केल्या, व त्यामुळें येथील जाट, मुसलमान, शीख, मराठे, यांच्या मनांत याजविषयीं विलक्षण दहशत बसली होती. लुटालूट, कत्तल, जाळपोळ इत्यादि निष्ठुरपणाचे प्रकार राज्य व द्रव्य यांच्या तृष्णेनें हा स्वधर्मीयांशींहि करण्यास कमी करीत नसे. या याच्या निष्ठुर वृत्तीचें उदाहरणहि मोठें बोधप्रद आहे. स. १७५६-५७ सालीं हा हिंदुस्थानांत आला असतां दिल्लीच्या मुक्कामांत यानें दिल्लीचा मयत वजीर कमरुद्दीनखान याचा मुलगा इन्तिजामउद्दौला यास दोन कोट रुपये देण्याच्या करारावर वजीर केलें. पण नेमलेल्या दिवशीं त्या रकमेपैकीं एक कोट रुपयाचा पहिला हप्ता यास मिळण्याचा रंग दिसेना. त्यामुळें यानें इन्तिजामउद्दौलास लांकडी खोड्यांत घालण्याची धमकी दिली. तेव्हां लाचार होऊन त्यानें शुअलापुरी बेगमेपाशीं पैसे असल्याचें सांगितलें. बेगमहि पैशाची तजवीज चटकन करीत नाहीं, असें पाहून यानें तिच्या बोटाच्या नखांतून लोखंडी खिळे ठोकण्यास फर्माविलें. याचा योग्य तो परिणाम होऊन यास सुमारें ८३ लाखांची प्राप्ति झाली. पैसे न मिळते तर यमदूताशीं स्पर्धा करणाऱ्या याच्या नोकरांनीं योग्य रीतीनें चाकरी करण्यास कमी केलें नसतें, अशी यास खात्री असल्यामुळें यानें केवळ दहशतीनेंच अनेक कामें केलीं. याच्या या निष्ठुर व लोभी वृत्तीचें वर्णन एका मराठी पत्रांत उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. तें हा स. १७५६-५७ सालच्या स्वारींत दिल्लीस राहिल्या वेळचें आहे. पत्रलेखक म्हणतो, 'अब्दालीचें वर्तमान तरी दिल्लींत किल्ल्यांत आहे. खानखानाचे मायेपासून तीन करोड रुपये घेतले व खानखानास वेगळाच तानून क्रोड रुपये घेतले. वजीरापासून पन्नास लक्षांचें जवाहीर व ५० लाख रुपये घेऊन कैदेंत ठेविले होते. खानखानासहि कैदेंत टाकले होते. कुलशहरांत सध्यां खणत्या लाविलेल्या आहेत. पांच रुपयेपावेतों माणसापासून निघाले ते घेऊन खजिन्यांत दाखल करीत होते. शहरांत जो ज्याचे घरीं राहिला तो त्याचेंच म्हणून वर्तणूक करतो. माणसें बहुत मारलीं गेलीं; व स्त्रिया बहुत भ्रष्टिल्या. कित्येकांनीं प्राण दिले व कित्येकांनीं जलप्रवाह केला. जितक्या बादशाहजाद्या होत्या तितक्यांस आपले लोकांस विवाह करून दिल्या. जितक्या पातशाहाच्या व शाहाजाद्याच्या बायका होत्या त्या आपले घरांत निका पढून घातल्या. जेथवरी चांगली बायको हिंदूची होती तेथवर लोकांनीं बाटविल्या. व घरांत घातल्या' (पे. द. २१, १०४). हें वर्णन दिल्लींतून तत्कालीं लिहिलेलें असल्यामुळें त्यांत सत्याचा अंश फार आहे, हें सांगावयास नकोच. यानें मथुरा, वृंदावन, व जाटांचें ठाणें बल्लमगढ या ठिकाणीं जी कत्तल, जाळपोळ व लुटालूट केली त्यांचें विस्तृत पण अंगावर शहारे आणणारें वरील वर्णन या गोष्टी स्वतः ज्यानें पाहिल्या अशा एकानें केलें आहे. यावरून याच्या ठिकाणीं क्रूरपणा, निष्ठुरता वगैरे गोष्टी किती मोठ्या प्रमाणांत होत्या हें वरील दोन्ही वर्णनांपेक्षांहि जास्त उत्तम कळून येतें.

याची जरब किंवा दहशत शत्रुपक्षीयांस किती वाटत असे हें अनेक ठिकाणीं आलेल्या उल्लेखांवरून चांगलें स्पष्ट होतें. पानिपतच्या लढाईनंतर स. १७६२ सालीं शिखांचा पाडाव करण्यासाठीं हा हिंदुस्थानांत आला होता. त्या वेळचें वर्णन "वाकियात-इ-दुर्रानीं" मध्यें एके ठिकाणीं आलें आहे. त्यांत या पुस्तकाचा कर्ता अब्दुल करीम म्हणतोः 'एके दिवशीं रात्रीं हा उठला व कांहीं घोडेस्वार आपल्याबरोबर घेऊन हिंदुस्तानांत आला. ज्या वेळीं हा जंदियालला पोहोंचला त्या वेळीं याजबरोबर फक्त १०-१२ लोक होते. तरी याच्या नांवाची दहशत लोकांस इतकी बसली कीं, शीखसैन्य ही बातमी ऐकतांच पळून गेलें.' भाऊसाहेबांनीं अब्दालीशीं ठासून लढाई दिली हें खरें, पण त्यांच्या पत्रांत अनेक ठिकाणीं याच्या फौजेच्या नुसत्या आवईनें मराठे ठाणेदार आपलीं ठाणीं टाकून पळत असत, असें नमूद असून अशा लोकांच्या बाबतींत 'तिकडे त्यांची फौज आली तर ठाणेदार मरत न पळत' (रा. खं. १. २१७) 'पेंच पडल्यास झुंजत, परन्तु कांहीं भय मानून जागा न सोडीत' (रा. खं. १. २०८) असें करण्याबद्दलचा हुकूम त्यानें गोविंदपंत बुंदेल्यास पाठविला आहे. येवढेंच नव्हे, तर 'जो ठाणें टाकून अवाईनेंच येईल त्याचे पारिपत्य तुम्हीं उत्तम प्रकारें करावें,' (रा. खं. १. १९५). अशी परवानगी भाऊसाहेबांनीं गोविंदपंत बुंदेल्यास देऊन टाकली होती. याच्या भयानें लोक गर्भगळीत होऊन घरेंदारें सोडून पळून जात असत व शहरें ओस पडत, अशा प्रकारचे अनेक उल्लेख आले आहेत. फौज बाळगून राहणाऱ्या लोकांचींहि अशीच स्थिति होती (पे. द. २१. १०३-१०७, रा. खं. १ ले. १३९, १४१, १४२, १४३).

हा अनुभवानें शाहणा होत गेला होता. यामुळें मागील अनुभवाचा उपयोग करून घेण्यांत याचा हातखंडा असे. याविषयीं एक बोधप्रद हकीकत आहे ती अशीः हिजरी १०६३ मध्यें यानें इराणचा राजा शाहारूख याला उखडून

टाकण्यासाठी प्रथम हिरात येथें असलेल्या त्याच्या सरदारास मारून हिरात घेतलें. नंतर मशहद येथें असलेल्या शाहारूख यासहि बेजार करून त्याजकडून आपणास अनुकूल असा तह करविला. यानंतर निशापूर घेण्याच्या उद्देशानें यानें आपला मोर्चा त्या शहराकडे वळविला. तेथील सरदार अब्बास कुलीखान यास कळून चुकलें कीं, आपला टिकाव याच्यापुढें लागणार नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या चुलत्याच्या सल्ल्यावरून निराळाच डाव टाकला. या वेळीं कडक हिंवाळा सुरू होण्यास २ महिने अवकाश होता. अब्बास कुलीखानानें याच्याशीं तहाचें बोलणें सुरू केलें, व तें दोन महिने लांबविलें. दोन महिन्यांनंतर ज्या वेळीं कडक हिंवाळा सुरू झाला तेव्हां यास कोणत्याच प्रकारची हालचाल करणें अगदीं अशक्य झालें. येवढेंच नव्हे, तर पूर्वी तरतूद केलेली नसल्यामुळें निशापूरचा वेढा चालू ठेवणें म्हणजे स्वतःच्या सैन्याचा पुरा नाश, हेंहि यास कळून चुकलें. या वेळीं यास हेंहि कळून चुकलें कीं, अब्बास कुलीखानानें आपणांस तहाचें बोलणें सुरू करून पूर्णपणें फसविलें. या वेळीं याच्या मनांत अब्बास कुलीखानाविषयीं राग व सूड यांच्या भावना उत्पन्न झाल्या असल्याच पाहिजेत. पण आपला तोल अविचाराच्या बाजूस न जाऊं देतां किंवा लोक आपणांस काय म्हणतील याचा बिलकुल विचार अगर पर्वा न करितां हा तेथून हिरातला निघून गेला. हिरात येथें गेल्यावरहि कडक थंडीमुळें याच्या सैन्याचा नाश व खराबी पुष्कळ झाली. यावरून नमतें कोठें घ्यावयाचें व कोठें घ्यावयाचें नाहीं म्हणजे पर्यायानें सारासारविचारशक्ति ही याच्या ठिकाणीं जागृत होती, असें दिसून येतें. या वेळचा कटु अनुभव हा जन्मांत विसरला नाहीं. हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांत अनेक ठिकाणीं या युक्तीचा अवलंब करून शत्रुसैन्य जेरीस आणण्याचे यानें प्रयत्न केले व बहुतेक ठिकाणीं याचे प्रयत्न यशस्वीहि झाले. उदाहरणार्थ, तहाची थाप देतां देतांच दत्ताजीचा नाश नजीबखानानें घडविला. भाऊसाहेबांशींहि याची तहाची वाटाघाट बरेच दिवस चालू होती. दोन्ही वेळां तहाची वाटाघाट निष्फळ ठरल्यावर दोघांनाहि दिसून आलें कीं, आपणांस शत्रुपक्षानें फसविलें. भाऊसाहेब फसले गेले असा मराठी पत्रांचा जरी आशय नसला तरी युद्धाचे अगोदर मराठ्यांचे लष्करांत महागाई व अब्दालीच्या लष्करांत स्वस्ताई, मराठ्यांना रसद पोहोंचेना व यास मात्र भरपूर रसद मिळत होती. नाना फडणीसाच्या पत्रांत 'लष्कर गडबडलें' सारखे असलेले विचार, या गोष्टी काय दाखवितात? ही तहाची भूलथाप देण्याची युक्ति यानें आपल्या हिंदुस्थानावरील पहिल्या स्वारींत स्वतःचा पराजय होत असतांहि उपयोगांत आणली होती. तिचा परिणाम असा झाला कीं, त्या स्वारींत जरी यानें माघार घेतली तरी तसें करण्यांत याचें नुकसान शक्य तितकें कमी झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याच्या युद्धपद्धतींत आणखी एक विशेष आहे. हा बहुधा जेथून याचें भय कमी अशा ठिकाणांवरूनच अगदीं अनपेक्षितपणें येत असे. यामुळें शत्रुसैन्यांत एकदम गडबड उडे. तसेंच लोकांच्या अपेक्षेपेक्षांहि हा लवकर चालून जात असे. त्यामुळें शत्रूमध्यें गडबड उडे. 'अब्दाली अकस्मात आला' अशा प्रकारचे उल्लेख आढळतात (रा.खं १. १५०). या गडबडीचा योग्य फायदा घेतल्याशिवाय हा राहत नसे. याचीं उदाहरणें यानें केलेल्या स्वाऱ्यांत पदोपदीं आढळतात. युद्धांतील डावपेंचांत हा अत्यंत निष्णात असे. स. १७५६।५७ च्या स्वारींत एकदां समशेरबहादर, अंताजी माणकेश्वर, जाट वगैरेंनीं याला त्रास देण्यास सुरवात केली. तेव्हां यानें अबदुल समदखानास सांगितलें कीं, तूं आपल्या सैन्यासह लपून बैस व शंभर लोकांना त्यांच्यावर पाठव. या शंभर लोकांनीं मारामारी करीत व माघार घेत लपलेल्या लोकांपर्यंत यावें व नंतर लपलेल्या लोकांनीं बाहेर पडून शत्रूचा मोड करावा. या युक्तीप्रमाणें वागून अबदुल समदनें जय मिळविला. असें करीत असतां यास मोठाल्या तोडी कराव्या लागत. याप्रमाणें हा करीत असावा असें यानें अनेक वेळा लोकांना दिङ्मूढ केल्यावरून वाटतें. याचमुळें भाऊसाहेबांच्या एका पत्रांत 'चाळीस कोस पन्नास कोस धावतात' अशी वदंता अब्दालीविषयीं लिहिलेली आढळते.

शत्रूच्या हालचालींची अचूक बातमी ठेवण्यांत आणि हाताखालच्या सर्व सैन्याकडून काम घेण्यांत हा अत्यंत कुशल होता. गोविंदपंत बुंदेल्याचा वध, पाराजीपंत बाघाच्या खंडिजन्याची लूट आणि बागपतावर सैन्यासह यमुना उतरणें या तीन गोष्टी याच्या सर्वांगीण युद्धकौशल्याच्या उत्कृष्ट निदर्शक आहेत. तसेंच ऐनवेळीं राखीव सैन्य उपयोगांत आणण्याची याची पानपतावरील कल्पनाहि ध्यानांत घेण्यासारखी आहे.

हा एकाद्या फकीराप्रमाणें राहत असे. हा अगदीं सामान्य मनुष्याप्रमाणें कपडे घाली व त्यामुळें कधीं कधीं हा शत्रूंस ओळखूंहि येत नसे. याला लोकांनीं आपणांस लवून सलाम करावे किंवा स्वतःस लोकांनीं फार पूज्य समजावें हें आवडत नसे. म्हणून यानें लोकांस चालू

पद्धतीनें सलाम करण्याची बंदी करून याच्यापुढें येतांना फक्त डोक्यास हात लावावा, असें मुलाकरवीं फर्माविलें होतें. हा विद्वानांचा मोठा चाहता होता. हा दर शुक्रवारीं विद्वान् व वृद्ध लोकांना एकत्र बोलावून शास्त्रें व इतिहास यांवर चर्चा करवीत असे, व त्यांचा सन्मान करीत असे.

हा मुसलमानी धर्मांतील आचाराविषयक आज्ञा उत्तम तऱ्हेनें पाळीत असावा, याबद्दल इतर धर्माचे लोक यास नांवें ठेवणार नाहींत. पण सामिन यानें निरनिराळ्या ठिकाणीं याच्या तोंडांत किंवा याच्याविषयीं बोलतांना इतरांच्या तोंडांत जीं वाक्यें घातलीं आहेत तीं वस्तुस्थिति-निदर्शक अशीं मानलीं तरी हा परधर्माचा-विशेषतः हिंदूंचा मोठा द्वेष करीत असावा असें म्हणतां येतें.

या द्वेषाचें अगदीं हिडिस उदाहरण सामीननें मथुरेच्या कत्तलींत स्वतः पाहिलें होतें व त्याचें वर्णन त्यानें केलें आहे. तें असें:—मीं यमुनेच्या कडेला बैराग्यांच्या व संन्याशांच्या कित्येक झोपड्या पाहिल्या. त्यांपैकीं प्रत्येकींत मनुष्याच्या मुंडक्याच्या तोंडास गाईचें मुंडकें लागेल अशा बेतानें दोन्ही मुंडकीं बांधून टाकलेलीं होतीं ( ईंडि. ॲंटि. १६; ३६; हितचिंतक मासिकाचा पानपत अंक ).

**अहमदशाह फारुकी**--( स. १५३७ ) हा खानदेशच्या फारुकी घराण्यांतील पहिल्या मुहम्मदशाहाचा पुत्र.

**अहमदशाह बाहामनी**—बाहामनी राजवंशांतील अल्लाउद्दीन हसन कांगो त्याचा हा मुलगा. याला फीरूझ व अहमद पहिला असे दोन मुलगे होते, याप्रमाणें सिवेलनें आपल्या वंशावळींत उल्लेख केला आहे. परंतु हें सिवेलचें मत चुकीचें आहे, असें मुसलमानी रिसायत व फेरीस्ता यांनीं दिलेल्या वंशावळींवरून दिसतें. फेरीस्तानें आपल्या वंशावळींत याचा उल्लेखच केला नाहीं. याचे मुलगे फीरूझ व अहमद पहिला हे दाऊदखानाचे मुलगे होत, असें फेरीस्तानें उल्लेखिलें आहे. हा गादीवर आला नाहीं.

२. ( स. १४२२-१४३५ ) हा एक बाहामनी राजा होय. आपला भाऊ सुलतान फीरूझ यास पदच्युत करून हा गादीवर आला ( १४ सप्टेंबर १४२२ ). हा फीरूजशाहाचा भाऊ होय.

नेहमींप्रमाणें विजयनगर व केरळ येथील राजांनीं याच्याबरोबर युद्ध आरंभिलें. स. १४२४ सालीं वरंगळच्या राजावर यानें स्वारी केली, आणि राजास ठार मारून बहुतेक सर्व प्रांत जिंकिला. मजबूत घोडे आणि तिरंदाज यांच्या साहाय्यानें हा जय मिळवी. तसेंच यानें अनेक हिंदु लोकांस ठार मारिलें आणि बायकापोरांस बाटवून मुसलमान केलें. ह्या स्वारींत शाहास एक हिऱ्याची खाण सांपडली. सर्व मुलखांत हिंदु लोकांचीं असलेलीं देवळें पाडून तेथें यानें मशिदी बांधल्या. वऱ्हाड प्रांतांतील गाविलगड व नरनाळा हे दोन जुने किल्ले यानें दुरुस्त केले. स. १४२६ त माळव्याच्या सुलतानाशीं लढाई करून त्याचा यानें पराभव केला. नंतर बेदरनजीक हा शिकारीस गेला असतां, तेथें एक नवीन शहर वसवावें असें मनांत येऊन, यानें अहमदाबाद-बेदर नांवाचें शहर वसविलें. बेदरास यानें खडकावर एक किल्ला बांधिला, तो अत्यंत बळकट म्हणून नांवाजलेला होता. हें नवीन शहर यानें आपली राजधानी केली. नंतर कित्येक दिवसपर्यंत कोंकणपट्टी व गुजराथ ह्या प्रांतांत याच्या स्वाऱ्या चालू होत्या. स. १४३५ त हा मरण पावला. याची कबर अहमदाबाद-बेदर येथें बांधली. याच्या मागें दुसरा अलाउद्दीन बाहामनी गादीवर आला ( २७ फेब्रु. १४३५ ).

यानें अनेक दानधर्म केले, व इराण वगैरे देशांतून पुष्कळ साधूंस इकडे आणविलें. हा विद्वान् व साधु लोकांस फार मान देत असे, म्हणून यास वली ( साधु ) हें नांव मिळालें. सय्यद मुहंमद जिसू दुराज ह्या साधूच्या घराण्यास यानें मोठमोठीं इनामें करून दिलीं, माजी शाहाच्या प्रधानास त्याच्या पहिल्या जागेवर कायम केलें आणि फौजेची शिस्त सुधारली. येणेंप्रमाणें अनेक सत्कृत्यांनीं यानें रयतेची प्रीति संपादन केली.

३. ( स. १५१८-२१ ) हा बाहामनी वंशांतील दुसऱ्या महमूदशाहाचा पुत्र. हा बापानंतर गादीवर आला.

**अहमदशाह मोगल**-( स. १७४८-५४ ) दिल्लीचा एक बादशहा. हा मुहम्मदशाह आणि ऊधमबाई यांचा पुत्र. याचा जन्म दिल्लीच्या किल्ल्यांत झाला (स. १७२५), व स. १७४८ मध्यें पानपत येथें याला राज्याभिषेक झाला. याचें संपूर्ण नांव मुजाहिद उद्दीन मुहम्मद अबुन नश्र अहमदशाह बहादुर असें होतें. राज्यारोहण करण्यापूर्वी यानें अहमदशाहा अब्दालीचा सरहिंद येथें चांगलाच पराभव केला होता. इतक्यांत यास आपल्या बापाच्या मृत्यूची बातमी लागली, तेव्हां हा ताबडतोब दिल्लीकडे वळला आणि सफदरजंग यास वजीर नेमून यानें आपल्या कारकीर्दीसच सुरवात केली. पण लवकरच याच्या प्रमुख सरदारांत अधिकारासंबंधा तंटे उपस्थित झाले. अहमदशाहा अब्दाली पुनः स. १७५१ मध्यें पंजाबांत आला असतां यानें त्याला लाहोर व मुलतान हे परगणे देऊन वाटेस लावलें. मरा-

ह्यांच्या स्वाऱ्या बादशाही मुलखांत धुमाकूळ घालीत होत्याच. अली मुहम्मद नांवाच्या रोहिल्यांच्या पुढाऱ्यानें स्वतंत्र राज्य स्थापिलें. पण अधिकाऱ्यांची आपसांत फूट असल्यानें आणि हा विषयी असल्यानें कोणीच आवरता नाहीं अशी स्थिति झाली. शेवटीं गाजीउद्दीन नांवाच्या सरदारानें वजीरीच्या लोभानें मराठ्यांचें साहाय्य घेऊन याला कैद केलें आणि याचे डोळे काढले. त्यानंतरहि हा २१ वर्षे जगला; व दुखण्यानें स. १७७५ मध्यें मेला. याच्यानंतर दुसरा आलमगीर बादशाह झाला.

**अहल्याबाई होळकर**–हिच्या जन्मकालाविषयीं आज कोणत्याहि प्रकारचा प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाहीं. ही मृत्युसमयीं म्हणजे स. १७९५ तसुमारें ६० वर्षांची होतीं, असें मालकमसाहेब म्हणतो. परंतु स. १७८०-८१ च्या दोन अस्सल पत्रांत आपल्या वयास ५५ वर्षे झालीं असल्याचे अहल्याबाईचे उद्गार आहेत ( विविधज्ञानविस्तार, वर्ष ३८, अंक ५, पृष्ठ १४६ ). त्यावरून व स. १७४३ च्या सुमारास मल्हारराव होळकर नाशिकच्या यात्रेस गेला असतां त्यानें तेथें आपल्या उपाध्यायास अहिल्याबाई लग्नसमयीं ( स. १७३३ त ) ८ वर्षांची होती म्हणून जें लिहून दिलें होतें, त्यावरून हिचा जन्म स. १७२५ त झाला असें ठरतें. हिचा बाप माणकोजी शिंदे हा औरंगाबाद जिल्ह्याच्या बीड तालुक्यांतील चौंदें गांवचा पाटील होता. स. १७३३-३४ मध्यें मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव याशीं हिचा विवाह झाला. त्या समयीं खंडेराव दहा वर्षांचा होता.

पुढें खंडेराव व्यसनीं निघाल्यामुळें हिच्या वृत्तींमध्यें उदासीनता दिसूं लागली. खंडेराव बरकड कसाहि असला तरी अहल्याबाईपुढें त्याची बिलकुल मात्रा चालत नसे. ही हजर असतां खंडेरावाला आपल्या सर्व अव्यवस्थित वृत्तीस रजा द्यावी लागे. हिला मालेराव नांवाचा मुलगा स. १७४५ त देपालपूर मुक्कामीं झाला, व त्याच्या पाठीवर तीन वर्षांनीं मुक्ताबाई नांवाची एक मुलगी झाली. वरील दोनच अपत्यें हिला होतीं. हिच्या नशिबीं सौभाग्यसुख फार दिवस नसल्यामुळें, स. १७५४ सालीं डीगेजवळ कुंभेरीच्या किल्ल्यास मराठ्यांच्या सैन्याचा वेढा पडला असतां हिचा पति खंडेराव हा गोळी लागून मरण पावला. हें वर्तमान समजतांच हिनें पतीबरोबर सहगमन करावयाचें ठरविलें. 'तूं आम्हांकडे पाहून मागें राहिलीस तर खंड राहिला व अहल्या गेली,' अशी मल्हाररावानें गळ घातल्यामुळें हिला आपलें सहगमन तहकूब करावें लागलें. तेव्हां मल्हाररावानें संस्थानचा सर्व कारभार आपल्या सुनेकडेच सोंपविला. ३ जून स. १७६६ त मल्हारराव मरण पावल्यावर राज्याची कुलजबाबदारी अहल्याबाईवरच येऊन पडली. मल्हाररावानंतर २१ वर्षांचा मालेराव गादीवर बसून त्याच्या नांवचा शिक्कामोतब सुरू झाला. परंतु तो गादीवर बसल्यानंतर सारा दहा महिनेच काय तो जिवंत होता. त्याला लवकरच वेडेपणाच्या लहरी येऊं लागल्या व त्याच्यापासून इतरांस त्रास होऊं लागला. ब्राह्मणांचा छळ केला म्हणून हिनें आपल्या मुलासहि देहान्तशासन केलें, अशी हिच्या न्यायनिष्ठुरतेबद्दल आख्यायिका आहे. अहल्याबाईनें त्याला मारिलें किंवा मारविलें, अशा ज्या दंतकथा आहेत त्या अगदीं निराधार आहेत, असें मालकमसाहेबांनीं लिहिलें आहे. मालेरावाच्या मृत्यूनंतर होळकर घराण्यांतील एखादा मुलगा दत्तक द्यावा, असें हिला सुचविण्यांत आलें. पण तसें करण्याचें हिनें नाकारलें. पुढें वंश नाहीं असें जाणून अहल्याबाईनें जानोजीचा मुलगा तुकोजी याला ओटींत घेऊन गादीवर बसविलें,असें वाक्य सरस्वतीमंदिरांतील वंशावळींत आहे. जरी तुकोजीच दौलतीचा वारस अशी सर्वत्र भावना होती तरी त्याचें यथाविधि दत्तविधान मात्र कधींच झालेलें नव्हतें ( म. रि. उत्तर वि. २. पृ. ७. ).

मल्हारराव होळकराचे मृत्यूनंतर अहिल्याबाईचा मुलगा मालेराव यास २३-७-१७६६ रोजीं सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. परंतु तो ता. २७-३-१७६७ रोजीं मरण पावल्यामुळें होळकरांच्या घरांत कोणीहि वारस उरला नाहीं. पुत्राचे मृत्यूमुळें अहल्याबाईस फार दुःख झालें. अशा परिस्थितींत राघोबादादास या सरदारीची व्यवस्था आपले मर्जीप्रमाणें करून द्रव्य मिळविण्याची इच्छा झाली. होळकरांचा कारभारी गंगाधर यशवंत ऊर्फ गंगोबा तात्या चंद्रचूड हा राघोबाचा हस्तक होता. या दुकलीनें बाईचे मांडीवर दत्तक देऊन गंगोबानें कारभार चालवावा, असें ठरविलें. परंतु ह्या बुद्धिमान् व बाणेदार बाईनें त्यास साफ कळविलें कीं, जहागिरीची व फौजेची व्यवस्था मला पाहिजे. त्यांत कोणींहि ढवळाढवळ केलेली आपणास खपणार नाहीं. हिचें हें करणें माधवराव पेशव्यास पसंत पडलें. परंतु दादानें आपला आग्रह सोडला नाहीं. त्यानें एकदम फौजेनिशीं इंदुरावर चाल करण्याचा धाक घातला. हें पाहतांच या बाईनेंहि लढण्याची सिद्धता दाखवली, आणि तुकोजी होळकरास फौजेवर मुख्य नेमलें व गंगोबास कारभारावरून काढून टाकलें. वरील व्यवस्था होण्यापूर्वीच दादानें शिंदे, भोसले, गायकवाड आणि दाभाडे वगैरे सरदारांसह हालचालीस सुरवात केली. अशा कठीण परि-

स्थितींत बाईनें डगमगून न जातां, माधवराव पेशव्याकडे तातडीनें दूत रवाना केले; व युक्तीनें भोसले, गायकवाड व दाभाडे या सरदारांस आपणाकडे वळविलें. इंदूरवर स्वारी करण्याचा दादाचा हुकूम महादजीनें नाकारला. भोसले व गायकवाड तर उघडच बाईस सामील झाले. बाईची तयारी व 'माझा पराभव झाला तर मी अबलाच आहें, पण आपणांवर तो प्रसंग आल्यास जग काय म्हणेल याचा विचार करून युद्धास तयार व्हावें.' हा बाईचा निष्ठुर जबाब पाहतांच राघोबा नरमला. बाई रक्तपात न करतां या प्रसंगांतून पार पडली. सर्व सरदारांनीं त्यांची पुष्कळ निर्भर्त्सना केली. यावरून बाईच्या कर्तबगारीबद्दल लहानमोठ्या नोकरांत केवढी मान्यता व खात्री होती हें दिसून येतें. दादांस तर आपला बेत सोडूनच द्यावा लागला ( ८ एप्रिल १७६७ ).

मेवाडचा राणा अरीसिंह उर्फ अलसी याच्याकडून महादजी शिंदे यांनीं कांहीं परगणे घेतले, तेव्हां हिनेंहि शिंदे, होळकर व पेशवे यांचे हिस्से सारखे असतात असें म्हणून राण्याकडून कांहीं मुलूख मिळवला ( रा. इ. पा. १८० ). ही गोष्ट स. १७७१ च्या सुमारास झाली.

रामपुऱ्याच्या जहागीरदाराच्या बंडाचा मोडहि हिनें पूर्णपणें केला.

दत्तक न घेतां सैन्याच्या मदतीनें राज्य चालविण्याचा विचार करून हिनें त्या कामीं महादजी शिंदे व पेशवे यांची सुद्धां पूर्ण सहानुभूति मिळविली. स्त्री असल्यामुळें सैन्याचें आधिपत्य तुकोजी होळकर याच्याकडे सोपविलें. तुकोजी महत्त्वाच्या प्रसंगीं अहल्याबाईचा सल्ला घेत असे ( होळकरांच्या राज्याचें सामान्य वर्णन, पा. १० ). हिच्या कारकीर्दीत हिचा व तुकोजीचा वास्तविक विरोध चारपांच महत्त्वाच्या प्रकरणांत झाला, व त्यालाहि तुकोजीचा भोळसर स्वभाव व अव्यवस्थित खर्च हींच दोन कारणें होतीं. त्यांपैकीं अहल्याबाईच्या हाताखाली तिच्या अत्यंत विश्वासांतल्या शिवाजी गोपाळ नांवाच्या इसमाची पुणें दरबाराकडून पुण्यास बदली झाली असतां तुकोजीनें भोळसरपणानें अहल्याबाईची मंजुरी न विचारतां त्या बदलीस संमति दिली हें एक होय ( पुरुषोत्तमकृत देवी श्री. अहल्याबाई-च. पृ. १६१-६२ ). हिनें घरांतला कारभार आपल्याकडे ठेवून बाहेरचा कारभार तुकोजीच्या हातीं दिला होता. पण प्रत्येक गोष्टीवर हिची करडी नजर असल्यानें तुकोजीला स्वतंत्रपणें वागण्याला सवडच मिळत नसावी. शेवटी तर तो फारच व्यसनी झाला होता. स्वतः अहल्याबाईच्या राज्यांत लढाया व कलह हे बोटांवर मोजण्याइतकेच झाले. गोविंदपंत गानु नांवाचा एक सज्जन मनुष्य हिचा मंत्री होता. पुणें, हैद्राबाद, श्रीरंगपट्टण, नागपूर, लखनौ, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं होळकराकडून जे वकील नेमले जात, त्यांची नेमणूकहि हिच्याचकडून होत असे. हिला प्रजेची तर भीति नव्हतीच. पण इतर राजेरजवाड्यांनींहि कधीं हिच्या राज्यावर स्वारी केली नाहीं. हिच्या कारकीर्दीत चंद्रावतांनीं जें बंड उभारिलें तो केवळ स्वजात्यभिमानाचा व स्वसंरक्षणाचा प्रयत्न होता. हिनें स्वतःच बंडवाल्यांशी तोंड देऊन पळसुडा येथील लढाईत त्यांचा पराभव केला. आपल्या राज्यांत धाड घालून त्यावर उपजीविका करणाऱ्या गोंड लोकांचा अहल्याबाईनें त्यांना संरक्षण करणारे रखवालदार नेमून बंदोबस्त केला. त्याजवरून हिचें व्यवहारचातुर्य फार उत्तम रीतीनें व्यक्त होतें. पुष्कळ दिवसांच्या करारानें जमीन पट्ट्यानें देण्याची पद्धत अहल्याबाईनेंच सुरू केली, असें म्हणतात ( मालकम भाग २ ).

हिचें जें आज सर्वतोमुखीं नांव झालें आहे तें हिच्या युद्धकौशल्यामुळें किंवा मुत्सद्दीपणामुळें नसून औदार्य, न्यायप्रियता, भूतदया, सदाचरण, इत्यादि लोकोत्तर गुणांमुळेंच होय. या गुणांमुळें हिला आपली कारकीर्द यशस्वी करून दाखवितां आली; येवढेंच नव्हे, तर पाटीलबाबासारख्या मुत्सद्दी मंडळीसारखें अखेरपावेतों हिचें वजन राहिलें. हिच्या धर्मशील वर्तनामुळें तत्कालीन राजेरजवाड्यांचा हिजवर इतका विश्वास होता कीं, आसपासचीं संस्थानें हिच्याकडे आपले तंटे घेऊन येत ( महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें-भाग १, पा. १२४, भाग २, पा. १७० ). आपल्या हातीं पुष्कळ पैसा असतांहि हिनें त्याचा दुरुपयोग केला नाहीं. शिल्लक उरलेल्या पैशाचा विनियोग हिनें हिंदुस्थानांत लोकोपयोगी सार्वजनिक कामें करून ठेवण्यांत केला. हिनें लोकांच्या सोयीसाठीं जागोजागीं अन्नछत्रें, धर्मशाळा, विहिरी, रस्ते व घाट बांधिले. काशीविश्वेश्वराचें मंदिर व गया येथील विष्णुपदाचें मंदिर पुनः नवें बांधलें आणि कलकत्त्यापासून काशीपावेतों मोठा थोरला रस्ता बांधला ( हरप्रसाद शास्त्री- 'स्कूल हिस्टरी ऑफ इंडिया' ). काशीचा मणकर्णिकाघाट, दशाश्वमेघ घाट व सोरटी सोमनाथाचें देवालयहि हिनें नवें बांधवून त्यांत मूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली ( महेश्वर दरबारची बातमीपत्रें, भाग २, पानें ८६-८७ ).

ही दिसण्यांत फार सुंदर नव्हती, तरी हिचा चेहरा अत्यंत तेजस्वी दिसे. हिचीं वस्त्रें पांढरीं शुभ्र पण साधीं असत. हिची वृत्ती शांत असे, परंतु ही असत्य बोलणाराचा तिटकारा

करी. हिचीं धार्मिक व्रतें व उपवास खडतर असून तीं हिनें अखेरपर्यंतीं चालू ठेविलीं होतीं. हिला पूर्व वयांतच लिहिणें, वाचणें समजूं लागलें. ही मोडी अक्षरहि लिहीत असे. पुराण ऐकण्याची गोडी असल्यामुळें हिच्या अंगीं लवकरच बहुश्रुतपणा व चतुरस्रता आली. हिची कुशाग्र बुद्धि व कामांतील हुशारी पाहून मल्हारराबानें आपल्या हयातींतच हिच्यावर सरकारी कामें सोंपाविलीं. अर्थात् राज्य चालविण्यास जे गुण लागतात त्यांचा उगम हिच्या अंगीं पूर्वीच झाला असला पाहिजे. मालकमसाहेबानें हिची दिनचर्या मोठ्या काळजीनें व कौतुकानें लिहिली असून तींत तो म्हणतो, " ही सूर्योदयापूर्वी घटका दीड घटका उठून स्नान करी, व पूजाअर्चा करी. नंतर नियमित कालपर्यंत पुराणश्रवणास बसे. नंतर ही तीन दानें देऊन आपणासमक्ष ब्राह्मणांस भोजनें घाली. नंतर हिचें ताट वाढून येई. हिच्या भोजनांत सारे शाकभाज्यांचे पदार्थ असत. भोजन आटोपल्यावर पुनः कांहीं वेळ परमेश्वर-स्तव करून थोडा वेळ वामकुक्षी करी. नंतर पोषाख करून सरकारी कामकाज करावयास दरबारांत जात असे. तेथें सूर्यास्तापर्यंत बसे. यानंतर दोन तीन तास पूजा-अर्चा व फराळ वगैरे कृत्यांत जात. मग ही नऊ वाजावयाच्या सुमारास सरकारी काम पुनः पाहूं लागे. तें अकरा वाजेपर्यंत पाही व त्यानंतर निजावयास जात असे."

हिच्या कारकीर्दीत अखेरपर्यंत हिच्या मुलाच्या नांवाचाच शिक्कामोर्तब सरकारी कामावर होत होता. १७ नवंबर १७९० त हिचा नातू-मुलीचा मुलगा नथ्याबा उर्फ धोंडिबा फणशे वारला. ता. ३ डिसेंबर १७९१ जांवई यशवंतराव फणशे वारला. या प्रसंगीं त्यांच्या स्त्रियाहि सती जात. हे सर्व प्रसंग हिनें मोठ्या धैर्यानें सहन करून राज्य-कारभार सुरळीत चालविण्यांत कसूर केली नाहीं. हिच्या राज्यांत सर्वत्रांस न्याय मिळून प्रजा सुखी होती. हिच्या राज्याचा सर्वत्र धर्मराज्य म्हणून उल्लेख होई. ही ता. १३ ऑगष्ट १७९५ ( शके १७१७ श्रावण व. १४ ) रोजीं इहलोक सोडून गेली. हिच्या ३० वर्षांच्या कार-कीर्दीच्या वार्षिक उत्पन्नाचीं सरासरी काढल्यास तीं १,६०,२९,७३४।≈।। इतकी निघते. हीं आपला धार्मिक खर्च खासगी उत्पन्नांतून करी. तो खर्च आजमितीस चालू ठेवला असून त्याकरितां आजतागायत दरसाल ७०,००० रुपये खर्ची पडत आलेले आहेत. ८ प्रहरांतील २ प्रहर हिचे धार्मिक कार्यांतच जात. धर्म, राज्यव्यवहार, नैतिक आचरण, स्वतःची आकर्षक शरीरयष्टि व पावित्र्य या गुणांनीं हिची प्रजा तर धर्मराज्यांतच होती. परंतु त्या काळचे मुत्सद्दी, राजेरजवाडे एवढेंच नव्हे, तर पाश्चि-मात्य इतिहासकारहि हिच्या दरवळलेल्या कीर्तिसुगंधानें मोहित झालेले आहेत ( विविधज्ञानविस्तार ३६. ९ पा. ३४१ ).

महादजी शिंदे जुना संरक्षणाचा दिलेला बेलभंडार बाजूला सारून गोहजवाल्यावर चढाई करूं लागला तेव्हां हिनें पाठविलेला इषारा हिच्या स्वभावाचा निदर्शक आहे. ही म्हणते ' सर्वांशींच आपण वाईट झाल्यास आपल्या बेलभंडारास कोणी विचारणार नाहीं. मग हिंदुस्थान हस्तगत कसें होईल ? सलूख राखून पुढील कामें करा. अद्यापि इंग्रजांचेंहि पारिपत्य पुरतेपणीं झालें नाहीं. ' ( महे-श्वर दरबारचीं बातमीपत्रें भा. १, पा. १२४ ). हें पत्र २८ मे स. १७८१ चें आहे.

या थोर स्त्रीच्या उदात्त चारित्र्यामुळें मराठ्यांचा नैतिक दर्जा वाढला यांत शंका नाहीं. हिचें उदात्त चारित्र्य आणि सुव्यवस्थित राज्य यांचे गोडवे अनेक देशी किंवा मालकमसारख्या परदेशी लेखकांनीं मुक्तकंठानें गायिल आहेत. अस्तंगत होणाऱ्या मराठेशाहींतील नररत्नें म्हणून अहल्याबाईसारखीं दैवी माणसें डोळ्यापुढून दूर होणें केव्हांहि शक्य नाहीं. तीर्थयात्रा करणाऱ्या धार्मिक माण-साला प्रत्येक क्षेत्रांत अहल्याबाईचें मूर्तिमंत दर्शन घडत असतें. विशाल मंदिरें, भव्य घाट, अन्नसंतर्पण करणारीं अन्नछत्रें आणि तीर्थक्षेत्रांचे पवित्र मार्ग हे अद्यापिहि या स्त्रीच्या औदार्याची ग्वाही सर्वत्र देत आहेत. काशीची गंगा रामेश्वरला आणि रामेश्वराचा सेतु काशीला प्रत्यहीं पडावीं अशी व्यवस्था बाईनीं करून ठेविली आहे, आणि अद्यापिहि चालू आहे अशी लोकप्रसिद्धी आहे. रघुनाथराव पेशवे यांच्याशीं झालेल्या प्रसंगांत हिनें आपला राजकारणी-पणाहि चांगलाच व्यक्त केला. होळकरांच्या कैफियतीचा कांहीं अप्रसिद्ध भाग मागाहून इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत हरिपंत फडके यांची गैरवाजवी राज-कारणाबद्दल बाईनीं जी कानउघाडणी केली आहे, तीवरूनहि बाईचें राजकारणचातुर्य चांगलें व्यक्त होतें. पैशाच्या व्यव-हारांत विशेष दक्ष असणें, व आपल्या व्यवहारांत दुस-ऱ्याचा वरचष्मा न होऊं देणें वगैरे वागणूकहि व्यवहार-चातुर्याचीच आहे. केवळ स्त्रियांचेंच लढाऊ सैन्य हिनें तयार केलें होतें अशी आख्यायिका आहे. पेशव्यांबद्दल निष्ठा, कै. मल्हारराव होळकराबद्दल अभिमान आणि स्वाभिमान यांच्या जोरावर हिनें आपलें वर्चस्व शेवटपर्यंत राखलें होतें. तुकोजी होळकराच्या व्यसनींपणामुळें सैन्याची स्थिति असावी तशी शेवटीशेवटीं राहिली नव्हती. तथापि योग्य

वेळीं पेशव्यांना किंवा शिंद्यांना मदत करण्यास ही तयार असे. तत्कालीन नाना, महादजी वगैरे प्रमुख मुत्सद्यांनीं हिच्या कर्तृत्वाबद्दल व धोरणाबद्दल उघडपणें प्रशंसा केलेली आढळते.

**अहसनखान फारुकी**—खानदेशच्या फारुकी घराण्यांतील कैसरखानाचा हा मुलगा होय. याला आदील तिसरा या नांवाचा एक मुलगा होता. वरील उल्लेख केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत आला आहे. पण मुसलमानी रियासतीमधील वंशावळींत यास हसन असें म्हटलें आहे. परंतु तो हसन ( मलीक ) नसीरचा मुलगा आहे असें दर्शविलें आहे.

**अहंकिंगंगाधर**—हा तपतीसंहरणोपाख्यानाचा कर्ता. याचा आंध्र कवींना मोठा आश्रय असे.

**अहीर**—( आभीर पाहा ).

**अहोबल**—' संगीतपारिजात ' नांवाच्या प्रसिद्ध संस्कृत ग्रंथाचा कर्ता. हा दाक्षिणेकडील द्रविड ब्राह्मण. याच्या पित्याचें नांव श्रीकृष्ण पंडित. यानें बापाजवळ संस्कृतभाषा व संगीतशास्त्राचा अभ्यास केला. नंतर धनवड संस्थानच्या आश्रयाला राहून उत्तरेकडील संगीताचा अभ्यास केला. याचा संगीत-पारिजात ग्रंथ उत्तरपद्धतींत पुढील कारणांनीं सर्वमान्य समजला जातो. श्रुति व स्वर हे भिन्न नसून एकच आहेत. षड्‌जग्रामांतील पहिल्या चार स्वरांच्या दिढीनें पुढील चार स्वर ध्वनिदृष्टीनें उच्च आहेत. हा आपल्या रागांत सात शुद्ध व पांच विकृत असे जे बारा स्वर मोजी त्या स्वरांचीं स्थानें यानें तारेच्या लांबीनें कायम करून ठेविलीं आहेत. म्हणजे अमुक स्वराचा ध्वनि निघण्यास अमुक लांबीची तार पाहिजे. हीच गोष्ट पाश्चात्यांनीं १९ व्या शतकांत शोधली. पण सुधारलेल्या साधनांच्या अभावीं तें काम यानें केलें म्हणून याचें महत्त्व आहे. हा सनाच्या सत्राव्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेला.

**२.** ( रायस )–विजयनगरच्या पहिल्या रंगराजाचा मंत्री होय. हा कविहि होता. यानें कुवलयविलास नांवाचें नाटक संस्कृतांत लिहिलें आहे. याशिवाय अहोबल नांवाचे बरेच पंडित होऊन गेले आहेत.

**३.** याचें अध्ययन पायगुंडे यांच्या जांवयाजवळ झालें. नीलकंठशास्त्री थत्ते याचे विद्यार्थी होत.

**अक्षपाद**—( स. १५० च्या सुमारास) न्यायसूत्राचा कर्ता. हा षोडशपदार्थवादी होता.

न्यायसूत्रावरील जुन्या टीकांतूनसुद्धां न्यायसूत्राचा कर्ता अक्षपाद होता असेंच आहे. चवथ्या शतकांत होऊन गेलेला न्यायभाष्याचा कर्ता वात्स्यायन म्हणतो कीं, न्यायसूत्र हें अक्षपादाच्या पूर्वीच संगतवार असें रचलें गेलें होतें. परंतु ६ व्या शतकांत होऊन गेलेला न्यायवार्तिकेचा कर्ता उद्योतकर वार्तिकांच्या प्रारंभीं असें म्हणतो कीं, अक्षपादानेंच प्रथम संगतवार असें न्यायसूत्र रचलें. ' न्यायवार्तिक-तात्पर्य-टीका ' ( स. ८१ ) व न्यायमंजरी ( न्यायमंजरी प्रकरण १ लें ) या दोन ग्रंथांत अक्षपाद हाच न्यायसूत्राचा कर्ता आहे असें म्हटलें आहे. माधवाचार्य ( स. १३५० च्या सुमारास ) हा आपल्या सर्वदर्शनसंग्रहांत न्यायशास्त्रास ' अक्षपाददर्शन ' म्हणजे अक्षपादाचें शास्त्र असें म्हणतो.

परंतु पद्मपुराण ( उत्तरखंड अध्याय २६३ ), स्कंदपुराण व शिवपुराण उमासंहिता ( २. ४३–४७ ) यांत गोतम अथवा गौतम या नांवाच्या माणसानें न्यायशास्त्र निर्माण केलें आहे असें म्हटलें आहे. न्यायसूत्रवृत्तीचा कर्ता विश्वनाथ न्यायसूत्रास " गौतमसूत्र " म्हणजे गौतमानें निर्माण केलेलें सूत्र असें म्हणतो. तेव्हां न्यायसूत्राचा कर्ता अक्षपाद कीं गौतम असा प्रश्न उद्भवतो. अनंतयज्वन् हा आपल्या पितृमेधसूत्राच्या टीकेंत अक्षपाद व गौतम हे दोघेहि एकच होते असें म्हणतो.

गौतम हा तत्त्वज्ञानाचा विचार करण्यांत इतका गढून गेलेला असे कीं, चालतां चालतां तो एका विहरींत पडला. त्यांतून त्यास बाहेर काढण्यास फार त्रास पडला. तेव्हां देवानें त्यावर पुनः असा प्रसंग येऊं नये, म्हणून त्याच्या पायास डोळे दिले. परंतु या गोष्टींत बिलकुल तथ्य नाहीं. ही गोष्ट अक्षपाद या शब्दाचें विवरण करण्यासाठींच केवळ रचण्यांत आली असावी.

दुसरी एक दंतकथा अशी आहे कीं, व्यास हा गौतमाचा शिष्य होता, व त्यानें गौतमास साष्टांग नमस्कार घातला असतां गौतमानें आपल्या खऱ्या डोळ्यांनीं न पाहतां पायांतील डोळ्यांनीं पाहिलें. पण ही भाकडकथा गौतमानंतर होऊन गेलेल्या तर्कज्ञांनीं व्यासाचा अपमान करण्यासाठीं रचली असावी. कारण व्यासानें महाभारत व वेदांतसूत्र या ग्रंथांतून न्यायशास्त्रावर टीकेची झोड उठवली आहे.

वास्तविक आन्वीक्षिकीचा कर्ता गोतम अथवा गौतम व अक्षपाद दोघेहि भिन्न होते. एक मिथिलेंत राहत असे, तर दुसरा काठेवाडांत प्रभास येथें राहत असे. ब्रह्माण्डपुराणांत असें सांगितलें आहे कीं, अक्षपाद व कणाद हे दोघेजण सोमशर्मा नांवाच्या एका ब्राह्मणाचे मुलगे होते. हा ब्राह्मण

शिवाचा प्रति अवतारच असून प्रभास येथील देवळांत त्यानें खडतर तपश्चर्या केली होती. प्रभास हें सरस्वती-नदीच्या पूर्व किनाऱ्यावर वसलें असून हें श्रीकृष्णाचें निर्वाणस्थान आहे अशी याची ख्याति आहे.

आतां न्यायसूत्राचा खरा कर्ता कोण हें ठरविणें फार कठीण आहे. गौतम व अक्षपाद या दोघांनींहि तें लिहिलें असावें असें दिसतें. न्यायसूत्रांत एकंदर पांच विषय आहेत: ( १ ) प्रमाण, ( २ ) प्रमेय, ( ३ ) वाद, (४) अवयव, (५) अन्यमतपरीक्षा. या विषयांपैकीं पहिल्या तीन विषयांचा खल जुन्या ब्राह्मण, बुद्ध व जैन ग्रंथांतून केलेला आहे. गौतमानेंहि आपल्या आन्वीक्षिकी-विद्येंत अद्यापि अपक्व स्थितींत असलेल्या उपरिनिर्दिष्ट विषयांचाच ( १, २, ३ ) खल केला आहे. परंतु अक्षपादानें वरील विषयांपैकीं १, ४, व ५ या विषयांचें आन्वीक्षिकींत यथाक्रम विवरण केलें आहे. नंतर आन्वीक्षिकी-विद्येस ' न्यायसूत्र ' असें म्हणूं लागले, तेव्हां अक्षपाद हा न्याय-सूत्राचा खरा कर्ता होय. याच्या सूत्रांत गौतमाच्या आन्वीक्षिकी-विद्येंतील बराच भाग आला आहे. ज्याप्रमाणें चरकानें आत्रेयाच्या अग्निवेशतंत्रास अथवा आयुर्वेदास ग्रंथाचें स्वरूप प्राप्त करून दिलें त्याचप्रमाणें अक्षपादानें गौतमाचे आन्वीक्षिकीस न्यायसूत्राचें स्वरूप प्राप्त करून दिलें. तेव्हां न्यायशास्त्रास " गौतमी विद्या " अथवा "अक्षपाददर्शन" असें म्हणतात.

**अक्षर अनन्य**—एक हिंदी कवि. हा स. १६५४ मध्यें झाला. हा दतिया येथील पृथ्वीचंद राजाचा दिवाण होता. पुढें हा विरक्त होऊन पन्ना येथें राहिला. प्रसिद्ध छत्रसाल राजा याचा शिष्य झाला. कांहीं कारणावरून हा महाराजावर अप्रसन्न झाला आणि जंगलांत जाऊन राहिला. त्याचा पत्ता लागल्यावर महाराज त्याची क्षमा मागण्याकरितां गेले.

यानें योग आणि वेदांत यांवर कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. राजयोग, विज्ञानयोग, ध्यानयोग, विवेकदीपिका, ब्रह्मज्ञान, अनन्यप्रकाश, वगैरे ग्रंथ यानें लिहिले आहेत. शिवाय दुर्गासप्तशतीचा हिंदी पद्यांमध्यें अनुवाद केलेला आहे. याच्या लिखाणांत इतर निर्गुणमार्गी संतांप्रमाणेंच चुका आहेत. असे निर्गुणमार्गी संत थोडे आहेत कीं, ज्यांचे ग्रंथ साहित्याच्या दृष्टीनें बरोबर आहेत. निर्गुण-मार्गी संतांप्रमाणें सध्यांहि या संतमालिकेची परंपरा चालू आहे; आणि नवीन नवीन पंथ स्थापन होत आहेत.

**अक्षोभ्यतीर्थ**—मध्वाचार्यांच्या चार प्रमुख शिष्यांपैकीं शेवटले. यांच्या नंतर मध्वाचार्यांच्या पीठावर जयतीर्थ ऊर्फ टीकाचार्य या नांवानें प्रसिद्ध असणारे आचार्य आले.

**अज्ञानदास**—शिवकालीन एक शाहीर. यानें अफझुलखानाचा वध या ऐतिहासिक प्रसंगावर दोन पोवाडे रचले आहेत. हे पोवाडे खुद्द जिजाबाईनें रचण्यास सांगून ते शिवाजीकडून ऐकविले; व कवीच्या रचनाचातुर्याबद्दल एक घोडा व शेर सोन्याचा तोडा यास बक्षिस मिळाला. हे दोन्ही पोवाडे छापून प्रसिद्ध झाले आहेत ( अॅकवर्थ व शालिग्रामकृत पोवाडे ). हल्लीं प्रसिद्ध असलेल्या सर्व पोवाड्यांपैकीं अज्ञान किंवा ( अग्निन ) दासाचा पोवाडा सर्वांत जुना आहे. याची रचना एकतारीवर म्हणतां येईल इतकी साधी आहे. शिवाय या पोवाड्यांत वर्णिलेल्या प्रसंगानंतर लवकरच रचिलेला व शिवाजी आणि त्याचे मावळे सरदार यांनीं खुद्द ऐकलेला तेव्हां हा बराच विश्वसनीय म्हणण्यास हरकत नाहीं. हा पोवाडा वाचून त्या वेळेचें चित्र डोळ्यापुढें चांगलें उभें राहतें.

**अज्ञानसिद्ध नागेश**—यांनीं आपल्या ग्रंथांत नागनाथ हें आपल्या गुरूंचें नांव म्हणून दिलें आहे. व हे स्वतःचें नांव नुसतें अज्ञान असें देतात. यानें अविध भाषेंत पंचीकरणप्रमेय रचिलें आहे. यावरून यांचा काल शके १४०० चा सुमार येतो. वरदनागेश व हे एकच असें वाटतें.

यांचे ग्रंथ:—कालज्ञान व पंचीकरणप्रमेय हे आहेत. वरदनागेशाचे नांवावर वरदनागेश व गुरुशिष्यसंवाद हे ग्रंथ सूचिकारांनीं दिले आहेत ( सं. सू. ).

**अंक**—चालुक्य घराण्यांतील त्रैलोक्यमल्लाचा एक संस्थानिक. याच्या एका देणगीचा उल्लेख शके ९७० मध्यें आहे ( भांडारकर पा. २०७ ).

**२.** हा रट्ट घराण्यांतील एक राजा. हा या घराण्यांतील एरगराजाच्या मागाहून गादीवर आला. हा जैनधर्मी असून यादवांचा मांडलिक होता.

**अंगडशाह**—( स. १५३९-१५५२ ) हा एक शिखांचा गुरु होय. स. १५०४ मध्यें याचा जन्म झाला. हा नानकाप्रमाणेंच खत्री जातीचा असून नानकामागून स. १५३९ मध्यें शिखांचा गुरु झाला. नानकानेंच याला आपला वारस केलें होतें. याच्याविषयीं अशी एक दंतकथा आहे कीं, आपल्या अनुयायांसह गुरु नानक प्रवास करीत असतां त्यानें रस्त्याच्या कडेला पडलेलें प्रेत पाहिलें. तेव्हां नानक म्हणाला कीं, ज्याअर्थी तुमचा माझ्यावर विश्वास आहे, त्याअर्थी तुम्ही हें अन्न ( प्रेत ) खावें. अंगडाशिवाय सर्वजण याला कचरले. पण अंगडानें

खालीं बसून त्या प्रेताला खाण्याकरितां विवस्त्र करण्यास सुरुवात केली. तोंच तें प्रेत अंतर्धान पावून त्या जागीं याला पवित्र अन्नाचें ताट आढळून आलें. तेव्हां नानकानें याला आलिंगन देऊन म्हटलें कीं, तूं माझीच प्रतिमा असून माझें तेज तुझ्या ठिकाणीं राहील. त्या वेळेपासून शीख लोक गुरु नानकाचा अंश त्याच्या मागून गादीवर आलेल्या प्रत्येक गुरूंत असतो असें मानीत आले आहेत.

याच्या कार्याची फारशी माहिती मिळत नाहीं. यानें गुरुमुखी लिपी शोधून काढिली व 'ग्रंथसाहेब' विस्तृत केला असें म्हणतात. याची राहणी अगदीं साधी असे. दोर विणून हा उदरनिर्वाह करी. स. १५५२ मध्यें हा दिवंगत झाला. अमरदासाला आपल्यामागें यानें गुरु निवडलें होतें.

**अंगनदेव**—हा कलचुरी घराण्यांतील अर्जुनाचा पुत्र. याच्या विजव्वा नांवाच्या मुलीचें लग्न इंद्र नित्यवर्ष राजाशीं झालें होतें ( भांडारकर, पा. २७८ ).

**अंगापूरकर हरि**—( जन्म स. १७५२-मृत्यु ? ) एक मराठी कवि. याचा केदारविजय हा ग्रंथ बेळगांवच्या रामतत्त्वप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाला आहे ( स. १८९४ ). त्यावरून याची कांहीं माहिती मिळते. याच्या पित्याचें नांव गोपाळराव व आईचें नांव यमुना. आडनांव देशमुख, गोत्र वसिष्ठ. याचा गुरु हरिनारायण. याला बद्रीकेदार येथें केदारविजय ग्रंथ लिहिण्याविषयीं दृष्टान्त झाला. त्याप्रमाणें चार महिने दहा दिवसांत यानें ग्रंथ पूर्ण केला. याच्यावर केदारेश्वराची कृपा होती. ग्रंथाचे ३५ अध्याय असून ६११० ओव्या आहेत. शिवाय यानें महाभारतापैकीं उद्योग व भीष्म हीं पर्वेंहि मराठींत लिहिलीं, असें केदारविजयाच्या प्रस्तावनेंत कवीनें म्हटलें आहे. केदारविजय ग्रंथांत केदारनाथ नांवाचा एक नाथसंप्रदायी अवतारी पुरुष होऊन गेला त्याचें चरित्र वर्णिलें आहे. केदारनाथाचें स्थान कोल्हापूरपासून चार मैलांवर असलेला जोतिबाचा डोंगर होय ( म. क. च. ११. पा. ४०२-४०८ ).

**अंगुलिमाल**—हा श्रावस्तीचा राजा प्रसेनजित् याचा पुत्र होय. हा तांत्रिक प्रयोग करणारा असल्यामुळें प्रयोगाकरितां गळ्यांत कापलेल्या बोटांची माळ घाली म्हणून यास अंगुलिमाळ म्हणत. एकदां बुद्धदेव भिक्षेला जात असतां हा म्हणाला, ' भिक्षु, उभा रहा. ' तेव्हां बुद्धदेवानें उत्तर दिलें, ' मी उभा आहें. ' असें म्हणून ते पुढें चालूं लागले. तेव्हां हा म्हणाला, ' तूं खोटें बोलतोस. ' तेव्हां बुद्धदेव म्हणाले, ' मी सत्य सांगतों कीं, जगांत मीच फक्त अढळ असून बाकी सर्व लोक अस्थिर म्हणजे चल आहेत. ' हें अध्यात्मपूर्ण उत्तर ऐकून याला ज्ञान झालें.

**अंडरसन**—हा वॉरन हेस्टिंगचा वकील होय. वॉरन हेस्टिंगनें शिंद्यांच्या मार्फत पुणें दरबारशीं तह करण्याकरितां यास संपूर्ण अधिकार देऊन याला शिंद्याकडे पाठविलें (स.१७८१) होतें. याचा तह नानांस बिलकुल पसंत नव्हता, तो नाकबूल करावा असाच जवळ जवळ नानाचा ग्रह झाला. अंडरसन दीड वर्ष महादजीचे सान्निध्यांत होता. यानें लिहून ठेविलेला महादजीसंबंधाचा अभिप्राय मार्मिक आहे. वरील सालबाईचा तह ठरण्यास अतोनात विलंब लागला. याबद्दल शिंद्यास अत्यंत वाईट वाटलें. या शब्दाचें संस्कृतीकरण इंद्रसेन असें केलेलें आढळतें ( दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणें भा. १. ८५; ८८; १०० इत्यादि).

**अंड्रोकोटस्**—चंद्रगुप्त मौर्याचा ग्रीक उच्चार.

**अंतला**—श्रीवर्धन येथें राज्य करणारा एक राजा. याचा यादव घराण्यांतील मौलगीपुत्र पहिल्या भिल्लमानें पराभव केला ( भांडारकर, पा. १४८ ).

**अंताजी कृष्ण फडणीस**—हा नाना फडणिसाचा पुतण्या होय. स. १७७६ मध्यें हा परशुरामभाऊ पटवर्धनाच्या बाजूनें प्रतिनिधीच्या फौजा घेऊन करवीरकराशीं लढत होता. स. १७९८ सालीं कोल्हापूरकर छत्रपति सातारकर छत्रपतींना पेशव्याविरुद्ध मदत करण्याकरितां निघाले असतां मध्यें वाटेंत त्यांचा तळ कऱ्हाड मुक्कामीं पडला. कऱ्हाड हें प्रतिनिधीचें मुख्य ठाणें होय. त्या प्रसंगीं अंताजी कृष्ण हा प्रतिनिधीस सल्लामसलत देत होता ( म. रि. उत्तर वि. ३ पृ. ८० ).

**अंताजी दामोदर शितुत**—हे महाराष्ट्रांतील देवरुखे ब्राह्मण. यांचें मूळ गांव कोंकणांतील जांबरूण. गोत्र वसिष्ठ. सुखवस्तु शब्दाचा शितूत हा अपभ्रंश असावा. गुजराथेंतील पंचमहाल जिल्ह्यांतील नायक जातीच्या दरोडेखोरांचा बंदोबस्त केल्यामुळें हे मोठ्या योग्यतेस चढले. हे शिंद्यांच्या दरबारीं असून शिंदेशाहींत यांचें फार वजन होतें. शिंदे सरकारनें यांना नाणें पाडण्याचा परवाना दिला होता. यांच्या रुपयाला अन्तुशाही रुपया म्हणत.

**अंताजी नागेश**—हा एक पेशव्यांचा सरदार होय. गुजराथच्या बंदोबस्ताचें काम याचेकडे होतें.

जेव्हां फत्तेसिंग गायकवाडानें पेशव्यांचे महालांस उपद्रव आरंभिला, तेव्हां हा व गणेशपंत बेहरे हे दोघे फत्तेसिंगावर चालून गेले. पण पुढें फत्तेसिंगास करार करून देण्याचें ठरलें. त्याप्रमाणें ता. २३-१०-१७७७ रोजीं कराराची सनद पेशव्यांनीं करून दिली, आणि अंताजी नागेश यास

फत्तेसिंगाचा कारभार करण्यासाठीं मुजुमदार नेमून पाठविलें. अपाजी गणेश बेहेरे, व अंताजी नागेश रगडून कारभार करूं लागले. तेणेंकरून फत्तेसिंग केवळ नामशेष झाला ( म. रि. उत्तरार्ध भा. १ ).

**अंताजी ( बाबुराव ) मल्हार बर्वे**—हा मल्हारपंतांचा वडील मुलगा असून फार हुशार होता. याचें दुसरें नांव बाबूराव असें होतें. प्रथम हा निजामाकडे औरंगाबादेस व पुढें दिल्लीस पेशव्यांचे तर्फे वकिलातीचे कामावर होता. नादीरशाहाच्या स्वारीच्या वेळचीं याचीं पत्रें महत्त्वाचीं आहेत. याचें व सदाशिवराव भाऊंचें पटलें नाहीं, तेव्हां हा साताऱ्यास शाहूकडे गेला. हा स. १७४९ त कोठुरें येथें मरण पावला. या घराण्याचा स्वतंत्र वृत्तान्त छापलेला आहे ( म. रि. म. १, पृ. ४२८ ).

याची आत्या ही बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची बायको राधाबाई होय. याची बायको पिंगळे ( पेशवे ) घराण्यांतील होती. हा देशस्थकोंकणस्थविवाह दिसतो. यानें हिंगणे व दीक्षित यांच्या मदतीनें उत्तरहिंदुस्थानांत जाट, बुंदेले वगैरे सर्व लहानमोठे हिंदु संस्थानिक एकत्र करून मुसलमानांविरुद्ध एक जंगी कारस्थान उभारलें होतें, परंतु तें शेवटास गेलें नाहीं.

**अंताजी माणकेश्वर गंधे**—हा नगर जिल्ह्यांतील कामरगांव येथील राहणारा. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र भारद्वाज. वडिलांचें नांव माणकोजी. आजाचें नांव लिंगोजी. उपनांव गंधे.

अंताजीस दिल्लीहून सात हजार स्वारांची मनसब मिळाली होती. उत्तरेकडील राजकारणांत शिंदेहोळकरांप्रमाणें सेनापति म्हणून याला महत्त्व आलें होतें.

अंताजीस तीन मुलगे होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें बहिरोपंत, व्यासराव व भगवंतराव ( मं. त्रै. वर्ष ८ अंक ३ ले. २१ पृ. १३५ ). हा चिमाजी अप्पाचा मनुष्य होता.

अंताजीचें पूर्वायुष्य पुणें परगण्यांतील कन्हेपठार प्रान्तांत गेलें. राघोबल्लाळ अत्र्यांच्या सख्ख्या भावाचे नातू त्रिंबकपंत अत्रे हे अंताजीपंताचे मावसभाऊ होत. शके १६२० चे सुमारास त्रिंबकपंत अत्रे वारले. त्यांचे मागें त्यांचीं मुलें लहान असल्यानें व घरांत कोणीच कर्ता पुरुष नसल्यानें त्यांचें संगोपन व चांबळी वगैरे वतनी गांवचे जोशाकुळकरणाची वाहिवाट अंताजी माणकेश्वर व त्यांचे वडील बंधु हरि माणकेश्वर हे करूं लागले. अंताजीपंतास पुढें येण्यास वेळ लागला नाहीं. हा गरीबींत वाढला होता, तरी लवकरच पुढें सरसावला. याच्या शिक्क्यावरून असें दिसतें कीं, हा प्रथम शाहूच्या पदरीं नोकर असून शाहूकडून पेशव्यांकडे आला असावा. याच्या पदरीं कन्हेपठारकडील माणसांचा भरणा होता; व लष्करांत चांबळी, गराडे भागांतील लोक होते. कोंढींत येथील बाबुराव अत्रे अंताजीच्या विशेष भरंवशाचे असून ते याच्यातर्फे पिछोरच्या राजाजवळ वकील होते.

स. १७५३ मध्यें दिल्ली येथें बादशाह व वजीर यांमध्यें युद्धप्रसंग झाला. त्या वेळीं पेशव्यांचे तर्फे अंताजीनें बादशहास मदत केली. लढाई चालू असतां लढाईची हकीगत अंताजीनीं बाबुरावास कळविली आहे. ती मोठी मनोरंजक असून मननीय आहे. या लढाईत मराठ्यांनीं जाटास पळतां भुई थोडी केली. बादशहातर्फे अंताजीनें समाधानकारक कामें केल्यानें बादशहाकडून इटावा व फुपुंद हे दोन परगणे जहागीर मिळाले. हे जरी तिकडे दीर्घकाल राहत असले तरी इकडेहि यांनीं आपला संबंध कायम ठेवला होता. त्याच्या कामरगांवीं अद्यापि भव्य वाड्याचा कोट याच्या वैभवाची ग्वाही देत आहे. सखाराम बापू बोकील व हा हे व्याहीव्याही होते. सखाराम बापूची मुलगी याच्या मुलास दिली होती असें वाटतें. अंताजीपंताच्या पश्चात् याचा मुलगा बहिरो अनंत बराच प्रसिद्धीस आला होता ( मं. त्रै. ३. २-४, पा. १०८ ).

हा बाजीराव व मुहम्मदखान बंगष यांच्या लढायांत आपल्या सैन्यासह हजर होता. बंगषानें याचा उज्जनीस पराभव केला होता ( ता. १९-५-१७३१ ). हा स. १७५५ मध्यें पुनः हिंदुस्थानांत जाऊन नागोरास दत्ताजी शिंद्यास मिळाला ( काव्ये. ४५१ ). स. १७५७ मधील लढाईंत यानें अबदालीला चांगलांच हात दाखविला होता. परंतु अबदालीची फौज भारी असल्यानें याचा उपाय चालेना. दिल्लीस असतां बादशाही कारस्थानांत याचा चांगलाच हात होता. याचा वाढत चाललेला वरचढपणा हिंगण्यास बिलकुल सहन होत नसे. त्यामुळें दोघांचें बिलकुल जमेना. हिंगणे-गंधे यांचें भांडण म्हणजे पेशव्यांच्या घरांतील भाऊबंदकीचा प्रतिध्वनि होता. दिल्लीदरबारांत याच्यावर कोणी विश्वास ठेवीत नसे म्हणून यास पुण्यास पाठविण्यांत आलें, असें रामराव निळकंठाच्या पत्रांत आहे. त्याप्रमाणें स. १७५९ मध्यें हा पुण्यास गेला. या सालच्या डिसेंबरांत सदाशिवरावानें पुणें येथें याच्या कारभाराची झडती घेऊन यास निर्दोषी ठरविलें. ( रा. खं. ३. २३३ ). यावरून याच सुमारास दत्ताजीच्या रोहिलखंडाच्या मसलतींत हा होता, असें भाऊसाहेबांच्या बखरींत लिहिलें आहे तें बरोबर आहे किंवा नाहीं, हें सांगतां येत नाहीं.

पानपतच्या युद्धांतून हा, बाजी हरि, नाना पुरंदरे, व मल्हारराव होळकर असे रात्रौ दिल्लीचे सुमारास चालले असतां दांडग्यांच्या हुल्लडींत फरुखाबादच्या जमीनदाराच्या हातून हा व बाजी हरि हे ठार झाले ( म. रि. म. ३ पा. २०५ ). याची मुद्राः–मुद्रैषा शंभुचरणद्वंद्वनिष्ठस्य सर्वदा । माणिकेश्वरसंभूत अनंतस्य विराजते ।

**अंताजी रघुनाथ कावळे**—कावळे हा मालाडचा सरदेसाई व इनामदार होता. हा फारच शूर व हिंदुधर्माचा अभिमानी होता. यानें साष्टी प्रांत पोर्तुगिजांकडून जिंकून घेण्याचा पेशव्यांकडे सारखा लकडा लावला होता. एकदां तर दाभाड्याकडून साष्टी जिंकवण्याचें कारस्थान यानें उभें केलें होतें. शेवटीं पेशव्यांनीं याच्या सांगण्यावरून साष्टीवर हल्ला केला; व बहुतेक साष्टी प्रांत काबीज केला. वसईच्या मोहिमेंत यानें चिमाजी अप्पाला सर्व प्रकारें साहाय्य केलें. कावळे आपणांस पुढें जावळे म्हणवून घेऊं लागले ( गंगाजी नाईक पाहा ).

**अंताजी शिवदेव मुताल्लिक** ( कऱ्हाडकर )—हा यमाजी शिवदेवाचा भाऊ असून हे दोघे राजारामाच्या कारकीर्दीत परशुराम त्रिंबकाचे हाताखालीं कारकुनी करूं लागले; आणि अंगच्या हुशारीनें लवकरच प्रसिद्धीस आले. स. १७३०–३१ त विशाळगड कांबीज करण्याचे कामीं श्रीनिवासराव प्रतिनिधींचे हाताखालीं यास शाहूनें पाठविलें होतें व त्या कामगिरीबद्दल शाहूनें यास पुष्कळ इनाम दिलें. याला एक पुत्र असून त्याचें नांव वासुदेव असें होतें. याच्याबद्दल खालील उल्लेख आढळतो. रा. यमाजी शिवदेव यांनीं उंब्रजचे मुक्कामीं स्वामीसंनिध विनंती केली– ' कै. राजाराम महाराज चंदीचे मसलतीस गेले ते समयीं किल्ले जगदेवगड हस्तगत करावयाचेदिवशीं अंताजी शिवदेव यांसी आज्ञा झाली. त्यावरून किल्ल्यावरी हल्ला करून दरवाजावरी चालून गेले. स्वामीचे दृष्टीं ठार झाले. त्याजकरितां महाराजांनीं त्यांची स्त्री मनूबाई यांस मौजे कोरेगांव इनाम करून दिला. त्या वेळचीं इनामाचीं पत्रें अग्नीचा उपद्रव होऊन दग्ध झालीं. तरी नूतन पत्रें करून देऊन इनाम चालविलें पाहिजे, म्हणून त्याजवरून मौजे मजकूर गांव इनाम दिला असें ' (म. रि. म. वि. ३ पृ. ३०६-७ ).

**अंतिओक योनराज**—अशोकाच्या शिलालेखांत त्याच्या सिरियन साम्राज्यापैकीं एण्टियोकसकरितां हें नांव आलें आहे.

**अंतिग**—( अग्निग पाहा ).

**अंतोबा गोसावी**—समर्थांचा शिष्य. मेथवड ( जि. सातारा ) चा राहणारा. समर्थ प्रथम स्वतःच आषाढी-कार्तिकीला पंढरीस जात, पण त्या वाऱ्या पुढें त्यांनीं याला करावयास सांगितल्या.

**अंतोबा नाईक भिडे**—हें सावकार घराणें पेशव्यांची पोतदारी करून प्रसिद्धीस आलें. यांचें मूळ ठिकाण कोंकणांतील गणपतिपुळें. पहिला प्रसिद्ध पुरुष अंताजी नरहर साताऱ्यास सराफी करून राहत असतां पेशव्यांबरोबर स्वारींत जाऊन संपन्न झाला, आणि पेशव्यांनीं पुण्यास वास्तव्य केल्यावर तेथें बुधवारांत भिड्यांनीं आपला वाडा बांधिला. शाहू छत्रपतीस अंताजीनें द्रव्यसाहाय्य केलें, त्यावरून त्यांस छत्रपतीनें रोहिडखोऱ्यांतील तिटेघर गांव ता. १४–४–१७१८ रोजीं इनाम दिला. फत्तेसिंग भोंसल्यासहि अंताजीनें पैशाचें साहाय्य केलें. यास ता. २५–१२–१७४१ रोजीं पेशव्यांची पोतदारी व पालखीचा मान शाहूकडून मिळाला. अंतोबा नाईक ता. ९–२–१७४२ रोजीं मृत्यु पावला. याला रामाजी नाईक हा मुलगा होता ( म.रि. उत्तर वि. १ ला, पृ. ४९७ ).

**अंदलीब**–खाजा मुहम्मदचें नामान्तर.

**अंबनाक काननाक**—कोरेगांवच्या लढाईत पेशव्यांच्या विरुद्ध इंग्रजांतर्फे कामीं आलेला एक महार सैनिक.

**अंबरनाक**—दामाजीपंत नांवाचा ब्राह्मण मंगळवेढ्याचा कमावीसदार होता. त्यानें दुष्काळपीडितांस सरकारी धान्य वांटलें. त्यामुळें सरकारी देण्याची तोहमत दामाजीपंतावर आली. तींमधून विठु महार यानें आपल्याजवळील पुरलेलें धन सरकारांत भरून त्याची सुटका केली. आणि महारांच्या बाबत हक्काची सनद दामाजीपंताच्या हातची लिहिलेली, बाहामनी बादशहाकडून मिळविली.त्या उपलब्ध सनदेंत अंबरनाक असें नांव आहे. अमृतनाक महारास ही सनद मिळाली असें कित्येक महारांचें म्हणणें आहे ( वि. रा. शिंदे कृत ' भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न ' पृ. १९४ ).

**अंबरनाथ**–मराठी कवि. कऱ्हाडजवळ कुंभारगांव म्हणून आहे तेथील कायस्थ. पूर्वी बालेघाटीं मामलत करीत असत. अमणापुरी मठ केला. यांनीं जिवंत समाधि घेतली. हे चैतन्यसांप्रदायी होते. यांचा काल एकनाथांनंतर दिसतो. यांचें अर्जुनगर्वपरिहार हें एक काव्य आहे ( सं. सू. ).

**अंबाजी**–अमृतरायाचें नांव.

२. ( कल्याण गोसावी पाहा ).

**अंबाजी इंगळे**—( स. १७८४-१८०९ ) शिंद्यांचा एक मराठा सरदार. याच्या बापाचें नांव त्रिंबकजी. स. १७८४ सालीं महादजी पातशाहीचा बंदोबस्त करण्यासाठीं दिल्लीकडे गेला तेव्हां हा उत्तर हिंदुस्थानांत त्याजबरोबर होता. त्या प्रसंगीं याच्या हातून कित्येक जबाबदारीचीं कामें घडलीं. उदाहरणार्थ, याच सालच्या जुलै-आगस्ट महिन्यांत हा व शीख सरदार यांचा तह ठरला. ता. २ नोव्हेंबर रोजीं अफरासियाबखानाचा खून झाला तव्हां यास फौजेमुद्धां मुसलमानी लष्करांत ठेवलें होतें. स. १७८७ च्या आक्टोबरांत महादजीनें खोर्डा-पाटोडीहून 'गुलामकादरच्या पारिपत्यास येऊं काय' म्हणून पातशहास विचारण्यासाठीं याची नेमणूक केली होती.

थोड्याच वर्षांनीं यास याहून जास्त स्वतंत्रतेनें कारभार करण्याची संधि मिळाली. स. १७९१ च्या सुमारास महादजीनें यास उदेपूरच्या राजाच्या विनंतीवरून त्याच्या राज्यांतील चोंडावत सरदारांचें बंड मोडण्यासाठीं कांहीं पलटणी देऊन पाठविलें. तेव्हां यानें चोंडावतांचा मुख्य साळुंब्रा यास राण्याची माफी मागावयास लावून त्याजकडून राण्यास वीस लक्ष रुपये दंड देवविला, व राण्याची सत्ता प्रस्थापित करून बंडखोर सदरारांकडून त्याच्या जमिनी सोडविल्या. शिवाय यानें तोतया राण्यास कमलमीरांतून हांकून लावण्याचीहि राण्याची दुसरी एक कामगिरी बजाविली. एवढ्या गोष्टी करावयास अंबाजीस दोन वर्षे लागलीं. यांशिवाय मेवाडच्या राण्यास याच्याकडून आणखीहि कांहीं कामगिऱ्या करून घ्यावयाच्या होत्या. शिवाय मेवाडच्या राण्यास चोंडावत सरदारांचेंहि भय वाटत होतेंच. म्हणून त्यानें अंबाजीच्या सैन्याच्या खर्चाकरितां सालीना आठ लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून देऊन यास मेवाडांत ठेवून घेतलें. अशा रीतीनें मेवाडच्या कारभाराचीं सूत्रें याच्या हातीं येऊन हा आपणास मेवाडचा सुभेदार म्हणवूं लागला. स. १७९५ सालच्या सुमारास याची शिंद्यांचा प्रतिनिधि म्हणून उत्तर हिंदुस्थानांत नेमणूक झाली. त्या वेळीं दौलतराव शिंदे हा वयांत आलेला नसल्यामुळें प्रथम प्रथम याच्या हातीं उत्तर हिंदुस्थानांत 'कर्तुमकर्तु' सत्ता आली. पण लवकरच यास लखबादादा हा प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला. लखबादादानें राण्यास याच्याविरुद्ध कट करण्यास सांगून याचें वर्चस्व झुगारून देण्याविषयीं गुप्तपणें उत्तेजन दिलें. त्यामुळें याच्या पक्षाच्या व राण्याच्या पक्षाच्या लोकांत कित्येक चकमकी होऊन यांपैकीं बहुतेकांत याच्या पक्षाच्या लोकांचा पराजय होत गेला. अशा स्थितींत स. १८०० च्या सुमारास हिंदुस्थानचा कारभार याच्याकडून काढून तो शिंद्यांनीं लखबाकडे सोंपविला. स. १८०३ मध्यें यानें आपल्या कारस्थानांना पेरॉन यास हुसकून लावून त्याची जहागीर व शिंद्यांच्या सैन्याचें आधिपत्य मिळविलें.

ज्या वेळेस यशवंतराव होळकरांनीं पुण्यावर स्वारी केली तेव्हां, याचा महालुंग्यास असलेला वाडा त्यानें लुटून जाळला. हा पुढें दौलतराव शिंद्याच्या हिंदी फौजेचा मुख्य सेनापति झाला. स. १८०३ मध्यें झालेल्या युद्धांत इंग्रजांनीं यास स्वतंत्र राज्याचें आमिष दाखवून फितूर केलें. तेव्हां यानें ग्वाल्हेर किल्ला व शहर आणि त्याचे उत्तरेकडील यमुनेपर्यंतचा प्रदेश सोडून दिला, आणि त्याच वेळीं यास दक्षिणेकडील प्रदेशाचें राज्य स्वतंत्र तोडून मिळालें ( १६-१२-१८९३ ). परंतु पुढें हा अगदीं तोंडघशीं पडला. कारण दौलतराव शिंद्यापाशीं हा तर उघड राजद्रोही ठरला, आणि इंग्रजांकडील राज्य यास मिळालेंच नाहीं. स. १८०५ त यशवंतराव होळकरांनीं याला गांठून याचे फार हाल केले. शिवाय याजपासून पन्नास लाख रुपये वसूल करून यास वरील फितुरीचें भरपूर प्रायश्चित्त दिलें ( १८-४-१८०५ ). हा ८१ वर्षांच्या वृद्धावस्थेंत ता. ४-६-१८०९ रोजीं मरण पावला. मरेपर्यंत हा प्रकृतीनें अगदीं खडखडीत होता. याचा रंग काळा असून चेहरा तरतरीत होता. याचा पोषाख साधा असून स्वभाव थट्टेखोर होता. याच्या पायांत चोळणा असून अंगांत रुदार बंडी व डोक्यास पांढरें पागोटें असे. हा कधींकधीं अंगावर शालजोडी घेत असे. अजमीरचे कारभारावर असतां हा आजारी पडला. तेव्हां युरोपियन डॉक्टरांस बोलावून कांहीं उपचार केला; पण बरें वाटेना. तेव्हां बनास नदीच्या कांठाजवळच बायकामुलें होतीं तेथें जाऊन सर्वांचा निरोप घेऊन यानें देह ठेविला. याजपाशीं द्रव्यसंचय मोठा असावा अशी सर्वांची कल्पना होती. सर्जेराव घाटग्यानें यास छळून याचें द्रव्य उपटण्यास कमी केलें नाहीं. त्यासाठीं तेलाचे बोळे याच्या बोटांवर ठेवून ते सर्जेरावानें पेटवून दिले होते. ५ मे १८०९ असा याचा मृत्युकाल डफनें दिला आहे. याची छत्री कोट्यास आहे. त्याअर्थी हा तेथेंच मृत्यु पावला असें दिसतें. मराठा रियासत उत्तर विभाग २ मध्यें हा जयपुराजवळ मरण पावला, असें लिहिलें आहे. मरणापूर्वी थोडे दिवस याचें लग्न ठरलें होतें, पण पोरीच्या नशिबीं वैधव्य नसल्यानें तें घडून आलें नाहीं. याचे पश्चात् याचा भाऊ बाळोबा हा पुढें याच्या दौलतीची व्यवस्था पाहत होता. याला त्रिंबकराव नांवाचा एक मुलगा होता.

अंबाजी इंगळ्यांचे बंधु खंडोजी इंगळे नागपुरास रघूजीराव भोसल्याकडे गेले, पण शेवटीं भोसल्याबरोबर त्यांचीहि जहागीर इंग्रजांनीं खालसा केली.

मराठे हे राज्यकर्ते नसून केवळ पैशावर दृष्टि ठेवणारे लुटारू आहेत, अशी इतर प्रांतांत मराठ्यांची प्रायः प्रसिद्धी होती. अशी अपकीर्ति होण्याला कारण झालेल्या मराठा सरदारांपैकीं हा एक आहे.

**अंबाजी त्रिंबक पुरंदरे**—हा सासवडचा देशपांडे व कुलकर्णी. अंबाजीपंत व तुकोपंताचा मुलगा मल्हार तुकदेव पुरंदरे हे शाहू सुटून येतांच त्याच्या पक्षास सामील झाले; व पुढील उद्योगांत शाहूला यांचा फार उपयोग झाला. तेव्हां यास शाहूनें मुतालिकी दिली. शिवाय बाळाजी विश्वनाथानें आपली पोतनिशी व जामदरखाना याजकडे सोंपविला होता. तीं कामें हा आपल्या विश्वासूक माणसाकडून करून घेत असे. बाजीरावास पेशवाई मिळाल्यावर त्यानें दिवाणगिरीवर याची नेमणूक केली. तेव्हां मल्हार तुकदेव ऊर्फ दादोबा मुतालिकी पाहूं लागला. याशिवाय बहुतेक सरदारांकडे अंबाजीपंताच्या असाम्या असत. शाहूच्या खास मर्जीतील लोकांत याचा समावेश होता. ही मंडळी शाहूच्या दरबारांत पेशव्याचा पाठपुरावा करीत, व जातीनें स्वारीवर हजर असत. त्यामुळें पेशवा निर्धास्तपणें मुलूखगिऱ्या करी. याचें नांव आबाजी असेंहि लिहिलेलें आढळतें. मुतालिक हा शाहूजवळ राही आणि दिवाण हा पेशव्याजवळ राही. पुरंदरे आणि पेशवे यांचा शेवटपर्यंत घरोबा राहिला. गादीवरील पेशवा वयानें लहान असला तरी पुरंदरे घराण्यांतील पुरुषास पत्रांत चिरंजीव लिही. बाळाजीनें शाहूला कर्ज पाहिजे होतें तें सावकाराकडून अंबाजीपंताच्या साह्यानें दिलें. बाळाजीस जेव्हां दमाजी थोरातनें पकडलें होतें, तेव्हां अंबाजी पुरंदरे यांनींच दंड भरून बाळाजीची सुटका केली. स. १७२४ मध्यें यानें स्वतंत्रपणें माळवा काबीज केला.

शाहूनें १३।२।१७२७ रोजीं यास पत्र लिहिलें. शाहूची त्या वेळीं एवढी तारांबळ उडाली होती कीं, प्रत्यक्ष पेशवा व सेनापति हे तरी आपणांस मनापासून मदत करतील कीं नाहीं ह्याबद्दल त्यास शंका होती. शाहू लिहितो, "तुम्हीं बाजीरावांस चार गोष्टी विचारावयास सांगून अमित्राचें पिच्छावरी जाऊन फितूरी तुटे तो अर्थ करणें; तुम्हीं स्वामीजवळ बोलून गेला काय, करितां काय, हा विचार करीत नाहीं, सेनापति व प्रधान यांचे मनांत विचार तरी काय आहे याचा शोध घेऊन लिहून पाठविणें. यावरून स्वामी निश्चित मानतील. वारंवार लिहावयाची सीमा झाली, परंतु कार्यभागाचा विचार दिसत नाहीं. याउपरी (अमित्राचें) गुज काढावें आणि फितूर तुटावा, ऐसें चितांत असेल तरी पत्र दर्शनीं अमित्राचें पिच्छावरी येऊन वाताहात करणें" (काव्ये. १६७).

साताऱ्याहून संभाजीस आणण्याकरितां हा व याच्या बरोबर कित्येक सरदार गेले. शाहूनें चौथाईबद्दल ता. २३।४।१७२६ ला एक पत्र कदम बांडे व पिलाजी गायकवाड यांस लिहिलें त्यांत ह्याचें नांव आहे. ज्या वेळेस पवार, बांडे बाजीरावाच्याविरुद्ध कारस्थानें करूं लागले, त्या वेळेस बाजीरावानें त्यांच्या बंदोबस्तासाठीं याला व पुष्कळ सरदारांना पाठविलें. दंडराजपुरी येथें पराभव पावल्यावर सर्व सिद्दी सरदार जंजिऱ्यांत जाऊन बंदोबस्तानें राहिले. त्या वेळच्या हकीकतीचें पत्र बाजीरावानें ता. २६।५।१७३३ रोजीचें साताऱ्यास अंबाजीस पाठविलें. या पत्रावरून कळतें कीं, जंजिरा ताब्यांत येईना तेव्हां मराठ्यांनीं, राजापुरी, खोकरी, अंतोर्णे, नागोठणें, अश्वधारा वगैरे ठिकाणें लढून घेतलीं. मानाजी आंग्रे हा जंजिऱ्यास आरमारासह आला व त्यानें सिद्दीचा मोड केला (म. रि. म. १). पुरंदरे घराणें पेशव्यांचे कारभारी आणि छत्रपतींचे उपमंत्री होय. याचा मृत्यु भाद्रपद शु. ८।१६५६ रोजीं माहुलीस झाला (स. १७३५). बाजीराव पेशवे यांनीं याच्या हाताखालींच राज्यकारभाराचें शिक्षण घेतलें होतें. याला तात्या असें म्हणत. याची पत्नी बयाबाई. बयाबाईनें सहगमन केलें. यांना महादोबा व सदाशिव असे दोन पुत्र होते.

**अंबादास**—समर्थशिष्य कल्याणाचें नामान्तर.

**अंबादेव महाराज**—(स. १२७२-१२९१) रुद्रम्बानें नेमलेला एक सुभेदार. याची राजधानी कांदी कोट-मनोरथपुर ही होती.

रुद्रम्बा हें राणीचें राज्य म्हणून पुष्कळसे सुभेदार त्याचा फायदा घेण्यास प्रवृत्त झाले; परंतु अंबादेवानें त्या सर्वांना पराभूत केलें. यानें श्रीपती गणपतीस जिंकलें व राजसहस्रमल्ल पदवी घेतली. त्याचप्रमाणें एरूवमल्लदेव, केशव, स्वामिदेव, अल्लूगंग, दामोदर आणि मल्लिकार्जुन यांस पराभूत केलें. हा रुद्रम्बानें फार हुशार अधिकारी निवडला होता (सुब्रमणि अय्यरकृत एनशन्ट डेक्कन भा.१ पृ.२१३).

**अंबाबाई**—हिचीं मराठींत कांहीं पदें आहेत (सं.सू.).

**अंबांबिका**—विजयनगरच्या तुळुव घराण्यांतील नरसिंहराय ऊर्फ नरसा याची पत्नी. हिचे पुत्र रंगराय व अच्युतराम.

**अंबिकादेवी**—पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या सत्याश्रयाची पत्नी.

**अंबाप्रसाद**–मेवाडच्या गादीवर शक्तिकुमारानंतर हा आला. चितोडच्या किल्ल्यावर मिळालेल्या रावल समरसिंहाच्या वेळच्या वि. सं. १३३१ ( स. १२७४) मधील प्रशस्तींत याचें नांव आम्रप्रसाद असें लिहिलें आहे. याची राणी सोळंकीवंशांतील राजाची मुलगी होती, असें एका फुटक्या शिलालेखावरून दिसतें. सांभरच्या दुसऱ्या वाक्पतिराज चौहानानें याला ठार मारलें, असें पृथ्वीराजविजय नांवाच्या जयानक कवीच्या महाकाव्यावरून दिसतें. नृवर्मा ( नरवर्मा ), अनन्तवर्मा व यशोवर्मा असे याला तीन भाऊ होते. नंतर शुचिवर्मा गादीवर आला ( रा. इ. पा. ४३८ ).

**अंबिकाबाई दाभाडे**—ही यशवंतराव दाभाड्याची बायको असून प्रसिद्ध उमाबाईची सून होती. सासूसुनेचें वांकडें आल्यामुळें ही सासूबाईपाशीं न राहतां आपल्या मुलास–त्रिंबकरावास घेऊन चांदखेड येथें स्वतंत्र राहत असे. परंतु उमाबाईनीं हिला सणसणीत पत्र धाडून आपणाजवळ आणलें. हिला एकच मुलगा असून त्याचें नांव त्रिंबकराव होतें. पुढें हिला व उमाबाईला पेशव्यांनीं सिंहगडावर बंदोबस्तांत ठेविलें ( भा. व. श. २७ ). ही शितोळे देशमुख याची मुलगी असून हें लग्न ता. १२-५-१७५२ मध्यें झालें. परंतु हिचा नवरा यशवंतराव लवकरच मरण पावला ( म. रि म. वि. २, पृ. ३००-२१ )

**अंबिकाबाई भोसले**– रुस्तुमराय जाधवाची कन्या व छत्रपती शाहूची पत्नी. शाहू तुरुंगांत असतां हिचें लग्न औरंगजेबानें शाहूशीं मोठ्या थाटानें करून दिलें. ही गोष्ट स. १६९९ मध्यें झाली ( म. रि. म. वि. २. पृ. १७८).

**अंबिकाबाई महाडिक**–ही शिवाजीची मुलगी होती. हिच्या आईचें नांव सईबाई असून तिची ही तिसरी मुलगी. ही हरजीराजे महाडिक तारळेकर यांस दिली. महाराजांनीं हरजीराजे यांस जिंजी प्रान्तांत जहागिरी देऊन त्या प्रान्ताची सुभेदारीहि त्यांजकडे सोंपविली होती ( शिवाजी-निबंधावली १, पृ. २२५ ).

**अंबिगळ चौडय्य**—( स. ११६० ) कानडी लिंगायत कवि. कानडींत याचीं तात्त्विक वचनें फार प्रसिद्ध आहेत.

**अंबुदास ( संन्यासी )**—यानें मराठींत कांहीं पदें केलीं आहेत. याचें भक्तिज्ञान-वैराग्यनिरूपण नांवाचें एक प्रकरण उपलब्ध आहे ( सं. सू ).

**अंबूराव हणमंते**—याचें नांव बाळकृष्ण वासुदेव ऊर्फ अंबूराव हणमंते होतें. याला शाहूमहाराजानें राज्याभिषेकाच्या वेळेस अमात्य ही पदवी दिली ( १२।१। १७०८ ). तेव्हांपासून हा अमात्य होता ( बाळकृष्ण वासुदेव हणमंते पाहा ).

**अंम चालुक्य ( अम्म )**—( स. ९१८-९२५ ) हा चवथ्या विजयादित्याचा वडील मुलगा. याचें नांव विष्णुवर्धन असेंहि होतें. याच्या कारकीर्दीत राजमहेंद्री शहर चालुक्यांनीं जिंकलें. राष्ट्रकूटांबरोबर याच्या आप्तांनीं याच्याविरुद्ध कट केला होता, परंतु सिद्धीस गेला नाहीं.

**२.** ( स. ९४५-९७० ) हा चालुक्यांपैकीं दुसऱ्या भीमाचा धाकटा मुलगा होय. याचें दुसरें नांव सहावा विजयादित्य असें होतें. या वेळीं पांचव्या विजयादित्यापासून चालत आलेला गृहकलह थांबला. कामराज व नायमोबा यांची मुलगी ती याची राणी होय. हा स.९४५च्या डिसेंबरच्या पांचव्या तारखेला शुक्रवारीं गादीवर बसला. त्या वेळीं हा बारा वर्षांचा होता.

**अंमंगदेवी**—ही पहिल्या राजेन्द्र चोलाची मुलगी व पहिल्या राजराज पूर्वचालुक्याची पत्नी. हिचा मुलगा राजेन्द्र दुसरा किंवा कुलोत्तंग चोल पहिला होय.

**अंमाल आचार्य** अथवा **वरदाचार्य**—हा घटितशत सुदर्शनाचार्य यांचा मुलगा होय. हा कानेईचा वैष्णव आचार्य होता. यानें रामानुजांचीं तत्त्वें व दिग्विजय यांसंबंधीं सहा अंकी नाटक लिहिलें. या नाटकाचें नांव यतिराजविजय अथवा वेदांतविलास असें आहे. तसेंच चोलभाण व वसंततिलकभाण अशीं नाटकें यानें लिहिलीं.

**अंलात**—हा एक शक राजा होता. यानें इ. स. च्या सुमारास पाटलिपुत्रावर स्वारी केली व तें शहर ताब्यांत आल्यावर तेथील लोकांचीं सरसहा कत्तल केली. तसेंच चातुर्वर्ण्याबाहेरचे शक लोक तेथें आणून त्यांची वस्ती केली. शकयवनांच्या स्वाऱ्यांमुळें देशांत जी भीषण परिस्थिति उत्पन्न झाली होती तिचें हृदयद्रावक वर्णन गर्गाचार्यांनीं आपल्या युगपुराणांत येणेप्रमाणें केलें आहे. 'या दारुण महायुद्धांत राष्ट्रांतील सर्व पुरुष कामास आल्यामुळें स्त्रियांना सर्व कामें करावीं लागलीं. त्यांनीं नांगर धरले व धनुष्यबाण घेऊन शेतांचें रक्षण केलें. जिकडे तिकडे स्त्रिया संघानें राहूं लागल्या. पुरुष इतके दुर्मिळ झाले कीं, एक एक पुरुषाला दहादहा वीसवीस स्त्रिया वरूं लागल्या, जिकडे तिकडे दांभिकपणा पसरून चातुर्वर्ण्य विस्कळित झालें. याच लोकांत दोन वर्षे अवर्षण पडून हजारों लोक मृत्युमुखीं पडले.' गेल्या महायुद्धानंतरचें वर्णन अद्यापि स्मरणांत असल्यानें यांत खोटें मानण्यासारखें कांहीं नाहीं ( गर्गाचार्य पाहा ).

**अंशुवर्धन**—हा नेपाळच्या ठाकुरी वंशांतील पहिला राजा होय. हा शेवटल्या सूर्यवंशी राजाचा जांवई असून फार शूर व विद्वान् होता. यानें शब्दविद्याशास्त्र हा ग्रंथ लिहिला आहे. ह्यूएनत्संग म्हणतो कीं, अंशुवर्धन व अंशुफलो हे एकच आहेत.हा प्रथम श्रीहर्षाचा मांडलिक होता. त्याच्या पश्चात् हा स्वतंत्र झाला (स. ६४८). हा पश्चिम नेपाळचा राजा होता. यानें आपली राजधानी मध्यलखु येथें नेली. यानें एक सात तोव्यांची पाणपोई बांधिली व तीवर एक शिलालेखहि लिहिला.

## आ

**आई आदिपुरुष**—समर्थांचा शिष्य जो देवदास त्यानें या सत्पुरुषाचा आपल्या कवितेंत उल्लेख केला आहे. पंत प्रतिनिधी यांच्या ऐतिहासिक पत्रव्यवहाराच्या शिरोभागीं 'श्री आई आदिपुरुष' असें नांव आढळतें. यावरून असें वाटतें कीं, पंत प्रतिनिधींच्या वंशांत 'आई आदिपुरुष' या नांवाचे कोणी सत्पुरुष होऊन गेले असावेत किंवा त्यांच्या वंशांतील कोणीं पुरुषानें, त्या नांवाच्या सत्पुरुषापासून उपदेश ग्रहण केला असावा (महाराष्ट्र कविचरित्र भा. १, पृ. २६४).

कीशियासी दिधले लक्षघर । आई आदिपुरुषा दिधला वर मोरेश्वराचा बिडवार । वाढविला त्वां गोविंदा ॥

(देवदासकृत रंगमालिकाबारतोडांतील ओवी)

श्रीसमर्थांची कविता भाग १ ला (धुळें), पृष्ठ २९१ स्फुट ओवी संख्या २४३ मध्यें आई आदिपुरुषाचा उल्लेख आहे.

"आई आदिपुरुष हेंची विचारावें । आपुलें करावें समाधान ॥ १ ॥

यांच्या शिष्यपरंपरेंतील कांहीं लोकांना देणग्या दिलेल्या आढळतात (सन १७४०). हे शिष्य जालनाजवळील सोमठाणें व गोलटगांव या गांवचे होते (पे. द. २२. १४२). राणोजी शिंदे वगैरेंहीं या सत्पुरुषाचा संबंध असावा.

**आईनाथ**—उत्तमश्लोक हे वऱ्हाडांत पैनगंगेच्या काठीं आले तेव्हां तेथें आईनाथ महाराज वास्तव्य करीत होते. त्यांच्या साधुत्वाबद्दल शंका घेणाऱ्या कुटाळ लोकांनीं त्यांना मजेखातर एका खोल खड्ड्यांत पुरलें. दोन महिने त्या स्थितींत होते. उत्तमश्लोक त्या मार्गानें चालले असतां भूगर्भातून आर्तस्वर ऐकूं आला. म्हणून त्यांनीं यांना बाहेर काढलें. आईनाथांनीं यात्रेहून परत येऊन आपली क्रिया करण्यास उत्तमश्लोकांस सांगितलें (कविचरित्र भा.६, पा. १७१-१७२). आई आदिपुरुष व आईनाथ एकच काय ?

**आकतखान खल्जी**–(स. १३००) हा अलाउद्दीन खल्जीचा पुतण्या. आकतखानाचा बाप उलूघखान याचें अलाउद्दीनावर फार प्रेम होतें. फीरूझशाह खल्जीचा खून करून दिल्लीचे तक्ताचा अपहार करण्याचें मसलतींत उलूघखानानें जी एकनिष्ठेनें मदत केली ती केली नसती तर अलाउद्दीनाचें सर्व कपटनाटक फसलें असतें. उलूघखानाचें अलाउद्दीनावर असें निस्सीम प्रेम होतें, तरी त्याचा मुलगा आकतखान यास अलाउद्दीनाचा खून करण्याचा मोह झाला. स. १३०० मध्यें रतनभोरचे स्वारींत उलूघखानाचा पराभव झाला. म्हणून त्याचे मदतीस अलाउद्दीन स्वतः निघाला. वाटेंत तिलपतजवळ शिकारीकरितां मुक्काम करून एक दिवस सकाळीं शिकारीवर गेला. त्यास येण्यास उशीर लागला म्हणून आकतखान १०० मोंगल घोडेस्वार बरोबर घेऊन त्याचे शोधास गेला. अलाउद्दीन थोड्याशा लोकांनिशीं एकटाच दूर जंगलांत दृष्टीस पडला. तेव्हां आकतखानास त्याचा वध करण्याचा मोह झाला. त्यानें आपल्या स्वारांस सुलतानावर शरसंधान करण्याचा हुकूम केला. स्वार सर्वच मोंगल असल्यानें त्यांनीं हुकमाप्रमाणें शरसंधान सुरू केलें. अलाउद्दीन चौरंगावर बसलेला होता. हल्ला होतांच तो उठला व चौरंग समोर धरून त्यानें बाण चुकवून स्वतःचें धैर्यानें रक्षण केलें. माणिक नांवाचा त्याचा विश्वासू गुलाम बरोबर होता. त्यानेंहि राजास बाण लागूं नयेत म्हणून त्याजपुढें उभें राहून बाण आपल्या अंगावर घेतले. तरीहि राजाच्या खांद्यास जखम झालीच व तो निश्चेष्ट होऊन जमिनीवर पडला. तेव्हां कांहीं पायदळांतले सैनिक बरोबर होते, ते पुढें झाले व आपल्या तरवारी म्यानांतून काढून राजाचे भोंवतालीं त्याचें रक्षण करण्यास उभे राहिले. 'अलाउद्दीन मेला आहे.' असा त्यांनीं पुकारा केला. आकतखानानें छावणीकडे घूम ठोकली व छावणींत पोहोंचल्याबरोबर 'आपण अलाउद्दीनास ठार केलें आहे. सर्व सैन्यानें आपण जिंकलेल्या सुलतानपदास मान्यता देऊन राजनिष्ठेची शपथ घ्यावी' अशी द्वाही फिरविली. त्यानें झटपट दरबारहि भरविला. कांहीं उल्लू सरदारांनीं दरबारांत हजर राहून आकतखानास राजनिष्ठ राहण्याच्या शपथाहि घेतल्या. परंतु आकतखानानें जनानखान्यांत शिरण्याचा प्रयत्न केला, तेव्हां मात्र जनानखान्यावरील संरक्षकांनीं 'अलाउद्दीनाचें शिर प्रत्यक्ष दाखवून अलाउद्दीनाचा वध सिद्ध केल्याशिवाय आपण जनानखान्यांत तुम्हांस जाऊं देणार नाहीं.' असें म्हणून आकतखानास मज्जाव केला.

छावणींत आकतखानाचा दरबार भरला असतां इकडे अरण्यांत भटकणाऱ्या सैनिकांपैकीं ५०-६० सैनिक राजा मृतवत् पडला होता तेथें जमा झाले. त्यांनीं

अलाउद्दीनाच्या जखमा बांधल्या. अलाउद्दीन हुषार झाल्याबरोबर छावणीकडे जावयास निघाला. वाटेंत त्यास आणखी सैनिक भेटले. नंतर तो एका टेंकडीवर चढून गेला व सैनिकांस राजछत्र उघडून डोक्यावर धरण्याचा त्यानें हुकूम दिला. राजछत्र पाहतांच सैनिक व सरदार भराभर त्याच्या मदतीस धांवून गेले. शेवटीं पाठलाग करून याचा वध करण्यांत आल्यावर याच्या साथीदारांसहि हालहाल करून ठार करण्यांत आलें ( कें. हि. ).

**आक्काबाई**—कऱ्हाडचे रुद्राजीपंत देशपांडे यांची ही कन्या व रामदासस्वामींची शिष्यीण होय. ही बालविधवा होती. हिच्या मनांत पुढें परलोकप्राप्तीचा विचार आला; तेव्हां हिनें पित्याच्या आज्ञेनुसार समर्थांचा उपदेश घेतला, व समर्थांची सेवा करीत राहिली. हिची गुरूवर दृढभक्ति होती. हल्लींची परळी येथील रामदासस्वामींची समाधि व दगडी सभामंडप हें सर्व समर्थांच्या मागें हिनेंच बांधिलें. समर्थांच्या वडील बंधूंच्या मुलांस चाफळास आणून, स्थापून ३६ वर्षे कारभार केला. समर्थांच्या मागून ४० वर्षांनीं हिनें परलोकींची वाट धरली. हिचें वृंदावन सज्जनगडावर आहे. शके १६४३ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस हिनें देह ठेवला ( मंडळ-षष्ठसंमेलनवृत्त पा. १८९ ).

**ऑक्झिंडेन**—इंग्रजांचा शिवाजीकडील वकील. हा शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या दिवशीं रायगडावर हजर होता. याचें शिवाजीच्या दरबारांतील प्रत्येक थोर माणसाशीं संबंध आलेले होते. त्यासंबंधाचें यानें बारकाईनें टिपण करून ठेविलें आहे. त्यावरून तत्कालीन परिस्थिति ध्यानांत येते. 'परदेशांतील राजकारणाकडे लक्ष देणारे किंवा परद्वीपस्थ राजांच्या उदयास्तांचा विचार करणारे ह्या देशांत कोणीहि नाहींत' असें यानें म्हटलें आहे (पत्रसारसंग्रह १६५० ). शिवाजीच्या राज्याभिषेकाचेंहि यानें बारकाईनें वर्णन केलेलें आहे ( पत्रसार सं. १६४३). याचें सबंध नांव हेन्री आक्झिंडेन असें होतें.

**ऑक्टर लोनी** सर डेव्हिड-( स. १७५८-१८२५ ) हा ब्रिटिश सेनापति, बोस्टन येथें स. १७५८ मध्यें जन्मला आणि केडेट म्हणून ( १७७७ त ) हिंदुस्थानांत आला. यानें कोईल, अलीगड आणि दिल्ली येथील लढायांतून लॉर्ड लेकच्या हाताखालीं काम केलें. पुढें स. १८०३ मध्यें दिल्ली येथें याला रेसिडेंट नेमण्यांत आलें. १८१४ मध्यें मेजर जनरल असतांना होळकराच्या हल्ल्यापासून यानें त्या शहराचा मोठ्या शौर्यानें बचाव केला.

पुढें काटमांडूवर चाल करून जाणाऱ्या सर्व सैनेचें आधिपत्य जेव्हां याला देण्यांत आलें तेव्हां यानें मोठ्या हुषारीनें गुरखे लोकांचा पराभव केला व स. १८१६ मध्यें सेगवली येथें तह घडवून आणला. या मर्दुमकीबद्दल याला जी. सी. बी. केलें. हिंदी सैन्यांत हा मान मिळविणारा हा पहिला अधिकारी होय (स.१८१७-१८१८). पुढें याच्याकडे राजपुताना-पथक दिलें होतें. यानें अमीरखानाशीं स्वतंत्र करार करून त्याला इतर पेंढाऱ्यांपासून विभक्त केलें. १८१८ मध्यें राजपुतान्यांत याला रेसिडेंट नेमिलें. जेव्हां दुर्जनसालनें भरतपूरचा बालराजा बलवंतसिंग याच्या विरुद्ध बंडाळी माजविली ( स १८२५ ), तेव्हां यानें स्वतःच्या जबाबदारीवर राजाला मदत करण्याचा सैन्याला हुकूम दिला. त्या वेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड ॲम्हर्स्ट याला याचें करणें पसंत पडलें नाहीं. तेव्हां याला अतिशय अपमान वाटून यानें राजीनामा दिला व हा दिल्लीस गेला.

आपल्या इतक्या दिवसांच्या इमानेइतबारें केलेल्या नोकरीचीं गव्हर्नर जनरलला कांहींच किंमत वाटूं नये याचा याला खेद होऊन याला लवकर मृत्यु आला असें म्हणतात. १५ जुलै १८२५ रोजीं मिरत येथें याचा अंत झाला. कलकत्ता येथें ऑक्टर लोनींचें स्मारक म्हणून एक स्तंभ उभारिलेला आहे.

**आखो**—हा गुजराथी कवि जातीचा सोनार असून लहानपणापासूनच यास जगाचा वीट आला होता. याचा पहिला गुरु वाल्लभपंथी होता; पण त्याच्याविषयीं संशय येऊन आखोनें काशीस दुसऱ्या गुरूपाशीं वेदाचें अध्ययन केलें.

चित्तविचारसंवाद, आखेगीता, गुरुशिष्यसंवाद वगैरे याचे ग्रंथ होत. वेदान्ताच्या अभ्यासामुळें याच्या काव्यांत भरपूर वेदान्त भरलेला आहे. आखो हा जरी विद्वान् अगर भाषातज्ज्ञ नसला तरी योग्य वेळीं व योग्य स्थळीं शाब्दिक कोरडे ओढण्यांत याचा हात धरणारा कोणी नव्हता.

हा स्वतःला कवि मानीत नसे. तर लोकांनीं आपणास तत्त्वज्ञ अगर ज्ञानी म्हणावें असें यांस वाटे. याची उपमा व रूपकें योग्य व समर्पक आहेत. यानें काव्यास निराळें वळण देण्याचा प्रयत्न केला व तो बऱ्याच अंशीं सिद्धीसहि गेला.

**आगाखान**—( स. १८००-१८८१ ) हसनअल्ली शाहा ( जन्म इराणांत १८०० त ) याला, जेव्हां तो मुंबईस ब्रिटिश राज्याच्या आश्रयाला प्रथम येऊन राहिला त्या वेळीं "हिज हायनेस आगाखान" ही पदवी देण्यांत आली. त्याचा पूर्वज अली-मुहंमद पैगंबराचा जामात-होता, असें मानितात. अलीचा मुलगा हुसेन यानें इराणच्या एका राजकन्येशीं लग्न लाविलें होतें. तेव्हां अर्थातच आगाखानानें आपला संबंध इतिहासपूर्व काळांतील इराणच्या राजघराण्याशीं जोडला. शिवाय याच्या पूर्वजांनीं, खिस्ती

धर्मयुद्ध चालू असतां बेनिफतिमी लोकांचे खलीफ म्हणून अनेक वर्षे इजिप्तमध्यें राज्य केलें होतें. इराण सोडण्यापूर्वी बादशाह फत्तेअलाशाहानें आगाखानाला कर्मान या मोठ्या व महत्त्वाच्या प्रांताचा सुभेदार नेमिलें होतें. याची तेथील कारकीर्द, चिकाटी, नियमितपणा आणि उच्च राजकीय धोरण या दृष्टीनें वाखाणण्याजोगी म्हणतां येईल. याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं व शाहाच्या मर्जीतल्या लोकांनीं आंतून कारस्थानें चालवून देशांत अंतःक्षोभ उत्पन्न केला होता. तरी पुष्कळ दिवसपर्यंत यानें शाहाचा स्नेह व प्रीति संपादन केली होती. सरतेशेवटी याच्यावरची शाहाची मर्जी अजिबात खप्पा होऊन, स्वसंरक्षणासाठीं ब्रिटिश हद्दींत याला पळून जावें लागलें. राहावयास हिंदुस्थान पसंत करून यानें मुंबईला आपलें ठाणें दिलें. त्या वेळीं पहिलें अफगाणयुद्ध जोरांत होतें. तेव्हां इराणहून अफगाणिस्थानांतून इकडे येतांना, ब्रिटिश सैन्याला उत्तम प्रकारची मदत करण्यास याला आयतीच संधी मिळाली व अशा रीतीनें आपलें दैव यानें ब्रिटिशांच्या हातीं दिलें. नंतर कांहीं वर्षांनीं सिंधच्या मोहिमेंत हा असाच ब्रिटिशांच्या चांगला उपयोगी पडला. त्या वेळीं सरहद्दीवरच्या जातींतील अनेकांचा हा गुरु असल्यानें नेपियरनें या जातींचा बंदोबस्त करण्याकरितां आगाखानाची नेमणूक केली. या आपल्या मुसलमान स्नेह्याची नेपियर फार वाहवा करी व शौर्य आणि मुत्सद्दीगिरी या गुणांविषयीं तो याला फार मान देई. उलट आगाखानानेंहि ब्रिटिश सरकारशीं एकनिष्ठ राहून नेपियरच्या स्नेहास व विश्वासास आपली पात्रता दर्शविली. हा जेव्हां हिंदुस्थानांत कायम राहूं लागला तेव्हां सरकारनें मोठ्या इस्मायली संप्रदायाचा हा वरिष्ठ पुढारी असें कबूल करून, " हिज हायनेस " ही पदवी व मोठें पेन्शन याला बहाल केलें. त्या वेळेपासून तो हा मरेपर्यंत ( स. १८८१ ) आगाखानानें ब्रिटिशांच्या छत्राखालीं मोठ्या शांततेनें काळ कंठिला व त्याचप्रमाणें आपल्या अनुयायांचीं धर्मकृत्यें पार पाडिलीं. याची धार्मिक सत्ता मानणारे लोक केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर अफगाणिस्तान, खोरासान, इराण, अरबस्तान, मध्य आशिया, सीरिया, मोरोक्को वगैरे देशांत पुष्कळ आहेत. हा शेवटपर्यंत ब्रिटिश राज्याशीं पूर्णपणें एकनिष्ठ राहिला, व सरहद्दीवरील जातींवर याचा मोठा वचक असल्यानें वायव्य सरहद्दीवरच्या ब्रिटिशांच्या मोहिमांना याचें अमूल्य साहाय्य मिळालें. हिंदुस्थानांत देखील मुसलमान लोक जेव्हां धार्मिक किंवा राजकीय स्वरूपाचे दंगे करीत तेव्हां त्यांना शांत करण्याचे कामीं याचा उपयोग होत असे.

याच्या मृत्यूनंतर याचा वडील मुलगा आगाखान दुसरा याच्या अधिकारावर आला. त्यानें आपल्या वडिलांचा कित्ता इतका चांगला गिरविला कीं, स्थानिक सरकारची त्याच्यावर मर्जी बसली व त्याला Knigthood of the Order of the Indian Empire ही मोठी पदवी मिळून मुंबईच्या कायदे कौंसिलांत स्थान मिळालें.

**आग्रदास**—एक हिंदी कवि. हा नाभादासाचा गुरु आणि तुलसीदासाचा समकालीन होता. याचें गांव जयपूर राज्यांतील गलता. हा वल्लभाचार्याच्या अष्टछापांतील श्री. कृष्णदासजी पयहरीचा शिष्य. तथापि हा रामभक्तिपूर्ण भजन करीत असे. याचे चार ग्रंथ मिळाले आहेत. हितोपदेश, उणखाणा बावनी, ध्यानमंजरी ( रामध्यानमंजरी) व कुंडलिया हे ते ग्रंथ होत (हिंदीशब्दसागर प्रस्ता. पा.९९).

**आच** किंवा **आचग**–हा दुसऱ्या विक्रमादित्य चालुक्याचा मांडलिक. याचें राज्य दक्षिणेकडे होतें. हा शूर होता ( भांडार. भा. ३, पृ. १२० ).

**आचवल**–( मनभट उपाध्ये पाहा ).

**आचण्ण**–(स. ११९५ ) कानडी जैन कवि. गोत्र-भारद्वाज. पिता-केशवराज. माता-मल्लांबिके. ग्रंथ-वर्धमानपुराण; श्रीपदाशीति. गुरु-नंदीयोगीश्वर. याचें गांव-पुलिगेरे म्हणजे हल्लींचें लक्ष्मेश्वर. याचा पिता केशवराज यानें रेवण चमूपाच्या सांगण्यावरून वर्धमानपुराण लिहावयास आरंभ केला. पण तें त्याच्या हातून पुरें न झाल्यामुळें यानें तें पुरें केलें. रेवण चमूप हा प्रथम कळचुरी राजाचा मंत्री होऊन नंतर होयसळ वीर बल्लाळाचा ( स. ११७३-१२२० ) मंत्री झाला, असें शिलालेखावरून समजतें ( अरसीकेरे नं ७७; क. क. च. भा. १, पा. ३०० ).

**आचुगि** ( दुसरा )—हा सिंध घराण्यांतील एक राजा होय. यानें पश्चिम चालुक्य घराण्यांतील सार्वभौम राजा विक्रमादित्य ( साहवा ) याच्या आज्ञेवरून होयसळ बल्लाळ राजाबरोबर युद्ध केलें आणि जय मिळवून गोवें घेतलें. यानें पांड्यराजास पळवून लावलें. पश्चिम घाटांतील मलय लोकांचा मोड करून कोंकण घेतलें. यानें गोवें व उप्पिनकट्टि ( उप्पिनगड्डी-दक्षिण कानडा ) हीं शहरें जाळलीं. याचा काल स. ११२२ हा होय.

**आच्चा दीक्षित**—अप्पय्य दीक्षितांचा धाकटा बंधु. याचा नातू नीलकंठ. नीलकंठानें नीलकंठविजय नांवाचा संस्कृत भाषेंत ग्रंथ स. १६३७-३८ मध्यें लिहिला ( साहित्यशास्त्राचा इतिहास, पा. २५२ ).

**आजमखान**–( इरादतखान पाहा ).

**आझीम**–घाझीचें नामान्तर.

**आण्णा पिलीवकर**—अक्कलकोटच्या जहागिरीत पिलीव नांवाचा गांव सोलापूर जिल्ह्यांत आहे. आण्णा हा तेथचा ग्रामजोशी होय. हा पेशवाईच्या अखेरीस होता. हा संस्कृत व प्राकृत कविता चांगल्या करी. अक्कलकोटकराच्या फौजेबरोबर हा खर्ड्याच्या लढाईत गेला होता. ह्यानें त्या लढाईवर उत्तम कविता केली आहे, असें म्हणतात. ती कविता पाहून सवाई माधवरावांनीं यास मोठें बक्षिस दिलें होतें. राजेरजवाडे व सरदार ह्यांच्या प्रशंसापर कविता करून त्यावर द्रव्य मिळवून हा आपला निर्वाह चालवी. यानें परशरामभाऊ पटवर्धनावर खालीलप्रमाणें कविता केली आहे:—

ज्यानें स्वराज्यपट विस्तृत फार केला ।
शोभे म्हणून पटवर्धन नाम त्याला ॥
त्याच्या पुढें गमति येरहि शूर माते ।
साळी बहू कीरति ते पटवर्धनातें ॥ १ ॥

( भा. व. खं. ३, जु. ऐ. गो. पृ. १८ )

**आतिश**-याचें नांव ख्वाजा हैदर अली असें असून आतिश हें उपनांव आहे. हा लखनौचा राहणारा असून याच्या बापाचें नांव ख्वाजा अलीबक्ष होतें. याचा जन्म लखनौ येथें झाला. याला पद्यरचनेचा नाद असून यानें शाहीरी पेशा पत्करला. हा मसहफीचा शिष्य. हा सरळ, साधा आणि भोळा होता. याला लखनौ दरबारांतून दरमहा ८० रुपये मिळत. त्यांपैकीं १५ रुपये स्वतःकरितां ठेवून बाकीचे हा गोरगरीबांना वांटी. हा स्वतंत्र वृत्तीचा असे. नासिख आणि हा समकालीन होता. प्रसिद्ध 'गुलजार नसीम' या पुस्तकाचा कर्ता दयाशंकर हा याचा शिष्य होता. याचा दीवान ( कवितासंग्रह ) प्रसिद्ध आहे. याला गजल व महफिलो यांचा नाद होता. याची जोरदार उर्दू भाषा हा लखनौचा एक नमुना होय. मृत्यु स. १८४४ ( क. कौ. भा. ४ ).

**आत्मवास**—आनंदबोधमतीचा गुरु.

**आत्मानंद**—यानें ' अस्यवामीय ' ( ऋ. १. १६४ ) सूक्तावर भाष्य लिहिलें आहे. हा सायणाच्या पूर्वीच्या स्कंद, उद्गीथ, भास्कर या भाष्यकारांचा निर्देश करतो. पण सायणाचा निर्देश करीत नाहीं. त्या अर्थी हा सायणाच्या पूर्वीचा असावा. यानें लिहिलें आहे कीं, स्कन्दादिकांचें भाष्य अधियज्ञविषयक आहे. निरुक्त आधिदैवविषयक आहे. पण माझें भाष्य अध्यात्मविषयक आहे. याचा शाकपूणीच्या निरुक्ताशीं विशेष परिचय होता असें दिसतें.

**आत्माराम**—हा एक गुजराथी ब्राह्मण. गुजराथ भाषेतील कवि होता. रामवनवासवर्णन यानें फार उत्कृष्ट केलें आहे ( काव्य. दो. ).

२. जयकृष्णभट्टाचा मुलगा. कर्काच्या कात्यायन-श्रौतसूत्र-भाष्यावर यानें भावविबोधिनी नांवाची टीका लिहिली आहे ( सी. सी. ).

३. याशिवाय कामंदकीय वगैरे टीकाग्रंथ लिहिणारा आणखी एक आत्माराम झालेला आहे ( सी. सी. )

४. एक मराठी कवि. याचा अपरोक्षानुभूति हा ग्रंथ, कांहीं पदें व लावण्या प्रसिद्ध आहेत ( सं. सू. ).

**आत्माराम तांबोळी**—दुसरे बाजीरावाचा एक सरदार. यानें परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत यांस पकडण्याची कामगिरी केली ( ता. ५-७-१८०० ).

**आत्माराम पांडे**—तुळसीदासाचा पिता.

**आत्मारामबुवा चरेगांवकर**—एक रामदासी. यानें संतविजय व हनुमंतस्वामींची बखर यांच्या आधारें शके १७८९ ( स. १८६७ ) च्या सुमारास समर्थांचें ओवीबद्ध चरित्र लिहिलें.

**आत्माराममहाराज एकेहाळीकर**—यानें श्रीदासविश्रामधाम नांवाचा १६३०२ ओव्यांचा प्रचंड समर्थचरित्रग्रंथ शके १७०० ते १७३८ चे सुमारास निर्माण केला असें आंतील उल्लेखावरून दिसतें ( पृ. ९७० ). हे समर्थांपासून ( कल्याण, शिवराम, रामचंद्र, आत्माराम ) पांचव्या पिढींचे शिष्य होत. हा ग्रंथ ऐतिहासिक म्हणण्यापेक्षां पौराणिक स्वरूपाचा आहे. याशिवाय आत्महित, अक्षरमालिका, क्रमसार हे यांचे ग्रंथ असल्याचें सं. क. का. सूचीत दिलें आहे. या प्रचंड ग्रंथाला रामदासी 'सांप्रदायाचा विश्वकोश' अशा शब्दांनीं प्रस्तावनेंत श्री. शं. श्री. देवांनीं गौरविलें आहे.

**आत्माराम शिवराम वाकडे**—हा दौलतराव शिंद्याचा वकील होता ( ऐ. प. ३६८ ). यास यशवंतराव होळकरानें रघूजीचें मन वळविण्यासाठी नागपुरास पाठविलें ( ऐ. प. ३९६ ). याचा व बाजीरावाचा झालेला पत्रव्यवहार उपलब्ध आहे. यास तीन मुलगे असून त्यांचीं नांवें अनुक्रमें चिंतो, कृष्ण व शिवराम अशीं होतीं. आसईच्या लढाईत याचा बराच उपयोग झाला ( म. रि. उ. वि. ३, पृ. २६७-३०६ ).

**आत्मारामस्वामी शिंदखेडकर**— हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. हा पूर्वाश्रमीं चाळीसगांवीं राहत होता. यानें आपल्या वृद्धावस्थेंत श्रीनिर्मलानंद परमहंस स्वामीपासून संन्यासदीक्षा घेतली व आनंदसांप्रदाया.

प्रमाणें आपला मठ सिद्धपूर–ज्यास हल्लीं शिरपूर ( वाशीम तालुका ) असें म्हणतात, तेथें स्थापन केला.

श्रीसमर्थ रामदास, तुकाराम प्रभृति साधुवृंद ज्या वेळीं दक्षिणेंत उदयास येऊन आपले सामर्थ्यानें हिंदुधर्माचें रक्षण करीत होते त्या वेळीं म्हणजे शके १६०० चे सुमारास हा आत्माराम खानदेश व वऱ्हाड येथें उदयास येऊन वऱ्हाडांतील वाशिमाजवळील शिरपूर येथें राहत असे. यानें आपल्या अलौकिक सामर्थ्यानें आनंदसांप्रदाय प्रसिद्ध करून पुष्कळ लोकांस स्वधर्माचरणाकडे वळविलें, आणि योगबळानें व भक्तिबळानें हिंदुमुसलमानांत ऐक्य करून जातिभेदभाव मोडून श्रीशाहादत्ताचे चरणीं भक्तजनांस तल्लीन करून सोडलें. आणि औरंगजेब बादशहास आपल्या शिष्याकडून शुद्धीवर आणवून देवगड–ज्यास दौलताबाद म्हणतात–तेथें राहण्यास सांगितलें, व त्या औरंगजेबाला त्यानें अल्ला व आलम एकरूप आहे असें सिद्ध करून दाखविलें. ह्या आत्माराम परमहंसांनीं हिंदुधर्मावर महदुपकार करून ठेविला. तो हा कीं, हजारों हिंदु यवनधर्माचे दीक्षेपासून वांचविले ( सदानंद पाहा ).

यानें श्रीमाहूर येथें अत्युग्र तपश्चर्या केली. त्या वेळीं श्रीदत्तात्रेय प्रभु कृपाळू होऊन याला त्यांनीं प्रत्यक्ष दर्शन दिलें. नंतर हा निर्मलानंदस्वामींकडे गेला. निर्मलानंदांनीं यास उपदेश देऊन आत्मवत् केलें. यापुढें हा स्वच्छंदगामी बालोन्मत्त अवस्थेत शिरपुरास राहत असे. याचें नित्याचें भिक्षाटन वगैरे बालोन्मत्तावस्थेतच चालत असे. असे कित्येक दिवस चालल्यानंतर श्रीआत्मारामस्वामी सिद्धपुराहून निघून धरणगांवास आले. नंतर चोपडें येथें यानें सदाशिव धर्माधिकारी यांस पूर्ण वैराग्याच्या कसोटीस लाविलें व पुढें संन्यासदीक्षा देऊन आत्मवत् केलें. तेव्हांपासून सदाशिव धर्माधिकारी हे सदानंद परमहंस या नांवानें प्रसिद्धीस आले.

आत्माराम परमहंस यानें नाना लोकोत्तर चमत्कार लोकांना दाखवून त्यांना भक्तिमार्गास व योगमार्गास लाविलें. यानें केलेले पुष्कळ ग्रंथ आहेत. त्यांतील कांहीं ग्रंथांची माहिती येणेंप्रमाणें:—आत्मबोध, उत्तर अजपा, चतुर्दश चक्रावली, परज्ञानसागर, महार्णव चित्प्रकाश, नीलांबर शास्त्र, जंगमाकरितां श्रीरंगपट्टण येथें आत्मारामस्वामींनीं केलेले टीकेसह निलांबरी आहे. याशिवाय कानडी, तेलगू, फार्सी, खानदेशी, वऱ्हाडी, गौडी वगैरे भाषांत यांची स्फुट कविता पुष्कळ आहे. वचनसमुद्र (सं.), अनील पुराणज्ञान ( सं. ), खेचरीमुद्रा त्रिविध प्रकार, वेदवच ( सं. ), देहचतुष्टय ( सं. ), मुसलमानांचे निमाज (प्रा.), मन, स्वरूप, जीव, शिव, निर्वाणगीता–तत्वसार, योगशास्त्र–आदि व सांप्रदायग्रंथ आहेत.

स्वामींचा समाधिकाल शके १६५३ चे सुमारास असावा असें वाटतें. कारण श्रीआनंदसार हा ग्रंथ श्री. आत्मारामस्वामींचेच समक्ष शके १६५१ त यांच्याच सान्निध्यांत झाल्याचें श्रीमत्परमहंस सदानंदस्वामी लिहीत आहेत. माघ शु० १५ दोन प्रहरीं सर्व देवतांसमक्ष श्रीमत्परमहंस आत्मारामस्वामी समाधींत जाऊन बसले. त्या वेळीं श्रीशाहादत्तानें प्रत्यक्ष मलंगवेषानें येऊन स्वामीस समाधि दिली. आणि वर बांधून घेण्यास आज्ञा दिली. त्याप्रमाणें समाधि बांधून घेतली. त्या वेळीं स्वरूपज्ञान राऊळासच झालें. श्रीदत्तमहाराजांचें आगमन यास कळलें व यानेंच श्रींची प्रार्थना केली कीं, आपणहि तेथें वास करावा. ती विनंति प्रभूनें मान्य केल्यावर तेथें औदुंबर वृक्ष उत्पन्न झाला. हा सर्व विद्यापारंगत असल्याचें याच्या ग्रंथांवरून दिसून येतें. सिद्धपुरास बुद्धमतानुयायी आणि जंगमानुयायी तसेंच वेदमतानुयायी, या सर्वांस याच्या संबंधानें सारखाच आपलेपणा वाटत असे. आणि प्रत्येकाचें आपापलेपरी उत्तम प्रकारें समाधान करून ज्यावर अनुग्रह करणें योग्य दिसेल त्यास अनुग्रह करून हा कृतार्थ करीत असे ( महाराष्ट्र कविचरित्र, भा. ४ पृ. ६५-८४ ).

**आत्रेय व्यंकट**—संस्कृत भाषेंतील उत्तरचंपू ग्रंथाचा कर्ता.

**आदन**—चेरापैकीं राजा.

**आदमखान**—काश्मीरच्या मुसलमानी वंशांतील जो शाहीखान झैन-उल आबिदीन त्याचा हा एक पुत्र होय. याचाच मुलगा फथशाह हा होय.

**आदमल्ल**—वैद्यकांतील शार्ङ्गधर ग्रंथाचा टीकाकार.

**आदित्य चोल**—( स. ८८०-९०७ ) विजयालय चोलराजाचा पुत्र. याला राजकेसरीवर्मा ही पदवी होती. यानें पुष्कळ प्रान्त काबीज केले. अपराजित पल्लव व कोंगूराज यांचा यानें पराभव केला. आपली सरहद्द राष्ट्रकूटांच्या सरहद्दीशीं भिडवली. परान्तक पहिला हा याचा पुत्र होय. चेरराजा स्थाणुरवीशीं याची मैत्री होती.

हा धार्मिक राजा होता. कालहस्तीजवळील तोंडमनाड येथील शिलालेखावरून असें दिसतें कीं, ह्या राजाच्या मृत्यूनंतर याच्या दहनाचे जागीं याचें देऊळ बांधिलें व हा मरणानंतर लोकांच्याकडून पूजिला जात होता. तोंडइमान आररूर हें याचें मृत्युस्थान होय. याचें एक देऊळ नॉर्थ आरकॉट प्रांतांत मेलपांडी येथें होतें.

तोंडमनाड व तोंडइमान एकच. हा स. ८६१ मध्यें गादीवर आला असें एफी. इंडिकामध्यें उल्लेखिलेलें आहे ( व्हा. १९ पा. ८१-८७ ).

**२.** (स. ९६५-६९) हा दुसऱ्या परान्तकाचा पुत्र. याला करिकाल राजकेसरी असेंहि म्हणत. यानें पल्लव व पांड्य राजांचा पराभव केला होता. याच्या मागें याचा चुलत चुलता परकेसरीवर्मन् मधुरान्तक उत्तम हा स. ९६९ मध्यें राजा झाला व याला पदच्युत केलें.

**आदित्यदास**—वराहमिहिराचा पिता.

**आदित्यदेव**—( संगण्या पाहा ).

**आदित्य यादव**—( स. १४६१ ) त्रावणकोर येथें राज्य करणारा यदुवंशांतील एक राजा. हा मोठा गुणी असून यानें आपल्या पराक्रमानें केरळाला विभूषित केलें, अशी माहिती हिस्ट्री ऑफ केरळवरून मिळते.

**आदित्यवर्धन**—वैसवंशी रजपुतांपैकीं राज्यवर्धनाला अप्सरादेवीपासून झालेला पुत्र. याच्या पत्नीचें नांव महासेनगुप्ता. यास प्रभाकरवर्धन नांवाचा पुत्र झाला. महासेनगुप्ता ही माळव्याच्या गुप्तवंशापैकीं होती.

**आदित्यवर्मन् कदंब**—हा बनवासी येथील कादंब घराण्यांतील पहिल्या कीर्तिवर्म्याचा पुत्र होय.

**आदित्यवर्मन् चालुक्य**—हा चालुक्यांपैकीं दुसऱ्या पुलकेशीचा मुलगा. फ्लीटच्या मतें हा वडील मुलगा होय. हा कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्यामधील प्रांतावर राज्य करीत असे. याचा एक ताम्रपट कर्नुल प्रांतांत सांपडला असून त्यांत याच्या देणगीचें वर्णन आहे (इंडि. ॲंटि. १०. २४४; ११.६६). मिरज शिलालेखांतहि याचा उलेख आहे

**आदित्यवर्मन्पल्लव**—हा पल्लवांपैकीं एक. हा गादीवर आला नव्हता.

**आदित्यवर्मन् मौखरी**—( स. ५००-५२५ ) हा हरिवर्म्यानंतर गादीवर आला. याची पत्नी हर्षगुप्ता होय. याचा समकालीन गुप्तांपैकीं हर्षगुप्त होय. याला आदित्यसेन असेंहि म्हणत असावेत ( मध्ययुगीन भारत भा. १ पा. १६ ). याचा शिलालेख मध्ययुगीन भारतांत छापलेला आहे ( भा. १ पृ. २६२ ).

**आदित्यसेन गुप्त**--(स. ६५५-६९०) कुमारगुप्तानंतर जे ११ राजे झाले त्यांत हा विशेष प्रख्यात आहे. यानें पुनः एकवार स्वतंत्र राज्य स्थापून अश्वमेधयज्ञ केला. याच्या बापाचें नांव माधवगुप्त असें होतें. याच्या पत्नीचें नांव कोणदेवी.

**आदित्यसेन मौखरी**–(आदित्यवर्मन् मौखरी पाहा).

**आदिनाथ**—नवनाथांपैकीं एक. नेवासें गांवच्या जवळील मर्मरगिरीत आदिनाथाचें स्थान आहे. त्यास म्हातारदेव किंवा वृद्धेश्वर असें म्हणतात. याच्या आसपास ज्ञानराजाच्या परंपरेतील मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ व गहिनीनाथ यांच्या समाधि आहेत.

**२.** ( ऋषभदेव पाहा ).

**आदिनारायण**--एक वैदिक व गवई ब्राह्मण. शक १६०० च्या सुमाराची याची संस्कृत व प्राकृत पदें आहे ( सं. सू. ).

**आदिलखान फारुकी**—( स. १४३७) हा नासीरखान फारुकीचा मुलगा.

**२.** ( स. १४५७-१५०३ ) हा मुबारकखानाचा मुलगा होय. खानदेशांतील फारुकी राजांपैकीं हा एक राजा होय. हा या घराण्यांतील मिरान मुबारिक याच्यामागून गादीवर आला.

यानें ४६ वर्षांच्या राजवटींत आपलें राज्य भरभराटीस व मजबुतीस आणलें. यानें गोंडवन व गढामंडळ ( गढा म्हणजे हल्लींचें जबलपूर ) येथील राजांना आपलें मांडलिक बनवून भिल्ल व कोळी या वाटमाऱ्यांचा बंदोबस्त केला. यानें अशीरगडची जास्त बळकटी केली, सलैगड बांधला, बऱ्हाणपुरास बरेच राजवाडे बांधले व शाह-इ-झरकुंड ( जंगली शहा ) ही पदवी घेतली. याचें थडगें बऱ्हाणपुरास दौलतमैदानजवळील राजवाड्यानजीक आहे.

**३.** ( स. १५११-१५२० ) खानदेशांतील फारुकी राजांपैकीं दाऊदखानाचा मुलगा.

हा व याचा भाऊ आलम या दोन भावांत भांडणें लागलीं. आलमला निजामशाहाचें व याला गुजराथच्या मुहंमद बेगड्याचें पाठबळ होतें. बेगड्यानें आपली नात याला देऊन व पैशाची आणि सैन्याची मदत करून याला गादीवर बसविलें. राज्यांत स्वतःच्या विरुद्ध अनेक कट झाले असतां, व गुजराथच्या राजानेंहि त्रास दिला असतां आदिलनें आपली सत्ता बळकट करून दहा वर्षें राज्य केलें. हा हसन (मु. रियासतींत) किंवा अहसनखान ( केंब्रिज हि. मध्यें ) याचा मुलगा होय, असें उल्लेख मु. रियासत व केंब्रिज हि. मध्यें आले आहेत.

याचेंच नांव आलमखान होतें, असें केंब्रिज हि. मधील वंशावळीवरून दिसतें. गुजराथचा सुलतान दुसऱ्या मुज्फरशाहाचा हा जांवई होता. म्हणून याचा मुलगा मुहंमद बहादूरशाहानंतर गुजराथच्या गादीवर आला.

**४.** खानदेशच्या फारुकी घराण्यांतील दुसऱ्या मुबारकशहाचा मुलगा. याला मुहंमदशाहा २ रा या नांवाचा एक भाऊ होता. याचाच मुलगा बहादूरशाह हा होय ( कें. हि. ). यालाच मु. रिसायतीमध्यें राजा अली असें म्हटलें असावें.

# आदिलशाही घराणें–( विजापूरचें )

**मुराद**
( हा अनाटोलीयाचा म्हणजे सध्याच्या तुर्कस्थानांतील होय. )

**१ ( अबूल-मुजफर ) युसुफ आदिलशाह**
( हा बहामनी राज्याचा मांडलीक. यानें इम्मडी नरसिंह ( विजापूरचा ) याचा स. १४९३ मध्यें पराभव करून त्याचा देश लुटला. )

**२ इस्माईल**
( स्वतंत्र, स. १५१०–१५३४ )

**मसीती**
( अहमदशहा बाहमनी याची पत्नी )

**खदीजा**
( अलाउद्दीन इमादशाहची पत्नी )

**मर्यम**
( अहमदनगरच्या बुर्हाण-निझामशाहाची पत्नी )

**अल्लू**
( फेरिस्ता )

**३ मल्लू आदिल**
( स. १५३४–३५ )

**४ इब्राहिम आदिल १ ला**
( स. १५३५–१५५७ )

**अबदुल्ला**
( गोव्यास पळून गेला. )
( C. H. )

**५ अली आदिलशाह १ ला**
( स. १५५७–१५८०
११ एप्रिल १५८० मध्यें खून झाला. )

**इस्माईल**
( C. H. )

**अहमद**
( C. H. )

**हदीया**
( मूर्तिजा निजामशाहची पत्नी )
(फे.)

**तहमास्प**

**खदीजा**
( हुसेन निजामशाहची पत्नी )

**६ इब्राहीम आदिलशाह २ रा**
( स. १५८०–१६२६ )

**इस्माईल**

**७ मुहम्मद आदिल**
( स. १६२६–१६५६ )

**दर्वीश**
( C. H. )

**सुलेमान**
( C. H. )

**मुलगी**
( अकबराचा मुलगा दानियल याची पत्नी )

**८ अली आदिल २ रा**
( स. १६५७–१६७२ )

**९ सिकंदर**
( स. १६७२–१६८६ अल्पवयी गादीवर आला. शेवटी औरंगजेबानें हें राज्य स. १६८६ मध्यें आपल्या राज्यास जोडलें. )

**बादशाहा बीबी**

१ गादीवर आलेल्यांच्या मागें आंकडे घातले आहेत.

**आदिलखान सूर**—हा फरीदखान उर्फ शीरशाहाचा मुलगा. त्यानंतर वडील म्हणून हाच गादीवर यावयाचा, पण धाकटा भाऊ जलालखान हा लोकप्रिय असल्यानें त्यासच राज्य मिळालें ( स. १५७७-७८ ).

**आदिवराह**—भोजदेव ऊर्फ मिहिर याचें एक नांव.

**आदेलराय ( दलवई )**—विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटपति देवरायाचा हा सेनापति. जेव्हां लिंगमा नायक ( वेलोरचा ) यानें बंड केलें तेव्हां राजानें याला लिंगमाचा मोड करण्याकरितां पाठविलें. शेवटीं याला ओबरायाचें वर्चस्व सहन न होऊन यानें आपला एक पक्ष पाडला व अशा रीतीनें विजयनगरच्या राज्यांत दुही पडली.

**आधमखान**—हा हुमायूनचा दासीपुत्र असून याच्या आईचें नांव माहूम अनग असें होतें. माहूम ही अकबराच्या दायांपैकीं एक होती. अकबर राज्यावर येईपर्यंत त्याचें दायीत्व माहूमकडे होतें. आधमखानानें आपल्या नांवाप्रमाणेंच अधमपणाचीं कृत्यें केलीं. पांच हजार सैनिकांचा हा अधिकारी होता. रूपमतीचा प्रियकर जो माळव्याचा बाज बहादूर त्याचा यानें पराभव केला.

बाजबहादुराची अत्यंत रूपवती रजपूत जातीची स्त्री याच्या हातीं लागली होती. तिनें याच्याशीं लग्न करण्यापेक्षां मृत्यु बरा म्हणून आत्महत्या करून घेतली. रूपवतीनें याला भेटण्याची वेळ ठरवून त्या वेळीं तिनें उत्तम पोशाख करून विष ग्रहण केलें. आणि आपल्या अंगावरील वस्त्रानें आपलें तोंड झांकून घेऊन ठरलेल्या जागीं पडून राहिली. ठरलेल्या वेळीं हा येऊन पाहतो तों ती मरून पडल्याचें याच्या दृष्टोत्पत्तीस आलें ( लेनपूल, पा. २४५). बाजबहादूराकडील इतर स्त्रियाहि याच्याकडे होत्या. त्यांस चहाड्या करण्यास सवड सांपडूं नये म्हणून याच्या आईनें त्यांना ठार केलें ( खापीखान, एल्फिस्टन ५०१ टीप ). ही हकीगत अकबराला कळल्यावर त्याला अत्यंत राग आला व याला त्यानें नोकरीवरून दूर केलें. स. १५६२ मध्यें यानें आपला शत्रु जो अत्गहखान त्याचा खून केल्यामुळें अकबराच्या हुकुमावरून यास ठार मारण्यांत आलें. याला बकीखान नांवाचा एक भाऊ होता ( बील ).

**आधिकनान**—अव्हेयरच्या तीन भावांतील एक. हा मोठा दैववान् होता. पिरलीनें ( बाप ) यास अरण्यांत सोडल्यावर यास एका राजानें वाढविलें. पुढें मोठा झाल्यावर राजानें यास चांगला आश्रय दिल्यामुळें अनेक विषयांवर तामिळ भाषेंत यानें काव्यें लिहिलीं. असें सांगतात कीं, यानेंहि आपल्या भावाप्रमाणें लग्न मुळींच केलें नव्हतें ( क. च. ).

**आनंद**— गौतमबुद्धाचा चुलत भाऊ. हा गौतमाचा शिष्य झाला होता. हा अत्यंत स्मरणशील आणि गौतमाचा अत्यंत आवडता शिष्य होता. हा खरा भक्त होता. भगवंताच्या परिनिर्वाणापर्यंत याला अर्हत्पद मिळालें नाहीं. हा केवळ 'स्रोतआपन्न' होता. तरी भगवंतावर याचें निःसीम प्रेम होतें. कोणच्या वेळीं भगवंताला काय पाहिजे असतें, कोणाची भेट कशी करून द्यावी यांत हा फार कुशल होता. एक तेवढें महापरिनिब्बानसुत्त वाचलें म्हणजे गौतमाच्या सेवेकऱ्यांत याला मोठेपणा कां मिळाला हें सहज समजतें. सर्वांत जास्त पांच सुत्ते याच्या नांवावर आहेत. गौतमाच्या त्रिपिटकांचा संग्रहकार हाच झाला ( बौद्धसंघाचा परिचय, पा. १९४ ). याचें निर्वाण पाटलिपुत्रापासून एक योजनावर व वैशालीच्या सीमेवर गंगेच्या मध्यावर झालें. यानें आपलें शरीर योगाग्नीनें जाळून घेतलें. याची राख अजातशत्रु व लिच्छवी यांनीं अर्धी अर्धी वांटून घेतली व त्यावर आपल्या देशांत स्तूप बांधले. हा पुढें बुद्ध होणार आहे. यानेंच स्त्रियांनाहि प्रव्रज्या ( संन्यास ) देण्याविषयीं बुद्धदेवाला प्रार्थना केली होती.

**२.** एक नैय्यायिक. मंखाच्या काव्याची परीक्षा करण्याकरितां एकत्र झालेल्या तीस पंडितांपैकीं एक.

**३.** याला आनंद राजानक असेंहि म्हणत. हा कवि काश्मीरांत राहणारा असून शैव होता. यानें मम्मटाच्या काव्यप्रकाशावर काव्यप्रकाशनिदर्शन नामक टीका लिहिली (स. १६६५). याशिवाय नैषधीयटीका हा याचा ग्रंथ आहे (सी. सी. ). परमानंद चक्रवर्ति भट्टाचार्याच्या 'विस्तारिका' टीकेचा निर्देश यानें केला आहे ( वि. वि. पु. २२ अंक १-२ ). याला अनिंदकहि म्हटलेलें आहे.

**४.** धर्मसंप्रदायदीपक ग्रंथाचा कर्ता.

**५.** हा एक कवि होता. यानें ' माधवानलकथानकम् ' नांवाची एक संस्कृतमध्यें कथा रचिली. हें संस्कृत कथानक कान्हूरास सांपडलें (मं. श. १८३७, वा. इ. ले. १३०).

**६.** मराठी कवि. सूर्यविजय काव्याचा कर्ता.

**आनंदगिरि**—श्रीमत् शंकराचार्यांचा हा शिष्य होय. यास आनंदबोध असें नामान्तर होतें. यानें ' शंकरविजय ' नांवाचा ग्रंथ केला. त्यांच्या देखत घडून आलेल्या सर्वांचें निवेदन यानें केलें आहे. हा बृहस्पतीच्या अंशानें जन्मला होता, असें माधव पंडितानें आपल्या शंकरविजयांत लिहिलें आहे. यानें शंकराचार्यांच्या प्रत्येक भाष्यावर महत्त्वाची टीका लिहिलेली आहे. शतश्लोकीवरील टीकेंत वेदावरील रावणभाष्य व सायणभाष्य यांतील उतारे आले आहेत. सायण-

भाष्यांतील उतारे सायणभाष्याशीं ताडून पाहतां ते अक्षरशः जुळतात. सायणभाष्यांतील उतारे ज्या अर्थी याच्या भाष्यांत आहेत त्या अर्थी हा सायणानंतरचा असला पाहिजे, किंवा त्या भाष्यांत तो उतारा तरी मागाहून घातला गेला असला पाहिजे. आनंदगिरीचा शंकराचार्यांचें चरित्र लिहिलेला शंकरविजय पाहतां हा शंकराचार्यांचा साक्षात् शिष्य नसून त्यांच्यानंतर बऱ्याच कालानें झालेला असावा.

**२.** तत्त्वावलोक ग्रंथ करणाऱ्या जनार्दनाचें नामान्तर.

**आनंदतनय**—हा कवि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. हा कर्नाटकांतील अरणीचा राहणारा. याचें नांव गोपाळपंत असून पित्याचें नांव आनंदराव असें होतें. तथापि आनंदतनय, आनंदनंदन व अरणीचा शिपाई यांपेक्षां अधिक उल्लेख यानें आपल्या स्वतःबद्दल केला नाहीं. याच्या गुरूचें नांव मुरार परब्रह्म.

विजापूर दरबारचे मुत्सद्दी वेदोभास्कर यांना अरणी प्रांत जहागीर मिळाला, तेव्हां त्यांच्याबरोबर यांचे वडील तिकडे गेले. वेदोभास्करानें शहाजीला पकडण्याचें काम केलें म्हणून ही जहागीर मिळाली. यानें शेवटीं संन्यास घेतला आणि पुत्राला उपदेश दिला. हे रामोपासक होते. यांचें रामपंचायतन अद्यापि तंजावरच्या वंशजांकडे आहे. आनंदतनय व रघुनाथ पंडित हे व्याही होते अशी आख्यायिका आहे. यांचें भाषेवर चांगलेंच प्रभुत्व असून रचना यमकप्रधान आहे. यांचीं आख्यानें-१ विश्वामित्राभिगमन, २ ताटकावध, ३ विश्वामित्रयज्ञरक्षण, ४ सीतास्वयंवर, ५ शबर्याख्यान, ६ सेतुबंध, ७ बालचरित्र, ८ पूतनावध, ९ कंदुकाख्यान, १० कृष्णचरित्र, ११ गोरसकीडा, १२ महाबळचरित्र, १३ नवरसचरित्र, १४ सुदामचरित्र, १५ गणिकोद्धार, १६ उमारमासंवाद, १७ मार्कंडेयाख्यान, १८ शिबिआख्यान, १९ मृगीचरित्र, २० स्फुट सवाया, २१ विषयपंचक व १५६ संस्कृत व हिंदी पदें ( महाराष्ट्र कविचरित्र भा. १, पा. ११४-१३५).

**आनंदतीर्थ**—( मध्वाचार्य पाहा ).

**आनंदनाथ**—हे मूळ कुरोळीचे. यानें कन्हाडास जगदंबेची आराधना केली व तेथेंच मठस्थापना केली. समाधिशक १७२५ माघ व।। १२. शिष्य प्रल्हादबाबा. ग्रंथ-भक्तमंजरी ( सं. सू. ).

**आनंदपाल**—( स. १००१-१००९ ) पंजाबांतील शाही घराण्यांतील जयपाळाचा मुलगा. गझनीच्या महमूदानें याच्यावर स्वारी केली, त्या वेळीं दूरदूरचे हिंदु राजे सेना घेऊन याच्या मदतीला आले. इतकेंच नव्हे, तर देशोदेशींचे लोक व स्त्रिया यांनीं या हिंदु राज्याच्या संरक्षणार्थ आपले वस्त्रालंकार विकून याच्याकडे मदतीकरितां संपत्ति पाठविली (ब्रिग, फिरिश्ता भा. १ पृ. ४६; अनंगपाळ पाहा). महामूदाशीं झालेल्या लढाईंत शेवटपर्यंत यास जय होता. परंतु दुर्दैवानें याचा हत्ती वुजून मागें फिरला. हें दृश्य पाहतांच सर्व सैन्यास असें वाटलें कीं, 'आपला राजा लढाईंतून पाय काढून पळत सुटला.' तेव्हां तेहि सैरावैरा पळूं लागले. पण महमूदानें त्यांची कत्तल केली. अशा प्रकारें त्या लढाईंत याचा पराभव झाला (लेनपूल पृ.२०).

**आनंदबोधयति**—हा "न्यायमकरंद" ग्रंथाचा कर्ता होय. यानें न्यायदीपावली, प्रमाणमाला, आणि न्यायमकरंद असे तीन ग्रंथ लिहिले असून हा अकराव्या किंवा बाराव्या शतकांत होऊन गेला, असा उल्लेख डॉ. दासगुप्त यांनीं आपल्या हिस्टरी ऑफ इंडियन फिलॉसफी भाग २ रा. पृ. ११६ यामध्यें केला आहे. यानें न्यायदीपावली, व त्यावरील प्रमाणरत्नमाला नांवाची टीका, न्यायमकरंद आणि न्यायापदेशमकरंद, असे ग्रंथ केले ( C. C. ). हा आत्मवासाचा शिष्य असून यानें प्रकाशात्मनाच्या शब्दनिर्णयदीपिका या ग्रंथावर 'न्यायदीपिका' नांवाची टीका स. ११५० सुमारास लिहिली ( Journal of the Andhra Historical Research Society, Vol. V, part 3, p. 188, foot-note ). परंतु डॉ. दासगुप्तांनीं प्रकाशात्मनाचा काल स. १२०० असा ठरविला आहे ( History of Indian Philosophy, Vol. II, p. 103). आणि प्रकाशात्मनाच्या ग्रंथावर यानें टीका केली, तेव्हां हा स. १२०० नंतर झाला असें निश्चित ठरतें. चंदुपंडितानें आपल्या श्रीहर्षाच्या 'नैषधचरितम्' या ग्रंथावरील टीकेंत आनंदबोधाच्या न्यायमकरन्द ग्रंथांतील कांहीं उतारे घेतले आहेत. चंदुपंडितानें आपली टीका स. १२९७ मध्यें लिहिली (Handiqui : Naisadha-Carita-English Translation 1934, Punjab Ori. Series Intro. p. II ) यापूर्वी हा केव्हांहि झाला असला पाहिजे. यावरून आनंदबोध हा स. १२५०च्या सुमारास झाला असें ठरतें ( The Calcutta Oriental Journal, Vol. II, 1934, p. 137-139).

**आनंदभट्ट जातवेदभट्ट चतुर्वेदी**-याचा गुरु वासुदेवपुरी संन्यासी होय. याच्या शेवटच्या लिहिण्यावरून यानें समग्र काण्वसंहितेवर भाष्य लिहिलेलें दिसतें.

**आनंदमल्ल**—हा नेपाळच्या दुसऱ्या ठाकुरी घराण्यांतील राजा. हा जयदेवमल्लाचा भाऊ.

यानें भक्तपूर किंवा भाटगांव, वेणीपूर, पणौती, नाला, धोमखेल, खडपू, आणि चौकटशंगा अशीं गांवें वसविलीं.

हा भाटगांव येथें राज्य करीत असे. याच्या व याच्या भावाच्या राज्यांत दक्षिणेंतून कर्नाटक घराण्यांतील नान्यदेव या मूळ पुरुषानें प्रवेश केला (जयदेवमल्ल पाहा). यानें एकंदर २५ वर्षे राज्य केलें.

**आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर**—( मृत्यु स. १६९६ ) याचें मूळचें नांव अनंत. याचा जन्म आगळगांवीं झाला. याच्या आईबापांचीं नांवें, सावित्री व ब्रह्मदेव असून आडनांव जोशी होतें. हा वशिष्ठ गोत्री असून ऋग्वेदी होता. याच्या आनंदित वृत्तीवरून याचें आनंदमूर्ति असें नांव पडलें. हा नाशिकच्या रघुनाथस्वामींचा शिष्य. त्यांनीं याला स्वतःच्या ब्रह्मनाळ येथें ठेवला, व लोकहि यास मान देऊं लागले. परशुराम त्रिंबक प्रतिनिधींची याच्यावर श्रद्धा होती. हा पुरुष अत्यंत समाधानी होता, व समर्थ रामदासस्वामी यांच्या पंचायतनांत याची गणना होती. याची समाधि शके १६१८ मध्यें कार्तिक शुद्ध १४ चे दिवशीं ब्रह्मनाळींच झाली. याचे ग्रंथ प्रसिद्ध नाहींत, पण पदें आहेत. याची वाणी रसाळ असून हे फार प्रेमळ कीर्तन करीत असत, असें महाराष्ट्रसारस्वतकार लिहितात. याचा पुत्र कृष्णमूर्ति, याचीं पदें प्रसिद्ध आहेत.

**आनंदरंग तिरुवेंगड पिल्ले**-(स. १७०९–१७६१) एक दुभाष्या. याचा जन्म ता. ३० मार्च इ. स. १७०९ रोजीं मद्रासजवळ असलेल्या पेरांबूर नांवाच्या एका लहानशा गांवीं झाला. पूर्वी याचे वडील व्यापार करीत होते, पण लवकरच त्यांना फ्रेंच गव्हर्नराजवळ एतद्देशीय वकील किंवा कोर्टिअरची जागा मिळाली. फ्रेंच गव्हर्नर एम्. लिनो यानें याची जागा कायम केली. तें काम यानें इतकें चांगल्या रीतीनें बजावलें कीं, फ्रेंच गव्हर्नरास याच्या कर्तबगारीबद्दल विशेष आनंद होऊन, त्यानें यास पोर्टोनोव्हो येथील फ्रेंचांच्या वखारीवर मुख्य अंमलदार नेमिलें. तेथें यानें चांगली खटपट करून, फ्रेंच कंपनीकरितां व खाजगी व्यापाराकरितां, निळ्या रंगाचें पुष्कळ कापड तयार करण्याचे कारखाने सुरू केले, आणि स्वतःच्या खर्चानें फ्रेंच कंपनीचा व्यापार वाढविण्यासाठीं लालपेठ व अर्काट एथें नवीन पेठा वसाविल्या. त्यामुळें तेथें व्यापाराची विशेष भरभराट होऊन याचें फ्रेंच दरबारीं अतिशय महत्त्व वाढलें. एम्. लिनो याच्या मागून स. १७३५ मध्यें एम्. डूमास या नांवाचा फ्रेंच गव्हर्नर झाला. त्याचेंहि याच्याबद्दल चांगलें मत होऊन त्यानें याची राजकारणांत सल्लामसलत घेण्यास सुरवात केली. याच्या कर्तृत्वशक्तीमुळें फ्रेंचांचा व्यापार एकसारखा वाढत चालला होता.

एम्. डूमासनंतर एम्. डुप्ले याची नेमणूक झाली त्याची व याची पूर्वीपासून चांगलीच ओळख होती. त्यामुळें आतां याचा उत्कर्ष होण्याचा चांगलाच योग आला, व याच्या अंगीं वसत असलेल्या प्रामाणिकपणा व दूरदृष्टि ह्या सद्गुणांमुळें याचें डुप्लेजवळ विशेष वजन वाढलें. त्यानें यास आपल्या दरबारीं मुख्य सल्लामसलतगार नेमून यास लवकरच चीफ दुभाष्याची जागा दिली. पूर्वी ही जागा एका ख्रिश्चनास मिळाली होती, त्यानंतर ती याला देण्यांत आली व तेथें हा कायम झाला. ही जागा इतकी महत्त्वाची होती कीं, यास दक्षिणच्या सुभेदारापासून तों सर्व संस्थानिकांकडून मोठमोठे मानमरातब मिळाले, आणि याची फार वाहवा झाली. हा स. १७५४ पर्यंत–डुप्लेच्या कारकीर्दीची भरभराट संपेपर्यंत—त्या जागेवर होता. त्यानंतर मात्र याची सत्ता व वजन फ्रेंच अधिकाऱ्यांजवळ कमी कमी होऊं लागलें. आणि स. १७५६ मध्यें शरीरप्रकृतीच्या नादुरुस्तीमुळें, फ्रेंच गव्हर्नरानें ( एम्. डी. लेरीट ) यास नोकरीवरून दूर केलें. त्यानंतर फ्रेंच सत्तेचा विलय होत चालला, आणि ता. १६ जानेवारी स. १७६१ रोजीं कर्नल कूटनें पांदेचरी हस्तगत केली. ह्याच सुमारास हा मृत्यु पावला (१२ जाने. १७६१).

याची ही सर्व माहिती यानें लिहिलेल्या रोजनिशीवरून मिळते. कारण याच्या मनावर जे पाश्चात्य सहवासाचे संस्कार घडले होते त्याच्या योगानें यास आपली रोजनिशी लिहून ठेवण्याची प्रेरणा उत्पन्न झाली असावी. यानें ६ सप्टें. स. १७३६ ते १७६१ पर्यंत कर्नाटकांतील सर्व राजकारणांचे व सर्व लहानथोर घडामोडीचे वृत्तांत आपल्या रोजनिशींत लिहून ठेविले आहेत. इतिहासाच्या दृष्टीनें या रोजनिशा फारच महत्त्वाच्या आहेत.

हा मेल्यानंतर सुमारें एका शतकानंतर याच्या रोजनिशांचा पत्ता लागला. एम्. ग्यालो मॉटब्रुन्, एम्. अरीयल, एम्. व्हीनसन्, एम्. लाड वगैरे निरनिराळ्या फ्रेंच विद्वानांनीं याच्या रोजनिशांच्या निरनिराळ्या नकला व भाषान्तरें करण्याचे बरेच प्रयत्न केले व मूळ प्रत पॅरीस येथील नॅशनल लॉयब्ररींत नेऊन ठेविली. ह्या रोजनिशींमुळें याची ख्याति सर्व यूरोपांत पसरली आहे ( इ. सं. ऐ. च. ४९–५३ ). याची रोजनिशी मूळ तामीळ भाषेंत लिहिली असून तिचें इंग्रजी भाषांतर मद्रास सरकारनें आतां सात भागांत प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत याचें चित्र व चरित्र दिलें आहे. इंग्लंडची सतराव्या शतकांतील सामाजिक व धार्मिक गोष्टींची माहिती पेपी नांवाच्या गृहस्थाच्या डायरीवरून ज्याप्रमाणें कढून येते त्याप्रमाणें

अठराव्या शतकांतील हिंदुस्थानांतील घडामोडी समजण्यास याची डायरी अत्यंत उपयुक्त आहे. यानें लिहिलेल्या रोजनिशीची पुष्कळ मोठमोठ्या लोकांकडून तारीफ झाली.

**आनंदराय मखिन्**—हा भारद्वाजकुळांतील नृसिंह किंवा नरसिंह याचा पुत्र असून तंजावरचे राजे शहाजी (स. १६८१-१७११) व शरभोजी (स.१७११-१७२७) यांच्या कारकीर्दीत होऊन गेला. यानें सप्तांकी 'विद्यापरिणय' हें संस्कृत नाटक खरोखरच वेदकवीनें लिहिलें असून तें त्यानें याच्या नांवानें प्रसिद्ध केलें. तंजावरचा राजा शहाजी याच्या एका स.१६९३ सालच्या दानपत्रिकेंत वेदकवीचा उल्लेख असल्यामुळें त्याचा काल निश्चित करतां येतो.

विद्यापरिणय नाटकांत प्राकृत भाग मुळींच नाहीं व विदूषकाचेंहि पात्र नाहीं. हें नाटक शरभोजीच्या कारकीर्दीत लिहिलें असून तें त्यांत उल्लेख केलेल्या प्रबोधचंद्रोदय नाटकाच्या स्वरूपाचें आहे. या नाटकांत शिवभक्ति ही निवृत्तीच्या मदतीनें जीवराजा व विद्या यांचा विवाह घडवून आणण्याकरितां जीवराजा व त्याची पत्नी अविद्या यांच्यामध्यें बिघाड उत्पन्न करते; आणि राजाचा नर्मसचिव चित्तशर्मन् याचीहि तिला मदत असते. जीवानें विद्येचें रूप पाहिल्यापासून त्याच्या ठिकाणीं तिच्याविषयीं आवड उत्पन्न होते. अविद्या ही आपल्या बाजूनें आपले हस्तक, आपलीं पाखंडी मतें, आपले मनोविकार, यांच्या साह्यानें जीवास आपल्या कह्यांत ठेवण्याचा प्रयत्न करते. पण तिचीं सर्व साधनें निरुपयोगी ठरून जीव व विद्या यांच्या विवाहाचा काळ प्राप्त झाला आहे, असें जाहीर होतें.

आनंदरायानें 'जीवनंदन' नांवाचें दुसरें एक सप्तांकी अन्योक्तिरूप नाटक लिहिलें आहे. ज्या अर्थी हें नाटक शहाजी राजाकरितां लिहिलें आहे त्या अर्थी तें आधींचें असावें. त्यांत जीवराज व राजयक्ष्मा यांच्या युद्धाचें वर्णन आहे. त्या राजयक्ष्म्यास निरनिराळ्या व्याधी मदत करतात, परंतु जीवराज व राणी बुद्धि हे आपल्या प्रधानांच्या सल्ल्यावरून शिवाकडे जातात व त्यांच्यापासून रसगंधक व इतर पुष्कळ गुणकारी वनस्पती मिळवितात व त्यायोगानें शत्रूंचा पाडाव करतात. हें युद्ध बरेंच निकराचें होतें व अखेर शिवाच्या मदतीनें राजास योगसिद्धि प्राप्त झाल्यामुळें विजय प्राप्त होतो.

विद्यापरिणय नाटकांत आनंदरायानें व्यंकटनाथ वेदान्ताचार्य कवितार्किकसिंह यानें केलेल्या 'संकल्पसूर्योदय' नाटकाचा उल्लेख केलेला आहे. यावरून हें नाटक आनंदराय याच्यापूर्वी लिहिलें असावें असें दिसतें. हें दशांकी अन्योक्तिरूप नाटक असून त्यांत रामानुजाचीं तत्त्वें प्रतिपादन केलीं आहेत. या नाटकाच्या अनेक हस्तलिखित प्रतींवरून तें बरेंच लोकप्रिय होतें असें दिसून येतें.

**आनंदराव**—स. १८००-१८०८ पर्यंत पुणें दरबारीं असलेला निजामाचा वकील.

२. (हंबीरराव मोहिते पाहा).

**आनंदराव काशी**—(स. १७७६-१८१८) पेशव्यांच्या वेळचा पुणें येथील एक कोतवाल. ता. १६-७-१७७६ रोजीं याची कोतवालीवर नेमणूक झाली. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, भारद्वाज गोत्र, आडनांव 'वाचासुंदर' पालीचा जोशी. आबाजी कृष्ण शेलूरकराचा व याचा आप्तसंबंध होता.

खर्ड्याच्या लढाईच्या वेळीं आनंदराव कोतवालीवर असून हा व राघोपंत गोडबोले यांच्याकडे मशारूल्मुल्क याजवर देखरेख ठेवण्याचें काम होतें. मराठ्यांच्या अखेरीपर्यंत हा कामावर होता, असें मंडळाच्या वा. इ. वृ. शके१८३७ ले. १०८ यांत नमूद आहे. म्हणजे दुसऱ्या बाजीरावाचे वेळेस धनी व चाकर एकमेकांस शोभतील असेच होते.

याची वर्तणूक चांगली नसून याच्याबद्दल अनेक तक्रारी पेशव्यांकडे व नानाफडणिसांकडे गेल्या होत्या. त्यावरून पुण्यास खुद्द पेशव्यांच्या राजधानीमध्यें कोतवालाचा जुलूम चालू होता असें आढळून येतें.

"गरती बायका बदकर्मीबाबद धरून व ब्राह्मणी व परदेशिणी वगैरे आणतात. त्यासी खुद्द मशारनिले आपलें घरीं नेऊन त्यांजवळ बदकर्में करितात. याप्रमाणें ज्या बायका सुटून येतात, त्या लोकांचे घरीं फिरतात कीं, आमची धन्याजवळ दाद लावावी. परंतु कोणी स्वामी कानावर घालीत नाहीं. हल्लीं ब्राह्मण बायका सुटून आल्या आहेत. त्यांचे मनास आणावयाविषयीं परवानगी कीं, मशारबिलेचें बदकर्माची चौकशी करणें" (ऐ.स्कु.ले.भा.३,पृ. ४९-५०).

शहरची कोतवाली म्हणजे वाटेल तसा जुलूम करण्याची व चरण्याची जागा. विशेषतः आनंदराव काशी व घाशीराम या दोघांवरही नानांची मर्जी असल्यामुळें त्यांनीं आपल्या अमदानींत वाटेल तसा हात मारून घेतल्याचे उल्लेख ठिकठिकाणीं आहेत. याच्यानंतर घाशीराम ता. ८-२-१७७७ मध्यें कोतवालीवर नेमला. पण घाशीरामाचा पुढें लवकरच खून होऊन, कोतवालीचे कामावर याची स. १७९१ मध्यें पुनः नेमणूक झाली. १७९१ पासून कोतवालीचें कामावर हा अखेरपर्यंत होता (म. रि. उत्तर वि. २ रा, पृ. ५००-५०५).

**आनंदराव गायकवाड**—(स. १८००-१८१९) हा गोविंदराव गायकवाडानंतर बडोद्याच्या गादीवर आला.

पत्नीचें नांव तख्ताबाई असें होतें. गोविंदरावाच्या औरस मुलांमध्यें हा सर्वांत वडील होय. हा स्वतः मंदबुद्धीचा असल्यामुळें संस्थानांत निरनिराळे पक्ष उद्भवून ते आपल्या तंत्रानें कारभार चालविण्यासाठीं धडपड करीत होते. कान्होजी नांवाचा गोविंदरावाचा एक दासीपुत्र होता. त्यानें आपल्या हातीं कारभाराचीं सूत्रें येण्याकरितां बरीच खटपट केली. पण त्याच्या जुलमी कृत्यामुळें त्याला दिवाणाच्या जागेवरून कमी व्हावें लागलें. कान्होजीच्या अत्याचाराबद्दल यानें कान्होजीस अटकेंत ठेवण्याचा हुकूम दिला. कान्होजीनंतर पूर्वीचा दिवाण रावजीअप्पा यास पुनः दिवाणगिरीचा अधिकार प्राप्त झाला.

अशा प्रकारें कान्होजीस कैद केल्यावर कान्होजीची आई गजराबाई ही सुरतेस होती, तिनेंहि कडीचा जहागीरदार खंडेरावाचा मुलगा मल्हारराव यास रावजीअप्पाविरुद्ध उचल करण्यास चिथवलें. मल्हाररावाच्या वतीनें लढणारे लोक आनंदरावाचीं ठाणीं काबीज करूं लागले. तेव्हां रावजीनें इंग्रजांशीं बोलणें लावून मल्हाररावाविरुद्ध आपणांस मदत केल्यास इंग्रजांच्या पांच पलटणी चाकरीस ठेवण्यास आपली तयारी आहे, असें मुंबई सरकारास कळविलें. ही विनंति ऐकून मुंबई सरकारास मोह अनिवार झाला; व गव्हर्नर जनरलकडून परवानगी आली नव्हती तरी त्यांनीं मेजर वॉकर याजबरोबर १६०० लोकांची तुकडी देऊन गायकवाडांच्या मदतीस पाठविलें. इंग्रजांनीं कडी शहर काबीज करून बडोदें सरकारच्या हवालीं केलें, तेव्हां मल्हारराव शरण आला. त्यामुळें गायकवाड घराण्याच्या दोन्ही शाखा पुनः एकत्र होऊन त्यांचा मुलूख एका सत्तेखालीं आला. मोहीम संपतांच इंग्रजांनींहि आपलें बक्षीस सव्याज पदरांत पाडून घेतलें. नंतर रावजीअप्पानें इंग्रजांच्या कुमकी सैन्याची एक तुकडी पाठवून सणखेडा काबीज करून घेतला (स. १८०२). बडोद्याच्या लष्करांत अरब लोकांचाच भरणा जास्त होता. त्यामुळें रावजीअप्पा व त्याचे सल्लागार इंग्रज यांनीं बडोद्याचें लष्कर कमी करण्याचें काम हातीं घेतलें. तेव्हां अरब शिपायांस ही गोष्ट मुळींच आवडली नाहीं. त्यांनीं खुद्द गायकवाड सरकारास कैद करून आपल्या बाकीची फेड केल्याशिवाय त्याला मुक्त करणार नाहीं असें जाहीर केलें. त्या वेळीं मुंबईहून युरोपियन पलटण मागविण्यांत येऊन अरब लोकांचा पाडाव केला आणि त्यांची योग्य व्यवस्था लाविली. जेव्हां अरब लोकांनीं आनंदरावास कैद केलें तेव्हां त्यांनीं कान्होजीस कैदमुक्त केलें होतें. त्यामुळें कान्होजी स्वतंत्र होऊन गायकवाडांचे राज्यांत बंडाळी करूं लागला. तेव्हां मेजर होम्स यानें कान्होजीचा पाठलाग करून त्याचा पराभव केला, व त्यास उज्जनीस पळून जाणें भाग पाडलें. अशा रीतीनें इंग्रजांनीं लवकरच बडोदें सरकारवर आपला पगडा बसविला व अतःपर त्या राज्यांतील महत्त्वाच्या सर्व गोष्टी-ब्रिटिश रेसिडेंट ले. क. वॉकर याच्या तंत्रानें होऊं लागल्या.

पुढें स. १८०३ मध्यें रावजीअप्पाजी मरण पावल्यामुळें त्याचा पुतण्या सिताराम यास मुख्य कारभाराची जागा देण्यांत आली. पण सिताराम हा त्या कामांत नालायक असल्याचें दिसून आल्यामुळें गायकवाडाचा भाऊ व त्याच्या जहागिरीचा वारस जो फत्तेसिंह, त्यास स. १८०६ पासून राजप्रतिनिधि म्हणून नेमण्यांत आलें. फत्तेसिंहानें गंगाधरशास्त्री नामक एका इसमाची आपल्या चिटणीसाच्या जागेवर नेमणूक केली. पुढें लवकरच सर्व मुख्य कारभाऱ्याचे अधिकार गंगाधरशास्त्र्याच्या हातीं आले. यानंतर इंग्रजांनीं पुनः तह करून त्या तहान्वयें, दोन हजाराच्या ऐवजीं तीन हजार पायदळ व तोफखान्याची एक कंपनी ठेवण्याचे गायकवाडांनीं कबूल केलें व सैन्याच्या खर्चाकरितां १०,७०,००० रुपये उत्पन्नाचे ७ जिल्हे तोडून देऊन काठेवाडावर एक लक्षाच्या हुंड्या दिल्या. शिवाय आपल्या पदरीं कोणीहि युरोपीय माणूस चाकरीस न ठेवण्याचा व ब्रिटिशांच्या अनुमतीशिवाय कोणत्याहि परक्या संस्थानिकाशीं कलागत उपस्थित न करण्याचा करार केला. या उलाढालींत पेशव्यांच्या देण्याघेण्यासंबंधीं कांहींच हिशेब केला नव्हता, तेव्हां पेशव्यांचा हिशेब मिटविण्याकरितां गायकवाडांनीं बापू मैराळ नांवाचा आपला एक वकील पुण्यास पाठविला, पण त्याचा कांहींएक उपयोग न झाल्यामुळें त्या कामाकरितां गंगाधरशास्त्र्याची पुण्यास रवानगी करण्यांत आली. गंगाधरशास्त्र्यांनीं पेशव्यांची वर्तणूक पाहिल्यावर, वादाच्या प्रश्नाचा निकाल लावण्याचें काम इंग्रजांकडे सोंपविलें. ही बातमी बाजीराव पेशवे (दुसरा) व त्रिंबकजी डेंगळे यांना समजतांच त्यांच्या वृत्तींत फरक पडला; व त्रिंबकजीनें पंढरपूर मुक्कामीं संधि साधून गंगाधरशास्त्र्याचा खून करविला (स. १८१५). त्याबद्दल इंग्रजांनीं त्रिंबकजीस कैद केलें.

पुढें स. १८१८ मध्यें फत्तेसिंग वारला. तेव्हां आनंदरावानंतर बडोद्याच्या गादीचा वारस त्याचा धाकटा १९ वर्षांचा भाऊ सयाजी असून शिवाय तो स्वभावानें शांत पण चलाखहि होता, म्हणून त्यास इंग्रजांनीं राजप्रतिनिधि नेमिलें. नंतर स. १८१९ मध्यें आनंदराव मरण पावला. मरणसमयीं याचें वय पंचावन्न वर्षांचें होतें.

**आनंदराव धुळप**—( स. १७६४-१७९५ ) यांच्या घराण्याचें मूळचें नांव मोरे असून शिवाजीनें जावळी येथें ज्या मोरे घराण्याची धूळधाण केली तें हेंच होय. जावळीहून हकालपट्टी झाल्यावर याचे पूर्वज स्वसंरक्षणार्थ विजापूरदरबारीं येऊन राहिले, व तेथें त्यांनीं समशेर गाजविल्यामुळें त्यांस धुळप हा बहुमानाचा किताब मिळाला.

पुढें शिवाजीच्या भीतीनें याचे वंशज धवडे बंदरीं जाऊन राहिले. स. १७६४ मध्यें आनंदराव ह्या दर्यायुद्धांत नाणावलेल्या गृहस्थाकडे मराठ्यांच्या आरमाराचें आधिपत्य आलें. पेशव्यांच्या डायरींत आनंदराव याच्या नांवाचा आरमाराकडील सरदार म्हणून पहिला हुकूम आढळतो. पेशवाई नष्ट झाल्यावर याच्या वंशजांस इंग्रजांनीं पोलिटिकल पेन्शनें करून दिलीं ( मं. अहवाल शके १८३३ पृ. ११५ ).

याची कर्तबगारी स. १७६७-६८ त दिसून आली. नारायणरावाच्या वधानंतर पेशवाईत झालेल्या खळबळीमुळें इंग्रजांनीं आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली. तेव्हां पेशव्यांनीं आनंदराव धुळप व रघुजी आंग्रे यांनीं एकत्र मुंबई शहरांत जाऊन शहर लुटून फस्त करावें व नंतर साष्टीस इंग्रज बसला आहे त्याचें पारिपत्य करावें, असा हुकूम दिला ( ता. २१-१२-१७७४ ). पण आनंदरावाला आपली पुरी कर्तबगारी दाखविण्यास स. १८८१ नंतर संधि मिळाली. स. १७८३ सालीं यानें इंग्रजांविरुद्ध एक मोठा जय मिळविला. त्या वेळीं इंग्रजांची एक लढवई दुधोशी बोट, एक बतेला व तीन शिबाड अशीं पांच गलबतें, सरंजाम, दारूगोळा वगैरे भरून जात असतां यानें सर्व गलबतांचा पाडाव केला. या बहादरीबद्दल पेशव्यांनीं ता. २५ मे स. १७८३ (शके १७०५ चैत्र व. ९) रोजीं आनंदरावास 'बहुमान खासगीचा पोषाख व कंठी' देऊन शाबासकीचें पत्र पाठविलें तें उपलब्ध आहे ( मं. अहवाल शके १८३३ पृ. १२० ).

हा स. १७९५ मध्यें मरण पावला. याचा एक सुंदर पोवाडा ऐतिहासिक पोवाड्यांत छापलेला असून त्यांत इंग्रजांविरुद्ध याच्या झालेल्या युद्धाचें वर्णन आहे. याचा वंश विजयदुर्गास आहे ( म. रि. उत्तर वि. १ ला पृ. ३९५ ).

**आनंदराव धुंडिराज कोठेकर**—देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गंगथडीचा प्रांत भोसल्यांचे ताब्यांत आल्यावर दुसऱ्या रघूजीनें हरिपंत फडके यांच्या मार्फतीनें आनंदराव धुंडिराज कोठेकर याजपासून एक लक्ष रुपये घेऊन त्यास दिला व यानें या सुभ्याचें काम १०।१२ वर्षें केलें.

कोठेकर हा त्याच प्रांतांतील म्हणजे हल्लींच्या मोंगलाईतील कोठे या गांवचा राहणारा असून पुढें हा नागपुरास आला. गंगथडीचा सुभा भोसल्यांकडून दुसऱ्या मराठा युद्धानंतर झालेल्या तहानें गेला ( स. १८०३ ).

कोठेकर याचे भाऊबंद वऱ्हाडचे दक्षिणेस मोगलाईंत कोठे येथें असून आनंदरावाचे वंशज नागपूर बालाघाट येथें आहेत ( बखर पा. १६४ टीप; ना. प्रां. इ. पृ. २१५).

**आनंदराव नरसी वेरुळकर**—हैदरच्या दरबारीं पेशव्यांचे वकील असणारे नरसिंगराव वेरुळकर यांचे चिरंजीव. हे महादजी शिंदे यांच्या पदरीं असून, त्यांच्या वतीनें दिल्लीच्या शहाअलम बादशहाजवळ कांहीं दिवस वकिलीवर होते. यांनींच बादशहाचीं सोंगें आणून बादशहाचा अपमान केला, असें महादजीस कळलें. तेव्हां महादजी शिंदे लिहितात ( स. १७८६ च्या सुमारास):- यानें धुळवडीचे दिवशीं बादशहाचें सोंग आणून बादशहापुढें नेलें, असें मला बादशहाकडून कळलें आहे. त्याअर्थी यास तोफेच्या तोंडीं देण्यांत यावें. असा दोनदां हुकूम झाला. पण बादशहाचा निरोप आला कीं, ब्राह्मण आहे यास मारूं नये. लष्करांतून काढून देऊन देशीं वाटेस लावणें. त्यावरून वस्तभाव राहुटीसुद्धां तोफखान्यांत पहाऱ्यांत आहे ( इ. सं. ऐतिहासिक टिपण ४२ ). हीच गोष्ट इब्रतनामा या फारशी तवारिखेंतहि आली आहे (इलियट-हिस्टरी ऑफ इंडिया, व्हा. ८ पा. २४३-२४४).

**आनंदराव पवार**—( स. १७२८-३६ ) धार संस्थानचा मूळ उत्पादक उदाजी पवार, त्याचा हा धाकटा भाऊ. याचा बाप सुपेकर संभाजी बुवाजी होय.

पुढें हा व याचे बंधू शाहूपाशीं उदयास आले. स. १७२८ च्या सुमारास बाजीरावाचें व उदाजीचें वांकडें आल्यामुळें बाजीरावानें उदाजीस कैदेंत ठेवून आनंदरावास धारेस नेमिलें ( धार संस्थानचा इतिहास, पृ. ३८० ). स. १७२१ च्या डभईनजीक झालेल्या लढाईत हा बाजीरावाच्या विरुद्ध दाभाड्याच्या बाजूनें लढत होता. त्या वेळीं हा जखमी झाला.

बाजीरावाच्या कांहीं आज्ञापत्रांवरून व संडलोई दप्तरांतील एका पत्रावरून रियासतकारांनीं स. १७३६ हा आनंदरावाचा मृत्युकाल ठरविलेला आहे. पण उलटपक्षीं ग्रँटडफ यानें मराठी कागदपत्राच्या आधारावर असें नमूद केलें आहे कीं, स. १७४२ च्या पावसाळ्यांत बाजीरावाचा नर्मदातीरीं मुक्काम होता. तेव्हां त्यानें आनंदरावाची

डभइच्या लढाईनंतर प्रथमच भेट घेऊन याच्याकडे धार व तिच्या आसमंतांतील मुलूख कायम केला. इतकेंच नव्हे, तर स. १७५० च्या सुमारास देखील आनंदराव हयातच होता, असा ग्रँटडफचा समज झालेला दिसतो ( पु. १, पृ. ४४६ पाहा ).

याला यशवंतराव व रायाजी असे दोन पुत्र असून त्यांपैकीं यशवंतराव हा आनंदरावाच्या मागून धारचा अधिकारी झाला, व रायाजीस महाराष्ट्रांत सरंजामी उत्पन्न नेमणूक मिळाली. याची मैनाबाई नांवाची स्त्री असून ती याच्या मागून बरींच वर्षे म्हणजे सवाई माधवरावांच्या कारकीर्दीपर्यंत जिवंत होती, असें दिसतें. हा सर्पदंशानें मृत्यु पावला ( ज्ञानकोश ).

याची छत्री उज्जयनीस मंदाकिनीघाटावर आहे. याची मुद्रा ' श्रीशीवचरणीं दृढभाव । संभाजीसुत आनंदराव पवाररावः । '

**२.** (स. १७८०-१८०७) धारच्या खंडेराव पवार यास गोविंदराव गायकवाडाची कन्या मैनाबाई हिच्यापासून झालेला हा पुत्र होय. यास खंडेरावामागून स. १७८० मध्यें धारचा अधिकार प्राप्त झाला. त्या वेळीं हा केवळ अर्भक असल्यामुळें वयांत येईपर्यंत याचें संगोपन याच्या आजोळीं गायकवाडांच्या घरीं झालें.

याच्या गायकवाड घराण्याशीं असलेल्या संबंधामुळें गोविंदरावाच्या मृत्यूनंतर बडोद्यास अराजकता माजली, तेव्हां गायकवाडाच्या घराण्यांतील असंतुष्ट मंडळी धार संस्थानच्या आश्रयास आली. आनंदरावास पुढें करून गायकवाडाच्या राज्यांत बखेडा उपस्थित करण्याचाहि प्रयत्न करण्यांत आला. याला मैनाबाई नांवाची स्त्री असून रामचंद्रराव नांवाचा एक पुत्र होता. याच्याकडे पूर्वी स. १८०१ त यशवंतराव होळकर हा नोकरीस राहिला होता. परंतु दौलतराव शिंद्यानें यास धाक घातल्याबरोबर यानें त्यास कामावरून दूर केलें. हा ता. १०-६-१८०७ रोजीं मरण पावला ( म. रि. उ. वि. ३, पृ. ३८६ ).

**आनंदराव फाकडे**—हा मानाजीचा दत्तक पुत्र. यानें दौलतरावाच्या सांगण्यावरून सर्जेराव घाटग्याचा खून केला. हा दौलतरावाजवळ देवडीवरील पाहऱ्यावर अंमलदार होता. दौलतरावाच्या बायकोनें-बायजाबाईनें-वरील खुनाबद्दल यास शिक्षा करण्याचा हट्ट धरिला. तेव्हां अंतस्थ रीतीनें यास बरींच रक्कम पोंचवून दौलतरावानें यास पळून जाण्यास सांगितलें. तेव्हां शिंदेशाही सोडून हा पुढें बडोद्यास गायकवाडांचे आश्रयास गेला. तेथें हें फाकडे घराणें हल्ली नांदत आहे ( म. रि. उ. वि. ३ पृ. ५७५ ).

**आनंदराव माधव**—हा भोसल्यांचा वकील होय. स. १८०३ मध्यें याला भोसल्यानें वेलस्लीकडे बोलणें करण्यास पाठविलें होतें.

**आनंदराव यशवंत चंदावरकर**—दुसऱ्या बाजीरावाचा वकील. बाजीरावास जेव्हां धूळकोट येथें सर्व बाजूंनीं घेरलें ( स. १८१८ चे सुमारास ), तेव्हां त्यानें यास मालकम या इंग्रज अधिकाऱ्यास मद्दू येथें भेटावयास पाठविलें. हा ता. १६ मे १८१८ रोजीं मद्दू येथें पोंचला ( म. रि उ. ३ पा. ५०४ ).

**आनंदराव रामजी**—हा रामजी महादेवाचा पुत्र होय. स. १७७४ मध्यें जेव्हां इंग्रजांनीं ठाण्याच्या किल्ल्यावर स्वारी केली, तेव्हां हा किल्ल्याच्या बाहेर होता. पण मोठी शिताफी करून पांचशें लोकांनिशीं हा किल्ल्यांत गेला. परंतु याचा उपयोग न होऊन इंग्रजांनीं किल्ला सर केला ( म. रि. उत्तरवि. १ पृ. २४ ).

**आनंदराव रामजी यादव**—मल्हारराव होळकराचा सरदार. हा अब्दालीशीं लढतांना पडला ( मार्च १७६१ ).

**आनंदराव रास्ते**—(मृ. १७९९) यांच्या वडिलांचें नांव भिकाजी शामजी गोखले असें असून शाहूनें किंवा विजापूरच्या बादशहानें यांच्या एका पूर्वजाची सचोटी पाहून त्याचें पूर्वीचें 'रसदे' हें पद मोडून रास्ते म्हणजे रास्त वागणारे हें नांव दिल्यापासून हें घराणें नवीन नांवानें प्रसिद्धीस आलें. नानासाहेब पेशव्यांची स्त्री गोपिकाबाई ही याची सख्खी बहीण होती.

याचा ज्येष्ठ बंधु मल्हारराव मृत्यु पावल्यानंतर याच्या कर्तृत्वावर सरकारची मेहेरनजर होऊन याच्या नांवें सरदारी केली गेली ( कैफियती व यादी). नारायणरावाचा वध झाला तेव्हां हा पेशव्यांतर्फे कर्नाटक प्रांतांत अधिकारी होता ( मं. संमेलनवृत्त शके १८३७ ). पुण्यांत असलेली रास्त्याची पेठ यानेंच वसविलेली असून तिच्याकरितां पेशव्यांकडून यास जमीन देण्याविषयीं हुकूम झाला ( पेशव्यांची रोजनिशी ८. पृ. ३५३ ).

हा मरण पावल्यावर किल्ले पांडवगड सरंजामाचे गांवसुद्धां आनंदरावाच्या निसबतीस होता तो सरकारांत जप्त करून बाजीरावानें याची कमावीस ता. १ एप्रिल स. १८०१ रोजी बाळोजी कुंजर यांस सांगितली (पेशव्यांची रोजनिशी ५ पृ. ९८).

यास महिपतराव म्हणून पुत्र होता. पण तो मृत्यु पावल्यामुळें स. १७९४-९५ सालीं वडील भाऊ गणपतराव याचा कनिष्ठ पुत्र माधवराव यास यानें दत्तक घेतलें

( पंत प्रधान यांची दुसरी शकावली ). हा बाराभाईंस अनुकूल होता. यानें अनेक लोकोपयोगी कामें केलीं ( गोखले घ. इ. पा. ११ ).

**आनंदराव वाघ**—पहिल्या रघूजीच्या वेळच्या प्रमुख मराठे सरदारांपैकीं आनंदराव वाघ हा एक होय. याचा मुलगा रामचंद्र वाघ हा मुधोजीचे वेळेस प्रसिद्धीस आला ( ना. प्रां. इ. पा. १०६ ).

**आनंदराव सुमंत**—याचें समग्र नांव आनंदराव रघुनाथ भोपळे असें असून याला औरंगाबादकर असेंहि म्हणत. यानें थो. शाहू महाराजांना राज्यावर आणण्याच्या कामीं श्रम केले होते म्हणून शाहूनें यास सुमंतांचें पद दिलें ( स. १७०८ ). यापूर्वी सुमंतांचें पद हणमंते यांच्याकडे होतें. याचें काम परराष्ट्रीय राजकारण करणें, राजपत्रावर 'संमत सुमंत' लिहिणें. याची मुद्रा-श्रीराजा शाहु छत्रपति स्वामिचरणीं तत्पर । रघुनाथसुत आनंदराव सुमंत निरंतर । हा गृहस्थ जाधवरावाचे तर्फेचा असून मोगलाईतील माहितगार होता. हा शाहूकडील बरींच कारस्थानें चालवीत होता. शाहूनें याजकडून आंतून नबाब ऐवजखानाकडे तडजोड चालविली, परंतु बाहेरून नाजूक कामाकरितां पाठविलें म्हणून प्रसिद्ध केलें ( २३-३-१७२४ ). हा साताऱ्यास न राहतां शाहूतर्फे निजामाजवळ राही. बाजीरावाचा याजवर विश्वास नव्हता असें दिसतें. कारण बाजीरावानें शिवाय दोन वकील निजामाकडे बोलीस पाठविले. हा कांहीं दिवस सवाई जयसिंगाकडे होता ( म. रि. म. १ पृ. ३७३-३८२ ).

**आनंदराव सोमवंशी**—हा दावलजी सोमवंशीचा कदाचित् पुत्रहि असेल. हा सरलष्कर असून पेशव्यांच्या बहुतेक युद्धांत असे. याला प्रतिनिधीसह अंजनवेलीस पाठविलें होतें ( स. १७२३ ). हा स. १७३२ मध्यें थो. शाहूचा सरलष्कर होता. याच्या पथकाचें नांव धाकट्या बाजीरावाच्या राजवटींतहि आढळतें. मुद्रा-श्रीराजा शाहु चरणी तत्पर । आनंदराव सोमवंशी सरलष्कर ।

**आनंदराव हुपीकर**—याजकडे कर्नाटकाचा सरसुभा होता. हा मृत्यु पावला तेव्हां याचे जागीं १६।९।१८०९ रोजीं बाजीरावानें मोदीची नेमणूक केली ( म. रि. उ. ३ पा. ३७५ ).

**आनंदराव होळकर**—यशवंतराव होळकरांचा पुण्याच्या दरबारीं असलेला एक वकील व नातेवाईक.

**आनंदवर्धन**—हा सुप्रसिद्ध पंडित काश्मीरच्या अवंतिवर्मा नांवाच्या राजाच्या राजवटींत उदयास आला. अवन्तिवर्म्याचा काळ स. ८५७-८८४ हा निश्चित आहे. ध्वन्यालोक हा याचा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. त्याशिवाय अर्जुनचरितकाव्य, प्राकृतांत लिहिलेलें विषमबाणलीला काव्य हेहि ग्रंथ याचेच होत. ध्वन्यालोकानंतर यानें धर्मकीर्ति या बौद्ध ग्रंथकाराच्या प्रमाणविनिश्चय या ग्रंथावर धर्मोत्तमा नांवाची टीका लिहिलेली दिसते. देवीशतक नांवाचें यानें केलेलें एक स्तोत्रहि आहे. त्यांत यमक, भाषाश्लेष म्हणजे अक्षरें तींच पण संस्कृत, मागधी, शौरसेनी इत्यादि निरनिराळ्या भाषानुसार अर्थ निराळा होईल अशीं पद्यें, गोमूत्रिका व इतर चित्रबंध यांची रेलचेल केली आहे. त्यांतील एकेंएकाव्या पद्यावरून याच्या पित्याचें नांव नोण होतें, असें कळतें. देवीशतकावर कैय्यकटाची टीका आहे. याशिवाय आनंदवर्धनाचा तत्त्वालोक नांवाचा आणखी एक ग्रंथ असावा. ध्वन्यालोकावरील लोचनटीकेंत 'बहुमम इन्ति भणिन्तऊ' ( ध्वन्यालोक पा. २४३ काव्यमाला-प्रत ) हें पद्य सैंधव भाषेंतील म्हणजे जुन्या सिंधी भाषेंतील आहे असें म्हटलें आहे.

व्याकरणशास्त्राच्या इतिहासांत पाणिनींच्या सूत्रांचें जें महत्त्व आहे तेंच महत्त्व अलंकारशास्त्रांत याच्या ध्वन्यालोकाचें आहे. ध्वन्यालोक हा ग्रंथ कारिका, वृत्ति व उदाहरणें अशा तीन भागांत विभागला आहे. यांपैकीं कारिका व वृत्ति हीं दोन्हीहि याचींच आहेत, असें कांहींचें म्हणणें असून कारिका दुसऱ्याच्या असून वृत्ति तेवढी याची आहे, असें कांहीं म्हणतात. सहृदय नांवाच्या याच्या गुरूनें कारिका लिहिल्या आणि त्यावर यानें वृत्ति लिहिली, असेंहि म्हणण्यांत येतें ( सा. इ. पा. ११२-१३० ).

**आनंदसूरी व अमरचंद्रसूरी** ( स. १०९३-११५० ) या दोघांचाहि जन्म गुजराथेंत झाला. लहानपणींच यांनीं आपल्यापेक्षां बलाढ्य अशा तर्कज्ञान्यांचा वादांत पराभव केल्यामुळें यांना अनुक्रमें वाघाचा छावा व सिंहाचा छावा अशीं टोपणनांवें मिळालीं ( व्याघ्रशिशुक व सिंहशिशुक ). हे दोघेहि नागेंद्रगच्छ शाखेच्या महेंद्रसुरींचे शिष्य होते. हरिभद्रसूरी हा यांचे मामाहून झाला. ज्या सिद्धराजानें यांना टोपणनांवें दिली तो स. १०९३ मध्यें गादीवर आला. तेव्हां हे दोघे १२ व्या शतकाच्या सुरवातीस होऊन गेले असावेत. गणेश उपाध्यायानें आपल्या तत्त्वचिंतामणि ग्रंथांत यांचा निर्देश केलेला दिसतो ( हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४७-४८ ).

**आनंदस्वामी**—मराठी कवि. भवभ्रमहारक भजनानंदलहरीचा कर्ता.

**आनंदज्ञान**—तत्त्वावलोक ग्रंथ करणाऱ्या जनार्दनाचें नामान्तर.

**आनंदीबाई जाधव**—चंद्रसेन जाधवांची पत्नी.

**आनंदीबाई निंबाळकर**—ही सुप्रसिद्ध महादजी शिंदे यांची बहीण असून निजामाचा सरदार रावरंभा महाराव निंबाळकर यास दिली होती. हिला एकदां निजामाचा वकील बाबाराव गोविंद याच्याबरोबर निजामानें महादजीकडे पाठविलें होतें. हिला कर्ज फार झालें म्हणून ही एकदां महादजीकडे मदत मागण्यास आली होती. वाटेंत हिनें आक्टोबर स. १७८३ मध्यें महेश्वराला मुक्काम करून अहल्याबाईचा पाहुणचार घेतला. त्याचें वर्णन वाचण्याजोगें आहे. 'आनंदीबाईस निजामांनीं तीन लक्षाची जहागीर देऊन पाटीलबाबाकडे अंतस्थ राजकारणास पाठविली' असा त्या वेळीं बाहेर लौकिक होता. पण हिच्या रदबदलीचा उपयोग झाला नाहीं. शरीरेंकरून विकल, म्हणून परत जात होती. त्रासून दोनतीन कोस निघून गेला. लाखो रुपये देण्याऐवजीं बाबांनीं तीस एक हजाराचे हवाले घेतले. ही बाई ग्वाल्हेर येथें स. १७८५ मध्यें मृत्यु पावली ( म. रि. उ. २ पा. २२३-२४ ).

**आनंदीबाई पेशवे**—( स. १७५५-१७९४ )—राघोबादादा ऊर्फ रघुनाथराव पेशव्यांची ही दुसरी बायको होय. ही राघो महादेव ओक मलठणकर यांची कन्या असून हिचें लग्न तारीख १७ डिसेंबर १७५५ मध्यें झालें. हिच्या मातुश्रीचें नांव काकूबाई ओक असें होतें.

ही मराठ्यांचे इतिहासांत कारस्थानी स्त्री म्हणून प्रसिद्ध आहे. हिचें राघोबावर बरेंच वजन असून तो राजकारणांत हिच्या सल्ल्याप्रमाणें चालत होता, असें दिसतें ( ऐ. ले. सं. भाग ४ पृ. १९६८ ). नारायणरावाचा वध, 'ध' चा 'मा' करून हिनेंच केला असें पांडुरंग नामक कवीचें नारायणरावाच्या वधावरील काव्य इतिहाससंग्रहांत ( मार्च १९१० ) प्रसिद्ध झालें आहे त्यावरून दिसतें. आपल्यावरील हा आरोप स्वतः आनंदीबाईहि जाणून होती, असें इतिहाससंग्रहांत छापलेल्या मेणवली दप्तरांतील एका पत्रावरून कळतें. राघोबादादाचें अस्सल पत्र रामशास्त्र्यांच्या हातीं पडलें (ग्रँटडफ) त्यावरून 'ध'चा 'मा' झाला होता, हें जरी सिद्ध झालें असलें तरी तो कोणीं केला हें त्यांस गूढच राहिलें असावें. 'उगाच निष्कारण कैदेंत ठेविलें आहे" 'ज्याचें बोट सांपडलें त्याचा हात धरला.' 'नारायणरावास दगा झाला तोहि आम्हांस ठाऊक नाहीं. याविसीं आमचे आंगी लावणारानी लावावे. ...उगीच हाल करावे हे काय?' ( पे. द. ) अशा तऱ्हेचे निर्वाणीचे उद्गार निघतात व एकदां तर बाई स्पष्ट कानांवरें हात ठेवून सांगते कीं, 'नारायणरावाच्या खुनाची माहिती आपल्याला नाहा! पूर्वी साहेबानीं प्रायश्चित्त केलें ते समयींच मला बलाविलें नाहीं. किमर्थ...माझी ममता विशेष म्हणून नारायणरावाच्या गर्दीचा मार मला सांगत नव्हते. यांणीं चौकशी किमर्थ केली नाहीं. यादीचीं अक्षरें 'ध' चा 'मा' कोणी केला यांची चौकशी किमर्थ न केली? माझा दस्ताऐवज किंवा निरोप कांहींतरी निवडायचें होतें. कांहींच न करितां उगेच पेचांत ठेविलें. दैवास उपाय नाहीं."

खुनाच्या आरोपाची ही कैफियत नव्हे तर काय? नारायणरावांचे खुनांत आनंदीबाईचें अंग होतें हें सिद्ध करण्यास पुरावा उपलब्ध नाहीं. हिच्या मागच्या पुढच्या कृत्यांवरून अनुमानानेंच हिचा या कामांत संबंध मानला जातो. ही मोठी धूर्त व सावध दिसते. हिनें गंगाबाईस मारण्याचे प्रयत्न केले. बारभाईंशीं युद्ध चालू असतां हिनें शक्य तितक्या रीतीनें नवऱ्यास साह्य केलें. 'बाई तुम्हांस माहीतच आहेत. शंभर राजकारणें करतील' असे हिच्याबद्दल ठिकठिकाणच्या पत्रांत उल्लेख आहेत. इकडे सखाराम हरि वगैरे स्वपक्षांतील मंडळीस ही उत्तेजन देते, तर त्याच वेळीं सवाई माधवरावाच्या प्रकृतीविषयीं खबर काढून त्यास जपा म्हणून लिहिते; आणि नवऱ्याचा डाव फसल्यावर पुनः या सर्व अपकर्षाचें दूषण ती सखाराम बापू, नानाफडणीस वगैरे कारभाऱ्यांस देते. यावरून करून सवरून नामानिराळी, अशी हिची वागणूक हिच्या एकंदर चरित्रांत दिसते. अंतःकरणाच्या वृत्ती ताब्यांत ठेवण्याची कला तिला चांगली अवगत होती.

नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें देतांना दादानें विरोध केला त्या वेळीं आनंदीबाईनें नवऱ्याचें मन वळवून नारायणरावासच वस्त्रें देवविलीं. जर हिच्या मनांत नारायणरावास दूर करावयाचें असतें तर हीच चांगली संधि होती. मुद्दाम पुढें त्याच्या खुनापर्यंत प्रकरण आणण्याचें कारणच नव्हतें. पुतण्याचे खुनाबद्दल दादानें प्रायश्चित्त घेऊन गोपिकाबाईचें दर्शन घ्यावें, आणि मातुश्रीसमान त्या वडील व पुण्यशील बाईचा शुभाशीर्वाद मरणापूर्वी संपादावा, अशी भर आनंदीबाईनें आपल्या नवऱ्यास आसन्नमरण स्थितींत दिली. यावरून नवऱ्याचे हातून घडलेल्या पापाचें क्षालन धार्मिक दृष्ट्या तरी व्हावें, अशीच हिची भावना दिसते. त्या पापांत हिचा स्वतःचा हात असावा असें दिसत नाहीं. धार्मिक दृष्ट्या ही गोपिकाबाईइतकीच श्रद्धाळू होती. पेशव्यांच्या घराण्याच्या लौकिकाबद्दल हिला कळकळ वाटे, तशीच

मराठी राज्यास उतरती कळा लागलेली पाहून हिला हळहळ वाटत असे. हिचीं यासंबंधींचीं पत्रें व उल्लेख मोठ्या शहाणपणाचे व मार्मिक आहेत. पुतण्याच्या खुनाशीं आपला संबंध जोडून लोक आपणांस पाण्यांत पाहतात, याबद्दल हिचा जीव तिळतिळ तुटे, आणि 'पुराव्याचें माप माझ्या पदरांत घाला, उगाच साप साप म्हणून भुई बडवूं नका' असें कंठशोष करून ही कारभाऱ्यास विचारी. यावरून वाटतें कीं, नवऱ्याच्या अविचारामुळेंच हिच्या शहाणपणाचें मातेरें झालें. आणि नवऱ्याचा दोष उगाच आनंदीबाईचे माथीं आला.

आनंदीबाईच्या कृष्णकारस्थानाचा किंवा दुष्ट स्वभावाचा पुरावा कोठेंहि आढळत नाहीं. ही देखणी स्त्री नवऱ्यास भुरळ पाडून त्याच्याकडून वाटेल तें कृत्य करवी असा सामान्य समज त्या वेळीं होता. त्याचाच अनुवाद पूर्वी डफनें व अलीकडे इतिहाससंग्रहाचे संपादक रा. ब. पारसनीस व त्यांचे साहाय्यानें इतिहास लिहिणारे ना. किंकेड यांनीं ठिकठिकाणीं केलेला आढळतो; पण त्याचा पुरावा मात्र कोणत्याहि प्रकारचा एवढ्या मोठ्या वाङ्मयांत ते देत नाहींत ( म. रि. म. भा. ४. पा. ३४५–४८ ).

पुढें स. १७७५ मध्यें हिला धारच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आलें.

स. १७७६ मध्यें विसाजी गोविंद आठवले, खंडेराव त्रिंबक ओंडेकर यांनीं आनंदीबाईस पकडण्यासाठीं धारेस वेढा घातला तेव्हां हिनें मोठ्या शौर्यानें लढून कांहीं काळ टिकाव धरला. पण लवकरच किल्ल्यांतील सामान संपल्यामुळें ही खंडेरावाच्या स्वाधीन झाली ( म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ७८ ).

अटकेंत असतांना स. १७७८ च्या सप्टेंबर महिन्यांत हिनें नानाफडणविसास खालीलप्रमाणें पत्र लिहिलें. 'हल्लीं यवनाकांत ब्राह्मणी दौलत फितुरानीं होऊं पाहते. तुमच्या चित्तांतील उगीच आटी जात नाहीं. आम्हीं तुमच्या स्वाधीन, पावणेदोन वर्षें जाहालीं. कार्यसिद्धी तुमची कांहींच न जाहली. नुकसान पांच हजार फौजेचें, सरंजामी गुंतलें, ही झालीं. विशेष कांहींच न झाले. तुमची फौज गुंतून आमचा धन्याचे पायासीं वियोग.'' या वाक्यावरून हिचा निरपराधीपणा दाखविण्याचा बहाणा व मुत्सद्दीपणा चांगला ध्यानांत येतो. त्याच दिवशीं सखाराम बापू बोकील यांना लिहिलेल्या पत्रांतील पुढील भाग हिच्या राजकारणी दूरदृष्टीची चांगली माहिती देणारा आहे.

'हल्ली इंग्रेज घरांत येऊ पाहातात. तमाम अंमल उठवून आपलें अंमल बसवितात. आमचे निमित्त करून सर्व दौलतीस गिऱ्हाईक होतील. सुजाउद्दौले व महमदअल्ली यांच्या घरांतून प्रथम चाकरीस येतो म्हणून नम्रतेनें पायरव करून घेतली. आणि आतां उभयतास पोटापुतें देऊन सर्व दौलतीचे धनी झाले आहेत. या सर्व गोष्टी तुम्हास ठाउक आहेत. तसेंच आमच्या घरांत होईल. ते जातीनें खबरदार व मनुष्यें जवळ चांगली असें असोन उभयतांच्या गती याप्रमाणें झाल्या. आमचे येथें तर कारभारी जवळ मातबर कोण आहे, व पारख कोणाची आहे. व मर्जी ही कोणत्या तऱ्हेची आहे. तुम्हास ठाऊक असोन, तुम्ही तिहीं पिढ्याचे कारभारी, ही ब्राह्मणी दौलत बुडावयाजोगी करितां हे तुम्हास करणें ठीक दिसत नाहीं. + + हें कालचक्र विपरीत आलें. परंतु आम्हास हाच भरंवसा आहे कीं, तुम्ही काळचक्रासहि फिरवाल. हे जाणून तुम्हास पत्र लिहिलें आहे. जन्मभर चांगले केले आणि शेवटीं म्हातारपणीं इंग्रेजांच्या घरांत ब्राह्मणी दौलत घातली हे अपेश येई तो अर्थ न करावा. हुजुर (रघुनाथराव दादा) ऐकत नाहीं असें म्हणाल, तर ज्यापेक्षा तुम्हीं प्राण घेता किंवा पेंचांत आणता, त्यापक्षीं काय होईल ते होवो, परंतु तुमचे हातीं नच लागावें हा निश्चय आहे' ( इ. सं. ऐ. टि. पा. २८–३० ).

आनंदीबाईच्या पत्रांत खोंचदारपणाहि बराच आढळतो. वरील पत्रांतच ही नानाफडणीसाच्या नवीन लग्नास उद्देशून लिहिते, ''नवी भावजय लाडकी केली तिचें नांव काय ठेविलें व दुसरी करावयाची कधीं?'' तथापि वरील उपरोधिक वाक्यें लिहिणाऱ्या स्वतः आनंदीबाईच्या यजमानांनीं, हिच्या जिवंतपणींच भिकाजीपंत पेंडश्यांच्या मथुराबाई नामक कन्येशीं लग्न केलें होतें, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

राघोबाच्या मृत्यूनंतर कारभाऱ्यांच्या नजरकैदेंत असतांनाची हिची हकिकत हिच्या दिनचर्येवरून दिसून येते (पे.द.४, सप्टेंबर १७८६ ते ऑक्टोबर १७८८). कोपरगांवीं आनंदीबाईस सालीना २ लाख रुपयांची नक्त नेमणूक होती. पूर्वीच्या वैभवाची आठवण होऊन चालू सरंजाम कांहींच नाहीं असें वाटून हिला फार खेद होत असे. '' स्वस्तेंत जन्म गेला, त्यामुळें परस्वाधीनता–साहवत नाहीं. भावीस उपाय नाहीं.'' असें कधीं कधीं हीच आपलें समाधान करून घेई. '' आम्ही केवढी माणसें होतों आणि कोणत्या योग्यतेस आलों. अन्याय कोणी पहात नाहीं. उगेच निष्कारण कैदेंत ठेवलें आहे....धनी आसते म्हणजे ताकत नवती '' अशा तऱ्हेचा खेद होऊन ही चरफडत असे.

हिला घालून पाडून-टोचून बोलण्याची फार संवय होती. बारभाई-कारभारी मंडळीवर व त्यांतल्या त्यांत नानावर हिचा फार राग. कारण लहानपणापासून नानाची हिला माहिती आणि तोच आतां वरचढ बनला होता. बाई दानधर्म फार करी व कधीं कधीं कामनिक अनुष्ठानें करवी, म्हणून नाना फडणीस त्या धर्मकृत्यांना लवकर परवानगी पाठवीत नसे. तेव्हां हिचा तडफडाट होई. "आमचे मर्जीचे अगत्य कोणास नाहीं." असें बैतागून ती बोलत असे. नानास मूलबाळ संसारिकांचें सुख नाहीं असें पाहून एखादे वेळेस हिला नानाची कींवहि येत असे व त्याच्या परिस्थितीपेक्षां आपलीच बरी असें हिला वाटे.

आपल्या चालू दुःस्थितीबद्दल आनंदीबाईचा जसा नानावर राग, तसाच तो मागील दुःस्थितीबद्दल गोपिकाबाई व माधवराव यांच्यावर होता. हिच्या बोलण्यांत वारंवार जावेला टोमणे मारलेले आढळतात.

जसें नानाबद्दल तसेंच गोपिकाबाईबद्दलहि आनंदीबाईला कधीं कधीं वाईट वाटे. 'बाईची धन्य आहे. दोन मूल हत्तीप्रमाणें गेले. आम्हांस किती वाईट वाटतें. मग त्यांचे काय पुसावे.' असें अंतःकरणापासून उद्‌गार निघत. गोपिकाबाई पंचवटीस वारल्याचें कळल्यावर हिनें सवाईमाधवरावाचें बहुतप्रकारें समाधान करण्याविषयीं कारभाऱ्यांस दुखवट्याचें जें पत्र पाठविलें तें खरोखरीच मननीय आहे.

"चिरंजिवास (सवाईमाधवरावास) आई, बाप, भाऊ कोणीच नाहीं. आम्ही दूरच आहो, येक आजी तीहि दूरच होती. परंतु ममतेचें तेवढेच मनुष्य होतें. याअर्थी चिरंजिवास श्रम बहुत होतील. परंतु बहुतप्रकारें समजोन सांगावें, त्यांचाहि कालच जाला होता. सृष्टीची वाट हीच आहे. त्यापक्षी अशा गोष्टी सांगोन त्याचे शांतवन होय ते करावें." (पे. द. ४. ७०).

माधवराव पेशवे व शिंदे यांच्या संबंधानें बाई नेहमीं कुत्सित बोलतांना दिसते. माधवरावानें हिला व राघोबाला कैदेत ठेवलें होतें म्हणून, व शिंद्यानें कारभाऱ्यांविरुद्ध आपल्याला राज्य कायीज करण्याच्या कामीं मदत केली नाहीं म्हणून त्या दोघांवर हिचा राग होता. घरगुती प्रश्नामुळेंहि हिचें माधवरावासंबंधीं अगदीं वाईट मत बनलें होतें. बारभाईचा यशस्वी कारभार शिंद्यांच्या बळावर चालला आहे, हें आनंदीबाई ओळखून होती. पण शिंदा आपल्याशीं "गुलामपणा" करितो म्हणून ही त्याची निंदा करी.

धाकटा बाजीराव फार अर्वाच्यपणा करी, तेव्हां त्याला सुधारण्याविषयीं कारभारी कांहींच करीत नाहींत. "मूल शहाणें होऊं नये असें साऱ्यांस वाटतें." अशी ही नेहमीं तक्रार करीत असे.

नारायणरावाविषयीं बाईचें मत चांगलें असल्याचें पाहून आश्चर्य वाटतें. "माधवराव छचोरीपणा करीत असत. पण नारायणराव बहुत मर्यादशील होता, असा ग्रह झाला होता."

पुष्कळदां बाईच्या तोंडून कांहीं नवीन माहिती मिळते. माधवराव पेशव्यापासून दादासाहेबांपर्यंत कोणाच्याच अस्थींचें विसर्जन झालें नव्हतें हें कळून येते. दादासाहेबांच्या अस्थी काशीस पाठवीत नाहींत म्हणून बाई नेहमीं चरफडत असे.

बाजीरावाचे बेशिस्त वागण्याबद्दल आनंदीबाई त्याला सारखी बोलत असे व कारभारी या राजपुत्राची काळजी घेत नाहींत म्हणून त्यांनाहि हासडीत असे. "यांचें दैवच खोटें आहे." "यांचे पत्रिकेंत आहे कीं, याजवळ वडिलांचें कांहीं राहूं नये" असें ही भाकीत करीत असे (लोकशिक्षण वर्ष ४, अंक ८).

दु. बाजीरावास पेशवाई प्राप्त होईपर्यंत हिला स्वातंत्र्य मिळालें नाहीं. राघोबाच्या मृत्यूपर्यंत ही त्याजबरोबर कोपरगांवास नानाफडणिसाच्या प्रतिबंधांत होती. कारभारी मंडळीचें हिच्याशीं वर्तन एकंदरींत बरेंच निष्ठुरपणाचें होतेंसें दिसतें. काव्येतिहाससंग्रहांतील (ले. ४९४) एका यादींत, राघोबादादा मृत्यु पावल्यावर हिच्या अंगावरील सौभाग्यालंकार काढून आणण्यास नानानें ताबडतोब आपला हस्तक पाठविला होता, असा उल्लेख आहे. ही ता. २७ मार्च १७९४ रोजीं आनंदवल्ली येथें मरण पावली (मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३५, धडफळे यादी). हिला दुर्गाबाई ऊर्फ गोदूबाई नांवाची कन्या आणि बाजीराव व चिमणाजीअप्पा असे दोन पुत्र होते. ता. १०-१-१७७५ रोजीं धारच्या किल्ल्यांत हिला बाजीराव नांवाचा पुत्र झाला, व चिमाजीअप्पा हा ता. ३०-३-१७८४ मध्यें झाला.

**आनंदीबाई भोसले**—(स. १७८६-१८२२) ही दुसऱ्या शाहूची चवथी बायको असून शिर्के यांची कन्या होती. हिला माईसाहेब असें म्हणत. हिचें लग्न ता. २५-३-१७८६ रोजीं झालें. नवऱ्याच्या पश्चात् प्रतापसिंह लहान असतां साताऱ्याचा कारभार हिनें दक्षतेनें चालविला. एल्फिन्स्टननें हिची प्रशंसा केली आहे. एक इंग्रजी प्रवासी लिहितो, 'ही बाई घोड्यावर बसण्यांत फार प्रवीण होती. मुळच्याच सौंदर्यास हिचा भरजरी पोषाख चांगला खुलून दिसे. ही पडद्यांतून उघडपणें बाहेर भेटी घेई, त्या वेळीं

हिचा बोलका व प्रेमळ स्वभाव सहज निदर्शनास येई. हिंदु स्त्रियांचे अंगीं सामान्यतः जो भित्रेपणा असतो तो हिच्या ठिकाणीं मुळींच नव्हता. व्यवहारचातुर्य व प्रसंगावधान या गुणांच्या योगानें हिची कर्तबगारी विशेष झळकत असे.' हिला तीन पुत्र झालेः प्रतापसिंह, रामचंद्र व शहाजी. प्रतापसिंह हा थोरला असून राज्यारोहणप्रसंगीं तो अवघा पंधरा वर्षांचा होता. हिच्या भावास ( खंडेराव मामा शिर्के ) सरलष्कर म्हणत. ही राजकारणांत मोठी चतुर होती. ही तुळजापुराहून परत येत असतां भीमातीरीं धूळखेड येथें पौष शु० १० रोजीं ( ३-१-१८२२ ) मरण पावली. तेव्हांपासून प्रतापसिंहास कुटुंबांतला आधार असा राहिला नाहीं ( म. रि. उ. वि. ३, पृ. ५९५ ).

२. बिंबाजी भोसल्यास दोन बायका होत्या. एक उमाबाई व दुसरी आनंदीबाई. पैकीं उमाबाई ही त्याजबरोबर सती गेली, व आनंदीबाई ही रतनपूर येथेंच राहिली. तिचेजवळ कारभारी कृष्णंभट उपाध्ये, महिपतराव काशी व महादजी भोसले हे होते. आनंदीबाईचा विचार रघूजीच्या विरुद्ध दिसल्यामुळें व बिंबाजीस पुत्र नसल्यामुळें छत्तिसगडचा सुभा आपल्या ताब्यांत घेण्याचा रघूजीनें निश्चय केला.

भवानीकाळोचा पुत्र यशवंतराव, भवानीशंकर व नथू भोसले यांस रघूजीनें सैन्यासह छत्तिसगडास रवाना केलें. महिपतराव काशी व कृष्णंभट यांनीं आनंदीबाईची व यशवंतरावाची सफाई करून दिली व यशवंतरावास रघूजीबरोबर पुण्यास जाणें असल्यामुळें रघूजीनें महिपतराव दिनकर यांस आपले तर्फेनें छत्तिसगडास रवाना करून यशवंतरावास परत आणिलें.

बिंबाजी मेल्यावर एक वर्षभर आनंदीबाईनें छत्तिसगडाचा कारभार पाहिला. परंतु त्यानंतर रघूजीनें छत्तिसगडचा अंमल आपणाकडे घेतला व आपल्या तर्फेचे सुभेदार छत्तिसगडचे सुभ्यावर पाठविले ( ना. प्रा. इ. पृ. २९४ ).

**आनंदीबाई होळकर**—ही यशवंतराव होळकराची पत्नी. शिंदे-होळकरांच्या युद्धांत सर्जेराव घाटग्यानें हिचा खासगी तालुका लुटला ( म. रि. उ. ३, पृ. १८६ ).

**आपग्गा**—ही तामीळ जातीची कवयित्री अव्हेयरची बहीण होय. हिचा जन्म अर्काटप्रांतांतील ऊटकाडू येथें झाला व पिरलीनें तेथेंच रानांत हिला सोडून दिलें. हीच पुढें एका परटाच्या स्त्रीस सांपडली. पुढें तिनें हिचें पालनपोषण केलें.

हिला शास्त्रज्ञान कसें झालें असेल तें असो, हिनें नीतिशास्त्रावर 'नीतिपात्तल' नांवाचा एक ग्रंथ रचिला व इतर भावंडांप्रमाणें लग्न केलें नाहीं ( क. च. ).

**आपदेव**—हा अनंतदेवाचा बाप होय. यानें 'मीमांसान्यायप्रकाश' किंवा 'आपदेवी' या नांवाचा ग्रंथ लिहिला.

**आपनतिम्म**—( स. १७५२-७१ ) म्हैसूरच्या बेडादचा मुलगा. याला हैमनअली गांव मिळालें. याचा निर्वंश झाला.

**आपाजी बाळाजी दामले**—हा नानाचा खास भरंवशाचा सरदार होय. बाहेरच्या कारभारांत खुद्द पेशव्यांचें धोरण संभाळण्याकरितां अलीबहादरावरोबर याला नानानें दिलेला होता. हा स. १७८६-८७ त बडोद्यास असून तेथून यास अलीबहादरास मिळण्याची आज्ञा झाली. याचीं कित्येक पत्रें भारतवर्षाच्या दुसऱ्या वर्षांत १६-२९ छापलेलीं आहेत ( म. रि. उ. २, पा. १५२ ).

**आपा कवि**--( अप्पा कवि पाहा ).

**आपा खंडेराव**—( खंडेराव हरी पाहा ).

**आपाजी गणेश**--हा अहमदाबाद येथील पेशव्यांचा सुभेदार होय.

स. १७७७ मध्यें फत्तेसिंग गायकवाडास करारांची सनद पेशव्यांनीं करून दिल्यावर आपाजी गणेश, बेहेरे व अंताजी नागेश हे फत्तेसिंगाचा कारभार रगडून करूं लागले, तेणेंकरून फत्तेसिंग केवळ नामशेष झाला. स. १७७७ च्या डिसेंबरांत याचा मुलगा अमृतराव अमदाबादेंत होता. त्यास फत्तेसिंगानें भेटीस म्हणून बोलाविलें. तेव्हां तो जात असतां वाटेंतच एका गारद्यानें त्याला जिवें मारिलें. 'ही गोष्ट आपणाकडून घडली नाहीं' असें फत्तेसिंग म्हणाला. पण हा प्रकार त्याजकडूनच झाला असें लौकिकांत आहे ( म. रि. उत्तर. १. २४२ ).

**आपाजी नामदेव लांडे**—हे मूळचे सर्जापूरकळंबे, किल्ले वैराटगड, ता. वंदन, येथील राहणारे. आपाजीचा बाप नामाजी व त्याचे भाऊ बाळाजी व नरसोबा हे होनप देशपांड्याकडे नोकरीस राहिले. नामाजीचे पश्चात् गुमास्तेगिरीचें त्यांचें काम आपाजीकडे आलें. यानें होनपांचें देशपांडेपण बळकावण्याचा दोनदां प्रयत्न केला. पण तो सफळ झाला नाहीं. संभाजीच्या वेळीं मोगलाई अम्मल झाला. किल्ले कोंढाण्यास वेढा पडला असतां याची आई गोदूबाई हिनें कर्यात मावळचें देशपांडेपण आपणांस द्यावें असा अर्ज औरंगजेबास केला. वतन मिळविण्यासाठीं आपाजीचा चुलता बाळाजीकृष्ण हा बाटून मुसलमान

झाला. तेव्हां त्यास स. १७०६ मध्यें कर्यात मावळचे देशपांडेपण मिळालें. मुसलमान झाला म्हणून यास नांव लांडे देशपांडे पडलें. यास डोणजेकर देशपांडे असें म्हणतात ( श्या. म. मराठे ).

**आपाजी भगवंत रानडे**—हे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे पणजे असून पटवर्धनांचा मामलेदार बाळकृष्णपंत लागू याचे हस्तक होते. स. १८०० च्या सुमारास हे व बाळकृष्णपंत लागू वेलस्लीस आणण्यास हरिहरावर सामोरे गेले ( म. रि. उ. ३ पृ. १६० ).

**आपाजी राम**—हैदरचा वकील आपाजीराम हा पुण्यास दादाचे मसलतींत राहून केवळ आपल्या धन्याचें हित साधीत होता. त्यानें पुण्याहून हैदरास लिहिलें : " संधी फार चांगली आली आहे. आपण क्षण विलंब न करितां फौजा पाठवून शिरे, मदगिरी, चेनरायदुर्ग, होसकोटे, बाळापूर, वगैरे तालुके लगोलग हस्तगत करावे. " हैदरानें या सूचनेचा फायदा घेऊन वरील ठिकाणें ताबडतोब काबीज केलीं ( म. रि. म. भा. ४, पा. ३५४ ).

**आपाजी राम गाडगीळ**—हे नानासाहेब पेशव्यांचे साडू व लोभांतले. हे अक्कलकोटकर फत्तेसिंगबाबाचे कारभारी होते. हे युद्धावर जात. हावेरीच्या युद्धास हे होते ( स. १७६४ ). यांची पत्नी भिकाजीपंत रास्ते यांची कन्या सगुणाबाई.

**आपाजी राम दाभोळकर**—हा रामाजी अनंताचा पुत्र. रामाजी अनंत पानपतावर मृत्यु पावला ( म. रि. उ. वि. २ पृ. २४३ ). हा महादजी शिंद्याचा कारभारी होता. हा स. १७९० च्या सुमारास मारवाडच्या स्वारींत मरण पावला. महादजी याच्याशीं कधीं रागानें व कधीं लोभानें सारखी वाटाघाट करी ( म. रि. उ. १, पा. ३४६).

**आपाजी राम सहस्रबुद्धे**—हा दुसऱ्या बाजीरावाचा एक हस्तक होय.

**आपाजीराव द्वारकोजीराव पाटणकर**—याच्या आजाचें नांव चांदजीराव. हे सर्व पेशव्यांचे सरदार होते. याचें मूळ आडनांव साळुंखे. एकदां गुलटेकडीजवळ श्री. माधवराव आणि नारायणराव हे गजयुद्ध पाहत असतां एक हत्ती थेट श्रीमंतांच्या अंगावर आला, तेव्हां यानें त्याला सोंडेवर कट्यार मारून परतविलें. त्यासाठीं यांना चौघडा मिळाला.

**आपाजी हरी**—वसई खाडीच्या मुखाशीं एक इंग्रजी जहाज मराठ्यांनीं जाळिलें. तेव्हांपासून इंग्रजावर पुणेकरांचा बेभरंवसा झाला. त्यामुळें नारो आपाजीनें फेब्रुवारींत पुरंदरास कळविलें कीं, आपाजी हरी, शिवाजी विठ्ठल व विसाजी केशव यांना निक्षून लिहावें कीं, इंग्रजास दहशत पडेल अशी हरएक तरतूद करावी ( म. रि. उ. १, पृ. २५ ).

**आपा देसाई निपाणकर**—याचें नांव सिधोजीराव निंबाळकर असून हा प्रथम दौलतराव शिंद्याच्या पदरीं नोकर होता. स. १८०० मध्यें शिंद्यानें याला आपली पलटण देऊन परशुरामभाऊ पटवर्धनाची जहागीर काबीज करण्याकरितां रवाना केलें होतें.हा स. १८०३ मध्यें जनरल वेलस्लीस बाजीरावातर्फे येऊन मिळाला. बाजीरावाच्या पदरीं बापू गोखले वगळल्यास हा एकटाच उत्तम सेनानायक होता. पुढें बाजीरावाची फूस मिळाल्यानें यानें चिकोडी व मनोळी हे दोन्ही जिल्हे आपल्या ताब्यांत घेतले. नंतर यानें खेमसावंताच्या मुलाचा गळा दाबून प्राण घेवविला. पण या खुनामुळें याचा मुळींच फायदा झाला नाहीं, कारण पुंडसावंत नांवाच्या इसमानें, आपाजीचें सैन्य कोल्हापूरकरांशीं लढण्यांत गुंतलें असतां, ती संधी साधून याचें सर्व सैन्य देशाबाहेर हाकून दिलें. बाजीरावाच्या कपटीपणामुळें स. १८१३ च्या सुमारास याला विनाकारण आपल्या चतुर्थांश जहागिरीस मुकावें लागलें. स. १८१८ सालीं जी कोपरगांवची लढाई झाली, तींत हा पेशव्याचे बाजूनें लढत होता. हा एक बाजीरावाचा नाणावलेला सेनापति होता, तरी बाजीरावाचें राज्य इंग्रजांनीं घेतल्यावर त्यांनीं याची जहागीर खालसा केली नाहीं. पेशव्यांशीं युद्ध चाललें असतांच याचा इंग्रजांशीं पत्रव्यवहार सुरू होता ( ग्रँ. ड. ).

कोणे दिवशीं याच्या वाड्यांत कीर्तन झालें. आप्पासाहेब कीर्तन ऐकत बसला होता. याच्या समोरच एका खांबाशीं टेकून याचा एक कारकून बसला होता. त्याच्या अंगरख्यांत एक ढेकूण शिरला होता. त्यामुळें तो कारकून वारंवार चुळबूळ करी. त्याच दिवशीं अशी गोष्ट झाली कीं, आपासाहेबाच्या पागोट्यांत भला मोठा विंचू जाऊन बसला होता. हुजऱ्यानें तसेंच पागोटें आणून दिलें; तेंच डोईस घालून आपासाहेब कीर्तनास येऊन बसला. कीर्तनास आरंभ झाल्यापासून विंचवानें सारखे डोक्यावर तडाखे मारण्यास आरंभ केला. कथा संपेपर्यंत आपासाहेब ते तसेच सोशीत होता.

कथा संपल्यावर आपासाहेबानें समोर बसलेल्या कारकुनास हाक मारून विचारलें कीं, कथेस आरंभ झाल्यापासून चुळबूळ कसली चालली होती ? कारकुनानें सांगितलें कीं, कपड्यांत ढेकूण शिरल्यामुळें अशी गोष्ट घडली.

मग आपासाहेबानें डोईचें पागोटें काढून झाडलें तों त्यांतून भला मुठीसारखा विंचू बाहेर पडला. आपासाहेब कारकुनास म्हणाला, बेट्या, ढेकणानें इतकी तुझी तारांबळ उडवली, हा तर प्रहरभर सारखें माझें डोकें फोडीत आहे ( भा. व. खं. ३ जु. ऐ. गो. पृ. ४० ).

**आपा पुरंदरे ( धोंडो मल्हार )**—( मृ. स. १७८५ ) हा तुकोपंत पुरंदऱ्याचा नातू. पुरंदऱ्यांच्या घरांत तंटे होते. नीळकंठ आबा पुरंदरे दादाचे पक्षांत असून हा माधवरावाचे पक्षांत होता. कोळ्याच्या दंग्याच्या बाबतींत याचा सरंजाम जप्त झाला होता ( माधवराव पेशवे पाहा ). हा पुणें प्रान्ताचा सुभा होता. कात्रजच्या तलावाचें काम याच्या कारकीर्दीत झालें.

**आपा बळवंत** ऊर्फ **कृष्णराव बळवंत मेहेंदळे**—( स.१७४८-१७९८ ) हा पानपतवर पडलेल्या बळवंतरावाचा पुत्र. हा एक पेशवाईतील सरदार असून प्रथम राघोबादादाच्या बाजूस होता. पण जेव्हां हरिपंत फडक्यानें दादाचा पाठलाग सुरू केला आणि दादा नर्मदापार होऊन इंदुरास होळकरांकडे गेला, त्या वेळीं दादाची परिस्थिति पाहून, या वेड्यापिराच्या नादीं लागण्यांत आतां अर्थ नसून उलट हानि आहे, अशी याची व दादाच्या पक्षपात्यांची खात्री झाली. तेव्हां यानें ' आपल्याच्यानें तुम्हांबरोबर पळवत नाहीं' असें दादास सांगून, हा आपल्या सर्व सामानासह नर्मदेवरून परत येऊन तापीतीरीं चांगदेवावर हरिपंतास मिळाला; व यास हरिपंतानें आपल्याजवळ ठेवून घेतलें.

पुढें स. १७७५ मध्यें इसफ नांवाच्या गृहस्थानें दोन हजार गारदी व एक हजार राउतांनिशीं सातपुड्याचे आजूबाजूस राहून नेमाड तालुक्यांत उपद्रव करण्यास सुरुवात केली. तेव्हां हरिपंतानें याला इसफावर पाठविलें. नापारच्या लढाईंतून राघोबादादा पळून गेल्यावर हरिपंतानें याला व आणखी कांहीं सरदारांना मिळून गोविंदराव गायकवाडावर रवाना केलें. नंतर दादा जेव्हां सुरतेजवळ अश्विनीकुमार येथें इंग्रजांच्या आश्रयास गेला तेव्हां हा हरिपंतांचे तर्फेनें राघोबादादाशीं पत्रव्यवहार करूं लागला (खरे.१८४०, १८४२, १८४६, १८४९,१८५३). स. १७८६ मध्यें हरिपंतानें याला, बाजीपंत आण्णा आणि रघुनाथराव पटवर्धन यांना टिपूविरुद्ध निजामाच्या मदतीस पाठविलें. पण अखेरीस गजेंद्रगड येथें तह झाला ( स. १७८७ ). ( म.रि. उत्तर वि. २, पृ. २८४ ).

पुढें हा बहुतेक नानाफडणीसाचे सहवासांत असे. नंतर दौलतरावानें नानास कैद केल्यावर, बाजीरावानें आपाबळवंत व नानाचे दुसरे साथीदार यांना अटकेंत ठेविलें व प्रत्येकाचा जो द्रव्यसंचय असेल तो लुबाडून घेऊन त्यांना त्रास देण्याचा उपक्रम सुरू केला. तेव्हां मराठी राज्यांतील चाळीस वर्षांच्या धडामोडी पाहिलेल्या या पुरुषानें एकाएकीं आत्महत्या केली ( ता. १५-४-१७९८ ) याच्याविषयीं खालीलप्रमाणें उल्लेख आहे.

' आपा सारखा पुरुष होणें नाही. त्याजपाशीं पैका मागों लागले, तेव्हां अब्रूसाठीं अमृत प्राशन केलें, आणि देवाधीन झाले. '

**आपासाहेब पटवर्धन**—परशुरामभाऊचा मुलगा. नाना फडणीसाच्या वेळीं हा सैन्याधिकारी होता. इंग्रजांच्या मदतीस जाण्यास नानानें यास सांगितलें पण यानें तें नाकारलें.

**आपासाहेब भोसले**—हा कक्काजी भोसल्याचा ( भांबोरे येथील ) मुलगा होय. याला चिमणाजी नांवाचा वडील भाऊ होता.

हा मोठा बलवान् व रागीट असा होता. याच्या धाडसाविषयीं अनेक आख्यायिका जुनीं माणसें सांगतात. हा व याचा वडील बंधु चिमणाजी असे दोघेजण सायंकाळचे समयास महादेवाच्या दर्शनाकरितां चालले असतां वाटेंत दोघा हत्त्यांची मोठी टक्कर झाली, व ते दोघे लढत लढत जवळच एक गाय बांधिली होती तिजवर जावयास लागले. हे पाहून चिमणाजीनें भावास सांगितलें कीं, " अरे अप्पा, गाईला वाचीव. " हे भावाचे शब्द ऐकून हा एकदम दोन्ही हत्त्यांचे मध्यें घुसला व दोन्ही हातीं दोन्ही हले दोन्हीकडे सारून त्यांची झुंज सोडविली. याला मूलबाळ कांहींच नव्हतें ( मं. सप्तम सं. वृ. श. १८४१ पृ. ६९ ).

२. ( मुधोजी भोसले पाहा ).

**आबदार बेगम**—अकबर बादशहाची एक राणी.

**आबा काळे**—हा शिंद्यांच्या पलटणीवरचा अधिकारी. पुढें याचा व प्रतिनिधीचा बेबनाव होऊं लागला. कांहीं दिवस वाड्यांत व शहरांत कारभार करूं लागला. याच्या मदतीस विश्वनाथभट मामा व चिंतोपंत देशमुख हे होते. याचीं पत्रें उपलब्ध आहेत ( म. रि. उ ३ पृ. ६५ ).

**आबा कृष्ण शेलूकर**—आनंदराव काशीचा आप्त. यानें जातीनें बंदगान निजामचा ज्येष्ठ पुत्र अलिज्याहा याचा सैन्यासह जाऊन बंदोबस्त केला. पुढें निजामाशीं याची औरंगाबाद येथें मुलाखत झाली, तेव्हां यानें निजामाला लक्षावधि रुपयांचे नजराणे दिले व यालाहि त्यांनीं अनेक गांवें दिलीं ( पे. द. ३१.१६४ ).

सातारा जिल्ह्यांत कोरेगांव तालुक्यांत फत्यापूर म्हणून एक गांव आहे, तेथचा हा कुलकर्णी. हा घरचा फार दरिद्री होता, परंतु मोठा हुषार कारकून होता. होतां होईल तितकें आपलें ठिकाण सोडूं नये, अशी वतनदार लोकांना एक खोडच असते. त्याप्रमाणें हाल सोशीत हा तसाच घरीं होता; परंतु शेवटीं कंटाळून यानें घर सोडिलें आणि पुण्यास आला. तेथें पुष्कळ खटपटी करून ह्यानें फडांत कारकुनीची जागा मिळविली. ह्याचें अक्षर इतकें उत्तम होतें व लिहिण्याची शैली इतकी उत्कृष्ट होती कीं, जेव्हां जेव्हां ह्याचें काम नाना फडणिसासमोर जाई तेव्हां तेव्हां तें पाहून नाना फार संतुष्ट होई. पुढें नानानें आपल्या खाजगी कारकून मंडळींत याची नेमणूक केली. तेव्हां तर नानाची यावर फारच मर्जी बसली. पुढें खुद्द नानाचा कागदपत्रांचा रुमालहि नानानें याच्या ताब्यांत ठेवला. नानाचीं जीं अति विश्वासू माणसें होतीं त्यांत आबा शालूकर व गोविंदराव पिंगळे हे मुख्य होते. नानाच्या कृपेनें पुढें ह्याला गुजराथची सुभेदारी मिळाली होती. पुण्यास शालूकराच्या बोळ प्रसिद्ध आहे ( भा. व. खं. ३ जु. ऐ. गो. पृ. ३७–३८ ).

दुसरा बाजीराव आल्यावर चिमाजीआप्पाला गुजराथचा सुभेदार केला व यास दुय्यम सुभेदार नेमलें. नानाला कैद केलें तेव्हां याच्यावरहि तीच पाळी आली. पण दहा लक्ष रुपये देऊं करून हा सुटला. शिंद्याला रुपये देण्याकरितां यानें गायकवाडांत सक्तीनें कर वसूल केला तेव्हां गोविंदराव गायकवाडाचें द याचें भांडण जुंपलें व त्यांत इंग्रजाशीं संगनमत करून त्यानें याला कैद केलें. पण पुणें दरबारनें याला आपल्याकडे बोलावून घेतलें ( १५–१०–१८०१ ) ( म. रि. उ. वि. ३, पृ. ३८० ).

**आबाजी महादेव सोवनी**—हा एक राघोबादादाचा सरदार होय. जेव्हां हरिपंत फडक्यानें दादाचा पाठलाग सुरू केला तेव्हां हा व सदाशिव रामचंद्र हे दोघे राघोबादादातर्फे हरिपंताशीं मध्यस्थी करीत.

पुढें यानें दादाचा पक्ष सोडून हा हैदराजवळ नोकरीस राहून कारस्थानें करूं लागला. स. १७७७ त मानाजी फांकडे दादाचा पक्ष सोडून हरिपंताबरोबर कर्नाटकांत हैदरावरच्या मोहिमेंत होता. त्या वेळीं हैदराजवळ तुळ्या पवार, आबाजी महादेव व बाजीराव बर्वे हे होते. ह्या तिघांनीं मानाजीस कळविलें कीं, 'पैका पाहिजे तो पाठवितों, हरिपंताची फौज फोडावी, हैदरखान लढाईस उभे राहतील ते समयीं सर्वांनीं येऊन त्यास मिळावें.' याला मानाजीनें खालीलप्रमाणें उत्तर दिलें. 'आपल्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं अडवून बसतों, तुम्हीं चालून यावें.' त्याप्रमाणें मानाजीनें हैदराकडून पैसे घेऊन हरिपंतांचे सैन्यांतील यशवंतराव माने, निळकंठराव थोरात व महादजी भोंसले मुंगीकर वगैरे मराठे सरदार फितविले.

अशा प्रकारचीं भयंकर कारस्थानें यानें हैदराजवळ असतांना केलीं.

**आबाजी रघुनाथ चिटणीस**—हा देशस्थ ब्राह्मण असून शिंद्याचा कारभारी होता. याला शिंद्याच्या लष्कराची चांगली माहिती होती. तेव्हां याचे मार्फत नानानें फितुरी करून शिंद्याची फोडाफोड मांडली.

पुढें हा आपल्या मंडळीसह नानास येऊन मिळाला. नंतर दौलतराव शिंद्यानें याला कैद केलें. पण कांहीं कारणामुळें स. १७९९ च्या जानेवारी मध्यें दौलतरावानें याला कैदेंतून सोडवून जवळ आणिलें. शिंद्यानें सामोरें जाऊन याचा सत्कार केला. हा सरकारवाड्यांत जाऊन बाजीरावास भेटला. नानांचीही भेट घेतली. अशीं सर्वांशीं खलबतें करून यानें शिंद्याचा कारभार पुन्हा हातीं घेतला. हा आल्यापासून लुच्चांचा कारभार कमी झाला. याला कृष्णोबा नांवाचा एक भाऊ होता. हे दोघेहि नानाजवळ जेव्हां महाडास होते, तेव्हां नानाचे आग्रहावरून दहा लाख रुपये शिंद्यानें नजराणा घेऊन कृष्णोबाच्या नांवानें चिटणिसी करून दिली.

**आबाजी लक्ष्मण लाड**—हा लखबादादाचा मुलगा. हा यशवंतराव होळकरानें पुण्यावर केलेल्या स्वारींत हजर होता. त्या वेळीं यानें बरीच लूट मिळवली. प्रथम यानें अहमदनगर प्रांतांत लुटालूट केली. नंतर महादजीनें बांधलेला जामगांवचा उत्कृष्ट वाडा यानें खणून काढला ( म. रि. उ. ३ पृ. १९४–९६ ).

**आबाजी विश्वनाथ प्रभु**—याचा जन्म स. १६३१ मध्यें झाला. हा नेहमीं बाजी पासलकराबरोबर काम करीत असे. स. १६४९ मध्यें शिवाजीनें आपल्या सरदारांत दाखल करून घेतलें. मोरे याजवर जय मिळवून यानें जावळी काबीज केली. रोहिडा किल्ला घेतांना बाजी प्रभूबरोबर युद्ध करून त्याचा पराजय केला. बाजी प्रभूस शिवाजीकडे येण्यास यानें त्याचें मन वळविलें. संभाजी व राजाराम याच्या वेळीं हा मोंगलाशीं शौर्यानें झुंजला. स. १६९४ त औरंगजेबानें तोरणा ऊर्फ प्रचंड किल्ल्याला वेढा घातला असतां यानें मर्दुमकीनें किल्ल्याचें रक्षण केलें. पण परत येत असतां हा घातीथीं पतन पावला ( स. १६९४ ). याचा मुलगा जनाजी.

**आबाजी शंकर**—हा बाळोजी कुंजराचा कारभारी. याचा काल दुसऱ्या बाजीरावाच्या वेळचा होय. पुण्यांत याचा वाडा असलेला एक कसब्यांतील बोळ यांचे नांवें प्रसिद्ध आहे. यांचें उपनांव शाळिग्राम असावें.

**आबाजी सोनदेव बहुतकर**—हा कल्याण भिवंडीकडील सोनोपंताचा मुलगा. हा दादोजी कोंडदेवाच्या हाताखालीं तयार झाला. यानें स. १६४८ मध्यें कल्याण प्रांतावर स्वारी केली, व तेथील सुभेदार मुल्ला अहमद याजला कैद करून तो किल्ला व प्रांत हस्तगत केला. शिवाजी कल्याणास गेला आणि याची हुषारी पाहून यालाच तेथील सुभेदार नेमलें. याच स्वारींत मुल्ला अहमदची सुंदर सून याच्या हातीं आली. तिची शिवाजीनें सन्मानपूर्वक पाठवणी केली आणि याला दोष देऊन आपल्या लोकांस नीतिमत्तेचा धडा घालून दिला, असें सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत लिहिलें आहे. राज्याभिषेकाच्या वेळीं वसूली व हिशेबाचें काम याच्याकडे होतें. याच्या खात्यांत तीनशें कारकून होते. हणमंते कुटुंबांत हें मुज्मूचें काम पूर्वी असल्यानें त्याशीं याची चुरस होती. याचा धाकटा भाऊ निळो सोनदेव होय. पण याच्याकडे मुज्मू दिली होती, हें डफचें म्हणणें राजेवाडे खोटें आहे असें ठरवितात ( रा. प्रस्तावना, पा. ४४४ ).

**आबा पुरंदरे** ( नीलकंठ महादेव )— ( मृत्यु स. १७६५ ) हा महादोबा अंबाजी पुरंदरे याचा पुत्र. याच्या पत्नीचें नांव उमाबाई. हा माधवराव पेशव्याचा मुख्य दिवाण आणि सखाराम बापू बोकील हा दुय्यम दिवाण होता. माधवराव पेशवे व रघुनाथराव दादा यांच्यांत हा रघुनाथराव पेशव्याच्या बाजूचा होता. याचा मृत्यु शा. श १६८७ मार्ग व. ५ रोजीं झाला. याला औरस संतति नसल्यानें यानें आपला चुलत भाऊ त्रिंबक पुरंदरे याचा मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव नारायण असून तो महादजीपंत ऊर्फ बाबा या नांवानें प्रसिद्धीस आला.

**२.** ( मृ. स. १८२६ ) ( नीलकंठ महादेव पाहा. )

**आभीर**—पुराणांत भविष्यकालीन राजे सांगतांना आंध्रानंतर दहा आभीर राजांचा निर्देश आहे ( ब्रह्मांड ३. ७४.; वायु. २, ३७; विष्णु. ४. २४; भा. १२. १; मत्स्य. २७३. १८ ). आंध्रांनंतर हे झाले असें पुराणांत म्हटलें आहे. त्यावरून आभीरांचा काल आंध्रानंतरचा ठरतो. आंध्रांपैकीं शेवटला राजा पुलोमायी हा स. २२५ पर्यंत राज्य करीत होता हें निश्चित ठरलें आहे. त्यानंतर यांनीं सदुसष्ट वर्षे राज्य केलें असें मत्स्यपुराण, ब्रह्मांडपुराण व वायुपुराण यांत स्पष्ट म्हटलेलें आहे. पण यांची नांवनिशी स्पष्टपणें कोणींच दिलेली नाहीं.

रुद्रभूति आभीराचा निर्देश शक १०३ मधील गुंडाच्या शिलालेखांत आला आहे. पण हा रुद्रभूति राजा नसून रुद्रसिंह क्षत्रपाचा सेनापति होता.

वीरसेन ऊर्फ ईश्वरसेन अहरि यांचें वर्चस्व शक ३४१ मध्यें खानदेशावर होतें असें नाशिकच्या शिलालेखांत म्हटलें आहे ( E. I. Vol. VIII. P. 88 ). आभीर शब्दाचें अहीर हें अपभ्रष्ट रूप आहे. हा शिलालेख याच्या राज्यारोहणानंतर नवव्या वर्षीचा आहे. याच्या आईचें नांव दमरी व पित्याचें नांव शिवदत्त आभीर असें आहे. आंबेरी येथील देवगिरीचा सिंहदेव यादव याच्या शिलालेखांत 'गुर्जर व मालव राजे हे नम्र झाले व शूर आभीर राजांची सर्व जात नाश पावली.' असें वर्णन आहे. हे शूर आभीर राजे म्हणजे द्वारसमुद्राच्या बल्लाळराजांपैकीं नरसिंह होय. याचा कांहीं मुलुख सिंह ऊर्फ सिंघण यादवानें घेतला होता ( Burgess. Arch. Sur. Rep. 1878-86 ).

शालिवाहनानंतर तीनशें वर्षांत आभीर राजे खानदेश, नाशिक, काठेवाड, पालनपूर व कच्छ येथें राज्य करीत होते असें दिसतें. आठव्या शतकांत जेव्हां काठी लोक गुजराथेंत आले तेव्हां तेथें सर्वत्र आभीरांचा ताबा होता असें इतिहासावरून समजतें. हेमचंद्राच्या द्व्याश्रय काव्यांत जुनागडजवळील वनथली येथील चूडासम ग्रहरिपु राजा हा आभीर होता असें म्हटलें आहे. चूडासमाची अहेर राणे म्हणून पुढेंहि प्रसिद्धी दिसते. ख्रिस्ती शकांच्या आरंभीं नेपाळाकडे अहीर राजे झाले. आंबेरीच्या शिलालेखांत लिहिल्याप्रमाणें सिंघणाचा सेनापति खोलेश्वर यानें त्यांचा निःपात केला.

दिल्ली ऊर्फ हस्तिनापूर येथेंहि एका अहिरवंशानें राज्य केलें आहे. त्याच्या एकमेकींशीं मेळ नसलेल्या बऱ्याच याद्या उपलब्ध आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढें देतों.

१. दिल्लीच्या मित्रपाळ वंशांतील शेवटला राजा विक्रमपाळ यास अहीर नामक त्याच्या वजीरानें मारिलें व तो अहीर गादीवर बसला. त्यांत पुढीलप्रमाणें आठ पुरुष झाले आणि त्यांनीं १२५ वर्षे राज्य केलें. १ अहीर २४ वर्षें, २ विक्रम अहीर ३३ वर्षें, ३ मुलुखचंद्र २ महिने, ४ विक्रमचंद्र १२ वर्षें, ५ मूळचंद्र २ वर्षें, ६ रूपचंद्र १४ वर्षें, ७ मलराणचंद्र १२ वर्षें, ८ सूरचंद्र २६ वर्षें ( अर्वाचीन कोश ).

२. दयानंद सरस्वतीनें आपल्या सत्यार्थ प्रकाशांत मलुकचंदवंश म्हणून अशींच थोड्या फरकानें दहा नांवें दिलीं आहेत. त्यांनीं १९१ वर्षे एक महिना सोळा दिवस राज्य केलें असें दिलें आहे.

३. अनंत धोंडूजीकृत भारतेतिहास या पुस्तकांत अहीर वंशांतील सोळा नांवें दिली असून त्यांनीं २२७ वर्षे सात महिने व सत्तावीस दिवस राज्य केलें. त्यांतील पहिलीं आठ नांवें थोड्या फरकानें वरच्या सारखींच आहे.

या दंतकथेसारख्या माहितीवरून असा एक बराच बलिष्ठ वंश हिंदुस्थानांत होऊन गेला एवढीच गोष्ट सिद्ध होते.

या टिपणांतील बरीच माहिती मं. चे त्रै. वर्ष ७, अं. १-४, पा. १६५-१६७ वरून घेतली आहे.

**आमन(ण) यादव**—यादव घराण्यांतील महादेवाचा पुत्र. बापाचे पश्चात् गादीवर बसला (Paithana Grant, Ind. Ant. vol. XIV. p. 317 ). परंतु थोडक्याच दिवसांत कृष्णपुत्र रामचंद्रानें याला गादीवरून काढून टाकून आपण गादीवर बसला ( स.१२७१ ).

**आम्रदेव**—अनहिलपट्टणच्या नरपतिचा पिता. हा धारा नगरीस राहत असे ( भा. ज्यो. पा. ४७६ ).

**आम्रभट**—याला आंबडा असेंहि म्हणत ( अजयपाळ पाहा ).

**आयर्व्हिन वुइल्यम**—( जन्म स. १८४० मृ. १९११ ) हा बंगाल प्रांतांत नोकरीवर असून याला फार्सीची आवड व हिंदी लोकांविषयीं सहानुभूति विशेष होती.

याला फार्सी कागद जमविण्याचा नाद असून उत्तर मोंगलशाहीचे अनेक कागद व बखरी यानें जमविल्या. औरंगजेबाच्या पुढचा म्हणजे स. १७०७ पासून १८०३ मध्यें मोंगल बादशाही बुडाली तोंपर्यंतचा संगतवार इतिहास अस्सल कागदांच्या आधारें लिहिण्याचा याचा संकल्प होता. संशोधनाचें काम करण्यांत हा निष्णात असून वृद्धवेतन घेऊन स्वदेशीं गेल्यावर यानें हा उद्योग जोरानें सुरू केला. सर जदुनाथ सरकारांस औरंगजेबाचे कागद हेच पुरवीत असत. इतर संशोधकांनाहि मदत करण्यास हे नेहमीं तयार असत. यांच्या ग्रंथाचें नांव ' लेटर मोगल ' असें असून त्यांत स. १७०७-१७३९ पर्यंतचा इतिहास आला आहे. या ग्रंथांतील स. १७१२-२० च्या मोंगल कारभारास सय्यदांची कारकीर्द असें नांव असून आयर्व्हिनचे लेख ' अरेबियन नाईट्स ' सारखे चटकदार झाले आहेत. स. १७१२-२० पर्यंतच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीचा इतिहास लिहिल्यावर हा मरण पावला. त्यापुढील भाग याच्या लिखाणावरून संपादकानें तयार केला व प्रसिद्ध केला. संपादक सर यदुनाथ सरकार आहेत.

**आयामल्ल**—याला राजा म्हणत असून हा जयसिंहाचा मंत्री होता. याचा बिहारी सत्सई करणाऱ्या कृष्ण नांवाच्या हिंदी कवीला आश्रय होता. हा जयसिंह म्हणजे सवाई जयसिंह असावा.

**आयेशा**—अबू बकरची कन्या आणि मुहम्मद पैगंबरची अत्यंत लाडकी बायको होती. ही ७ वर्षांची कुमारिका असतांना लग्न झालें. ही महत्त्वाकांक्षी व उद्धट होती तरी हिच्याविषयीं लोकांत आदर असे. मुहम्मद पैगंबरावर हिचें फार वजन होतें.

हिनें मुहंमदाच्या निधनानंतर अलीला गादीवर न येऊं देण्याबद्दल कसून विरोध केला, व त्याच्याबरोबर लढाया केल्या.

पैगंबरी व धर्मनिष्ठांची माता असें हिला मुसुलमान संबोधीत असत. स. ६७८ मध्यें हिच्या वयाच्या ६७ व्या वर्षी ही मरण पावली.

हिच्या मृत्यूविषयीं एक आख्यायिका सांगतात. येझिदशीं एकनिष्ठपणें वागण्याचें हिनें मोठ्या उद्दामपणानें नाकारल्यावर पहिल्या मुआवियानें हिला मेजवानीस घरीं बोलाविलें. हिच्या खुर्चीखालीं न दिसेल असा खड्डा खणून त्यावर पानें फुलें पसरून ठेविलीं होतीं, तीं अशीं कीं त्यायोगें धोका दिसूं नये. जेव्हां ही खुर्चीवर बसली तेव्हां आयतीच खड्ड्यांत पडली व नंतर चुना, दगड वगैरेनीं तोंड बंद करून घेतलें.

**आरजु**—( स. १६७१-१७२३ ) याचें नांव सिराजुद्दीन अलीखान असून आरजु हें उपनांव आहे. याच्या पित्याचें नांव हसमुद्दीन रहसाम असें होतें. हा स. १६९५ मध्यें फर्रुखसियरच्या वेळीं दिल्लीस आला. दिल्लीविषयीं याला मोठें प्रेम वाटत असे. हा उर्दूपेक्षां फार्सीतील नामांकित कवि आहे. यानें असे शिष्य तयार केले कीं, त्यामुळें हा उच्चपदास पोंचला. जानजाना मजहर, सौदा, मीर तकी, मीर दर्द वगैरे याचे शिष्य होत. यानें उर्दू भाषेची सुधारणा केली. याचे फार्सी कवितांचे दोन दिवान ( ग्रंथ ) प्रसिद्ध आहेत. याशिवाय यानें कांहीं उपयुक्त पुस्तकें लिहिलीं आहेत. सिराजुल्लुकात, चिरागे हिदायत, शरह गुलिस्ताने सादी, शरह सिकंदरनामा, हीं त्यांतील कांहींचीं नांवें होत. वास्तविक हा उर्दू कवि नव्हता ( क. कौ. भा. ४ ).

**आयलू भासेअर**—हा एक तेलगू कवि होय. हा विजयानगरच्या २ ऱ्या वेंकट राजाचा आश्रित होता.

यानें राजाच्या सांगण्यावरून हले ( जुन्या ) कानडी भाषेंतील रट्ट कवीच्या कवितांचें भाषांतर तेलगूंत करून त्यांस रेत्त मतमु असें नांव दिलें ( अरविदु डिनस्टी ५२१).

यालाच आयला भास्कर म्हणत असावेत. यानें केतुमतन नांवाच्या ग्रंथाचें तेलगींत श्लोकबद्ध भाषांतर केलें ( तेलगू वाङ्मय, पा. ५६ ).

**आरण्यराज**—अबूच्या परमारांपैकीं उत्पलराजाचा पुत्र.

**आरनेरळ चामराज**—( स. १४७८-१५१३ ) यालाच आर्बरळ चामराज दुसरा असें सिवेलनें म्हटलें आहे. हा म्हैसूरच्या तिम्मराजाचा पुत्र. याला बट्टाद ( बेत्तड ) नांवाचा मुलगा होता.

**आरबखान**—हा अहमदाबादचा सुभेदार होता. हा अत्यंत हुशार होता. याला एक अत्यंत रूपवान् मुलगी असून ती दिल्लीचा शहाजादा सुजा यास दिलेली होती. ती सासरीं गेली तेव्हां आरबखानानें तिच्याबरोबर २० हत्ती, १ हजार घोडे व निरनिराळ्या जिनसांनीं भरलेले ६ हजार गाडे नजर पाठविले. अहमदाबाद येथील याच्या कचेरींत पांचशें नोकर असून शिवाय याच्या घरचे चारशें नोकर होते. ते सर्व याच्या घरीं जेवीत. याच्या घरचा खर्च दरमहा सुमारें १२-१३ हजार होता. याचे खाजगी घोडे पांचशें व हत्ती पन्नास होते. त्यांचा खर्च वेगळाच. याच्या नोकर-चाकरांचे पोषाख मौल्यवान् होते, तरी यांचें राहणें अगदीं साधें होतें. फ्रेंच गृहस्थ मंडेल्स्लो हा आरबखानाला भेटला होता व आरबखान त्याशीं अत्यंत सन्मानानें वागला. आरबखान बराच क्रूर व कडक असे ( ब्रि. रि. पू. १, ३१० ).

**आरम गुलाम**—दिल्लीच्या गुलाम घराण्याचा संस्थापक जो कुतुबुद्दीन त्याचा हा मुलगा होय.

हा बापाच्या पाठीमागून तख्तनशीन झाला. परंतु प्रबळ सुभेदारांच्या हाताखालीं असलेलें एवढें अफाट राज्य चालविण्याची यास शक्ति नव्हती, त्यामुळें यास चहूं बाजूंनीं शत्रू उत्पन्न झाले. अशा स्थितींत दिल्लीच्या प्रमुख दरबारी मंडळीनें कुत्बचा जांवई अल्तमश, बदाऊन प्रांताचा अंमलदार, ह्यास दिल्लीस येऊन राज्यकारभार हातीं घेण्याविषयीं विनंति केली.

याचा काल स. १२१० असून यानें फक्त कांहीं महिनेच राज्य केलें असावें. यास कांहीं पुस्तकांत आरामशाहा असेंहि म्हटलें आहे ( मु. रि. भा. १ ला).

**आर्द्रक (भद्रक) शुंग**—शुंग घराण्यांतील एक राजा. याला वायुपुराणांत ध्रुक किंवा भद्र, तसेंच मत्स्यपुराणांत अंतक असें म्हटलेलें आहे. याच्या पित्याचें नांव भागवतांत वसुदेव व ब्रह्मांडपुराणांत वसुमित्र असें दिलेलें आहे. यानें दोन वर्षें राज्य केलें.

**ऑर्म**—याचें नांव रॉबर्ट ऑर्म. कॅ. अलेक्झँडर हॅमिल्टन याजबरोबर हा व्यापार करण्याकरितां हिंदुस्थानांत आला. हा बंगाल प्रांतांत राहत असे. यानें व बर्नियर यांनीं बंगाल प्रांताविषयीं बरीच माहिती दिली आहे. ऑर्म यानें मराठ्यांचा इतिहाससुद्धां लिहिला आहे. त्याचें नांव हिस्टॉरिकल फ्रॅग्मेंट्स. यानें अनेक ठिकाणचे उतारे संग्रहित केले ते इंडिया ऑफिसमध्यें ठेविले आहेत. यानें नकलून घेतलेल्या कित्येक कागदांच्या अस्सल प्रती आज उपलब्ध नसल्यामुळें ह्या संग्रहाचें विशेष महत्त्व आहे. यांतील शिवकालीन पत्रांतील उतारे पत्रसारसंग्रहांत मराठींत दिले आहेत.

**आर्य असंग**—( स. ४५० सुमारें ) यास चिनी भाषेंत Mucak असें म्हणत असत. या बुद्ध तत्त्वज्ञाचा जन्म गांधार येथें झाला. प्रथम हा महिशासक पंथाचा अनुयायी असून हीनयान पंथांतील वैभाषिक तत्त्वज्ञानाचें अनुसरण करीत असे. तदनंतर हा मैत्रेयाचा शिष्य बनला व महायान पंथांतील योगाचार्य तत्त्वज्ञानाचें अनुसरण करूं लागला. कांहीं दिवस नालंद येथें पंडित म्हणून हा राहत असे. हा स. ४५० च्या सुमारास होऊन गेला.

स० ५३१ त याच्या 'महायानसमपरिग्रहशास्त्र' या ग्रंथाचें चिनी भाषेंत भाषांतर करण्यांत आलें. तेव्हां याची जास्तींत जास्त अलीकडची तारीख म्हणजे स. ५३१ ही धरली जाते. हा कौशंबी व अयोध्या या ठिकाणीं कांहीं वर्षें राहत असे. त्या दोन्ही ठिकाणचा नष्टप्राय संघाराम सनाच्या ७ व्या शतकांत ह्युएन्संगानें पाहिला होता.

यानें एकंदर १२ ग्रंथ लिहिले, त्यांपैकीं बऱ्याच ग्रंथांच्या चिनी व तिबेटी प्रती उपलब्ध आहेत. डॉ. सुगिउरू ( Sujiuru ) यांनीं चिनी प्रतीवरून असें सिद्ध केलें आहे कीं असंगानें जेनिओच्या ( Genyo ) १० व्या भागांत तत्त्वज्ञानावर लिहिलें आहे. परंतु या ठिकाणीं त्यानें आपला गुरु मैत्रेय याच्या विधानांचीच पुनर्वाच्यता केली आहे. परंतु जःच्छुः ( Zaschuh ) च्या १६ व्या भागांत मात्र तत्त्वज्ञानावर लिहितांना यानें स्वतंत्र विचार प्रगट केले आहेत ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक ).

**आर्यक (घनश्याम)**—हा महादेव व काशी यांचापासून झालेला मुलगा असून तुकोजी नांवाच्या मराठी राजाचा प्रधान होता. तसेंच हा एक संस्कृत भाषेतील नाटककार होता.

यानें राजशेखर कवीचा उल्लेख आपल्या ग्रंथांत केलेला आहे. यानें कुमारविजय नांवाचें पंचांकी नाटक लिहिलें. त्यांत तारकासुरावर कुमारानें मिळविलेल्या जयाचें वर्णन केलेलें आहे. तसेंच यानें डमरूक, मदन-संजीवन, नवग्रहचरित नांवाचें तीन अंकी नाटक, प्रचंड राहूदय नांवाचें अन्योक्तिपर नाटक, अशीं नाटकें लिहिलीं.

**आर्यकाळ**—धर्मप्रचारक तिबेटी ग्रंथांवरून असें दिसतें कीं हा ख्रि. सनाच्या दुसऱ्या शतकांत हिंदुस्थानांतून चीनमध्यें बौद्धधर्माच्या प्रचारार्थ गेला.

**आर्यचक्रवर्ति**—हा तामीळ लोकांतील मुख्य होता; हा आर्य नव्हता. सिलोनमध्यें स. १२७७-८८ मध्यें जेव्हां भुवनेश्वरबाहु १ ला राज्य करीत होता व मोठा दुष्काळ पडला होता, तेव्हां तामीळ शत्रु पांड्य राजानें हाकून दिल्यामुळें सिलोनच्या पुढल्या किनाऱ्यावर उतरले होते. तेथें आर्यचक्रवर्तीस मोठ्या सैन्यानिशीं पांड्य राज्यांनीं पाठविलें.

आर्यचक्रवर्तीनें सुभागिरि देशांत प्रवेश केला व पुष्कळ संपत्ति व दांताचे अवशेष असे घेऊन पांड्य देशास परत आला.

या वेळीं पांडयराजा कुलशेखर पहिला राज्य करीत होता. यास ते अवशेष दिले. पुढें पराक्रमबाहु ३ रा (स. १२८८-९३) यानें पांड्य देशांतून अवशेष परत आणून, पराक्रमबाहु ४ था यानें बांधलेल्या देवळांत ते आणून ठेविले; असें सिंव्हलीस लोकांच्या महावंश ग्रंथांमध्यें लिहिलें आहे ( एन्शन्ट डेक्कन भा. १, पा. १७० ).

**आर्यदीक्षित**—हा द्रविड स्मार्त ब्राह्मण असून कवि होता. हा शके १६०० मध्यें अग्रहार गांवीं होता. याची मान्यता लोकांत चांगली होती.

यानें अलंकारशास्त्र व अध्यात्मविद्या या दोहोंवर मिळून एकंदर ८४ ग्रंथ लिहिले. आपल्या वयाच्या ९० व्या वर्षी द्रविड देशांतील चिलब्रम गांवीं हा मरण पावला. ग्यारेटसाहेबांनीं याचें नांव आपल्या कोशांत आर्यहिच्छित असें चुकून लिहिलेलें आहे. ऑक्रेक्टसूचींत याचें नांव आढळत नाहीं.

**आर्यदेव**—माध्यमिक तत्त्वज्ञानावर लिहिणारा हा दुसरा बुद्ध ग्रंथकार होय. यास, कर्णरिप, काणदेव, नीलनेत्र व पिंगलानेत्र इत्यादि उपनांवें आहेत. याचा जन्म दक्षिणेंत झाला असून हा नागार्जुनाचा पट्टशिष्य होता. ह्युएन्संगच्या म्हणण्याप्रमाणें आर्यदेवानें महाकोशल, लुब्न, प्रयाग, चोल व वैशाली ह्या देशांत फिरून लोकांस तेथील तार्किक वादांत जिंकून व तो त्यांस बुद्धधर्माचीं खरीं तत्त्वें शिकवून मोठी कीर्ति संपादन केली. लामा तारानाथाच्या म्हणण्याप्रमाणें आर्यदेव नालंद येथें बरेच दिवस राहत असून तेथें हा पंडित होता. आर्यदेव चंद्रगुप्त मौर्याच्या कारकीर्दीत भरभराटीस आला. स. ४०१ मध्यें कुमारजीवानें आर्यदेवाच्या चरित्राचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. तेव्हां आर्यदेव हा जास्तीत जास्त अलिकडे म्हणजे स. ४०१ च्या सुमारास होऊन गेला असावा. यानें माध्यमिक तत्त्वज्ञानावर बरेच ग्रंथ लिहिले आहेत. उ० शतकशास्त्र, ब्रह्मप्रमथन, मुक्तिहेतुसिद्धि, इत्यादि. या सर्व ग्रंथांवरून याचें तत्त्वज्ञानाचें अगाध ज्ञान दिसून येतें ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक ).

**आर्यनाथ**—दक्षिणेंत मुसलमानांना विरोध करणारा एक राजा. हा मुसलमानांशीं युद्ध करण्यांत गुंतलेला असे. यानें लोकोपयोगी कामेंहि पुष्कळ केलीं. यानें सिलोनवर स्वारी केली व तेथें हा लढाईत मारला गेला ( स. १५७३ च्या पूर्वी ). याच्या मागून सिलोनचा राजा कुमार कृष्णप्पा झाला.

**आर्यभट**—( जन्म स. ४७६ ) भारतीय ज्योतिःशास्त्रांमध्यें हा पहिला आर्यभट होय. याचा आर्यभटीय नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे. उपलब्ध असलेल्या पौरुष ज्योतिष ग्रंथांत याच्याहून प्राचीन दुसरा नाहीं. याच्या ग्रंथास 'आर्यसिद्धांत' म्हणतात. आर्यसिद्धांताचे दोन भाग केलेले असून त्या ग्रंथावर सूर्यंयज्वन् नांवाच्या ज्योतिष्यानें टीका केलेली आहे. स. १८७५ सालीं डॉ. केर्न यानें आर्यसिद्धांत टीकेसहित हॉलंड देशांत लेडेन येथें छापून काढला. यानें थोडक्यांत संख्या दाखविण्याकरितां जी परिभाषा योजली ती पूर्वी दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांत आढळत नाहीं, यावरून ही मूळ कल्पना आर्यभटाची असली पाहिजे. या पद्धतीनें काम फार थोडक्यांत होतें. याची युगपद्धति इतर सिद्धांतांहून थोडीशी भिन्न आहे. एका मनूचीं युगें आर्यभट७२ म्हणतात व इतर ७१ म्हणतात. महायुगाचें प्रमाण यांचें व इतरांचें सारखेंच आहे. गणितशास्त्राची वाढ ज्योतिषाच्या आश्रयानें झाली व त्यांत अंकगणित, बीजगणित व गोलगणित अशा तीन शाखा मानून हें शास्त्र अभ्यासलें पाहिजे ही

गोष्ट प्रथम यानें आपल्या ग्रंथांत मांडली आहे. हा वेध घेण्यांत म्हणजे आकाशाचें सूक्ष्म अवलोकन करण्यांत प्रवीण होता व वेधसिद्ध आंकड्यांची संगति लावण्यासाठीं नवीन उपपत्ति मानण्यास तयार होता.

याचें वसतिस्थान कुसुमपूर होतें. हें बंगाल्यांतील पाटणा होय, असें समजतात. परंतु बंगाल्यांत आर्यसिद्धांत मुळींच चालत नाहीं, यावरून आर्यभटाचें कुसुमपूर हें दक्षिणेंत असेल, असा तर्क पूर्वी कै. दीक्षित यांनीं केला होता, तो आतां–याच्या सिद्धांतावरील विस्तृत भाष्यग्रंथ उपलब्ध झाला असून तो त्रिवेंद्रम् येथें छापण्यांत आला आहे, त्यावरून–खरा ठरतो. त्यावरून हा केरल प्रांतांतील होता असें आतां निश्चित ठरलें आहे. पृथ्वी प्रत्यहीं आपल्या भोंवतीं फिरते म्हणजे तिला दैनंदिन गति आहे, असें मानणारा ज्योतिषी हिंदुस्थानांत एक आर्यभटच झाला, पण पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते असें याचें मत होतें असें दिसत नाहीं. याचा एखादा करणग्रंथ असावा पण तो सांप्रत उपलब्ध नाहीं.

याच्या ग्रंथावरून याची योग्यता फार मोठी आहे. याच्या ग्रंथांतील कांहीं उतारे व आधार पुष्कळ लोकांनीं घेतले आहेत. लल्ल या नांवाचा जो एक ज्योतिषी होऊन गेला तो याचा अनुयायी होता. याचे सिद्धांत दक्षिण हिंदुस्थान व मलबार प्रांतांत विशेष मान्य आहेत. बंगाल व महाराष्ट्रांत जे ज्योतिषग्रंथ आहेत त्यांत आर्यसिद्धांताचीं वचनें आढळत नाहींत.

अल्बीरूनी याजपाशीं आर्यभटीय ग्रंथाचा कांहीं तरी भाग व त्याचें अरबी भाषांतर होतें. हें भाषांतर खलीफ मनसूर याच्या कारकीर्दीत झालें असावें ( भा. ज्यो. ) याच्या आर्यभटीय ग्रंथास आर्यभटीयलघुसिद्धांत किंवा लघुआर्यसिद्धांत असेंहि म्हणतात. या ग्रंथाच्या पहिल्या भागास 'दशगीतिका' आणि दुसऱ्या भागास 'आर्याष्टाशत' असें म्हणतात. दशगीतिकेवर भूतविष्णूची टीका असून आर्याष्टाशतावर सोमेश्वराची टीका आहे. यानें सूर्य सिद्धांतावर एक टीका लिहिली आहे. तिचें नांव सूर्यसिद्धांतप्रकाश असें आहे.

२. या आर्यभटाच्या एका सिद्धांताची एक प्रत पुणें डेक्कन कॉलेजच्या ग्रंथसंग्रहालयांत आहे. तींमध्यें त्या सिद्धांतास 'लघु आर्यसिद्धांत' असें म्हटलें आहे; परंतु स्वतः ग्रंथकारानें 'लघु' असें कोठेंच म्हटल्याचें आढळत नाहीं. त्यानें केलेल्या आर्यमध्यें सुद्धां तो 'सिद्धांत'च म्हणतो. हा पूर्वीच्या आर्यभटाहून अर्वाचीन आहे, म्हणून यास द्वितीय म्हणण्यांत येतें; आणि द्वितीय हें नांव आर्यसिद्धांतास देणें सोईचें पडतें म्हणून तसें करण्यांत येतें. यानें आपला काल सांगितला नाहीं. एके ठिकाणीं आपल्या ग्रंथांत हा म्हणतोः

एतत्सिद्धांतद्वयमीषद्यातें कलौ युगे जातं ॥ २ ॥

यावरून कलियुग लागल्यावर लवकरच हे दोन सिद्धांत झाले असें दाखविण्याचा याचा उद्देश आहे; परंतु ब्रह्मगुप्तानंतर हा झाला अशी खात्री वाटते. कारण हा आपला सिद्धांत कलियुगारंभानंतर लवकरच झाला असें म्हणतो, तरी आपली गणना पौरुष ग्रंथांतच करतो.

याच्या ग्रंथांत युगपद्धति आहे. कल्पारंभ रविवारीं आहे. या प्रमाणावरून खात्रीनें वाटतें कीं ब्रह्मगुप्तानंतर, शके ५८० च्या नंतर हा झाला. ही याची कालाची मर्यादा झाली. अर्वाचीन मर्यादा पाहिली तर भास्कराचार्यांनीं याचा उल्लेख केलेला आहे. यावरून शके १०७२ पूर्वी दुसरा आर्यभट झाला असला पाहिजे, हें उघड आहे. यानें अयनांश काढण्याची रीत दिलेली आहे, परंतु ती प्रत्येक वेळीं बरोबर ठरतेच असें नाहीं.

याच्या ग्रंथाचे १८ अधिकार आहेत; व त्यांत सुमारें ६२५ आर्या आहेत. पहिल्या १३ अध्यायांत करणग्रंथांतील निरनिराळ्या अधिकारांत असणाऱ्या सर्व गोष्टी आहेत. यानें संख्या दाखविण्याकरितां पाटीगणितांत मात्र प्रसिद्ध संज्ञा योजिल्या आहेत, बाकी सर्वत्र संख्या दर्शविण्यास अक्षरसंज्ञा योजिल्या आहेत.

**आर्यशूर**—हा बराच प्रसिद्ध कवि असून अश्वघोषाच्या संप्रदायांतील असावा.

यानें 'जातकमाला' ( समूहाचें नांव ) लिहिल्या असून त्यांत नवीन गोष्टी लिहिण्याची तसदी घेतली नाहीं. परंतु जुन्याच गोष्टी सुंदर खुबीदार भाषेंत पुन्हा कथन केलेल्या आहेत. त्यांतील गद्य व पद्य काव्यदृष्ट्या उत्कृष्ट व शुद्ध असून त्यांत कृत्रिमतेपेक्षां खुबीदारपणा अधिक दिसून येतो. हा बहुधा राजदरबारीं धर्मोपदेशकाचें काम करीत असे. जातकमाला या ग्रंथांत चौतीस जातकें असून तीं चरियापिटकांतील पस्तीस जातकांप्रमाणेंच, बोधिसत्त्वाच्या पारमित्तांचें ज्ञान करून देण्यासाठीं लिहिलेलीं आहेत. पालिजातकसमुच्चयांत ज्या थोड्या गोष्टी सोडून दिलेल्या आहेत, त्यांपैकीं एक 'क्षुधापीडित व्याघ्री आपल्या पिल्लांना खाऊन टाकण्याच्या बेतांत आहे असें पाहतांच तिला अन्न पुरविण्यासाठीं बोधिसत्त्वानें स्वतः आपला प्राण दिला' ही पहिली गोष्ट आहे.

त्या वेळीं हिंदुस्थानांत विशेष लोकप्रिय व बऱ्याच प्रचलित असलेल्या ग्रंथांपैकीं एक–अशी इत्सिंगानें जातक-

मालेची स्तुति केली आहे. अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रांमध्यें जातकमालेंतील कथांसंबंधीं चित्रें असून समर्पण लेखामध्यें आर्यशूरानें केलेलें श्लोक आहेत. प्राचीन लिपीविद्येप्रमाणें हे खोदीव लेख इ. सनाच्या सहाव्या शतकांतील असावेत. ज्या अर्थी आर्यशूराच्या दुसऱ्या ग्रंथांचें स. ४३४ त चिनी भाषेंत भाषांतर झालें होतें, त्या अर्थी हा कवि बहुधा स. चौथ्या शतकांत झाला असावा ( विंटरनिझ–हिस्टरी ऑफ इंडिया, बौद्ध काळ ).

**आर्यश्रुतकीर्ति**—हा पञ्चवस्तुग्रंथाचा कर्ता. याचा काल न. १०३ असा प्रो० पाठकांनीं ठरविला आहे ( सि. सं. ग्रामर पृ. ६७ ).

**आर्यसमुद्र**—हरदत्ताचा उत्तराधिकारी.

**आर्यसुस्थित**—यानें कोटिशः मंत्राचा जप केला. त्यावरून यास कोटक व काकंदिक नगरांत जन्मला म्हणून काकंदिक अशीं दोन बिरुदें होतीं. याचें गोत्र व्याघ्रापत्य होतें. ९६ व्या वर्षी वीरसंवत् ३१३ त हा मरण पावला. यापासून कोटिकगच्छ शाखा उत्पन्न झाली. सुप्रतिबुद्ध याचा धाकटा भाऊ होता.

**आर्यावर्त**—( हुइनि पाहा ).

**आलम**—(स.१६५६)हिंदी भाषेंतील कवि. हा सनाढ्य ब्राह्मण होता, असें शिवसिंह म्हणतो. एकदां यानें आपलें शिरस्त्राण शेख नांवाच्या रंगारणीकडे रंगवावयास दिलें. त्यांत एक अर्धी कविता चुकून गेली. ती शेखनें पुरी करून कपड्याबरोबर याच्याकडे दिली. तेव्हां यानें तिला एक हजार रुपये बक्षीस दिले. तेव्हांपासून दोघेंहि एकमेकांवर प्रेम करूं लागले. शेवटीं यानें मुसलमानी धर्म स्वीकारून शेखशीं लग्न केलें. याच्या कवितेचे तीन चरण हा करी व चवथा शेख करी. याचा कवितासंग्रह आलमकेलि नांवानें प्रसिद्ध आहे. शिवाय यानें 'माधवानलकामकंदला' नांवाची गोष्ट पद्यात्मक रचली आहे. याची कविता प्रेम व चमत्कारपूर्ण आहे ( क. कौ. १; शब्दसागर प्रस्तावना ).

**आलम अली**—( स. १७१८ ते १७२० ) हा सय्यद हुसेनचा पुतण्या होता. याला दत्तक घेऊन त्यानें मुख्य प्रतिनिधी म्हणून औरंगाबादेस ठेवून दिलें. हुसेनकडून खबर येतांच हा निजामावर चालून गेला. याच्याजवळ एकंदर तीस हजार फौज होती. पराभूत दिलावरची फौज याला येऊन मिळाल्यामुळें याला जोर आला. निजाम आणि हा यांच्यांत नरमाईचें बोलणें सुरू झालें. निजाम नको नको म्हणत असतां यानें आपली फौज पुढें नेली. पुढें याला मराठ्यांची बरीच मदत मिळालीं. निजामानें परत जोराचा हल्ला ता. १०–६–१७२० रोजीं चढविला, तेव्हां निजामानें याला गोळी घालून ठार मारलें. निजामाच्या एका सरदारानें याचें शिर कापून नेलें. ही लढाई वऱ्हाडांत पैन घाटांत बालापूर येथें झाली ( मु. रि. भा. २, पृ. ३९९ ).

**आलम फारूकी**–दाऊदखान फारूकीचा मुलगा आंदिल तिसरा त्याचें हें नांव आहे, असें केंब्रिज हिस्टरी म्हणते.

**आलमगीर मोगल**—( औरंगजेब पाहा ).

**२.** दिल्लीच्या मोगल घराण्यांतील जहांदरचा हा मुलगा. हा स. १७५४ मध्यें गादीवर बसला व सर्व कारभार स्वतःच्या हातीं घेतला.

या वेळीं मराठ्यांचें वर्चस्व उत्तर हिंदुस्थानांत फार असल्यामुळें सर्व मुसलमान मराठ्यांच्या विरुद्ध बनून त्यांनीं अब्दालीस हिंदुस्थानांत बोलाविलें. अब्दालीनें पंजाब खालसा केला, तेव्हां तो परत घेण्यासाठीं मराठ्यांनीं स्वारी करून अब्दालीच्या मुलास तेथून हांकलून दिलें. त्यावर अब्दालीनें पुन्हा स. १७५९ सालीं स्वारी केली. त्या धामधुमींत आलमगीराचा खून झाला.

**आलम लोदी**—लोदी घराण्यांतील जो बहलूल त्याचा हा एक पुत्र होय. याला निजामखान, मुबारक, याकूब, फतहखान, मूसा व जलालखान असे सहा भाऊ होते. त्यांपैकीं फक्त निजामखान दिल्लीच्या गादीवर आला.

**आलिमशाह**—हा सय्यद घराण्यांपैकीं दिल्लीचा एक बादशहा होय. हा स. १४४५ मध्यें गादीवर आला. याच्यापासून बहलोल लोदी यानें स. १४५१ मध्यें राज्य घेतलें. अलाउद्दीन आलिमशाह सय्यद असें याचें नांव आहे.

**आलीबेग**—महादजी शिंद्यांचा सरदार. अलाउद्दीन सय्यदचें नामान्तर.

**आलु**—( अल्लट पाहा ).

**आल्बुकर्क**—( अल्बुकर्क पाहा ).

**आल्मीडा**—( स. १५०५–०९ ) हा पोर्तुगीझ अधिकारी होय. पोर्तुगीझ राजानें आपल्या हिंदुस्थानांतील आरमारावर व सर्व व्यापारावर देखरेख ठेवण्याबद्दल फ्रान्सिस्को ड आल्मीडा या वजनदार मनुष्याची नेमणूक करून त्यास इकडे पाठविलें. स. १५०५ च्या सप्टेंबरांत कान्नूर येथें दाखल झाल्याबरोबर आल्मीडानें 'कोचीन, कान्नूर व सीलोन' ह्या ठिकाणचा पोर्तुगीझ 'व्हाइसरॉय' अशी भपकेदार पदवी धारण केली. हा अधिकार याजकडे तीन वर्षें चालणारा होता.

किल्ले, तट वगैरे बांधून आपल्या वसाहती मजबूत करून मुसलमानांचा उच्छेद करावयाचा, आणि आरबी समुद्रावर व एकंदर हिंदी महासागरावर दुसऱ्या कोणाचा शह राहूं द्यावयाचा नाहीं, हें मुख्य काम आल्मीडानें हातीं घेतलें. यानें आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्यावर किल्वा येथें किल्ला बांधला, आणि मोंबासा येथील अधिकाऱ्यास आपला मांडलिक बनविलें. तसेंच गलबतांच्या रस्त्याचे वाकबगार खलाशी पाहिजे तेव्हां मिळावे म्हणून त्यांसाठी कायमची नेमणूक करून दिली. यानें होनावर व कान्नूर येथील राज्यें जिंकून कोचीन येथें मुख्य ठाणें वसविलें. याचा मुलगाहि पराक्रमी होता. त्याचा अंत मलीक आयझ याच्याबरोबर झालेल्या लढाईत ( स. १५०८ ) झाला. मलीक आयझ यास जय मिळाला तरी त्यानें उदार अंतःकरणानें हातीं लागलेल्या पोर्तुगीझ लोकांस चांगलें वागविलें आणि असा शूर पुत्र पोटीं निपजल्याबद्दल गौरवदाखल आल्मीडास त्यानें पत्र लिहिलें.

इतक्यांत आल्मीडाचीं तीन वर्षे भरून अल्बुकर्कची पुन्हां नेमणूक होऊन तो लिस्बनहून हिंदुस्थानांत आला. पुत्राच्या मरणाचा सूड उगविल्याशिवाय हा काम सोडीना. अल्बुकर्कहि ह्याच्या आड आला नाहीं. आल्मीडा वेगानें मुसलमानांवर चालून आला. स. १५०९ त दीव नजीक उभय पक्षांची निकराची लढाई होऊन तींत तीन हजार मुसलमान व बावीस पोर्तुगीझ पडले. अहमदाबादचा सुलतान महंमद बेगडा यानें मलीक आयझाचा पराभव झालेला पाहून त्याचा पक्ष सोडून पोर्तुगीझ लोकांशीं तह केला. अशा प्रकारें काम करून हा कोचीन येथें परत आला व स. १५०९ च्या नवंबर महिन्यांत परत जात असतां रस्त्यांत आफ्रिकेच्या किनाऱ्यावर मारामारी होऊन तींत हा मारला गेला.

फ्रान्सिस्को ड आल्मीडा हा हिंदुस्थानचा पहिला पोर्तुगीझ व्हाइसरॉय होय. हिंदुस्थानांत पोर्तुगीझ लोकांचें राज्य स्थापन करणें शक्य नाहीं, फक्त आरमार ठेवून बखारीचें संरक्षण करावें म्हणजे झालें, असें याचें मत होतें. कोचीन येथें असतांच अल्बुकर्क व अल्मीडा ह्या दोघांची बरीच चकमक उडून अल्बुकर्क यास कांहीं दिवस कैदेंत कंठावे लागले ( ब्रि. रि. पूर्वार्ध, पृ. १००-१०५ ).

**आल्हण** ( आहलांदन )--नदोल येथील चाहमान घराण्यांतील जो आशा-राजा त्याचा हा मुलगा होय. स. ११५३ मध्यें हा गादीवर येऊन यानें ११६१ पर्यंत राज्य केलें.

यानें सौराष्ट्रिक जिंकून चालुक्य राजा कुमारपाल यास मदत केली. याला केल्हण, गजसिंह, आणि कीर्तिपाल असे तीन मुलगे होते. याच्या नंतर याचा मुलगा केल्हण हा स. ११६५ मध्यें गादीवर आला.

**आल्हणदेवी**—ही हूणकन्या असून कलचूरीपैकी कर्णाची पत्नी होय.

**२.** ही मेवाडच्या वैरिसिंहाची कन्या असून कलचूरीपैकी गयकर्णाची पत्नी. हिचा भेलाघाटच्या शिवमंदिरावर कलचूरी संवत् ९०७ (स. ११५५) मधील लेख आढळतो. या विधवेनें दोन घराण्यांची माहिती दिली आहे. हिला नरसिंहदेव व जयसिंहदेव नांवाचे दोन पुत्र होते. ते दोघे क्रमानें चेदिदेशाचे राजे झाले.

**आल्हा**—( ऊदल पाहा ).

**आवजी**—नानासाहेब पेशव्याचा चिटणीस होय. ह्याला महिपति नांवाचा एक भाऊ असून तोहि नानासाहेब पेशव्यांचा चिटणीस होता.

**आवजी कवडे**—( स. १७३७-१७५७ ) हा थो. बाजीराव पेशव्याचा सरदार होता. याचा डभई येथें पिलाजी गायकवाड याचा मुलगा दमाजी गायकवाड यानें पराभव केला ( एप्रिल १७३१; म. रि. म. भा. १, पा. ३८६ ). भोपाळच्या स्वारींत बाजीरावानें रघूजी भोंसले यास मदतीस बोलाविलें असतां तो आला नाहीं. तेव्हां बाजीरावाचा व त्याचा बिघाड होऊन त्यानें रघूजीस शासन करण्याचें ठरविलें.

निजामाचे भानगडींतून मुक्त होतांच त्यानें स. १७३९ त आवजी कवड्यास रघूजीवर पाठविलें, व त्याचे मदतीस अंताजी माणकेश्वर यास दिलें. पद्मजी जाचकहि आवजीबरोबर होता.

रघूजीनें आवजीवर आपले सरदार भास्कर हरी, कृष्णाजी आटोळे व अलीखान यांस पाठविलें. उमरावतीजवळ त्यांची लढाई झाली. ती साधारण सारखीच झाली. पुनः दुसरी लढाई नागपूर प्रांतांत झाली. तींत आवजीच्या पक्षाचा मोड होऊन हा पळून गेला ( पे. द. १५. ४१-४३ ). रघूजीची व आवजीची प्रत्यक्ष लढाई झाल्याचें दिसत नाहीं.

नंतर आवजी कवड्यांनीं रघूजीच्या मुलखांत लुटालूट आरंभिली. तेव्हां रघूजीनें बाजीरावाविरुद्ध शाहूकडे तक्रार केली. तेव्हां शाहूनें, आपले सरदार वऱ्हाडांत न पाठवण्याविषयीं बाजीरावास लिहिलें (ऐ. प. ले. ४३७).

आवजीस थो. बाजीरावानें अंतर्वेदींत पाठविलें होतें, परंतु तो मरतांच आवजी दक्षिणेंत परत आला ( ना. प्रा. इ. पृ. ७८, ७९ ).

याचा वाडा पुण्यांत कसबा पेठेंत होता. तेथें उमाबाई दाभाडे या स. १७५२ मध्यें राहिल्या होत्या. याचा मृत्यु स. १७५७ च्या पूर्वी झाला. याचे पुत्र महिपतराव कवडे हेहि शूर होते.

**आवजी पंडित**—हा संभाजीचा वकील मुंबईस इंग्रजांकडे बोलणें करण्यास असे. याला संभाजीनें कामावरून काढलें तेव्हां हा पोर्तुगीजांचे नोकरीस राहिला. आणि त्यांचे तर्फेनें बादशाहाकडे जाऊं येऊं लागला ( जून १६८२ ). हा बहुधा आवजी नीळकंठ पारसनीस असावा ( चिटणीसकृत राजारामचरित्र, पृ. ५५ ).

हा रामचंद्रपंत अमात्याच्या निसबतीस होता. स. १७३७ च्या एप्रिलमध्यें यानें वसई भागातील मनोर व तांदुलवाडी घेण्याची कामगिरी केली होती (वसईची मोहीम).

**आवजी बल्लाळ चिटणीस**—हा बाळाजी आवजी चिटणीस याचा मुलगा असून अण्णाजी दत्तोचा साह्यकारी होता. याला संभाजीनें हत्तीचे पायाखालीं देऊन ठार मारिलें ( म. रि. पू. २ पृ. ३९० ).

**आवजी हरि चित्रे मुजुमदार**—हा एक प्रभु गृहस्थ जंजिऱ्याचे सीदीजवळ दिवाण होता. याजवर सीदी सरकारची इतराजी होऊन याला व याचे भावाला ठार करण्यांत आलें; आणि याच्या बायकामुलांस मस्कतला नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा हुकूम झाला. याची पत्नी गुलबाई ही धूर्त होती. तिनें खलाशांचें मन वळवून मस्कतच्या ऐवजीं राजापुरास नेऊन सोडून देण्याची व्यवस्था केली. तेथें विसाजी शंकर नांवाचा गुलबाईचा भाऊ होता. लिंगोजी असेंहि त्यांचें नांव आढळतें त्यानें ओळख न देतां आपल्या बहिणीस विकत घेतलें. विसाजी हा इभ्रतदार व्यापारी होता. यानें बाळाजी, चिमणाजी व श्यामजी या तीनहि भावांचें चांगलें शिक्षण करविलें. पुढें बाळाजीनें शिवाजीचें नांव ऐकून त्याकडे आपली, नांवानें प्रगटहि होतां येत नाहीं ही करुणाजनक कहाणी कळविली. पुढें शिवाजी राजापुरीं आला असतां गुलबाईनें आपली कहाणी शिवाजीस निवेदन केली. तेव्हां हें घराणें शिवाजीच्या आश्रयास गेलें आणि बाळाजीनें आपल्या कर्तबगारीनें शिवाजीची चिटणीशी मिळविली ( स. १६५८ ). आणि या घराण्यानें आपली स्वामिभक्ति व राजकारण यांचा लौकिक पुढें शेवटपर्यंत कायम ठेवला.

**आवरू**—उर्दू कवि. याचें प्रसिद्ध नांव शाहामुबारक असून याचें मूळचें नांव नजमुद्दीन होय. हा ग्वालेरच्या शाह मुहमद गौस याच्या वंशांतील होय. पण याच्या जन्ममृत्यूच्या कालाविषयीं माहिती मिळत नाहीं. पण हें मात्र निश्चित आहे कीं, हा मुहम्मदशाहाचे वेळीं मेला. याचा व कमाल बुखारीचा मुलगा मीर मख्खन यांचा चांगला स्नेह होता. आवरूनें आपल्या कवितांमध्यें मीर मक्खनचा उल्लेख केला आहे. यानें पुष्कळ कविता लिहिली ( क. कौ. भा ४ ).

**आशाधर**—व्याघ्रेरवाल कुलांतील,सल्लक्षणाचा मुलगा. हा सपादलक्षाचा रहिवासी होता. पण याचें राज्य मुसलमानांनीं जिंकून घेतल्यानंतर हा माळव्यांत धार येथें जाऊन राहिला व तेथें यानें जैन धर्मतत्त्वांचा अभ्यास केला आणि (स. १२३६) 'त्रिषष्टिस्मृति' व (स. १२४४) 'भव्यकुमुदचंद्रिका' असे दोन ग्रंथ लिहिले. यांपैकी 'भव्यकुमुदचंद्रिका' हा ग्रंथ म्हणजे यानें परमार देवपालाचा मुलगा जैतुगिदेव याच्या कारकीर्दीत स्वतः लिहिलेल्या 'धर्मामृत' नांवाच्या काव्यावरील टीका होय. यानें 'जिनयज्ञकल्प' आणि पुष्कळ इतर ग्रंथ लिहिले आहेत. यानें रुद्रटाच्या काव्यालंकार नांवाच्या ग्रंथावर संस्कृतांत टीका लिहिली आहे.

**आशाधरभट्ट**—याच्या पित्याचें नांव रामजीभट्ट आणि गुरूचें नांव धरणीधर. संस्कृतांत याचे ग्रंथ पुढीलप्रमाणें आहेतः—( १ ) कोविदानंद, ( २ ) त्रिवेणिका, ( ३ ) अलंकारदीपिका, ( ४ ) अद्वैतविवेक, ( ५ ) प्रभापटल. पहिले तीन ग्रंथ साहित्यविषयक आहेत. शेवटले दोन अप्रसिद्ध आहेत. हा सतराव्या शतकांतील असावा ( साहित्यशास्त्राचा इतिहास काणेकृत ).

**आशाराम**—एक गुजराथी कवि. याचीं कविता व पदे बरींच आहेत.

**आसड**—( स. ११९२ ) भिल्लमाळ कुलांतील राजकटुक याचा मुलगा. यानें विवेकमंजरी या नांवाचा जैन ग्रंथ व कालिदासाच्या मेघदूतावर टीका संस्कृतांत लिहिली आहे.

**आसफखान**—( असफखान पाहा ).

**आसाध**—जैन महासाधु. महावीरांचा प्रतिस्पर्धी. महावीराच्या विरुद्ध जे सात पाखंडी होते, त्यांमध्यें याची गणना होते. यानें आपलें पाखंडी मत पसरविण्याचा बराच प्रयत्न केला.

**ऑस्टिन**—इंग्रजांचा वकील ( पत्रसार स. १७३२ ).

**आहवमल्ल कलचुरी**—(स. ११८१-८३) हा कल्याणीच्या बिज्जल कलचुरीचा तिसरा मुलगा. याला (वीर) राय नारायण असेंहि दुसरें एक विरुद होतें. हा बिज्जलाचा तिसरा मुलगा असून याचे वडील भाऊ सोमेश्वर अथवा सोविदेव आणि संकम यांच्या नंतर हा स. ११८१ मध्यें गादीवर आला. हा आपणाला कलचुर्यचक्रवर्ती आणि कळचुर्य भुजबलचक्रवर्ती, परमभट्टारक इत्यादि विशेषणें लावीत असे. याची राजधानी कोणती होती याबद्दल उल्लेख आढळत नाहीं. शिलालेखांवरून याच्या अधिकाऱ्यांचीं नांवें महाप्रधान, अंतःपुर वेर्गडे, महापसाइत, दंडनायक इत्यादि असावीं असें दिसतें.

याचा सर्वांत उत्तरकालीन उल्लेख भाद्रपद व॥ त्रयोदशी शोभकृत संवत्सर शक ११२५ या मितीचा आढळतो. याची इंग्रजी तारीख १७ सप्टेंबर ११८३ येते. यानंतर याच्या कारकीर्दीचा अंत लवकरच झाला असावा असें याच्या मागून गादीवर बसलेल्या याचा धाकटा भाऊ सिंघण याच्या इतर शिलालेखांवरून दिसतें.

**आहवमल्ल चालुक्य**—प. चालुक्यांपैकीं सत्याश्रय, सोमेश्वर पहिला. हा ही पदवी वापरीत असे.

**आहवादित्यवीर गुत्त**--(स. ११८२-१२१३) हा गुत्त घराण्यांतील दुसऱ्या गुत्ताचा पुत्र होय. हा आपल्या बापानंतर गादीवर बसला. हा चालुक्य राजांचा मांडलिक असावा. हा आपणास महामण्डलेश्वर असें म्हणवून घेत असे. याचें राज्य म्हैसूर प्रांतांत होतें.

**आळवंदान**—राजाधिराज चोलाचा वडील भाऊ.

**आळूप ( अळव अळूव ) वंश**—यांना जुन्या काळीं ( पूर्वी ) आलु व खेद असें म्हणत. यांनीं स. ७ व्या शतकापासून ११ वें शतकापर्यंत राज्य केलें. यांचें मुख्य ठिकाण पत्ती-पोंबुच्च, ( सध्यांचें हुंच ) शिमोग जिल्ह्यांतील आणि नगर तालुक्यांतील, ह्या गांवीं होते. त्या वेळच्या होयसल राजांनीं यांचा उल्लेख केलेला आहे.

गुणसागर—(कोदम्ब-मंडळ किंवा बनवासीप्रांत येथें विजादित्य चालुक्य ( स. ६८०-६९७ ) याच्या वेळीं किंवा अगोदर राज्य केलें. )

चित्रवाहन २ रा— स. ६९२.

चित्रवाहन १ ला—तिसऱ्या गोविंद राष्ट्रकूटाचा समकालीन. यानें उदीयवार घेतलें

रणसागर—(श्वेतवाहन यानें याला हाकून दिलें.)

श्वेतवाहन—

पृथ्वीसागर—

'उदयादित्य'—'उत्तम पांड्य.'

विजयादित्य मारम्म—'उत्तम पांड्य.'

कवी आळुपेन्द्र भुजबल—

कुलशेखर आळुपेन्द्र—स. १२०५।६.

बंकीदेव आळुपेन्द्र—(मंगलारे येथें राहत असे स. १३०२।३ ).

सोयीदेव आळुपेन्द्र--( स १३१५।१६-१३२४।२५. )

**आज्ञात कौंडिन्य**—( कौंडिन्य पाहा. )


**आंगरे घराणें**—यांचें मूळ उपनाम सकपळ; कुलाब्यानजीक आंगरवाडीचे राहणारे म्हणून आंगरे नांव पडलें. तुकोजी आंगरे स. १६५८ मध्यें शिवाजीकडे प्रथम बारगिरी करून होता. पुढें हळुहळू वाढत जाऊन सुवर्णदुर्गाच्या सुभ्यावर त्याची नेमणूक झाली. त्यापूर्वी सुवर्णदुर्गाचा सुभा अचलोजी मोहिते याजकडे होता. पण हबशांशीं पराक्रमानें न लढल्यामुळें तो याच्याकडे आला. तेथून हें घराणें वाढत गेलें. ( वंशावळ १२८ पानावर पाहा ).

**आंडय्य**—( स. १२३५ सुमार ) कानडी जैन कवि. बाप-सांत; आई-बल्लव्वे.

ग्रंथ-कब्बिगरकाव ( कवींचा रक्षक ). हा कवि कानडी भाषेचा अभिमानी होता. यानें संस्कृत शब्द न वापरतां प्रतिज्ञेनें कानडींत ग्रंथ केला आहे. याचें काव्य कर्नाटकांत सोबग्गिन या नांवानें प्रसिद्ध व संस्कृत जाणणारे लोक मदन विजय असें त्यास म्हणतात. याचा ग्रंथ सुभाषितें व म्हणी यांचें आगर आहे. याचा ग्रंथ सुंदर कानडीचा नमुना आहे ( क. क. च. भा. १, पा. ३६६ ).

**आँजिअर**—प्रथम हा सुरतेचा प्रेसिडेंट असून ( स. १६६९ ) नंतर मुंबईचा गव्हर्नर व कमांडर-इन्-चीफ झाला. यानें मुंबई शहर सुधारण्याकरितां अनेक उपाय केले. पोर्तुगीझांनीं चालविलेला धर्मच्छल बंद केला; व्यापाराच्या सोयी नवीन करून राज्यकारभाराची व्यवस्था लावून दिली, टांकसाळ घातली व तटबंदी केली. लंडन शहर त्या वेळीं नुकतेंच म्हणजे स. १६६६ त जळून खाक झालें होतें, तें पुन्हां बांधण्यासाठीं जे नकाशे व नियम करण्यांत आले, तेच कंपनीनें हिंदुस्थानांत मुंबई शहरासाठीं पाठवून दिले. यानें मुंबई हें गलबतांचें व व्यापाराचें मुख्य बंदर केलें, आणि तेथें बखारींच्या व वसाहतीच्या

# आंग्र्यांची वंशावळ


सेखोजी संकपाळ रा. आंगरवाडी, हर्णेनजीक
तुकोजी आंगरे स. १६९०
कान्होजी, सरखेल १६९०–१७२९
१ पत्नी मथुराबाई, २ लक्ष्मीबाई ( मानाजी जगतापाची कन्या ).
सेखोजी १७२९–३३
संभाजी १७३४–३५
३ गहिनाबाई ( दिनकरराव भोसले याची कन्या )
मृत्यु ४१
तुळाजी १७३४–५६
मानाजी १७३५-५८
येसाजी
धोंडजी
बायका
१राधिकाबाई २भागीरथीबाई
१ महिमाजी, २ रघूजी, ३ चिमाजी, ४ हिरोजी, ५ धोंडजी, ६ तुकोजी, ७ कृष्णाजी, ८ सुभानजी, ९ तुळाजी, १० राम.
रघूजी १७५८-९३
राधाबाई (कुडवे)
रघूजीच्या बायका-नर्मदाबाई (शिताळे)
आनंदीबाई (भोसले)
( दौलतराव शिंद्याची आई )
मेनाबाई
महादाजी
बाबुराव १७९९-१८१३
संभाजी (सवाई सरखेल १८४५)
(१८४५-९२) बाबुराव
(९२-१९०२) संभाजी
चंद्रोजी ( प्रस्तुत )
जयसिंग- खून १८००
स्त्री सकवारबाई
मुरारराव
[अथवा संभाजी]
मानाजी २रा
कान्होजी
प्रथम १७९४-१७९९, नंतर कैद पुनः १८१३-१८१७
१ स्त्री
२ री राजराबाई (नरसिंहराव कदम)
रघूजी २ रा. १८१७-३८
स्त्रिया ५: भागीरथी, कमळा, भवानी, यशोदा, अंबिका
कान्होजी २ रा १८३८–३९ ( स. १८४० मध्ये राज्य खालसा )

जांगीं इंग्रज अधिकारी नेमले. तसेंच एतद्देशीय व्यापाऱ्यांस व कारागिरांस नानाप्रकारच्या सवलती देऊन यानें त्यांना मुंबईस आणलें. त्यांजवर धर्मसंबंधी जुलूम होऊं नये व गाई वगैरे मारून त्यांस दुखवूं नये, अशी यानें व्यवस्था ठेविली. एतद्देशीय लोकांपैकीं प्रत्येक जातीचे पंच नेमून त्यांनीं आपले खटले तोडावे, अशी परवानगी ऑजिअरनें विलायतेहून आणविली. यानें मुंबईची हवा सुधारून तेथें रोग्यांच्या शुश्रूषेकरितां दवाखाने बांधिले; एक मोठें प्रार्थनालय स्थापिलें; आणि पोलीसचीं व इनसाफाचीं कोर्टें निर्माण केलीं. एकंदरीत यानें मुंबईची सर्व बाजूंनीं भरभराट होण्यासाठीं भयंकर प्रयत्न केले. हाच सध्याच्या मुंबईचा संस्थापक होय.

मुंबईची भरभराट झाल्यामुळें सुरतेचें महत्त्व कमी झालें. सुरत सोडून इंग्रजांनीं मुंबईसच कायमचें यावें असें ऑजिअरचे मनांत होतें, पण तें या वेळीं विलायतेंत कंपनींच्या कोर्टानें मंजूर केलें नाहीं. ऑजिअर हा स. १६७७ त सुरत येथें मरण पावला. इंग्रजांची पश्चिम किनाऱ्यावर सत्ता कायम करणारा हाच पहिला पुरुष होय. 'याचा थोरपणा शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं 'असें कौन्सिलनें लिहिलें आहे. एतद्देशीय सत्ताधीशांना कागदी दपटशा दाखवून कांहीं उपयोग नाहीं. हातीं तलवार घेऊनच आपला व्यापार चालविला पाहिजे. परमेश्वराच्या मनांत तुमच्यावर मोठी मेहेरबानी आहेशी दिसते. दुसऱ्या कोणत्याहि युरोपियन राष्ट्रापेक्षां तुमचा पाया हिंदुस्थानांत जास्त मजबूत झाला आहे यांत संशय नाहीं, असें यानें कंपनीस लिहून पाठविलें (ब्रि. रि.पूर्वार्ध पृ.२९७-३०३).

**आंदिल**—( आलम फारुकी पाहा ).

**आंध्र**—कण्व राजघराण्याच्या समाप्तीनंतर हें घराणें विशेष उत्कर्षाला चढलें. यांचें सैन्य बरेंच मोठें असून नांवाजलेलें होतें. त्यांमध्यें एक लाख पायदळ, दोन हजार घोडेस्वार व एक हजार हत्ती इ. चा समावेश केला होता. यांच्या प्रांतांत ३२ मोठालीं शहरें असून त्यांच्या भोंवतीं तट असत. त्यांची राजधानी कृष्णाकाठीं श्रीकाकुलाम नांवाचें शहर होतें. अशोकाच्या मृत्यूनंतर सिमुक नांवाच्या राजानें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें व आंध्र घराणें चालू झालें. आंध्र राजे हे शातवाहन किंवा शालीवाहन या घराण्यांतील होते व त्यांपैकीं बऱ्याच राजांनीं आपल्या नांवापुढें शातकर्णी असें पद जोडलेलें आढळतें. आंध्र राजे हिंदु धर्माचे कट्टे पुरस्कर्ते असून त्यांनीं जातीसंस्था पुनः चालू केल्या. यांनीं बुद्धांनाहि बऱ्याच मोठाल्या देणग्या देऊन विहार बांधून दिले. यांनीं ब्रांझ, दर्पे व शिसें इत्यादींचीं नाणीं पाडलीं होतीं व त्यांपैकीं कांहींवर जहाजाचें चित्र खोदलेलें आढळतें. या घराण्यांत एकंदर ३० राजे झाले व त्यांनीं ४५० वर्षे राज्य केलें. हे अश्वमेध व गवामयन नांवाचे यज्ञ करीत असून त्या वेळीं सर्व ब्राह्मणांना मोठाल्या दक्षणा देत असत. हे शिवाचे उपासक असून कृष्णाला संकर्षण व वासुदेव म्हणून त्याची पूजा करीत असत.

कुटुंबपद्धति अमलांत आणलेली असून कटुंबांतील मुख्याला गृहपति असें म्हणत. यांच्या कारकीर्दीत व्यापारी, तेली, वीणकरी, धान्य विकणारे, बांबूचीं कामें करणारे इ. लोकांच्या सोसायट्या असून त्यांत ते व्याजानें रकमा गुंतवीत असत ( V. Smith, p. 217-32 ). आंध्र घराण्याची पुराणांत उपलब्ध होणारी वंशावळ मतभेदासह आमच्या प्राचीन चरित्रकोशांत दिली आहे ( पा. ६८४-६८५ ).

आंध्रांना आंध्रभृत्य असें पुराणांत संबोधण्यांत आलें आहे. पुराणांत यांना शूद्र म्हटलें आहे. यांचा सर्वांत प्राचीन निर्देश ऐतरेय ब्राह्मण या वैदिक ग्रंथांतील होय ( ७.१८ ). तेथें यांचा विश्वामित्राशीं संबंध जोडला असून दस्यू वगैरे बरोबर हीन जातीचे म्हणून निर्देश आहे. पण शिलालेखांत यांनीं आपणांस द्विज म्हणून घेतलें आहे. तेलंगणापेक्षां महाराष्ट्राशीं यांचा विशेष संबंध दिसतो. यांचे शिलालेख, पुतळे व नाणीं हीं नानाघाट, कान्हेरी वगैरे महाराष्ट्रांतील ठिकाणीं आढळतात. हालाची गाथा सप्तशती महाराष्ट्री नांवाच्या प्राकृत भाषेंत आहे.

१९-३० पर्यंत व्यक्तींचीं नांवें पुढें समकालीन इतर पुराव्यासह कोष्टक रूपानें दिलीं आहेत. पुराणांतील नांवांचा उपलब्ध इतर साधनांतील नांवांशीं मेळ घालण्याचें काम कांहीं ठिकाणीं दुर्घट आहे. व्यक्तिशः माहिती देतांना आम्ही त्यांचा अधिक खुलासा करूं. यानंतर पल्लव व वाकाटक घराणीं उदयास आलीं.

**आंध्र कालिदास**—हा तैलंगजातीचा ब्राह्मण कवि होय. हा वारंगळ शहरचा राहणारा असून शके ९०४ मध्यें होता. ओळखण्यासाठीं म्हणून याच्या मागें आंध्र हें पद जोडत असत. तेलंगी भाषेंतील याचा 'स्मार्थविजय' हा ग्रंथ प्रसिद्ध होय ( तेलगू वाङ्मय पा० ५५. कालिदास व भोज पाहा). तेलंगी लोक तच्या जागीं थ उच्चार करितात.

**आंवडा**—गुजराथच्या सोलंकी पैकीं कुमारपालाचा प्रधान. याला आम्रभट असेंहि म्हणत. हा जैन होता.

**आंभी (आम्फिस)**—हा तक्षशिलेचा राजा. सिकंदरची हिंदुस्थानावर स्वारी झाली तेव्हां यानें सिकंदरची अधीनता एकदम स्वीकारली. शिवाय पोरसवर स्वारी करण्यास त्यास उत्तेजन दिलें. म्हणजे यानें स्वकीय शेजाऱ्याशीं द्रोह करून परक्यांना मदत केली ( मौर्य साम्राज्यका इतिहास, पा. ११४ ). सिकन्दर परत जातांना त्यानें हिंदुस्थानच्या जिंकलेल्या प्रदेशाचे तीन भाग केले. त्यांत शेलमपासून सिन्धुनदापर्यंतच्या भागावर यास क्षत्रप नेमलें.

# आंध्र घराण्यांतील शेवटचे राजे

| नांवें. | काल | असलेले शिलालेख Ep. Ind.. Vol. X. App. | नाणीं | महाराष्ट्रांतील क्षहरात सत्रप राजे व त्यांचा काल | उज्जयनीचे शक सत्रप राजे व त्यांचा काल | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ पुरीकसेन. २१ वर्षें | स. ५९ | | वासिष्ठीपुत्र (१) विलिवायकुर याचीं धनुष्य आणि बाण असलेलीं नाणीं या तीन राजांपैकीं एकाचीं असावींत ( See Rapson pp. 5–6 ). परंतु ते निराळ्या घराण्यांतील असण्याचा संभव आहे ( See Ind. Anti. votl XLIX 1920 pp. 30–4 ). | भूमक, सत्रप ( फक्त नाणीं; शिलालेख किंवा काल उपलब्ध नाहीं ). स. ७–१० ? किंवा इ. स. पूर्व. | चष्टन; राजा ही पदवी लावीत असे. स. ८० | टॉलेमी चष्टनास टेस्टनस् असें म्हणतो. |
| २० सुंदर शातकर्णी. १ व. | स. ८० | | | | | |
| २१ चकोरशातकर्णी. ½ व. | स. ८१ | | | | | |
| २२ शिवस्वाती. २८ व. | स. ८१ | नं. १२७९ अमरावती राज श्री शिवमक सत; नंबर २५ किंवा २६ पाहा. | माथुरीपुत्र सिवलकुर याचीं धनुष्य आणि बाण असलेलीं नाणीं याचीं आहेत असें रॅपसन म्हणतो ( Rapson p. 7 ) ती नाणीं दुसऱ्याच घराण्यांतील असण्याचा संभव आहे. | नहपानचें भूमकाशीं नातें. परंतु तें माहित नाहीं. नहपान सत्रप स. ४० किंवा त्यापूर्वी. | | |
| २३ गौतमी पुत्र २१ व. | स. १०२ | नं. ११२३,११२५,११२६ नाशिक. | नहपानाचीं असलेलीं नाणीं पुनः यानें राज गौतमीपुत्र श्री शातकर्णी या नांवानें पाडलीं ( Rapson pp. LXXXIX 64–70 ). | नहपानची मुलगी दक्षामित्रा ही नाशिकचा सुभेदार ऋषभदत्त किंवा उषवदत्त यास दिली होती. नहपान स. ८० च्या सुमारास मेला असावा. आंध्र राजा गौतमीपुत्र यानें याच्या घराण्याचें राज्य जिंकलें, सुमारे स. ११९. स. ११९–१२४ पर्यंतचे या घराण्याचे शिलालेख आहेत. | जयदामन् सत्रप चष्टनचा मुलगा. स. ११० | टॉलेमीनें गौतमीपुत्रास बेलिओ कोरस असें म्हटलें आहे. परंतु तें नांव गौतमीपुत्राच्या वेळच्या दुसऱ्या एखाद्या राजाचें असावें. |

| | | |
|---|---|---|
| २४ पुलोमा ( वी ) २ रा गौतमीपुत्राचा मुलगा २८ व. स. १२३ | नं. ९९४ कन्हेरी; ११२२-४, ११४७ नाशिक; ११००, ११०६ कार्ले आणि १२४८ अमरावती. राज वासिष्ठीपुत्र श्री पुलोमायी. कांहीं ठिकाणीं श्रीपूर्वी स्वामी शब्द घातलेला आहे. नं. ९९४ मध्यें श्री वासिष्ठीपुत्र श्री शातकर्णी असा उल्लेख केला आहे. | पूर्वेकडील नाणीं; राज-वासिष्ठीपुत्र श्री पुलोमायी या नांवानें आहेत(Rapson p.20). |
| २५ शिवश्री पुलोमा ( वी ३ ) रा. ७ व. १५६ | नंबर २२, २६ पाहा. | राज वासिष्ठीपुत्र शिव श्री शातकर्णी या नांवानें याचीं नाणीं आहेत. |
| २६ शिवस्कंध शातकर्णी ३ व. स. १६३ | नं. ११४६ बनवासी, नंबर २२ आणि २५ पाहा. | |
| २७ यज्ञश्री शातकर्णीक २९ व. १६६ | नं. ९८७, १०२४ कन्हेरी आणि ११४६ नाशिक. राज गौतमीपुत्र स्वामी श्री यज्ञ शातकर्णी नं. १३४०. | नाण्याचे पुष्कळ प्रकार. त्यावर राज गौतमीपुत्र श्री यज्ञ शातकर्णी किंवा याचा कांहीं भाग लिहिलेला असे ( Rapson pp. 34, 35 ). |
| २८ विजय ६ व. स. १९५ | | |
| २९ छंदश्री ( चंद्र ) शातकर्णी १० व. स. २०१ | नं.१३४१ गोदावरी जिल्ह्यांतील कोंडवोल. राज वासिष्ठीपुत्र श्री चंड ( चंद्र ) शात. | राज वासिष्ठीपुत्र श्री चंद्र सातीं या नांवाचीं याचीं नाणीं ( Rapson, pp. 30, 33 ). |
| ३० पुलोमा ( वी ) ४ था ७ व. स. २११ | बहुतेक नाहींत. | नाहींत. परंतु कांहीं पुलोमावी याचीं नाणीं संशयातात आहेत. |
| घराण्याचा शेवट स. २२५ | | |

रुद्रदामन् १ ला, जयदामनचा मुलगा, स. १३०-१५० आंध्र राजा पुलोमावी याचा दोनवेळां पराभव केला.

दामजदश्री रुद्रदामन् १ ल्याचा मुलगा. स. १५५

जयदामन् सत्रप दामजदश्रीचा मुलगा. स. १७८

रुद्रसिंह १ ला रुद्रदामन् १ ल्याचा मुलगा स. १८०

रुद्रसेन १ ला, रुद्रसिंह १ ल्याचा मुलगा स. १९९

संघदामन् रुद्रसिंह १ ल्याचा मुलगा स. २२२

दामसेन हा रुद्रसिंह १ ल्याचा मुलगा स. २२३

# इ

**इकबालखान**—तुघ्लग घराण्यांतील बादशाहा फीरूजशाहाच्या मृत्यूनंतर राज्यांत अंदाधुंदी माजली. तेव्हां हा बादशाहाच्या तर्फेनें प्रतिस्पर्ध्यांशीं लढला व राज्यांत थोडाबहुत बंदोबस्त केला. पण इतक्यांत हिंदुस्थानावर तैमूरलंगाची धाड आली. तिला तोंड देण्याकरितां बादशाहा व इकबालखान यांनीं तयारी केली, पण शेवटीं पराभव झाला.

तैमूर गेल्यानंतर इकबालखान दिल्लीस आला. त्या वेळीं महमूद बादशाहा तैमूरच्या भीतीनें गुजराथेंत पळून गेला होता. तेव्हां यानें दिल्ली व त्या भोंवतालच्या प्रदेश काबीज करून घेतला आणि बादशाहिपद बळकाविण्याचा यत्न केला. पुढें यानें, दुसऱ्या महमूदशाहाला कनोज येथें वेढलें, परंतु याला इटावा घेतां न आल्यामुळें हा दिल्लीला परत गेला. स. १४०५ मध्यें हा सामानच्या बहरामखानावर चाल करून गेला, तेव्हां बहराम डोंगराळ प्रदेशांत पळून गेला व इकबाल त्याचा पाठलाग करीत त्याच्या मागोमाग गेला. अजोधन येथें याची मुलतानचा सुभेदार खिज्झरखान याशीं गांठ पडली. तेव्हां त्यांच्या मध्यें लढाई होऊन तिच्यांत इकबाल पराभव पावून ठार मारला गेला. महमुदाची पुनः दिल्लीच्या तख्तावर स्थापना झाली.

**इखलासखान**—विजापूरच्या आदिलशाही घराण्यातील दुसऱ्या इब्राहीम आदिलशहाचा एक प्रधान. इब्राहिमाचा दिवाण कीश्वरखान याचा कारभार जुलमी होऊं लागल्यामुळें इखलासखानानें कीश्वरखानास ठार करून त्याची जागा आपण बळकाविली व आपण कारभार पाहूं लागला. यानें कीश्वरखानाच्या वेळचे सर्व कामगार काढून टाकून त्या जागा आपल्या वतीच्या लोकांना दिल्या. पण हा कारभार पाहूं लागल्याला फार दिवस झाले नाहीं, तोंच दिलावरखानानें कृतघ्नपणानें याचे डोळे काढून यास कैद केलें व अशा रीतीनें दिलावरखान दिवाणाचे जागेवर आला. हा एक हबशी सरदार होता. विजयनगरच्या रामरायाशीं झालेल्या तालीकोट येथील लढाईंत हा हजर होता ( आरविदु डिनॅस्टी पृ. १०१-१०२ ).

**२.** ( स. १६७२-१६८९ ) हा एक मोगल सैन्याधिकारी होय. स. १६७२ मध्यें मोगल सेनापति महाबतखान यानें याला शिवाजीच्या सैन्यावर पाठविलें. त्या वेळीं मराठी सैन्य प्रतापरावाचे हाताखालीं होतें. प्रतापरावानें मोगली सैन्याची दाणादाण करून याचा पूर्ण पराभव केला. हा शेखनिजामचा मुलगा. मुकरबखान ही शेखनिजामची पदवी होय ( शेख निजाम पाहा ). स. १६८९ मध्यें संगमेश्वरीं असलेल्या संभाजीवर छापा घालून त्याला पकडण्यास यानें आपल्या बापाला मदत केली ( डफ् भा. १ ला, पृ. १९६,२७६ ). संभाजीस पकडण्यास व तळघरांतून वर आणण्यास साहाय्य केलें म्हणून यास पंचहजारी मनसब मिळाली होती ( संभाजी. ९६,१०० ).

**इख्तियार उद्दीन अल्तूनिया**—( स. १२३६-१२४० ) रूकनुद्दीन फीरुझ व सुलताना रझियाचे कारकीर्दीत इख्तियार उद्दीन अल्तूनिया हा भातिंदाचा सुभेदार होता. मुलतान, हौसी, लाहोर व बुदौनच्या सुभेदारांनीं कट करून रझियास पदच्युत करण्याचा कट उघडून लावल्यावर रझियाचे मर्जीतला जलालुद्दीन याकूत याचा पाडाव करण्याकरितां व जमल्यास रझियास पदच्युत करण्याकरितां दिल्लीच्या दरबारांतील तुर्की सरदारांनीं मुख्य वाकनीस शंसुद्दीन आह्तमस ऐतिगिन याचे नेतृत्वाखालीं दुसरा कट करून यास बंड करण्याची भर दिली. कारस्थानांस बळी पडून यानें बंड केलें तेव्हां रझिया व याकूत यांनीं दिल्लींतील सैन्य बरोबर घेऊन भातिंदावर स्वारी केली. सैन्यांतील असंतुष्ट सरदारांनीं याकूतला ठार मारलें व रझियास कैद करून याचे स्वाधीन केलें. तिकडे दिल्लीस असलेल्या सरदारांना ही बातमी कळतांच शंसुद्दीनचे तिसरे मुलास-मुइज्जुद्दीन बहराम यास तक्तावर बसविलें. राज्यपद मिळवून दिल्याबद्दल जी मानसन्मानांची व अधिकारांच्या जागांची खैरात झाली तींत सर्व सरदारांनीं आपले हातांत हवें तें पाडून घेऊन अल्तूनियाला तसेंच कोरडें ठेविलें. रझियास कैद करण्याचे कारस्थानांत याची कामगिरी सर्वांत अधिक असूनहि याची सरदारांनीं उपेक्षा केल्यामुळें हा चिडला व यानें रझियास कैदेतून मुक्त करून तिच्याशीं लग्न केलें. आपल्या नूतन परिणीत वधूस पुनः तिच्या गेलेल्या तक्तावर बसवून सर्व सरदारांची खोड मोडण्याकरितां अल्तूनियानें मोठें सैन्य जमविलें व रझियास बरोबर घेऊन दिल्लीवर स्वारी करण्याकरितां हा निघाला. वाटेंत बहरामनें यास गाठून लढाई केली. त्या लढाईत पराभूत होऊन रझिया व अल्तूनिया कैद झाले ( १३ आक्टोबर १२४० ). दुसरे दिवशीं दोघांचाहि सैनिकांनीं खून केला.

**इख्तियार उद्दीन ऐतिगिन**—( स. १२४० ) इखत्यार उद्दीन ऐतिगिन हा रझियाचे कारकीर्दीत मुख्य वाकनीस होता. दिल्लीचे दरबारांत जलालुद्दीन याकूत या सिद्दी गृहस्थास सुलताना रझियानें मोठ्या अधिकारावर नेमलें. तिची याकूतवर मर्जी असल्यामुळें दिल्लीचे दरबारीं याकूतचें वजन व वर्चस्व फार वाढलें. एक तर याकूत परकी इसम व दुसरें त्याजवरील सुलतानाचे मर्जीमुळें शिरजोर झालेला म्हणून त्याचा पाडाव करण्याचें याचे मनांत आलें. शिवाय जमल्यास स्त्रीचे हातांत गेलेली राजसत्ता याकूतचा पाडाव झाल्यावर डळमळेल असा विचार करून यानें दरबारीं लोकांस कटांत घेऊन भातिंदाचा सुभेदार इख्तियार उद्दीन अल्तूनिया यास बंडाचें निशाण उभारावयास चिथविलें. अल्तूनियास मोह होऊन बंड केलें, तेव्हां रझिया, याकूत व दिल्लीचें सैन्य बरोबर घेऊन अल्तूनियास वठणीस आणण्यास भातिंद्यावर चालून गेली. भातिंद्यास पोहोंचल्यावर सैन्यांतील असंतुष्ट सरदारांनीं याकूतला ठार केलें व रझियास कैद केलें. सरदारांनीं रझियास अल्तूनियाचे स्वाधीन करून दिल्लीस असलेल्या आपल्या साथीदारांस मुइज्जुद्दीन बहराम या मृत सुलतान शंसुद्दिन अल्तमसच्या तिसऱ्या मुलास तक्तावर बसविण्यास सांगितलें. २२ एप्रिल १२४० रोजीं बहरामचे नांवाची द्वाही फिरली व ५ मेला सैन्य दिल्लीस परत आलें. तेव्हां सरदारांनीं दरबार भरवून बहरामचे सुलतानपदास मान्यता देतांना अशी अट घातली कीं, इख्तियार उद्दीन ऐतिगिन यास मुख्य वजीर करून हुकमतपन्हाचे अधिकार दिले पाहिजेत. राजास हें कबूल करणें भाग होतें. ऐतिगिननें बहरामचे बहिणीशीं म्हणजे रझियाशीं लग्न करून सर्व सत्ता आपले हातीं घेतली व प्रतिराजाप्रमाणें वागूं लागला. बहरामला ऐतिगिनच्या बेमुर्वतखोर वर्तनाचा व जाचणुकीचा त्रास सहन होईनासा झाला. तेव्हां ३० जुलई रोजीं बहरामनें दोन तुर्कांस रागाचे भरांत आपल्या समक्ष ऐतिगिनावर वार करण्यास चिथविलें. वार वर्मीं लागून ऐतिगिन तात्काळ मरण पावला.

**इख्तियार उद्दीन मुहम्मद खल्जी**—(स.११९३ते १२०६ ) बंगालमध्यें मुसलमानी सत्ता प्रस्थापित करणारा गझनीचे राजाचा सुभेदार. हा तुर्की लोकांतील खल्ज ज्ञातीचा इसम कुरूप, बेडौल, पण कर्तबगार व महत्त्वाकांक्षी होता. याच्या कुरूपतेमुळें याच्या महत्त्वाकांक्षेस योग्य नोकरी बरींच वर्षें मिळाली नाहीं. पुढें ह्यास हिजबर उद्दीन हसन अदीब नांवाच्या धाडशी अधिकाऱ्याकडे नोकरी मिळाली व नंतर हा अयोध्या प्रांतांत इस्लामी राज्य स्थापणाऱ्या हिसाम उद्दीन आघूल बक नांवाच्या मुसलमान अधिकाऱ्याचे नोकरींत शिरला. यानें गंगा व शोण या नद्यांमधील प्रांतांत कांहीं मुलूख मिळविला व त्यांत आपलें बस्तान नीट बसवून बिहार व तिरहुत प्रांतांत स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. प्रथम प्रथम यानें फक्त लूटमार केली व द्रव्यसंचय केला, तेव्हां द्रव्याचे लोभानें नशीब काढूं इच्छिणारे अनेक लोक यास येऊन मिळाले. पुरेसें सैन्य जमल्यावर यानें ओदंतपुरी नांवाच्या बिहारच्या राजधानीवर स्वारी केली. तेथील सुप्रसिद्ध विहारांत वस्तीस असलेल्या भिक्षूंची कत्तल करून राजधानी लुटली. लूट व तेथील ग्रंथसंग्रह बरोबर घेऊन हा हिंदुस्थानांतील इस्लामी राजाचा मुख्य सुभेदार कुतुबुद्दीन ऐबक यास दिल्लीस भेटण्यास गेला. इखत्यारचें यश असेंच कायम टिकलें तर हा शिरजोर होईल म्हणून याचा बऱ्या वाईट मार्गानें पाडाव करूं इच्छिणाऱ्या याच्या शत्रूंनीं अनेक कारस्थानें करून ऐबकचें मन कलुषित करण्याचे प्रयत्न केले. ते व्यर्थ गेल्यावर यास ठार करण्याची खालील युक्ति केली. बेफाम झालेला हत्ती आपण कह्यांत आणूं शकतों, अशी इखत्यारला घमेंड आहे, अशी खोटी बातमी उठवून हा प्रयोग प्रत्यक्ष करून दाखवून आपलें म्हणणें खरें करून दाखविण्याची याच्या शत्रूंनीं याला भर दिली. इखत्यारनेंहि माघार न घेतां हा प्रयोग करून दाखविण्याचें कबूल केलें व हत्ती कह्यांत आणून सर्वांची फजिती केली. ऐबक खूष होऊन त्यानें याला ह्यानें जिंकलेल्या व पुढें जिंकील त्या सर्व मुलखाचा राज्यकारभार पाहण्याचीं अधिकारसूत्रें देऊन याची बिहार प्रांतांत रवानगी केली. बिहारमध्यें परत आल्यावर यानें बंगालच्या उपसागरापासून हिमालयाच्या पायथ्यापर्यंत इस्लामी राज्याचा विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा आंखून उद्योगास आरंभ केला. दक्षिण बंगाल-प्रांताचें राज्य ह्या वेळीं लक्ष्मण नांवाच्या सेन घराण्यांतील राजाकडे होतें. राजा लक्ष्मण वृद्ध असून नवद्वीप किंवा नदिया नांवाचे राजधानींत राहत असे. नदिया या वेळीं बहुतेक उजाड झालेलें होतें. असें सांगतात कीं, तुर्की लोकांकडून नदिया उध्वस्त व्हावयाचें आहे असें भविष्य वर्तविलें गेलें होतें, म्हणून तेथील बहुतेक सर्व श्रीमान् लोक पूर्वेकडे दूर वस्तीस गेले होते. लक्ष्मण राजानें मात्र राजधानी सोडण्याचें नाकारिलें होतें. हा बरोबर मोठें सैन्य घेऊन नदियावर स्वारी करण्याकरितां निघाला; परंतु यानें प्रवास इतक्या झपाट्यानें केला कीं, हा जेव्हां नदियास पोहोंचला तेव्हां याजबरोबर फक्त १८ च स्वार होते. उत्तरेकडील

घोडेवाले आहेत, अशा समजुतीनें यास द्वारपालांनीं शहरांत जाऊं दिलें. हा राजवाड्याजवळ आला तेव्हां राजा लक्ष्मण जेवावयास बसला होता. यानें द्वाररक्षकांवर एकदम तुटून पडून कत्तल सुरू केली. त्यामुळें सगळीकडे गोंधळ व हाहाःकार उडाला. राजा लक्ष्मण जेवीत असल्यानें उघडाच होता. तो जेवण तसेंच टाकून मागील दारानें उघडाच बाहेर पडून नावेंत बसून पसार झाला. बाकीचें सैन्य नदियास येऊन पोहचेतों हा व याचे अठरा संवगड्यांनीं प्रतिकारास दाद दिली नाहीं. सैन्य आल्यावर शहर लुटण्यांत आलें. खजिन्यांत लक्ष्मण सेन राजाच्या ८० वर्षाच्या शांततेच्या कारकीर्दीत जमविलेलें सर्व द्रव्य याचे हातीं लागलें. यानें गौर अथवा लखनावतीला जाऊन तेथें आपली राजधानी करून बंगाल प्रांतांत मुसलमानी सत्ता दृढमूल केली. लखनावतीस (गौर) मशीदी बांधल्या. पाठशाळा काढल्या. धर्मशाळा बांधल्या. बंगालमध्यें आपल्या सत्तेची स्थापना झाल्यावर यानें हिमालयाच्या पायथ्यापर्यंत राज्यविस्तार पोहोंचविण्याचे प्रयत्न केले व ते शेवटास नेले. कोच, मेच आणि कचारी नांवाच्या मोगल वंशीय लोकांस यानें आपल्या सत्तेखालीं आणिलें. या ज्ञातीपैकीं एक राजा अली मेच असें नांव धारण करून मुसलमान झाला व त्यानें याला हिमालयापलीकडील प्रांत जिंकण्यास, त्या बिकट पर्वतश्रेणींतले मार्ग दाखवून मदत करूं असें आश्वासन दिलें. अलीच्या महत्त्वाकांक्षेस मर्यादा नसल्यानें तो स. १२०५ मध्यें १०००० घोडदळ बरोबर घेऊन याच्यासह घातुक कामगिरीवर निघाला. कामरूप प्रांताच्या राजाशीं तह करून मदतीचें आश्वासन घेऊन देवकोटहून हा एका नदीच्या कांठानें १० दिवस चाल करून बुर्धनकोटला पोहोंचला. तेथें नदीवर एक दगडी पूल होता, त्या पुलाचे अलीकडे राहून रक्षणाचें काम करण्यास सैन्य ठेवून, बुर्धनकोटचा राजा वसंतऋतु येईतों पुढें जाणें घातुक आहे असें बजावून सांगत असतांहि तिबेटकडे जाण्यास निघाला. १५ दिवस चालून गेल्यावर हा एका मोठ्या वस्तीच्या किल्ल्याजवळ जाऊन पोहोंचला. हा किल्ला तिबेटच्या कोणत्या भागांत होता व त्याचें नांव काय यासंबंधानें माहिती उपलब्ध नाहीं. तेथील लोकांनीं जोराचा प्रतिकार केल्यामुळें याचे बरेच सैनिक पडले व त्यास परत फिरावें लागलें. वाटेवरील लोकांनीं रस्ते नादुरुस्त करून, उपासमार करण्याकरितां पिकें, वैरण जाळून व हल्ले करून याला जर्जर केलें. नदीजवळ हा येऊन पोहोंचला तेव्हां असें आढळून आलें कीं, नदीवरील पूल उध्वस्त करण्यांत आला होता व नदीस भयंकर मोठा पूर आला असल्यानें नदीपार जाणें अशक्य होतें. कामरूपच्या राजानें वचनभंग करून याचे सैन्यावर पडल्ला करून नदींत यास उतरावयास लाविलें. नशीब थोर म्हणून हा १०० घोडेस्वारांनिशीं नदीपार आला व लखनावतीस परत जाऊं शकला. हिंदुस्थानांत मुसलमानी सैन्याचा अशा प्रकारचा मोड कधीं झाला नव्हता. याचें सर्व सैन्य गारद झालें व लखनावतीस लज्जेनें तोंड दाखविण्याची सोय राहिली नसल्यानें मेलों असतों तर बरें होतें असें यास वाटूं लागलें. मेलेल्या सैनिकांच्या आया, बहिणी, बायका, पोरें यास शिव्याशाप देऊं लागले. त्यामुळें पश्चात्ताप होऊन हा आजारी पडला व स. १२०६ मध्यें मरण पावला, असें कांहीं बखरकार म्हणतात. तथापि खरी गोष्ट अशी दिसते कीं, याच्या वेड्या धाडसानें झालेल्या मनुष्यहानीमुळें संतापून अलीमर्दान नांवाच्या सरदारानें याचा खून केला ( कें. हि. ). याला बख्त्यार खल्जी, मुहंमदबी इख्त्यार खल्जी असेंहि म्हणत. याला अफगाण म्हटलेलें आढळतें ( हि. का. १. १२६-१२८ ).

**इख्तियार उद्दीन युझबक**—( स. १२४६-५८ ) बंगालचा सुभेदार.

**इचलकरंजीकर ( जोशी ) यांची वंशावळ**—

विश्वनाथपंत (जोशी) वरवडेकर.

नारोपंत ( हुपरीकर वंश ) महादजीपंत-गंगाबाई

*१ नारो महादेव(ज.स.१६६३-१७१६ )-लक्ष्मीबाई.

२ लग्न अनुबाई= २ व्यंकटराव(स.१७०१-मृ.१७४५) सुमारें (स.१७२०) पेशव्यांची मुलगी ( मृ. १७८३ ). ३ नारायणराव ताल्या (मृ. १०-११-१७७० )

वेणुबाई(पत्नी-त्रिंबकराव पेठे). ४ व्यंकटराव दादा सा. =रमाबाई आत्महत्या ( २-१-१७९५. )

५ नारायणराव बाबासा. (द.मृ.३-१-१८२७) =गंगाबाई.

( ६ ) व्यंकटराव रावसा० ( मृ० १६-२-१८३१ )

( ७ ) केशवराव तात्या सा. ( मृ. ७-२-१८५२ )
|
( ८ ) व्यंकटराव ( द. ) ( मृ. ८-४-१८५४. )
|
(९) गोविंदराव आबासा. (द.) (मृ०१५-२-१८७६)
|
(१०) नारायणराव बाबासा.(द.)ता. १०-८-१८७६.

* **टीप**—संताजीराव घोरपडे यानें नारो महादेव यास नोकरीस ठेविलें आणि पुत्र मानलें. शेवटीं सरंजाम देऊन या घराण्याची इचलकरंजी येथें स्थापना केली. यानें कृतज्ञता म्हणून मूळचें आडनांव सोडून घोरपडे हें नांव स्वीकारलें ( म. रि. म. १ पृ. ४१६).

**इच्छनीकुमारी**—अबूच्या परमार घराण्यांतील जैत राजाची मुलगी. ही फार रूपवान असल्यामुळें गुजराथचा राजा ( भोळा ) भीमदेव यानें हिच्याविषयीं परमार राजाकडे मागणी केली. जैत राजानें भीमदेवाची मागणी नाकारून युद्धाची तयारी केली. युद्धाची सिद्धता झाल्यावर साबरमतीच्या कांठीं लढाई होऊन भीमदेवाचा पुरा मोड झाला. या लढाईंत पृथ्वीराजानेंहि हिच्या प्राप्तीकरितां भाग घेतला होता ( मु. रि. भा. १ ला, पृ. ९०- १९७ ).

**इच्छाराम**—एक गुजराथी कवि. हा डाकूरचा गुजराथी ब्राह्मण. यानें गुजराथींत दशावतारवर्णन नांवाचें काव्य केलें आहे ( का. दो. ).

**इच्छारामपंत ढेरे**—माधवराव पेशवे आजारी असतां थेऊरास त्यांचे आजाराचे शेवटचे दिवसांत त्यांच्या शुश्रूषेस राहिलेल्या मंडळींपैकीं इच्छारामपंत ढेरे हा एक होता. माधवरावास यातना सहन होत नसल्यामुळें तो सारखा जीव देण्यासाठीं खंजीर मागत होता. तो न दिल्याबद्दल त्यानें इच्छरामपंतास मुस्क्या बांधून चोप दिला. इच्छारामपंत हा माधवरावाचा खाजगीकडील विश्वासू कारकून होता. नारायणरावांचे खुनाचे दिवशीं गारदी वाड्यांत शिरून पगाराकरितां गलगा करूं लागले. तेव्हां " कचेरीच्या वेळेस पगार मागा, आतां यजमान निजले असतां गलगा करण्याचें कारण नाहीं." असें त्यांना हा दरडावून सांगूं लागला. तेव्हां गारद्यांनीं यास ठार मारलें ( म. रि. म. भा. ४, पा. ३३६ ).

**इझ्झुद्दीन**—( मुहम्मद शीरान खल्जी पाहा ).

**इझ्झुद्दौला अब्दुर रशीद गझनवी**—(स.१०५२) हा महमूद गझनवीचा सहावा मुलगा किल्ह्यांत कैदेंत होता. मौदूद गझनवी स. १०४९ मध्यें वारल्यावर त्याचा भाऊ अली अबू अल् हसन ( अली बहाउद्दौला ) यास गझनीचे उमरावांनीं तक्तावर बसविलें होतें. परंतु तो दुबळा होता. त्यास राज्यकारभाराची जबाबदारी रेटेना. तेव्हां यास कैदेंतून सोडण्यांत आलें. यानें गझनीवर स्वारी करून अलीस पदच्युत केलें व आपण अमीरपदाधिष्ठित झाला. इझ्झुद्दौला अभ्यासू पंडित होता; व धर्मशास्त्राचें अध्ययन करी. मात्र शिस्त बिघडलेल्या स्वतःच्या राज्याचा कारभार पाहण्यास हा फारसा लायक नव्हता. यानें पंजाबच्या राज्यकारभाराचे कामगिरीवर नूष्तिगिन नांवाचे हुषार अधिकाऱ्यास नेमिलें. नूष्तिगिननें कांग्रा किल्ला हिंदू राजा महीपाल याजकडून परत मिळविला, व प्रांताच्या कारभारांतील बिघडलेली शिस्त सुधारली. सीस्तानचे राज्यकारभारावर नेमलेल्या तुघ्रीलनें विश्वासघात करून सीस्तान प्रांतांत दरारा व शिस्त बसविली, परंतु अमीरा-ऐवजीं आपली सत्ता प्रस्थापित केली. सल्जुकांचा पराभव करून त्यानें मोठें सैन्य जमविलें व गझनीवर स्वारी केली. इझ्झुद्दौलाचा पराभव करून त्यास व राजघराण्यांतील १० इसमांस ठार मारून तुघ्रील तक्तनशीन झाला ( कें. हि. ).

**इझ्झुद्दीन बल्बन**–( स. १२५९ ) बंगालचा सुभेदार.

**इत्सिंग**—(स.६७१-७१३)हा एक चिनी प्रवासी होय. हा बौद्ध श्रमण असून यानें हिंदुस्थानला जाण्याकरितां स. ६७१ त ह्यूएन्संग परलोकवासी झाल्यावर चीन देश सोडला व जावा, मलाक्का या मार्गानें हुगळीच्या मुखाशीं असलेल्या ताम्रलिप्तीमध्यें हा स. ६७३ त जाऊन पोंचला. कांहीं कालपर्यंत यानें नालंद येथें अभ्यास केला व बुद्धगया, वाराणशी, श्रावस्ती, कुब्ज, राजगृह, वैशाली, कुशिनगर या ठिकाणीं हा फिरला. स. ६९२ मध्यें चीनला जात असलेल्या तत्सइन नामक चिनी उपाध्यायाबरोबर यानें आपला ग्रंथसंग्रह चीनला पाठविला. स. ६९५ मध्यें हा स्वतः चीनला परत गेला, त्या वेळीं तेथें राज्य करीत असलेल्या वु-हाऊ राणीनें याचें चांगलें स्वागत केलें. स. ७०० व ७१२ यांमधील कालांत यानें ५६ ग्रंथांचें भाषांतर केलें, आणि ७१३ मध्यें ७९ व्या वर्षी वारला.

**इन्शा**—( स. १७१५ ) याचें नांव सैयद इन्शा अल्लाखाँ हें असून इन्शा हें उपनांव होय. याचा बाप हकीम मीर माशा अल्ला खाँ हा असून याचा जन्म दिल्ली येथें झाला.

याचे पूर्वज समरकंदाहून हिंदुस्थानांत आले. लहानपणापासूनच हा चलाख आणि प्रतिभावान् होता. याच्या इतका ऐटदार कवि उर्दूमध्यें दुसरा कोणी नव्हता असें म्हणतात. जो विषय हा हातांत घेई तो विषय हा मनापासून तडीस

नेई. याला गाण्याचाहि नाद होता. सतार वाजविण्यासहि हा शिकत होता. हा जन्मतःच कवि होता. हा दिल्ली सोडून मुर्शिदाबादेस गेला. पण तेथें फार दिवस न राहतां परत पुनः दिल्लीस आला. या वेळीं दिल्ली दरबारांत बेबंदशाही माजली होती. तरी पण शाहआलम बादशाहनें याचा सन्मान करून आपल्या दरबारीं ठेवलें. हा गुणी, मधुरभाषणी, हजरजबाबी, विनोदी आणि कवि असल्यामुळें याचा प्रभाव दरबारांत चांगला पडून याच्याशिवाय शाहआलम बादशाहास चैन पडत नसे. याचा वर्ण गोरा असून हा देखणाहि होता.

फायक नांवाच्या कवीनें याच्यावर निन्दात्मक कविता लिहिली. ती ऐकून इन्शा खूष झाला. कांहीं गोष्टींविषयीं यांचीं व बादशाहाचीं मतें जुळत नसत. ज्या गोष्टी बादशाहास आवडत नसत त्या गोष्टी इन्शा बादशाहास न विचारतां करीत असे व पुढें अशाच कांहीं गोष्टीवरून बादशाहा याच्यावर रुष्ट होऊन यांचें वेतन बंद केलें.

१ उर्दू गजलों का दीवान, २ दीवान रेख्तों, ३ उर्दू के कसीदे, ४ फारसी के कसीदे, ५ दीवान फारसी, ६ मसनवी शेर बिरंज, ७ मसनबी फारसी बेनुक्त, ८ शिकार नामा फारसी, ९ निन्दात्मक पद्य, १० मसनवी आशिकाना, ११ हाथी और चंचल प्यारी हथिनी की शादी, १२ फुटकर शेर, १३ दीवान बेनुक्त, १४ मातए आमिल ( फार्सी ), १५ मुर्ग नामा ( उर्दू ) हे सर्व ग्रंथ इन्शाचे होत. याशिवाय यानें 'दरियाय' आणि 'राणी केतकी की कहानी' हींहि पुस्तकें लिहिलीं आहेत.

याला हिंदुस्थानांतल्या बऱ्याचशा भाषा येत होत्या. कधीं पंजाबी, कधीं काश्मीरी, कधीं मराठी, कधीं अफगाणी, कधीं ब्रज वगैरे भाषा हा बोलत असे. तात्पर्य हा बहुभाषाभिज्ञ असून प्रतिभाशाली पुरुष होता. याचा मृत्यु स. १७९५ मध्यें झाला ( क. कौ. भा. ४ था ).

**इब्न खुर्दादबा**—एक अरबी प्रवासी. यानें मान्यखेट वल्लभराय ( ब-हारा ) व बंगालच्या पाल राजाची माहिती दिली आहे. तसेंच यानें सात जातींचें सविस्तर वर्णन केलें आहे. हा स. ९१२ या सुमारास मेला ( म.भा.२ २६६). हा मक्केच्या यात्रेस गेला होता ( बील ).

**इब्न बतूता**—आफ्रिका खंडांतील तांजर्स येथें राहणारा इब्न बतूता नामक एक विद्वान गृहस्थ आशिया खंडांत फिरत फिरत सन १३४० त दिल्लीस आला.

यानें मुहंमद ( जोना ऊर्फ उलुघबेग ) तुघ्लखाच्या दरबारची बरीच हकीकत दिली आहे. यानें दिल्ली शहराचें विस्तीर्ण वर्णन केलें आहे. हा दिल्लीस पोंचला तेव्हां तेथें सुलतान नव्हता. सुलतानच्या आईनें या परदेशी पाहुण्याचें स्वागत अत्युत्तम केलें. सुलतान आल्यावर त्यानें याच्या खर्चाचा बंदोबस्त चांगला करून दिला. याची मुलगी दिल्लीस वारली, तेव्हां सुलताननें तिचा उत्तरविधि मोठ्या समारंभानें करविला. त्या समारंभांत सुलतानचे वतीनें त्याचा वजीर हजर होता. यांस मुहंमदानें न्यायाधीशाचें काम सांगितलें आणि त्याबद्दल मोठें वेतन करून दिलें. याचें पंचावन्न हजार दिनारांचें कर्ज सुलतानानें वारिलें. तुघ्लख घराण्यांतील जो मुहंमद ( जोना ऊर्फ उलुगबेग ) त्याच्या क्रूर कृत्यांचें यानें चांगलें वर्णन केलें आहे. तें वर्णन वाचून अंगावर कांटा उभा राहतो. मुहंमदाचीं क्रूर कृत्यें यानें स्वतः पाहिलेलीं होतीं. यानें मुहंमद सुलतानाच्या स्वभावाचें वर्णन येणेंप्रमाणें केलें आहेः—

'लोकांवर उपकार करणें व त्यांस तलवारीच्या धारेखालीं धरणें ह्या दोन्ही गोष्टी एकदम करणारा मनुष्य या सुलतानाशिवाय दुसरा कोणी सांपडणार नाहीं. सुलतानच्या हातून द्रव्य मिळवून दुःख निवारण झालेला भिकारी, आणि त्याच्याच हातून शिक्षा झालेल्या इसमाचें प्रेत, अशांची जोडी त्याच्या वाड्याच्या दारांत सदैव दिसून येते. ..... वगैर.' ( मु. रि. भा. १ ला, पृ. १५२, १५९, १६१; अलाउद्दीन तमोशिरीन घियासुद्दीन मुहंमद पाहा ). यानें 'इब्न बतूताचे प्रवास' या नांवाचा ग्रंथ लिहिला. त्याचें स. १८२९ मध्यें इंग्रजी भाषांतर रेव्ह. एस. ली. बी. डी. लंडन, यानें केलें ( बील ).

**इब्न हौकल**—एक अरबी प्रवासी. यानें स. ९७६ च्या सुमारास आपलें प्रवासवृत्त लिहिलें. यानें वल्लभराय राष्ट्रकूटाच्या राज्यांतील सुबत्तेचें वर्णन केलें आहे ( म. भा. २, २७० ).

**इब्राहीम**— ( स. १५२६ सुमार ) काश्मीरच्या मुहम्मदशाहाचा मुलगा. हा फत्तेशाहानंतर गादीवर आला.

**२.** ( स. १५५२ ) काश्मीरच्या मुसलमान राजांपैकीं नाझुकशाहाचा पुत्र. पित्यानंतर हा गादीवर आला.

**३.** ( शंसुद्दीन इब्राहीमशाहा पाहा ).

**४.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील दुसऱ्या अलीचा हा एक दिवाण.

ममलकत मदारखान मुहंमद याच्या नंतर हा दिवाणाचे कामावर आला. हा जरी दिवाण होता तरी अली आदिलशाहाची मातोश्री बडीसाहेबीण हिच्या सल्ल्याशिवाय कोणतीहि गोष्ट होत नसे. बडीसाहेबीण मक्केच्या यात्रेस

निघाली, तेव्हां तिजबरोबर हाहि निघाला. म्हणून, याचा मुलगा अबदुल मुहंमद यास सर्व अधिकार दिला.

( विजापूरचें आदिलशाही घराणें मोडककृत ).

५. शिवाजीचा इमानी नोकर. ता. १५ एप्रिल स. १६७४ रोजीं शिवाजीनें फोंडा किल्ल्यास वेढा दिला. मोर्चा लावून हल्ले चढवीत असतां आदिलशाहीचा सरदार बहलोलखान किल्लेकऱ्याच्या उपराळ्यास येत असल्याचें कळलें. तेव्हां त्यास पिटाळून लावण्याचा शिवाजीनें बेत केला. वेढ्याची ढिलाई पाहून किल्ल्यांतील शिबंदीचे स्वार तटावर व बुरुजावर उभे राहिले. शिवाजीनें ही संधि साधून आधींच तयार असलेले सुरुंग उडवले. तेव्हां आंतील शिबंदाची पळापळ झाली. या गर्दीत यानें मोठ्या धैर्यानें किल्ल्यावर निशाण चढविलें म्हणून शिवाजीनें यास तेथील सुभेदारी दिली.

**इब्राहीम आदिलशाह**—( स. १५३४–१५५७ ) हा विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील इस्माईलचा पुत्र. हा याचा थोरला भाऊ मल्लू याचे नंतर विजापूरचे गादीवर आला.

गादीवर आल्यावर यानें प्रथम इमामांच्या नांवानें खुत्बा पढण्याचें बंद करून सुनी पंथ राज्यांत चालू केला. परदेशीय शिपायांस रजा देऊन त्यांचे जागीं दक्षणी व मोंगल शिपायांस नोकरीस ठेविलें. इस्माईलचे कारकीर्दीत ज्या रीति व वहिवाटी चालू होत्या, त्या सर्व इब्राहीमानें बंद केल्या. सर्व सरकारी हिशोब व दप्तर आजपर्यंत फार्सी भाषेंत व लिपींत ठेवीत असत, तें बंद करून मुलकी कामावर ब्राह्मणांस नेमून त्यांच्या करवीं सर्व हिशोब व दप्तर मराठी भाषेंत व मोडी लिपींत ठेवण्यास सुरवात केली. येणेंकरून मराठ्यांचें प्राबल्य दिवसेंदिवस वाढत चाललें.

जेव्हां विजयनगरचा व्यंकट ( १ ला ) याचा प्रधान सलाकम तिम्म राजु याचा कारभार जनतेस असह्य व जुलमी होऊं लागला तेव्हां वरदादेवी-अमाल, आणि दोवागर या राण्यांनीं मिळून याच्याकडे मदत मागितली आणि सलाकमास बडतर्फ करून आपल्या मुलास गादीवर बसविण्याबद्दल विनंति केली. या विनंतीस मान देऊन यानें विजयनगरवर स्वारी केली. पण सलाकमानें अन्य प्रयत्नानें हा डाव फसविला. ज्या वेळीं विजयनगरचा सदाशिव राजा गादीवर बसला, त्या वेळेपासूनच हिंदु व मुसलमान यांच्या भांडणास सुरुवात झाली. विजयनगर येथें सदाशिव राजाच्या राज्याभिषेकाची गडबड चालू असतां यानें असदखानाच्या मदतीनें विजयनगरच्या राज्यांतील आडोनी किल्ल्यावर स्वारी केली. तेव्हां रामरायानें आपल्या भावास पाठवून याच्याशीं तह केला. एकदां रामराय आणि बुर्हाण निजामशाह यांनीं याच्यावर स्वारी केली तेव्हां यानें आपल्या मंत्र्याच्या सल्ल्यानें या दोन बलिष्ठ शत्रूंशीं सख्य केलें. याप्रमाणें याच्या व विजयनगरच्या राजामध्यें नेहमीं झटापटी होत.

एकदां याचा सरदार असदखान यानें विजयनगरच्या रामराजाचा भाऊ वेंकटाद्री याचा पराभव केला व त्याच्या छावणींतून बरेंच जडजवाहीर लुटून आणलें. तेव्हां इब्राहीमानें असदखानास प्रधानकीचीं व सेनापतीचीं वस्त्रें दिलीं, आणि त्याच्या एका कन्येशीं लग्न केलें. त्या कन्येच्या पोटीं जो पुत्र होईल त्यास आपल्यामागून गादीवर बसवावें असें इब्राहीमानें सांगितलें. या लग्नानें असदखानाचें प्रस्थ जास्त माजलें. तेव्हां दरबारांतील लोक त्याच्या विरुद्ध वाटेल त्या कंड्या पिकवूं लागले व त्याचा हेवा करूं लागले. दरबारांतील विरुद्ध असलेल्या लोकांनीं राजाचें मन असदखानाविषयीं कलुषित करून त्याला राजाकडून दिवाणाचे जागेवरून कमी करविलें. पुढें असदखानानें इमादशाहास आपली सर्व हकीकत सांगून त्याची खात्री पटविली व त्याच्याकडून राजाचा आपल्याविषयीं असलेला गैरसमज दूर करविला. हा गैरसमज दूर केल्यावर राजानें असदखानास आलिंगन दिलें. त्याच्याविषयीं आपलें मन कलुषित करणाऱ्या सर्व लोकांस कैदेंत ठेविलें; व असदखान पुनः कारभार पांहूं लागला. यानंतर असदखान थोड्याच दिवसांनीं मरण पावला.

इब्राहीमला बहुतेक आपली सर्व कारकीर्द विजयनगरच्या रामराजाशीं लढण्यांत खर्च करावी लागली. विजयनगरशीं शेवटची लढाई होऊन तींत विजयनगरचा पराभव झाला. याप्रमाणें स्थिरता झाल्यावर इब्राहीमास जबरदस्त दुखणें आलें. अलीकडे बरेंच दिवसांत हा दारू फार पिऊं लागून, पाहिजे त्या वाईट स्त्रियांशीं संभोग करूं लागला होता. या व्यसनापासूनच ज्वर, मस्तकशूळ, घेरी, श्वास, असे अनेक रोग होऊन यास जिवावरचें दुखणें आलें; व त्या दुखण्यांतच हा स. १५५७ मध्यें मरण पावला. यानें एकंदर २४ वर्षें व कांहीं महिने राज्य केलें. अलाउद्दीन इमादशाहाची मुलगी रबिअसुलताना ही याला दिली होती. याला अली वगैरे पुत्र व तानीबिबी आणि बयदासुलताना अशा दोन कन्या होत्या. पहिलीचें लग्न अलीबरीद याशीं आणि दुसरीचें निजामशाहाशीं झालें.

हा शूर व पराक्रमी होता. यानें शूरत्वानें आणि निर्भयपणें युद्धें केलीं. हा सर्वदा शत्रूंवर दौड करून जात असे. आणि त्यांच्या मुलुखांची नासाडी करीत असे. विद्वानांची व गुणीजनांची याला पारख होती. पण हा राज्याच्या अखेरीस मोठा क्रूर, निर्दय आणि दुर्गुणी झाला. अल्प अपराधास मोठी शिक्षा करूं लागला, आणि क्षमा व दया कोणावर करीत नसे ( विजापूरचें आदिलशाही घराणें-मोडकळीत ).

**२.** ( स. १५८०–१६२७ ) विजापूरच्या आदिलशाहाच्या घराण्यांतील तहमास्पाचा मुलगा. अलीस पुत्रसंतान नसल्यामुळें अलीनंतर हा विजापूरच्या गादीवर बसला.

गादीवर बसला तेव्हां याचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. आरंभापासूनच याचें राजतेज नजरेस येऊं लागलें. याच्या विस्तीर्ण भाळावरून हा पुढें चांगला निघेल, असा सर्वांचा तर्क असून तो बहुतांशीं खरा झाला. एकदां हा दरबार बरखास्त झाल्यावर वाड्यांत जात असतां याच्या एका सरदारानें साहजिकच ह्यास म्हटलें कीं, 'आज सरकारांस विशेष तसदी पडली.' तेव्हां यानें उत्तर दिलें कीं, ' ईश्वरी कृपेनें आतां जें काम मजकडे आलें आहे त्यांत विश्रांति मिळण्याची मीं इच्छा करणें म्हणजे राजनीतीस किंवा बादशाहा या नांवास बाध आणणें होय.' अशा याच्या कित्येक समर्पक आणि चटकदार भाषणांवरून लोकांनीं साहजिकच ताडलें कीं याच्या कारकीर्दींत प्रजा बहुधा आबादानींत राहील.

हा अल्पवयी असल्यामुळें याचा कारभार कामीलखान दक्षणी हा पाहत असे. याची चुलती चांदबिबी ही याच्या विद्याभ्यासावर देखरेख करी व याचें पालनपोषण करी. पुढें कामीलखानानें चांदबिबीची अदबी ठेवण्याचें एका बाजूस झुगारून उन्मत्तपणा आरंभिला, तेव्हां चांदबिबीनें त्याच्या नाशाचे उपाय चालविले. आणि शेवटीं ( हाजी ) कीश्वरखान नांवाच्या एका सरदाराकडून कामीलखानाचा खून करविला. कामीलखानानें दोन महिने दहा दिवस काम पाहिलें. याच्या नंतर कीश्वरखान दिवाणाचें काम पाहूं लागला. पण कीश्वरखानाविषयींहि लोकमत प्रतिकूल होऊन त्याच्या नाशाच्या खटपटीस सरदार लोक लागले. पुढें कांहीं कारणावरून कीश्वरखानानें चांदबिबीस कैद करण्याचा हुकूम बादशाहाकडून घेतला व चांदबिबीस सातारच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. चांदबिबीस कैद केल्यावर कीश्वरखान निर्धास्त झाला आणि आपल्यास वाटेल तसा कारभार करूं लागला. त्यामुळें प्रजेस फार त्रास होऊं लागला. शेवटीं कांहीं कारणावरून हबशी लोकांनीं कीश्वरखानास ठार मारिलें. कीश्वरखानानें एकंदर चार महिने बारा दिवस काम केलें. कीश्वरखानास मारावयाचें काम इखलासखान यानें केलें. त्यानंतर इखलासखान हा दिवाणाचें काम पाहूं लागला. इखलासखानानें चांदबिबीस कैदमुक्त करून कीश्वरखानाच्या वेळचे सर्व अधिकारी काढून टाकले. शेवटीं दिलावरखानानें कृतघ्नपणानें इखलासखानाचे डोळे काढून त्यास कैद केलें, व विजापूरचा कारभार दिलावरखान पाहूं लागला. दिलावरखान दिवाणाचें काम पाहूं लागला, ही गोष्ट हमीद यास पसंत पडली नाहीं. तेव्हां दिलावरखानानें हमीदास कैद केलें. अबदुल हसन हा क्षणांत काय करील याचा त्याला विश्वास नव्हता म्हणून त्यानें त्याला जिवें मारिलें. दिलावरखान चांगला विचारी असून राजकीय व धर्म या विषयांवर वादविवाद करण्याची त्याला फार गोडी असे ! राज्यांत नेहमीं स्वस्थता असावी, कोठेंहि दंगाधोपा नसावा, असें त्यास वाटे. अदोनीचा किल्लेदार घालीबखान यानें बंड केलें होतें, त्यास आपल्या बुद्धिचापल्यानें पकडून त्याचे डोळे काढिले. याप्रमाणें यानें ( दिलावरखान ) सतत आठ वर्षेपर्यंत अबाधित राज्यकारभार चालवून आणि राज्याचें उत्पन्न वाढवून आदिलशाही राज्य भरभराटीस आणिलें.

स. १५८६ मध्यें इब्राहीम आदिलशाहा प्रौढदशेंत आल्यामुळें त्याच्या लग्नाचा विचार निघाला व कुत्बशाहाची बहीण मलिकाजहान हिचेबरोबर त्याचा विवाह झाला. त्या वेळीं राज्यांत दिलावरखानाचें प्रस्थ फार माजलें होतें. दिवाणाच्या हुकमाशिवाय राज्यांतील एक पानहि हालत नसे. त्यामुळें इब्राहीमास दिवाणापासून फार त्रास होऊन एके दिवशीं यानें दिवाणास, कांहीं सरदारांच्या मदतीनें राज्यत्याग करणें भाग पाडलें. नंतर इब्राहीम आदिलशाहा दिलावरखानाच्या धाकदराऱ्यांतून व जाचांतून सुटतांच याच्या खऱ्या स्वरूपावर जो बुरखा होता तो एकीकडे झाला, आणि यानें त्याच ठिकाणीं मसनदीवर चढून सर्वांच्या भेटी व नजरनजराणे घेतले.

यानें राज्यसूत्रें हातीं घेतांच सर्व खात्यांचा उत्तम बंदोबस्त ठेवून चांगली व्यवस्था केली. सर्व कामें न्यायानें, दयाळुपणानें आणि शाहाणपणानें करण्याकडे याची एकसारखी नजर असे. प्रजेची दादहि चांगली लागे. त्यामुळें ती सर्वदा सुखांत राहून राजाचें कल्याण चिंती. येणेंकरून मागील दंग्याचें तिला लवकरच विस्मरण पडलें. दिलावरखान यानें राज्यत्याग केल्यावर तो दुसऱ्या बुर्हाण निजामशाहाकडे

गेला. तेथें त्याचा चांगला सत्कार झाला. पुढें दिलावरखानानें बुर्‍हाण निजामशाहास चढवून इब्राहीम आदिलशहावर स्वारी करण्याचा निश्चय केला व या मुलखांत बंडाळी माजविली. तेव्हां इब्राहीमानें दिलावरखानास पुनः आपला दिवाण नेमण्याचें कबूल करून त्यास विजापूरीं बोलविलें. दिलावर विजापुरास आल्यावर इब्राहीमानें त्याचे डोळे काढून त्यास सातारच्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. दिलावरखानाची अशा प्रकारें वाट लाविल्यावर यानें बुर्‍हाणशाहावर स्वारी करून त्याचा पूर्णपणें मोड केला. स. १५९५ सालीं याची व इब्राहीम निजामशाहाची लढाई होऊन तींत निजामशाहाचा पराभव झाला व त्यांत तो मारला गेला. त्या वेळीं इब्राहीम आदिलशाहाचा सेनापति हमीदखान होता.

हा वरचेवर कर्नाटकावर स्वार्‍या करीत असे. विजयनगरचा दुसरा वेंकट याच्या कारकीर्दीत यानें पेणुकोंडावर स्वारी केली होती. पण दुर्दैवानें त्या स्वारींत याचा पूर्ण मोड झाला. यानंतर यानें विजयनगरवर स्वारी न करतां त्याच्याशीं सख्य करण्याचा प्रयत्न केला. कारण उत्तरेकडील मोंगल साम्राज्य प्रबळ होऊन दक्षिणेकडील राज्यें जिंकण्यास सुरवात झाली होती. त्यामुळें आतां त्यांच्यांत दोस्तीचा तह झाला होता.

याला गायनाचा नाद असे. आणि तो पुढें हळूहळूं वाढत गेला. स. १६०५ मध्यें इब्राहीम आदिलशाहाची कन्या फातेमा सुलतान, ऊर्फ बादशाहासाहेबा हिचें लग्न १७ वे वर्षीं शाहा हाबिबुल्लाह बिन शाहा यदुल्लाह हुसनी या श्रेष्ठ कुलांतील पुरुषाशीं झालें. यास आणखी एक मुलगी असून ती अकबराचा मुलगा दानियाल यास दिली होती. याला चार बायका असून त्या चौघींनाहि मुलगे होते आणि आपल्या मुलाला राज्य मिळावें म्हणून त्या कारस्थानें करीत. या घरगुती प्रकरणानें शेवटीं हा अगदीं त्रस्त होता ( दर्वीश पाहा ). यानें निजामशाहीच्या मलिकंबरास मदत केली होती.

हा कविताहि करीत असे. याच्या बऱ्याच फर्मानांवर 'पूजा ( पूज्य ) श्री सरस्वती' असें लिहून प्रारंभ केलेला असतो. यानें एक संगीतमहाल बांधून त्यांत सरस्वतीच्या मूर्तीची स्थापना केली होती. यामुळें हिंदू लोकांनीं याला 'जगद्गुरु' अशी पदवी देऊन गौरविलें होतें. याचेच कारकीर्दीत मुहंमद कासीम फेरिस्त्यानें आपला इतिहास लिहिला.

गायनकलेंत निपुण असल्यानें याचें सुंदर गाणें ऐकून अन्तरिक्षांतून जाणारा तपस्व्याचा शिष्य याच्या माडीवर उतरला. तेथें गायन ऐकत असतां त्यास निद्रा लागली. ज्या एका गुटिकेच्या साहाय्यानें तो आकाशांत संचार करूं शकत असे ती गुटिका जवळच पडली व ती याला सांपडली. पण तो जागा झाल्यावर गुटिकेकरितां आकोश करूं लागला तेव्हां ती यानें त्यास परत दिली. तो शिष्य नित्य रामेश्वरचें उदक गुरूला स्नानार्थ देत असे. याची माहिती ऐकून याला जगद्गुरु अशी पदवी गुरूनें धाडून दिली अशी आख्यायिका आहे. लोक याला जगद्गुरु पातशा म्हणत ( प. सा. ५० ).

गायनाकडे विशेष झोंक असल्यामुळें यानें हिंदु लोकाशीं बराच परिचय ठेविला होता. सरस्वतीपूजन व सेवा केल्याशिवाय आवाज सुधारणार नाहीं आणि चांगलें गातां येणार नाहीं म्हणून बहुधा सर्व जातींचे लोक प्रथम सरस्वतीपूजन करून नंतर गायन शिकतात. त्याप्रमाणें यानें केलें होतें. त्यामुळें यानें मुहंमदी धर्माचा परित्याग केला, असें लोक म्हणूं लागले. हें सर्वथैव जरी खरें नसलें तरी गायनाच्या छंदामुळें याचें हिंदुधर्माकडे विशेष लक्ष असावें, यांत शंका नाहीं. स. १६२० मध्यें यास भगेंद्र रोग झाला. तेव्हांपासून वैद्य, हकीम इत्यादिकांनीं रोगपरिहारार्थ सतत उद्योग चालविले होते, तरी गुण नव्हता. इतक्यांत फारनालीब म्हणून कोणी उत्तम फिरंगी वैद्य आहे, असें वर्तमान समजलें. तेव्हां त्याला बोलावून आणून औषधोपचार केले पण त्याचाहि कांहींएक उपयोग न होतां, हा भगेंद्र रोगानेंच १२ सप्टें. स. १६२७ मध्यें मरण पावला. याच्यानंतर याचा मुलगा मुहंमद विजापूरचे तक्तावर बसला.

**इब्राहीम कुत्बशाह**—( स. १५५०-१५८१ ) हा गोवळकोंड्याचा एक सुलतान होय. याची हुसेन निजामशाहाशीं कल्याणीजवळ भेट झाली. तेव्हां हुसेन निजामशाहनें आपली मुलगी बिबी जमाली हिचा विवाह याच्याशीं थाटानें करून दिला.

यानें प्रथम विजयनगरच्या रामरायास मदत केली, आणि त्याच्याशीं सख्य केलें. पण ही मैत्री फार दिवस टिकली नाहीं. यानें अली आदिलशाहाची आणि दक्षिणेकडील इतर राजांची एकी शरीरसंबंधानें घडवून आणून विजयनगरच्या रामरायाविरुद्ध कारस्थान चालविलें. या कारस्थानांत याचा उद्देश विजयनगरच्या वाढत्या सत्तेस आळा घालणें हा होता. शिवाय यानें लढाईची तयारी चालविली.

पुढें स. १५६५ मध्यें राक्षस-तागडी येथें मुसलमानांची व विजयनगरच्या रामरायाची लढाई झाली. त्या वेळीं

हा मुसलमानांतील एक प्रमुख होता. राक्षस-तागडीच्या लढाईनंतर यानें व पहिला मुर्तझा निजामशाहा यानें मिळून विजापूरच्या अली आदिलशाहावर स्वारी केली होती. विजयनगरच्या श्रीरंगाचे ( तिरुमल्लाचा मुलगा ) राज्यावर जेव्हां विजापूरच्या अली आदिलशाहानें स्वारी केली तेव्हां यानें श्रीरंग यास मदत केली होती. पण पुढें स. १५७९ मध्यें यानें विजयनगरवर स्वारी केली व तींत हिंदूंचा पूर्ण मोड केला. हीच याची विजयनगरवरची शेवटची स्वारी होय.

यानंतर हा स. १५८० मध्यें मरण पावला व त्याची गादी त्याचा मुलगा मुहम्मद कुली कुत्बशाहा यानें घेतली ( आरिवदु डिनॅस्टी ऑफ विजयनगर ).

**इब्राहीमखान**—थो. शिवाजीच्या आरमारांतील एक सरदार.

**इब्राहीमखान गारदी**—( स. १७५७-१७६१ ) हा अंगानें अगदीं किरकोळ व वर्णानें काळा असून, देवीच्या वणांनीं याचें तोंड अगदीं विद्रूप झालेलें होतें. पांदीचरी येथें ड ब्यूरी नांवाचा एक कामगार होता. त्याच्या पालखीपुढें छडी घेऊन धांवणारा एक लहानसा शिपाई म्हणून हा नोकरीस लागला. यास थोडें पोर्तुगीज येत असल्यामुळें कांहीं लष्करी कवाईत माहीत होतांच ड ब्यूरोनें यास शिपायांचा नाईक केलें. त्यानंतर यास लवकरच फौजेंत अमलदारी मिळून याच्या हाताखालीं दोन हजार पायदळ व दोनशें स्वार जमा झाले. अशा रीतीनें फ्रेंच फौजेंत अमलदारी मिळतांच पुष्कळसे इसम स्वतंत्र उद्योग करूं लागत. तदनुसार यानें फ्रेंचांची नोकरी सोडली आणि निरनिराळ्या दरबारांत यानें आपला शिरकाव करून घेतला ( सय्यद गुलाम हुसेनखान कृत सैयद्दल मुताखरीन, भा. ३, पा. ३५५ ).

गारद्यांची फलटण हिंदुस्थानांत प्रथम मूसाबुसीनें तयार केली आणि त्यांत हा तयार झाला अशी प्रसिद्धी आहे.

स. १७५७ सप्टेंबरच्या सुमारचें एक पत्र प्रसिद्ध आहे ( ऐ. प. ९१ ). त्यावरून त्या वेळीं हा सदाशिवराव भाऊ पेशव्यासारख्यांना लक्ष देण्यासारखा योद्धा प्रसिद्ध होता असें दिसतें. तें पत्र बहुधा निजाम व पेशवे यांच्यांत झालेल्या सिंदखेडच्या लढाईबद्दल असावें. त्या वेळीं हा निजामाकडून लढत होता. पण हा स. १७५८ च्या जूनानंतर मराठ्यांस येऊन मिळाला ( म. इ. सा. १. १५४ ). हा वऱ्हाडांत निजामअल्लीकडे कांहीं दिवस होता. तेथून बुसीनें याला फोडून पुनः आपणाकडे घेतलें होतें ( पे. द. २०.९३,५५ ). पण बुसीच्या तोफखान्याचा प्रभाव सदाशिवरावावर पडून त्यानें मराठ्यांकडे नसलेला तोफखाना प्रथमच उभारला आणि याच्यासारखीं माणसें जवळ केलीं असें दिसतें. उदगीरच्या लढाईतहि यानें महत्त्वाची कामगिरी केली आणि भाऊचा हा एक विश्वासाचा माणूस झाला होता (पे. द. १.६६,७९). याला विश्वासांत घेणें मल्हारराव होळकरास पसंत नव्हतें. म्हणून त्या दोघांचें वैर जुंपलें होतें. पूर्वी मराठे गनिमी काव्यानें लढत असत. गनिमी कावा म्हणजे शत्रु गैरसावध असतां त्यावर हल्ला करावयाचा आणि शत्रु सावध झाला कीं, पळ काढावयाचा अशा रीतीनें धांवपळीचें युद्ध करावयाचें.

हा उदगीरच्या लढाईंत भाऊसाहेबाबरोबर होता. तेथून सर्व पानपतकडे निघाले तेव्हां भाऊसाहेबाशीं याचा झालेला संवाद भाऊसाहेबाचे बखरींत पुढीलप्रमाणें दिला आहे.

इब्राहीम–तुम्ही गनीम लोक दहा वेळ पळाल व दहा वेळ उभे राहाल. आम्ही गारदी केवळ पाय उतारे, आम्हास पळावयास पाय नाहींत आणि गांठ तों रोहिल्याची पडणार.

भाऊसाहेब–निदान प्रसंग पडला तरी आम्ही तुम्हांस सोडून निघणार नाहीं. तुम्ही गाडून उभे राहाल तेथें मीहि उभा राहीन. यास अंतर करणार नाहीं.

असें म्हणून भाऊसाहेबानें बेलभंडार दिला आणि यानें दिलेली साजकरोटी आपण घेतली.

दिल्लीकडे चालून जातांना याच्या हाताखालीं दहा हजार गारदी होते. आणि शंभर तोफांचा तोफखाना होता.

दिल्ली घेऊन कुंजपुऱ्याकडे भाऊसाहेब निघाले तेव्हां त्यांना बातमी लागली कीं, कुत्बशाह व शाहमतखान कझलबाश हे कुंजपुऱ्याच्या किल्ल्यांत अडकले असून त्यांना अबदाली कुमक पाठविणार आहे. तेव्हां सदाशिवरावभाऊनें यास स्वार पाठवून तांतडीनें बोलावून घेतलें. तेव्हां हा रातोरात कूच करून दाखल झाला. तेव्हां सदाशिवरावभाऊनें हल्ल्याकरितां ठरविलेल्या मुहूर्तास तीन घटका अवकाश होता. भाऊनें निरोप पाठविला कीं, ' मुहूर्तास तीन घटका अवकाश आहे. तूर्त न उठावें.' तेव्हां यानें उत्तर पाठविलें कीं, ' मुहूर्त कशास पाहिजे ? आम्ही किल्ला फत्ते करितों आणि हुजूर येतों. ' त्याप्रमाणें यानें हल्ला करून किल्ला सर केला. हा मुहूर्तांकरितां थांबला असता तर शत्रूला कुमक आल्यामुळें याला किल्ला सर करणें जड गेलें असतें.

याप्रमाणें पानपतावर मुक्काम झाल्यावर तीन मोठीं युद्धें झालीं. त्या वेळीं इब्राहीमखानानें चांगलाच पराक्रम केला. पण पानपतावरील दीर्घकालीन मुक्काम मराठ्यांना फारच भोंवला. शेवटीं सर्व सैन्यासह निघून जावें असें ठरलें. परंतु अबदालीची फौज वाटेंत असतां तिच्या अंगावरून निघून जाणें शक्य नाहीं असें मल्हारराव होळकरादिकांचें म्हणणें होतें. शेवटीं निघून जावेंच असें ठरवून याला बोलावून घेतलें.

इब्राहीम–भाऊसाहेब, तुम्ही ज्या वेळीं इकडे यावयासी मसलत केली ते समयीं तुमचे आमचे इनाम प्रमाण झाले तेंच करार आहे. आमचे गैर इनाम असते तरी प्रचीत दाखवितो. म्हणोन बोलोन दुराणी व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला यांचीं पत्रें पंचवीस दाखविलीं कीं, 'तुम्ही आम्ही एकजात आहों, यासमयीं आम्हाकडे यावे म्हणजे तुम्हांस पंचवीस लक्षाचा मुलुख देऊ. पातशाही उमरावीहि देऊ. पत्रें म्हणोन दाखविली प्रविष्ट केली. भाऊसाहेबांनीं वाचून पाहिलीं तेव्हां त्यांचीहि याच्या प्रामाणिकपणाविषयीं खात्री झाली.

भाऊसाहेब–तुमचे आमचे इमान आहे तेंच करार (शाबूत) आहे. परंतु आतां दिल्लीस जाऊन पोंचावयाची मसलत कोणती करावी ? निभावणी कैशी होईल ?

इब्राहीम–तुम्ही गनीम लोक, तुम्हास हिंमत पुरवणार नाहीं. तुम्ही आम्हास ते कांहीं निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आम्हास सोडून जाल. आम्हास मात्र मृत्यूनें गांठलें हेंच खरें.

भाऊसाहेब–तुम्हास सोडून आम्हीं कदापि जाणार नाहीं. तुम्ही जेथें उडी टाकून उभे राहाल तेथें आम्हींहि कत्तल होऊन जाऊं. परंतु रण सोडून जाऊ हें घडणार नाहीं.

इब्राहीम–हरप्रयत्नें दिल्लीस पोंचावें हे खरेंच आहे. कीं देशीं मोंगल निजामअल्ली नबाब तुम्हाशीं लढाई हमेशा करतो, त्याचप्रमाणें गोल बांधून मध्यें बुणगे घालावे, व भोंवती मातब्बर सरदार ठेवून बाजवा वाटून द्याव्या. आणि कोस दोन कोस लढत, भांडत दिल्लीस जाऊन पोंचावें.

पण भाऊसाहेबानें पूर्वी ठरलेला बेत ऐन वेळीं बदलल्यामुळें यानें आपल्याकडून अत्यंत शिकस्त करूनहि उपयोग झाला नाहीं. याच्या तोफखान्यावर सदाशिवरावाचा फार विश्वास होता. यानें आठ हजार रोहिल्यांना ठार केलें असें म्हणतात. पण सैन्य जमून नसल्यानें मदत कोणाचीच कोणाला होईना. तोफखानाहि बंद पडला. पांच हजार गारदी कापले गेले. याचा पुत्र व भाचाहि कापला गेला. पुरंदरे दप्तर भाग १, ले. ४२५ मध्यें भाच्याच्या ऐवजीं मेहुणा असें आहे. हाहि जखमी झाला तरी लढतच होता. शेवटीं हत्यार चालेना तेव्हां कैद झाला. शेवटीं अब्दालीनें विचारलें असतां भाऊला दिलेल्या वचनाकरितां यानें अब्दालीकडे जाण्याचें नाकारलें, तेव्हां याचा वध करण्यांत आला.

**इब्राहीमखान सूर**—सूर घराण्याचा हा एक पूर्वज. हा बहलोल लोदीच्या कारकीर्दीत नोकरीसाठीं दिल्लीस आला. परंतु तेथें नोकरी न मिळाल्यामुळें, जोनपुरच्या जमालखान नामक सरदाराच्या पदरीं यानें नोकरी धरली. याचा पुत्र हसनखान हा जोनपुरच्या राज्यांत पांचशें स्वारांचा असामदार होता.

**२.** (स. १५५३–५५) सूर घराण्यांतील मुहंमदशाह सूर आदिलीचा हा मेहुणा. मुहंमदशाह व्यसनी असल्यामुळें त्याची गादी यानें बळकावली. परंतु मुहंमदशाहाचा दुसरा मेहुणा अहमदखान यानें याचा पराभव करून सिकंदर हें नांव धारण केलें आणि तो गादीवर बसला (स. १५५४ सुमार).

**इब्राहीम गझनवी**–(राज्यारोहण मार्च स. १०५९ आगष्ट २५, १०९९) हा पहिल्या मसूद गझनवीचा मुलगा. फरुखझाद मार्च स. १०५९ मध्यें वारल्यावर हा गझनीचे गादीवर बसला. तुघ्रील नांवाच्या कृतघ्न नोकरानें अमीर इझ्झुद्दौला अब्दुल रशीद यास ठार मारून गझनीचें राज्य बळकाविलें, पण ४० दिवसांनीं त्याचा खून झाला. तेव्हां गादी कोणास द्यावी याचा विचार झाला. त्यांत या इब्राहीमला गादी देण्याचें घाटत होतें. परंतु त्या वेळीं याची प्रकृति बिघडून हा अशक्त झालेला असल्यानें याचा भाऊ फरुखझाद यास गादीवर बसविण्यांत आलें. फरुखझादनें फार थोडे वर्षे राज्य केलें. व त्याच्या मृत्यूनंतर यास अमीर होण्याचा मान मिळाला. फरुखझादनें गझनीच्या राज्यास त्रास देणाऱ्या सल्जूक घराण्यांतील राजपुरुषांशीं तह केला होता. तोच पुन्हां अंमलांत आणून इब्राहीमनें आपला मुलगा मसूद याचा मलिकशाहा अर्सलानच्या मुलाच्या मुलीशीं विवाह घडवून आणून सल्जूकशीं तहानें जोडलेली मैत्री दृढतर केली. त्यामुळें यास हिंदुस्थानकडे लक्ष देण्यास सवड सांपडली. स. १०७९ मध्यें पंजाबची दक्षिण सरहद्द ओलांडून यानें अजुधान–म्हणजे हल्लींचें पाकपट्टणवर स्वारी करून तें ठाणें हस्तगत केलें. याच स्वारींत रूपाल नांवाचें शहर जिंकल्याचाहि उल्लेख आहे. यानें न्यायानें आणि दयाशीलतेनें राज्य केलें. हा अत्यंत धर्मशील होता. यानें कुराणाचें फार्सींत भाषांतर केलें. याल

चाळीस मुली व छत्तीस मुलगे होते. यानें आपल्या मुलींचीं विद्वान लोकांशीं लग्नें लाविलीं. त्यांपैकीं एक मुलगी प्रसिद्ध ग्रंथकार नासिरी याच्या पणजास दिली होती. हा शाहूसारखा होता. शांतींत व वैभवांत दीर्घकाल राज्य करून हा स. १०९९ त मरण पावला. याचें नांव इब्राहीम झहीर उद्दौला गझनवी असें होतें.

**इब्राहीम तुघ्लक**--दिल्लीच्या तुघ्लक घराण्यांतील राजबाचा तिसरा मुलगा. याचा फीरूझ नांवाचा एक भाऊ दिल्लीच्या तख्तावर आला.

**इब्राहीम धौशा जाबितजंग**—हा एक निजामअलीचा सरदार होय. स. १७७५ मध्यें यानें बारभाईच्या तर्फेनें मुधोजीच्या वऱ्हाड प्रांतावर स्वारी केली आणि त्याला जेरीस आणलें.तेव्हां मुधोजीनें बारभाईस दहा लाख रुपये दंड भरून आपला बचाव करून घेतला. पुरंदरच्या तहाच्या अगोदर याची मदत हरिपंत फडक्यानें मागितली होती, पण हा उशिरा येऊन हरिपंतास मिळाल्यामुळें पुरंदरचा तह कायम झाला. यानंतर हैदरवरच्या स्वारींत यानें हरिपंतास मदत केली; पण याचें धोरण दुटप्पी होतें.

**इब्राहीम निजामशाह**—( स. १५९५ ) हा अहमदनगरच्या निजामशाहींतील दुसऱ्या बुर्हाणचा पुत्र. हा व्यसनी होता. विजापूरकरांशीं झालेल्या युद्धांत हा मारला गेला. यानें चारच महिने राज्य केलें.

**इब्राहीम बरीद**—( स. १५६२-६९ ) बेदरच्या बरीदशाही वंशांतील अली बरीदाचा हा पुत्र. हा आपल्या बापानंतर बेदरच्या गादीवर आला. याच्या नंतर याचा धाकटा भाऊ दुसरा कासीम बरीद हा गादीवर आला. कासीम बरीद हा याचा मुलगा असून यास खानजहान नांवाचा एक भाऊ होता, असें केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया यामधील वंशावळींत दर्शविलें आहे.

**इब्राहीम बीन हरिरी**—यानें 'तारीख-इ-इब्राहीमी' या नांवाचा हिंदुस्थानचा इतिहास लिहिला आहे. त्यामध्यें बाबरापर्यंतचा प्राचीन इतिहास आहे. याचा इतिहास संक्षिप्त असून तो यानें स. १५२८ मध्यें बाबरास अर्पण केला ( बील ).

**इब्राहीम लोदी**—( स. १५१७-१५२६ ) दिल्लीचा बादशहा सिकंदर लोदी याचा हा मुलगा होय. स. १५१७ मध्यें सिकंदर मरण पावल्यावर त्याच्या मागून हा दिल्लीच्या गादीवर आला. परंतु हा लवकरच अप्रिय झाला. याचें कारण असें कीं, अफगाण लोकांस वरिष्ठांचा करडा अम्मल बिलकुल सहन होत नाहीं. किंबहुना वरिष्ठांस ते आपल्या बरोबरीचे समजतात व आपल्या प्राणापेक्षांहि स्वातंत्र्यास अधिक जपत असतात. अफगाण लोकांचा हा स्वभाव आजतागायत कायम आहे. लोदी सुलतानांचे ठिकठिकाणचे अधिकारी आपापल्यापरी स्वतंत्रेनें वागत. दिल्लीच्या सुलतानांच्या हातीं मोठी सत्ता येऊन ते फार प्रबळ होऊं नयेत म्हणून त्यांनीं सिकंदरच्या मृत्यूनंतर याचा धाकटा भाऊ जलालखान ह्यास जोनपूरच्या तख्तावर बसविलें. परंतु यास तें न आवडून यानें त्याचा मोड केला व पुढें पदरच्या सरदारांस फारच कडक रीतीनें वागविण्यास सुरवात केली.

हा त्यांना आपल्या समोर हात जोडून स्तब्ध उभे करीत असे. कित्येकांस तर यानें क्षुल्लक अपराधाबद्दल ठार मारिलें व इतरांचा अपमान करावा म्हणून त्यांच्या हाताखालच्या लोकांस यानें त्यांच्या बरोबरीचा दर्जा दिला. ह्याचा परिणाम लवकरच दिसून आला. दर्याखान लोहानी नांवाचा अफगाण सरदार अयोध्या, जोधपूर, बहार ह्या प्रांतांत स्वतंत्र झाला. दौलतखान लोदीनें पंजाबांत आपलें स्वातंत्र्य स्थापित केलें. इतकेंच नव्हे, तर त्यानें काबूलच्या तख्तावर राज्य करणारा बाबर यास मदतीस बोलावून इब्राहीम लोदीस पदच्युत करण्याचा बेत केला. बाबरानें त्याप्रमाणें येऊन हिंदुस्थानावर स्वारी केली व पानिपत येथें याचा पूर्ण पराभव करून यास ठार मारलें ( २१ एप्रिल स.१५२६).

## इमादशाही घराणें ( वऱ्हाडचें )

( १ ) फत्ते उल्लाह इमादशाह ( स. १४८४ ).

( २ ) अलाउद्दीन इमादशाह ( स. १४८४–१५२७ ) ( स. १५०४ )

रिबिअसुलताना (१) इब्राहीम आदिलशाहाची पत्नी. | पत्नी युसफ आदिलशाहाची मुलगी खदीजा.

( ३ ) दर्या इमादशाह ( स. १५२७–१५७२ )

बुर्हाण इमादशाह ( १५७२ ? ) काल मुसलमानी रियासतीप्रमाणें दिला आहे.

मुलगी –दौलतशाह= अहमदनगरच्या पहिल्या हुसेन निजामशाहाची पत्नी

**इमादुल्मुल्क**—हा निजामुल्मुल्कचा नातू. यालाच धाकटा गाजीउद्दीन ऊर्फ मीर शहाबुद्दीन असें म्हणत असत. हा दिल्लीच्या बादशहाचा वजीर होता. मराठ्यांप्रमाणें ह्याला नजीब आपण मित्र आहों असें भासवीत होता. यानें सफदरजंग वजीराविरुद्ध उभारलेलें कारस्थान वाचण्यासारखें आहे ( ऐ. प. ८९ ).

**इमामवक्ष**—(नासीख पाहा).

**इम्मडी**—( स. १६३७–३८ ) म्हैसूर संस्थानांतील राजाधिराज ( उडीयर ) चा मुलगा.

हा गादीवर आल्यावर याचा खून झाला व याच्या मागून याचा चुलत भाऊ कंठीरवनरस हा राजा झाला.

**इम्मडी विज्जल कलचुरी**—कलचुरी घराण्यांतील विज्जलाचा हा मुलगा. याचा काल स. १२ व्या शतकांतला असून यानें लिंगायतांचा आद्य पुरुष जो बसव याला पकडून आणण्याविषयीं व बाकीच्या लिंगायतांना फाशीं देण्याविषयीं आज्ञा केली होती ( भांडारकर भा. ३ पृ. १३१ ).

इम्मडी या कानडी शब्दाचा अर्थ दुप्पट असा आहे. आपल्याकडील सवाई शब्दासारखा हा नांवाच्या माथें जोडतात.

**इरादतखान**—महाबतखानाचा मुलगा. मोंगलांनीं स. १६३६ मध्यें निजामशाही बुडविली. त्यानंतर हा दौलताबादेचा सुभेदार होता. यानें शहाजी भोसले यास मोंगलाकडे मिळवून घेण्याची पुष्कळ खटपट केली. पण शहाजीनें दहा वर्षांचा एक मुलगा तख्तीं बसवून निजामशाही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. यालाच स. १६३० मध्यें खानजहान लोदीचें बंड मोडण्याकरितां शहाजहाननें दक्षिणेंत पाठविलें, तेव्हां आजमखान अशी पदवी दिली होती ( शहाजीचें चरित्र पा. ४१ ).

**इरावती**—अग्निमित्राची पत्नी.

**इरिविबेडंग नोळम्ब घटेयङ्ककार**—( स. ९९७–१००८ ) मोरिगेरीचा पल्लव राजा. हा पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या सत्याश्रयाचा मांडलिक होता.

**इरुक्कदेव पांड्य**—हा उच्चंगीचा होय. हा पलन्त पांड्याचा मुलगा.

**इरुक्कपाल पांड्य**—( स. १०९८ ) हा उच्चंगीचा होय. याची पत्नी चोल राजकन्या. याची मुलगी महादेवी. ही ऐरेयंग होयसलला दिली होती.

**इरुग**—विजयनगरच्या संगम वंशांतील पहिल्या बुक्कारायाच्या चैच नांवाच्या मंत्र्याचा हा मुलगा होय.

हा विजयनगरच्या हरिहर दुसरा या राजाचा एक सेनापति होता, असा उल्लेख स. १३८५ सालच्या कामलापूराजवळील एका जैन मंदिरांतील शिलालेखांत आलेला आहे.

**इरेयप्प गंग**—पश्चिम गंग घराण्यांतील पहिल्या शिवमाराचा हा मुलगा. कांहीं ठिकाणीं याचें नांव गाळलेलें आहे. याचा पुत्र श्रीपुरुष.

**२.** हा पश्चिमगंगांपैकीं श्रीपुरुषाचा पुत्र. यास दुर्गमार असेंहि म्हणत.

**३.** हा पश्चिमगंगांपैकीं पहिल्या राचमल्लाचा पुत्र. याला ऐरेयंग असेंहि म्हणत. कांहीं ठिकाणीं याचें नांव गाळलें आहे.

**४.** ( स. ९१३–३८ ) पश्चिमगंगांपैकीं पहिल्या भूतुगाचा मुलगा. याचें अस्तित्व संशयास्पद आहे. याच घराण्यांतील दुसऱ्या राचमल्लाच्या मदतीनें यानें राज्य मिळविलें असें म्हणतात. याची पत्नी जाकबा ही चालुक्यांपैकीं होती. याचा मृत्यु स. ९३८ मध्यें झाला.

**इलम तिरैयन चोल**—हा कांचीच्या चोल घराण्यांतील एक राजपुत्र होय.

याच्याविषयीं बरीच माहिती तामीळ कवितेंत आलेली आहे. याच्यानंतर कांची येथें पल्लव राजे राज्य करूं लागले.

**इलंजेर सेन्नी चोल**—हा चोलांपैकीं एक. याला उरुउप्पहरेर इलयोन, असें म्हणत. याला राज्य नव्हतें. करिकाल चोलाचा हा पिता असें प्राचीन कवितेंत येतें.

**इलेश्वरोध्याय**—तेलंगी कवि. हा महाविद्वान ब्राह्मण शालिवाहन शकाच्या सातव्या शतकांत होता. हा श्रीशैलमल्लिकार्जुन क्षेत्रानजीक इलेश्वर येथें राहत असे.

हा जातीचा तेलंग ब्राह्मण होता. न्याय, व्याकरण, अलंकार, मीमांसा व धर्मशास्त्र यांत याची प्रवीणता दिसून येत असे. यानें आपल्या वयाच्या १५ व्या वर्षींच मोठमोठ्या राजांच्या भेटीस जाऊन ओळख करून घेतली. यानें शांकर मताच्या प्रतिपक्षाशीं वाद करून त्यांचें खंडन केलें. याच्या विद्वत्तेबद्दल पुष्कळ राजांकडून इनामें, पारितोषकें, बक्षिसें वगैरे मिळालीं.

यानें रघुपतिपेठ व नारायणगड इत्यादि ठिकाणच्या राजांस काव्यें व छंदशास्त्र पढविल्यामुळें त्यांनीं याचा बहुमान करून विद्यालय स्थापण्याइतकें द्रव्य दिलें. विद्यालयांत बरेच विद्यार्थी मूढमती असल्यानें यानें 'ज्योति-ष्मती' नांवाचा एक ग्रंथ करून विद्यार्थ्यांना विद्वान् केलें.

या कवीस फक्त तीन कन्या होत्या. थोरली सुखानें नांदत होती. दुसरी विधवा (नाचीं पाहा ) होती व तिसरीनें, पति ब्राह्मण नसल्याचें कळल्यानें स्वतःस जाळून घेतलें. या दुःखावेगांत यानें 'इलेश्वरविजय' नांवाचा ग्रंथ लिहिला व पुढें हा लवकरच मरण पावला. कविचरित्रांत अकबराचा सरदार व हा यांची भेट झाल्याचा निर्देश आहे. त्याशीं वरील काळ जुळत नाहीं.

**इल्लय**—विजयनगरचा एक कवि. ज्योतिषशास्त्रांत हा पारंगत असल्यानें विरूपाक्ष राजानें यास आपल्या पदरीं ठेवलें. यानें सूर्यसिद्धान्तावर टीका लिहिली. हा विजयनगर येथेंच मरण पावला. भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासांत याचा उल्लेख नाहीं ( कविच. )

**इष्टुर फांकडा**—कॅ. स्टुअर्टला मराठे लोक, शौर्यामुळें मोठ्या कौतुकानें 'इष्टुर फांकडा' असें म्हणत.

पुणें दरबारशीं लढण्याकरितां स. १७७८ मध्यें श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब पेशवे यांच्या मदतीस इंग्रजातर्फे हा बोरघाटामध्यें आला होता. त्या वेळीं याच्याकडे एका तुकडीचें अधिपत्य दिलें होतें. हा योद्धा फार पटाईत असून यास सर्व रस्त्यांची व घाटनाक्यांची पूर्ण माहिती होती. मराठ्यांचे सर्व सरदार आपापल्या सैन्यानिशीं तळेगांवापासून बोरघाटापर्यंत माऱ्याच्या जागा रोखून युद्धास सिद्ध होते. तरीपण यानें ता. २५ रोजीं खंडाळ्याच्या उंच टेकडीवर आपलें निशाण लाविलें. तेव्हां लढाईस तोंड लागून मराठ्यांच्या तोफांचा भडिमार सुरू झाला. यानें तशा तोफांचा भडिमार सहन करून कारल्यापर्यंत आपली फौज नेऊन पोहोंचविली. त्या योगानें मराठे सेनापतीस याच्या शौर्याचा प्रभाव फार अलौकिक वाटून त्यांनीं याची फार वाहवा केली, व मोठ्या कौतुकानें यास 'इष्टुर फांकडा' असें अभिधान दिलें. शेवटीं याच लढाईंत याला एक तोफेचा गोळा लागून हा ता. ४ जानेवारी स. १७७९ रोजीं मरण पावला. त्या प्रसंगीं मराठी सैन्यानें 'इष्टुर फांकड्या शाबास'' अशी शाबासकी दिली ( ऐ. ले. सं. ७, नं. २४६४ ). याच्या शौर्याबद्दल, धैर्याबद्दल व युद्धचातुर्याबद्दल फार प्रशंसनीय उल्लेख आहेत. याच्या नांवापुढें 'लढाव' म्हणजे 'लढवय्या' असें विशेषण मराठ्यांनीं लावलेलें तत्कालीन मराठी अस्सल पत्रांत दिसतें. परशुरामभाऊ पटवर्धनांचा कारकून शिवाजी बाबाजी यानें ता. २२ जानेवारी स. १७७९ च्या पत्रांत पुढील उद्गार काढले आहेत " मुख्यत्वें श्रीमंतांचें पुण्य विचित्र ! अवतारी पुरुष ! त्यासारखे योग घडले. ज्या माष्टीनानें मसलत केली तो घाटावर येतांच समाधान नाहीं म्हणून मुंबईस गेला, तेव्हां मृत्यु पावला. **इष्टुर फांकडा** लढाव, इकडील फौजेचा, कारल्याच्या ठिकाणीं गोळा लागून ठार जाहला. कर्णेल के म्हणोन होता त्यास बाण लागून जेर जाहला. आकारिक 'कर्ते' होते त्यांची अशी अवस्था झाली.....सारांश श्रीमंतांचा प्रताप हें खरें. " ( ऐ. ले. सं. भा. ७ पृ. ३३९७ ).

याच्या मृत्यूबद्दल मुंबई सरकारच्या रिपोर्टामध्यें पुढील वाक्य आहे तें किती सार्थ आहे हें निराळें सांगावयास नकोच.

" On the same day they met with a very heavy loss by the death of Captain Stewart, who was a most active, gallant, and judicious Officer, and possessed of the true military spirit. " ( इ. सं. ४. १०, पृ. १५१-१५४ ).

**इस्कंदरखान**—काश्मीरच्या फत्तेशाहाचा पुत्र.

**इस्माईल आदिलशाहा**— ( स. १५१०-१५३४ ) हा विजापूरच्या युसफ आदिलशाहाचा पुत्र. गादीवर आला तेव्हां याचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें.

राजा अल्पवयी असल्यानें राज्याचा कारभार याचा प्रधान कमालखान हा पाहूं लागला. कमालखान राज्यकारभार पाहूं लागल्यापासून थोड्याच दिवसांत त्यानें लोकप्रीति संपादिली. पुढें कमालखानास दुष्ट वासना होऊन राज्यप्राप्तीची हाव सुटली. त्याकरितां त्यानें अमीर बरीदची मदत घेऊन इस्माईलास आणि त्याची आई बुबूजीखानुम या उभयतांस विजापूरच्या किल्ल्यांत कैद करून सोलापूरचा किल्ला घेतला. तेव्हां त्याखालीं असलेले साडेपांच परगणे कमालखानास मिळाले. नंतर कमालखानानें विजापुरास येऊन तेथील लोकांचें मत आपलेंसारखे करून घेऊन आपला हेतु उघड उघड सांगितला.

कमालखानाचा हेतु इस्माईल आणि त्याच्या आईस कळतांच त्यांना भीति वाटूं लागली व ते या संकटांतून पार पडण्याची युक्ति शोधूं लागले. इकडे कमालखानानें एका ज्योतिष्यास बोलावून त्याला राज्यारोहणाकरितां चांगला ( शुभ ) दिवस विचारला. तेव्हां ज्योतिष्यानें " आपणास पंधरा दिवस फार अशुभ असून आपल्याला दगा होण्याचा संभव आहे. तेव्हां आपण आपल्या शत्रूस जवळ येऊं न देतां त्यापासून दूर व सुरक्षित राहावें. पंधरा दिवसांनंतर सोळावा दिवस आपणास शुभ आहे " असें सांगितलें. त्याप्रमाणें खानानें राजवाड्यांतील सुरक्षित जागीं आपणास कोंडून घेतलें.

इस्माईलाची आई बुबूजीखानुभ आणि त्याची चुलती दिलषाद आगा या उभयतां अक्कलवान् व हुशार स्त्रिया होत्या. या प्रसंगीं फौज जमा करून दिवाणाशीं लढून पळून जाणें श्रेयस्कर नसून दिवाणाचा वध होणें हेंच श्रेयस्कर होतें हें त्यांनीं ताडलें. तेव्हां दिवाणाच्या वधाकरितां युसफ तुर्क ( हा इस्माईलचा पालक काका होय ) यास तयार करून हर प्रयत्नांनीं त्या दोन स्त्रियांनीं दिवाणाचा खून करविला.

कमालखानाचा बायको मर्दानी हिमतीची होती. तिनें शोक न करितां सर्व नोकरांस खानाच्या खुनाचा गवगवा न करण्याविषयीं सांगून जिकडे तिकडे सर्वांस शांत केलें. नंतर खानाच्या प्रेतावर कपडे वगैरे घालून दोहों बाजूंनीं गाद्या, गिरद्या लावून वाड्याच्या एखा सज्जावर जणूं काय लोकांचे मुजरे घेण्याकरितां मसनदीवर प्रेत बसविलें, व सर्व लोकांस हत्यारबंद होण्यास आज्ञा केली. नंतर आपला पुत्र सफदरखान यास बोलावून आणिलें, व त्यास या वेळीं धैर्य धरून बापाच्या वधाचा सूड घेण्यास आणि इस्माईलाला ठार करून राज्य घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सफदरखानानें सैन्य घेऊन राजवाड्यावर हल्ला केला.

या प्रसंगीं दिलषाद आगानें राणीस (बुबूजीखान) असा सल्ला दिला कीं, अशा समयीं नम्रपणापेक्षां शौर्य व धारिष्ट यांचाच अधिक उपयोग होईल. तिनें लागलीच राजवाड्याचे दरवाजे बंद करण्याचा हुकूम दिला आणि जनानखान्याबाहेरच्या बाजूस पहाऱ्यावर वगैरे जे थोडेबहुत इराणी व तुर्की लोक होते त्यांचीं मनें वळविलीं व त्यांना दिवाणाच्या विरुद्ध लढण्यास उत्तेजन दिलें. राजवाड्यांतील लोक पुरेसे न वाटून तिनें शहरांतील लोकांचें मन वळविलें व सफदरखानाशीं तोंड देण्यास सज्ज झाली. शेवटीं तिनें सफदरखानाशीं मोठ्या धैर्यानें तोंड दिलें आणि त्या गडबडींत सफदरखान मारला गेला. सफदरखान मारला गेल्यावर त्याचें सैन्य पळत सुटलें व याच्या सैन्याचा जय झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं इस्माईल आदिलशाहा मसनदीवर चढला. यानें सर्वांच्या भेटी घेतल्या. दरबारांतील सर्व कामगारांनीं व शहरच्या नागरिकांनीं भेटीस येऊन मोठ्या अदबीनें मुजरे केले. संकटसमयीं ज्यांनीं साहाय्य दिलें व जे स्वामिकार्यार्थ प्राण अर्पण करण्यास सिद्ध झाले त्यांस यानें प्रथम बक्षिसें व इनामें वांटलीं. नंतर जे सरदार कमालखानाच्या जुलुमास कंटाळून पळाले होते त्यांना दरबारीं परत येऊन आपापल्या कामावर रुजू होण्यासाठीं पत्रें पाठविलीं. दिवाणाची आई व दुसरीं त्याच्या कुटुंबाचीं माणसें कैदेंत होतीं तीं कैदमुक्त करून त्यांस द्रव्य देऊन राज्याच्या हद्दीबाहेर घालविलें. ज्या ज्योतिषानें कमालखानाच्या संकटाचें भविष्य केलें होतें त्याला आपल्या पदरीं नोकरीस ठेविलें. थोड्याच दिवसांत त्याजपाशीं तुर्की व मोंगल लोकांची बडी फौज जमली. जे दक्षिणी व हबशी लोक फौजेंत नोकरीस होते त्यांस बडतर्फ केलें आणि त्यानें पुढें १२ वर्षांत परदेशी लोकांशिवाय इतरांस नोकरीस ठेविलें नाहीं.

मुद्गल व रायचूर हे प्रांत विजयनगरच्या राजानें घेतले होते. ते परत घेण्यासाठीं याची व विजयनगरच्या हिंदु राजाची लढाई होऊन त्यांत मुसलमानांचा पुरा मोड झाला. यापुढें याला एकसारखीं युद्धें करावीं लागलीं. पुढें जेव्हां वारंवार युद्धें होऊन विजापूर इलाख्याची खराबी व पायमल्ली होऊं लागली तेव्हां सरहद्दीवरील राजांशीं सख्य करण्याकडे याचें फार लक्ष लागलें; व त्याकरितां यानें वऱ्हाडच्या अलाउद्दीन इमादशाहाशीं शरीरसंबंध जोडून सख्य केलें ( अमीर बरीद पाहा ).

यानंतर यानें विजयनगरच्या राजाचा पराभव करून त्याच्याकडून मुद्गल आणि रायचूर हे दोन प्रांत परत मिळविलें. त्या वेळीं विजयनगरच्या राज्यांत गोंधळ माजला होता. यापुढें यानें अमीर बरीद यास जेरीस आणलें. त्यामुळें बरीद कंटाळून जाऊन त्यानें इस्माईलशीं सख्य केलें व तेलंगणावर हल्ला करण्यास इस्माईलच्या कुमकेस गेला.

पुढें गोवळकोंड्याच्या किल्ल्याला वेढा दिला असतां हा तेथेंच ज्वरानें आजारी पडला व त्यांतच याचा शेवट झाला. स. १५३४ मध्यें हा मरण पावला. हा न्यायशील, क्षमाशील, उदार व दूरदर्शी असा होता. हा कवि आणि विद्वानांचा आश्रयदाता होता. याच्यानंतर याचा वडील मुलगा मल्लू हा गादीवर बसला. यानें मोठ्या ऐश्वर्यानें एकंदर २५ वर्षें राज्य केलें ( विजापूरचें आदिलशाही घराणें, मोडक-कृत ).

**२.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील तहमास्पचा मुलगा.

**३.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील पहिल्या इब्राहिमाचा मुलगा.

**इस्माईलखान दक्षिणी**—हा विजापूरचा मल्लू आदिलशहाचा दिवाण. पहिला दिवाण असदखान यानें राजिनामा दिल्यावर हा काम पाहूं लागला.

**इस्माईलखान मका**–औरंगजेबाचा कर्नाटकांत रवाना केलेला एक सरदार.

**इस्माईल गझनवी**—( स. ९९७ ) गझनी येथील यामीनीच्या गुलाम राजघराण्यांतील सबक्तगिनाचा धाकटा मुलगा. सबक्तगीन स. ९९७ च्या आगष्टमध्यें बाल्ख येथें वारल्यावर त्याच्या इच्छेस अनुसरून बल्खच्या उमरावांनीं इस्माईल यास राज्यपद दिल्याचें जाहीर केलें. एक पक्ष असा होता कीं, त्यास वडील व अधिक तेजस्वी मुलगा महमूद यास राज्यपद

मिळावें असें वाटत होतें. महमुदानेंहि इस्माईल यास पत्र लिहून, 'गझनीचें राज्यपद सोडल्यास बल्खची सुभेदारी त्याजकडे ठेवण्यांत येईल,' असें कळविलें. परंतु महमुदाच्या मागणीस इस्माईलनें नकार दिला. तेव्हां निशापुराहून महमूद व बल्खहून इस्माईल असे दोघेहि बंधू गझनीवर चाल करून गेले. त्या शहराजवळ दोघांमध्यें झालेल्या लढाईंत पराभव होऊन यास एका किल्ल्यांत आश्रयार्थ जावें लागलें. याच्या सरदारांनीं यास दगा देऊन महमुदाचे स्वाधीन केलें. तेव्हां महमुदानें यास कैदेंत ठेविलें. पुढें जन्मभर यास तसेंच कैदेंत राहावें लागलें.

२. काश्मीरच्या नाझुकशाहाचा पुत्र. हा आपला भाऊ दुसऱ्या इब्राहिमानंतर गादीवर आला. याच्यानंतर याचा मुलगा हबीब हा गादीवर आला ( स. १५५७ ).

**इस्माईल निजामशाह**—( स. १५८९-९० ) निजामशाहीतील मिरन हुसेनचा हा चुलतभाऊ. हा प्रथम लोहगडावर कैदेंत होता. याचा बाप बुर्हाण २ रा हा अकबराच्या आश्रयास होता. त्यानें अकबराची मदत घेऊन यावर स्वारी करून यास कैद केलें व गादी बळकावली.

**इस्माईल बेग**—आग्र्याचा सुभेदार जो हमदानी त्याचा हा पुतण्या. यानें ता. २३-९-१७८३ रोजी मीर्झा शफीचा खून केला.

स. १७८८ मध्यें यानें चारपांच हजार सैन्यानिशीं आग्र्यावर चाल केली. पण त्यांत याचा पराभव होऊन याला पळ काढावा लागला. त्या वेळीं दिल्ली येथें असलेल्या मराठी सैन्याविरुद्ध हा सारखीं कारस्थानें करी, त्यामुळें याच्यापासून मराठी सैन्यास फार त्रास होऊं लागला. म्हणून खंडेराव हरीनें स. १७९१ च्या डिसेंबरांत कानोडास याला कोंडून चहूंकडून हल्ला केला; व पुढें लवकरच कानोडचें ठाणें हस्तगत केलें. त्याच वेळीं खंडेराव हरीनें यास कैद केलें.

पुढें आग्र्यांत आठ वर्षें कैद भोगून हा शेवटचा मोगल मुत्सद्दी व शिपाई स. १७९९ त मरण पावला. कैदेंत असतांहि पूर्वीचे खेळ खेळण्यास यानें कमी केलें नाहीं. यानें आपला चुलता जो हमदानी त्याच्या मुलींशीं लग्न लाविलें होतें ( म. रि. उ. २, पृ. २४४, ५० ).

**इस्माईल लोदी**—लोदी घराण्यांतील निजामखानाचा मुलगा.

**इस्माईल सामानी**—सामानी वंशाचा पहिला प्रख्यात राजा. हा स. ९०३ मध्यें गादीवर आला. याचें राज्य समरकंद व बुखारा या प्रांतांवर होतें. यानें शास्त्र आणि वाङ्मय यांचा पुरस्कार केला आणि बुखारा शहर प्रख्यातीस आणलें. पर्शियन व आरबी भाषेचें महत्त्व या वेळीं फारच वाढलें. या बादशहास अमीर असें म्हणत. हिंदुस्थानांतील हम्मीर हा अमीर शब्दापासूनच निघालेला असावा. याच्याच वंशांत पुढें सबक्तगीन, महमूद गझनवी वगैरे लोक निघाले ( हिं. भा. अं. पा. १५ ).

**इस्माईल हाजी मौलवी मुहम्मद**—( स. १७८१-१८३१ ) हा मुसलमानी धर्मसुधारक दिल्लीजवळील फोव्हा गांवीं जन्मला. सय्यद मुहम्मदच्या साहाय्यानें हिंदुस्थानांतील मुसलमानी धर्म येथील हिंदुपंथाच्या तावडींतून सोडविण्याचा यानें बराच प्रयत्न केला. आपल्या कामाकरितां हा पुष्कळ वर्षें फिरला व मक्केला देखील जाऊन आला होता. हिंदुस्थानांत आल्यावर यानें शुद्ध इस्लामी धर्माचें नवमत उपदेशण्याचें काम सुरू केलें व अनेक अनुयायी जमविले. पण याची चळवळ सरकारी मुसलमानी पुढाऱ्यांस पसंत न पडून, त्यांचें व याचें भांडण लागल्यामुळें स. १८२७ त ब्रिटिश सरकारनें 'इस्माईली' पंथाला विरोध केला. तेव्हां हा पंजाबांत गेला. तेथें अफगाणांचे मदतीनें शीखांचे विरुद्ध लढाई केली. त्या लढाईत हा पडला ( स. १८३१ ). तथापि याची चळवळ नाहींशी झाली नाहीं वायव्य सरहद्दीवरील पर्वतांतून अद्याप याचे कांहीं अनुयायी भेटतात. मक्केला गेला असतां 'वाहाबी' चळवळ आपल्या धोरणावरच चालली आहे, असें याला तेथें आढळून आलें.

**इस्लामखान**—सुलतानशाह लोदीचें नामांतर.

**इस्लामशाह सूर**—( स. १५४५ ) यानें स. १०-१-१६८८ रोजीं कांचीचा विध्वंस केला. हा दिल्लीच्या सूर घराण्यांपैकीं शीरशहानंतर गादीवर आला.

## इंगळे यांची वंशावळ

त्रिंबकराव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अंबुजी | खंडूजी | बाळोजी | मालोजी | पांडुरंग ऊर्फ विठोजी |
| त्रिंबकराव | गंगाधरराव | नारायणराव | | लक्ष्मणराव |

( म. रि. उ. २, पृ. ४४५ ).

**इंदुकांत**—चार्वाकाचा पिता.

**इंदुराज**—तौतुकाचा नातू व श्रीभूतिराजाचा पुत्र. हा कात्यायन-गोत्री ब्राह्मण होता व काश्मीराकडे राहत असे, असें भगवद्गीतेच्या टीकेच्या शेवटीं म्हटलें आहे. यालाच भट्टेन्दुराज किंवा इंदुभट्ट म्हणतात.

या इंदुराजाचा गुरु मुकुल. इंदुराजानें कोंकणांतून जाऊन काश्मीरामध्यें मुकुलापाशीं साहित्यशास्त्राचें अध्ययन केलें.

**इंद्र**—संस्कृत भाषेतील एक व्याकरणकार. याचें व्याकरण स्वतंत्र तऱ्हेनें उपलब्ध आहे असें दिसत नाहीं. परंतु 'कथासरित्सागरा'च्या चौथ्या तरंगामध्यें असें म्हटलें आहे कीं, पाणिनीच्या पूर्वीचा व पाणिनीमुळें लुप्त झालेला सांप्रदाय म्हणजे ऐंद्र व्याकरणकारांचा होय. व्याडी, वररुची किंवा कात्यायन व इंद्रदत्त हे व्याकरणकार या परंपरेंतील होत. डॉ. बर्नेल म्हणतो कीं, तामील भाषेचें अति पुरातन व्याकरण म्हणजे तोल्कापियम नामक सर्वसंग्रहांतील कांहीं भाग होत, व यांतील व्याकरणपद्धति ऐंद्र सांप्रदायाची आहे. पांड्य राजाचे दरबारांत हें व्याकरण वाचलें जाई व तेथें हें पसंत पडे. यावरून असें दिसतें कीं, याचें व्याकरण नष्ट झालेलें असून पाणिनि, कात्यायन वगैरे आचार्यांनीं याचा प्राचीं, एके वगैरेसारख्या नांवानें उल्लेख केलेला असावा. जरी याचा ग्रंथ सांपडत नाहीं तरी बोपदेवानें आपल्या कविकल्पद्रुमांत याचा उल्लेख केला आहे. तसेंच अभिनवशाकटायनाच्या शब्दानुशासनामध्यें याचा उतारा दिला आहे. इंद्र आणि इंद्रगोमिन् हे दोघे एकच होत ( सि. ऑ. सं. ग्रामर, पृ. १० ). हेमचंद्राच्या बृहद्वृत्तीवरील न्यासांत याचा उतारा दिलेला आहे ( सी. सी. ).

**इंद्र (राष्ट्रकूट)**—(स. ६७०–९०) हा राष्ट्रकूटराजांचा मूळ पुरुष म्हणून याचा उल्लेख वेरूळ येथील शिलालेखांत आला आहे. हा दन्तिवर्मनाचा मुलगा असून याला गोविंद पहिला या नांवाचा एक मुलगा होता ) भांडारकर, भा. ३, पृ. ८५). याचा काल सुमारें स. ६७०-६९० असा असावा ( आळतेकर, पृ. २८ ).

**२.** ( स. ७३०–४५ ) मालखेडच्या राष्ट्रकूटवंशांतील कर्क पहिला याचा मुलगा. याला ध्रुव, कृष्ण (१) व नन्नराज असे तीन भाऊ होते. पण सर्व भावांमध्यें हाच फार महत्त्वाकांक्षी असल्यानें यानें बापाच्या मागें मालखेडची गादी मिळविली.

हा ज्या वेळेस गादीवर आला त्या वेळेस याच्या राज्याभोंवतालीं बरींच लहानमोठीं स्वतंत्र राज्यें इतस्ततः विखुरलेलीं होतीं. त्यांमध्यें दक्षिणेंतील चालुक्य घराणें सर्वांत बलिष्ठ गणलें जात होतें. या चालुक्य राजांच्या इतर राजांशीं नेहमीं लढाया चालत. स. ७२५ मध्यें भडोचचा राजा तिसरा जयभट यानें गुजराथचा चालुक्य राजा मंगलरस याच्या मदतीनें वलभीच्या चालुक्यांचा पराभव केला. या लढाईत इंद्र चालुक्य ( दक्षिण ) राजाच्या वतीनें त्यांचा मांडलीक म्हणून होता. ही लढाई खेडा प्रांतांत झाली. तींत चालुक्याचा पूर्ण पराभव होऊन खेडा प्रांत व पंचमहाल प्रांत हे जयभट्टानें चालुक्यांपासून जिंकले. याच सुमारास इंद्रानें भवनागा या चालुक्य राजकन्येचें लग्नमंडपांतून हरण करून तिच्याशीं राक्षसविधीनें विवाह केला.

इंद्रास भवनागेपासून दंतिदुर्ग नांवाचा मुलगा झाला. इंद्राच्या कारकीर्दीबद्दल नक्की असें कांहींच बोलतां येत नाहीं. पण याच्यामागून याचा पुत्र दंतिदुर्ग हा स. ७५० च्या पूर्वी एकदोन वर्षें गादीवर आला होता. त्यावरून याची कारकीर्द जवळजवळ १५ वर्षें ( ७३०–७४५ ) असावी ( E. I. XVIII. 235-36).

**३.** ( स ८१२ च्या पूर्वी ) राष्ट्रकूट घराण्यांतील जो ध्रुव त्याचा हा मुलगा व तिसऱ्या गोविंदाचा भाऊ होय. गोविंदानें याला गुजराथ प्रांत देऊन तेथील सुभेदार केलें. यानें आपला भाऊ गोविंद यास वेळोवेळीं मदत केली. स. ८०० च्या सुमारास गुजराथ याचे ताब्यांत आला. यानें नागभट्टाचा आणि इतर राजांचा पराभव केला. राष्ट्रकूटांच्या गुजराथ येथील शाखेचा हा मूळ पुरुष होय. स. ८१२ मध्यें याचा मुलगा कर्क सुवर्णवर्ष हा गुजराथच्या गादीवर आला ( आळतेकर–कृत राष्ट्रकूट, पृ. ६२, ६५,६६,७९ ). हा शके ७३१ (स. ८०९) पर्यंत गादीवर आला नसावा. यानें फार तर तीन वर्षें राज्य केलें असावें ( द. म. इ. सा. खं. ३, ३० टीप ).

**४.** (स. ९१४) मालखेडच्या राष्ट्रकूट वंशांतील जगत्तुंग राजाचा पुत्र. जगत्तुंग राज्यप्राप्तीपूर्वीच एका लढाईत मारला गेल्यामुळें याला याच्या आजानंतर स. ९१४ मध्यें गादी मिळाली. हा आपल्या वयाच्या सुमारें ३५ व्या वर्षी गादीवर आला व याची कारकीर्द अगदीं लहान म्हणजे पांचच वर्षांची झाली. परंतु येवढ्या थोड्या कालांत यानें राष्ट्रकूट घराण्याचा दरारा सर्वत्र बसविला ( E. I.VII. Appendix, p. p. 16 ).

युवराज असतांनाच यानें कनोजच्या राजाचा पराभव केला. नंतर राज्यावर आल्यावर यानें आपली दृष्टि परमारांकडे वळविली. परमार घराणें हे गुर्जर प्रतीहारांचे मांडलिक होतें व प्रतीहारांच्या प्रोत्साहनानुसार परमारराजा उपेन्द्र यानें राष्ट्रकूटांवर स्वारी केली. पण यानें परमारांचा पुरा मोड करून त्यांना आपल्या सत्तेखालीं आणलें.

परमारांवर मिळविलेला हा जय म्हणजे इंद्राच्या उत्तर दिग्विजयाचा आरंभच होय. या वेळीं कनोजच्या राज-

घराण्यांत वारसासंबंधीं अंतःस्थ कलह सुरू झाला होता. इंद्रानें या संधीचा योग्य फायदा घेऊन कनोजच्या महीपालाचा पराभव केला.

याप्रमाणें हा उत्तर दिग्विजयांत गुंतला असतां दक्षिणेकडे सुद्धां याच्या सेनापतींनीं मुलुख पादाक्रांत करण्याचा सपाटा चालविलाच होता.

याप्रमाणें अल्पकाल कां होईना पण मोठ्या शौर्यानें राज्य करून इंद्रानें राष्ट्रकूटांचा जात चाललेला बोज कायम राखला. आपल्या अल्पशा कारकीर्दीत यानें आपणास सार्वभौम म्हणविणाऱ्या प्रतीहारसत्तेस धक्का दिला. व राष्ट्रकूट-सैन्याचा वचक पुन्हां एकदां उत्तरेकडे बसाविला. हा जर अल्प कालांतच मरण पावला नसता तर राष्ट्रकूट-सत्ता पुढें बराच कालपर्यंत टिकली असती ( राष्ट्रकूट, पानें ९९–१०४).

चेदीच्या घराण्यांतील राजकन्या जी विजाम्बा तिच्याशीं यानें लग्न लाविलें होतें. तिच्यापासून याला अमोघवर्ष आणि गोविंद असे दोन मुलगे झाले. पैकीं अमोघवर्षानें याच्यानंतर अवघे कांहीं महिने राज्य करून त्याच्यानंतर श. ८४१ मध्यें गोविंद गादीवर आला ( भांडारकर भा. ३, पृ. ९८-१०१ ).

**५.** ( स. ९८२ मृत्यु ) मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्यांतील खोत्तिग राजाचा पुत्र. खोत्तिगाच्या कारकीर्दीत चालुक्य राजा दुसरा तैल यानें राष्ट्रकूट घराण्याचा बहुतेक नाश करून टाकला होता. परंतु मारसिंह नांवाच्या याच्या मामानें याला हाताशीं धरून राष्ट्रकूट घराणें पुन्हां नांवारूपास आणण्याची धडपड चालविली, व त्याप्रमाणें याला कांहीं कालपर्यंत सिंहासन मिळालें सुद्धां. पण हा अत्यंत अननुभवी व लहान असल्यानें याला बलिष्ठ चालुक्य सत्तेपुढें टिकाव धरतां येईना, व शेवटीं याला सिंहासन सोडावें लागलें (राष्ट्रकूट १३१–३२ ).

हा गंगवंशांतील राणीपासून झालेला असल्यामुळें धर्मशील जैन होता. कारण गंगराजे जैन होते. उत्तर चालुक्यांनीं शेवटचा राष्ट्रकूट राजा कक्कल याचा शिरच्छेद केला. तेव्हां यानें राष्ट्रकूटांच्या सत्तेची पुनः स्थापना करण्याचा प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां यानें सल्लेखनविधीनें आपला प्राण दिला ( स. ९८४ ). सल्लेखनविधि हें एक प्रायोपवेशनासारखें जैनांचें व्रत असून कट्टे जैन लोक तें प्रसंगीं आचरतात.

**इंद्र (भट्टारक)**—हा जयसिंहाचा धाकटा भाऊ स.६६३ त गादीवर आला. कोठें कोठें याला इंद्रराज असेंहि म्हटलें आहे. एका राजसंघानें याला गादीवरून काढण्याचा प्रयत्न केला. त्यांत अधिराजेंद्र हा मुख्य होता. अधिराजेंद्र बहुधा कलिंग नगराच्या गंगवंशाचा इंद्रवर्मा असावा. यानें सात दिवसच राज्य केलें, असें एके ठिकाणीं म्हटलें आहे.

**इंद्रकुमारी**—ही अजितसिंगाची मुलगी असून हिला अजितसिंगानें– फर्रुखसियाला दिली. बादशाहानें हिला स. २३–९–१७१५ मध्यें मुसलमानी दीक्षा देऊन हिच्याशीं लग्न लाविलें. फर्रुखसियरच्या मरणानंतर पुढें कांहीं वर्षांनीं सय्यदांनीं हिला अजितसिंगाच्या ताब्यांत दिलें व हिची संपत्ति एक कोटीपेक्षां अधिक होती ती हीस दिली. अजितसिंगानें परत हिला आपल्या राज्यांत नेऊन प्रायश्चित्त देऊन हिला परत हिंदुधर्मांत घेतलें ( म. रि. म. १, पृ. ७९–१४२ ).

**इंद्रदत्त**—ऐंद्र पिठाचा हा पहिला अनुयायी. हा पाणिनीचा समकालीन असून पाणिनीबरोबर अभ्यास करीत असे ( सि. ऑ. सं. ग्रामर, पृ. १०,१९ ). कथासरित्सागराप्रमाणें हा उपवर्षाचा शिष्य. यानें ऐंद्र व्याकरण केलें असें तेथें म्हटलें आहे.

**इंद्रद्युम्न**—हा पाल घराण्यांतील शेवटचा राजा स. ११९७ त मगध येथें राज्य करीत असे. पण याच्यावर मुसलमानांनीं स्वारी केल्यामुळें हा ओरिसा प्रांतांत पळून गेला व तेथें यानें स. ११९८ त एक जगन्नाथाचें देऊळ बांधलें ( J. N. Samadar's 'Raja Indradyumna' in J. B. & O. Res. Soc., Vol. V, Part ii, pp. 295-7; महेंद्रपाल पाहा ).

**इंद्रभूति**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं बेचाळिसावा सिद्ध होय. हा जातीनें राजा असून लंकापूरचा राहणारा होता. हा अनंगवज्र आणि कंबळपा यांचा शिष्य होता. याचा ग्रंथ सत्त्वैकदृष्टि ( त. ४८।१२ ) ( सिद्ध पाहा ).

**इंद्रभूति गौतम**—(स. पूर्व ६०७-५१५ ) इंद्रभूति किंवा यास गौतम अथवा गोतम असें म्हणत असत. हा जैनधर्मसंस्थापक महावीर याचा शिष्य होता. यानें महावीरानें शिकविलेली जैनधर्माची सर्व शिकवण एकत्रित करण्याचें काम केलें. हा अत्यंत विद्वान् असून जैन धर्माचा पहिला नेता होता.

महावीराच्या वर याचें अत्यंत प्रेम होतें. महावीराच्या निर्वाणसमयीं हा हजर नव्हता, त्यामुळें याला फार दुःख झालें. हा महावीराच्या अकरा गणधरांपैकीं एक होता ( जैनिझम इन् नॉर्थ इंडिया ).

याच्या बापाचें नांव ब्राह्मण वसुभूति व आईचें नांव ब्राह्मणी पृथ्वी असें होतें. याचा जन्म मगधदेशांतील गोंबर गांवीं झाला व वयाच्या ९२ व्या वर्षी महावीरास निर्वाणपदाची प्राप्ति झाल्यावर १२ वर्षांनीं राजगृहप्रांतांतील गुणय गांवीं मरण पावला. महावीरास निर्वाणपदाची प्राप्ति स. पूर्व ५२७ या सालीं झाली असें गृहीत धरल्यास याचा जन्म स. पूर्व ६०७ या सालीं झाला असावा व हा स. पूर्व ५१५ या सालीं निर्वाणपदाला गेला असावा.

**इंद्रायुध**—कनोजचा एक राजा. हा स. ७८३ मध्यें गादीवर आला, पण बंगाल व बहार देशाचा राजा धर्मपाल यानें याला स. ८१० मध्यें पदच्युत केलें ( स्मिथ पृ. ३९२,४१३ ). याला इंद्रराज असेंहि म्हणत असावेत ( वत्सराज पाहा ).

**इंद्रोजी कदम**—कदम घराण्यांतील एका शाखेंत कंठाजी कदमाच्याच कालांत इंद्रोजी कदम या नांवाचा एक प्रख्यात मराठा सरदार होऊन गेला. हा सातारा जिल्ह्यांतील साप गांवचा राहणारा असून आपल्या पराक्रमानें मोठ्या योग्यतेस चढला होता. शाहूच्या काळीं याचें महाराष्ट्रांत प्राबल्य फार माजलें होतें; इतकेंच नव्हे, तर कर्दनकाळासारखाच सरकारला हा वाटत असे. याच्या पराक्रमाप्रमाणें याचा थाट व सरंजामहि दांडगा होता. याच्याजवळ ७००० निवडक सैन्य असून घोडेस्वारहि बरेच होते. गर्विष्ठपणामुळें हा सर्व जगास तुच्छ मानीत असे. इतकेंच काय, पण यानें आपल्या पागेंतील घोड्यांना रुप्याचे नाल मारून असा हुकूम सोडला कीं, हे रुप्याचे नाल परकीयांच्या प्रदेशांत पडावे व त्यांनीं आपल्या वैभवानें दिपून जावें.

एके दिवशीं सदरहू सरदाराच्या पुंडाईची हकीकत शाहूच्या कानावर गेली, तेव्हां त्यानें मुद्दाम यास बोलावणें केलें. शाहूच्या आज्ञेप्रमाणें इंद्रोजी कदम साताऱ्यास येऊन तळ देऊन बसला; व शाहूला निरोप पाठविला कीं, " मी इतर आपल्या प्रधानांप्रमाणें नजीक येतांच नौबती बंद करणार नाहीं. " शाहूनें यास तशी परवानगी दिली व खास राजवाड्यांतील दरबारांत मुलाखत घेण्याचें ठरविलें. कदम पुढें येण्यापूर्वीच शाहूनें त्याचा डामडौल व गर्विष्ठपणा ओळखून आपल्या अंगावरचें जडजवाहीर आपल्या कुत्र्याच्या अंगावर घालून आपण सफेत कपडे करून बसला. याची अशी कल्पना होती कीं, शाहू महाराजांचे सर्व प्रधान आपलें वैभव पाहून तोंडांत बोट घालतील. परंतु दरबारांत जातांच यानें कुत्र्यानेंच फक्त जडजवाहीर घातलें आहे व शाहूमहाराज स्वच्छ आणि पांढरा पोषाख करून बसले आहेत, हें पाहून हा ओशाळला व मर्म ओळखून शाहूमहाराजांच्या पायावर डोकें ठेविलें. शाहूनें याचा योग्य सत्कार केला. इंद्रोजीनें सोन्याच्या सिंहासनावर शाहूस बसवून आपल्या जवळचें जडजवाहीर त्यास अर्पण केलें. शाहूनें सैन्यास मोठें जेवण व पोषाख देऊन परत पाठविलें.

पुढें इंद्रोजी यास मोगलांचा पराभव करते वेळीं दोन बोटांस गोळी लागून दोन बोटें उडालीं (ऐ. स्फु. ले. भा. ३, पा. ३५ ).

**इंपे, सर एलिजा**—( स. १७३२-१८०९ ) हा एक बंगालचा सर न्यायाधीश होय. याचा जन्म १३ जून १७३२ मध्यें झाला.

याचें शिक्षण वॉरन हेस्टिंग्सबरोबर वेस्टमिन्स्टर येथें झालें. स. १७७३ मध्यें याला कलकत्त्याच्या नवीन वरिष्ठ कोर्टामध्यें पहिला सर न्यायाधीश नेमण्यांत आलें; स. १७७५ त नंदकुमाराचा खटला याच्याच पुढें चालला होता, त्यामुळेंच याची इतिहासांत ख्याति झाली. स. १७८७ मध्यें हाउस ऑफ कॉमन्समध्यें याच्यावर नंदकुमाराचा कायद्यानें खून करण्याच्या आरोपावरून खटला करण्यांत आला. बर्क, मिल्ल, मेकाले इत्यादिकांनीं याच्यावर अनेक गुन्हे लादून याला दोषी ठरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण तो सफळ झाला नाहीं.

स. १७८० मध्यें याला कंपनीच्या कोर्टाचा म्हणजे ' सदर दिवाण अदलत'चा मुख्य नेमण्यांत आलें; व त्या कामाकरितां महिना ५००० रु. जादा वेतन ठरविलें. पण हा कारभार बेकायदेशीर होता, तेव्हां डायरेक्टरांनीं याला परत बोलाविलें व पुढें याच्यावर खटला भरला.

हा फार धोरणी व हुषार न्यायाधीश होता. यानें मोठ्या मेहनतीनें स. १७८१ त एक कोड तयार केलें. हिंदूंचे आचारविचार ओळखून हा न्याय देत असे, व साम्राज्यांत स्वास्थ्य राहावें याविषयीं याची खटपट असे. पण याच्या गुणांचें शेवटीं चीज झालें नाहीं. हा पार्लमेंटांत होता. स. १८०९ मध्यें याचा अंत झाला.

# ई

**इतिकदखान**--( झुल्फिकारखान पाहा ).

**ईल**—स. १०५८ च्या सुमारास एलिचपूर येथें ईल नांवाचा राजा राहत होता. हा जैनधर्मी असून याचे कारकीर्दीत वऱ्हाडांत जैनधर्माचा फार प्रसार झाला होता. यानें जैनधर्मास फार उत्तेजन दिलें. यानेंच शिरपुर येथील प्रसिद्ध पार्श्वनाथाचें मंदिर बांधलें, असा समज आहे. त्याचप्रमाणें एलिचपूरजवळ मुक्तागिरी येथेंहि यानें अनेक जैन मंदिरें बांधल्याचें सांगतात. त्यांपैकीं कांहीं बांधलेलीं आहेत आणि कांहीं खडकांत कोरलीं आहेत.

हा एलिचपूर येथें राज्य करीत होता. एकदां गझनी येथील एक फकीर फिरत फिरत याचे दरबारांत आला, त्याचा कांहीं कारणावरून यानें अपमान केला. ही हकीकत त्या फकीरानें गझनी येथें जाऊन त्या वेळीं तेथें राज्य करीत असलेल्या सुलतान महमूद याच्या दरबारांत सांगितली. त्या वेळीं सुलतान महमुदाचा भाचा रहिमानशाह याचें लग्न ठरलें असून लग्नाचें कंकणहि त्यानें बांधलें होतें. तेव्हां फकीर त्याला म्हणाला कीं, 'तुमच्या धर्माची दुसरे लोक विटंबना करितात, आणि तुम्ही लग्नासारख्या सुखासमाधानांत दंग राहतां !' अशा तऱ्हेनें त्या फकीरानें शहाजाद्याची निर्भर्त्सना केली. रहिमानशाहाचीहि धर्मावर फार प्रीति होती. वरील भाषणानें त्यालाहि चेव आला; व त्यानें प्रतिज्ञा केली कीं, 'मी ईल राजावर स्वारी करून त्याला ठार मारीन तेव्हांच लग्न करीन.' असें म्हणून त्यानें लग्नाची तयारी तहकूब केली. लग्नाकरितां रहिमानशाह नवरदेव बनला होता व तशा स्थितींतच तो लढाईस निघाला. फार्सी भाषेंत नवरदेवाला दूला म्हणतात. या कारणामुळें याचें नांव दूला रहिमानशाह असें प्रचारांत आलें.

वरीलप्रमाणें सर्व बेत करून दूला रहिमानशाह १०।१२ हजार सैन्य बरोबर घेऊन लढाईस निघाला. पुढें हा आपल्या सैन्यासह एलिचपूर येथें आल्यावर ईल राजाची भेट घेऊन त्याला लढाईचें आव्हान दिलें. ईल राजाचें स्वधर्मावर प्रेम असल्यानें त्यानें वरील आव्हान स्वीकारलें व तो लढाईस सज्ज झाला. उभय सैन्यांची घनघोर लढाई होऊन रहिमानशाह आणि ईल हे दोघेहि त्या लढाईंत मृत्यु पावले. याप्रमाणें हे दोघेहि वीर स्वधर्माच्या रक्षणाकरितां कामीं आले. एलिचपूर येथें बीचन नदीच्या कांठीं दूला रहिमानशाहा याची कबर करून त्यावर एक मोठी इमारत बांधली आहे. त्या इमारतीच्या पायांतच ईल राजाची समाधि करण्यांत आली होती, असें म्हणतात.

दूला रहिमानशाहाच्या बरोबर लढाईंत पडलेल्या अकरा हजार वीरांची एकच कबर बांधण्यांत आली. त्याला गंजीशहीदा म्हणतात. गंजीशहीदा याचा अर्थ लढाईत पडलेल्या सर्व वीरांची कबर असा आहे. दूला रहिमानशाहा हा मोठा पीर म्हणून मानण्यांत येतो व त्याचा उरूस भरत असतो. दूला रहिमानशाहाच्या कबरेवरची मूळ इमारत आज तेथें नाहीं. दिल्लीचा सुलतान अलाउद्दीन खल्जी यानें हल्लींची इमारत चौदाव्या शतकाच्या आरंभीं बांधली, असें म्हणतात. त्यानंतर त्या इमारतीभोंवतीं कोट, मुख्य दरवाजा वगैरे इमारती नागपूरकर भोसले यांनीं बांधल्या आहेत. या सर्व इमारती आज अस्तित्वांत आहेत व त्या ईल राजा आणि दूला रहिमानशाहा यांच्यामधील झालेल्या लढाईचें स्मारक आहेत. या लढाईनंतर दूला रहिमानशाहाला गाझी हें नांव प्राप्त झालें आहे. गाझी म्हणजे लढाईत शौर्य दाखवून नांव कमावणारा अथवा जिंकणारा ( एलिचपूर पृ. ६-९ ).

**ईशान**—(स. ११७०-१२००) हा तिसऱ्या हलायुधाचा थोरला भाऊ होय. यानें संस्कृतमध्यें द्विजाह्निकपद्धति हा ग्रंथ लिहिला.

**२.** बाणभट्ट कवीचा हा बालमित्र असून कवि होता.

**ईशानदेवी**—अशोकपुत्र जालौकाची पत्नी. ही शैवपंथानुयायी होती. हिनें अनेक शिवालयें बांधलीं ( स्मिथ पृ. २०१ ).

**ईशानवर्मन् मौखरी**—कनोजच्या मौखरी घराण्यांतील जो ईश्वरवर्मन् त्याचा हा मुलगा होय. स.५६० मध्यें हा आपल्या बापानंतर गादीवर आला.

स.५६४ मध्यें मगधच्या कुमारगुप्तानें याच्यावर मोहीम केली व ती तशीच पुढें कुमारगुप्ताचा मुलगा दामोदरगुप्त यानें चालविली. पण त्या लढाईत दामोदरगुप्त मारला गेला.

याच्यानंतर याचा मुलगा शर्ववर्मन् हा गादीवर आला ( B. ). याच्यापूर्वीच्या राजांना 'महाराज' अशी पदवी लावलेली आढळते. परंतु याच्या मागें मात्र महाराजाधिराज असें म्हटलें आहे ( आशिरगडचा मुद्रालेख

नं. ४७, कॉर्पस इन्स्क्रिप्शन व्हॉ. ३ ). याची पत्नी उपगुप्ता. हा जीवितगुप्ताचा समकालीन होता.

**ईश्वर कवि**—( स. १५०० सुमार ) कानडी कवि. ब्राह्मण असावा. पिता-कच्चुटेश. याला अभिनव 'केशिराज' अशी पदवी होती. ग्रंथ-कविजिह्वाबंधन, ( छंदोबुधि ). याला बाण व फणिवर्म अशी नामान्तरें होतीं. हा आंध्रकवि आप्पचा निर्देश करतो. याचा ग्रंथ बायकोला उद्देशून लिहिला आहे असें दिसतें (क. क. च. भा. २, पा. १५१).

**ईश्वरकृष्ण**—सांख्यकारिकांचा कर्ता. हा वसुबंधूचा समकालीन असावा, असें सांख्यसिस्टिमम्ध्यें कीथ म्हणतो. याच्या कारिकांचें भाषांतर चिनी भाषेंत स. ५५७-५८३ ह्याच्या दरम्यान झालेलें असल्यामुळें हा निदान पांचव्या शतकाच्या नंतरचा तरी नसावा; आणि कदाचित् त्या पूर्वीचाहि असणें संभवनीय आहे. याच्या ६९ आर्या असून त्यांत संक्षिप्त रीतीनें पण फार सुसंगतपणें सांख्य-सिद्धातांचें दिग्दर्शन केलेलें आहे. कालांतरानें त्यांत आणखी तीन आर्या वाढविण्यांत आलेल्या आहेत. ह्या ग्रंथानें पंचशिखाच्या सूत्रांस मागें टाकिलें असावें. ह्यांत पंच-शिखाला सांख्यमताचा मुख्य प्रवर्तक असें म्हटलें आहे. स. ७०० च्या सुमारास गौडपादानें रचिलेली, व स. ११०० नंतर वाचस्पतिमिश्रानें लिहिलेली अशा दोन उत्तम टीका सांख्यकारिकेवर आहेत ( पेंडसेकृत संस्कृत वाङ्म-याचा इतिहास, पृ. ३९२-३९३ ).

यांत कै. लोकमान्य टिळकांनीं एक कारिका नवी शोधून काढली.

**ईश्वरदत्त आभीर**—हा एक आभीर घराण्यापैकी होय. हा रुद्रभूति सेनापतीच्या नंतर ५० वर्षांनीं झाला. यानें विजयसेन क्षत्रपाचें ( स. २३८-२४९ ) राज्य जिंकून गुजराथ, काठेवाड व दक्षिणचा कांहीं भाग आपल्या राज्यांत समाविष्ट केला असें दिसतें. ईश्वरदत्त आपल्या लेखांत स्वतःच्या कारकीर्दीचें वर्ष देत नसल्यामुळें याचा काळ खात्रीपूर्वक ठरवितां येत नाहीं. तथापि याचीं जीं नाणीं सांपडतात त्यांची घडण वगैरे विजयसेनाच्या नाण्यां-प्रमाणें दिसते, यावरून हा विजयसेनाचा समकालीन असावा असें वाटतें. नाशिक लेण्यांतील ईश्वरसेनाच्या बापाच्या नांवाप्रमाणें ( शिवदत्त ) याच्या नांवाच्या शेवटीं दत्त असें पद असल्यामुळें हा ईश्वरसेनाप्रमाणेंच आभीर असावा. हा स्वतः महाक्षत्रप म्हणवून नवीन शक सुरू करतो, यावरून तो मागील क्षत्रपांचा पाडाव करून राजा झाला असला पाहिजे, असें मत प्रतिपादण्यांत येतें. तथापि यानें फार थोडीं वर्षें राज्य केलें.

**ईश्वरदास नागर**—यानें औरंगजेबाच्या कारकीर्दीचा इतिहास फार्सी भाषेंत लिहिला ( मु. रि. २ पा.३२० ). हा रजपूत सरदार औरंगजेबाबरोबर दक्षिणेंत आला होता.

**ईश्वरसिंग**—( स. १७४३ ) जयपूरचा राजा सवाई जयसिंग सन १७४३ त मरण पावल्यावर त्याचा वडील मुलगा ईश्वरसिंग हा गादीवर आला. परंतु याचा धाकटा भाऊ माधोसिंग हा गादीवर आपला हक्क सांगूं लागला व मेवाडच्या जगत्सिंगाचें साहाय्य घेऊन त्यानें याशीं युद्ध सुरू केलें. ईश्वरसिंगानें शिंदे-होळकरांची मदत मागितली, गादीचा वारस ठरवितांनाच हे अडथळे उत्पन्न झाले होते; व माधोसिंगानें पातशहास एक कोट रुपये देण्याचें ठरवून राज्य आपणास मिळावें अशी खटपट चालविली. तेव्हां नानासाहेब पेशव्यानें ईश्वरसिंगाचा पक्ष घेतल्यामुळें दिल्लीच्या मुहम्मदशाह बादशहानें ईश्वरसिंगासच राज्य दिलें होतें. या वेळीं पेश-व्यानें सांगितल्यावरून शिंद्यांनीं होळकरास साह्य करून राजमहाल येथें माधोसिंग व राणा जगत्सिंग यांचा पराभव केला. हें प्रकरण १७४५ चे अखेर घडलें असावें. रा. सरदेसायांनीं १७४७ च्या आरंभीं म्हटलें आहे तें चुकीचें वाटतें.

यानंतर माधोसिंगानें मल्हारराव होळकरास ६५ लाख रुपयांची लालूच दाखवून त्याची मदत मागितली. होळकरा-च्या तोंडास पाणी सुटून त्यानें ह्या गोष्टीस पेशव्यांची मंजुरी मागितली. ही गोष्ट जयाप्पा शिंदे व त्याचा दिवाण रामचंद्रबाबा यास बिलकुल आवडली नाहीं. त्यानें असें करणें चांगलें नाहीं, असें नानासाहेबांस निक्षून बजावलें. पण या वेळीं पेशवा कर्जग्रस्त असल्यामुळें ( पु. द. ले १५९, २१३ ) त्यासहि हें राजकारण पसंत पडलें. रामचंद्रबाबाचें म्हणणें " माधोसिंगाचें राजकारण लटकें त्यांत जीव नाहीं. पैका प्राप्त होणें नाहीं. " हें पुढें खरें झालें. पण ह्या वेळीं मात्र तो आपलें राजकारण बिघडवितो म्हणून मल्हारराव त्याजवर खूप चिडला होता ( पे. द. २, २५ ).

हीं प्रकरणें १७४६ च्या बुंदेलखंडाच्या स्वारीच्या वेळीं चालू होतीं. अखेर मल्हारारावाचा पक्ष घेऊन नानासाहेब पेशव्यानें माधोसिंगास ईश्वरसिंगानें चार परगणे टोक, तोडा, मालपुरा व नेवाई एकूण अठरा लाखांची जागा द्यावी, असा निकाल दिला. हा निकाल ऐकतांच मराठ्यांनीं पगडी बद-लली म्हणून संतापानें ईश्वरसिंगानें युद्धाची तयारी आरं-भिली ( स. १७४७ आरंभ ). स. १७४७ च्या फेब्रुआरींत मल्हारारावाचा मुलगा खंडेराव माधोसिंगाच्या बाबतींतिला

करार अमलांत आणण्यासाठीं हजार स्वारांनिशीं उदेपूरच्या राज्यास साह्य करण्यास गेला ( पे. द. २,३ ).

स. १७४८ च्या स्वारींत पेशव्यानें ईश्वरसिंगाची गांठ घेऊन जयपूरच्या गादीच्या बाबतींत झालेला आपला निकाल त्यास पुन्हां सांगितला. पण पेशव्याची पाठ फिरतांच ईश्वरसिंगानें तो निकाल धाब्यावर बसविला. तहाप्रमाणें वर्तन केलें नाहीं म्हणून माधोसिंगाचा कैवारी मल्हारराव होळकर यानें १ जुलै १७४८ रोजीं ईश्वरसिंगावर स्वारी केली ( राजवाडे खंड ६, १९०-१९१; कोटा द. १ ले. ८० ).

शिंद्यानें होळकरास या वेळीं मदत केली नाहीं. मल्हाररावानें ईश्वरसिंगास नरम करून त्याजकडून नानासाहेबानें ठरविलेला करार पुरा करून घेतला. या लढाईंत सुरजमल जाटानें ईश्वरसिंगास मदत केली होती, तेव्हां मल्हाररावानें त्याच्यावर स्वारी केली.

ईश्वरसिंगाच्या पाठीमागें हात धुऊन लागण्याचें कारण या वेळीं सफदरजंग वजिराच्या मार्फतीनें ईश्वरसिंगास नाहींसें करून अजमीरचा सुभा आपण घ्यावा,अशी मल्हाररावाची अंतःस्थ खटपट चालू होती. ईश्वरसिंगाचा पराभव केल्यावर त्यानें जोधपूरच्या अभयसिंग व बख्तसिंग या दोन भावांच्या भांडणाचा सलोखा करून दिला.

स. १७५० त जोधपूरचा राजा अभयसिंग मरण पावला. तेव्हां त्याचा भाऊ बख्तसिंग व मुलगा रामसिंग यांच्यामध्यें जोधपूरच्या गादीसाठीं भांडणें सुरू झालीं. अभयसिंगाच्या वेळेपासून भावांभावांतहि भांडणें सुरू होतीं, व स. १७४८ च्या अखेर मल्हाररावाच्या मध्यस्थीनें सलोखा झाल्याचा उल्लेख एका पत्रांत आढळतो (पु. द. भा. १, ले. १५७ ). मल्हाररावाचा ओढा बख्तसिंहाकडे होता. या चुलतापुतण्याच्या भांडणांत जयपूरच्या ईश्वरसिंगास पडावें लागलें; कारण रामसिंग हा त्याचा जांवई होता. तेव्हां बख्तसिंगाचा पक्ष घेऊन ईश्वरसिंगाचें पारिपत्य करण्याचा मल्हाररावानें विचार केला.

सुभेदार जयपुरावर आले हें कळतांच ईश्वरसिंगानें दोन लाख रुपये देऊन वकिलास पाठविलें. पण मल्हारराव कांहीं केल्या ऐकेना. राजानें जुना कारभारी केशवदास यास ठार मारिलें त्याचा सूड आपण घेणार, असें मल्हारराव म्हणूं लागला. " मग राजा उगाच राहिला. संध्याकाळ जाहली. वर्तमान ऐकिलें कीं सुभेदार येथून दहा कोसांवर आले. खिजमतगारास सांगितलें कीं काळा नाग जिवंत आणवेंण व सोमलखार घेऊन येणें, औषध करणें आहे. त्यांनीं आणून दिलें. दोन प्रहर रात्रीस जहर राजे यानें घेतलें, नाग अंगास डसविले. पहाटे ईश्वरसिंग राजा याचा प्राण गेला. तिघी बायकांनीं जहर घेतलें व एक कलावंतिणीनें जहर घेतलें.'

ईश्वरसिंगाची हृदयद्रावक आत्महत्या मराठ्यांच्या उत्तरहिंदुस्थानांतील कारभाराला काळिमा आणणारी आहे. ता. १४ डिसेंबर रोजीं होळकराची फौज जयपुरांत येऊन दाखल झाली त्याच्या आदल्या रात्रीं हा प्रकार घडला.

ईश्वरसिंगानें आत्महत्या केल्याचें कळतांच मल्हाररावानें माधोसिंगास सांडणीस्वार पाठविला, व आपण शहरांत चौक्या बसवून खंडणीच्या वसुलास प्रारंभ केला. पंधराव्या दिवशीं माधोसिंग आला. त्याच्या आठव्या दिवशीं जयाप्पाहि होळकरास येऊन मिळाला. माधोसिंग मल्हाररावाचा मित्र व जयपूरची गादी त्याला आतां अनायासें मिळालेली, अर्थात् आतां पैसे उकळण्याचें एक चांगलेंच साधन प्राप्त झालें, असें होळकरास वाटलें. पण त्याची प्रचीती माधोसिंगानें लवकरच आणून दिली. त्यानें मल्हाररावास, जयाप्पास व दहापांच हजार खाशांस जेवावयास बोलाविलें. " पांच सात दिवस पक्कान्नें केलीं होतीं. त्यांत अवघें वीख घातलें. पाणियांत वीख घातलें आणि ब्राह्मणास पेढे विखाचे केले. सोमलखार दोन मण घेतला होता. " अशा तऱ्हेनें साऱ्या मराठी फौजेस विषप्रयोग करण्याचा त्याचा बेत होता. पण आयत्या वेळीं जयाप्पानें मोडा घातल्यामुळें कोणीं गेलें नाहीं, व तो प्रसंग टळला. हा बेत फसल्यानंतर एक दिवस माधोसिंगानें सर्व खाशा सरदारांस लवाजम्यानिशीं शहरांत बोलाविलें. जयाप्पाकडचे बरेच खासे व इतर जवळजवळ पांच हजार लोक शहर पाहावयास गेले. तेव्हां पूर्वसंकेताप्रमाणें शहराचे दरवाजे लावून घेण्यांत आले; व मराठ्यांची सरसहा कत्तल करण्याचा माधोसिंगानें हुकूम केला. दोन प्रहरापासून तों प्रहररात्रीपर्यंत कत्तल चालू होती. एकंदर तीन हजार मराठे ठार झाले; व एक हजार जखमी झाले. कित्येक गांवकुसांवरून उडया टाकून पळाले. पौष वद्य ९ गुरुवारीं ( १० जाने. १७५१ ) मराठ्यांची ही कत्तल झाली. " माधोसिंग बेइमानी त्याचें राजकारण लटकें," हे रामचंद्रबाबाचे शब्द या वेळीं मल्हाररावाच्या प्रचीतीस आले असतील. दहशत खाऊन मल्हाररावानें १२ जानेवारीस शहराअलीकडे तीनचार कोस येऊन तेथें मुक्काम केला. " झाला प्रकार माझ्या हुकमानें झालेला नाहीं. पोरासोरी झाली. " असें माधोसिंगानें वकिलामार्फत कळविलें. पण त्यांत कांहीं अर्थ नव्हता. तहाच्या आशेनें मल्हाररावानें आणखी

पंधरा दिवस फुकट घालविले. २२ जानेवारीपर्यंत त्याचा मुक्काम जयपुराजवळ होता ( पे. द. २, ३१ यांतील या पत्राची २१ फे. १७५१ ही तारीख चुकीची असून ती २२ जाने. १७५१ पाहिजे). अशा पद्धतीनें या ईश्वरसिंग-प्रकरणाचा तात्पुरता शेवट झाला. पण या वेळेपासून रजपूत मराठ्यांचे विरुद्ध झाले. मराठे हे राज्यकर्ते नसून लुटारू आहेत, अशी रजपुतांची शेवटपर्यंत समजूत होती. पानपतसारख्या भारतीय युद्धावर याचाहि बराच परिणाम झाला.

**ईश्वरसेन**—( धर्मकीर्ति पाहा ).

**ईश्वरसेन आभीर**—हा दमरी व शिवदत्त आभीर यांचा पुत्र होय. याचें नांव डॉ. भांडारकर जे. बी. बी. आर. एस. पु. ७ नं. १५ वरून वीरसेन आभीर असें देतात. हा आंध्रांची सत्ता बळकावणाऱ्यांपैकीं एक असावा. याची सत्ता नाशिक, खानदेश या भागांत होती. यापेक्षां विशेष माहिती आढळत नाही. याचे नाशिक येथील शिलालेख उपलब्ध आहेत (E. I. Vol. VIII. p. 88). यानें स. २४० मध्यें आभीर-राज्य स्थापन केलें.

**ईश्वरा**—सिंधपूरच्या ( पंजाबांतील सिंहपूर ) यादव घराण्यांतील भास्कर-वर्मन् रिपु-धंघल याची ही मुलगी होय.

ही, जालंधरचा राजपुत्र चंद्रगुप्त यास दिली होती. हिचा काल स. ७०० चे सुमारास आहे ( B ).

**ईश्वरानंद**–भाष्यप्रदीपविवरण व भाष्यप्रदीपव्याख्या यांचा कर्ता.

**ईसरादेवी**—रघुवंशी प्रतीहारांपैकीं नागभटाची पत्नी. हिचा पुत्र रामभद्र.

**ई-हुई**—एक चिनी प्रवासी. हा चीनमध्यें लोयांग येथें राहत होता. हा भारतवर्षात बौद्ध ग्रंथांचा शोध करण्याकरितां आला व येथें यानें अनेक ग्रंथांच्या प्रती करून घेतल्या. नंतर हा परत गेला.

**ईळी शैवल्लभी**—कुलोत्तुंगाची द्वितीय पत्नी.

## उ

**उग्र**—वरगुणवर्मन्च्या वेळेचा एक राजा (स. ८६२ ). वरगुणवर्मन् पांड्याचा धाकटा भाऊ परांतक वीरनारायण यानें यास जिंकलें होतें.

**उग्र पांड्य**—पांड्यांपैकीं सुंदराचा मुलगा.

**उग्रभूति**—जयपालाचा मुलगा जो आनंदपाल त्याचा हा गुरु होय. हा एक व्याकरणकार असून याचीं पुस्तकें काश्मीरमध्यें बरींच लोकप्रिय आहेत. याला राजपुत्राकडून बरीच देणगी मिळत असे ( स्मिथ पृ. ३९७ फुटनोट ). यानेंच जगद्धराच्या बालबोधिनीवर न्यास नांवाची टीका लिहिली. हा शिष्यहितान्यास ग्रंथाचा कर्ता होय. याचा ग्रंथ व्याकरणविषयक आहे ( सी. सी. ).

**उग्रसेन पल्लव**—नेलोर प्रांतांतील पालक्चा राजा. याचा समुद्रगुप्तानें पराभव केला होता.

**उच्छला सातवाहन**—( स. ११०१-१११९ ) काश्मीरांतील सातवाहन घराण्याचा पहिला राजा. यानें हर्षाला ठार करून लोहर घराण्याकडून राज्य घेतलें. शिवरथ नांवाचा याचा प्रधान होता.

**उज्वलदत्त**--याची शाकटायनाच्या उपादिसूत्रावर वृत्ति आहे. तिचा भट्टोजी दीक्षितानें सिद्धांतकौमुदीत उणादिसूत्रावर व्याख्या करतांना निर्देश केला आहे. याच्या-पूर्वी उणादिवर पुष्कळ टीका होत्या. यानें त्या पाहिल्या होत्या. वृत्ति, न्यास, रक्षित, कलिङ्ग, हृदचन्द्र यांचे ग्रंथ पाहून यांनीं आपली वृत्ति लिहिली आहे व जागोजाग यांनीं यांतील उतारेहि दिलें आहेत. यालाच जाजलि असें दुसरें नांव होतें, असें टीकेच्या शेवटीं दिलेल्या संकल्पावरून म्हणावें लागतें. याची वृत्ति संशोधून प्रथम आफ्रेजनें प्रसिद्ध केली.

**उडीयार**--( स. १५७८-१६१७ ) म्हैसूर संस्था-नांतील हिरे ( वडील-ज्येष्ठ ) चामराजाचा हा मुलगा. यानें राज्यविस्तार करून श्रीरंगपट्टण काबीज केलें ( स. १६१० ).

याचा मुलगा नरसराज हा बापाच्या देखत मरण पावला. यालाच सिवेलनें राजाधिराज असें म्हटलें आहे.

**उत्कर्ष**--काश्मीरचा राजा जो कलश त्याचा हा मुलगा होय. हा प्रथम लाहोरचा सुभेदार होता. स. १०८९ मध्यें हा आपल्या बापानंतर काश्मीरच्या गादीवर आला.

गादीवर आल्यापासून अवघे २२ दिवस यानें राज्य केलें. कारण याला गादीवर बसल्यापासून २२ व्या दिवशीं याचा

भाऊ हर्ष यानें गादीवरून काढून टाकिलें आणि आपण राज्य करूं लागला (B)

याचा पिता कलश स. १०७३ मध्यें मेला. तेव्हां नोनक नांवाच्या मंत्र्यानें हर्षाला कैदेंत ठेवून याला गादीवर बसविलें; व यानेंहि प्रजेला न जुमानतां मन मानेल तसा कारभार केला. पण पुढें याचा तिसरा भाऊ विजयमल्ल यानें पुष्कळ लोकांचें साह्य मिळवून याचा पराभव करून याला ठार केलें; व हर्षाला गादीवर बसविलें. याच्या कालाविषयीं मतभेद आहे (म. भा.१.२.११५).

**उत्तम चोल**--हा स. ९६९ त राज्यावर आला असावा. कारण पहिल्या राजराजच्या अगोदर हा १६ वर्षे राज्यावर होता, असा उल्लेख आढळतो. हा स. ९८५ पर्यंत होता. यास परकेसरीवर्मन् ही पदवी होती. हा दुसऱ्या आदित्य चोलाबरोबर राज्य करीत होता (सुंदर चोल परान्तक २ रा पाहा).

**उत्तमश्लोक**—(स. १७०९-१७८६) हा एक कवि होऊन गेला. याचें देहावसान पैठण मुक्कामीं झालें. यानें प्रबोधसार नांवाचा एक ग्रंथ लिहिला. त्यांत एकंदर ओवीसंख्या ३२१ आहे. याचें मूळ नांव माधवराव व्यापारी असें होतें. कृष्णदयार्णवानें याचें नांव उत्तमश्लोक असें ठेविलें. कृष्णदयार्णवाचा हा एक पट्टशिष्य होता. याची समाधि पैठणास आहे. हा शके १७०८ चैत्र शु. ४ या दिवशीं समाधिस्थ झाला (मं. त्रै. व. १२, ४ ले. २६).

हा नाथसांप्रदायी असून याचा जन्म शके १६३१ (स. १७०९) सालीं बीड येथें झाला. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र भारद्वाज. वडलांचें नांव बाळाजी महादेव. हे व्यापारी होते. आईचें नांव चिऊबाई. ही बीडच्या देशपांडे घराण्यांतील मुलगी. याचें पाळण्यांतलें नांव माधवराव. वडील तेराव्या वर्षी व आई सोळाव्या वर्षी वारली. याला मुकुंदराव नांवाचा एक विद्वान् पुत्र होता. त्याचे वंशज सध्यां उमरखेड येथें आहेत. कृष्णदयार्णवाचा हा पट्टशिष्य. कृष्णदयार्णवानें सांगावें व यानें लिहावें, अशा पद्धतीनें भागवत-दशमस्कंधावरील उत्तरार्धाच्या सत्यायशीव्या अध्यायाच्या तेविसाव्या श्लोकापर्यंत ग्रंथ झाल्यावर कृष्णदयार्णव समाधिस्थ झाले (श.१६६२). यानें सत्त्यायशीवा अध्याय पुरा केला; आणि पुढील तीन अध्याय लिहून ग्रंथ शके १६६५ मध्यें पुरा केला. यानें गीतेवरहि एकदोन अध्याय टीका लिहिली होती. यानें सप्तशतीवर एक ग्रंथ लिहिला आहे (आईनाथ पाहा).

**उत्तर**—(सोण पाहा).

**उत्पल**— काश्मीरचा शैव तत्त्ववेत्ता. उदयकराचा मुलगा उत्पल. हा स. ९३० च्या सुमारास उदयास आला. हा सोमनंदाचा शिष्य होता. यानें प्रत्यभिज्ञासूत्र, अजडप्रमातृसिद्धि आणि परमेशस्तोत्रावलि हे ग्रंथ लिहिले आहेत. त्याच वेळीं भट्ट नारायण हा होऊन गेला. यानें स्तव-चिंतामणि हा ग्रंथहि लिहिला आहे.

**२.** चिप्पट जयापीड नांवाच्या काश्मीरच्या राजाचा मामा. चिप्पट जयापीड अल्पवयी गादीवर आला असतां यानें आपल्या हातांत सत्ता घेतली. मम्म नांवाचा दुसरा एक मंत्री याचा जोडीदार होता. चिप्पट वयांत आल्यावर यानें अजितापीड नांवाच्या दुसऱ्या एका अज्ञानाला पुढें करून सत्ता आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मम्मानें तसाच प्रकार करून दोघांत युद्ध झाल्यामुळें उत्पलाला जय मिळाला. यानंतर कर्कोटक घराण्यांतील म्हणून एका अल्पवयी अनंगापीड नांवाच्या मुलाला शेवटीं गादीवर बसविण्यांत आलें. पण उत्पलाचा नातू अवन्तिवर्मा यानें त्याला पदच्युत करून पुढें स्वतः गादी बळकावली. व स. ८५५ च्या सुमारास काश्मीरांत उत्पल घराण्याची स्थापना झाली (म. भा. २, पा. ९७).

**उत्पलभट्ट**—(भट्टोत्पल पाहा).

**उत्पलराज परमार**—अबूच्या परमार घराण्यापैकीं सिंधुराजाचा उत्तराधिकारी. सिरोही राज्यांतील वसंतगड येथें पूर्णपाल परमाराच्या वेळचा म्हणजे वि. सं. १०९९ (स. १०४२) या शिलालेखांत परमाराची वंशावळ या उत्पलराजापासून सुरू होते.

**उत्वी**–हा गझनीच्या महमुदाचा समकालीन ग्रंथकार होय. हा महमुदाचा चिटणीसहि होता. हिजरी स. ४१२ (स. १०२१) मध्यें यानें आपला वृत्तान्त थांबविला आहे. हा याच्याहि पुढें जिवंत होता, असें याच्या ग्रंथांतील उल्लेखावरून दिसतें. महमुदाच्या स्वारीचीं वर्णनें समजण्यास प्रायः याचाच एक ग्रंथ सध्यां उपयोगी आहे. मात्र त्यांतील शत्रुपक्षाकडील तपशील किंवा अतिशयोक्तीचीं काव्यमय वर्णनें वजाबाकी करून स्वीकारलीं पाहिजेत. तत्कालीन कागदपत्रांचाहि यानें उपयोग केलेला दिसतो. स्वाऱ्यांच्या नोंदीचें रजिस्टर अथवा महमुदानें लिहून ठेवलेल्या आठवणी अशा तऱ्हेच्या सरकारी कागदपत्रांचा यानें निर्देश केला आहे. याच्या ग्रंथाचें नांव तारिख-इ-यामीनी असें आहे.

**उदय**—उदयनाचें नामान्तर.

**उदयकर**—( उदयनाचार्य पाहा ).

**उदयचंद्र**—हा पल्लवसेनापति होता. यानें नंदीवर्मन् यास जेव्हां द्रमिळ राजपुत्रानें नंदीपुर येथें वेढा घातला तेव्हां मदत केली. आणि शत्रूंचा पराभव करून पल्लवराजा चित्रमाय यास ठार मारलें ( नंदीवर्मन् पल्लवमल्ल पाहा ).

२. यानें हेमचंद्राच्या बृहद्वृत्तीवर अनेक न्यास लिहिले आहेत. हा चांद्रांच्या संघांतील होता. याचा देवेन्द्रसूरि नांवाचा शिष्य होता.

**उदयन**—पांडवांच्या कुरुवंशांत भारतीय युद्धानंतरच्या राजांच्या यादींत याचें नांव येतें. हा शतानीकाचा पुत्र असें मत्स्य, विष्णु व भागवत पुराणांत दिलें आहे. पण बृहत्कथेंत म्हणजे कथासरित्सागरांत शतानीक-सहस्रानीक-उदयन असा क्रम दिला आहे. म्हणजे बृहत्कथेप्रमाणें उदयनाचा पिता सहस्रानीक होय. जैनवाङ्मयांत सहस्रानीक-शतानीक-उदयन असाच क्रम आहे. याचा पुत्र मत्स्यपुराणाप्रमाणें वहीनर होय. कथासरित्सागरांत याच्या पुत्राचें नांव नरवाहन असें दिलें आहे. वह-इ-नर हें नरवाहन शब्दाचें इराणी रूप आहे, असें दिसतें.

याला उदय, उदयन, उदयिन, उदयाश्व, वत्सराज अशीं नांवें आढळतात. बौद्ध याला उदयीभद्र असें संबोधितात.

हा वत्सदेशाचा राजा होता. वत्सदेश म्हणजे प्रयागच्या पश्चिमेकडील गंगायमुनांच्या दुआबांतील प्रदेश होय. याची राजधानी कौशांबी. सध्यां कोसम नांवाचें खेडें यमुनेच्या डाव्या बाजूस आहे तेंच हें होय. याचा काळ स. पूर्व ५०३ होय. यानें गंगेच्या कांठीं कुसुमपुर हें शहर वसवेंल. याची राणी ही अवंतीच्या महासेन प्रद्योत राजाची कन्या होय ( स्मिथ पृ. ३८-३९ ).

अशोकापूर्वीच्या राजांपैकीं वत्सदेशचा हा राजा बौद्ध बनला होता, असें बौद्ध ग्रंथांतून सांगितलें आहे; व हा जैन होता असें जैन ग्रंथ सांगतात.

यानें केलेली बुद्धाची पांच फूट उंचीची चंदनी मूर्ति कौशाम्बी येथील राजवाड्याच्या देवळांत अद्याप आहे, असें ह्यूएन्संग आपल्या प्रवासवृत्तांत म्हणतो.

हा पांडवांच्या कुलांतील होता, असें स्वप्नवासवदत्त नाटकांत म्हटलें आहे. याच्या प्रथम पत्नीचें नांव वासवदत्ता. वासवदत्ता ही अवन्तिराज प्रद्योत याची कन्या होती. वासवदत्ता व उदयन यांच्या वयांत फारसें अंतर नव्हतें. याला मगधदेशचा राजा दर्शक याची बहीण पद्मावती ही दुसरी पत्नी होती. ती वासवदत्तेपेक्षां वयानें थोडी लहान होती. तिचें लग्न दर्शकाच्या कारकीर्दीत झालें. दर्शकाची राजधानी राजगृह दिसते. दर्शकाच्या वेळीं अवंतिदेशचा राजा प्रद्योत होता, अशी माहिती भासाच्या स्वप्नवासवदत्त या नाटकावरून मिळते. पुराणावरून पाहतां हा व त्याबरोबरचे इतर राजे गौतमबुद्धाच्या समकालीन किंवा दहावीस वर्षें पुढें असावेत. तथापि उदयनानें बुद्धधर्म किंवा जैनधर्म खरोखरच स्वीकारला होता किंवा ग्रंथकारानें आपल्या धर्माला राजाश्रय मिळाला होता हें दाखवून धर्माचा प्रसार करण्याकरितां ही गोष्ट मागाहून रचली, याबद्दल शंका आहे.

हा वीस पादचारी योद्धयांसह हत्ती पकडण्यास गेला असतां कृत्रिम कातडी हत्तींत लपून बसलेल्या लोकांनीं यावर छापा घालून याचे सर्व लोक मारले, ही गोष्ट भासाच्या यौगंधरायण नाटकांत आली आहे. क्षेमेन्द्राच्या बृहत्कथामंजरींत ( लंबक २ अ. २ ) ही कथा आहे. पण एकटाच शिकारीस गेल्याचें तेथें दिलें आहे. कथासरित्सागरांत हीच गोष्ट बरीच विस्तृत दिली आहे. इतरहि दहाबारा काव्यनाटकांत थोड्याफार फरकानें ही कथा आली आहे. याच्या कथा सर्व उज्जयनींत लोकांच्या तोंडीं होत्या, असें मेघदूतांत कालिदासानें म्हटलें आहे.

हा वीतभय येथील राजा होय. याला वैशालीच्या चेतक या लिच्छवी राजाची सर्वांत मोठी मुलगी जी प्रभावती ही दिली होती. वीतभय या देशाला जैन वाङ्मयांत सिंधु-सौवीर देश असें म्हटलें आहे. हा बिंबिसारचा समकालीन होता.

डॉ. श्री. व्यं. केतकरांनीं प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासांत याचा काळ स. पूर्व आठवें शतक होय असें ठरविलें आहे. तसेंच कथासरित्सागरांतील याच्या दिग्विजयाचें वर्णन ऐतिहासिक आहे, असेंहि ते म्हणतात.

२. हा शबर राजा होता. यास नेलवेली येथें उदयचंद्र पल्लवसेनापति यानें ठार मारलें (स.७३५); (नंदीवर्मन् पल्लवमल्ल पाहा).

**उदयनाचार्य**—(स.९८४) वाचस्पतिमिश्रावर टीकेची झोड उठवली आहे. तेव्हां त्याचें वेंड काढण्यासाठीं ह्यानें 'न्यायवार्तिक-तात्पर्यटीका' या ग्रंथावर 'न्यायवार्तिकतात्पर्यटीकापरिशुद्धि' या नांवाची एक उपटीका लिहिली. यास उदयकर असेंहि म्हणत असत. हा जातीनें ब्राह्मण असून याचा जन्म मिथिला येथें झाला.

उदयनाचार्यानें इतरहि बरेच ग्रंथ लिहिले आहेतः कुसुमाञ्जलिः, आत्मतत्त्वविवेक, कर्णावली व न्यायपरिशिष्ट अथवा बोधसिद्धि अथवा बोधशुद्धि. यास बुद्धधिक्कार असेंहि म्हणतात.

उदयनआचार्य या नांवानें हा जास्ती प्रसिद्ध होता. यानें 'लक्षणावली' नांवाचा आणखी एक ग्रंथ लिहिला आहे.

हा ग्रंथ शके ९०६ म्हणजे स. ९८४ त लिहिला, असें यानें त्यांत म्हटलें आहे. मिथिलेच्या उत्तरेस २० मैलांवर कमला नदीच्या तीरावर वसलेल्या मोनिरोनी या गांवीं याचा जन्म झाला.

यानें वादांत बऱ्याच वेळां बुद्धलोकांस जिंकिलें होतें, परंतु ते याचा जय कबूल करीत नसत. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं एक दिवस याच्यांत व बुद्धलोकांत मोठा कडाक्याचा वाद झाला. अनुमानानें यास ईश्वराचें अस्तित्व पटवून देतां न आल्यामुळें एक ब्राह्मण व एक श्रमण (बुद्ध) बरोबर घेऊन हा एका टेकडीवर गेला, व तेथून दोघांसहि यानें खालीं फेंकून दिलें. पडतां पडतां ब्राह्मण ओरडला, 'ईश्वराचें अस्तित्व मला मान्य आहे.' श्रमण ओरडला, 'तें मला मान्य नाहीं.' तेव्हां खालीं पडतांच तो बुद्ध गतप्राण झाला. परंतु ब्राह्मणाच्या केसासहि धक्का पोंचला नाहीं. या प्रसंगावरून ईश्वराचें अस्तिव सिद्ध झालें.

यास अशा रीतीनें जरी विजय मिळाला तरी याजवर खुनी असा आरोप करण्यांत आला. तेव्हां टेकडीवरून खालीं उतरून हा उदयनपुरी येथील जगन्नाथाच्या देवालयाकडे चालता झाला. जगन्नाथासंबंधीं त्या वेळीं अशी प्रसिद्धि होती कीं, तो फक्त पुण्यवानांनाच दिसत असे.

तेथें हा तीन दिवस राहिला तेव्हां जगन्नाथानें याचे स्वप्नांत येऊन यास सांगितलें कीं, 'बनारस येथें तुझ्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून स्वतःस जाळून घेतल्याखेरीज तुला माझें दर्शन घडणार नाहीं.' तेव्हां उदयनानें बनारस येथें जाऊन आपला देह अग्नीस अर्पण केला. ईश्वराचें अस्तित्व राखण्यासाठीं आपण एवढे श्रम घेतले तरी जगन्नाथानें आपणावर दया केली नाहीं, हें पाहून यास राग आला. मरतांना यानें पुढील उद्गार काढलेः--

'ऐश्वर्यमदमत्तोऽसि मामवज्ञाय वर्तसे ।
प्रवृत्ते बौद्धसंपाते मदधीना तव स्थितिः ॥'

"बुद्धलोक मातले असतां ज्याच्यावर तुझें अस्तित्व अवलंबून होतें, त्या माझा, आपल्या श्रेष्ठत्वाच्या जोरांत तूं धिक्कार करीत आहेस !" (हिस्ट्री आफ् इंडियन लॉजिक पा. १४३). असें म्हटल्यानंतर याला जगन्नाथानें दर्शन दिलें.

**उदयनाथ**--कवीन्द्राचें नामांतर.

**उदयप्रभसूरि**--'धर्माभ्युदय महाकाव्य' आणि 'आरंभसिद्धि' या संस्कृत ग्रंथांचा कर्ता. वीरधवलाचा (स. १२४१) मंत्री वस्तुपाल यानें याला आश्रय दिला होता.

**उदयभानु**--उदेभान राठोड. स. १६७० त तानाजी मालुसऱ्यानें सिंहगड किल्ल्यावर रात्रींच्या वेळीं अचानक हल्ला केला, तेव्हां उदयभानु हा किल्ल्याच्या संरक्षणार्थ मोगलांकडून नेमलेला अधिकारी होता. या हल्ल्यांत ह्याचा पराभव होऊन त्यांत हा मारला गेला. हा मूळचा रजपूत पण बाटून मुसलमान झाला होता (जेधे शकावली). यालाच उदेभान राठोड म्हणतात.

**उदयमती**--ही अनहिलवाडच्या सोलंखींपैकीं पहिल्या भीमदेवाची बायको. हिनें अनहिलवाड्यास 'राणीनी बाव' (विहीर) बांधविली (स. १०४५). हिचा पुत्र पहिला कर्ण होय.

**उदयराज परमार**--अबूच्या परमारांपैकीं किराडूच्या शाखेंतील सोच्छराजाचा पुत्र. हा गुजराथच्या सिद्धराज जयसिंहाचा सामंत होता; आणि सिद्धराजाकरितां चोड, गौड, कर्नाटक आणि माळव प्रांतांत लढाईस गेला होता (रा. इ.).

**उदयवर्मा परमार**--माळव्याच्या परमारांपैकीं महाकुमार. शाखेंतील हरिश्चंद्रवर्म्याचा थोरला पुत्र. याचें वि. सं. १२५६ मधील दानपत्र मिळालें आहे (राजपुतानेका इतिहास, पा. १९८).

**उदयसिंह**--(स. १४६८--७२) हा आपला पिता राणा कुंभा यास ठार मारून वि. सं. १५२५ (स. १४६८) मध्यें मेवाडचा राजा झाला. पितृघाती माणसाला हत्यारा असें म्हणतात व त्याचें मुखावलोकन करणें पाप समजतात. वंशावळी लिहिणारांनीं अशा माणसांचीं नांवें वंशावळ देतांना गाळलेलीं आढळतात. याच्याशींहि असाच व्यवहार लोकांनीं केला. राजभक्त लोकांनीं याला टाळण्याचा प्रयत्न केला. यानें राज्यांतील लोक वश होत नाहींत असें पाहून भोंवतालच्या राजांना मुलूख देऊन मैत्री करण्यास सुरवात केली. तेव्हां राज्यांतील लोक अधिक विरुद्ध झाले आणि रावत चूंडाचा पुत्र कांधल याच्या नेतृत्वाखालीं जूट करून उदयसिंहाचा धाकटा भाऊ रायमल यास गादीवर बसविण्याचें ठरविलें. या वेळीं रायमल सासुरवाडीला इडर

येथें होता. त्याला बोलावतांच तो आपल्या सैन्यासह ऋषभदेवाकडून ( केसरियानाथ ) जावर ( योगिनीपुर )च्या जवळ आला. इकडचे सरदारहि आपल्या सैन्यासह त्याला जाऊन मिळाले. जावरजवळ झालेल्या लढाईंत रायमलचा विजय झाला; व तेथें त्याचा अधिकारहि सुरू झाला. पुनः दाडिमपुराजवळ घोर युद्ध झालें. तेथेंहि याचा पराजय झाला व क्षेम नृपति मारला गेला. या लढाईंत याचे हत्ती, घोडे, नगारा व निशाण हें सर्व रायमलच्या हातांत गेलें. याच क्रमानें पावी व पानगड येथील लढायांत विजय मिळवून त्यानें चितोडला वेढा दिला. चितोडलाहि विजय झाला; व उदयसिंह तेथून पळाला व त्यानें कुंभगडचा आश्रय घेतला. तेथून हा पळाला व साऱ्या मेवाडवर रायमलचा अधिकार झाला. ही गोष्ट वि. सं. १५३० मध्यें झाली. शेवटीं आपले दोन पुत्र सैसमल व सुरजमल यांच्यासह आपल्या सासुरवाडीला सोजत येथें जाऊन हा राहिला. नंतर बिकानेरला राहून मांडूच्या सुलतानाकडे गयासशाह ( गयासुद्दीन) खल्जीकडे गेला व तेथून मेवाडचें राज्य मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. शेवटीं त्याला आपली मुलगी देण्यास हा तयार झाला. पण हें बोलणें करून बाहेर पडत असतां वीज पडून हा मृत्यु पावला ( रा. इ. पा. ६३६-३९ ).

२. हा मेवाडचा महाराणा संगाचा पुत्र होय. याच्या आईचें नांव करमेती ( कर्मवती ) होय. विक्रमादित्याला वणवीरानें ठार केल्यानंतर स्वतःच्या पुत्राचा बळी देऊन पन्ना दाईनें याला वांचविलें. पन्ना याला घेऊन देवलियाचा रावत रायसिंहाकडे आली. त्यानें याच्या संरक्षणाची व्यवस्था करून डुंगरपुरला यांना पाठवून दिलें. येथील रावळ आसकरणनें कुंभलमेर येथें पोंचवलें. तेथील किल्लेदार आशा देफरा ( महाजन ) होता. सर्वच लोक वणवीरला भीत होते. शेवटीं आपल्या आईच्या उत्तेजनानें त्यानें आपल्या अन्नदात्याला आश्रय दिला. ही बातमी थोडक्याच दिवसांत सर्वत्र पसरली व वणवीरानेंहि 'खरा उदयसिंह मीं मारला. हा तोतया आहे.' असें जाहीर केलें. पण हा या वेळीं लहान नव्हता, पंधरा वर्षांचा होता. त्यामुळें अनेक सरदार व आजोळचे बुंदीकडील लोक याला चांगले ओळखीत होते. त्यामुळें लवकरच याला मेवाडचा स्वामी मानून सरदारांनीं नजराणे केले. ही गोष्ट वि. सं. १५९४ ( स. १५३७ ) मध्यें झाली. पण हा तोतयापणाचा आरोप निखालस नाहींसा करण्याकरितां सोनगरे अखैराज( रणधीरोत )ची मुलगी याला देण्यांत आली व सर्वांनीं एकत्र जेवण केलें. इतर सरदारांनाहि बोलावण्यांत आलें व सेना एकत्र झाली. वणवीरानें कुंवरसी तंवर याच्या प्रामुख्याखालीं आपली सेना रवाना केली. माहोली( मावली )पाशीं युद्ध होऊन याचा जय झाला. चितोडलाहि वेढा देऊन यानें तो ताब्यांत घेतला व आपल्या पैतृक राज्याचा हा मालक झाला. वणवीर मारला गेला कां पळाला, याचा पत्ता लागला नाहीं.

पुढें याचें झाला अजाचा पुत्र जैतसिंह याच्या मुलीशीं लग्न झालें. ती जोधपुरच्या राव मालदेवाची मेव्हणी ( बायकोची धाकटी बहीण ) होती, व तिच्याशीं मालदेवाला लग्न करण्याची इच्छा होती. तेव्हां त्या बाबतींत याच्याशीं त्याचे दोन हात झाले. पण तो पराजित झाला.

नंतर शेरशहा सूरनें अजमेर घेतलें आणि तो चितोडकडे वळला. यानें चितोडच्या किल्ल्या त्याच्याकडे पाठवून दिल्या व शेरशहानें चितोड घेतला, असें तारीखे शेरशाहीमध्यें अब्बासखां सरवानी लिहितो. पण चितोड पुनः याच्याकडे कसा आला, याचा उलगडा होत नाहीं.

बुंदीचा राव सुरताणाबद्दल सरदारांवर अत्याचार करतो म्हणून भारी तकारी येत, म्हणून बुंदीचें राज्य यानें हाडा अर्जुनचा पुत्र सुरजन याला दिलें. तो सैन्यासह बुंदीवर जातांच सुरताण रायमल खीचीकडे पळाला ( स. १५५४ ).

शेरशहा सूरचा गुलाम हाजीखां हा एक प्रबळ सेनापति होता. अकबर गादीवर आला तेव्हां हाजीखांचा अकबरवर अधिकार होता. अकबरानें मुहम्मद सरवानी ( नासिर-उल्मुल्क ) यास त्यावर पाठविलें. तेव्हां हाजीखां अजमेरला पळाला. राव मालदेवनें त्याला लुटण्याकरितां पृथ्वीराज जैतावतला पाठविलें. हाजीखानें महाराण्याची मदत मागितली. महाराण्यानेंहि राव सुरजन, दुर्गा सिसोदिया, राव जयमल मेडतिये वगैरे लोक पाठविले. पण रजपुतांनीं आपसांत युद्ध खेळून पराक्रमी लोक नाहींसे करणें बरें नाहीं असें ठरवून सर्व परत गेले. पण या मदतीच्या बदला हाजीखांची रखेली रंगराय पातर (वेश्या) महाराण्यानें मागितली. ती देण्याचें नाकारतांच मालदेवाच्या मदतीनें हाजीखानें याच्यावर स्वारी केली व त्यांत अनेक रजपूत योद्धे धारातीर्थी पडले. हा महाराणाहि त्यांत जखमी झाला.

एकदां हा चितोडहून एकलिंगजीच्या दर्शनाला गेला आणि तेथून आहाडच्या बाजूला शिकारीला गेला. वाटेंत याला बेडच नदी डोंगरांतून पटांगणांत गेलेली आढळली. त्या मैदानांत यानें उदयपुर वसविण्याचें ठरविलें. कारण चितोड पहाडांत आहे. त्यामुळें त्याला शत्रूचा सहज वेढा पडतो; व वेढलें कीं रसद बंद होते. त्यामुळें सध्यांच्या

ठिकाणीं यानें उदयपुर वसविण्यास सुरुवात केली. यांत याची दूरदृष्टि दिसून येते.

यानंतर अकबरानें चितोडवर स्वारी केली. यापूर्वी तीनशें वर्षे मुसलमान हिंदुस्थानांत आले असूनहि शंभर वर्षेपर्यंत एक वंश राज्य करूं शकला नव्हता. याचें कारण प्रबळ रजपूत हयात होते आणि त्यांचें साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न झाला नव्हता. त्यांच्या साहाय्याशिवाय हिंदुस्थानांत एकछत्री राज्य चालवणें अशक्य आहे, हें लक्षांत घेऊन त्यांना आपल्या बाजूला घेण्याचा त्यानें प्रयत्न केला. अकबरानें प्रथम आंबेरचा राजा भारमल कछवाहे याला आपला सेवक बनवून त्याची प्रतिष्ठा वाढविली, पण रजपुतांतील प्रमुख असणारा चितोडचा राणा याला आपल्या ताब्यांत घेण्याची त्याला आवश्यकता वाटली. याच सुमारास माळव्याचा सुलतान बाजबहादूदुर अकबराच्या भीतीनें पळाला व चितोडच्या महाराण्याच्या आश्रयाला राहिला. ही संधि साधून अकबरानें चितोडवर स्वारी केली. स्वारीची बातमी याचा पुत्र शक्तिसिंह यानें अगोदरच चितोड येथें पोंचविली होती. बापाशीं विरोध असल्यामुळें तो अकबराकडे गेला होता, पण चितोडवर स्वारी करण्याचें ठरलेलें कळतांच तो तेथून बदनामीला भिऊन रातोरात पळून आला. अकबराच्या स्वारीची बातमी कळतांच सर्व रजपूत एकत्र झाले. महाराण्यानें परिवारासह डोंगरांत जावें, कारण गुजराथशीं लढून आपण कमजोर झालों आहोंत असें ठरविलें. त्याप्रमाणें हा राठोड जयमल व पत्ता सिसोदिया यांना सेनाध्यक्ष नेमून आपण सपरिवार पहाडांत गेला. लढाई जोरांत सुरू झाली. महाराण्याचा पाठलाग होऊनहि महाराण्याचा पत्ता लागला नाहीं. दोही बाजूंनीं तोफांचा उपयोग केला जात होता. सुरुंग पुनःपुन्हां पाण्यासारखा पैसा खर्चून दुसरे तयार केले जात. शेवटीं सुरुंगानें चितोडची भिंत उडविण्यांत आली, पण तेथें तेल, कपडे व कापूस सारखा जाळून कोणालाहि आंत येणें रजपुतांनीं अशक्य केलें. पण शेवटीं अन्नसामग्री संपल्यामुळें स्त्रिया व मुलें यांनीं जोहार करून देह अग्नीला अर्पण केले. आणि दुसऱ्या दिवशीं किल्ल्याचे दरवाजे उघडून प्राणावर उदार होऊन रजपुतांनीं लढण्यास सुरुवात केली. राठोड जयमल पायानें लंगडा झाला असल्यामुळें त्याला घोड्यावर बसतां येत नव्हतें. पण लढण्याची इच्छा तर होती; तेव्हां त्याचा एक कळा नांवाचा कुटुंबी त्याला आपल्या खांद्यावर घेऊन निघाला. राठोड जयमल व पत्ता सिसोदिया हे दोघेहि हनुमानपोळ व भैरवपोळच्या मध्यें पराक्रमाची शर्थ करीत असतां कामास आले. त्यांचे घोड्यावर बसलेले दगडी पुतळे अकबर आग्र्यास गेल्यावर तयार करून चितोडच्या दरवाजांत बसविण्यांत आले होते, असें फ्रेंच प्रवासी बर्नियर यानें लिहिल्यावरून दिसतें ( बर्नियर्स ट्रॅव्हल्स, पृ. २५६, स्मिथ-संपादित). पण ते औरंगजेबानें फोडून टाकले असें म्हणतात. अनेक योद्धयांबरोबर प्रजाहि मारली गेली. कारण प्रजेनेंहि युद्धांत भाग घेतला होता. आणि अकबरानेंहि यामुळेंच सरसहा कत्तल करण्याचा हुकूम दिला होता. वि. सं. १६२४ चैत्र वद्य १३, ता. २५ मार्च स. १५६८ मध्यें दुपारीं चितोड पूर्णपणें अकबराच्या ताब्यांत आलें. तेथें तीन दिवस राहून अब्दुल मजीद आसफखानाला किल्ल्यावरील अधिकारी नेमला, व अकबर अजमेरकडे निघून गेला.

महाराणा चार महिने डोंगरांत राहून नंतर उदेपूरला आला आणि अर्धवट राहिलेलीं कामें पुरीं केलीं.

चितोड घेतल्यानंतर पुढल्या वर्षी याचा रणथंभोर हा अजिंक्य किल्ला अकबरानें घेतला. आणि मेवाडचें स्वातंत्र्य पूर्णपणें नष्ट झालें.

याचा पौत्र अमरसिंह यावर त्याच्या वेळीं लिहिलेल्या अमरकाव्यांत आणखीहि याच्यासंबंधीं कांहीं पराक्रमाच्या गोष्टी दिल्या आहेत; व यांनीं पराक्रमी लोकांना उत्तेजन दिल्याचेंहि लिहिलें आहे. यानें उदेपूर येथें कांहीं महाल, तलाव, व उदयश्यामचें मंदिर बांधलें. चितोड गेल्यानंतर हा कुंभलगडला राहत असे. कारण उदयपुर पुरें वसलें नव्हतें. हा कुंभलगडावरून गोगूंदा गांवीं आला असतां आजारी पडून फाल्गुन शुद्ध १५ ( २८ फेब्रुवारी, स. १५७२ ) मध्यें मृत्यु पावला. याला वीस बायका व पंचवीस मुलें होतीं. मुलांचीं नांवें—प्रतापसिंह, शक्तिसिंह, वीरमदेव, जैयतासिंह, कान्ह, रायसिंह, शार्दूलसिंह, रुद्रसिंह, जगमाल, सगर, अगर, सीया, पंचायण, नारायणदास, सुरताण लूंवकरण, मणेशदास, चंदा, भावसिंह, नेतसिंह, सिंहा, नगराज, वैरिशाल, मानसिंह, साहिबखान. तसेंच याला वीस मुलीहि होत्या.

याला विशेष कर्तृत्व व दूरदर्शीपणा होता असें दिसत नाहीं. हाजीखां पठाणाशीं रंगराय वेश्येकरितां यानें युद्ध केलें. तसेंच शेवटींहि आपला योग्य वारस असतां आपल्या एका प्रेमपात्र असणाऱ्या भाटयाणीच्या पुत्राला–जगमाळला राज्य देऊन मूर्खपणा केलाच. चितोड स्वतः न लढवतां डोंगरांत लपून बसला. या सर्व गोष्टी याच्या नादानपणाच्या द्योतक आहेत.

यानें जगमाळला राज्याधिकारी केलें होतें तरी सर्व सरदारांच्या संमतीनें राणा प्रताप मेवाडच्या गादीवर आला व जगमाळ अकबराला जाऊन मिळाला (रा.इ.पा.७१४).

**उदयसिंह राठोड**—हा जोधपूरच्या मालदेवाचा मुलगा होय. स. १५८६ मध्यें हा अकबराचे नोकरींत होता, आणि त्याच वर्षी यानें आपली बालमती नांवाची मुलगी जहांगीर यास दिली. बालमतीपासून जहांगीरास शाहजहान नांवाचा पुत्र झाला. अकबरानें याला मोठ्या पदास चढवून जोधपूरची जहागीर दिली. यालाच मोठा राजा असें शरीर अवजड असल्यामुळें म्हणत. स.१५९४ मध्यें लाहोर येथें हा मरण पावला. त्या वेळीं याच्या चार बायकांनीं याच्या चितेंत उडया टाकिल्या. याच्यानंतर याचा मुलगा सूरजसिंह हा गादीवर आला.

**उदयसौभाग्य**—हा 'दुण्ढिका' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता होय. यानें आपला ग्रंथ स. १५३३ मध्यें लिहिला. त्या वेळीं गुजराथेंत बहादूरशहा राज्य करीत होता. याचा दुण्ढिका हा ग्रंथ हेमचंद्राच्या बृहद्वृत्तीवर आहे ( सिस्टीम ऑफ संस्कृत ग्रामर, पृ. ७८ ).

**उदयाकर**—उत्पलाचा पिता.

**उदयादित्य**—बिट्टिदेवाचें नामान्तर.

**२.** हा एरयंगचा तिसरा मुलगा. हा बिट्टिदेवाचा भाऊ होय. हा बिट्टिदेवानंतर गादीवर बसला असावा.

३. तिसऱ्या नागवर्म्याचा आश्रयदाता. वनवासीचा राजा ( भुवनैकमल्ल चालुक्य पाहा ).

४. ( स. ११५० सुमार ) कानडी कवि. हा चोळ घारण्यांतील असून याच्या पित्याचें नांव सोमनाथ. हा राजपुत्र दिसतो. यालाहि राज्याभिषेक झाला होता. तथापि मांडलिक असावा.

हा आपणांस उदेग असेंहि म्हणवून घेतो. ग्रंथ–उदयादित्यालंकार. याचा हा ग्रंथ ७२ कवितांचा लहान असला तरी त्यांत जयदेवाच्या चंद्रालोकाप्रमाणें लक्ष्य, लक्षण व उदाहरण हें सर्व एकाच श्लोकानें सांगितलें आहे. या ग्रंथांत काव्यभेद, रीति, रस, काव्यगुण व अलंकार हे विषय याच क्रमानें सांगितले आहेत. याच्या ग्रंथांतील कांहीं भाग दंडीच्या काव्यादर्शाचें भाषांतर आहे ( क. क. च. १, पा. १५९ ).

**उदयादित्य परमार**—माळव्याच्या परमारांपैकीं जयसिंहाचा उत्तराधिकारी. हा राज्यावर आल्यानंतर सांभरच्या तिसऱ्या विग्रहराज ( विसळदेव ) चौहानाच्या साहाय्यानें यानें आपल्या राज्याची स्थिति सुधारली व विग्रहराजानें दिलेल्या घोड्यावर बसून गुजराथच्या भीमदेवाचा मुलगा कर्ण यास जिंकलें (पृथ्वीराजविजय सर्ग ५). ही लढाई भीमदेवाचा सूड घेण्याकरितां असावी. भोजानें वीर्यराम चौहानाला मारलें होतें. तथापि यानें सांभरच्या चौहानाशी सख्य केलें असण्याचा संभव आहे. यानें आपल्या नांवानें उदयपुर ( ग्वाल्हेर राज्यांतील ) नगर बसविलें. त्या यपुरांतून परमारांचे पुष्कळ शिलालेख मिळाले आहेत. हाहि विद्यानुरागी होता. भोजाच्या पाठशाळेच्या खांबावर नरवर्म्याचे नागबंधांत संस्कृतांतील वर्ण व नाम आणि धातु यांचे प्रत्यय दिले आहेत. ती योजना याची आहे. त्याबरोबर याच्या नांवाचे श्लोकहि खोदलेले आहेत. असेंच उज्जयनीस महाकालमंदिराच्या मागें व उनगांवीं याच्या नांवाचे श्लोक खोदलेले आहेत.

याला लक्ष्मदेव व नरवर्मा असे दोन पुत्र व श्यामळदेवी नांवाची एक मुलगी होती, असे शिलालेखावरून दिसतें. श्यामळदेवीचें लग्न मेवाडांतील गुहिलवंशी विजयसिंहाशीं झालें होतें.

उदयपुर येथें मिळालेल्या एका शिलालेखांत वि. सं. ११९६–शा. श. ९८१ (स. १०५९) मध्यें हा राजा झाला असें म्हटलें आहे ( एपि. इंडि. भा. ५ चें परिशिष्ट १ नं. ६८ व टीप १). हें अशक्य नाहीं, पण याबद्दल संशय आहे. याच्या वेळचे आतांपर्यंत दोन शिलालेख मिळाले आहेत. त्यांपैकीं ग्वाल्हेर राज्यांतील उदयपुर येथें एक वि. सं. ११३७ ( स. १०८० ) मधील व दुसरा झालरापाटण ( राजपुताना ) येथें वि. सं. ११४३ मधील.

भाटांच्या ख्यातामध्यें याचा पुत्र जगदेव याची एक सुंदर कथा आढळते. घरांतील द्वेषामुळें तो गुजराथेंतील ( सिद्धराज ) जयसिंहाकडे गेला व तेथें शौर्य व स्वामिभक्ति यांच्या जोरावर त्यानें जहागीर मिळविली. उदयादित्यानें आपल्या मागें यालाच राज्य दिलें वगैरे. यांत कांहीं भाग कविकल्पनेंतील असला तरी एवढें खरें कीं, या नांवाचा पुरुष माळव्याच्या परमारांत झाला होता हें निश्चित. माळव्याचा परमार राजा अर्जुनवर्मा यानें अमरुशतकावर रसिकसंजीवनी नांवाची टीका लिहिली आहे. त्यांत जगद्देव किंवा जगदेव यासंबंधीं एक श्लोक उद्धृत करून त्याला तो आपला पूर्वज होता असें म्हणतो. बार्नेटनें आपल्या क्रॉनॉलजींत याच्यानंतर लक्ष्मदेव गादीवर आला असें म्हटलें आहे ( पा. १९२ ).

याचा एक शत्रु कर्नाटक राजा होता. यानें बंगालपासून अफगाणिस्थानपर्यंत स्वाऱ्या केल्या होत्या व जय मिळविले होते, असें याच्या जयपूरच्या लेखावरून सिद्ध होतें. हा एक भोजाचा नातलग असावा.

**उदंडिन् अथवा उदंडनाथ**--भवभूतीनंतर विशेष नांव घेण्यासारखें उदण्डिन्चें 'मल्लिकामारुत' हें एकच प्रकरण लिहिण्यांत आलें आहे. 'मल्लिकामारुत' या नाटकाच्या कर्त्याचें नांव त्याचा टीकाकार जो रंगनाथदंडी यानें निर्दिष्ट केलें आहे. हा नाटककार व सुप्रसिद्ध साहित्यकार दंडी, हे दोघे एकच होते, असेंहि कांहीं लोक म्हणतात. वास्तविक पाहिलें तर तो कुक्कुटकोड येथील झामोरीन मानविक्रम याच्या दरबारीं पंडित होऊन गेला; व त्याच्याच विनंतीवरून प्रस्तुत नाटक लिहिण्यांत आलें होतें.

'मल्लिकामारुत' नाटकाचे दहा अंक आहेत. त्यांत विद्याधर राजाची कन्या मल्लिका हिचा कुंतल राजपुत्र मारुत याच्याशीं विवाह कसा घडून आला, ही कथा वर्णिली आहे. प्रथम सिंहल राजा मल्लिकेस मागणी घालतो व त्यामुळें मारुताचें मन खिन्न होतें. मारुताचा मित्र कलकंठ हाहि आपली प्रियतमा रमयंतिका हिच्या प्राप्तीच्या बाबतींत तसाच खिन्न असतो. अशा स्थितींत या दोघांनाहि आपापल्या प्रियतमेस मदांध हत्तीच्या तडाख्यांतून सोडविण्याचा प्रसंग येतो. या हत्तीच्या झटापटींत कलकंठ हा गतप्राण झाला असें कळतें आणि म्हणून मारुत आत्महत्या करण्यास उद्युक्त होतो. पण ऐन वेळीं कलकंठ प्रकट होऊन तसें करण्यापासून मारुतास परावृत्त करतो. पुढें कांहीं काळानें मल्लिकेस एक राक्षस घेऊन जातो व मारुत तिला त्याच्यापासून सोडवून आणतो; व ज्या अर्थी तीं व सिंहल राजा यांचा विवाह होण्याचें घाटत असतें त्या अर्थी मारुत तिला घेऊन पळून जातो. मल्लिकेस फिरून एक राक्षस घेऊन जातो व त्यामुळें मारुतास वेड लागतें. शेवटीं सर्व अडचणी नाहींशा होऊन दोन्हीहि जोडप्यांच्या मनासारखी स्थिति घडून येते, असें दाखविलें आहे.

**उदाजी पवार**—मलठणचा पाटील संभाजी पवार याचा हा मुलगा. संभाजी पवार हा शिवाजीच्या वेळीं मलठण येथें होता. हा सध्यांच्या धारच्या पवारांचा मूळ पुरुष होय. पवार हा परमार शब्दाचा अपभ्रंश आहे.

औरंगजेबाच्या विरुद्ध रजपुतांस मराठ्यांनीं मदत केली, त्या वेळीं स.१६९८ मध्यें यानें माळव्यांत शिरून मांडवगडास तळ दिल्याचा उल्लेख सांपडतो. तेव्हांपासून याचा माळव्याकडे राबता सुरू झाला. स. १७०९ मध्यें यानें मांडवगड काबीज केलें. स. १७१८ सालीं हा बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस गेला होता.

हा बाजीरावाचा लहानपणापासून मित्र होता. स. १७२४ मध्यें यानें आपलें ठाणें धार येथें बसविलें. पुढें हा बाजीरावास डोईजड झाला.

हे थोरले बाजीराव बल्लाळ पेशवे यांचे दिवाण म्हणून काम करीत होते, असें स. १७२८।२९ चे कांहीं कागदपत्र छापले आहेत त्यांवरून ठरतें (धारसंस्थानचा इतिहास २, पा. ३०). प्रथम हे माळव्यांत आले, आणि मराठ्यांचा अंमल माळवा व त्याच्याहि पलीकडे पोंचविण्याचा धाडसी उद्योग यांनींच यशस्वी केला. सोरठ, काठेवाड, बागड, बुंदीकोट व बुंदेलखंड हे प्रांतहि यांनीं जिंकले असून तेथील चौथाई-सरदेशमुखीचा अंमल होण्याविषयीं लिहिलेलीं ताकीदपत्रें उपलब्ध आहेत. त्यावरून स. १७२८।२९ च्या सुमारास उत्तरेकडील राजकारणांत यांचें केवढें स्थान होतें हें चांगलें ध्यानांत येतें. एवढा पसारा आवरण्यास कठीण म्हणूनच स. १७२८ च्या मे महिन्याच्या पूर्वी मल्हाररावांची व यांची उत्तरेकडे नेमणूक झाली.

माळवा व गुजराथ या ठिकाणीं मराठ्यांचा जम बसविणारा मुख्य इसम उदाजीच होय, असें स. १७२६ मध्यें शाहूनें ठरवून दिलेल्या सहा कलमी तहावरून दिसून येतें. १७२८ मध्यें बाजीरावाचें व याचें वांकडें आलें व याला कैद करण्यांत आलें. पुढें कैदेंतून सुटल्यावर यानें मांडवगड काबीज केलें.

डभईच्या लढाईंत हा बाजीरावाच्या विरुद्ध म्हणजे दाभाड्याकडून हजर होता.

पुढें मांडवघाटावरील तिरलाच्या लढाईंत यानें विशेष पराक्रम गाजवला (ता.१२-१०-१७३१).

बढवाणीचा ठाकूर अनूपसिंग मराठ्यांस सामील झाला होता. त्याच्या मुलखास उपद्रव देऊं नये, असें आज्ञापत्र शाहूनें स. १७३५ मध्यें यास व मल्हारराव होळकर यास काढलें होतें (शा. रो. २०२ व २४१).

बाजीरावानें याला माळवा व गुजराथचा अर्धा मोकासा दिला. त्या सनदेंत 'आमची सर्व इमारत तुम्हावरच आहे. येविसी आपलें समाधान असो देणें.' असें शब्द आहेत (मं. ८.१-२, पा. ३८-३९).

स. १७३६ मध्यें सिद्दीवरील मोहिमेस जाण्याकरितां शाहूमहाराजांनीं यास बोलावलें आहे.

सिद्दी अंबर अफवानी याच्याशीं लढाई करून त्याला रायगडाखालीं वाडीपाचाड येथें (ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र, लेखांक २७८) यानें ठार मारलें व गोवळकोंड्यास वेढा दिला (स. १७३६ आक्टोबर). यानंतर याचा भाऊ आनंदराव पवार धारचा अधिकारी झाला (स. १७३६).

हे फार शूर असल्यानें ' जिधर उदा उधर खुदा ' अशी म्हण तिकडे होती. मुद्रा–' श्रीशिवचरणीं दृढभाव । संभाजीसुत उदाजी पवारराव ।'. याचा मृत्यु मलठण येथें झाला. स. १७६० ( ? ).

**उदाजी पडवळ**—संभाजी-पुत्र शिवाजीच्या वेळीं सागरगड बंदरावरचा अधिकारी होता ( राजवाडे प्रस्तावना–१५४ ).

**उदाराम**—हा खानखनान, जाधवराव यांचेबरोबर शहाजहानला मिळाला, परंतु राजपुताऱ्यांतील दोन्हीहि स्वाऱ्यांत यश न आल्यामुळें त्यांनीं शहाजानचा पक्ष सोडून बादशहाची नोकरी पत्करिली. यामुळें शहाजानास बादशहाची क्षमा मागावी लागली.

उद्धवराव, जगजीवनराव, रायबागन वगैरेच्या घराण्यास राजे उदाराम अशी शहाजहाननें पदवी दिली होती ( मु. रि. भाग २ रा, पृ. १८१ ).

**उदेपुरी गोसावी**—उदेपुरी गोसावी हा साताऱ्याच्या बनसीगीर गोसाव्याचा चेला होता. ह्या मठाचे महंत फार श्रीमंत असून सर्व मराठी संस्थानांत सावकारी करीत. त्याचप्रमाणें उदेपुरी हा नागपुरास आला. सावकारी करतां करतां हा वकिली करूं लागला, व पुढें कलकत्तेकर इंग्रज व भोंसले यांचेमध्यें सर्व महत्त्वाच्या उलाढाली याचे मार्फत होऊं लागल्या.

लॉर्ड क्लाइव्हनें चौथाईच्या रकमेचा निकाल करण्यासाठीं मीर झैनुल् आबिदीन नांवाचा आपला वकील नागपुरास जानोजीकडे पाठविली. तेव्हां जानोजीनेंहि उदेपुरी गोसाव्यास आपला वकील म्हणून कलकत्त्यास पाठविलें.

चौथाईच्या प्रश्नाबद्दल व ओरिसाच्या प्रश्नाबद्दल, जानोजीनें सर्व हवाला उदेपुरीवर दिला.

फेब्रु.स.१७६८ मध्यें गव्हर्नरानें जानोजीस कळविलें कीं, ओरिसाप्रांत तुम्ही खालीं करून आम्हांस द्याल तरच आम्ही चौथाईची रक्कम देऊं, नाहीं तर देणार नाहीं. जानोजीस अर्थातच हें कबूल झालें नाहीं. त्यानें आपल्या नाकबुलीचें पत्र गव्हर्नरास पाठवून ' आम्ही आतां बंगाल्यांत लष्कर पाठवूं ' अशी धमकी दिली; व उदेपुरी गोसावी यास परत बोलावून दुसरा वकील लाला आनंदरूप नांवाचा पाठविला.

उदेपुरीचा मुलगा गणेश संभाजीकडे कटक येथें होता.

उदेपुरीस दोन चेले असून त्यांस तो पुत्राप्रमाणें वागवीत असे. त्यांपैकीं एका मुलाची एक राख ठेवलेली होती. एकदां रात्रीं तो तिच्या घरीं गेला असतां ती त्यास मरून पडलेली सांपडली. त्यावरून त्या मुलावरच खुनाचा आरोप ठेवून त्यास पकडण्यासाठीं मुधोजीनें शिपाई पाठविले. त्या गर्दीत ते दोघेहि मुलगे मारले गेले. त्यांतच उदेपुरीसहि धाक दाखवून राजाचे पन्नास लाखांचे रोखे उदेपुरीकडून जबरदस्तीनें काढून घेतले. तेव्हांपासून उदेपुरी अगदीं गरीब झाला व नागपुरास निघून गेला ( ना. प्रां. इ. ).

उदेपुरी हा रांडा ठेवतो, अशा तक्रारी नागपुराहून त्याचा गुरु बनसीराम याकडे साताऱ्यास गेल्या होत्या ( मंडळांतील अ. प्र. पत्रें नं. ६८४१–६८७५–६८७८ ).

**उदेपुरी बेगम**–औरंगजेब बादशहाची एक बायको. कोणी म्हणतात कीं, ती रजपूत असून उदेपूरच्या शिसोदिया घराण्यांतील होती. औरंगजेबाचा समकालीन प्रसिद्ध व्हेनेशियन प्रवासी मनुची हा सांगतो कीं, ही दाराच्या जनानखान्यांतील एक जॉर्जियन बटीक असून त्याच्या वधानंतर औरंगजेबाची रखेली होऊन राहिली ( आयव्हिन, स्टोरिया डो मोगोर १, ३६१, २, १०७ ).

औरंगजेबाची हिच्यावर फार मर्जी असे. हिला मद्यप्राशनाची मोकळीक दिली होती. औरंगजेबाच्या मृत्युसमयीं उदेपुरी सारखी त्याच्या उशाशीं रडत बसली होती. एकदां उदेपूरच्या राजाशीं युद्ध चालू असतां रजपुतांनीं हिला पळवून नेली होती, परंतु लवकरच परत आणून दिली.

औरंगजेबाच्या मृत्युसमयीं हिनें स्वतःला जाळून घेण्याची इच्छा दर्शविली. त्यावरून टॉड कल्पना करितो कीं, ही रजपूत असावी ( ॲनल्स ऑफ मेवार, प्र. १३ टीप ).


पण मुसलमान झालेल्या रजपूत स्त्रियांना मुसलमानी धर्माप्रमाणें मूठमाती देत, जाळीत नसत. तेव्हां ती जाळून घेणार होती ह्यावरून ती रजपूत ठरत नाहीं ( सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब १, प्र. ४ ). हिच्यापासून औरंगजेबास कामबक्ष नांवाचा मुलगा झाला (७ मार्च १६६७). त्याच्यावर औरंगजेबाचें फार प्रेम होतें. ही जून स. १७०७ मध्यें ग्वाल्हेर येथें मृत्यु पावली.

**उद्गीथाचार्य**—यानें ऋग्वेदावर भाष्य लिहिलें. त्यापैकीं कांहीं उपलब्ध आहे.

**उद्धव गोसावी**—स. ( १६०४-१६९३. ) श्रीसमर्थ रामदासस्वामींचे पहिले शिष्य. यांजविषयींची हकीकत अशीः टाकळी येथें रामदासस्वामी त्रयोदशाक्षरी मंत्राचें पुरश्चरण करीत असत. ते एकदां असेच गंगातीरीं बसले असतां शेजारच्या दशकपंचक गांवांतील सदाशिवपंत दशपुत्रे नांवाचा पुरुष निवर्तला व त्याचें दहन करण्यास सर्व मंडळी

नदीतीरीं आली होती. मृताची पत्नी उमाबाईहि सहगमनाच्या इच्छेनें तेथें आली होती. तिचें लक्ष रामदासस्वामींकडे गेलें व त्यांना तिनें नमस्कार केला. समर्थांनीं 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' म्हणून आशीर्वाद दिला. बाईस आश्चर्य वाटलें व ती तशीच उभी राहिली. तेव्हां समर्थांनीं कारण विचारतांच तिनें सांगितलें, "महाराज, आपण म्हणतां तें सत्य होवो, पण माझा पति तर कालच मृत झालेला आहे व मी आज सहगमनासाठीं आलें आहें." त्यावर समर्थ उठले व त्या जागीं जाऊन प्रेतावरून त्यांनीं हात फिरविला व जे पळत सुटले ते दिसेनासे झाले. इकडे सदाशिवपंत खडखडीत जागा झाला. सदाशिवपंताची इच्छा कीं ज्यांनीं मला देहदान दिलें त्यांस मला भेटवा. त्याप्रमाणें त्यास दुसरे दिवशीं समर्थ भेटले. भेटींत, पहिला मुलगा समर्थांना देण्याचे ठरलें. तोच हा उद्धव होय. उद्धव मोठा झाल्यावर तो टाकळीसच राहूं लागला. तेथें समर्थांनीं यास मठ बांधून दिला ( रामदासच. ).

**उद्धव चिद्घन**—यांपैकीं उद्धव हें याचें व चिद्घन हें गुरूचें नांव होय. पण अशा जोड नांवानें याची प्रसिद्धी आहे. याचें उपनांव कोकिळ. हा मोगलाईंत आंबेजोगाईजवळ असणाऱ्या धारूरचा राहणारा. हा चैतन्यसांप्रदायांतील एका परंपरेंत येतो. म्हणजे तुकाराम महाराज व हा हे एकाच चैतन्यसांप्रदायांतील होत. खालीलप्रमाणें याची गुरुपरंपरा आहेः




या परंपरेपैकीं अनेक पुरुषांनीं मराठींत ग्रंथरचना केली आहे. यांपैकीं याचा गुरुबंधु राघवस्वामी यानें शके १६११ मध्यें संदेहहरण नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ तयार केला आहे. या ग्रंथाच्या समाप्तीनंतर उद्धवास चिद्घनाचा अनुग्रह झाला असें याच परंपरेंतल्या माधवदास कवीनें आपल्या 'अलक्षविधान' ग्रंथांत सांगितलें आहे. म्हणजे शके १६११ नंतर यास गुरूपदेश झाला असें होतें. माधवदासानें याच्या कीर्तनाच्या लौकिकाचेंहि वर्णन केलें आहे. राजवाडे यांनीं ग्रंथमालेंत निश्चित केलेला कालहि या कालाशीं जमतो.

याची उपलब्ध सर्व कविता काव्यसंग्रहांत छापली आहे. याची छापलेली कविता विविध वृत्तांत आहे. याचें अनुभवशतक अनेक वृत्तांत रचलेलें आहे. गीतार्थमंजरी सवाईवृत्तांत आहे. याचा शुकरंभासंवाद दिंडीवृत्तांत आहे. नागनाथ व त्याचे शिष्य, हेगराज, बहिरंभट, बहिरापिसा यांचीं चरित्रें, तसेंच मृत्युंजय, गोराकुंभार हीं यानें दिंडीवृत्तांत गायिलीं आहेत. यानें श्रियाळचरित्र गाइलेलें आहे. पण याच्या 'भक्तकथामृतसार' या ग्रंथावरून याचें नांव प्रसिद्ध आहे. पण हा ग्रंथ अद्यापि उपलब्ध नाहीं. मात्र असा स्वतंत्र चरित्रात्मक ग्रंथ असतां, वर सांगितलेलीं सुटीं चरित्रें कवीनें पुनः लिहिलीं याचें कारण भक्ति हेंच दिसतें. याची समाधि पंढरपुरास असून मठ श्रीक्षेत्र काशी येथें आहे (सं. तृतीय सं. १८३७, पा. ११०-१११). यानें त्रिलोचनचरित्र हिंदीमध्यें लिहिलें आहे तें भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३८ च्या अहवालांत प्रसिद्ध झालें आहे ( पा. ११९-१२२ ). याचें रामदासचरित्रहि प्रसिद्ध आहे. यानें केलेल्या ग्रंथांची एक मोठी यादी सं. सूचीकारांनीं दिलेली आहे.

याची कविता अगदीं साधी परंतु भक्तिरसपूर्ण आहे. भाषा अत्यंत सुलभ असून, तींत परकीय भाषेंतले शब्द फारसे आढळत नाहींत. कवीचा कटाक्ष केवळ अर्थबोधाकडेच विशेष असल्यामुळें, एका प्रेमळ सत्पुरुषाचे उद्गार या दृष्टीनें पाहिल्यास कवि म्हणूनहि याची योग्यता मोठी आहे (महाराष्ट्र कविचरित्र, भाग ३, पृ.११९-१२०).

**उद्धव ( चैतन्य )**—उद्धव चिद्घनाचें नामांतर.

**उद्धव मल्हार**—मल्हार त्रिंबक काशीस गेल्यावर हा वयांत आला आणि व्यवहाराकरितां सुरजी अंजनगांवाहून व्याडी मांडव्यास येऊन राहिला. याचा मुलगा उद्धवसुत यानें समर्थांचें ओंवीबद्ध चरित्र लिहिलें. हे पिता-पुत्र केशवाचे अनुग्रहित होते.

**२.** ( उद्बोधनाथ पाहा ).

**उद्धव मुल्हेरकर**—हा रामानुजसांप्रदायी कृष्णोपासक होता. मुल्हेर येथें याचें संस्थान आहे. याचा काल स. १५४०-१६००. याचे गुरु काशिराज. याचे ग्रंथः-उद्धवबोध, बोधरहस्य, संतमाळ, स्वरूपानुभव, पदें व अभंग ( सं. सू. ).

**उद्धव योगदेव**—स. १६९० मध्यें औरंगजेबानें येसूबाई व शाहू यांना रायगडावरून पकडून नेलें तेव्हां हा त्यांच्याबरोबर होता. शाहू कैदेत असतां त्याचा राजकीय कारभार हाच पाही ( म. रि. म. वि. ३, पृ. ३०१). याला राजाज्ञा अशी त्या वेळीं पदवी होती.

**उद्धवराव**—( स. १५९२-१६३२ ) हा 'उदाराम' घराण्याचा मूळ पुरुष होय. याचे वडिलांचें नांव 'रामाजीपंत' असें होतें. हा मूळचा वाशीमचा राहणारा. ऋ. दे. ब्रा. हा त्या वेळच्या रीतीप्रमाणें संस्कृत, फासी, अरबी वगैरे विद्येंत तरबेज होता. गरीबीमुळें व अंगच्या तरतरीमुळें हा दिल्लीस गेला. तेथें याच्या मामामार्फत याचा सरकारी कामांत प्रवेश होऊन, याची हुशारी अकबराचे ध्यानांत येऊन त्यानें यास वाढवीत वाढवीत अखेरीस पांच हजारांची मनसब दिली. लष्करी कामांतहि यानें फार बहादुरी दाखविली. त्यावरून अकबरानें वाशीम व माहूर हे दोन जिल्हे याचे ताब्यांत दिले व यास दक्षिणेंत पाठविलें. शहाजहानाचे वेळींहि यास वरील दोन्ही जिल्ह्यांतील देशमुखी वतन व कांहीं जहागिर मिळाली. यानें मोगल बादशहाची एकंदर ४० वर्षे नोकरी केली. याला एक मुलगा असून त्याचें नांव जगजीवनराव असें होतें. उद्धवरावाची सून म्हणजे जगजीवनरावाची बायको फार शूर होती. ( रायबागीण पाहा ).

याला अकबरानें ५२ महालांची देशमुखी व ५०० ची मनसब देऊन वाढविलें ( अनंतकविकृत भक्तरहस्य, शारदाश्रम हस्तलिखित ).

याला शहाजहाननें राजे उदाराम असा वंशपरंपरेनें किताब दिला होता.

स. १६३२ मध्यें आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी मरण पावला ( मं. त्रै. व. २·१ ते ४ ले. ४ ).

वरील आधार-पुस्तकांत 'रायबागन' उद्धवरावाची बायको होती असें म्हटलें आहे तें चूक आहे. ती याची बायको नसून त्याच्या मुलाची बायको म्हणजे याची सून होती ( मं. त्रै. व. ४, अं. १-४, पृ. ४९-५०).

शहाजहाननें जहांगीरविरुद्ध बंड केलें ( सं. १६२१-२२ ) तेव्हां याची त्याला मदत होती. जहांगीराविरुद्ध यानें आपल्या माहूरच्या किल्ल्यांत शहाजहानला आश्रय दिला होता. तेव्हां शहाजहान, मुमताजमहाल, पुत्र दारा, सुजा, औरंगजेब यांसह होता. हा भातोडीच्या लढाईत मोंगलांतर्फे लढत होता ( स. १६२४ ).

**उद्धवसुत**—याच्या पित्याचें नांव उद्धव. उद्धवाचा पिता मल्हार आणि मल्हार त्रिंबकाचा पुत्र. हा वऱ्हाडांतील सुरजी अंजनगांवचा राहणारा. गोत्र अगस्ति, कुलदैवत मल्हारीमार्तंड व तुळजापुरवासिनी. उद्धव व उद्धवसुत यांना केशवानें अनुग्रह दिला होता. यांनीं समर्थांचें ओंवीबद्ध चरित्र लिहिलें आहे. या चरित्रांत समर्थसंस्थानावर गंगाधरस्वामींची स्थापना होईपर्यंतचा कथाभाग आला आहे. यावरून हें चरित्र शके १६३२ नंतर पण १७०० चे आंत रचलें असावेंसें दिसतें. यांत शकमिति नाहीं व सर्व माहिती ऐकीव असावी, असें अन्तःप्रमाणावरून वाटतें.

**उद्बोधनाथ**—एक मराठी कवि. राशिनगांव. यजुर्वेदी वाजसनेयी ब्राह्मण. मूळ समग्र नांव उद्धव मल्हार ठिपसे. पुढें उद्बोध असें नांव घेतलें. शिष्य—केसरी शिर्वादन. यांचीं पदें आहेत ( सं. सू. ).

**उद्भटभट्ट**—हा काश्मिरी पंडित महाराज जयापीडाचा आश्रित होता. जयापीडाच्या दरबारांतील पंडितांचा हा सभापति होता. याचें दररोजचें वेतन एक लक्ष दीनार होतें असें राजतरङ्गिणींत वर्णन आढळतें ( स. ४ श्लो. ४९५). महाराज जयादित्य स. ७७९ पर्यंत राज्य करीत होते. जयापीडाच्या दुर्वर्तनामुळें शेवटीं त्याचा ब्राह्मणांनीं त्याग केला होता. त्यावरून हा प्रारंभीं त्याच्याजवळ असावा. म्हणजे स. ८०० च्या सुमाराचा होय. ध्वन्यालोककार आनंदवर्धनाचार्यांनीं याचा वारंवार उल्लेख केला आहे. पण यांनीं त्याच्या ध्वनिमताचा चांगलासा उल्लेख केलेला नाहीं. यावरून वरील कालाला दुजोरा मिळतो. यांनीं तीन ग्रंथ केले. १ भामहविवरण, २ कुमारसंभवकाव्य, ३ अलंकारसारसंग्रह. याशिवाय भारताच्या नाट्यशास्त्रावर यानें टीका लिहिली होती असें संगीतरत्नाकरांतील 'व्याख्यातारो भारतीये लोल्लटोद्भटशंकुकाः' या वाक्यावरून दिसतें. याच्या काव्यालंकारसारसंग्रह ग्रंथावर कोंकणांतील इन्दुराज किंवा प्रतिहारेन्दुराज यानें टीका लिहिली आहे. यानें उद्भटालंकार नांवाचाहि एक ग्रंथ केलेला दिसतो. (काणेकृत साहित्यशास्त्राचा इतिहास, पा. १८९).

**उद्योतकर**—ह्यानें न्यायसूत्रावर 'न्यायवार्तिक' नांवाची एक टीका लिहिली आहे.

सुबंधूनें आपल्या वासवदत्तेमध्यें उद्योतकराचा निर्देश केला आहे ( न्यायस्थितिमिवोद्योतकरस्वरूपां बौद्धसंगतिमिवालङ्कारभूषिताम्...वासवदत्तां ददर्श पृ० २३५ Hall's ed. )

उलट बाणानें आपल्या 'हर्षचरितां'त वासवदत्तेचा सर्वोत्कृष्ट काव्य म्हणून उल्लेख केला आहे ( उच्छ्वास १ ). हर्षचरितावरून बाण हा राजा हर्ष अथवा हर्षवर्धन याचे दरबारी होता, असें दिसून येतें. ग्रंथांत स्वतःचा उल्लेख करतांना योजलेल्या विशिष्ट पद्धतीवरून बाण स्वतः अगदीं तरुण असावा व त्याचा आश्रयदाता हा वयानें व अनुभवानें मोठा असावा, असें दिसून येतें. चिनी यात्रेकरू हुएन्संग हिंदुस्थानांत आला असतां हर्षवर्धन ठाणेश्वर येथें राज्य करीत होता ( स. ६२९-६४४ ). ह्यावरून असें दिसतें कीं, बाण हा स. ६३५ च्या सुमारास होऊन गेला असावा व हीच, उद्योतकराची शेवटची कालमर्यादा ठरवतां येईल.

'न्यायवार्तिक' या आपल्या ग्रंथांत उद्योतकरानें 'वादविधि' नांवाच्या एका तर्कशास्त्रावरील ग्रंथाचा उल्लेख केला आहे. वादविधि हे धर्मकीर्तीच्या वादन्यायाचेंच दुसरें नांव असावें ( न्यायवार्तिक 1-33 pp. 121 A. S. B. ) उलटपक्षीं धर्मकीर्तीनें आपल्या न्यायबिंदूंत एका शास्त्राचा व शास्त्रकाराचा उल्लेख केला आहे. तें शास्त्र म्हणजे 'न्यायवार्त्तिक' व शास्त्रकार म्हणजे उद्योतकर असावा, असें दिसतें. तेव्हां असें सिद्ध होतें कीं, धर्मकीर्ति व उद्योतकर हे दोघेहि समकालीन होते; व ते स. ६३५ च्या सुमारास होऊन गेले.

उद्योतकरास भारद्वाज हें नांव त्याचा जन्म भारद्वाज गोत्रांत झाला असल्यामुळें पुढें मिळालें ( इति श्रीपरमर्षि भारद्वाजपाशुपताचार्य श्रीमदुद्योतकरकृतौ न्यायवार्त्तिके पञ्चमोध्यायः। ).

हा पाशुपत शैव पंथाचा आचार्य असल्याकारणानें यास पाशुपताचार्य असेंहि म्हणत असत.

याचा जन्म कोठें झाला हें नक्की माहित नाहीं. ठाणेश्वरापासून ४० मैलांवर यमुनानदीच्या पूर्व भागावर बसलेल्या स्रुघ्न या गांवाचाच फक्त त्याच्या ग्रंथांत उल्लेख आलेला आहे ( एष पन्थाः स्रुघ्नं गच्छति । न्यायवार्त्तिक १-३३ ). ठाणेश्वराहून स्रुघ्नं येथें जाण्यास एक मोठा रस्ता आहे. सतीशचंद्र विद्याभूषणांच्या मतें 'न्यायवार्त्तिक' लिहितांना उद्योतकर ठाणेश्वर येथें राहत होता. ठाणेश्वर येथील राजदरबारीं कधींकाळीं यास राजाश्रय असण्याचा संभव आहे.

दिङ्नाग, नागार्जुन व आपणापूर्वी होऊन गेलेल्या इतर बुद्ध तर्कज्ञांचीं मतें हाणून पाडणें हाच न्यायवार्त्तिक लिहितांना उद्योतकराचा उद्देश होता. ही गोष्ट न्यायवार्त्तिकेच्या सुरुवातीच्या ओळीवरूहि दिसून येतें. दिङ्नागाचा यानें आपल्या ग्रंथांत 'भदंत' असा उल्लेख केला आहे. तसेंच यानें नागार्जुन व वसुबंधु यांच्यावरहि टीका केली आहे (हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक पा. १२३-१२७ ).

**उद्योतकेसरी**—ओरिसाच्या केसरी घराण्यांतील एक राजा. याचे दोन लेख मिळाले आहेत. एक खंडागिरीच्या टेकड्यांतील व दुसरी ब्रह्मेश्वराच्या देवळांतील.

**उद्योतन**—हल्लीं अस्तित्वांत असलेल्या ८४ गच्छांची उत्पत्ति याचेपासूनच झाली. याचा ऋषभाची पूजा करण्याचा मानस होता. आपले मनोरथ पूर्ण करण्यासाठीं हा मालवक देशाहून शत्रुंजयाकडे जावयास निघाला, पण यात्रा पुरी झाली नाही तोंच वाटेंत यास मृत्यूनें गांठलें.

**उद्योतनसूरि**—जैनांच्या कथासाहित्य या ग्रंथांतील कांहीं भागांचा कर्ता. कथासाहित्य हा ग्रंथ स. ७७९ मध्यें पूर्ण झाला ( जिनविजय, S. S. V. 26 p. 180 ). यानें हरिगुप्त या जैन आचार्याचा पुष्कळ ठिकाणीं निर्देश केला आहे.

**उधळिमा**—यालाच उधरिपा असेंहि म्हणतात. हा जातीनें वैश्य होता. हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं एकाहत्तारावा सिद्ध होय. हा देवीकोट येथील राहणारा होता. हा कर्परिपा याचा शिष्य होय.

**उन्मत्तावंति उत्पल** ( स. ९३७-३९ )—हा काश्मीर येथील उत्पल घराण्यांतील शेवटचा राजा होय. पार्थ राजाचा पुत्र. यानें आपल्या प्रजेवर भयंकर जुलूम केला. उत्पल घराण्यांत हा जुलमी राजा म्हणून प्रसिद्ध आहे. स. ९३७ मध्यें आपल्या बापानंतर गादीवर आला. याची प्रजेशीं अन्यायाची वर्तणूक होती. हा स. ९३९ मध्यें मरण पावला ( स्मिथ पृ. ३८९ ).

**उपकोशा**—वररुचिनामक कवीची स्त्री. ही मोठी कवयित्री होती ( म्योर. इं. को. ).

**उपगुप्त**—हा अशोकाचा गुरु. याचा बाप गुप्त असून याचा जन्म बनारस अगर मथुरा येथें झाला असावा. बहुतेक यांचें वास्तव्य मथुरा येथें असे. ह्या ठिकाणीं यानें आपल्या पंथाचा एक मठ बांधिला ( स्मिथ पृ. १९९ ).

**उपगुप्ता**—ही माळव्याच्या गुप्त घराण्यापैकीं हर्षगुप्ताची मुलगी व ईश्वरवर्मन् मौखरीची पत्नी.

**उपनिषद्ब्रह्म**—संक्षेपशारिरकाचा टीकाकार.

**उपयादत्त होयसळ**—हा होयसळापैकीं एरेयंगचा पुत्र ( मृत्यु स. ११२२ ).

**उपवर्ष**—पाणिनी वगैरे याचे शिष्य, असें कथासारसागरांत लिहिलें आहे.

**उपसेन**—याला अश्वजित् असेंहि म्हणत. बुद्धदेवानें सारनाथ येथें याला प्रथम उपदेश केला. सारिपुत्र व मौद्गालायन यांनींहि याच्या सांगण्यावरून बुद्धदेवाकडे जाऊन दीक्षा घेतली.

**उपसेन वंगंतपुत्त**—हा सारिपुत्ताचा धाकटा भाऊ. सारिपुत्ताला जसें आईच्या नांवावरून सारिपुत्त म्हणत तसें याला बापाच्या नांवावरून वंगंतपुत्त म्हणत. तरुणपणीं वेदाभ्यास झाल्यावर हा भिक्षु झाला. उपसंपदेनंतर एकाच वर्षानें संघाची अभिवृद्धि करण्याच्या हेतूनें दुसऱ्या एका तरुणाला प्रव्रज्या दिली. पण ही गोष्ट गौतमाला कळतांच त्यानें या गोष्टीचा निषेध केला व ' भिक्षु होऊन दहा वर्षे झाल्याशिवाय आपल्या हाताखालीं दुसऱ्याला उपसंपदा देऊं नये ' असा नियम केला. ( महावग्ग, ओल्डेनबर्ग एडिशन, पृ. ५९). याचा परिणाम याच्यावर चांगलाच झाला. यानें पुढें दहा वर्षे व्रतपूर्वक घालवून अनेक शिष्य केले व सर्वांना साधें व नियमानें वागण्याचें उत्तम वळण घालून दिलें. यामुळें गौतमालाहि हा अत्यंत प्रिय झाला. सलायतनसंयुत्ताच्या दुसऱ्या पण्णासकाच्या दुसऱ्या वग्गाच्या सातव्या सुत्तांत याच्या अंतकाळची गोष्ट आली आहे. याला सर्पदंश झाला असतांहि हा बिलकुल विचलित न होतां यानें अत्यंत शांतपणें देह ठेवल्याचें तेथें वर्णन आहे. म्हणून प्रसाद उत्पन्न करणाऱ्या भिक्षूंत याला अग्रस्थान मिळालें आहे ( बौ. सं. प., पा. १९० ).

**उपाध्ये**—( मनभट पाहा ).

**उपानहपा**—( पनहपा पाहा ).

**उपालि**—हा कपिलवस्तु येथें राहणारा एक न्हावी होता. हा अनिरुद्ध वगैरे राजपुत्रांबरोबर बुद्धदेवाकडे गेला. बुद्धदेवानें याला सर्वांआधीं प्रव्रज्या दिली, व आपला शिष्य केला. महात्मा बुद्धदेव निर्वाणाला गेल्यावर हा विनयपिटकाचा पहिला प्रवक्ता आचार्य झाला. बुद्धदेवानें याला प्रव्रज्या दिल्यावर राजकुमारांना मोठेपणाचा गर्व नाहींसा व्हावा म्हणून याला नमस्कार करण्याची आज्ञा दिली होती.

पहिल्या संगीत महाकाश्यपानें ह्यालाच विचारून विनयाचा संग्रह केला, असें विनयअट्ठकथेंत म्हटलें आहे ( बौ. सं. प. पा. २०० ).

**उपेन्द्र परमार**—( कृष्णराज परमार पाहा ).

**उपेन्द्रभान**—ओरिसा प्रांतांतील गमसर संस्थानचा राजा. यानें शब्दमाला व गीताभिमान असे दोन कोश केले ( स. १५०० ).

**उमर खय्याम**—एक सुप्रसिद्ध फार्सी कवि. याचें पूर्ण नांव घियासुद्दीन अबुल्फत्ह उमर बिन इब्राहिम अल्खय्यामी. हा इराण देशांतील खुरासान प्रान्तांतील निशापूरचा राहणारा. खुरासान या शब्दाचा अर्थ ' सूर्याचा प्रदेश ' असा आहे. सृष्टिसौंदर्याबद्दल या देशाची प्रसिद्धी असून हा कविहि सौंदर्याचा उपासक म्हणून प्रसिद्ध आहे. निशापूर येथें याचा जन्म अकराव्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला. याच्या वेळीं खुरासान प्रान्तावर सल्जुक वंशांतील शेवटचा प्रतापी सुलतान मलिकशाह याचें राज्य असून आक्सस नदीपासून भूमध्यसमुद्रापर्यंत त्याची सार्वभौम-सत्ता पसरलेली होती. यानें आपल्या एका रुबाईत या शहाचें पुढील वर्णन केलें आहे:-' आणि तुझा घोडा सोन्याचे नाल मारलेले आपले पाय जिथें जिथें टाकतो, तिथें तिथें भरजरी गालिचा घातल्याप्रमाणें भूमि झळकते !' ( व्हिनफील्डचें भाषान्तर ). याच्या कारकीर्दीत वैभव, व्यापार आणि विद्वत्ता या तिहींचें निशापूर हें केन्द्र होऊन बसलें होतें. धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान आणि शास्त्रें यांचें शिक्षण देणारीं सहा विद्यालयें तेथें होतीं. मलिकशहाचा विद्याप्रिय मंत्री निजामुल्मुल्क यानें तिथें एक वेधशाळाहि उभारली होती. निजामाच्या नांवावर मोडणाऱ्या ' वसाया ' नामक प्रबंधांत पुढील माहिती आली आहे: ' निजामुल्मुल्क, इस्माईली पंथाचा अत्याचारी पुढारी हसन-इब्न-सब्बाह व हा हे सहाध्यायी होते. आणि तिघांपैकीं ज्याचा भाग्योदय होईल त्यानें इतरांचा परामर्श घ्यावा, असा त्यांचा आपसांत करार असल्यामुळें निजामाकडून मिळणाऱ्या देणगीवर उमर कालक्रमणा करीत असे.'

हा जन्मानें इराणी पण जातीनें अरब होता. अल्खय्यामी हें एका अरबी जमातीचें नांव होतें असें म्हणतात. खय्याम या शब्दाचा अर्थ 'तंबू शिवणारा' असा होतो. पण हा स्वतः तंबू शिवून उपजीविका करीत असेल असें दिसत नाहीं. यानें मोवराफिक नांवाच्या एका विख्यात गुरूपाशीं शिक्षण घेतलें. धर्मशास्त्र, बीजगणित, भूमिति, ज्योतिष, वैद्यक इत्यादि अनेक शास्त्रांचें यानें अध्ययन केलें होतें; आणि विद्यार्थ्यांना शिक्षणहि देण्याचा याचा क्रम असे. अरबी व फार्सी या दोन भाषांत मिळून यानें एकंदर दहा ग्रंथ केले. त्यांपैकीं तीन सृष्टिज्ञानपर, चार गणितावर, व दोन अध्यात्मावर असून, एका ग्रंथांत यानें आपल्या वेळोवेळीं लिहिलेल्या त्रुटित रुबायांचा संग्रह केलेला होता. पण यांपैकीं आज याचे फक्त तीनच ग्रंथ उपलब्ध आहेत. ' अल्हकीम ' म्हणजे शास्त्रज्ञ म्हणून

याची कीर्ति सर्व इराणभर पसरली व स. १०७४ सालीं मलिकशहानें याला राजज्योतिषी नेमून याच्या विद्वत्तेचा गौरव केला. या जागेवर असतां यानें 'झिज़-इ-मलिक्-शाही' हा ज्योतिषकोष्टकांचा ग्रंथ रचून, सात ज्योतिर्विदांच्या साहाय्यानें जुन्या फार्सी पंचांगांत सुधारणा केली. याची नवीन जलाली कालगणना लोकप्रिय न होतां जुनें हिजरी पंचांगच प्रचारांत राहिलेलें आहे. तथापि याचा प्रयत्न शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. युक्लिडच्या भूमितींतील कठीण स्थळांवरील याचा ग्रंथ लीडन ग्रंथालयांत ठेवलेला असून याच्या बीजगणितावरील ग्रंथाचें वोपेकनें फ्रेंचमध्यें भाषांतर केलें. हा ग्रंथ अनेक शतकें प्रमाण मानला जात असे. याच ग्रंथांत अबू ताहिर नामक कोणा गृहस्थाचा आपला आश्रयदाता म्हणून यानें उल्लेख केलेला आहे. कदाचित् निजामुल्मुल्काच्या खुनानंतर यानें ताहिराचा आश्रय घेतला असावा. याला शंभर वर्षांचें आयुष्य लाभलें होतें.

याच्या विद्वत्तेविषयीं अनेक फार्सी लेखकांनीं आदरपूर्वक लिहिलें असलें तरी याच्या धार्मिक मतांविषयीं त्यांना तिटकारा असे. सुफीपंथाचे लोक याच्या कवितांत आपलीं मतें प्रतिपादन केलीं आहेत असें भासवितात. पण तें पूर्णपणें बरोबर नाहीं.

हा मदिरासक्त, एकान्तप्रिय, व आळशी प्रकृतीचा असे. सध्यां जरी जगांत कवि म्हणून याची प्रसिद्धी असली तरी हा जिवंत असतां याला कवि म्हणून कोणीहि समजत नसत. हा मेल्यानंतरहि फिट्जेरल्डच्या अनुवादाच्या रूपानें पुनरुज्जीवन होईपर्यंत याला इराणांतहि फारसे चाहते नव्हते. पण आतां मात्र याच्या रुबाया सुखवादी संशयात्म्याचें बायबल होऊन बसल्या आहेत. यानें आत्म्याच्या मरणोत्तर स्थितीविषयीं निराशा प्रगट केली आहे. याचा मृत्यु स. ११२३।२४ सालीं शंभर वर्षे आयुष्य भोगल्यावर झाला (रत्नाकर, ग. त्र्यं. मालखोडकरांच्या लेखावरून).

**उमरखान**—माळव्याच्या घोरी घराण्यांतील जो हुशंगशाहा त्याचा हा एक पुत्र होय.

२. दिल्लीच्या अलाउद्दीन खल्जीचा मुलगा.

**उमर बिन खशब**—मुहम्मद पैगंबराचा जिवलग स्नेही व सासरा. हा अबू बकर सादिकनंतर दुसरा खलीप झाला. यानें सिरिया आणि फीनशीआ जिंकून मोठ्या निकराची लढाई दिली; आणि स. ६३७ मध्यें जेरुशलेम घेतलें. याच्या सेनापतीनें इराण आणि इजिप्त पादाक्रान्त करून मुहम्मदाचे अनुयायी वाढविले. याच्या सैन्यानें अलेक्झांड्रिया काबीज केल्यावर यानें तांबडा समुद्र व नाईल नदी यांमध्यें कालवा सुरू केला. यालाच प्रथम अमीर-अल-मोमीनीन ही खलिपांना असलेली पदवी मिळाली. स. ६४४ मध्यें एका इराणी गुलामानें हा सकाळचा नमाज पढत असतां याचा खून केला.

**उमरशेख मीर्झा**—दिल्लीचा पहिला मोगल बादशहा बाबर याचा पुत्र होय. याच्या पित्याचें नांव अबसुईद मीर्झा. यास अकरा भाऊ होते. त्यांपैकीं हा चवथा होय. तैमूरलंगानें जिंकलेला विस्तृत प्रदेश अबसुईदच्या हाताखालीं होता. त्याच्या त्या मुलखाच्या अकरा वांटण्या झाल्या. याला प्रथम काबूलचें राज्य मिळालें. परंतु तें जाऊन पुढें फरघाना प्रांत मिळाला (मु. रि. २·२).

**उमराबगीर गोसावी**—हा सुजाउद्दौल्याचा एक सरदार. यानें विश्वासराव, तुकोजी शिंदे, संताजी वाघ व यशवंतराव पवार या पानपतच्या युद्धांत पडलेल्या योध्यांचे मुडदे तीन लक्ष रुपयांस सोडवून त्यांस ब्राह्मणांकडून विधियुक्त अग्निसंस्कार केला (म. रि. म. ३, पा. २०५). उमराबगीर व अनूपगीर ऊर्फ हिंमतगीर यांच्या पानपतयुद्धापासूनच्या हालचाली लक्षांत घेतल्या म्हणजे यांचा कारस्थानीपणा व परस्पर संबंध उलगडतात (हिंमतबहादर गोसावी पाहा).

**उमाजी पंडित**—शिवाजीचा शिक्षक. संभाजी दिलेरखानाकडे गेल्यावर हा बिदनूरकडे वकील होता, असें प्रभात नांवाच्या ९१ कलमी बखरीवरून दिसतें.

**उमाजी संभाजी भोसले**—हा शहाजी राजाचा नातू. याचा जन्म तारीख २५-११-१६५४ सालीं झाला असें जेधें शकावलींत दिलें आहे. याला सुरतसिंग नांवाचा एक वडील भाऊ होता.

**उमादेवी**—ही कूपक घराण्यांतील असून यदुघराण्यांतल्या जयसिंह राजाशीं हिचें लग्न झालें होतें. ही आपल्या नवऱ्याबरोबर केरळ देशाचा राज्यकारभार पाहत असे (हिस्ट्री ऑफ केरळ).

**उमापति**—यानें विजयनगरच्या हरिहरदेव याच्या कारकीर्दीत 'पारिजातहरण' नांवाचें सत्यभामाकलहावर नाटक लिहिलें.

**उमापतिधर**—हा संस्कृतज्ञ पंडित बंगालचा राजा लक्ष्मणसेन याचा आश्रित होता.

**उमापति शिवाचार्य**—शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांतील तामीळ ग्रंथकार. तामीळांतील चार तत्त्वज्ञानी आचार्यांपैकीं एक. हा ब्राह्मण असून दिगंबरमच्या देवळांतील पुजारी होता. याचा गुरु 'मरई गणसंबंध' (ब्राह्मणेतर) होता. यानें कोदिकवि हा ग्रंथ लिहिला.

शके १२३५ सालीं 'अनि' उत्सवाच्या प्रसंगीं यानें जे वादविवाद केले ते 'शंकरपनिकरणं' या ग्रंथांत ग्रथित केलेले आहेत. याचे ग्रंथ पुष्करागमावर संस्कृत भाष्य, 'फोईर पुराण,' दिगंबर देवळाचा इतिहास, शिवप्रकाशकं, व थिरु वाक्त्पयत वगैरे होत.

ईश्वर रूपी, अरूपी व रूपारूपी आहे. मल तीन प्रकारचे आहेतः १ अनवमल, २ कर्ममल, ३ मायामल. यांचे भागः १ ईश्वरस्वरूप, २ आत्म्याचें स्वरूप, ३ पाशस्वरूप, ४ अद्वल स्वरूप, ५ सद्गुरुस्वरूप, ६ मार्गदीपिका, ७ आत्मप्रकाश, ८ मोक्षमार्ग, ९ पंचाक्षरसत्य, १० जीवन्मुक्तलक्षण वगैरे होत, ही तत्त्वें यांनीं आपल्या ग्रंथांत प्रतिपादिलीं आहे.

**उमाबाई**—रामदासाचा शिष्य उद्धवगोसावी याची आई.

**उमाबाई दाभाडे**—( मृत्यु स. १७५३ ) खंडेराव दाभाडे यांची ही पत्नी. ही मोठी पराक्रमी व दक्ष होती. आपल्या मुलानें कांहीं तरी पराक्रम करावा म्हणून हिनें शिकस्त केली, परंतु उपयोग झाला नाहीं.

डभईच्या लढाईत हिचा पुत्र त्रिंबकराव हा बाजीराव पेशव्याशीं लढत असतां भावसिंगराव टोके याच्या बारगिरानें दगा करून जोडगोळीनें हत्तीवर ठार केला ( रा. खं. ३.१६६ ). शाहूनें तळेगांवीं जाऊन बाजीरावाला हिच्या पायावर घालून हिचा राग शांत केला ( रा. खं. ३.१६६ ). तेव्हां स्वतः बाजीरावानें हिची समजूत घातली ( दाभाडे बखर ). पुढें गायकवाडास आपले दुय्यम नेमून हिनें जातीनें कांहीं काळ गुजराथचा कारभार केला. शाहूला दाभाडे घराण्याबद्दल आपलेपणा वाटे व दाभाड्यांनाहि शाहूबद्दल पूज्यभाव होता. पण दाभाडे व पेशवे यांचें ठीक नव्हतें. अशा स्थितींत वरच्या हिंदुस्थानशीं दळणवळणाला सोयीचा गुजराथप्रांत ताब्यांत घेण्याच्या दृष्टीनें बाजीरावानें दाभाड्यांना गुजराथेंतून नाहींसें केलें. स. १७५० मध्यें हिच्यावर निजामाशीं संगनमत केल्याचा आरोप ठेवून पेशव्यांनीं गुजराथ आपणाकडे घेतली. अशा रीतीनें शाहूचाहि आधार गेलेला पाहून हिनें ताराबाईची भेट घेऊन पेशव्याविरुद्ध कारस्थान उभारलें. २० आक्टो. १७५० रोजीं हिनें आपला वकील पेशव्याकडे पाठविला, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां हिनें स्वतः आळंदीस पेशव्यांची भेट घेतली ( २२ नवंबर ) परंतु दाद लागेना, तेव्हां हिनें स.१७५१ मध्यें दमाजीस पेशव्यावर पाठविलें. युद्ध होऊन दमाजी गायकवाडाचा पुरा मोड झाला. ३० एप्रिल १७५१ रोजीं वेणेचा तह होऊन हिनें निरुपायानें गुजराथ पेशव्यास दिली.

१७५१ एप्रिल ते नवंबरपर्यंत ही पेशव्यांच्या कैदेंत होती. दाभाड्यांची इतर मंडळीहि पुण्यामध्यें कैदेंत होती. ती मंडळी १६ नवं. १७५१ मध्यें कैदेंतून पळाली. तेव्हां ही व हिची सून अंबिकाबाई यांना सिंहगडावर कैदेंत ठेवलें. सासूसुनांचेंहि बरें नव्हतें.

१७५२ फेब्रुवारी १४ रोजीं हिला पुण्यास आणलें. ५ एप्रिल १७५२ मध्यें अखेरचा तह झाला. त्यांत–गायकवाड पूर्ववत् दाभाड्यांची चाकरी करतील. दाभाड्यांनीं राज्यांत बखेडा करूं नये. रामराजाला अनुकूल होऊं नये. पेशव्यांचे विचारें चालावें. दाभाड्यास खर्चास दरमहा ५० हजार रुपये मिळतील. पूर्वीचे मोकासे यांच्याकडे चालतील, अशीं कलमें होतीं.

यानंतर बाईचा जप्त केलेला सरंजाम पेशव्यांनीं २ नवं. १७५२ मध्यें सोडला ( ना. सा. रा. ले. ६१ ) आणि दाभाड्यास वस्त्रें दिलीं. यापुढें पेशवे व दाभाडे यांचें चांगलें सूत होतें.

या बाईनें जातीनें अहमदाबाद ( गुजराथ) सर केल्याबद्दल शाहू महाराजांनीं हिच्या पायांत सोन्याचे तोडे घातले होते ( दाभाडे बखर, पृ. २९८ ).

हिचा मृत्यु २८ नवं. १७५३ रोजीं नडगेमोडीपाशीं डेरे देऊन राहिली होती तेथें झाला.

हिचा साग्र वृत्तांत वॉट्सनच्या हिस्ट्री ऑफ गुजराथ या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत सांपडेल.

**उमाबाई भोसले**—(उमा. वा) फलटणच्या निंबाळकर घराण्यांतील मालोजी नाईक २ रा याची ही मुलगी व मालोजी भोसल्याची बायको. हिला वणगोजी ऊर्फ जगपाळराव नांवाचा भाऊ होता. शहाजी व शरीफजी हीं हिचीं दोन मुलें होत. हिला माहेरचें दिपाबाई असें नांव होतें.

**२.** मुधोजी ऊर्फ अप्पासाहेब भोसल्यांची बायको. ही मोठी कर्तव्यनिष्ठ बाई होती. अप्पासाहेबांस इंग्रजांनीं पकडल्यावर हिनेंच गंगासिंग नांवाच्या मनुष्यास गुप्त रीतीनें त्यांस सोडविण्यास पाठविलें होतें.

हिनें अप्पासाहेबांस त्यांचे पलायनांत व नंतर बरेंच द्रव्य पुरवलें. ही शोकामुळें जून १८१८ मध्यें मरण पावली ( ना. प्रा. इ. पृ. ४४७, ४६६ ).

**उमाबाई होळकर**—ही मल्हारराव होळकरांची पत्नी. हिला अमीरखानानें स. १८१५ मध्यें ठार मारलें ( म. रि. उ. वि. ३, पृ. ४३८ ).

**उमास्वाती**—( स. १–८५ ) हा वाचक श्रमण या नांवानें विशेष ओळखला जातो. याला नम्रक

वाचक असेंहि म्हणत असत. हें नांव बहुतेक त्याच्या शाखेस उद्देशून असावें. हिंदु तत्त्वज्ञानी यास उमास्वाती वाचकाचार्य असें म्हणत. हा ४८ वर्षे, ८ महिने व ६ दिवस जगला व संवत् १४२ म्हणजे स. ८५ त परलोकवासी झाला.

यानें 'तत्त्वार्थाधिगमसूत्र' नांवाचा एक ग्रंथ व त्यावरील श्वेतांबर सांप्रदायमतें एक भाष्य लिहिलें आहे. आपल्या ग्रंथांत स्वतःविषयीं हा खालील माहिती देतोः—

याचा जन्म 'न्यग्रोधिका' नांवाच्या एका खेडेगांवीं झाला. यानें आपला ग्रंथ पाटलीपुत्र अथवा कुसुमपुर (हल्लींचें पाटणा) येथें लिहिला. याच्या बापाचें नांव स्वाती असें असून यास कधींकधीं स्वातितनय असेंहि म्हणत असत. याची आई उमा ही वत्सगोत्री असल्यामुळें यास कधींकधीं 'उमास्वातिसुत' असेंहि म्हणत असत. जिनप्रभसूरीच्या तीर्थकल्पांत, उमास्वातीनें ५०० संस्कृत प्रकरणें लिहिलीं असें म्हटलें आहे. याच्या काळीं श्वेतांबर व दिगंबर यांच्यामधील भेद जरी अस्तित्वांत आला नव्हता, तरी हा श्वेतांबर पंथाचा होता असें श्वेतांबर म्हणतात (हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक). हा कौभीषाणि गोत्राचा होता. यानें बरींच पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांपैकीं पुढील पुस्तकें सध्यां उपलब्ध आहेतः (१) तत्त्वार्थाधिगम-सूत्र, (२) भाष्य (तत्त्वार्थाधिगमसूत्रावर), (३) पूजाप्रकरण, (४) जंबूद्वीपसमास, (५) प्रशमरति.

**उमीचंद**—हा जातीनें शीख होता. हा मोठा वजनदार सावकार कलकत्त्यास राहत असे. कलकत्त्याचा इंग्रज गव्हर्नर ड्रेक व याची दोस्ती होती. यानें अलिवर्दिखानास बंगालची सुभेदारी मिळवून दिली. सिराजउद्दौल्यास कलकत्त्यावर आणण्याचें व इंग्रजांविरुद्ध चिडविण्याचें काम यानें केलें, या सबबीवर यास इंग्रजांनीं कैद केलें. सिराजनें इंग्रजांचा पुरा मोड केला. स. १७५७ त सिराजच्या दरबारीं हा इंग्रजांतर्फे वकील म्हणून राहिला. चंद्रनगर घेण्याचे कामीं यानें इंग्रजांस अतिशय मदत केली. प्लासीच्या लढाईत उमीचंद हजर होता. पुढें बंगालच्या सुभेदारीवर मीर जाफरला बसवून सिराज उद्दौल्यास पदच्युत करण्याचा व्यूह क्लाइव्हनें चालविला. परंतु ही गोष्ट गुप्त ठेवणें फार अत्यावश्यक होतें. तेव्हां ही गोष्ट गुप्त ठेवण्याबद्दल क्लाइव्हनें उमीचंदास तीस लाख रु. लांच देण्याचें कबूल केलें. पण क्लाइव्हचा हेतु उमीचंदास पूर्णपणें फसविण्याचा होता. त्याकरितां त्यानें एक तांबडा व एक पांढरा असे दोन कागद केले. त्यांपैकीं पांढरा कागद खरा व तांबडा खोटा होता. तो खोटा तांबडा कागद त्यानें उमीचंदास दिला. पुढें मीर जाफरची सुभेदारीवर स्थापना झाल्यावर त्यानें ठरल्याप्रमाणें सर्वांना बक्षिसें व लांच देण्यासाठीं दरबार भरविला. त्या प्रसंगीं यानें आपला कागद दाखवून पैशाची मागणी केली. तेव्हां क्लाइव्हनें यास कळविलें कीं, 'तांबडा कागद खोटा आहे, तुम्हांस कांहींएक मिळणार नाहीं.' हे शब्द ऐकतांच आकाशांतून कुऱ्हाड पडल्यासारखें होऊन उमीचंद बेशुद्ध पडला. तेव्हांपासून हा भ्रमिष्ट झाला. उमीचंद वेडा होऊन मरण पावला (ब्रि. रि. पू. पृ. ५३२).

**उमेदसिंग**—बुंदी संस्थानच्या बुधसिंगाचा हा मुलगा. जेव्हां याच्या बापास राज्याबाहेर हाकून दिलें तेव्हां यानें मल्हारराव होळकरांच्या मदतीनें पुन्हां गादी परत मिळविली. याच्यानंतर अजितसिंग गादीवर आला.

**उरगण्णा दंडनाथ**—हा कवि लष्करी खात्यांतील मोठ्या पदवीचा सरदार होता. कांहींच्या मतें हा विजयनगरचा राजा हरिहरराजाच्या पदरीं होता. याची गति संस्कृत व्याकरणांत चांगली होती. यानें नानार्थरत्नमाला व एकाक्षरनिघण्टु असे दोन कोश केले (कविचरित्र).

**उर्फी मौलाना**—हा कवि शीराझचा राहणारा. याचें खरें नांव जमालुद्दीन. हा स. १५८९ मध्यें खानखानानच्या द्वारां अकबराच्या दरबारांत राहिला. याच्या ग्रंथांपैकीं 'दीवाणि' आणि 'कसायद' हे ग्रंथ फार प्रख्यात आहेत. याच्या इच्छेप्रमाणें याच्या अस्थि नजफ आश्रफाच्या शेजारीं पुरल्या. हा. स. १५९१ मध्यें लाहोर येथें मरण पावला.

**उलघबेग मीर्झा**—(स. १३९४-१४४९) हा तैमूरलंगाचा नातू व मीर्झा शहारुखचा मुलगा. हा ज्योतिषशास्त्रांतील पंडित होता. हा युद्धकलेंत निपुण नव्हता. यानें राज्यांतील सर्व ज्योतिषी एकत्र जमवून 'झीज उलघबेग' नांवाचा ज्योतिष गणिताचा ग्रंथ तयार केला. स. १४४९ त याच्या मुलानें यास ठार मारलें (बील).

याच्याजवळ ताऱ्यांचे वेध घेण्याचीं मोठालीं यंत्रें होतीं. विशेषतः ताऱ्यांची उंची मोजण्याचें जे सूर्ययंत्र (तुरीप यंत्र) तें याजवळ होतें. तें १८० फूट उंच होतें.

**उलुघखान**—(स. १२९२-१२९६) याचा उच्चार उल्घूखान असाहि करीत असावेत. चंगीझखानाचे वंशांतील हुलागूखानाचा नातू. स. १२९२ मध्यें एक लाख

मोंगलांनीं पंजाबवर स्वारी केली. सुनामपर्यंत त्यांना फारसा विरोध झाला नाहीं. पण पुढें जलालउद्दीन खल्जीच्या सैन्यांनीं मोंगलांचा मोड केला. आणि आल्या वाटेनें जाऊं देण्याचा तह झाला. पण यानें आपल्या सैनिकांसह इस्लामी धर्म स्वीकारून जलालउद्दीन खल्जीची नोकरी पत्करली. वरचढ झालेल्या तुर्क लोकांना तोंड देण्यास असे लोक त्याला पाहिजेच होते. कैकूबादच्या वेळीं तुर्कांच्या कत्तली करण्यांत आल्या. पण जलालउद्दीननें आपली एक मुलगी याला देऊन आपलेसें केलें. पण अलाउद्दीन गादीवर येतांच राजनिष्ठ म्हणून याचे डोळे काढण्यांत आले. याच्याबरोबर आलेल्या मोगल सैनिकांपैकीं हवा मानवत नाहीं म्हणून कांहीं परत गेले आणि कांहीं मुसलमान होऊन येथें राहिले. पण येथील लोक त्यांना नव मुसलमान असें म्हणून त्यांचा तिरस्कार करीत. अलाउद्दीन गादीवर आल्यावर नव मुसलमानांच्या कत्तली सुरू झाल्या. त्यांत हा मारला गेला असें दिसतें.

**२.** हा अलाउद्दीन खल्जीचा धाकटा भाऊ व शहाबुद्दीन मसूदचा धाकटा मुलगा. याच्या पित्याचें नांव यघुषखान असेंहि आढळतें ( कें. हि. ). अलाउद्दीनच्या प्रत्येक कामांत याचें साहाय्य असे. यानें गुजराथवर स्वारी करून अनहिलवाडला वेढा दिला आणि तें शहर जिंकलें ( स. १२९७ ). राजा कर्णाची पत्नी कमलदेवी दिल्लीस पाठविली. रणथंभोर जिंकत असतां नुस्रतखान मेला तरी यानें नेट धरला. शेवटीं अलाउद्दीन याच्या मदतीस आला. हा वेढा चालू असतां दिल्लीस दोन बंडें झालीं ( हाजी मौला पाहा ). तीं बातमी गुप्त ठेवून अलाउद्दीननें याला बंड मोडण्याकरितां पाठविलें. पण हा तिकडे लवकरच मरण पावला ( आकतखान खल्जी पाहा ).

**३.** बल्बनचें नामांतर.

**उवट**—याच्या पित्याचें नांव वज्रट. हा गुजराथेंतील आनंदपुर येथें राहत होता. यानें वाजसनेयी संहितेवर भाष्य लिहिलें. हा माळव्यांतील भोजाच्या वेळीं होता. भोजाचें राज्य स. १०१०–५५ पर्यंत होतें. यजुःप्रातिशाख्यावरहि याचें भाष्य आहे. संहितेवरील भाष्य यानें उज्जयनींत लिहिलें.

**उषवदात**—हा दीनीकाचा पुत्र व नहपानाच्या दक्षमित्रा नांवाच्या मुलीचा पति. हा नहपानाचा सेनापति असावा असें दिसतें. हा नहपानाच्या राज्यांत चहूंकडे हिंडत असे व वेळोवेळीं दानधर्म करीत असे. याच्या लेखावरून पत्ता लागतो कीं राजपुतान्यांत बार्णासा (बनास) नदीवर यानें तीर्थघाट बांधला व सुवर्णदान केलें. भट्टारक नहपानाच्या आज्ञेवरून पावसाळ्यांतच हा मालवांच्या तडाख्यांत सांपडलेल्या उत्तमभाद्र क्षत्रियांना सोडवण्याकरितां गेला. हा आला आहे असें कळतांच मालव पळाले. पण उत्तमभाद्र क्षत्रियांनीं त्यांच्याशीं बंधुत्व जोडलें होतें. नंतर हा पुष्करला गेला आणि स्नान करून यानें तीन हजार गाई व एक गांव दान दिलें ( एपि. इंडि भा. ८, पा ७८ ). याचे शिलालेख पाली व संस्कृतमध्यें आहेत ( डॉ. भांडारकर अर्ली हिस्ट्री ऑफ दि डेक्कन पाहा ).

यानें गोवर्धन येथील वीणकरी लोकांच्या बँकेंत २००० कार्षापण शें. १०० कर्षापणाच्या व्याजानें ठेविले होते व त्यांतील कांहीं व्याज २० भिक्षूंना पावसाळ्यांत चरितार्थाकरितां मिळावें अशी व्यवस्था केली होती, व दुसऱ्या एका बँकेंत १००० कार्षापण शें. ७५ भावानें ठेवून त्याचें व्याज भिक्षूंना इतर कांहीं गोष्टी घेण्याकरितां मिळावें अशी व्यवस्था केली होती. यानें १६ गांवें ब्राह्मणांना दिलीं होतीं. प्रभासक्षेत्रीं ८ ब्राह्मणांना नेऊन त्यांचीं लग्नें लावून दिलीं. यानें बाग तयार केले, पोहण्याकरितां तळीं बांधलीं, नद्यांतून बोटी सुरू केल्या ( J. B. B. R. A. S. Vol. VII. No. 6. Nasik Inscriptions ). यानें बलुराका येथील गुहेंत राहणाऱ्या भिक्षूंना कर्जिका नांवाचें गांव दिल्याचें आढळतें ( Archæological Survey of Western India, No. 10, No. 13, Karli Inscriptions ).

**उसमान**—एक हिंदी कवि. पित्याचें नांव शेख हसन. यानें चित्रावली नांवाची प्रेमकहाणी स. १६१३ मध्यें लिहिली. याच्या काव्यांत इंग्रजांचें वर्णन आहे. हा जहांगीर बादशाहाच्या वेळीं होता (क. कौ. भा. १). हा हाजीबाबाचा शिष्य व गाजीपूरचा राहणारा.

**उस्ताद अली**—हा बाबरचा तोफखानदार होय. बाबराला यानेंच आपल्या कर्तबगारीनें पुष्कळ वेळां यश मिळवून दिलें ( मु. रा. भा. १, पा. १० ).

**उस्तीक स्टिफन**—इंग्रजांचा शिवाजीच्या वेळचा वकील.

राजापूरला जी नुकसानी झाली, त्याबाबत तह करण्याकरितां हा मनुष्य नेमलेला दिसतो. कांहीं ठिकाणीं याला स्टिफन युस्टिक म्हटल्याचें आढळतें.

**उस्मानखान घोरी**—माळव्याच्या घोरी घराण्यांतील हुशंगशहाचा पुत्र.

**उंगपो**—एक चिनी प्रवासी. हा सिपिन या चिनी प्रवाशाबरोबर भारतवर्षांत आला होता. यानें सांचीच्या संघारामांत संस्कृत शिकण्याला सुरुवात केली, पण तें पार पडेना. हा नेपालामार्गें परत

जात असतां नेपाळांत मृत्यु पावला. हिंदुस्थानांत असतां यानें आपलें नांव मतिसिंह असें घेतलें होतें.

**उंद-भट**—(स.९०३-९०७) सिरोनीचा एक राजा. हा स. ९०३ मध्यें गादीवर आला. हा कनोजच्या महेंद्रपालाचा प्रतिस्पर्धी असून यानें मधुवेणी नदीच्या कांठीं युवराजांशीं युद्ध केलें होतें. यानें स. ९०७ पर्यंत राज्य केलें ( B ).

## ऊ

**ऊकाँग**—( स. ७५३-७९० ) एक चिनी बुद्ध श्रमण. हा मध्य आशियाच्या मार्गानें प्रवास करून गांधार प्रांतांत स. ७५३ मध्यें व काश्मीरला स. ७५९ मध्यें जाऊन पोंचला. चार वर्षांनीं पुन्हां गांधारला परत येऊन हा मध्य हिंदुस्थानांत जाण्याकरितां ७६४ मध्यें निघाला. कपिलवस्तु, वाराणशी, श्रावस्ती, कुशिनगर व नालंद येथें यानें तीन वर्षे घालविलीं. स. ७८३-७८४ च्या सुमारास हा चीनला जाण्याकरितां निघून ७९० मध्यें तेथें पोहोंचला. यानें दशभूमी, दशाबल, सूत्रें वगैरे संस्कृत पुस्तकें बरोबर नेलीं होतीं ( डफ ).

**ऊदल**—पृथ्वीराज चौहानानें महोबाच्या परमर्दिदेव चंदेलराजावर स्वारी केली. त्या वेळीं परमर्दिदेवाचे सामंत आल्हा व ऊदल हे लढाईंत हजर नव्हते. ते पूर्वी कांहीं अप्रसन्नतेमुळें कनोजच्या जयचंदाकडे जाऊन राहिले होते. पृथ्वीराजाच्या सैन्यानें देशाची खराबी चालविली आहे असें पाहून परमर्दिदेवाच्या राणीनें आल्हा व ऊदल यांना बोलावणें पाठविलें. पण यांनीं महोब्यास परत येण्याचें नाकारलें. तेव्हां याच्या वीरमातेनें पुढील उद्गार काढल्याचें प्रसिद्ध आहे. ती म्हणाली, "हे विधाता, तूं मला वांझ कां केलें नाहींस ? क्षत्रियधर्म न पाळणाऱ्या अशा पुत्रांना जन्म देण्यापेक्षां मी वांझोटी असतें तरी हरकत नव्हती. मालक संकटांत असतां ज्याचे सरदार सुखानें झोंप घेतात अशा क्षत्रियांना धिःकार असो. जो क्षत्रिय संकटाच्या वेळीं धन्याकरितां शिर देण्यास तयार होत नाहीं तो जातीचा रजपुतच नव्हे." (रासोसार, पृ. ४६१, नागरी-प्रचारिणी सभेनें प्रकाशित केलेला ).

**ऊदा**—( २ उदयसिंह पाहा ).

**ऊधमबाई**—एक हिंदु स्त्री. हिचें दिल्लीचा बादशहा मुहम्मदशाहबरोबर लग्न झालें होतें. हिच्या मुलाचें नांव अहमदशाहा. अहमदशाहा गादीवर बसला तेव्हां (स.१७४८) हिला नबाबबाई, नबाब कुदसिया आणि साहेब झमानी अशा पदव्या मिळाल्या. अहमदशाहबरोबर हिचेहि डोळे काढले होते. हिचा भाऊ मानखान यास ६००० सैन्यावरील अधिकार मिळालेला होता.

**ऊहिंग**—एक चिनी प्रवासी. हा चीनमधून भारतांत आला व तेथून लंकेस गेला. लंकेतील यात्रा केल्यावर हा भारतवर्षांत आला. येथें महाबोध विहारांत कांहीं दिवस राहून नालंदला गेला. तेथें योगाचार ग्रंथांचें यानें अध्ययन केलें. हा नालंदला परलोकवासी झाला. यानें आपलें नांव प्राज्ञदेव असें घेतलें होतें.

## ऋ

**ऋषभदत्त**—( उषवदात पाहा ).

**ऋषभदेव**—जैनांचा पहिला तीर्थंकर. याच्याकरितां प्राचीन चरित्रकोशांतील अर्हत्, ऋषभ, आणि या कोशांतील तीर्थंकर शब्द पाहा.

**ऋषिनाथ**—( स. १७४२-७३ ) एक हिंदी कवि. हा असनीचा राहणारा असून एक बंदीजन होय. हा प्रसिद्ध कवि ठाकुर याचा बाप होय.

यानें काशीराजाचा दिवाण सदानंदाच्या आश्रयास राहून 'अलंकारमणि-मंजरी' नांवाचें एक उत्तम पुस्तक लिहिलें आहे. यामध्यें दोहांची संख्या जास्त असून कांहीं कांहीं ठिकाणीं घनाक्षरी आणि छप्पय यांचा उपयोग केला आहे.

यानें आपल्या वृद्धावस्थेंत सुद्धां एक ग्रंथ लिहिला, असा उल्लेख आलेला आहे.

# ए

**एकनाथ**—( स. १५३३?–१५९९ ) यांचा जन्म केव्हां झाला याबद्दल निश्चित पुरावा नाहीं. पांगारकरांनीं शके १४५५ सालीं जन्म झाल्याचें अंदाजी दिलें आहे. समाधिशक पूर्वी शके १५३१ मानीत होते. पण आतां १५२१ हा निश्चित आहे. यांची पितृपरंपरा भानुदास–चक्रपाणी–सूर्यनारायण-एकनाथ अशी आहे. यांच्या मातेचें नांव रुक्मिणी. मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या यांची मातापितरें हा जन्मल्यानंतर लवकरच मेलीं. त्यामुळें यांचे आजे चक्रपाणी यांनीं यांचें पालणपोषण केलें. कुलाचा एकच अंकुर म्हणून याचें एकनाथ असें नांव ठेवलें. एका असेंहि याला म्हणत असावेत. सहा वर्षांचे असतां यांचें उपनयन झालें. हे बारा वर्षांचे असतांच पैठणांत गांवाबाहेरील शिवालयांत यांस असा दृष्टान्त झाला कीं, ' जनार्दनपंत या नांवाचे साधु देवगडावर आहेत, तेथें जाऊन तूं त्यांचा उपदेश घे.' असा दृष्टान्त झाल्यावर आजाचीहि अनुज्ञा न घेतां हा जनार्दनस्वामीकडे गेला. तेथें यानें आपल्या गुरूची उत्तम सेवा केली. आणि ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांचा उत्तम अभ्यास केला. जनार्दनस्वामी दत्तभक्त होते तरी त्यांनीं याला दत्तभक्ति करण्यास न लावतां पंढरीचा सोपा मार्ग पतकरण्यास सांगितलें. कदाचित् भानुदासादिकांची पूर्वपरंपरा ध्यानांत घेऊन त्यांनीं तसें सांगितलें असावें; आणि विठ्ठल हा मंत्र देऊन जातीचा विचार न करितां अन्नदान करण्यास सांगितलें. तेथें यांना गुरुकृपा आणि दत्तदर्शन यांचा लाभ झाला. नंतर यांनीं देवगडावरच पण वायव्य दिशेस शूलभंजन ऊर्फ सुलभपर्वतावर रम्य जागीं सहा वर्षें तपश्चर्या केली. तेथें यांनीं योगाचा अभ्यास करून त्यांत पूर्ण प्रगति करून घेतली; आणि नंतर कृष्णाचा साक्षात्कार झाला. नंतर यांनीं कांहीं वर्षें तीर्थयात्रेंत घालविलीं. तीर्थयात्रा सुरू झाल्यानंतर चतुःश्लोकी भागवताच्या टीकेपासून यांच्या ग्रंथलेखनास प्रारंभ झाला.

एकदां देवगडावर परचक्र आलें असतां जनार्दनस्वामी ध्यानांत गुंतले आहेत असें पाहून यांनीं स्वतः घोड्यावर स्वार होऊन त्या परचक्राचा पाडाव केला.

नंतर हे गुरूच्या आज्ञेनें पैठणास आले आणि विजापूर येथील गिरिजाबाई नांवाच्या मुलीशीं यांचें लग्न झालें.

परमार्थ व प्रपंच मिळून चालविण्याची यांची हातोटी अपूर्व होती. आपल्या वर्तणुकीनें यांनीं सर्व जगास परमार्थी मनुष्यानें कसें वागावें याचा कित्ता घालून दिला.

आपल्या अंगावर थुंकणाऱ्या यवनाशीं शांततेनें व सभ्यपणानें वागणें, आपल्या पितरांच्या श्राद्धाच्या वेळीं महारास जेऊं घालणें, महाराच्या येथें जेवणें, गंगेचें पाणी घरीं आणीत असतां तहानेनें तळमळत असलेल्या एका गाढवास तें पाजणें, वेश्या, चोर, जार यांना भक्तीला लावून उद्धार करणें, एका अस्पृश्य मुलास उचलून कडेवर घेणें, ज्ञानाचा अभिमान चढलेल्या पुत्राशीं म्हणजे हरिपंडिताशीं शांत रीतीनें वागणें, या व इतर अशा अनेक गोष्टींनीं एकनाथ हे शांतता, दया, अक्रोध, समता वगैरे गुणांचे मूर्तिमंत अवतार होते, असें म्हणावें लागतें.

एकदां यांच्या गळ्यास रोग झाला असतां ' ज्ञानदेवांच्या गळ्यास लागलेल्या अजानवृक्षाची मुळी तूं काढ. म्हणजे तुझा रोग बरा होईल,' असा यांस दृष्टांत झाल्यानें हे आळंदीस आले. या प्रसंगाची हकीगत यांनीं स्वतःच पुढील अभंगांत दिली आहेः

श्रीज्ञानदेवें येऊन स्वप्नांत । सांगितली मात मजलागीं ।
दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा । परब्रह्म केवळ बोलतसे ।
अजानवृक्षाची मुळी कंठास लागली । येऊनि आळंदीं काढ वेगीं ।
ऐसें स्वप्न होतां आलों अलंकापुरीं । तंव नदीमाझारीं देखिलें द्वारा ।
एका जनार्दनीं पूर्व पुण्य फळलें । श्रीगुरु भेटले ज्ञानेश्वर ॥

या अभंगावरून त्या वेळीं ज्ञानदेवाच्या समाधीचें द्वार नदीमध्यें होतें. हल्ली जेथें सिद्धेश्वरापुढील नंदी दाखविला जातो तेथें त्या वेळीं नदीचें पात्र असावें. एकनाथ त्या मार्गानें जाऊन त्यांनीं अजानवृक्षाची मुळी सोडविली असें दिसतें. नंतर हे पैठण येथें आले आणि तेथें शके १५०६ ( स. १५८४ ) तारणनाम संवत्सरीं कपिलाषष्ठीला सध्यांची ज्ञानेश्वरी जगाला दिली. यांनीं लिहिलेली ज्ञानेश्वरीची संशोधनपत्रिका पुढीलप्रमाणें आहेः

श्रीशके पंधराशें बारोत्तरीं । तारण नाम संवत्सरीं ।
येका जनार्दन अत्यादरीं । गीता ज्ञानेश्वरीप्रति शुद्ध केली ॥ १ ॥
ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध ।
तों शोधूनिया एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥ २ ॥
नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका । जयाची गीतेची वाचितां टीका ।
ज्ञान होय लोकां । अति भाविकां ग्रंथार्थियां ॥ ३ ॥
बहु काळ पर्वणी गोमटी । भाद्रमास कपिलाषष्ठी ॥
प्रतिष्ठानीं गोदातटीं । लेखनकामाठी संपूर्ण झाली ॥ ४ ॥

ज्ञानेश्वरीपाठी । जो ओवी करील मन्हाठी ॥
तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥ ५ ॥
( ज्ञानेश्वरी, कुंटेप्रत )

शके पंधराशें बारोत्तरीं हा पाठ चूक दिसतो, कारण त्या सालीं तारण संवत्सर येत नाहीं. साहोत्तरीं असा पाठ कांहीं प्रतींत आहे. तो बरोबर दिसतो. कांहीं जुन्या रूपांबद्दल नवीं रूपें घालणें वगैरे किरकोळ सुधारणांखेरीज यांनीं ज्ञानेश्वरीमध्यें फारशा सुधारणा केल्या असें यांच्या शब्दावरून दिसत नाहीं, असें प्रो. रा. द. रानडे म्हणतात ( संतवचनामृत पा. २९ प्रस्तावना ). पण ज्ञानेश्वरीच्या पाठांत ओवी घुसडून देणारा अमृताच्या ताटांत नरोटी ठेवणाऱ्याप्रमाणेंच हास्यास्पद होईल, असें यांनीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या संशोधनपत्रिकेंत म्हटलें आहे. यावरून तसा कांहीं प्रयत्न त्या वेळीं झाला असावा असें वाटतें. म्हणूनच याला ज्ञानेश्वरीची संहिता निश्चित करणें भाग पडलें असावें.

ज्ञानेश्वरींतील किमयेच्या ओव्या यांनीं ज्ञानेश्वरींतून काढून टाकल्या. कारण केवळ त्याच दृष्टीनें ज्ञानेश्वरीकडे लोक पाहूं लागले आणि ज्ञानेश्वरींतील इतर अत्यंत महत्त्वाच्या भागांकडे लोकांचें दुर्लक्ष होऊं लागलें अशी आख्यायिका आहे. तसेंच ज्ञानेश्वरांच्या ओवीचा चवथा चरण तोटका असतो, पण एकनाथांची ओवी पूर्ण चार चरणांची असते. पूर्ण चार चरणांच्या कांहीं ओव्या ज्ञानेश्वरींत आहेत त्या एकनाथांच्या असाव्यात.

एकनाथ हे कीर्तन करतां करतांच पैठण येथें शके १५२१ मध्यें समाधिस्थ झाले. केशवानें व महिपतीनें लिहिलें आहे कीं, यांनीं गोदावरींत देह ठेविला.

यांचें एकनाथी भागवत हें वारकऱ्यांच्या प्रस्थानत्रयीपैकीं असून अत्यंत लोकप्रिय आहे. तसेंच भावार्थरामायण आणि रुक्मिणीस्वयंवर हे ग्रंथहि प्रासादिक असून लोकांना फार आवडतात. पण यांचें मूर्तिमंत दर्शन यांच्या अभंगांमध्यें आणि भारुडांमध्यें घडतें. हे कीर्तनकार असून यांना गाण्याचें अंगहि चांगलेंच अनुकूल असावें. समाजांतील वेगळाल्या जातींच्या आचारविचारांचा तन्मयतेनें आणि सहृदयतेनें यांनीं उपयोग करून घेतला आहे; आणि त्यावर स्फुट कवनें केलीं आहेत. त्यांचा ताजेपणा व आकर्षकपणा अद्यापिहि कायम आहे. मग खुद्द नाथच त्यांचा कीर्तनांत उपयोग करीत असतील तेव्हांचा रंग अद्भुतच असला पाहिजे. आणि हें केवळ करमणुकीकरितां केलें नसून तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवर रचलेलें असल्यामुळें त्याला करमणुकीबरोबर भारदस्तपणाहि आला आहे. आजचे गोंधळी, भराडी, वासुदेव, भुत्ये, वाघे, मुरळी, बहुरूपी इत्यादि नाथांच्याच भारुडाचा उपयोग करून आपली भूमिका विनोदी दिसत असली तरी तत्त्वज्ञानावर उभारली आहे असें दाखवितात.

अनेक दृष्टींनीं पाहतां असें दिसून येतें कीं, एकनाथ हा लोकोत्तर पुरुष होता. त्याचें काम अगदीं बिनखोड आहे. याचे ग्रंथांत कांटेतोलपणा, व्यावहारिक चातुर्य, खोल अर्थ व सर्वव्यापी प्रमेयें हीं सर्वभर आढळतील. किंबहुना या व अशा सर्व बाबींत एकनाथ केवळ हातखंडा आहे. याची राहणी आणि वागणीहि अशीच अवर्णनीय दिसते. हा जसा लौकिकांत वागतो तसेंच ग्रंथांत लिहितो. आणि तो जसें लिहितो तसाच वागतो. हें असिधाराव्रत फार कठीण आहे, पण तें एकनाथानें साधून दाखविलें. आणि यामुळेंच कृष्णदयार्णव याला 'सकळ सद्गुणीं संपूर्ण' असें म्हणतो. देवदास याला 'उदार, धीर, सर्वज्ञ' असें संबोधतो. एकेश्वर अवधूत याचे ग्रंथ पाहून याला 'व्यासाचा साक्षात् अवतार' मानतो. मोरोपंत म्हणतो, 'तो केवळ-प्रभुरूप' असा 'शांतिजलधि' आहे. कारण 'स्वापत्य तसें प्रेमें अज्ञार्थि प्राणिजात तर्पावें' ही त्याची नेहमींची करणी असे. अमृतराय तर याला 'परमपुरुष परम भागवत' च लेखतो. तुकाराम याचे गुण आठवून आणि यानें वैष्णवांचा मिळवलेला मेळा पाहून 'त्याचे पायीं माथा' ठेवतो. मुक्तेश्वराला याचे आचारविचार हे 'निर्दोष आणि निर्मळ' वाटतात आणि हा सकल 'सज्जनवृंदापेक्षां अधिक' श्रेष्ठ दिसतो. याचा सहचर व गुरुबन्धु दासोपंत याला तर याचा सगळाच चमत्कार अनुभवास येतो. तो याला दयेचें अधिष्ठान समजतो. अलीकडे विद्वान् लोकहि एकनाथाकडे पाहून कौतुकानें मानाच डोलावतात. चिपळूणकरशास्त्री, गोडबोले, राजारामशास्त्री भागवत, सहस्रबुद्धे, पावगी वगैरे मंडळी तर एकनाथाची थोरवी गातातच, पण नवीन पंथाची मंडळी देखील याचे ग्रंथ मनापासून वाचतात व अभ्यासतात. न्यायमूर्ति रानडे तर याच्या ग्रंथाचा फार प्रेमानें अभ्यास करीत व करवीत. असा हा एकनाथस्वामी केवळ अलौकिक पुरुष होता. अनाथ दुबळ्यांना साह्य करावें, बुडत्यांना हात द्यावा, विश्वकुटुंबी वृत्ती ठेवावी, असंतांनाहि संत मानावें, भक्त्यानंद आपण भोगावा व दुसऱ्यांना भोगवावा, ईश्वरचरित्रांत आपण रमावें व इतरांना रमवावें. सुंदर ग्रंथ आपण लिहावे व दुसऱ्यांकडून लिहवावे, हाच क्रम यानें आजन्म आचरला.

याच्या चरित्रांतील विलक्षण आणि चिंतनीय गोष्ट म्हटली म्हणजे निरनिराळ्या उत्तरकालीन पांच ग्रंथकारांस याच्या कृपेनें, आशीर्वादानें किंवा सामर्थ्यानें ग्रंथरचनास्फूर्ति झाली ही होय. केवळ याच्याच कृपेनें आपलें युद्धकांड पुरें करण्यास कृष्णदास मुद्गल समर्थ झाले. याशिवाय नाथांचा नातू मुक्तेश्वर हा जन्मतः मुका असतां नाथकृपेनें त्यास वाचा फुटली अशी कथा प्रसिद्ध आहे. याचा एक शिष्य गावबा हा अपंडित असतां, आपल्या भावार्थरामायणाचा उर्वरित भाग पुरा करण्याचें सामर्थ्य नाथानें त्यास दिलें. त्याचप्रमाणें, प्रसिद्ध 'हरिवरदा' ग्रंथाचा कर्ता श्रीमत्कृष्ण-दयार्णव यास सदर ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ति नाथानें दिलेल्या दृष्टांतामुळेंच झाली, हें खुद्द दयार्णवस्वामींनींच 'हरिवरदा' ग्रंथांत नमूद केलें आहे. याशिवाय पेशवाईच्या अखेरीस पुण्याच्या बाजूस होऊन गेलेल्या ठाकुरदास बाबा यांनींहि एकनाथमहाराजांच्या कृपेनेंच आपणास कवित्वस्फूर्ति झाली असा स्पष्ट उल्लेख आपल्या कवितेंत केला आहे.

१ चतुःश्लोकी भागवतटीका
२ एकनाथी भागवत ( एकादशस्कंध टीका २००००० ओळी )
लेखनकाल शा श. १४९२–१४९५ कार्तिक शु. १५
३ रुक्मिणीस्वयंवर ( ओवीबद्ध ) (शा. श. १४९३) ( २ ) ( अभंगबद्ध )
४ भावार्थरामायण ( गावबा, जयरामसुत )
५ शुकाष्टकावर टीका ( ४५८ ओव्या )
६ आनंदलहरी ( १५४ ओव्या )
७ गीतासार ( ४५० ओव्या )
८ आनंदानुभव ( ? ) ( एकनाथ असा निर्देश )
९ हस्तामलक ( ६७४ ओव्या )
१० स्वात्मसुख ( ५११ ओव्या )
११ प्रल्हादविजय (नृसिंहजन्म, प्रल्हादचरित्र, चिलया-कथा )
१२ एकनाथीगाथा ( पदें, अभंग, भारुड वगैरे )
१३ गंगागौरीचें भांडण
१४ चिरंजीवपद ( ओव्या ४२ )
१५ गणेशविलास
१६ एकादशी–माहात्म्य
१७ मुद्राविलास
१८ बालक्रीडा व इतर दशमस्कंधांतील प्रकरणें (दशम-स्कंधाचा एक भाग. एकनाथ, जनार्दनाचा एका, असें जरी कर्त्याचें नांव असलें तरी हा ग्रंथ याचा नसावा. )
१९ रुक्मं-गदाची कथा
२० तुळशीमाहात्म्य
२१ हनूमज्जन्म
२२ शिवपार्वतीविवाह
२३ रामरावणाची व सीतामंदोदरीची एकात्मता.

भावार्थरामायण हा प्रचंड ग्रंथ पहिलीं पांच कांडें व सहाव्या युद्धकांडाचे ४४ अध्याय झाल्यावर हे समाधिस्थ झाले. बाकीचे १२५ अध्याय गावबाचे आहेत. म्हणजे मूळ ग्रंथाच्या ४० हजार ओव्यांपैकीं २५ हजार ओव्या नाथांच्या आणि १५ हजार गावबाच्या आहेत. त्यांत वाल्मिकीरामायण, अध्यात्मरामायण, भागवत, हनूमान् नाटकासारखीं संस्कृत नाटकें, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथांचे आधार घेतले आहेत. शिवाय अहिमहिचें आख्यान जयरामसुत नांवाच्या कवीनें या रामायणाला जोडलें आहे ( ८५४. ३४० ). जयरामसुत व गावबा हे भिन्न होत असें लिहिण्यावरून दिसतें. यांनीं दशावतार नांवाचें एक छोटेंसें अभंगात्मक प्रकरण रचलें आहे. त्यांत नववा अवतार विष्णु बौद्ध होऊन पंढरीस विटेवर उभे राहिले असें दिलें आहे.

याशिवाय हळदुली, कृष्णदान ( सत्यभामेनें नारदाला कृष्ण दान दिला आणि अगणित संपत्तीपेक्षां केवळ भक्तिभावानें ठेवलेल्या रुक्मिणीच्या तुळसीपत्रानें तोलला जाऊन परत मिळाला ), श्रीदत्तजन्माख्यान, अमृतानुभव टीका यांशिवाय ध्रुव, उपमन्यु व सुदामा यांचीं अभंगात्मक चरित्रें, जिवाजीपंत व आत्मारामपंत यांचा गद्य पत्रव्यवहार अशीं अनेक प्रकरणें लिहिलीं.

तो काल संस्कृत ग्रंथ लिहिणारांचा असल्यामुळें यांचा पंडित लोक तिरस्कार करीत. पण प्रत्यक्ष यांचें विवेचन ऐकल्यावर यांच्या शास्त्रशुद्ध विवेचनाची लोकांवर छाप पडे. यांचा भागवतग्रंथ प्रथम मनकर्णिकेच्या घाटावर वाचण्या-सहि विरोध झाला, पण विद्वानांनीं तपासल्यावर शेवटीं त्याच ग्रंथाची काशीक्षेत्रांतून पालखींत घालून मिरवणूक काढण्यांत आली. भागवत यांनीं काशीसच पुरें केलें. तेथें यांचा साडेतीन वर्षें मुक्काम होता ( १४९२–९५ कार्तिक ). हरिपंडित रुसून काशीस गेला असतां त्याची समजूत घालण्याकरितां आणखीहि हे काशीस गेले होते ( शा. श. १५१९ )

यांना हरिपंडित नांवाचा एक मुलगा आणि गोदुबाई व गंगाबाई नांवाच्या दोन मुली होत्या. मुक्तेश्वर कवि हा गोदुबाईचा मुलगा होय. गोदुबाई वडील असून हरि-पंडित मधले होत. गोदुबाईचें सासरचें नांव गंगाबाई होतें.

केशव नांवाच्या कवीनें शके १६८२ सालीं श्रीएकनाथ-चरित्र नांवाचें ३१ अध्यायांचें प्रकरण लिहिलें. याचाच आधार घेऊन व आणखी भर घालून महिपतीनें भक्त-लीलामृत ग्रंथांत सविस्तर चरित्र लिहिलें. प्रसंगत इतर ग्रंथकारांनीं केलेले निर्देश व वरील साहित्य हेच यांच्या चरित्राचे मुख्य आधार होत.

वारकरी सांप्रदायाची संघटना हा यांच्या कर्तबगारीचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ व तुकाराम हे तीन या सांप्रदायाचे मुनि होत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामाची गाथा हे या सांप्रदायाचीं प्रस्थानत्रय होय. या तिघांच्या विचारसरणींत सारखेपणा आहे. हे पक्के अद्वैतवादी असून सगुणभक्तीचे प्रचारक आहेत. पंढरीचा विठ्ठल हा यांचा देव असून शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाशीं हे समरस झाले आहेत. द्वैती व ज्ञानविमुख अशा इतर भागवत सांप्रदायांपेक्षां यांचा भागवतधर्म वेगळा आहे. आणि त्याचा प्रचार या तिघांपैकीं एकनाथानें विशेष तत्परतेनें आणि समंजसपणें केला आहे. ज्ञानेश्वरी शुद्ध स्वरूपांत सांभाळण्याची खटपट करून तिचा सांप्रदायाचा मूळ ग्रंथ म्हणून यानें प्रचार केला. ज्ञानेश्वरीला अद्यापि समाजांतील वरच्या वर्गातील शास्त्री-पंडितांकडून मान्यता मिळाली नव्हती. तें काम पैठण-सारख्या क्षेत्रांतील या थोर ब्राह्मणानें पार पाडलें. ज्ञानेश्वराची समाधि शोधून काढली, तिचा जीर्णोद्धार केला आणि तुकारामासारख्याला स्फूर्ति देऊन वारकरी सांप्रदायाचा भव्य आणि सर्वसंग्राहक प्रासाद उभारला. यांचें वर्णन पुढीलप्रमाणें आढळतें:

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिलें पाया । रचियेलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥
(४३९९)

हा तुकारामाच्या गाथ्यांत क्षेपक अभंग म्हणून दिला आहे, पण हा तुकारामाशीं समकालीन असणाऱ्या बहिणाबाईचा आहे.

एकदा जारे अलंकापुरा जन्म एरझारा चुकवा ॥

असा टाहो फोडून पंढरीबरोबर आळंदीच्या वारीस यानें उत्तेजन दिलें.

ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत ज्या पद्धतीचें योगशास्त्राचें विवरण आहे, अगदीं त्याच पद्धतीचें विवरण यांच्याहि भागवतांत आहे. तुकारामाच्याहि लिहिण्यांत त्यांतील कांहीं खुणा आढळतात. पण पुढें तो योग नष्ट झालेला दिसतो. तिघांच्याहि समाधिकालच्या ज्या आख्यायिका व अभंग आहेत त्यांवरून या तिघांचाहि योगशास्त्राशीं अनुभवाचा संबंध होता असें दिसतें.

नाथाच्या वाङ्मयांतील कांहीं नमुने:—

भिंगाचें भिंगुलें खांद्यावर अंगुलें ।
नाचत तान्हुलें यशोदेचें ॥
येती गवळणी करिती बुझावणी ।
लागती चरणीं कान्होबाच्या ॥
गोविंद बाळिया वाजविती टाळिया ।
आमुचा कान्हया देवराव ॥
कडदोरा बिंदली वाघनखें साजिरीं ।
नाचत श्रीहरि यशोदेचा ॥
पायीं घागरिया वांक्या साजरिया ।
कानींच्या बाळिया डाळ देती ॥
एका जनार्दनीं एकत्वें शरण ।
जीवें निंबलोण उतरिती ॥

## जोशी

आम्ही अलक्षपुरचे जोशी । शकुन सांगूं निश्चयेसी ॥
तेणें चुकती चौऱ्यांशीं । मी निर्गुणपुरचा जोशी ॥
होरा ऐका दादानो । होरा ऐका दादानो ॥ ध्रु० ॥
नका जाऊं मनामागें । थोरथोरां झाले दगे ॥
मी बोलत नाहीं वाउगें । सावध रहा दादानो ॥
वासना वाईट ही बा थोर । भुलविले लहानथोर ॥
फिरती चौऱ्यांशीं लक्ष घरें । पडाल फशीं दादानो ॥
एका जनार्दनीं जोशी । सांगेल शकुन सर्वत्रासी ॥
रामनाम वाचेसी । तेणें तरती विश्वासी दादानो ॥

**एकोजी शहाजी भोसले**—(स. १६३१-१६८५) याची आई तुकाबाई. ती मोहित्यांपैकीं होती. ही शहाजीची दुसरी स्त्री. याचा जन्म स. १६३१ त झाला. शहाजी बंगलोरास असतांना, हा त्याच्याजवळ असे. याचें खरें नांव व्यंकोजी नसून एकोजी असें होतें. यानें सेंगमलानें खंड न दिल्यामुळें त्यास ठार केलें, व तंजावर काबीज केलें. हा मुसलमानांच्या बाजूनें नेहमीं शिवाजीवर हल्ला करी. शिवाजी यास निम्मा वांटा देण्यास तयार झाला. याची पत्नी दीपाबाई हिनें याला बोध केला, त्यामुळें पुढें यानें रघुनाथरावास बोलावून राज्याची वांटणी केली. याला तीन राण्या होत्या; व शहाजी, शरफोजी व तुकोजी असे तीन पुत्र होते. राज्याचे पांच सुभे होते.

शहाजीला कैद केल्यावर बंगलोर व कोंडाणा हस्तगत करण्यास रुस्तुमजमा ऊर्फ फर्हादखान व तानाजी डुरे

यास पाठविलें. त्यांचा याचा थोरला भाऊ संभाजी यानें पराभव केला व परत फिरवलें. त्या युद्धांत हा असावा ( स. १६४८ डिसेंबर–१६४९ जानेवारी ).

स. १६५७ मध्यें विजापुरास गडबड उडाल्यामुळें कर्नाटकांतल्या नाइकांनीं विजापूरचा अंमल झुगारून दिला. तेव्हां शहाजीला विजापुरकरानें तिकडे रवाना केलें. तेव्हां स. १६५८ मध्यें शहाजीनें कनकगिरीच्या पूर्वेस श्रीशैलमल्लिकार्जुन म्हणून स्थान आहे तें हस्तगत करण्यास एकोजीस रवाना केलें होतें. तेव्हां एकोजीबरोबर कवि जयराम पिंडे हा होता. शिवाजीनें जसें महाराष्ट्रांत स्वतंत्र राज्य निर्माण केलें तसें कर्नाटकांत एक राज्य निर्माण करून त्यावर एकोजीस बसवावें अशी शहाजीची इच्छा होती, पण तंजावरचा लिंगप्पा नाईक त्यास वश झाला नाहीं. पण त्याच्या हयातींत न झालेलें काम एकोजीनें शहाजीच्या मृत्यूनंतर स. १६७४ मध्यें तंजावर घेऊन तेथें स्वतंत्र राज्य स्थापून केलें ( शहाजी पा. ८ ). शहाजी तुंगभद्रातीरीं वारल्यावर ( २३।१।१६६४ ) यानें शहाजीची क्रिया केली. पुढें बंगलोर याच्याकडे राहिलें तरी तें यानें म्हैसूरच्या चिक्कदेवराज ओडियार यास स. १६८२ मध्यें खरेदी दिलें ( शहाजी पा. ).

दक्षिण हिंदुस्थानांत मराठ्यांचा प्रवेश स. १६३८ मध्यें शिवाजीचा बाप शहाजी आला तेव्हां झाला. तेव्हां शहाजी हा विजापूरच्या आदिलशाही बादशहाच्या पदरीं होता. तो सैन्य घेऊन दक्षिणेंत आला होता. या कर्नाटकांतील लढायांमध्यें शहाजी व त्याचें सैन्य तीस वर्षेपर्यंत गुंतलें होतें. शहाजीनें म्हैसूर, वेल्लूर व जिंजी हे प्रांत जिंकून घेतले. या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून बंगलोर, कोळार, सीरा ऊर्फ कत्ता, व म्हैसूर प्रान्तांतील आणखी कांहीं भाग इतकी जहागीर स. १६४८ त त्याला मिळाली. या लढायांतच मदुरा व तंजावर येथील पुरातन 'नाईक' संस्थानिकांना विजापूरच्या बादशहास शरण येऊन खंडणी देण्यास शहाजीनें भाग पाडलें. बंगलोर येथें शहाजीचें मुख्य ठाणें असून दक्षिणेंत आलेल्या मराठा सैन्याचा तळ बंगलोरासच होता. शहाजी स. १६६४ ( शा. श. १५८५ ) मध्यें घोड्यावरून पडून मेल्यावर त्याची दक्षिणेकडील जहागीर त्याजजवळ असलेला त्याचा पुत्र एकोजी याजकडे आली.

यानें विजापूरच्या पक्षास राहून भावाशीं विरोध आरंभिला होता. यांत यांचा सद्धेतु (आदिलशाहीच्या दृष्टीनें ) होता म्हणूनच अलीआदिलशहानें यास २ परगणे त्याबद्दल इनाम दिले आहेत. यांची मिती श. १५८७ श्रा. शु. १२ ( स. १६६५ ऑगस्ट १२ ) ही आहे.

शहाजी मेल्यावर हा बंड करून स्वतंत्र न होतां विजापूरचें अधिराज्य कबूल करून त्याचा मोठा अभिमान धरून होता, त्याबद्दलहि कदाचित् वरील इनाम मिळालें असेल ( मं. त्रै. वर्ष ११. १ लें १० ).

या वेळीं तंजावर व मदुरा येथील 'नाईक' राजांमध्यें प्राणघातक तंटे सुरू होऊन त्यांत तंजावरच्या राजाचा पराभव झाला. तेव्हां तो विजापूरच्या दरबाराकडे आश्रयासाठीं गेला. त्या दरबारानें राजास गादीवर बसवावें अशी एकोजीला आज्ञा दिली. तेव्हां बारा हजार सैन्य बरोबर घेऊन एकोजीनें चाल केली, व त्या शरणागत राजास गादीवर बसविलें. तथापि त्या राजाच्या पक्षांतील लोकांत कलह होऊन एका बाजूच्या लोकांनीं एकोजीस बोलावणें धाडलें व 'तुम्ही तंजावरचा प्रांत काबीज करा' अशी याला विनंति केली. मराठ्यांचें सैन्य येतांच तंजावरचा राजा पळून गेला. तेव्हां एकोजीनें तंजावर घेतलें ( स. १६७४ ) व बंगलोर येथील ठाणें उठवून तंजावर मुक्कामीं नेलें ( स. १६७५ ).

तंजावर येथें एकोजी राज्य करीत असतांना, एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट झाली. ती म्हणजे स. १६७७ मध्यें शिवाजीनें त्या प्रांतावर स्वारी केली ही होय. याचा निभाव न लागून ही कर्नाटकांतील वडिलोपार्जित जहागीर अनायासें शिवाजीच्या हस्तगत झाली. तंजावर व त्रिचनापल्ली येथील या जहागिरीवर शिवाजीचाच हक्क आहे, असें विजापूर सरकारनेंहि कबूल केलें. आपल्या सावत्र भावास जय मिळाला म्हणून याची अगदीं निराशा झाली. तेव्हां बैरागी होऊन संसारत्याग करण्याचा यानें निश्चय केला. पण शिवाजीनें यास एक खरमरीत पत्र लिहून त्यांत 'तुझें कर्तव्य काय ? व तूं करतोस काय ?' अशा प्रकारें याची नीट कानउघाडणी केली. तेव्हां याचें मन वळून बैरागी होण्याचा यानें हट्ट सोडला. या वेळेस आपल्या भावाचें समाधान व्हावें म्हणून शिवाजीनें अत्यंत उदारपणानें वडिलोपार्जित उत्पन्नावरील सर्व हक्क यास दिला. पण या औदार्याचा परिणाम राजकीय दृष्ट्या अनिष्टच झाला. मराठी राज्यापासून तें राज्य स्वतंत्र राहूं लागलें. पण स्वतंत्रपणें राहून दुसऱ्यावर दाब ठेवण्याला आवश्यक असणारे शौर्यादि गुण यापाशीं नव्हते. तेव्हां म्हैसूरकडील दूरचीं ठाणीं आपल्या ताब्यांत ठेवण्याचें अवसान यास नसल्यानें यानें म्हैसूरच्या राजास बंगलोर देऊन टाकलें व त्याचा मोबदला

म्हणून अवघे तीन लाख रुपये यास मिळाले. याप्रमाणें या राज्याचे तुकडे होऊन याच्या मागें हैदर, टिपू व इंग्रज यांनीं त्याच्या राज्याची दुर्दशा करून टाकली. हा १६८७ मध्यें मरण पावला (मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, पा. १४४-१४६).

**एच्चम्मा नायक**— (स. १६१४-१६) विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील चिक्करांय किंवा रंगराय ३ रा याचा हा एक सरदार होय.

जेव्हां जगरायानें चिक्करायाला कैद केलें तेव्हां त्याला सोडविण्याची यानें बरीच खटपट केली व गुप्त रीतीनें चिक्करायाचा एक मुलगा आपल्याजवळ आणून ठेविला.

चिक्करायाच्या वंशाचा भयंकर रीतीनें नाश झाल्याचें कळल्यावर याला जगरायाचा अतिशय राग आला व त्याला (जगरायाला) यानें लढाईचें आव्हान दिलें. जगराय व एच्चम्मा नायक यांच्यामध्यें लढाई होऊन तींत जगरायाचा पराभव झाला व त्याला जंगलाचा आणि पहाडांचा आश्रय करणें भाग पडलें. जगरायाचा पराभव केल्यावर यानें राजपुत्रास विजयनगरचे गादीवर बसविलें व तो राजा असल्याचें जाहीर केलें. त्या वेळीं बरेच सरदार लोक याच्या पक्षास येऊन मिळाले. त्यामुळें याचा पक्ष बळकट झाला व दिवसेंदिवस याच्या पक्षास यश येऊं लागलें.

अशा रीतीनें यानें एक प्रकारची मोठी कामगिरी बजाविली. वरील सर्व गोष्टी स. १६१४ पासून १६१६ पर्यंत घडल्या असाव्या.

**एडवर्ड ह्यूज**—(स. १७२१?-१७९४) इंग्रजांचा हिंदुस्थानांतील नौकायोद्धा.

ह्यास आपल्या मुत्सद्देगिरीची फार मोठी घमेंड होती व त्यामुळें हा इतरांच्या कारभारांत ढवळाढवळ करीत असे. यानें आपले कांहीं पगारी हेर पुण्यास ठेविले होते. परंतु नाना फडणवीसानें त्यांना पकडून कैदेंत ठेविलें. तेव्हां यानें २०० पगाराचा एक ब्राह्मण हेर ठेविला, व इंग्रजांशीं तह करणें किती फायद्याचें आहे, ह्याचीं पत्रें यानें पुणें दरबारीं पाठविण्याचा सपाटा चालविला होता (म. रि. उ. वि. १, पृ. ३९७).

**एडेन जॉर्ज**-(लॉर्ड ऑकलंड)—(स. १७८४-१८४९) हा एक हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होय (स. १८३६-४२). ऑक्सफोर्ड येथें शिक्षण संपवून स. १८०९ मध्यें हा वकिली करूं लागला. स. १८१४ त बाप वारल्यावर बॅरन ऑकलंड या नांवानें हा हौस ऑफ लॉर्ड्सचा सभासद झाला. स. १८३० त बोर्ड ऑफ ट्रेड-(व्यापारी मंडळ) चा अध्यक्ष व टांकसाळीवरचा मुख्य अधिकारी झाला व स. १८३५ त हा गव्हर्नर जनरल म्हणून हिंदुस्थानांत आला.

यानें हिंदी लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिलें. यात्रेकरूंवरील कर, देवस्थानावरचा सरकारी ताबा, लोकांच्या धार्मिक संस्कारांच्या वेळीं कंपनीचें सैन्य व अधिकारी यांनीं हजर राहणें यांसारख्या गोष्टी बंद केल्या. या वेळीं इंग्लंडचा परराष्ट्रीय मंत्री लॉर्ड पामर्स्टन हा होता. याच्या चिथावणीनें त्यानें अफगाणिस्थानांत थोडी खळबळ दिसतांच त्याशीं युद्ध पुकारलें (स.१८३८). त्या युद्धांत इंग्रजांचा पूर्ण मोड होऊन ब्रिटिश सैन्याची सरसहा कत्तल करण्यांत आली. आपलें धोरण चुकलें व पहिल्या चुकीची दुरुस्ती करण्यास अवसर न देतां डायरेक्टरांनीं दुसरा गव्हर्नर जनरल नेमला, या दुहेरी अपमानांत याला स्वदेशाचा रस्ता धरावा लागला. पण अधिकारावर असलेल्या याच्या पक्षानें याच्या चुकांवर पांघरूण घालून याला पहिला आरमारी अधिकारी नेमिलें.

**एरेप्रगड**—तेलगू कवि. यास तेलगू वाङ्मयांत फार मान आहे. यास 'प्रबंधपरमेश्वर' अशी पदवी आहे. याचें हरिवंश नांवाचें काव्य प्रसिद्ध आहे. या हरिवंशापेक्षांहि महाभारताचा वनपर्वापैकीं राहिलेला भाग यानें पूर्ण केला म्हणून याची प्रसिद्धी आहे. तेलगू भाषेंत महाभारत तीनशें वर्षांत तीन व्यक्तींकडून पुरें झालें. त्या तिघांपैकीं हा एक होय.

**एरेमाधवराय**—हा एक व्याकरणकार असून विजयनगरच्या दुसऱ्या व्यंकट राजाच्या दरबारांतील पंडितांत याची गणना होत होती.

यानें 'त्रिपदद्योतिनि' हा ग्रंथ व्याकरण विषयावर लिहिला आहे (आरविंदु डिनॅस्टी, पृ. ५२१).

**एरेयंग रट्ट**—(स. १०४०) हा रट्ट घराण्यांतील एक राजा. हा कन्नकैर पहिला याच्या मागून गादीवर आला. हा जैनधर्मी व यादवांचा मांडलिक होता.

**एरेयंग होयसळ**—हा होयसळ घराण्यांतील विजयादित्याचा मुलगा. याची पत्नी महादेवी. ही उच्चंगीच्या इरुकपाळ पांड्याची मुलगी.

**एलम्मा गारु**—वल्लभाचार्यांची माता, व लक्ष्मणभट्टाची पत्नी.

**एलय रेड्डी**—प्रतापरुद्राचा सर्वाधिकारी.

**एलल**—सिलोन जिंकणारा चोलराजा.

**एलिझाबेथ**—(स. १५३३-१६०३) इंग्लंडची राणी. हिच्या कारकीर्दीत इंग्लंडमध्यें ईस्ट इंडिया कंपनी

हिनेंच ईस्ट इंडिया कंपनीस हिंदुस्थानांत व्यापार करण्याची पहिली सनद दिली.

**एलेन्बरो**—( स. १७९०–१८७१ ) हा लॉ एडवर्डचा मुलगा. हिंदुस्थानचा एक गव्हर्नर जनरल. याचें शिक्षण ईटन व केंब्रिज येथें झालें. परराष्ट्रीय राजकारणांत याचें फार लक्ष असे. सिंधच्या अमिराशीं विनाकारण युद्ध करून तो प्रांत यानें बळकाविला. यानें गुलामगिरी अमान्य ठरविली. लॉटरी बंद केल्या. बंगालमधील पोलिसांची सुधारणा केली. अफगाणिस्थानासंबंधीं याचें धोरण, सिंधची जप्ती, ग्वाल्हेर-वर मोहिम या त्याच्या कारकीर्दीतील मुख्य गोष्टी. स. १८४१ त हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला. इंग्लंडांत हा स. १८४६ त आरमारी अधिकारी झाला.

**एलेल शिंगण**—हा तामिळ भाषेंतील कुरल काव्याचा कर्ता तिरुवळुवर याचा मित्र होता. त्या वेळचा हा प्रमुख होता. याचे सर्व व्यवहार दर्यामार्गानें चालत होते. याच्या नांवाचा शेवटला शब्द सिंगण हा बेटाशीं संबंध दाखवितो ( मनु चोल पाहा ).

**एल्फिन्स्टन मौंट स्टुअर्ट**—( स. १७७९-१८५९ ) पेशवाईअखेरचा पुण्याचा रेसिडेंट. हा स्कॉटलंडमधला असून याचा जन्म ता. ६-१०-१७७९ रोजीं झाला. ता. २६-२-१७९६ रोजीं कंपनींत नोकरी मिळून हा कलकत्त्यास आला. फोर्ट वुइल्यम कॉलेज, कलकत्ता, येथें परीक्षेकरितां दाखल झाला ( स. १८०० ). पुण्याच्या रेसिडेंटचा असिस्टंट सेक्रेटरी झाला ( स. १८०१ ). नागपूरचा रेसिडेंट झाला ( स. १८०३ ). नंतर शिंद्याचे दरबारीं थोडें दिवस काम केल्यावर जुलै स. १८०८पासून काबूल येथें वकील होता. तेथून स. १८१० च्या जूनमध्यें पुण्याचा रेसिडेंट झाला. स. १८१९-१८२७ पर्यंत हा मुंबईचा ले. गव्हर्नर होता. हा मुत्सद्दी तसा शिपाईहि होता. शेवटीं हा स. १८५९ मध्यें स्कॉटलंडांत गेला. याचें चरित्र मराठी व इंग्रजी भाषांत ( काटन, कोलब्रुक ) अनेकांनीं लिहिलें आहे. याचा राजकीय पत्रव्यवहार व डायरी प्रसिद्ध आहेत.

**एल्यट**—हा एक इंग्रजांचा वजनदार वकील होय. स. १७७७ त हेस्टिंग्सनें याला व जेम्स एंडरसन आणि कॅ. कॅंपबेल यांना भोसल्यांचें मन वळविण्याकरितां नागपुरास पाठविलें. वरील तीन वकीलांपैकीं हा फार हुशार होता. पण नेमल्या ठिकाणीं पोंचण्यापूर्वीच हा वाटेंत ता. १२-९-१७७८ रोजीं मरण पावला. त्यामुळें याच्या हातून जें कारस्थान हेस्टिंग्स यास घडवून आणावयाचें होतें तें लांबणीवर पडलें ( म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. २५५-५६ ).

**एल्हण**—एल्हण व चाल्हण हे दोन महानुभाव मराठी कवि, १४ व्या शतकांतील सर्वांत श्रेष्ठ कवि होत. एल्हण यानें ब्रह्मविद्येच्या किंवा मोक्षसाधनाच्या मागें फारसें न लागतां कृष्णचरित्राचें प्रवचन केलें आहे. याचा 'अष्टविवाह' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचें नांव 'श्रीकृष्णषोडशसहस्रविवाहअष्टस्वयंवरवर्णन' असें आहे. याचे एकंदर १२ भाग किंवा प्रसंग आहेत. "ऋषि कथांचेनि कथाविलासें। पुराण शरचंद्र उदैला पूर्णप्रकाशें । तेथ गळतेनि श्रीकृष्णकथामृतरसें । निर्भर भोंवरिये चकोरू ॥" असें पहिल्याच प्रसंगांत सांगून कवीनें स्वयंवरवर्णनास सुरुवात केली आहे. पहिल्यांत रुक्मिणीहरण वर्णिलें आहे. दुसऱ्यांत जांबुवंतीस्वयंवर-वर्णन आहे. तिसऱ्या, चौथ्या व पांचव्या प्रसंगांत स्यमंतकमणि व सत्यभामेची प्राप्ति यांची कथा आहे. यांत इतर आख्यानेंहि ओघानें आणिलीं आहेत. याप्रमाणेंच पुढें मित्रविंदा, लक्ष्मणा, भद्रा, कालिंदी वगैरेंच्या गोड कथा गोड भाषेनें सांगत सांगत कवीनें दहाव्या भागापर्यंत ग्रंथ आणिला आहे. अकराव्यांत सोळा सहस्र रूपें धारण करून या मदनसरोवरांतल्या राजहंसानें, सौंदर्यतरंगिणीकांठच्या अखंड राजहंसींच्या गळ्यांत मंगळसूत्रें बांधल्याची हकीगत आहे. शेवटच्या प्रसंगांत या सर्व कांतांसह श्रीकृष्णानें वसंतक्रीडा केल्याचें वर्णन आहे व तें नवरसांनीं परिपूर्ण असून अत्यंत सुंदर भाषेंत लिहिलें आहे ( मंडलीक एल्हन पाहा ).

**एळेर**—( ख्रि. पू. २०५–१६१ ) यास उजु टोळींतील द्रमिळ म्हणत असत. यानें चोलांच्याकडून सिलोन घेतलें; आणि सिंहली राजा असेल यास ठार मारलें. यानें चव्वेचाळीस वर्षे राज्य केलें (मनु चोल पाहा).

**एंटियोकस दि ग्रेट**—या ग्रीक राजानें काकेशस पर्वत ओलांडून भारतांत प्रवेश केला व सोफागसेनस (वृषसेना)शीं तह केला. याला दीडशें हत्ती मिळाले, असें ग्रीक लेखक पोलिबिअस यानें लिहिलें आहे. नंतर हा परत गेला. पण याच्या सरदारांनीं शालिशूकाच्या वेळीं ( ख्रि. पू. २०७–२०६ ) पाटलीपुत्रापर्यंत देश ताब्यांत घेतला होता, असें गार्ग्यसंहितेवरून दिसतें.

# ऐ

**ऐनुद्दीन मुहम्मद खाजा जहान**—खानदेशमधील फारुकी घराण्याचा मूळ पुरुष. याचा पुत्र मलिक.

**ऐनुन्मुल्क**—( स. १३०५–१३४३ ) अयोध्या प्रांताचा सुभेदार. स. १३०४-५ चे सुमारास अलीबेग नांवाच्या मोगल सरदारानें हिंदुस्थानावर स्वारी केली आणि हिमालयाच्या पायथ्यापर्यंत त्यानें लुटालूट केली. तो परत जात असतां त्याला जोरकसपणें तोंड देणाऱ्यांपैकीं हा एक होता. म्हणून अलाउद्दीन खल्जीनें याला मुलतानची सुभेदारी दिली आणि याकडे माळव्यांतील जालोर, उज्जयनी, चंदेरी वगैरे हिंदु राज्यें जिंकण्याची कामगिरी सोंपविली. त्याप्रमाणें ९ डिसेंबर स. १३०५ रोजीं यानें माळव्याचा राजा कोक ऊर्फ हरनंद याचा पराभव करून उज्जयिनी, मांडू, धार, चंदेरी वगैरे ठिकाणीं मुसलमानी सत्ता स्थापन केली. यामुळें जालोरचा कानिरदेव चौहान याला शरण गेला आणि दिल्लीस जाऊन मांडलिक झाला. मुबारकचा खून करून खुस्रवनें दिल्लीचें तक्त घेतलें तेव्हां याला आपल्या पक्षांत ओढण्याकरितां आलमखान व अमीर-उल्-उम्रा या पदव्या देण्यांत आल्या ( स.१३२० ). मुहम्मद तुघ्लकनें याला अयोध्येचा सुभेदार नेमलें. स. १३३६ मध्यें दिल्ली प्रांतांत दुष्काळ पडला आणि तो ७ वर्षे टिकला.

याच्या शांततेच्या कारभारामुळें याच्या प्रांतांत सुबत्ता होती. धान्याचीं कोठारेंहि भरलेलीं होतीं. पण लुटीच्या भीतीनें तेथील धान्य दिल्लीकडे आणतां येईना. म्हणून मुहम्मदानें गंगेच्या पश्चिमतीरावर जुन्या खोर शहराजवळ स्वर्गद्वार नांवाचें शहर वसविलें आणि दिल्लीचे लोकांस तेथें वस्तीस नेलें. आणि त्याची सर्व व्यवस्था याच्याकडे सोपविली. दिल्लीहून तेथें राहावयास आलेल्या खानदानीच्या व गुन्हेगार अशा दोनहि लोकांची याच्यावर फारच मर्जी बसली. मुहम्मदला ही गोष्ट धोक्याची वाटून गुन्हेगार लोकांना परत धाडावें असा त्यानें हुकूम धाडला आणि याची दक्षिणेंत कुतलघखानाचे जागीं बदलीहि करण्यांत आली. दक्षिणेंत मुसलमानी सत्ता डळमळीत असल्याचें याला ठाऊक असल्यानें यानें तिकडे जाण्यापेक्षां लोकप्रियतेचा फायदा घेऊन अला उद्दीन असें नांव घेऊन बंड उभारलें आणि मुहम्मदहि याच्या भीतीनें कनोजसारख्या सुरक्षित जागीं पळाला पण हाहि कनोजवर चालून आला. पण शेवटीं याचा पराभव होऊन याला अर्धनग्न स्थितींत मुहम्मदपुढें उभें करण्यांत आलें. पण त्यानें याची सेवा ध्यानांत घेऊन प्रथम तुरुंग व नंतर पुनः अयोध्या प्रांतावर नेमिलें.

**ऐबक**—( कुत्बुद्दीन पाहा ).

**ऐवजखान**—हा एक निजामाचा सरदार होता. पूर्वी हा वऱ्हाडांत कामावर होता. शाहूनें याच्याशीं सुमंतामार्फत तहाचें बोलणें सुरू केलें होतें. यानें चिमाजी अप्पावर स्वारी केली ( म. रि. म. १, पृ. १६८, २९५ ). याचा पहिल्या बाजीरावानें पराभव केला होता ( राजवाडे प्रस्तावना १३६ ).

# ओ

**ओढेकरवंश**—( खंडेराव त्रिबकराव पाहा ).

शिवाजी शंकर ( ओढेकर )

| | | |
|---|---|---|
| रंगराव शिवदेव ( मृ. गोहदचे लढाईत ) | त्रिबकराव शिवदेव ( राक्षसभुवनावर पराक्रम ) | माधवराव शिवदेव (पवारांचा दिवाण) |

| | | |
|---|---|---|
| खंडेराव | शिवराम | रंगराव |

गणपत शिवराम

( म. रि. उ. १, पा.५०७ ).

**ओपीली सिद्धी २ रा**—तेलगू चोल वंशांतील प्रमुख. याचा उल्लेख गणपतीच्या शिलालेखांत आढळतो. यानें कारमांडु जिंकलें होतें. याचा उल्लेख कृष्णा प्रांतांतील कोणीदेनाजवळच्या शिलालेखांत सांपडतो.

**ओबना नायक**—( स. १५४२–१५६९ सुमार ) हा तिम्मण नायकाचा मुलगा. हा आपल्या बापानंतर चित्तळदुर्गच्या गादीवर आला. हा विजयनगरच्या सदाशिवरावाचा समकालीन दोता.

**ओबराय**—( अदेलराय पाहा ).

**ओबाला**—विजयनगरच्या आरविंदु घराण्यांतील श्रीरंग राजाचा मुख्य सेनापति होता. यानें सेनापतीचें काम स. १५७२ पर्यंत केलें (आरविंदु डिनस्टी, पृ.२६७).

**ओंकार**--हा 'पळसी' गांवचा राहणारा असून 'पहाडसिंग' नांवाच्या राजाचा आश्रित होता. याचें उपनांव 'चोरमागे'. हें उपनांव पडण्याचें कारण, याच्या कोणा पूर्वजास 'चोर' म्हणून सुळावर देत असतां त्यास एका महानुभावपंथी साधूनें सोडविलें व त्यास आपल्या सांप्रदायांत मागून घेतलें म्हणून त्यास 'चोरमागे' हें उपनांव पडलें. त्याच्या कुलांत हा 'ओंकार चोरमागे' झाला. हा विठ्ठलाचा समकालीन होता. याचें 'लक्ष्मणास्वयंवर'-कृष्णपत्नी लक्ष्मणा हिच्या चरित्रावर काव्य आहे. याचे सात सर्ग असून ४४२ पदें आहेत. दक्षामकर, ललिता, वगैरे नवीं नवीं अक्षरवृत्तेंहि याच्या ग्रंथांत आलीं आहेत. याच्या या 'लक्ष्मणास्वयंवरां'त 'चौरसबंध' 'नवरस-बंध' 'गोमुत्रिकाबंध' वगैरे 'बंध' मराठी भाषेंत अगदीं नवीन घालून यानें वाङ्मयोपासना केली आहे. याचा 'गोमुत्रिकाबंध' असाः-'कुरंगणी जया**परी। परीस** सांपडे **वनीं॥ वनीं** भवार्णवीं **हरी। हरी** हरी त्वरा करी ॥' याच्या काव्याचा रचनाकाल शा. श. १६३० असें हा लिहितो. यानें छंदरचनेंत बरीच भर टाकली आहे (म. सा. भाग २).

# औ

## ओक अथवा अवुक घराणें

१ बुक्क (मूळ पुरुष) स. १४७३-१४८१

सिंग (नंदेल किंवा नद्याळ येथें).

२ रामराज (स.१४८१-१५०८)- पत्नी सम्वकाम्म

३ तिम्म, कोंड, श्रीरंग (स. १५०८-१५३६).

४ नल्लतिम्म, येसतिम्म (स. १५३६-५५), तिरुन्नाथ, अप्पळ, ओजलप्पति

५ रघुनाथ (स.१५५५-५८), १९ नारायण (स.१७७१-८५)

६ पेद्द कृष्णम (स. १५५८-८८), ७ चिन्न कृष्णम (स.१५८८-१६१८)

८ ओजलवति (स.१६१८-१६४६)

९ नरसिंह(स.१६४६-६८)

१० राघव (स.१६६८-९१)

११ पेद्द कुमार राघव (स.१६९१-१७३५) निपुत्रिक

दासम

१२ अप्प नरसिंह (स.१७३५-३७)

(याची विधवा) १३ चेलम्मा

(पणतु) नरसिंह

१६ ओजलपति (स.१७५१-५९)

१५ किचम (१७४३-५१) राघव

१४ नरसिंह (१७३९-४३) कुमार राघव (स.१७५९-६७)

व्यंकटकुमारराघव

१८ व्यंकट नरसिंह (१७६७-७१)

२० कृष्ण (१७८५-१८०५)

हें घराणें विजयनगरच्या राजघराण्यापैकीं होय. तिम्माची जहागिर ओक येथें होती म्हणून यांना ओक घराणें म्हणतात. यांच्या तारखा ऐतिहासिक गोष्टींशीं जमतात.

**ओट्रॅम, सर जेम्स**--(स. १८०३-१८६३) प्रख्यात ब्रिटिश सेनापति. यानें स. १८५७ सालाच्या बंडांत लखनौचा वेढा उठविण्यांत व बंड मोडण्यांत शौर्य गाजविलें. याचें आयुष्य हिंदुस्थानांत गेलें. यास मोठ्या सन्मानानें वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें पुरण्यांत आलें.

**औमा**--गोपीचंद राजाची महाराणी. हिच्या सांगण्या-वरून गोपीचंदानें आपल्या आईच्या गुरूस --जालंदरास-- लिदींत पुरलें.

**औरंगजेब**-(स. १६१८-१७०७) याचें संपूर्ण नांव मुहिउद्दीन मुहम्मद औरंगजेब असें आहे. हा शहाजहान

बादशहास अर्ज मंदबानू मुमताजमहाल हिचे ठिकाणीं झालेलें सहावें अपत्य होय. जहांगीर हा अहमदनगरच्या स्वारींहून आग्र्यास परत जात असतां पंचमहाल जिल्ह्यांतील दोहद गांवीं याचा जन्म झाला ( स. २४ आक्टो. १६१८ ). जसा याचा जन्म स्वारींत झाला तसा याचा मृत्यु देखील स्वारींत झाला.

शहाजहान दक्षिणेंत होता आणि औरंगजेब व दारा लाहोर येथें नूरजहानच्या देखरेखीखालीं होते. पण लवकरच शहाजहान गादीवर आला आणि याला पंधरा हजारांची नेमणूक होऊन याच्या शिक्षणास आरंभ झाला.

शहाजहानचा प्रख्यात वजीर सादुल्लाखान, मीर मुहम्मद हशीम, मुल्ला सालिह हे याचे शिक्षक होते. याला कुराण चांगलें अवगत होतें. अरबी व फार्सी भाषा याला एखाद्या मौलवीप्रमाणें येत असत. याला हिन्दी भाषा व्यावहारापुरती येत असे. बल्क व कंदाहार प्रांतांत हा कामावर असल्यानें चघताई व तुर्की याहि भाषा याला समजत होत्या. अरबी लिपींत लिहून कुराणाच्या दोन प्रती यानें मक्का व मदीना येथें पाठविल्या होत्या. दिल्ली येथें याच्या हातची एक कुराणाची प्रत निजामुद्दीन अवलियाच्या दर्ग्यांत ठेवलेली आहे.

याच्या पत्रांतून निरनिराळ्या म्हणी व काव्याचे उतारे येतात. तथापि याला धार्मिक गोष्टींची आवड असे. कुराण, त्यावरील टीका, मुसलमानी धर्मशास्त्र, महमूद गझनीचे ग्रंथ व इतर धार्मिक ग्रंथांचा याचा अभ्यास असे. त्यामुळें दरवेशी व अवलिया यांची संगति यास आवडे.

हा गादीवर आला तेव्हां यानें दरबारांतून गाणेंबजावणें बंद केलें. तेव्हां सर्व गवई लोक बेकार झाले. तेव्हां त्यांनीं आपलें गाऱ्हाणें याच्या कानावर घालण्याकरितां एक मोठी मिरवणूक काढली. आणि मिरवणुकीची गडबड हा प्रार्थनेकरितां मशिदींत जातांना याच्या कानावर येईल अशी व्यवस्था केली. ठरल्याप्रमाणें बादशाहाच्या कानावर गडबड येतांच यानें चवकशी केली. तेव्हां याला सांगण्यांत आलें कीं 'गायनकलेची प्रेतयात्रा निघाली आहे.' तेव्हां यानें बिलकुल न हंसतां उत्तर दिलें कीं, 'तिचें असें दफन करा कीं ती पुनः केव्हांहि डोकें वर काढणार नाहीं.' यावरून याचा स्वभाव व्यक्त होतो.

हा चौदा वर्षांचा असतांना साठमारींतील एका हत्तीनें याच्यावर हल्ला केला. तेव्हां यानें न डगमगतां त्या हत्तीला जखमी करून हल्ला परतवला. या याच्या धाडसाबद्दल शाहजहाननें याची सुवर्णतुला केली आणि दोन लक्ष रुपये बक्षीस, तो हत्ती आणि 'बहादूर' ही पदवी दिली.

स. १६३५ मध्यें याला बुंदेल्यावर पाठविण्यांत आलें. तेथील जुझर राजा जहांगीरच्या वेळेपासून मोगलांना त्रास देत होता. त्याला ठार करून यानें त्याची राजधानीहि ताब्यांत घेतली. या वेळीं हा नांवाचा सेनापति होता. खानजहान वगैरे तीन कर्ते सेनापति होते, पण या जयामुळें याला दक्षिणचा सुभेदार नेमलें व हा दौलताबादेस राहण्यास गेला ( १४ जुलै १६३६ ).

दक्षिणेंत शहाजी भोसले हा त्या वेळीं हुसेन निजामशाहाला पुढें करून निजामशाही तगविण्याचा प्रयत्न करीत होता. पण शेवटीं त्याला हार खावी लागली व बाल निजामशाहाला मोगलांच्या ताब्यांत द्यावें लागलें. या स्वारींतहि खानजहान प्रमुख होता. तो पुढें औरंगजेबाचा सल्लागार झाला. यानंतर यानें औसा, उदगीर हीं घेऊन बागलाणचा राजा बैरामशाह याच्यावर स्वारी केली. तेथील सालेर व मुल्हेर येथील अजिंक्य समजले जाणारे किले जिंकून सर्व बागलाण ताब्यांत घेतला ( ४ जून १६३८ ); आणि बैरामशाह हा मोगलांचा तीन हजारी सरदार बनला. शहाजीचा मोड केल्याबद्दल याला बढती देऊन बादशाहानें बारा हजारी केलें; आणि बागलाण घेतल्याबद्दल पंधरा हजारी ( १५ हजार घोडदळ व ९ हजार पायदळ ) करण्यांत आलें ( २३ फेब्रु. १६३९ ). यानें १४ जुलै १६३६-मे १६४४ पर्यंत दक्षिणची पहिली सुभेदारी केली. या आठ वर्षांत चारदां हा आपल्या बापास भेटण्यास गेला होता. आपल्या मागें बहुधा हा शाहिस्तेखानास आपल्या कामाचा अधिकार देऊन जाई.

पूर्वी शहाजहानच्या पदरीं असणाऱ्या पण नंतर विजापूरकराकडे गेलेल्या आणि शेवटीं वेरूळ येथें राहून मोगलांविरुद्ध बंड करणाऱ्या खेळोजी भोसल्याला यानें पराभूत करून ठार केलें ( आक्टो. १६३९ ).

याची बहीण जहानआरा ही भाजल्यामुळें तिला पाहण्याकरितां हा आग्र्यास गेला ( २ मे १६४४ ). तेथें गेला असतां याला कांहीं दुष्कृत्यावरून नोकरीवरून बडतर्फ करण्यांत आलें; आणि याची नेमणूकहि बंद करण्यांत आली. पुढें जहानआराच्या सांगण्यावरून समजूत झाल्यावर याची गुजराथच्या सुभेदारीवर नेमणूक केली ( १६ फेब्रु. १६४५ ). तेथें हा स. १६४७ च्या जानेवारीपर्यंत होता. नंतर याची बल्क व बदकशान प्रांताच्या सुभेदारीवर सालिना साठ लक्षाच्या नेमणुकीवर योजना झाली.

बल्क व बदकशान येथील नजर मुहम्मदास लोकांनीं पदच्युत केलें आणि त्याचा मुलगा अबदुल अझीझ यास गादीवर बसविलें. पण ही संधि साधून शहाजहाननें 'हे प्रांत मूळ बाबरचे' असें कारण दाखवून स्वारी केली. मुरादनें बल्क घेतलें ( २ जुलै १६४६ ). परंतु मुराद लवकरच परत आल्यामुळें तिकडे पुनः बंडाळी उत्पन्न झाली. ती मोडण्याकरितां एक लक्ष रुपयांचा नजराणा देऊन अलिमर्दान व २५,००० सैन्यासह हा रवाना गेला ( २५ मे १६४७ ). बल्क जिंकून बदकशानकडे जात असतां याचा पराभव होऊं लागला व उझबेक पठाण याला फार त्रास देऊं लागले. तेव्हां बल्क शहर व किल्ला नजर मुहम्मदाच्या नातवास देऊन हा काबूलकडे परत फिरला ( १ आक्टो. १६४७ ). वाटेंत परत येतांना पठाण व वादळ यांमुळें याचें सुमारें दहाहजार सैन्य गारद झालें. या स्वारींत मोगलांचा कवडीचाहि फायदा न होतां चार कोट रुपयांचा चुराडा झाला.

यानंतर यास मुलतानचा सुभेदार नेमलें (मार्च १६४८). या जागेवर हा १४ जुलै १६५२ पर्यंत होता. एवढ्या काळांत यानें इराणी लोकांवर दोन स्वाऱ्या केल्या; पण इराणी लोकांच्या तोफखान्यापुढें याचा कांहीं उपाय चालेना. पण या स्वाऱ्यांतील अपयशामुळें बारा कोटींचें नुकसान झालें; व बादशाहाची याच्यावर फार इतराजी झाली. वास्तविक सैन्याच्या हालचाली काबूलहून बादशहाच करीत असल्यामुळें अपयशाची जबाबदारी त्यावरच होती. यानंतर यानें सिंधची बंडाळी मोडली आणि याची पुनः दक्षिणच्या सुभेदारीवर नेमणूक झाली.

दक्षिणेंत हा बऱ्हाणपुरास आला ( १० जुलै १६५२ ) आणि गांवाबाहेर कांहीं दिवस राहिल्यावर राजवाडा तयार झाला आणि हा तेथें राहण्यास गेला. तेथेंच हिराबाई नांवाच्या आपल्या मावशीच्या तैनातीस असलेल्या स्त्रीस आपल्या जनानखान्यांत घेऊन तिचें नांव झैनाबादीमहाल असें ठेवलें. बादशाहाचा पुढें जाण्याचा तगादा असतांहि यानें नऊ महिने तेथें काढले. नंतर हा दौलताबादेस आला. तेथें यानें चार वर्षे काढलीं. विजापूर व गोवळकोंडा यांवर स्वाऱ्या केल्या. अकबर नांवाचा याला मुलगा झाला ( ११ सप्टें. १६५७ ). याची आवडती दिलरसबानू मेली ( ८ आक्टो. १६५७ ); आणि याची आवडती रखेली झैनाबादीहि मृत्यु पावली. येथें असतांना जवळील सातारे गांवचें खंडोबाचें देऊळ व मूर्ति फोडून यानें मुरळ्या वाहण्याची चाल बंद केली. खडकी ऊर्फ औरंगाबाद हें आपल्या नांवचें गांव वसवलें. एका छबिलराम नांवाच्या बीडच्या कानगोनें पैगंबराबद्दल अप्रयोजक शब्द वापरल्याबद्दल न्यायाचा फार्स करून त्याचा शिरच्छेद केला. त्याच्या आप्तानें बादशाहाकडे तक्रार केली असतां गुप्त पत्र लिहून हें प्रकरण मधल्यामधेंच दडपून टाकून बादशहापर्यंत न जाईल अशी व्यवस्था केली. तेथें यानें बांधलेला राजवाडा अजून अलमगिरी महाल या नांवानें पडक्या स्थितींत दाखवला जातो. या खेपेस यानें इकडे आल्यापासून मुर्शिदकुलीखानाच्या द्वारां वसुलाची चांगली व्यवस्था केली. तूट न येईल अशी व्यवस्था करून वसूल वाढविला. जिकडे तिकडे नवे लोक भरून प्रत्येक स्वाराचा वीस रुपये पगार ठरवून दिला. रद्दी लोक व हत्यारें नाहींशीं करून सैन्याचा दर्जा वाढविला. शहाजहानच्या हुकुमावरून गोंडवनच्या पैकीं देवगडचें राज्य जिंकलें. ( जाने. १६५६ ) व तेथील राजास मांडलिक बनविलें. पुढें स. १६५७ त देवगडच्या गोंड राजानें मुसलमानी धर्म स्वीकारला आणि पुढें यास मराठ्यांविरुद्ध मदत केली. यानें त्यास बुलंदबख्त ( नशीबवान् ) अशी पदवी दिली ( स. १६८६ ). जव्हारचा राजा खंडणी देईना म्हणून त्यावर रायकरण यास पाठवून त्याचा पराभव केला व त्याला मांडलिक केलें ( ४ जाने. १६५६ ).

खंडणी थकली, कर्नाटकच्या स्वारींत मोगलांची परवानगी घेतली नाहीं, वगैरे कारणें काढून यानें गोवळकोंड्याच्या अबदुल्ला कुत्बशाहावर आपल्या मुलाच्या लग्नाच्या निमित्तानें स्वारी करून विश्वासघातानें त्याला ठार करण्याचा प्रयत्न केला, पण तो हैद्राबादेहून गोवळकोंड्याच्या किल्ल्यांत पळाला व तेथें दोन महिने वेढा घालून यास तह स्वीकारावा लागला ( स. १६५६ ). पुढें मीरजुम्ला यास 'कर्नाटक द्यावा कारण तो प्रांत त्याची जहागीर आहे.' म्हणून बादशहानें हुकूम पाठविला. पण बादशाहाच्या आजारीपणाचा फायदा घेऊन कुत्बशाहानें तसें केलें नाहीं, कर्नाटकचा राजा श्रीरंगराय यासहि उलट बाजूकडून लांच घेऊन कबूल करूनहि मदत केली नाहीं. पण विजापूर व गोवळकोंडें येथील आदिलशाही व कुत्बशाही हीं दोनहि राज्यें कांहींतरी तक्रारी काढून साम्राज्यविस्ताराच्या नादीं लागून यानें बुडवलीं.

अली आदिलशाह खरा वारस नाहीं म्हणून प्रथम यानें भांडण उकरून काढून त्यावर स्वारी केली व भालकी येथें आदिलशहाचा मोड केला (एप्रिल१६५७). पण बादशाहानें हुकूम केल्यावरून यानें आदिलशाहाशीं तह केला. याच वेळीं शिवाजीमहाराजांनीं आदिलशहाची बाजू घेऊन जुन्नर ते थेट औरंगाबादपर्यंतचा मुलूख व खुद्द अहमदनगरहि

एका उतारानें अचानक औरंगजेब नदी उतरला (२३ मे) व तो तडफेनें आग्र्याकडे वळला. त्यामुळें दाराचा सर्व बेत फसला आणि त्याला आपला अवजड तोफखाना टाकून आग्र्याकडे वळावें लागलें. दोनहि भावांची गांठ आग्र्यापासून पांच कोसांवरील यमुनेच्या काठच्या समुगड गांवीं पडली. पण दारानें तेथें सरळ औरंगजेबावर हल्ला न चढवतां त्याच्या हल्ल्याची वाट पाहत त्याला आडवा होऊन राहिला. पण त्याचा फायदा औरंगजेबाला झाला. त्याचें दमलेलें सैन्य ताजें झालें आणि याचें सैन्य उन्हानें जायबंदी झालें. रात्रीं औरंगजेबानें आपल्या सैन्याला अनेक आश्वासनें देऊन उत्तेजित केलें.

दुसऱ्या दिवशीं लढाई सुरू झाली. पण दाराची जागा वाईट, तोफखाना कमकुवत, सैन्यांत फितुरी, शिलकी सैन्याचा अभाव यांमुळें रजपूत लोक शौर्यानें लढले तरी दाराचा अखेर पराजय झाला. दाराला आपल्या सैन्यावर सारखा ताबा ठेवतां येईना. शेवटीं जलद हालचाल करण्याकरितां तो हत्तीवरून घोड्यावर उतरला, पण ही त्याची मोठी चूक झाली. मालक दिसेनासा झाल्यावर सैन्य पळूं लागलें, आणि याचा जय झाला. दारा रातोरात आग्र्यावरून दिल्लीकडे पळाला. शहाजहाननें आग्रहपूर्वक भेटीस बोलावलें असतां लाजेनें त्याला त्यानें तोंडसुद्धां दाखवलें नाहीं. औरंगजेबानें जय झाल्यावर मुरादचें अभिनंदन केलें आणि "तुझें राज्य सुरू झालें" असा त्याचा गौरव केला. ३ जूनला आग्रा शहर काबीज केलें आणि तेथील कोतवालाला फांशीं दिलें. शहाजहानच्या भेटीस न जातां वेढा घालून व शेवटीं तर किल्ल्याचें पाणी बंद करून किल्ला ताब्यांत घेतला; व १० जूनला उघडपणें दरबार भरवून सर्व सत्ता आपल्या ताब्यांत घेतली. दोन दिवसांत सर्वत्र आपले लोक नेमून १३ जूनला तो दिल्लीस दाराच्या पाठलागास निघाला. तत्पूर्वी मुरादास कपटानें पकडून कैद केलें; नंतर अलाहाबाद घेतलें व आग्र्याची उजवी बाजू बळकट केली. दिल्लीस थोडे दिवस विश्रांति घेण्याचें ठरवून सुलेमान शुकोहवर शाहीस्तेखानास पाठवून बहादुरखानास दारावर पाठविलें. आणि २१ जुलै रोजीं दिल्लीबाहेरील शालिमर बागेंत स्वतः तक्तारूढ झाला; व 'आलमगीर गाझी' अशी पदवी धारण केली. दाराचा पाठलाग चालू असतां सुजा दिल्लीवर चालून आला म्हणून हा गुजराथेंतून दिल्लीकडे आला. प्रथम औरंगजेबानें आपला मुलगा सुलतान मुहम्मद यास सुजावर पाठविलें त्यांची खजवा येथें गांठ पडून लढाई झाली. औरंगजेबहि मीरजुम्ल्यासह तेथें आला. औरंगजेबाच्या सैन्याची प्रथम कांहीं हत्तीनें नासाडी केली, पण पुढें सुजाचा पराभव झाला.

दारा गुजराथेंत आल्यानंतर तेथील सुभा शहानवाझ दारास मिळाला. त्या दोघांनीं औरंगजेबाशीं देवराई येथें लढाई दिली ( १२–१४ मार्च १६५९ ). जसवंतसिंगहि दाराला मिळाला होता, पण त्याला औरंगजेबानें फोडलें. याहि लढाईंत पराजय पदरीं आल्यानें दारा मेरट, अहमदाबाद, कच्छ मार्गे सिंधकडे गेला. वाटेंत त्याचे फार हाल झाले. शेवटीं विश्वासघातानें दाराला पकडून दिल्लीस आणण्यांत आलें. तेथें राजद्रोही व धर्मद्रोही म्हणून त्याला देहान्ताची शिक्षा देऊन क्रूरपणें त्याचा वध करण्यांत आला. तसेंच त्याचा पुत्र सुलेमान शुकोह यालाहि पकडून आणून विष पाजून ठार करण्यांत आलें.

खजव्याच्या लढाईनंतर सुजा प्रयाग, पाटणा व पुढें गंगेंतून मोंगीरास गेला. त्यावर औरंगजेबानें मीर जुम्लास पाठविलें. मीरजुम्लानें फितुरीनें गंगेच्या पश्चिमेकडील राजमहाल ते हुगळीपर्यंतचा प्रदेश काबीज केला. पण आरमाराच्या जोरावर त्यानें मीरजुम्ल्याशीं टिकाव धरला. औरंगजेबाचा मुलगा सुलतान मुहंमद सुजाच्या मुलीच्या लोभानें त्याला जाऊन मिळाला. ती मुलगीहि त्याला मिळाली ( ८ जून ). पण अनेक घडामोडी होऊन सुजाच्या सैन्यानें त्याला सोडलें. त्यामुळें त्यानें भावाच्या हातून मरण्यापेक्षां आराकानी लोकांत जाऊन राहण्याचें ठरविलें व हिंदुस्थानला कायमचा रामराम ठोकला ( १२ मे १६६० ).

अशी भावांची व्यवस्था लावल्यावर पूर्वी फक्त तक्तारोहण (२१ जुलै१६५८) झालें होतें त्याच्या समारंभाकरितां ५ जून १६५९ रविवार हा दिवस नक्की करण्यांत आला. त्या वेळीं प्रारंभीं दिलेलें लांबलचक नांव यानें धारण केलें. २५ लाखांपर्यंत देणग्या व बक्षिसें दिलीं. हिजरी वर्ष सुरू केलें. पारशी नवरोझ बंद केला. हा समारंभ दोन अडीच महिने चालू होता. जुलूस ( तक्तारूढ सरकारी वर्ष ) २३ मे १६५८ त हा धरण्यांत आला.

राज्यारोहणाचा समारंभ झाल्यानंतर सुलेमान व मुराद यांची वाट लावल्यावर स. १६६२–६४ पर्यंत हा काश्मीरांत राहिला. शहाजहान मेला तेव्हां हा आग्र्यास आला. तेथून पुढें १६७४ पर्यंतचा काळ यानें दिल्लीस काढला. या सालीं हा आफ्रिदी लोकांचीं बंडें मोडण्याकरितां सरहद्दीकडे गेला व तात्पुरता बंदोबस्त करून परत आला ( स. १६७६ ). याचा साहाय्यक जसवंतसिंग काबूलकडे मेल्यामुळें त्याचें अजमीरचें राज्य घशांत

घालण्याची याला दुर्बुद्धि झाली. त्या वेळीं हा दिल्लीतून बाहेर पडला ( ३ सप्टें. १६७९ ), तो पुनः दिल्लीस आला नाहीं. या वेळीं रजपूत लोकांनीं एकी करून याला विरोध केला. त्यामुळें याला जय मिळाला नाहीं आणि अजितसिंह जोधपुरचा राजा झाला. याचा पुत्र अकबरहि रजपूतांना उघड सामील झाला. आणि ज्या रजपूतांनीं मोगल बादशाही उभारण्यास मदत केली ते रजपूत याच्या विश्वासघातकी वर्तनानें विरुद्ध झाल्याबरोबर याचें बळ एकदम कमी झालें. भूपाळसिंग गोंड, भावांचे तोतये, रावकर्ण, चंपतराय बुंदेला वगैरेशीं याचे झगडे चालू होते. याचा पिता शहाजहान आग्र्याच्या किल्ल्यांत मेला तेव्हां हा त्याच्या अन्त्यविधीला सुद्धां गेला नाहीं. यानंतर हा स. १६८२ च्या मार्च महिन्यांत पुनः दक्षिणेंत आला. शिवाजीमहाराजांबद्दलच्या आदरामुळें आणि याच्या धोरणामुळें मोगलांचा दरारा बिलकुल उरलेला नव्हता. मुसलमान शाह्याहि नष्ट करण्याचें यानें धोरण स्वीकारलें होतें (सिकंदर, आदिलशाह, अबुलहसन कुत्बशाह, शहाजी, शिवाजी पाहा). मराठे तर जिवावर उदार होऊन लढत होते. शिवाजी, संभाजी, राजाराम यांना नाहींसें करूनहि मराठेशाहीचा जोर कमी होईना, तेव्हां यानें शाहूकडून भेदाचा प्रयत्न केला. पण त्याचाहि उपयोग होईना, तेव्हां हा अहमदनगर येथें येण्यास निघाला. पण वाटेंत यास मराठ्यांनीं लुटलें. या अपजयामुळें याचें दुखणें मर्यंतरीं थांबलें होतें तें उलटलें व अखेर हा नगर येथें मृत्यु पावला ( २१ फेब्रु. १७०७ ). यानें मृत्युपत्र करून आपलें राज्य तिघां मुलांस वांटून दिलें. याचा शेवट अगदीं निराशेंत झाला.

मोगल बादशहांपैकीं सर्वांत विद्वान् पुरुष हा होय. स्वधर्माचा याचा अभ्यास उत्कृष्ट होता. फतवा-इ-आलमगिरी नांवाचा मुसलमानी कायद्याचा उत्तम ग्रंथ औरंगजेबानें लिहिला आहे. या कामीं पुष्कळ विद्वान् मौलवी खपत होते. त्यांत मौलाना शेख निजाम हा मुख्य होता. औरंगजेबास कुराण तोंडपाठ येत होतें, आणि त्याचा अर्थ चांगला कळत होता. याचें हस्ताक्षर सुंदर होतें. मात्र यास कवितेची आवड नव्हती. मुसलमानी धर्मशास्त्रांतील याची विद्वत्ता अप्रतिम होती, असें मोठमोठ्या विद्वानांनीं म्हटलें आहे ( जर्नल ऑफ दि मॉस्लेम इन्स्टिटयूट, मार्च १९०७ ).

हा जितका परधर्माचा द्वेष्टा होता तितकाच स्वधर्मी शिया पंथाचा द्वेष करी. याच्या हाताखालीं शियापंथाचे अनेक लोक अधिकारी व सेनापति असतांना याचा त्या पंथाचा द्वेष कमी झाला नाहीं. 'शियांना मारणारी' असें कित्येक कट्यारींचें यानें नांव ठेविलें होतें. पत्रव्यवहारांत शियांचा उल्लेख आला तर त्यांस एखादी शिवी दिल्याशिवाय हा कधींहि राहत नसे. याच्या हाताखालचे शियापंथी कामदार याला फसवून कशी तरी वेळ भागवून नेत. विजापूर व गोवळकोंडा येथील राजे शियापंथी होते म्हणूनच त्यांना यानें समूळ नाहींसें केलें. शेख-उल्-इस्लाम नांवाचा एक विद्वान् व थोर पुरुष याजपाशीं होता त्यानें हीं राज्यें जिंकूं नयेत म्हणून याची पुष्कळ विनवणी केली, तें यानें बिलकुल ऐकलें नाहीं. तेव्हां तो शेख यास सोडून चालता झाला. यानें अनेक प्रकारें त्याला बोलावलें तरी तो पुनः आला नाहीं.

यानें अनेक देवळें उध्वस्त करून त्यांच्या मशिदी केल्या अशी प्रसिद्धी आहे. हिंदु लोकांचें पवित्र क्षेत्र जें बनारस तेथें यानें वेणीमाधवाचें जुनें देवालय मोडून मशीद बांधली ती अद्यापि प्रसिद्ध आहे. ह्या मशिदीचे उंच मनोरे औरंगजेब बादशाहाची स्वधर्मनिष्ठा व हिंदुधर्माबद्दलचा द्वेष जणूं अद्यापि जगजाहीर करीत आहे असें भासतें. या मशिदीचें नांव 'माधवजीका देवडा' असें प्रचलित आहे. यावरून याचें धोरण दिसून येतें.

कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीचे सभासद बाबू रजनीरंजन यांनीं एक अस्सल सनद प्रसिद्ध केली आहे. तींत पुढील वाक्यें आहेत. 'आम्ही आमच्या पवित्र धर्मास अनुसरून, आम्हीं असा ठराव केला आहे कीं, जुनीं देवालयें पाडून टाकावयाचीं नाहींत व नवीं देवालयें बांधून द्यावयाचीं नाहींत, आमच्या न्यायी राज्यांत आम्हांस असें जाहीर झालें आहे कीं, कांहीं दुष्ट व मत्सरी लोकांनीं बनारस येथील व आसपासच्या दुसऱ्या कांहीं ठिकाणच्या हिंदु लोकांस फार त्रासवून सोडलें आहे, आणि देवालयाचे संरक्षक जे कित्येक ब्राह्मण लोक त्यांना देवालयापासून घालवून देण्याचा प्रयत्न चालविला आहे. या जुलमानें हिंदु लोकांत हाहाःकार झाला आहे. म्हणून आम्हीं तुम्हांस अशी आज्ञा फर्मावितों कीं, यापुढें कोणीहि इसमानें, ब्राह्मणास किंवा दुसऱ्या हिंदु रहिवाश्यास कोणत्याहि प्रकारें त्रास देऊं नये, किंवा त्यांच्या धर्मास हरकत करूं नये. एवढेंच नव्हे, तर त्यांना त्यांच्या वृत्तीचा शांततेनें उपभोग घेऊं द्यावा, चंद्र १५ जमादिसानी ( ९ जुन्या ऐ. गो. पा. १–२ ).

( स. १६५९ ) आमच्या धर्माप्रमाणें असें ठरलें आहे कीं, देवळाचा नाश करूं नये व नवीं देवळें बांधण्यास परवानगी देऊं नये ( पत्रसा. ७६४, स. १६६८ )

लुटलें. यानें त्याच्यावर नौसिरखानास पाठविलें, पण त्याचाहि शिवाजीनें पराभव केला ( मे १६५७ ). पण विजापूरकरांनीं तह केल्यामुळें शिवाजीनेंहि रघुनाथपंताला पाठवून तह केला. पण शहाजहान आजारी पडल्यामुळें हा तिकडे गेला आणि विजापूरकरांशीं झालेल्या तहाची अंमलबजावणी झाली नाहीं.

शहाजहान आजारी पडून त्यानें सर्व सरदारांदेखत दारा शुकोह यास गादीचा वारस नेमलें; आणि आग्र्यास प्रकृति सुधारण्याकरितां त्यानें मुक्काम केला. नवंबरमध्यें शहाजहान बरा झाला. पण बंगालमध्यें असणाऱ्या सुजानें स्वतःस बादशाह पदवी घेऊन तो दिल्लीवर चाल करून निघाला. तेव्हां दाराचा मुलगा सुलेमान शुकोह जयसिंहासह त्यावर रवाना झाला. त्याला अनेक ठिकाणीं पराजित करून पाठलाग केला व त्याला पकडलें व विश्वासघातानें ठार केलें. मुरादनेंहि आपण बादशाह बनल्याचें जाहीर करून सुरत लुटली. तेव्हां त्याची बदली, शहाजहाननें औरंगजेबाच्या अंमलाखालील वऱ्हाड प्रांतावर केली, पण मुरादनें तो हुकूम मानला नाहीं आणि औरंगजेब मुरादला सामील झाला. तेव्हां मारवाडच्या जसवंतसिंगाला माळव्याचा सुभेदार करून औरंगजेबावर व काशीमखानास गुजराथची सुभेदारी देऊन मुरादवर रवाना करण्यांत आलें. या वेळीं औरंगजेबानें दिल्लीकडे जाणाऱ्या मीरजुम्ल्यास पकडलें आणि त्याच्याच सल्ल्यानें त्याचें व त्याच्या तोफखान्याचें साहाय्य मिळवलें. आदिलशाह व कुत्बशाह यांच्याशीं खंडणी माफ करून व किल्ले परत देऊन स्नेह संपादन केला. इतकी तयारी झाल्यावर 'बादशहास भेटण्यास दिल्लीस येत आहें' असा निरोप दारास पाठवून हा दिल्लीकडे निघाला. हंडियाला मलिक हुसेनला पाठवून नर्मदेच्या नावा आपल्या ताब्यांत घेतल्या आणि बादशाही सरदारांशीं होणारा पत्रव्यवहारहि ताब्यांत घेतला. गोंडवनच्या गोंड राजास मैत्रीचीं पत्रें लिहून त्याला आपले बाजूस मिळवून घेतलें. कारण त्याच्या राज्यांतून आग्र्याचा रस्ता होता. सैन्याची समजूत घातली, आगाऊ पगार सुरू केला. बऱ्हाणपुरास लष्करी दारूगोळ्याची तयारी सुरू केली. खुद्द दरबारांतील अधिकारीहि आपल्या बाजूस वळवून घेतले. मीरजुम्ल्याचे इंग्रज व फ्रेंच गोलंदाज तयार होतेच. अशी तयारी झाल्यावर मुअज्जमला औरंगाबादेस सुभेदार नेमलें आणि दौलताबादेच्या किल्ल्यांत नुकताच जन्मलेला मुहंमद, अकबर व जनानखाना ठेवून आणि बाकीच्या मुलांसह औरंगबादेहून निघाला ( ५ फेब्रु. १६५८ ). बऱ्हाणपुरास आल्यावर ( १८ मार्च ) तयारीकरितां एक महिना तेथें मुक्काम केला. तेथें दरबारांतील याचा वकील इसाबेग दिल्लीहून येऊन यास मिळाला. तेव्हां याला सर्व माहिती मिळाली आणि जसवंतसिंगाची पूर्ण तयारी होण्यापूर्वीच त्याला तोंड देण्याचें ठरवून यानें बऱ्हाणपूर सोडलें ( २० मार्च ). मांडव, अकबरपुर, उज्जैन, देवाळपुर, असा माळव्यांत हा उतरला आणि तेथें मुरादास बोलावून त्याची भेट घेतली ( १४ एप्रिल ). सायंकाळीं धरमतला मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं जसवंतसिंगाशीं युद्ध देण्याचें ठरविलें.

जसवंतसिंगाला नर्मदेवरील उतार औरंगजेबानें ताब्यांत घेतल्यामुळें याची नीटशी बातमी ठेवतां आली नाहीं. मुराद व औरंगजेब यांना एकत्र न होऊं देण्याकडेहि त्यानें लक्ष दिलें नाहीं. औरंगजेबाला मिळतो म्हणून निरोप धाडला, पण याचा रस्ताहि त्यानें रोखला. शिवाय जसवंतसिंगाला विशेष लढाई न करितां मुराद व औरंगजेब यांना पिटाळून परत लावून द्यावें, असा बादशाहाचा हुकूम असल्यामुळें त्याचें काम अवघड होऊन बसलें. पण औरंगजेब मात्र बेमुर्वतीनें तुटून पडला. शिवाय मुसलमान सरदार त्याच्या हाताखालीं लढण्यास राजी नव्हते. खुद्द कासीमखान बादशाही सैन्यासह पळून गेला आणि सर्व मुसलमान सरदार औरंगजेबाला सामील झाले. लढाईत २४ मुसलमानेतर मेले आणि मुसलमान सरदारांपैकीं फक्त एकच मेला. असा विजय मिळाल्यावर हा ३ दिवस उज्जैनला राहून एक महिन्यानें ग्वाल्हेरीस पोंचला ( २१ मे ). तेथें याला बादशाही सरदार नासीरीखान येऊन मिळाला. तेथें याला समजलें कीं, दारा हा धोलपूर येथें चंबळ अडवून मोठ्या सैन्यासह बसला आहे. शहाजहान आग्र्याहून बलुचपुर येथें आला असतां त्याला धरमतच्या लढाईत औरंगजेबाला जय मिळाल्याची बातमी समजली ( २५ एप्रिल ). तेव्हां तो दिल्लीस न जातां आग्र्यास परत फिरला, व दारास त्यानें सैन्य जमविण्यास सांगितलें. लवकर ६० हजार सैन्य उभें करण्यांत आलें. त्यापैकीं सय्यद व रजपूत दाराच्या बाजूचे होते. याशिवाय बरेच विश्वासूक सरदार दारा शुकोहबरोबर आधींच रवाना झालेले होते. शहाजहानच्या मनांत अझून मुलांत सलोखा होईल अशी आशा होती. पण दारानें आपलें सैन्य धोलपुरास चंबळेवर पाठविलें ( ९ मे ), व आपणहि पित्याची भेट घेऊन सैन्यानिशीं निघाला. बापलेकांची ही शेवटची भेट होय. दारानें चंबळचे सर्व उतार ताब्यांत घेतले व तो मोर्चे लावून बसला. औरंगजेबाला आडवूं तितक्यांत दारा शुकोह आपणास येऊन मिळेल अशी त्याला आशा होती. पण धोलपूरच्या पूर्वेस २० कोसांवर असलेल्या भटाऊर गांवीं

एका उतारानें अचानक औरंगजेब नदी उतरला (२३ मे) व तो तडफेनें आग्र्याकडे वळला. त्यामुळें दाराचा सर्व बेत फसला आणि त्याला आपला अवजड तोफखाना टाकून आग्र्याकडे वळावें लागलें. दोनहि भावांची गांठ आग्र्यापासून पांच कोसांवरील यमुनेच्या काठच्या समुगड गांवीं पडली. पण दारानें तेथें सरळ औरंगजेबावर हल्ला न चढवतां त्याच्या हल्ल्याची वाट पाहत त्याला आडवा होऊन राहिला. पण त्याचा फायदा औरंगजेबाला झाला. त्याचें दमलेलें सैन्य ताजें झालें आणि याचें सैन्य उन्हानें जायबंदी झालें. रात्रीं औरंगजेबानें आपल्या सैन्याला अनेक आश्वासनें देऊन उत्तेजित केलें.

दुसऱ्या दिवशीं लढाई सुरू झाली. पण दाराची जागा वाईट, तोफखाना कमकुवत, सैन्यांत फितुरी, शिलकी सैन्याचा अभाव यांमुळें रजपूत लोक शौर्यानें लढले तरी दाराचा अखेर पराजय झाला. दाराला आपल्या सैन्यावर सारखा ताबा ठेवतां येईना. शेवटीं जलद हालचाल करण्याकरितां तो हत्तीवरून घोड्यावर उतरला, पण ही त्याची मोठी चूक झाली. मालक दिसेनासा झाल्यावर सैन्य पळूं लागलें, आणि याचा जय झाला. दारा रातोरात आग्र्यावरून दिल्लीकडे पळाला. शहाजहाननें आग्रहपूर्वक भेटीस बोलावलें असतां लाजेनें त्याला त्यानें तोंडसुद्धां दाखवलें नाहीं. औरंगजेबानें जय झाल्यावर मुरादचें अभिनंदन केलें आणि "तुझें राज्य सुरू झालें" असा त्याचा गौरव केला. ३ जूनला आग्रा शहर काबीज केलें आणि तेथील कोतवालाला फांशीं दिलें. शहाजहानच्या भेटीस न जातां वेढा घालून व शेवटीं तर किल्ल्याचें पाणी बंद करून किल्ला ताब्यांत घेतला; व १० जूनला उघडपणें दरबार भरवून सर्व सत्ता आपल्या ताब्यांत घेतली. दोन दिवसांत सर्वत्र आपले लोक नेमून १३ जूनला तो दिल्लीस दाराच्या पाठलागास निघाला. तत्पूर्वी मुरादास कपटानें पकडून कैद केलें; नंतर अलाहाबाद घेतलें व आग्र्याची उजवी बाजू बळकट केली. दिल्लीस थोडे दिवस विश्रांति घेण्याचें ठरवून सुलेमान शुकोहवर शाहीस्तेखानास पाठवून बहादुरखानास दारावर पाठविलें. आणि २१ जुलै रोजीं दिल्लीबाहेरील शालिमर बागेंत स्वतः तक्तारूढ झाला; व 'आलमगीर गाझी' अशी पदवी धारण केली. दाराचा पाठलाग चालू असतां सुजा दिल्लीवर चालून आला म्हणून हा गुजराथेंतून दिल्लीकडे आला. प्रथम औरंगजेबानें आपला मुलगा सुलतान मुहम्मद यास सुजावर पाठविलें त्यांची खजवा येथें गांठ पडून लढाई झाली. औरंगजेबहि मीरजुम्ल्यासह तेथें आला. औरंगजेबाच्या सैन्याची प्रथम कांहीं हत्तीनें नासाडी केली, पण पुढें सुजाचा पराभव झाला.

दारा गुजराथेंत आल्यानंतर तेथील सुभा शहानवाझ दारास मिळाला. त्या दोघांनीं औरंगजेबाशीं देवराई येथें लढाई दिली ( १२–१४ मार्च १६५९ ). जसवंतसिंगहि दाराला मिळाला होता, पण त्याला औरंगजेबानें फोडलें. याहि लढाईंत पराजय पदरीं आल्यानें दारा मेरट, अहमदाबाद, कच्छ मार्गे सिंधकडे गेला. वाटेंत त्याचे फार हाल झाले. शेवटीं विश्वासघातानें दाराला पकडून दिल्लीस आणण्यांत आलें. तेथें राजद्रोही व धर्मद्रोही म्हणून त्याला देहान्ताची शिक्षा देऊन क्रूरपणें त्याचा वध करण्यांत आला. तसेंच त्याचा पुत्र सुलेमान शुकोह यालाहि पकडून आणून विष पाजून ठार करण्यांत आलें.

खजव्याच्या लढाईनंतर सुजा प्रयाग, पाटणा व पुढें गंगेंतून मोंगीरास गेला. त्यावर औरंगजेबानें मीर जुम्लास पाठविलें. मीरजुम्लानें फितुरीनें गंगेच्या पश्चिमेकडील राजमहाल ते हुगळीपर्यंतचा प्रदेश काबीज केला. पण आरमाराच्या जोरावर त्यानें मीरजुम्ल्याशीं टिकाव धरला. औरंगजेबाचा मुलगा सुलतान मुहंमद सुजाच्या मुलीच्या लोभानें त्याला जाऊन मिळाला. ती मुलगीहि त्याला मिळाली ( ८ जून ). पण अनेक घडामोडी होऊन सुजाच्या सैन्यानें त्याला सोडलें. त्यामुळें त्यानें भावाच्या हातून मरण्यापेक्षां आराकानी लोकांत जाऊन राहण्याचें ठरविलें व हिंदुस्थानला कायमचा रामराम ठोकला ( १२ मे १६६० ).

अशी भावांची व्यवस्था लावल्यावर पूर्वी फक्त तक्तारोहण (२१ जुलै१६५८) झालें होतें त्याच्या समारंभाकरितां ५ जून १६५९ रविवार हा दिवस नक्की करण्यांत आला. त्या वेळीं प्रारंभीं दिलेलें लांबलचक नांव यानें धारण केलें. २५ लाखांपर्यंत देणग्या व बक्षिसें दिलीं. हिजरी वर्ष सुरू केलें. पारशी नवरोझ बंद केला. हा समारंभ दोन अडीच महिने चालू होता. जुलूस ( तक्तारूढ सरकारी वर्ष ) २३ मे १६५८ त हा धरण्यांत आला.

राज्यारोहणाचा समारंभ झाल्यानंतर सुलेमान व मुराद यांची वाट लावल्यावर स. १६६२–६४ पर्यंत हा काश्मीरांत राहिला. शहाजहान मेला तेव्हां हा आग्र्यास आला. तेथून पुढें १६७४ पर्यंतचा काळ यानें दिल्लीस काढला. या सालीं हा आफ्रिदी लोकांचीं बंडें मोडण्याकरितां सरहद्दीकडे गेला व तात्पुरता बंदोबस्त करून परत आला ( स. १६७६ ). याचा साहाय्यक जसवंतसिंग काबूलकडे मेल्यामुळें त्याचें अजमीरचें राज्य घशांत

घालण्याची याला दुर्बुद्धि झाली. त्या वेळीं हा दिल्लीतून बाहेर पडला ( ३ सप्टें. १६७९ ), तो पुनः दिल्लीस आला नाहीं. या वेळीं रजपूत लोकांनीं एकी करून याला विरोध केला. त्यामुळें याला जय मिळाला नाहीं आणि अजितसिंह जोधपुरचा राजा झाला. याचा पुत्र अकबरहि रजपूतांना उघड सामील झाला. आणि ज्या रजपूतांनीं मोगल बादशाही उभारण्यास मदत केली ते रजपूत याच्या विश्वासघातकी वर्तनानें विरुद्ध झाल्याबरोबर याचें बळ एकदम कमी झालें. भूपाळसिंग गोंड, भावांचे तोतये, रावकर्ण, चंपतराय बुंदेला वगैरेशीं याचे झगडे चालू होते. याचा पिता शहाजहान आग्र्याच्या किल्ल्यांत मेला तेव्हां हा त्याच्या अन्त्यविधीला सुद्धां गेला नाहीं. यानंतर हा स. १६८२ च्या मार्च महिन्यांत पुनः दक्षिणेंत आला. शिवाजीमहाराजांबद्दलच्या आदरामुळें आणि याच्या धोरणामुळें मोगलांचा दरारा बिलकुल उरलेला नव्हता. मुसलमान शाह्याहि नष्ट करण्याचें यानें धोरण स्वीकारलें होतें (सिकंदर, आदिलशाह, अबुलहसन कुत्बशाह, शहाजी, शिवाजी पाहा). मराठे तर जिवावर उदार होऊन लढत होते. शिवाजी, संभाजी, राजाराम यांना नाहींसें करूनहि मराठेशाहीचा जोर कमी होईना, तेव्हां यानें शाहूकडून भेदाचा प्रयत्न केला. पण त्याचाहि उपयोग होईना, तेव्हां हा अहमदनगर येथें येण्यास निघाला. पण वाटेंत यास मराठ्यांनीं लुटलें. या अपजयामुळें याचें दुखणें मर्यंतरीं थांबलें होतें तें उलटलें व अखेर हा नगर येथें मृत्यु पावला ( २१ फेब्रु. १७०७ ). यानें मृत्युपत्र करून आपलें राज्य तिघां मुलांस वांटून दिलें. याचा शेवट अगदीं निराशेंत झाला.

मोगल बादशहांपैकीं सर्वांत विद्वान् पुरुष हा होय. स्वधर्माचा याचा अभ्यास उत्कृष्ट होता. फतवा-इ-आलमगिरी नांवाचा मुसलमानी कायद्याचा उत्तम ग्रंथ औरंगजेबानें लिहिला आहे. या कामीं पुष्कळ विद्वान् मौलवी खपत होते. त्यांत मौलाना शेख निजाम हा मुख्य होता. औरंगजेबास कुराण तोंडपाठ येत होतें, आणि त्याचा अर्थ चांगला कळत होता. याचें हस्ताक्षर सुंदर होतें. मात्र यास कवितेची आवड नव्हती. मुसलमानी धर्मशास्त्रांतील याची विद्वत्ता अप्रतिम होती, असें मोठमोठ्या विद्वानांनीं म्हटलें आहे ( जर्नल ऑफ दि मॉस्लेम इन्स्टिटयूट, मार्च १९०७ ).

हा जितका परधर्माचा द्वेष्टा होता तितकाच स्वधर्मी शिया पंथाचा द्वेष करी. याच्या हाताखालीं शियापंथाचे अनेक लोक अधिकारी व सेनापति असतांना याचा त्या पंथाचा द्वेष कमी झाला नाहीं. 'शियांना मारणारी' असें कित्येक कट्यारींचें यानें नांव ठेविलें होतें. पत्रव्यवहारांत शियांचा उल्लेख आला तर त्यांस एखादी शिवी दिल्याशिवाय हा कधींहि राहत नसे. याच्या हाताखालचे शियापंथी कामदार याला फसवून कशी तरी वेळ भागवून नेत. विजापूर व गोवळकोंडा येथील राजे शियापंथी होते म्हणूनच त्यांना यानें समूळ नाहींसें केलें. शेख-उल्-इस्लाम नांवाचा एक विद्वान् व थोर पुरुष याजपाशीं होता त्यानें हीं राज्यें जिंकूं नयेत म्हणून याची पुष्कळ विनवणी केली, तें यानें बिलकुल ऐकलें नाहीं. तेव्हां तो शेख यास सोडून चालता झाला. यानें अनेक प्रकारें त्याला बोलावलें तरी तो पुनः आला नाहीं.

यानें अनेक देवळें उध्वस्त करून त्यांच्या मशिदी केल्या अशी प्रसिद्धी आहे. हिंदु लोकांचें पवित्र क्षेत्र जें बनारस तेथें यानें वेणीमाधवाचें जुनें देवालय मोडून मशीद बांधली ती अद्यापि प्रसिद्ध आहे. ह्या मशिदीचे उंच मनोरे औरंगजेब बादशाहाची स्वधर्मनिष्ठा व हिंदुधर्माबद्दलचा द्वेष जणूं अद्यापि जगजाहीर करीत आहे असें भासतें. या मशिदीचें नांव 'माधवजीका देवडा' असें प्रचलित आहे. यावरून याचें धोरण दिसून येतें.

कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीचे सभासद बाबू रजनीरंजन यांनीं एक अस्सल सनद प्रसिद्ध केली आहे. तींत पुढील वाक्यें आहेत. 'आम्ही आमच्या पवित्र धर्मास अनुसरून, आम्हीं असा ठराव केला आहे कीं, जुनीं देवालयें पाडून टाकावयाचीं नाहींत व नवीं देवालयें बांधून द्यावयाचीं नाहींत, आमच्या न्यायी राज्यांत आम्हांस असें जाहीर झालें आहे कीं, कांहीं दुष्ट व मत्सरी लोकांनीं बनारस येथील व आसपासच्या दुसऱ्या कांहीं ठिकाणच्या हिंदु लोकांस फार त्रासवून सोडलें आहे, आणि देवालयाचे संरक्षक जे कित्येक ब्राह्मण लोक त्यांना देवालयापासून घालवून देण्याचा प्रयत्न चालविला आहे. या जुलमानें हिंदु लोकांत हाहाःकार झाला आहे. म्हणून आम्हीं तुम्हांस अशी आज्ञा फर्मावितों कीं, यापुढें कोणीहि इसमानें, ब्राह्मणास किंवा दुसऱ्या हिंदु रहिवाश्यास कोणत्याहि प्रकारें त्रास देऊं नये, किंवा त्यांच्या धर्मास हरकत करूं नये. एवढेंच नव्हे, तर त्यांना त्यांच्या वृत्तीचा शांततेनें उपभोग घेऊं द्यावा, चंद्र १५ जमादिसानी ( ९ जुन्या ऐ. गो. पा. १–२ ).

( स. १६५९ ) आमच्या धर्माप्रमाणें असें ठरलें आहे कीं, देवळाचा नाश करूं नये व नवीं देवळें बांधण्यास परवानगी देऊं नये ( पत्रसा. ७६४, स. १६६८ )

बादशहाचें धर्मवेड माजत चाललें आहे. ××× एखाद्या हिंदूचें घेतलेलें कर्ज बुडवावयाचा सोपा मार्ग म्हणजे सावकार हिंदूनें मुहम्मद व मुसलमानी यांना शिव्या दिल्याची खोटीच तक्रार काजीकडे करण्याची धमकी द्यावी म्हणजे झालें. ××× देवळें पाडून मशिदी बांधण्याचा त्यानें धोशा लावला आहे (पत्रसा. ११९२; स. १६६८). बादशहाचें धर्मवेड अडचणींत पकडून धर्मांतर करणें भाग पाडण्याकरितां त्यानें नेमलेले हस्तक ××× ही हिंदूंना ××× जाचक होत आहेत. स्वर्गामध्यें अशा कृत्यांनीं मुहम्मदाच्या बरोबर मान्यता मिळेल असें खूळ याच्या मुल्लांनीं त्याच्या डोक्यांत भरून दिलें आहे (पत्रसा. १२४९). (स. १६६९) एका हिंदूनें काजीनें खाल्लेल्या टरबुजांचा एक भाग पांच वर्षांपूर्वी खाल्ला होता, या सबबीवर त्याला मुसलमान करण्यांत आल्यामुळें त्यानें जीव दिला (पत्रसा. १२७५).


याचा अकबर नांवाचा कर्तबगार मुलगा रजपूत व मराठे या याच्या शत्रूंना सामील झाला होता. तो शेवटीं आपल्या बचावाकरितां इराणमध्यें पळाला. तेथेंहि इराणच्या शहाच्या मदतीनें तो कांहीं कारस्थान उभारील म्हणून हा त्याला सारखीं आर्जवाचीं पत्रें धाडीत असे. अकबरानें धाडलेलें एक उत्तर ऐतिहासिक घडामोडीवर व औरंगजेबाच्या स्वभावावर प्रकाश पाडणारें असल्यामुळें पुढें देत आहों. 'बाबा, तुमचें उदाहरण मीं नेहमीं डोळ्यापुढें ठेवलें आहे. इतकें चांगलें उदाहरण दुसऱ्या कोणाचें सांपडणार? ज्या रजपुतांनीं अकबर, जहांगीर, व शहाजहान यांस मनापासून साह्य केलें, त्यांचा आश्रय मीं केला, यांत वाईट तें काय केलें? जसवंतसिंग तुमच्या भुलथापांस भुलला नसता तर तुम्ही आज हिंदुस्थानचे बादशाहा नसतां असें हे रजपूत लोक आपल्या राज्याचे खांब होते. पूर्वी फौजेंत रजपूत शिपाई पाहिजे असले म्हणजे एकाचे ठिकाणीं शंभर उमेदवार पुढें येत. हल्लीं तुम्ही तीनतीन वर्षे डांगोरा पिटूनहि दहापांच माणसें देखील जमा होत नाहींत. हा परिणाम कशाचा? आज तुमचे अम्मलदार इतके आहेत पण एकाची तरी तुमच्यावर खरी भक्ति आहे काय? फौजेंतील सर्व लोक दरिद्री झाले आहेत. कोणापाशीं हत्यार नाहीं. कवि किंवा ग्रंथकार तुमच्या अमदानींत निपजला नाहीं. व्यापारी व धनिक म्हणून आहेत त्यांची दिवसाढवळ्या लूट होते. त्यांचे खून पडतात. रयत तर धुळीस मिळाली. विजापूर, गोवळकोंडा येथील राज्यांचा दक्षिणचा प्रदेश जो पूर्वी तुम्हांसच अत्यंत संपन्न व स्वर्गतुल्य वाटत होता तो आतां ओसाड, कंगाल व निर्धन बनला आहे. विजापूर, औरंगाबाद वगैरे शहरें केवढीं धनाढ्य, विस्तृत व शोभिवंत होतीं. पण हल्लीं तेथें धुळीशिवाय काय आहे, तुम्हीच सांगा! या सर्वांचें कारण काय तर तुमचा परधर्मद्वेष. तुम्ही हिंदूंवर जिझिया बसविला, त्यानें सर्व लोक तुमच्यावर उठले. जाळपोळ व लूट करूं लागले. त्यानेंच देश धुळीस मिळाला.


तुमच्या राज्यांत एक तरी प्रकार असा आहे काय कीं ज्याची मला तारीफ करितां येईल? थोर थोर पुरातन घराणीं नामशेष झालीं. सर्वच लुच्चांचा बाजार भरला आहे. सगळा राज्यकारभार हलकट लोकांच्या हातांत आहे. हातांत जपमाळ, काखेंत कुराण आणि डोक्यास मोठेंसें पागोटें असलें म्हणजे त्यावर तुमचा पूर्ण भरंवसा! अशी मंडळी तुमच्या राज्याचे आधारस्तंभ!

असा सर्व राज्याचा नाश झालेला मला पाहवेना. तेव्हां अत्यंत कष्टानें मी देशत्याग करून इकडे आलों. आतां मी शांत आहें. परमेश्वर तुम्हांला दीर्घायुष्य देवो. मींच परत येऊन राज्य करावें म्हणतां, तरी तुम्ही राज्य सोडून मक्केस चालते व्हा. म्हणजे मी दाखवितों कसें राज्य करावयाचें तें. आजपर्यंत काय करा-त होती ती सर्व तुम्हीं करून दाखवलींत. आतां वृद्धापकाळीं परमार्थसाधनच तुम्हांस योग्य आहे. जास्त लिहून तुम्हांस त्रास होईल म्हणून पत्र पुरें करितों.' (मनूची ४. १७१–१७७).

अकबरानें आखून दिलेल्या लष्करी पण देशांतील सर्व घटकांचा समावेश करणाऱ्या राजनीतीनें शहाजहानच्या वेळीं मुसलमानी वळण स्वीकारलें. त्यामुळें हिंदु प्रजा आणि तिचा धर्म यांबद्दल नुसती सहानुभूतिसुद्धां राहिली नाहीं. औरंगजेबाच्या कारकीर्दीत मुस्लीम नीतीची परमावधि झाली. अकबराच्या उदार व संग्राहक धोरणाचा अधार्मिक म्हणून नाश करण्यांत आला. आणि मोगली साम्राज्य पूर्णपणें धर्मांध झालें. त्यामुळें लढाऊ वृत्तीच्या स्वातंत्र्यप्रिय हिंदूंनीं डोकें वर काढलें आणि मोगली साम्राज्य औरंगजेबाच्या देखत नष्ट केलें. स. १६७८ पासून स. १७०७ पर्यंत मराठे, रजपूत, जाट, बुंदेले व शीख यांनीं पांच ठिकाणांहून औरंगजेबाच्या हीन राजनीतीस विरोध केला, त्याच्या सैन्याशीं युद्धें केलीं, आणि अखेरीस राज्याचीं पाळेंमुळें खणून काढलीं.

**औंधच्या प्रतिनिधींची वंशावळ—**




× असें चिन्ह ज्या आंकड्यावर केलेलें आहे ते कोल्हापूरकरांचे प्रतिनिधि होत.

## क

**ककुच्छंद**—या कल्पांतील चार बुद्धांपैकीं दुसरा. यांचें जन्मस्थान क्षेमावती आहे. कांहीं ग्रंथांत नाभिका हें जन्मस्थान दिलें आहे. यांचें निर्वाणहि तेथेंच जवळ झालें. नाभिका नेपाळच्या तराईत आहे.

**ककुस्थ**—हा रघुवंशी प्रतिहार राजा नागभट याच्या बहिणीचा पुत्र.

**ककुस्थवर्मन् कदंब**—( स. ४२५-५० ) कदंब घराण्यांतील एक राजपुत्र. हा त्या घराण्यांतील रघूनंतर गादीवर आला. याच्या पित्याचें नांव भगीरथ. याला अनंतदेवी नांवाची एक मुलगी असून ती कुमारगुप्तास दिली होती.

**कक्क प्रतिहार**—हा मंदोरच्या प्रतिहारवंशांतील भिल्लादित्याचा पुत्र. यानें मुद्गगिरि ( बिहारांतील मुंगेर ) येथें गौडाशीं लढून जय मिळवला. हा व्याकरण, ज्योतिष, तर्क ( न्याय ) व सर्व भाषांतील कवित्वांत निष्णात होता. याला भट्टि ( भाटी ) वंशांतील महाराणी पद्मिनीपासून बाउक व दुसरी राणी दुर्लभदेवीपासून कक्कुक नांवाचा पुत्र झाला. याच्यानंतर बाउक गादीवर आला. हा रघुवंशी प्रतिहार राजा वत्सराजाचा सामंत असावा. कारण वत्सराजानें गौडावर विजय मिळवला, त्या लढाईत हा होता ( वत्सराज पाहा ).

**कक्क राष्ट्रकूट**—( कर्क राष्ट्रकूट पाहा ).

**ककसूरि**—सिद्धसूरीचा उत्तराधिकारी व पंचप्राण नामक ग्रंथाचा कर्ता.

**ककाजी भोसले**—हा खेळोजी भोसल्याचा ( नांदनज व भांबोरे येथील ) मुलगा होय. याला शाहाजी, रुस्तुमजी व सुभानजी या नांवांचे तीन भाऊ होते.

हा सरंजामी अंमलदार असून नानासाहेब पेशव्याचे वेळेस लष्करांत कामकाज करीत होता. हा एके वेळेस कर्नाटकांत पेशव्यांच्या स्वारीबरोबर गेला होता असा उल्लेख याच्या एका पत्रांत आला आहे. पुढें हा आपल्या कुटुंबासह भांबोऱ्यास राहावयास आला. तेव्हांपासून भोसल्यामध्यें भांबोरकरांची शाखा वेगळी पडली. याला चिमणाजी व आप्पासाहेब नांवाचे दोन मुलगे होते ( मं. सप्तम सं. वृ. पृ. ६८-६९ ).

**२.** हा राघोजी ऊर्फ रावसाहेब ( भांबोरे येथील ) भोसल्याचा मुलगा होय.

हा अव्वल इंग्रजींतील भांबोरें गांवचा सरंजामी वहिवाटदार होता. याचे देखत मराठेशाही बुडून नवीन इंग्रजी अंमल सुरू झाला. हा स्वभावानें भोळा व दयाळू होता. याच्या शरीराचा बांधा ठेंगणा असून राहणी अगदीं साधी होती. याला साधारण लिहितां वाचतां येत असे. याचें पहिलें कुटुंब वडूसकर शिरक्यांच्या घराण्यांतील होतें. तें वारल्यावर दुसरें कुटुंब वडगांवच्या निंबाळकर घराण्यांतील केलें. तिजपासून याला तीन मुलगे व तिघी मुली अशीं सहा अपत्यें झालीं. याची बायको आपल्या सासऱ्याप्रमाणेंच कागदपत्रांचें महत्त्व जाणत असे ( मं. सप्तम सं. वृ. पृ. ७० ).

**ककुक प्रतिहार**—( स. ८६१ सुमार ) हा मंदोरच्या प्रतिहारवंशांतील कक्काला दुर्लभदेवीपासून झालेला पुत्र. हा आपल्या थोरल्या सावत्र भावानंतर गादीवर आला. घटियाळ येथें मिळालेले दोनहि शिलालेख याचे आहेत. त्यावरून पुढील माहिती मिळते. हा ब्राह्मण हरिचंद्र याचा वंशज होय. यानें आपल्या सच्चारित्र्यानें मरु, माड, वल्ल, तमणी ( त्रवणी ), अज्ज ( आर्य ) व गुर्जरच्या लोकांचें प्रेम संपादन केलें होतें. वडणाणय मंडलांतील भिल्लांचीं गांवें यानें जाळलीं. रोहिन्सकूप( घटियाळ )च्या जवळ बाजार तयार करून व्यापारी लोकांना आणवलें, तसेंच मड्डाअर ( मंदोर ) व रोहिन्सकूप या गांवांत जयस्तंभ उभारले ( ज. रा. ए. सो. स. १८९५, पृ. ५१७-१८ ). हा न्यायी, प्रजापालक व विद्वान् होता. हा स्वतः संस्कृतांत काव्यरचना करी. घटियाळ येथील वि. सं. ९१८ ( स. ८६१ ) मधील शिलालेख सर्व संस्कृतमध्यें आहे. व शेवटीं यानें केलेला म्हणून एक संस्कृत श्लोक कोरला आहे; तो असाः " यौवनं विविधैर्भोगैर्मध्यमं च वयः श्रिया। वृद्धभावश्च धर्मेण यस्य याति स पुण्यवान् ॥ " ( एपि. इंडि. भा. ९, पृ. २८० ).

**कडुंगण पांड्य**—हा राजा स. ५६०-५९० राज्य करीत असावा. या राजानें कळभ्राच्या कारकीर्दीचा शेवट केला. तामीळ कवीचे पहिले पिढीचा शेवट याच्या राज्यांत झाला. परंतु चेर राजांमध्यें शेरमान शेल्व राजा व कडुंगण या दोघांचा उल्लेख कपिलर कवींनीं एका श्लोकांत केला आहे. यास मुलगा होता. त्याचें नांव ( अधिराज ) मारवर्मन् ( अवनिचूडामणि ) होय ( सुब्रह्मण्य अय्यरकृत एन्शन्ट डेक्कन ).

**कडतोजी गुजर**—( प्रतापराव गुजर पाहा ).

**कचेश्वर**—एक महाराष्ट्रीय कवि. राहण्याचें गांव व जन्मस्थान चाकण. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. आडनांव ब्रह्मे. यानें तुकारामाच्या शिष्यापासून त्याच्या अभंगांच्या वह्या मागवून अभ्यास केला. याच्या अक्षय भजनामुळें यास लोक वेडा म्हणत असत. पण पुढें मात्र साधुसंतांना मिळणारा मान याला मिळूं लागला. हा चाकणच्या रानांत आश्रम करून अयाचित वृत्तीनें राहत असे.

यानें शके १६०७ मध्यें पाऊस पाडून दाखविला. याबद्दल त्यास एक टका व एक मण धान्य असें त्या परगण्यांतील दर गांवाहून मिळत असे. यास शाहूच्या उपलब्ध पत्रांचा पाठिंबा आहे.

पुढें शाहूनें राज्याकरितां साताऱ्यांत जात असतां याचा आश्रम पाहिला. यासच आपला गुरु केलें व अर्थातच 'राजगुरु' हें सार्थ नांव कचेश्वरास पडलें. तेंच पुढें उपनांव म्हणून चालू राहिलें. बाळाजी विश्वनाथ सुद्धां याचा फार मान ठेवीत असे, असें त्याच्या अनेक पत्रांतील मायन्यावरून सिद्ध होतें. याला साताऱ्यास नेलें होतें. पण तेथें हा राहिला नाहीं. हा उंब्रज येथें राहत असे. कचेश्वर हा शके १६५३ त उंब्रज येथें फाल्गुन शुद्ध द्वितीयेस वारला. याची समाधी माहुली येथें आहे. याचे वंशज हल्ली पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील चाकणच्या आसपासच्या गांवीं व सातारा जिल्ह्यांतील अतीतगांवीं राहतात. यानें स्थापलेल्या पांडुरंगाच्या मूर्ति खेड व चांडोली येथें आहेत.

कचेश्वराच्या पद्यरचनेपैकीं सध्यां छापून प्रसिद्ध अशीं दोनच आख्यानें आहेत. तीं म्हणजे सुदामचरित्र व गजेंद्रमोक्ष. श्लोकबद्धतेमुळें व वृत्तभिन्नतेमुळें याचीं आख्यानें कानाला गोड लागणारीं अशीं आहेत. यानें दिलेले दृष्टांत नेहमींच्या परिचयाचे असे असल्यानें स्त्रियांच्या तोंडीं सुद्धां ही कविता बसण्यास फारसे सायास पडत नाहींत. सध्यां छापून प्रसिद्ध असें कचेश्वराचें आत्मचरित्र आहे. यानें आपलें आत्मचरित्र अभंगांत लिहिलें आहे. त्यापैकीं पाहिले ५७ अभंग गहाळ झाले असून पुढले ५४ प्रसिद्ध झाले आहेत. ते फारच प्रेमळ आहेत. काव्यसंग्रहांत विठ्ठलकविकृत कवितासंग्रहांत द्रौपदीवस्त्रहरण प्रसिद्ध झालें आहे तें याचें असावें असें म. कविचरित्रकार आजगांवकर म्हणतात ( म. क. चरित्र भा. ३, पा. १३७-१५८ ).

तसेंच यानें शिवाजीसंबंधीं लिहिलेल्या दोन कविता प्रसिद्ध आहेत. यानें शिवाजीपासून शाहूपर्यंत पिढ्या पाहिल्या होत्या असें दिसतें.

याचा शिष्य रामचंद्र खटाटोपे. यांचीं इनाम गांवें:- १ सासपडे ( जि. सातारा ), २ अतीत ( जि. सातारा ), ३ वाकी ( जि. पुणें ), ४ धावडी, ५ पांगरी.

**कच्चायनो**—( कात्यायन पाहा ).

**कच्छवाह**—ग्वाल्हेरचा राजा. स.१०२२मध्यें महमूद गझनवीनें ग्वाल्हेरच्या मजबूत किल्ल्यावर स्वारी केली तेव्हां तेथें या नांवाचा हिंदु राजा राज्य करीत होता. किल्ला जिंकण्यास फार दिवस व फार मेहनत लागेल असें पाहून महमूदानें ३६ हत्ती या राजाकडून घेऊन तो कालिंजरकडे निघून गेला.

कच्छवाह रजपूत राजाचें घराणें बहुधा जिझोतीच्या चंदेल राजघराण्याचें मांडलीक असावें ( कें. हि. ).

**कच्छवाहवंश** ( अंबर किंवा जयपूर )

रामाचा मुलगा कुश याजपासून
नळ
(नळापासून चवतिसावा पुरुष) धवळराय ( स. ९६७ )
कोकल ( स. १०३७ )
हंनूनजी
जानुर्देवजी
(पत्नी-पृथ्वीराज चव्हाणाची बहीण) पंजून ( पांचवा पुरुष )
पृथ्वीराज ( अकरावा पुरुष )
भीम — बिहारीमल
भगवानदास — मुलगी लग्न अकबराशीं
जगत्सिंग मानसिंग मानसिंह — ( मुलगी लग्न जहांगीरशीं )
भावसिंग ( १६१५ )
(भांझाराजा) जयसिंह पहिला ( स. १६२१-१६६७ )
महासिंग ( दुर्बल )
रामसिंग पहिला करितसिंह
( स. १६६८ ) ( सवाई ) जयसिंह( दुसरा ) स. १६९९
ईश्वरसिंह (स.१७४३-१७५०) माधवसिंह (स.१७५०-६३)
पृथुसिंह (स.१७६३) प्रतापसिंह(स.१७७८-१८०३)
जगत्सिंग दुसरा (स.१८०३-१८१८)
जयतसिंह तिसरा ( स. १८१८ )
रामसिंह दुसरा ( स. १८३५ )
माधवसिंह ( स. १८८१ )

रत्नाकर भट्टाच्या प्रशस्तीवरून रा. राजवाडे सवाई जयसिंह हा रामसिंहाचा पणतू असें म्हणतात.

रामसिंह
कृष्णसिंह
विष्णुसिंह
जयसिंह सवाई
( मुसलमानी रियासत, पा. ४१९ ).

**कणाद तर्कवागीश**--( स. १५६० चा सुमार ) एक तर्कशास्त्रज्ञ. कणाद तर्कवागीश व रघुनाथ शिरोमणि हे दोघे वासुदेव सार्वभौमाचे शिष्य होते अशी प्रचलित समजूत आहे. आपल्या 'भाषारत्नं' या ग्रंथांत उपोद्घातांतील पहिल्या श्लोकांत कणादानें एका चूडामणीस नमन केलें आहे. हाच जानकीनाथ चूडामणि असल्यास कणाद स. १५६० च्या सुमारास होऊन गेला असला पाहिजे. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत:--

( १ ) 'माणिक्याख्या' गंगेशाच्या तत्त्वचिंतामणिवरील टीका.

( २ ) ' भाषारत्नं ' वैशेषिकतत्त्वज्ञानावरील ग्रंथ.

( ३ ) ' अपशब्दखण्डन ' वैशेषिकतत्त्वज्ञानावरील ग्रंथ ( हिस्ट्री ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४६६ ).

**कण्णकैर रट्ट**--हा रट्ट घराण्यांतील एक राजा होय. हा या घराण्यांतील कार्तवीर्य पहिला याच्या मागून गादीवर आला. हा जैनधर्मी व यादवांचा मांडलिक होता. याला कण्ण असेंहि म्हणत ( स. १००० ).

**२**. हा रट्ट घराण्यांतील पहिल्या सेनानंतर गादीवर आला. हा जैनधर्मी व यादवांचा मांडलिक होता ( स. १०७६ ). याला कण्ण असेंहि म्हणत.

**कण्वऋषी**--हा गंग या घराण्याचा मूळ पुरुष होय. हा काश्यपगोत्री होता असें म्हणतात.

**कण्व घराणें**—या घराण्याचा मूळ पुरुष वसुदेव हा होय. हा मगधच्या शुंग घराण्यांतील शेवटच्या देवभूमीचा प्रधान होता. यानें देवभूमीस ठार मारून त्याचें राज्य आपण बळकाविलें.

वसुदेव ( ख्रि. पू. ७२-६३ )-भूमिमित्र—( ख्रि पू. ६३-४९ ) या वेळीं शकांचें राज्य उत्तर हिंदुस्थानांत फार भरभराटींत होतें )-नारायण ( ख्रि. पू. ४९-३७ )-सुशर्मन्—( ख्रि. पू. ३७-२७ ) याला आन्ध्र राजानें ठार मारलें.

यापुढें शक राजांनीं या घराण्याचा समूळ नायनाट करून, येथें कुशान घराणें स्थापन झालें व त्या घराण्यानें स. १२४ पर्यंत राज्य केलें ( सिवेल आणि आयंगार, पृ. ३२० ). जात ब्राह्मण.

**कण्हपा**--हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सतरावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून कर्नाटक प्रान्तांतील रहिवासी होता. याच्या वेळीं देवपाल नांवाचा राजा राज्य करीत होता ( स. ८०९-४९ ). याचे कनखला ( ६७), मेखला, ( ३६ ), या दोन योगिनी, धर्मपा ( ३६ ), कंतलिपा ( ३९ ), महिपा ( ३७ ), उधळिया ( ७१ ), भदेपा ( ३२ ), जवरिपा ( ६४ ) वगैरे शिष्य होते. याचे काव्यग्रंथ मागधी भाषेंत बरेच आहेत. यावरून यानें मागधींत व हिंदींतहि कविता केल्या आहेत असें दिसतें. याचे ग्रंथ-कान्हपाद (त. २८।१७ ), महादुण्डनमूल ( त. ८६।३० ), वसंततिल (त. १२।३०), असंबंधदृष्टि (त. ४८। ४७ ), वज्रगीति (त. ४७।३३), दोहाकोष (त. ४७।४४). शेवटला ग्रंथ संस्कृतांत आहे. हा हिंदी कवि होता.

**कत्त**—( कार्तवीर्य पाहा ).

**कत्तम ( कत्त ) चक्रवर्ति**—( कार्तवीर्य रट्ट तिसरा पाहा ).

**कथरुह्यदेव**—ओरिसाच्या गजपति घराण्यांतील एक राजा. याचा प्रधानानें खून केला ( स. १५४१ ).

**कदफिसेस्**—(स.४०-७७)यालाच कुझुलो कदफिसेस असें म्हणतात. हा कुशान नांवाच्या फिरत्या टोळींचा मुख्य होता. यानें स. ४० मध्यें हिंदुस्थानच्या उत्तर भागांत आपली सत्ता स्थापन केली. कुशान हें कोणत्या एका टोळींचें नांव नसून तें एका कुटुंबाचें किंवा वंशाचें नांव असावें असें एफ. डब्ल्यु. थॉमस म्हणतात ( J. R. A. S. 1906 p. 203 ). तर के. पी. जयस्वाल ( J. B. O. Res. So. VI, p. 12-22 ). हें पहिल्या कदफिसेसच्या पूर्वीच्या अधिकाऱ्याचें नांव असावें असें म्हणतात. कुशान हें कुश नांवाच्या युद्धप्रिय टोळींचें अनेकवचन असावें, असें मत प्रचलित आहे (J. R. A. S. Jan. 1914, p. 79-88). युचि ह्या नांवाची एक फिरती टोळी चीनमध्यें राहत असे, त्यांना चरितार्थाच्या अभावीं चीनची सरहद्द सोडून बाहेर पडावें लागलें. त्या टोळींपैकींच कदफिसेस् हा हिंदुकुशाच्या दक्षिणेकडे उतरला व तेथील प्रांत काबीज करून राहूं लागला. यानें नंतर गांधार, काबूल, व इराणपासून सिंधुपर्यंत राज्यें जिंकिलीं. काबुल प्रांत यानें स. ५० मध्यें घेतला असावा. यानें स. ४५-७० चे दरम्यान इंडो-पार्थियनांचा पराभव करून हिंदुस्थानचीं उत्तर सरहद्द काबीज केली. इंडो ग्रीक लोकांचा शेवटला राजा हरमॉइस याच्यावर स. २० मध्यें यानें स्वारी केली व त्याचा पराभव करून काबूल प्रांतांत आपली सत्ता स्थापन केली. हा वयाच्या ८० व्या वर्षी मरण पावला. याच्या पश्चात् याचा पुत्र कदफिसेस् दुसरा हा स. ७८ मध्यें गादीवर आला ( Smith p. 265--67, 293 ).

**२**. ( स. ७८-११० ) यालाच ओइमो कदफिसेस असें म्हणत असत. हा पहिल्या कदफिसेसचा मुलगा. स. ७८ मध्यें कदफिसेस् पहिला याची कारकीर्द संपल्यानंतर हा गादीवर आला. हा आपल्या बापाप्रमाणेंच अतिशय महत्त्वाकांक्षी होता. यानें गादीवर आल्यावर आपल्या बापाच्या वेळचें उत्तर हिंदुस्थान जिंकण्याचें काम हातीं घेतलें. पंजाब व गंगा नदींच्या जवळील बनारसपर्यंतचा सर्व प्रदेश सिंधुनदीच्या मुखाजवळील प्रदेश आपल्या राज्यास जोडिले. जिंकलेल्या सर्व प्रांतांवर हा सुभेदार नेमून राज्यव्यवस्था त्यांच्यावर टाकीत असे. यानें राज्यांत सर्वत्र नाणीं सुरू केलीं. हीं नाणीं विशेषतः तांबें व ब्रांझ धातूंचीं केलेलीं असत; व त्यांच्यावर राजांचा राजा किंवा राज्य करणारा राजा असें खोदलेलें असे. हीं नाणीं काबूल-

पासून गाझीपूर, बनारस, कच्छ, काठेवाड येथें सांपडलेलीं आहेत. याचे वेळीं चिनी सेनापती पानचाओ (Pan-chao) यानें रोमन साम्राज्यापर्यंत स्वाऱ्या करून मुलूख जिंकिले. खोतान, काशगर इ. राजांनीं चिनी साम्राज्य मान्य केलें. चिनी सेनापतीच्या या जयामुळें व चिनी साम्राज्याच्या विस्तारामुळें याला साहजिकच भीति वाटली. कारण हाहि स्वतःला सार्वभौम राजा मानीत असे व चिनांचा गुलाम होणें यास आवडत नसे. म्हणून यानें आपण होऊनच होतीं या नांवाच्या चिनी राजाची मुलगी लग्नाकरितां मला द्यावी असा निरोप पाठविला, परंतु ही गोष्ट चिनी सेनापतीस अपमानकारक वाटल्यानें त्यानें दूतास पकडून ठेविलें. यामुळें यानें शी नांवाच्या सेनापतीबरोबर ७०००० घोडेस्वार देऊन त्यास चीन देश जिंकण्याकरितां पाठविलें. परंतु हें सैन्य टघदुंभाष पामीर (Taghdumbash Pamir) नांवाच्या १४००० फूट उंच असलेल्या पर्वताच्या ताशघर (Tashkurghan Pass) खिंडींतून जातांना त्यांचे अत्यंत हाल झाले. बरेंचसें सैन्य रस्त्यांतच मेलें व उरलेलें चीनच्या भक्ष्यस्थानीं पडलें. चिनी साम्राज्याखालीं रोम व हिंदुस्थान आल्यामुळें या दोन देशांत व्यापार चालू झाला. हिंदुस्थानांतून रेशीम, मसाल्याचे पदार्थ, रत्नें व रंग इ. रोममध्यें जात व त्याच्या मोबदला रोममधून सोनें येई. हा सर्व व्यापार जहाजांतून चालत असे. हा शंकराचा भक्त होता व याच्या नाण्यांवर नंदीचें चित्र खोदलेलें असे. हा स. ११० मध्यें मरण पावला ( V. Smith p. 267-75, 294, 319 ).

**कदमराव**—हा बंकापूर येथील असून विजापूरचा मांडलीक होता.

मुहम्मद आदिलशाहाचे कारकीर्दीत यानें बंड केलें म्हणून शाहानें मीर्झा अलीस फौज देऊन याजवर पाठविलें. मीर्झा अलीनें कदमरावास पकडून सन १६२८ त ठार मारिलें आणि आपण विजापुरास परत आला ( मु. रि. भा. १ ला, पृ. २७० ).

**कदमवंश**—( पा. १९१ पाहा ).

**कदरखान**—हा एक बंगालचा सरदार होय. याचा काल स. १३३६-३९ असा आहे. याला केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत 'कादरखान' असें म्हटलें आहे.

मुहंमद तुघ्लक दिल्लीस राज्य करीत असतां फकीरुद्दीन नामक एका गृहस्थानें बादशहाविरुद्ध ( सन १३३९ ) बंड करून कदरखानास ठार मारून पूर्वेकडील प्रांतावर स्वतंत्र राज्य स्थापिलें ( मु. रि. भा. १ ला, पृ. ३१९ ).

**कदंबवंश**—( पा. १९२-९३ पाहा ).

## कदंब घराणें ( गोव्याचें )

(बॉम्बे गॅझेटियर १, भा. २, पृ. ५६४ एफ.; इंडि. अँटि. ११. २७३; १४. २८९. एपि. इंडि. ८ परिशिष्ट २. १ पाहा.) 'बनवासीचे राजे' असें गोव्याचे कदंब लोक आपल्या मागें (व्यर्थ) बिरुद लावीत (एपि. इंडि. ७. १९८ ).

१ गुहल्ल १ ला
('व्याघ्रमारिन्'-किंवा 'गूवल १' ला)

२ षष्ठदेव १ ला
('चत्त' 'चट्टल' 'चट्टय' स. १००७)

३ जयकेशिन् १ ला
(स. १०५२ सोमेश्वर १ ला)

४ गूवलदेव २ रा
(स. १०९८)

५ विजयादित्य १ ला
('विजयार्क' बा. चट्टलादेवी).

६ जयकेशिन् २ रा
(स. १११९, ११४७ बा. मैलाला विक्रमादित्य ४ था या चालुक्य राजाची मुलगी)

७ पेर्मादि-शिवचित्त
(स. ११४७-११८२ बा. कमलोदेवी. कामभूपाची मुलगी).

८ विजयादित्य २ रा
(स. ११४७, ११५८, ११७१, 'विष्णुचित्त' 'विक्रमार्क' वाणिभूषण, बा. लक्ष्मीदेवी).


९ जयकेशिन्-३ रा
(स. ११८७-१२१० 'वीरजय' बा. महादेवी).

१० त्रिभूवनमल्ल
(बा. माणिक्या-देवी).

११ षष्ठदेव २ रा
(स. १२४६, १२५० १२५७. 'शिवचित्त,' 'चट्टय')

(मुलगी कामदेव किंवा कावन याची बायको).
(सिवेल आणि आयंगार).

# कदम ( बांडे ) यांची वंशावळ गांव—मौजे तोरखेड पा॥ सुलतानपूर ( खानदेश )




( म. रि. म. १, पृ. ४३२ )

# कदंब घराणें ( बनवासीचें )

**टीप**—राजाच्या नांवापुढें दिलेल्या तारखा जोव्हीओ दुब्रील ( Jouveau Dubreuil ) यांच्या एन्शन्ट हिस्ट्री ऑफ दि डेक्कन पृ. ९५ मधून घेतल्या आहेत.

१ मयूरशर्मन् ( स. ३४०–३६०. यानें बनवासी आणि हळसी हे प्रांत घेतले आणि चुत्तुशातकर्णाला मारलें ).

२ कंगवर्मन् ( स. ३६०–३८५. पुष्कळ लढाया केल्या ).

३ भगीरथ ( स. ३८५–४१० )

४ रघू ( स. ४१०–४२५ )

५ ककुस्थवर्मन् ( स. ४२५–४५० ).

६ शांतिवर्मन् ( स. ४५०-४७५ )

अनंतदेवी ( कुमारगुप्ताला दिली होती )

कृष्णवर्मन् १ ला ( बा. कैकेय राजाची मुलगी )

७ मृगेशवर्मन् ( स. ४७५-४८८ 'विजयशिव' बा. कैकेय-प्रभावती )

८ मांधात्रिवर्मन् (स.४८८-५००)

विष्णुवर्मन् १ ला किंवा 'विष्णुदास' ( रविवर्मनने यास ठार मारिलें. )

देववर्मन् किंवा शिवानंदवर्मन् ( साधु झाला ).

९ रविवर्मन् (स. ५००-५३७). भानुवर्मन् शिवरथ ( स. ५४१-४२ ).

सिंहवर्मन्

१० हरिवर्मन् ( स. ५३७-५५० पुलकेशिन् १ ला. या चालुक्य राजानें याचें राज्य घेतलें ).

११ कृष्णवर्मन् २ रा. ( स. ५५०–५६५. कीर्तिवर्मन् १ ला या चालुक्य राजानें याचें राज्य घेतलें ).

मुलगी ( दुसऱ्या माधव गंग राजाची बायको ).

अजवर्मन्

भोगीवर्मन्

विष्णुवर्मन् २ रा.

**टीप**— १ मयूरशर्मनबद्दल ताळगुंद येथील लेख पाहा ( एपि. इंडि. ८.३० ). हा मानव्य गोत्री ब्राह्मण होता. हा चालुक्य राजाप्रमाणें आपण हारितीचा वंशज आहों असें म्हणतो. यानें कांची येथील पल्लव राजावर स्वाऱ्या करून आपलें बनवासी येथील राज्य स्वतंत्र केलें.

# कदंब घराणें ( हानगल किंवा पानुंगल येथील )

( या घराण्याची वंशावळ फ्लीटनें बॉंबे गॅझेटिअर १ भाग २, पृ. ५५९ यामध्यें दिल्याप्रमाणें घेतली आहे. )

या घराण्यांतील पहिले तेरा राजे बापानंतर मुलगा या क्रमानें एकापुढें एक असे आले आहेत. त्यांचीं नांवें:—

१ मयूरवर्मा १ ला, २ कृष्णवर्मा, ३ नागवर्मा १ ला, ४ विष्णुवर्मा, ५ मृगवर्मा, ६ सत्यवर्मा, ७ विजयवर्मा, ८ जयवर्मा १ ला, ९ नागवर्मा २ रा, १० शान्तिवर्मा १ ला, ११ कीर्तिवर्मा १ ला, १२ आदित्यवर्मा.

१३ चट्ट याचे लेख स. ९७२, ९७३, १०१२ चे आहेत ( एपि. क. ८ ता. सोरब ४५४-५५ ).

१४ जयवर्मा २ रा किंवा ( जयसिंह स. १०३० )

माऊलीदेव

१५ तैलप किंवा तैल १ ला ( स. १०५०, बा. चाऊंडला )

१६ कीर्तिवर्मा २ रा किंवा कीर्तिदेव १ ला किंवा तैलणसिंग स. १०६८-१०७७ प. चालुक्य, राजाचा जहागीरदार )

१७ शान्तिवर्मा २ रा. किंवा शान्ति किंवा शान्तेय ( स. १०८८, बा. शिरियादेवी पांड्यराजकन्या )

१८ तैल २ रा. किंवा तैलप किंवा तैलह ( स. १०९९-११३५, बा. बाचला पांड्यराजकन्या आणि चामला. चामलादेवीपासून )

चोकिदेव किंवा जोकी

विक्रम किंवा विक्रमांक

१९ मयूरवर्मा २ रा. स. ११३१. बापाच्या सरहद्दीवर प. चालुक्य सोमेश्वर तिसऱ्याचा मांडलीक म्हणून राज्य करीत होता ( एपि. क. ८, सोरब ८० पाहा )

२० मल्लिकार्जुन ( स.११३२,११३५,११४४ )

२१ तैलम किंवा माऊली तैल. ( न. ११४७-११६० ) आणि म्हैसूर आर्क्यालॉजिकल रिपोर्टस् ( १९२३ सं. ११२ एपि. इंडि. १६. ३१ आणि एफ़ पाहा )

२२ कीर्तिदेव २ रा स. ११७२

२३ कामदेव स. ११८१-१२०७ ( बा. केतला, प. चालुक्य सोमेश्वर ४ चा मांडलीक )

बर्म्म

सोम

मल्ल ( ३ मार्च स.१२१८ ते ७ जानेवारी दरम्यान गादीवर बसला ) ( एपि. क. ८, सोरब १८०, २२१, २४ ).

**कदंब**--तेलगू कवि. अदितिकुंडलाहरण नाटकाचा कर्ता.

**२.** तेलगू कवि. हा कवि प्रतापरुद्र राजाचा दिवाण होता. हा मूळचा कलिंग देशचा रहिवासी होय. ह्यास ज्योतिषशास्त्राची फार लहानपणापासून आवड असल्यानें त्या विद्येंत हा निष्णात होऊन 'ज्योतिषार्णव' नांवाचा ग्रंथ यानें केला. याच ग्रंथाच्या प्रस्तावनेंत यानें आपल्या जन्माचा शक १३८४ चित्रभानु संवत्सर लिहिला आहे ( क. च. ).

**कनकदास**--( स. १५५० सुमार ) कानडी कवि. जातीनें बेरड किंवा महार असावा.

ग्रंथ-मोहनतरंगिणी ( कृष्णचरितें ), रामध्यानचरित्र, नळचरित्र, हरिभक्तिसार. यांशिवाय याचीं हरिभक्तिपर अनेक पदें प्रसिद्ध आहेत. याशिवाय नृसिंहस्तव नांवाचा लहानसा ग्रंथ याचा दिसतो.

हा धारवाड जिल्ह्यांतील कागिनेले गांवचा असावा. तसा याचा प्रत्येक पद्याच्या शेवटीं तेथील कागिनेले आदिकेशवाचा उल्लेख आढळतो.

हा अस्पृश्य असल्यामुळें उडुपीच्या देवळापुढें यास उभें राहूं देत नसत. म्हणून हा देवळाच्या मागें उभा राहून भजन करी. याच्या भक्तीनें मंदिरांतील देवानें मागें तोंड फिरवलें, अशी आख्यायिका आहे. आजहि देवाचें तोंड फिरलेलें आहे. ज्या बाजूस तोंड फिरलेलें आहे त्या बाजूच्या खिडकीचें नांव 'कनकाची खिडकी' असें आजहि प्रसिद्ध आहे.

धारवाड जिल्ह्यांतील कोड तालुक्यांतील बाड हें याचें जन्मस्थान असून हा कागिनेले येथें जाऊन राहिला व तेथेंच मृत्यु पावला. यानें रामानुजाची स्तुति केली असल्यामुळें हा श्रीवैष्णवाचा शिष्य असावा. यानें पुरंदरदासाची प्रशंसा केली आहे. त्याच्याच धर्तीवर यानें पदें केलीं आहेत, पण हा त्याचा शिष्य होता असें म्हणण्यास निश्चित आधार नाहीं ( क. क. च. भा. २, पा. २३८ ).

**कनकमुनि**—याला कोनकमुनि असेंहि म्हणतात. मुख्य चार बुद्धांपैकीं हा एक आहे. भद्रकल्पांत याचा जन्म सोमवती येथें झाला. याच्या बापाचें नांव यज्ञदत्त असून हा जातीचा ब्राह्मण होता. बुद्धवंशांत याचें निर्वाणस्थान पर्वताराम असें लिहिलें आहे. पर्वताराम धौलागिरि व मुक्तिनाथ यांच्या मध्यें आहे. त्याला सध्यां सैनामैना असें म्हणतात.

**कनकसेन मैत्रक**—( स. १४४ सुमार ) वलभीच्या मैत्रकांचा मूळ पुरुष. अयोध्येच्या सूर्यवंशांतील हा मनुष्य लोहकोटाहून सौराष्ट्रांत वीरनगराला गेला, व तेथें स. १४४त परमार राजापासून तेथील राज्य हस्तगत केलें. यानंतर चार पिढ्यांनीं विजयसेन नामक राजानें विजयपूर म्हणजे हल्लीचें धोल्का शहर वसविलें; व पुढें त्या घराण्यानें वलभीपूर येथें आपलें राज्य स्थापलें. या घराण्यांतील पहिला महत्त्वाचा राजा भट्टार्क होय ( म. यु. भा. १. २. १४२ ).

**कनकाई**—तुकाराम महाराजांची माता. बोल्होबाची पत्नी.

**कनकावती**—ही बनवासीच्या कदंब घराण्यांतील मयूरवर्माची मुलगी होय. दक्षिण तुलुव येथील प्रतिनिधि चंद्रसेन त्याचा मुलगा सरदार लोकादित्य याजबरोबर हिचें लग्न झालें. म्हैसूर देशांतल्या एका राजाला लोकादित्यानें मारून त्याचा मुलूख हस्तगत केला.

**कनखलिपा** ( योगिनी )--ही स्त्री असून चौऱ्यांशी सिद्धांपैकीं सदुसष्टावी होय. ही जातीनें गृहपतिकन्या असून अगचेनगर येथील राहणारी होय. ही कण्हपाची शिष्या होय. हिचा सनातनावर्तत्रयसुखागम हा ग्रंथ आहे.

**कनिष्क**—( स. १२०-१६२ ) हा एक कुशान राजा. दुसऱ्या कदफिसेसनें स. ७८ ते १११ पर्यंत सुमारें ३३ वर्षें राज्य केल्यावर कनिष्क राज्यावर आला. कनिष्क हा दुसऱ्या कदफिसेसचा मुलगा नव्हता. त्याच्या बापाचें नांव वझेष्क असें असून याचें राज्यारोहण व दुसऱ्या कदफिसेसचा मृत्यु यांच्या दरम्यान बराच काल लोटलेला दिसतो. एकंदर कुशान राजांपैकीं याचें नांव हिंदुस्थानच्या बाहेरहि फार प्रसिद्ध आहे. तथापि याच्याबद्दल विश्वसनीय अशी ऐतिहासिक माहिती मात्र थोडी आढळते. विश्वसनीय अशा चिनी इतिहासकारांच्या ग्रंथांतहि याच्याबद्दल थोडे उल्लेख आढळतात. याच्या संबंधीचे उल्लेख असलेले कोरीव लेख पुष्कळ आहेत. परंतु ते घोटाळ्याचे असल्यामुळें ह्याच्या कालासंबंधीं अनिश्चितता आहे. कांहीं विद्वान् संशोधक कनिष्काचें राज्यारोहण ख्रि. पू. ५८ मध्यें झालें असें म्हणणारे आढळतात. नाण्यादि पुराव्यावरून स्वतः व्हिन्सेंट स्मिथचेंच एके काळीं कनिष्काच्या कारकीर्दीचा आरंभ स. ७८ मध्येंच झाला असें नक्की मत होतें. परंतु १९२४ मध्यें त्यानें हिंदुस्थानच्या इतिहासावर जें पुस्तक प्रसिद्ध केलें त्यांत याचा राज्यारोहणाचा काल कदाचित् सुमारें ४० वर्षें नंतरहि असूं शकेल अशी जबर शंका प्रदर्शित केली आहे. तेव्हां याचा

काल स. १२० ते १६२ असा धरण्यास हरकत नाहीं. हा दुसऱ्या कदफिसेसनंतर गादीवर आला, हें मात्र आतां निःसंशय ठरलें आहे.

ह्युएनत्संगनें असें लिहून ठेविलें आहे कीं, 'जेव्हां कनिष्क गंधार येथें राज्य करीत होता तेव्हां याची सत्ता आसपासच्या राज्यांवर होतीं; व दूरदूरच्या प्रदेशांवर याचें वर्चस्व होतें. याचीं नाणीं काबूलपासून गंगेकांठच्या गाझीपूरपर्यंत सांपडत असल्यामुळें याचें राज्य विस्तृत होतें व याची कारकीर्द बरीच मोठी होती असें दिसतें.

कनिष्कानें आपल्या कारकीर्दीच्या आरंभासच काश्मीर जिंकून तेथें अनेक स्मारकें उभारलीं व आपल्या नांवाचें एक शहरहि वसविलें. यानें हिंदुस्थानच्या आणखी अंतर्भागांत शिरून पाटलीपुत्र येथील अश्वघोष नांवाचा एक बौद्ध साधु आपल्या बरोबर नेला. यावरून हा अश्वघोषाचा समकालीन होता, हें निश्चित ठरतें. कनिष्काची राजधानी पुरुषपूर म्हणजे आधुनिक पेशावर होती. येथें यानें-बौद्ध सांप्रदायाचा कट्टा पुरस्कर्ता बनल्यावर-बुद्धावशेषावर एक उंच इमारत उभारली. ही इमारत कोरीव लांकडाची असून ती तेरा मजली व ४०० फूट उंचीची होती आणि तिच्यावर चांगला लोखंडी कळस होता. ही इमारत आगीनें तीन वेळां जळून खाक झाली होती, पण श्रद्धाळू राजांनीं ती पुन्हांपुन्हां बांधून दुरुस्त केली. हा एक बौद्ध धर्माचा मोठा पुरस्कर्ता असून एक मोठा बलाढ्य राजा होऊन गेला. कनिष्कासारख्या बुद्धिमान् राजास आपलें सामर्थ्य वाढविण्यास व लोकांचें साहाय्य मिळविण्यास बुद्धसंघांचे अनुयायी व्हावेंसें वाटत असल्यास नवल नाहीं. यांत याचा हेतु धार्मिक असण्यापेक्षां राजकीय असणें साहजिक व संभवनीय आहे.

कनिष्कानें हिंदुस्थानाबाहेरील पार्थियन लोकांबरोबरहि युद्ध केलें. कनिष्काचे अत्यंत महत्त्वाचे लष्करी पराक्रम म्हटले म्हणजे काश्गार, यार्कंद आणि खोतान यांवरील विजय होत. हे प्रदेश चिनी सत्तेखालीं होते. यानें चीनला खंडणी देण्याचें बंद करून चीनच्या साम्राज्यांतील एका मांडलिक राजापासून ओलीस इसम आणले. हे इसम दिसण्यांत व पोषाखांत चिनी माणसाप्रमाणें होते.

पूर्व वयांत युद्धादि निमित्तानें जीं रक्तपाताचीं क्रूर कृत्यें झालीं त्यांबद्दल विषाद वाटून यानें बौद्ध संप्रदाय स्वीकारला. याच्या कारकीर्दीत आरंभींचीं नाणीं ग्रीक भाषा, लिपी व देवता यांनीं युक्त आहेत. याच्या काळांत बौद्ध सांप्रदायाचा जो महायान म्हणून नवा पंथ निघाला तो हिंदु, झरथुष्ट्री, ख्रिस्ती, मॉस्टीक व हेलेनिक अशा अनेक पंथांच्या मिश्रणानें बनविलेला होता. कनिष्क बौद्ध संप्रदायी बनल्यावरहि जुन्या व नव्या अशा दोन्हीहि देवतांना भजत असे.

कनिष्काच्या कारकीर्दीतील आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशोकाच्या पद्धतीवर त्यानें भरविलेली धर्मसमिति होय. या मंडळाच्या सभा काश्मीरच्या राजधानीनजीक कुंडलवन नामक मठांत भरल्या. त्यांत वसुमित्र अध्यक्ष आणि पाटलीपुत्राहून आणलेला सुप्रसिद्ध ग्रंथकर्ता अश्वघोष उपाध्यक्ष होता, व सभासद ५०० होते.

कनिष्क सुमारें ४३ वर्षे राज्य करून स. १६२ च्या सुमारास मरण पावला. याच्या मृत्यूसंबंधीं पुढील दंतकथा आहेः याचा माथर नांवाचा एक असामान्य बुद्धिमत्तेचा प्रधान होता. त्याच्या सांगण्यावरून राजानें दिग्विजयाचें काम सुरू केलें. तीन दिशांना याला जय मिळाला. पण उत्तरेकडे दिग्विजय मिळविण्याचें काम राहिलें. त्या वेळीं याचे चाकरनोकर त्रासून जाऊन राजाच्या लोभाविषयीं आणि क्रूरपणाविषयीं टीका करूं लागले व शेवटीं त्यांना असें वाटूं लागलें कीं 'या सर्व त्रासांतून मुक्त होण्याकरितां आपण सर्वांनीं मिळून राजालाच नाहींसा केला पाहिजे.' याप्रमाणें पुढें जेव्हां राजा आजारी पडला तेव्हां त्यांनीं कट करून याला एका दुलईखालीं झांकून टाकलें व एका माणसानें याच्यावर बसून याला गुदमरून टाकून याचा जीव घेतला.

याच्या वेळचे शिलालेख मिळाले आहेत ( एपि. इंडि. भा. १० चें परिशिष्ट, लेखसंख्या १८, २१, २२ २३; ज. रॉ. ए. सो. इ. स. १९२४, पृ. ४००. आरा येथील लेखाकरितां एपि. इंडि. भा. १४, पृ. १४३ ).

यानें काश्मीर येथें बुद्धाच्या सिद्धान्ताचा निर्णय करण्याकरितां बौद्धसंघ एकत्रित केला होता. त्यांत जे त्रिपिटक मानले गेले ते तांब्याच्या पत्र्यावर यानें खोदून काढले. आणि ते एका दगडाच्या पेटींत ठेवून तीवर एक स्तूप उभारला ( भारतीय प्राचीन लिपिमाला १ पृ. १५४. टिप्पण १; सॅम्युअल बीलकृत बुद्धिस्ट रेकार्डस् ऑफ दि वेस्टर्न वर्ल्ड, भा. १, पृ. १५५ ). यानें केलेलें संस्करण मान्य करणारे महायान या नांवानें ओळखले जातात. चरक वगैरे ग्रंथकार याच्याच कालांत झाले. यानें अनेक स्तूप बांधले व संघाराम, विहार वगैरे निर्माण केले. हा संस्कृत भाषेचा अभिमानी असून महायान पंथाचे सर्व ग्रंथ संस्कृतमध्यें आहेत. यानें राजकीय आज्ञापत्र प्रथम संस्कृतमध्यें लिहिलें.

सुमारीनचा से-कीं नांवाचा ग्रंथ, शेन हान चौ नांवाचा पां-कूं चा ग्रंथ, हौ-हा-चौ-नांवाचा फां-ये-चा ग्रंथ अशा तीन चिनी ग्रंथांचा खोल अभ्यास करून विद्वानांनीं कनिष्काच्या कालाचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे. सेकीं हा ग्रंथ स. पूर्वी ९१ या वर्षी पुरा झाला आहे. दुसरा ग्रंथ ख्रिस्तोत्तर सन २४ आणि २२० या वर्षांतील इतिहास सांगतो ( हि. का. मार्च १९२९ ).

युए-चि जातींच्या कुशान घराण्यांतील हा एक कर्तृत्ववान् पुरुष होता.

स. पू. ५८ मध्यें याच्या कारकीर्दीत 'विक्रमसंवत्' नांवाचा शक सुरू झाला. तो कनिष्काच्या 'राज्याभिषेक दिनानिमित्त' अगर ( अल्पांशानें ) परंपरेनें चालत आलेल्या बौद्ध समितीनिमित्त सुरू केला वगैरे कल्पना बरोबर दिसत नाहींत.

**कन्नर**--कल्याणीच्या कलचुरींपैकीं राजलाचा मुलगा.

**कन्नारया**—राष्ट्रकूट तिसऱ्या कृष्णाच्या वेळचा सिंदेवाडीचा राजा व योद्धा ( नाशिय सिंद पाहा ).

**कन्ह**--( कृष्ण पाहा ).

**कन्हैया**--श्रीतुकाराममहाराजांचा आजा. शंकराचा मुलगा व बोल्होबाचा पिता होय.

**२.** हा नबाब वाजिदअलीशहाचा शागीर्द असून नृत्य व भाव या कसबांत फार वाकब, अशी याची प्रसिद्धी होता.

**कपालपा**—यालाच कमळ असें म्हणतात. हा चौऱ्यांयशीं सिद्धांपैकीं बहात्तरावा सिद्ध होय. हा शूद्र राजपुरीदेशचा राहणारा.

**कपिल**—श्वेताश्वतर उपनिषदांत सांगितल्याप्रमाणें अन्वीक्षिकी ग्रंथ लिहिणारा कपिल हा फार पूर्वी होऊन गेला. याचा जन्म अजमीरजवळ पुष्कर येथें झाला म्हणतात, परंतु पद्मपुराणांत हा इंद्रप्रस्थ येथील राहणारा होता, असें सांगितलें आहे. याच्या तत्त्वांचें कालांतरानें सांख्यतत्त्वज्ञानांत रूपांतर झालें. यानें प्रथम आपलीं तत्त्वें आसुरी यास शिकविलीं ( सांख्यकारिका श्लोक ७० ) व त्यानें तीं पंचशिख यास शिकविली. आसुरीचा 'शतपथब्राह्मणां'त उल्लेख केला आहे व तो ब्रह्मयज्ञांतील तर्पणांत आहे. त्यावरून हा बराच प्राचीन दिसतो ( प्राचीन चरित्रकोश पाहा ).

**२.** कश्यप हा कौशांबी येथील जितशत्रु राजाचा उपाध्याय होय. त्याचा कपिल हा पुत्र. याचें बहुतेक अध्ययन 'श्रावस्ती' नामक नगरांत झालें. जैन लोकांच्या उत्तराध्ययनसूत्रवृत्तींतील आठव्या अध्ययनांत याची सविस्तर हकीकत आहे. परंतु सांख्यशास्त्रकर्ता हाच असें मात्र लिहिलें नाहीं. त्यावरून तो कपिल व हा कपिल हे दोन्ही निराळे असावेत हें दिसून येतें.

**३.** सुश्रुताच्या टीकेंत याचीं वचनें उद्धृत केलीं आहेत. त्यावरून वैद्यकावर याचा एखादा ग्रंथ असावा ( सुश्रुत सूत्र. ६ ).

**कपिलर**--अन्हेयर म्हणून जी सुप्रसिद्ध कवयित्री होऊन गेली तिच्या तीन भावांपैकीं हा एक होय. याच्या पित्यानें यास अरण्यांत सोडल्यावर एका ब्राह्मणानें याचें पालनपोषण केलें व तामिळ भाषा उत्तम तऱ्हेनें शिकविली.

यानें पुढें जे अनेक कविताबद्ध ग्रंथ लिहिले त्यांत आगवर नांवाचा एक ग्रंथ आहे. त्यांत यानें आपलें व आपल्या भावंडांचें इतिवृत्त देऊन आपला जन्म चोल देशांत झाल्याचेंहि सांगितलें आहे ( क. च. ).

**कपिलेंद्रदेव**—ओरिसाच्या प्राच्यगंग घराण्यांतील ४ थ्या भानू राजाचा प्रधान व गजपति घराण्याचा संस्थापक. दुसरा अहमद बहामनी याच्या मदतीनें यानें ओरिसाचें राज्य बळकाविलें, आणि तेथें सूरिवंश घराणें स्थापन केलें ( कटक गॅझेटिअर चा. २५ ). कटक यानें आपली राजधानी केली. याचा काल श्रीकूर्मम् येथील शिलालेखावरून स. १४२९-३० किंवा १४३१-३२ असा आहे. हा एका धनगराचा मुलगा होता. याचा मुलगा पुरुषोत्तम.

**कसान यांची वंशावळ**—( दे. कृ. ब्रा. )

* आनंदराव ( आप्पा ) रिसालदार

| | |
|---|---|
| बाबासाहेब | चिंतामणी रामभाऊ (जनरल) १८५३ |
| ० | विनायकराव ( दादासाहेब ) |
| | आनंदराव ( रावसाहेब ) ( विद्यमान ) |

*( हे दारव्ह्याहून आले. आरबांचे रिसालदार ).

( नागपूर प्रांताचा इतिहास, पृ. ५५९ ).

**कबीर**—एक हिंदी कवि. हिंदुस्थानांतील एक संत व धर्मसुधारक. याच्या जन्माविषयींच्या कथा बऱ्याच विसंगत आहेत. हा एक ब्राह्मण विधवेचा मुलगा असून स्वतःच्या अब्रूचा बचाव करण्याकरितां तिनें जन्म देतांक्षणींच यास काशी येथील 'लहर' तळ्याजवळ नेऊन टाकलें.

कबीरकसोटी या ग्रंथांत याचा जन्म वि. सं. १४५५ (स. १३९७) आणि मरण १५७५ (स. १५१७) मध्यें झाल्याचें लिहिलें आहे. कबीर पंथी लोक वि. सं. १२०५ ते १५०५ पर्यंत हे हयात होते असें मानतात.

पुढें निरु नांवाचा मुसलमान साळी (जुलहा) आपल्या नीमा नांवाच्या बायकोसह तेथून चालला असतां त्याचें या अर्भकाकडे लक्ष गेलें. त्यानें यास घरीं नेऊन याचें पालनपोषण केलें. तोच कबीर मोठा झाल्यावर साळ्याचा धंदा करूं लागला. याचा हिंदुधर्माकडे कल असल्यानें रामानंदास आपला गुरु करावा असें यास वाटूं लागलें. पण आपण मुसलमान असल्यामुळें हा आपणास शिष्य करणार नाहीं असें वाटल्यावरून यानें एक युक्ति शोधून काढली. रामानंदाचा गंगास्नानाचा नित्यक्रम पाहून कबीर एके दिवशीं घाटावर गेला; रामानंदाचा चालतां चालतां याच्यावर पाय पडला, तेव्हां 'राम राम' असे उद्गार रामानंदाच्या तोंडांतून निघाले. तोच गुरुमंत्र समजून कबीर उठला व रामानंद आपला गुरु आहे असें यानें ठरविलें.

दुसरी ह्याविषयींची हकीकत म्हणजे, प्रथम कबीर रडूं लागला व रामानंदानें त्याला उगी करण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळीं यास 'राम राम' हा गुरुमंत्र दिला.

त्या वेळेपासून कबीर नित्य रामानंदाच्या मठांत जाऊन तेथील वादविवादांत भाग घेत असे. पुढें कांहीं वर्षे हा मणिकपूर मुक्कामीं होता. तेथें यास शेक, तक्की व एकवीस पीर यांची कीर्ति ऐकूं आली. त्यांच्या उपदेशाचा निषेध करून यानें निराळाच उपदेश केला. तक्की व कबीर यांचें शत्रुत्व होतें. सिकंदर लोदीच्या तर्फे सिकंदरानें कबीराचा भयंकर छळ करविला; परंतु केवळ दैवी चमत्कारामुळें कबीर मृत्यूच्या दाढेंतूनहि सुटला. पुढें लवकरच सिकंदराचा व याचा समेट होऊन सिकंदरानें यास आपल्या कृपाछत्राखालीं घेतलें.

कबीर मगहर येथें निवर्तला. याच्या शवाची कोणत्या पद्धतीनें विल्हेवाट लावावी याबद्दल हिंदुमुसलमानांत तंटा लागला. परंतु याच्या अंगावरील झांकलेलें वस्त्र काढतांक्षणींच त्या ठिकाणीं प्रेत नसून फुलें असल्याचें आढळून आलें. तेव्हां अर्थातच कांहीं फुलें मुसलमानांनीं घेऊन त्यांवर कबर बांधली, तर हिंदूंनीं त्यांतील कांहीं फुलें घेऊन त्यांचें काशीक्षेत्रीं दहन केलें. यास लोई नांवाची बायको असून दोन अपत्यें पण होतीं. त्यांचीं नांवें कमाल (मुलगा) व कमाली (कन्या) अशीं होतीं. ह्याविषयीं मात्र कांहीं अद्भुत गोष्टी सांगण्यांत येतात.

वरील हकीकतींत ऐतिहासिक सत्याचा भाग किती व काल्पनिक भाग किती हें ठरविणें कठीण आहे. मि. वेस्टकॉट म्हणतो कीं, हा 'सूफी' मुसलमान पंथाचा असणें अशक्य नाहीं; पण याच्या ग्रंथांत हिंदूंच्या चालीरीति यांच्याशीं इतका पूर्ण परिचय असल्याचें दिसून येतें कीं, मुसलमानी धर्मतत्त्वें याच्या मुळाशीं आहेत असें कशावरूनहि दिसून येत नाहीं. तरी पण हा धार्मिक सुधारक असून पंडित होता, हें मात्र निश्चित आहे. हा निरनिराळे टेंभा मिरविणारे ब्राह्मण व निरनिराळ्या पंथांचे आचार्य या सर्वांवर लाखोली वाही. यावरून याजवर मुसलमानी धर्माचा पगडा बसला होता असें समजतात.

कबीराच्या खुद्द स्वतःच्या ग्रंथांत रामानंदाचें नांव कोठेंहि आढळत नाहीं. तरीपण ईश्वर निर्गुण व विदेही आहे, या मतांचें खंडन करणें वगैरे गोष्टी रामनंदापासून यानें घेतल्याचें संभवतें. याचीं मतें हिंदु व मुसलमान या दोन्ही वर्गांवर परिणाम करणारीं होतीं. सबंध हिंदुस्थानांत याचे अनुयायी दहा लाखांपर्यंत असतील. शीख धर्माचा संस्थापक नानक यानेंहि याच्याच शिकवणीवरून आपला पंथ तयार केला. कबीर हा हिंदु कीं मुसलमान हें समजत नाहीं. कारण हा दोन्ही धर्मांविरुद्ध बोलतो. हा वेदांत, संन्यास, उपासतापास वगैरे गोष्टींना मानीत नाहीं. हा भक्तिमार्गाचा पुरस्कार करी, पण वेदांतास शिव्या देई. यावरून हा अशिक्षित असावा असें दिसतें. अनेक देवांस भजणें चुकीचें आहे. धर्मग्रंथ महत्त्वाचे आहेत, पण त्यांना डोक्यावर चढविण्यांत अर्थ नाहीं, असें याचें मत होतें.

सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं हा म्हणतो, "रामतेजांत सर्व जीवनाचें मिळून झालेलें सृष्टि हें एक सूक्ष्म स्वरूपांत असलेलें द्रव्य होतें. तें द्रव्य रामतेजानें प्रकाशित झालें; नंतर स्त्रीस्वरूपांत वासना प्रकट झाली. तिला 'गायत्री' म्हणूं लागले व तेथूनच सृष्टीच्या उत्पत्तीची खरी सुरुवात होय." उपनिषदांत एकाचीं अनेक रूपें झालीं असें जें म्हटलें आहे तें 'सत्त्व' होय, साक्षात् ईश्वर नव्हे. यावरून कबीराचें मत द्वैतपर आहे, हें सिद्ध होतें. जातिभेद अगर वर्णभेद ह्या सर्व गोष्टी खोट्या आहेत, असें कबीर म्हणतो. कबीराचा सर्व उपदेश तोंडींच असे, तरीसुद्धां त्यानें कांहीं ग्रंथरचना केली असल्याचें त्याचे भक्त सांगतात. सुखनिधान, गोरखनाथाच्या गोष्टी, रामानंदाच्या गोष्टी वगैरे याचे ग्रंथ आहेत.

याचे दोहरे प्रख्यात आहेत. त्याचप्रमाणें याचीं पदेंहि बरींच प्रसिद्ध आहेत. याची कवित्वशक्ति चांगली,

स्फूर्तिदायक व हृदयंगम आहे. याचे दोहरे तुकारामाच्या 'तुका म्हणे' सारख्या शेवटच्या ओळींत 'कहत कबीरा' असें म्हणून पुरे केले आहेत. 'कबीराचे दोहरे' म्हणून उपलब्ध असलेल्या पुस्तकांतील भाषा बरीच मराठीच्या वळणावर आहे.

याचे धर्मदास व सुरतगोपाळ नांवाचे दोन शिष्य प्रसिद्ध आहेत. कबीराच्या मृत्यूनंतर काशीच्या शाखेचा चालक सुरतगोपाळ झाला आणि छत्तिसगडच्या शाखेचा चालक धर्मदास झाला ( श्यामसुंदरदासकृत कबीरग्रंथावली-प्रस्तावना ).

याच्या साक्या लोकांमध्यें म्हणींसारख्या प्रचारांत आल्या आहेत. हे मोठे सत्यनिष्ठ होते. यांनीं स्वतः केलेला ग्रंथ नाहीं, पण यांच्या शिष्यवर्गांनीं नामांकित ग्रंथ केले आहेत. यांची कांहीं गूढ वाक्यें आहेत व त्यांचे कांहीं उलटेसुलटे अर्थहि प्रसिद्ध आहेत. लोकांचा असा समज होता कीं, मगहर येथें मृत्यु आला असतांना मुक्ति मिळत नाहीं. पण सत्यनिष्ठ कबीराला हें केव्हांच पटणें शक्य नव्हतें, म्हणून यानें तेथें देह ठेवला.

**कॅमक**—हा एक इंग्रज सैन्याधिकारी ( मेजर ) होय. भोंसल्याशीं सख्य करण्याकरितां एल्यटनंतर गॉडर्ड यास हेस्टिंग्सनें नागपुरास पाठविलें व त्याच्या मदतीस कॅमक या सेनापतीस पाठविलें ( १७७८ च्या सुमारास ). नंतर हा भेलसा येथें आल्यावर भोपाळकर सरकारांनीं याजपाशीं विनंति केली कीं, 'भेलसे शिंद्याकडून घेऊन आम्हांस द्यावें, त्याबद्दल आम्ही तुम्हांस तीन लक्ष रुपये देतों. कारण भेलसा परगणा पूर्वी नानासाहेब पेशव्यानें भोपाळचे नबाबापासून जिंकून घेतला व तो सध्यां शिंद्यांच्या ताब्यांत आहे.' ही गोष्ट मान्य करून यानें शिंद्यांवर स्वारी केली. पण या स्वारीचा विशेष फायदा न होऊन महादजीनें कॅमकचें पारिपत्य केलें ( स. १७८१ ).

**कमरिपा**—याला कंबल असेंहि म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं तिसावा सिद्ध होय. जात राजकुमार. ओरिसा प्रांतांत राहणारा. घंटापाचा हा शिष्य.

इंद्रभूतिहि याचा शिष्य होता. याला खुद्द गौतमबुद्धाचें दर्शन झालें होतें. हा त्रिपिटकाचा पंडित होता.

यानें प्रज्ञापारमितादर्शनावर चार ग्रंथ लिहिले. याची तंत्रग्रंथसंख्या अकरा आहे. त्यांपैकीं कांहीं प्राचीन उडिया मागधी हिंदींत आहेत. असंबंधदृष्टि ( त. ४८।३८ ), असंबंधसर्गदृष्टि ( त. ४८।३९ ), कम्बलगीतिका ( त. ४८।३७ ).

**कमरुद्दीनखान**—(स. १७२१-४८) दिल्लीच्या मुहम्मदशाहाचा वजीर अली याचा खून झाल्यानंतर बादशहानें अमीनखानास वजीर नेमलें. त्याचाच हा पुत्र होय. कमरुद्दीन व निजामउल्मुल्क हे चुलत भाऊ होत. याचा बाप सन १७२१ त मेला. निजाम वजीर झाला व कमरुद्दीन याची सरदारींत बढती झाली. पुढें यास वाजिरी मिळाली ( स. २२-७-१७२४ ). हा बाळापूरच्या लढाईत निजामाकडे होता. थोरल्या बाजीरावाविरुद्ध लढण्यासाठीं हा मोठ्या सैन्यानिशीं आला होता ( २०-११-१७३४ ). नंतर यानें तरवराहून पिलाजीवर स्वारी केली. पण त्यांची प्रथम गांठ न पडतां पुढें झील तलावावर गांठ पडली. तरीसुद्धां बाजीरावानें झुकांडी देऊन दिल्लीचीं उपनगरें लुटलीं ( स. १७३७ ).

याची वडील मुलगी निजामाच्या मुलास-गाजीउद्दीनास दिली होती. चौदा वर्षांनीं मुलीची भेट झाल्यामुळें याला आनंद झाला. हा निजामास पन्नास मैल सामोरा गेला. त्या वेळची फारच मजेदार माहिती आयर्व्हिननें लिहून ठेविली आहे.

नादीरशहानें यास पुढें कैद केलें, याची सर्व संपत्ति घेतली व यास उन्हांत उभें करून हत्ती, जवाहीर, वगैरे जडजवाहीर घेतलें.

यानंतर मराठ्यांचा उत्तरेंत धुमाकूळ चालू असतां हा त्यांवर चालून गेला. निजाम व हा हे दोघेहि भाऊभाऊ ( चुलत ) असल्यानें मराठ्यांचे शेवटपर्यंत शत्रू राहिले. पुढें अहमदशाहा अबदाली दिल्लीवर चाल करून येत असतां त्यास विरोध करण्यास हा जातीनें गेला; व सरहिंद येथें अबदालीचा पराभव केला. पुढें २।३ दिवसांतच हा आपल्या तंबूंत निमाज पढत असतां तोफेचा गोळा लागून मेला ( १० मार्च १७४८ ).

**कमलदेवी**—गुजराथचा राजा कर्णदेव याची बायको. स. १२९७ मध्यें उलूघखान व नुस्रतखान नांवाचे दोन सरदार गुजराथचे स्वारीवर अलाउद्दीनानें पाठविले. त्यांनीं अनहिलवाड ( हल्लीं पाटण ) वेढा देऊन शहर काबीज केलें. राजा कर्णदेव आपली मुलगी देवलदेवीस बरोबर घेऊन देवगिरीचे राज्यांत आश्रयार्थ गेला. ही मात्र उलूघखानाचे हातीं लागली. त्यानें हिला दिल्लीस पाठविलें. पुढें ही अलाउद्दीनचे झनान्यांत दिल्लीस असतां हिला आपली मुलगी देवलदेवीस भेटण्याची इच्छा झाली. तिलाहि पुढें दिल्लीस आणली ( १ अलफखान व खिजरखान पाहा ).

**कमलभव**—( स. १२३५ सुमारें ) जैनधर्मी कानडी कवि. गुरु-माघणन्दी पंडितयति.

ग्रंथ—शांतीश्वरपुराण. यांत चवदाव्या तीर्थंकराचें चरित्र आहे. १६ आश्वास आहेत.

याला देवकवि उत्तेजन देत असे. यानें देवगिरीच्या सिंघण ( स. १२१०-४७ ) यादवाचा निर्देश केला आहे ( क. क. च. भा. १, पा. ३६१ ).

**कमलशील**—( स. ७५० सुमार ) कमलशील अथवा कमलश्रील असें यास म्हणत. हा बौद्ध तर्कज्ञ शांतरक्षिताचा शिष्य. प्रथम हा नालंदा येथें तंत्रशास्त्राचा पंडित म्हणून काम करीत होता. परंतु पुढें तिबेटच्या राजा( स. ७२८-७४६ )च्या बोलावण्यावरून हा तिबेटांत गेला. तेथें यानें चिनी धर्मोपदेशक महायान होशंग यास वादांत जिंकून व त्यास हाकून देऊन गुरु पद्मसंभव व शांतरक्षित यांच्या मतांचें समर्थन केलें. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेतः—

( १ ) न्याय-बिन्दु-पूर्व-पक्ष ( संक्षिप्त ). या ग्रंथांत धर्मकीर्तीच्या न्यायबिंदूवर लिहिल्या गेलेल्या टीकांचा सारांश दिला आहे. या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे. तिबेटी भाषांतर करण्याचें काम हिंदी साधु विशुद्धसिंह व शुचेन येथील तिबेटी भाषांतरकार या दोघांनीं मिळून केलें.

( २ ) तत्त्वसंग्रहपंजिका. ही शांतरक्षिताच्या तत्त्वसंग्रहावरील टीका आहे. टीकेची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं, परंतु तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे. तिबेटी भाषांतर करण्याचें काम देवेंद्रभद्र व तिबेटी भाषांतरकार या दोघांनीं मिळून केलें ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३२७-३२८ ).

**कमलश्रील**—( कमलशील पाहा ).

**कमलाकर**—मुल्हेरचे उद्धव यांच्या चरित्रांत एका कमलाकराचा उल्लेख आहे ( स. १६४० सुमार ). शिवकल्याणचे पणजे कमलाकर नांवाचे होते. त्यांचा काल व बालबोधकार त्र्यंबकराव योगी ( निरंजन माधवाच्या परंपरेंतील ) यांचा काल एकच. शिवकल्याणचे पणजे पयोष्णीतारीं ( खानदेश ) तापी नदीच्या उत्तरभागीं होते. भक्तिविजय अध्याय ५७ यांत कमलाकराचा उल्लेख आहे. पण ते महिपतीपूर्वीचे होत. यांचीं कांहीं पदें आहेत.

२. गीतगोविंद ग्रंथाचा टीकाकार.

**कमलाकर भट्ट**—( स. १६१०-१६४० ) भट्ट घराण्यांतील काशीचे महापंडित आणि धर्मशास्त्रज्ञ. यांच्या पित्याचें नांव रामकृष्ण व आजाचें नांव नारायण भट्ट. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. यांचा काल स. १६१०-१६४० असा असावा. हा यांचा काल बहुतांशीं बरोबर असावा. कारण यानें आपल्या आजोबाचा जन्म स. १५१३ त झाला असा उल्लेख आपल्या ग्रंथांत केला आहे. हें घराणें मूळचें पैठणचें असून यांचें गोत्र विश्वामित्र. यांना दोन भाऊ होते. त्यांपैकीं धाकट्यानें यांच्या हाताखालीं अभ्यास केला. हाहि विद्वान् असून यानें मीमांसेचा फार बारकाईनें अभ्यास केला होता.

यानें २२ हून अधिक ग्रंथ लिहिले आहेत. यानें कुमारिलाच्या वार्तिकावर निर्णयसिंधु नांवाची टीका लिहिली आहे. शिवाय निर्णयसिंधु ( वि. सं. १६६८; स. १६१० ), दानकमलाकर, शान्तिरत्न, पूर्तकमलाकर, व्रतकमलाकर, प्रायश्चित्तरत्न, विवादताण्डव, गोत्रप्रवरदर्पण, कर्मविपाक रत्न, शूद्रकमलाकर, सर्वतीर्थविधि वगैरे ग्रंथ धर्मशास्त्रावर लिहिले आहेत. यांच्या पूर्तकमलाकरामध्यें तळीं, विहिरी, झाडें ( वनस्पती ), सार्वजनिक बगीचे वगैरे-विषयीं माहिती दिलेली आहे. याच्या तत्त्वकमलाकरामध्यें मीमांसेंतील तत्त्वाविषयीं स्पष्टीकरण आलेलें आहे. याच्या ' विवादताण्डव ' यामध्यें न्यायदानाविषयीं बरीच माहिती आलेली आहे. पुष्कळ ठिकाणीं याचीं व याचा चुलत भाऊ जो नीळकंठ याचीं मतें विरुद्ध आहेत. यानें आपल्या निर्णयसिंधूमध्यें २०० स्मृतींचा आणि ३०० पेक्षां जास्त निबंधकारांचा उल्लेख केलेला आहे. या ग्रंथाचे तीन विभाग केलेले आहेत. धार्मिक कृत्यें, दिनमान, संक्रांत, क्षयमास, तिथि, व्रत, संस्कार, वगैरेची माहिती या ग्रंथांत आलेली आहे. याचा हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. याशिवाय यानें कलिधर्मनिर्णय, कार्तवीर्यपद्धति, नीतिकमलाकर, बह्वृचाह्निक, भक्तिरत्न, रुद्रपद्धति वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. मम्मटाच्या काव्यप्रकाशावर याची एक टीका आहे.

२. हे प्रसिद्ध ज्योतिषी होत. यांचें राहण्याचें गांव गोलग्राम असून यांनीं स्वतः लिहिलेल्या ' सिद्धांतविवेक ' नांवाच्या ग्रंथावरून यांची बरीचशी माहिती मिळते. यांच्या ज्येष्ठ बंधूचें नांव दिवाकर असून बहुतेक ज्ञानप्राप्ति नृसिंहाच्या कृपेनें व दिवाकराच्या शिकवणीमुळें झाली. यानेंच पुढें वर सांगितलेला ग्रंथ लिहिला.

यावरून कमलाकरभट्टाचा निपणजा राम, आजा, कृष्ण, बाप नृसिंह व ज्येष्ठ बंधु दिवाकर, होते असें समजतें. ग्रंथरचनेचा काल व स्थळ यानें आपल्या ग्रंथाच्या

शेवटी दिली आहेत. स. १५८० ते ८१ या कालांत यानें सिद्धांततत्त्वविवेक ग्रंथ लिहिला. यावरून हा ग्रंथ शहाजहान बादशहाच्या राज्याच्या अखेरीस झाला असें दिसून येतें.

याच्या ग्रंथाचे एकंदर १३ भाग आहेत; व त्यास 'अधिकार' अशी संज्ञा दिली आहे. पहिल्या भागांत ग्रहांच्या मध्यम गतींचा विचार असून ग्रहांच्या स्पष्ट गतीचा उल्लेख केलेला आहे. हा ग्रंथ बनारस सिरीजमध्यें प्रसिद्ध झाला आहे.

हा कमलाकरभट्ट सर्वस्वीं सूर्य सिद्धांतानुसारी होता. कमलाकराच्या वरील ग्रंथांतील तत्पूर्वी नाहींत अशा नवीन गोष्टी रा. दीक्षित यांनीं आपल्या ज्योतिःशास्त्रांत नमूद केल्या आहेत ( पृष्ठ २८७-८८ ).

**कमलादेवी कदंब**--पेरमादि कदंबाची पत्नी. कामभूपाची मुलगी.

**कमलाबाई पालकर**—ही थो. शिवाजीची मुलगी होती. हिच्या आईचें नांव सकवारबाई असें होतें. ही जानोजी पालकर यांस दिली होती ( शिवाजी-निबंधावली १, पृ. २२५ ).

**कमलुक**—( तोरमाण पाहा ).

**कमाल**—हा प्रख्यात साधु कबीर याचा मुलगा असें समजतात; पण पुष्कळ कबीर संप्रदायी तसें मानण्यास तयार नाहींत. कमाल नदींत वाहत असतांना कबीरास दिसला व पुढें कबीरानें याचा सांभाळ केला, म्हणून हा आपणास 'कबीरसुत' असें म्हणत असे. 'सुत' शब्दाचा अर्थ शिष्य असा सुद्धां होऊं शकतो. कबीर हा ब्रह्मचारी होता. परंतु लोई ही त्याची शिष्या त्याजपाशीं कायम असल्यानें ती त्याची बायको असावी, असा लोकांचा समज असे ( वि. विस्तार पु. ३९, पा. ६०-७१ ). कमाल व कमाली यांच्या जन्माचे प्रकार विलक्षण आहेत, असें बहुतेक कबीराचे चरित्रकार व अनुयायी म्हणतात. तेव्हां कमाल हा कबीराचा मुलगा नसावा हें खरें वाटतें. कमालाचींहि पदें बरींच आहेत.

**कमालखान**—सिंधु नदीवरील नीलाब प्रांतांतील गख्खर लोकांचा राजा सारंगाचा हा मुलगा. हा याच घराण्यांतील सुलतान आदम याच्यानंतर गादीवर आला.

हुमायूननें सुलतान आदम यास कैद करून गख्खर लोकांचें राज्य याच्या स्वाधीन केलें. तेव्हां हा सर्व गख्खर प्रदेशाचा मालक झाला.

२. ( इस्माईल आदिलशाह पाहा ).

**कमोन्स**—हा एक पोर्तुगीज कवि. गोवें येथील पोर्तुगीज अधिकारी बारेटोने याचे कारकीर्दीत यानें गोव्यांतील पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या उन्मत्तपणावर एक टीकात्मक कविता प्रसिद्ध केली. त्याबद्दल शिक्षा म्हणून या कवीस हद्दपार करून मोलक्का येथें पाठविलें. तेथून हा स. १५८१ त परत गोव्यास आला, आणि कांहीं दिवस चौल येथें रस्ते वगैरे करणाऱ्या ( पब्लिक वर्क्स ) खात्याचा हा मुख्य होता. सोळा वर्षे काम करून हा स्वदेशीं परत गेला. या कवीचे ग्रंथ युरोपांत सुप्रसिद्ध आहेत ( ब्रि. रि. पू. पृ. १२८ ).

**करण घेला किंवा वाघेला**--(कर्णदेव बघेल पाहा).

**करणसिंग**—( स. १६३१-६९ ) हा एक बिकानेर संस्थानचा राजा होय. रायसिंगनंतर हाच या घराण्यांतील थोर पुरुष होय.

यानें महाराष्ट्रांत करणपूर, पद्मपूर व केसरिसिंगपूर हीं गांवें वसविलीं. हीं गांवें इंग्रजांनीं दोन खेडीं देऊन आपल्याकडे घेतलीं.

**करन कवि**—एक हिंदी कवि. हे कान्यकुब्ज देशांत जमीनदार होते व छत्रसालच्या वंशजाच्या ( पन्ना-नरेश ) दरबारीं आश्रयाला होता. यांचा कविताकाल वि. सं. १८६० ( स. १८०२ च्या ) सुमाराचा असल्याचा समज आहे. यांनीं 'साहित्यरस' व 'रसकल्लोळ' या नांवांचीं दोन काव्यें ( रीतिग्रंथ ) लिहिलीं आहेत. साहित्यरत्नांत यांनीं लक्षणा, व्यंजना, ध्वनिभेद, प्रास, अनुप्रास वगैरे सर्व विषयांचें संपूर्ण विवेचन केलें आहे. यांचें काव्यहि मोठें गोड व सुरस वाटतें.

**करमतसिंग**—हा पतियाळाच्या साहेबसिंगाचा मुलगा. स. १८१३ मध्यें गादीवर आला.

**करवाराचार्य**—यांचा आर्यवैद्यकावर एखादा ग्रंथ असावा, असें माधवनिदानावरील टीकेंत ( अतिसाराधिकार ) आलेल्या निर्देशावरून वाटतें ( पं. गणनाथ सेनकृत प्रत्यक्ष शारीर प्रस्ता. ).

**करिकाल चोल**—( स. १५०-१८० ) चोल घराण्यांतील पहिला ऐतिहासिक मुख्य पुरुष हा होय. याच्या पूर्वीचीं नांवें संगमादि ग्रंथांतून आढळतात. परंतु त्यांची ऐतिहासिक माहिती फारशी आढळत नाहीं. करिकालाच्या आजाचें नांव वेरपहरदक्कई पेरुनरकिळ्ळी असून तो कुडक्को नेडुमशेरदालन या चेर राजाचा

समकालीन होता. हे दोघे लढत असतां दोघेहि ठार झाले असें म्हणतात. करिकालाचा पिता उरुवप्पहरेर इळचोन ( इळंजेतसेन्नी ) नांवाचा होता. तो तरुण असतांच वारला तेव्हां हा गादीवर आला. पण चेरांनीं याचें बरेंच राज्य आक्रमण केल्यामुळें याला अज्ञातवासांत राहावें लागलें. पुढें एका आगींत सांपडल्यामुळें याचे पाय अधू झाले. त्यामुळें यास नींळपाद किंवा कृष्णपाद असें म्हणत. लहानपणींच यानें न्यायनिवाड्याचें काम उत्तम केलेलें आढळतें. नानगुर बेळ कुटुंबांतील मुलीशीं यानें लग्न लाविलें. वेण्णिळ ( तंजावर जिल्ह्यांतील हल्लींचें कोईळवेण्णी ) येथें यानें पाण्ड्य व चेर या दोन्ही राजांचा पराभव करून चेर राजकन्येशीं लग्न लाविलें; आणि आपली बहीण चेर राजास दिली. यामुळें दोन्ही घराण्यांत दोस्ती घडवून आणली. सीलोनवर यानें स्वाऱ्या केल्या. आपली पहिली राजधानी उरैयूर ही बदलून कावेरीपट्टनम् नांवाचें शहर स्थापून तेथें नेली. याचें कारण आपल्या राज्याची दक्षिण व पश्चिम सरहद्द मजबूत असावी, व्यापाराची भरभराट होऊन किनाराहि सुरक्षित राहावा, म्हणून ही राजधानीची अदलाबदल झालीं. तिच्या स्थापनेसाठीं करिकालानें सीलोनमधील बारा हजार लोक वेठीस पकडून आणले होते. पुढें सातव्या शतकांत गैल कुर्रम् ही राजधानी झाली. सिलप्पाधिवारम् वगैरे काव्यांतून यानें उत्तर हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून थेट हिमालयावर आपला व्याघ्रध्वज रोविल्याचा उल्लेख आहे. पल्लवांचा ध्वजहि व्याघ्राचाच होता. अवंतीराज, मगधराज आणि वज्रराज ( बुंदेलखंड ) हे याचे मित्र होते. याच्या कारकीर्दीत कावेरीपट्टनम् येथें दर्यावर्दी व देशांतील व्यापार फार जोरांत सुरू होता. याच्या कारकीर्दीत कांची नगरी सोन्याची केली असें वर्णन आहे. तसेंच कावेरी नदीला बंधारे घालून कालवे काढले होते. या वेळीं चोल साम्राज्याची भरभराट झाली असून हा सम्राट् बनला होता. याच्या वर्णनपर पट्टिनप्पालै नांवाचें एक काव्य झालें. त्याच्या कर्त्यास एक लक्ष सव्वा हजार सुवर्णमुद्रा यानें बक्षिस दिल्या. हा विद्वान् असल्यानें याच्या पदरीं परनर, कळाथलैयार वगैरे संगम ग्रंथांत प्रसिद्ध असलेले कवी होते. यानें बरींच वर्षे राज्य केलें.

हा खिस्तोत्तर पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांतील असावा.

२. चोल घराण्यांतील दुसऱ्या आदित्याचें नामान्तर.

३. काकतीयांचा पहिला राजा.

**करीमखान**—हा शिंदेशाहींतील पेंढारी असून यानें खर्ड्याच्या लढाईनंतर ( स. १७९५ ) निजामाच्या सैन्याची जी लूट झाली तींत बराच पैसा मिळविला. याच्या कावेबाजीनें व धूर्ततेनें हा पेंढाऱ्यांचा पुढारी बनला. अमीरखानानें करीमखानास जहागीर म्हणून एक जिल्हा दिला. त्यांतच शिंद्यांनीं कांहीं मुलूख देऊन भर टाकिली. यानें सन १८०३ मध्यें शिंद्यांचे बरेचसे किल्ले काबीज केले. एकदां तर याच्या मुलखाची वसुली १५ लाखांपर्यंत गेली होती.

आपलीं बायकापोरें व द्रव्य यांच्या रक्षणार्थ यानें एक किल्ला बांधला होता. हा शिंदेशाहींतील असला तरी वेळेस आपल्या धन्याविरुद्ध जाण्यास कचरत नसे. यामुळें शिंद्यांनीं याला कांहीं तोफा देण्याचें मिष करून आपल्या भेटीस बोलाविलें आणि कैद करून ग्वालेरच्या किल्ल्यांत ठेविलें. पण यानें पैसे भरून आपली सुटका करून घेतली ( स. १८१० ).

याच्या हाताखालीं त्या वेळीं २५००० फौज व कांहीं पायदळ इतकें सैन्य होतें. याच्या छोट्या नांवाच्या विश्वासांतील माणसानें फितुरी केल्यामुळें याचा भोसल्यावर स्वारी करण्याचा बेत फसला; व अमीरखानाकडे आश्रयास जावें लागलें. शिंद्यांच्या सांगण्यावरून अमीरखानानें यास कैद केलें. हा पुढें स. १८१६ पर्यंत अमीरखानाच्याच कैदेंत होता. याच वेळीं इंग्रजांनीं पेंढाऱ्यांवर स्वाऱ्या करून त्यांचा पराभव केला; व कांहींची कत्तल केली. करीमखान हा इंग्रजांना शरण गेल्यामुळें याला गणेशपूर ही जहागिरी देण्यांत आली. तेथें कांहीं काल याचा वंश नांदत असे. परंतु पुढें स. १८५७ च्या बंडांत भाग घेतल्याच्या आरोपावरून ही जहागिरी खालसा करण्यांत आली.

**करुणाकर पिशारोती**—कालीकत येथील झामोरीन राजाच्या दरबारीं हा एक कवि होता. दक्षिण मलबारमधील प्रसिद्ध क्षेत्र मूक्कोल, येथील हा राहणारा होय.

यानें 'कविचिंतामणि' नांवाची 'वृत्तरत्नाकर' यावर एक टीका लिहिली आहे. त्या टीकेंत कालीकतचा राजा राजराजाच्या पदरीं हा होता, असा उल्लेख आला आहे. राजराज हें मानविक्रम या राजाचें नांव असावें ( Indian H. Quarterly Vol. VI, p. 90 ).

**कर्क राष्ट्रकूट**—राष्ट्रकूट घराण्यांतील पहिल्या गोविंदाचा मुलगा. हा आपल्या बापानंतर गादीवर आला. याचा काल स. ७०० नंतरचा होय. याला इंद्र १ ला, कृष्ण १ ला आणि नन्न गुणावलोक या नांवाचे तीन मुलगे होते.

हा वैदिक धर्माचा भोक्ता असून यानें आपल्या पदरीं पुष्कळ ब्राह्मणांना आश्रय दिला होता ( भांडारकर पृ. ८५ ).

२. ( स. ९७२-७३ ) मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्यांतील निरुपम राजाचा पुत्र. हा खोत्तिग नांवाच्या आपल्या चुलत्याच्या मागून गादीवर आला. यावरून खोत्तिग यास औरस पुत्र नसावा अगर यानेंच युक्तीनें गादी बळकावली असावी असें वाटतें. याच्याच कारकीर्दीत राष्ट्रकूट घराण्याचा शेवट झाला.

यानें अवघे अठरा महिनेच राज्यपदाचा उपभोग घेतला. हा अत्यंत दुर्व्यसनी व दुष्ट होता; व याचे मंत्रीहि याला साजेसेच होते. राष्ट्रकूटाचा शेवटचा सामना दुसऱ्या तैल चालुक्याशीं झाला. ह्या लढाईंत याचा पुरा पराभव होऊन राष्ट्रकूटांचें साम्राज्य नाश पावलें. यालाच अमोघवर्ष चवथा असेंहि म्हणत असत.

३. राष्ट्रकूट घराण्यांतील गुजराथ शाखेपैकी गोविंदाचा हा मुलगा व ध्रुवाचा नातू होय. याचा काल स. ७५७ असा असून हा गुजराथ येथें राष्ट्रकूटाचा सुभेदार होता. राष्ट्रकूटाच्या मुख्य शाखेंतील दन्तिदुर्गाचा हा समकालीन असून त्याच्याच कारकीर्दीत गुजराथची सुभेदारी याचेकडे आली. परंतु पुढें यानें स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला, पण तो सफल झाला नाहीं.

**कर्क सुवर्णवर्ष राष्ट्रकूट**—राष्ट्रकूट घराण्यांतील ध्रुवाचा हा मुलगा. याला गोविंद ३ रा व आणखी कांहीं भाऊ होते. ध्रुवानंतर राष्ट्रकूटांचे गादीवर गोविंद ३ रा आला. कर्क हा आपल्या वडिलांच्या वेळेपासूनच खानदेशचा कारभार पाहत होता.

२. गुजराथ येथील राष्ट्रकूट शाखेंतील इंद्राचा हा मुलगा. यानें अमोघवर्षाचें पालन केलें.

**कर्कोटक वंश**—( काश्मीरचीं राजघराणीं पाहा ).

**कर्ण**—छत्रपति राजाराम महाराज भोसले यांचा लेकवळा हा मराठ्यांच्या तत्कालीन राजकारणांत भाग घेत असे. जेधे शकावलींत स. १६९७ मध्यें राजाराम यानें कर्ण याला मोंगलाईंत पाठविल्याचा उल्लेख आहे. पुढें कर्नाटकांतहि यानें बरीच कामगिरी केली. हा पराक्रमी व योद्धा होता.

**कर्णदेव कलचुरी**—( स. १०३८-८० ) हा त्रिपुरी येथील कलचुरी घराण्यांतील गांगेयदेवाचा पुत्र. यानें हूण राजकन्या आल्हणदेवीशीं लग्न केलें. हा मोठा शूर होता. यानें काशीस 'कर्णाचा मेरु' या नांवाचें एक देऊळ बांधलें ( जबलपूर ताम्रपट ). यानें स. १०३५ त मगधच्या पालचा पराभव केला ( भेडाघाट शिला. ) व चोड, कुंग, हूण, गौड, गुर्जर व कीर या राजांना आपल्या सेवेस लाविलें. भीमदेवगुर्जर, कीर्तिवर्मा चंदेल्ल, पहिला सोमेश्वर ( प ) चालुक्य आणि उदयादित्य परमार यांचा पराभव केला ( स. १०४२ ). यानें भीमदेव गुर्जर राजाच्या मदतीनें मालवराज भोजाचा पराभव केला. पुढें याचा काळ फिरला. याच्या शत्रूंनीं याचा स. १०७० मध्यें पराभव केला. याच्या दरबारीं गंगाधर म्हणून एक कवि होता.

२. ( स. १०४२ सुमार ) हा कल्याणीचा राजा चेदींच्या लेखांत यास त्रिकलिंगाधिपति असें म्हटलें आहे (एपि. इंडि. २ ३०८). यानें कर्णावती नांवाचें एक नवीन नगर वसवून तें वेदविद् ब्राह्मणांना अग्रहार दिलें. तें हल्लीं तेवूरजवळ कर्णबेद नांवाचें खेडें आहे ( एपि. इंडि. २. ३ ). यानें चंपारण्य उध्वस्त केलें. हें चंपारण्य म्हणजे बिहारांतील चंपारण्यच होय ( बिहार ओरिसा जर्नल १९२४ ). याला वीर-श्री आणि यौवन-श्री या नांवांच्या दोन मुली होत्या. त्यांपैकी वीर-श्री ही वर्म घराण्यांतील ( बंगाल येथील ) जतवर्म यास दिली होती व अशा रीतीनें जतवर्माचा राजघराण्याशीं संबंध आला होता. दुसरी मुलगी यौवन-श्री ही बिहारच्या तिसऱ्या विग्रहपाल राजास दिली होती ( The Modern Review for November 1932, p. 5-30 ).

**कर्णदेव वघेल**—वघेल वंशांतील सारंगदेवाचा पुत्र. गुजराथमध्यें हा करणघेला नांवानें अजूनपर्यंत प्रसिद्ध आहे. याच्या वेळीं वि. सं. १३५६ ( स. १२९९ ) मध्यें दिल्ली येथें अलाउद्दीन खल्जी याचा धाकटा भाऊ उलूघखान तसेंच नुस्रतखान जलेसरी यानें गुजराथेवर स्वारी केली आणि याचें राज्य घेतलें. हा पळून देवगिरीच्या रामदेवराव यादवाकडे गेला. अशा प्रकारें गुजराथमधील सोलंकींचें राज्य नष्ट झालें. याची राजधानी गुजराथेंतील अनहिलवाड ही होती.

याला कर्ण, करण, कर्णराय किंवा कर्णदेव असें म्हणत असत. हा वघेल वंशांतील म्हणून वाघेला असें म्हणत. तसेंच वेडसर असल्यानें घेला असें म्हणत. घेलो हा गुजराथी शब्द असून त्याचा अर्थ 'वेडा' असा आहे.

भाट लोकांनीं कर्णाच्या अनाचाराचें पुष्कळ वर्णन केलें आहे. माधव नांवाचा एक नागरी ( नागर ) ब्राह्मण याचा मुख्य प्रधान होता. तो कोठें बाहेर गेला असतां,

त्याच्या रूपवती पत्नीस कर्णानें बलात्कार करून आपल्या वाड्यांत नेलें. तिला सोडविण्याचा प्रयत्न माधवाचा भाऊ केशव यानें केला, पण त्यांत तो मारला गेला. वरील हकीकत माधवास कळतांच त्यानें अलाउद्दीन खल्जीची मदत घेऊन लढाईची तयारी केली. शेवटीं लढाई होऊन फितुरीनें याचा पराभव झाला व हा आपलीं बायका-मुलें राजधानींत सोडून पळून गेला. याच्या पश्चात् मुसलमानांनीं याचें राज्य घेतलें. त्या वेळीं याची स्त्री कमलादेवी ही मुसलमानांचे हातीं लागली. पुढें तिची अलाउद्दीनकडे रवानगी करण्यांत आली. नंतर याची मुलगी देवलदेवी हिलाहि पकडून दिल्लीस अलाउद्दीनाकडे पाठविण्यांत आलें. नंतर देवलदेवीचें लग्न शहाजादा खिजरखान याजबरोबर झालें.

इकडे हा दुर्धर यातना व दुःखें ह्यांनीं जर्जर होऊन लवकरच अज्ञातवासांत मरण पावला. या गुजराथच्या शेवटल्या राजावर भाटांनीं रासमाला वगैरे ग्रंथांत अनेक कविता केल्या आहेत.

**कर्णपार्य**—( स. ११४० सुमार ) कानडी कवि. जैन, कर्णप, कन्नमरय, कण्णप्प वगैरे नांवानीं याचा उल्लेख येतो.

ग्रंथ—नेमिनाथपुराण, माळवीमाधव ( दुर्गसिंहाच्या कानडी पंचतंत्रावरून कळतें ), वीरेशचरित्र.

याचा गुरु—कल्याणकीर्ति (मलधारीदेवाचा शिष्य).

आश्रयदाता—जीमूतवाहनवंशज लक्ष्मणराज.

**कर्ण यादव**—हा पांचव्या भिल्लम यादवाचा पिता.

**कर्णरिपा** ( आर्यदेव )—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं अठरावा सिद्ध आहे. जात ब्राह्मण. नालंदा प्रांतांत राहणारा. हा नागार्जुनाचा शिष्य.

**कर्णसिंह**—( स. १५८४-१६२८ ) उदेपूरचा महाराणा. हा अमरसिंहाचा मुलगा. ज्या वेळेस जहांगीर बादशाहानें कर्णसिंहास मनसबदारी व राजा हा किताब दिला, तेव्हां अमरसिंहानें आपला राज्यशकट याच्या ताब्यांत दिला. हा २६ जानेवारी १६२० मध्यें गादीवर बसला. याच्या राज्यांत झगडे न होण्याचें कारण यानें आपल्या राज्यांत हिंडून फिरून ठिकठिकाणीं सुधारणा केल्या व उदेपूर शहराचीहि पुष्कळ सुधारणा केली.

याच्या कारकीर्दीत लढाया अशा झाल्याच नाहींत. यानें खुर्रमला पुष्कळ वेळां लढाईच्या प्रसंगीं मदत केली. शहाजहान बादशाह होण्यास याची मदत कारणीभूत झाली.

यानें आपल्या राज्यांतील प्रत्येक गांवांत, पाटील, पटवारी, त्याचप्रमाणें चौकीदार नेमून दिले. जेणेंकरून आपली प्रजा सुखांत राहील अशी यानें फारच काळजी घेतली. त्यामुळें याच्या राज्यांतून बाहेर देशांत गेलेले लोक परत आपल्या देशांत येऊन आनंदानें राहूं लागले.

यास एकंदर सात पुत्र होते. जगतसिंह, गरीबदास, मानसिंह, छत्रसिंह, मोहनसिंह, गजसिंह, सूरजसिंह आणि दोन मुली होत्या. हा जन्मजात राजा होता. याचा चेहरा भव्य असून, डोळे मोठे व पाणीदार होते, याचा चेहरा नेहमीं हंसतमुख असे. त्यामुळें हा आपली छाप लोकांवर सहज पाडीत असे. हा स. १६२८ च्या मार्च महिन्यांत मरण पावला ( रा. इ. पा. ८२२ ते ८३० ).

**कर्ण सोळंकी**—( स. १०६३-१०९३ ) हा अनहिलवाडच्या भीमदेव सोळंकीचा उदयमतीपासून झालेला मुलगा. याची राणी मयणल्लदेवी ( मीनल किंवा मैनलदेवी ) ही गोव्याच्या जयकेशी कदंबाची मुलगी. यानें हल्लीं जेथें अहमदाबाद शहर आहे, तेथें कर्णावती नांवाचें शहर स्थापिलें ( स. १०७० ). यानें शांततेनें राज्य केलें व लोकोपयोगी अनेक कृत्यें केलीं. कर्णसागर नांवाचा तलाव यानें बांधला. याला मैनलदेवीपासून सिद्धराज जयसिंह नांवाचा सुप्रसिद्ध पुत्र झाला.

माळव्याचा राजा उदयादित्य यानें सांभरच्या तिसऱ्या विग्रहराज चौहानाच्या मदतीनें याला जिंकलें ( एपि. इंडि. भा. १० पृ. १९२ ). यानें गुजराथेंतील कोळी व भिल्ल लोकांचा उपद्रव नाहींसा केला व त्यांना ताब्यांत घेतलें. विक्रमांकदेवचरित लिहिणाऱ्या बिल्हणानें कर्णसुंदरी नांवाची नाटिका लिहिली आहे, त्या नाटिकेचा नायक असणारा कर्ण हाच होय. सिद्धराज जयसिंह अज्ञान असतांच हा मृत्यु पावला.

**कर्णावती**—उदेपूरच्या महाराणा संगाची पत्नी. बहादुरशहानें स. १६२३ त जेव्हां चितोडगड काबीज केला त्या वेळीं हिनें राखी पाठवून हुमायूनचें साहाय्य मागितलें. हिला पुढें हुमायूनच काय पण अकबर ते औरंगजेबापर्यंत सर्व आपली बहीण मानीत असत.

**कर्नाटकचे नबाब**—( पा. २०८ पाहा ).

**कर्माबाई**—ही बाई जगन्नाथक्षेत्रांत राहत असे. हिचा पति मरण पावला त्या समयीं ही गरोदर होती. पुढें हिला मुलगा झाला व मुलाचीहि वाढ होऊन नातू झाला. परंतु पुत्र मरण पावल्यानें हिला असह्य दुःख झालें.

पुढें असेच दुःखांत हिचे दिवस चालले असतां एक साधु हिच्या घरीं आला व त्यानें एक गोपालमूर्ति हिच्या

स्वाधीन केली व बजाविलें " ज्याप्रमाणें आपण एखाद्या लहान मुलाचें पालनपोषण करतों त्याप्रमाणें ह्या मूर्तीस जप. " त्याप्रमाणें हिचा क्रम चालू असतां ती मूर्ति खरोखरच हिच्या हातून जेवूं लागली.

एकदां असें झालें कीं, कांहीं कामामुळें हिला जेवावयास घालण्यास उशीर झाला. तेव्हां जगन्नाथास भुकेनें पीडा झाल्याचा दृष्टांत पुजाऱ्यास झाला. त्यावरून देवास कर्माबाईचा नैवेद्य आवडतो असें ठरून अजूनहि तोच प्रकार चालू आहे ( भक्ति. वि. अ. ३५ ).

**कर्मारपा**—यालाच कम्मरिपा असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं पंचेचाळिसावा सिद्ध होय. जात लोहार. साळिपूरचा राहणारा. अवधूताचा शिष्य. यानें सोमसूर्यबंधनोपाय (त. ४०।७१) नांवाचा ग्रंथ लिहिला.

**कलकलपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं अडुसष्ठावा सिद्ध होय. जात शूद्र. स्थान भिरलीनगर ( ? ).

## कलचुरिवंश ( कल्याणीचा )—

कृष्ण ( नासिकजवळ राज्य करीत होता )
|
शंकरगण
|
बुद्ध ( स ६०५–१०; मंगलेश चालुक्या-
..... कडून पराजय )
कर्ण ( कन्न, कृष्ण ) स. १०४२ ( एपि.
| इंडि. २. २९७ ). त्रिकलिंगचा राजा.

बिज्जल १ वीरश्री यौवनश्री राज किंवा राजल
|
अम्मुगी संकम १ कन्नर जोगम
|
पेरमादि ( ११२८,
सोमेश्वर (प.) चालुक्याचा मांडलिक )
|
बिज्जल २ ( त्रिभुवनमल्ल, निशंकमल्ल, मईलुगी
| ( स. ११५६; खून )

२ सोमेश्वर ३ शंकम आहवमल्ल
( सोविदेव सोयी (संकवर्ष) (स.११८१–८३
रायमुरारि (स.११७५–८०) अप्रतिमल्ल
स.११६७–७५) रायनारायण )

सिंघण सिरियादेवी ( एरंबरगच्या चामुंडराय
(स. ११८३–८४) यादवाशीं लग्न )

**टीप**—चेदीच्या कलचुरींमधूनच हें घराणें निघालें आहे ( बॉबे गॅझेटियर १. २. ४६८ फूटनोट, एपि. इंडि. १२. ३०; १५. ३१५ ). पश्चिम चालुक्य राज्याचा नाश केल्यावर दुसऱ्या बिज्जलनें राजा ही पदवी धारण केली. याच्या बायकोचा भाऊ बसव हा लिंगायत धर्माचा संस्थापक असून त्यानें याचा खून केला. बिज्जल २५ सप्टें.–६ डिसें. ११५६ च्या दरम्यान गादीवर आला ( एपि. कर्ना. ७ शिकारपूर १०२; ८ सोरब १३१ ). हा ता. २ मे ११७५ पर्यंत जिवंत होता ( एपि. क. ८ सागर ६६ ).

## २. ( त्रिपुरीचें हैहय )—

१ कोक्कलदेव स. ८५० पत्नी नट्टा
| ( हर्षचंदेल्लाची बहीण )

कलिंगराज २ मुग्धतुंग ऊर्फ प्रसिद्धधवल
| | स. ९००
कमळराज |
३ बालहर्ष ४ केयूरवर्ष ऊर्फ युवराज पहिला
स. ९२५ ( लग्न नोहलादेवी )
|
५ लक्ष्मणदेव स. ९५०

६ शंकरगण ७ युगराजदेव ( मुंजराजाचा समकालीन )
स. ९७० | स. ९८०
८ कोक्कलदेव ( दुसरा ) स. १०००
|
गांगेयदेव ( स. १०१०–१०३८ )
|
कर्ण ( स. १०३८–१०८० )
( राणी आल्हणदेवी हूणकन्या )
यशःकर्ण ( स. १०८०–११२४ )
|
गयकर्ण ( स. ११२४–११५२ )
( राणी आल्हणदेवी गुहिलोतकन्या )
विजयसिंहाची मुलगी.

नरसिंह (स.११५२–११७०) जयसिंह
( ११७०–११८०*)
|
विजयसिंह ( स. ११८०–११९८ )
|
अजयसिंह ( गौरीशंकर ओझा )
|
त्रैलोक्यवर्मन

**टीप**—चेदिशकारंभ स. २४८ सप्टेंबरच्या पांच तारखेस सुरू झाला ( एपि. इंडि. ९. २१ ). चेदिशकाला कलचुरी हें नांव मात्र आठव्या शकापूर्वी आढळत नाहीं. हें घराणें आठव्या शतकापर्यंत बौद्ध असून पुढें वैदिक झालें ( एपि. इंडि. व्हा. १, पा. २६५; व्हा. २, पा. ३०५ ).

**३. कलचुरीवंश (रतनपूर)**–पृथ्वीदेव–×नानल्लदेव (स. ११२४) ×कान्यकुब्जचा गोविंदचंद्र व जेजाकभुक्तीचा कीर्तिवर्मा हे याचे मित्र होते )–रत्नदेव–पृथ्वीदेव ( स. ११४५ )–जाजल्लदेव ( स. ११६८ )–रत्नदेव ( स. ११८१ )–पृथ्वीदेव ( स. ११९० ).

**कलथ-थलई**—( स. ३०–६० ) हा एक तामिळी कवि असून चेर राजाच्या दरबारीं भाट होता. ज्या लढाईंत चेरल–अथन व चोलकिळी हे एकमेकांशीं लढणारे राजे अगदीं घायाळ होऊन पडले, त्या प्रसंगीं हा भाट हजर होता. याच्या पुढच्या लढाईतहि म्हणजे जेव्हां दुसऱ्या एका चेरल–अथन नांवाच्या राजाचा करिकाल चोलानें पराभव केला तेव्हां हा होता. कपिलर कवि, याचा जुना कवि म्हणून उल्लेख करितो व यासंबंधीं अशी माहिती सांगतो कीं, इरंको–वेलची राजधानी अरैयम् तेथील राजानें याचा मान ठेवला नाहीं म्हणून नष्ट झाली. या कवीनें रचलेलीं सहा पदें पुरनानुरूमध्यें आहेत ( कनकसभे–तामील्स एटीन हंड्रेड इयर्स अॅगो ).

**कलश**—हा काश्मीरच्या लोहर घराण्यापैकी अनंतदेव व सूर्यमती यांचा हा पुत्र. मातापित्यांनीं वृद्धपणामुळें वानप्रस्थाश्रम स्वीकारून याला गादीवर बसविलें, पण यानें दुष्टपणानें त्यांना अत्यंत त्रास दिल्यामुळें पित्यानें आत्महत्त्या केली व आई सती गेली. पण त्यानंतर मात्र हा विचारपूर्वक वागूं लागला. पण पुढें लवकरच याचा पुत्र हर्ष यानें बंड उभारलें, त्यांत शेवटीं हर्षाला बंदिवास पत्करावा लागला. याच्या मागून हर्ष गादीवर बसावा अशी याचीहि इच्छा होती, पण नोनक नांवाच्या मंत्र्याच्या खटपटीनें उत्कर्ष गादीवर बसला. कलश स. १०७३ मध्यें मरण पावला ( म. भा. १. २. ११५ ). कल्याणच्या परमर्दीदेवानें पंडित मागितल्यावरून यानें बिल्हणास कल्याणास पाठविलें.

**कलिकाल गौतम**—( हरिभद्रसूरि पाहा ).

**कलिकालसर्वज्ञ**—हेमचंद्रसूरीचें नामान्तर.

**कलिवल्लभ**—ध्रुव राष्ट्रकूटाचें नामांतर.

**कलिविक्रम**–दुसऱ्या विक्रमादित्य चालुक्याचें नामांतर.

**कलिंगराज कलचुरी**—रत्नपूर येथील कलचुरी ( हैहय ) घराण्यांतील हा पहिलाच राजा होय. स. १०२० मध्यें हा राज्य करीत होता.

त्रिपुरीच्या कलचुरी घराण्यांतील जो कोक्कल १ ला त्याचा हा वंशज होय. यानें दक्षिण कोसल जिंकलें. याच्यानंतर याचा मुलगा कमलराज हा गादीवर आला ( B ).

**कलीमुल्ला बाहामनी**—( स. १५२२–२६ ) हा बाहामनी राज्यांतील दुसऱ्या अहमदाचा पुत्र होय. याला अहमद बरीदनें गादीवर बसविलें; व वलीच्या बेगमेशी निका लाविला. तिच्यावर आषक होऊनच यानें वलीचा खून केला होता. हा शेवटपर्यंत नगरच्या बुर्हाण निजामाकडेच राहत होता. याच्यानंतर बाहामनी वंशाचें राज्य लयास गेलें.

केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया यामध्यें हा दुसऱ्या अहमदाचा मुलगा नसून भाऊ आहे, म्हणजे हा महमूद २ रा याचा मुलगा होय, असें उल्लेखिलें आहे.

**कल्याणकवि**—आलकदत्ताचा शिष्य. मंखाच्या ग्रंथाच्या परीक्षणाकरितां जे तीस पंडित नेमले होते त्यांपैकीं हे एक होत.

**कल्याणकीर्ति**—'संक्षेपजिनविजय' नामक ग्रंथाचा कर्ता.

**कल्याण गोसावी**—हे श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे शिष्य होत. गोदावरीच्या तीरीं असणाऱ्या बाभूळगांवच्या कृष्णाजीपंताचे हे पुत्र होत. यांचें गोत्र कौशिक असून हे आश्वलायनशाखी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. यांचा जन्म शके १५४० मध्यें झाला. यांचें मूळचें नांव अंबाजी. वडील काशीयात्रेस गेल्यावर हे आपल्या बंधूसह-वर्तमान कोल्हापुरास राहावयास गेले.

मामा पिराजीपंत यानें यांचा चांगल्या रीतीनें सांभाळ केल्यामुळें पुढचें शिक्षण यांना सोपें गेलें. रामदासस्वामी एकदां कोल्हापूर मुक्कामीं आले असतां पिराजीपंतांच्या मनांत अनुग्रह घेण्याचें आलें. समर्थांच्या म्हणण्याप्रमाणें सिद्धता करून त्यांनीं अनुग्रह घेतला.

त्या दिवशींचा भोजनाचा थाट अंबाजीनें केला असल्यानें श्रीरामदासस्वामींनीं आपल्या सेवेकरितां याची याचना केली. बहिणीच्या मर्जीप्रमाणें पिराजीपंतांनीं अंबाजीस श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या स्वाधीन केलें. रामदासांनीं यास योग्य तें शिक्षण, लेखन व वाचन शिकविलें.

एकदां समर्थांच्या आज्ञेनुसार हा छबिना जाणाऱ्या वाटेवरील फांदी तोडीत असतां विहिरींत पडला. बऱ्याच

वेळानंतर ही बातमी रामदासस्वामींना समजली. ते तात्काळ विहिरीवर आले. त्यांनीं "अंबाजी" म्हणून हाक मारतांच यानें आंतून ओ दिली. त्यावर स्वामींनीं विचारलें "कल्याण आहेस का?" त्यावर तो "हो" म्हणाला. यावरूनच यांस पुढें कल्याण म्हणण्याचा प्रघात पडला. ही गोष्ट मसूर येथें झाली. समर्थांच्या दासबोधाचें व इतर ग्रंथांचें लेखन खुद्द कल्याणांनींच केलें आहे. हे गुरुभक्त व भरताचे अवतार होते, असें मोरोपंत आपल्या आर्येंत म्हणतात. याची कविता व पदें पुष्कळ आहेत. डोमगांव मुक्कामीं यानें मठस्थापना केली होती. तेथें यांनीं लिहिलेला दासबोध अजून आहे. हे आजन्म ब्रह्मचारी होते. यांनीं केलेल्या अनेक अचाट कृत्यांवरून यांची शक्ति अजमावतां येते.

**कल्याणचंद्र**—( स. १००० चे सुमारास ) हा 'प्रमाण-वार्तिक-टीका' या ग्रंथाचा कर्ता होय. हा स. १३५० पूर्वी झाला असला पाहिजे, कारण ज्ञानचंद्रानें याचा उल्लेख आपल्या 'रत्नाकरावतारिका-टिप्पण' या ग्रंथांत केला आहे.

**कल्याणदास**—शके १७४८ ( स. १८२६ ) मध्यें हा होता व डाकुरास राहत असे. सत्संग म्हणून याचा एक ग्रंथ गुजराथींत असून कांहीं पदेंहि पण यांचीं प्रसिद्ध आहेत.

**कल्याणभट्ट**—जयरथ नामक कवीचा गुरु.

**कल्याणमल्ल**—( स. ११७२ सुमार ) हा कलिंग देशचा राहणारा. कविचरित्रांत हा जातीनें ब्राह्मण असल्याचें सांगितलें आहे. परंतु 'मल्ल' या पदावरून हा क्षत्रिय होता, असें कांहींचें मत आहे. कलिंग देशचा राजा अनंगभीम, याच्या पदरीं हा नोकरीस होता.

'अनंगरंग' या नांवाचा यानें एक ग्रंथ ( श. १०९४ च्या सुमारास ) रचिला आहे ( क. च. ).

**कल्याण रक्षित**—( स. ८२९ सुमार ) हा बुद्ध तर्कज्ञ धर्मोत्तराचार्याचा गुरु असून वादविवादांत अत्यंत प्रवीण होता. स. ८२९ त कालवश झालेल्या महाराज धर्मपाल याच्या कारकीर्दीत हा होऊन गेला. यानें खालील ग्रंथ लिहिले:—

( १ ) सर्वज्ञसिद्धिकारिका–हा ग्रंथ तिबेटांत आहे. ग्रंथास सुरवात सर्वज्ञास प्रणाम करून होते.

( २ ) बाह्यार्थसिद्धिकारिका–ह्या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं, परंतु तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे. तिबेटी भाषांतर करण्याचें काम काश्मीर येथील वैभाषिक शिक्षक जिनमित्र व तिबेटी भाषांतरकार या दोघांनीं मिळून केलें.

( ३ ) श्रुतिपरीक्षा—या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे.

( ४ ) अन्यापोहविचारकारिका–ह्या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे.

( ५ ) ईश्वरभंगकारिका—या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु याचें तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३२८-३२९ ).

**२.** ( स. १००० सुमार ) ह्या जैनतर्कज्ञानें बुद्धतर्कज्ञ धर्मकीर्ति ( स. ६३५ ) याच्या 'प्रमाणवार्तिक' या ग्रंथावर 'प्रमाणवार्तिकटीका' या नांवाची एक टीका लिहिली आहे. स. १३५० मध्यें ज्ञानचंद्रानें आपल्या 'रत्नाकरावतारिकाटिप्पण' या ग्रंथांत याच्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे. तेव्हां त्यापूर्वीच ही टीका यानें लिहिली असली पाहिजे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. १९८).

**कल्याणवर्मन्**—(स.५७८सुमार) सारावली नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. भट्टोत्पलानें बृहज्जातकावरील 'जगच्चंद्रिका' नांवाच्या टीकेंत सारावलींतील कांहीं उतारे घेतले आहेत ( स. ९६६ ), त्याअर्थी हा त्यापूर्वी स. ५७८ च्या सुमारास होऊन गेला असावा ( डफ ).

**कल्याणवर्मन् मौखरी**—( स. ३२६ ) कनोजच्या मौखरी वंशांतील हा सुंदरवर्मनचा मुलगा. चंद्रगुप्तानें पाटलीपुत्रास ज्या वेळीं वेढा दिला त्या वेळीं आपल्या राजधानीचें संरक्षण करीत असतां याचा बाप सुंदरवर्मन् हा मारला गेला. बापाच्या मरणसमयीं हा अगदीं लहान होता. त्यामुळें चंद्रगुप्तानें याचें राज्य घेतलें. अल्पवयींच वरीलप्रमाणें आपत्ति याच्यावर आल्यानें विनयंधरा नांवाच्या एका दाईनें याला एका अरण्यांत नेऊन याचें पालन केलें. त्याचप्रमाणें मंत्रगुप्त नांवाचा याचा मुख्य मंत्री व इतर सरदार मंडळी योग्य वेळ येतांच चंद्रगुप्तास गादीवरून काढून टाकून याला गादीवर बसविण्याच्या विचारांत होती. चंद्रगुप्तानें आपल्या राज्याच्या मर्यादा वाढविल्या, पण लवकरच त्याच्या राज्यांत बंडाळी माजली. ती मोडण्याच्या कामांत चंद्रगुप्त गुंतला असतां याचा मंत्री मंत्रगुप्त यानें फंदफितुरी करून व आसपासच्या राजांची मदत घेऊन कनोजच्या गादीवर याची स्थापना केली. सुगांग राजवाड्यांत याला राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकानंतर यादव राजा कीर्तिसेन याची मुलगी कीर्तिमती इच्याशीं याचें लग्न झालें ( कौमुदीमहोत्सव अंक ५ ). इतक्यांत चंद्रगुप्त मारला गेला. परंतु पुढें लवकरच समुद्रगुप्तानें याचा पराभव करून याला पाटलीपुत्र सोडून जाणें भाग पाडलें.

एकंदरीत याची कारकीर्द फारशी महत्त्वाची नव्हती. राज्य मिळविण्यामध्यें यानें कांहींच शौर्य दाखविलें नव्हतें. याला राज्योपभोग फार दिवस मिळाला नाहीं ( The Maukharis, by E. A. Pires, p. 36-41 ).

**कल्याणसिंग**—हा बिकानेरचा राजा. यानें आपली मुलगी अकबरास दिली. हा आपल्या मुलासह अकबरास भेटावयास गेला होता. याचा मुलगा रायसिंग हा अकबराचा सेनापति होता.

**कल्ल सोळंकी**—सोरठ येथें राज्य करणाऱ्या सोळंकी वंशांतील पुरुष. याचा भाऊ महल्ल. या दोन भावांचें प्रेम रामलक्ष्मणांसारखें होतें. याचा पुत्र राजेन्द्र.

**कल्लट**—हा काश्मीरच्या अवंतिवर्म राजाच्या वेळीं उदयास आला ( स. ८५५-८८३ ). राजतरंगिणीकारांनीं याचा सन्मानपूर्वक उल्लेख केला आहे.

**कल्लर**—( लल्ल किंवा लल्लीय पाहा ).

**कल्लादनार**—( स. १००-१३० ) तामिळ कवि. हा बहुतेक वेंकडमचा रहिवासी असून भयंकर दुष्काळांत यास तें गांव सोडावें लागलें. दक्षिणेकडे येऊन हा कावेरीच्या तीरावर राहूं लागला. तेथील पोरैयुरु व अंबर राजांनीं याचा चांगला सत्कार करून यास आपल्या दरबारीं ठेविलें. अलंकानमूच्या लढाईंत पांड्य सैन्यांत हा होता. तेव्हां विजयी नेडुंजचेलीयनचीं स्तुतिपर कवनें यानें गाइल्यामुळें यास लुटींतील एक हिस्सा मिळाला. तोल्काप्पियम या तामिळी व्याकरणावर यानें टीका लिहिली असें म्हणतात, पण ती सध्यां उपलब्ध नाहीं. मदुरेंतील शिवलीलेचें वर्णन केलेला कल्लाडम नांवाचा काव्यग्रंथ यानेंच लिहिला असें म्हणतात; पण याच्या भाषेवरून व पुढील काळांत घडलेल्या गोष्टींवरून तसें दिसत नाहीं ( ज्ञानकोश ).

**कल्हण**—काश्मीरचा राजा हर्ष, त्याचा मंत्री चंपक. त्या चंपकाचा पुत्र हा होय. याचा राजतरंगिणी नांवाचा ग्रंथ सुप्रसिद्ध असून त्यांत आठ तरंग आणि ७८२७ श्लोक आहेत. यानें इतिहासाचे अकरा ग्रंथ, अनेक शिलालेख, दानपत्र आणि प्रशस्ति वगैरे साधनांचा अभ्यास करून हा ग्रंथ लिहिला आहे. यानें लिहिलें आहे कीं, सुव्रतानें विस्तृत इतिहासग्रंथांतील सार घेऊन आपला ग्रंथ लिहिला, पण त्यामुळें मूळ साधनें नष्ट झालीं. क्षेमेन्द्रानें नृपावलिग्रंथाची रचना केली, पण ती निर्दोष झाली नाहीं. याशिवाय यानें हेलाराजाची पार्थिवावलि, पद्ममिहिराचें पुस्तक आणि नीलमतपुराण यांचा निर्देश केला आहे. यानें नीलमतपुराणाच्या आधारें गोनन्द,दामोदर यशोमती आणि दुसऱ्या गोनन्दाचा इतिहास लिहिला आहे. पहिला गोनन्द हा पांडवांचा सामन्त होता. तेव्हांपासून याचा समकालीन राजा जयसिंहापर्यंत यानें आपला ग्रंथ लिहिला आहे, आणि त्याच्याच कारकीर्दीत समाप्त केला आहे. यानें स. ११४८ ( श. १०७० ) राजतरंगिणी लिहिण्यास सुरुवात केली आणि पुढें दोन वर्षांनीं संपविला. ( रा. त. १. ५२ ). याचें अनुकरण करून पुढें जोनराजानें स. १४१२ पर्यंत भाग लिहिला. तसेंच जोनराजाचा शिष्य श्रीवदानें स. १४७७ पर्यंत भाग लिहिला. त्यानंतर प्राज्यभट्टानें अकबराच्या विजयापर्यंतचा भाग लिहिला. यानें एक 'अर्धनारीश्वरस्तोत्र' लिहिलेलें आहे.

**कविकंकण मुकुंदराय**—( मृ. स. १६४० ) बंगाली कवि. हे एक ध्येयवादी कवि असून वास्तव वादाचे पुढारी होते. हे स. १६ व्या शतकांत होऊन गेले. त्या समयीं असणाऱ्या इंग्लिश प्रोफेसर कोवेल यानें यांची फार प्रशंसा केली आहे.

यांच्या आत्मचरित्रावरून असें समजतें कीं, हे बरद्वान जिल्ह्यांतील दामन्या नामक गांवचे राहणारे होत. त्या परगण्याचा सुभेदार फार क्रूर होता. त्याच्या अत्याचारानें आणि उपद्रवानें सर्व गांव त्रासून गेलें होतें. अशा स्थितींत हा आपलें जन्मस्थान सोडून भटेनला आला. तेथें रूपराय आणि यदुनान्दी यांनीं याला मदत करून आपल्या घरीं ठेवून घेतलें. यानें आपल्या आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे कीं, स्नानाच्या वेळीं आम्हां लोकांना तेल मिळत नसून आम्हांला आमची भूक पाणी पिऊन भागवावी लागत असे. एकदां यानें फूल नांवाच्या तलावावर चंडी देवीची पूजा केली आणि थकल्यामुळें जमिनींवर झोपला. त्या वेळीं स्वप्नांत चंडी देवीनें दर्शन देऊन याला नियम शिकवून कविता करण्यास सांगितलें.

यानंतर हा आडरा ( मेदिनीपुर ) येथें आला. तेथील बाकुंडाराय राजाला याची कविता इतकी पसंत पडली कीं, राजानें याला आपल्या मुलास शिकवण्याकरितां शिक्षक नेमलें. दरबारांत याला फार मान मिळत असून शेवटीं शेवटीं तर हा राजाच्या कृपाछत्राखालीं गेला. जेव्हां देशाची परिस्थिति सुधारली तेव्हां हा पुन्हां आपल्या जन्मभूमीस परत गेला, व राहिलेलें आयुष्य चंडी देवीच्या आराधनेंत घालविलें. याचा मृत्यु स. १६४० च्या सुमारास झाला.

यांचा 'चंडी-मंगल' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. हें काव्य यानें स. १५८९ मध्यें समाप्त केलें. त्या वेळीं मानसिंह

# कर्नाटकचें नबाब घराणें

१ झुल्फीकार अलीखान ( यानें औरंगजेबाकडून कर्नाटकच्या नबाबांची उत्पत्ति करून घेतली. स. १६९० किंवा १६९२-१७०३ )

२ दाऊदखान ( यानें इंग्रजांशीं मैत्री संपादिली स. १७०३-१७१० )

अगीबत्ती मुहम्मदखान

३ सादत उल्लाहखान १ ला ( 'मुहम्मद सय्यद' याला विजापूरच्या बहादुरशाहा यानें नबाब केलें. स. १७१०-१७३२ )

गुलाम अलीखान ( सादत-उल्लाह खान यानें याला वेलोरचा जहागीरदार केलें. )

४ दोस्त अलीखान ( स. १७३२-१७४० ) याला सादत-उल्लाहखान यानें दत्तक घेतलें, याचा दिवाण चंदासाहेब हा होय.

फकीरअली ( वेलोरचा सुभेदार स. १७३२ )

सादत-अली

अकबर मुहम्मद

गुलाम मुर्तझाअली ( वेलोरचा सुभेदार )

हुसेन ( दामलचेरुकच्या लढाईत मारला गेला. )

५ सफदार-अली ( स. १७४०-४२ फ्रेंचांची मदत, गुलाम मुर्तझा अलीनें खून केला.)

मुलगी ( गुलाम मुर्तझा अलीची बायको )

मुलगी ( तकीसाहेबाची बायको )

मुलगी ( चंदासाहेबाची बायको )

६ सादत-उल्लाह-खान २ रा. ( 'मुहम्मद सैय्यद' स. १७४२-१७४४ याचा पठाणानें खून केला. )

जाद; साहिब जद. ( याचा खून झाला. )

७ अन्वरुद्दीन मुहम्मद ( निजाम-उल्-मुल्क यानें याला नबाब केलें. यानें इंग्रजांचा आश्रय धरून फ्रेंचांच्या विरुद्ध लढाया केल्या व शेवटीं लढाईतच मारला गेला. स. १७४४-१७४९ )

महफुजखान ( हा मदुरेचा सुभेदार होता.)

८ मुहम्मदअली ( स. १७४९-१७९५ )

अबदुलरहीम

अबदुलवहाब

नजीबउल्लाह

९ उदत-उल-उमरा ( स. १७९५-१८०१ )

अलीहुसेन

अमीर-उल-उमरा

१० अझीम-उद्दौलाह ( स. १८०१-१८१९ )

११ आझम जाह ( स. १८१९-१८२५ )

अझीम जाह बहादूर ( अर्काटचा राजपुत्र स. १८६७-१८७४ )

हा बंगालचा सुभेदार होता. या ग्रंथाचे ३ विभाग केलेले आहेत. पहिल्या विभागांत शिव-पार्वतींचें वर्णन आहे. दुसऱ्या भागांत शिकारी कालकेतु आणि तिसऱ्या भागांत धनपति आणि श्रीमंत यांचें वर्णन आहे ( क. कौ. भा. ७ ). यानें चैतन्यचरित्रामृत लिहिलें आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे.

**कविकलश**—( स. १६८०-८९ ). यालाच कलुषा किंवा कब्जी असें म्हणतात. संभाजीच्या कारभारांत याचें महत्त्व विशेष आहे. मात्र याचें खात्रीलायक पूर्ववृत्त उपलब्ध नाहीं. हा कनोजा ब्राह्मण प्रयागजवळचा राहणारा. काशी येथें भोसल्यांचा क्षेत्रोपाध्याय होता. स. १६६६ मध्यें आगऱ्याहून परत येतांना संभाजीचा व याचा प्रथम परिचय घडला. कवींमध्यें कलश म्हणजे श्रेष्ठ, अशा अर्थाचा 'कविकलश' असा यास किताब होता. तो कदाचित् शिवाजीच्या राज्याभिषेकप्रसंगीं यास मिळाला असेल. यावरून हा संस्कृत पंडितेला शास्त्री असून हिंदींत कविता करीत असावा. प्रचारांत यास कविजी, कबीजी, कब्जी किंवा कलुशा अशा अपभ्रष्ट नांवानें संबोधूं लागले. याचें कागदोपत्रीं नांव कविकलश किंवा कब्कलश असें येतें. याच्या सल्ल्यानें संभाजी वागला आणि अंतीं त्याचा परिणाम विपरीत झाला. म्हणून कलुशा म्हणजे कळलाव्या किंवा कलिपुरुष असा मराठींत संकेत झाला. केशवभट कबजी नांवाचा हिंदुस्थानी ब्राह्मण मांत्रिक होता. त्यानें संभाजीस वश केलें. तो सांगेल तसें करावें ( म. द. रु. २ पृ. ७० ). यावरून याचें नांव केशव असावें असें दिसतें. हा गोडबोल्या व मंत्रतंत्र करणारा असल्यामुळें स्वकीयांबद्दल शंकित झालेल्या संभाजीनें याला जवळ केलें. कदाचित् क्षेत्रोपाध्यायांचीं भांगगांजासारखीं परंपरागत व्यसनें यास असावीं आणि संभाजीची व याचीं पूर्वीची ओळखहि असावी. याच्या मुद्रेवरूनहि याच्या वृत्तीचा अंदाज बांधतां येईल. ती मुद्रा अशी—

विधिरर्थिमनीषाणामवधीर्नियवर्त्मनाम् ।
शेवधिः सर्वसिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा ॥

यांतील सर्वसिद्धींचा शेवधि म्हणजे ठेवा हे शब्द ध्यानांत घेण्यासारखे आहेत. त्याप्रमाणें याला समस्त-राजकार्यधुरंधर, विश्वासनिधि या नेहेमींच्या मायन्याप्रमाणें कर्मकांडपरायण, दैवतैकनिष्ठाग्राहिताभिमान हींहि विशेषणें याचा मंत्रतंत्रावरील विश्वास दर्शवितात. तात्पर्य, तांत्रिक विद्येंतील अनुष्ठानाच्या जोरावर जय मिळविण्याचा प्रयत्न याच्यामार्फत चालत असावा. इतर सर्व प्रधान कायम असून याच्याकरितां छंदोगामात्य हें निराळेंच पद निर्माण करण्यांत आलें. संभाजीच्या हा सर्वांत अधिक विश्वासांतला होता. संभाजीच्या व याच्या विशेष सलगीमुळें याचें विशेष वजन होतें. तथापि संभाजी याची योग्यता जाणून होता असें दिसतें. मात्र हा औरंगजेबाला फितूर झाला होता असें वाटत नाहीं.

जंजिऱ्याचें कारस्थान यानेंच संभाजीस समजाविलें व आपली त्या कामावर नेमणूक करून घेतली. परंतु योग्य वेळीं याची कुमक न गेल्यामुळें प्रथम स्वारी केलेल्या दादजी प्रभूची फजिती झाली ( स. १६८२-८५ ).

पुढें गोव्याची स्वारी अर्धवट टाकून संभाजीला शहाअलमला तोंड देण्याकरितां परत यावें लागलें, तेव्हां भीमगडावर अकबराच्या संरक्षणाची व्यवस्था करून यानेंच तह घडवून आणला व रायगडास परत आला ( जे. श. १८-५-१६८४ ).

गोवेकरांवर फोंडें मुक्कामीं हल्ला चढविला असतां त्यांच्याशीं तह करण्यास यासच पाठविलें. पुढें १६८५ मध्यें शहादिखानावर यास पाठवून खानास पार पिटाळून देशावर आणलें. याचीं पुढील ३ वर्षें कुठें पन्हाळा, तर विशाळगड अशा किल्ल्यावरच गेलीं. हा संगमेश्वरीं असतांना याचें व शिर्के यांचें वांकडें आलें. याच वांकडेपणामुळें संभाजीनें शिर्क्यांचा निर्वंश करण्याची प्रतिज्ञा केली. संभाजी खुद्द, शिरक्यांचा पराभव करण्यास गेल्यामुळें हा सुद्धां खेळणें या मुक्कामीं कांहीं दिवस होता. संभाजी खेळण्याहून निघाला ही बातमी मोंगलास समजतांच शेख निजाम हा कोल्हापुराहून दौड करीत निघाला, व संभाजीस त्यानें मोठ्या युक्तीनें पकडलें.

शेवटीं संगमेश्वरीं संभाजीबरोबर यास पकडून हाल करून ठार करण्यांत आलें. हा मेल्यानंतर याच्या मुलांस राजारामानें वतनाच्या सनदा करून दिल्या. त्यावरून हा फितूर असल्याचा तत्कालीं संशय नव्हता. औरंगजेबाचा पुत्र अकबर संभाजीकडे आला तेव्हां त्याच्यावर यास नेमण्यांत आलें होतें ( गणोजी शिर्के, येसूबाई, व संभाजी पाहा ).

**कविचूडामणि चक्रवर्ति**—यानें अन्वयबोधिनी नांवाचा ग्रंथ संस्कृतांत केला.

**कविजंग**—हा तुरेताजखाचा मुलगा. याचें संपूर्ण नांव खाजे मुहम्मदखा कविजंग. याच्या घराण्याची आतांपर्यंतची वंशावळ आहे. याच्या भावाचें नांव खाजे शरीफ असें आहे.

हा निजामाचा नोकर अहमदनगरचा किल्लेदार होता. त्या किल्ल्याचा हा बंदोबस्त उत्तम ठेवी. नगरचा किल्ला पुण्यापासून जवळ असल्यामुळें पेशव्यांना तो

पाहिजे होता. त्याकरितां दामप्रयोग करण्यांत येऊन विसाजी कृष्ण बिनीवाले यांच्या हातून राजकारण शिजून ता. ९।११।१७५९ रोजीं कविजंगानें किल्ला आंतील दारूगोळा व शस्त्रास्त्रांसहित भाऊसाहेब पेशव्यांना दिला. त्याबद्दल दरसाल पन्नास हजार उत्पन्नाची जहागीर वंशपरंपरेनें पेशव्यांनीं याला दिली.

कविजंग हें आडनांव आहे. याचें मूळ ठिकाण दिल्ली असून मूळ पुरुष शागुलखा होता. याचें नांव खाजा शरिफ ऊर्फ एकताज कविजंग असें होतें. याच्या ताब्यांत औरंगाबाद ते बालेघाटपर्यंतचा मुलूख दिला होता. निजामाकडून याला उपसर्ग झाल्यास पेशवे त्याचा बंदोबस्त करीत.

पुढें दौलतराव शिंदे व त्रिंबकजी डेंगळे यांनीं याच्या जहागिरीपैकीं कांहीं गांवें जप्त केलीं. याचें थडगें नगर येथें डांगे गल्लीजवळ कमानी मशिदींत आहे. त्यावरील चार शिलालेखांवरून हा स. १७७४-७५ त मेला असें ठरतें. कविजंग याचा अर्थ रणशूर असा आहे ( मं. अ. १८३७ इ. पा. २४० ).

**कवितार्किक**--ज्याला हल्ली नोआखली म्हणतात तेथील राजा माणिक्यदेव याच्या पदरीं हा एक राजोपाध्याय होता. हा १६ व्या शतकांत होऊन गेला. ' मी कवितार्किक असून वाणीनाथाचा पुत्र आहें ' असें हा आपल्या स्वतःचें वर्णन करतो. यानें एक ' कौतुकरत्नाकर ' या नांवाचें प्रहसन लिहिलें आहे. या प्रहसनांत सुशीलांतक नांवाचा पोलीस अंमलदार जरी जवळ झोंपलेला असतो तरी राणीची चोरी होते. तथापि वसंतोत्सव साजरा करण्याचा राजा बेत करतो व त्यांत राणीची जागा एका वेश्येनें भरून काढावी असें सुचवितो. राजाच्या गुरूचें मन राणीवर जडतें; परंतु ती फक्त त्याला वर उचलून खालीं टाकून देते; त्यामुळें त्याचें नाक रक्तबंबाळ होतें. राणीला भ्रष्ट करण्याचा आरोप त्याच्यावर करण्यांत येऊन तो शाबीत धरला जातो. परंतु अखेर वसंतोत्सवाच्या वेळीं सर्व गोष्टींचा खुलासा होतो.

**कविपरमेष्ठी**—( स. ५५० सुमार ) जैनांचा प्राचीन आचार्य. याचा सर्व जुन्या कानडी जैन कवींनीं जगप्रसिद्ध म्हणून उल्लेख केला आहे. यानें कांहीं ग्रंथ केले होते असे उल्लेख आहेत. पण सध्यां एकहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. याला कविपरमेश्वर असेंहि म्हणत असत. याच्या नांवाचा निर्देश संमतभद्र व पूज्यपाद यांच्या मध्यें येतो. त्यावरून कालाबद्दल तर्क करितां येतो. त्रिषष्टिशलाकापुरुषपुराण व चरितपुराण हे दोन ग्रंथ यानें केले होते, असें चामुण्डराय आपल्या ग्रंथांत म्हणतात. जिनसेनानें ( स. ७८३ ) आपलें आदिपुराण याच्या त्रिषष्टिशलाकापुरुषपुराणावरून लिहिलें, असें चामुण्डराय म्हणतात. यावरून जिनसेनाच्या पूर्वी हा झाला हें स्पष्ट होतें (क. क. च. भा. १, पा. ४ )

**कविराज**--कविराज शेषधर असेंहि यास दुसरें नांव आहे. यानें राघवपांडवीय नामक संस्कृत काव्य केलें.

**कविराक्षस**--हा एक तेलगू कवि असून याचें मूळचें नांव भीम असें होतें. हा बाराव्या शतकाच्या शेवटीं किंवहुना तेराव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेला. याचा जन्म गोदावरी प्रांतांतील वेमुलवाडा खेड्यांत झाला. याच्या जन्मासंबंधीं अनेक चमत्कारिक दंतकथा लोक सांगतात. वरील खेड्यांत सोमन्ना नामक एक तेलगू नियोगी ब्राह्मण राहत होता. त्याच्या मरणानंतर त्याच्या बायकोस अतिशय विपन्नावस्था प्राप्त झाल्यामुळें आपली उपजीविका त्या खेड्यांतील श्रीमंतांच्या घरीं गाणीं वगैरे म्हणून व त्यांच्या स्त्रियांचें मनरंजन करून करावी लागली. महाशिवरात्रीच्या दिवशीं कित्येक स्त्रियांबरोबर ही द्राचारम् येथील शिवाचे दर्शनास गेली. तेथें इतर स्त्रिया देवास निरनिराळे नवस करूं लागल्या, तेव्हां हिनेंहि देवास नवस केला कीं, " हे देवा, मला जर मुलगा झाला तर मी पाण्यानें पणती भरून दिवा लावीन. " पुढें दैवगतीनें ती खरोखरच गर्भार राहिली. हें पाहून गांवच्या ब्राह्मणमंडळीनें तिला जातिबहिष्कार घातला. तिनें त्यांना बजावून सांगितलें कीं, " माझ्या हातून कोणत्याहि प्रकारचें पापाचरण झालेलें नसून केवळ परमेश्वरावरील माझ्या निःसीम भक्तीमुळें मला गर्भ राहिला आहे. " परंतु हें कोण ऐकणार ? त्या ब्राह्मणमंडळीनें तिचा उपहास करून तिची उलट अवहेलना मात्र केली. पुढें कांहीं दिवसांनीं ती ब्राह्मणस्त्री प्रसूत होऊन तिला एक मुलगा झाला. त्याला तिनें मोठ्या प्रेमानें वाढवून ज्या देवाच्या प्रसादानें हा झाला त्याचेंच नांव ' भीम ' असें ठेविलें. तिनें याला साधारण शिक्षण दिलें.

हा मोठा होऊन जेव्हां आपल्या सवंगड्यांबरोबर खेळत असे तेव्हां गांवचीं इतर मुलें याला ' विधवेचा पोर ' म्हणून चिडवीत असत. अशा प्रकारचा अपमान याला सहन न होऊन एके वेळीं हा आपल्या आईकडे गेला व वरीलसंबंधानें आईला खुलासा विचारला. तेव्हां तिनें याला इत्थंभूत हकीकत सांगितली. ती सर्व ऐकून घेऊन हा तेथून गांव सोडून द्राचारम् येथें जाऊन तेथील देवालयांतील शिवलिंगास मिठी मारून बसला. तेव्हां देवानें

याला अभिवचन दिलें कीं, " तूं जें जें बोलशील, जें जें करशील तें सर्व सत्य होईल. "

यानंतर हा कांहीं काळानें आपल्या मूळच्या गांवीं आला. त्याच दिवशीं त्या गांवामध्यें एका ब्राह्मणाच्या येथें ब्राह्मणभोजन चाललें होतें. हा तेथें गेला तेव्हां याला ' विधवेचा पोर ' म्हणून त्यांनीं हाकून लाविलें. तेव्हां या तरुण भीमानें त्यांना असा शाप दिला कीं, " तुमच्या पात्रांवरील डाळीचे बेडूक होतील आणि भाताचा चुना होईल. " थोडक्याच वेळांत डाळीचे बेडूक होऊन या पानावरून त्या पानावर नाचूं लागले ! हें पाहून सर्व ब्राह्मणमंडळी घाबरून गेली व त्यांना हें कृत्य भीमन्नाचें आहे असें वाटून त्यांनीं याला सन्मानानें बोलावून विनंति केली कीं, तूं जर बेडकांची पूर्ववत् डाळ करशील व चुन्याचा भात करशील, तर तुला आम्ही जातींत घेऊं. त्यावरून यानें पूर्ववत् त्या जिनसा करून दाखविल्या; तेव्हां याला त्यांनीं जातींत दाखल केलें. यानंतर हा अनेक अद्भुत गोष्टी करणारा म्हणून प्रसिद्धीस आला; परंतु शिव्याशाप देणारा कवि म्हणून याची प्रख्याती झाली. लोक याला आडदांड आणि कविराक्षस असें म्हणत असत. हा कित्येक राजांच्या दरबारीं जाऊन ' भीमेश्वर देवाचा मी मुलगा आहें ' असें म्हणत असे.

राजनरेंद्रांचा नाश झाल्यावर बहुतेक वेंगी देशावर चोलराजांची सत्ता झाली. हा भीम कवि चालुक्यराजा चोक्कराजा-जो तेलंगणाच्या कित्येक भागांवर राज्य करीत होता-त्याच्या पदरीं होता. तेलगू भाषेंतील प्रसिद्ध आप्पाकाव्यावरूच असें कळतें कीं, हा कवि सेहिनी. मारा-ज्याला भास्कराचें तेलगू रामायण अर्पण केलें होतें त्याच्या वेळीं होता. हा चोक्कराजाचा समकालीन होता.

कविराक्षस ऊर्फ भीमन्ना हा नन्नयभट्टानंतर आणि तिक्कन्ना याच्यापूर्वी प्रसिद्ध होता, असें वर उल्लेख केलेल्या आप्पाकाव्यावरून सिद्ध होतें. या कवीचा छंदःशास्त्रावरील टीकात्मक ग्रंथ ' भीम कवि छंदसूः ' हा रेचन्ना नामक एका वैश्यास अर्पण केला आहे.

कावेल्ली व्यंकट रामस्वामी याच्या ' दक्षिणेंतील कविचरित्र ' नामक ग्रंथावरून असें दिसतें कीं, भीम कवीनें ज्योतिषावर ' भीमन्ना-ज्योतिष ' नामक ग्रंथ लिहिला होता व इतर कित्येक विषयांवर यानें पदात्मक प्रकरणें लिहिलीं होतीं. परंतु हीं सर्व सांप्रत दुर्दैवानें उपलब्ध नाहींत. भीमकविकृत कित्येक काव्यें दक्षिण हिंदुस्थानांतील कित्येक प्रसिद्ध विद्वानांच्या पुस्तकालयांत व तेलगू कविमंडळीजवळ क्वचित् कोठें आढळतात. भीमकवीनें ज्या अनेक अद्भुत व चमत्कारिक गोष्टी केल्या, त्या तेलंगणांत आबालवृद्धांच्या तोंडीं झाल्या आहेत. ह्या सर्व जरी दंतकथा आहेत, तरी तेलंगणांतील लोक त्या खऱ्या आहेत असें समजून इतरांस मोठ्या प्रेमानें सांगतात. हा मरण पावला त्या वेळीं सर्व लोक हळहळले. हा मोठा सदाचरणी व दातृत्वाविषयीं प्रसिद्ध होता ( परशाकृत तेलगू वाङ्मय, पृ. ४७-४९ ).

**कवींद्र**—एक हिंदी कवि होय. हा कालिदास त्रिवेदीचा मुलगा असून याचा जन्म वि. सं. १७३६ ( स. १६७८ ) च्या सुमारास झाला.

याचा ' रसचंद्रोदय ' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. याशिवाय यानें ' विनोदचंद्रिका ' आणि ' जोगलीला ' नांवांचे दोन ग्रंथ लिहिले, असा शोध लागला आहे. याचा कविताकाल वि. सं. १७७७-१८०४ (स. १७१९-१७४६) असा मानला जातो. हा अमेठीचा हिम्मतसिंह आणि त्याचा पुत्र गुरुदत्त यांच्या सहवासांत बरेच दिवस होता. याचा ' रसचंद्रोदय ' हा ग्रंथ मोठा असून शृंगारिक आहे. याची भाषा मधुर आणि प्रसादपूर्ण आहे. भगवंतराय खीची आणि बुंदीचा बुद्धसेन यांनीं याचा आदरसत्कार चांगला केला होता. याचें नांव उदयनाथ असून हा कवींद्र या नांवानें प्रसिद्ध झाला.

**कश्यप**—या कल्पांतील चार बुद्धांपैकीं पहिला. याचा परिनिर्वाणस्तूप श्रावस्तीजवळ टंडवा नांवाच्या गांवीं आहे. फाहियाननें टंडवा हें याचें जन्मस्थान आहे असें म्हटलें आहे. पण याचें जन्मस्थान काशी मानतात. हा निर्वाणाला गेला तेव्हां याचें शरीर जळालें नाहीं म्हणून याच्या शरीरावरच स्तूप बांधण्यांत आला.

२. या गोत्राचे तीन भाऊ होते. त्यांचीं नांवें बिल्वकश्यप, नदीकश्यप व गयकश्यप अशीं होतीं. हे तीनहि भाऊ मोठे अग्निहोत्री होते. यांनीं बुद्धदेवापासून प्रव्रज्यादीक्षा घेतली. हे तीनहि पुढें बुद्ध होणार आहेत.

**कॅस्ट्रो ( जॉन )**—(स. १५४२-४८). स. १५४२चे सुमारास पोर्तुगीझांच्या हिंदुस्थानांतील कारभारांत गोंधळ माजला होता. तो मिटविण्याकरितां कॅस्ट्रो यास मोठ्या तयारीनें हिंदुस्थानांत पाठविलें. यानें हिंदुस्थानांत आल्यावर अंमलदारांचे पगार वगैरे ठरवून लांचलुचपतीचे प्रकार व खाजगी व्यापार करण्याची पद्धत यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला, पण यास विशेष यश आलें नाहीं.

हा आला तेव्हां पोर्तुगीझ लोकांवर सर्व मुसलमानांनीं शस्त्र उचललें होतें. खंबायतचा सुलतान महमूद व त्याचा

मुख्य कामगार खोजा जाफर हे दीव परत घेण्याच्या उद्योगास लागले. खोजा जाफर हा मोठा अभिमानी व चतुर होता. त्यानें बाहेरून पोर्तुगीझांशीं स्नेह राखून अंतस्थ रीतीनें दीव परत घेण्यासाठीं सर्व मुसलमानांची जूट केली. पण स. १५४६ चे नोव्हेंबरांत यानें स्वतः आरमार बरोबर घेऊन दीव येथें मुसलमानांचा पूर्ण पराभव केला. कॅस्ट्रोनें विजापूरच्या पहिल्या इब्राहिम आदिलशाहशींहि युद्ध सुरू केलें होतें. त्यांत त्याचा पराभव करून पोर्तुगीझांनीं दाभोळ बंदर काबीज केलें. नंतर दोघांचा तह ठरला ( स. १५४७ ). दीवच्या विजयाची बातमी युरोपास पोंचून राजाकडून कॅस्ट्रोस शाबासकी व व्हाइसरॉयचा हुद्दा मिळाला. हा स. १५४८ त मरण पावला. गोवा काबीज करून अल्बुकर्कनें आपली कीर्ति पोर्तुगीझ इतिहासांत कायम केली. त्याचप्रमाणें दीवचा बचाव केल्याबद्दल कॅस्ट्रोची कीर्ति आहे ( ब्रि. रि. पूर्वार्ध, पृ. १२१-१२३ ).

**कस्तुरी रंगप्पा नायक**—हा मदुरेच्या विरप्पा नायकाचा तिसरा मुलगा. हा आपला भाऊ कुमार कृष्णप्पा नायक याच्यानंतर मदुरेच्या गादीवर आला ( स. १६०१ ).

कांहीं लोक हा गादीवर बसल्यापासून आठच दिवसांनीं मरण पावला असें समजतात.

याच्यानंतर याचा पुतण्या मुत्तू कृष्णप्पा नायक हा मदुरेच्या गादीवर आला.

२. हा कर्नाटकांतील शिरे येथील किल्ल्यावरील नाईक. याला विश्वासानें भेटीकरितां बोलावून अफझलखानानें ठार मारलें ( स. १६३८ ).

**कळभ्र**—हा मुडु कुंडुमीनंतर फार थोड्या दिवसांकरितां राज्यावर आला. कडुंगण पांड्यानें याच्या राज्याचा मोड केला ( स. ५६०-९० ).

**कक्षा**—सिंधचा राजा. हा चचाचा भाऊ चंद्र याचा मुलगा. दाहीरनें महंमूद कासीमबरोबर आरोर येथें जें घनघोर युद्ध केलें त्या युद्धांत दाहर मारला गेला. तेव्हां कक्षा युद्धभूमींतून निघून आत्मसंरक्षणार्थ बाबिया येथें जाऊन राहिला. बाबियास बेरा नदीचे तीरीं एक प्राचीन किल्ला होता. या किल्ल्यांत ठाणें देऊन त्या किल्ल्याचे आसपासचे मुलखावर यानें आपली राजवट सुरू केली. पुढें महमूद कासीमनें बाबियावर स्वारी केली, तेव्हां हा त्यास शरण गेला. महमूद कासीमच्या सरदारांच्या मनांतून कक्षाचा वध करावा असें होतें, परंतु महमूद कासीमनें सरदारांची विनंती अमान्य करून कक्षास आपले जवळ ठेवून घेतलें. त्यास याच्या मुत्सद्दीपणाविषयीं इतका आदर वाटे कीं, विचार करण्यासारखा प्रश्न निघे तेव्हां कक्षाचा सल्ला घेतल्यावांचून तो कांहीं करीत नसे. राज्याच्या आर्थिक व्यवहाराचें सर्व काम महमूद कासीमनें याकडे सोंपविलें होतें व खजिनाहि याच्याच ताब्यांत असे. महमूद प्रेमानें यास 'दैवी सल्लागार' म्हणे. महमूद कासीमनें याची मैत्री संपादन केल्यावर कांहीं लढाया मारल्या. त्या लढायांत कक्षानेंहि मर्दुमकी गाजवून त्यास बिनमोल मदत केली. मात्र मुलतानवरील स्वारीच्या वेळीं त्याच्या आरबी सैन्याचा जोर पूर्ववत् कायम आहे व त्यास आपल्या मदतीची विशेष अपेक्षा नाहीं असें पाहून यानें आपलें सैन्य बरोबर घेऊन काश्मीरची वाट धरली व तेथील राजाचा हा आश्रित झाला.

**कंकणपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकोणतिसावा सिद्ध होय. हा जातीनें राजकुमार असून विष्णुनगरचा राहणारा होता. हा कंबलपाच्या परिपाटींतील सिद्ध होय. चर्यादोहाकोषगीतिका ( त. ४८।७ ) हा याचा ग्रंथ होय. हा हिंदी भाषेंत कविता करीत असे, असें कांहीं कवितांवरून दिसतें.

**कंकालिपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सातवा सिद्ध होय. हा जातीनें शूद्र व मगधदेशचा राहणारा. याचा सहजानंदस्वभाव ( त. ४८।९० ) हा ग्रंथ होय.

**कंगवर्मन् कदंब**—( स. ३६०-३८५ ). वनवासीचा राजा.

**कंचला**—गंगांपैकीं वासवाची पत्नी.

२. ही गंगांपैकीं गोविंदरसाची मुलगी. ही वीरदेव सातारला दिली होती ( स. १०५० ).

**कंचुपल्लु**—एक ज्योतिषी. यानें ज्योतिषदर्पण नांवाचा ग्रंथ लिहिला ( श. १४७९ ). याचें गोत्र वत्स असून हा कण्व शाखेचा होता. याचें नांव कोंडपल्ली. कांचीपर्यंत माझें पंचांग चालतें असें हा म्हणतो. नरगिरीचा नरसिंह हें याचें कुलदैवत. पैलुभटीय या ग्रंथाचा यानें उल्लेख केला आहे ( भा. ज्यो. पा. ४७२ ).

**कंठाजी कदम बांडे**—( स. १७२४-३४ ). हा पुणें जिल्ह्यांतील बांड्याच्या वडगांवचा राहणारा. ताराबाईच्या पदरीं अमृतराव कदम म्हणून एक पराक्रमी पुरुष होता. तो पुढें शाहूला मिळाला. त्याचाच कंठाजी कदम हा तिसरा मुलगा होय. हाहि आपल्या बापाप्रमाणें शूर असल्यामुळें पश्चिम खानदेशांतील कांहीं गांवें पेशव्यानें

यास इनाम दिलीं. याच्याजवळ २०० स्वार होते व गुजराथ प्रांतावर याची नेमणूक होती.

स. १७२४ सालीं यानें गुजराथेंत चौथाईचा हक्क मिळवला. निजामाचा काका, गुजराथचा नायबसुभेदार हमेदखान यास शुजायतखानाविरुद्ध मदत केल्यामुळें याचा हा फायदा झाला, पण पुढें यास पिलाजी गायकवाड निमा हिस्सेदार झाला.

एकदां खंबायत येथून पैसा घेण्याकरितां हे दोघे त्या गांवीं गेले. गांवकऱ्यांनीं मोठ्या युक्तीनें त्या दोघांत कलागत लावून दिली. तेव्हां कंठाजी कदम व गायकवाड यांमध्यें लढाई होऊन त्यांत गायकवाडाचा मोड झाला. यानें नंतर गांवकऱ्यांपासून खंडणी वसूल केली. हमेदखानानें या वेळीं मध्यस्थी करून तंटा मिटविला ( स. १७२६ ).

हा स. १७२७ च्या निजामच्या स्वारींतहि होता.

सरबुंलदखानानें कदमाची कामगिरी त्याच्याकडे पूर्वीप्रमाणेंच चालू ठेविली. परंतु खानाच्या अपेक्षेप्रमाणें कंठाजीकडून मुलुखाची व्यवस्था नीट पाहिली जात नसे. पुढें हा स. १७३१ मध्यें बाजीरावाच्या विरुद्ध बाजूनें लढत असतां पळून गेला.

स. १७३४ मध्यें माळव्यांत स्वारी करून यानें बरीच लूट मिळविली. यापुढें मात्र याचें नांव ऐकूं येत नाहीं. याला चत्रसिंग नांवाचा मुलगा होता. याचा वंश खानदेशांतील इनामगांवीं आहे ( पा. १९१ पाहा ).

**कंठीरवनरस**—( स. १६३८–५९ ). म्हैसूर संस्थानांतील इम्मडीचा हा चुलतभाऊ.

यानें आदिलशाहीचा रणदुल्लाखान याची दुसरी स्वारी परतवून स्वतःचें नाणें पाडलें व श्रीरंगपट्टणची तटबंदी केली. हा निपुत्रिक असल्यानें पुढें केम्पदेवराज दोड्ड हा राजा झाला.

**कंठीरवराज**—( स. १७०४–१७१४ ). म्हैसूर संस्थानांतील चिक्कदेवाचा मुलगा.

**कंतलिपा**—यालाच कंथालिपा असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एकोणसत्तरावा सिद्ध होय. हा कण्हपाचा शिष्य. जात शिंपी. देश मणिधर.

**कंति**—( स. ११००–११०६ ). पहिली कानडी कवयित्री. द्वारससमुद्राच्या बल्लाळाच्या दरबारांत ही होती. ही धर्मानें जैन होती. हिच्या पूर्वीची कानडी कवयित्री माहित नाहीं. नागचंद्रा ( अभिनवपंप ) व ही यांच्या संवादकविता प्रसिद्ध आहेत.

**कंपन**—वेदभाष्यकार सायणाचा पुत्र.

**कंपन संगम**—( स. १३५५ नंतर लवकरच मृत्यु ). हा विजयनगरच्या संगम घराण्यामधील पहिल्या हरिहराचा तिसरा भाऊ; आणि संगमाचा मुलगा. हा नेल्लोर व कडप्पा येथें हरिहराचा युवराज म्हणून कारभार पाहत होता, असें याचा मुलगा दुसऱ्या संगमाच्या बिट्टगूंट्च्या ताम्रपटावरून दिसतें ( एंप. इंडि. व्हा. ३, पा. २४ ). स. १३५५ च्या फेब्रुवारींत हरिहर वारल्यावर वडीलपणाचा अनुक्रमानें साम्राज्याचा अधिकार याच्याकडेच यावयास पाहिजे, परंतु तसा तो आलेला दिसत नाहीं. याचें कारण त्या वेळीं हा आसन्नमरण असावा. बिट्टगूंट्च्या ताम्रपटांत म्हटलें आहे कीं, हरिहराच्या मागून कंपनानें पृथ्वीचें राज्य चिरकाल केलें. पण त्यांत सत्यांश नाहीं. हा हरिहराच्या मागून तीनचार महिन्यांत वारला असावा. हा वारल्यानंतर याच्या मुलाकडे सत्ता न जातां आधी सेनापति असलेल्या कर्तबगार बुक्काच्या हातांत राज्याचीं सूत्रें गेलीं. याला सायण व संगम असे दोन पुत्र होते.

**२.** हा विजयनगरच्या संगम वंशांतील पहिल्या बुक्काचा दुसरा मुलगा. याला हरिहर, विरूपाक्ष, भास्कर आणि मल्लिनाथ असे चार भाऊ होते.

**कंबरजखान**—हा एक मोगल सरदार असून हैद्राबादेस राहत असे. स. १७२३ च्या सप्टेंबरपासून ते १७२४ च्या जुलैपर्यंत खंडेराव दाभाडे, फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ हे उत्तर व दक्षिण पाईन घाटांत याची गडबड थांबवीत होते. फत्तेसिंग भोसले यानें याचा शेवटीं पराभव केला.

**कंबरसेन**—( स. १५०८–१५५३ ) अहमदनगरच्या बुर्हाण निजामशहाचा मुख्य प्रधान. हा जातीनें ब्राह्मण असून बुर्हाणशहाच्या दरबारीं फार दिवस मुख्य प्रधानाचें काम पाहत होता. यानें मोठ्या हुशारीनें कारभार केला. याच्या कारकीर्दीत मराठे लोक प्रसिद्धीस येऊं लागले ( मु. रि. भा. १ ला, पृ. २४३ ).

**कंबायसिस**—( ख्रि. पू. ५२८–२१ ) इराणच्या हखामनीषीय घराण्यांतील राजा.

**कंस**—( स. १३८६–९२ ) हा बंगाल्यांतील एक हिंदु जमीनदार होय. बंगालचा सुलतान दुसरा शम्सुद्दीन दुर्वृत्त निघाल्यामुळें त्याच्या पश्चात् तें राज्य यानें बळकाविलें.

यानें स. १३९२ पर्यंत राज्य केलें व याच्या पश्चात याचा मुलगा जितमल्ल हा बंगालच्या गादीवर आला. याला केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत 'गणेश भादुरी'चा कंस नारायण असें म्हटलें आहे.

**काकतीय वंशावळ**—( स. १११७-१३६४ ). करिकाल- १ दुर्जय ( रघूच्या घराण्यांतला )– २ पोल पहिला– ३ बेट ( त्रिभुवनमल्ल किंवा बेटम् )– ४ पोल दुसरा ( जगतीकेसरिन्, स. १११७-११६३ बा. मुप्पलादेवी )– ५ प्रतापरुद्र पहिला ( स. ११६३–११९९, बा. पद्मादेवी. भाऊ महादेव, त्याची बायको नायांबिका )– ६ गणपती ( महादेवाचा मुलगा. 'छलमत्ती-गंड;' सेनापति जयाच्या बहिणी नरमा व पेरमा यांच्याशीं लग्न. स. ११९९-१२६० )– मैलला ( महादेवाची मुलगी व गणपतीची बहिण. 'मेलांबिका' नातवाडी जहागीरदार बुद्धाचा मुलगा रुद्र याच्याशीं लग्न )– ७ रुद्रम्मा ( गणपतीची मुलगी. बापाच्या मागून गादीवर आली 'रुद्रमहाराज' 'छलमत्तीगंड' हीं पुरुषनामें घेतलीं. स. १२६०–१२९१. हिनें चालुक्य राजपुत्र वीरभद्रेश्वराशीं लग्न केलें होतें. हिला गणपांबिका नांवाची बहिण होती. तिनें अमरावतीचा जहागीरदार कोटबेटाशीं लग्न केलें. हिची मुलगी मुम्मदाम्बा हिनें महादेवाशीं लग्न लावलें ). – ८ प्रतापरुद्र दुसरा ( रुद्रम्माचा नातू व मुम्मदाम्बाचा मुलगा. स. १२९१–१३३०. स. १३०९ मध्यें मलिक काफूरनें याचा पराभव केला. स. १३०९ मध्यें सेनापति मुप्पीडी कांचीस जाऊन मानवीर यास सुभेदार केलें. पुढें दिल्लीच्या खल्जी सुलतानानें याचें राज्य आपले ताब्यांत घेतलें. याला अन्नमदेव नांवाचा एक भाऊ होता. तो बस्तर घराण्याचा संस्थापक झाला–एपि. इंडि. ९. १६०) –९ कृष्ण किंवा वीरभद्र ( स. १३४४ )– १० विनायक किंवा नागदेव ( स. १३६४ त मुहम्मदशाहा बहामुनीनें निर्दयपणानें याचा खून केला ).

या घराण्याची राजधानी वरंगळ किंवा अनुमकोंड येथें होती. सनाच्या आकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हें घराणें प्रबल होतें. या घराण्यांतील राजे आपण करिकाल चोलाचे वंशज आहोंत असें म्हणतात. परंतु त्यांच्या नात्याविषयींचा निर्णय लावतां येत नाहीं ( एपि. इंडि. ३. ९४; ९. १६४; २५६; इंडि. ॲंटि. १८९२ पृ. १९७; ॲन्यु. रि. १९०९–१०. १३० पाहा ) ( सिवेल आणि आयंगार पृ. ३५५ ).

**काकवर्ण**—( ख्रि. पू. ) शिशुनाग घराण्यांतील शिशुनागाचा मुलगा.

**काकुस्थवर्मन् कदंब**—( स. ४३५-७५ ) कुंतल येथील कदम्ब घराण्यांतील भगीरथवर्मचा हा मुलगा. हा स. ४३५ च्या सुमारास आपल्या बापानंतर गादीवर आला.

स. ३९१-३९२ च्या सुमारास याचा बाप भगीरथवर्मन् यानें काकुस्थवर्मनची मुलगी गुप्त घराण्यांतील दुसऱ्या चंद्रगुप्ताचा मुलगा पहिला कुमारगुप्त यास दिली, व तें लग्न आपल्या कारकीर्दीत लाविलें, असें रे. हिरास यानें आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. परंतु एन्–लक्ष्मीनारायणराव यांनीं खालीलप्रमाणें प्रतिपादिलें आहे.

काकुस्थवर्मन् यानें आपल्या दोन मुली, एक गंग घराण्यांत व दुसरी गुप्त घराण्यांत दिल्या होत्या. यांशिवाय याची आणखी एक मुलगी वाकाटक घराण्यांतील नरेंद्रसेन या राजास दिली होती. नरेंद्रसेनाच्या कालावरून असें ठरविण्यांत येतें कीं, काकुस्थवर्मन् हा स. ४३५ मध्यें गादीवर आला; व वाकाटक घराण्यांत दिलेल्या मुलीचें लग्न स. ४४५ मध्यें केलें. या वेळीं गुप्त घराण्यांतील कुमारगुप्त म्हातारा झाला होता. तेव्हां गुप्त घराण्यांत दिलेली याची मुलगी कुमारगुप्तास दिली नसून ती कुमारगुप्ताच्या स्कंदगुप्त किंवा पुरगुप्त या मुलास दिली असावी. कारण कुमारगुप्ताचा काल स. ४१४-४५५ असा आहे. यावरून वर उल्लेखिलेलें मत चुकीचें ठरतें.

याच्या गंग घराण्यांत दिलेल्या मुलीच्या लग्नाच्या कालावरून हा स. ४७५ पर्यंत जिवंत होता, असें सिद्ध होतें. तेव्हां याचा काल स. ४३५-४७५ असा एन्. लक्ष्मीनारायणराव यांनीं ठरविला आहे. वरील माहितीवरून पहिला कुमारगुप्त, स्कंदगुप्त आणि पुरगुप्त हे गुप्त घराण्यांतील याचे समकालीन होते असें ठरतें ( Ind. H. Quarterly, March 1933, p. 197–201 ).

**कॉकेन वुइल्यम**—स. १६४३ त इंग्लंडांत वुइल्यम कॉकेन याची कंपनीच्या गव्हर्नरचे जागीं नेमणूक झाली. याच्या हाताखालीं वुइल्यम मेथ्वोल्ड हा डेप्युटी गव्हर्नर असून त्याला हिंदुस्थानांतील व्यापाराची उत्कृष्ट माहिती होती ( ब्रि. रि. पूर्वार्ध पृ. २६६).

**काच**—इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत उत्तर भारतांतील बहुतेक क्षत्रिय बौद्धधर्माचे अनुयायी असल्यामुळें वैदिक धर्माला कोणी वाली नाहीं अशी अवस्था झालेली होती. अशा स्थितींत काच हा एक महान् पराक्रमी पुरुष वैदिक धर्माचा वाली म्हणून पुढें आला. ब्राह्मणांचें याला पूर्ण पाठबळ होतें. काचाला त्या काळांतील शिवाजी म्हटलें असतां शोभण्यासारखें आहे. शिवाजीप्रमाणेंच यानें डोंगरी आणि वन्य लोकांचें सैन्य तयार केलें. या सैन्याच्या मदतीनें यानें प्रथम मगध देश हस्तगत केला; व नंतर यानें आसपासच्या बौद्धधर्मी राजांवर हत्यार उपसलें. काचानें 'सर्वराजोच्छेत्ता' असें

बिरुद धारण केलें व आपल्या नांवाचीं सुवर्णनाणीं पाडलीं. विष्णूचें चक्र हें याचें ध्वजचिन्ह होतें. पुढील काळांतील सम्राट् गुप्तांच्या सत्तेचा मूळ पुरुष काच हाच होय. पुराणें काचाचा उल्लेख 'विश्वस्फटिक,' 'विश्वस्फाटि', 'विश्वस्फाणि' या नांवांनीं करतात. विंध्यशक्ति पाहा.

कांहींच्या मतें हाच समुद्रगुप्त असावा, तर कांहीं याला समुद्रगुप्ताच्यापूर्वी कांहीं महिने राज्य करणारा त्याचा भाऊ असें म्हणतात. याचीं कांहीं सोन्याचीं नाणीं समुद्रगुप्ताच्या नाण्यांसारखींच आढळतात ( J. R. A. S. 1909, p. 342, Fleet ).

**काट राजा**—( सवाई शहाजी पाहा ).

**कात्यायन**—( वररुचि पाहा ).

**कान्होजी आंगरे**—( स. १७२९ मृत्यु ) आंगऱ्यांची वंशावळ पा. १२८ पाहा. याचा बाप तुकोजी हा सुवर्णदुर्गास २५ असामींवरचा नाईक होता. याचें बाळपण जोशी नांवाच्या ब्राह्मणाकडे गुरें वळण्यांत गेलें. पण त्या ब्राह्मणानें याची तरतरी पाहून हत्यारें वगैरे पुरवून याला तयार केलें. अचलोजी मोहिते सुवर्णदुर्गाचा किल्लेदार याजकडे यास नोकरी लागली. हपशांच्या मुलुखांत लूट करावी आणि ती आपसांत वांटून घ्यावी असा याचा क्रम सुरू झाला. एकदां हपशांच्या हातांत सांपडला असतां लांकडी बेड्या आगटींत जाळून हा पळाला. तेव्हां ताडिळ गांवच्या फकी नांवाच्या मुसलमानानें याला आपल्या बाळंत झालेल्या मुलीच्या जागेवर निजवून लपविलें. त्यामुळें हा बचावला. म्हणून यानें फकीला एक गांव इनाम दिला, तो अद्यापि त्याच्या वंशजांकडे चालू आहे. हा शिवाजीच्या वेळेपासून नोकरीस होता. तरी संभाजीच्या वेळेस विशेष पुढें आला. याचे किल्ले मोंगलांनीं घेतल्यामुळें मोंगल-मराठ्यांत तह होऊन मोंगलांनीं तिकडचा निम्मा वसूल घेतला. तेव्हां हा खांदेरी मुक्कामीं राहावयास गेला. पुढें राजारामाच्या कारकीर्दींत यानें स्वपराक्रमानें किल्ले परत घेऊन मोंगलांना पळतां भुई थोडी केली. या त्याच्या पराक्रमामुळें राजारामानें यास सुवर्णदुर्गावर नेमलें. मराठेशाहीच्या संकटसमयीं यानें पश्चिम किनाऱ्याचें उत्तमपैकीं रक्षण केलें. व त्यामुळें यास 'सरखेल' हा किताब बहाल करण्यांत आला. राजारामानें याला 'ध्वजवृंदाधिकारी' ही पदवी दिली होती.

हा राजारामाबरोबर चंदीचंदावरकडे गेला होता. जंजिरेकरांनीं सुवर्णदुर्गावर स्वारी केली आणि वेढा दिला. तेव्हां अचलोजी मोहित्याचा धीर खचला; आणि तो तहास तयार झाला. तेव्हां यानें नेट धरला आणि मोहिल्याला ताब्यांत घेऊन किल्ला लढविण्यास सुरुवात केली. छत्रपति राजारामाला खरी हकीगत कळतांच त्यानेंहि यास तेथील किल्लेदार नेमलें ( स. १६९४ ). शेवटीं जंजिरेकरास वेढा उठवून परत जावें लागलें. या वेढ्यांत एकदां हा शत्रूच्या हातीं सांपडला असतां शर्थीनें समुद्र पोहून जाऊन यानें आपली सुटका करून घेतली.

स. १६९६ मध्यें हा आपल्या परिवारासह त्र्यंबकेश्वराच्या यात्रेला गेल्याचा उल्लेख तेथील क्षेत्रोपाध्यायाच्या दप्तरीं आहे.

स. १६९७ मध्यें गुजर व कान्होजी यांमध्यें तंटा लागून गुजरास कान्होजीनें अटकेंत ठेविलें. पुढें गुजर वारल्यामुळें आंग्रे हा मराठ्यांच्या आरमाराचा अधिपति झाला. पुढें इंग्रज, फिरंगी व मुसलमान या तिघांनीं छळलें तरी कान्होजीचें स्थान ढळलें नाहीं. यावरून याच्या शौर्याची, धडाडीची आणि मुत्सद्देगिरीची कल्पना येते.

नंतर कोंकणपट्टीचे किल्ले यानें मोंगलांकडून परत घेतले. जयगड व पूर्णगड हे किल्ले नवे बांधले. स. १६९८ मध्यें विजयदुर्ग याच्या आरमाराचें मुख्य ठाणें झालें. पण स. १६९९ मध्यें कुलाबा हें मुख्य ठाणें झालें. नंतर यानें आपणांस स्वतंत्र राजा म्हणवून घेतलें व जमाबंदी सुरू केली. 'तळकोंकणांत पुंडावे होऊन प्रांत बेराण पडला. महाराष्ट्रधर्म रहावा ऐसे नव्हते. त्या वेळेस फिरंगी व हपशी हेहि प्रांतांत धर्म उच्छेद करावयास आले होते. तेव्हां सरखेलसाहेबांचे पुण्यप्रतापें स्वरक्षणार्थ थोरथोर मातबर सरदार जमा होऊन शामलाची क्षिती केली. संकाजी मोहिते, राणोजी गोळे, खंडोजी माणकर, सद्राजीराव खराडे, कृष्णाजी मोड व हसनखान जमादार यांही सरखेलसाहेबांचे समागमें युद्ध प्रसंग करून शामलाची क्षिती केली आणि श्रमें पाऊन कोंकणांत धर्म रक्षिला. सरखेलसाहेब याही धर्मस्थापना केली ही कीर्ति या लोकीं व परलोकीं जाऊन उरली आहे' ( आडिवरेकर दीक्षित यांच्या संग्रहांतील अप्रसिद्ध कागद, स. १६९८ ).

शाहू राजे औरंगजेबाचे मृत्यूनंतर परत आले तेव्हां हे ताराबाईच्या पक्षांत होते. तेव्हां त्यानें याजवर बहिरोपंत पिंगळे यास पाठविलें, पण त्याला यानें कैद केलें. लोहगड व राजमाची हे किल्लेहि घेतले. साताऱ्यावर स्वारी करणार अशी भुमका उठली होती, पण बाळाजी विश्वनाथ यांच्या मध्यस्थीनें तह घडून आला.

या तहांत २७ किल्ले, ३४ लक्षांचा मुलुख, आरमारचा सुभा व सरखेल हें पद यास मिळालें (स.१७१५).

स. १७१७ मध्यें डच व इंग्लिश यांनीं याच्यावर हल्ला चढवला. शाहूची व याची भेट जेजुरी येथें झाली. पुनः स. १७१८ मध्यें इंग्रज खांदेरीवर हल्ला करणार अशी रामा कामटी याच्यामार्फत यास बातमी लागली व याच्या कडेकोट तयारीमुळें इंग्रजांचा हल्ला निष्फळ ठरला. शेवटीं २४ मार्च १७२३ रोजीं रामा कामट्यास फितुरीबद्दल गोळी घालून मुंबईस ठार करण्यांत आलें ( कुलाबा गॅझेटियर ).

यानें इंग्रजांचीं किंग विइल्यम व सक्सेस हीं जहाजें लुटलीं; तेव्हां मुंबईच्या गव्हर्नरनें यास लिहिलें कीं, 'दुसऱ्याचे द्रव्याचा अभिलाष करणें ही नीति नव्हे.' त्यास याचें उत्तर 'ईश्वर स्वतःचें कांहींच कुणाला देत नाहीं. एकाचें काढून दुसऱ्याला देतो; व ज्याला घेतां येतें तो तें दुसऱ्याचें घेऊं शकतो.'

स. १७२० मध्यें इंग्रज विजयदुर्गावर व स. १७२२ फिरंग्यांच्या साहाय्यानें कुलाब्यावर हल्ला करतात. पण ते प्रयत्न फसतात. हा स. १७२८ मध्यें मृत्यु पावला, असे ग्रँट डफ म्हणतो.

बायका तीनः १ मथुराबाई–बाकाजी महाडिकाची कन्या ( वंशावळ पाहा १२८ ).

ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर याचे गुरु होत. राणी लक्ष्मीबाई आंगरे यांचीं स्वामींना लिहिलेलीं पत्रें उपलब्ध आहेत. स्वामींनीं याला अगणित द्रव्य दिलें, आणि याच्या उत्कर्षास कारण झाले. स्वामींना सावनूरच्या नबाबानें हत्ती बक्षिस दिला होता. तो कोंकणांत परशुरामक्षेत्रीं जात असतां माखजनच्या याच्या चौकीदारानें आडवला व परशुरामक्षेत्र सिदी सातानें लुटलें त्यामुळें यावर स्वामींचा राग झाला व स्वामी देशावर राहण्यास गेले. स्वामी याला ज्या रकमा देत त्या कर्जाऊ समजून परत मागण्यांत येत व त्याबद्दल कुरबुर झालेली आढळते.

यानें लोहगड किल्ला भाऊपणाची शपथ घेऊन नानासाहेब पेशव्यांस दिला. म्हणूनच बाजीराव याला पत्रांत कान्होजी काका असें संबोधून लिहीत असे ( पे. द. ३०. ५६ ).

याच्या दोन मुद्रा–१ श्रीराजारामचरणीं सागर । तुकोजीसुत कान्होजी आंगरे निरंतर ॥ २ श्रीशाहू नृपतिप्रीत्या तुकोजीतनुजन्मना । कान्होजीसरखेलस्य मुद्रा जयति सर्वदा ॥

२. ( स. १८३८–३९ ) हा अल्पवयी वारल्यावर दत्तकाची परवानगी न मिळाल्यामुळें संस्थान खालसा झालें.

**कान्होजी जेधे**—( स. १६६० मृत्यु ). हा मावळांतील एक प्रमुख देशमुख. हा आदिलशाही फौजेवरील एक अधिकारी होता (प. सा. ३०७). याला आदिलशहाकडून शहाजी भोसले व दादोजी कोंडदेव यांचा बंदोबस्त करण्याविषयीं हुकूम आलेला होता. हा प्रथम रणदुल्लाखानाचे हाताखालीं काम करीत असे. नंतर शहाजीनें याला आपल्याकडे मागून घेतलें. याच्या मार्फत रणदुल्लाखान व शहाजी यांचा स्नेह जडला होता. हा व याचा कुलकर्णी दादाजी नरस प्रभू यांना 'शिवाजीला सामील झाल्याबद्दल गर्दन छाटली जाईल, मगरूरी न करतां अमिनाशीं रुजू व्हावें' अशा अर्थाचा हुकूम आला होता ( ३०–३–१६४५—राजवाडे खंड १५. २६७ ). हा बाजी पासलकराचा जांवई होता. रायरीश्वरापाशीं शिवाजीबरोबर स्वराज्याच्या शपथा घेणाऱ्यांत हा एक होता. याच वेळीं मुहम्मद आदिलशहास अर्धांगवायु झाला, आणि त्याच सुमारास शहाजीला जिंजीजवळ कैद करून विजापुरास आणलें होतें. तथापि मुलाच्या अपराधाबद्दल बापास शिक्षा करूं नये, असा कुराणाचा आधार घेऊन शहाजीला सोडण्यांत आलें. शहाजीची सुटका झाल्यावर त्यानें याच्याकडून बेलरोटीवर शपथ घेवविली कीं, तुम्हीं जाऊन शिवाजीस सामील व्हावें. आणि कोणीहि शत्रु चालून आला तरी त्याचा पाडाव करावा. याचा व शहाजीचा चांगला स्नेह होता. कर्नाटकांतील स्वारींत हा शहाजीबरोबर होता आणि शहाजीबरोबर शहाजीचा मनुष्य म्हणून यालाहि कैद भोगावी लागली होती. याच्याप्रमाणें याचा मुलगा बाजी हाहि कर्ता आणि लढवय्या होता. शिवाजीच्या बाजूनें खळदबेलसरच्या लढाईंत बाजीनें विजापूरकरांविरुद्ध चांगलीच लढाई गाजविली होती. शिवाय याचें वतन शहाजीच्या जहागिरींत होतें. शहाजीचा बस कमी होत चालला असून शिवाजीचा राज्यस्थापनेचा प्रयत्न चांगलाच मूळ धरूं लागला होता. अशा वेळीं शिवाजीच्या भोंवतीं कांहीं कर्तबगार माणसें शहाजीनें पाठविलीं त्यांपैकीं हा एक होता.

चंद्रराव मोऱ्याच्यावर हल्ला झाला तेव्हांहि शिवाजीस याचा फार उपयोग झाला ( चंद्रराव मोरे पाहा ).

आपल्या जमावानिशीं अफजलखानाला सामील व्हावें असें पातशाही फर्मान याला आलें होतें ( प. सा. ७७४ ). शिवाय अफझलखानानेंहि पत्रें लिहून लालुच दाखवून माणसें आपलींशीं करण्याचा प्रयत्न केला होता. 'तुमचा बाप व बिरादर दाहावीस वर्षे शिवाजी भोसलेची चाकरी करितात तरी आम्हांला

मिळावें ' असें एका पत्रांत याला म्हटलें आहे ( प. सा. ७८२ ). अफझलखानाबरोबर असलेल्या मराठे सरदारांत घोरपडे, माढरे, खराडे, जाधव, मंबाजी भोंसले, घाडगे, काटे, प्रतापराव मोरे, पिलाजी व शंकराजी मोहिते इतकीं नांवें शिवभारतांत दिलीं आहेत. विजापूरच्या दृढमूल सत्तेशीं विरोध करण्याची शक्ति शिवाजींत नसल्यामुळें त्या वेळीं शिवाजीला मिळणें धोक्याचें होतें. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं यानें शिवाजीची बाजू धरली एवढेंच नव्हे तर इतरांनाहि शिवाजीकडे वळविलें असें जेधे शकावली व करीणा यांवरून दिसतें.

अफजलखानाचे वेळीं याला अली अदिलशहाकडून पुढील फर्मान आलें होतें ( स. १६-६-१६५९ ). ' शिवाजीनें निजामशाहि कोंकणांतील मुसलमानांचा उच्छेद व लूट करून किल्ले हस्तगत केले. त्याचे पारिपत्यासाठीं अफजलखानास रवाना केलें आहे. तरी तुम्ही शिवाजीचा पराभव करून निर्मूल फडशा करावा. त्याच्या लोकास आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचें कल्याण इच्छिणें. खानाच्या सांगण्यावरून तुमची योग्यता वाढविली जाईल ' ( प. सा. सं. ७७४ ). म्हणजे हा कान्होजी जेध्याला फोडण्याचा प्रयत्न होता.

याला फर्मान आलें तेव्हां तें फर्मान घेऊन हा आपल्या पांच पुत्रांसह शिवाजीच्या भेटीस गेला. शिवाजी म्हणाला, ' तुमचे शेजारी केदारजी व खंडोजी खोपडे हे अफजलखानाकडे गेले. तुम्ही पातशाही हुकूम मोडून राहिलात तर वतनास आपाय होईल. कदाचित् प्राणावरहि बेतले, तेव्हां तुम्हीहि जाणें.' कान्होजी म्हणाला, ' शहाजी महाराजांनीं तुमचें साहाय्य करण्याविषयीं आमच्या कडून शपथ घेतली आहे. त्या शपथेला आपण जागणार. मग वतनाचें कांहींहि होवो. ' शिवाजीनें वतनावर पाणी सोडण्यास सांगितलें, त्याप्रमाणें हातावर पाणी घेऊन यानें सोडलें. तेव्हां शिवाजीनें याला आपलीं मुलेंमाणसें कारीहून तळेगांवास नेऊन ठेवण्यास सांगितलें. याप्रमाणें हा पूर्णपणें शिवाजीला मिळाल्यावर परस्परांची आणभाक झाली. नंतर हा व इतर देशमुख यांची शिवाजीच्या सांगण्यावरून बैठक झाली. तेथें कान्होजी म्हणाला, ' आपण तर शिवाजीकरितां वतनावर सुद्धां पाणी सोडलें आहे. लेक व आपण शिवाजीकरितां प्राणहि वेंचण्यास तयार आहोंत. मुसलमान बेइमान आहेत. आपलें काम झाल्यावर नसतें निमित्त ठेवून नाश करतील. महाराजांचें हें मऱ्हाष्ट राज्य आहे. सर्वांनीं हिंमत धरून एकनिष्ठेनें सेवा करावी. ' याचे हे हिंमतीचे शब्द ऐकून इतरांनाहि स्फूर्ति आली. त्यामुळें बांदल, हैबतराव सिलिमकर, पासलकर, मारणे, डमाले, मरळ, डोहर हे सर्व शिवाजीमहाराजांना मिळाले. असा कर्तबगार, नेटाचा आणि शूर पुरुष शिवाजीला मिळाल्यामुळें शिवाजीची बाजू चांगलीच बळकट झाली.

अफजलखानाचे मृत्यूनंतर उभय सैन्यांची तुंबळ लढाई झाली. या लढाईला ' प्रतापगडची लढाई ' असें म्हणतात. या प्रतापगडचे युद्धांत हा वृद्ध गृहस्थ हजर असावा. याचा मुलगा बाजी यास यापूर्वीच शिवाजीनें सर्जेराव अशी पदवी दिली होती. यानंतर हा वृद्ध गृहस्थ स. १६६० च्या सप्टेंबराच्या सुमारास मरण पावला ( प. सा. ८३० ). याची कारी येथें समाधि आहे.

**कान्होजी मोहिते**—हंबीरराव मोहित्याचा मुलगा.

**कान्होजी राणोजी शिर्के**—बाळाजी व चंद्रसेन जाधव यांच्या तंट्याच्या वेळीं बाळाजीस व त्याच्या कुटुंबास पोंचविण्याच्या कामांत यानें भाग घेतला होता. म्हणून हा प्रसिद्धीस आला. याचीच भगिनी थोरल्या शाहूमहाराजांची पत्नी सकवारबाई होय. सकवारबाईचें माहेरचें नांव राणूबाई असून ती याची धाकटी बहीण होती. याची ब्रह्मेंद्रस्वामींवर भक्ति होती. ब्रह्मेंद्रस्वामी याच्यातर्फेच सकवारबाईकडे संधान बांधीत.

**कान्होजीराव गायकवाड**—( स. १८००-१ ). गोविंदराव गायकवाडाची रक्षा गजराबाईस गोविंदरावापासून झालेला हा मुलगा होय. हा मोठा पराक्रमी होता. यानें आपल्या आईच्या मदतीनें बापाचा उच्छेद आरंभिला. स. १८०० मध्यें गोविंदराव मरण पावला. तेव्हां वारसासंबंधीं तंटे उपस्थित झाले. गोविंदरावाचा औरस पुत्र आनंदराव हा भोळसर होता. त्यामुळें यानें प्रथम आनंदरावाचें मन वळवून आरबांच्या साह्यानें कारभार हातीं घेतला आणि बायकांस व आप्तांस कैदेंत टाकून खर्च भागविण्यासाठीं त्यांचें जडजवाहीर हरण केलें, त्यावरून सर्वांसच याचा वीट आला; आणि त्याच आप्तेष्टांनीं आरबांस फितवून व रावजीस पुढें करून ता. २९-१-१८०१ रोजीं कान्होजीस पकडलें आणि रणपूर येथें कैदेंत ठेविलें. पुढें इंग्रजांनीं याला कर्नाटकांत कैदेंत ठेविलें होतें (आनंदराव गायकवाड पाहा ).

**कान्होजीराव डफळे**—( स. १७९०-१८१० ). हा जतच्या अमृतरावाचा मुलगा. हा आपल्या बापानंतर जतच्या गादीवर आला ( १७९० ).

हा खर्ड्याच्या लढाईंत व इतर बऱ्याचशा लढायांत पेशव्यांच्या हाताखालीं हजर असे. हा स. १८१० त मरण

पावला. याच्या वेळीं रावबाजी यांनीं मध्यंतरीं जतची देशमुखी जप्त करून त्रिंबकजी डेंगळ्याकडे सोंपविली होती. याच्यानंतर याची वडील बायको रेणुकाबाई ही कारभार पाहत होती.

**कान्होजीराव भोसले**—( दु. सेनासाहेब सुभा )—( स. १७१०-१७३० ) हा परसोजी भोसल्याचा मुलगा. परसोजीचे मृत्यूनंतर शाहूजवळून सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें घेऊन हा वऱ्हाडांत आला. यानें परसोजीच्या स्मशानस्थळाच्या पूजेकरितां शाहूराजाकडून खेड येथील कांहीं जमिनींची सनद मिळविली. वऱ्हाडांत आल्यावर यानें दारव्हा हें महत्त्वाचें ठाणें काबीज केलें, व नंतर भाम येथें कायमचें ठाणें केलें.

हा शूर व पराक्रमी होता. कटक प्रांतांत पूर्ण अम्मल बसविण्याचें काम जरी पुढें रघूजी भोसल्यानें केलें तरी त्याचा पाया यानेंच घालून दिला होता.

हा मोठा धार्मिक असून याचें सोवळें व नेमधर्म कडक असत ( ना. भो. बखर पा. ३१ ). प्रथम यास मूलबाळ कांहीं नव्हतें. तेव्हां यानें रघूजीस आपणाजवळ भाम येथें आणून ठेवलें. पुढें त्यास रायाजी ( कांहीं ठिकाणीं त्यास रामजी असें म्हटलें आहे तें चूक आहे. रायाजी हेंच त्याचें खरें नांव-पे. द. भा. २०. ३२ ) नांवाचा मुलगा झाल्यापासून याचें रघूजीवरील प्रेम कमी झालें, व याचा आणि रघूजीचा बिघाड होऊन रघूजी याचेकडून निघून गेला.

याचा अम्मल फार करडा असे. बखरकार म्हणतो, " अमल बहुत क्रूरतेचा सेनासाहेब सुभा करू लागले " ( पान २९ ). यावरून याचा स्वभाव फार तापट असावा आणि यामुळेंच याचा रघूजीशीं बेबनाव झाला असावा. याच्या फौजेचाहि असाच बेबंदशाही कारभार असावा असें वाटतें. याचे फौजेचा त्रास खुद्द याचे राज्यांतहि कितपत होता हें याच्या एका अभयपत्रावरून दिसतें ( शारदाश्रम यवतमाळ संग्रह ). परंतु यास विशेष दोष देतां येत नाहीं. कारण कमीजास्ती प्रमाणांत ही स्थिति सर्वांच्याच सैन्याची असे.

राणोजी व रघूजी भोसले दिल्लीहून परत आल्यावर त्यांनीं याजवळ वतन व सरंजाम यांमध्यें हिस्सा मागितला. तें भांडण शाहूपर्यंत जाऊन स. १७२७ त यानें तिघांत सरंजामाची वांटणी करून दिली. स. १७२५-२७ पर्यंत कान्होजी बाजीरावाबरोबर कर्नाटकांतील स्वारींत होता.

पुढें हा शाहूस जुमानीनासा झाला. याचे सुभ्याचा वसूलहि बरोबर येईना. तेव्हां शाहूनें यास साताऱ्यास समक्ष बोलावलें. परंतु यास हिशेबहि देतां आला नाहीं, व रकमहि पटवितां आली नाहीं. तेव्हां शाहूचा व याचा बेबनाव झाला. तेथें राहणें धोक्याचें वाटून हा शाहूची परवानगी न घेतां, सैन्यासह आपले तळावरून पळून गेला ( स. १७२५ ). यास अडविण्यासाठीं शाहूनें दोन सरदार पाठविले. एवढेंच नव्हे, तर तो स्वतःहि पहाटची प्रहर रात्र असतां याचे पाठलागार्थ निघाला. बरोबर असलेल्या यमाजी शिवदेवानें त्यास पुष्कळ सांगितलें कीं, ' मी कान्होजीचा पाठलाग करतों. तुम्ही स्वतः येण्याची जरूर नाहीं.' परंतु शाहू हट्टासच पेटला होता. तो पुसेसावळीच्या पुढें वडगांवापर्यंत गेलाच व शेवटीं यमाजी शिवदेवास पुढें पाठवून तो साताऱ्यास परत आला, व वऱ्हाडांतील सर्व सरदारांस कान्होजी त्या रस्त्यानें गेल्यास त्यास पकडण्यास सांगितलें.

परंतु कान्होजी कोणाचेहि हातीं न लागतां निजामाकडे गेला. पण निजामानें कान्होजीस चाकरीस ठेवून घेतलेलें दिसत नाहीं. हा मराठी राज्यांतच दंगाधोपा करीत कांहीं दिवस राहिला. शाहूशीं मिलाफ करण्यासाठीं येसाजी सिद्धेश्वर नांवाच्या गृहस्थास यानें साताऱ्यास पाठविलें. थोडा कालपर्यंत त्यांचा मिलाफ झालाहि, परंतु तो फार दिवस टिकला नाहीं.

कान्होजी पुढें भाम येथें जाऊन पोंचला. याच्या बंदोबस्ताचें काम शाहूनें याचा पुतण्या रघूजी यासच सांगितलें; व कान्होजीस त्याचे जागेवरून काढून टाकून त्याचे जागीं रघूजीस नेमलें, व त्यास कान्होजीस पकडून आणण्याची आज्ञा केली.

स. १७३० त वऱ्हाडांत चांगला जम बसल्यावर रघूजीनें याच्यावर चाल केली. आपलें सेनासाहेब सुभा हें पद गेल्याचें कान्होजीस माहीत होतें. परंतु हा खुषीनें प्रांताचा ताबा सोडण्यास तयार नव्हता.

कान्होजी भाम येथें असतां रघूजीनें याजवर हल्ला करून याचा सरदार तुकोजी गुजर यास ठार मारलें. तेव्हां कान्होजी भामेहून माहूरचे बाजूस पळून गेला; व रघूजीनें मंदार या गांवाजवळ याचा पराभव केला; आणि मर्यादेनें खालीं उतरून यास पालखींत बसण्यास सांगूं लागला. परंतु हा रागांत असल्यामुळें रघूजीस अद्वातद्वा बोलूं लागला. शेवटीं रघूजीनें यास कैद करून ( स. १७३० ) तो यास घेऊन साताऱ्यास गेला. शाहूनें यास तेथेंच नजरकैदेंत ठेवलें. हा पुढें नजरकैदेंतच वारला.

परंतु ना. बखर पा. ४० यांत रघूजी कर्नाटकांत चंदासाहेबाचे मोहिमेवरून परत साताऱ्यास आला तेव्हां कान्होजीस शाहूचे परवानगीनें घेऊन नागपुरास आला, असें लिहिलें आहे. परंतु तसें झाल्याचें दिसत नाहीं ( नागपूर प्रांताचा इतिहास ).

कान्होजीचा शिक्का—

श्रीशाहुनृपतिनिष्टस्य पर्सोजितनुजात्मनः ।
कान्होजी भोसलस्येयं भाति मुद्रा यशस्करी ॥
( रा. ख. १५ पा. ३२८ ).

**कान्हो पाठक**—हे केंदूर पाबळचे रहिवाशी. उत्तम ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध होते. त्याच गांवचें जोशीपण यांचेकडे असून हे वृत्त्यंशी होते. यांचें सर्व घराणेंच्या घराणें विद्वान् होतें. यांच्या वंशांपैकीं कान्हो त्रिमल वगैरेंना श्रीज्ञानेश्वरांनीं समाधि घेतेसमयीं आपली चीजवस्त दिली होती, अशी वारकरी लोकांत अद्यापि समजूत आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या आरतीच्या वेळीं विडा-खिरापतीचा मान यांच्या घराकडे आहे.

यांचा गीतासार नांवाचा ग्रंथ व इतर काव्यें उपलब्ध आहेत. गीतासारावरून यांच्या गुरूचें नांव नागनाथ असावें असें समजतें. हे विरक्त होते. काशीचा एक पंडित यांच्या दर्शनास आला असतां हे मुलाला खेळवीत होते. ब्राह्मणानें सहज प्रश्न केला, " अजून मायापाश सुटत नाहीं कां ? " हें वाक्य ऐकतांक्षणींच यानें त्या मुलास उचलून विहिरींत फेंकून दिलें. त्यास पुढें लोकांनीं काढलें.

कान्हो त्रिमलदास असेंहि याचें कोठें कोठें नांव आढळतें. त्रिमलदासांचा 'पाताळकांड' म्हणून एक ग्रंथ आहे. त्यांनीं नागेशाचे गुरु म्हणून नांव दिलें, ते नागनाथ व नागेश एकच असावेत असें वाटतें.

खिरापतीचा मान ज्यानें मिळविला त्यानेंच मराठींत गीतासार नांवाचा ग्रंथ लिहिला अशी प्रसिद्धी आहे. पण केंदूरच्या पाठकांच्या संग्रहामध्यें सांपडलेल्या एका गीतासाराच्या पोथींत हा नागनाथाचा शिष्य होता असें म्हटलें आहे. त्यावरून या घराण्यांत याच नांवाचे दोन गृहस्थ झाले असून ज्ञानेश्वरसमकालीन कान्हो पाठकांचा ग्रंथ वेगळा असावा असें दिसतें ( मं. वा. इतिवृत्त शके १८३६ क्रमांक ९३ ).

**कान्होपात्रा**—( स. १४६८ सुमार ) महाराष्ट्रांतील एक संत-कवयित्री. मंगळवेढें येथें शामानामक कळावंतीणीच्या पोटीं हिचा जन्म झाला. ही रूपानें सुंदर असून गाणारीहि उत्कृष्ट असे. आईचा बेत, मुलीचे गुण बादशहास दाखवून धन मिळवावयाचा होता. परंतु हें मुलीस पसंत न पडून ही सरळ पंढरपुरांत जाऊन ईश्वरभजनीं लागली.

बादशहास हिच्या रूपाची कुणकुण लागतांच त्यानें हिला आणण्यासाठीं म्हणून एक कामगार पाठविला. बादशहाकडील निरोप ऐकल्यावर हिनें 'मी देवदर्शन करून येतें' असें उत्तर दिलें. ही देवालयांत गेली व परमेश्वराची करुणा भाकूं लागली, तोंच हिचें प्राणोत्क्रमण झालें. भक्तिविजयांत ३९ व्या अध्यायांत हिचें समग्र चरित्र देण्यांत आलें आहे. हिचा काल शा. श. १३९० असावा असें इतिहाससंशोधक राजवाडे सांगतात. हिचे कांहीं अभंग प्रसिद्ध आहेत ( महाराष्ट्र कविचरित्र भा. ३, पा. ३९-४४ ).

**कान्होबा**—याचें दुसरें नांव कानीफनाथ असें होतें. याची समाधि नगर जिल्ह्यांत शेवगांव तालुक्यांत मढी म्हणून एक गांव आहे तेथें आहे. नवनाथांपैकीं हा एक आहे. याचें देऊळ लहानशा टेकडीवर आहे. हा हिंदु सत्पुरुष असून पुजारी मात्र मुसलमान आहेत. हा हिंदुमुसलमानांचा देव असून याची दोघेंहि भक्तीनें पूजा करितात. हिंदु व मुसलमान याला आपलाच साधु समजतात. याच्या स्मरणार्थ जवळ आसपास पुष्कळशा इमारती आहेत. याचें दुसरें नांव 'शहा रमजान' असें होतें. याचें देऊळ स. १७३० मध्यें बांधलें. येथें हिंदु साधूंच्या जरी समाधि आहेत तरी त्या सर्व मुसलमानी पद्धतीवर बांधलेल्या आहेत. मुसलमान लोक यास 'शहा रमजान' असें समजत असल्यामुळें शहा रमजानच्याबद्दल अहमदनगर ग्याझिटियरमध्यें पुढील हकीगत दिलेली आहेः शहा रमजान महीसवार हा स. १३५० (हिजरी ७५२) च्या सुमारास पैठण येथें आला. हा मंत्रविद्येंत प्रवीण असून गोदावरी नदींतून एका मोठ्या माशावर बसून आला, म्हणून याला महीसवार हें नांव मिळालें. हा पैठणास आल्यावर सादतअली नांवाच्या एका इसमानें याला मुसलमानी धर्म दिला. तेथें हा कांहीं दिवस राहून पुढें सतत ७ वर्षें प्रवास करून मढी येथें स. १३८० ( ७८२ हिजरी ) मध्यें आला व तेथें स. १३९० ( ७९२ हिजरी ) या सालीं मरण पावला. त्या वेळीं याचें वय ९० वर्षांचें होतें. यावरून याचा जन्म स. १३०० मध्यें झाला असावा असें दिसतें. अशा प्रकारची याच्याबद्दलची माहिती आहे. जवळच मिरी या गांवास याचें स्थान आहे. शिवाय मिरी व मढी यांच्या दरम्यान याचें आणखी एक तिसरें स्थान आहे. यास तांबूलदेव असेंहि म्हणतात.

मिरीची यात्रा फाल्गुन शु. १० ला व मढीची फाल्गुन व. ५ ला होते.

एकंदरीत हा मूळचा हिंदु होता. पैठणास आल्यावर मुसलमान झाला. हा मंत्रविद्येंत निष्णात असे. हा सत्पुरुष होता.

कोणी कोणी असें म्हणतात कीं, हा व शहा रमजान हे एक नसून दोघे होते. परंतु वरच्या ह्या सर्व पुराव्यावरून एकंदरीत ते दोघे एकच आहेत, असें वाटतें. कान्होजीचा मुलगा बाबूराव आंगरे यांनीं याचें स्थान जागृत आहे असें म्हटलें आहे. याच्याबद्दलच्या बऱ्याच दंतकथा आहेत ( मं. वा. इ. श. १८३७ ले. १०६ ).

२. तुकारामाचा धाकटा भाऊ. तुकयाबंधु म्हणून याचे अभंग आहेत.

**काफूर**—( मलीक नायब काफूर पाहा ).

**काब्राल**—हा एक पोर्तुगीज खलाशी होय. वास्को-डगामानंतर स. १५०० मध्यें पोर्तुगालच्या राजानें याजबरोबर युद्धसामग्री व उत्तमोत्तम खलाशी देऊन याला कालिकतला पाठविलें. हिंदुस्थानच्या जलमार्गाचा वास्को-डगामानें शोध लावल्यानंतर हा पहिलाच गृहस्थ हिंदुस्थानास यावयास निघाला. त्यामुळें याचें प्रवासांत बरेंच नुकसान झालें. शेवटीं हा हिंदुस्थानांत येऊन कालिकतच्या राजाची यानें भेट घेतली. याच्या सफरीनंतर पुन्हा वास्कोडगामा हिंदुस्थानांत आला ( ब्रि. रि. पूर्वार्ध पृ. ९३ ).

**कामदेव**—गोव्याचा कदंब राजा त्रिभुवनमल्ल याची मुलगी याला दिली होती. यालाच कावन म्हणत.

२. प्रबोधचंद्रोदयाचा टीकाकार.

**कामदेव कदंब**—( स. ११८१-१२०७ ) हा बनवासी व हानगल येथील कदंब घराण्यांतील एक राजा. हा चौथ्या सोमेश्वर प. चालुक्याचा जहागीरदार म्हणून स. ११८९ मध्यें राज्य चालवीत होता. यानें मलेजुलु, कोंकण आणि पश्चिम घाट हे देश जिंकले होते. यानें स. ११८१ मध्यें राज्याला सुरुवात केली. स. ११९६ मध्यें होयसल बल्लाळ ( दुसरा ) यानें हानगल शहरास वेढा दिला. पण त्यास कामदेवानें हाकून दिलें. हा स.१२०३-४ या सालीं बल्लाळाबरोबर झगडत होता. यानें केतलादेवी हिच्याशीं लग्न केलें होतें.

**कामधेनु**—हा ग्रंथकार आहे किंवा हें ग्रंथकाराचें नांव आहे याबद्दल संशय आहे. हा स. १०००-११०० च्या सुमारास झाला. कल्पतरु आणि हारलता यांमध्यें याचा उल्लेख असून याचा उल्लेख मिताक्षरा किंवा मेधातिथि यांत केलेला नाहीं.

यानें धर्मशास्त्रांतील निरनिराळ्या विषयांवर पुष्कळ लेख लिहिले आहेत. याचे ग्रंथ उपलब्ध झालेले नाहींत. चंडेश्वराच्या विवादरत्नाकर यामध्यें याचा वारंवार उल्लेख आलेला आहे. याचे उतारे श्राद्धक्रिया-कौमुदी यामध्यें आलेले आहेत.

कामधेनु नांवाचाहि एक ग्रंथ होता. हा धर्मशास्त्रावर लिहिलेला आहे. पण या ग्रंथाच्या कर्त्याविषयीं दुमत आहे. हरप्रसादशास्त्री व जयस्वाल यांच्या मतें हा ग्रंथ भोजाचा आहे. आफ्रेचनें कामधेनु हा ग्रंथ शंभूचा मानला आहे. पण काण्यांच्या मताप्रमाणें गोपाल हा या ग्रंथाचा कर्ता होय.

**कामबक्ष मोगल**—(स.१६६७-१७०९) हा औरंगजेब बादशाहाचा उदेपुरी बेगमपासून झालेला सर्वांत धाकटा पुत्र होय. याला मृत्युपत्राप्रमाणें खरी दक्षिणची सुभेदारी मिळावयाची, परंतु याच्या हेकेखोर व अरेरावी वर्तनामुळें बहादूरशहानें यावर स्वारी करून याचा पराभव केला. याच लढाईत झालेल्या जखमेमुळें याचा अंत झाला ( स. १७०९ ). याचा जन्म स. १६६७ च्या २५ फेब्रुवारींत दिल्ली येथें झाला होता. परंतु ७ मार्च ही तारीख आयर्व्हिन देतो.

हा पराक्रमी नसल्यानें याच्या हातून म्हणण्यासारखी कामगिरी झाली नाहीं, तरी पण औरंगजेबाचें याच्यावर फार प्रेम होतें. जेव्हां झुल्फिकारखानानें जिंजीस वेढा दिला त्या वेळीं हा त्याचे बरोबर होता; परंतु हा मराठ्यांशीं राजकारणें करूं लागल्यामुळें खानानें यास कैद करून बादशहाकडे रवाना केलें.

जर आपल्या हयातींत कामबक्ष आणि अजमशाहा यांची योग्य तऱ्हेनें व्यवस्था लागली नाहीं, तर या दोघांमध्यें भांडणें होऊन राज्यांत बखेडा माजेल व त्याचा फायदा मराठे घेतील, हें पूर्णपणें औरंगजेबानें ओळखल्यावरून त्यानें कामबक्ष यास विजापूरचा सुभेदार नेमलें. १६ फेब्रु. १७०७ रोजीं हा विजापुरास जाण्याकरितां निघाला. विजापुरास पोंचण्यापूर्वीच औरंगजेबाच्या मृत्यूची बातमी आली. तेव्हां बहुतेक मोगल सरदार आपल्या सैन्यासह यास सोडून अहमदनगर येथें अजमशहास जाऊन मिळाले. परंतु यानें तसेंच पुढें कूच करून विजापूर गांठलें. या वेळीं सर्व मोगल सरदार अजमशहाचे बाजूस होते. तरीपण अजमशहानें याला विजापूर येथें स्वतंत्र झाल्याबद्दल कोणत्याहि प्रकारें निर्बंध

घातले नाहींत व याच्यामध्यें कोणतीहि ढवळाढवळ केली नाहीं. यानें अजमशहास मिळण्याची आपली इच्छा दर्शविली होती, परंतु ती नाकारण्यांत आली.

यानंतर आपण स्वतंत्र आहोंत, हें दर्शविण्यासाठीं यानें आपल्या राज्यांत मंत्री, सेनापति व इतर अधिकारी यांच्या नेमणुका करून मनसब व किताब बहाल केले. यानें स्वतःस दिनपनाह Defender of the Faith हा किताब घेऊन आपल्या नांवाचीं नाणीं सुद्धां पाडण्यास सुरुवात केली ( आयर्विन व सरकारकृत लेटर मोगल भा. १ ला, पृ. ५, १०, ११ ).

**कामरान मोगल**—( स. १५३८-५५ ) बाबरचा हा मुलगा. याचा वडील भाऊ हुमायून. हा स्वभावानें तिरसट व विश्वासघातकी होता. हुमायूननें यास काबूल व पंजाब सुभा दिला होता. पुढें स. १५३८ त शेरशहानें हुमायूनवर स्वारी केली असतां हा मदतीस गेला नाहीं व उलट काबूलहून चाल करून आला. शेवटीं आपल्या बचावासाठीं यानें पंजाब शेरशहाच्या स्वाधीन केला.

हुमायून इराणांतील सैन्य घेऊन येत असतां हा भीतीनें सिंधमध्यें पळाला. पण सिंधांत यास आश्रय मिळाला नाहीं. इकडे हुमायूननें काबूल काबीज करून आपला अंमल बसविला. परंतु हुमायून शेरशहाशीं युद्धांत गुंतला असतां यानें बंड करून काबूल घेतलें. परंतु हुमायूननें यास ताबडतोब पकडलें व कैदेंत ठेविलें. तेवीस वर्षे यानें हुमायूनशीं बेइमानगिरी केल्यानें हुमायूननें याचे डोळे काढले ( स. १५५३ ). एकदां दोघांची गांठ पडली असतां याची दीन स्थिति पाहून हुमायूनास रडें कोसळलें. यासहि पश्चात्ताप होऊन यानें क्षमा मागितली. पुढें कांहीं दिवसांनीं हा मक्केस जात असतां वाटेंतच मरण पावला ( स. १५५६ ).

हा शूर, धाडसी, कपटी व क्रूर होता. बील म्हणतो 'हा मक्केस पोहोंचला होता व तेथें तीन वर्षे राहिला. नंतर हा मेला.' याचा मुलगा अबुल कासीम मींर्झा हा ग्वालेरच्या किल्ल्यांत कैदी होता. त्याला अकबरानें ठार मारलें ( स. १५६६ ).

**कामलादेवी**—रामनाथ होयसळाची पत्नी. ही गंगराजकन्या होती.

**२.** माळव्याच्या गुप्त घराण्यांपैकीं देवगुप्ताची मुलगी.

**कामंदक**—( स. ७००-७५० सुमार ) काश्मीरच्या बाजूचा हा एक कवि होऊन गेला. ह्यानें नीतिसार नांवाचा ग्रंथ लिहिला. अर्थशास्त्र ह्या लेखांत डॉ. विंटरनिझनें नीतिसाराचें सुंदर परीक्षण केलें आहे. डॉक्टरसाहेबांच्या मतें हा ग्रंथ स. ७००-७५० या कालांतील आहे. भवभूतीच्या मालतीमाधवांतील कामंदकीची आठवण या वेळीं जरूर होते. कणिक, कौटिल्य यांप्रमाणें कामंदकहि शास्त्रनीतीविषयीं प्रसिद्ध होता.

**कामाख्या**—ही एलिचपूर येथें राहत असून हिची योगिनी म्हणून फार प्रसिद्धी होती. कावड वंगाला ( बंगालचा एक भाग ) देशांतील काउरळी येथील ही मूळची राहणारी. तो प्रांत मंत्रतंत्र, जादूटोणा, हटयोग इत्यादि कामांत फार प्रसिद्ध असे. अशा देशाची ही कामाख्या असल्यामुळें हीहि हटयोगांत फार प्रवीण होती, म्हणूनच हिचें नांव कामाख्या योगिनी म्हणून प्रसिद्ध होतें. हिच्यामध्यें एक दोष फार मोठा होता. हिला आपल्या योगबळाचा फार गर्व होता. दुसऱ्याच्या योगसमार्थ्याची परीक्षा पाहण्याची आणि दुसऱ्याला योगभ्रष्ट करून त्याची मानहानि झाली म्हणजे आनंद मानण्याची हिला फार खोड होती. याप्रमाणें हिनें अनेक योग्यांची परीक्षा करून त्यांना योगीपदापासून भ्रष्ट केलें होतें. अशीच परीक्षा पाहण्याचा प्रयत्न हिनें द्वारावती येथें राहणाऱ्या श्रीचक्रपाणी या नांवाच्या सत्पुरुषासंबंधानें केला. त्याचप्रमाणें त्याला भ्रष्ट करण्याचा हिचा निश्चय होता. पण त्यांत हिला यश न येऊन श्रीचक्रपाण्यांनीं योगबळानें आपल्या प्राणांचा निरोध केला आणि अवतारसमाप्ति केली. तेव्हां हिला अतोनात दुःख झालें आणि तेव्हांपासून हिनें सत्पुरुषांचा छळ करण्याचें सोडून देऊन आपल्या योगसामर्थ्याचा दुसऱ्याच्या कल्याणाकरितां उपयोग केला. हिनें आपल्या पुढील आयुष्याचा एलिचपूर येथें सद्व्यय केला ( एलिचपूर पृ. १०-१५ ).

**कामार्णव गंग**—( स. ११५२ पर्यंत ) हा त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगांपैकीं अनंतवर्मन् ऊर्फ चोडगंगाचा पुत्र. याला स. ११४२ मध्यें राज्याभिषेक झाला. यानें दहा वर्षे राज्य केलें. याला कुमार अनंतवर्मन्, जतेश्वर असेंहि म्हणत. याला मधुकामार्णव म्हणत असत. या घराण्यांत एकंदर सहासात कामार्णव झाले. त्यांची विशेष माहिती मिळत नाहीं. या घराण्यांतील तिसऱ्या कामार्णवांनीं ( स. ८७८-९७ ) आपल्या नांवाचा शक सुरू केला त्यावरून इतरांचा कालनिर्णय होतो.

**कामिलखान दक्षिणी**—विजापूरच्या दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाचा दिवाण. पण इब्राहीमची चुलती चांदबिबी हिचा उपमर्द केल्यानें तिनें कीश्वरखानाकडून यास ठार केलें. हा दोन महिने दहा दिवस दिवाण होता.

**कायगांवकर दीक्षित पाटणकर**—( नारायण गोविंद टकले )-( स. १६५०-१७४८ ) नारायण दीक्षित नांवाचा एक ब्राह्मण सतराव्या शतकांत स. १६५० नंतर गंगातीरीं पैठण मुक्कामीं तपश्चर्या करूं लागला. हा संस्कृत विद्वान् व कर्मठ होता. पुढें हा भिक्षावृत्ति पत्करून औरंगाबादेजवळ राहूं लागला. यानें सर्व हिंदुस्थानभर पर्यटण केलें. बाळाजी विश्वनाथाची याजवर अत्यंत भक्ति जडली. पुढें शाहूमहाराजहि याच्या भजनीं लागले. ब्रह्मेंद्रस्वामी व नारायण दीक्षित हे समकालीन होते.

यांचें वसतिस्थान काशी हेंच बरेच दिवस होतें. हा तेथें अन्नवस्त्रें देऊन सदावर्तें घाली. बाजीराव व राघोबादादा यांचा याशीं पत्रव्यवहार होत असे. यांचीं त्यांना उत्तरेंहि जात असत.

गोदाप्रवरेच्या संगमावर कायगांवास दीक्षितांनीं वास्तव्य केलें म्हणून यास कायगांवकर असें म्हणण्याचा प्रघात पडला. दीक्षित हे सावकारी करीत असत. शेंदुर्णीचे हल्लींचे जहागिरदार याचे वंशज आहेत.

दक्षिणेंतील व कोंकणांतील कारस्थानांत यांचें अंग होतें. काशीस दीक्षितपुरा म्हणून यानें वसविलेला एक भाग आहे. आपल्या प्रवासांत ठिकठिकाणच्या राजकारणाचीं बातमी ठेवून तीं हा बहुधा पेशव्यांस देत असावा असें दिसतें; कारण बाजीराव, चिमाजीआप्पा व नानासाहेब यांचा याच्याशीं पत्रव्यवहार होत होता. याच्या वडिलांचें नांव गोविंदराव असून यांचें दुसरें आडनांव टकले असें होतें. कायगांव हें गोदावरीचे कांठीं असून उत्तर हिंदुस्थानच्या हमरस्त्यावर आहे. याचा उपयोग, निजामाकडील व उत्तरेकडील व्यवहारांत पेशव्यांस होत असे. याला दोन पुत्र असून त्यांचीं नांवें अनुक्रमें वासुदेव व बाळकृष्ण अशीं होतीं. हा ता. १०-१०-१७४८ मध्यें मरण पावला ( म. रि. म. वि. ३, पृ. २९७-९८ ).

**कायमखां बंगष**—पहिल्या बाजीरावानें याचा पराभव केला ( ४ मे १७२९ ).

**कायविररस**—हा बेलगुट्टी घराण्यांतील पहिला महामंडलेश्वर होय. याचा स. १०६१ चा वीरगळ आढळतो. त्यांत हा सर्व पृथ्वीवर राज्य करणारा होता, असा निर्देश आहे. पण हा बेलगुट्टीच्या भोंवतीं राज्य करीत असे. हा पहिल्या सोमेश्वर चालुक्याचा (स. १०४८-६८) मांडलिक होता. संतार राजा वीरसंतार व त्याचा मुलगा भुजबळ हे चालुक्यांशीं लढत होते. त्यांत हा चालुक्यांतर्फे लढत होता.

**कायस्थ ( साहिनी ) घराणें**—या घराण्यांतील मूळ पुरुष गंगेय साहिनी हा गणपति काकतीय राजाचा सेनापति होता. या घराण्यानें म्हैसूर आणि हैद्राबादच्या आसपासचा बराचसा प्रांत आपल्या सत्तेखालीं आणला होता. १ गंगेय साहिनी ( स. ११९९-१२६० )-२ जन्नीगदेव-३ त्रिपुरारिदेव ( स. १२७२-७३ )-४ अंबदेव ( स. १२७३-१३०२ ). यांपैकीं पहिले दोघे आपणास गंदपेंडर व मंडलीक ब्रह्मराक्षस असें म्हणवून घेत. शेवटले दोघे जन्नगदेवाचे पुत्र होत ( सिवेल आणि आयंगार पृ. ३५९ ).

**कारुवाकी**—अशोक मौर्याची पत्नी. हिचा पुत्र तीवर. हिच्या दानाचें वर्णन अशोकानें आपल्या एका शिलालेखांत केलें आहे.

**कार्तवीर्य रट्ट**—( स. ९८० ) हा रट्ट घराण्यांतील पहिला राजा होय. याच्या बापाचें नांव नन्न असें होतें. हा जैनधर्मी व यादवांचा मांडलिक होता. प. चालुक्यांपैकीं पहिल्या तैलपाशीं याचें शत्रुत्व होतें. या सर्वांना कत्त असेंहि म्हणत. हें घराणें सौदत्तीचें होय. याला दावरी व कन्नकैर असे पुत्र होते.

**२.** (स. १०८७) हा रट्ट घराण्यापैकीं पहिल्या सेनाचा मुलगा. दुसऱ्या कण्णकैरानंतर गादीवर आला. जैन व यादवांचा मांडलिक.

**३.** ( स. ११४३-६५ ) हा रट्टांपैकीं दुसऱ्या सेनाचा मुलगा. हा यादवांचें मांडलिकत्व झुगारून देऊन स्वतंत्र झाला. याच्या पत्नीचें नांव पद्मलादेवी. याला कत्तम चक्रवर्ति असेंहि म्हणतात.

**४.** ( स. ११९९ ) हा रट्टांपैकीं पहिल्या लक्ष्मीदेवीचा मुलगा. पत्नीचें नांव मादेवी किंवा एचलादेवी.

**कार्तिकेय**—मृच्छकटिक नाटकांतील शर्विलकाच्या भाषणांत हा चौर्यशास्त्रग्रंथाचा कर्ता होता, असा निर्देश आहे.

**कॉर्नवॉलिस**—(स. १७३८-१८०५). हा बंगालचा दुसरा गव्हर्नर जनरल होय. स. १७८६ च्या सप्टेंबर महिन्यांत मोठ्या नाखुषीनें कामावर रुजू झाला. याच्यावर प्रधानमंडळाचा पूर्ण विश्वास असल्यामुळें यास सर्वाधिकार बहाल करण्यांत आले होते. हेस्टिंग्जला आपलें पद स्थिर करण्यास जशा अनेक खटपटी कराव्या लागल्या तशा यास कराव्या लागल्या नाहींत. कॉर्नवॉलिस हा शूर व धाडसी होता तरी तैलबुद्धीचा मात्र नव्हता.

यानें आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या तीन वर्षांत सिव्हिल सर्व्हिसच्या नियमांची दुरुस्ती केली. याचें धोरण जरी सौम्य होतें, तरी पण सैन्याची जय्यत तयारी ठेवण्या-

विषयीं यानें कधींच हयगय केली नाहीं. कॉर्नवॉलिसनें केवळ आपल्या वजनावर अल्प आयासांत निजामाकडून गुंतुर जिल्हा घेतला. वेळेनुसार इतरांच्या हातून काम होत नाहीं असें पाहून हा खुद्द लढाईवर जात असे. जनरल मेडोजचा पराभव झालेला ऐकतांच हा स्वतःच जाण्यास तयार झाला. मात्र या युद्धांत ऐनवेळीं यास मराठ्यांचें साहाय्य मिळालें म्हणूनच याचा बचाव झाला. या लढाईमुळें बराच मुलूख इंग्रजांच्या ताब्यांत आला. याच कारणावरून यास कंपनीकडून 'मार्क्विस' करण्यांत आलें.

बंगाल, बहार व ओरिसा यांमध्यें कायमधाऱ्याची पद्धत सुरू केल्यामुळें हा बराच लोकप्रिय झाला. इतर बाबतींत हा जरी सुस्वभावी होता तरी न्यायदानाच्या बाबतींत याच्याकडून हयगय केली जात असे. सर जॉन शोअरला येथें नेमून हा विलायतेस परत गेला. पुन्हां शोअर व मार्क्विस वेलस्लीची कारकीर्द संपल्यावर याची नेमणूक झाली. या वेळीं मात्र संस्थानांकडे पूर्ण लक्ष पुरवावयाचें असें ठरलें, परंतु अशा अर्थाचें पत्र पोंचायच्या आंतच हा आजारी पडला व ५ मे रोजीं गाझीपूर येथें याचा अंत झाला.

**कालपा**—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं सत्ताविसावा सिद्ध होय. राजपूरचा राहणारा. यासच शृंगालपाल म्हणतात.

**कालभोज**—( स. ७३४–५३ ) मेवाडच्या राज्यावरील एक महत्त्वाचा पुरुष. हा दुसऱ्या महेन्द्रानंतर गादीवर आला. याचें नांव शिलालेख, दानपत्र, ऐतिहासिक पुस्तकें, व सोन्याचीं नाणीं यांवर खालीं लिहिल्याप्रमाणें वेगळालें आढळतें:

बप्प, बोप्प, बप्पक, बप्प, बप्पक, बप्पाक, बाप्प, बाष्प, व बापा ( ना. प्र. प. १. २४८-५० व टीपा १०–२१ ).

बप्प व बप्प हे दोन्ही प्राकृत भाषेंतील प्राचीन शब्द आहेत. यांचा मूळ अर्थ बाप असा आहे. याच अर्थानें वरील भिन्न भिन्न रूपांचा उपयोग प्राचीन काळापासून केलेला आढळतो ( फ्ली. गु. इं. पृ. १७८; इंडि. ॲंटि. भा. १४. ९८ ). मागाहून हा शब्द बहुमानार्थक झाला आणि नांवासारखाहि त्याचा उपयोग करूं लागले. मेवाडमध्यें याच्या पुढल्या पुष्कळ लेखांत बापा रावळ असा निर्देश मिळतो.

पण हा शब्द कोणाला उद्देशून धरावा याबद्दल संशोधक लोकांत मतभेद आहे. आणि जुन्या शिलालेखांत याचें स्थान निश्चित नाहीं. यामुळें संशोधकांचा घोटाळा होणें स्वाभाविक आहे. पण मेवाडच्या भाटांचें ख्यात, राजप्रशस्ति महाकाव्य, नैणसीचें ख्यात, यांत बाप्पाचा पुत्र खुंमाण दिला आहे आणि आटपुरच्या ( आहाड ) प्रशस्तींत कालभोजाच्या पुत्राचें नांव खुंमाण दिलें आहे. त्यावरून यालाच बाप्पा म्हणत असें ठरलें, असें ओझा म्हणतात.

यानें वि. सं. ७९१–८१० ( स. ७३४–७५३ ) पर्यंत राज्य केलें.

याचें एक सोन्याचें नाणें मिळालें असून त्यावर शिव, नन्दी व भक्त व त्रिशूळ आहेत. दुसऱ्या बाजूवर सूर्य, सवत्स धनु.

हा लकुलीश संप्रदायाचा साधु हारितराशीचा शिष्य होता.

याची राजधानी नागदा होती. हारितराशीच्या कृपेनें याला जमिनींत गाडलेले कोट्यावधि रुपये सांपडले व त्याच्या जोरावर सैन्य उभारून यानें मौर्यांपासून चितोड घेतलें.

याचा देहान्त नागदा येथें झाला. याचें समाधिमंदिर एकलिंगजीच्या मंदिरापासून एक मैलावर आजहि विद्यमान आहे. याला सध्यां बापारावळा असें म्हणतात. यानें चितोड मौर्यांपासून घेतलें, या हकीगतीवरून व सांपडलेल्या सोन्याच्या नाण्यांवरून हा प्रतापी व स्वतंत्र राजा होता, हें स्पष्ट दिसतें.

याच्या संबंधीं अद्भुत कथा बऱ्याच प्रचलित आहेत. पण त्या ऐतिहासिक माहिती मिळत नसल्याच्या निदर्शक आहेत ( रा. इ. पा. ४०४–४२० ).

**काला लोदी**—लोदी घराण्यांतील मलिक बहरामाचा हा एक मुलगा होय. याला सुलतान शाहा, फीरूज, मुहम्मद व मलिक ख्वाजा असे चार भाऊ होते. याचाच मुलगा बहलोल लोदी हा होय.

**कालिदास**—( स. ३८७–४१३ सुमारें ) याच्या चरित्राविषयीं पुढील दन्तकथा सर्वत्र प्रसिद्ध आहे. हा एक ब्राह्मणाचा मुलगा. पांच सहा महिन्यांचा असतांच आईबाप वारल्यानें एका गौळ्यानें याचें पालनपोषण केलें. हा अठरा वर्षांचा झाला तरी याला शिक्षण मिळालें नव्हतें. जेथें हा राहत असे तेथील राजाला एक उपवर कन्या असून तिचा विवाह व्हावयाचा होता. तिला अनेक वर दाखवूनहि ती कोणालाच पसंत करीना. तेव्हां राजानें वरसंशोधनाचें काम प्रधानावर सोंपविलें. प्रधानाचें व राजकन्येचें ठीक नसल्यामुळें प्रधानानें या संधीचा फायदा घेतला आणि गौळ्याच्या घरीं वाढलेल्या या ब्राह्मणकुमाराबरोबर ज्याला शास्त्रीपंडितांचा लवाजमा देऊन याला वर म्हणून राज्यकन्येकडे पाठविलें. तेव्हां याच्याबरोबरच्या

शास्त्रीपंडितांपुढेंच हात टेकावे लागल्यामुळें याच्या ज्ञानाचें प्रदर्शन होण्याची वेळच आली नाहीं आणि राजकन्येचा विवाह याच्याशीं झाला. पण पुढें दोनचार दिवसांत यांचें सर्व बिंग बाहेर पडलें. पण विवाह होऊन गेल्यावर राजकन्या बिचारी काय करणार ? तिनें यास कालीदेवीची उपासना करावयास सांगितली. यानेंहि देवीच्या पायाशीं धरणें धरलें व शेवटीं तर शिरच्छेदहि करण्यास तयार झाला. तेव्हां देवी याला प्रसन्न झाली. आणि याच्या मस्तकावर तिनें वरदहस्त ठेवला.तेव्हांपासून हा अत्यंत विद्वान् व प्रतिभासंपन्न कवि झाला व कालिदास या नांवानें प्रसिद्धी पावला.

देवीचा वरदहस्त प्राप्त करून हा परत आला आणि राजकन्येचीहि याच्या गुणवत्तेबद्दल खात्री झाली. पण आपला भाग्योदय करणाऱ्या राजकन्येस हा मातृवत् व गुरुवत् मानूं लागला. त्यामुळें चिडून जाऊन राजकन्येनें याला 'स्त्रीच्याच हातून मृत्यु येईल' म्हणून शाप दिला. तेव्हांपासून याच्या आयुष्याला निराळेंच वळण लागलें, आणि याचा बराच काळ वेश्यांच्या सहवासांत जाऊं लागला. एकदां सिंहलद्वीपांत आपला मित्र जानकीहरण-कर्ता कुमारदास यास हा भेटण्याकरितां हा गेला असतां तेथील वेश्येचे तोंडून 'कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न तु दृश्यते' या श्लोकार्धाच्या पूर्तीकरितां राजानें मोठें बक्षिस लावल्याचें यास समजलें. यानें लागलीच 'बाले तव मुखाम्भोजात्कथमिन्दीवरद्वयम्' असें श्लोकार्ध रचून त्या समस्येची पूर्ति केली. राजानें देऊं केलेल्या बक्षिसाच्या लोभानें वेश्येनें याला गुप्तपणें ठार केलें. पण कुमारदासास संशय आला म्हणून त्यानें दरडावून विचारतांच तिनें आपला गुन्हा कबूल केला. आपल्या प्रिय मित्राचा अशा रीतीनें अंत झाल्याचें समजल्यावर राजाला अतिशय वाईट वाटलें व त्यानें दुःखाच्या भरांत कालिदासाच्या चितेवरच स्वतःस जाळून घेतलें. कालिदासास जेथें अग्नि दिला ती जागा अद्यापि सिंहलद्वीपांत माटर नांवाच्या दक्षिण प्रांतांत किरींदी नदीच्या मुखाजवळ दाखवितात, असें कै. म. म. डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण यांनीं म्हटलें आहे. पण कुमारदास हा राजा सिलोनमध्यें त्या वेळीं असल्याचें सिद्ध होत नसल्यानें हें स्वीकारतां येत नाहीं.

कालिदास हा ब्राह्मणकुलांत जन्मला होता, असें दिसतें. याच्या ग्रंथांत ऋषी, विद्वान् ब्राह्मण व यज्ञकर्ते यजमान यांचीं चित्रें आपलेपणानें काढलीं आहेत. शाकुंतलांत यानें स्वतः वैदिक वृत्तांत रचलेला एक श्लोक घातला आहे. यावरून हा ब्राह्मण असणें जास्त संभवनीय दिसतें. हा मंदोसरचा रहिवासी असावा असें कल्पून म. म. हरप्रसादशास्त्री यांनीं हा दसोरा ब्राह्मण असावा, असें म्हटलें आहे. पण मंदोसरपेक्षां याचा उज्जयनीशीं अधिक संबंध दिसतो.

रघुवंशाच्या पहिल्या सर्गांतील आश्रमाचें वर्णन अगदीं आत्मीयतेनें केलेलें असून अत्यंत सुंदर साधलें आहे.

शाकुंतलांतील कण्व व मारीच यांच्या व विक्रमोर्वशीयांत च्यवनाच्या आश्रमाचें मनोहर वर्णन केलें आहे. त्यावरून आश्रमांतील पद्धतीकडे आदर्श म्हणून बोट दाखविण्याचा कवीचा उद्देश दिसतो.

कालिदासाच्या काव्यांत यानें कोठें व कशाचें अध्ययन केलें होतें याचा पत्ता लागत नसला तरी याची बहुश्रुतता व वैदिक धर्माबद्दलचा आदर मात्र चांगलाच व्यक्त होतो.

कालिदासासारखा कवि आपल्या प्रान्तांतील असल्यास प्रान्तिकदृष्ट्या अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. बंगाली लेखक हा बंगाली होता असें प्रतिपादन करितात. काली ही बंगाल्यांतील प्रमुख देवता असून कालिदास असें नांव तेथें अद्यापि ठेवलें जातें. तसेंच ऋतुसंहाराचा आरंभ ग्रीष्मापासून केला असून 'आषाढस्य प्रथमदिवसे' हा मेघदूताचा आरंभहि बंगाल्यांतील चालू सौरमासांतील दिवसगणनेसारखा आहे. इत्यादि कारणांनीं कालिदास हा बंगाली होता, असें तिकडील लोक निश्चितपणें प्रतिपादतात. मुर्शिदाबादेत गड्डाशिंगरु या गांवीं कालिदासाचा जन्म झाला. तेथें याचें स्मारक करण्याकरितां कालिदास-जन्मपीठोत्सव-कमेटी त्यांनीं स्थापन केली आहे. तिनें एक कालिदासपाठशाळा चालविली आहे. प्रतिवर्षी सरस्वती-पूजोत्सवाच्या वेळीं तेथें साहित्य-संमेलनाचा व इतर मनोरंजक कार्यक्रम करण्यांत येतो. सरकारच्या मदतीनें त्यांनीं तेथें एक तलाव खोदवून त्याला कालिदाससागर असें नांव दिलें आहे. कालिदासाला तीन स्त्रिया होत्या व त्यांच्या सहवासांत तो निरनिराळ्या ठिकाणीं राहत होता. विद्युन्माला या आपल्या पत्नीसह यानें ब्रह्मानीतला गांवीं कांहीं दिवस वास केला. श्रीपाट दोगाझिया या गांवीं यानें आपला द्वितीय संबंध व पुत्राचा विवाह केला, अशा दंतकथा बंगाल्यांत अद्यापि प्रचलित आहेत. अशा माहितीं कालिदास-समितीनें प्रसिद्ध केलेल्या कालिदास-जन्मपीठसंभारअनुष्ठानपत्र या पुस्तकावरून कळून येते.

कालिदास हा काश्मीरी होता, असें एक मत बरेंच व्यवस्थितपणें लोकांपुढें आलें आहे. दिल्ली युनिव्हर्सिटीचे संस्कृतचे प्रो. लक्ष्मीधर कल्ला यांनीं बर्थप्लेस ऑफ कालिदास ( कालिदासाची जन्मभूमि ) या आपल्या इंग्रजी

पुस्तकांत हें मत व्यवस्थित मांडलें आहे. कालिदासाच्या प्रत्येक ग्रंथांत हिमालयाबद्दल आपलेपणानें वर्णन किंवा निर्देश आढळतो. कुमारसंभवाचा प्रारंभ हिमालयाच्या वर्णनापासून झाला आहे. मेघदूताची यक्षाची नगरी अलका ही हिमालयावर होती. विक्रमोर्वशीयांत पुरुरवा व उर्वशी यांची प्रथम भेट काश्मीराजवळ गंधमादनपर्वतावर झाली. पुढें उर्वशीचा वियोग झाल्यावर राजा त्याच पर्वतावर भटकूं लागला. रघुवंशांतील पहिल्या सर्गांत दिलीप वसिष्ठाश्रमांत जातो तोहि हिमालयावरच. शाकुंतलांतील कण्व व मारीच यांचे आश्रम याच पर्वतावर कवीनें वसविले आहेत. हीं सर्व स्थळें काश्मीरांत सिंधु-नदीच्या खोऱ्यांत होतीं हें सिद्ध करितां येतें. वसिष्ठाश्रमाजवळ गंगाप्रपात होता, त्या ठिकाणीं दिलीप रक्षण करीत असलेल्या वसिष्ठाच्या धेनूवर एका सिंहानें झडप घातली. कालिदासानें त्या सिंहाला 'भूतेश्वरपार्श्ववर्ती' म्हटलें आहे. काश्मीरांत वरील प्रदेशांत भूतेशतीर्थ प्रसिद्ध आहे. काश्मीरांतच सिंधु व मालिनी नद्या, शचीतीर्थ, सोमतीर्थ व ब्रह्मसर हीं तीर्थें आणि शक्रघाट हीं सांपडतात. आपल्या कथानकाच्या सोयीसाठीं शचीतीर्थ व शक्रघाट हीं हस्तिनापुराजवळ होतीं असें कवीनें वर्णिलें असलें तरी तीं नांवें त्याला पूर्वपरिचित असल्यामुळेंच सुचलीं असावीं. रघुवंशांत ( २. ३५ ) वसिष्ठधेनूवर झडप घालणारा सिंह आपणास निकुंभाचा मित्र म्हणतो. हा निकुंभ कोण, याचा टीकाकारास उलगडा झाला नाहीं. पण काश्मीरच्या नीलमतपुराणांत कुबेरानें दुष्ट पिशाचांबरोबर युद्ध करून त्यांस काश्मीरांतून हाकून देण्याकरितां निकुंभाची योजना केली होती अशी कथा आली आहे, त्यावरून कालिदासास काश्मीरांतील प्राचीन कथांचें ज्ञान होतें असें दिसतें. काश्मीरच्या कांहीं विशिष्ट रीतिरिवाजांचें व लौकिक समजुतींचेंहि प्रतिबिंब कालिदासाच्या ग्रंथांत पडलेलें दिसतें. विवाहप्रसंगीं सासूनें किंवा दुसऱ्या कोणी सौभाग्यवती स्त्रीनें वराच्या मस्तकाला माला बांधावी असा काश्मीरांत रिवाज आहे, हें तद्देशीय विवाह-पद्धतीवरून दिसतें. रघुवंशांतहि इंदुमतीनें अजाच्या गळ्यांत स्वतः माळ न घालतां आपल्या सुनन्दा नामक उपमातेकडून ती घालविली आहे. तसेंच हा काश्मीरी शैव म्हणजे प्रत्यभिज्ञादर्शनाचा अनुयायी होता असें दिसतें. या दर्शनांत सदाशिव हें एकच सर्वव्यापि तत्त्व मानलें आहे. त्याचीं शिव व शक्ति हीं दोन रूपें सृष्टिनिर्माणाकरितां होतात. शक्तीच्या साहाय्यानें शिव चराचर सृष्टि उत्पन्न करतो व स्वतःहि नियतीस्तव शक्तीचें आवरण घेऊन जीव बनतो. या आवरणामुळें त्याला स्वतःचें विस्मरण पडतें. पुढें गुरूपदेशानें, अध्यात्मदर्शनाभ्यासानें किंवा इतर कांहीं कारणानें जीवाचें आवरण नष्ट झाल्यावर त्याला आपल्या पूर्व स्वभावाची ओळख ( प्रत्यभिज्ञा ) पटते व नंतर त्याचें परम तत्त्वाशीं ऐक्य होतें. स्वतःचें विस्मरण आणि पुनः ओळख हें या तत्त्वज्ञानांतील मुख्य तत्त्व हें याच्या प्रत्येक नाटकांत आहे. शाकुंतलाच्या भरतवाक्यांत यानें शंकराला परिगतशक्ति असें म्हटलें आहे. इत्यादि अनेक कारणें देऊन याचा काश्मीरशीं अत्यंत निकट संबंध असावा हें वर्णिलें आहे.

तसेंच कालिदास हा विदर्भांतील होता असेंहि दाखविण्याचा प्रयत्न झाला आहे ( J. R. A. S. 1926 पा. ७२६-एफ. जी. पिटर्सन ). कालिदासाच्या अनेक ग्रंथांत विदर्भाचा संबंध येतो. याच्या मालविकाग्निमित्रांत विदर्भराजकन्येच्या प्रेमकथेचें संविधानक आहे. मेघदूतांतील रामगिरि म्हणजे रामटेक हें प्रसिद्धच आहे. रघुवंशांतील अजपत्नी इंदुमती विदर्भराजकन्या होती ( रघु. ६ ). 'ऋद्धां विदर्भाधिप-राजधानीम्' (रघु. ५·४०), 'सौराज्यरम्यानपरो विदर्भान्' ( रघु. ५·६० ) असे विदर्भाबद्दल आपलेपणाचे निर्देश आले आहेत. कवीनें आपले ग्रंथ वैदर्भी रीतींत लिहिले. तसेंच हा विदर्भांत वकील म्हणूनहि बरेच दिवस होता. कालिदास हा बिहारी होता असेंहि एक मत गंगा नांवाच्या हिन्दी मासिकांत एकानें प्रतिपादन केलें होतें.

कै. म. म. हरप्रसादशास्त्री व प्रो. शि. म. परांजपे यांनीं बारकाईच्या तपशिलावरून हा मंदोसर व विदिशा येथील असावा असें सिद्ध केलें आहे ( शि. म. परांजपे साहित्यसंग्रह, भा. १, पृ. ९६ ).

ग्रंथ व श्रेष्ठता—मम्मटानें आपल्या काव्यप्रकाशांत यशःप्राप्ति हें काव्यनिर्मितीचें प्रमुख प्रयोजन सांगितलें आहे व त्याच्या उदाहरणार्थ कालिदासाचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. ध्वन्यालोक हा साहित्यशास्त्रावरील सर्वमान्य ग्रंथ लिहिणारा मार्मिक व सहृदय टीकाकार आनंद-वर्धन यानें तर 'जगतांत कालिदासादि दोनचार किंवा पांचसहा माणसांना फार तर महाकवि म्हणतां येईल,' असे उद्गार काढले आहेत. जयदेव कवीनें कालिदासाला 'कविकुलगुरु' ही अत्यंत श्रेष्ठ पदवी अर्पण केली आहे. अकराव्या शतकांतल्या सोड्ढळ कवीनें आपल्या उदय-सुंदरी नामक चम्पू ग्रंथांत निरनिराळ्या कवींचे विशेष सांगतांना याला रसेश्वर अशी संज्ञा दिली आहे. अशा या अद्वितीय कवीचा सत्कार हिंदुस्थानचा शेक्सपीयर या

शब्दानें पाश्चात्य पंडितांनीं केला आहे. अशा या थोर कवीचें जीवनचरित्र अल्पांशानेंहि उपलब्ध नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

याचे पुढील ग्रंथ प्रसिद्ध आहेत:—

( १ ) ऋतुसंहार, ( २ ) मालविकाग्निमित्र, ( ३ ) कुमारसंभव, ( ४ ) विक्रमोर्वशीय, ( ५ ) मेघदूत, ( ६ ) कुंतलेश्वरदौत्य, (७) शाकुंतल, (८) रघुवंश. कुंतलेश्वरदौत्य नाटक नांवाचा अनुपलब्ध ग्रंथ याचा असल्याबद्दल क्षेमेन्द्राच्या औचित्यविचारचर्चेत ( पृ. १३९ ) निर्देश आहे.

याशिवाय सेतुबन्ध किंवा रावणवहो या प्रवरसेनाच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या प्राकृत काव्यांत याचा बराच हात असावा असें दिसतें. वरील आठ ग्रंथ कोणच्या कालक्रमानें झाले असतील हे आंकडे घालून दाखविलें आहे.

रघुवंश हें यांचें काव्य अत्यंत उत्कृष्ट असून इतर काव्यांच्या मानानें साध्या भाषेंत लिहिलें असल्यानें आबालवृद्ध संस्कृतज्ञास सारखेंच प्रिय झालें आहे. त्यामुळें यावर अनेक पंडितांनीं टीका लिहिल्या असून त्यांपैकीं तेहेतीस टीकांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. यामुळेंच कालिदासाचा निर्देश ' रघुकार ' असा संस्कृत भाषेंतील ग्रंथकार करतात. कुमारसंभव व मेघदूत हीं काव्यें दैवी संपत्तीनें युक्त असणाऱ्या नायकांवर उभारलेलीं असल्यामुळें सामान्य वाचकाला त्यांच्याबद्दल तितकासा आपलेपणा वाटत नाहीं. शंकर व यक्ष हे वरील काव्यांचे नायक होत. यांच्यापेक्षां रघुवंशांतील दिलीपापासून अग्निमित्रापर्यंतचे तीस राजे वाचकाला तन्मय होण्याच्या दृष्टीनें सोयीचे आहेत. त्यांत क्वचित् अद्भुतपणा असला तरी त्यांबद्दल कौतुक व सहानुभूति कायम राहते. दिलीपापासून दशरथापर्यंत रघुवंशांतील राजे एक एक गुणांत श्रेष्ठ असें दाखविले आहेत. दिलीप हा भक्तिमान्, रघु दानशूर, अज प्रेमळ व दशरथ राजगुणसंपन्न होता. पण रामाच्या स्वभावांत या सर्वच गुणांचें मधुर मिश्रण झालें आहे. पण रामानंतर या घराण्यांतील गुणाला ओहोटी लागलेली दिसते. कुश व अतिथि यांची स्थिति कांहीं बरी होती, पण अतिथीनंतरच्या एकवीस पिढ्यांत कवीला वर्णन करण्यासारखा प्रसंग आढळला नाहीं. अग्निवर्णानें तर विषयमग्न होऊन आपल्या घराण्याचें यश कलंकित केलें. प्रजेची पित्याप्रमाणें काळजी घेणारा दिलीप राजा आणि प्रजेनें दर्शनार्थ धरणें धरल्यावर मंत्र्याच्या आग्रहावरून खिडकींतून एक पाय बाहेर काढून ' याच्या दर्शनानें आपली तहानभूक भागवा ' असें प्रजेस सांगणारा अग्निवर्ण राजा यांतील अन्तर सहज लक्षांत येतें. कालिदासानें स्वीकारलेला वंशक्रम फक्त पद्मपुराणाशीं जमतो. पण पद्मपुराणांत कालिदासावरून घेतला आहे असें वाटतें. या काव्यांत सर्वच प्रमुख रसांचा परिपोष झाला आहे.

कालिदासानें मालविकाग्निमित्र हें नाटक लिहिलें आहे. त्यांतील अग्निमित्र हा मौर्यवंशाचा उच्छेद करून मगधसाम्राज्य बळकावणाऱ्या सेनापति पुष्यमित्राचा मुलगा. त्याचा काळ खि. पूर्व १५० वर्ष हा विद्वानांनीं निश्चित केला आहे. तसेंच याच्या नांवाचा उल्लेख प्रथम उत्तरेंतील कनोजच्या सम्राट् हर्षाचा ( स. ६०६-६४७ ) आश्रित जो संस्कृत कवि बाणभट्ट, त्याच्या हर्षचरिताच्या प्रस्तावनेंत आला आहे. तसेंच दक्षिणेंतील बदामी नामक पूर्व चालुक्यांच्या राजधानीपासून ईशान्येस १५ मैलांवर असलेल्या ऐहोळे ( याचा जुना कानडी उच्चार अय्यावोळें ) या गांवीं जुन्या जैनमंदिरांत एका शिलाखंडावर कोरलेल्या स. ६३४ च्या रविकीर्ति या जैन कवीच्या प्रशस्तींत आढळतो. या दोन मर्यादा निश्चित असल्या तरी याच्या मधल्या काळांत कालिदास केव्हां झाला असेल याबद्दल अत्यंत मतभेद आहे. तो मतभेद लक्षांत यावा म्हणून कांहीं प्रमुख लोकांचीं मतें पुढें देत आहोंत.

हा संवतारंभीं असणाऱ्या उज्जयनीच्या विक्रमाच्या दरबारांत होता, असें परंपरागत मत आहे. तेंच श्री. चिं. वि. वैद्य यांनीं प्रतिपादलें आहे. स. च्या चौथ्या शतकाचा उत्तरार्ध ( डॉ. भांडारकर ).

स. चें पांचवें शतक ( प्रो. का. ब. पाठककृत मेघदूतप्रस्तावना ). स. चें सहावें शतक (प्रो. मॅक्समुल्लरकृत हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर व म. म. हरप्रसादशास्त्री; वराहमिहिर पाहा ).

याचा आश्रयदाता कोणी शकारि विक्रमादित्य असावा, असें परंपरा व विक्रम शब्दाच्या श्लेषावरून अनुमान आहे. अभिनंदकविकृत रामचरित्रांत ' ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना ' असें स्पष्ट म्हटलें आहे. अभिनंदकवीचा काल अकरावें शतक हा आहे. उज्जयनीच्या गुप्तांपैकीं पहिला चंद्रगुप्त आणि त्याचा नातू दुसरा चंद्रगुप्त यांनीं विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती, असें त्यांच्या नाण्यांवरून दिसतें. तसेंच दुसऱ्या चंद्रगुप्तानें स. ३९५ च्या सुमारास काठेवाडच्या परकी शकवंशीय क्षत्रपांचा समूळ उच्छेद करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला असें शिलालेख व नाणीं यांवरून सिद्ध होतें. कौत्स शाब नांवाच्या त्याच्या एका सांधिविग्रहिक मंत्र्यानें मध्य हिंदुस्थानांत उदयगिरि येथें एक लेख कोरविला आहे. त्यांत

त्यानें आपला शब्दार्थन्यायलोकज्ञ व कवि म्हणून स्पष्ट निर्देश केला आहे ( डॉ. फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शनस् नं. ६ ). त्यावरून विद्वान् माणसास मोठ्या हुद्यावर तो नेमी असें दिसतें. कालिदास, मेंठ इत्यादि विद्वानांप्रमाणें उज्जयनीच्या सभेपुढें त्यानें स्वतःहि परीक्षा दिली होती, असें राजशेखराच्या काव्यमीमांसेंत उद्धृत केलेल्या एका प्राचीन वचनावरून दिसतें ( काव्यमी. अ. १० 'इह कालिदासमेण्ठावमररूपसूरभारवयः । हरिचंद्रचंद्रगुप्तौ प्रकाशितावह विशालायाम् । ). राजाच कवि असल्यास सर्व लोक काव्य करूं लागतात आणि त्यांना त्याच्याकडून उत्तेजन मिळूं लागतें. याच्या वेळीं सुप्रसिद्ध कालिदास झाला असावा असें दिसतें.

यानें कुंतलेश्वरदौत्य नांवाचें काव्य लिहिलें होतें असें क्षेमेंद्राची औचित्यविचारचर्चा ( पृ. १४० ), भोजराजाचा शृंगारप्रकाश आणि राजशेखराची काव्यमीमांसा या ग्रंथांतील आलेल्या उताऱ्यांवरून दिसतें.

त्यावरून एक गोष्ट निश्चित होते कीं, कालिदास कुंतलदेशच्या मांडलिक राजाच्या दरबारांत वकील म्हणून गेला असतां तेथील विलासमग्न राजानें याची विशेष वास्तपुस्त केली नाहीं.

हा कुन्तलेश्वर म्हणजे चंद्रगुप्त विक्रमादित्याचा नातू वाकाटक नृपति दुसरा प्रवरसेन असावा ( ऐयंगार-स्टडीज् इन् गुप्त हिस्टरी पा. ५४ ). चंद्रगुप्तानें आपली मुलगी प्रभावतिगुप्ता ही वाकाटक घराण्यांतील राजा रुद्रसेन यास दिली होती. हा विवाह स. ३९५ च्या सुमारास झाला असावा, असें व्हिन्सेंट स्मिथनें दाखवून दिलें आहे. रुद्रसेन लवकरच मरण पावल्यावर त्याच्या दिवाकरसेन व दामोदरसेन या दोन पुत्रांपैकीं एक पुत्र प्रवरसेन दुसरा म्हणून गादीवर आला. पण तो अल्पवयी असल्यानें प्रभावतिगुप्ता ही प्रामुख्यानें राज्यकारभार चालवी. तिच्या वेळीं तेथें गुप्तांचें वर्चस्व होतें. तिचा पुत्र प्रवरसेन दुसरा वयांत आल्यावर स्वतः कारभार पाहूं लागला. तो कसा काय राज्यकारभार करतो हें पाहण्याकरितां चंद्रगुप्ताचा वकील म्हणून कालिदास त्याच्या दरबारीं गेला होता. तेव्हां याचा विदर्भाशीं व वाकाटक नृपति यात्रेकरितां जात असलेल्या रामटेकाशीं परिचय झाला होता असें दिसतें ( मं. त्रै. ३. २-४ पृ. ९९ ). कालिदासानें कुन्तलेश दुसरा प्रवरसेन विलासांत मग्न आहे असा चंद्रगुप्ताकडे रिपोर्ट केला, असें कुन्तलेश्वरदौत्यांतील उपलब्ध श्लोकावरून दिसून येतें.

सेतुबंध किंवा रावणवहो ( संस्कृत रावणवध ) या नांवाचें प्राकृत भाषेंत लिहिलेलें एक मोठें काव्य प्रसिद्ध आहे. तें काव्य विक्रमादित्याच्या आज्ञेनें प्रवरसेनाकरितां कालिदासानें लिहिलें, असें एक टीकाकार म्हणतो. या तिघांचा कसा संबंध असावा हें वरील कल्पनेप्रमाणें लक्षांत घेतल्यास संशयास जागाच राहत नाहीं. या काव्याच्या पहिल्या आश्वासाच्या ९ व्या पद्यांत हें काव्य राजानें गादीवर आल्यावर लवकरच रचलें, असें म्हटलें आहे. यावर टीकाकार रामदासानें प्रवरसेन म्हणजे भोजदेव असें म्हटलें आहे. विदर्भाच्या राजघराण्याला भोज अशी संज्ञा होती, असें कालिदासाच्या रघुवंशावरून दिसतें. शिवाय भरतचरित या काव्याचा कर्ता कृष्णकवि यानेंहि सेतुबंध काव्य कुन्तलेशानें रचलें, असें म्हटलें आहे ( १. ४ ). वाकाटकाच्या वंशजास कुंतलेश असें म्हणत असत. यावरून हें काव्य प्रवरसेनानें केलें आणि कालिदासानें त्याला त्या कामीं मदत केली असें ठरतें व त्यामुळें कालिदासाचा काळ निश्चित होतो. म्हणजे द्वितीय चंद्रगुप्ताच्या ( स. ३८०–४१३ ) कारकीर्दीत कालिदास झाला असावा.

'ज्योतिर्विदाभरण' ग्रंथाच्या बाविसाव्या अध्यायाच्या दहाव्या श्लोकांत ग्रंथ शकारि विक्रमादित्याच्या आश्रयास असणाऱ्या कालिदासानें रचला व तो त्याच्या नवरत्नांपैकीं एक होता, असें म्हटलें आहे. ग्रंथांतील कांहीं ज्योतिषविषयक उल्लेखांवरून हा ग्रंथ तेराव्या शतकांतील असावा असें मानण्यांत येतें; पण या ग्रंथकारानें वराहमिहिरानें दिलेला कलियुगारंभ मानला असल्यानें ग्रंथाचा रचनाकाल स. ५८० हा येतो. या ग्रंथांत व कालिदासाच्या काव्यांत अनेक ठिकाणीं कल्पनासाम्य आढळतें. तथापि हा अनेक दोषयुक्त ग्रंथ रघुवंशादि काव्यें करणाऱ्या कालिदासाचा नसावा, असें अनेक विद्वानांचें मत आहे ( प्रो. मिराशीकृत कालिदास, पा. ३३ ).

एकदां एका पंडितानें राजसभेंत येऊन 'अम्भोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारानिधिर्वारिधिः' अशी समुद्रवाचक सहा पर्याय शब्द जोंत गुंफिले आहेत अशी ओळ म्हटली, व समस्यापूर्ति करण्याबद्दल पंडितांस आव्हान केलें. सर्व पंडित स्तब्ध बसले व त्याला जयपत्र मिळणार इतक्यांत कालिदासानें पुढें होऊन खालीं दिल्याप्रमाणें श्लोक पुरा केला:

अम्बा कुप्यति तात मूर्ध्नि विधृता गङ्गेयमुत्सृज्यताम् ।
विद्वान् षण्मुख सन्ततं मयि रता तस्या गतिः का वद ॥
कोपाटोपवशाद्विवृद्धवदनः प्रत्युत्तरं दत्तवान् ।
अम्भोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारानिधिर्वारिधिः ॥

एके दिवशीं कुमार कार्तिकेयानें श्रीशंकराला म्हटलें, 'बाबा, तुम्ही या गंगेला डोक्यावर चढविलेली पाहून आईला फार राग आला आहे.' श्रीशंकरांनीं उत्तर केलें, 'अरे, पण जी सदैव माझ्यावर प्रेम करते तिनें कोठें जावें ?' त्याबरोबर कार्तिकेयाला राग येऊन त्याच्या सहाहि मुखांतून 'अम्भोधिर्जलधिः पयोधिः' इत्यादि प्रकारें सागरवाचक शब्द बाहेर पडले.

ईश्वरी कृपा नसली तर विद्या संपादन करण्यास अत्यंत श्रम पडतात, हें माहीत असल्यानें कालिदास गरीब अज्ञ ब्राह्मणास राजदरबारीं पारितोषिक मिळविण्यास मदत करीत असे. एकदां एक ब्राह्मण राजसभेंत आला, त्याला पुरुषसूक्ताची पहिलीच ओळ येत होती. तेवढी त्यानें सभेंत म्हणून दाखविली, पण तेवढ्यानें राजा थोडाच संतुष्ट होणार ! कालिदासानें ब्राह्मणाचें भांडवल संपुष्टांत आलें हें ताडलें आणि पुढें होऊन म्हणाला—'महाराज, या ब्राह्मणानें आपली मोठ्या खुबीनें स्तुति केली आहे. त्याचा आशय असा--

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
चलितश्चकितश्छत्रस्तव सैन्ये प्रधावति ॥

'राजा, तुझें सैन्य शत्रूवर चाल करीत असतां शेष पृथ्वीच्या भारानें स्वस्थानापासून चळतो, इंद्र चकित होतो, व सूर्य धुळीनें झांकला जातो.' या श्लोकांत कालिदासानें मोठ्या खुबीनें यथासंख्य अलंकार साधून राजाकडून त्या गरीब ब्राह्मणास मोठें पारितोषिक मिळवून दिलें.

कालिदासाच्या ग्रंथांत पुढील अशुद्ध प्रयोग सांपडतात. 'लावण्य उत्पाद्य इवास यत्नः' (कुमार. १. ३५). 'तेनास लोकः पितृमान् विनेत्रा' ( रघु. १४. २३ ). या ठिकाणीं आस हें रूप 'बभूव' असें पाहिजे. अस् या दुसऱ्या एका धातूचें किंवा आस हें विभक्तिरूपक अव्यय म्हणून या रूपाची काव्यालंकारसूत्रवृत्तिकार वामनानें व्यवस्था लावण्याचा प्रयत्न केला आहे. 'कामयान-समवस्थया तुलाम्' ( रघु. १९. ५० ). येथें 'कामयान' चूक असून कामयमान असें पाहिजे. 'तं पातयां प्रथममास पपात पश्चात्' ( रघु. ९. ६१ ). 'प्रभ्रशयां यो नहुषं चकार' ( रघु. १३. ३६ ). 'संयोजयां विधिवदास समेतबन्धुः' ( रघु. १६. ८६ ). पातयामास, प्रभ्रशयां-चकार, संयोजयामास अशीं अखंड रूपें पाणिनीच्या व्याकरणाच्या दृष्टीनें शुद्ध आहेत. भाषेच्या अत्यंत कसोशीनें उपयोग करणाऱ्या कालिदासानें हे प्रयोग व्याकरणदृष्ट्या चूक असले तरी तत्कालीं चालू असल्यामुळें सहज केले असावेत. अश्वघोषाच्या बुद्धचरित्रांतहि असे कांहीं प्रयोग आढळतात.

कालिदासाच्या काव्यांत आलेल्या शास्त्रीय वाङ्मयांतील विविध निर्देशांवरून व पारिभाषिक शब्दांवरून याचें खोल ज्ञान व बहुश्रुतता चांगलीच व्यक्त होते. वेद, पुराणें, रामायणासारखे ग्रंथ, गायनादि विविध कला, राजनीति, इतिहास, भूगोल, अनेक प्रकारचे जगांतील व्यवहार, शिष्टाचार यांचें यांनीं जागोजाग इतक्या चांगल्या प्रकारें ग्रंथन केलें आहे कीं, त्या विषयांचें विशेष ज्ञान असल्या-शिवाय इतकें सूक्ष्मपणें लिहितां येणार नाहीं हें सहज पटतें. केव्हांहि पाल्हाळ न करितां मनांतील आशय मोजक्या शब्दांत व्यक्त करण्याची कला कालिदासा-शिवाय इतर प्रसिद्ध कवींत आढळत नाहीं, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. तसेंच थोडा रसिकपणा जवळ असल्यानें अल्पज्ञानानें कालिदासाच्या शब्दांतील आशय आपल्या ध्यानीं येईल असेंहि कोणीं समजूं नये.

हा मोठा रंगेल व विनोदी स्वभावाचा होता यांत शंका नाहीं. याच्या सर्व ग्रंथांत शृंगाररसाला प्राधान्य आहे. म्हणून याला एका सुभाषितांत 'कवितादेवीचा विलास' म्हणून वर्णिलें आहे. नाटकांतील विविध प्रसंग व विशेषतः विदूषकाचें पात्र निर्माण करण्यांत याचा विनोदी स्वभाव दृष्टीस पडतो. हा मोठा मोकळ्या मनाचा होता. कोणाबरोबरहि सात पावलें चाललें अथवा थोडें संभाषण केलें कीं मैत्री होते, असें यानें म्हटलें आहे ( कुमार. ५. ३९; रघु. २. ५८ ). पुरुषांचें स्त्रियांवरचें प्रेम चंचल असेल पण त्यांचें मित्रप्रेम चिरस्थायि असतें ( कुमार. ४. २८ ), या याच्या उक्तीवरून याच्या मित्रप्रेमाची कल्पना येते. याचें हृदय अत्यंत कोमल होतें. दिवसा सूर्यप्रकाशानें निस्तेज झालेल्या चंद्राच्या कोरीकडे पाहून याला अत्यंत दुःख होई ( कुमार. ५. ४८ ). समाजांतील धीवरासारख्या हलक्या दर्जाच्या लोकांचींहि चित्रें यानें मोठ्या मार्मिकपणें रंगविलीं आहेत, यावरून याची सूक्ष्म-दृष्टि व कला दिसून येते. कोणत्याहि व्यक्तीच्या स्वभावांतील मर्म हुडकून काढण्यांत याचा हातखंडा असावा. नाहींतर शाकुंतलांतील घटकेंत पगडी फिरविणाऱ्या शिपा-याचें पात्र याच्या हातून निर्माण झालें नसतें. याला गुणाबद्दल आदर होता, व्यक्तीबद्दल नव्हता, हें याच्या 'वृत्तं हि महितं सताम्' ( कुमार. ६. १२ ) या उक्तीवरून दिसून येईल. हा मोठा विनयशील, स्वाभिमानी आणि निर्भय दिसतो. हिंदुस्थानचा किंबहुना जागतिक कवि म्हणून दाखविण्यासारखा हा थोर कवि आहे. गोएटे-

सारख्या जगन्मान्य कवीनेंहि याचे ग्रंथ डोक्यावर घेऊन नाचावें यापेक्षां याच्या जागतिक मोठेपणास आणखी पुरावा कोणता पाहिजे !

२. गुजराथी कवि. याचा जन्म स. १७२५ त झाला. याची बरीच प्रसिद्धी यानें लिहिलेल्या प्रल्हाद-आख्यानानें झाली. या आख्यानाशिवाय सीतास्वयंवर, ध्रुवाख्यान, ईश्वर, विवाद इत्यादि याचीं काव्यें चांगलीं वठलीं आहेत.

**कालिदास त्रिवेदी**—एक हिंदी कवि होय. हा अंतर-वेदचा राहणारा असून कान्यकुब्ज ब्राह्मण होय. हा वि. सं. १६८७ (स. १६२९) मध्यें गोवळकोंड्याच्या स्वारींत औरंगजेबाच्या सैन्यांतील एका राजाबरोबर दक्षिणेस आला होता. या लढाईचें आणि औरंगजेबाच्या प्रशंसेचें वर्णन यानें केलें आहे. यानें वि. सं. १६९१ मध्यें 'वधू-विनोद' हा ग्रंथ लिहिला. नायिकाभेद आणि नखशिख हीं पुस्तकें याचीं होत. याच्या 'राधामाधव बुधमिलन-विनोद' या ग्रंथाचा शोध लागला आहे. याचा 'कालिदास हजारा' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे; त्यामध्यें जुन्या २१२ कवींच्या कविता आलेल्या आहेत. आणि जंजिरा हाहि यानेंच लिहिला. याचा मुलगा आणि नातू हे दोघेहि चांगले कवि होऊन गेले. त्यांचीं नांवें अनुक्रमें कवीन्द्र आणि दुलह हीं होत.

**कालीकुमारी**—बुंदेलखंडचा राजा चंपतरायाची ही पत्नी होय. नवरा मेला असें कळतांच हिनेंहि आपला कंठ चिरून घेतला ( मु. रि. भा. २, पृ. २७० ).

**कावजी कोंढाळकर**—याचें घराणें कान्होजी जेध्याचें ऋणानुबंधी आणि जिवास जीव देणारें होतें. कान्होजीचा प्रतिस्पर्धी जो बांदल देशमुख त्याची व कान्होजीची झुंज (लढाई) होऊन त्या झुंजींत कावजीचा वडील भाऊ पोसजी हा ठार झाला. तेव्हां कान्होजीनें कावजीस आश्रय दिला; आणि पुढें निजामशाहींत व आदिलशाहींत त्यास मनसबदारी मिळाल्यावर कान्होजीनें कावजीसहि बढती देऊन गौरविलें. सन १६३५ त माहुलीच्या वेढ्यानंतर कान्होजी शहाजीकडे आला आणि त्याजबरोबर कर्नाटकांत गेला. या वेळीं दादाजीकृष्ण लोहोकरे, वाघोजी तुपे वगैरे मंडळीप्रमाणें कावजीहि त्याजबरोबर असावा. स. १६५९ त अफजलखानप्रसंगीं कान्होजीनें वतनावर पाणी सोडून शिवाजीची नोकरी बजावली. त्या वेळीं कान्होजीबरोबर कावजीहि होता. कान्होजीच्या सैन्यानें प्रथम जावळीस आणि बांदलाबरोबर पारघाटांत अफजलखानाच्या सैन्याशीं चांगलें तोंड दिलें. त्या कामीं कावजीनें आपलें शौर्य गाजविलें.

शिवाजीनें कावजी व वाघोजी तुपे या दोघांसहि कर्ती माणसें पाहून कान्होजीपासून मागून घेतलें ( जे. श. ), आणि त्यांस पायदळावर हजारी नेमिलें ( स. १६५९ ). स. १६६० पासून शाहिस्तेखान पुण्यास राहून अंमल चालवूं लागला. त्याचे दोन सरदार बुलाखी आणि नामदारखान हे कुलाबा जिल्ह्यांत धामधूम करीत होते. कावजीची नेमणूक नुक्तीच देइरी गडावर झालेली होती. त्यास बुलाखीनें वेढा दिला. त्या वेळीं यानें पराक्रम करून वेढा उठविला ( स. १६६१ ) ( संभाजी कावजी कोंढाळकर पाहा ).

**कावन**—( २ कामदेव पाहा. )

**कावेल्ली व्यंकट बोरय्या**—( स. १७२५ मृत्यु ) एक तेलंगी ब्राह्मण कवि. याचा जन्म एलोर येथें शके १५९८ ( स. १६७६ ) त झाला. यास लहानपणापासूनच संस्कृत कविता करण्याचा नाद असे. फार्सी व इंग्रजी भाषेचा थोडासा अभ्यास करून यानें इंग्रज फौजेंत पगार वांटण्याची नोकरी पत्करिली. टिपूबरोबर झालेल्या युद्धांत हा मॅकेन्झीसाहेबाबरोबर होता, त्यामुळें युद्धांतील सर्व वृत्तांत यास पद्यरूपानें करतां आला. मॅकेन्झीला इतिहास लिहिण्यास लागणारें साहित्य यानेंच पुरविलें. श्रीरंगचरित्र यांत श्रीरंगपट्टणाचा इतिहास आहे. हा नकाशेहि काढीत असे. स. १७२५ त अपस्मार रोगानें हा अल्पवयीच वारला. मॅकेन्झीनें याचा एक पुतळा मद्रासच्या वाळवंटावर उभा केला आहे, अशी माहिती अर्वाचीन कोशकार देतात ( अत्तालू रूपय्या पाहा ).

**काशी कवि**—मराठी कवि. याचा ग्रंथ किंचित्-रामायण. अवचितसुत काशी व हा एकच किंवा भिन्न ? ( सं. सू. ).

**काशी त्रिमल**—हा मथुरेंत मुसलमानापासून संभाजी राजाचा बचाव करण्याकरितां संभाजीबरोबर जेवला असावा व यानें त्याला दक्षिणेंत सुरक्षित पोंचविलें ( कृष्णाजी त्रिमल पाहा ).

**काशीदास**—हा एक बंगाली कवि होऊन गेला. यानें कृत्तिवासाच्या साहाय्यानें महाभारत व रामायण यांचें बंगालींत भाषान्तर केलें.

**काशीनाथ ऊर्फ बाबा पाध्ये**—(स. १७९०–१८०६) काश्यपाध्यायाचा नातू, यज्ञेश्वराचा पुतण्या व अनंतोपाध्यायाचा ज्येष्ठ पुत्र. यास लोक बाबा पाध्ये म्हणतात.

याच्या आईचें नांव अन्नपूर्णा. याचा भाऊ विठ्ठल. यानें आपली एक मुलगी आवडी नांवाची मोरोपंत कवीच्या रामकृष्ण नांवाच्या मुलास दिली होती.

हा जातीचा कऱ्हाडी ब्राह्मण असून पंढरपूर येथील राहणारा होय.

रत्नागिरी जिल्ह्यांतील गोळवली नांवाचा गांव याच्या वंशजांस अग्रहार म्हणून दिला गेला आहे.

धर्मशास्त्रावर धर्मसिंधुसार नांवाचा यांचा ग्रंथ धर्मसिंधु या नांवानें प्रसिद्ध आहे ( स. १७९१ ).

धार्मिक बाबतींत याच्या धर्मसिंधु ग्रंथाचा दाक्षिणेंत फार उपयोग केला जातो. याचें मराठींत भाषांतर झालेलें आहे. या ग्रंथाचे तीन भाग केलेले आहेत. पहिल्या विभागांत सर्वसामान्य कालाविषयीं माहिती आलेली आहे. उत्सव, उपवास, वगैरेंचे नियम दुसऱ्या भागांत आणि संस्कार, गर्भाधान, लग्न, गोत्रप्रवर वगैरेंचें स्पष्टीकरण तिसऱ्या भागांत केलेलें आहे. याशिवाय यानें प्रायश्चित्तेन्दुशेखर, वेदस्तुति टीका, विठ्ठलकृष्णमन्त्रसारभाष्य आणि कुण्डदिवाकर असे ग्रंथ लिहिले आहेत.

**काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे**—हा गोविंदाचार्य अष्टपुत्रे यांचा पुत्र होय. हा मोठा विद्वान् असून काशींत जाऊन राहिला होता. तेथें यानें पहिल्या गंधाचा मान मिळविला.

**काशीबाई पेठे**—त्रिंबक अमृतेश्वर पेठे यांची बायको. दुसऱ्या बाजीरावास पेशवाई मिळाल्यापासून त्याजकडे ही जात येत असे आणि त्यांचे मर्जीप्रमाणें वागून त्यास हरवक्त खूष ठेवी. श्रीमंत वसईहून परत आल्यावर त्रिंबकरावांचा सरंजाम जप्त केला आणि हिला वर्षाचे दोन हजार रुपये ठरवून दिले. पुढें हिच्या गैरचालीबद्दल नवऱ्यानें बाजीरावाकडे हकीकत कळविली. त्यावरून हिला कैद करून त्रिंबकचे किल्ल्यावर पाठविलें. नंतर ही ता. २७-९-१८१२ रोजीं मेली ( म. रि. उ. ३ पृ. ५५७ ).

**काशीबाई पेशवे**—( मृत्यु २७-११-१७५८ ) ही थोरल्या बाजीरावाची पत्नी व चासकर जोशी यांच्या घराण्यांतील महादजीपंत यांची मुलगी. हिचें लग्न स. १७११ चे सुमारास झालें. हिचें माहेरचें नांव लाडूबाई. पंतांचा व बाळाजी विश्वनाथाचा फार स्नेह होता. ही पतीबरोबर लढाईस जात असे. हिचा स्वभाव जरी शांत होता तरी ही सासूसारखी राजकारणांत कुशल नव्हती व त्यामुळेंच मस्तानीचें प्रस्थ माजलें. बाजीराव वारल्यावर ही रावेरहून परत आली. ही पतिनिष्ठ, गरीब व शांत होती. हिनें स. १७४२ त रामेश्वराची व स. १७४६ त काशीची यात्रा केली. हिला घरांत ताई म्हणत.

**काशीबाई प्रतिनिधि**—( स. १७९८ सुमार ) ही भवानराव प्रतिनिधींची बायको होय. ही हिम्मतवान् व पराक्रमी असून हिनें करवीरकरास कोयनेवर ( कऱ्हाड ) अडवून धरलें. परोपरी विनवणी केली असतां ही करवीरच्या फौजेस आपल्या मुलखांतून पुढें जाऊं देईना, तेव्हां कोल्हापूरकर छत्रपतीनें ता. २१-७-१७९८ रोजीं खुद्द कऱ्हाडवरच चाल केली. पण त्यांत त्याचा मोड झाला ( म. रि. उत्तर वि. ३, पृ. ८० ).

**काशीबाई भोसले**—ही शिवाजी महाराजांची सातवी पत्नी होती. हिचें लग्न शके १५७९ वैशाख शु. ५ ( ता. ८ एप्रिल १६५७ ) रोजीं झालें. ही जाधवरावांची कन्या होय.

**२.** ही बिंबाजी भोसल्याची बायको व पहिल्या रघूजीची आई होय. बिंबाजी वारला तेव्हां रघूजी फार लहान असल्यामुळें हिला रघूजीविषयीं फार काळजी वाटे. हिनें त्याच्याकरितां देवांस व साधुसंतांस बरेच नवससायास केलेले आढळतात.

ब्रह्मेंद्रस्वामीनें हिला लिहिलेलीं बरींच पत्रें उपलब्ध आहेत ( ब्र. स्वा. च. पा. २९६-२९७ ).

**काशीबा गुरव**—सावता माळ्याची कविता लिहून ठेवणारा.

**काशीराज पंडित**—याच्या पित्याचें नांव शिवाजी. हा महाराष्ट्रीय ब्राह्मण असून दिल्लीचा वजीर सफदरजंग याच्या पदरीं प्रथम नोकरीस राहिला. सफदरजंगाची याचेवर विशेष मेहेरबानी होती. सफदरजंगानंतर हा सुजाउद्दौल्याच्याहि मर्जीत होता. याची दरबारांत मोठी प्रतिष्ठा व वजन असे. स. १७६१ मध्यें पानिपत येथें जें मराठे व दुराणी यांचें घनघोर युद्ध झालें त्या वेळीं हा तेथें हजर होता. यानें सेनापति भाऊसाहेब व विश्वासराव यांचीं प्रेतें शोधून काढून त्यांस चंदनादि काष्ठें जमवून अग्नि दिला व त्यांची उत्तरक्रिया हिंदु धर्माप्रमाणें उत्तम प्रकारें केली व या प्रकारानें मराठ्यांवर उपकार केले. स्वतः काशीराज म्हणतो, " आणिक सेवा न घडली ! ईश्वरें हाच आम्हांस नेमला होता ! भगवदिच्छेस उपाय काय ? " पानिपतच्या लढाईचा वृत्तांत यानें फारशी भाषेंत लिहिला आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर जेम्स ब्राऊन यानें स. १७९१ मध्यें ' एशियाटिक रिसर्चेस ' या ग्रंथांत प्रसिद्ध केलें. तें ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें आहे. याच्या बखरींतील कांहीं महत्त्वाच्या चुका रा. राजवाडे यांनीं दाख-

विल्या आहेत ( प्रस्तावना १०७ ). परंतु त्यांनीहि शेवटीं असें म्हटलें आहे कीं, पानपतच्या शेवटल्या युद्धांत हा हजर होता. यानें स्वदृष्टीनें पाहिलें तेवढें बहुधा खरें आहे.

विविधज्ञानविस्तारांत याच्या पानपतच्या बखरीचें भाषांतर प्रसिद्ध झालें आहे. हा मुसलमानांचा पक्षपाती दिसतो. सुजाउद्दौला व भाऊसाहेब पेशवे यांचें बोलणें-चालणें याचेमार्फत चालत असे.

**काशीराजस्वामी**—प्रसिद्ध केशवस्वामींचे हे गुरु होत.

**काशीराम**--हा हिंदी 'कनक मंजरी'चा कर्ता होय. औरंगजेबाचा सुभेदार जो निजामतखाँ त्याचा हा आश्रित होता. याचा जन्म स. १६५७ मध्यें झाला. यानें वरील ग्रंथांत ( काव्यांत ) धनधीरसाह राजा आणि त्याची बायको कनकमंजरी यांचें कथानक वर्णिलें आहे.

**२.** व्यंकटराव काशीचा पिता.

**काशीरामदास**—( स. १६००-७८ ) एक बंगाली कवि. हे बंगाल्यांतील बरद्वान जिल्ह्यांतले राहणारे. यांचा जन्म ब्राह्मणी नदीकांठच्या ' सिंजी ' गांवीं झाला. याच्या कृष्णदास नांवाच्या भावानें श्रीकृष्णचरित्रावर कविता लिहिल्या असून दुसऱ्या भावानें जगन्मंगल नांवाचें काव्य लिहिलें आणि त्यांत श्रीजगन्नाथाची स्तुति केली. यानें पाळलेल्या नंदराम नांवाच्या मुलानें महाभारताचें द्रोणपर्व बंगालींत लिहिलें. यांनीं आदि, सभा, वन, विराट् हीं पर्वें लिहिलीं. यांचे ग्रंथ जरी यांनीं पूर्ण केले नसले तरी यांचें भारत बंगाल्यांत घरोघर श्रद्धेनें वाचलें जातें. शिवाय यांनीं भारतपुराण म्हणूनहि एक ग्रंथ लिहिला. हे बंगाल्यांतील आवासगढ ( मिदनापूर ) येथें शिक्षक होते. सिंजीच्या एका तलावाला यांचें स्मरणार्थ 'केशे-पुकुर ' असें नांव दिलें आहे. यांचे स्मारक करण्याची वंगीय साहित्य-परिषद् खटपट करीत आहे ( क. कौ ७ ).

**काशीराव गुप्ते**—हा नागपूरकर भोसल्यांच्या सरदारांपैकीं विनायकराव गुप्ते यांचा वंशज. याच्या पित्याचें नांव राजेश्वर. यानें नागपूरकर भोसले यांची बखर लिहिली.

**काशीराव गोखले**—हा बाजीरावाचा एक लष्करी सरदार कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्या दुआबांतील प्रदेशाचे संरक्षणार्थ होता, असें मन्रो आपल्या पत्रांत लिहितो. याच्या हाताखालीं घोडदळ व पायदळ फौज चांगली होती. ता. १३ जूनच्या तहानें दुआबांतील हा प्रदेश बाजीरावानें इंग्रजास लिहून दिला, आणि ' तो ताब्यांत घेण्यास इंग्रज फौजा येतील तर तो त्यांच्या हवालीं करूं नये,' अशी बाजीरावानें यास आंतून ताकीद दिली होती. प्रदेश ताब्यांत घेण्याची कामगिरी मन्रो यांजकडे होती. त्यामुळें मन्रो यास मुख्यतः याशींच लढावें लागलें. नवलगुंद इंग्रजांनीं घेतलें त्यावर हा चालून आला. याची व मन्रोची डिसेंबर स. १८१७ त बरीच लढाई झाली. नवलगुंदच्या ठाण्यांत मन्रोनें म्हैसूरचा रहिवासी रामराव यास किल्लेदार नेमिलें. याचा मुलगा गोविंदराव गोखले यानें ता. १९-१२-१८१७ रोजीं रामरावावर चाल केली, पण रामरावानें नवलगुंदच्या बाहेर येऊन त्याचा पाडाव केला. त्या वेळीं हा बदामी येथें होता. तेथून हा गोविंदरावाचे मदतीस धांवून आला. इतक्यांत इंग्रज फौजांनीं येऊन यास नवलगुंदांतून घालवून दिलें. नंतर इंग्रजांनीं गदग, डंबळ, हुबळी वगैरे ठाणीं घेतलीं. या कामीं इंग्रजांना यानें सारखा त्रास देऊन त्यांचा पिच्छा पुरविला. ता. १८-१-१८१८ रोजीं बदामीचें ठाणें इंग्रजांचे हातीं पडलें. पुढें मन्रो बेळगांवावर आला. तेव्हां हा कृष्णा उतरून भीमेवर आला ( म. रि. उ. ३, पृ. ५३७ ).

**काशीराव होळकर**—होळकराचा औरस पुत्र. तुकोजीच्या मरणानंतर गादीविषयीं भांडण जुंपलें. तेव्हां यानें शिंद्यांच्या मदतीनें सर्वांचा पाडाव केला. याच्यानंतर यशवंतराव हा होळकर घराण्याचा मुख्य बनला. यास व याच्या बायकोस यशवंतरावानें मारेकरी घालून ठार मारलें.

**काशीविलास क्रियाशक्ति**—बुक्करायाचा मुलगा दुसरा हरिहर याचा हा कुलगुरु होता. माधवमंत्र्याचाहि हा गुरु होता. हरिहराचा कुलगुरु या नात्यानें याचा प्रथम उल्लेख स. १३७८ च्या ( श. १३०० कालयुक्त, मार्गशीर्ष ) डिसेंबरांत कोरलेल्या ताम्रपटांत सांपडतो ( एपि. कर्ना. व्हा. ५, ले. २५६, पा. ५२१ ). पण स. १३८१ च्या सुमारास रचलेल्या यज्ञतंत्रसुधानिधीवरून सायणास त्यानें आपला कुलगुरु नेमल्याचें दिसतें ( BBRAS. डॉ भाऊ दाजी मेमोरियल, पा. १-२ ). सायण मरण पावल्यावर हरिहरानें क्रियाशक्तीला पुनः कुलगुरु नेमल्याचा आधार सांपडतो. स. १३९८ (श. १३२० बहुधान्य) व १३९९ (श. १३२१ प्रमाथी) सालीं दिलेल्या दोन ताम्रशासनांत हरिहरानें याचा उल्लेख 'राजराजगुरु पितामह ' असा केला आहे ( रिपोर्ट ऑन् दि वर्किंग ऑफ दि म्हैसूर अर्क्यालॉजिकल डिपा. १९११-१२,पा. ४८). स. १४०४ मध्यें ( श. १३२६ तारण ) हरिहर मरेपर्यंत

हाच कुलगुरु होता असें दिसतें. स. १४०३ मध्यें ( श. १३२५ सुभानु ) क्रियाशक्ति हयात असून त्या वेळीं याचा उल्लेख 'श्रीमत् क्रियाशक्ति गुरुमुनीश्वर' असा आढळतो ( एपि. कर्ना. व्हा. ६, ले ५२, पा. १८३ ). एका वेळीं दोन कुलगुरु असत असें, सायणहि कुलगुरु होता अशा निर्देशावरून वाटतें.

**काश्मीरचीं राजघराणीं**-(१) **कर्कोटक घराणें**-१ दुर्लभवर्धन ( स. ६०१-६३७ )-२ रदुर्लभक ( स. ६३७-८७ )-३ चंद्रापीड ( स. ६८७-९५ )-४ तारापीड ( स. ६९५-९९ )-मुक्तीपीड ऊर्फ ललितादित्य ( स. ६९९-७३५ ) हे तिघे सख्खे भाऊ होते. -६ कुवलयापीड ( स. ७३६ )-याचा भाऊ. -७ वज्रापीड ( स. ७३६-४३)-कुवलयापीडाचे पुत्र ८ संग्रामपीड (स.७४३-७५०) ९ ललितापीड ( चिप्पड जयापीड ऊर्फ बृहस्पति )-याचे पुत्र दोन-उत्पलापीड व अजितापीड-अनंगापीड. हे सर्व अल्पवयी असून चिप्पड जयापीडाचा मामा उत्पल याच्या हातांत सर्व सत्ता होती. अनंगापीडाला पदच्युत करून उत्पलाचा पुत्र अवंतिवर्म्यानें गादी बळकावली ( स.८५५ ).

**(२) उत्पल घराणें**--१ अवंतिवर्मा (स.८५५-८४)-२ शंकरवर्मा ( स. ८०४-९०२ )-याला दोन अल्पवयी पुत्र-गोपाळवर्मा व संकटवर्मा. यांचा कारभार यांची आई सुगंधा पाहत असे ( स. ९०२-०४ ).

**(३) वीरदेव वंश**—यशस्करदेव (स. ९४०-४८)-संग्रामदेव ( स. ९४९ ).

**(४) दिद्दिरघराणें**—पर्वतगुप्त ( स. ९५०-९५८ ), क्षेमगुप्त ( स. ९५८-७२) राणी दिद्दा-अभिमन्यु(स. ९७३)-तीनपुत्र-नंदिगुप्त ( स. ९७५ )-त्रिभुव गुप्त ( स. ९८० )-भीमगुप्त. क्षेमगुप्ताची राणी दिद्दा ही आपल्या मुलांचा व नातवांचा कारभार पाहत असे. त्यांच्या मागून तिनें स. १००३ पर्यंत स्वतः राज्य केलें.

**(५) लोहर घराणें**—संग्रामराज, हा दिद्दाचा भाचा ( स. १०२९ )-अनंतराज ( स. १०५९ )-कलश ( स. १०७९ ), याला दोन पुत्र हर्ष व उत्कर्ष, प्रथम उत्कर्ष ( स. १०८९ )-नंतर हर्ष ( स. ११०१ ). दुसऱ्या शाखेतील उच्चल ( स. ११११ )-भाऊ सुस्सल ( स. ११२८ )-हर्षाचा पुत्र मारला गेला. हर्षाचा पुत्र भिक्षु ( स. ११३० )-नंतर सुस्सलपुत्र जयसिंह ( स. ११४८ -११५१ ).

नंतर लहानशा संस्थानाच्या रूपांत असणारें काश्मीरचें राज्य कोटा नांवाच्या विधवा हिंदु राणीपासून स. १३३९ मध्यें शहा मीर्झा ऊर्फ शंसुद्दीन पहिला नांवाच्या धाडसी मुसलमानानें जिंकलें.

**(६) मुसलमान घराणें**—शाहा मीर्झा शंसुद्दीन १ ला (स. १३४६) याला जमशीद, अलीशेर अलाउद्दीन, शीरशामक शिहाबुद्दीन, हिंदालकुत्बुद्दीन असे मुलगे होते (हे एकानंतर दुसरा या क्रमानें गादीवर आले)-२जमशीद (स.१३४९), ३ अली शेर-अलाउद्दीन ( स. १३५०-४ ), शीरशामक शिहाबुद्दीन ( स. १३५९ )--५ हिंदालकुत्बुद्दीन ( स. १३७८ )-६ शिकंदरबुत्शिकन् ( स. १३९३ ९४) ( हिंदाल कुत्बुद्दीनचा मुलगा. याला हैबतखान नांवाचा भाऊ होता. )-७ मीरखान अलीशाह ( स. १४१६ ) ( सिकंदर बुत्शिकनचा मुलगा )-८ शाहीखान झैनुल्-आबिदीन ( स. १४२०. सिकंदर बुत्शिकनचा दुसरा मुलगा )-९ हाजीखान हैदरशाह ( स. १४७०; यास आदमखान व बहरामखान असे भाऊ होते )-१० हसन-शाह ( स. १४७२; हाजीखान हैदरशहाचा मुलगा )-११ मुहम्मदशाह ( स. १४८९, १४९९, १४९७-९८, १५२९; हसनशाहाचा मुलगा )-१२ फत्तेशाह ( स. १४८९-१४९८;आदमखानाचा मुलगा)-१३ इब्राहीम १ ला ( स. १५२६. अकरावा राजा मुहम्मदशाहाचा मुलगा ) -१४ नाझुकशाह ( स. १५२७, १५४०; बारावा राजा फत्तेशाहाचा मुलगा. याला इस्कंदरखान नांवाचा भाऊ होता )--१५ शंसुद्दीन २ रा ( स. १५३४-३५. अकरावा राजा मुहम्मदशाहाचा मुलगा व तेरावा राजा इब्राहीम पहिल्याचा भाऊ)--१६ मीर्झाहैदर ( स. १५४१--५१. यानें चौदावा राजा नाझुकशहापासून राज्य बळकाविलें)--१७इब्राहीम दुसरा ( स. १५५२. चौदावा राजा नाझुकशाहाचा मुलगा )--१८ इस्माईल ( स. १५५५. चौदावा राजा नाझुकशाहाचा दुसरा मुलगा )--१९ हबीब ( स. १५५७ --१५६१. अठरावा राजा इस्माईलचा मुलगा ).

( Cambridge History of India ).

**काश्यप मतङ्ग**—चीनच्या मिंगटी राजानें भारतांत बौद्ध धर्माचें ज्ञान संपादण्याकरितां पाठविलेल्या पंडितांनी याला चीनमध्यें नेलें. चिनी राजाच्या निमंत्रणावरून चीनमध्यें जाणारा पहिला धाडसी धर्मोपदेशक हा होय. हा मग प्रदेशांतील श्रमण असून चीनच्या राजाचें निमंत्रण आलें तेव्हां हा गांधारांत म्हणजे सध्यांच्या अफगाणिस्थानांत होता. तेथून हा तिबेट-मार्गे चीनकडे प्रवास करण्यास निघाला. त्या वेळचा तिकडचा प्रवास फारच कठीण होता. ज्या मार्गानें प्रवास करावयाचा तो मार्ग डोंगराळ व वाटेंत गोबीचें रण तुडवावयाचें. दहाबारा मंडळी निघाली तर मुक्कामास पोंचेपर्यंत वाटेंत निम्मी मृत्यु पावावयाची, असें अनेक चिनी प्रवाश्यांच्या वृत्तान्तावरून दिसतें. पण

यानें हा अवघड प्रवास खुषीनें स्वीकारून चिनांत बौद्ध-धर्माच्या प्रचारकाचा पहिला मान मिळवला. राजानें याला स्वतंत्र मठ बांधून दिला व याचें शिष्यत्व पत्करण्यास अनेक पंडितांना भाग पाडलें. यानें तेथील भाषा हस्तगत करून बौद्ध ग्रंथांचें त्या भाषांत भाषान्तर केलें. अनेक शिष्य तयार करून बौद्धधर्माचें चांगलें बस्तान बसविलें; व आपला जीर्ण देह तेथेंच ठेवला. याच्यानंतर धर्मरक्ष या भारतीय गृहस्थानें तिकडे धर्मोपदेशाचें काम पुढें चालविलें.

**कासीभट बिन केसोभट राजर्षि**—( मृत्यु स. १७०१ ) केशवचैतन्याचा वंशज आणि राजाराम-महाराजांच्या वेळीं राजारामाला मदत करणारा पराक्रमी सरदार. हा जिंजीस जाऊन राजारामातर्फे लढत असतां जखमी होऊन परत आला. त्या वेळीं खुद्द राजारामानें याच्याविषयीं अत्यंत गौरवाचे उल्लेख केले असून, राज्य तुमच्या चरणावर अर्पण केलें, असें म्हटलें आहे ( अप्रसिद्ध लेख ).

**कासीमखान**—( मृत्यु स. १६९६ ) हा एक औरंग-जेबाचा सरदार असून दक्षिणेंतील राज्यें बुडविण्यासाठी औरंगजेबाबरोबर दक्षिणेंत आला होता. यानें राजाराम वगैरे मंडळी जिंजीस जात असतां मध्यें वाटेंत संशयावरून राजाराम व आणखी कांहीं मंडळी खेरीज करून खंडो-बल्लाळ वगैरे मंडळींना पकडून त्यांच्याकडून राजारामा-विषयीं बातमी काढण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु तो निष्फळ झाला. याची हुकमत फक्त याच्याच सैन्यावर चाले. पुढें जेव्हां संताजी घोरपड्यानें मोंगलांना जेरीस आणून त्यांना माघार घ्यावयास लावलें, तेव्हां झालेला मोंगलांचा पाडाव याला सहन न होऊन यानें विषप्राशन करून आत्महत्या केली ( ग्रँट् डफ् ).

२. ( मुहम्मद कासीम पाहा ).

**कासीम बरीद**—( स. १४९२-१५०४ ) बेदरच्या बरीदशाही वंशांतील हा पहिला राजा होय.

हा प्रथम मुहम्मदशाहा बाहामनीपाशीं गुलाम म्हणून होता. तेव्हां मराठ्यांनीं बंड केलें तें यानें मोडलें, तेव्हां यास योग्यतेस चढविलें. त्यामुळें हा बाहामनी राज्याची राजधानी बेदर येथें स्वतंत्रपणें राज्यकारभार करूं लागला; व स. १४९२ त बेदर येथें स्वतंत्र झाला, आणि बारा वर्षे कारभार करून स. १५०४ मध्यें मरण पावला.

२. ( स. १५७२ ) अली बरीदचा पुत्र. पण त्याचा नातू असेंहि आढळतें.

**कासीमशाह**—( स. १७३० सुमार ) एक हिंदी कवि. हा सूफी पंथाचा होता. हंस राजा व जवाहीर राणी यांचें हंसजवाहीर कथानक यानें लिहिलें.

**कासीराज**—याचा अध्यात्मानुभव नांवाचा ओवी-बद्ध मराठी ग्रंथ आहे; तो शके १७४२ ( स. १८२० ) मध्यें संपविलेला आहे. याचा संतकविसूचींत निर्देश नाहीं ( मं. त्रै. १३. १ ).

**काळोजी पवार**—हा देवास राज्याचे संस्थापक तुकोजी व जिवाजी यांचा पिता. काळोजीच्या पित्याचें नांव बुवाजी. काळोजीला संभाजी नांवाचा एक भाऊ होता. त्याचाच पुत्र सुप्रसिद्ध उदाजी पवार ऊर्फ उदबा. काळोजीनें माळव्यांत मराठ्यांची सत्ता नेली व ती पुढील पिढ्यांनीं विस्तृत करून कायम केली.

**कांचनदेवी**—सिद्धराज जयसिंहाची मुलगी. ही अजमीरच्या अर्णवराव ऊर्फ आना चौहानाला दिली होती. हिचा पुत्र सोमेश्वर.

**कांचनाचार्य**—संस्कृत नाटककार.

याच्या ' धनंजयविजया 'चा काळ निश्चितपणें ठरवितां येत नाहीं. या नाटकांतील दोन श्लोक हनुमान नाटकांत सांपडतात. परंतु यावरून कांचन हा भोजाच्या पूर्वी होऊन गेला, असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. शिवाय प्रस्तुत नाटकांतील प्रास्ताविक कविता विजयनगरच्या राजांच्या अनेक शिलालेखांतून दृष्टीस पडतात. आणि त्यावरून कांचन हा विजयनगरच्या एखाद्या राजाच्या पदरीं दरबारी कवि असणें संभवनीय आहे.

याचा बाप उपाध्याय असून त्याचें नांव नारायण असें होतें. त्याला वागीश्वर हा किताब मिळालेला होता. जय-देवाच्या सांगण्यावरून याच्या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला असें दिसतें. या जयदेवाच्या पदरीं कोणीएक गदाधर नामक कवि होता.

' धनंजय-विजयां 'त दुर्योधनाच्या सैन्यावर अर्जुनानें जो विजय मिळविला त्याची कथा वर्णिली आहे. हा अर्जुनाचा विजय म्हणजे पांडव अज्ञातवासांत विराटाच्या घरीं राहत असतां त्याच्या गोग्रहणाच्या वेळीं मिळविलेला होय. विराटपुत्र ज्याचें सारथ्य करीत आहे, असा अर्जुन व कौरव यांच्यांतील युद्ध विद्याधर व प्रतिहारी वर्णन करतात. अशा रीतीनें अर्जुनाला विजय प्राप्त झाल्यावर पांडव आपलें रूप प्रकट करतात व तदनंतर अर्जुनपुत्र व विराटकन्या यांचा विवाह होतो. हस्तलिखित ग्रंथांच्या यादींत 'धनंजयविजयव्यायोग' हें कोणा एका यशोधरानें

लिहिलें, असें म्हटलें आहे. हे दोन्हीहि ग्रंथ एकच असावेत असें वाटतें.

**कांक्षारेवत**—हा एक बौद्ध असून ध्यानरत श्रावकांत श्रेष्ठ होय. याचा जन्म श्रावस्तींतील एका धनाढ्य कुटुंबांत झाला. इतर लोकांबरोबर हा भगवंताचा उपदेश ऐकण्यास जात असे. हा भिक्षु झाला. लहानसहान गोष्टींतहि याला शंका वाटे म्हणून भिक्षु याला 'कांक्षारेवत' असें म्हणूं लागले, व ह्याच नांवानें पुढें हा प्रसिद्धीस आला. हा समाधिभावनेमध्यें अत्यंत दक्ष असे व त्यांतच आनंद मानी ( बौद्धसंघाचा परिचय, पृ. १७६ ).

**किरणमयी**—एक हिंदी कवयित्री. बिकानेरचा राजा राजसिंहाचा भाऊ पृथ्वीसिंहाची ही पत्नी. अकबर बादशाहानें हिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां ही कट्यार घेऊन त्याच्या अंगावर धांवली. तेव्हां तो आई म्हणून हिला शरण आला आणि त्यानें आपला जीव वांचवला ( क. कौ. १ ).

**किलकिलाराजवंश**—आंध्रराजांचा इतिहास निवेदन केल्यावर मत्स्यादि पुराणांत 'तेषु स्थानेषु कालेन ततः किलकिला नृपाः' हें किंवा या अर्थाचीं वाक्यें येतात. नाणीं व शिलालेख यांच्या अभ्यासावरून हे किलकिला राजे म्हणजे भारशिव किंवा वाकाटक घराण्यांतील राजे होत, असें आतां सिद्ध झालें आहे.

कुशान राजवंशाचें वर्चस्व वाढूं लागलें तेव्हां बुंदेलखंडांतील पद्मावती येथें राज्य करीत असलेलें 'विदिशा नाग' नांवाचें राजघराणें विंध्याद्रीच्या पायथ्याशीं रानांत आश्रयार्थ गेलें. यासंबंधीं पुराणांत 'भोक्ष्यन्ति च समाः षष्टिं पुरीं कांचनकां च वै' असें वाक्य येतें. म्हणजे यांची राजधानी कांचनका येथें किंवा पुरीकाचनका येथें होती. नाचणा येथें हल्ली वाकाटक व भारशिव घराण्यांसंबंधीं शिलालेख, नाणीं व ताम्रपट उपलब्ध झाले आहेत. त्याचा विचार करतां नाचणा म्हणजे पुरीकाचनका असावें, असें दिसतें.

नाचणा हें ठिकाण पन्ना शहराच्या ईशान्येस २५ मैलांवर असलेल्या गंज शहराच्या पश्चिमेस दोन मैलांवर आहे. या पुरीकाचनका येथें राज्य करणाऱ्या नागराजांनीं आपणास भारशिव असें नांव घेतलें व पुढें भारशिव घराणें, भारशिव घराण्यांतील भवनागाच्या मुलीचा वाकाटकांच्या गौतमीपुत्र नांवाच्या राजकुमाराशीं विवाह होऊन वाकाटक वंशांत विलीन झालें. वाकाटक घराण्याचा संस्थापक विंध्यशक्ति हा मूळचा वागाट नांवाच्या गांवचा राहणारा विष्णुवृद्धगोत्री ब्राह्मण. वागाट अथवा वाकाट हें गांवहि बुंदेलखंडांतील ओर्च्छा संस्थानांत झांशी जिल्ह्यांतील चिरगांवच्या पूर्वेस ६ मैलांवर आहे. हें शहर प्राचीन आहे कारण त्याचा अमरावती येथील ख्रिस्तपूर्व १५० मधील शिलालेखांत उल्लेख आहे. किलकिला नांवाची नदीहि पन्ना नांवाच्या सुप्रसिद्ध ठिकाणाजवळ सत्ना ते पन्ना रस्त्यावर आहे. आजहि ही नदी याच नांवानें ओळखली जात आहे. त्या नदीवर स. १८७० मध्यें बांधलेल्या पुलावर 'किलकिलानदी' अशी पाटी लाविली आहे. वागाट, पद्मावती वगैरे गांवें ज्या प्रदेशांत आहेत त्याच प्रदेशांतही किलकिला नांवाची नदी आहे. व कोशला, मेकला वगैरे प्रांतिक नांवांची उत्पत्ति लक्षांत घेतां पूर्वी नाचणा, पद्मावती व वागाट हीं भारशिव व वाकाटक राजवंशाशीं संबंध असलेलीं गांवें ज्या प्रदेशांत आहेत त्या प्रदेशास किलकिला या नदीवरून पडलेल्या नांवानें ओळखीत असावे. या विचारसरणीस, पुराणांतरीं, भारशिव व वाकाटक घराण्यांतील राजांचा उल्लेख किलकिला वंशांतील राजे म्हणून आला असल्यानें व त्याच राजांचा उल्लेख 'विदिशा नागाः' असाहि आला असल्यानें बळकटी येते. वाकाटक घराण्याच्या मूळ पुरुषाचें विंध्यशक्ति हें नांवहि कर्तृत्वदर्शक आहे. या ब्राह्मण सेनापतीनें नागराजे आपल्या पडत्या काळांत पद्मावतीहून विंध्याद्रीचे आश्रयास गेले असतां विंध्याद्रीच्या सभोंवतालच्या प्रदेशावर आपली सत्ता टिकविण्यास व वाढविण्यास भारशिव राजांना मदत केली तिचें निदर्शक आहे. मध्यप्रांतांत सांपडलेल्या ताम्रपटावरून त्या भागांतील 'नागपूर' हें नांव पुरातन असल्याचें दिसतें व म्हणून त्या प्रांतांत नागराजांची सत्ता असल्याचेंहि उघड होतें.

भारतीय राजे हे शिवभक्त असून शिवभक्तिदर्शक असें हें नांव त्यांनीं सहेतुक घेतलें असावें. त्यांच्या नाण्यांवर नागवंशीय राजांचे राजचिन्हांपैकीं ताडाचें झाड व फणा पसरलेला नाग असून शिवाय गंगा-यमुनेच्या मूर्ति राजाला मूर्धाभिषेक करीत असलेल्या दाखविलेल्या असतात. त्यांचीं नांवेंहि नवनाग, वीरसेननाग, हयनाग, त्रयनाग, बर्हिणनाग अशीं असून त्यांचा उल्लेख खालीलप्रमाणें आढळतोः—"अंशभारसन्निवेशितशिवलिंगोद्वहनशिवसुपरितुष्टा समुत्पादितराजवंशानां पराक्रमाधिगतभागीरथ्यामलजलमूर्धाभिषिक्तानां दशाश्वमेधावभृतस्नानानां भारशिवानाम्" असें वर्णन असलेल्या भारशिव राजांचाच उल्लेख पुराणामध्यें 'किलकिलानृपाः' असा येत असल्यामुळें भारशिव राजे म्हणजेच किलकिला राजे

व नागवंशीय राजे असल्याविषयीं संशय राहत नाहीं. भारशिव घराण्यांतील राजांना 'नवनाग' असेंहि पुराणांत म्हटलें आहे व असें म्हणण्याचा हेतु असा कीं, त्यांनीं नागराजांची परंपरा पुनरुज्जीवित केली, म्हणून ते नवनाग होत. भारशिव व वाकाटक सम्राट् आपल्या मुलांच्या व नातेवाइकांच्या साम्राज्यांतील प्रांतांवर नेमणुका करून त्यांस त्यांच्या ताब्यांत दिलेल्या प्रांताचा राज्यकारभार स्वतंत्रपणें पाहण्यास पूर्ण स्वातंत्र्य देत. त्यामुळें घराण्याच्या अनेक शाखा निर्माण होऊन विदिशा नागराज घराण्यांचे अथवा किलकिला राजवंशांतील राजे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजांचे अनेक राजवंश निर्माण झाले. भारशिव राजे हे सम्राट् असून त्याच राजवंशापासून उत्पन्न झालेल्या शाखांतील राजे मांडलिक पण स्वतंत्र राजे म्हणून निरनिराळ्या प्रांतांचा राज्यकारभार पाहत. अशा शाखांपैकीं, पद्मावती व मथुरा येथील शाखा सुप्रसिद्ध आहेत. या शाखांना स्वतंत्र नांवेंहि देण्यांत आलीं होतीं. पद्मावतीच्या शाखेला टांकवश असें म्हणत व मथुरेच्या शाखेस यदुवंश असें म्हणत. एकाच राजवंशांतील शाखांस अशीं दोन भिन्न नांवें देऊन भारशिव राजांनीं त्यांचें राजघराणें हें मूळचें नागवंशीय असून त्यांची जन्मभूमि पंजाबांतील टंक देश असल्याचा ऐतिहासिक पुरावा निर्माण करून ठेविला आहे. यावरून असें दिसून येईल कीं, किलकिलाराजवंश हा नागवंशोद्भव असून त्याची जन्मभूमि टंक देश होय. त्यांनीं बुंदेलखंडांत अथवा विदिशा प्रांतांत पद्मावती येथें आपलें राज्य स्थापिलें व कुशान राजसत्तेच्या काळांत विंध्याद्रिपर्वताचे आश्रयास चणका येथें राज्य स्थापून कुशान साम्राज्य हळुहळू खिळखिळें करून पुन्हां नागराजांचें राज्य सर्व आर्यावर्तांत स्थापन केलें. पुराणांत 'नवनागाः पद्मावत्यां कान्तिपूर्यां मथुरायाम्' असा जो उल्लेख येतो त्याचें कारणहि असें कीं, या घराण्यांतील शाखांच्या राजधान्या मथुरा, पद्मावती व कान्तिपुरी येथें होत्या. या राजघराण्यांतील राजांनीं केलेल्या दशाश्वमेधाचा स्मृत्यवशेष काशींतील 'दशाश्वमेधघाट' या नांवांत व ते आपणास राज्याभिषेक काशीस करीत असल्याचा दाखला हल्लीं हिंदु युनिव्हर्सिटी ज्या ठिकाणीं आहे त्या काशीच्या भागास नागव म्हणतात यांत आढळतो. भारशिवांचा काल त्यांचीं नाणीं, शिलालेख, ताम्रपट यांवरून स. १५० ते २८४ असल्याचें सिद्ध झालें आहे. ज्या वाकाटक घराण्याच्या साम्राज्यांत भारशिव घराण्याचें साम्राज्य विलीन झालें त्या वाकाटकांचें साम्राज्य हिंदुस्थानांत स. २८४ ते ३४८ पर्यंत होतें व त्या घराण्यांतील राजे स. ३४८ ते ५५० पर्यंत राज्य करीत असल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

किलकिला राजांपैकीं भारशिव राजे हे क्षत्रिय होते व वाकाटक मूळचे ब्राह्मण. वाकाटकांच्या गौतमीपुत्र नांवाच्या राजकुमाराचें लग्न भारशिव घराण्यांतील मुलीशीं झाल्यावर वाकाटकांकडे सम्राट्पद आलें. भारशिवांनीं विंध्यपर्वताचे पायथ्यापासून गंगा-यमुनेच्या दुआबापर्यंत आपला राज्यविस्तार केला, परंतु वाकाटकांनीं मात्र दक्षिण हिंदुस्थानांत आपलें साम्राज्य स्थापन केल्याशिवाय वायव्येकडून येणाऱ्या परचक्रास तोंड देणें कठीण पडतें हें ओळखून दक्षिण हिंदुस्थानांतहि आपलें साम्राज्य स्थापिलें. गुप्त घराण्यांतील चंद्रगुप्त (२ रा) विक्रमादित्याची प्रभावती नांवाची मुलगी वाकाटकांच्या पृथ्विसेनाच्या रुद्रसेन नांवाच्या कुमारास दिली व तदनंतर या प्रभावतीनेंच आपलीं मुलें लहान असे तों राज्यकारभार पाहिला. गुप्त घराण्याशीं हा लग्नसंबंध झाल्यावर वाकाटक राजघराणें मागें पडलें व गुप्तांचे साम्राज्याचा विस्तार झाला. अशा प्रकारें 'किलकिला नृपाः' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भारशिव व वाकाटक राजांनीं प्राचीन नागराजवंशाची परंपरा पुनरुज्जीवित करून गुप्त साम्राज्याचा उदय होईतों ती टिकविली व तिची वाढ आणि प्रसारहि केला. या किलकिला राजांचा इतिहास उपलब्ध होण्यापूर्वी आंध्र व कुशान साम्राज्यें नष्ट झाल्यावर गुप्तांच्या साम्राज्याची प्रस्थापना होईतों हिंदुस्थानांत सर्व हिंदुस्थानावर सत्ता असलेली साम्राज्यें नव्हतीं, असें व्हिन्सेंट स्मिथ वगैरे इतिहासकारांस वाटत असे. हें मत आतां असिद्ध ठरलें आहे. भारशिव राजांनीं पुनरुज्जीवित केलेली नागराजांची साम्राज्यपरंपरा वाकाटक राजांनीं वाढवून अखिल हिंदुस्थान आपल्या साम्राज्यांत समाविष्ट केलें व त्यामुळेंच पुढें गुप्त घराण्यास साम्राज्यस्थापन करण्यास फार प्रयास पडले नाहींत. किलकिला राजवंशाच्या साम्राज्याचा वारसाच गुप्त घराण्याकडे गेला. गुप्त घराण्यांतील राजांनीं नागराज घराण्यांतील मुलींशीं विवाह केले असल्याचे दाखले उपलब्ध आहेत. प्रभावती गुप्ताची आई कुबेरनागा ही चंद्रगुप्त (२ रा) याची मुख्य राणी होती. हिंदु राजवटीचा इतिहास अशा प्रकारें गुप्त घराण्याच्या साम्राज्यकालापर्यंत अत्रुटित आहे.

किलकिला राजवंशाच्या राजवटींत संस्कृत भाषेला प्रोत्साहन मिळून ती राजभाषा झाली. या वंशाचे शिलालेख, ताम्रपट, उच्च संस्कृत भाषेंत आहेत. संस्कृत

वाङ्मयाची वाढ झाल्याचेहि दाखले आहेत. नागरी लिपीहि याच कालांत प्रचारांत आली. शिल्प व चित्रकला यांची सुधारणा झाली. सुप्रसिद्ध अजिंठ्याचीं लेणीं, भूमारा येथील देऊळ, नाचणा येथील शिल्प, हीं किलकिला राजांचीं स्मारकेंच आहेत.

यांच्या शिल्पाचे विशेष, शिखरें, मखरकमान, नागप्रतिमा, गंगा व यमुना यांच्या मूर्ति वगैरे अनेक असून या शिल्पास 'नागरशिल्प' असेंच मानसार नांवाच्या गुप्तकालांतील ग्रंथांत म्हटलें आहे.

या नाग संस्कृतीचीं प्रात्यक्षिकें अलीकडे यमुनेच्या कांठीं अलाहाबादपासून १० मैलांवर असलेल्या उत्खनित भिता नांवाच्या गांवीं उपलब्ध झालीं आहेत. सहजाति या नांवानें चेदी देशाच्या द्वारावर एक शहर होतें तें सरकारी पुराणवस्तुसंशोधन खात्यानें जमीन उकरून उघडें केलें आहे. या ठिकाणीं वाकाटकांच्या मुद्रा, नाणीं, नाणीं पाडण्याच्या मुशी व घरगुती आणि सार्वजनिक उपयोगांतील अनेक वस्तु सांपडल्या आहेत. त्यावरून तत्कालीन संस्कृतीची योग्य कल्पना करतां येते. ( जयस्वाल-हिस्टरी ऑफ इंडिया ).

**किलपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं त्र्याहत्तरावा सिद्ध होय. हा राजकुमार जातीचा. प्रहरशहर यांचें वसतिस्थान होय. याचा दोहाचार्यगीतिकादृष्टि ( तं. ४८।३५ ) हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

**किशनचंद**—हा दिल्लीचा राहणारा असून कवि होता. काव्यांत यानें आपलें नांव इखलास असें दिलें आहे. याच्या बापाचें नांव अचलदास असून हा जातीनें खत्री होय. याच्या घरीं विद्वानांच्या नेहमीं बैठकी भरत असत. यानें 'हमेश बहार' नांवाचा एक चरित्र-ग्रंथ लिहिला आहे व त्यांत मुहम्मदशहापर्यंतच्या कारकीर्दींत झालेल्या सुमारें २०० कवींचीं अकारविल्हे चरित्रें दिलीं आहेत. याचीं इखलासखान अगर इखलासकेश अशीं नांवें आहेत. फार्शीत हा निष्णात असून अलमगीरच्या हाताखालीं नोकर होता. त्यानेंच यास वरील पदवी दिली. पुढें फर्रुकसियरनें यास सातहजारी सरदार बनविलें. यानें या शहाची 'बादशहानामा' या नांवाची बखर लिहिली आहे ( बील ).

**किशोरी**—हिंदी कवि. हे अयोध्येंतील बैरागी असून स.१७९७ पर्यंत होते. यांनीं भक्तिपर अनेक कवनें लिहिलीं असून 'रामचरित्रसंबोधिनी' नांवाचें काव्य लिहिलें. याखेरीज यानें अनेक ग्रंथ रचिले. आंदोलरहस्यदीपिका, तुलसीदासचरित्र, सारचंद्रिका, देहावली वगैरे बरेच ग्रंथ यांनीं रचिले आहेत.

**कीर्टिंग कर्नल**—( स. १७७५ ) हा एक इंग्रज सेनापति होय.

नापारचे लढाईत राघोबादादाची अगदीं गाळण उडाली, तेव्हां राघोबादादा सुरतेस इंग्रजांच्या आश्रयास गेला. त्या वेळीं मुंबईहून इंग्रजांकडून कर्नल कीटिंग हा फौज घेऊन दादाचे मदतीस आला ( स. १७७५ ). दादांच्या अव्यवस्थितपणामुळें कर्नल कीटिंगच्या हातून व्हावा तसा उद्योग झाला नाहीं. दादाची फौज पगार नसल्यानें बिथरली, तेव्हां कीटिंगनें त्यास कांहीं रक्कम कर्जाऊ दिली. त्याबद्दल मुंबईहून यास ठपका आला. तसेंच फत्तेसिंगास आपल्या बाजूस वळविण्याची खटपट यानें केली ती याच्याच गळ्यांत आली. पुढें मुंबईकराच्या हुकुमावरून यानें हरिपंतास लिहिलें कीं, 'आतां लढा नाहीं. आम्ही दादाचा पक्ष सोडतों.' शिवाय रघुनाथरावाचें व कीटिंगचें चांगलें जुळत नव्हतें ( म. रि. उत्तर वि. १ ला ).

**कीतू**—( स. ११६२-८१ ) याचें नांव कीतपाल चौहान. हा जोधपूर राज्यांतील नाडौलचा होता. हा मेवाडचा मांडलिक असे. हा आल्हणदेव चौहानाचा तिसरा पुत्र होय. यानें आपल्या बाहुबलानें जालोरच्या परमारांचें राज्य घेतलें व चौहानाच्या सोनगरा येथील शाखेचा मूळ पुरुष व स्वतंत्र राजा झाला. सिबाणे (जोधपूर ) येथील किल्लाहि परमारांकडून यानें जिंकला होता. चौहानाच्या शिलालेखांत याचें नांव कीर्तिपाल चौहान असें सांपडत असलें ( एपि. इंडि. ९·६९ ) तरी हा कीतू या नांवानें जुन्या ख्यातांत व काव्यांत राजपुतान्यांत प्रसिद्ध आहे. याचें एक दानपत्र वि. सं. १२१८ ( स. ११३१ ) मधील मिळालें आहे (एपि. इंडि. भा. ९, पृ. ७०). त्यांत याला बापाकडून बारा गांव मिळाले आहेत. वि. सं. १२३९ ( स. ११८२ ) मधील शिलालेखांत याचा मुलगा समरसिंह गादीवर आल्याचा निर्देश आहे. त्यावरून हा त्यापूर्वी मेला असावा.

**कीर्ति**—( धर्मकीर्ति पाहा ).

**कीर्तिदेव**—( कीर्तिवर्मा कदंब पाहा ).

**२**. हा हानगळ कदंबांपैकीं तैलमचा मुलगा.

**कीर्तिपाळ चौहान**—( कीतू पाहा ).

**कीर्तिभूषण पांड्य**—हा वरगुण पांड्यामागून गादीवर आला.

**कीर्तिराज सोलंकी**—लाट देशच्या सोलंकी घराण्यापैकीं गोग्गि राजाचा पुत्र. याच्या वेळचें एक दानपत्र शा. श. ९४० ( वि. सं. १०७५, स. १०१८ ) चें मिळालें आहे ( डॉ. कीलहार्न संगृहीत इन्स्क्रिप्शन्स्

ऑफ नॉर्दर्न इंडिया नं. ३५४, पृ. ५० ). याचा पुत्र वत्सराज.

**कीर्तिवर्मन्**—( स. ११२५ ) यानें कानडा गोवैद्यक नांवाचा पद्यग्रंथ केला. त्यांत गुरांच्या रोगांची माहिती आहे.

**कीर्तिवर्मा कदंब**—हा हानगळ येथील कदंब घराण्यांतील पहिल्या शांतिवर्म्याचा पुत्र.

**२.** ( स. १०६८-७७ ) हा हानगलच्या कदंब घराण्यांतील पहिल्या तैलाचा मुलगा. याला कीर्तिदेव पहिला किंवा तैलणसिंह असेंहि म्हणत. चावुंडला देवी ही याची माता होय. हा सहाव्या विक्रमादित्य प. चालुक्याचा जहागिरदार होय.

**कीर्तिवर्मा गुहिलोत**—मेवाडच्या गादीवर हा नरवर्म्यानंतर आला. याच्यानंतर योगराज गादीवर आला. हा व नरवर्मा भाऊ असावेत, असें कुंभलगडच्या शिलालेखावरून दिसतें. त्या अप्रसिद्ध लेखांत यशोवर्मा असें नांव आहे. नांवांतहि कीर्तीबद्दल यश शब्द घालणें शक्य आहे ( रा. इ. पा. ४४३ ).

**कीर्तिवर्मा चंदेल्ल**—( स. १०६०-११०० ) देववर्म्याचा भाऊ कीर्तिवर्मा याची कारकीर्द ह्याच्या भावाच्या पश्चात् सुरू झाली. याच्या पित्याचें नांव विजयपाळ. यानें देवगड नांवाचा प्रांत आपल्या राज्यास जोडला व तेथें कीर्तिगिरी नांवाचा किल्ला बांधला. जबलपूर जिल्ह्यांतील बलिहि शहर यानेंच वसविलें अशी दंतकथा आहे. यानें कर्ण कलचुरीचें राज्य घेतलें. याच्यानंतर याचा मुलगा सल्लक्षणवर्मन् गादीवर आला.

**कीर्तिवर्मा चालुक्य**—( स. ५५७-९७ ) हा पश्चिम चालुक्यांपैकीं पहिल्या पुलकेशीचा वडील पुत्र. ऐहोळ येथील शिलालेखांत याला नळ, मौर्य, कदम्ब यांची काळरात्र असें म्हटलें आहे. यानें कदम्बांपैकीं कृष्णवर्मन् २ रा याचें राज्य घेतलें. याला पृथ्वीवल्लभ म्हणत. यानें अंग, वंग, कलिंग, मगध, केरळ, मद्रक, गंग, मूषक वगैरे देशांवर स्वाऱ्या केल्या. याच्यानंतर याचा धाकटा भाऊ मंगलीश गादीवर आला. याला पुलकेशिन् दुसरा, हा व आणखी दोन मुलगे होते.

**२.** ( स. ७४७-७५७ ) हा पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या विक्रमादित्याचा मुलगा. यानें पल्लवांवर जय मिळविल्याचा उल्लेख आहे. पण लवकरच याच्या राज्यांत बंडाळी झाली; व बाजूच्या दंतिदुर्ग राष्ट्रकूटानें स्वारी करून याचें राज्य बुडविलें. या घराण्याचें वर्चस्व या वेळीं कमी झालें असून राष्ट्रकूटांचें वर्चस्व वाढलें होतें.

**३.** पश्चिम चालुक्यांपैकीं पहिल्या भीमानंतरचा राजा. याचा फ्लीटनें उल्लेख केला नाहीं.

**कीश्वरखान**—हा दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाचा दिवाण असदखानाचा पुत्र ( अली व इब्राहीम आदिलशाह पाहा ). यानें कामीलखानाचा खून करून दिवाणगिरी मिळविली च चांदबिबीसहि कैद केलें. शेवटी यालाहि कंटाळून एखलासखान या हबशी सरदारानें याचा खून केला.

**कुईचुंग**—एक चिनी प्रवासी. हा समुद्रमार्गे सिंहलद्वीपांत आला व तेथून हा भारतवर्षांत आला. तीर्थयात्रा करीत राजगृहाला पोंचला व तेथें वेणुवनांत राहिला. तेथेंच रोगी होऊन मेला.

**कुकुरिपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चवतिसावा सिद्ध होय. जात ब्राह्मण. देश कपिलवस्तु. हे मीनपा, चर्पटीपा व मणिभद्र यांचे गुरु होत. याच्या उपलब्ध सोळा ग्रंथांपैकीं पुढील ग्रंथ हिंदींत आहेतः तत्त्वसुखभावनानुसारियोगभावनोपदेश ( तं. ४८।६५ ), स्रवपरिच्छेदन ( तं. ४८।६९ ). हा हिंदी कवि होता. याच्या कविता उत्कृष्ट असून सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

**कुचिपा**—यालाच कूसूलि असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं पस्तिसावा सिद्ध होय. जात शूद्र. देश कपिलवस्तु. हा मीनपाचा गुरु.

**कुतबन**—( स. १४९२ ) एक हिंदी कवि. हा शेरशाहाचा पिता असून, हुसेनशाहचा आश्रित होता. हा चिश्ती वंशांतील शेख बुर्हानचा शिष्य होय.

यानें 'मृगावती' नांवाची एक कहाणी लिहिली. तींमध्यें चंद्रनगरचा राजा गणपतीदेव याचा मुलगा आणि कंचनपूरच्या राजाची मुलगी मृगावती यांच्या प्रेमकथेचें वर्णन आहे. हें काव्य सुंदर व रहस्यमय झालेलें आहे.

**कुत्बुद्दीन**—( स. १४५१-१४५९ ) गुजराथचा मुहंमदशहा मरण पावल्यावर त्याचा पुत्र कुत्बुद्दीन गादीवर आला. माळव्याचा मुहंमद खल्जी यानें यावर स्वारी करून याचा पराभव केला. पुढें उभयतांनीं तह करून दोघांनीं मिळून मुसलमानी धर्म वाढविण्याची खटपट करण्याचें ठरविलें. परंतु हा ठराव अमलांत आला नाहीं. मेवाडचा राणा कुंभ हा या वेळीं हिंदु राजांत अत्यंत शूर व प्रभावशाली होता. तरी सुद्धां त्यांस बुडविण्यास बरेच मुसलमान टपून होते. नागोर येथें यानें कुंभ राण्याचा सन १४५८ मध्यें पराभव केला असें म्हणतात. नंतर हा त्याच वर्षी मरण पावला ( मे १४५९ ).

**कुत्बुद्दीन ऐबक गुलाम**—( स. ११९१-१२१० ) दिल्लीचा बादशाह. याला लहानपणीं कोणीतरी निशापूरला पळवून नेलें आणि गुलाम म्हणून विकलें. जात तुर्क. तेथें याला शिक्षण वगैरे चांगलें मिळालें. पण तो मालक वारल्यावर याला पुनः गुलाम म्हणून विकलें. तेथें यास विकत घेणारानें शहाबुद्दीन घोरी यास नजर केलें. त्याची यावर मर्जी बसून हा सरदार झाला. पृथ्वीराज चौहाणास जिंकून शहाबुद्दीन परत निघाला तेव्हां त्यानें यास हिंदुस्थानांत जिंकलेल्या दिल्लीपर्यंतच्या मुलखाचा सुभेदार नेमलें; आणि सर्वाधिकार याच्या स्वाधीन केले. यानें दुआब, कनोज, अजमीर, गुजराथ वगैरे प्रांत स्वाऱ्या करून आपल्या सत्तेखालीं आणले. याचा सरदार इख्त्यार उद्दीननें बिहार, तिरहुत, बंगाल हे प्रांत आपल्या सत्तेखालीं आणले. तेव्हां यानें दिल्ली जिंकली आणि आपली राजधानी गुहराम येथून दिल्लीस आणली ( स.११९३ ). १५ मार्च १२०६ रोजीं शहाबुद्दीन मेल्यावर यानें आपल्या सरदारांच्या अनुमतीनें स्वातंत्र्य जाहीर केलें. किरमान प्रांताचा अधिकारी ताजुद्दीन या विरोध करणाऱ्याचा यानें पराजय केला व गजनी लुटली (स.१२०९). पण विजयोत्सवांत गर्क असतां ताजुद्दीननें यावर हल्ला करून याला लाहोरकडे पळावयास लावलें. तेथें पोलो खेळत असतां हा पडला, यावर याचा घोडा पडला आणि त्याच्या खोगराचे खिळे याला लागून हा मेला ( नवं. १२१० ). हा न्यायी, उदार व राजकार्यकुशल होता. या विजयी पुरुषाची कीर्ति कुतुबमिनार व जुम्मामशीद हीं दिल्लीस अद्यापि सांगत आहेत. याच्याच कारकीर्दीत मुसलमानांची सत्ता हिंदुस्थानच्या इतर प्रांतांत शिरली व दिल्ली येथें स्थिर झाली.

**कुत्बुद्दीन कुत्बशाह**—कुत्बशाही घराण्यांतील सुलतान कुलीचा मुलगा. सुलतान कुलीचा खून होतांच याचा भाऊ जमशीद यानें याला पकडून याचे डोळे काढले.

**२.** ( हिंदाल ( काश्मीरचा ) पाहा ).

**कुत्बुद्दीन तुघ्लक**—हा दिल्लीच्या राजबातुघ्लकाचा पुत्र. याचा फीरुझ नांवाचा भाऊ दिल्लीच्या तख्तावर होता.

**कुत्बुद्दीन फीरुझशाह**—( स. १३४१ ) अलाउद्दीन उदौजीचा जांवई. मदुरा येथील स्वतंत्र राजा. जलालुद्दीन अहसनशाहा हा मदुरेचा सुभेदार असतां त्यानें स्वातंत्र्य जाहीर केलें. पांच वर्षांनंतर त्याचा खून करून अल्लाउद्दीन उदौजी नांवाचा मनुष्य गादीवर आला. तो पांड्य व केरळ येथील राजांशीं लढत असतां डोक्यांत बाण शिरून ठार झाला. तेव्हां हा त्याचा जांवई राजा झाला. पण ४० दिवस राज्य केल्यावर राज्यांत बंड झालें, त्यांत हा मारला गेला.

**कुत्बुद्दीन मुबारक खल्जी**—(मुबारकखल्जी पाहा).

**कुत्बुद्दीन लंगा**—( स. १४४५-६९ ) मुलतानच्या शेख यूसुफ कुरेशीचा हा सासरा.

स. १४४५ मध्यें यानें आपल्या जांवयास पकडून मुलतान येथें स्वतंत्रपणें राज्य सुरू केलें. याचें मूळ नांव रायसिन्हा ( सहर ) लंगा असें होतें. यानें स. १४६९ पर्यंत शांततेनें राज्य केलें. याच्यानंतर याचा मुलगा हुसेनशाहा हा मुलतानचे गादीवर आला ( मु. रि. १. ३३० ).

**कुत्बुद्दीन लोदी**—हा सुलतानशाह लोदीचा पुत्र. याला कुत्बुद्दीन असें केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत म्हटलें आहे.

**कुत्बुल्मुल्क**—( मलीक कुत्ब उल्मुल्क पाहा ).

**कुदक्रो नेदूम शेरम आदम**—( स. १२५ ) चेर घराण्यांतील एक राजा. पेरुनार किल्लीशीं लढत असतां दोघेहि मेले.

**कुनाल मौर्य**—(ख्रि. पू.२३२-२२४) हा मौर्यवंशांतील अशोकाचा पुत्र. वायुपुराणांत कुनाल असें नांव दिलें असलें तरी ब्रह्मांडपुराणांत हें नांव कुशाल असें आढळतें. कदाचित् ही वाचनाची चूक असावी. विष्णु व भागवत पुराणांत याला सुयशस् असें म्हटलें आहे. सुयशस् ही याची पदवी असावी. श्री. जयस्वाल यांनीं असेंच मानलें आहे; व इतर संशोधकांनाहि ही गोष्ट मानणें भाग आहे.

बौद्ध व जैन यांच्या वाङ्मयांत आलेल्या माहितीवरून हा आंधळा होता असें दिसतें. हा अत्यंत रूपवान् होता. याची सावत्र आई तिष्यरक्षिता हिनें अशोकाला एका दुखण्यांतून बरें करून अत्यंत खुष केलें. अशोकानें तिला वर म्हणून सात दिवस राज्याची सर्व सत्ता दिली. तिष्यरक्षितेची प्रेमयाचना यानें नाकारल्यामुळें याच्यावर तिचा फार राग होता. तिनें तक्षशिलेच्या अधिकाऱ्याला कुनालाचे डोळे काढण्याची आज्ञा केली. राजा अशोकाची मुद्रा असलेली ही आज्ञा तेथें पोंचतांच लोक आश्चर्यचकित झाले. पण कुनालानें अशोकाची आज्ञा म्हणून आपले डोळे आपणच काढून टाकले ( दिव्यावदान पृ. ४००-४१० ). त्यामुळें हा राज्यकारभार पाहण्यास असमर्थ होता. म्हणूनच दिव्यावदान व जैनसाहित्य यांत

हा राजा झाल्याचा निर्देश नाहीं. याचा मुलगा संप्रति किंवा संपदि अशोकाच्या वेळीं युवराजपदावर होताच. तोच अशोकानंतर राज्यपदावर आलेला दिसतो.

नंतर एक तंतुवाद्य घेऊन हा भटकत भटकत पाटलीपुत्र येथें आला. तेथें यानें आपलें तंतुवाद्य वाजवून आपली ओळख राजास पटवून दिली. तेव्हां अशोकानें हा आपला मुलगा आहे हें ओळखून याची विचारपूस केली. यानें घडलेली सर्व हकीगत सांगितली. त्या वेळीं अशोकास आपल्या राणीचा भयंकर राग येऊन त्यानें, तिला एका खोलींत कोंडून त्या खोलीस आग लावून देण्याची आज्ञा केली. परंतु तसें यानें करूं दिलें नाहीं. तेव्हां अशोकानें आपली पुढीलप्रमाणें इच्छा प्रदर्शित केली, 'जर माझें प्रेम माझ्या मुलावर आणि बायकोवर सारखेंच असेल व कोणत्याहि प्रकारचा द्वेषभाव नसेल, तर माझा मुलगा कुनाल याचे डोळे पूर्ववत् होतील.' वरील उद्गार बाहेरपडतां क्षणींच कुनालचे डोळे पूर्ववत् झाले.

याच्या वेळीं अशोकाचा पुत्र जालौक यानें काश्मीरांत स्वतःचें वेगळें राज्य स्थापन केलें आणि आंध्राचा सीमुक याच वेळीं स्वतंत्र झाला. ग्रीक लोकांचे हल्लेहि याच वेळीं सुरू होते. त्यावरून या वेळीं अशोकाच्या विशाल राज्याला उतरती कळा लागली असून मांडलिक स्वतंत्र होऊं लागले होते.

कुनाल हा गादीवर बसला नाहीं. कुनालचा मुलगा विगताशोक हा अशोकानंतर गादीवर आला ( I. H. Q. Vol. VII, No. 1, p. 156–158 ).

तक्षशिला येथें उत्खनन करण्यांत आलें आहे. तेथें एक आभूषण ( दागिना ) सांपडलें आहे. ह्यूएन्संगनें तेथें पाहिलेल्या कुनालस्तूपाचें मार्शलनें विस्तृत वर्णन केलें आहे. पण त्याच्या मतें हा स्तूप स. च्या तिसऱ्या शतकांत बनला असला पाहिजे. मौर्यकालांतील हा स्तूप नाहीं असें त्यानें ठरविलें आहे ( John Marshall–A Guide to Taxila. See the 5th Chapter an 'Stupa of Kunal' ). प्राचीन आख्यायिका अशी आहे कीं, अशोकाच्या आज्ञेनें त्याचा पुत्र कुनाल यास ज्या ठिकाणीं आंधळें केलें त्या ठिकाणीं हा स्तूप बांधला. पण हा स्तूप अशोकानें बांधलेला नाहीं. अशोकानें बांधलेल्या स्तूपाच्या जागीं पुढें केव्हांतरी हा स्तूप बांधला गेला असावा.

**कुबेरभट्ट**—प्रसिद्ध बाण कवीचा पणजा चित्रबाहूचा आजा. यास अर्थपती नांवाचा मुलगा होता.

**कुब्ज विष्णुवर्धन चालुक्य**—पूर्वचालुक्य घराण्याचा संस्थापक ( विष्णुवर्धन पाहा ).

**कुमरिपा**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं त्रेसष्टावा सिद्ध होय. हा जातीनें कृष्णकृतवाणिक असून जोमन श्रीदेशचा राहणारा होता.

**कुमारगुप्त**—(स. ४१३–४५५) गुप्तवंशांतील दुसऱ्या चंद्रगुप्ताचा मुलगा. याच्या मातेचें नांव ध्रुवादेवी.

शिलालेख व नाणीं यांवरून हा मोठा राजा होता, असें दिसतें. याच्या कारकीर्दींत साम्राज्याचा विस्तार झाला नसावा. मात्र यानें अश्वमेधयज्ञ केला होता त्यावरून यानें नवीन मुलखहि मिळविला असला पाहिजे. स. ४५० च्या सुमारास हूण लोकांनीं स्वाऱ्या केल्यामुळें हें गुप्तांचें राज्य खिळखिळें झालें. याला महेंद्र म्हणत असत.

यानें महाराजाधिराज, परमराजाधिराज, महेंद्र, अजितमहेन्द्र, महेंद्रसिंह आणि महेन्द्रादित्य इत्यादि पदव्या धारण केल्या होत्या. यानें अश्वमेधयज्ञ केला होता. त्या यज्ञाकरितां पाडलेलीं याचीं सोन्याचीं नाणीं उपलब्ध झालीं आहेत. आपल्या पित्याप्रमाणें हाहि परमभागवत ( वैष्णव ) होता. याच्या कालचे दहा शिलालेख मिळाले आहेत. त्यांपैकीं पांच गुप्तसंवत् ९६–१२९ पर्यंतचे आहेत ( स. ४१५–४४८ ) व एक मालव ( विक्रम ) संवत् ४९३ ( स. ४३६ ) चा आहे ( फ्लीट गु. इं. लेखसंख्या १०; २१; १८ ). याचीं सोनें, चांदी व तांब्याचीं पुष्कळ नाणीं मिळालीं आहेत. त्यांपैकीं कांहींवर संवत्हि आहे. त्यांत गुप्तसंवत् ११९–१३६ ( स. ४३८–४५५ ) पर्यंतचीं आहेत. स. ४५५ मध्यें याच्या राज्यावर हूणांचा हल्ला झाला, त्यांत हा मारला गेला. याला घटोत्कच, स्कंदगुप्त व पुरगुप्त असे तीन पुत्र होते. घटोत्कचाच्या आईच्या नांवाचा शोध लागला नाहीं. स्कंदगुप्त आणि पुरगुप्त यांच्या आईचें नांव अनंतदेवी. अनंतदेवी ही बनबासींच्या कदंब घराण्यांतील ककुस्थवर्मनाची मुलगी असावी. कुमारगुप्ताच्या हयातींत घटोत्कच हा गुप्तसंवत् ११६ ( स. ४३५ ) मध्यें माळव्याचा अधिकारी होता, असें कुमारगुप्ताच्या तुमैन ( तुंबवन ) गांवच्या ( ग्वाल्हेर राज्यांतील) शिलालेखावरून दिसून येतें ( इंडि. अँटि. ४९. ११४–११५ ). याच्यानंतर स्कंदगुप्त गादीवर आला.

**२.** ( स. ४७२–७७ ) हा गुप्तवंशांतील स्कंदगुप्ताचा मुलगा असावा. हा नरसिंहगुप्तानंतर गादीवर आला. याचा एक शिलालेख सारनाथ ( काशीजवळ ) येथें मिळालेल्या मूर्तीच्या खालीं आढळतो. तो गुप्तसं. १५४ म्हणजे स.

४७३ मधील आहे ( भारतीय प्राचीन लिपिमाला पृ. १७४ टिपण ६ ). यानें हूणांशीं लढाया केल्या. कारण त्यांच्या सारख्या स्वाऱ्या चालू होत्या.

**३.** ( स. ५३०-५६४ ) गुप्त घराण्यांतील नरसिंह-गुप्ताचा हा मुलगा होय.

**४.** गाळव्याचा गुप्त राजा.

**कुमारजीव**—( स. ३८३-४१५ ) एक बौद्ध ग्रंथकार व भिक्षु. वसुबंधूचा हा समकालीन होता, असें म्हणतात. यानें स. ४०४ च्या सुमारास शतशास्त्र आणि बोधिचित्तोत्पादनशास्त्र या दोन ग्रंथांचें भाषांतर केलें. मात्र दंतकथेच्या आधारें असें दिसतें कीं, त्याचा भाषांतरकर्ता वसुबंधु होता. परंतु तें खरें नाहीं असें विद्वानांचें मत आहे.

गुप्तकालांत ज्या वेळीं परदेशी धार्मिक मंडळें पाठविलीं जात होतीं त्या वेळीं याची नेमणूक चीनच्या धार्मिक-मंडळांत केली होती. स. ३८३ मध्यें हा हिंदुस्थानांतून चीनमध्यें गेला.

शिवाय ब्रह्मजालसूत्र, अश्वघोषाचा सूत्रालंकार, सद्धर्म-पुंडरीक, सुखावतीव्यूह, वज्रछेदिका, दशभूमिकविभाषा-शास्त्र, प्रज्ञापारमितासूत्रशास्त्र, माध्यमिकशास्त्र, वगैरे अनेक ग्रंथांचीं यानें चिनीमध्यें भाषांतरें केलीं.

हा कांहीं दिवस लुकाँग ह्याजवळ चीनमध्यें होता; व स. ४०२ ते ४१२ पर्यंत चिनीमध्यें भाषांतर केलें. याचा मृत्युकाल निश्चित नाहीं, पण स. ४१५ च्या सुमारास हा मेला असावा.

यानें नागार्जुन, अश्वघोष व आर्यदेव वगैरेंचीं चरित्रें लिहिलीं आहेत. आणि तीं सध्यां तिबेटमध्यें प्रसिद्ध आहेत ( विंटरनिझ-हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २ ).

**कुमारदास**—( स. ७००-५० ) 'जानकीहरण-' कर्ता कुमारदास हा स. ५१७-५२६ मध्यें ज्यानें राज्य केलें तो सिंहलद्वीपचा राजा असणें शक्य नाहीं. याचा काळ स. ७००-७५० हा असावा, असें प्रो० कीथ यांनीं अनेक प्रमाणांनीं दाखविलें आहे. कालिदास व कुमारदास यांच्या संबंधाची आख्यायिका विश्वासार्ह नाहीं ( कालिदास पाहा ). जानकीहरणांतील उतारे क्षेमेंद्रानें आपल्या औचित्यविचारचर्चेत घेतले आहेत ( C. C. ).

**कुमारदेवी**—ही लिच्छवी घराण्यांतील राजकन्या व गुप्त घराण्यांतील पहिल्या चंद्रगुप्ताची राणी. हिचें लग्न चंद्रगुप्ताशीं झाल्यामुळें तो जहागिरदार होता तो मोठा राज्यकर्ता बनला. चंद्रगुप्त हा खरा पाटलीपुत्रासारख्या लहानशा शहरचा राजा. पण तोच पुढें आपला राज्य-विस्तार वाढवूं शकला. त्याला हुंड्यामध्यें हें शहर मिळाल्याचें प्रसिद्ध आहे.

**२.** ही कनोजच्या गोविंदचंद्र गाहडवालाची पत्नी. ही देवरक्षिताला शंकरदेवीपासून झालेली कन्या होय हिचा एक अतिशय महत्त्वाचा लेख सारनाथ येथें उपलब्ध झाला आहे. त्यावरून पाल, राष्ट्रकूट व गाहडवाल यांचा शरीरसंबंध दिसून येतो. हिनें सारनाथ येथें अतिशय विशाल बौद्धमंदिर बांधलें होतें.

**कुमारधूर्जटि**—यानें कृष्णदेवरायविजय नांवाचें ऐतिहासिक काव्य लिहिलें आहे.

**कुमारपाल**—( स. ११४०-४२ ) बंगालच्या पाल राजांपैकीं रामपालाचा पुत्र. याचें नांव मागाहूनच्या एका लेखांत मिळतें. याचा मुलगा गोपाळ ( हिं. भा. अ. पा. ३४९ ) हा रामपालाच्या हयातींतच मेला ( हि. का. मार्च १९२९ ). हा याचा बाप गादीवर असतांनाच आसाममध्यें वैद्यदेव नांवाच्या एका हुशार प्रधानाच्या मदतीनें राज्य करीत असे ( V. Smith p. 416 ). हा इकडे आल्यावर कामदेव तिकडचा राजा झाला.

**कुमारपाल सोलंकी**—(स. ११४२-७३) गुजराथच्या सोलंकीवंशांतील कर्ण, कर्णाचा भाऊ क्षेमराज-देवप्रसाद-त्रिभुवनपाल असा याचा वंशसंबंध आहे. हा त्रिभुवनपालाचा पुत्र (सिद्धराज) जयसिंहास पुत्र नसल्यानें हा गादीवर आला ( बाहड व अर्णवराज चौहान पाहा ). जयसिंह याला मारण्यास टपला होता, त्यामुळें हा वेष बदलून हिंडत असे. त्यामुळें याचें राज्यावर येण्यापूर्वीचें आयुष्य खडतर गेलें. यानें अजमेरच्या आना (अर्णबराज) चौहानावर दोन स्वाऱ्या केल्या होत्या. त्यांपैकीं पहिली स्वारी वि. सं. १२०१ ( स. ११४४ ) च्या सुमारास झाली. तींत कुमारपालास विजय प्राप्त झाला होता, असें दिसत नाहीं. दुसरी स्वारी वि. सं. १२०९ ( स. ११५० ) मध्यें झाली तींत हा विजयी झाला. पहिल्या लढाईंत आबूचा विक्रमसिंह परमार आनाला सामील झाला म्हणून यानें त्यास कैद केलें व त्याचें राज्य त्याच्या भावाचा मुलगा यशोधवल यास दिलें ( ना. प्र. प. भा. ३, पृ. १७५ ). यानें माळव्याच्या बल्लाळ राजाला ठार केलें; व कोंकणच्या शिलाहारवंशी मल्लिकार्जुनावर दोन वेळां स्वारी केली. पहिल्या स्वारींत पराजय झाला पण दुसरींत जय मिलाला. त्या लढाईंत सोमेश्वर चौहानानें मल्लिकार्जुनाचें डोकें उडवलें. हा सोमेश्वर म्हणजे सिद्धराज जयसिंहाच्या मुलीचा मुलगा होय ( ना. प्र. प.

१. ३९९ ). हा मोठा प्रतापी आणि नीतिनिपुण होता. याच्या राज्याची मर्यादा लांबपर्यंत पसरली होती; व माळवा व राजपुताना यांचा बराच अंश याच्या ताब्यांत होता. जैन पंडित हेमचंद्रापासून यानें जैनधर्म स्वीकारला व जीवहिंसा आपल्या राज्यांत बंद केली होती. गुजराथच्या बाहेर माळवा व राजपुताना येथेंहि याचे कांहीं शिलालेख मिळाले आहेत. यानें वि. सं. ११९९-१२३० ( स. ११४२-७३ ) पर्यंत राज्य केलें. याचा सर्वांत वडील भाऊ महीपाल नांवाचा होता. याचा पुत्र अजयपाल याच्या मागें गादीवर बसला ( रा. इ. पा. २१८-२२० ). यानें अनहिलपट्टण येथें पार्श्वनाथाचें देऊळ बांधलें.

कुमारपालचरित नांवाचें प्राकृत भाषेंतील द्याश्रयमहाकाव्य हेमचंद्रानें लिहिलें आहे. त्यावर पूर्णकलशगणीनें रचलेल्या संस्कृत भाषेंतील टीकेसहित तें बॉंबे संस्कृत सीरीजमध्यें प्रसिद्ध झालें आहे. कुमारपालाचें चरित या काव्यांत वर्णिलें आहे. साधारणतः पाणिनीच्या व्याकरणास भट्टिकाव्य तसेंच हें संस्कृत व प्राकृत व्याकरणास होय. याच काव्याचे पहिले सर्ग शुद्ध संस्कृतमध्यें असून त्यांचा उपयोग हेमचंद्र व्याकरणाच्या पहिल्या सात अध्यायांत सांगितलेल्या संस्कृतभाषेच्या उदाहरण-प्रत्युदाहरणाकरितां केला आहे. शिवाय 'अथ प्राकृतम्' म्हणून हेमचंद्रानें संस्कृत व्याकरणाबरोबर प्राकृत व्याकरणाकरितां जो आठवा अध्याय लिहिला त्याचीं क्रमानें उदाहरणें, प्रत्युदाहरणें व मतान्तरोदाहरणें या काव्यांत ग्रथित केलीं आहेत म्हणून या काव्यास द्याश्रयकाव्य असें म्हणतात. पहिल्या वीस सर्गांवर अभयतिलकगणीची टीका आहे. अभयतिलक व पूर्णकलश हे जिनेश्वर सूरीचे शिष्य होत. शेवटल्या आठ सर्गांपैकीं पहिल्या सहांमध्यें याचा दिग्विजय आहे व शेवटच्या दोन सर्गांत श्रुतदेवी नांवाच्या देवतेचा यावर अनुग्रह आहे.

**कुमारमणिभट्ट**—हा एक हिंदी कवि होय. यानें वि. सं. १८०३ ( स. १७४५ ) मध्यें रसिकरसाल नांवाचा एक सुंदर रीतिग्रंथ लिहिला आहे. आपण हरिवल्लभाचे पुत्र आहोंत असा उल्लेख यानें आपल्या ग्रंथांत केला आहे. हा गोकुळचा राहणारा होता, असें शिवसिंहानें म्हटलें आहे.

**कुमारराज**—याची राजधानी कर्णसुवर्ण ( मुर्शिदाबाद ). हा आसामचा प्राचीन राजा होय. ह्युएनत्संगाच्या वेळीं कामरूप देशचा हा राजा होता. याला भास्करवर्मा असेंहि म्हणतात. हा हर्षाचा सहकारी मित्र असून याच्याविषयीं बाणभट्ट व ह्युएनत्संग यानें लिहून ठेवलेलीं वर्णनें तंतोतंत जुळतात.

ह्युएनत्संग म्हणतोः-"येथील गादीवरचा राजा ब्राह्मण असून नारायणदेवाचा वंशज आहे. याच्या वंशाकडे कामरूपाचें राज्य एक हजार पिढ्यांपासून चालत आहे. हा विद्येचा भोक्ता असल्यानें येथें लांबलांबचे लोक विद्याभ्यासासाठीं येतात. हा स्वतः बौद्धधर्मी नसला तरी बौद्धधर्मीयांना मान्यता देण्यांत येते."

याच्या बापाचें नांव सुस्थितवर्मा व जात क्षत्रिय होय, असें नांवावरून वाटतें. पण हा ब्राह्मण होता. कर्णसुवर्ण (मुर्शिदाबाद) येथील शशांक राजा मेल्यावर ( स. ६१९-नंतर ) तें राज्य हर्षानें याला दिलें ( डाक्टर रिव्ह्यू १९१३, म. भा. १ पा. ६३; हर्षचरित्र ).

**कुमारलब्ध**—याला कुमारलात असेंहि म्हणत. हा सुप्रसिद्ध बौद्ध पंडित होता. ह्युएनत्संगच्या मतें हा 'सौत्रांतिक' पंथाचा संस्थापक होय. हा मूळचा तक्षशिला येथील राहणारा. 'कल्पनामंडितिका' अथवा कल्पनालंकृतिका हा याचा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. अश्वघोषाचा म्हणून मानला गेलेला 'सूत्रालंकार' हा ग्रंथ वस्तुतः यानेंच लिहिला. वर उल्लेख केलेलाच तो ग्रंथ होय. या ग्रंथांत राजा कनिष्काचा प्राचीन राजा म्हणून उल्लेख सांपडतो. म्हणजे हा कनिष्कानंतर सुमारें २०० वर्षांनंतर झाला असावा. हा ग्रंथ संपूर्ण उपलब्ध नाहीं. परंतु याची भाषा शुद्ध संस्कृत असून व्याकरणाच्या चुकाहि थोड्या आहेत. फक्त मध्यें दोनच आर्या प्राकृतांत आढळतात.

पूर्वेस अश्वघोष, दक्षिणेस देव, पश्चिमेस नागार्जुन व उत्तरेस हा, असे समकालीन विद्वान् हिंदुस्थानांत होते. त्यांत हा श्रेष्ठ होता. हा दररोज कमींत कमी ३२ हजार अक्षरें लिहीत असे.

यानें अनेक शास्त्रांवर ग्रंथ लिहिले आहेत, असें दंतकथा म्हणून चिनी प्रवासी लिहितो ( विंटरनिट्झ-हिस्टरी ऑफ् संस्कृत लिटरेचर, भाग २ ).

**कुमार वाल्मीकि**—( १५०० सुमार ) कानडी कवि. ब्राह्मण.

ग्रंथ-रामायण. याचें रामायण तोरवे गांवीं लिहिल्यामुळें तोरवेरामायण या नांवानें प्रसिद्ध आहे. तसेंच महिरावणाच्या युद्धांसंबंधींहि प्रसिद्ध असलेला ग्रंथ याचाच असावा. यानें आपलें नांव नरहरी असें सांगितलें आहे. पण हा कुमार वाल्मीकि या पदवीदर्शक नांवानेंच विशेष

प्रसिद्ध आहे. याचें तोरवे हें गांव सोलापूर जिल्ह्यांतील असें म्हटलें असलें तरी तें विजापूरजवळचें असावें. कारण यानें उल्लेख केलेलें नरसिंहाचें देवस्थान तेथेंच आहे. नरसिंहाच्या देवळांत बसूनच यानें आपला ग्रंथ लिहिला आहे. कुमार व्यासाचा हा गौरव करतो आणि त्याप्रमाणेंच याचीं वर्णनें सरस असतात (क. क. च. भा. १ पा. १४६). कानडींत ब्राह्मण कवीनें लिहिलेल्या रामायणांपैकीं याचें रामायण पहिलें होय.

**कुमारविष्णु पल्लव**—हा पल्लव घराण्याचा मूळ संस्थापक होय. यानें कांची येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. हा स्कंदशिष्याचा पुत्र व वीरकूर्चाचा नातू. पुढें या वंशांत शूर राजे न निपजल्यानें समुद्रगुप्तानें यांना मांडलिक बनविलें (स.३३८) हा स. २००-च्या सुमारास झाला. हा समुद्रगुप्ताच्या प्रयाग येथील लेखांत (स. ३३८) व वेलूरच्या पल्लवांची वंशावळ असलेल्या लेखांत १९ वा विष्णुगोप म्हणून दिलेला राजा हाच असावा. हा हिंदुधर्माभिमानी व शैव होता.

**२.** (स. ३७५–४००) पल्लव घराण्यांतील दुसऱ्या स्कंदवर्मन्‌चा मुलगा. याला बुद्धवर्मन् आणि नंदिवर्मन् असे दोन मुलगे होते (जयस्वाल पृ. १९१). यानें अश्वमेध यज्ञ केला होता. याची पत्नी नागराजकन्या होती.

**३.** हा बुद्धवर्मन् पल्लवाचा पुत्र.

**कुमारव्यास**—(स. १४३० सुमार) कानडी कवि. जात-ब्राह्मण. माध्वसांप्रदायी असावा. गांव-कोळीवाडू (गदगजवळ). ग्रंथ-यानें कानडी भाषेंत संस्कृत महाभारताचीं पहिलीं दहा पर्वें लिहिलीं.

याचें मूळ नांव नारायणप्प असें होतें. गदगच्या वीरनारायणाचा हा भक्त होता. त्या देवळांत बसून यानें आपला ग्रंथ लिहिला. राईस व किटेल हे हा विजयानगरच्या कृष्णदेवरायाच्या (स. १५०९–१५२९) कारकीर्दीच्या पूर्वभागांत होता, असें म्हणतात. पण हें म्हणणें कर्नाटक कविचरित्रकार आर. नरसिंहाचार्य यांना मान्य नाहीं.

विजयनगरच्या (प्रौढ) देवरायाच्या (स. १४१९–१४४६) वेळीं हा व याच्या बायकोचा भाऊ चामरस हे दोघेहि प्रसिद्ध कानडी कवि होते; आणि त्यांच्यांत स्पर्धाहि होती. यासंबंधीं अनेक आख्यायिका वीरशैवांच्या वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. वीरशैव ग्रंथांतील आख्यायिका खऱ्या मानल्यास याचा काळ स. १४३० असा ठरतो.

१ लेखणी हातांत न धरतां, २ एकहि शब्द न परत घेतां किंवा न खोडतां, ३ न थांबतां, आणि ४ कोणत्याहि प्रकारें दुसऱ्याचें अनुकरण न करितां ग्रंथ लिहिण्यांत याचें वैशिष्ट्य होतें. हें केवळ ईश्वरी कृपेचें फळ होय असें याचें म्हणणें. भाषा सोपी व सर्वांना आवडणारें याचें काव्य आहे. लक्ष्मीशाच्या जैमिनिभारताच्या खालोखालें कानडी लोकांचा हा आवडता ग्रंथ आहे. ग्रंथ फार मोठा आहे.

यानें ऐरावत नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. यांत गजगौरीव्रताची कथा आहे (क. क. च. भा. २ पा. ६४).

**कुमारसिंह**—याचा थोरला भाऊ सामंतसिंह. याच्याकडून मेवाडचें राज्य कीतू चौहानानें घेतलें. तें यानें गुजराथच्या राजाच्या साहाय्यानें पुनः मिळविलें, व आपल्या वंशपरंपरागत राज्याचा हा धनी झाला (रा. इ. पा. ४५८).

**कुमारस्वामिन्**—सुप्रसिद्ध टीकाकार मल्लिनाथाचा पुत्र. याची विद्यानाथकृत-प्रतापरुद्रयशोभूषणावर रत्नापण नांवाची टीका प्रसिद्ध आहे.

**२.** पोट्या कवीचा भाऊ.

**कुमारिलभट्ट**—(स. ६५०–७५० सुमार) पूर्वमीमांसाशास्त्रावरील वार्तिककार व कर्ममार्गाचा प्रवर्तक. हा विद्वान् असून बौद्ध मतास यानें मोठ्या धाष्टर्यानें विरोध केला व वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें. विद्यारण्यकृत शांकरदिग्विजयांत यास स्कंदाचा अवतार म्हटलें आहे. यानें बौद्धांचा पराजय करून कर्ममार्गाचें प्रवर्तन केलें. याचाच फायदा घेऊन पुढें आद्य शंकराचार्यांनीं अद्वैत मताचा प्रसार केला. याचा काल (स. ७००) म्हणजे हर्षानंतरचा मानितात. याच्या कालाप्रमाणें याच्या वसतिस्थानाबद्दलहि दुमत आहे. याना संस्कृताखेरीज द्राविडादि इतर भाषा अवगत होत्या, व यानें बौद्ध धर्माचा अभ्यास बौद्ध भिक्षूंपाशीं केला होता. यानें केलेल्या मातुलकन्याविवाहाच्या निषेधावरून हा महाराष्ट्रीय नसावा असें दिसतें. स. ६५० ते ७५० हा याचा काल असावा. वार्धक्यांत यानें आपला देह अग्नीस अर्पण केला. त्या वेळीं आद्य शंकराचार्य याकडे आले होते, पण त्या वेळीं हा जळूं लागल्यामुळें यानें त्यांस माहिष्मतीस मंडनमिश्राकडे जाण्यास सांगितलें. याचें कर्मप्राधान्य शंकराचार्यांनीं खोडून काढलें.

जैन लोकांच्या ग्रंथांत याच्याविषयींची माहिती अशी देतात. 'जयमंगल हें गांव उत्कल व तैलंगण यांच्या सरहद्दीवर होतें. याचा जन्म जयमंगल गांवीं झाला. हा तैत्ति-

रीय शाखेचा कृष्ण यजुर्वेदी ब्राह्मण होता. याच्या आईचें नांव चंद्रगुणा असें होतें. यानें जैनाचार्याजवळून कपटानें जैन-धर्माचीं मतें समजावून घेतलीं; व अखेर त्यांचाच घात केला. राजाच्या सांगण्यावरून यानें जर वेद खरे असतील तर मला कांहीं अपाय होणार नाहीं असें म्हणून पर्वतावरून उडी मारली, पण हा सुखरूप राहिला.

तंत्रवार्तिकांतील एका ठिकाणीं केलेल्या "आन्ध्रद्रविड-भाषायाम्" शब्दप्रयोगावरून हा तामिलनिदर्शक कांहीं तरी शब्द असला पाहिजे असा बर्नेलनें शेरा मारला आहे ( धर्मकृति पाहा ).

याचे ग्रंथः—( १ ) आश्वलायनगृह्यकारिका ( ? ), ( २ ) मीमांसातंत्रवार्तिक, ( ३ ) मीमांसाश्लोकवार्तिक, ( ४ ) लघुवार्तिक, ( ५ ) टुप्टीका, ( ६ ) बृहट्टीका. यांशिवाय आणखीहि कांहीं वार्तिकग्रंथ याच्या नांवावर आहेत.

मानव श्रौतसूत्रावर याची टीका आहे असें दिसतें. असें असेल तर हा मैत्रायणी शाखेचा असावा.

सनाच्या बाराव्या शतकाच्या पूर्वार्धांत झालेल्या मंख-कवीच्या श्रीकंठचरित्रांत तुतातिन असें पद कुमारिला-करितां वापरलें आहे ( श्रीकंठचरित. २५. ६५–६६ ). जोनराजाच्या टीकेतहि तेथें तुताति पदाचा अर्थ कुमारिल असाच केला आहे. आणि ' महतां सम्यङ् नाम-ग्रहणमयुक्तमिति तुतातितशब्दः प्रयुक्तः ' असें स्पष्टीकरण केलें आहे. 'इति तौताः' असा निर्देशहि कुमारिलाच्या अनुयायांना उद्देशून केलेला असतो ( ना. प्र. प. १ पा. २२८ ).

यानें 'यदि वेदाः प्रमाणं' म्हणून पूर्वपक्षांत कां होईना वेदांच्या प्रामाणिकत्वाबद्दल शंका घेतली म्हणून प्रायश्चित्ता-दाखल तुषाग्नींत आपणास जाळून घेतलें अशी प्रसिद्धी आहे.

**कुमुदेंदु**—कानडी जैन कवि. यानें षट्पदी छंदांत एक रामायण लिहिलें. त्या ग्रंथाचें नांव 'कुमुदेन्दु-रामायण'. हा ग्रंथ समग्र उपलब्ध नाहीं ( स. १२७५ ).

**कुरुकुल्ला**—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं असून याचा महामुद्राभिगीति ( तं. ४८।९९ ) हा ग्रंथ आहे.

**कुरुस्**—( ख्रि. पू. ५५८–२८ ) इराणच्या हखा-मनीषीय घराण्यांतील राजा. सायरस असाहि याचा उच्चार आहे. यानें हिंदुस्थानचा कांहीं भाग आक्रमण केला होता ( सायरस पाहा ).

**कुलपट्टी कलापराय**—हा तेलगू कवि असून भत्राजु जातीचा होय. रायपुर तालुक्यांतील गोंडवोलु येथील राहणारा. यानें गद्यात्मक इंद्र-नारदसंवाद नांवाचा ग्रंथ लिहिला आहे ( परशाकृत तेलगू वाङ्मय, पृ. ६६ ).

**कुलभूषण पांड्य**—हा अनंतगुण पांड्याच्या मुलगा. याच्यावर चेदिराज चालून आला, पण उलट त्याला माघार घ्यावी लागली.

**कुलवतिमिश्र**—एक हिंदी कवि होय. हा आग्रा येथील राहणारा होय. याच्या बापाचें नांव परशुराम-मिश्र असें होतें. हा ब्राह्मण असून जयपूरच्या रामसिंहाच्या दरबारीं होता. याचा ' रसरहस्य ' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. यानें द्रोणपर्व, युक्ति-तरंगिणी, नखशिख, संग्रहसार, गुणरसरहस्य वगैरे ग्रंथ लिहिले.

हा रीति-काल कवींमध्यें संस्कृतांतील मोठा होय. याचा ' रसरहस्य ' हा ग्रंथ, मम्मटाच्या ' काव्यप्रकाश ' ग्रंथाची छाया होय. यानें आपल्या आश्रयदात्याची प्रशंसा करतांना आपल्या चरित्रांतील कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. याची भाषा अलंकारयुक्त आणि रचनाहि सरस आहे.

**कुलशेखर**—हा त्रावणकोरच्या राजघराण्यांत जन्मला होता. यानें फार चांगल्या रीतीनें राज्य केलें. याच्या कारकीर्दीत दुबळ्या लोकांस जबरदस्तीपासून बिलकुल पीडा होत नसे. यानें धार्मिक ग्रंथांचा फार मेहनतीनें अभ्यास केला. विशेषतः यास रामायण फार आवडत असे.

या राजानें तिरुपति व श्रीरंग येथील यात्रा केल्या व नरसेवा म्हणजे ईश्वरसेवा करणें होय, हें आपल्या चरित्रानें दाखविलें. यानें तामिल व संस्कृत या दोन्ही भाषांत ग्रंथ लिहिले आहेत. याचा 'तेट्टंदिरल' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

**कुलशेखर पांड्य**—( स. ११६७ सुमार ) हा एक पराक्रमी पांड्याबरोबरच समान हक्कदार होता. यानें लंकापूरदंडनाथाबरोबर अनेक युद्धें केलीं. पण सर्व युद्धांत पराभव पाऊन शेवटीं हा पळून गेला. लंकापूरदंडनाथ हा पराक्रम पांड्याचा सेनापति होता. पुढें याचा मुलगा विक्रमपांड्य हा मदुरेचा राजा झाला. त्याला तिसऱ्या कुलोत्तुंग चोलाचें साहाय्य होतें.

२. (स. १२६८–१३१०) याचें राज्य सिलोनवरहि होतें. व्हेनेशियन प्रवासी मार्कोपोलो लिहितो कीं याचे सेनापति मुसलमान होते ( आर्यचक्रवर्ति पाहा ). याला

सुंदर पांड्य व वीर पांड्य असे दोन मुलगे होते. यानें वीरपांड्याला आपल्या पश्चात् गादी दिल्यामुळें रागावून सुंदर पांड्यानें याचा खून केला. वास्तविक सुंदर पांड्य हा याचा योग्य वारस होता.

**३.** ( १३१४-४५ ) याचे मदुरा, तंजावर वगैरे ठिकाणीं शिलालेख आहेत.

**कुलशेखरवर्मा**—केरळदेशांतील संस्कृत नाटककार. यानें 'सुभद्राधनंजय' नांवाचें नाटक लिहिलें आहे. कुलशेखरवर्मा हा केरलकुलांतील एक देदीप्यमान तारा होता व हा १० व्या शतकाचा उत्तरार्ध व १२ व्या शतकाचा पूर्वार्ध यांच्या दरम्यान केव्हांतरी होऊन गेला असें दिसतें. महाभारतांतील तपती व संवरण यांच्या संबंधींचें 'तपतीसंवरण' नाटक यानेंच लिहिलें आहे.

**कुलेश पांड्य**—एक राजा. याचा निर्देश वंशशेखरानंतर येतो. हा फार विद्वान् होता.

**कुलोत्तुंग चंगाल्व**—( स. १०९७-१११४ ) हा चंगाल्व घराण्यांतील एक राजा. याला उदयादित्य म्हणत.

**२.** चंगाल्व घराण्यांतील राजा. याला महादेव ऊर्फ पेम्म वीर पम्म असें म्हणत.

**३.** ( स. १२४६-१२५२ ) चंगाल्व घराण्यांतील राजा. याला सोमदेव भोप्प असें म्हणत.

**कुलोत्तुंग(चोल)चालुक्य**—(स. १०६३-१११८) हा पूर्व चालुक्यांपैकीं पहिल्या राजराजाचा मुलगा. याला पहिला राजेन्द्रचोल म्हणत. यानें चोलांचें राज्य जिंकलें व वेंगी प्रान्तावर प्रतिनिधी नेमून आपण चोलांचें राज्य पाहूं लागला. यानें वेंगी प्रान्तावर आपला पहिला प्रतिनिधी नेमला (स. १०६३-१०७७ ). तो विजयादित्य सातवा होय. तो कुलोत्तुंगाचा चुलता होता. दुसरा प्रतिनिधी दुसरा राजराज (स.१०७७-१०७८), व तिसरा वीरनाथ ऊर्फ वीरदेव होता (स.१०७८-११०७). याच्यापासून वेंगीचें राज्य हा चोल देशाचा एक भाग झाला. याचा समकालीन पश्चिम चालुक्याचा राजा सहावा विक्रमादित्य होय. याचा मांडलिक कलिंग देशच्या राजावर खंडणी न दिल्यामुळें स. १०७१ मध्यें यानें स्वारी केली होती. याची राजधानी या वेळीं गंगापुरी होती. विक्रमाङ्कदेवचरित या काव्यावरून असें दिसतें कीं, चोल राज्यांतील अन्तःकलहामुळें याला चोलराज्य बळकाविण्यास संधि मिळाली ( स. १०६३-१११२ ).

चोलवंशांतील अधिराजेन्द्रास पुत्र नसल्यानें चालुक्य वंशांतील कुलोत्तुंगाकडे चोलाचें राज्य गेलें. कुलोत्तुंग हा दोनदां गादीवर बसला. एकदां स. १०७० मध्यें पैतृक राज्यावर म्हणजे वेंगीच्या सिंहासनावर व दुसऱ्यांदा सर्व चोल साम्राज्याच्या सिंहासनावर स. १०७४ मध्यें बसला, असें भट्टनाथस्वामी म्हणतात. कारण स.१०७४ मध्यें यानें कुलोत्तुंग ही पदवी धारण केली. त्यापूर्वी याचें साधें नांव राजेन्द्रच होतें. राजेन्द्र ऊर्फ कुलोत्तुंग चोल हा चालुक्यवंशी राजराज चालुक्याचा मुलगा असून राजेंद्र चोलाचा जांवई होता. याची आई अम्मंग देवी ही गंगैकोंड चोल राजाची कन्या होती. हा लहानपणीं आपल्या आजोळीं ( सासुरवाडीस ) राहत असे. याच्या बापाचे मरणानंतर याच्या चुलत्यानें वेंगीचें राज्य बळकावलें होतें. हा वेंगीचा राजा व्हावयास पाहिजे होता, परंतु चालुक्य राजवंशांत या वेळीं यादवी माजली होती व हा अज्ञान होता. मोठा झाल्यावर हा तिरुवोरीयुर प्रान्ताचा सुभेदार झाला. याला राजकेसरीवर्मा अशी पदवी होती. हा वर सांगितल्याप्रमाणें गंगैकोंड या चोल राजाचा मुलीकडून नातू होता. याचा बाप राजराज स. १०६१-६२ मध्यें वारला. हा युवराज असतां यानें वैरागरम व चक्रकोट हीं महत्त्वाचीं ठाणीं काबीज केलीं होतीं. याच्या कारकीर्दीच्या एकूणपन्नास वर्षांपर्यंतचे शिलालेख प्रसिद्ध आहेत. यावरून हा स. १०७० मध्यें वेंगीच्या व चोलराजांच्या गादीवर बसल्याचें दिसतें. त्यापूर्वी हा आपल्या आज्याबरोबर ( गंगैकोंड ) बऱ्याच लढायांत हजर असे. चोल साम्राज्याच्या सिंहासनावर बसण्याची संधि लक्ष लावून हा पाहत होता; आणि ती अधिराज राजेंद्राच्या वेळीं याला लाभली. याची पत्नी मदुरांतकी ( अधिराजराजेंद्र पाहा ). तत्पूर्वी हा आपणास चालुक्य न म्हणवून घेतां चोलच म्हणवीत असे. याची आई व आजी कुंदव्वा या चोलच होत्या. याचा ध्वज चोलांचा व्याघ्रचिन्हांकित होता, चालुक्यांच्या प्रमाणें वराहचिन्हांकित नव्हता. यानें आपल्या राज्यारोहणाच्या चवथ्या वर्षी कुलोत्तुंग ही पदवी धारण केली आणि कुंतलराजाचा व पांड्य राजांचा पराभव केला. याला कावेरीनदीतीरावर राज्याभिषेक झाला होता. यानें म्हैसूर प्रान्तावर स्वारी करून ( स. १०८१ ) विक्रमादित्य चालुक्याचा पराभव केला ( स. १०८३ ); व त्याला तुंगापार घालवून गंगामंडल व सिंघण प्रान्त काबीज केले. पाण्ड्य राजाला जिंकून मानार, तिनेवेल्ली, कन्याकुमारी, कुट्टरू, मलबार वगैरे प्रान्त काबीज केले ( स. १०८५ ); आणि त्या त्या प्रान्तीं आपले अधिकारी नेमले. याच्या एका तोंडमान चक्रवर्ती नांवाच्या लेकवळ्यानें पल्लवराजाचा पराभव करून तें राज्य खालसा

केलें होतें. याप्रमाणें कुलोत्तुंगानें चोलसाम्राज्य वाढविलें. ह्या वेळीं दख्खनमध्यें विक्रमादित्य चालुक्य व कुलोत्तुंग चोल हे बलिष्ठ सम्राट् होते. पाण्डय व चेर हे चोलांचे मांडलिक होते. मदुरेस कुलोत्तुंगानें आपल्या भावास अधिकारी नेमलें होतें. यानें राज्यप्रसार करतांना राज्यांतील व्यवस्थेकडेहि लक्ष दिलें. आपल्या सर्व राज्याच्या जमीनींची मोजणी केली ( स. १०८६ ). या मोजणींतील शेवटचें परिमाण श्रीपाद ( कुलोत्तुंगाचें पाऊल ) हें होतें. यानें दोनदां कलिंगदेश जिंकला (स.१०९५,१११२), त्यामुळें याची कीर्ति फार वाढली. टेकी ताम्रपटावरून दक्षिण कलिंग चोलसाम्राज्यांत मोडत असल्याचें दिसतें. यानें शेवटीं गंगवाडी प्रान्त होयसलापासून पुनः कांबीज केला. कारण त्यांनीं याच्या सुभेदाराला गंगवाडींतून हुसकून देऊन उलट याच्याविरुद्ध चालुक्यास मदत केली होती. हा शैव असल्यानें यानें रामानुजाचार्यांना हद्दपार केलें होतें.

**२.** ( स. ११३५-४६ ) हा पूर्व चालुक्यांपैकीं विक्रमदेवाचा मुलगा. हा पूर्व चालुक्यवंशांतील शेवटला पुरुष होय. हा स. ११२७ मध्यें गादीवर आला. यानें स. ११३२ मध्यें दिलेलें ताम्रपत्र उपलब्ध आहे. याच्या वेळीं वारंगळचे गणपतीराजे हे या सर्व चालुक्यांचा प्रदेश हळुहळूं घशाखालीं उतरवीत होते. शेवटीं त्यांनीं स. ११२८ ( डॉ. बर्नेलच्या मतें ) या सुमारास या चालुक्यांचें राज्य खालसा केलें असावें. पुढें हे राजे फार तर मांडलिक असावे. याच्यावर अनेक काव्यें झालीं आहेत. यानें चिदम्बरम् येथील देवाची मूर्ति समुद्रांत टाकली. ती पुढें रामानुजानें काढली, असें एका लेखांत वर्णन आहे. याच्या मागून राजराज दुसरा हा याचा चुलतभाऊ राजा झाला ( स. ११४६ ).

**३.** ( स. ११८६-१२१६ ) हा चोलांपैकीं दुसऱ्या राजाधिराजाचा मुलगा. यानें उत्तरेंत स्वारी केली. वीरपांड्याचा यानें पराभव करून मदुरा घेतली आणि ती विक्रमपांड्यास दिली. नेत्तुर येथें यानें फिरून वीर पांड्याचा पराभव करून त्याला व चेर राजाला क्षमा केली ( B. ).

कांचीच्या तेलगू चोलाला नामोहरम केलें. यानें अनेक शिवालयें बांधलीं. यानें अनेक मांडलिक उत्पन्न केले व त्यानेंच पुढें चोलसाम्राज्य खिळखिळें केलें. तसेंच होयसल, काकतीय व यादव वगैरे शेजारचे राजेहि हातपाय पसरूं लागले, त्यामुळें चोलसाम्राज्य मोडकळीस आलें. दक्षिणेंतील सर्व राजघराण्यांत अंतःकलह माजला. याच्या वेळीं जैन भवनन्दी यानें नन्नुल हें तामील व्याकरण लिहिलें. याच्यानंतर याचा मुलगा राजराज तिसरा त्रिभुवनचक्रवर्ति, राजकेसरीवर्मा हा राजा झाला ( स. १२१६ ).

**कुलोत्तुंग पांड्य**—हा पांड्य घराण्यांतील राजशेखराचा मुलगा.

**कुलु(त्लु)घखान**—( स. १३२१-१३४० ) दक्षिण हिंदुस्थानचा सुभेदार. याचें मूळ नांव मलिक कुवाम उद्दीन. पण दक्षिणेचा सुभेदार नेमलें, तेव्हां यास वरील पदवी देण्यांत आली. घियासुद्दीन तुघ्लकच्या कारकीर्दीत दक्षिणेंत बंडें झालीं नाहींत. नाहीं म्हणावयास वरंगळच्या प्रतापरुद्रदेव काकतीयानें दिल्लीस खल्जीवंश नामशेष झाल्यानें खंडणी देण्याचें टाळलें. तेव्हां त्यावर युवराज मुहंमद ऊर्फ उलूघखान याची योजना झाली. त्याची पहिली स्वारी ( स.१३२१ ) फसली, पण दुसऱ्या स्वारींत यश येऊन त्यानें तो प्रांत खालसा केला आणि त्यावर याची नेमणूक केली. हा दक्षिणचा कारभार पाहत असतां प्रथम बहादुद्दीन गुरुशास्प यानें बंड केलें व दुसरें अलीशाहकारनें केलें ( स. १३४० ). यापुढें मात्र प्रांताच्या वसुलाचा मक्ता देण्याची पद्धत सुरू केल्यानें प्रजा त्रस्त झाली आणि उत्पन्न कमी पडलें. पण कांहीं लोकांनीं याच्याविषयीं घियासुद्दीनचें मत कलुषित केल्यानें त्यानें याला नोकरींतून कमी करून याचा भाऊ मौलाना निजामुद्दीनची दक्षिणच्या सुभेदारीवर नेमणूक केली. पण अननुभवी माणसाच्या कारकीर्दीत बंडाचा वणवा पेटला आणि हसन कांगो बहामनी हा बंडखोरांचा पुढारी ३ आगष्ट स. १३४७ रोजीं स्वतंत्र राजा झाला.

**कुल्लूकभट्ट**—( स. ११५०-१३०० सुमार ) मनुस्मृतीवरील एक टीकाकार. यानें भोजदेव, गोविंदराज, कल्पतरु आणि हलायुध यांचा उल्लेख केला आहे. यावरून हा स. ११५० च्या नंतर झाला असावा, आणि रघुनंदनानें याचा उल्लेख केल्यावरून हा स. १३०० शेंच्या अगोदर झाला असावा. तेव्हां याचा काल स. ११५०-१३०० असा असावा.

ह्याची ' मन्वर्थमुक्तावली ' नांवाची मनुस्मृतीवरील टीका फार उत्कृष्ट आहे. या ग्रंथाच्या पुष्कळ आवृत्त्या छापलेल्या आहेत. ह्यानें निरुपयोगी चर्चा गाळून फक्त मुद्याला धरून आपला ग्रंथ लिहिला आहे. ह्यानें बराचसा भाग मेधातिथि आणि गोविंदराज यांच्या ग्रंथांतून घेऊन आपल्या ग्रंथामध्यें मिसळून दिला आहे. मेधातिथि आणि गोविंदराज या दोघांचीहि हा चिकित्सा करीत असे.

यानें आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत आपल्याविषयीं थोडीशी माहिती दिलेली आहे. हा बंगालच्या वारेंद्र ब्राह्मण घराण्यांतील होय. याचें मूळ गांव गौड देशांतील नंदनवासिन् नांवाचें होतें. याच्या बापाचें नांव भट्ट-दिवाकर असें होतें. काशीच्या पंडितांच्या संगतीमध्यें यानें आपली ' मन्वर्थमुक्तावली ' ही टीका काशी येथें लिहिली. यानें ' स्मृतिसागर ' हा ग्रंथ लिहिला असावा. त्याचप्रमाणें 'श्राद्धसागर,' 'विवादसागर,' आणि 'आशौच-सागर ' असे ग्रंथ लिहिले. श्राद्धसागर हें ' पूर्वमीमांसे'नें परिपूर्ण भरलेलें आहे. विवादसागर आणि आशौचसागर असे दोन ग्रंथ यानें बापाच्या इच्छेवरून लिहिले, असा उल्लेख केलेला आहे.

**कुवलयानंद पांड्य**—हा मकरध्वज पांड्याचा नातू होय. यानें दर्यावरील व्यापार वाढविला. हा दर्यावरील सफरींत असतांच वादळानें बुडून मरण पावला.

**कुवलयापीड**—( स. ७३५-३६ ) हा कर्कोटक वंशापैकीं सहावा राजा होय. हा ललितादित्यानंतर गादीवर आला. हा फार निर्बल मनाचा होता. एकदां याचे प्रधानानें याचा आज्ञाभंग केला. तेव्हां हा इतका अस्वस्थ झाला कीं, याला रात्रभर झोंप आली नाहीं व यानें दुसऱ्या दिवशीं राज्यत्याग करून अरण्य-वास पत्करण्याचें ठरविलें. यानें फक्त १ वर्ष १५ दिवस राज्य केलें. याच्यामागून वज्रादित्य गादीवर आला.

**कुशलसिंग**—( स. १५३० सुमार ) हा बासडा संस्थानांतील एक राजा होय. यानें आपलें संस्थान स. १५३० च्या नंतर स्वतंत्र केलें. यानें भिल्ल लोकां-पासून आग्नेय भागांतील प्रदेश घेऊन त्याला कुशलगड असें नांव दिलें. या संस्थानांतील हा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला.

**कुशलिपा**—यालाच कुद्दालिपा असें म्हणतात. हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चव्वेचाळिसावा सिद्ध होय. जात वाणी. स्थळ रामेश्वर. शांतिपाचा शिष्य. ग्रंथ अचिंत-क्रमोपदेश (तं. ४८।८२), चित्ततत्त्वोपदेश (तं. ४८।८३) व सर्वदेवतानिष्पन्नक्रममार्ग ( तं. ४८।७७ ) हे होत.

**कुशान राजघराणें**—( हिंदुस्थानांतील साम्राज्य सुमारें स. ९० ते १७५ ).

वायव्य सरहद्दीच्या दरवाजानें हिंदुस्थानांत येऊन ज्या परकी राजवंशांनीं राज्यें स्थापन केलीं, त्यांपैकीं कुशान राजघराणें प्राचीन आहे. कदफिसेसच्या कारकीर्दीत कुशान साम्राज्य पंजाबांत गंगायमुनेच्या दुआबांत बहुधा काशी-पर्यंत व दक्षिणेस सिंधूच्या भोंवतालीं असावें. या साम्रा-ज्याचा विस्तार कनिष्कानें केला. कनिष्क व वासुदेव यांचे कारकीर्दीत कुशान साम्राज्य बिहारपर्यंत पसरलें होतें. हिंदुस्थानांतील या प्रांतांशिवाय अफगाणिस्थान, बॅक्ट्रिया, मेसापोटेमिया वगैरे पश्चिम आशियांतील भागहि या साम्राज्यांत मोडत असत. शिवाय काश्मीर प्रांतहि कनिष्कानें जिंकून आपल्या साम्राज्यांत दाखल केला होता. या घराण्यांतील कनिष्क या थोर राजाची राजधानी पुरुषपुर अथवा पेशावर येथें होती. हिंदुस्थानांतील राज्या-बरोबरच या घराण्याचें राज्य मेसापोटेमियापर्यंत असल्या-मुळें हिंदुस्थानच्या या राजाला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें होतें व हिंदुस्थानांतून रोमपर्यंत दळणवळणाला राजमार्ग उपलब्ध झाला होता.

मूळचें परकी असूनहि या राजवंशानें हिंदु संस्कृतीचा व बुद्धधर्माचा स्वीकार करून हिंदुसंस्कृति व बुद्धधर्माचा प्रसार हिंदुस्थानाबाहेर करण्याची महनीय कामगिरी केली. हे हिंदु संस्कृतीचे अभिमानी बनले असल्याचा उत्कृष्ट दाखला यांच्यांतील वासुदेव या नांवांत आढळतो. यांनीं अनेक विहार बांधले, धर्मतत्त्वांची चर्चा करून धार्मिक वाङ्मय निर्माण करण्याकरितां पंडितांच्या महासभा भर-विल्या व या सभांना परदेशांतील विशेषतः चीनमधील विद्वानांस बोलावून हिंदु संस्कृतीचा प्रसार केला.

ज्या नागवंशीय राजघराण्याचा पराभव करून या वंशानें आपलें साम्राज्य उत्तर हिंदुस्थानांत स्थापिलें त्या नागवंशीय राजांनीं विंध्याद्रींचा आश्रय करून कुशान साम्राज्य नष्ट करण्याचे प्रयत्न केले ( किलकिला, भारशिव व वाकाटक घराणीं पाहा ). हिंदुसमाजरचनेमध्यें परकी लोक हिंदु झाल्यास अथवा हिंदुस्थानांतील एखाद्या धर्म-मताचा स्वीकार केल्यास त्यांना उच्चवर्णीय ब्राह्मणांचा अथवा क्षत्रियांचा दर्जा व मान प्राप्त होऊं शकत नाहीं. धर्मप्रेमानें बुद्धधर्म स्वीकारून हिंदु संस्कृतीचा अंगिकार केल्यावरहि कुशान राजवंश व तत्सम लोकांना सामाजिक उच्चवर्णीयत्व मिळालें नाहीं व उच्चवर्णीयांचा विरोधहि कमी झाला नाहीं. त्यामुळें कुशान राजांनीं हिंदु समाजरचना बिघडविण्याचे प्रयत्न केले; विश्वस्फाणि किंवा वनस्पर नांवाच्या त्यांच्या एका सुभेदारानें, कैवर्त, पंचक वगैरे शूद्रांहूनहि कमी दर्जाच्या जातींतील लोकांना अधिकाराच्या जागा देऊन एक नवीनच नोकरशाही निर्माण केली असल्याचा दाखला सांपडतो. काश्मीरांतहि त्यांनीं नागपूजा बंद करून तेथील लोकांवर बुद्धधर्म सक्तीनें लादला, असें राजतरंगिणी-वरून दिसतें. कुशान कालांतील आज उपलब्ध असलेल्या शिल्पांत फक्त बुद्ध व जैनांचेंच शिल्प आढळतें. कुशानपूर्व

कालापूर्वीच्या शिल्पासंबंधानें वर्णनें ग्रंथांतरीं उपलब्ध असूनहि त्या शिल्पपद्धतीचीं देवळें, मंदिरें किंवा इमारती उपलब्ध नाहींत. यावरून जयस्वाल या सुप्रसिद्ध संशोधकांचें असें मत झालें आहे कीं, कुशानकालांत पूर्वीच्या हिंदु शिल्पाचा विध्वंस झाला असला पाहिजे.

कुशानराजांनीं हिंदुस्थानांत राज्यस्थापना करण्यास सुरुवात करण्यापूर्वी ऑक्झसनदीच्या दक्षिणेकडील बॅक्ट्रिया देशांत यांचें राज्य होतें. तथापि ते याहि प्रांतांत परकीच होते. यु-ई-ची नांवानें ओळखल्या जाणाऱ्या चीनच्या वायव्य भागांतील भटक्या लोकांतून कुशान घराणें उदयास आलें. चीनच्या वायव्यभागांत तेथील तुर्की जमातींमध्यें ख्रिस्तपूर्व स. १६५ चे सुमारास यादवी उत्पन्न होऊन यु-ई-ची ज्ञातीस तो प्रांत सोडून आपलीं खिल्लारें चारण्यास भरपूर रानें असलेल्या गोबीच्या उत्तर भागांत यावें लागलें. त्यांच्या जमातींत त्या वेळीं लाख दोन लाख स्त्रीपुरुष व घोडे, मेंढ्या व इतर जनावरांचा मोठा लवाजमा होता. कांहीं कालानंतर यु-ई-चींनीं भटकेपणा सोडून बॅक्ट्रियामध्यें कायम वस्ती केली. स. ४० चे सुमारास या यु-ई-ची जमातीचीं ५ राज्यें बॅक्ट्रियांत होतीं. त्यांपैकीं कुशाज्ञातीच्या राजघराण्यास 'कुशान' असें म्हणत. या कुशानघराण्यांत कदफिसेस नांवाचा शूर राजा उदयास येऊन त्यानें यु-ई-चींच्या पांचहि राजांवर आपलें अधिराज्य स्थापन केलें. त्यानें किपिन ( चिनी ) म्हणजे गांधार काबीज केला. त्यानंतर कदफिसेस २ रा यानें पंजाब आपल्या राज्यास जोडला ( स. ९० ). या घराण्यांतील सर्वांत थोर सम्राट् कनिष्क. त्याच्या राज्याचा विस्तार वर दिलाच आहे. कुशानघराण्याची हिंदुस्थानांतील राजसत्ता सहावा राजा वासुदेव याचे कारकीर्दींत नष्ट झाली. तरीहि अफगाणिस्थानांत यांचें राज्य टिकून होतेंच.

**कुसाजी भोसले**—हे शाहूमहाराजांचे लेकवळे होते. हे शूर असल्यानें लढाईवर जाण्याची पाळी यांचेवरच येई. साताऱ्यानजिकच्या शिराळे प्रांताची सुभेदारी यांचेकडे असे. पुढें कर्नाटक प्रांतावर बाबूजी नाईकाची नेमणूक झाली असतां त्याजकडे अर्धा कर्नाटक दिला, व अर्धा याजकडे दिला, शिराळें येथील भोसले घराण्याचे हे संस्थापक होत ( शाहूमहाराज बखर ).

**कुस्तन**—मौर्यसम्राट् अशोकाचा मुलगा. यानें खोतान प्रांतांत बौद्धधर्माचा प्रचार केला, असें बौद्ध ग्रंथ व खोतानी ग्रंथांवरून कळतें. हे खोतानी ग्रंथ सध्यां उपलब्ध नाहींत. पण तिबेटी भाषेंत आढळणारे कांहीं ग्रंथ त्या खोतानी ग्रंथांचें भाषान्तर असावेत असें वाटतें. त्या तिबेटी ग्रंथांचीं नांवें राखेलच्या 'दि लाइफ ऑफ बुद्ध' या ग्रंथांत आढळतात. त्या ग्रंथांतील माहितीवरून बऱ्याच गोष्टींवर प्रकाश पडतो. अशोकाच्या पूर्वीहि कांहीं प्रचारक खोतानकडे गेले, पण तेथील लोकांकडून अवमानित होऊन ते परत आले. नंतर तेथें कांहीं भौतिक घटनेमुळें पाण्याचे प्रवाह वाहूं लागले व देश बेचिराख झाला. अशोकाचा मंत्री यश व हा हे तेथें गेले. तेव्हां तेथें कांहीं चिनी लोकहि आले. आणि त्या दोघांनीं खोतान पुनः वसवला. धर्मप्रचाराबरोबर नवीन वसाहत करण्याचा हा इतिहास आहे.

**कुंग**—फाहियान या चिनी प्रवाशाचें मूळनांव.

**कुंडधान**—हा श्रावस्तींतील एका ब्राह्मणकुलांत जन्मला. वेदाध्ययन वगैरे करून विद्वान् झाल्यावर उतारवयांत यानें बौद्धसंघांत प्रव्रज्या घेतली. हा भिक्षेसाठीं गांवांत जात असतां याच्या मागोमाग एक स्त्रीहि जात असे; व परत येतांना ती मागोमाग येत असे. त्यामुळें गांवांतील बायकापोरें थट्टा करूं लागलीं. 'धान्याचा कोंडा झाला,' 'धान्याचा कोंडा झाला' असें तीं म्हणत, तेव्हां धानहि 'तुम्ही कोंडा' इत्यादि बोलून त्यांना शिव्या देई. त्यामुळें याला कुंडधान हें नांव मिळालें. हा असा लोकांशा भांडतो, हें भगवंताला समजलें तेव्हां याला बोलावून आणून धम्मपदांतल्या दोन गाथा भगवंतानें म्हटल्या. त्यांचा अर्थ असा 'अपशब्द बोलूं नकोस. तूं बोललास तर लोकहि तुला बोलतील. ह्याप्रमाणें हमरीतुमरी दुःखदायक आहे. त्यायोगें तुझ्यावर प्रत्याघात होतील. पालथ्या घातलेल्या भांड्याप्रमाणें जर तूं मनांतून आवाज बाहेर पडूं दिला नाहींस तर तूं निर्वाणाजवळच आहेस. कारण तुला प्रत्याघातबुद्धि राहिली नाहीं.' पुढें भगवंताच्या उपदेशाप्रमाणें वागून स्वप्रयत्नानें हा अर्हत् झाला. तरी कुंडधान हेंच याचें नांव कायम राहिलें. याची अशी कांहीं पुण्याई होती कीं, उपासकांनीं आमंत्रणपत्रिका पाठविल्या असतां बहुधा पहिली पत्रिका याला मिळे ( बौद्धसंघाचा परिचय, पृ. १८० ).

**कुंडल केसरी**—केसरी घराण्यांतील एक राजा. यानें पुरी येथील मार्कंडेश्वराचें मंदिर स. ८११-२९ चे दरम्यान बाधलें, असें हंटरनें आपल्या ग्रंथांत म्हटलें आहे.

**कुंडिन**—तैत्तिरीयशाखेचा हा वृत्तिकार असल्याबद्दल कांडानुक्रमणींत लिहिलें आहे. बौद्धायनगृह्यसूत्रांत हें नांव

कौंडिन्य असें आहे. हा फार प्राचीन म्हणजे ख्रि. पू. पांचव्या शतकांतील असण्याचा संभव आहे.

**कुंतल किंवा कुंतलक**—(स. ९२५-१०२५ सुमार) याचा वक्रोक्तिजीवित नांवाचा एक अत्यंत महत्त्वाचा संस्कृत ग्रंथ अद्यापि अप्रसिद्ध आहे.

**कुंतल शातकर्णि**—याचा उल्लेख वात्स्यायनाच्या कामसूत्रांत आला आहे. कामचेष्टा सहन न झाल्यानें, महादेवी मलयवतीला यानें कात्रीनें ठार केलें (भांडारकर ५६).

**कुंथुनाथ**—जैनांचा सत्रावा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

**कुंदकुंदाचार्य**—(ख्रि. पू. ५२०) सरस्वतीगच्छांतील हा जैन यति होय. हा वीर संवत् ४९ मध्यें जन्मून वयाच्या ९५ व्या वर्षी मरण पावला. यानें कांहीं ग्रंथरचना केली आहे. त्यापैकीं शिवकुमार महाराजांकरितां पंचास्तिकाय हा ग्रंथ यानें लिहिला, असें त्या ग्रंथावरील टीकेवरून समजतें. यानें षट्प्राभृत हा ग्रंथ केला असून त्यावर श्रीश्रुतसागरानें टीका लिहिली आहे. याच्या गुरूचें नांव विद्यानंदिन् असें होतें. याचा तिसरा ग्रंथ तत्त्वार्थदीपिका हा होय.

**कुंदबाई**—ही सुंदर चोल परांतक २ रा याची मुलगी (सुंदरचोल पाहा).

**कुंदव्वा**—ही गंग घराण्यापैकीं पहिल्या पृथ्वीपतीची मुलगी. ही विक्रमादित्य बाणाला दिली होती.

**२.** ही दुसऱ्या परान्तक चोलाची मुलगी. ही पल्लवराजाला दिली होती.

**३.** ही पहिल्या राजराज चोलाची मुलगी. ही विमलादित्य चालुक्याला दिलेली होती.

**४.** ही मधुरान्तक उत्तम चोलाची मुलगी.

**कुंभकर्ण गुहिलोत**—(स. १४३३-६८) उदेपूरचा राणा. मोकलच्या मागें त्याचा ज्येष्ठ पुत्र कुंभकर्ण ऊर्फ कुंभा हा गादीवर आला (वि. सं. १४९०- स. १४३३).

यानें महाराजाधिराज, रायराय (राजराज), राणेराय, महाराणा, राजगुरु, दानगुरु, शैलगुरु, परमगुरु, चापगुरु, तोडरमल्ल (गज, हय व नर यांच्या अधिपति अशा राजांना जिंकणारा मल्ल), अभिनवभरताचार्य, व हिंदुसुरत्राण अशीं बिरुदें धारण केलीं होतीं, असें शिलालेखावरून दिसतें. त्यावरून हा राजांचा राजा, विद्वान्, दानी व महाप्रतापी असल्याचें सूचित होतें.

राज्यावर आल्याबरोबर यानें आपल्या पित्याला ठार मारणाऱ्या चाचा व मेरा यांना मंडोवरच्या रणमल्लाकडून ठार करविलें. तेव्हांपासून रणमल्लाचें वर्चस्व याच्या दरबारांत वाढत चाललें. याचा चुलता राघवदेव याचें बरेंच वर्चस्व दरबारांत होतें, तें रणमल्लाला सहन होत नसे. एकदां तर शिरपाव देण्याकरितां राघवदेवाला दरबारांत बोलावून बंद तोंडाच्या बाह्याचा अंगरखा पोषाख म्हणून त्याला घालावयास दिला व त्याचे दोनहि हात बाहींत गुंतले असतां दोहीं बाजूंनीं हल्ला करवून भर दरबारांत राघवदेवाला ठार केलें. कुंभा त्या वेळीं रणमल्लाला कांहींच बोलला नाहीं. पण याच्या कानावर वरचेवर रणमल्लाच्या प्रामाणिकपणाविषयीं संशय उत्पन्न करणाऱ्या गोष्टी येऊं लागल्या. महपा पवार व चाचाचा पुत्र एका यासहि शरणागत म्हणून यानें रणमल्लाच्या सल्ल्याविरुद्ध आश्रय दिला. याची माता सौभाग्यदेवी व तिची दासी भारमली यांच्याकडून अशाच रणमल्लाविरुद्ध कागाळ्या येऊं लागल्या. कारण भारमली रणमल्लाच्या प्रेमांतील होती. कुंभकर्णाला संशय येऊं लागला, पण राठोडाशिवाय भोंवतीं कोणीच दिसेना. तेव्हां कोणी तरी विश्वासूक सिसोदियांपैकीं जवळ पाहिजे म्हणून चूंडाला स्वार पाठवून बोलावण्यांत आलें. चूंडा अजासह चितोडला आला. पण रणमल्लाला संशय आला म्हणून त्यानें तक्रार केली, तेव्हां सौभाग्यदेवीनें चूंडाच्या त्यागाविषयीं रणमल्लाला स्पष्टपणें सांगून गप्प बसविलें.

रणमल्लानेंहि आपलीं मुलें दूर पाठविण्याची व्यवस्था केली. शेवटीं एक दिवस रात्रीं तो दारूच्या निशेंत असतां महपा (महीपाल) पवारानें रणमल्लाला ठार केलें. चूंडानें रणमल्लाचा पुत्र जोधा याचा पाठपुरावा केला आणि त्याचें मंडोवरचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. पण पुढें जोध्याचें राज्य त्याचें त्याला देऊन त्याची मुलगी शृंगारदेवी राणा कुंभाचा पुत्र रायमल्लाला करण्यांत आली व हा तंटा संपला.

यानें आबूचें राज्य घेतलें व सिरोहीच्या सैसमलला जिंकून त्याच्या राज्याचा पूर्वेकडील भाग आपल्या राज्यांत मिळविला.

मेरा व चाचा यांनीं राणा मोकलला मारलें, म्हणून त्यांचा सूड उगवला गेला. पण त्यांना साहाय्य करणारा महपा पवार याला कांहींच शासन झालें नव्हतें. तो माळव्याच्या सुलतानाच्या आश्रयाला जाऊन राहिला होता. त्याला पत्र लिहून महपाला ताब्यांत देण्याविषयीं लिहिलें असतां त्यानें शरणागतरक्षणाची सबब सांगून युद्धाची भाषा काढली. तेव्हां उभयपक्षांत सारंगपुर येथें युद्ध होऊन सुलतानाला कैद करण्यांत आलें; व सहा महिने चितोड येथें ठेवण्यांत येऊन कांहीं दंड न घेतां सोडून देण्यांत आलें. अबुल फज्लनें शत्रूंपासून कांहीं दंड न घेतां त्याला भेट देऊन सोडण्याच्या या कृत्याबद्दल कुंभाची खूप प्रशंसा केली आहे. पण कर्नल

टॉडनें हिंदूंची राजनैतिक अदूरदर्शिता, अहंकार, उदारता व कुलाभिमान यांचें हें उदाहरण म्हटलें आहे ( टॉड १. ३३५ ). ज्या महपा पवाराकरितां येवढें युद्ध झालें त्याला पुनः कुंभानें शरणागत म्हणून आश्रय दिलाच. या विजयाबद्दल राण्यानें विशाळ कीर्तिस्तंभ उभारला. ही लढाई वि. सं. १४९४ ( स. १४३७ ) मध्यें झाली.

राणपूर ( जोधपूर ) येथील वि. सं. १४९६ ( स. १४३९ ) मध्यें प्रसिद्ध जैनमंदिर बांधलें गेलें. त्यावरील शिलालेखांत या राण्यानें आपल्या राज्यावरील सात वर्षांचा वृत्तांत दिला आहे. तो असा—यानें सारंगपूर, नागपूर ( नागोर–येथें फिरोजखांशीं झालेलें युद्ध असावें ), गागरण ( गागरौन ), नराणक ( नराणा ), अजयमेरू ( अजमेर ), मंडोर ( मंडोवर ), मंडलकर ( मांडलगढ ), बुंदी, खाटू, चाटसू ( चाकसू ) हे किल्ले यानें सहज जिंकले, उत्तम हत्ती मिळविले, मुसलमान सुलतान जिंकले, दिल्ली व गुजराथ यांच्यावर स्वारी केली असतां तेथील राजांनीं याला छत्र भेट दिलें व 'हिंदुसुरत्राण' अशी पदवी दिली. असा हा मोठा पराक्रमी व धार्मिक सम्राट् होता. हें वि. सं. १४१६ ( स. १४३९ ) पर्यंतचें यांचें चरित्र आहे.

महाराणा मोकल मारला गेल्यावर हाडौतीच्या हाडा (चौहाना)नें स्वतंत्र होण्याचा उद्योग सुरू केला, पण यानें त्यावर स्वारी करून त्याला जिंकलें. यासंबंधीं कुंभलगडच्या वि. सं. १५१७ च्या शिलालेखांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. 'बबावदा ( बम्बावदा ), व मण्डलकर ( मांडलगढ ) यांवर महाराण्यानें विजय मिळविला. हाडावटी( हाडौती )ला जिंकून तेथील राजाला कर देणारे केले. तसेंच षट्पुर ( खटकड ), व वृन्दावती ( बूंदी ) जिंकली. '

माळव्याचा सुलतान महंमूदशाह खल्जी यानें मागील पराजय धुवून काढण्याकरितां कुंभलगडावर स्वारी केली पण त्याचा पराजय झाला ( स. १४४३ ). पुनः तीन वर्षांनीं स्वारी केली त्यांतहि यश आलें नाहीं. तेव्हां त्यानें गुजराथच्या कुत्बुद्दीनकडे ताजखांला पाठविलें; व माळवा व गुजराथ मिळून स्वारी करण्याचा बेत ठरविला. पण त्यांना याच्यावर विजय मिळवितां आला नाहीं. नागोरहि शम्सखांपासून जिंकून घेतलें. तो गुजराथच्या कुत्बुद्दीनकडे गेला. त्यानें त्याच्या मुलींशीं लग्न लावलें, व नागोरवर स्वारी केली. पण त्यांतहि यश आलें नाहीं, असें फिरिस्ता म्हणतो ( भा. ४. पृ. ४०–४१ ). पण कीर्तिस्तंभाच्या प्रशस्तींत त्याचें विस्तृत वर्णन आढळतें.

अशा प्रकारें माळवा व गुजराथ येथील सुलतानांशीं याच्या संघशः किंवा व्यक्तिशः सारख्या लढाया चालू होत्या, पण त्यांत याचा नेहेमीं विजय झालेला आढळून येतो.

याशिवाय यानें पुष्कळ लढाया जिंकलेल्या दिसतात. कुंभळगडच्या प्रशस्तींत पुढीलप्रमाणें म्हटलें आहेः कुंभळगडच्या लेखाचा काळ वि. सं. १५१७ आहे. ' यानें नारदीयनगरच्या राजाशीं लढून त्याच्या स्त्रिया आपल्या दासी बनविल्या, शोध्यानगरीच्या राजाला आपल्या पायावर नमवलें, हम्मीरपुरच्या युद्धांत रणवीर विक्रमाला कैद केलें, धान्यनगरच्या राजाला पदच्युत केलें, जनकाचल ताब्यांत घेतला, चंपावती नगरीला त्रस्त केलें, मल्लारभुफर ( मलारणा ) जाळलें, सिंहपूर( सीहोर )च्या राजाचें तलवारीनें मुंडकें उडवलें, रणस्तंभ ( रणथम्भोर ) जिंकलें, आमदाद्रीचा भुगा केला, कोटकेच्या युद्धांत सिंहासारखा पराक्रम दाखवला, विशालनगर ( वीसलनगर ) समूळ नष्ट केलें, आपल्या अश्वसैन्यानें गिरिपूर ( डुंगरपूर ) आक्रमित केलें, तेव्हां वार्धे ऐकूनच तेथील राजा गैपाळ ( गैबा किंवा गोपाळ ) किल्ला सोडून गेला. त्याच संवतांतील कीर्तिस्तंभाच्या प्रशस्तींत डीडवाणेच्या मिठाची खाण सुरू केली, खंडेला जिंकणें, तसेंच एकलिंगमाहात्म्यांत वायसपूर नष्ट करणें व मुसलमानांकडून टोडा घेणें-लिहिलें आहे. पण संस्कृतीकरणामुळें यांतील कांहीं नांवांची बरोबर ओळख पटत नाहीं. उदाहरणार्थ नारदीयनगर, शोध्यानगरी, हम्मीरपूर, धान्यनगर, जनकाचल, चम्पावती, काटडा व वायसपूर हीं अशीं नांवें आहेत. पण यांतील प्रारम्भाचीं कांहीं नांवें माळव्यांतील असावींत.

हा शिल्पशास्त्रज्ञ असून यानें सुंदर कामें केलीं. अशी प्रसिद्धी आहे कीं, मेवाडांतील ८४ किल्ल्यांपैकीं ३२ किल्ले व अनेक मंदिरें व जलाशयें वगैरे यानें बांधलीं. त्यांपैकीं शिलालेखांत निर्देश आलेलीं पुढें दिलीं आहेत.

यानें चितोडच्या किल्ल्यावर अनेक शिखरें व बुरुज असलेला विचित्रकूट बांधला. वर जाण्याकरितां रस्ता नव्हता तो यानें चांगला रथ जाण्यासारखा बांधला. तसेंच रामपोल ( रामरथ्या ), हनुमानपोल ( हनुमानगोपूर ), भैरवपोल ( भैरवांकविशिखा ), महालक्ष्मीपोल ( महालक्ष्मीरथ्या ), चामुंडापोल ( चामुंडाप्रतोली ), तारापोल ( तारारथ्या ) व राजपोस ( राजप्रतोली ), या नांवांचे यानें चितोडला दरवाजे बांधले. यानें सुप्रसिद्ध कीर्तिस्तम्भ बांधला. तो वि. सं. १५०५ माघ शुद्ध १० ला

पुरा झाला. कुंभस्वामी व आदिवराह हीं मंदिरें, रामकुण्ड, जलयन्त्र( राहाट )युक्त कित्येक विहिरी, कित्येक तलाव, तसेंच वि. सं. १५०७ कार्तिक वद्य ९ ला चितोडवर विशिखा ( पोल ) बांधला.

वि. सं. १५१५ चैत्र वद्य १३ ला कुंभमेरू ( कुंभलगड ) ची प्रतिष्ठा झाली, तसेंच या किल्ल्याला चार दरवाजे बांधले. मांडव्यपुरा( मंडोवर )हून आणलेली हनुमानाची मूर्ति, तसेंच एका शत्रूकडून आणलेली गणपतीची मूर्ति तेथें स्थापन केली. खंडित झालेलें एकलिंगजीचें मंदिर नवीन बांधून मंडप, तोरण, ध्वजादंड, व कलश यांनीं सुशोभित केलें. तसेंच त्या मंदिराच्या पूर्वेस कुंभमंडप नांवाचें स्थान बांधलें.

सिरोही राज्यांतील वसंतपूर यानें पुनः वसविलें, आणि तेथें विष्णूकरितां सात जलाशय निर्माण केले. अबू जिंकून अचलेश्वराजवळच्या शृंगावर वि. सं. १५०९ माघ शुद्ध पौर्णिमेला अचलदुर्ग बांधला. अचलेश्वराजवळ कुंभस्वामीचें मंदिर व त्याच्याजवळ एक सरोवर व चार जलाशयें बांधलीं. हा कीर्तिस्तंभ व मंदिरें पाहिलीं असतां यांच्याकरितां कोट्यवधि रुपये लागले असतील हें सहज लक्षांत येतें; व याच्या वैभवाची कल्पना येते. कीर्तिस्तंभ तर हिंदु जातीच्या कीर्तीचा अलौकिक स्तंभ आहे. त्याचें महत्त्व व त्याकरितां झालेला खर्च याचा अदमास हा प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय होणें शक्य नाहीं.

हा जसा वीर आणि युद्धकुशल होता तसाच विद्यानुरागी आणि विद्वानांचा सन्मान करणारा होता. एकलिंगमाहात्म्यांत हा वेद, स्मृति, मीमांसा, उपनिषद्, व्याकरण, राजनीति आणि साहित्य यांत निपुण होता असें लिहिलें आहे. यानें संगीत विषयावर संगीतराज, संगीतमीमांसा, तसेंच सूडप्रबंध ( ? ) नांवाचा ग्रंथ लिहिला. चंडीशतकावर व्याख्या लिहिली. जयदेवाच्या गीतगोविंदावर रसिकप्रिया नांवाची टीका लिहिली. महाराष्ट्रीय, कर्नाटकी, व मेवाडी या भाषांचे प्रयोग ज्यांत आहेत अशीं चार नाटकें यानें लिहिलीं होतीं. हा कविशिरोमणि, वीणा वाजवण्यांत कुशल व नाट्यशास्त्राचा मर्मज्ञ होता. याला नव्यभरत ( अभिनवभारताचार्य ) म्हणत. हा नन्दिकेश्वराच्या मताचा अनुयायी होता. यानें संगीतरत्नाकरावर टीका लिहिली, तसेंच भिन्न राग व ताल यांत म्हटल्या जाणाऱ्या अनेक देवतांचीं पदें बनवलीं. त्यांचा एकलिंगमाहात्म्याच्या रागवर्णन या अध्यायांत संग्रह आहे.

शिल्पसंबंधीं अनेक पुस्तकें याच्या आश्रयाखालीं तयार झालीं. सूत्रधार( सुतार )मंडन यानें देवतामूर्तिप्रकरण, प्रसादमण्डन, राजवल्लभ, रूपमण्डन, वास्तुमण्डन, वास्तुशास्त्र, वास्तुसार व रूपावतार हे ग्रंथ रचले. तसेंच त्याचा भाऊ नाथा यानें वास्तुमंजरी हा ग्रंथ लिहिला; व मंडणचा पुत्र गोविंद यानें उद्धारधोरणी, कलानिधि व द्वारदीपिका नांवांचीं पुस्तकें रचलीं. जय व अपराजित यांच्या मतानुसार कीर्तिस्तंभाची रचना या विषयावर एक ग्रंथ लिहिला होता, व तो दगडावर खोदवून कीर्तिस्तंभाच्या खालच्या भागावर लावला होता. त्यापैकीं प्रारंभींची शिला शेजारच्या दगडाच्या ढिगाऱ्यांत सांपडली ती उदयपूरच्या म्युझियममध्यें पाहावयास मिळते. बाकी उपलब्ध नाहीं. कीर्तिस्तंभावरील प्रशस्तीचा कवि अत्रि अर्धी प्रशस्ति झाल्यावर मेल्यामुळें त्याचा मुलगा महेश यानें ती पुरी केली. त्याचा यानें हत्ती, सोनें, चवरी व श्वेतछत्र देऊन सन्मान केला.

याचे वि. सं. १४९१ ते १५१८ पर्यंतचे साठ शिलालेख मिळाले आहेत. त्यांचा येथें निर्देश करणें अशक्य आहे.

याला शेवटीं उन्माद रोग झाला. त्यामुळें हा बडबडत असे. हा एकदां कुंभलगड येथें मामा ( कुंभस्वामी ) देवाच्या मंदिराजवळ जलाशयावर बसला असतां याच्या राज्यलोभी मुलानें–ऊदानें ( उदयसिंह ) कट्यारीनें याला अचानक ठार केलें. ही गोष्ट वि. सं. १५२५ ( स. १४६८ ) मध्यें झाली.

याला अकरा पुत्र होतेः उदयसिंह, रायमल्ल, नगराज, गोपाळसिंह, आसकरण, अमरसिंह, गोविन्ददास, जैतसिंह, महरावण, क्षेत्रसिंह व अचलदास. ही माहिती भाटांच्या ख्यातावरून मिळते.

जावर येथील रामकुंडाच्या जवळ असलेल्या रामस्वामी नांवाच्या विष्णुमंदिरावरील प्रशस्तिवरून कळून येतें कीं, याला एक रमाबाई नांवाची मुलगी होती. तिचा विवाह जुनागडचा यादव राजा मंडलिक ( शेवटचा ) याच्याशीं झाला होता.

याला अनेक स्त्रिया होत्या. तथापि कीर्तिस्तंभावरील प्रशस्ति व गीतगोविंदावरील टीका यांत कुंभलदेवी व अपूर्वदेवी अशीं दोन नांवें आढळतात.

हा एकलिंगजीचा भक्त होता, तरी यानें विष्णूचीं अनेक मंदिरें बांधलीं. याच्या वेळीं जैनांचींहि बरींच प्रसिद्ध मंदिरें बांधलीं गेलीं. त्यावरून याची वृत्ति दिसून येते.

या थोर राजाचें शरीरहि चांगलेंच धष्टपुष्ट होतें. अत्यंत थोर पुरुषांपैकीं हा एक होय.

अबूच्या पहाडावरील एका मंदिरांत याची मूर्ति असून त्याची रोज पूजा होत असते.

**कुंभनदास**—एक हिंदी कवि. हा विठ्ठलनाथाच्या 'अष्टछाप' कवींतील एक. हा परमानंददासाचा समकालीन होता. याला अकबर बादशाहानें बोलावून फत्तेपूर शिकी येथें याचा वादांत पराजय केला.

**कूचिमंचिजण्णकवि**—हा तेलंगणांतील प्रख्यात कवि होय. हा शोकगीतें सुंदर करतो. यानें चंद्रशेखरविलाप नांवाचें शृंगारपर काव्य केलें आहे.

**कूचिमंचितिम्मकवि**—( स. अठरावें शतक प्रारंभ ) तेलगू कवि. याचा लक्षणसारसंग्रह नांवाचा ग्रंथ व्याकरण व छंद या विषयांवर आहे. याच्या शुद्धांध्ररामायणांतहि एक संस्कृत शब्द सांपडावयाचा नाहीं.

**कूट**—( स. १७८०-८३ ) हा एक इंग्रज सेनापति होय. याचें संपूर्ण नांव सर आयर कूट असें आहे.

स. १७८० मध्यें हैदरानें इंग्रजांच्या फौजेची त्रेधा उडवून दिली, तेव्हां हेस्टिंग्सनें यास बंगालची फौज देऊन मद्रासेस पाठविलें. पण कूटला सुद्धां सुमारें वर्षभर हैदरानें दाद दिली नाहीं.

नंतर मराठ्यांशीं युद्ध न करतां त्यांच्याशीं तह करावा असें मत ज्यांचें होतें, त्या चौकड्यांत हा एक होता.

पुढें हा कलकत्त्यास गेला. पण हेस्टिंग्सला टिपूशीं युद्ध करावयाचें होतें. म्हणून त्यानें याला मुद्दाम भीड घालून पुनरपि मद्रासेस रवाना केलें ( २०-३-१७८३ ). तेव्हां रस्त्यांत जहाजावरच यास अर्धांगवायूचा झटका आला व किनाऱ्यावर आल्यावर ता. २७-४-१७८३ रोजीं हा शूर इंग्रज सेनापति मरण पावला.

**कून**—सुंदरपांड्याचें नामांतर.

**कूनीय**—अजातशत्रूचें नामांतर.

**कूर्मदास**—हा पैठणचा रहिवासी. याची जात ब्राह्मण. हा जन्मतः थोटा व पांगळा होता; याच्या मनांत पंढरपुरास जाऊन पडावें असें आलें. पुढें एका कार्तिकी एकादशीस पंढरीस जाण्याच्या हेतूनें हा खुरडत निघाला. जातां जातां कार्तिक शुद्ध १० स, लऊळ म्हणून करमाळें तालुक्यांत, एक गांव आहे, तेथें येऊन पोहोंचला. येथून पंढरपूर ९ कोस आहे. तेव्हां यानें विचार केला कीं आतां आपलें एकादशीस पंढरपुरास जाणें होत नाहीं. म्हणून यानें देवाची प्रार्थना करून वारकऱ्यांबरोबर निरोप पाठविला. असें सांगतात की निरोपाप्रमाणें विठोबानें यास येऊन दर्शन दिलें, असें भक्तविजयकार म्हणतात. याचा काल सुमारें शके १२३० चा होय ( अर्वाचीन कोश ). याची स्फुट कविता आहे.

**कृत्तिवास**—( स. १२८८ ) बंगाली भाषेंत रामायण लिहिणारा बंगाली कवि. यानें गौडाधिपतीच्या विनंतीवरून रामायण लिहिलें. याचें रामायण बंगाल्यांत घरोघर मोठ्या श्रद्धेनें वाचलें जातें. हा कुलीन ब्राह्मण असून श्रीहर्षाचा वंशज होता. आदिसूराच्या सांगण्यावरून हें घराणें बंगाल्यांत आलें ( क. कौ. ७ ).

**कृपाचार्य**—केवलाद्वैतवादी कुलिज नामक ग्रंथाचा कर्ता.

**कृपाराम**—( स. १५४० ) एक हिंदी कवि होय. यानें 'हिततरंगिणी' नांवाचा ग्रंथ दोहामध्यें लिहिला आहे. हा ग्रंथ सरस असून भावपूर्ण आहे. यांतील भाषा परिमार्जित आहे.

**२.** ( स. १४९८ नंतर ) एक ज्योतिषी. यानें बीजगणित, मकरंद, यंत्रचिंतामणि इत्यादि ग्रंथांवर संपूर्ण टीका लिहिल्या. सर्वार्थचिंतामणि, पंचपक्षी, मुहूर्ततत्त्व, यांवर याच्या टीका आहेत आणि वास्तुचंद्रिका नांवाचा ग्रंथहि आहे. केशवकृत मुहूर्ततत्त्वाचा काळ सुमारें श. १४२० आहे. त्यावरून याचा काल त्याहून अर्वाचीन असला पाहिजे हें सिद्ध होतें ( भा. ज्यो. २७६ ).

**३.** हिंदुस्थानी कायस्थ ब्राह्मण. सवाई जयसिंगाच्या पदरीं असणारा हुषार मुत्सद्दी. बाजीराव ( थोरला ) व सवाई जयसिंग यांचा स्नेह घडवून आणण्यांत याचें साहाय्य झालें, आणि बाजीरावानें याला आपला वकील नेमलें. हा मेल्यानंतर याचा मुलगा तुळजाराम हा वकिलातींत काम करूं लागला ( म. रि. मध्य. ३, पा. २९५ ). सवाई जयसिंग मेल्यावर त्याची दिल्लींतिल वकिली महादेव हिंगणे याजकडे देण्यांत आली; आणि याला जयनगरांत नेण्यांत आलें ( पुरंदरे दप्तर ). याचा मुलगा तुळजाराम यानें आपल्या वडिलांची कामगिरी पुढीलप्रमाणें नमूद केली आहे. 'कै. बाजीरावसाहेब हिंदुस्थानांत आले. त्या वेळेस सेवकाच्या वडलाच्या विद्यमानें, सवाई जयसिंग याकडील मामलीतीची तडमोड झाली, ती सेवकास ठाऊक आहे. खानदौरा, मीरबक्षी व कमरूद्दीनखान वजीर हे उभयतां राव कै. यावर चालून गेले, त्या वेळेस सेवकांचे वडिलांनीं कज्जा होऊं दिला नाहीं.' तसेंच जयसिंगाचे मुलखांत आल्यावर झालेल्या जाबसालाची माहिती आहे.

**कृष्ण**—( हा. १२९० ) कोंकणचा रामचंद्र यादवानें नेमलेला सुभेदार. हा भारद्वाजगोत्री ब्राह्मण होता. सिंघण

यादवाच्या पदरीं असलेल्या पद्मनाभाचा हा नातू होय ( भांडारकर, पा. १६२ ).

**२.** ( स. १५५० नंतर ) हा नृसिंहाचा मुलगा. यानें मुरारिविजय नांवाचें नाटक लिहिलें आहे. यास शेषकृष्ण म्हणून जें कित्येक ठिकाणीं संबोधण्यांत येतें तें सर्वस्वीं चुकीचें आहे. यानें १६ व्या शतकाच्या उत्तरार्धांत रचलेल्या नाटकाची प्रत अलवार ग्रंथसंग्रहालयांत पाहावयास मिळते. उषापरिणयचंपु, सत्यभामापरिणय नाटक, सत्यभामाविलास नाटक व असे आणखी कांहीं ग्रंथ यानेंच तयार केले आहेत ( सी. सी. ). कृष्णपंडित व हा एक नव्हे, असें पीटर्सनचें ठाम मत आहे; कारण कृष्णपंडित हा १२ व्या शतकांत होऊन गेला.

**३.** ( स. १५७८–१६०८ ) हा एका विद्वत्कुलांत जन्मास आला. हा बल्लाळाचा दुसरा पुत्र होय. यानें भास्कराचार्यांच्या बीजावर बीजनवांकुर नांवाची टीका केली आहे. तीमध्यें यानें स्वतःच्या बुद्धिमत्तेवर नवीन युक्त्या सांगितल्या आहेत. टीकेंतील गणितामध्यें खानखान नामक प्रधानाचा जन्मशक १४७८ होता, हें उदाहरण घातलें आहे. खानखान हा शक १५०० च्या पूर्वी प्रधान होण्याचा संभव नाहीं. तरीपण रंगनाथानें केलेल्या उल्लेखावरून हा दिल्लीचा बादशहा जहांगीर याच्या दरबारीं मोठ्या मान्यतेस चढलेला मनुष्य होता असें दिसतें व त्यावरून त्याच्या टीकेचा काल शके १५०० पासून १५३० पर्यंतचा असावा ( भा. ज्यो. पा. २८३-८५ ).

**४.** ( स. १६५३ ) एक ज्योतिषी. करणकौस्तुभ या नांवाचा एक करणग्रंथ शके १५७५ या वर्षीचा आहे. तो अमक्या सिद्धांताच्या आधारें लिहिला असें जरी त्यांत म्हटलें नाहीं तरी पण त्यांतील ग्रहगति आणि क्षेपक ग्रहकौतुक यांत कांहीं फेरफार करून दिले आहेत.

या ग्रंथाच्या कर्त्याच्या वर्णनावरून कृष्ण हा मावळांत राहणारा असें दिसतें. हा देशस्थ ब्राह्मण होता. यानें तंत्ररत्न नांवाचा दुसरा मोठा ग्रंथ लिहिला आहे ( भा. ज्यो. पा. २९०-९१ ). याचा करणकौस्तुभ हा ग्रंथ शिवाजीमहाराजांच्या सांगण्यावरून लिहिला असून तो श्री. द. वि. आपटे यांनीं अनेक प्रतींवरून शुद्ध करून छापून प्रकाशिला आहे ( आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावली ग्रंथांक ९६ ). अशा प्रकारें महाराजांनीं ज्योतिर्गणित सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यापासून फलप्राप्ति कांहीं झाली नाहीं; त्यामुळें करणकौस्तुभ हा ग्रंथ लोकप्रचारांत आला नाहीं व त्या वेळीं प्रचलित असलेल्या ग्रहलाघवाचाच प्रचार चालू राहिला. पण त्यावरून ग्रहांचें आकाशांतील स्थान गणितानें आलेल्या स्थानाशीं मिळत नाहीं अशी याची खात्री झालेली होती, येवढें स्पष्ट दिसतें. कृष्ण दैवज्ञ यानें ग्रहलाघवाच्या गणितावर असा आक्षेप घेतला कीं, त्यांत केलेलें गणित 'ज्या' आणि 'चाप' ह्यांविरहित केलें आहे. म्हणून तें स्थूल झालें ( शिवाजी निबंधावली २ पृ. १३६ ).

**५.** ( स. १७२७–१७३२ काव्यकाल ) एक हिंदी कवि. हा माथुर चौबे असून बिहारीचा पुत्र होता. यानें राजा आयामल्ल याच्या आज्ञेवरून 'बिहारी सतसई' ही टीका लिहिली; व आयामल्लाचीहि यानें प्रशंसा केली आहे. वरील टीका यानें दोह्यांत लिहिली असून त्यांत काव्यगुण चांगला दिसून येतो. याच्या सवायाहि सहृदयता व रचनाकौशल्य यांनीं युक्त आहेत.

**कृष्ण कलचुरी**—हा कल्याणीच्या कलचुरी शाखेचा संस्थापक. नंतर जोगम गादीवर आला. चेदीच्या कलचुरी घराण्यापैकीं एक. हा नाशिकजवळ राज्य करीत होता. याचा पुत्र शंकरगण हा पांचव्या शतकांत असावा.

**२.** याच घराण्यामध्यें आणखी एक कृष्ण झालेला असावा. हा त्रिकलिंगाचा राजा होता. याला कन्न, कर्ण असेंहि म्हणत असत ( स. १०४२, एपि. इंडि. २. २९७ ).

**कृष्णकविशेखर**—संस्कृत नाटककार. यानें 'कुवलयवती' नांवाची नाटिका लिहिली आहे. हिच्यांत माधव म्हणजे कृष्ण आणि कुवलयवती यांच्यांतील प्रणय व राधेचा मत्सर यांवर टीका केली आहे.

**कृष्ण काकतीय**—(स. १३४४–७०) हा प्रतापरुद्र काकतीयाचा मुलगा. याला वीरभद्र म्हणत. हा वरंगळ जवळ राहत होता. स. १३३९–४० मध्यें मुहम्मद तुघ्लकनें देवगिरी हें आपलें मुख्य शहर करण्याचें ठरविलें, व वरंगळचा राजाविरुद्ध जाऊन तैलंगणवर स्वारी करून माबरकडे जाण्याचें ठरविलें. हा पहिल्या बुक्काचा समकालीन होता.

यानें कर्नाटक राजा बल्लाळदेव याची मदत मागितली. त्यानें व दुसऱ्या इतर राजांनीं मदत देण्याचें ठरविलें. सर्व एकत्र होऊन मुसलमानांना धुडकावून लावलें, फक्त दौलताबाद दिल्लीच्या बादशहाच्या स्वाधीन राहिलें. पण हा विजय चिरकाल टिकला नाहीं.

परत स. १३७० मध्यें हा व विजयनगरचा राजा या दोघांनीं आपले प्रांत फिरून मिळविण्याचा शेवटला प्रयत्न केला, व दिल्लीच्या बादशहास वकीलाबरोबर निरोप पाठविला कीं 'आमचें नुकसान भरून देतां कीं लढाई करूं?' परंतु दिल्लीचा बादशहा मुहम्मदशहा यानें माणसाच्या

अभावीं व पैशाच्या अभावीं १८ महिने अळमटळम् करून दिवस घालविल्यावर एकदम मोठी रक्कम यांच्याजवळ मागितली. यांनीं ती साहजिकच नाकारल्यामुळें तैलंगणावर स्वारी केली; व हिंदूंचा पराजय करून आपलें राज्य प्रस्थापित केलें. हा मुसलमानांना विरोध करणारा दक्षिणेंतील एक मोठा राजा होता. पण दक्षिण निर्यवन करण्याचा याचा प्रयत्न अयशस्वी झाला. हा कृष्ण नाईक या नांवानेंहि प्रसिद्ध आहे.

**कृष्णकान्त विद्यावागीश**—( स. १७८० सुमार ) हा रामनारायण तर्कपंचाननाचा शिष्य असून तर्कशास्त्र व अलंकारशास्त्र या दोन्ही शास्त्रांत पारंगत होता. ह्यानें खालील ग्रंथ लिहिले आहेत:—

१ न्यायरत्नावली. २ दायभागटीका. ३ गोपाललीलामृत. ४ चैतन्यचंद्रामृत. ५ कामिनी-काम-कौतुक. ६ उपमान-चिंतामणि-टीका. ७ शब्दशक्तिप्रकाशिकाटीका.

हा काश्मीरच्या महाराज गिरीशचंद्र याचे वेळीं होऊन गेला. याला आपल्या ज्ञानाचा फार गर्व होता ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४८४-८५ ).

**कृष्णगुप्त**—माळव्याच्या गुप्त घराण्यापैकीं पहिला राजा होय. याचीच मुलगी हर्षगुप्ता ही आदित्यवर्मनला ( स. ५००-५२५ ) दिलेली होती.

**कृष्णजोशी संगमेश्वरकर**—कोल्हापूरच्या जोशीरावांचा पूर्वज होय. हा पानपतच्या युद्धांत हजर होता. यानें पानपतच्या युद्धाचे वेळीं मराठ्यांची फौज जोरांत असून अब्दालीची काय दुःस्थिति आहे, याचें वर्णन केलें आहे ( ५ नवं. १७६० ). हा ८ नवंबराला त्याच युद्धांत तोफेचा गोळा लागून मरण पावला ( राजवाडे प्रस्तावना पा. ८२-८३ ).

**कृष्णडिंभ विराट**—( स. १६०२ सुमार ) हा उपाध्य आम्नायांतील मयंकराजाचा शिष्य. महानुभाव कवि. यानें कृष्णमुनि ऊर्फ कविडिंभ हें नांव धारण केलें होतें. यानें भगवद्गीतामाहात्म्य, फलटणमाहात्म्य, ऋद्धिपूरमाहात्म्य व कृष्णजन्माष्टमी इत्यादि ओवीबद्ध प्रकरणें रचिलीं आहेत. साधनामृतस्तोत्र, तीर्थमालिका इत्यादि श्लोकबद्ध रचनाहि बरीच केली आहे. यांशिवाय याचीं पदें, धावे वगैरे स्फुट रचना बरींच आहे. याचा विशेष प्रसिद्ध ग्रंथ रुक्मिणीस्वयंवर हा होय. हा ग्रंथ श्लोकबद्ध असून नवखंडात्मक आहे. याला नवखंडरुक्मिणीस्वयंवर असें म्हणतात. शिवाय कल्पद्रुम असेंहि नांव आहे.

फलटणमाहात्म्यांत श्रीचक्रपाणी यांच्या चरित्रविषयक वर्णन असून ग्रंथाचे १३ अध्याय आहेत. ऋद्धिपूरमाहात्म्यांत श्रीगोविंदप्रभूचें चरित्र असून दहा अध्याय आहेत. यांचे पांच धावे वाचले कीं श्रीसमर्थांच्या 'धांवरे रामराया। किती अंत पाहासी' इत्यादि धाव्यांची आठवण होते. यानें रुक्मिणीस्वयंवरांत अक्षरगणात्मक व मात्रागणात्मक अनेक वृत्तें योजिलीं आहेत. त्यांत आपणांस पांच अक्षरांपासून सव्वीस अक्षरांपर्यंत एकेका चरणांत अक्षरें आहेत अशीं वृत्तें सांपडतील. अगदीं अपरिचित अशीं कितीतरी वृत्तें आढळतात. महानुभव कवींची ही स्वतंत्र वृत्ति वाखाणण्यासारखी आहे ( म. वा. इं. २.७६३.६५ ).

**कृष्णदत्त मैथिल**—(स. १७५१) सदाराम व आई आनंददेवी यांचा हा पुत्र होय. स. १७५१ मध्यें 'सांद्र कुतूहल प्रहसन,' ग्रंथाचा हा कर्ता असून राधारहस्य काव्य यानें रचलें आहे. बाजड जिल्ह्यांत भामतीय गांवांत हा राहत असे. धर्मवर्मन् राजाचा हा समकालीन होता ( सी. सी. ).

यानें कुवलयाश्वीय नांवाचें प्रहसन लिहिलें आहे. तसेंच दिवाकर पुरुषोत्तमाच्या समोर ज्याचा प्रयोग करण्यांत आला तें अन्योक्तिरूप पुरंजनचरित्र नाटक याचेंच होय.

**कृष्णदयार्णव**—( स. १६७४-१७४० ) हा कोपारूढ मुक्कामीं कऱ्हाडनजीक राहत असे. हा माध्यंदिनशाखी शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण असून कवि म्हणून यास लोक मान देत असत. याचें खरें नांव नरहरी. आईचें नांव बहिणा व बापाचें नांव नारायण. गोत्र गौतम. औरंगजेबाच्या धर्मच्छळामुळें याला गांव सोडून आंबें मुक्कामीं जावें लागलें. त्याच ठिकाणीं आनंदसांप्रदायी गोविंदानें यास उपदेश दिला. याचें टोपण नांव रूढ होण्याचें कारण म्हणजे हा मधुकरी मागत असतां 'कृष्णदयार्णव समर्थ' म्हणून म्हणत असे. हेंच नांव पुढें चालू झालें. खानदेशांतील पिंपळनेर मुक्कामीं कुटुंब निवर्तलें म्हणून दुसरें केलें. यांना पुढें वयाच्या ५० व्या वर्षी महारोग झाला; व त्यावर उपाय म्हणून भागवताच्या दशमस्कंधावर यांनीं श्रीधराच्या आधारें हरिवरदा नांवाची प्राकृत टीका लिहिण्यास सुरुवात केली. हे टीका सांगत व उत्तमश्लोक हे लिहीत. पूर्वार्ध शके १६५६ श्रावण व. अष्टमीस संपविला.

यांचे ग्रंथ—दत्तजननोत्साह, विचारचंद्रिका, हरिवरदा ( टीका ), तन्मयानंदबोध.

'स्वानंदस्वामीस श्रीशिवाजीमहाराजांनीं साधूच्या सेवेपासून होणाऱ्या आत्महितबुद्धीनें रायगड किल्ल्यावर नेऊन ठेविलें; व त्यांचा योगक्षेम चालवून त्यांची भक्तिपूर्वक

सेवा केली. तेथें छत्रपतींच्या सरदारींत पालखीचे धनी कोणी गोविंदराव या नांवाचे ब्राह्मण होते. त्यांचें पूर्वपुण्य फळास येऊन त्यांनीं स्वानंदस्वामीची सेवा केली व उपदेश घेऊन विरक्त झाले.' अशी यांनीं आपल्या गुरूची माहिती दिली आहे ( हरिवरदा उत्तरार्ध, अ. ९० ).

शिवभूपती पावतां मुक्ति । दक्षिणे येवोनि ताम्रपती ।
केली विजयपुरा समाप्ति । महाविपत्ति राष्ट्राते ॥
( हरिवरदा पूर्वा. १. ३२ ).

असें शिवाजीचा मृत्यु, औरंगजेबाची स्वारी व विजापूरच्या बादशाहीची समाप्ति यांचें यानें वर्णन केलें आहे.

हे आपल्या हरिवरदा ग्रंथाचा ८७ वा अध्याय लिहीत असतां पैठणास मार्गशीर्ष शु. ५ शके १६६२ (स.१७४०) रोजीं समाधिस्थ झाले. पण यापूर्वीच यांचा रोग बरा झाला होता. हा ग्रंथ पूर्ण होण्यास १६ वर्षे लागलीं. हा ग्रंथ चांगला आहे. यांचे बरेच अभंग आणि पदें उपलब्ध आहेत. उत्तमश्लोकानें पुढील अध्याय लिहिले. पैठण येथें वरील गुरुशिष्यांच्या समाधी जवळ जवळ आहेत ( म. क. च. १ पा. २७०-२८८ ).

**कृष्णदास ( गोविंद )** – ( स. १७८५-१८०८ ) मराठी कवि. हा स्वतःला अज्ञान कृष्णदास म्हणवितो. गुरु-हरिदास कान्हा. ग्रंथ-बालक्रीडा, रासक्रीडा, भस्मासुरवध, रुक्मिणीस्वयंवर, अश्वमेधपर्व, अंबास्तुति, शिवरात्रीचरित्र, कृष्णजन्म, गरुडगर्वपरिहार ( सं. सू. ).

२. हा मराठी कवि मुद्गल कृष्णदासाच्या वेळींच होऊन गेला. याचीं महाभारतांतील निरनिराळ्या कथानकांवर रचिलेलीं प्रकरणें आढळतात. याचें स्वतःचें नांव विश्वनाथ असावें, असें याच्या 'अभिमन्युविवाहा'तील उल्लेखावरून वाटतें. केव्हां केव्हां हा आपणांस 'विप्र-विप्रदास' असेंहि म्हणवितो. या अभिमन्युविवाहाचे सात अध्याय असून याची ग्रंथसंख्या जवळ जवळ अडीच हजार आहे.

३. यास कोणी बिहारी कृष्णदास असेंहि म्हणतात. यानें बादशहा अकबर याच्या आग्रहावरून फार्सीकोश किंवा फार्सीप्रकाश नांवाचा ग्रंथ लिहिला ( पीटर्सन ).

४. कृष्णदास नामा व विष्णुदास नामा हे एकच ( सं. सू. ).

५. कथासारामृत या मराठी ग्रंथाचे कर्ते ( सं. सू. ).

६. (स. १५९८ सुमार ) हा एकनाथाच्या वेळीं होऊन गेला व याचें नांव कृष्णदास लोळ्या असें महिपती व इतर चरित्रकार सांगतात. पण हा आपलें नांव 'कृष्णदास मुद्गल' असें आपल्या ग्रंथांत सांगतो. यानें रामायण युद्धकांड मराठींत लिहिण्यास सुरुवात केली. पण तो पूर्ण होण्यापूर्वीच आपण मरणार असें यास वाटूं लागलें. तेव्हां यानें एकनाथास तो ग्रंथ पुरा करण्यास विनंति केली. कृष्णदासाचा दृढनिश्चय व ग्रंथ पुरा करण्याची उत्कट इच्छा पाहून एकनाथानें सांगितलें कीं, " आपण असें हताश होऊं नये. 'तुम्ही आरंभिला ग्रंथ बरा । हा आपुल्याच मुखें पूर्ण करा ॥' ग्रंथ पूर्ण होईपर्यंत तुम्हांस काळाचें मुळींच भय नाहीं." हें ऐकून कृष्णदासास धीर येऊन रात्रंदिवस श्रम घेऊन यानें आपला ग्रंथ पूर्ण केला व नंतर लागलाच हा मृत्यु पावला. हा जर कृष्णदास लोळ्या नसेल तर कृष्णदास लोळ्या हा एक अगदीं स्वतंत्र कवि समजला पाहिजे. कृष्णदास मुद्गलाचें रामायण-युद्धकांड हल्लीं उपलब्ध आहे. याचे ७८ प्रसंग अथवा अध्याय असून याची ग्रंथसंख्या सुमारें दहा हजार आहे. हा पैठण येथील राहणारा. याच्या बापाचें नांव नृसिंह. याचें स्वतःचें नांव मुद्गल असून गुरूचें नांव 'कृष्ण' असें असलें पाहिजे. यानें आपला ग्रंथ वाल्मीकि रामायणाच्या आधारेंच लिहिला आहे. याची भाषासरणी साधारण मनोरम आहे. उपमादि अलंकारांनीं आपल्या ग्रंथाला उत्कृष्ट तऱ्हेनें नटवून यानें आपल्या ग्रंथाची रचना थाटाची करण्याचा यत्न केला आहे. या युद्धकांडाचीं पारायणें मराठेशाहींत किल्ल्याकिल्ल्यावर होत असत. रामरावणयुद्धाचे वेळीं रावण युद्धाला गेला तेव्हां कवि म्हणतो, " रावणू नोवरा केळवला । मुक्ति परणावया निघाला । म्हणोनि बाणीं मंडपू घातला । अवघें आकाश लोपलें ॥" ( म. सा. १. २७४-२७७ ).

महिपतीबाबांचे उल्लेखाप्रमाणें हा नाथापूर्वी एक वर्ष म्हणजे शके १५२० मध्यें समाधिस्त झाला ( सं. सू. ).

नाथचरित्रकार 'केशव' यानें, युद्धकांड पुरें होईपर्यंत आपणांस काळाची भीति नाहीं असा विश्वास उत्पन्न करून याच्याकडून युद्धकांड पुरें करून घेतल्याची कथा चांगली वर्णिली आहे.

७. (स. १५४२ सुमार) एक हिंदी कवि. हा वल्लभाचार्यांचा शिष्य असून विठ्ठलनाथाच्या 'अष्टछाप' मंडळापैकीं एक होय. हा शूर होता. हा आचार्यांचा फार आवडता होता. याला आचार्यांनीं मंदिराचा मुख्य केलें.

याचा 'जुगलमानचरित्र' नामक छोटासा ग्रंथ प्रसिद्ध आहे. याशिवाय यानें भ्रमरगीत, आणि प्रेमसत्त्वनिरूपण असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. याच्या फुटकळ कविता पुष्कळ सांपडतात. सूरदास आणि नंददास यांच्यापेक्षां याच्या कविता हलक्या दर्जाच्या होत.

८. ( स. १७९५ सुमार ) एक हिंदी कवि. हा मिर्झापूरचा राहणारा व कृष्णभक्त होता. माधुर्यलहरी नांवाचें ४२० पानांचें पुस्तक यानें लिहिलें. याची कविता मध्यम आहे.

९. ( सार्वभौम भट्टाचार्य ) ( स. १५७५ च्या सुमारास ) यानें पुढील ग्रंथ लिहिले–१ तत्त्वचिंतामणि–दीधि-ति-प्रसारिणी' हा ग्रंथ रघुनाथाच्या टीकेवरील टीका होय. २ 'अनुमानालोकप्रसारिणी' हा ग्रंथ जयदेवाच्या आलोक ग्रंथावर टीका आहे ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पृ. ४६८ ).

**कृष्णदेव यादव**—( स. १२४७–६० ) हा यादव घराण्यांतील दुसऱ्या सिंघण यादवाचा नातु व दुसऱ्या जैत्रपाल ऊर्फ जैतुगीचा मुलगा. हाहि पराक्रमी होता. यानें गुजराथेवर स्वाऱ्या केल्या आणि पुष्कळ यज्ञ केले. मालवा व कोंकण वगैरे भागांतहि यांचा दरारा होता. याचा मंत्री लक्ष्मीदेव म्हणून होता, त्याच्या नंतर जल्हण हा मंत्री झाला. हा फार विद्वान् होता. याच्या वेळीं संस्कृत विद्येची भरभराट होती. याला कन्ह, कन्हार व कंधार असें म्हणत. जैत्रपाळ अल्पवयी मेल्यामुळें सिंघणाच्या मागाहून हाच गादीवर आला. याच्याच पदरच्या अमलानंदानें वेदान्तसूत्रावर टीका लिहिली आहे.

**कृष्णदेवराय तुलुव**—( स. १५०९–१५२९ ) हा विजयनगरच्या तुलुव घराण्यांतील इम्मडी नरसा किंवा नरसिंह याचा पुत्र होय. याच्या आईचें नांव नागलाई.

हा स. १५०९ मध्यें विजयनगरच्या गादीवर बसला. हा विलक्षण व असामान्य पुरुष होता. महाराजाधिराज, सिंहासनाधीश्वर इत्यादि यास पदव्या होत्या. तसाच हा कर्तृत्ववान्, स्वतंत्र, निरंकुश सत्ता व अधिकार चालविणारा, स्वतःचें वजन व महत्त्व कायम ठेवणारा, प्रभाववान् व प्रतापी राजा होता, असें वर्णन 'पायेस' नें केलें आहे. हा मोठ्या पहांटे उठून मुद्गल, जोडी व दांडपट्टा यांचे हात करी; आणि त्यायोगें शरीरांतील सर्व स्नायू व पुठ्ठे भरदार व प्रेक्षणीय ठेवीत असे. हा पटाईत घोडेस्वार होता. याचें शरीर, रूप व चर्या भव्य असून याच्याशीं प्रसंग पडणारावर याची चांगलीच छाप बसत असे. पदरच्या अवाढव्य फौजेचें आधिपत्य हा स्वतः करी. हा फारच शूर, योग्य राजकारणी असून मनाचा उदार, अंतःकरणाचा कोमल व स्वभावाचा दिलदार होता. त्याचप्रमाणें हा फार लोकप्रिय होता. याच्या अमलाखालीं बहुतेक सारें दक्षिण हिंदुस्थान होतें.

याच्या कारकीर्दीत याचा व पोर्तुगीज लोकांचा संबंध वारंवार आलेला आहे. याच्या कारकीर्दीत इस्माईल आदिलशहाशीं एक भली मोठी लढाई रायचूरच्या किल्ल्याबद्दल रायचूरच्या आसपास झाली. या लढाईंत यानें मुसलमान लोकांचा पूर्ण पाडाव केला. या पराजयामुळें मुसलमानांना चांगलाच वचक बसला.

यानें बरींच सार्वजनिक कामें करून लोकप्रियता संपादिली. यानें जमीनींची सुधारणा करून पाटबंधारे बांधले आणि पाण्याचा मुबलक पुरवठा केला. यानें स. १५२१ मध्यें 'कोरंगल'–कुरवीगड्डा—येथें तुंगभद्रेला भलें मोठें धरण बांधलें. याशिवाय यानें विजयनगरचा राजा नरसिंहाचा प्रचंड १६ फुटी पुतळा बसविला व त्याच्या पुजाअर्चेसाठीं जमीन लावून दिली. तुलुव घराण्यांतील हा सर्वांत मोठा राजा होय. हा स. १५२९ च्या २८ जुलै–२८ डिसेंबरच्या दरम्यान मेला. हा अच्युतरायाचा सावत्र भाऊ. याच्यानंतर अच्युतराय गादीवर बसला. याला या घराण्यांतील पहिला राजा समजतात.

याचा पुत्र तिरुमल्ल हा लहानपणींच मृत्यु पावला. याची मुलगी तिरुमल्लांबा ही रामराय अरविदूची पत्नी. आणि याची दुसरी मुलगी वेंगला ही रामरायाचा भाऊ तिरुमल्ल याची पत्नी.

**कृष्णधूर्जटि दीक्षित**—( स. १७७४ ) व्यंकटेश दीक्षिताचा पुत्र. यानें तर्कसंग्रहावर सिद्धान्तचंद्रोदय नांवाची संस्कृत टीका लिहिली. ही टीका विक्रमपट्टणच्या गजसिंहाचा पुत्र राजसिंहाकरितां लिहिली ( सी. सी. ).

**कृष्णनाथ सार्वभौम भट्टाचार्य**—हा दुर्गादास चक्रवर्तिन्चा पुत्र. याचें आनंदलतिका नांवाचें एक छायानाटक आहे. या नाट्यकाव्याचें पांच कुसुमें असून त्यांत सम व रेवा यांच्या प्रणयाची कथा आहे.

**कृष्ण नृसिंह शेष**—हा महाराष्ट्रीय पंडित अकबराचे वेळीं काशींत होता. यानें शूद्राचारशिरोमणी नांवाचा ग्रंथ लिहून कलियुगांत क्षत्रियांचें अस्तित्व नाहीं असें प्रतिपादन केलें. या ग्रंथाची १–१–१६७२ रोजीं नक्कलेली प्रत बडोद्याच्या लायब्ररींत आहे. पिलाजी नामक राजाचे विनंतीवरून आपण हा ग्रंथ लिहिला असें हा म्हणतो. हा कायस्थांची निंदा करतो. याच्या मताचें खंडण करण्याकरितां शिवाजी महाराजांनीं विश्वेश्वरभट्ट ऊर्फ गागाभट्ट यास हाताशीं धरलें.

**कृष्णप्पा** ( कृष्णराय )—हा विजयनगरच्या रामरायाचा पुत्र. हा रामरायास तिरुमल्लांबिका राणीपासून झाला.

२. ( स. १५७३ मृ. ) हा कुमार कृष्णप्पा या नांवानें विशेष प्रसिद्ध आहे. आर्यनाथानें सिलोनवर स्वारी केली आणि तो लढाईत मारला गेला. नंतर याच्याकडे सिंहली लोकांचें आधिपत्य आलें. हा स. १५७३ मध्यें मरण पावला.

३. हा बेल्लरचा एक नायक होय. विजयनगरचा पहिल्या रंग राजाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस हा बालम घराण्याचा पुढारी होता.

याच्यानंतर बेल्लूरच्या गादीवर याचा मुलगा वेंकटाद्रि नायक हा आला.

४. ( मृ. स. १६०१ ) हा मदुरेच्या विरप्पा नायकाचा दुसरा मुलगा. हा आपला भाऊ विश्वप्पा नायक याच्यानंतर मदुरेच्या गादीवर आला. याशिवाय याला कस्तुरी रंगप्पा नायक या नांवाचा एक भाऊ होता.

हा मोठा धार्मिक आणि पवित्र होता. हा दररोज न्यायदानाचें काम करीत असे. त्रावणकोरचा राजा याचा मांडलिक होता. पुढें हा आपल्याला 'पांड्य राजा' असें म्हणवून घेत असे. याची व पांड्य राजाची मैत्री त्या वेळीं चांगली जुळली होती.

याचे व विजयनगरच्या दुसऱ्या वेंकट राजाचे संबंध चांगल्या प्रकारचे नव्हते. तेव्हां वेंकट राजानें याच्यावर बऱ्याचशा सैन्यानिशीं स्वारी केली, त्या वेळीं यानें आपण वेंकट राजाशीं तोंड देण्यास असमर्थ आहोंत असें जाणून त्याचें वर्चस्व कबूल केलें आणि खंडणी देण्यास तयार झाला.

याचा राज्यकारभार साधारण बरा झाला. पण याची कारकीर्द फार मोठी न होतां हा स. १६०१ मध्यें मरण पावला.

**कृष्णभट्ट आद्य**--( स. १७२० सुमार ) या महाराष्ट्रीय तर्कज्ञानें 'गदाधरी' या ग्रंथावर 'गदाधरी-कार्षिका' व शिरोमणीच्या तत्त्वचिंतामणीवर एक अशा दोन टीका लिहिल्या आहेत. हा बनारस येथें मरण पावला. याची उपरिनिर्दिष्ट टीका तेलगू भाषेंत प्रसिद्ध झाली आहे ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा.४८६ ).

**कृष्णमिश्र**—यानें प्रबोधचंद्रोदय नांवाचें उपदेशपर नाटक चंदेल्लवंशी कीर्तिवर्मन् राजाकरितां लिहिलें. हें नाटक लिहिण्याचा काल स. १०५० ते ११९६ हा अदमासें ठरवितां येतो. यानें आपल्या नाटकांत शंकराचार्यांचें अद्वैतमत सर्वांत श्रेष्ठ कसें आहे हें प्रतिपादन केलें आहे. त्याकरितां जैन, बौद्ध, कापालिक वगैरेंचें वर्णन तत्कालीन परिस्थितीची कल्पना देणारें केलें आहे.

प्रबोधचंद्रोदय नाटकाच्या उपोद्घातांत असें म्हटलें आहे कीं, गोपाळाच्या शिफारशीनें राजा कीर्तिवर्मन्च्या समोर त्या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. सदरहू गोपाळ यानें चेदि राजा कर्ण याचा पराभव झाल्यानंतर कीर्तिवर्म्यास त्याचें गमाविलेलें राज्य फिरून प्राप्त करून दिलें होतें. यावरून कीर्तिवर्मन् हा जेजाकभुक्तीचा चंदेल्ल राजा जो कीर्तिवर्मन् तोच होय. या चंदेल्ल राजाचा देवगड येथें स. १०९८ मधला एक शिलालेख उपलब्ध आहे. महोबा शिलालेखावरून या चंदेल्ल राजानें लक्ष्मीकर्ण म्हणजे त्रिपुरीचा चेदि राजा कर्ण याचा पराभव केला होता. या चेदि राजाचा स. १०४२ मधला एक शिलालेख उपलब्ध आहे. विक्रमांकदेवचरित ( १८.९३ ) यांत कर्णाला 'कालः कलिंजरागिरिपतेः' असें म्हटलें आहे, व हें वर्णन कृष्णमिश्राच्या लिहिण्याशीं बरोबर जुळतें. गोपाळ कोण होता याविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. महेश्वर टीकाकार म्हणतो कीं तो कीर्तिवर्मनचा सेनापति असून ब्राह्मण होता. तें कांहीं असलें तरी कृष्णमिश्र हा ११ व्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला असला पाहिजे असें दिसतें.

**कृष्णमुनि**—मराठी कवि. काव्य चेंडूफळी ( ले. श. १७१६ ). हा मानभाव असावा ( सं. सू. ).

**कृष्णमूर्ति**—हा जातीचा तेलंगी ब्राह्मण असून, शिष्टवारु कुळांतील होता. हा मद्रासमधील रामचंद्रपूरचा राहणारा होय.

यानें यक्षानंद नांवाचें तेलगू नाटक रचलें. हा शालिवाहन १७२५ व्या शकांत असावा असें अनुमान आहे ( क. च. ).

२. मराठी कवि. आनंदमूर्तीचे पुत्र. गुरुपरंपरा-दत्त-दासोपंत-अवधूत-विश्वंभर-कृष्णमूर्ति. ग्रंथ-समश्लोकीगीता, सुलभवेदान्त ( ले. श. १६८० ) ( सं. सू. ).

**कृष्ण याज्ञवल्की**—( स. १५४८-१६१३ सुमार ) हा महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध कवि होय.

याचें गोत्र कौंडिण्य असून आईबापाचीं नांवें कमळा व अंबाजी अशीं होतीं. याच्या गुरूचें नांव अनंत असून कथाकल्पतरु ग्रंथ यानें नाशिक येथें लिहिला. याची भाषा, साधी, सरळ व सोपी आहे ( गोपाळ याज्ञवल्की पाहा ). याची कुलदेवता-रेणुका, म्हाळसा. याचा भक्तविजयाच्या ५७ व्या अध्यायांत निर्देश आहे. याचे ग्रंथ-रुक्मांगदाख्यान, देवीमाहात्म्य व कथाकल्पतरु ( भागवत ) ( सं. सू. )

याच्या कथाकल्पतरूचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. त्यांपैकीं पूर्वार्ध मात्र कृष्णयाज्ञवल्कीनें

लिहिला होता. यांत सात स्तबक अथवा भाग आहेत. यांत एकट्या सातव्या स्तबकाचीच ग्रंथसंख्या २९४६ आहे. या ग्रंथांत अनेक पौराणिक कथा सांगितल्या आहेत. प्रचलित कथांपेक्षां या कवीनें सांगितलेल्या कथांत पुष्कळ फेर आढळतो. या ग्रंथांत भूगोलवर्णन, सूर्याच्या गति, चारी वर्ण व सर्व जातींची उत्पत्ति वगैरे विषयांहि वर्णिले आहेत. याची भाषा अगदीं सरळ आहे ( म. सा. १. २७८ ).

**कृष्णराज ओडेयर**—( स. १७९९-१८६८ ) म्हैसूरचा राजा. बेट्टादचा पुत्र. याच्या पूर्वी म्हैसूरचें राज्य टिपू सुलतानाकडे होतें. परंतु इंग्रजांनीं व निजामानें मिळून टिपूशीं युद्ध केलें. त्या युद्धांत टिपूचा पराभव होऊन तो मारला गेला. तेव्हां इंग्रजांनीं व निजामानें याचें राज्य आपल्या ताब्यांत घेऊन त्यांतील कांहीं स्वत:स घेऊन बाकीचा प्रांत म्हैसूरच्या हिंदु राजाचा वंशज जो कृष्णराज ओडेयर यास देऊन याला म्हैसूरच्या गादीवर बसविलें ( स. १७९९ ).

हा तीन वर्षांचा असतांना गादीवर आला. हा अल्पवयी असल्यामुळें इंग्रजांनीं टिपूचा मंत्री जो पूर्णय्या त्यास याचा कारभार पाहण्यासाठीं नेमिलें. यानें आपल्या पुढील आयुष्यांत राज्याची उत्तम प्रकारें व्यवस्था ठेवली व नवीन सरदार निर्माण केले. यास संतति नसल्यानें यानें चामराजेंद्र नांवाच्या मुलास दत्तक घेतलें. हा ता. २७ मार्च १८६८ त मरण पावला. मरणसमयीं याचें वय ७२ वर्षांचें होतें ( बील ).

**कृष्णराज परमार**—आबूच्या परमारांपैकीं आरण्यराजाचा पुत्र. याला कान्हडदेव असेंहि म्हणत. हा या वंशांतील पहिला कृष्णराज होय.

बाराव्या शतकाच्या सुमारास खोदलेल्या उदेपूर प्रशस्तीमध्यें याच्या पूर्वीच्या कांहीं राजांची नामावळि दिली आहे. पण ती विश्वसनीय दिसत नाहीं. ब्यूलरसाहेबांनीं परमारांसंबंधीं सर्व लेख विचारांत घेऊन वंशावळ व माहिती दिली आहे व याचा उदयकाल स. ८०० ठरविला आहे ( इंडि. अँटि. १.२२३ ). पण चिं. वि. वैद्यांच्या मतें हा इ. स. ९१० च्या सुमारास स्वतंत्र राजा असला पाहिजे ( म. यु. भा. २.१९६ ). याला महाराजाधिराज परमेश्वर अशीं बिरुदें लावलेलीं आहेत. माळव्याची व आबूची या दोन्ही परमारांच्या शाखा याच्यापासूनच सुरू झाल्या असाव्यात.

**२.** ( स. १०५९-६५ ) आबूच्या परमारांपैकीं धुंधुकाचा दुसरा पुत्र. गुजराथच्या पहिल्या भीमदेव सोलंकीनें याला कैद केलें होतें, पण नाडौलच्या बालप्रसाद चौहानानें याला मुक्त केलें ( एपि. इंडि भा. ९, पृ. ७५-७६ ). याच्या वेळचे दोन शिलालेख भीनपाल येथें मिळाले आहेत. त्यांपैकीं एक वि. सं. १११७, आणि दुसरा वि. सं. ११२३ मधला आहे ( स. १०६० व १०६६ ). याच्यापासून आबू व केराडू अशा दोन शाखा वेगळ्या झाल्या असें दिसतें. याच्यापर्यंत आबूच्या परमारांची वंशावळ शृंखलाबद्ध मिळते. पुढली वंशावळ वास्तुपालाचा भाऊ तेजपाळानें बांधलेल्या आबूवरील देलवाडा येथील लूणवसही नांवाच्या नेमिनाथ मंदिराच्या प्रशस्तींत मिळते. ती वि. सं. १२८७ ( स. १२३० ) मधील आहे. परंतु ती पुरी नाहीं. तींत लिहिलें आहे कीं, परमारवंशांत धंधुक, ध्रुवभट इत्यादि राजे झाले. पुढें रामदेव झाला. रामदेवापासून तेथें वंशावळ सुरू आहे. आदि पदावरून रामदेवाच्या पूर्वी कांहीं पुरुष झाले असावेत. पण त्यांची माहिती उपलब्ध होत नाहीं, तोंपर्यंत कृष्णराजानंतर कांहीं पिढ्या राहतात, असें समजलें पाहिजे. त्यानंतर रामदेवापासून वंशावळ मिळते आहे ( रा. इ. पा. १७५ ).

**३.** ( स. १२३५ नंतर ) आबूच्या परमारांपैकीं सोमसिंहाचा पुत्र. याला कान्हडदेव असेंहि म्हणत.

**४.** याचें दुसरें नांव उपेन्द्र असें आढळतें. उदयपूरच्या प्रशस्तींत याच्याविषयीं लिहिलें आहे कीं, यानें पुष्कळ यज्ञ केले आणि आपल्या पराक्रमानें मोठा राजा झाला ( एपि इंडि. भा. १ पृ. २३४ ). यापासून माळव्याचें परमारघराणें सुरू झालें असावें.

**कृष्णराम**—कालिकाल नांवाच्या प्रसिद्ध गुजराथी कवितेचा कर्ता.

**२.** गुजराथी कवि. मेवाडी ब्राह्मण. यानें शिक्षा नांवाचा गुजराथींत एक ग्रंथ केला आहे ( का. दो. )

**कृष्णराय**—संस्कृत नाटककार. सोळाव्या शतकांत होऊन गेलेल्या कृष्णराय नाटककारानें आपल्या पंचांकी 'जांबवतीकल्याण' या नाटकामध्यें कृष्णाच्या जांबवतीबरोबर झालेल्या विवाहाच्या कथेसंबंधीं वर्णन केलें आहे.

**कृष्णराव नारायणराव जोशी**—याचा बाप नाना जोशी म्हणून बारभाईचे तर्फेनें नागपूरकडे संधान ठेवण्याच्या कामगिरीवर असून बापलेकांचीं पत्रें दहाव्या खंडांत आहेत ( म. इ. सा. ले. १२२-१३० व १६५ ). हा नाना फडणिसाचे तर्फेनें अनेक कामांवर असून त्यांचे पश्चात् बाजीरावानें याला सातारकर छत्रपतीजवळ ठेविलें होतें ( का. सं. प. या. १८६ व ४८३ जुनी प्रत ).

हा इभ्रतीचा वकील असल्यामुळें नानानें याला मुद्दाम हैदराकडे पाठविलें. याचा पत्रव्यवहार म. इ. सा. या ग्रंथांच्या १९ व्या खंडांत छापलेला महत्त्वाचा आहे. नानानें जेव्हां हैदराशीं तह करून इंग्रजांविरुद्ध चौघांचें कारस्थान उभें केलें, तेव्हां हैदरानें मराठ्यांचा एक प्रतिष्ठित वकील सर्व कामें बोलून ठरविणारा असा पुण्याहून आपल्याकडे बोलाविला. तदनुसार कृष्णराव नारायणराव जोशी सातारकर यास इतमामानिशीं पुण्याहून रवाना केलें. हा गृहस्थ नारायणरावाचे वधानंतर बारभाईकडे अंतरंगांत असून साबाजी भोसले व निजामअली यांस दादाचे विरुद्ध बारभाईकडे खंबीरपणें ठेवण्याची कामगिरी करीत होता. म. इ. सा. खं. १० ले. ८९–१४२ या पत्रांत याचा उल्लेख वारंवार असून याचा बाप नाना जोशी साबाजी भोसल्याबरोबर नागपुराजवळ मारला गेला.

पुढें स. १७८१ मध्यें पुन्हां हा हैदरकडे गेला ( म. रि. उत्तर वि. १ ला ).

**कृष्णराव परशुरामपंत प्रतिनिधि** ( औंध )–– हा कोल्हापूरकरांचा प्रतिनिधि होऊन विशाळगडकरांचा मूळ पुरुष झाला.

**कृष्णराव पानशे**—( मृ. स. १७७७ ) परशुरामभाऊ धारवाडजवळचीं ठाणीं हस्तगत करूं लागला तेव्हां धारवाडच्या पूर्वेस ५० मैलांवर डंबळचें ठाणें हस्तगत करतांना लढाई होऊन कृष्णराव पानशे गोळी लागून पडला ( १७७७ सुमारास ). ( म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ४५२ ).

**कृष्णराव बलवंत**—( आप्पा बळवंत पाहा ).

**कृष्णराव बल्लाळ काळे**—( मृ. स. १७८६ ) हे नाना फडणवीस यांच्या विश्वासांतले गृहस्थ होत. पेशव्यांचे वकील म्हणून निजाम-दरबारीं यांची नेमणूक करण्यांत आली होती. हे राहणार काशीचे. पण दाक्षिणेंत येऊन बाबूजी नाईकातर्फे, नानासाहेबांच्या तर्फे पेशवे दरबारीं नोकरीस राहिले. दादासाहेब हे उत्तरेस स्वारी करण्यास गेले असतां हे त्यांचे बरोबर होते. यांची राजकारणांतील हुशारी पाहून पेशव्यांनीं यांस इनाम दिलें. पुढें निजामशाहींत वकिलीच्या हुद्यावर असतांना यांस १५ हजारांचा सरंजाम व पंधरा हजारांची जहागीर मिळून तीस हजारांची नेमणूक होती. निजामाकडूनहि यांस दहापंधरा हजारांची जहागीर मिळाली होती. हे हैदरावर केलेल्या स्वारींत होते. यांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे ( म. इ. सा. ३ ).

यांचा मुलगा गोविंदराव हा स्वामिनिष्ठ असूनसुद्धां रावबाजीनीं त्याच्या वाढलेल्या सव्वा लाख सरंजामापैकीं बराचसा जप्त केला. थोरल्या माधवरावानें याच्याकडून रघुनाथ दादाला पकडून बंदींत ठेवलें म्हणून धाकट्या बाजीरावाचाहि या घराण्यावर राग होता. याचा मृत्यु भाद्रपद व॥ प्रतिपदा शके १७०८ ( स. १७८६ ).

**कृष्णराव बापुराव पारसनीस**—हा पुण्याचा पारसीस. याचा पुत्र नारायण.

**कृष्णराव भगवंत अमात्य**—हे करवीरकर भोसल्याचे अमात्य. अमात्यपदप्राप्ति शके १६७५ व मृत्यु शके १६८३ ( लेखनालंकार. )

**कृष्णराव भगवंतराव खटावकर**-(मृ.स.१७१३) हे खटावचे राहणारे. हे मराठी राज्यांत यांनीं केलेल्या बंडाळींवरून बरेच प्रसिद्धीस आले. यांच्या पूर्वजांना निजामशाहींत पाटिलकी होती. हे माध्वमती वैष्णव होते. पूर्वज मूळचे कर्नाटकांतील राहणारे. ह्यांस लहानपणापासून विद्येचा फार नाद होता. यांना खटाव येथील जहागिरी दिल्लीकरांनीं दिली. परंतु यांचा वंश त्यांच्या वतनगांवीं गेला. हा फार शूर होता. यानें खटाव येथें असलेल्या मशिदीचा विध्वंस करून त्या ठिकाणीं दत्ताची स्थापना केली. त्यांत पुढें ग्रंथालयाची व्यवस्था करण्यांत आली.

हे विद्वानांचे चहाते होते व ग्रंथांचे भोक्ते होते. नवीन ग्रंथाचा उतारा घेण्यासाठीं बारा बारा लेखक यांचेजवळ असत. यांचें कुलदैवत खंडोबा होय. व्याकरण व न्याय ह्या दोन शास्त्रांत हे निष्णात होते.

कृष्णरावांची विष्णुसहस्रनामावलीवरील द्वैतमती संस्कृत टीका उपलब्ध आहे ( म. रि. म. १ पृ. ४३–४४ ).

शाहूराजे गादीवर बसते समयीं, हे ताराबाईच्या बाजूस होते. संभाजी महाराजांनंतर हे मोंगलांस जाऊन मिळाले व यांच्या साहाय्यानें मराठ्यांच्या राज्यांत धुमाकूळ घालणें त्यांना सोपें गेलें. मूळापासून हे बंडखोरच. पुढें शाहूमहाराजांनीं बाळाजी विश्वनाथास ह्यांच्यावर पाठविलें. कृष्णरावांनीं स्वपराक्रमाची कमाल केली, परंतु यांना गोळी लागून हे लढाईत पडले. त्या वेळीं यांच्या मुलासहि फार जखमा झाल्या व तो खटावकडे पळाला. परंतु मुलाची बायको फार शूर होती. तिनें लुगडें फाडून पट्ट्या बांधल्या व स्वतः तीर घेऊन युद्ध केलें, पण तिचा पराभव झाला. लढाई चालू असतां यांचा प्राण गेला. पुढें बाळाजीनें तिला सती जाण्यास परवानगी दिली. शाहूनें यांच्या वंशजास खटाव गांव इनाम दिला. त्याचप्रमाणें याचा भाऊहि पडला व पराभव झाला.

एकदां कोल्हापूरकर शिवाजीस पकडण्याचा बेत करून त्यास मोंगलांनीं घेरलें असतां यानें त्यास बगल दिल्यामुळें

निसटून जातां आलें. हा उपकार स्मरून शिवाजी कृष्णरावाच्या जहागिरीस उपद्रव करीत नसे. जेजुरीच्या खंडोबाचें देऊळ कृष्णरावानेंच बांधलें आहे. चंपाषष्ठीच्या दिवशीं पहिला नैवेद्य खटावकरांचाच झाला पाहिजे असा मान आहे. या वेळीं पौषमासीं देवाचें लग्न होतें तेव्हां अगोदर कांहीं दिवस देवास तेल लागतें त्या प्रसंगीं तेल लावण्याचा पहिला मान खटावकरांचा आहे. तो मान यांच्या उपाध्यांकडे चालू आहे.

मूळ पुरुष नारोपंत. ह्यास औरंगजेब बादशहानें स. १६८८ मध्यें कसबे खटाव येथील ठाणेदार नेमिलें. त्यांनीं दोन वर्षें तें काम केलें. नंतर त्यांचे चिरंजीव रामचंद्र नारोजी ह्यांनीं ८ वर्षें ठाणेदारीचें काम केलें. ते खटावास ठाणेदार असतां भोंसरगांवचे माळावर त्यांची व निंबाळकर यांची लढाई झाली. तींत ते मरण पावले.

पुढें त्यांचे नातू कृष्णराव भगवंत ह्यांस स. १६९८ त 'राजे'हा किताब मिळाला. त्यास तीन चिरंजीव होते. त्यांपैकीं वडील नारायणराव ह्यास शाहूमहाराजांनीं खटावची ठाणेदारी व गांव इनाम करून दिला. इनामाची सनद राजशक ५५ ( स. १७२८-२९ ) ची आहे.

विष्णुमूर्ति खटावास आहे. ती आडांत टाकलेली होती. ती काढून कृष्णरावानें तिची स्थापना केली ( ऐ. गो. पृ. ४५-४६ ).

**कृष्णराव माधव चिटणीस**—(स.१७८०-१८०३) जात प्रभु. हा चिमणाजी रखमांगद चिटणीसाचा भाचा. चिमाजीस पुत्र नसल्यामुळें त्यानें आपले मामाचा मुलगा यासच पुत्रवत् मानून आपले मागें चिटणिशी मिळावी अशी व्यवस्था केली ( अप्र. का.). सर्व सुभ्यावर चिटणिशीचे कामावर या घराण्यातर्फे कारकून जात असत.

स. १७८० त दु. रघुजीचे कारकीर्दीत चिमणाजी रखमांगद वारला व हा चिटणीस झाला.

ता. १०-२-१७९० रोजीं भवानी मुनशी मरण पावला. त्याचे मागें त्याची दिवाणगिरी त्याचा पुतण्या श्रीधर लक्ष्मण ऊर्फ बापू मुनशी यास मिळाली. त्याचे मदतीस यास रघूजीनें नेमिलें; व दोघांनींहि मिळून कारभार करावा असें ठरवलें.

कोलब्रुकनें केलेल्या रघूजीच्या वर्णनांत त्यानें म्हटलें आहे की, " श्रीधर लक्ष्मण मुनशी याच्या खालोखाल मर्जीतला मुत्सद्दी कृष्णराव चिटणीस हा आहे. याचेकडे राज्यांतील अंतर्गत कारभार आहे."

ज्या वेळीं यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी केली त्या वेळीं श्रीधर मुनशी व कृष्णराव हेहि पुण्यासच होते. त्यांचे मार्फत यशवंतरावानें पत्रें दिलीं होतीं, व त्यांत इंग्रजांविरुद्ध चढाई करण्याची वेळ आली आहे, असें स्वतःच सुचविलें होतें.

हा वऱ्हाडांत कुऱ्हा येथें स. १८०३ सालीं रघूजीबरोबर असतां मरण पावला. याचेच वंशज हल्लींचे नागपूरचे प्रसिद्ध चिटणीस हे होत ( ना. प्रां. इ. पृ. २१३ ).

**कृष्ण राष्ट्रकूट**—( स. ७११-७२ सुमार ) मालखेडच्या राष्ट्रकूट वंशांतील पहिल्या कर्काचा पुत्र. यास इंद्र, ध्रुव, नन्नराज असे तीन भाऊ होते. कर्काच्या मागें मालखेडचें राज्य इंद्रास मिळालें. पुढें इंद्र मरण पावल्यानंतर इंद्राचा पुत्र दंतिदुर्ग गादीवर आला. पण दंतिदुर्गहि अकालींच निपुत्रिक मरण पावला. तेव्हां हा त्याच्यामागून, ( म्हणजे आपल्या पुतण्यामागून ) गादीवर आला. ' हा आपल्या जुलमी पुतण्यास ( दंतिदुर्गास ) पदच्युत करून गादीवर आला ' असें कांहींचें मत आहे. पण तें चुकीचें आहे ( दंतिदुर्ग पाहा ). ' कृष्णानें आपल्या नातलगाचा पाडाव करून राज्य मिळविलें ' असा जो उल्लेख आहे तो बहुधा ' अंत्रोलि-चऱ्होली ' शिलालेखांत उल्लेखिलेल्या दुसऱ्या कर्क राजाचा असावा. कारण हा कर्क फार महत्त्वाकांक्षी असून दंतिदुर्गाच्या वेळेसच ' समधिगतपंचमहाशब्दपरमभट्टारक-महाराजाधिराज परमेश्वर ' हें बिरुद आपल्या नांवापुढें लावीत असे, व दंतिदुर्गाच्या मृत्यूनंतर हा आपणास उघड उघड ' सार्वभौम राजा ' म्हणवून घेऊं लागला. त्यामुळें कृष्णानें त्या कर्काचें पारिपत्य केलें असावें.

यास बऱ्याच प्रौढ वयांत मालखेडचें राज्य मिळालें. राज्यारोहणसमयीं ( स. ७५६ ) याचें वय जवळजवळ ४५ वर्षांचें असावें. दंतिदुर्गानें केलेल्या दिग्विजयांत हा त्याला प्रामुख्यानें मदत करीत होता. दंतिदुर्गानें चालुक्यांचा मोड करण्याचें काम आरंभिलें होतें, तें यानें शेवटास नेलें.

चालुक्यांचा मोड करून त्यांचें राज्य आपल्या राज्यास जोडल्यावर याची दृष्टि गंग राजाकडे वळली. त्या वेळीं श्रीपुरुष हा वृद्ध गंगराजा मन्न येथें राज्य करीत होता. कृष्णानें मन्न येथें त्याचा पुरा मोड केला.

गंगांचा मोड केल्यावर कृष्णाची दृष्टी वेंगी येथील चालुक्य घराण्याकडे वळली. यानें आपल्या मुलास ( गोविंदराज ) चालुक्यांवर पाठविलें. गोविंदराजानें चवथ्या विष्णुवर्धन चालुक्याचा मोड केला व त्या राज्याचा बराचसा भाग आपल्या राज्यास जोडला ( स. ७७२ ).

या सुमारास जवळजवळ सर्व मध्यप्रांत कृष्णाच्या अमलाखालीं आला होता.

यानंतर कृष्णानें दक्षिण कोंकणावर स्वारी केली व तेथील शिलाहार राजास आपलें मांडलिकत्व कबूल करावयास लावलें.

याच्या मृत्युकालासंबंधीं नक्की असें कांहींच सांगतां येत नाहीं. पण याचा मृत्युकाल साधारणतः स. ७७२ ते स. ७७५ च्या दरम्यान असावा. कारण ७७२ सालच्या तळेगांव शिलालेखांत याचें नांव आढळतें, पण स. ७७५ मध्यें खोदलेल्या पिंपरी येथील शिलालेखांत फक्त याच्या मुलाचेंच नांव आढळतें.

कृष्ण बराच कर्तबगार राजा होता. यानें आपल्या १८ वर्षांच्या अल्प कारकीर्दीत राज्याचा विस्तार जवळजवळ पूर्वीच्या तिप्पट वाढविला. यानें गंग व पल्लव या राजांचा पाडाव केला, व आपल्या पराक्रमाच्या योगानें यानें आपल्या घराण्याचा सर्व दक्षिणेंत बराच दरारा बसविला.

यानें वेरूळ येथील मनास थक्क करून सोडणारें शिवलेणें करविलें. तें एक डोंगर कोरून तयार केलें आहे.

याच्या पदरीं अकलंकदेव नांवाचा एक जैन कवि होता. परंतु पिटर्सन् रिपोर्ट नं. २, पा. ७९ मध्यें, 'अकलंकदेव हा कृष्ण राजाचा मुलगा असावा' असें प्रसिद्ध झालें आहे. पण ह्या म्हणण्यास पाहिजे तितका ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं (आळतेकरकृत राष्ट्रकूट, पा. ४०९).

यानें शके ६८० हेमलंबी संवत्सर अश्विन अमावास्येच्या सूर्यग्रहणानिमित्त पुणें प्रान्तांतील बोपखेल गांव (बोपखेल, ता. हवेली, जि. पुणें) पूगडिभट यास दिल्याचें वृत्त ताम्रपटांत आहे. यांत राष्ट्रकूट राजाची वंशावळ गोविंदराज, ककराज, इन्द्रराज, दन्तिदुर्ग व कृष्णराज अशी आहे, व हा अनुक्रम भांडारकरांच्या इतिहासांतील अनुक्रमाशीं सुसंगत आहे. दन्तिदुर्गानंतर त्याच्या मुलास किंवा वारसास बाजूस सारून किंवा मारून हा गादीवर आला असें भांडारकरांच्या सदर इतिहासांत म्हटलें आहे. त्याचा निर्णय करण्यांत या ताम्रपटांत साधन नाहीं पण हा ककराजाचा मुलगा असें मात्र यांत स्पष्ट म्हटलें आहे. याला शुभतुंग व अकालवर्ष अशींहि नांवें होतीं. श. ६८० अश्विनी अमावास्या (स. ७५८ ऑक्टोबर ६) रोजीं ग्रहण असल्याचें दीक्षित व पिले यांच्या जंत्रींत नमूद आहे. यांत पुणें प्रान्ताचा उल्लेख 'पुण्यविषयान्तर्गत' असा आहे. भा. मंडळाच्या श. १८३४ च्या इतिवृत्तांत पृ. ३७६ वर श. ६९० मधील कृष्णराजाचा दुसरा ताम्रपट छापला आहे. त्यांत 'पूनक-विषयान्तःपाति' असा पुणें प्रान्ताचा निर्देश आला आहे (मं. त्रैमा. ८. ३. पा.१६५–१६७).

२. (स. ८८०–९१४) मालखेडच्या राष्ट्रकूट वंशांतील पहिल्या अमोघवर्षाचा पुत्र. वारसासंबंधींचा कोणत्याहि तऱ्हेचा तंटाबखेडा न होतां याला निर्वेधपणें राज्य प्राप्त झालें. याचा राज्यारोहणाचा काल साधारणपणें स.८८० हा असावा (ईंडि. ऑंट. १२.२४७).

राज्यावर आल्यावर मात्र याला आपल्या शेजारच्या राष्ट्रांशीं बऱ्याच टकरा द्याव्या लागल्या. याचा मुख्य प्रतिस्पर्धी वेंगी येथील विजयादित्य चालुक्य होता. याच्या कारकीर्दीत राष्ट्रकूटांचे चालुक्यांशीं वारंवार संबंध येऊं लागले. त्याबद्दल तितकासा स्पष्ट असा उल्लेख आढळत नाहीं. त्या वेळचा चालुक्य राजा विजयादित्य याचा पहिल्या अमोघवर्षानें पाडाव करून चालुक्यांना राष्ट्रकूटांचे अंकित करून टाकलें होतें. पण अमोघवर्षाच्या मृत्यूनंतर विजयादित्यानें पुन्हां हातपाय हालविण्यास सुरुवात केली. याच सुमारास कृष्णानें आपली सत्ता अबाधित राखण्याकरितां एक राजकारण लढविलें. यानें चालुक्यांशीं संधान बांधून त्यांना नोदंब व गंग यांच्या विरुद्ध उठविलें. दोघांच्या लढाईत आपलें स्थान अढळ राहावें हाच याचा उद्देश होता. त्याकरितां यानें चालुक्यांच्या सैन्यास आपल्या देशांतून मार्ग देण्याचें कबूल करून इतरहि कांहीं मदत दिली. या लढाईत नोलंबांचा सेनापति मंगी हा मारला जाऊन विजयादित्याचा जय झाला.

विजयादित्याच्या या जयाचा परिणाम कृष्णाला प्रतिकूल असा झाला. गंगांवर मिळविलेल्या विजयानें चालुक्य शिरजोर झाले व विजयादित्यानें आपल्या पुतण्याच्या मदतीनें कृष्णाची सत्ता उलथून पाडण्याचा निश्चय केला; व त्याप्रमाणें किरणपुरास युद्ध करून याचा पराजय केला.

विजयादित्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुतण्या पहिला भीम हा गादीवर आला. त्यानेंहि आपल्या चुलत्याचेंच धोरण पुढें चालवून याचा व याच्याशीं मित्रत्वानें असलेल्या लाट व कर्नाटक येथील राजांचा निरवद्यपुर व पेरुवंगुरग्राम या दोन ठिकाणीं पराभव केला.

याच्या कारकीर्दीतील दुसरी विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे यानें केलेला गुजराथच्या राष्ट्रकूट घराण्याचा पाडाव ही होय. गुजराथचें राष्ट्रकूट घराणें नाहींसें करून त्या ठिकाणीं यानें ब्रह्मावलोक नांवाच्या नवीन घराण्याची स्थापना केली.

यानंतर हा फार दिवस वांचला नाहीं. स. ९१४ च्या सुमारास कुरुन्धकास जाऊन पञ्चबन्धोत्सव केला व आपल्या

नातवास राज्यसूत्रें अर्पण केलीं. याचा मुलगा जगत्तुंग हा पूर्वीच एका लढाईंत ठार झाला होता. यानें कोंकल कलचुरि या चेदिराजाच्या मुलीशीं विवाह करून वा दोन्ही राष्ट्रांमध्यें स्नेहसंबंध निर्माण केला होता. तसेंच आपल्या पुत्राचें लग्नहि यानें चेदि देशच्याच एका लक्ष्मी नांवाच्या राजकन्येशीं लावून दिलें होतें. त्यामुळें याला चेदिराजांचें निरनिराळ्या लढायांत बरेंच साहाय्य झालें.

एकंदरींत पाहतां याच्या कारकीर्दीत राष्ट्रकूट सत्तेचीं विशेष वाढ झाली नाहीं. उलट गंग व चालुक्य हीं दोन राष्ट्रें राष्ट्रकूटांच्या सत्तेंतून फुटून निघालीं होतीं. आपल्या पित्यांप्रमाणें यानेंहि जैन धर्माचाच पुरस्कार केला होता. आदिपुराणाच्या शेवटच्या पांच अध्यायांचा कर्ता गुणभद्र हा याचा गुरु होता ( राष्ट्रकूट, पानें ९०-९९ ).

**३.** ( स. ९१४ ) राष्ट्रकूटांच्या लाट येथील शाखेंतील दंतिवर्मन्‌चा मुलगा. याचा अकालवर्ष या नांवानेंहि उल्लेख करतात. याच्यानंतर याचा नातू शके ८३६ मध्यें गादीवर आला ( भांडारकर ).

**४.** ( स. ९३९-७१ ) मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या अमोघवर्षाचा पुत्र. हा स. ९३९ च्या सुमारास गादीवर आला असावा. पण त्यापूर्वीच म्हणजे युवराज असतांनाच यानें बराच पराक्रम गाजविला होता; व याचा दरारा आजुबाजूच्या राष्ट्रांत चांगलाच बसला होता. त्यामुळें याला राज्यपद मिळविण्यास कोणत्याहि तऱ्हेचा अडथळा आला नाहीं.

राज्यावर आल्यावर प्रथम यानें आपली दृष्टि दक्षिणेकडील राज्याकडे वळविली. गंगराज्यावर त्या वेळीं याचा मेहुणा बूतुग हा राज्य करीत होता. बाणवाडीचा तिसरा विक्रमादित्य याचें बूतुगाशीं सख्य होतें. याच वेळीं चोलराजा परांतक यानें विक्रमादित्यावर स्वारी करून विक्रमादित्याचा पराभव केला. तेव्हां यानें विक्रमादित्यास साहाय्य करण्याकरितां चोलराजावर स्वारी केली ( स. ९४४ ). या स्वारीचा उद्देश दक्षिणेंतील शक्य होईल तितका मुलूख राष्ट्रकूट राज्यास जोडावा असाहि होता.

चोलराजाशीं झालेल्या या लढाईंत प्रथम याचा मोड झाला. पण लवकरच यानें आपल्या मेहुण्याच्या मदतीनें चोल राजांचा पुरा पाडाव केला; व चोल राज्याचा बराचसा भाग आपल्या राज्यास जोडला.

कानडी कवि पोन्न यास याचा आश्रय होता. यानें आपल्या कारकीर्दीच्या ५ व्या वर्षी म्हणजे स. ९४४ च्या सुमारास तोंडै-मण्डलम् काबीज केलें. पुढें स. ९४७ मध्यें यानें गंग राजा बूतुग २ रा याच्याशीं सख्य करून चोल राजाशीं लढाई केली. त्या लढाईत बूतुगनें राजादित्यास तक्कोलम येथें युद्ध करून ठार मारिलें ( राजादित्य पाहा ). अशा रीतीनें विजयी झाल्यावर हा तोंडै-मंडलम् येथें आला. नंतर स. ९५९ मध्यें यानें मेल्पादी येथें तळ देऊन तोंडै-मण्डलमच्या आसपासच्या राजांस आपलें मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडलें. स. ९६७ मध्यें हा मरण पावला ( एपि. इंडि. १९. ८१-८७ ).

याची बिजब्बे नांवाची मुलगी मरुदेव गंगाला दिली होती.

हा याप्रमाणें दक्षिणेकडे गुंतला असतां उत्तरेकडील राजकारणांत बऱ्याच अडचणी उत्पन्न झाल्या व याच्या कारकीर्दीचा उत्तर काल बहुतेक झगड्यांत गेला. परमारांनीं राष्ट्रकूटांविरुद्ध उचल खाण्यास सुरुवात केली व चेदि आणि चंदेल्ल यांनींसुद्धां राष्ट्रकूटांवर उत्तरेकडून हल्ले करण्यास सुरुवात केली. प्रथम यानें या सर्वांचा पाडाव केला; पण तो तात्पुरताच. दक्षिणेकडे ज्याप्रमाणें यानें आपला वचक बसविला तसा तो याला उत्तरेकडे बसवितां आला नाहीं.

कृष्णास एक पुत्र होता. परंतु तो याच्या आधींच मरण पावल्यामुळें याच्यानंतर याचा भाऊ खोत्तिग हा गादीवर आला ( राष्ट्रकूट ११५-२५ ).

यानें दन्तिग आणि वप्पुग यांना ठार मारून पश्चिम-गंग राजा राचमल्ल १ ला याच्या गादीवर बूतुग २ रा यास बसविलें. त्याचप्रमाणें यानें पल्लव राजा नोलम्ब अन्निग आणि कलचुरी-चेदि राजा सहस्रार्जुन यांचा पराभव करून कोंजेवरम् आणि तंजावर हें घेतलें. याचा धाकटा भाऊ जगत्तुंग ३ रा हा याच्या सत्तेखालीं राज्य करीत होता. यादव घराण्यांतील वद्दिग हा याचा प्रतिस्पर्धी होता. स. ९४९ मध्यें याची चोल घराण्यांतील राजादित्य याच्याशीं लढाई झाली.

**कृष्णवर्मन् कदंब**—हा बनवासीच्या कदंब घराण्यापैकीं ककुत्सवर्मन्‌चा पुत्र. याची पत्नी कैकयराजाची मुलगी होती.

**२.** ( स. ५५०-६५ ) हा बनवासीच्या कदंब घराण्यापैकीं सिंहवर्म्याचा पुत्र. बदामीच्या चालुक्यांपैकीं कीर्तिवर्मन् पहिला यानें याचें राज्य घेतलें.

**कृष्णवर्मा चेर**—हा चेर घराण्यांतील होय. कृष्णवर्मा कदंब व हा एकच असावा.

**कृष्ण ( कन्ह ) शातवाहन** ( आंध्र )—हा आंध्राचा दुसरा राजा. याच्या कारकीर्दीत याच्या राज्याची हद्द

नाशिकपर्यंत भिडली होती ( V. Smith, 218 ). यानें स. पूर्वी ५०-४० पर्यंत राज्य केलें ( Bhand. p. 48 ).

**कृष्णसरस्वती**—यादवेंद्रसरस्वती यांचे हे शिष्य. नृसिंहसरस्वती यांनीं यांस आपले गुरु केलें होतें. यानें शंकराचार्यांच्या उपदेशसाहस्त्रीवर संस्कृत टीका लिहिली आहे.

**२.** गंगाधरसरस्वतीच्या सात शिष्यांतील एक.

**कृष्णसिंग**—रघुनाथराव पेशव्याचा एक लेकवळा.

**कृष्णसूरि**—यानें द्रौपदीपरिणय नांवाचें संस्कृत नाटक लिहिलें आहे.

**कृष्णस्वामी**—अन्यवृत्ति नामक संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

**२.** जयरामस्वामी वडगांवकरांचे गुरु. यांचें लग्न चुकून एका न्हाव्याच्या मुलीशीं झालें होतें. कृष्णाजी असेंहि यांस म्हणत ( सं. सू. ).

**कृष्णंभट्ट उपाध्ये ( जोशी )**—हा रतरपुर येथें बिंबाजी भोसल्याचा कारभारी होता (ना. प्रा. इ.पृ.२१४).

**कृष्णंभट्ट जोशी**—राक्षसभुवनच्या पूर्वेस असणाऱ्या शेंबे गांवच्या गोपाळपंत जोश्यांचा हा मुलगा होय. याजविषयीं अशी हकीकत सांगतात कीं, यानें वेताळाची अतिशय भक्ति केली. त्याप्रमाणें तो प्रसन्न झाला. वेताळ म्हणाला " तुझी काय इच्छा आहे तें माग ! " त्यावर हा म्हणाला, " मी कृष्णासारखा दिसेन असें कांहींतरी कर. " या याच्या म्हणण्याप्रमाणें वेताळानें यास एक मुकुट दिला व सांगितलें कीं, " जोंपर्यंत हा तुझे डोक्यावर आहे तोंवर तूं कृष्णच दिसशील व दूर काढून ठेवतांच पूर्ववत् होशील. "

त्याप्रमाणें यानें आपला क्रम चालू ठेवला. याच्या कृष्णरूपास भुलून बऱ्याच स्त्रिया संभोग इच्छूं लागल्या व त्यांच्या कामना यानें पूर्ण करून धनहि बरेंच संपादिलें.

पुढें आस्ते आस्ते ही गोष्ट हेमाडपंताचे कानावर गेली. त्याला या गोष्टींचें आश्चर्य वाटून खरी भानगड काय आहे हें पाहण्याकरितां त्यानें आपलें आराध्यदैवत गणपतीची प्रार्थना करून गूढ उकलवून घेतलें. तेव्हां त्यास फार राग आला व तात्काळ यास बोलावून मोठ्या युक्तीनें पैठणास आणलें.

याचें कृष्णरूप पाहून हेमाडपंतांनीं याचा सत्कार केला व स्नानभोजन करण्याविषयीं विनंति केली. परंतु मुकुट काढण्याची पाळी येईल व सर्वच उघडकीस येईल असें समजून यानें तें नाकारलें. अखेर कारकुनास हेमाडपंतानें नेत्रसंकेत करतांच डोक्यावरचा मुकुट त्यानें एकदम काढला ! सर्वच उघडकीस आलें ! कृष्णंभट्टास कैदेंत ठेविलें व अनुयायांस हद्दपार केलें. याच्याच अनुयायांना मानभावी म्हणतात ( अर्वाचीन कोश ). ही गोष्ट केवळ महानुभावांची नाचकी करण्याकरितां लिहिलेली दिसते.

**कृष्णंमा**—विजयनगरच्या रामरायाचा बंधु वेंकटाद्रीची पत्नी. हिला रंगप्पा व राम असे दोन पुत्र होते.

**कृष्णंमा नांदेल**—विजयनगरच्या अरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटपतिरायाचा हा एक शत्रु होय. याचा पराभव मातला अनंतानें केला.

**कृष्णाकुमारी**—( मृत्यु स. १८१० जुलै २१ ) मेवाडच्या भीमसिंह राण्याची ही मुलगी. हिच्याबद्दल त्या वेळीं साऱ्या रजपुतांत भांडणें लागलीं होतीं. जोधपूरचा मानसिंग व जयपूरचा जगत्सिंग यांच्यांत लढा होण्यास हीच कारणीभूत झाली. शिंद्यांनीं मानसिंगाची बाजू स्वीकारली; व मेवाडनजीक येऊन तळहि दिला. तेव्हां भीमसिंहानें जयपूरकरांशीं केलेला करार मोडला. पण जयपूरकरांनींहि स्वारीची तयारी चालविल्यामुळें भीमसिंह पेंचांत पडला. तो दुर्बल असल्यानें काय करावें हें त्यास सुचेना.

शिंद्यांनीं अमीरखानाची स्वारीवर नेमणूक केली होती. या अमीरखानाचा दरारा विलक्षण होता. भीमसिंह लवकर तयार होत नाहीं असें पाहून त्यानें सडेतोडपणानें सांगितलें कीं, " एक कृष्णाकुमारीस मानसिंगास तरी द्या किंवा तिला ठार तरी मारा ! " दुर्बल भीमसिंह तिला मारण्यास तयार झाला. पण तिला मारण्याचें काम कोणीच स्वीकारीनासें झाल्यावर हिचा बंधु जवानदास याला तें काम करण्यास सांगितलें. तो ठरल्याप्रमाणें खंजीर घेऊन हिला ठार मारण्यासाठीं आला असतां हिचें अप्रतिम सौंदर्य पाहून खजिल झाला व त्याच्या हातून तें काम न होतां खंजीर मात्र गळून पडला. तरी हिचें मरण चुकलें नाहीं. भीमसिंहानें विषप्रयोगाचा उपाय अमलांत आणण्याचें ठरवून खुद्द हिची आई चांदबाईच्या हातून विषाचे प्याले भरून पाठविले. आपल्यासाठीं आपल्या वडिलांना त्रास होत आहे असें पाहून ही मरणास सिद्ध झाली. सरबतांतील तीनहि वेळचें विष उलटून पडलें तेव्हां हिला अफू देऊन मारण्यांत आलें.

हिच्या पश्चात् अन्नत्यागानें हिची आईहि थोड्याच दिवसांत मेली. पुढें केवळ कृष्णाकुमारीच्या हत्येमुळेंच मेवाडच्या स्वातंत्र्यश्रीस उतरती कळा लागली ( टॉड ).

**कृष्णाचार्य पंढरपूरकर विट्ठलोपाध्ये**—हे पंढरींतील नामांकित पंडित होते. धर्मसिंधुकार काशीनाथ पाध्ये यांचे हे बंधु होत.

**कृष्णाजी अनंत सभासद**—शिवाजीचा सर्वांत जुना चरित्रकार. यानें प्रथम स. १६९७ मध्यें जिंजी येथें

शिवाजीची बखर लिहिली. समकालीन माणसानें लिहिलेली शिवाजीविषयक माहिती फक्त याच्याच पुस्तकांतील होय. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असावा असें काव्येतिहाससंग्रहकारांनीं म्हटलें आहे. हा शिवाजीमहाराजांपासून राजारामम्हाराजांच्या अखेरपर्यंत दरबारीं सभासद होता. सभासद म्हणजे राजसभेंत बसून सल्लामसलत देणारा शिष्ट पुरुष असावा. यानें आपली बखर राजारामम्हाराजांच्या आज्ञेवरून चंदी येथें ईश्वरनाम संवत्सरीं म्हणजे शके १६१९ त लिहिली. शके १६१६ सालीं ही बखर लिहिण्यास सुरुवात केली आणि १६१९ सालीं संपविली. यानें छत्रपतींच्या खालोखाल महाराष्ट्रांतील कर्ते पुरुष म्हणून प्रल्हाद निराजी, रामचंद्र निळकंठ, संताजी घोरपडे, बहिर्जी घोरपडे, व धनाजी जाधव हीं पांच नांवें दिलीं आहेत. हा स्वतः शिवाजीच्या वेळींहि हयात असल्यामुळें यानें दिलेली त्रोटक व स्थूल माहितीहि विश्वसनीय धरण्यास हरकत नाहीं (राजवाडे प्रस्तावना पा. २१७–१८). याचें उपनांव हिरेपारखी व गोत्र काश्यप. हे जुन्नरकर देशपांड्यांचे आप्त दिसतात.

**कृष्णाजी आटोळे**—हा पहिल्या रघूजी भोंसल्याचा सरदार होता. रघूजीनें यास व अलीखान यास आवजी कवडे ( बाजीरावाचा सरदार ) याजवर पाठवलें होतें ( स. १७३९ ). उमरावतीजवळ त्यांची लढाई झाली. ती साधारण सारखीच झाली. पुन्हां दुसरी लढाई नागपूर प्रांतांत झाली. त्यांत आवजीचा मोड होऊन तो पळून गेला. जानोजी व मुधोजी यांचे भांडणांत हा जानोजीचे पक्षाकडे होता.

बखरींत व इतर लेखांत यास आठवले असें म्हटलें आहे. त्यावरून हें घराणें ब्राह्मण असावें असा भास होतो. परंतु हे ब्राह्मण नसून मराठे सरदार होते (ना. प्रां. इ. पृ. ७९).

**कृष्णाजी एकनाथ धर्माधिकारी ऊर्फ कृष्णदास बैरागी**— यांचा चैतन्यलीला नांवाचा ग्रंथ उपलब्ध झाला आहे. केशव चैतन्य प्रभृति राजर्षि घराण्यांतील थोर पुरुषांचें चैतन्यलीला या ग्रंथांत वर्णन आलें आहे. चैतन्यलीला हा ग्रंथ शके १५९६ (सन १६७४ ) वैशाख वद्य द्वादशीस पुरा केलेला आहे. या ग्रंथाचे अध्याय २१ असून त्यांत ओवीसंख्या ३३७५ आहे. यानें आपला हा ग्रंथ शिवाजीमहाराजांना राज्याभिषेकप्रसंगीं रायगडावर अर्पण केला होता. या ग्रंथाचे आधारें शके १७०९ मध्यें नाशिक येथें निरंजन राघव अथवा रघुनाथ या सद्गृहस्थानें चैतन्यविजय नांवाचा ग्रंथ लिहिला, तो स. १९१३ मध्यें राजर्षि घराण्यांतील वासुदेवराव नामक पुरुषानें मुंबईस छापला. त्यांत 'ज्या मूळ ग्रंथावरून हे ५ अध्याय निरंजन रघुनाथानें लिहिले तो मूळ ग्रंथ सांपडल्यास किती चांगलें होईल' अशी सदिच्छा व्यक्त केली आहे. आणि तो ग्रंथ आतां प्रसिद्ध इतिहाससंशोधक रावसाहेब बाबासाहेब देशपांडे यांना राजर्षिवंशांतील माधवराव विष्णु यांच्याकडून मिळाला आहे. हा केशव चैतन्यास आपला गुरु मानतो. याची समाधिहि केशव चैतन्याच्या समाधीशेजारींच ओतूर येथें आहे; आणि त्यावर कृष्णंभट राजर्षीनें लिंगस्थापना केली आहे.

**कृष्णाजी कंक**—येसाजी कंकाचा पुत्र. संभाजीच्या वेळीं येसाजी सरनोबत होता, तर हा पदातिनाईक होता. या दोघांनींहि फौंड्याच्या लढाईत बरेंच शौर्य दाखविल्यामुळें संभाजीमहाराजांनीं उद्गार काढिले कीं, " फिरंगी यांसीं गाठ पडली तेव्हां बहुत कस्त केली आणि गनीम मारून काढला ते वक्तीं दोघानांहि जखमा लागोन चकचूर झाले."

या त्यांच्या पराक्रमामुळें खासा येसाजी यास १ हजार व कृष्णाजीस १ हजार होन अशी नेमणूक करून यांचा सन्मान केला ( राज. खंड १५.३९६; मं. चतु. संमे. १९८ ). हा त्या जखमांनीं मेला तेव्हां याच्या तीन वर्षांच्या येसाजी नांवाच्या मुलास स्मरणार्थ पुनः यांचेंच नांव देऊन वतन दिलें ( शि. च. सा. २.३९७ )

**कृष्णाजी गंगाधर भोसले**—यानें भोसल्यांचे उपाध्ये बाळंभट राजोपाध्ये यांना शा. श. १६१२ ( स. १६९० ) सालीं मंगळूर प्रांतांतील कंजनकोळ हा गांव सूर्यग्रहणानिमित्त दिला. यासंबंधींच्या दानपत्रावर 'सरकार-इआली सर सेनानी' अशा अर्थाचा फार्शी शिक्का आहे. त्यावरून हे सेनापतीच्या हुद्यावर होते असें कळतें. पण कोणाच्या हें समजत नाहीं. याशिवाय आणखीहि कांहीं दानधर्मासारख्या प्रकरणांत याचा उल्लेख येतो ( म. इ. सा. १५. ३८७ ).

**कृष्णाजी गोविंद**—ताईबाई कोल्हटकरचा कारभारी. यास प. रघूजी भोंसल्यानें, भास्करराम कोल्हटकराची स्त्री ताईबाई हिचे तर्फे वऱ्हाडच्या सुभ्याचा कारभारी नेमलें होतें. तें काम यानें पुष्कळ दिवस केलें. जानोजी व मुधोजी यांचे भांडणांत हा जानोजीस मिळाला. परंतु पुढें पंचगव्हाण व पिंजर येथील जमेदारांमध्यें सोयरिकीवरून आपसांत कांहीं तंटा उत्पन्न झाला असतां यानें पिंजरकरांचा पक्ष घेऊन पंचगव्हाणच्या जमेदारांस कैद करून फार त्रास दिला. जानोजीनें मना केलें असतां ऐकलें नाहीं म्हणून जानोजीची यावर अवकृपा झाली व यास जानोजीनें वरील कारभारावरून काढून टाकलें ( ना. प्रां. इ. ).

**कृष्णाजी जगन्नाथ**—हा नानाफडणविसाचा वकील जोधपुरास होता. यानें ता. १०-'-१७८५ रोजीं नानास एक पत्र लिहून त्या देशांतील सर्व हकीकत कळविली आहे. त्याचप्रमाणें नानाहि याला राजकारण कसें करावयाचें व बोलावयाचें याविषयीं लिहीत असे. नानाफडणिसाचे देशभर पसरलेले बहुतेक वकील हुशार, कर्तव्यदक्ष व समयज्ञ होते. त्यांस अपवाद असेल तर तो हा जोधपूरचा वकील कृष्णाजी जगन्नाथ याचाच होय. हा लिहूं लागला म्हणजे दहा दहा, वीस वीस पानें भरकटून त्यांत काय बरळतो आहे हें समजण्याची मारामार पडते. मराठ्यांचें राजकारण काय हें तर यास बिलकुल समजलें होतेंसें दिसत नाहीं ( म. रि. उ. २ पृ. ११८; २४३ ). यानें आपलें नांव कृष्णाजी जगन्नाथ वकील असें लिहिलें आहे ( ऐ. प. २६० ).

**कृष्णाजी त्रिमल**—मोरोपंत पिंगळ्याचे हे मेव्हणे. हे पूर्वी मथुरेस राहत असत. शिवाजीची आग्र्याहून सुटका झाली. त्या वेळीं त्यांना मथुरेस मुक्काम करावा लागला. तेथें हा व याचे दोन बंधु यांजपाशीं संभाजीस ठेवून त्यांनीं पाय काढला. मोंगलांना संशय येऊन संभाजीस पकडण्यासाठीं ते आले असतां यानें एका पानांत बसून भोजन केलें; व संभाजी आपला भाचा असल्याचें सांगून संभाजीचा बचाव केला.

कृष्णाजी त्रिमल हा शिवाजीबरोबर आधींच आला. काशी त्रिमल व त्याची आई संभाजीला घेऊन आली. आणि तिसरा विसाजी त्रिमल हा मथुरेसच राहिला. कृष्णाजी त्रिमलाला शिवाजीनें 'विश्वासराव' असा किताब दिला व रोख बक्षीस दिलें, अशी माहिती रा. खं ८ मधील २३ व्या पत्रावरून मिळते. अर्थात् संभाजीच्या ताटांत जेवल्याची गोष्ट काशी त्रिमलची असावी.

**कृष्णाजी दादो**—दादोजी कोंडदेवाचा मुलगा.

**कृष्णाजी धुळप**—माधवरावाचे मृत्यूनंतर इंग्रजांनीं ठाणें, वसई, विजयदुर्ग, रत्नागिरी वगैरे किनाऱ्यांवरील ठिकाणें हस्तगत केलीं. तेव्हां पेशव्यांनीं स. १७७३ चे जानेवारींत त्रिंबक विनायकास इंग्रजावर पाठविलें. त्यांनीं व कृष्णाजी धुळपानें मिळून इंग्रजांस विजयदुर्गांतून हुसकून दिलें.

**कृष्णाजी नाईक जोशी**—( स. १६४४-१७५० सुमार ) याच्या पित्याचें नांव केशव. हा बाबूजी नाईक बारामतीकरांचा चुलता. श्रीशिवरायांचे अभिषेकाचे समयीं 'कारकून व मुत्सद्दी' मंडळींत नांव दाखल होण्याइतकी कामगिरी यांनीं केली ( भिडे कृ. अ. इ. पा. २८ ). शिवाजीकडून विजापूर दरबारीं पुंडे वकिलीवर असतां त्यांचे मदतीस हे होते. एंकोजी राजांकडे मध्यस्ती करण्यास गेलेल्या मंडळींतहि हे होते. संभाजीच्या कारकीर्दीत व राजारामाच्या गडबडीच्या वेळीं हे दौलताबादेकडील भोंसल्यांच्या जहागिरीचें काम करीत होते. राजारामांनीं शाहूच्या सेवेकरितां यांची नेमणूक केली. स. १७०७ मध्यें शाहूची सुटका झाल्यावर त्यांस स्वराज्यांत आणून राज्य मिळवून देण्याचे कामीं यांनीं फार साहाय्य केलें; म्हणून यांना स्वराज्याची पोतदारी दिली ( भा. व. ऐ. प. पत्र ५८ ). यांचे नंतर ( स. १७११।१२ ) बाळाजी विश्वनाथ यांनीं आपली कन्या भिऊबाई ही यांचे पुतणे आबाजी यांस दिली. बाळाजीपंत भट सेनाकर्ते असतांना त्यांस 'पैक्याची' मदत यांनीं केली. स. १७२० मध्यें यास पिंपरी गांव ( ता. हवेली, जि. पुणें ) इनाम मिळाला. त्यांत थोरले बाजीरावांनीं यांच्याविषयीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे: "हे पुरातन राज्यांतील सेवक राजश्री स्वामींची सेवा वडील वडलांपासून करीत आले. पुढेंहि करीत आहेत." यांचे थोरले पुतणे बाबुजी हे बाळाजीपंताबरोबर स्वराज्याच्या सनदा आणण्याकरितां दिल्लीस गेले होते. यापूर्वीहि पैठण वगैरे परगण्यांत यांचा अंमल होताच. बाळाजीपंत परत आल्यावर शाहूमहाराजांनीं त्यांचे पुत्र बाजीराव यांस सरदेशमुखीची सनद दिली, त्यांत येणेंप्रमाणें उल्लेख आहेत: "( १ ) ४७५३ ॥ नि ॥ कृष्णाजी केशव प॥ पैठण वगैरेची चौथाई. ( २ ) प्रां गंगथडी: सरकार पैठण. नि ॥ कृष्णाजी केशव १९०१३॥ ≷" ( अप्रसिद्ध ). सावकार व पोतदार या नात्यानें त्या वेळच्या बहुतेक सरदारांकडे यांचें येणें जाणें असे. हे व यांचे पुतणे बाबुजी नाईक, आपल्या कर्तबगारीनें महत्त्वास चढूं लागल्यामुळें यांचेबद्दल पेशवेआदि सरदारांच्या मनांत मत्सर येऊं लागला व येनकेन प्रकारेण यांचें नुकसान करण्याची खटपट सुरू झाली. फत्तेसिंग अक्कलकोटकरांकडील कर्जाचे बाबतींत शाहूमहाराजांच्या मनांत विकल्प उत्पन्न केला गेला. "४० वर्षांची" एकनिष्ठ सेवा, स्वार्थी लोकांच्या नादानें महाराज विसरले म्हणून वैतागून यांनीं स. १७४१-४२ चे सुमारास काशीवास पत्करिला ( पे. द. १७.१५५-५७ ). यांचीं जीं कर्जे इकडे होतीं त्या सर्व कर्जफेडीची व्यवस्था व दरसाल रुपये १०,००० ची नेमणूक पेशव्यांनीं यांना करून दिली, ती यांचे पुत्र नानाजी व

पौत्र कृष्णराव यांजकडे चालत होती. काशींत "सोमयाग, गायत्रीपुरश्चरण श्रीकोटी होम" वगैरे धार्मिक कार्यांत राहिलेलीं वर्षे घालवून यांनीं स. १७४९–५० चे सुमारास देह ठेवला. यांची बुंदेलखंडाची सुभेदारी इतकी चोख व न्यायाची होती कीं, पुढें गोविंदपंत बुंदेल्यांनीं यांच्यासंबंधीं 'तपश्चर्याशील कृष्णाजी' असें म्हटलें आहे. यांचा वंश सातारा येथें नांदत आहे ( मा. ग. बा. ).

**कृष्णाजी परशुराम प्रतिनिधि**—( स. १७१८) हा परशुरामपंताचा मुलगा. परशुरामपंतानें याला विशालगड व सभोंवारचा प्रदेश ताब्यांत घेण्यास पाठविलें. यानें किल्ला ताब्यांत घेतला. साताऱ्यास परशुरामपंताचा कायमपणा झाल्यावर मग कोल्हापुरास हाहि कायम प्रतिनिधी झाला. तोच हल्लींच्या विशाळगडकरांचा पूर्वज होय.

**कृष्णाजी पवार**—काळोजी पवाराचा पुत्र. सखाराम बापू बोकिलांनीं स. १७७४ च्या ३० मार्चला महादजी शिंदे यांना जें पत्र लिहिलें त्यामध्यें याचा उल्लेख आला आहे. हा त्या वेळीं साखारामबापूंना मिळणार होता असें दिसतें ( म. रि. उ. १, पृ. ५ ).

**कृष्णाजी बाळाजी**—कोंकण सोडून घाटावर आले. यांजबरोबर इचलकरंजीकरांचे मूळ पुरुष नारो महादेव व पटवर्धन घराण्याचे मूळ पुरुष हरभट हेहि होते. कोल्हापुराजवळ जोतिबाच्या डोंगरावर तिघांच्या आणाभाका झाल्या. त्यांत, ज्याचा प्रथम उदय होईल त्यानें इतर दोघांचा प्रतिपाळ करावयाचा असें ठरलें. नारोपंतास योग्य आश्रयस्थान मिळाल्यामुळें कृष्णाजी व गणेश यांचीं मुलें अनुक्रमें शिवराम व जिवाजी हीं ठरल्याप्रमाणें नारोपंतांच्या घरीं आश्रयास गेलीं. त्यांना नारोपंतांनीं पेशव्यांच्याकडे नोकरीस पाठविलें. पेशव्यांनीं त्यांना पडळीची कमावीस व सातारच्या सरकारी वाड्याचें काम सांगितलें. तें काम त्यांनीं चांगल्या रीतीनें पार पाडलें.

**कृष्णाजी बांदल देशमुख**—मावळांतील बलिष्ठ देशमुख.

**कृष्णाजी भास्कर कुलकर्णी**—( स. १६५९–१७१२ ) हे वाईच्या कुलकर्ण्यांचे वंशज होत. सातआठ वर्षें अफजलखान हा वाईचा सुभा असल्यानें खानाची व याची दाट ओळख होती. हा खानाच्या येथें नोकरीस होता. कारण खानानें याला आपला वकील म्हणून शिवाजीकडे पाठविलें होतें. पुढें खानाचा वध झाला (स.१६५९). त्यानंतर हा शिवाजी महाराजांच्या नोकरीस होता. कारण औरंगजेब गादीवर बसला असतांना महाराजांनीं त्या वेळीं जो वकील पाठविला होता तोच हा कृष्णाजीपंत होय ( १६५९ ). रामचंद्र अमात्य यांनीं सावंतावर ज्या सरदारांस पाठविलें तोच हा सरदार (१७०९). सारांश, हा शूर, मुत्सद्दी व शिवशाहीचा माहितगार होता (रा. खं. ८.१). किल्ले विशाळगड औरंगजेबानें हस्तगत करून उदितासिंग रजपूत यास किल्ल्यावर ठेवला. त्यासी राजकारण करून यानें किल्ला ताब्यांत घेतला. तेव्हां परशुराम त्रिंबक यानें याला एक गांव द्यावा म्हणून शिफारस केली. तेव्हां याला कलबस्ते ( संगमेश्वर ) गांव ता. २२-४-१७७२ रोजीं इनाम करून दिला ( पत्रें यादी ५ ). पत्रें यादींतील वरील सनदेंत याचें उपनांव पंडित आहे. पण हे हल्लीं उपनांव जमेनीस लावतात. यांचें घराणें मलकापूर, संस्थान विशाळगड व मौजे सालपें येथें नांदत आहे ( मावळंकर सरदेसाई घ. इ. भा. १ पृ. ६८ व भा. २, पृ. ६८-७१). येथें एकाच नांवाच्या दोन व्यक्तींची माहिती सरमिसळ झाली असावी. शिवचरित्र साहित्यांत मावळचा शिवाजीचा अधिकारी म्हणून याच नांवाचा पुरुष अफजल प्रकरणाच्या पूर्वीपासून आढळतो.

**कृष्णाजी महादेव जोशी चासकर**—(स.१७३०–१७५४) याचा भाऊ रामचंद्र महादेव हा कल्याणचा सुभेदार होता. पण तो मरण पावल्यामुळें बाजीरावानें स. १७३० मध्यें याला कल्याणचा सुभेदार नेमलें. ह्याच्या व इतर मंडळींच्या मदतीनें मराठ्यांनीं भिवंडीच्या खाडीपलीकडे कांबें म्हणून ठिकाण होतें तेथें व पुढें मनोर येथें पोर्तुगीझांशीं लढून पोर्तुगीजांचा पराभव केला ( १७३१ अखेर ) ( म. रि. म. १, पृ. २९२ ). याची बहिण लाडूबाई ही थोरले बाजीराव यांना दिली. तिचें सासरचें नांव काशीबाई. यांचे वडील महादेवराव यानें थोरले राजाराम-महाराजांचे वेळीं श्रमसाहस केलें म्हणून खवली गांवची वृत्ति मिळाली. याला चासगांव मिळालें. उत्तरेकडील राजकारणांतहि हा होता. मृत्यु चैत्र शु॥ ९, १६७६ शके.

**कृष्णाजी महादेव भावे**—हा नानाचा वकील महादजीकडे होता. याचा मृत्यु ता. १४।२।१७८८ त झाला.

**कृष्णाजी मोरे**—(स. १६५६) यशवंतराव मोऱ्याचा पुत्र. यास शिवाजीनें ठार केलें ( चंद्रराव मोरे पाहा ).

**कृष्णाजी विनायक सोहोनी**—हे पेशव्यांच्या बखरीचे लेखक. हे रत्नागिरी जिल्ह्यांतील सोमेश्वराचे रहिवासी. पेशवाईच्या अखेर ते गांव सोडून देशावर आले. स्वपराक्रमानें यांनीं पेशवे दरबारीं सुभेदारी मिळविली. पुढें पेशवाईच्या मावळत्या ज्योतीबरोबर

यांचेंहि वैभव व पराक्रम फिके पडून संन्यासमार्गाचा अवलंब करण्याकडे लक्ष वेधलें, व त्याप्रमाणें वैजनाथाच्या देवालयांत यांनीं पुढील आयुष्य एखाद्या तपस्व्याप्रमाणें काढलें. यांनीं पेशवाईची बखर लिहिली. यांत बाळाजीपंत नाना हे श्रीवर्धनाहून निघाल्यापासून तें शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण फडकेपर्यंतची सर्व हकीकत आली आहे. या वेळीं यांचें वय ७० च्या सुमाराचें होतें. त्यांचा जन्म सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत झाला असावा. ( साने पेशवे बखर, प्रस्ता. ).

**कृष्णाजी शेट्या**—हा दौलतराव शिंद्याजवळ खिदमतगार होता. नंतर त्याचा कारभारी झाला. हा स.१७९७ च्या मे महिन्यांत वारला ( म. रि. उ. ३ पृ. ५०-५२ ).

**कृष्णानंद आगमवागीश**—हा वासुदेव सार्वभौमाचा शिष्य. यानें बंगाल्यांत प्रथम तंत्रशास्त्राचा प्रचार सुरू केला.

**कृष्णानंद वेदव्यास**—वेदव्यास हें याच्या घराण्याचें नांव असावें असें दिसतें. हा 'संगीतरागकल्पद्रुम' या ग्रंथाचा कर्ता असून याच्या बापाचें नांव हीरकानंद आणि आज्याचें नांव अमरानंद असें होतें.

यानें आपल्या ग्रंथांत पुष्कळ ग्रंथांचा व ग्रंथकारांचा निर्देश केला आहे. त्यामध्यें 'संगीतपारिजात' आणि 'संगीतनारायण' हेहि ग्रंथ आहेत. डॉ. पी. आर. भांडारकर यांनीं 'संगीतपारिजात' या ग्रंथाचा काल स. १६५०-१७०० असा ठरविला आहे ( 'Ancient Hindu Music' IA. XII p. 160 ). यानें आपल्या ग्रंथांत 'संगीतपारिजाता'चा फारसा उपयोग केलेला नाहीं. तेव्हां याच्या वेळीं 'संगीतपारिजात' हा ग्रंथ नुकताच लिहिलेला असला पाहिजे. शिवाय 'संगीतनारायण' या ग्रंथाचा काल स. १७५० असा आहे.

यावरून यानें 'आपला संगीतकल्पद्रुम' हा ग्रंथ स.१७५० ते स. १८०० यामधील कालांत केव्हांतरी लिहिला असला पाहिजे ( पी. के. गोडे ).

याचा ग्रंथ स. १८४२ मध्यें कलकत्ता येथें छापून प्रसिद्ध झाला आहे. यानें ग्रंथारंभीं बरींच शास्त्रीय माहिती दिलेली आहे. याच्या लिहिण्यावरून याच्या शुद्ध स्वरांचें सप्तक 'बिलावल' असावें असें वाटतें. यानें तीस वर्षे खपून हा ग्रंथ केला आहे. यानें आपल्या वेळच्या अनेक चिजा दिल्या आहेत, पण त्या सस्वर व सताल नाहींत ( शास्त्र व कला यांचा इतिहास, पा. १९ ).

**कृष्णाप्पा स्वामी**—शांतलिंगाप्पाचे शिष्य कृष्णाप्पा स्वामी हे उरण बहे ( अथवा उरण बाहे ) चे कुळकर्णी. हे कांहीं दिवस कृष्णातीरीं राहत असत. यांची शाखा आश्वलायन, गोत्र काश्यप; शके १५०४ मध्यें वटग्राम ऊर्फ वडगांव येथें येऊन यांनीं तेथें मठाची स्थापना केली. कृष्णाप्पांनीं आपली शिष्यशाखाहि बरीच वाढविली. यांचीं कांहीं पदें मात्र आढळतात. त्याशिवाय यांचा ग्रंथ वगैरे कोणतीहि रचना हल्लीं उपलब्ध नाहीं. असें म्हणतात कीं कृष्णस्वामींनीं ज्ञानेश्वरीचा नववा अध्याय पुढें ठेवून तो वाचीत असतां शके १५४५ रुधिरोद्गारी संवत्सरीं माघ शु. १५ स जित समाधि घेतली.

**कृष्णाबाई**—( दर्याबाई निंबाळकर ) ही परदेशी रजपुत ( रा. खं. ८. १८४ ). घाशीरामाची थोरली बहीण. हिनें ताराबाईच्या नातवाचें म्हणजे रामराजाचें लहानपणापासून पालनपोषण केलें. हिच्या भावानें त्या मुलास ता. २६-१-१७४५ नंतर हिच्यापाशीं आणून दिलें होतें. नंतर पेशव्यांनीं पावगांवास जाऊन हिच्यासह त्याला साताऱ्यास आणलें; व नंतर त्यास ( शके १६७१ ) स. १७५० मध्यें तक्तारूढ केलें. रामराजाचे लहानपणचे दिवस मुद्दाम अज्ञातवासांत काढले. कारण त्यास मारण्याकरितां प्रथम जिजाबाई व पुढें सकवारबाई टपलेल्या होत्या. म्हणूनच बाहेर तो मेला असें सांगून इतर सर्व मंडळींनीं त्याची अशी आंतून व्यवस्था केली, म्हणूनच दर्याबाईनें त्यास संभाळला असावा, असें इतिहासकारांचें मत आहे.

२. जयरामस्वामी वडगांवकर यांची आई.

**कृष्णाम्मा**—विजयनगरच्या अरविदु घराण्यांतील दुसऱ्या वेंकटाची पत्नी. हिच्या पित्याचें नांव जिलेल्ला कृष्ण राजू असें होतें. कृष्णाम्बा या नांवानेंहि हिचा उल्लेख करतात. हिच्यापासून वेंकट राजास एकहि पुत्र झाला नाहीं.

**कृष्णोबा चिटणीस**—हा आबा चिटणीसाचा भाऊ होता. याच्या वडिलांचें नांव रघुनाथ असें होतें. हा दौलतरावाचा चिटणीस झाला. पूर्वी हा नानाच्या पक्षास मिळाला होता. तथापि नानाचे आग्रहावरून दहा लाख रुपये दौलतरावानें नजराणा घेऊन याचे नांवें चिटणिसी करून दिली. पैशाबाबत यानें एकदां पठाणांवर लगट केली. त्या प्रसंगीं यास वार लागून हा घायाळ झाला. ऐनवेळीं दौलतराव तेथें आला म्हणून याचे प्राण वांचले ( १-३-१७९९ ). हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून महादजीच्या वेळेपासून शिंद्यांचे पदरीं होता ( आबाजी रघुनाथ चिटणीस पाहा ).

**केटर हेन्री**—( स. १७७७-१८३५ ) हा पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता होता. प्रथम याचा कायद्याचा

अभ्यास करण्याचा विचार होता. परंतु बापाच्या मृत्यूनंतर यानें सैन्यांत प्रवेश केला. यास बाराव्या रेजिमेंटमध्यें कमिशन मिळालें व हा हिंदुस्थानांत आला. त्या वेळीं यानें हिंदुस्थानची त्रिकोणमितीच्या साहाय्यानें पाहणी केली. आरोग्याकरितां यास हिंदुस्थान सोडावें लागलें. इंग्लंडांत जाऊन यानें सँडर्स्ट कॉलेजांत प्रवेश केला; व परीक्षा उत्तीर्ण होऊन कॅप्टन्ची जागा मिळविली. पुढें सन १८१४ सालीं पेन्शन घेऊन पुढील आयुष्य शास्त्रीय शोधांत घालविलें. यानें खगोलशास्त्रांत दुर्बिणींत कांहीं सुधारणा करून दाखविल्या. रशियाच्या मापाच्या तुलनेसंबंधानें अत्यंत परिश्रम घेऊन तीं मापें निश्चित केलीं. या याच्या कामगिरीमुळें यांस रशियानें बहुमान दिला व रॉयल सोसायटीनें यास आपला सभासद नेमलें.

**केतकादास क्षेमानन्द**—( स. १६४० सुमार ) हिंदी कवि. याचा जन्म वर्धमान जिल्ह्यांतील कांथरा गांवीं झाला. याची जात कायस्थ होय. क्षेमानन्द हें याचें नांव असून केतकादास ही याची पदवी होय.

केतका हें मनसादेवीचें नांव होय. म्हणून यानें आपलें नांव केतकादास असें ठेविलें.

यानें आपल्या 'आत्मचरित्रा'मध्यें रमीलाबादचा राजा बाराखाँ याचा उल्लेख केला आहे. आणि युद्धांत त्याचा मृत्यु झाल्याबद्दल खेद प्रकट केला आहे. आपला 'मनसामंगल' हा ग्रंथ स. १६४० च्या नंतर लिहिला. कारण त्यामध्यें बाराखाँ राजानें शिवराम भट्टाचार्य यास २० बिघे जमीन दान दिली, असा उल्लेख आला आहे. याच्या मनसाभाषण या ग्रंथांत ५००० कविता आहेत. याशिवाय याचे लहानसहान ग्रंथ असून ते अत्यंत लोकप्रिय आहेत. याची कविता सरस व रुचिपूर्ण आहे ( क. कौ. भा. ७ ).

**केत कोट**—हा अमरावतीच्या कोट घराण्यांतील एक राजा ( स. ११३० ). हा पहिल्या भीमाचा मुलगा.

२. ( स. ११८२–१२३१ ) कोट घराण्यांतील एक राजा. पत्नी प्रोलदेवी (?). शिवाय गणपांबा नांवाच्या गणपतीच्या मुलीनें याच्याशीं लग्न केलें होतें. याची गणपतीस फार मदत होती. याच्या मदतीनें गणपतीनें पुष्कळ लढाया केल्या. यानें स. १२०९ मध्यें भीमेश्वराचें देऊळ सुधारून बांधलें ( एन्शन्ट डेक्कन भाग १, पा. २८७ ).

३. ( स.१२३४-४०) कोट घराण्यांतील एक राजा. याला सन्मकेत असेंहि म्हणत. याच्या पत्नीचें नांव कायला. नागवाडी घराण्यांतील रुद्राची मुलगी.

**केतलादेवी**—ही कामदेव कदंबाची पत्नी.

**केदारजी बीन नरसोजी खोपडे**—हा विजापूरकरांच्या दरबारीं असून शिवाजीच्या विरुद्ध होता. शिवाजीस पकडण्याकरितां अफजलखान आला असतां त्याच्याबरोबर हा होता. अफजलखानाच्या वधानंतरच्या युद्धांत शिवाजीनें केदारजीचा पाडाव करून त्याचा शिरच्छेद करविला ( खंडोजी खोपडे पाहा ).

**केदारजी सिंदे**—(मृ. स. १७६७ ) हा तुकोजीचा मुलगा व महादजीचा पुतण्या. पुण्यास दादा-माधवरावांचे भांडण जोरांत चालू होतें. तोंपर्यंत सिंद्यांचे सरदारीचा निकाल लागला नाहीं. माधवरावाचें लक्ष महादजीकडे होतें. म्हणून महादजीवर दादाची गैरमर्जी होती. मध्यंतरीं जनकोजी शिंद्याचा तोतया उत्पन्न होऊन घोटाळा उत्पन्न झाला. पुढें नारो शंकरानें प्रयत्न करून सिंद्याची सरदारी ता. २५-११-१७६३ रोजीं केदारजीचे नांवें केली. परंतु पुढें ता. १० जुलई १७६४ त दादानें तीन लक्ष रुपये नजराणा घेण्याचा करार करून सरदारी मानाजी सिंद्यास दिली.

केदारजी बहुधा स. १७६७ त मृत्यु पावला. पश्चात् याचे बायकोस पेशव्यांनीं लोहगडावर अटकेंत ठेवलें होतें ( म. रि. म. भा. ४ ).

**केदारनाथ**—हा एक नाथसंप्रदायी साधु होता. याचें ठिकाण कोल्हापूरजवळचा जोतिबाचा डोंगर होय. याचें चरित्र 'केदारविजय' नांवानें अंगापूरकर हरीनें लिहिलें आहे; आणि तें प्रसिद्धहि झालें आहे ( अंगापूरकर हरि पाहा ).

**केदारभट्ट**—हा 'वृत्तरत्नाकर' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता होय. याचा पिता पिङ्गेक. गोत्र काश्यप. डॉ. कीथ यांच्या मताप्रमाणें यानें 'वृत्तरत्नाकर' हा ग्रंथ सनाच्या १५ व्या शतकापूर्वी लिहिला असें ठरतें. परंतु, औफ्रेचनें असें लिहिलें आहे कीं, 'वृत्तरत्नाकर यावर नारायणभट्टानें स. १५४५ मध्यें टीका लिहिली.' मल्लिनाथानें 'वृत्तरत्नाकर' ग्रंथाचा उपयोग केला आहे. मल्लिनाथाचा काल प्रो. हंदिकी यानें स. च्या १५ व्या शतकांत अगर १४ व्या शतकाच्या उत्तरार्धांत दिला आहे.

चंदुपंडितानें आपल्या 'नैषधचरित' यावरील टीकेंत वृत्तरत्नाकराचा उल्लेख केला आहे. चंदुपंडित स्वतःचा काल स. १२९७ असा सांगतो. यावरून वृत्तरत्नाकराचा काल स. १२५० पर्यंत मागें ढकलला जातो. हा ग्रंथ बराच महत्त्वाचा असल्यामुळें यावर जवळजवळ २० हून अधिक टीका लिहिल्या गेल्या आहेत. या ग्रंथाच्या हस्त-

लिखिताच्या पुष्कळ प्रती ( पद्मनाथ, चित्रसेन, सुल्हण पाहा ) निरनिराळ्या ग्रंथालयांत सांपडतात ( Annals of the B. O. R. I. 16, p. 143 ).

**केनवे कॅप्टन**—( स. १७८८-९४ ) हा इंग्रज वकील निजामाजवळ होता. निजामाशीं पूर्वी स. १७६८ चा करार होता, त्यांत यानें गंटूर प्रांत इंग्रजांस देण्याचें कबूल केलें होतें, परंतु कांहीं ना कांहीं सबबीवर तो अद्याप हस्तगत झालेला नव्हता. कॉर्नवालिस यास मोठी धास्ती होती कीं, निजाम भलत्याच हरकतीं सांगेल. पण यानें आपलें काम उत्कृष्ट बजावून अल्पावधींत निजामास खूष करून गंटूर प्रांत ताब्यांत घेतला ( स. १७८८ ). तेव्हां कॉर्नवालिसचें मन निश्चित झालें; आणि त्याची मर्जी याच्यावर विशेष बसली. हा स. १७९४ पर्यंत निजामाचे दरबारीं होता ( म. रि. उत्तर वि. २, पृ. २९३ ).

**केयूरबाहु**—काश्मीरचा राजा. लिंगण्या कवीनें याचें तेलंगी भाषेंत चरित्र लिहिलें आहे.

**केयूरवर्ष कलचुरी**—( स. ९२५ सुमार ) हा त्रिपुरीच्या कलचुरी घराण्यापैकीं सुग्धतुंग ऊर्फ धवल याचा पुत्र होय. हा आपला ज्येष्ठ बंधु बालवर्ष याच्यानंतर गादीवर आला. याच्या राणीचें नांव नोहलादेवी असून ती चालुक्य सामंताची कन्या होती ( नोहलादेवी पाहा ). केयूरवर्षाचेंच युवराज असें दुसरें नांव होतें. चंदेल्लाच्या लेखावरून असें दिसतें कीं, त्यांच्यापैकीं कोणीतरी याचा पराभव केला असावा. याच्यानंतर याचा मुलगा लक्ष्मण हा गादीवर आला ( म. यु. भा २. २२४ ).

**केरेय पद्मरस**—( स. ११०० नंतर ) बल्लाळ राजाचा हा मंत्री होता. यानें वीरशैवसंप्रदाय वाढविला. यानें ' दीक्षा बोधे ' नांवाचें संवादात्मक काव्य कानडींत लिहिलें आहे. त्यांत एक शिक्षक आपल्या शिष्यास शैव पंथाचीं तत्त्वें शिकवीत आहे.

**केरोजी पवार**—हा कृष्णाजी पवाराचा धाकटा मुलगा. याचा थोरला भाऊ बाबाजी. हा थो. शिवाजीच्या पदरीं होता. राजाराम छत्रपतीकडून यास सेनाबारासाहस्री ही शौर्यदर्शक पदवी मिळाली ( मावजी-कैफि. पा. ६९ ).

**केशरी**— ही एक महादजी शिंद्याची राख होय. ही नानाफडणिसाचे ओळखीची होती. ही उज्जनीस राहत असे. हिच्या मार्फत नानानें दौलतरावास बोध करविला कीं, नानास सोडून कारभार कराल तर तो तुम्हांस जाचक होईल. ही गोष्ट दौलतरावास पटली आणि त्यानें नानाशीं गुप्त बोलणें सुरू केलें. हिची मुलगी कोल्हापूरकरांच्या दासीपुत्रांस दिली ( स. १७९९; म. रि. उत्तर वि. ३, पृ. ३४; ७५ ).

**२.** ( राघोबादादा पेशवा पाहा ).

**केशव**—( जन्म स. १२४३ ) ग्रहलाघवकार गणेश दैवज्ञ यानें विवाहवृंदावन नामक ग्रंथावर टीका केली आहे, तो ग्रंथ केशवाचा आहे. याच केशवानें ' करणकंठीरव ' नामक ग्रंथ लिहिला असें गणेश दैवज्ञ म्हणतो. हा अर्थात् करणग्रंथ असला पाहिजे.

केशव हा भारद्वाज गोत्री औदीच्य ब्राह्मण असला पाहिजे. याचा पिता, आजा इत्यादि त्रयींचीं नांवें राणग, श्रियादित्य आणि जनार्दन अशीं होतीं. ग्रहलाघवकार गणेशाचा पिता केशव ह्याहून हा केशव प्राचीन असला पाहिजे. रामकृत विवाहपटलाच्या शके १४४६ च्या निर्णयामृत टीकेंत विवाहवृंदावन ग्रंथाचा उल्लेख आहे. यावरून केशवाचा काल शक १४०० हून अर्वाचीन नसावा, हें सिद्ध होतें.

गणेश दैवज्ञ यांच्या मतें याचा जन्म काल शक ११६५ असावा. याचें राहण्याचें गांव नर्मदातीरीं भडोच असावें. कारण तेथील अयनांश व अक्षांशहि बरेचसे जुळत आहेत ( भा. ज्यो. पा. २५७ ).

**२.** प्रख्यात ग्रहलाघवकार गणेश दैवज्ञाचा हा पिता होय. हा स्वतः मोठा विद्वान् होता. पुत्र गणेश दैवज्ञ याचें ग्रहगणित विषयांत याजवर वर्चस्व झालें, हें ' सर्वत्र विजयं चेच्छेत् शिष्यादिच्छेत्पराजयम् । ' या न्यायानें केशवास मोठें भूषणच होतें. स्वतः विद्वान् होता म्हणूनच याचा पुत्र इतका विद्वान् होऊं शकला. ग्रहकौतुक म्हणून याचा एक करणग्रंथ आहे. त्यांत आरंभ वर्ष १४१८ आहे. यावरून या सुमारास हा होता. याचें गोत्र कौशिक होतें.

याच्या पित्याचें नांव कमलाकर होतें. तोहि मोठा ज्योतिषी होता. वैजनाथ हा केशवाचा गुरु होय. कोंकणांत नांदग्राम गांवीं हा राहत असे, त्यासच हल्लीं नांदगांव ( सं. जंजिरा ) म्हणतात. याच्या पत्नीचें नांव लक्ष्मी असें होतें.

यानें गणित विषयावर बरेच ग्रंथ लिहिले परंतु याच्या मुलाच्या ग्रंथामुळें ते मागें पडले. मात्र वेधासंबंधीं केशवाची योग्यता मोठी आहे, हें कोणीहि कबूल करील.

यानें ग्रहकौतुक आणि जातकपद्धति यांवर स्वतः टीका केली आहे ( भा. ज्यो. पा. २५८ ). हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता.

**३.** केशव हा नामदेवाचा एक शिष्य होय. याचें मूळ स्थान तारापूर असून हा महाराष्ट्रीय वारकरी होता.

नामदेवानें याला पंजाबांत स्वधर्मप्रसारासाठीं पाठविलें होतें. हा प्रथम शरीरानें कुबडा होता. नामदेवानें याला आपल्या दिव्य शक्तीनें घुमान ( पंजाब ) येथील 'जथोरा' नांवाच्या तळ्यांत घालून अव्यंग केलें आणि परमार्थांत लळी, पांगळी झालेली पंजाबी प्रजा निरोगी व निर्व्यंग करण्याकरितां याचे बरोबर ज्ञानदेवाच्या अमृताची दिव्यौषधि देऊन यास आपला दवाखाना थाटण्यास नामदेवानें पंजाबांतच ठेविलें, असें जन्मसाखेवरून दिसतें.

केशवानें भावलपुरांत वरील प्रकारच्या रोग्यांकरितां एक मोठें रुग्णालय काढिलें व कित्येक मुमूर्षु मुमुक्षूंस मरणापासून मुक्त केल्याचें श्रेय घेतलें. यानें स्थापिलेल्या पीठास 'केशव कलधरकी गद्दी' म्हणून नांव दिल्याचें प्रसिद्ध आहे. सदरहू पीठ अद्यापिहि भावलपुरांत पाहावयास सांपडतें.

केशव हा संन्यासी होता, हें यास लाविलेल्या 'कलधर' ह्या विशेषणावरूनच उघड होत आहे; व नामदेवानेंहि आपल्या काव्यांत 'आवो कलंदर केशवा' ( ग्रंथसाहेब पान ११६७ ) असा ज्या अर्थी याचा 'कलधर' म्हणून उल्लेख केला आहे, त्या अर्थी वरील तर्क खरा आहे असें म्हणणें भाग पडतें. 'कलधर' हा 'कलंदर' या शब्दाचा अपभ्रंश होय व याचा अर्थ 'संन्यासी' असा हिंदी कोशकार देतात ( मं. त्रै. १८४७-४८ अं. १-४; पृ. ८-९ ).

४. यानें अधिक मासाचें गुजराथींत वर्णन केलें आहे ( गुजराथी काव्यदोहन ).

५. हे अकरा कावडी रामेश्वरास घालणाऱ्या समर्थशिष्य माधवाचे अनुग्रहित होते.

६. मध्वनाथाचा शिष्य ( पदसंग्रह पद. ४५३ ). एकनाथाचें चरित्र केशवानें शा. श. १६८२ मध्यें लिहिलें. तो मध्वनाथाचा शिष्य असावा. कै. तुकाराम तात्या यांनीं केलेल्या एकनाथी गाथ्याच्या आरंभीं हें केशवकृत नाथचरित्र छापलें आहे. त्याचे शेवटी शके १७५४ परिधावी नाम संवत्सरे उत्तरायणे माघ शुक्ल १३ इंदुवासरे क्षेत्र पंचवटी श्रीसितारामचरणसन्निधाने संपूर्णम्, असा लेखनस्थलकालोल्लेख आहे. तो सदर चरित्र ज्या मूळ पोथीवरून छापलें त्या पोथीच्या लेखकानें केलेला उल्लेख असावा असें वाटतें. हा स्वतः बारा वर्षेपर्यंत भागवतश्रवणार्थ नाथांच्या जवळ होता. पण असें असेल तर वरील शक चुकीचा दिसतो. याच्या पित्याचें नांव त्रिंबकराम.

७. काशिराजशिष्य ( अर्वाचीन कोश).

**केशव चैतन्य**—( स. १५२४-७२ ) विश्वनाथबाबा ऊर्फ केशव चैतन्य यांचा पिता हा गोवळकोंड्याच्या सुभेदाराचे त्रासानें तिनीवेलीहून पुणें येथें आला. त्याबरोबर त्याचा स. १५१९ मध्यें जन्मलेला त्रिंबक नांवाचा मुलगाहि होता. पुण्यास आल्यावर कसबा पेठेंत हल्लीच्या मुजुमदाराचे बोळाच्या पूर्वेकडील टोंकास असलेल्या जागीं यांचा जन्म स. १५२४ मध्यें झाला. यांचें बरेंच आयुष्य युद्धांत गेलें. पण त्यांत यश लाभलें नाहीं. यांचा वडील बंधु त्रिंबक यानें यवनाचा सेवक होऊन यांच्यावर परचक्र आणलें. त्याला तोंड देतांना यांचा धाकटा बंधु उद्धव बापु कामास आला. यामुळें यांचें मन विटून हे कुटुंबासह त्रिंबकास जाण्यास निघाले. वाटेंत ओतूर येथें मुक्काम पडला असतां राघव चैतन्यस्वामींचें दर्शन घडलें. शके १४७२ च्या सुमारास यांनीं त्यांस आपणांस संन्यास द्यावा अशी विनंति केली. पण तुम्हांस पुत्र झाल्याशिवाय संन्यास देतां येत नाहीं, असें सांगितल्यामुळें यांची निराशा झाली. पुढें स. १५५१ या वर्षीं म्हणजे यांच्या सव्विसावे वर्षीं यांना पुत्र झाला. त्याचें नांव नरसिंह असें ठेवण्यांत आलें. त्याचे तेरावे दिवशीं यांनीं संन्यास घेतला. तो महिना मार्गशीर्षाचा असल्यानें याचें नांव राघवचैतन्यांनीं केशवचैतन्य असें ठेवलें. यानंतर हे तीर्थयात्रेस निघाले. केशव चैतन्य यांची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें आहे. श्रीव्यास-राघवचैतन्य-केशवचैतन्य-तुकोबाराय. केशवचैतन्यांनीं श्रीतुकाराम महाराज ओतुर येथें जानू तेल्याच्या घरीं निद्रित असतां शके १५६१ माघ शुद्ध दशमी गुरुवार रोजीं स्वप्नांत उपदेश दिला ( स. १६४० ). श्रीकेशव चैतन्य यांचा काळ ओतूर येथें शके १४९३ वैशाख वद्य १२ रोजीं झाला म्हणजे हे समाधिस्थ झाल्यानंतर ६८ वर्षांनीं यांनीं तुकोबारायाला उपदेश दिला. असें होणें हें साधुसंतांच्या चरित्रांत नेहमीं दृष्टोत्पत्तीस येतें ( सोहिरोबा अंबिये, निळोबा पाहा ). यांनीं पुढील ग्रंथ केले:--१ भक्तिप्रकाश, २ वैकुंठपद, ३ वासनामयदेह, ४ गीताभागवतसार, ५ परमार्थविचार. हे समाधिस्थ झाल्यानंतर यांचे चिरंजीव नरसिंहभट्ट यांस दिल्लीच्या अकबर बादशाहाचें श्रावण शु. १ गुरु. शके १४९४ ( स. १५७२ ) आलेलें पत्र आहे. तसेंच याच सालांत सनद दिल्याचें नमूद आहे. त्यावरून अकबर बादशाहाचा व यांचा धार्मिकदृष्ट्या निकट संबंध आलेला दिसतो.

तुकोबांस परमेश्वरप्राप्तीची तळमळ लागली तेव्हां अनेक ठिकाणीं फिरत फिरत, कोणी खरा सिद्ध पुरुष भेटतो कीं

काय, याचा तपास ते करीत होते. ते पुष्कळ ठिकाणीं हिंडले, पुष्कळ संतांच्या भेटी घेतल्या, परंतु त्यांना योग्य सिद्ध पुरुष भेटला नाहीं. तेव्हां निराश होऊन ते पंढरपुरास गेले. तेथें त्यांना असा दृष्टान्त ( स्वप्न ) झाला कीं, 'तुम्हीं ओतुरास ( उत्तमपुरास ) जावें' म्हणजे तेथें तुम्हांला गुरूपदेश मिळेल. ओतुरास केशव चैतन्यांची समाधि आहे. ओतुरास ते जानु तेल्याच्या घरीं उतरले. तेथें शके १५६१ माघ शुद्ध १० गुरुवारीं उत्तर रात्रौ स्वप्नांत केशव चैतन्यांनीं त्यांस गुरूपदेश दिला, असें 'चैतन्यलीला' या ग्रंथांत म्हटलें आहे. हा ग्रन्थ कृष्णाजी एकनाथ धर्माधिकारी ऊर्फ कृष्णदास बैरागी यांनीं लिहिला व तो छत्रपति शिवाजीमहाराज यांस त्यांच्या राज्याभिषेकप्रसंगीं स. १६७४ मध्यें अर्पण केला, हें प्रसिद्ध आहे. हा गुरूपदेश खरा व प्रत्यक्ष नसून स्वप्नांतला आहे. केशव चैतन्य स. १५७१ त समाधिस्थ झाले व तुकोबांचा जन्म स. १६०८ त झाला. अर्थातच त्यांचा गुरूपदेश प्रत्यक्ष होणें शक्यच नाहीं. राघव चैतन्याचे शिष्य केशव चैतन्य, व केशव चैतन्याचेंच नांव बाबाजी असें आतां पुराव्यानिशीं सिद्ध झालें आहे; व पूर्वाश्रमांतील बाबाजी हें नांव सांगण्याचें कारण असें कीं, केशव चैतन्याचा नातू नरसिंहभट्ट बिन विश्वनाथभट्ट यांच्या मुलाचेंहि नांव केशव राजर्षि असेंच होतें, आणि गुरूपदेश देणाऱ्या केशव चैतन्याचें पूर्वाश्रमीचें नांव विश्वनाथ बाबा राजर्षि असें होतें; व लोक त्यांना बाबाजी असें म्हणत, अशी माहिती आतां कागदोपत्रीं सदर राजर्षि घराण्यांतील विद्यमान वंशजांनीं पुरविली असल्यामुळें हा वाद आतां मिटला आहे. तेव्हां तुकोबाचे गुरु जे केशव चैतन्य त्यांचा व तुकोबांच्या समकालीन केशवभट चैतन्याचा घोटाळा होऊं नये म्हणून बाबाजी हें नांव निळोबा पिंपळनेरकर यांनीं केशव चैतन्याच्या वर्णनादाखल घातलें आहे.

वरील ऐतिहासिक विवेचनावरून सिद्ध होतें कीं, वंगदेशीय आणि महाराष्ट्रीय चैतन्य-संप्रदाय निरनिराळे आहेत.

राघवचैतन्याची समाधि मोंगलाईंत गुलबर्ग्यानजीक दीड योजनावर 'आळंदगुंजोटी' या गांवीं असल्याचें निरंजन नामक कवीनें शके १७०९ या वर्षी लिहिलेल्या 'केशवचैतन्यचरित्र' या नांवाच्या ग्रंथांत लिहिलें आहे. हें विधान खरें आहे असें, एकानें केसरींत प्रसिद्ध केलें आहे. पण कुडची वीर या कवीनें त्यांची समाधि इंदापूर येथें आहे असें म्हटलें आहे. पण तें चूक दिसतें ( म. क. चरित्र भा. १ पा. ४७८ ).

**केशव चिंचक प्रधान**—स. १७३१ त हा कोल्हापूरचा प्रधान झाला. हे सर्वजण ( प्रधान मंडळी ) संभाजीचे सल्लागार होते. उदाजी चव्हाणानें दंगा करण्याचें काम संभाजी व शाहू यांच्या राज्यांत चालूच ठेविलें होतें. तरी उदाजीचा व संभाजीचा प्रधान यांचा पत्रव्यवहार होता ( म. रि. म. १. पृ. २०७ ).

**केशव दामोदर पुरोहित**—राजारामचरित नांवाच्या संस्कृत ऐतिहासिक काव्याचा कर्ता. शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्या वेळीं हा दानाध्यक्षाचें काम करीत असे. यानें 'धर्मकल्पलता' नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला. त्यांतील दंडनीतिप्रकरण संभाजीमहाराजांच्या 'बुधभूषण' नांवाच्या संस्कृत काव्यांत स. १६८२-८३ मध्यें सामील केलें. संभाजीनें याचे मुखें रामायण ऐकलें होतें म्हणून यास राजापूर प्रांतांत संगमेश्वर तालुक्यांत भूमिदान दिलें (२९ डिसें.१६८४). ४ जाने. १६९० मध्यें यानें राजारामचरित्र लिहिलें. हा स. १६९० मध्यें वारला असावा असें दिसतें. राजारामचरित्रावरून राजारामाच्या जिंजीच्या प्रवासाची बरीच बारीक व विश्वसनीय माहिती मिळते ( वा. सी. बेंद्रे यांच्या राजारामचरित्रावरून ).

**केशवदास**— ( स. १५५४-१६१६ ) एक हिंदी कवि व संस्कृत ग्रंथकार. याचा पिता काशिनाथ व आजा कृष्णदत्त. हा ओर्छाच्या रामसिंह राजाच्या इंद्रजितसिंह नांवाच्या भावाच्या सभेंत होता.

यानें कविप्रिया व रसिकप्रिया नांवांचे दोन ग्रंथ लिहिले. पहिल्या ग्रंथांत अलंकार सांगितले आहेत. तो ग्रंथ यानें आपली शिष्यिण प्रविणराय वेश्येकरितां लिहिला. दांपत्यरतिभावाचें वर्णन दुसऱ्या ग्रंथांत आहे. याच्या रामचंद्र महाकाव्यांतील संवाद फारच चांगले साधले आहेत. शब्दश्लेषहि खूप आहेत. हें काव्य साधु तुळशीदासाच्या सांगण्यावरून यांनीं लिहिलें अशी प्रसिद्धी आहे. वरील ग्रंथांशिवाय यानें विज्ञानगीता, वीरसिंहदेवचरित्र, जहांगीरचंद्रिका हे लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध आहेत. रत्नबावनी, नखशिख, हेहि ग्रंथ यानें लिहिले आहेत.

महाराजा बिरबलनें याला एका कवितेबद्दल ६ लाख रुपये दिले होते. ती कविता पुढीलप्रमाणें होयः

केशवदास के भाल लिख्यो बिधि रंक को अङ्क बनाय सँवार्यो । धोये धुवै नहिं छूटो छुटै बहु तीरथ जाय कै नीर पखार्यो ॥ ह्वै गयो रंक ते राव तबै जब बीरबली नृपनाथ निहार्यो । भूलि गयो जग की रचना चतुरानन बाय रह्यो मुख चार्यो ॥

इंद्रजित्सिंहाला अकबराचे एक लाख रुपये देणें होते. ते बिरबलद्वारां माफ करविले. देव कवीनें तर 'कठिण काव्य का प्रेत' असें याला म्हटलें आहे. याच्या कवितेविषयीं पुढील म्हण हिंदींत प्रसिद्ध आहेः 'कविका दोन बच है बिदाई पुछै केशव कवितायै।' तथापि हे मोठे रसिक होते.

**केशवदेव**--रतलामच्या रतनसिंगाचा हा नातू होय. यानें 'सीतामऊ' संस्थानची स्थापना केली. याला स. १६९५ त औरंगजेबाकडून तिरोड, नाहरगड, व अलोट या परगण्यांची जहागीर मिळाली. पैकीं मराठ्यांच्या स्वारीच्या वेळीं ग्वाल्हेर व देवासच्या राजांनीं अनुक्रमें नाहरगड व अलोट हे परगणे बळकाविले.

**२.** ( स. ११९२-१२१८ ) कोलनू घराण्यांतील राजा. याचे लेख उपलब्ध आहेत.

**केशवनाथ**—मारकीनाथाचा शिष्य. ग्रंथ-गर्भगीता, गुरुगीता ( र. श. १६२३ भाद्रपद व. १० ) ( सं. सू. ).

**केशव महाजन**—कोंकणच्या कामदेवराजाचा मंत्री.

**केशवमिश्र**—( स. १२७५ सुमार ) यानें 'तर्कभाषा' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. मिथिलेचा रहिवाशी असून गोवर्धनमिश्राचा गुरु होता. ह्या गोवर्धनमिश्रानें तर्कभाषेवर 'तर्कभाषाप्रकाश' नांवाची टीका लिहिली आहे. 'किरणावलिभास्कर' व 'कणादरहस्यमुक्ताहार' ह्या ग्रंथांचा कर्ता पद्मनाममिश्र हा गोवर्धनाचा थोरला भाऊ होता. तेव्हां केशवमिश्र, पद्मनाभ व गोवर्धन हे समकालीन होते. स. १४ व्या शतकाच्या उत्तरार्धांत विजयनगर येथील हरिहर राजाच्या दरबारीं असणाऱ्या चिनभट्टानें तर्कभाषेवर तर्कभाषाप्रवेशिका नांवाची टीका लिहिली, असें सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं आपल्या स. १८८२-८३ च्या रिपोर्टस् ऑफ संस्कृत मॅन्युस्क्रिप्ट्समध्यें म्हटलें आहे. पद्मनाभ हा वर्धमानापेक्षां लहान असून त्यानें आपल्या किरणावलिभास्करांत याचा उल्लेख केला आहे. तेव्हां पद्मनाभ १३ व्या शतकाचा आरंभ व १४ व्या शतकाचा शेवट यांमध्यें होऊन गेला असला पाहिजे. हा बहुधा १३ व्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला असावा ( हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३०१ ).

**२.** ( स. १५५०-१६०० सुमार ) याचा अलंकारशेखर नांवाचा ग्रंथ काव्यमालेंत प्रसिद्ध झाला आहे. त्याचे कारिका, वृत्ति व उदाहरणें असे तीन भाग आहेत. शौद्धोदनीच्या आहेत. या ग्रंथाचे आठ भाग असून त्यांना रत्न असें नांव दिलें आहे. उदाहरणार्थ, उपक्रमरत्न, दोषरत्न, गुणरत्न वगैरे. प्रत्येक रत्नांत अनेक 'मरिचि' आहेत. मूळ कारिका १२ व्या शतकानंतर रचिल्या आहेत. या ग्रंथांत कविकल्पलता, गोवर्धन, भार्गवसर्वस्व, भोजराज, महिमभट्ट, राजशेखर, श्रीपाद व श्रीहर्ष या ग्रंथांचा किंवा ग्रंथकारांचा उल्लेख आला आहे. हा ग्रंथ करण्यापूर्वी यानें आणखी सात ग्रंथ केलेले आहेत. ते अलंकारसर्वस्व, काव्यरत्न इत्यादि होत. हा राजा माणिक्यचंद्राचा आश्रित होता. माणिक्यचंद्र हा कांग्राचा राजा असून धर्मचंद्रानंतर म्हणजे स. १५५३ मध्यें गादीवर आला. त्याच्या सांगण्यावर हा अलंकारशेखर ग्रंथ लिहिलेला आहे ( कार्णेकृत संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास, पा. २४६-५० ).

**केशवराज सूरि**—हे नागदेवाचार्यांचे शिष्य. यानें संस्कृत व मराठी मिळून पंधरा सोळा ग्रंथ केले आहेत. महीन्द्रव्यासाच्या लीलाचरित्रग्रंथांतील चक्रधराचीं वचनें एकत्र करून यानें 'सिद्धांत सूत्रपाठ' नांवाचा ग्रंथ लिहिला. याच्या त्या सूत्रास आचार्यसूत्रें असेंहि म्हणतात. ह्या ग्रंथांत एकंदर १६०९ सूत्रें आहेत. त्यांचा महानुभावाला नित्यपाठ करावा लागतो. कित्येक वर्षांनीं रामेश्वर नांवाच्या ग्रंथकारानें त्याचे ११ भाग पाडले. यानें मूर्तिप्रकाश नांवाच्या आपल्या ग्रंथांत चक्रधराविषयीं माहिती दिली असून त्याच्या रूपगुणाचें वर्णन केलें आहे. यांस प्रत्यक्ष चक्रधराचा सहवास घडला असल्यामुळें याच्या ग्रंथास एकप्रकारचें महत्त्व आहे. याचा लेखनशक १२०६ (स.१२८४) हा आहे ( मराठी वाङ्मयाचा इतिहास १·४५५ ).

**२.** शिवकल्याणाच्या गुरुपरंपरेंतील एक (श. १४५०) ग्रंथ-रामायण ( सं. सू. ).

**केशव रामचंद्र**—हा दुसऱ्या रघूजी भोसले नागपूरकराचा हैद्राबादचा वकील ( ना. प्रां. इ. पा. २१७ ).

**केशवराव पटवर्धन**—( कुरुंदवाड ) त्रिंबकरावाचा हा मुलगा.

यानें इंग्रजांशीं तहनामा केला. हा मिरजकरांशीं झालेल्या तहनाम्याप्रमाणेंच होता. याला चार मुलगे होते. हा स. १८२७ त वारला, तेव्हां याचे सर्व पुत्र अज्ञान होते, त्यामुळें संस्थानच्या कारभाराचा सर्व बोजा याची बायको लक्ष्मीबाई इजवर पडला.

**केशवराव पानसे**—पेशव्यांचा तोफखान्यावरील निष्णात अधिकारी.

**केशवसेन**—( स. १२०० सुमार ) हा बंगाल्यांतील सेन घराण्यापैकीं लक्ष्मणसेनाचा पुत्र. याच्या वेळीं सेन घराण्याचें राजकीय महत्त्व नष्ट झालें होतें.

**केशवस्वामी**—हे रामदास-पंचायतनापैकीं होत. यांचें उपनांव भागानगरकर असें होतें. यांचे वडील आत्मारामपंत मोंगलाईंत कल्याणीचे कुलकर्णी होते. हे ऋग्वेदी होते. केशवाच्या आईचें नांव गंगाबाई होय. त्यांस हे वयाच्या ८० वर्षांनंतर झाले. केशवस्वामी हे पूर्ववयांत भागानगरच्या तानाशाह कुत्बशहाच्या पदरीं होते. यानें एकादशीचरित्र व इतर अभंग, पदें वगैरे काव्य केलें आहे. काव्यसंग्रहांत यांचीं सुमारें ५०० ते ६०० पदे छापलीं आहेत. यांची शिष्यशाखा बरीच मोठी होती. तिनें मराठी भाषेची पुष्कळ सेवा केली आहे. त्यापैकीं शिवराम व संतराज हे शिष्य प्रमुख होत. यांचे बरेचसे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. केशवस्वामीचा समाधिकाल शके १६०४ पौष शु. १३ असून समाधिस्थळ हैद्राबादेस आहे.

**केशवाचार्य**—रामनुजाचार्याचा पिता.

**केशिदेव शिलाहार**—हा ठाण्याच्या अपरादित्याचा पुत्र.

**केशिराज**—(स.१२६०) 'शब्दमणिदर्पण' नांवाच्या कानडी श्लोकबद्ध व्याकरणग्रंथाचा कर्ता. आणखीहि यानें पांच ग्रंथ केले आहेत. पण ते अनुपलब्ध आहेत. हा जैन होता. पिता-मल्लिकार्जुन. सोमेश्वर होयसळाच्या (स. १२३३-५४) नंतर किंवा त्या सुमारास हा होता. हें घराणें कवीचें होतें. यानें आपल्या ग्रंथांत अनेक मोठाल्या कवींचे उतारे उदाहरणार्थ घेतले आहेत. यानें आठ भागांत व्याकरणविषयक फोड केली असून नवव्या भागांत थोर कवींच्या गूढ शब्दप्रयोगांचें स्पष्टीकरण केलें आहे. यानें आपल्या ग्रंथावर स्वतःच वृत्ति लिहिली आहे. नृपतुंग व नागवर्म या पूर्वीच्या कानडी व्याकरणकारांपेक्षां यानें विस्तृत, क्रमबद्ध आणि शास्त्रशुद्ध व्याकरण तयार केलें (क. क. च. भा. १ पा. ३८५).

**केसराबाई होळकर**—ही मल्हारराव्याची आई होय. ही आपल्या सरदारांशीं वाटाघाटी करून राज्यकारभारांत लक्ष घालीत असे (म. रि. उत्तर वि. ३; पृ. ४४३).

**केसरी गंग**--गंग घराण्यांतील पृथ्वीपतीचें नामान्तर (पृथ्वीपति पाहा).

**केसरीनाथ**—(स.१७२४ समाधि) हे राशीन येथील नाथसंप्रदायांतील मठाचे अधिपति होत. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. यांच्या गुरूचें नांव उदूबोधनाथ असें होतें. अनेक शिष्यांतून हेच राशीन मठाचे अधिकारी झाले. पूर्वाश्रमीं हे राशीनचे मामलेदार होते. नोकरीवर असतांना उदूबोधनाथांच्या कीर्तनास हे जात असत.

हे कवि असून यांची काव्यरचना फार आहे. यांनीं शक १६४६ मध्यें आळंदीस भोजलिंगाच्या समाधीपलीकडे समाधि घेतली. प्रख्यात मराठी कवि शिवदिन हा यांचा शिष्य होय (सं. सू.). याचा ग्रंथ सिद्धान्तसार. कांहीं पदेंहि आहेत. कृष्णार्णवाचाहि एक सिद्धान्तसार आहे.

**केसो कृष्ण दातार**—हा राजेबहादुरांकडील जंबूसरचा मामलेदार होता. हा दादासाहेबांकडे मिळाला आणि खानदेशांत नंदुरबार, सुलतानपुर वगैरे मुलखास उपद्रव करून ठाणीं बसवूं लागला. याचे बंदोबस्तास हरिपंतानें गणेशपंत बेहरे यास फौज, तोफा व गाडदी देऊन पाठविलें.

पुढें स. १७७९ मध्यें दादाचा पक्षपाती गुलजारखानावर नानानें पारिपत्य करण्याकरितां मोठें सैन्य पाठविलें. त्या वेळीं हा लासूरच्या गढींत होता. शेवटपर्यंत हा दादासाठीं जिवापाड खटपट करीत होता. स. १७७९ मध्यें हा नगरदेवळाच्या गढींत असतां याच्यावर केसो भिकाजी दातार यानें हल्ला केला, पण त्यांत यालाच यश आलें (म. रि. उत्तर वि. १. पृ. २३६, २३८).

**केसो त्रिमल पिंगळे**—मोरोपंत पिंगळ्याचा भाऊ. शिवाजीचा एक मुत्सद्दी. हरजीराजे महाडिक हा जिजीकडे स्वतंत्रपणें कारभार पाहतो असा (११।२।१६८७) संभाजीस संशय आला. तेव्हां याला भरंवशाचा म्हणून तिकडे पाठविलें. मदतीस संताजी घोरपडे दिले. हरजी व केसोपंताचा विरोध पाहून औरंगजेबानें आपले सरदार तिकडे रवाना केले. तेव्हां हे दोघे एक झाले, पण संभाजी वारल्याची बातमी कळतांच हरजीनें याला कैद केलें (संभाजी ९२-९३).

**केसो भिकाजी दातार**—सवाई माधवराव यांचे कारकीर्दीत होळकर दरबारांत हे गृहस्थ पेशव्यांचे वकील होते. हे निस्पृह व स्पष्टवक्ते असून, यांचें अवलोकन सूक्ष्म व बारकाईचें होतें. गुप्त बातम्या काढण्यांत यांचा हातखंडा असे. यांनीं स. १७८२-१७९४ पर्यंत वकिलीचें काम केलें व पेशव्यांस वेळोवेळीं सरकारी व इतर बातमी दिली. यांनीं लिहिलेलीं २७६ पत्रें (महेश्वर दरबारचीं पत्रें भा. २) यांत प्रसिद्ध झालीं असून त्यांत तत्कालीन होळकरशाहीचा इतिहास पाहावयास सांपडतो.

स. १७७९ मध्यें यानें केसो कृष्ण दातार यांजवर नगरदेवळच्या गढींत हल्ला केला. पण त्यांत याला अपयश आलें. नंतर हा अहल्याबाईजवळ नानाचा विश्वासू कारकून म्हणून होता ( म. रि. उत्तर वि. पृ. २३७-२३८; विठ्ठल शामराज पाहा ).

**केम्पदेवराज**—(स. १६५९-७२) म्हैसूर संस्थानांतील मुप्पिनदेवाचा मुलगा.

बेदनूरच्या शिवाप्पा नायकानें याच्यावर केलेल्या स्वारींत यानें त्याचा पराभव केला; आणि मदुरेच्या नायक राजापासून एरोड घेतलें. याच्यानंतर याचा पुतण्या चिक्कराय हा गादीवर आला.

**कैकूबाद**—(स.१२८७-१२९०) घियासुद्दीन बल्बनचा नातू व बंगालचा सुभेदार बुघ्राखान याचा मुलगा. घियासुद्दीन बल्बन यास दोन मुलगे होते. त्यांपैकीं कानमलिक मुहंमदखान या मुलासच आपल मागें तक्त मिळावें अशी त्याची इच्छा होती. परंतु मुलतानवरील मोंगलांनीं केलेल्या स्वारींत तो मारला गेला बुघ्राखान यास तक्तावर बसवावें म्हणून बंगालमधून दिल्लीस बोलावून घेतलें. दिल्लीस आल्यावर तेथील उदास वातावरणांत त्यास चैन पडेना म्हणून शिकारीस जाण्याचे मिषानें तो दिल्लीबाहेर पडला व थेट लखनावतीस गेला. त्यामुळें बल्बन संतापला व त्यानें मरतांना आपल्या विश्वासू सरदार मुहंमदखानाचा मुलगा कैखुस्रव यास गादीवर बसविण्यास सांगितलें. बल्बनच्या मृत्यूनंतर दिल्लीतील सरदारांनीं बल्बनची इच्छा अमान्य करून यास तक्तावर बसविलें.

आजोबाची कदर नाहींशी होऊन अल्पवयांत म्हणजे १७ वे वर्षी दिल्लीचें राज्य प्राप्त झाल्यावर हा उच्छृंखल बनला. राजाच्या स्वैराचारामुळें लोकांतहि अमर्याद स्वैराचाराचें युग उगवलें. राज्यकारभारांत लक्ष देण्याचें कैकूबादनें सोडून दिलें, त्यामुळें निजामुद्दीन नांवाच्या कारस्थानी अधिकाऱ्यानें सर्व सत्ता आपले हातीं घेतली. त्या कालीं दिल्लीस मुसलमान सरदारांत 'नव मुसलमान' अथवा बाटग्या मुसलमान सरदारांचा एक पक्ष होता. मोगल लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून येथील मुसलमानी सत्ता उखडून काढण्याचे प्रयत्न सुरू केले होते. त्या यत्नास त्यांच्याच जातभाईंकडून आळा घालतां यावा अशा दूरदर्शी विचारानें बल्बननें बाटून मुसलमानी धर्म स्वीकारलेल्या मोगल लोकांचा आपल्या सैन्यांत व सरदारांत भरणा केला होता. या बाटग्या मुसलमानांचा येथील मूळचे अस्सल मुसलमान सरदार द्वेष करीत. त्यांस अधिकारावर ठेविल्यास इस्लामी धर्माचें पांघरूण फेंकून देऊन आपल्या जातभाईंची सत्ता प्रस्थापित करण्याचा बनाव ते करतील असेंहि त्यांस वाटे. याचे कारकीर्दीत पहिलेच वर्षी गझनीच्या तमरखानाचे सेनापतित्वाखालीं मोगलांनीं पंजाबावर स्वारी केली ( स. १२८७ ). मलिक मुहंमद बबकनें दिल्लीचें सैन्य बरोबर घेऊन लाहोरजवळ मोगलांचा पुरा मोड केला. निजामुद्दीननें सुलतानाकडे अशी तक्रार केली कीं, दिल्लीचे बाटग्या मुसलमान मोगल सरदारांच्या फितुरीमुळें त्यांच्या जातभाईंना स्वाऱ्या करण्याचा मोह होतो. म्हणून त्यांनाच नाहींसें करावें हें उत्तम. मोगल सरदारांवरील हा आरोप सर्वस्वीं खरा नव्हता. इतकें खरें कीं, हें मोगल लोक बाटून जरी मुसलमान झाले होते तरी त्यांच्या जातभाईंशीं प्रसंगोपात्त पत्रव्यवहार करीत. त्यांच्यासंबधीं आलेला संशय कितपत खरा आहे याची चौकशी न करतां यानें त्यांचा वध करण्याचा हुकूम दिला आणि त्याची अंमलबजावणी झाली.

मात्र ज्यांना अस्सल मुसलमान स्त्रियांशीं लग्न करण्यास परवाने मिळून अशीं लग्नें झालीं होतीं त्यांस न मारतां तुरुंगांत ठेवण्यांत आलें. हे सरदार मारले गेल्यानें दिल्लींत मोगल व अफगाण असे दोन विरोधी पक्ष उत्पन्न झाले. हा दारूचे धुंदींत असतां निजामुद्दीननें कैखुस्रवला ठार मारण्याचा हुकूम मिळविला व रोहटक येथें त्याचा वध करविला. शिवाय खातिरुद्दीन नांवाच्या विश्वासू अधिकाऱ्यावर खोटा आरोप करून त्याला अधिकारच्युत करून त्याची शहरांतून गाढवावरून धिंड काढण्यांत आली. मुलतानचा सुभेदार शाहक याचा वध करण्यांत आला. असल्या या अमानुष वर्तणुकीमुळें राजनिष्ट सरदारांनीं राज्यकारभारांतील लक्ष काढलें. बुघ्राखानानें आपल्या मुलास पत्रें लिहून धोक्याची कल्पना करून देऊन सावध करण्याचा प्रयत्न केला. एकदां तर पितापुत्रांची भेट व्हावयाचें ठरलें, परंतु त्याच सुमारास मोगलांनीं पंजाबवर स्वारी केली. वर वर्णन केल्याप्रमाणें दरबारांतील मोगल सरदारांचा निःपात करण्यांत आला तेव्हां मात्र बुघ्राखानास स्वस्थ बसवेना. निजामुद्दीनचें पारिपत्य करून कैकूबादला ताळ्यावर आणण्याच्या उद्देशानें गोग्रानदीचे तीरीं छावणी देऊन त्यानें मुक्काम केला व भेटींत आपल्या मुलांकडून निजामुद्दीन यास अधिकारच्युत करण्याचें वचन घेऊन लखनावतीस प्रयाण केलें. त्यानें मुलतानला जावें असा यानें हुकूम काढला, पण पुढें त्यानें मुलतानला जाण्यास विलंब लावल्यामुळें हुकुमाचा अपमान झाल्याचा त्यावर आरोप ठेवून विष देवघून वध करविला.

निजामुद्दीनच्या मृत्यूमुळें राज्यकारभारांत गोंधळ माजला. दरबारचा वचक कमी झाला. पुन्हां वचक बसवावा म्हणून या राज्यांतील सर्वांत अधिक प्रबल सरदार जलालुद्दीन फीरूझ खल्जी यास दिल्लीस बोलावून घेतलें व त्याजकडे सैन्याचें आधिपत्य दिलें; व बराणची सरंजामी त्यास दिली. त्यास एकदम उच्च पदवीस चढविल्यामुळें दरबारांतील व बाहेरील तुर्की सरदारांस राग आला. पुढें लवकरच कैकूबादला अर्धांगवायु झाला. जलालुद्दीन फीरूजच्या विरुद्ध लोकांनीं कैकूबादच्या तीन वर्षे वयाच्या मुलास दिल्लीस नेऊन शमसुद्दीन कयूमर्स हें नामाभिधान देऊन त्यास तक्तावर बसविलें.

जलालचे मुलगे दिल्लींत घुसले व त्यांनीं कयूमर्सला पळविलें. अशा प्रकारें लोकांस अप्रिय असलेल्या पक्षाचा जय होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें लोकांनीं बंड केलें व जलाल यशस्वी झाला. यानें आपल्या बापास ठार मारल्यामुळें यावर सूड उगविण्याची इच्छा असलेल्या एका अधिकाऱ्यानें आसन्नमरण असलेल्या यास गादीवर गदगदां हलवून डोक्यावर लाथ मारून ठार केलें व याचें प्रेत यमुनेंत फेंकून दिलें ( स. १२९० ).

कैकूबादाच्या मृत्यूमुळें घियासुद्दीन बल्बनचे राजवंश स्थापन करण्याचे श्रम वायां गेले. त्याच्या मागें त्याच्या वंशांतील एकच पुरुष गादीवर बसून त्याचा असा वाईट शेवट झाल्यावर जलालुद्दीन तक्तनशीन झाला; व खल्जी राजवंशाचे राजवटीस सुरुवात झाली.

**कैखुस्रव गुलाम**—( स १२८७ सुमार ) मुहम्मद गुलामचा पुत्र ( कैकूबाद पाहा ).

**कैय्यट**—( स. १००० नंतर ) काश्मीरी पंडित. बाप जय्यट. आडनांव उपाध्याय. गुरु महेश्वर. संस्कृत ग्रंथकार. पतंजलीच्या महाभाष्यावर याची सुप्रसिद्ध टीका आहे. त्या टीकेचें नांव प्रदीप असें असून प्रदीपावर नागोजीभट्टाचा उद्योत आहे. याचा प्रदीप भर्तृहरीच्या वाक्यपदीयाच्या आधारें लिहिला. काव्यप्रकाशकार मम्मट याचा भाऊ होता.

काशकृत्स्न व आपिशली यांचे हा उतारे घेतो. यानें केलेल्या प्रदीपावर पदमंजरी ग्रंथ उभारलेला आहे. स्वतंत्र ग्रंथकर्त्याचा काळ संपून याच्यापासून टीकाकारांचा काळ सुरू होतो.

**कैसरखान फारुकी**—हा पहिल्या गज्नीखान फारुकीचा मुलगा. याचा मुलगा अहसनखान.

**कोक**—हा काश्मीरच्या राजाचा दिवाण होता. यानें संभोगशास्त्रावर ग्रंथ लिहिला असून त्यास कोकशास्त्र असें नांव आहे. त्यावरूनच इतर जीं संभोगशास्त्रावर पुस्तकें लिहिलीं गेलीं त्यांसहि कोकशास्त्र असें म्हणतात.

**कोकालिपा**—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं ऐंशीवा सिद्ध होय. हा जातीनें राजकुमार असून चंपारण्यांत राहत असे. यानें आयुःपरीक्षा (तं. ४८।९४) हा ग्रंथ लिहिला आहे.

**कोकिल**—( गंगाधर कोकिल पाहा ).

**कोकिली**—चोल घराण्यांतील हा एक राजा होय.

**कोक्कल कलचुरी**—( स. ८५० सुमार ) हा त्रिपुरीचा कलचुरी राजा. कनोजचा मिहिरभोज व राष्ट्रकूटांपैकीं वल्लभराज म्हणजे दुसरा कृष्ण हे याच्या वर्चस्वाखालीं होते. याची एक कन्या कृष्ण राष्ट्रकूटाला दिली असून ती पट्टराणी होती. कदाचित् वरील भोजास याची दुसरी एखादी कन्या दिलेली असावी. याचा स्वतःचा विवाह हर्ष चंदेल्लाच्या नट्टा नामक बहिणीबरोबर झाला होता. पण याच्या या महत्त्वाचें कारण शिलालेखांत लिहिल्याप्रमाणें अनुपम पराक्रम होता कां वैभवशाली राजघराण्याशीं असलेला स्नेहाचा व सोयरिकीचा संबंध होता असा प्रश्न उत्पन्न झाल्यास पराक्रमाबद्दल पुरावा उपलब्ध नाहीं ( म. यु. भा. २. २२३ ). याच्या वेळीं हर्ष चंदेल्लानें याचा एकदां पराभव करून कालंजर किल्ला घेतला असावा ( म. यु. भा. २. २०६ ). कलचुरींविषयीं बिलहारी शिलालेख व बनारस ताम्रपट हे महत्त्वाचे आहेत ( एपि. इंडि. १. २६५; २. ३०५ ).

२. ( स. १००० ) हा दुसऱ्या युवराज कलचुरीचा मुलगा.

**कोक्किली**—( स. ७०९ सुमार ) हा पूर्व चालुक्य घराण्यापैकीं दुसऱ्या जयसिंहाचा धाकटा सावत्र भाऊ असून यानें सहा महिनेच राज्य केलें.

**कोचचडीयन रणदीरन**—( स. ६८० ) हा अरिकेसरी मारवर्मनचा पुत्र. त्यानंतर गादीवर आला. हा एक शूर राजा होता. यानें तामील कर्नाटक वगैरे देश जिंकले होते.

**कोटा**—( स. १३३९ ) काश्मीरची शेवटली हिंदु राणी. हिच्यापासून पहिल्या शमसुद्दीननें राज्य घेतलें.

**कोट्स** ( डॉक्टर )—( स. १७९७–१८१८ ) डॉ. कोट्स हा स. १७९७ पासून पुण्याच्या रेसिडेन्सींत नोकरीस होता. गोस्तन-देवीचा उपाय नुकताच डॉ. जेन्नर यानें इंग्लंडांत प्रसिद्ध केला त्याचा प्रसार यानें पुण्यांत पुष्कळ केला, आणि त्या कामांत पुणेकरांचा लोभ संपादिला. देवी काढून घेण्यास लोक धजेनात, तेव्हां

लोकांस उदाहरण घालून देण्याकरितां बाजीरावानें आपली बायको वाराणशीबाई इजला याच्याकडून सुद्धां देवी काढून घेतल्या. पुण्याच्या रेसिडेंसींतला पहिला डॉ. टॉमस कूझो हा होय. त्याची बदली ता. ५-७-१७९४ रोजीं होऊन त्याचे जागीं जेम्स फिंडले आला; आणि फिंडलेच्या मागून स. १७९७ त कोट्सची नेमणूक झाली. हाच पेशवाईअखेर तेथें होता (म. रि. उ. ३, पृ. ४८६ ).

**(राणी) कोणदेवी**—ही प्रख्यात आदित्यसेन गुप्ताची पत्नी होय.

**कोणमंडळ घराणें**—कोणमंडळ प्रदेश गोदावरीच्या खोऱ्यांत आहे. या घराण्याचा उगम हैहय घराण्यांतील कार्तवीर्यापासून झाला. चवदावे शतकानंतर या घराण्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. यांचें घराणें पुढीलप्रमाणें झालें:

१ मुम्मडि भीम ( बा. छद्दिदेवी. स. १०६३ )–२ राजपरेंदु १ ला–३ मुम्मडिभीम दुसरा ( स. ११२८-३६ ) –४ लोकभूपालक ( स. ११५० ).

राजपरेंदु पहिल्याचा दुसरा मुलगा राजेंद्रचोल ( स. ११२८ ). त्याचा बेट व मल्लिदेव ( स. ११५५–९५ ). बेटाचा सूर्य-राजपरेंदु २ रा–वल्लभ-सत्य दुसरा ( स. ११९५–१२०७ ).

राजपरेंदुचा तिसरा मुलगा सत्य किंवा सत्याश्रय ( स. ११३६ )–भीम ( स. ११५३ ). ( सिवेल आणि आयंगार, पृ. ३६१ ).

**कोन**—( स. १५८७ ) एक डच अधिकारी. याचा जन्म स. १५८७ मध्यें झाला असून यानें शिक्षण कोठें घेतलें झालें. पुढें स. १६०७ त हा पूर्वेकडील डच वसाहतींत आला. स. १६१३ त बेंटमचा प्रेसिडेंट होऊन १६१७ त गव्हर्नर जनरलची जागा व संपूर्ण अधिकार मिळाले. पोर्तुगीझांचा आल्बुकर्क, फ्रेंचांचा डूप्ले व डचांचा कोन हे ज्या त्या राष्ट्रांचे पुरुष इकडील साम्राज्यांत प्रमुख समजले जातात. डच लोकांचें राज्य इकडे स्थापन करावें अशीच याची महत्त्वाकांक्षा असून यास कंपनीचे पाठबळ होतें ( त्रि. रि. पूर्वार्ध, पृ. १७२ ).

**कोन्हेर त्रिंबक पटवर्धन**—हा पटवर्धनांच्या कुलींतला सांखेतील होय. हा धाडसी होता. याला कुलेदीप म्हणत. याच्या स्वारीमुळें हैदरावर बराच परिणाम घडला ( स. १७७१ ). पांडुरंगराव, कोन्हेरराव, रामचंद्र गणेश कानडे व पानशे हे चार सरदार कोल्हापुरकरांवर रवाना झाले होते. त्या वेळीं किल्लेकराचा सरंजाम साफ व कायमचा उतरला, त्याचें वर्णन आहे.

करवीरच्या त्रासामुळें यास कित्तूरच्या पुढें जातां आलें नाहीं. उलट याला परत यावें लागल्यानें पलीकडे हैदराचा मार्ग निष्कंटक झाला. कित्तूरचा गुंता उरकून कोपळच्या रोखें सेनापति कळावितील तिकडे जावें असा याचा विचार होता ( स. ९-१-१७७६ ). पुढें यानें साहसानें एकदम बंकापुरावर जाऊन हैदराचा जम बसला होता तो हिंमतीनें उडवून द्यावा असा विचार ठरविला. हें वर्तमान हैदरचा सरदार कुमदान यास कळतांच ता. ८ जानेवारी १७७७ रोजीं बंकापुराहून निघून तो पटवर्धनावर छापा घालण्याचे उद्देशानें सायंकाळीं सावशीस येऊन राहिला. पटवर्धन मंडळी त्याच दिवशीं बाहेर पडून सावशीपासून दोन कोसांवर येऊन राहिली. ही बातमी कुमदान यास कळल्यामुळें तोहि रात्रीं बाहेर पडला नाहीं. उजाडल्यावर पटवर्धनांनीं कुमदानवर हल्ला करण्याचें ठरविलें. परंतु कुमदाननें जवळच्या शेतांत तोफखाना छपवून ठेविला होता तो यास माहीत नव्हता. मराठी फौज माऱ्याच्या तावडींत येतांच तिजवर कुमदाननें तोफांचा मारा सुरू केला. त्यामुळें लोक पटापट मरूं लागले. तेथें हा व्यवस्था करीत असतां ठार झाला ( स. १७७७ जानेवारी ९ ).

हा काळाच्या जबड्यांत उडी घेणारा मर्द शिपाई असून विचारापेक्षां धाडसाच्या जोरावर वागणारा होता.

एकदां परशुराम भाऊ पटवर्धनानें कोल्हापूर घेऊन लुटलें. त्या वेळीं शहरांतील सर्व लोक तेथील श्रीशंकराचार्यांच्या मठाचा आश्रय करून राहिले. त्यांस वाटलें कीं आचार्यांच्या मठाची अमर्यादा पटवर्धन सरदार करणार नाहींत.

पण यास हें कळतांच संपत्तीच्या आशेनें यानें मठावर हल्ला केला. तो आपण जातीनें नागवी तरवार हातीं घेऊन सर्वांच्यापुढें होऊन मठांत शिरूं लागला. त्या वेळीं त्या जगद्गुरूच्या गादीवरील यतीश्वर धांवून येऊन मठाच्या दरवाज्यांत हात पसरून उभे राहिले. त्यांनीं यास सांगितलें कीं, " आमच्या आश्रयास आलेल्या ह्या लोकांस तुम्हीं त्रास देऊं नये. आमची आज्ञा मान्य करून ह्या गादीचा मान तुम्हीं रक्षावा." परंतु ह्या उन्मत्त पुरुषानें त्यांस उत्तर दिलें कीं, "जोगड्या ! तुला ह्याची पंचाईत कशाला ? बाजूस हो." असें म्हणून त्या सत्पुरुषाच्या छातींत धक्का मारून त्यास एकीकडे ढकलून दिलें, आणि आंत शिरला. याच्या पाठोपाठ याचे शिपाई आंत शिरले. त्यांस यानें मठ लुटण्यास हुकूम केला. मग त्या आडदांड लष्करी लोकांनीं खून, स्त्रियांची अब्रू घेणें, वगैरे अनेक दुष्कर्में त्या ठिकाणीं करून तें पवित्र स्थान भ्रष्ट केलें; व जातांना शेवटीं मठास आग लावून दिली. ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणाधमानें आपल्या

गुरुस्वामीचा अपमान करून त्याच्या पवित्र मठास आग लावून स्वधर्म पायाखालीं तुडविला.

यतीश्वराचा असा अपमान झाल्यावर ते तेथून निघाले आणि परशुरामभाऊस ही गोष्ट कळवावी म्हणून त्याजकडे गेले. यतीश्वरानें त्यास याचें अनन्वित कृत्य सांगितलें, परंतु त्यानें त्या बोलण्याकडे मुळींच लक्ष न देतां कोन्हेरपंताचें करणेंच योग्य ठरविलें. तेव्हां त्या सत्पुरुषास अत्यंत राग येऊन अनावर क्रोधाच्या भरांत तो उभा राहिला आणि मोठ्यानें ओरडून बोलला कीं, "वैदिक धर्मसंस्थापक जो शिवछत्रपती यांच्या वंशाशीं शत्रुत्व करून त्याचा अपमान करणारे स्वामीद्राही आणि वैदिकधर्मसंस्थापक जे श्रीमच्छंकराचार्य यांच्या सिंहासनाचा अपमान करणारे गुरुद्रोही असे जे तुम्ही दोघे त्या तुमचा निर्वंश होवो. तुम्ही दोघे अधम गतीस जाल." असें म्हणून जीभ हांसडून त्यानें आपला जीव दिला. ह्या साधुपुरुषाची समाधि वाळव्यानजीक कृष्णातीरीं शिरगांव येथ आहे. तो गांव पुढें पेशव्यांनीं त्या समाधीच्या पूजानैवेद्याकडे व वार्षिक उत्सवाकडे दिला. दरसाल तेथें पुण्यतिथि होते. ह्या वरील शापाप्रमाणें सर्व कांहीं घडलें आहे (भा. व. खं. ३, ऐ. गो. पृ. २६।२७).

**कोन्हेरराम रामाजीपंत कोल्हटकर**—(मृत्यु स. १७५२ सुमार) प. रघूजीचा दिवाण. पांडववाडी (वाईजवळ) येथें रामाजीपंत कोल्हटकर म्हणून एक रामभक्त होते. त्यांच्या वरदानानें रघूजीचा जन्म झाला, असें त्याचे आईबाप मानीत म्हणूनच त्याचें नांव रघूजी ठेवलें होतें. रामाजीपंतांचे पुत्र कान्हेरराम व भास्करराम हे त्या संबंधामुळेंच रघूजीकडे नागपुरास आले.

रघुनाथभट झिपरे सावकार रघूजीस जामीन राहण्यास तयार नव्हता. तो कोन्हेररामच्या मध्यस्तीमुळेंच जामीन राहिला. शाहूनें रघूजीस कान्होजीवर पाठविलें असतां त्याजबरोबर शाहूचे वतीनें कोन्हेरराम हाहि त्याचा दिवाण म्हणून गेला.

याचा मृत्यु स. १७५२ च्या सुमारास झाला. बंगाल्यांत जेव्हां भास्करराम मारला गेला तेव्हां रघूजीनें कोन्हेररामाचें सांत्वन करून त्यास वंशपरंपरा दरसाल पंचवीस हजारांची नेमणूक करून दिली मरणापूर्वी रघूजीनें कोन्हेररामास नागपुरास बोलावलें. दोघांचाहि फार ऋणानुबंध असून शेवटचे प्रसंगीं त्यानें जवळ असावें अशी रघूजीची फार इच्छा होती. परंतु वृद्धपणामुळें व भास्करपंतांच्या शोकामुळें तो नागपुराहून गेला तो परत आला नाहीं (नागपूर प्रांताचा इतिहास).

रत्नागिरीजवळील नेवरें गांवीं रामजी नारायणजी कोल्हटकर राहत असत. पुढें त्यांना पांडवगडचीं वतनें मिळालीं. पांडवगडाहून नेवऱ्यास जाण्याची वाट असून तीच वाट भैरवगडाहून चिपळूणास जाते. भैरवगडाखालीं भोसले बंधु राहत असत. त्यांचा व यांचा दाट परिचय झाला. एकदां हबशानें भैरवगडावर स्वारी करून यास (भोसले) कैद करून ठेविलें. तेव्हां पंतांनीं ३ हजार रु. दंड भरून त्यांची सुटका केली. त्यामुळें भोसल्यांनीं आपलें उपाध्येपण यांना बहाल केलें. यांच्यामार्फतच भोसले बंधू छत्रपतीकडे आले.

शाहूनीं ठोसरांची मुलगी सांभाळली होती. तिचा विवाह कोन्हेररामशीं लाविला. या कारणानें कोन्हेरवर महाराजांचा विशेष लोभ जडला. त्याचा भाऊ भास्कररराव यास पुढें रघूजीची बक्षिगिरी देण्यांत आली. कोल्हटकर आणि भोसले यांचें चांगलें नसलें तरी भोसले होते तोंपर्यंत कोल्हटकरांचा उदो उदो होत असे. स. १७४६ त कर्नाटकच्या सुभेदारीच्या भानगडींत भोसले हे बाबूजी नाईकाच्या बाजूचे होते व कोन्हेर हे साताऱ्यास राहून त्या बाबतींत खटपट करीत होते. भास्करपंतांस अलिवर्दीखानानें दगा दिल्यामुळें कोन्हेरास दुःख वाटून त्यांनीं देशीं जाण्याचा हट्ट घेतला. तेव्हां भोसल्यांनीं त्याला २५ हजारांची जहागीर व इतर खर्च देईन, असें सांगितलें होतें. तरीहि पंतांची उदासीनता दूर होईना. तेव्हां त्यांच्या मुलांना मनसबदाऱ्या देऊन मोठ्या कष्टानें रघूजीनें त्यांना निरोप दिला. रघूजीनें खुद्द म्हटलें, "आमचाही वृद्धापकाळ व तुमचाही वृद्धापकाळ, अशा प्रसंगीं आपण विभक्त असावें हें ईश्वरास मानत नाहीं."

पुढें या दोघांची भेट झाली कीं नाहीं हें नक्की आढळत नाहीं. भोसल्यामुळें कोल्हटकर व पेशवे यांचें मात्र सूत नव्हतें. रघूजी व कोन्हेरपंत मेल्यावर नानासाहेबांनीं त्यांच्या मुलांमधील तंटे सोडविले. कोन्हेरांस ६ मुलगे होते. यांच्याच घरचा शागिर्द दिवाकरपंत चोरघोडे हा मोठा मुत्सद्दी म्हणून उदयास आला.

**कोन्हेरराव त्रिंबक एकबोटे**—(मृ. स. १७५६) पहिले फांकडे कोन्हेरराव त्रिंबक एकबोटे. यांच्या शौर्यामुळें बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या कारकीर्दीत यांना शिलेदारी मिळाली. स. १७५१-५२ मध्यें जें मराठ्यांचें व मोगलांचें तुमुल युद्ध माजलें त्यांत यानें बरेच शौर्याचे पराक्रम करून दाखविल्यामुळें याची कीर्ति अजरामर झाली. मराठ्यांचें बुशीशीं जें मोठें युद्ध झालें त्याहि वेळीं हा त्या ठिकाणीं हजर होता. या वेळीं यानें आपल्या शौर्याची

सीमा केली. गनीमाकडून तोफेचे फ्रेंच गोळे सुटत होते तरी धैर्यानें हा त्यांना तोंड देत होता. त्याचप्रमाणें इतरांच्या साह्यानें यानें मोंगलांची सोन्याची अंबारी लुटली.

यानीं अनेक युद्धांमध्यें शत्रूंच्या फौजेवर चढाई करून फार मर्दुमकीचीं कामें केलीं. त्यामुळें यांचें शौर्य श्रीमंताचे नजरेस आलें व यांस शिलेदारीचें स्वतंत्र पथक मिळालें. बुसीनें ज्या वेळेस पुण्यावर चाल करून पेशवाईचीं उपकरणें व देव पळविले त्या वेळेस मराठे सरदार न डगमगतां मोठ्या आवेशानें शत्रूशीं युद्ध करण्यास सिद्ध झाले, त्यांत हा एक होतकरू शिलेदार हजर होता. ह्याच वेळीं याच्या ह्या युद्धकलाकौशल्याची फार तारीफ होऊन यास 'फांकडे' असें कार्यदर्शक पद मिळालें. तेव्हांपासून याची कोन्हेर त्रिंबक फांकडे ह्या नांवानें प्रसिद्धि झाली; आणि यास पेशवे सरकारांतून मोठा बहुमान व इनाम मिळालें, व याच्या बहादुरीबद्दल याच्या घोड्याच्या पायांत चांदीचा वाळा घालण्याचा मान मिळाला. हा असा बहुमान फारच थोड्या सरदारांस पूर्वी मिळत असे. हा होळीहुन्नूरच्या लढाईमध्यें हजर होता. तेथें यानें शत्रूवर पराक्रमानें चालून जाऊन आपलें रणशौर्य चांगलें व्यक्त केलें. त्या लढाईत हा मोठ्या पराकाष्टेनें बचावला. स. १७५६ त सदाशिवराव भाऊसाहेबांबरोबर हा सावनूरच्या स्वारीवर गेला, तेथें याच्या डोक्यावर बुसीच्या तोफखान्यांतील एक ताफचा गोळा पडून त्यांत याचा अंत झाला. याबद्दल बाळाजी बाजीरावांस फार दुःख झालें. बाळाजीनें यांच्या वंशजांस चांगलें इनाम देऊन या शूर पुरुषाची निस्सीम स्वामिभक्ति आणि पराक्रमपटुत्व या गुणांचें योग्य चीज केलें ( इ. सं. पु. ४ अं. १०, पृ. १४३-४४ ). शिवापुरकर देशपांडे यांच्या शकावलीवरून हा स. १७६० मध्यें हयात होता असें दिसतें ( पु. द. ३. पा. १२० )

**कोरांग**- महाकुल महातिष्य राजाचा धाकटा भाऊ व दुराचरणी अनुलेचा पति होय. हा विषप्रयोग घडून तिच्याच हातून मरण पावला ( ग्या. इं. को. ).

**कोराडी रामशास्त्री**—( स. अठरावें शतक सुमार) हा एक तेलगू कवि. हा ओंगाळें प्रांतांत राहत असे. यानें वसरादत्त काव्य रचिलें. ह्या काव्यांत राजा कंदार पहलु ह्याचा विवाह वसरादत्त हिजबरोबर झालेला आहे (परशाकृत तेलगू वाङ्मय, पृ. ६४ ).

**कोर्टेन**—( स. १६३५-३९ ) हा एक इंग्रज व्यापारी असून फार धनसंपन्न होता. यानें पिंडर व पोर्टर या साथीदारांच्या साह्यानें ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापार बुडविण्याची मसलत केली; आणि हिंदुस्थानशीं व्यापार करण्याकरितां नवीन एक कंपनी स्थापून तिला बादशाहाकडून सनदहि मिळविली ( स. १६३५ ). परंतु याच्या कंपनीनें फार दिवस टिकाव धरला नाहीं. उच लोकांकडून याच्या जहाजांस अतिशय जाच झाला. पुढें स. १६३९ त राजानें याच्या कंपनीच्या व्यापाराचा सर्व तपास करून हकीकत जाहीर करण्यासाठीं एक कमिटी नेमिली. तिनें तपास केल्यावर राजानें याची सनद काढून घेतली.

**कोलब्रुक** (हेन्री टॉमस)—( स. १७९९-१८३० ) ना. भोसल्यांशीं सबसीडियरी तह करण्यासाठीं वेलस्लीनें हेन्री टॉमस कोलब्रुक यास आपला वकील म्हणून नागपुरास पाठविलें. तो ता. १८-३-१७९९ रोजीं नागपुरास येऊन पोहोंचला.

कोलब्रुक याचें नांव प्रख्यात संस्कृत पंडित म्हणून हिंदुस्थानांत व युरोपांत प्रसिद्ध आहे. याचा जन्म स. १७६५ मध्यें झाला. याचें शिक्षण घरीच झालें. वयाचे १५ वे वर्षीच यानें ग्रीक, लॅटिन या भाषा व गणित या विषयांत प्राविण्य मिळविलें.

स. १७८२ सालीं हिंदुस्थानांत एका कारकुनाच्या जागेवर याची नेमणूक झाली. हिंदुस्थानांत आल्यावर ११ वर्षांनीं यानें संस्कृत भाषेचा अभ्यास केला. "डायजेस्ट ऑफ दि हिन्दू लॉ" चें अर्धे राहिलेलें भाषांतराचें काम याजकडे देण्यांत आलें होतें. स. १८०५ सालीं फोर्ट विल्यम येथील विद्यालयांत हिंदु कायदा व संस्कृत विद्येचा याला अध्यापक नेमिलें. याच सुमारास यानें संस्कृत व्याकरण, हिंदुधर्मसंस्कारांची माहिती व वेदांवर निबंध लिहिले.

असा हा विद्याव्यासंगी पंडित राजकारणाच्या डावपेचांत निरुपयोगी ठरावयाचाच व हाच अनुभव पुढें आला. याच्या मनाचा स्वाभाविक कल अशा कामांत नव्हता. परंतु यास डिप्लोमॅटिक खात्यांत घालण्यांत आलें. याचा मुलगा सर टी. इ. कोलब्रुक यानें याचें चरित्र लिहिलें आहे, त्यांत त्यानेंहि ही गोष्ट कबूल केली आहे.

कोलब्रुकनें राजाजवळ व नागपूरचे मुत्सद्यांजवळ इंग्रजांशीं दोस्तीचा व सबसीडियरी सैन्य ठेवण्याबद्दलचा तह करण्याबद्दल गव्हर्नराची इच्छा कळवली. राजानें व मुत्सद्यांनीं अर्थात् राजकारणाच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें स्पष्ट न सांगतां नुसत्या गोडगोड थापा देण्यास सुरुवात केली. साध्या मनाचा हा त्यास भुलला व यानें कलकत्त्यास ग. ज. यास त्याप्रमाणें कळवलें व नागपूरशीं सबसीडियरी तह होण्याची फार आशा आहे, असें वारंवार लिहिलें.

इकडे याची भेट घेऊन तहाच्या शर्ती ठरण्याची वेळ ठरावी व मध्येंच राजा कोठें शिकारीस जावा, कधीं दुसरीच कांहीं सबब निघावी, अशी लांबवालांबव चालली.

दोन वर्षेपर्यंत हा नागपुरांत राहिला. शेवटी याचे डोळे उघडले, व यास स्पष्ट कळून आलें कीं राजा आपणास चालवीत आहे. उलट इंग्रजांचा वकील त्याचे दरबारीं राहिल्यानें त्याची इभ्रतहि उगीच वाढली आहे. म्हणून ग. ज. यास कळवून नागपूर येथील वकिलात काढून आपणास परत बोलावण्याचा हुकूम पाठवावा, असें यानें कलकत्त्यास लिहिलें.

त्याप्रमाणें ग. ज.नें हुकूम पाठवून यास परत बोलावलें. त्याप्रमाणें हा १८-५-१८०१ रोजीं नागपुराहून निघून गेला. जातांनाहि रघूजीनें याच्या मार्फत ग. ज. यास अघळपघळ आश्वासनें देऊन दोस्तीचा निरोप पाठवला. पण राजाचा भाऊ व्यंकोजी हा याला जातांना पहिल्या मुक्कामींच भेटला व यास त्यानें सांगितलें कीं ही सर्व दरबारी भाषा आहे. यांतील एक अक्षरहि खरें नाहीं. तेव्हां यास मोठें आश्चर्य वाटलें.

यानें नागपूरच्या दरबारचें व रघूजीसंबंधाचें वर्णन आपल्या खाजगी टिपणांत लिहून ठेवलें आहे. हा म्हणतो, "राजाला नक्षीच्या बांधीव कामाची गोडी असून ती त्यानें स्वतःकरितां बांधलेल्या महालामध्यें दिसून येते. राजाला बगीच्याचीहि बरीच आवड आहे.

दरबारांत राजा वागतो तो राजाप्रमाणें न दिसतां एखाद्या साध्या खाजगी माणसाप्रमाणें दिसतो. तरीसुद्धां दरबारांत शोभा व भव्यपणा नसतो असें नाहीं. राजास वाघाचे शिकारीचा फार नाद आहे.....इ. राजा शिकारींत व चैनींत बराच वेळ घालवता. परंतु राज्यकारभाराकडे त्याचें दुर्लक्ष होतें असें नाहीं."

त्याचप्रमाणें यानें ३० ऑक्टोबर १७९९ रोजीं दसऱ्याचे स्वारीचें वर्णन केलें आहे.

हा १८१४ सालीं इंग्लंडला परत गेला. व १८ मार्च १८३० सालीं मरण पावला. मरणापूर्वी थोडे दिवस हा एशिआटिक सोसायटीचा डायरेक्टर होता (ना.प्रां.इ.).

**कोवूर किळार**—( स. १८०-२०० सुमार ) एक तामीळ कवि. यानें कुतुंजीनकिळ्ळीवळवनरापळ्ळी चोल याची स्तुति गायली आहे. त्याचप्रमाणें चेर राजाबरोबरचा पराक्रमहि वर्णिला आहे.

**कोसलादेवी**—मगध देशाच्या बिंबिसारची पत्नी. हिच्या बापाचें नांव महाकोसल असें होतें.

हिच्यापासून बिंबिसार राजास कुणिक नांवाचा मुलगा झाला असें बौद्ध लोक समजतात. ही प्रख्यात जैन साधु महावीर याची अनुयायी होती.

**कोंगणी गंग**—हा गंग घराण्यांतील एक राजा. हा सिंहनंदीच्यानंतर गादीवर आला. यानें कुवलयपूर ( कोलार ) ही आपली राजधानी केली.

**कोंचेगण चोल**—( सातव्या शतकापूर्वी ) तोण्डमाणाच्या नंतर पल्लव अमदानींतील तीनशें वर्षांत चोलांचें फक्त नांव येतें. बाकीची माहिती आढळत नाहीं. या काळांत यानें एका चेर राजाचा पराभव केल्याचा निर्देश आढळतो. याला शैव व वैष्णव दोघेहि आपल्या बाजूचा म्हणतात. कारण यानें शिव व विष्णु यांचीं पुष्कळ देवळें बांधलीं आहेत. त्यांत शिवाचीं ७० आहेत.

तामीळ वाङ्मयांत याचा उल्लेख आहे. याच्या शिल्पांतील वैशिष्ट्य म्हणजे इमारतीच्या शिखरावर निजलेला हत्ती दाखवावयाचा. याच्या नांवाचा समावेश ६३ शैवांत आहे. याची मूर्ति प्रत्येक शिवालयांत आहे.

शैवसाधु ज्ञानसंबंध व अप्पार यांनीं यासंबंधीं 'दंतकथा' लिहिल्या आहेत. त्या अर्थी सातव्या शतकाच्या पूर्वी हा झाला असला पाहिजे.

**कोंड**—हा विजयनगरच्या रामरायाचा पुत्र. हा रामरायास कोंडम्मा राणीपासून झाला. हा आनेगुंदीचा सुभेदार होता. याची तिरुमळाम्बा ही बायको होय. हिच्यापासून याला राम नांवाचा मुलगा झाला.

**कोंडभट्ट**--वैय्याकरणभूषण नामक संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

**कोंडम्मा**—ही विजयानगरच्या रामरायाची तिसरी बायको. ही पोचिराजु घराण्यांतील तिम्माची मुलगी.

हिच्यापासून रामरायास कोंद आणि तिम्म असे दोन मुलगे झाले. त्यांपैकीं कोंद हा आनेगुंदीचा सुभेदार होता.

**२.** ( कोंडांबिका पाहा ).

**कोंडविडू गाणदेव**—हा कोंडविडू देशाचा गाणदेव राजा स. १३७७ च्या सुमारास होऊन गेला. याचा आजा चंद्रदेव व बाप गुहिलदेवपाल हा होय. हुल्श यानें याला ओरिसाच्या कपिल गजपतीचा समकालीन मानला आहे. परंतु हा त्याचा समकालीन नसून त्याचा वंशज असावा असें म्हणतात ( गणदेवाचा ताम्रपट ).

**कोंडांबिका**—विजयनगरच्या आरविडू घराण्यांतील वेंकटपति दुसऱ्या त्याची ही तिसरी पत्नी होय. हिच्या पित्याचें नांव गोबुरीओब असें होतें. हिला कोंडम्मा असेंहि म्हणत. हिला एकहि मुलगा झाला नाहीं.

**कोंडू किंवा कुंडलीश**—हा साधु व ग्रंथकर्ता सातार्‍यास होता. यानें 'आत्मबोध' नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे ( शके १७१३ फा. शु. ७ ). या ग्रंथावर दासबोधाची छाया पडलेली आहे. याचीं १८ प्रकरणें आहेत. दुसरा 'आत्मसुख' या नांवाचा आणखी एक ग्रंथ यानें लिहिला आहे. याचीं ५ प्रकरणें आहेत.

'आत्मसुखा' च्या सुमारें २०० ओव्या व 'आत्मबोधा' च्या ६१२ ओव्या आहेत (मं. त्रै. ४·२ ले. ४३).

**कोंडूरी सितारामय्या**—एक तेलगू कवि. याचें शिवपारिजातम्, इलावतीचरित्र आणि कृष्णविलास इत्यादि ग्रंथ आहेत ( परशाकृत तेलगू वाङ्मय, पृ. ६६ ).

**कौडिण्य**—( विष्णुगुप्त पाहा ).

**२.** बुद्धाच्या पंचवर्गीं भिक्षूंपैकीं एक. याला बुद्धदेवानें वाराणसींत प्रथम उपदेश केला. कौंडिन्य हें याचें गोत्र व सुदत्त हें नांव असें जातक अट्ठकथाकाराचें म्हणणें आहे. बोधिसत्त्व जन्मल्यावर हा खात्रीनें बुद्ध होईल असें यानें भविष्य वर्तविलें. गौतमानें गृहत्याग केला तेव्हां हा खात्रानें बुद्ध होणार म्हणून आपल्या चौघां सहकाऱ्यांच्या पुत्रांसह यानें प्रव्रज्या घेतली व हे पांच 'पंचवर्गीय भिक्षु' या नांवानें प्रसिद्धीस आले. उरुवेला प्रदेशांत बोधिसत्त्वानें घोर तपस्या आरंभली. त्या वेळीं हें त्याची सेवा करीत असत. पण बोधिसत्त्वानें देहदंडनाची निष्फलता जाणून परिमित आहार ग्रहण करण्यास सुरुवात केल्याबरोबर तो पतित झाला असें समजून यांनीं त्याला सोडलें, व हा व याचे मित्र काशीस गेले. बोधिसत्त्वाला ज्ञान झाल्यावर प्रथम या पंचवर्गीयांना उपदेश करण्याचें ठरविलें. बोधिसत्त्व यांच्याकडे आला असतां यांच्याकडून इच्छा नसतांहि त्याचा सहज सत्कार झाला. त्यानें प्रथम याला उपदेश केला व तो याला पटला. तेव्हां बुद्ध उद्गारला, 'कौंडिन्यानें जाणलें.' तेव्हांपासून याला त्रिपिटकांत 'अञ्ञा कोण्डञ्ञ' ( अज्ञकौंडिन्य ) व ललितविराच्या आरंभीं 'ज्ञानकौंडिन्य' म्हटलें आहे. याला 'अज्ञात कौंडिन्य' असें नांव पडलें ( बौद्धसंघाचा परिचय, पा. १४५ ).

**क्रमादीश्वर**—याचा संक्षिप्तसार नांवाचा संस्कृत व्याकरणावर एक ग्रंथ आहे. पण हा ग्रंथ कोणत्या ग्रंथाचें सार आहे हें सांगतां येत नाहीं. प्रक्रियाकौमुदी व सिद्धान्तकौमुदी यांसारखाच पाणिनीचें व्याकरण सुलभ करण्याचा हा प्रयत्न असावा. यानें आपला ग्रंथ भर्तृहरीच्या महाभाष्यदीपिकेच्या नमुन्यावर लिहिला असून उदाहरणेंहि भट्टिकाव्यांतील घेतलीं आहेत. यानें विषयाची मांडणी निराळ्या पद्धतीनें केली असून कांहीं नियम अनवश्यक म्हणून काढून टाकले असून कांहीं नवीन घालवले आहेत. पण याचा हा प्रयत्न जरा ओबडधोबड आहे.

याच्या व्याकरणशाखेस जौमरशाखा नांव आहे. कारण जुमरनंदी नांवाच्या ग्रंथकारानें याचा विशेष पुरस्कार केला.

**क्लॅव्हरिंग**—( स. १७२२–७७ ) हा एक हेस्टिंग्सच्या कौंसिलांतील सभासद होय. याच्या बरोबर मॉन्सन व फिलिप फ्रॅन्सिस हे इंग्लंडहून आलेले होते.

हा व याचे दोघे साथीदार हे तिघेहि हेस्टिंग्सच्या विरुद्ध होते. ता. २५–९–१७७६ रोजीं मॉन्सन व ता. ३०–८–१७७७ रोजीं क्लॅव्हरिंग हे दोघेहि मरण पावले. तेव्हां हेस्टिंग्सचे दोन प्रतिस्पर्धी कमी झाले.

**क्लाइव्ह**—( स. १७२५–७४ ) रॉबर्ट क्लाइव्ह याचा जन्म श्रॉपशायर परगण्यांत स्टिचे येथें स. १७२५ त झाला. याचे वडील वकील असून आपला मुलगा विद्याभ्यासांत हुशार व्हावा म्हणून त्यास शिकवण्यास खूप प्रयत्न केला. परंतु क्लाइव्ह पडला हूड स्वभावी. त्याला त्या शिक्षणाचा कंटाळा येऊं लागला व त्यामुळें अभ्यासहि याचे हातून नीट होईना. तेव्हां नाइलाजास्तव कोठें तरी गुंतवावयाचें म्हणून क्लाइव्ह यास त्याच्या वडिलांनीं ईस्ट इंडिया कंपनींत कारकुनीची जागा दिली. परंतु याची खोडकर वृत्ति यास त्याहि जागेवर राहूं देईना व अखेर कंटाळून हा आत्महत्याहि करण्याचा प्रयत्न करूं लागला. याहिपलीकडील गोष्ट म्हणजे यानें स्वतः आपल्या अंगावर गोळ्या झाडून घेण्याचा प्रयत्न केला. पण यास त्या न लागतां बाजूनें गेल्यानें, आपल्याला जगविण्याचा परमेश्वराचा कांहींतरी हेतु असावा असें यास वाटूं लागलें व यानें आत्महत्येचा नाद पूर्णपणें सोडून दिला.

त्या नोकरीचा वीट येतांच यानें लष्करांत नोकरी धरण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें हा १७४३ त फ्रेंचांनीं मद्रास घेतलें त्या वेळीं होता. डेव्हिटच्या किल्ल्यावर जेव्हां फ्रेंचांनीं हल्ला चढविला त्या वेळीं यानें प्रथम हातांत शस्त्र घेतलें. नंतर तरवार गाजविण्याची वेळ म्हणजे पांडेचरीचा वेढा होय. त्रिचनापल्लीच्या वेढ्यांत यानें आपली मुत्सद्देगिरी, शौर्य व धैर्य दाखविल्यामुळें हा बराच मान्यतेस चढला. अर्काटच्या वेढ्यांत सुद्धां यानें हुशारी दाखविल्यामुळें फ्रेंचांना उतरती कळा लागली व इंग्रजांचें स्थान स्थिर होऊं लागलें.

यानें लग्न मास्कलिन नांवाच्या याच्या मित्राच्या बहिणीशीं झालें. पुढें प्रकृतिस्वास्थ्याकरितां हा इंग्लंडास गेला. परत येतेवेळीं क्लाइव्ह हा मद्रासचा गव्हर्नर होऊन आला. परंतु यास व वॉटसन यास बंगालमध्यें पाठविण्यांत आलें. बंगालमध्यें सिराजचा व याचा वारंवार तंटा होऊं लागला, पण तो मिटता घेण्याचें दूरच राहून याच्या चढेलपणाच्या उत्तरांनीं आगींत तेल मात्र ओतलें जात होतें. अखेर कलकत्त्यास उभय पक्षांची लढाई होऊन दोघांचहि बरेंच नुकसान झालें. अलीनगर येथें तह झाला ( स. १७५७ ). क्लाइव्ह हा जरी धाडशी होता तरी याची प्रसंगीं तारंबळ उडत असे. यानें ऐन वेळीं स्वतःच्या हिंमतीनें मनाचा निश्चय करून पराक्रम गाजविला असें कधींच घडलें नाहीं. बऱ्याच ठिकाणीं फितुरी झाली म्हणूनच इंग्रज विजयी झाले असें कांहींचें म्हणणें आहे.

याचा स्वभाव सुद्धां विश्वासघातकी होता. उमीचंदास यानें मोठ्या सभ्यतेनें फसविलें. वास्तविक पाहतां त्यांत क्लाइव्हचा व्यक्तिशः अगर कंपनीचा असा कोणताच फायदा झाला नाहीं. त्याचप्रमाणें सिराजला पदच्युत करून मीरजाफरला व त्याला सिंहासनावरून ओढून मीरकासिमाला गादी देण्यांत प्रत्येक वेळीं यानें आपला स्वार्थ साधला.

दिल्लीकर व अयोध्येचा नबाब यांनीं इंग्रजांवर स्वारी केली, परंतु त्यांचा बक्सार मुक्कामीं पराभव झाल्यामुळें त्यांच्याकडून बंगाल, बहार व ओरिसा या तीन प्रांतांची दिवाणीची सनद बादशाहापासून यांनीं मिळविली. यानंतर कंपनीच्या अंतःकारभारांत बऱ्याच सुधारणा केल्या. नोकरांचे पगार काय ते ठरवून त्यांना लांच खाण्यापासून बंदी करण्यांत आली.

इंग्लंडमध्यें परत गेल्यावर फार पैसे खाल्ल्याचा याजवर आरोप करण्यांत आला व त्याप्रमाणें पार्लमेंटमध्यें याची चौकशी सुरू झाली. परंतु निकाल विरुद्ध बाजूनें न लागतां उलट 'यांची कामगिरी स्पृहणीय होती.' असें जाहीर करण्यांत आलें.

पुढें लवकरच यानें स. १७७४ मध्यें आत्महत्या कली. यांस अफूचें जबरदस्त व्यसन लागलें होतें.

**क्लोज** ( कर्नल )—हा स. १७७२ त फौजखात्यांत दाखल होऊन म्हैसूरकरांबरोबर झालेल्या सर्व युद्धांत हजर होता. याच्या पराक्रमाबद्दल स. १८०० त यास इंग्रज सरकाराकडून तीनशें गिनी मोलाची एक बहुमोल तलवार बक्षीस मिळाली; आणि याची नेमणूक म्हैसूरचे रेसिडेंट म्हणून झाली. टिपूच्या पश्चात् म्हैसूरची व्यवस्था यानें उत्तम लाविली. ती याची चलाखी पाहून वेल्स्लीनें यास स. १८०१ त पुण्याच्या वकिलातीवर नेमिलें. तें काम यानें स. १८१० पावेतों केलें. यास देशी भाषा उत्कृष्ट अवगत होत्या. दिसण्यांत हा अगदीं साधा व नेभळट दिसे, पण अणिबाणीची वेळ आली कीं, याची चलाखी व्यक्त होई. याच्या इतके व्यवहारज्ञ कामगार इंग्रजांकडे फार थोडे झाले. आपल्या घरांत यानें गोमांस वर्ज्य केलें होतें. हेतु हा कीं, आपण हिंदूंशीं एकजीव व्हावें. स. १८१० त निवृत्त होऊन हा परत इंग्लंडास गेला आणि २०-४-१८१३ त मरण पावला. इंग्रज मुत्सद्यांचा मुकुटमणि अशी पदवी यास इंग्रज मुत्सद्दी देतात. बाजीरावाशीं वसईचा तह हें याच्याच कर्तबगारीचें फळ होय ( म. रि. उ. २, पृ. ३५४ ).

याच्याबद्दल एल्फिन्स्टननें खालील अभिप्राय व्यक्त केला आहे: 'क्लोजच्या एवढा गुणसमुच्चय सहसा एकत्र आढळत नाहीं. धिप्पाड व सुदृढ शरीर, शान्त डोकें, चलाख बुद्धि, अढळ धैर्य, अचल नीतिमत्ता, अप्रतिम कर्तव्यनिष्ठा आणि डामडौलाचा तिरस्कार इत्यादि गुणांत साध्या व सच्छील वर्तनाची भर पडलेली असा याच्यासारखा गृहस्थ अलीकडच्या काळांत क्वचितच आढळतो.' हडपसरची लढाई होऊन बाजीराव पुणें सोडून गेला तेव्हां क्लोज तेथें होता. यशवंतरावास लढाईंत जखमा झालेल्या ऐकून त्याचे समाचारास यानें मागसें पाठविलें, आणि मोठ्या स्नेहभावानें त्यास मेजवानीचें आमंत्रण दिलें. यशवंतरावासहि इंग्रजांशीं स्नेहभाव ठेवण्याची इच्छा होतीच. तेव्हां क्लोजचें आमंत्रण स्वीकारून तो मेजवानीस गेला. त्या प्रसंगीं साहेबानें ( क्लोजनें ) त्याचा उत्तम पाहुणचार करून सर्वास पोशाख व जिन्नस नजर करून आदरानें निरोप दिला ( म. रि. उ.३, पृ. २१० ).

**क्लोव्हिगो**—( स. १४०३–६ ) हा एक स्पेन देशाच्या राजाचा वकील होय.

हा स्पेनहून वकील म्हणून तयमूरकडे समरकंदास आला होता. यानें आपल्या प्रवासाची व तयमूरची मनोरंजक हकीकत लिहून ठेविली आहे (मु.रि.भा. १ ला पृ. १७९).

# ख

**खङ्गपा**—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं पंधरावा सिद्ध होय. हा चर्पटचा शिष्य. जात शूद्र, देश मगध.

**खदीजा**—विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील तहमास्पाची मुलगी; व हुसेन निजामशाहाची पत्नी होय.

**२.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील युसुफ आदीलशाहची मुलगी व अलाउद्दीन इमादशहाची पत्नी.

**खना**—एक बंगाली कवियित्री. हिचा संबंध अनेक वेळां अनेक कथानकांमध्यें येतो.

ही मिहिरची बायको होती असें म्हणतात. पण हा मिहिर वराहमिहिर होता कां दुसरा कोणी होता, हें सांगणें मात्र कठीण आहे. त्या वेळेस शाक-द्वीपीय ब्राह्मणांची 'मिहिर' ही पदवी होती. त्यावरून ही वराहमिहिरची बायको नसून एका शाक-द्वीपीय ब्राह्मणाची स्त्री असावी. हिच्या बापाचें नांव अटनाचार्य होतें. तो ज्योतिषी होता.

ही चंद्रकेतु राजाच्या वेळीं आपल्या पतीसह चंद्रपुर नांवाच्या गांवीं बरेच दिवसपर्यंत राहत होती, असें म्हणतात. हिच्या कवितेची रचना स. नवव्या शतकांत झाली असें हिच्या भाषेचा अभ्यास केला असतां दिसून येतें.

हें वरील मत रावबहादुर दिनेशचंद्र यांचें होय. पण खना ही स्त्री होती याबद्दल साशंकता आहे. कारण खना (क्षणा) हा ओरिसा-भाषेमध्यें पुलिंगी शब्द आहे; आणि बंगाली भाषेमध्यें स्त्रीलिंगी आहे. तेव्हां असें संभवतें कीं, 'खना' नांवाचा पुरुष क्षणासंबंधीं म्हणजे ज्योतिषासंबंधीं बोलणारा व लिहिणारा असावा. अर्थात् तो ज्योतिषी असला पाहिजे (क. कौ. भा. ७).

**खरकसिंग**—हा एक गादीं होय. राघोबादादास याचा चांगला पाठिंबा होता. वेळोवेळीं हा दादाला मदत करीत असे.

स. १७७७ च्या जानेवारींत हा दादाजवळ मुंबईस असतां आनंदीबाईनें यास मक संक्रमणाचे तीळ व पत्र पाठविलें होतें. पुढें तळेगांवच्या पराभवांत खरकसिंग ताब्यांत आला, तेव्हां यास नारायणरावाचे खुनांत सामील होता, म्हणून देहांत शिक्षा झाली.

**खरग्रह मैत्रक**—(स. १६१५) हा वलभीच्या मैत्रकवंशांतील धरसेनाचा पुत्र. हा आपला भाऊ शिलादित्य याच्या मागून गादीवर आला.

**२.** हा वलभीच्या मैत्रकवंशांतील तृतीय ध्रुवसेनाचा पुत्र.

**खरपट**— चौर्यशास्त्रकर्ता.

**खरोस्ट**—हा मथुरेच्या पहिल्या राजुल क्षत्रपाचा पुत्र. याच्या आईचें नांव नदसी अकसा. हा राजुलाचा युवराज होता. याचा शिक्का किंवा शिलालेख अद्यापि कांहींच सांपडलें नाहीं. त्यावरून हा राजुल जिवंत असतांच मेला असावा. म्हणूनच राजुलच्या मागून त्याचा दुसरा पुत्र सोंडास गादीवर बसलेला दिसतो (रा. इ.).

**खर्फू**—कठेरचा राजा. कठेरलाच पुढें रोहिलखंड म्हणूं लागले यानें स. १३७६-७७ चे सुमारास बुदौनचा सुभेदार सय्यद मुहंमद व त्याचे दोघे भाऊ यांस बोलवून विश्वासघातानें त्यांचा वध केला. या भयंकर गुन्ह्याची फीरूझला चीड आली व त्यानें यास योग्य शासन करण्याचें ठरविलें. स. १३८० मध्यें फीरूझशाहानें कठेरवर स्वारी केली व कठेरला पोहोंचल्यावर सर्व हिंदूंची सरसहा कत्तल करण्याचा आपल्या सैनिकांस हुकूम दिला. हा कुमाऊनला पळून गेला. या अपयशाचा सूडहि सुलतानानें हिंदु प्रजेवरच उगविला. सहस्रावधी हिंदु कापून काढले व २३००० तर पकडून गुलाम केले. या सर्वस्वसंहारक कत्तलीनेंहि त्याचें समाधान झालें नाहीं. त्यानें संभळ प्रांतावर एका अफगाण सरदारास सुभेदार नेमिलें; व कठेर शहराची दरसाल जाळपोळ करून धूळधाण करण्याचा त्यास हुकूम दिला. पुढें पांच वर्षपर्यंत सुलतान स्वतः कठेरला जात असे व स्वतः कठेर शहरीं व प्रांतीं जाळपोळ व कत्तली करीत असे. त्यामुळें तो प्रांत निर्मनुष्य झाला (कें. हि.).

**खल्लाटक**—हा मौर्य बिंदुसाराचा प्रधान मंत्री. यानें बिंदुसाराचा ज्येष्ठ पुत्र सुसीम यास राज्य न मिळतां अशोकास राज्य मिळावें असा प्रयत्न केला.

**खवासखान**—शेरशहाचा सेनापति (दौलतखान पाहा).

**२.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील मुहंमदाचा हा एक प्रधान. याचें मूळ नांव दौलतखान. इब्राहीम बारला तेव्हां यानें मोठ्या युक्तीनें मुहंमदला राज्य मिळवून दिलें म्हणून यास 'खवासखान' असा किताब देण्यांत आला (शिवभारत प्रस्ता. ७५).

पुढें हा लवकरच गर्विष्ठ होऊन मुस्ताफखानाशीं वैमनस्य धरूं लागला. याच्या मनांत जेव्हां मुस्ताफखानास कैद करावयाचें आलें तेव्हां यानें त्याजला बेळगांवकडे पाठवून कैद करविलें आणि आपली मजबुती करूं लागला. मुहंमद पहिल्यापासूनच याच्या दुर्वर्तनास व गर्विष्ठ स्वभावास कंटाळला होता. आपल्याविषयीं लोकमत चांगलें नाहीं हें जेव्हां याला कळलें तेव्हां यानें दिल्लीच्या बादशाहाची मदत मागून त्याचे स्वाधीन विजापूर करण्याचें कबूल केलें. तेव्हां मुहंमदाच्या प्रेरणेनें सिदी रैहान यानें खवासखान याचे वाड्यांत शिरून यास ठार मारिलें.

**३.** विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील दुसऱ्या अलीचा सरदार.

जेव्हां शिवाजीनें विजापूरच्या अफझलखानाला ठार केलें तेव्हां विजापूरकरानें याला शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठविलें होतें. त्याप्रमाणें यानें शिवाजीचा चांगलाच मोड केला. अलीच्या कारकीर्दीच्या शेवटीं हा अलीचा मुख्य वजीर होता.

खान मुहंमद मरण पावल्यावर हा वजीरीवर आला ( स. १६५९ ). शिवाजीनें बाजी घोरपड्याला मारल्यावर ( स. १६६४ ) याचाहि पराभव केला ( प. सा. १०४१; मं. त्रै. ११ ले. १० पा. ४७ ). हा दक्षिणी पक्षाचा मुख्य होता. याच्या विरुद्धपक्षाचा बहालोलखान पठाण होता. औरंगजेबानें बहादुरखानाला विजापूरचें राज्य जिंकण्याचा तगादा लावला होता. ता. १९-१०-१६७५ रोजीं भीमेचे काठीं यानें बहादूरखानाची भेट घेतली; आणि त्याच्याशीं संगनमत करण्याचा प्रयत्न केला. हीं गोष्ट बहलोलखान पठाणास बिलकुल पसंत पडली नाहीं. बहलोलखानानें आपल्याविरुद्ध चाललेलीं कारस्थानें लक्षांत घेऊन यास भोजनास बोलावून दारू पाजली आणि दारूच्या निशेंत असलेल्या याला कैद केलें ( स. १९-११-१६७५ ). आणि यास बंकापूरच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवून आपण वजीर झाला. पठाणांबद्दल लोकांमध्यें अनुकूलता नव्हती, त्यामुळें लवकरच अनेक गोंधळ सुरू झाले. तेव्हां ता. १८-१-१६७६ रोजीं बहलोलनें बंकापूर येथें यास ठार करून बंडखोरांवर चाल केली ( शिवाजी पा. १७०-१७१ ).

**खंडदेवमिश्र**—हा पूर्वमीमांसाशास्त्रांत अत्यंत प्रसिद्ध असलेल्या भाट्टदीपिका नांवाच्या ग्रंथाचा कर्ता होय. हा स. च्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला.

**खंडेराय**—गुरुपरंपरा–आत्माराम–गोपाळनाथ–खंडेराय. ग्रंथ–तुकाराम–नामदेव–एकनाथ–चरित्र (सं. सू.).

**खंडेराव गुजर**—हा प्रतापराव गुजराचा पुत्र. झुल्फिकारखानानें रायगड फितुरीनें घेतल्यानंतर शाहू व येसूबाई हीं उभयतां मोगलांच्या हातीं लागलीं. त्या वेळीं जी मंडळी पकडली गेली त्यांत हा होता. औरंगझेबाच्या धर्मलालसेला शाहूमहाराज बळी पडायचे, पण ते यावर निभावले. याच्यामुळें शाहूनें यास ६० गांवांची परळीनजीक पाटिलकी इनाम दिली.

याचे वंशज हल्लीं कामथी येथें राहत असून त्यांना याची सर्व माहिती आहे. खंडोजीस परत हिंदु करून घेण्याचे बरेंच प्रयत्न झाले, परंतु याच्या विलक्षण आग्रहापुढें लोकांना हात टेकावे लागले. हा म्हणत असे कीं, 'मी ज्या मुसलमान स्त्रीशीं लग्न केलें तिलाहि हिंदु करून घ्या' ( इ. सं. १. ४ ).

**खंडेराव त्रिंबक ओढेरकर**—पेशवाईंतील हा एक सरदार होय. स. १७७५ त आनंदीबाई धारेस असतां तिनें फौज ठेवून भेलसा वगैरे महालांत दंगे फार केले, ते विसाजी गोविंद आठवले व खंडेराव त्रिंबक ओढेरकर यांनीं जाऊन मोडले; आणि अष्टनचा तह झाल्यावर बाईस पकडण्यासाठीं धारेस वेढा घातला; व शेवटीं धार हस्तगत करून बाईस आपल्या ताब्यांत घेतलें ( म. रि. उ. १. ७८ ).

**खंडराव दरेकर**—हा एक सरदार असून प्रथम राघोबाचे बाजूस होता. हरिपंतानें राघोबादादाचा पाठलाग सुरू केला. तेव्हां दादा नर्मदापार होऊन पळत सुटला. त्या वेळीं हा दादाबरोबर होता.

पण पुढें याच्या नादीं लागण्यांत आतां अर्थ नसून उलट हानि आहे अशी याची व दादाच्या पक्षपात्यांची खात्री झाली. तेव्हां यानें 'आपल्याच्यानें तुम्हांबरोबर पळवत नाहीं'-असें दादास सांगून, तोफा सामानासह हा नर्मदेवरून परत येऊन तापीतीरीं चांगदेवावर हरिपंतास मिळाला ( म. रि. उ. वि. १ पृ ३ ).

**खंडेराव दाभाडे**—( स. १६९१–१७२९ ) दाभाडे घराण्याचा मूळ पुरुष येसाजी. त्याचा हा थोरला मुलगा होय. येसाजी शिवाजीमहाराजांचा हुजऱ्या होता. हे क्षत्रिय असून यांचें गोत्र शांडिल्य व देवक कळंबाचें आहे.

स. १६९१ च्या अखेर राजाराम छत्रपति हे जिंजीस जातांना हा त्यांच्या बरोबर होता. यानें महाराजांस पुष्कळ मदत केली.

स. १६९६ च्या सुमारास राजाराम हे चंजीस असतांना यास तळेगांवजवळील इंदुरी गांव इनाम मिळालें

व पुढें स. १६९८ त जुन्नर वगैरे प्रांतांची सरपाटीलकी मिळाली.

जिंजीहून परत आल्यावर छत्रपतीनें यास सेनाधुरंधर हें पद देऊन गुजराथ व बागलाणकडे मुलूखगिरीवर पाठविलें आणि वस्त्रें व पोशाख देऊन निशाण आणि जरीपटका हवाली केला. शिवाय पुणें वगैरे प्रांतांची व अकोलें व जावळें या महालांची सरपाटीलकी व कांहीं प्रांतांची सरदेशमुखी दिली.

शाहू छत्रपति सुटून आल्यावर हा ताराबाईला सोडून त्यांना जाऊन मिळाला. मध्यंतरीं चंद्रसेनानें यास ताराबाईकडे ओढण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला.

शाहूनें ता. ११-१-१७१७ त यास सेनापतीचें पद दिलें. तें पुढें याच्या घराण्यांत कायम झालें. याच वेळीं दिल्लीच्या बादशहानें दख्खनचा सुभेदार सय्यद बंधूंपैकीं हुसेनअली याच्या विरुद्ध उठण्यास शाहूस कळविलें असतां, शाहूनें तें काम यावर सोंपविलें. यानें खानदेश-गुजराथवर स्वाऱ्या करून हुसेनचा रस्ता अडविला. तेव्हां हुसेननें फौज पाठविली, ती सुद्धां यानें अडचणींत गांठून कापून काढली.

पुढें हुसेननें परत मोठी फौज पाठविली म्हणून यानें निंबाळकर व सोमवंशी यांच्या मदतीनें मोगलांचा पुरता मोड केला ( २४-४-१७१७ ).

यानंतर शाहूनें यास गुजराथ व काठेवाडकडे मराठ्यांचा अंमल बसवावा असा हुकूम केला, व खालील आशयाचें एक पत्र पाठविलें: " दरमहा हुजूर खर्चास ऐवज देत जावा. फौज बाळगावी. थोरले महाराज धान्य व नक्त, श्रावणमासीं धर्मदाय देत असत. तो सेनापती यानीं आपल्या तालुकापैकीं, होन चार लाख रुपये खर्च करून, कोटि लिंगें ब्राह्मणांकडून करवीत जावीं." ( शाहू. म. ब. )

बाळाजी विश्वनाथानें जी सरंजामी पद्धत निर्माण केली ( स. १७१९ ) तींत यास खानदेश देऊन गुजराथ काबीज केल्यास तीहि जहागिरी देऊन टाकूं म्हणून आश्वासन दिलें ( शाहू. म. ब. ).

सय्यदांचा हस्तक अमलअली व निजाम यांच्यांत स. १७२० त बाळापूरची जी लढाई झाली तींत सय्यदाच्या विनंतीवरून यास लढण्यासाठीं म्हणून शाहूनें पाठविलें होतें. त्यानंतर फत्तेसिंग भोसल्यांच्या आधिपत्याखालीं कर्नाटकांत ( स. १७२५-२६ ) झालेल्या स्वारींत हा हजर होता.

यानें वसई ते सुरतपर्यंतचें कोंकण काबीज केलें होतें. याच्याबद्दल शाहूनें पुढील उद्गार काढले " बडे सरदार मातबर, कामकरी हुषार होते." असा उल्लेख आहे ( शाहू. म. ब. ).

शाहूची मर्जी खंडेरावांवर पुष्कळ होती. कारण एकदां हा पोटशूलानें आजारी होता, तेव्हां महाराजांनीं जाऊन याचा समाचार मुद्दाम घेतला. थोरल्या बाजीरावाच्या वेळेस हा वयोवृद्ध झाला होता. अखेर स. १५।५।१७२९ मध्यें मुतखड्याच्या विकारानें हा मरण पावला. तळेगांवीं याची समाधि आहे.

इतिहासप्रसिद्ध उमाबाई दाभाडे ही याची बायको होय. याला त्रिंबकराव, यशवन्तराव व बाबूराव असे तीन पुत्र होते. त्रिंबकराव हा सुद्धां बापासारखा शूर होता.

मराठशाहीवरील आपत्प्रसंगीं जीं नररत्नें महाराष्ट्रांत चमकलीं त्यांत खंडेराव दाभाड्याची प्रामुख्यानें गणना करण्यास हरकत नाहीं. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, परशराम त्र्यंबक यांच्यापेक्षां राजारामममहाराजांनीं खंडेरावास जास्त उत्पन्न दिलें. न जाणों या मर्दाची कामगिरी सर्वांपेक्षां जास्त किमतीची असेल. तीनशें पंचाण्णव गांवांची सरपाटीलकी म्हणजे जवळजवळ सांतशें गांवांची देशमुखी खंडेरावास मिळाली असल्यामुळें हा सर्व वतनदारांचा मुकुटमणि ठरतो. भरीव कामगिरीवांचून असली भरीव देणगी मिळणें शक्य नाहीं ( मं. त्रै. व. ८ अं. ३ लें. १८ पृ. १२ ३).

**खंडराव निंबाजी**--रघुनाथराव पेशवे यांच्या पक्षाचा मनुष्य. हा व विष्णु नरहर यांनीं नाना-बापूंना दगा करण्याची मसलत केली. ती उघडकीस येऊन यास विड्या घालून सिंहगड व रुद्रमाळ या किल्ल्यांवर रवाना केलें; व याचीं घरेंदारें जप्त केलीं ( एप्रिल १७७६ ) ( म. रि. उ. १ पा. ११७ ).

**खंडेराव पवार**--( स. १७८३ मृत्यु ) हा यशवंतराव पवाराचा पुत्र होय. स. १७६८ त उत्तरेकडे मराठ्यांची स्वारी झाली, त्या वेळीं यास त्याच्या मातुश्रीनें स्वारींत पाठविलें नाहीं, याचे ऐवजीं याचा सावत्रभाऊ महिपतराव गेला; तेव्हांपासून यानें लक्ष माधवरावाकडे न राहतां, तें चुलता रघुनाथराव याजकडे लागलें, आणि नारायणरावाचे वधानंतर दादा पळून माळव्यांत गेला, तेव्हां तर यानें त्याचाच पक्ष उघड स्वीकारला. यानें आनंदीबाईस धारेस आणून तेथील किल्ल्यांत तिच्या बाळंतपणाची सोय केली. पुढें बारभाईंच्या सांगण्यावरून ओढेरकरांनीं निराळी फौज जमवून धारेस वेढा दिला.

पुरंदरचा तह होऊन सरदार परत आले, तेव्हां खंडेराव पवारहि बारभाईंस येऊन मिळाला, आणि याचे जप्त झालेले महाल पुन्हां यास परत करण्यांत आले ( १७७७ च्या सुमारास ) ( म. रि. उत्तर वि. १ ला पृ. ७९ ). हा महादजी शिंद्याबरोबर मोहिमांवर असे. स. १७८३ मध्यें हा मरण पावला ( म. रि. उत्तर वि. २ रा, पृ. २३८ ).

**खंडेराव राजे शिर्के**—( स. १७७५-१८४८ ) हे भवानजी राजे शिर्के यांचे चिरंजीव होत. भवानजी राजे हे फार शूर व कर्तृत्ववान् होते. हे कोंकणांतील डेरवण गांवचे इनामदार असल्यामुळें यांची 'डेरवणकर शिर्के' या नांवानें फार प्रसिद्धी असे. यांची मुलगी दुसरे शाहू-महाराज यांस दिली होती, तिचें नांव आनंदीबाई. ह्याच राणीसाहेब सातारचे सुप्रसिद्ध छत्रपति श्री. प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेब महाराज, व श्रीमंत शहाजी ऊर्फ आपासाहेब महाराज ह्यांच्या मातुश्री होत. अर्थातच खंडेराव हे या दोन छत्रपतींचे मातुल असल्यामुळें यांस मामासाहेब शिर्के असें म्हणत असत.

हे फार बुद्धिमान् व शूर असून यांच्यावर शेवटच्या छत्रपतींची कृपादृष्टि विशेष होती. स. १८१८ मध्यें पेशवाईचा शेवट झाल्यानंतर सातारचे छत्रपति बंधमुक्त होऊन सातारा येथें स्वतंत्र संस्थान निर्माण झालें, व तेथें नवीन राज्यकारभार चालू झाला. त्या वेळीं पूर्वीचीं अष्टप्रधानांचीं पदें जुन्या घराण्यांतील लोकांस देण्यांत आलीं. त्या प्रसंगीं खंडेराव राजे शिर्के यांस प्रतापसिंह महाराजांनीं 'सरलष्कर' असें पद दिलें. तें यांच्याकडे पुष्कळ वर्षें चालूं होतें.

प्रतापसिंह राजे स. १८३९ मध्यें पदच्युत होऊन काशी येथें गेले, तेव्हां त्यांच्या मागें त्यांचे बंधु श्री. शहाजी राजे सातारच्या गादीचे अधिपति झाले. त्यांची शिर्क्यांवर विशेष मेहेरबानी होऊन, त्यांनीं यांस स. १८४२ मध्यें 'सेनापति' हें पद दिलें. तें यांच्याकडे सातारचें राज्य खालसा होईपर्यंत चालू होतें.

यांस क्षत्रिय मराठ्यांचा विशेष अभिमान असून, यांनीं श्री. प्रतापसिंह महाराज व श्री. शहाजी ऊर्फ आपासाहेब महाराज, यांच्या कारकीर्दीत, आपल्या वजनाचा योग्य उपयोग करून, मराठ्यांची उन्नति करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. श्री. आपासाहेबांचे कारकीर्दीत सातारा येथील दरबारांत यांचें विशेष वजन असून, प्रत्येक राजकारणांत यांच्या संमतीवांचून पान हालत नसे. त्यावरून खालील आर्या प्रसिद्ध झाली होती.

" हर्षे, आगटे, महाजनि, नृपमातुळ खंडेरावजी शिर्के ।
याविरहित दरबारीं अन्य जनांचा कधीं न पद शिरके ॥ "

हे इंग्रज सरकारशीं राजनिष्ठेनें वागत असून, यांच्यावर सातारचे रेसिडेंट कर्नल ओव्हान्स, सर रॉबर्ट फ्रियर वगैरेंची फार मेहेरबानी होती. हे प्रत्येक राजकारणांत छत्रपतींस योग्य सल्ला देऊन संस्थानचें संरक्षण करण्यांत फार दक्ष असत. त्यामुळें यांचें नांव सातारा येथें सर्वतोमुखीं प्रसिद्ध होऊन, हे फार लोकप्रिय झाले होते. हे सातारा येथें ता. १३ जुलै स. १८४८ त मृत्यु पावले. त्या वेळीं यांचें वय ७३ वर्षांचें होतें.

यांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून सातारचे रेसिडेंट मि. फ्रियरसाहेब यांस फार वाईट वाटलें. यांच्या मृत्यूचें वृत्त त्यांनीं मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरी मे. ए. मॅलेटसाहेब यांस कळवितांना यांच्याबद्दल जो स्तुतिपर उल्लेख केला आहे तो फार वाचनीय आहे.

यांस छत्रपति आपासाहेबांनीं सातारा जिल्ह्यांत कामठी व व्हासुर्णे हीं दोन गांवें व कांहीं बागा इनाम करून दिल्या होत्या. खंडेरावास अंबाजी व आनंदराव असे दोन औरस पुत्र होते.

अंबाजी राजे हे कांहीं दिवस लष्करचा कारभार उपभोगीत असून त्यांस सातारचें राज्य खालसा झाल्यानंतर कांहीं नेमणूकहि मिळाली होती. परंतु स. १८५८ मध्यें त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप येऊन त्यांस जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा झाली, व त्यांचें अधें वांटयाचें इनाम व वाडा वगैरे जप्त करण्यांत आला.

त्यांचे दुसरे बंधु आनंदराव यांचेकडे बाकीचें इनाम चालत आहे. सातारा येथें गुरुवार पेठेंत जो शिर्क्यांचा वाडा प्रसिद्ध आहे व जेथें पुष्कळ वर्षें मामलेदार कचेरी होती, तोच खंडेराव शिर्के सेनापति यांचा वाडा होय ( ऐ. स्फु. ले. पृ. ३८-४० ).

**खंडेराव विठ्ठल विंचुरकर**—( स. १७९४-९५ ) हा शिवजी विठ्ठलचा भाऊ. माधवराव पेशव्यानें यास शिवजी विठ्ठलनंतर सरदारीचीं वस्त्रें दिलीं. हा निजामाशीं झालेल्या खर्ड्याच्या लढाईत हजर होता, परंतु आजारी असल्यामुळें याची म्हणण्यासारखी कामगिरी त्या लढाईत झाली नाहीं. खर्ड्याच्या लढाईनंतर लौकरच हा मरण पावला ( मे १७९५ ).

याची बायको गंगाबाई. पुत्र नरसिंह. यानें विंचुरानजीक एका टेकडीवर कोणजाई देवीचें देवालय बांधलें. हा चिटणिसी व जमाखर्च लिहिण्यांत हुशार असून मुत्सद्दी होता. यास संस्कृत चांगलें येत होतें. हा गोरा असून

सुस्वरूप होता. याची अंगकाठी उंच असून याचा स्वभाव रागीट आणि खुनशी असे. तथापि याचे हातून कोणाचें कधींहि नुकसान झालें नाहीं ( विंचूरकर घराण्याचा इतिहास पा. १२०-१२७ ).

**खंडेराव हरि भालेराव**—( स. १७८०-९७ ) हरिपंताचे वडील रामाजी आणि आजे बाळाजी हे दोघे थोरल्या बाजीरावांचे वेळीं माळव्यांत कामावर होते.

हे शिंद्यांच्या प्रमुख सरदारांपैकीं एक होत. हे बोरसरकर भालेराव यांच्या घराण्यांतील हरबा नाना यांचे चिरंजीव होत. यांचें दुसरें नांव खंडेराव आपा असें होतें. या नांवावरून इंग्रज लेखकांनीं यांचा उल्लेख आपा खंडेराव असा केलेला आढळतो.

हे महादजी शिंद्यांच्या पदरीं केव्हां राहिले हें आढळत नाहीं. स. १७८० मध्यें इंग्रज, गोहदकर राणा व शिंदे यांचें जें युद्ध चालू होतें, त्यामध्यें हे शिंद्यांच्या बाजूनें लढत होते. या लढाईंत गोहदकराची सरशी होऊन त्यानें ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला. तेव्हां हे प्रांत सोडून झांशी प्रांत व कोंचकाल्पीकडे लूट करून पोट भरावयास गेले. वरील युद्धांत यांनीं पुष्कळ पराक्रम केला.

स. १७८५ मध्यें महादजी शिंदे यांनीं दिल्लीच्या बादशहास अंकित करून घेतलें. ह्या वेळीं यांनीं पाटीलबाबांस चांगली मदत केली. याच वर्षी महादजीनें यास रायाजी पाटलाबरोबर आग्र्याचा किल्ला घेण्यास पाठविलें होतें. या वेळीं यांनीं चांगली मेहनत केली.

नंतर स. १७८६ मध्यें बुंदेलखंडांत रवाना झाले. यांनीं पर्ण्यावर चाल करून बेणीहुजरी याजवळ खंडणी मागितली. प्रथम बेणीहुजरी यानें खंडणी देण्याचें कबूल केलें, परंतु पुढें तो अळंटळं करूं लागला. तेव्हां यानें त्याशीं लढाई देऊन त्याचा पाडाव केला व पर्ण्याचा किल्ला काबीज केला. ही विजयवार्ता यानें महादजीस कळवतांच महादजीनें आपल्या रणशूर सरदाराच्या गौरवार्थ ही आनंददायक बातमी बादशहास एक हजार मोहरा देऊन सादर केली.

पर्ण्याचा किल्ला हस्तगत केल्यावर यांनीं कलिंजरावर स्वारी केली, व तो किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. कलिंजराहून कूच करून हे ओंडशास आले व यांनीं तेथील राजापासून १॥ लाख रु. खंडणी घेतली. नंतर हे दतियास आले व तेथील राजाकडे खंडणीबद्दल जाबसाल लाविला. दोन लक्ष रुपये खंडणी द्यावी किंवा सेंवढा किल्ला खालीं करून द्यावा, अशी अट घातली. त्याप्रमाणें लवकरच राजानें कबूल केलें. ह्याप्रमाणें यांनीं बुंदेलखंडामध्यें महादजी शिंदे यांचा चांगला अंमल बसविला.

हे बुंदेलखंडांतील राजकारणांत गुंतले असतां स. १७८७ मध्यें जयपूरचा राजा प्रतापसिंग व महादजी शिंदे यांची लढाई सुरू झाली. तेव्हां पाटिलबाबांनीं यांस १० हजार सैन्यानिशीं युद्धांत येण्याबद्दल आज्ञा केली. त्याप्रमाणें हे जाऊन हजर झाले. या युद्धांत यांनीं पराक्रमाची शर्थ केली.

स. १७८७ चे अखेरीस हे ग्वाल्हेर, गोहद, भिंड, भदावर, अटेर वगैरे प्रांतांचे कमाविसदार असून, यांनीं १० लक्ष रुपये मामलतीबद्दल पाटिलबाबांस दिले होते, असा दाखला सांपडतो. ते दोन वर्षें ग्वाल्हेर प्रांतांत होते, परंतु पुढें सैन्याचा खर्च विशेष वाढून रसदेचा भरणा वेळेवर न करतां आल्यामुळें मध्यंतरीं यांचें पाटिलबाबांशीं वितुष्ट आलें. परंतु यांनीं पैशाची व्यवस्था करून व सैन्याची जमवाजमव करून पाटिलबाबांची मर्जी संपादन केली. स. १७८८-८९ मध्यें दिल्ली येथील गुलामकादर रोहिल्याचें बंड मोडून सर्व बादशाही प्रांत हस्तगत करण्याचे कामीं महादजी शिंदे यांस यांची चांगली मदत झाली. आग्र्याचा किल्ला घेण्याचे कामीं यांनीं चांगले परिश्रम केले. ह्या सर्व परिश्रमांबद्दल महादजी शिंदे यांनीं यांस रेवाडी प्रांतीं बावीस महालांची मामलत सांगितली व दिल्लीच्या किल्लेदारीची बादशहाकडून स. १७९० मध्यें वस्त्रें देवविलीं. ह्यांनीं दिल्लीच्या किल्ल्याचा बंदोबस्त करून तेथें आपल्या वतीनें भवानीकुंवर यास किल्लेदारीचें काम पाहण्यास ठेविलें.

स. १७९० पासून यांचे बहुतेक पराक्रम व राजकारणें दिल्ली प्रांतांतच घडून आलीं. बुद्धिचातुर्य व तरवार बहादरी हे दोन्ही गुण याचे अंगीं होते.

स. १७९० च्या अखेरीस नजबकुलीखान मृत्यु पावल्यानंतर कानोडचा किल्ला यांनीं लढाईचा मुकाबला करून मोठ्या पराक्रमानें काबीज केला. हें ऐकून दिल्लीच्या बादशहानें खंडेराव हरि यांस " सापचें खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्यांची माळ, तरवार, येणेंप्रमाणें इनायत करून हत्तीघोडयाची परवानगी दिली. " ह्यानंतर खंडेराव हरि यांनीं कानोड येथें इस्माईल बेग यास कैद करून ( स. १७९१ डिसें. ) कानोड येथें आपल्या जहागिरीचें मुख्य ठिकाण स्थापन करून तेथून पुढील सर्व राजकीय उलाढाली चालविल्या. ह्या सुमारास यांनीं युरोपियन लष्करी अंमलदार नेमून, त्यांच्या हाताखालीं

कवाइती फौज तयार केली. प्रसिद्ध डी बॉइन हा प्रथम यांचे पदरी होता. स. १७९३ चे सुमारास ह्यांनीं जॉर्ज टॉमस नांवाचा एक नामांकित युरोपियन नोकरीस ठेविला व त्याजकडून एक हजार लोकांचें कवाइती पलटण तयार करविलें.

स. १७९४ मध्यें महादजी पुणें प्रांतीं मृत्यु पावल्यावर दिल्लीकडील प्रांतांचा बंदोबस्त करण्याचें काम शिंद्यांचे मुख्य सरदार डी बॉइन, खंडेराव हरि, गोपाळराव भाऊ वगैरेंवर पडलें. या वेळीं जॉर्ज टॉमस याचा यांस चांगला उपयोग झाला. ह्यांनीं मेवाती प्रांताचा चांगला बंदोबस्त करून कानोड येथील आपली जहागीर भरभराटीला आणिली, आणि दिल्ली प्रांतांतील शिंद्यांची सत्ता कांहीं काल तरी सुरक्षित ठेविली.

पुढें दिवसेंदिवस टॉमस याचें प्राबल्य अधिक वाढून तो एक शिरजोर सरदार बनला, आणि त्यानें यांचें महत्त्व व वजन बरेंच कमी केलें. त्यामुळें व प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें यांनीं संन्यास घेतला व हे अत्यंत उदास होऊन यांनीं स. १७९७ मध्यें यमुनेंत जलसमाधि घेतली ( आषाढ शु. १ शके १७१९ रविवार ता. २५।६। १७९७ ).

यांस औरस पुत्र होता असें दिसत नाहीं. यांनीं वामनराव ह्या नांवाचा आपला पुतण्या दत्तक घेऊन त्यास आपल्या जहागिरीचा मालक केलें ( ऐ. च. पृ. १३५-१४१ ).

यांनीं समाधि घेतली त्याच ठिकाणीं म्हणजे दिल्लीस निगमोदाचे घाटावर यांची छत्री बांधली. तथें नैवेद्य वगैरेची व्यवस्था यांचे दत्तक पुत्रानें—वामनराव यानें—केली. ती आजपावेतों चालत आहे ( मं. श. १८३७ वा. इ. ले. २०० ).

**खंडेराव होळकर**—( स. १७२३-१७५४ ) हा अहल्याबाईचा पति व मल्हारररावांचा पुत्र. आई गौतमाबाई. याचा जन्मकाल स. १७२३ असून हा युद्धकलेंत हुषार होता. स. १७५४ मध्यें अजमेरवर केलेल्या राघोबादादाच्या मोहिमेंत हा होता.

सुरजमल जाटाची खंडणी बरीच थकली होती. ती तो देईना म्हणून त्यावर स्वारी करण्यांत आली, त्या वेळीं हातास जोडगोळी लागल्यानें हा ठार झाला (स. १७५४). याला भालेराव व मुक्ताबाई अशीं दोन अपत्यें होतीं. याची मुद्रा—म्हाळसाकांतचरणीं तत्पर। मल्हारजीसुत खंडेराव होळकर.

**खंडो अनंत गंधे**—हा अंताजी माणकेश्वराचा पुत्र. स. १७७९ मध्यें याला व बाबूराव शंकर या दोघांना राघोबादादावरील स्वारींत जाण्याविषयीं नानानें आज्ञा केली ( म. रि. उ. वि. १, पा. २०९ ).

**खंडोजी ऊर्फ चिमणाबापू भोसले—नागपूरकर** ( स. १७८९-९०मृत्यु )-हा नागपूरकर मुधोजी भोसल्याचा मुलगा व दु. रघूजीचा धाकटा भाऊ होय.

खंडोजीस रघूजीनें ता. २१-४-१७७९ रोजीं दारव्हे, गिरोली, महागांव, खडी, धामणी, माहूर, भाम, वगैरे परगणे खाजगीचे सरंजामास दिले होते ( ऐ. प. ले. १६०-६१ पाहा ).

मुधोजीनें नाना फडणीसाच्या समजुतीखातर व निवळ बतावणी करण्याकरितां यास बंगालवर पाठविलें होतें. परंतु हेस्टिंग्ज यानें यास फोडून व यास १६ लक्ष रुपये लुचपत देऊन व आणखी देण्याचें कबूल करून गप्प बसविलें.

मुधोजीनें यास पेशव्यांचे लष्कराबरोबर बदामीचे स्वारीस रवाना केलें. एप्रिल १७८६ मध्यें बदामीचे राज्यांत यानें पुष्कळ शौर्य गाजवलें.

१७६४ त जानोजीनें चिमणाबापूस ओरिसा प्रांतावर सुभेदार म्हणून धाडला. याजबरोबर त्यानें भवानी काळू यासहि पाठविलें होतें. त्यानें शिवभटाचा मोड करून त्यास कटक प्रांतांतून हाकून दिलें.

पहिल्या मराठा इंग्रज युद्धांत मुधोजी पेशवे, निजाम व हैदर यांस मिळाला व त्यानें खंडोजीस ता. ११-८ १७७९ रोजीं दसऱ्याचे मुमुहूर्तानें ४० हजार फौज घेऊन रवाना केलें. चिमणाबापूनें प्रथम बिहार प्रांतांत शिरावें व तिकडून बंगालमध्यें जावें असा क्रम सर्व दोस्तांच्या विचारानें ठरविला होता. या कामास फार तर दोन महिने लागायचे. परंतु मुधोजीचे कानमंत्राप्रमाणें यानें वाटेंत बरेंच दिवस रेंगाळून दोस्तांचा विश्वासघात केला. हेस्टिंग्जनें बंगाल्यांतून क. बेली नांवाच्या सरदारास सैन्यासह कटक प्रांतांतून मद्रासेकडे हैदरावर रवाना केला. त्यास यानें सर्व प्रकारची मदत देऊन पुढें रवाना केलें. आपलें मुख्य काम सोडून जगन्नाथाचे यात्रेंतहि यानें एक महिना घालविला.

हा निवळ लढाऊ वीर होता. हा अतिशय धीट व शूर होता. मुधोजीचा भाऊ बिंबाजी यास पुत्र नसल्यामुळें त्यानें चिमणाबापूसच आपला पुत्र म्हणून मानलें होतें, व आपलें ठाणें जें रतनपुर तेथील कारभार आपले मागें चिमणाबापूनें करावा असें बिंबाजीनें ठरविलें

होतें. बिंबाजी मेल्यावर त्याचे बायकोनेंहि हीच तजवीज मान्य केली. बिंबाजीची बायको आनंदीबाई ही मेल्यावर यानें त्या सुभ्याचा कारभार पाहिला, परंतु हा रतनपुरास राहत नसे.

हा ता. १६-८-१७८९ रोजीं नागपुरास मरण पावला. हा शरीरानें धिप्पाड असून त्या वेळीं याच्याइतका सशक्त मनुष्य क्वचितच असेल. हा अत्यंत धाडसी व शूर होता. हा सशक्त ऐन पंचविशीच्या वयांत असल्यामुळें व आजारी नसतांना एकदम मरण पावल्यामुळें रघूजीनें यास जादूनें मारलें असा लोकप्रवाद त्या वेळीं उठला होता. हा रघूजीस आपली वांटणी मागत असे, व त्यामुळें उभयतांचें मन शुद्ध नव्हतें. यावरून रघूजी व त्याचा विश्वासू कारभारी महादजी लष्करी यांनीं मूठ मारून यास मारलें अशी बातमी उठली.

औरंगाबादकर यांचे अप्रकाशित बखरींत चिमणाबापूच्या मृत्यूची मिती अश्विन शुद्ध ८ संवत् १८४६ ( ता.१५-१०-१७९० ) अशी दिली आहे. यास पुत्रसंतति नव्हती ( नागपूरकर भोसल्यांचा इतिहास ).

**खंडोजी ( बिन धर्मोजी ) खोपडे**--हा तर्फ उत्रोलीचा देशमुख. याचे आणि जेधे देशमुख यांचे देशमुखीच्या वतनाबद्दल नेहमीं तंटे चालू होते. जेध्यांनीं तपेशिरवळच्या देशमुखीच्या सनदा निजामशहाकडून आणिल्या त्या वेळीं खोपड्यांनीं मेडखिंडींत खेळोजी जेध्याची वाट रोखून दगा केला. खेळोजी मयत झाला, परंतु त्या गडबडींत सनदा खोपड्यांच्या हातीं लागल्या नाहींत. याप्रमाणें कधीं जेध्यांनीं तर कधीं खोपड्यांनीं आपापलीं माणसें जमवून एकमेकांवर चालून जावें, दहापांच लोक प्राणास मुकावेत आणि फिरून पांचदहा वर्षे दोघांनींहि स्तब्ध राहावें, असा या दोन घराण्यांचा क्रम कैक वर्षे चालू होता. प्रमुख सत्तेची ढिलाई तर होतीच, पण खोऱ्यांच्या आणि त्यांमधील किल्ल्यांच्या आश्रयानें अशा कटकटी त्या कालीं वारंवार होत. एकदां जेध्यांनींहि मौजे करनवडें येथें खोपड्यांचें वऱ्हाड निघालें असतां त्यावर छापा घालून सारें लग्नच उधळून दिलें. परंतु पुढें या दोघांसहि या कटकटीचा कंटाळा येऊन यांनीं शिरवळच्या हवालदाराकडे गाऱ्हाणें केलें. तेव्हां समस्त दिवाण व गोत यांनीं निकाल दिला कीं, " पातशहांनीं जेधियास देशमुखी दिल्ही हे गोष्टी; परंतु खोपडियांनीं जेध्यांचा मारा केला, व जेध्यांनीं खोपडियाचें वऱ्हाड मारिलें, त्यामुळें खून दुतर्फा झाले आहेत. याकरितां देशमुखी दो जागा वांटावी " ( रा. खं. १५.३०२ ). या निकालाप्रमाणें भोर तर्फेची जेध्यांस, उत्रोली तर्फेची खोपड्यांस अशी देशमुखीची फारकत करून मिळाली.

पुढें हा विजापूरकरांचे चाकरीस राहिला. शिवाजीनें साऱ्या मावळच्या देशमुखांस दस्त केलें, त्या वेळीं खंडोजीनें शिवाजीची सत्ता कबूल केली. तरी विजापूरचे मनसबदार या नात्यानें तो आपणांस विजापूरचा नोकर म्हणवी. या ' दोन डगरींवरील ' धोरणाची कसोटी अफजलखानप्रकरणीं लागली. शिवाजीच्या पारिपत्यासाठीं अफजलखान विजापुराहून निघाला, तेव्हां त्यानें साऱ्या देशमुखांस व मनसबदारांस आपापल्या जमेतिनिशीं येऊन मिळण्याचीं फर्मानें काढिलीं. त्या फर्मानांप्रमाणें खंडोजी अफजलखानास जाऊन मिळाला. अफजलखानाचे वधानंतर झालेल्या लढाईंत खंडोजीचा पाडाव झाला. कान्होजी जेध्यानें याबद्दल शिवाजीकडे रदबदली केली. शिवाजीनें याचें वतन कायम ठेविलें; पण बेइमानीबद्दल खंडोजीचा " उजवा हात व डावा पाय कापविला ..... ज्या हातें तरवार धरिली तो हात कापिला " ( जे. क., शि. च. प्र. पृ. ४५ ).

यानें द्रव्याचे लालचीनें शत्रूस मिळून अफझलखानाचा वडील मुलगा फाजलखान व बायकामाणसें यांस आडवाटेनें पळवून नेऊन कऱ्हाड येथें सुरक्षितपणें पोंचविलें हें वर्तमान शिवाजीस कळतांच त्यानें याचा वरीलप्रमाणें वध केला ( शिवाजी, पा. ७० ).

**खंडोजी घोरपडे**—बाजी घोरपड्याचा जोडीदार.

**२.** हा एक पेशवाईंतील सरदार होय. जेव्हां हैदरानें मराठ्यांच्या फौजेशीं लढून गुत्तीचा किल्ला काबीज केला, तेव्हां त्यानें यास बेडी घालून गुत्तींतच ठेविलें होतें ( स. १७७७ ).

**खंडोजी फर्जंद**—संभाजी महाराजांचा गुप्त हेर. यानें संभाजीशीं आपलें वैर आहे असा बाहणा करून सीदीकडे नोकरी पत्करली. पण हा याचा कावा एका दासीमार्फत सीदीस कळला. तेव्हां याला पकडून ठार करण्यांत आलें ( संभाजी पा. ४० ).

**खंडोजी माणकर**—हा मराठा सरदार खरबलींचा राहणारा असून स. १७३७-४७ पर्यंत मराठ्यांच्या ज्या लढाया झाल्या त्यांत एक मुख्य लढवय्या होता. मानाजी व संभाजी आंग्रे यांचें भांडण मिटविण्यासाठीं शंकराजी फडक्याबरोबर यास मानाजीच्या मदतीस पाठविलें होतें. पुढें साष्टीबेटावर स्वारी करतेवेळीं सुद्धां खंडोजीनें आपल्या शौर्याचें अपूर्व दिग्दर्शन केल्यामुळें ठाण्याची किल्लेदारी याजकडे सोंपविण्यांत आली. वसईच्या वेळीं सुद्धां यानें

मोठ्या धिटाईनें गुराख्याचा वेष करून सुगावा काढला. यांचे वंशज सध्यां खरबलीस आहेत. यानें वांदरा, बेसावें, धारावी हीं स्थळें हस्तगत केलीं (म. रि. म. १ पृ.२९४-३००).

**खंडो बल्लाळ चिटणीस**—( जन्म स. १६६८-मृत्यु १९-९-१७२६ ) हा शिवाजीमहाराजांच्या बाळाजी आवजी चिटणीसाचा वडील मुलगा. याच्या धाकट्या भावास निळोबा म्हणत असत. बाळाजी आवजीबरोबर त्याचा थोरला मुलगा आवजी यासहि संभाजीनें हत्तीच्या पायीं दिलें. बाळाजीस खंडोबा नांवाचा एक काका होता तो हबशाच्या रागास बळी पडला. त्याचेंच नांव बाळाजीनें आपल्या या मुलास ठेवलें.

कलुषानें संभाजीचा हुकूम घेऊन बाळाजी आवजी व त्याचा थोरला मुलगा आवजी यास मारविल्यावर खंडो व निळो या दोघां बंधूंना वाघाच्या तोंडीं देण्याचें त्यानें ठरविलें होतें. पण येसूबाईच्या दूरदृष्टीनें यांचा बचाव झाला. शेवटीं येसूबाईच्या सांगण्यावरून संभाजीच्या ध्यानांत आपली चूक आली आणि त्यानें याच्या घराबरची जप्ती उठवून चिटणिसीचें काम याच्याकडून घ्यावयाचें ठरविलें. त्या वेळीं येसूबाईच्या आश्रयानें हा तेराचवदा वर्षांचा खंडोबा चिटणिसाचें काम उरकीत असे.

संभाजीनें गोव्यावर स्वारी केली तेव्हां हा लेखणीप्रमाणें तलवारहि सफाईनें चालवितो हें सर्वांच्या ध्यानीं आलें.

एकदां संभाजीची स्वारी संगमेश्वरीं असतां त्याची पत्नी येसूबाई तिकडे जाण्यास निघाली. इतक्यांत मोगल सरदारांनीं छापा घालून त्यांना पकडण्याचा घाट घातला. पण यानें मोठ्या समयसूचकतेनें आपली भावसबहीण संतूबाई हीस येसूबाईच्या ऐवजीं पालखींत बसवून पालखी रवाना करण्याची तयारी केली. इतक्यांत मोगलांनीं हल्ला करून ते संतूबाईस येसूबाई समजून घेऊन गेले. पण संतूबाईनें हिरकणी खाऊन आपली अब्रू वांचवली.

संभाजीनंतर राजाराम जिंजीकडे निघाला, त्याच्या विश्वासू मंडळींत हा एक होता. विशाळगडावरून निघाल्यावर सर्वांनीं लिंगायत कापडकऱ्यांचा वेष घेतला. त्या वेळीं राजारामाबरोबर हा, निळो येसाजी, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, सेकजी गायकवाड व रंगाजी भोसले इतकीच निवडक मंडळी होती. पहाटेच उठून रस्ता चालावयास लागावें व रात्रीं ठरलेल्या ठिकाणीं एकत्र व्हावें असा संकेत ठरलेला असे. एकदां शौचाहून आल्यावर राजारामाच्या पायावर धनाजीनें पाणी घातलेलें पाहून यांच्या पाळतीवर असलेल्या मुसलमान अधिकाऱ्यास संशय आला. तेव्हां पकडण्यास येण्यापूर्वीच यानें निळो येसाजीखेरीज सर्वांना रवाना करून दिलें, आणि आपण संकटास तोंड देण्यास सज्ज झाला. अधिकाऱ्यांनीं सर्व गेलेले पाहिले तेव्हां याला पकडून चांगलाच मार दिला आणि पांच दिवस अन्नपाण्यावांचून अंधारकोठडींत ठेवलें. शेवटीं तर राखेंचे तोबरेसुद्धां दिले, पण 'आम्ही जंगम कापडी आहोंत' हें म्हणणें यांनीं शेवटपर्यंत सोडलें नाहीं. तेव्हां हे जंगम कापडी आहेत अशा समजुतीनें यांना सोडून देण्यांत आलें. आणि हे चंजीस जाऊन राजारामास मिळालें. तेथें खाशा स्त्रियांसह यांची पत्नीहि आली, पण चंजीस आल्यावर याची पत्नी म्हाळसाबाई मृत्यु पावली. राजारामाची स्वारी जिंजीस गेल्यावर झुल्फिकारखानानें जिंजीस वेढा दिला. हा वेढा सात वर्षे होता. वेढा चालू असतांना साताऱ्यास रामचंद्रपंत अमात्याकडे कांहीं महत्त्वाच्या राजकारणासाठीं राजारामानें यास रवाना केलें. या वेळीं याच्याबरोबर याचा वडील मुलगा बहिरव खंडो हा होता. तेथून परत येतांना त्रिवेदी अरुणाचल परगण्यांत तारबियतखान नांवाच्या अंमलदारानें यास कैद केलें. शेवटीं पाहऱ्यावर असणाऱ्या हिंदूशीं संधान बांधून आपला मुलगा बहिरव यास बदली आणून बसविलें. बाहेर पडतांना तटावरून उडी टाकावी लागली, त्यांत पाय दुखावला व हा कायमचा लंगडा झाला. बहिरवाचें पुढें काय झालें याचा पत्ता नाहीं. कोणी म्हणतात मुसलमान होतांच त्यानें जीव दिला.

सात वर्षे चालवूनहि वेढा उठवला जात नाहीं असें पाहून राजारामानें जिंजीहून निघून जाण्याचा बेत ठरविला. ज्या बाजूला शिर्क्यांची चौकी होती तिकडूनच फक्त निघून जाणें शक्य आहे हें ओळखून शिर्के यांना फोडण्याकरितां याची योजना झाली. संभाजीच्या वेळेपासून शिर्के व भोसले यांचे संबंध शत्रुत्वाचे होते. शिर्के यांचे पूर्वज संभाजीनें मारल्यामुळें ते भोसल्यांचे कट्टे वैरी होऊन मोगलांना मिळाले. खंडो बल्लाळाचे पूर्वज संभाजीनें मारले होते तरी तो राजनिष्ठच होता, म्हणून याची नेमणूक शिर्क्यांना फितवण्याच्या कामीं करण्यांत आली. शिर्क्यांनें याचें खासगत दाभोळचें वतन लिहून घेतलें आणि राजारामाला वाट दिली. राजाराम निघून जातांच झुल्फिकारखानानें किल्ला ताब्यांत घेतला आणि याचीं तेथील बायकामुलें कैद केलीं. याला एक दीडदोन वर्षांची मुलगी होती, तिचा लळा झुल्फिकारखानाची पत्नी सरसबाईस लागला. शेवटीं तर मुलगी देत असाल तर तुमच्या मंडळींची मुक्तता

होईल असा खानानें निरोप धाडला व यानेंहि मुलीला देऊन बायकोची सुटका करून घेतली. पुढें राजाराम मेला व शाहू आला. शाहू व येसूबाई यांच्याकडे याचा स्वाभाविक ओढा होता. शाहूलाहि गादीवर बसविण्यास याचेंच श्रम उपयोगी पडले. शाहूला हा 'गुप्तपणें भेटला आणि सरदारांना वळविलें' असें शाहूनें याच्या मुलास-जिवाजी खंडोस-दिलेल्या सनदेंत म्हटलें आहे. पुढें शाहू खेमसावंताशीं लढत असतां उतरणीवरून घोड्यासह घसरला तेव्हां यानें प्रसंगावधान राखून घोड्याचा तोल राखला व शाहूला जिवावरच्या संकटांतून वांचविलें. पण याचें वतन शेवटीं आंगऱ्यांचे ताब्यांत गेलें, त्यामुळें या मानी पण कर्तबगार पुरुषास शेवटचे दिवस आर्थिक अडचणींत काढावे लागले आणि शेवटीं स. १७२६ मध्यें मृत्यु आला. याची पहिली बायको म्हाळसाबाई चंदीस वारली. नंतर यानें दोन लग्नें केलीं. याची एक मुलगी मुरारबाजीच्या पुतण्यास दिली होती. त्या जावयास राजारामानें पोतनिशी दिली. याचे वंशज हल्लींचे पुण्याचे पोतनीस होत. यानेंच शिवदिग्विजय नांवाची शिवाजीची बखर लिहिली असें अन्तर्गत पुराव्यावरून दिसतें ( वि. स वाकसकर यांनीं लिहिलेल्या चरित्रावरून ).

**खाजा इनायतुल्ला**—विजापूरच्या अली आदिलशाहाचा गुरु. इब्राहीम आदिलशाहा शियापंथाविरुद्ध असल्यामुळें याला शियापंथाचा म्हणून देहांतशासन मिळालें.

**खाजा जहान**—( स. १३२५-५१ ) अहमद मलिक झादा असें याचें मूळ नांव. याचा पिता अयाझ. हा सरकारी इमारतींवर देखरेख करण्याचें काम करी. यास शिल्पकलेची चांगली माहिती होती. स. १३२५ मध्यें यानें मुहम्मद तुघ्लकाच्या सांगण्याप्रमाणें एक शामियाना दिल्लीपासून १०-१२ मैलांवर असलेल्या अफगाणपूर नांवाच्या गांवीं उभारला. घियासुद्दीन तुघ्लक बंगालहून परत येतांना तेथें उतरेल अशी व्यवस्था करण्यांत आली. शामियान्याची रचना लांकडी असून मजबूत दिसे, पण एका ठराविक ठिकाणीं धक्का देतांच सर्व घर कोसळून पडावें अशी योजना होती. त्याप्रमाणें घियासुद्दीन शामियाना कोसळून मारला गेल्यावर मुहम्मद बादशाहा झाला; आणि हा वजीर झाला. आणि याला खाजा जहान ही पदवी मिळाली.

स. १३२६ मध्यें गुर्शास्पचें बंड मोडून दक्षिणेंत शांतता स्थापण्याचें काम यानें केलें. बादशाहाच्या गैरहजेरींत राज्यपालक म्हणून याची नेमणूक नेहमीं होई. इब्नबतूता दिल्लीस आला तेव्हां हा राज्यपालक असून बादशाहा कनोजप्रांतांत होता. स. १३३५ मध्यें लाहोरच्या हुलागूचें बंड यानेंच मोडलें. स. १३४४-४५ च्या सुमारास दक्षिणेंत बंडाळी माजली तेव्हां याला राज्यपालक नेमून बादशाहा दक्षिणेंत गेला. तो सिंधमधील बंडखोर तघी व त्याला आश्रय देणारा जामसाहेब यांचें पारिपत्य करण्याकरितां जात असतां तट्टा शहराजवळ अगोदर येत असलेला ताप वाढून मृत्यु पावला ( ९ मार्च स. १३५१ ). गादीचा योग्य वारस फीरूझ सिंधमध्यें बापाजवळ होता. पण यानें तो येण्यापूर्वीच त्याचे धाकटे भावास घियासुद्दीन मुहम्मद असें नांव देऊन गादीवर बसविलें. पण ही गोष्ट इतरांस मान्य नव्हती. शेवटीं फीरूझ येऊन बिनविरोध गादीवर बसला. हा फीरूझला शरण गेला तेव्हां त्यानेंहि याला माफी दिली. हा सामानला राहण्याकरितां जात असतां शेरखान नांवाच्या अधिकाऱ्यानें याचा खून केला ( स. १३५१ ).

**खाजा बायझीद लोदी**—सुलतान लोदीचा पुत्र.

**खाजा मीर**—( दर्द पाहा ).

**खाजा मुहम्मद नासिर**—हा ऊर्दू कवि अन्दलीब या नांवानें प्रसिद्ध आहे. याचा पुत्र दर्द कवि. याचा कवितासंग्रह 'नालए अन्दलीब' या नांवाचा आहे. याचा दुसरा मुलगा सय्यद मुहम्मद मीर हाहि कवि होता ( क. कौ. भा. ४ ).

**खाजा हिसाम उद्दीन जुनैदी**—(स. १३४७ सुमार) फीरूजशहा तुघ्लक दिल्लीचा सुलतान झाला तेव्हां राज्याच्या वसुलीखात्यांत गोंधळ माजला होता. प्रजेवरील करांचें ओझें इतकें वाढलें कीं, कित्येक प्रांतांतील लोकांनीं शेतजमिनी पडित टाकून लूटमारीचा उद्योग आरंभिला. लिलांवांत भरमसाट रकमा वाढवून वसुलाचें काम पत्करलेल्या सरदारांस कबूल केलेल्या रकमा वसूल करतां न आल्यानें सर्व देशभर प्रांतोप्रांतीं बंडें झालीं. दक्षिणेंत तर जमाबंदी खात्याकडील लोकांच्या बंडांतूनच दख्खनचें स्वतंत्र स्वयंशासित राज्य स्थापण्याची कल्पना निघून ३ आगष्ट १३४७ ला तिकडे बहामनी राज्याची प्रतिष्ठापना झाली. तेव्हां वसुलीखात्याची बिघडलेली घडी पूर्ववत् नीट बसवून वसूल वाढविण्याचे कामावर फीरूझशहानें या कर्तृत्ववान् सरदाराची नेमणूक केली. याची कर्तव्यनिष्ठा श्रेष्ठ दर्जाची असल्यामुळें सहा वर्षें यानें सर्व राज्यांत हिंडून, जमिनी स्वतः पाहून, जमिनीची प्रतवारी केली व त्यांतील उत्पन्नाचें प्रमाण पूर्वापार काय आहे, याचा इतिहास समजावून घेऊन जमिनीवर बसवावयाच्या साऱ्याचें

प्रमाण ठरविलें! सहा वर्षांच्या या दीर्घ प्रयत्नानंतर हिस्सामनें आपला विस्तृत अहवाल सुलतानास सादर केला. फीरूझनेंहि साऱ्याचें प्रमाण कमी केलें. त्याचप्रमाणें पूर्वी नेमणुकीचे वेळीं व सालोसाल सुभेदारांनीं सुलतानास नजराणे देण्याची वहिवाट असे तीहि बंद केली. त्यामुळें शेती सोडून गेलेले लोक पुन्हां शेती करूं लागले. लागवडीचें प्रमाण वाढलें. ओसाड खेडीं पूर्ववत् संतुष्ट शेतकऱ्यांनीं गजबजलीं.

**खाजा हिरवी**—झैनखान कोकचा पिता. याची पत्नी पिच्छाजान.

**खाजा हैदरअली**—( आतिश पाहा ).

**खानखानान**—एक पदवी ( बहिरामखान, त्याचा मुलगा अबदुल रहिमखान, ४ असफखान पाहा ).

**२.** स. १६४८ विजापूरकराचा एक हबशी सेनापति. मुस्तफाखानानंतर याची नेमणूक झाली होती ( पत्रसारसं. ५४८ ).

**खान जहान**—( बहादुरखान पाहा ).

**२.** ( स. १३७३-८७ ) फीरूझशाह तुघ्लकाचा मुख्य वजीर. स. १३७३ मध्यें सुलतान फीरूझशाह तुघ्लकाचा विश्वासू वजीर मलिक मकबूल खानजहान वारला. त्याच्या मुलासच वजीराची जागा दिली व खानजहान हा किताबहि दिला. स. १३७४ सालीं सुलतानाचा लाडका मुलगा फत्तेखान वारला, त्यामुळें सुलतान इतका हतबुद्ध झाला कीं, त्याचा उत्साह तर नाहींसा झालाच पण बुद्धीहि मंद झाली, ह्यामुळें याचे हातांत राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आलीं; यानें आपल्या सत्तेचा दुरुपयोग केला. स. १३८७ मध्यें यानें फीरूझशहाची अशी समजूत करून दिली कीं, युवराज मुहंमदखानानें कांहीं सरदारांचे मदतीनें सुलतानपद हिरावून घेण्याचें कारस्थान केलें आहे. सुलतानानें चौकशी न करतां कारस्थानांत असल्याचा ज्यांवर आरोप होता, अशांपैकीं महोबाचा सुभेदार झापरखान यास हिशेब तपासण्याचें निमित्त करून दिल्लीस बोलावून घेतलें व त्यास याचे घरीं अटकेंत ठेविलें. युवराजासहि दरबारांस हजर असतां पकडण्याचा बेत होता, परंतु त्यानें गुप्तपणें सुलतानाची गांठ घेतली; व राजघराण्यांतील कर्त्या पुरुषांचा निःपात करून स्वतः सुलतान होण्याची खानजहानची खटपट आहे, असेंहि त्यानें सुलतानास बजाविलें. तेव्हां सुलतानानें याला कैद करण्याचा हुकूम मुहंमदखानाचे हातीं दिला. मुहंमदखान ससैन्य येत असल्याची बातमी याला अगाऊच मिळाल्यामुळें यानें झाफरखानाचा तात्काळ वध केला. लढाई जुंपली तेव्हां आरंभींच यास वार लागून हा जखमी झाला. त्याबरोबर स्वतःचे घरांत शिरून एका चोरदरवाज्यानें हा निसटला व मेवाडमध्यें जाऊन तेथें चौहाणवंशीय कोकराजाकडे आश्रयास राहिला. फीरूझशहानें राज्यकारभाराचे सर्वाधिकार मुहंमदखानास दिले. त्यानें पहिली गोष्ट अशी केली कीं, घोडदळावरील मुख्य सेनापति सिकंदरखान यास गुजराथची सुभेदारी देण्याचें वचन देऊन याला पकडून आणण्याचे कामगिरीवर पाठविलें. सिकंदरखान मेवाडमध्यें येतांच कोकराजानें याला त्याचे हवालीं केलें, तेव्हां खानजहानचा शिरच्छेद करून सिकंदरखानानें त्याचें शिर दिल्लीस पाठविलें.

**३.** हुसेन कुली बेग नांवाच्या अकबराच्या सरदाराची पदवी. यानें बंडखोर दाऊदखानाचें डोकें कापून अकबराला आग्रा येथें नजर केलें. हा टंडा येथें मेला ( स. १५७८ ).

**खान जहान फारुकी**—खानदेशच्या फारुकी घराण्यांतील दाऊदखानाचा मुलगा.

**खान जहान बरीद**—( स. १६६२ सुमार ) हा बेदरच्या अमीर बरीदचा नातू. हा बऱ्हाडांत पळून गेला.

**खानजहान लोदी**—(मृ. १० जूनपूर्वी स.१६३१) अफगाण सरदार दौलतखान याचा हा मुलगा होय. याचें मूळ नांव पीरखान. जहांगीरच्या कारकीर्दीत यास खानजहान ही पदवी देण्यांत आली. पुढें चढत चढत हा ५००० च्या मनसबदारीपर्यंत चढला. पुढें जहांगीर मरण पावला तरी याची उन्नति व भरभराट होतच होती. शहाजहाननें तर यास माळव्याची सुभेदारी देण्यासाठीं दिल्ली मुक्कामीं बोलाविलें. पण त्या बोलावण्यांत यास कपटाचा वास आल्यामुळें यानें काढता पाय घेऊन शहाजीचा पक्ष स्वीकारला. पण यापुढें मात्र याच्या वैभवास उतरती कळा लागली. 'खानजहान लोदी' हा ग्रंथ हैबतखानानें लिहिला आहे. बऱ्हाणपूर याच्या जहागिरीचा भाग होता ( पत्रसारसंग्रह. २५६ ). हा गृहस्थ भव्य व देखणा होता. याचा स्वभाव उद्दाम व चैनी होता. हा सुनीपंथाचा असून हिंदूंचा भारी द्वेष करी. जहांगीरची कृपा असल्यामुळें हा दरबारांत प्रसिद्ध झाला. शहाजहान बंडखोरी करून पांचसहा वर्षे भटकत असतां हा पर्वीझबरोबर त्याचा पाठलाग करीत होता. त्यामुळेंच शहाजहानचें व याचें वैर होतें. पर्वीझ स. १६२६ च्या नवंबरांत मरण पावल्यावर याची नेमणूक दक्षिणच्या कारभारावर झाली. जहांगीरच्या शेवटच्या दोनतीन वर्षांत प्रांतिक अधिकाऱ्यांना निश्चित धोरण राखणें कठीण पडूं लागलें. यानें तीन लाख रुपये घेऊन बालाघाट प्रांत निजाम-

शाहाला परत दिला. यामुळें शहाजहानचा उद्योग व्यर्थ गेला. तथापि शहाजहान गादीवर आल्यावर दक्षिणचा सुभा याच्याकडेच कायम ठेवून गेलेला मुलूख परत घेण्याचा हुकूम केला. तो अमलांत येत नाहीं असें पाहून याला भेटीस बोलावलें व कांहीं सजा करणार तितक्यांत हा पळाला ( ५-१०-१६२९ ). याच्याशीं लढाई होऊन याचे दोन मुलगे व जांवई मारले गेले. पण मुर्तजा निजामानें यास हाताशीं धरून बीडचा परगणा जहागीर दिला. पण तो परगणा पाठलाग करणारांनीं घेतल्यावर हा हटत हटत कालिंजरपाशीं ( ता. १०।६।१६३१ ) बुंदीकर मधुसिंगाच्या हस्तें मारला गेला.

**खान मुहम्मद**—(मृ. स. १६५७) यालाच खानखानाखान मुहम्मद असें म्हणत. हा अली आदिलशाहाचा सरदार. शहाजीला कैद केल्यावर हा जिंजीकडे गेला आणि रूपनायकापासून जिंजीचा किल्ला हस्तगत केला. हा वजीर मृदु वृत्तीचा व समेटानें कारभार उरकणारा होता. म्हणून शहाजीची विजापूरच्या बादशहाकडून यानें गौरवानें सुटका केली ( १६-५-१६४९ ).

यानें औरंगजेबाला चांगलें पेंचांत पकडलें असतां सोडलें म्हणून याला युद्धांतून परत बोलावण्यांत आलें. आणि मक्का दरवाजांतून विजापुरांत शिरत असतां ठार करण्यांत आलें. दिल्लीदरबारनें खंडणीचा पहिल्या वर्षाचा वसूल याच्या कबरीकरितां खर्च केला. औरंगजेब म्हणाला कीं, याचा लबाड मित्र मुल्ला अहमद नाटिया यानें विश्वासघातानें यास ठार मारलें ( प. सा. ७३६ ).

**खाफीखान**—याचें खरें नांव मुहम्मद हशिमखान असून याचा बाप खाजा मीर हा एक इतिहासकारच होता. खाजा मीर खरा मुरादपक्षाचा फौजेंतील एक उच्च दर्जाचा अधिकारी. मुरादपक्षाच्या पश्चात् तो औरंजेबाच्या पदरीं नोकरीस राहिला. तेथेंच हा लहानाचा मोठा झाला. यानें सैन्यांत व दरबारांत अशी दोन्ही प्रकारें चांगली कामगिरी बजावली. औरंगजेबानंतर २६ वर्षांनीं यानें आपला इतिहास प्रसिद्ध केला. अद्यापि याच्या इतिहासाचें मराठी भाषांतर झालेलें नाहीं. यानें लिहिलेला इतिहास हा शियापंथी असल्यानें यानें औरंगजेबानंतर प्रसिद्ध केला असें म्हणतात.

यानें केलेल्या ग्रंथाचा कांहीं भाग जुने ग्रंथ, वडील व मित्र यांच्या सांगण्यावरून रचिला आहे. स. १६७८–१७३१ पर्यंतचा भाग मात्र यानें लिहिला आहे. त्यामध्यें मुसलमानांची अवास्तव स्तुति व हिंदूंची निर्भर्त्सना केलेली आढळते. याचें लिखाण पक्षपाती दिसतें. ग्रंथाचें फार्सी नांव मुंतखबुल्लुबाब असें आहे.

**खारवेल**—( ख्रि. पू. १८३–१५२ ) हा कलिंग देशचा सुप्रसिद्ध राजा. हा ऐलवंशांतील होता. याच्या पित्याचें नांव जीवदेव. याची शकावलि पुढीलप्रमाणें आहे. ख्रि. पू. १९४ जन्म. ख्रि. पू. १६९ पश्चिमेकडे सैन्य पाठविलें. १६७ राष्ट्रीक व मोज जिंकले. वज्रराजकन्या घुसी हिच्याशीं लग्न. १६३ राजगृहावर हल्ला. १५९ पुष्यमित्र शुंगाचा पाणउतारा. १५७ हाथीगुम्फालेख ( शंकर अय्यरकृत कलिंग–शकावली इंडि. अँटि. १९२०. ४३ ). याचे हाथिगुम्फेंतील शिलालेख सांपडले आहेत. त्यामुळें अनेक ऐतिहासिक गोष्टी निश्चित झाल्या आहेत. अशोकानें कलिंग देशांतील युद्धांत भयंकर कत्तली केल्या, पण त्याच्या मृत्यूनंतर कलिंगदेशच्या चैत्रराजानें स्वातंत्र्य जाहीर केलें; आणि त्याचा नातू खारवेल हा इतका बलिष्ठ झाला कीं, यानें ख्रि. पू. १६५ मध्यें मगधावर उलट पहिली स्वारी केली. हा त्यापूर्वी आठ वर्षें गादीवर आला होता. हा धर्मानें जैन होता.

याचें राज्य पूर्व घाटाचा पायथा आणि बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यापासून तेलंगाणच्या उत्तरेपर्यंत पसरलें होतें. थोडक्यांत म्हणजे याचें राज्य ओरिसा आणि गंजम या ठिकाणीं होतें.

यानें हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर ख्रि. पू. १८३ पासून ख्रि. पूर्व १५२ पर्यंत राज्य केलें. ओरिसामध्यें जैनधर्माच्या प्रचारास सुरवात झाल्यापासून अवघ्या १०० वर्षांचे आंत जैनधर्म हा राजधर्म होऊन बसला, असा उल्लेख याच्या एका शिलालेखांत आला आहे. याची बायको वज्र घराण्यांतील असून तिचें नांव घुसीता किंवा गुसीता असें होतें. याच्या पट्टराणीनें जैन श्रमणाच्याकरितां एक देऊळ बांधलें, असा उल्लेख स्वर्गपुरीच्या शिलालेखांत केला आहे. हा नेहमीं आपल्या राणीबरोबर जैन देवालयांत जात असे. याची पट्टराणी ही लालाक राजाची मुलगी होती. लालाक राजा हा हस्तिसाहसाचा नातू होय.

आपल्या सिंधुदा राणीकरितां यानें एक राजवाडा बांधला. त्या राजवाड्याचे दगड उत्तम अशा खाणींतून आणले होते. हा सर्व दृष्टींनीं सर्वोत्कृष्ट राजवाडा होय. या राजवाड्यास एकूण ७५ लक्ष पण खर्च आला.

यानें जैनधर्माचीं तत्त्वें प्रथम नीट समजावून घेऊन व त्यांचें महत्त्व ध्यानांत घेऊन जैन साधूंना मदत केली.

याच्या पदरीं जैन साधु आणि जैन धर्मोपदेशक होते. यानें जैन धर्मास चांगलाच आश्रय दिला होता.

हा आपल्या कारकीर्दीच्या तेरा वर्षांपर्यंत किंवा आयुष्याच्या सदतीस वर्षांपर्यंत जैनधर्मीय होता व यानें त्या कालांत जैनधर्माचा चांगलाच उत्कर्ष केला, असें फ्लीट म्हणतो.

खारवेलच्या वेळीं कलिंग देशांत 'अपभ्रंशप्राकृत' भाषा होती. ही 'अपभ्रंशप्राकृत' भाषा पुढील अर्धमागधी या भाषेच्या पूर्व स्वरूपांत होती.

पंधरावें वर्षी हा युवराज झाला आणि पंचविसावे वर्षी यानें 'महाराज्याभिषेक' हा वैदिक राज्याभिषेक करून घेतला. या अभिषेकावरून असें दिसतें कीं, त्या वेळीं जैनधर्मियांनीं परंपरेनें चालत आलेल्या राजकीय धर्मांमध्यें ढवळाढवळ केली नाहीं.

यानें चौदा वर्षेपर्यंत राजपुत्र या दर्शेत काढिले; आणि पुष्कळशा कला संपादिल्या. हा चेदी घराण्यांतील होय. या घराण्यांतील राजे 'ऐल' ही पदवी धारण करीत. आपला देश स्वतंत्र आणि आपली सत्ता सर्वश्रेष्ठ व शेजारील राजांनीं आपल्या वचनास मान द्यावा, अशी याची महत्त्वाकांक्षा होती. यानें बरीच मोठी फौज शातकर्णि आंध्र राजावर पाठविली. यापुढें यानें आणखी दोन स्वाऱ्या दक्षिणेतील आंध्र राजांच्या प्रदेशावर केल्या. यानें शातकर्णि आंध्र राजाचा पराभव केला.

शिपाईगिरीच्या कामांत याचा हातखंडा असल्यामुळें यानें त्या वेळच्या राजकारणांत बरीच मोठी दंगल माजविली होती. हा शौर्याचे आणि राजकारणाचे बाबतींत पुष्यमित्राच्या तोडीचा होता.

यानें कालवे आणि तनसुलीय किंवा तोसलीपासून कलिंग शहरापर्यंत रस्ते बांधिले.

यानें गादीवर आल्यापासून सुमारें आठ वर्षांनीं मगधचे राज्यावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. हा मौर्य घराण्यांतील अशोकाप्रमाणेंच सार्वभौम होता. त्याचप्रमाणें याची सहनशक्ति अप्रतिम होती. यानें राज्यकारभार उदार मनानें केला असावा असें दिसतें. हा आपणास 'सर्व प्रकारच्या लोकांचा पूजक' असें म्हणवीत असे. यानें 'महाविजय' नांवाचा राजवाडा बांधिला. या वाड्यास एकूण ३८ हजार नाणीं खर्च आला. शेवटीं शेवटीं याला सर्व धर्मांविषयीं आदर वाटत असे. यानें आसपासच्या बहुतेक राजांना जिंकून मगधचे राजास आपल्या पायापाशीं प्रणाम करण्यास भाग पाडलें.

मगधच्या पुष्यमित्र शुंगाच्या व याच्या वरचेवर लढाया होत. या लढाया बहुतेक धर्मांवरून होत. कारण पुष्यमित्र हा वैदिक( हिंदु )धर्मीय होता आणि खारवेल हा जैनधर्मीय होता. शेवटीं खारवेलनें पुष्यमित्र या शुंग राजाचा पराभव करून शुंगांचें राज्य जिंकलें. मगधचें राज्य जिंकल्यानंतर यानें दक्षिणेकडील शातकर्णी राजांचें राज्यहि आपल्या अमलाखालीं आणिलें. अशा प्रकारें याच्या शौर्याची वाहवा होऊन याची कीर्ति चोहोंकडे पसरली. एवढ्या उच्च पदास पोंचल्यावर पांड्य राजांनीं सुद्धां सहानुभूतिदायक मोठा नजराणा याच्याकडे पाठविला. अशा प्रकारें हा एक त्या वेळीं मोठा राजा होऊन गेला.

यासंबंधीं जर्नल ऑफ बिहार ओरिसा रॉयल एशियाटिक सोसायटीच्या तिसऱ्या व चवथ्या व्हॉल्युममध्यें विस्तृत माहिती आली आहे.

हा गादीवर आल्यानंतर दुसऱ्याच वर्षी कलिंगाच्या पश्चिम दिशेकडे शातकर्णीवर आपलें सैन्य पाठविलें, तेव्हां कृष्णावेण्णा नदीच्या कांठीं गेलेल्या याच्या सैन्यानें मूषिकनगर जाळून टाकलें, असें याच्या हाथिगुम्फेंतील शिलालेखावरून दिसतें. हें मूषिकनगर कृष्णावेण्णेच्या कांठीं असून तेथें शातकर्णीचें राज्य होतें असें दिसतें. कृष्णानदीला त्या वेळीं कृष्णावेण्णा असें म्हणत असत ( विविधज्ञानविस्तार ५८. पा. ४५८ ).

हा ख्रि. पू. ८० च्या सुमारास गादीवर आला, आणि यानें ख्रि. पू. ७२ मध्यें राजगृहास वेढा घातला, असें रामप्रसाद चंदानें लिहिलें आहे. पण ख्रि. पू. १८३ ते १५२ असा याचा काल आजपर्यंत ठरविलेला होता.

शुंग घराण्यावर लिहिणारे रॅप्सन, जयस्वाल, स्टेन वगैरेसारखे लोक खालीलप्रमाणें उल्लेख आपल्या लिखाणांत करितात.

'शुंग घराण्यांतील राजा पुष्यामित्र हा व कलिंग देशचा राजा खारवेल हे दोघे समकालीन होते. पुष्यमित्र राजगृह येथें असतां खारवेलनें राजगृहास वेढा घातला.'

वरील विधान एकंदर विचार करितां चुकीचें ठरतें. कारण पुष्यमित्राच्या वेळीं शुंग घराण्याची सत्ता कळसास पोंचली होती व आपण सर्वश्रेष्ठ आहोंत हें दर्शविण्यासाठीं पुष्यमित्रानें 'अश्वमेध' यज्ञ आरंभिला होता. अशा परिस्थितींत खारवेलच्या मगधवरील स्वाऱ्या आणि त्याचा राजगृह येथील वेढा या गोष्टी संभवतील असें वाटत नाहीं. तेव्हां हाथिगुंफा येथील शिलालेखांत उल्लेख केलेल्या याच्या मगधवरील स्वाऱ्या व राजगृह येथील वेढा, ह्या गोष्टी शुंग घराण्याच्या पडत्या काळांत झाल्या असल्या पाहिजेत.

ख्रि. पू. पहिल्या शतकाच्या पूर्वार्धात शुंग घराण्याची सत्ता मोडकळीस आली होती. यावरून खारवेलचा काल ख्रि. पू. पहिल्या शतकाच्या पूर्वार्धात येतो. शुंग घराण्यांतील देवभूतीस वसुदेव कण्वानें ठार मारून आपण गादी बळकाविली. हा देवभूति शुंग घराण्यांतील शेवटचा राजा होय. त्याच्यावर खारवेलनें स्वाऱ्या करून शुंग घराण्याचा नाश केला. याच वेळीं आंध्र राजा शातकर्णी याच्या स्वाऱ्या शुंग घराण्यावर होत होत्या ( I. H. Q. Vol. 5, p. 587–613 ).

**खिजरखान**—( स. १५४० ) बंगालचा राजा.

**खिजरखान खल्जी**—( स. १३१२–१८ ) हा अलाउद्दीन खल्जीचा वडील मुलगा. यास स. १३१२ मध्यें युवराजपद देण्यांत येऊन राजछत्र वापरण्याचा मान देण्यांत आला. याच्या शिक्षणाकडे बिलकुल लक्ष दिलेलें नव्हतें. गुजराथच्या कर्णाची मुलगी देवलदेवीशीं याचें लग्न झालें ( स. १३०७ ). अमीर खुस्रव नांवाच्या कवीनें या दोघांच्या शृंगारविलासावर लिहिलेलें काव्य प्रसिद्ध आहे.

चितोड घेतल्यावर याला तेथील राजा केला, व चितोडचें नांव खिजराबाद ठेवलें. पण रजपुतांच्या विरोधामुळें हा तेथें सुखानें राहूं शकत नव्हता. तसेंच दिल्लीची बादशाही अलाउद्दीनाच्या कारकीर्दीत खिळखिळी झाली होती. मलिक काफूर हा कारस्थानी व जबरदस्त गृहस्थ बापलेकांचें वितुष्ट उत्पन्न करी. अशा स्थितींत याला कारस्थानें करावयास सांपडूं नयेत म्हणून चितोडचा किल्ला मालदेव सोनगरे चौहान जालोरकर याच्या ताब्यांत देऊन यास दिल्लीस यावें लागलें.

याचें व बापाच्या विश्वासांतील काफूरचें वांकडें होतें. शेवटीं त्या कारस्थानी पुरुषाला यश येऊन याला राज्याला मुकावें लागलें. अलाउद्दीन आजारी असतां यानें किंवा याच्या आईनें त्याच्या शुश्रूषेकडे लक्ष न देतां आपले ऐषआरामाचे कार्यक्रम अखंड चालू ठेवले होते. हा पोलो, नाचगाणें यांत गर्क असे. आणि आईस लग्नें जुळवून तीं समारंभानें पार पाडण्याचा नाद होता. तिनें अलफखानाच्या मुलीचें लग्न आपला मुलगा शादीखानाशीं ठरवून मंजुरी मागितली. याचा फायदा काफूरनें घेतला आणि राज्यक्रांतीचा कट आहे असें भासविलें. तात्काळ हा, शादीखान व आई यांना तुरुंग दाखविण्यांत आला आणि अलफखानाचा वध करण्यांत आला. काफूरनें उमरला गादीवर बसवून याचे डोळे काढले. पण काफूरचा खून करून मुबारक गादीवर आला. त्यानें याला ठार केलें.

**खिजरखान बहादूरशाह**—(स.१५५५) बंगालचा राजा.

**खिदरखान**—( हंबीरराव मोहिते पाहा ).

**खुदावंद झाद**—( स. १३५८ ) ही घियासुद्दीन तुघ्लकाची मुलगी. हिचा नवरा खुश्रव मलीक. घियासुद्दीन सिंधकडे वारला, तेव्हां हिनें आपला मुलगा दावर मलीक यास तक्तावर बसविण्याचें ठरविलें. आणि फीरूझ तुघ्लकला आपल्या घरीं जेवावयास बोलावून त्याचा खून करविण्याचा बेत केला. त्याप्रमाणें तो आला असतां दावर मलिकनें इषारा दिल्यावरून तो वांचला.

**खुम्माण गुहिलोत**—( स. ७५३–७७३ ) हा मेवाडचा राजा काळभोज ऊर्फ बाप्पा रावळ याचा पुत्र. हा त्याच्यानंतर गादीवर आला. याचें नांव अद्यापि राजपुतान्यांत प्रसिद्ध आहे. कर्नल टॉडनें याच्या वेळीं बगदादचा खलीफा अल्मामू यानें चितोडवर स्वारी केल्याचें लिहिलें आहे, पण ती चूक असून दुसऱ्या खुम्माणच्या वेळीं स्वारी झाली होती.

हा हिन्दी भाषेंतील कवि होता. याच्यावर दलपतविजय नांवाच्या कवीनें खुमानरासो नांवाचें काव्य लिहिलें. त्यांत यानें केलेल्या चोवीस युद्धांचें वर्णन आहे.

२. ( स. ८२८-५३ ) मेवाडच्या गादीवर हा सिंहानंतर आला. याच्या वेळीं बगदादच्या खलीपानें चितोडवर स्वारी केली होती त्यांत हा विजयी झाला, असें खुंमाणरासोवरून दिसतें. पण त्यांतील पुष्कळसें वर्णन काव्यमय आहे. कर्नल टॉडनें त्यावरून माहिती दिली आहे. बगदादचा अब्बासिया खानदानमधील अल्मामू हा याच्या वेळीं खलीपा होता ( स. ८१३–८३३ ). यापूर्वीच त्यांनीं सिंध जिंकला असून राजपुतान्यावर स्वाऱ्या होत होत्या. याच्यानंतर माहयक किंवा खुंमाण तिसरा हा गादीवर आला.

३. ( स. ८७८-९०३ ) मेवाडच्या गादीवर महायकानंतर आला. याच्यानंतर भर्तृभट गादीवर आला.

४. ( स. १८२२ ) एक हिंदी कवि होय. हा बंदीजन असून बुंदेलखंडचे महाराजा विक्रमसिंह यांच्या आश्रयास होता. यांनीं तयार केलेल्या ग्रंथांपैकीं खालील ग्रंथ उपलब्ध आहेत:

( १ ) अमरप्रकाश, ( २ ) अष्टजाम ( स. १८५२ ), (३) लक्ष्मणशतक, (४) हनुमान, (५) नखशिख वगैरे.

यांनीं 'खुमान' काव्यांत आपलें उपनांव 'मान' असें लिहिलें आहे.

**खुस्रव**—( स. ६२५ ) इराणचा राजा. पुलकेशी चालुक्यानें याच्याकडे इराणमध्यें वकील पाठविला होता, व यानेंहि पुलकेशीकडे वकील पाठविला होता. परराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनें ही गोष्ट महत्त्वाची आहे ( म. यु. भा. १·२· १८१ ).

**२.** ( स. ११५२–११६० ) हा बहराम गझनवीचा मुलगा. हा स. ११५२ मध्यें गझनीचा अमीर झाला. याचे कारकीर्दीत तुर्कमान लोकांपैकीं घुझ्झ नांवाच्या टोळीनें खुरासान प्रांतावर स्वारी करून संजरला पराभूत करून कैद केलें. तो त्यांच्या कैदेंत असतां स. ११५७ मध्यें वारला. खुरासान प्रांतांतून तुर्कमान लोकांनीं गझनीकडे मोर्चा वळविला. तेव्हां भिऊन हा लाहोरला आला; तेथें स. ११६० मध्यें मरण पावला. सबक्तगिननें स्थापिलेल्या गझनवी राजवंशाच्या विस्तृत साम्राज्यांपैकीं स. ११५७ मध्यें खुस्रवच्या कारकीर्दीत फक्त पंजाबच काय तो गझनवी वंशाकडे शिल्लक राहिला. घुझ्झ तुर्कमान लोकांचे ताब्यांत गझनी पुढें १० वर्षेपर्यंत राहिली व नंतर गझनीचें राज्य घुरचे राजघराण्याचे ताब्यांत गेलें.

**३.** ( स. ११६०–११९२ ) हा खुस्रवशाह गझनवीचा मुलगा, हा त्यानंतर गादीवर आला. खुस्रवशाहचे कारकीर्दीत गझनीचें राज्य याच्या सत्तेखालून जाऊन घुझ्झ तुर्कमानांच्या हातीं गेलें होतें; त्यामुळें हा गझनवी घराण्यांतील अमीर असूनहि याचे अमलाखाली त्याच्या घराण्याच्या मोठ्या साम्राज्यापैकीं फक्त पंजाबच काय तो शिल्लक राहिला होता. राज्याचा एक एक प्रांत परक्यांच्या हातीं जाऊं लागला तरीहि हा सुखोपभोगमग्न राहिला. स. ११८१ मध्यें मुइझ्झुद्दिन मुहंमदानें लाहोरवर चालून येऊन लाहोरसमोर तळ दिला. तेव्हां हा त्यास शरण गेला. शरणागतत्वाचें प्रदर्शन करण्याकरितां आपला आवडता हत्ती व एक मुलगा ओलीस पाठवावा लागला. मुइझ्झुद्दिन मुहंमद पुढें अधिक त्रास न देतां सियालकोटला गेला व तेथें हल्लीं असलेला सुप्रसिद्ध किल्ला बांधिला. सियालकोट घेण्याचा यानें एकदां प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला. स.११८६मध्यें मुइझ्झुद्दिन मुहंमदनें पुन्हां लाहोरवर स्वारी केली व याला विश्वासघातानें पकडलें. पुढें तो जलालुद्दीन मुहंमद याजवर स्वारी करण्यास निघाला तेव्हां त्यानें याची घातुक अडचण होईल म्हणून यास ठार केलें ( स. ११९२ ).

**४.** ( जन्म स. १२५३–मृ. स. १३२५ ) फार्सी कवी. यमीन उद्दीन मुहम्मद हसन ऊर्फ अमीर खुस्रव असें याचें नांव आहे.

हा ज्या हिंदी कवींनीं फार्सी भाषेंत काव्यरचना केली आहे अशा कवींपैकीं एक अतिश्रेष्ठ कवि आहे. याचें घराणें मूळचें तुर्की. याचा बाप तुर्कस्थानांतील काश शहरचा रहिवासी. तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत चंगीझखानाच्या मोगल स्वारांनीं तुर्कस्थानांत धुमाकुळ घातला तेव्हां जे तुर्क लोक आश्रयार्थ हिंदुस्थानांत आले त्यांत अमीर खुस्रवचा बाप होता. अमीर खुस्रव पतियाला येथें स. १२५३ मध्यें जन्मला. कविता लोकप्रिय होऊं लागल्यावर अलाउद्दीनाचे दरबारी राजकवीचे जाग्यावर यास राजाश्रय मिळाला. उतारवयांत यांस उपरति होऊन यानें शेख निजामुद्दीन अवलियाचें शिष्यत्व पत्करिलें व सर्वसंगपरित्याग करून यानें कडक धर्माचरण अंगिकारिलें. तरी कविता करण्याचा मात्र त्याग केला नाहीं. याचा काव्यसंभार प्रचंड आहे. यानें स्वतः केलेल्या मोजदादीप्रमाणें लक्ष पंक्ती रचिल्या. आपल्या कवितांचे यानें चार वर्ग पाडिले आहेत, पहिल्यांत तारुण्यांतील स्वैरविलासी कवितांचा, दुसऱ्यांत मध्यम वयांतील काव्यांचा, तिसऱ्यांत पोरकटपणा टाकून धर्मविचारांकडे ओढा होऊं लागला अशा प्रौढ वयांतील कवितांचा व शेवटच्या वर्गांत बुद्धि स्थिर होऊन धर्मोपदेश करण्यास अनुकूल भूमिका प्राप्त झाल्यावर लिहिलेल्या कवितांचा यानें समावेश केला आहे. दुसऱ्या वर्गांतील कवितांमध्यें ज्यानें राजाश्रय देण्याचे उपकार केले त्या राजैश्वर्याच्या अभिमानी सुलतानास समाधान वाटेल अशा राजस्तुतिपर अनेक कविता आढळतात. याला कविश्रेष्ठ सादीसंबंधीं फार आदर वाटे. कविश्रेष्ठ सादी हिंदुस्थानांत आला तेव्हां यानें त्याचा मोठा सन्मान केला व सादीनेंहि याची अलाउद्दीनाकडे शिफारस केली. हा ३ एप्रिल १३२५ रोजीं वारला ( कें. हि. ). याची कबर जुन्या दिल्लींत आहे.

ज्या वेळेस अलाउद्दीननें दक्षिणेंत स्वारी केली तेव्हां हा त्याच्याबरोबर होता. हा संगीतामध्यें निष्णात होता. याला मुसलमानी व हिंदी असे दोनहि राग येत असत. यानेंच प्रथम ख्यालाचें गाणें काढलें. शूर सरदार, शहाणा मुत्सद्दी, लोकप्रिय कवि व गायनपटु असा याचा लौकिक होता. यानें निरनिराळ्या विषयांवर ७२ ग्रंथ केले. त्यांत कांहीं संगीतशास्त्रावरहि आहेत ( प्रतापरुद्र पाहा ).

यानें मोंगलांचें वर्णन चांगलें केलें आहे. " लोहमय शरीर, विस्तवासारखे चेहेरे, आंखूड मान, सुकलेले गाल, केसाळ व रुंद नाकपुड्या, अजगरी तोंडें, रांठ कांतडी, व दुर्गंधीयुक्त शरीर, ह्यांच्या योगानें कोण मनुष्य भिऊन गर्भगळित होणार नाहीं ! हीं भुतें पाहून

लोक दूर पळून जात आणि म्हणत, " देवानें हीं कशाचीं घडलीं आहेत कोण जाणे ! " याशिवाय यानें खल्जी घराण्यांतील खिजरखान व देवलदेवी यांच्या प्रणयलीलेविषयीं फार्सी भाषेंत एक सुरेख कवन रचिलें आहे.

यानें काव्य व इतिहासविषयक ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं 'आशिकी' अथवा 'दवलरानी व खिज्रखाँ' 'किरनुस्सादैन' 'खजायनुल फुतूह' हे प्रसिद्ध आहेत.

५. ( स. १५८७-१६२२ ) हा बादशहा जहांगीरचा सर्वांत वडील मुलगा. याची आई राजा मानसिंगची बहीण होय. याच्या जन्मानंतर तिला शहा बेगम ही पदवी मिळाली. हा दक्षिणेंत मरण पावला.

हा आपल्याविरुद्ध कारस्थानें करील म्हणून शहाजहाननें यास दक्षिणेंत बरोबर आणलें. आणि ता. २४-४-१६२२ च्या सुमारास यास बहुतेक त्यानेंच ठार केलें.

मरतेसमयीं याचें वय ३६ वर्षांचें होतें. याची आई व हा यांना नजिकनजिकच पुरण्यांत आलें. याच्या कबरीवर बऱ्याच करुणरसपर कविता लिहिल्या आहेत. 'माअसोर कुत्बशाही' नांवाच्या पुस्तकांत, शहाजहाननें रेझा नांवाच्या इसमाकडून यास मारविलें, असें म्हटलें आहे ( बील ).

६. ( खुदावंद झाद पाहा ).

७. ( ४ हसन पाहा ).

**खुश्रुशेट मोदी**— ( स. १७५५-१८१४ ) याचें नांव खुसरवानजी जमशेटजी मोदी असेंहि आढळतें. याचें मूळगांव खंबायत. हा जातीचा पारशी असून पेशव्यांच्या दरबारचा रेसिडेंट क. क्लोज याचा एजंट असे. प्रथम मॅलेटनें यास इकडे आणलें. पुढें हा सदाशिव माणकेश्वराच्या हाताखालीं राहून इंग्रजांकडे पेशव्यांचे तर्फे काम करी. एल्फिन्स्टन पुणें कारभारावर येण्याच्या पूर्वीपासून पुढें सोळा वर्षे इंग्रजांचें काम याच्या तंत्रानें चाले. पेशव्यांनीं याला कर्नाटकांत नेमलें होतें. हा हुषार व लटपट्या असल्यामुळें दोघांना खूष ठेवून स्वतःचा फायदा साधण्याचें याचें धोरण होतें. याच्या हुषारीबद्दल यास श्रीमंतांनीं गुजराथेंतील रालेज वगैरे पांच हजारांची जहागिरी दिली होती. क. क्लोजचा याजवर विश्वास असल्यामुळें तो बहुतेक हिंदी कारभार याच्या मार्फतच करीत असे. इंग्रजांशीं संधान बांधण्याचें ठरवून माणकेश्वर व बयाजी नाईक हे मोदीशीं सलगी करूं लागले; परन्तु रावबाजींचा मोदीवरच जास्त विश्वास असल्यामुळें सदाशिव माणकेश्वर व बयाजी मोदीचा द्वेष करूं लागले. व द्वेषाचा परिणाम मोदीवर लांच खाल्याची फिर्याद ठोकण्यांत झाला. परंतु आपलीं बिंगें बाहेर पडतील या भीतीनेंच श्रीमंतांनीं ती फिर्याद काढून टाकण्यास रसेलला सांगितलें. या श्रीमंतांच्या कृत्यानें मोदी खूष झाला. पुढें याच्याच ताब्यांत स. १८०५ ते १८२१ पर्यंत रेसिडेन्सी होती असें म्हटलें असतां फारसें वावगें होणार नाहीं.

एल्फिन्स्टनला मोदीचा स्वभाव आवडत नसे. याचें मुख्य कारण असें कीं, स्वतः एल्फिन्स्टन पेशवाई उलथून पाडण्याचा नाना तऱ्हेचे प्रयत्न करीत होता व ते त्याचे प्रयत्न अगर हेतु कदाचित् मोदीच्या हातून श्रीमंतांस कळतील व आपला कार्यभाग साधला जाणार नाहीं असें त्यास वाटे. याकरितां मोदीस एल्फिन्स्टननें असा लेखी निरोप पाठविला कीं, 'आपण एक सुभेदारी तरी करा नाहीं तर एजन्ट म्हणून तरी रहा. दोन्ही कामें एकाच वेळीं करणें इष्ट नव्हे ' त्यावर उत्तरादाखल सुभेदारी सोडल्याचें यानें कळविलें. त्याच वेळीं गंगाधरशास्त्री पटवर्धन हा गायकवाडांचा तंटा तोडण्यास आला होता. त्यास मोदीचा फार राग येत असे. तेव्हां त्यानें मध्यस्थी करून याचें एजन्टाचें काम काढून घेतलें व याच्या कामगिरीबद्दल यास ५०० रु. पेन्शन देण्याचें ठरविलें.

तहानें पेशवे हतप्रभ झाले; पुन्हां शक्तिसंपन्नावस्थेंत आणावें या उद्देशानें मोदीनें बरीच खटपट चालविली. त्यावर फितुरीचा आरोप ठेवण्याची एल्फिन्स्टननें पराकाष्ठा केली, पण व्यर्थ. अखेर मोदीला आपल्या इनाम गांवीं जाण्याची सूचना देण्यांत आली; तरीहि तो बरेच दिवस पुणें मुक्कामींच होता. पुढें याचें गुजराथेंत जाण्याचें बहुतेक ठरलें होतें. पण जावयास निघणार तोंच एका रात्रीं एकाएकीं मरण पावला. याच्या मरणाविषयीं बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत ( मं. अहवाल १७३८; दुसरे बाजीराव यांची राजनिशी ).

हे पारशी असूनहि 'हे विनंती' बाळबोधींत लिहीत असत. यांचे वंशज सध्यां रालेज ( जि. खेडा ) येथें आहेत. स्वतःचे बेत माहीत असल्यानें पेशव्यांकडून याला काढून लावणें असाध्य झाल्यानें एल्फिन्स्टननें यांना विषप्रयोग करून ठार केलें ( माघ व. ५. १७३६ ). पुण्याचा मोदीचा गणपति यांचाच होय.

**खेता**—( क्षेत्रसिंह पाहा ).

**खेमसावंत**—हा फोंड सावंताचा मुलगा होय. हाच सावंतवाडीचा राज्यसंस्थापक म्हणतां येईल.यानें स. १६२७ सालीं विजापूरकराकडून देशमुखी मिळवून तिचा १४ वर्षे उपभोग घेतला. याच्यानंतर याचा पुत्र लखम सावंत गादीवर आला.

**२.** ( स. १६७५–१७०९ ) हा शूर सावंतानंतर स. १६७५ सालीं गादीवर आला. हा शूर सावंताचा पुतण्या होय. याच्या पित्याचें नांव फोंडसावंत. यानें आपला फौजफाटा वाढवून त्याचा शिवाजीविरुद्ध उपयोग केला. पोर्तुगीजांच्या मागें संभाजी लागला तेव्हां त्यांनीं यास फोडून आपल्याकडे घेतलें ( स. १६८५–८६ ). यानें मोठ्या पराक्रमानें पोर्तुगीजांना नामोहरम करून आपल्या राज्याचा विस्तार केला व कुडाळच्या प्रभूंना जिंकून स्वतंत्र झाला. यानें चराठें हें राजधानीचें ठिकाण करून तेथें मोठी वस्ती करविली. याच गांवाला पुढें सुंदरवाडी म्हणूं लागले. शाहूनें याची सरदेशमुखी कबूल केली व कुडाळ आणि पंचमहाल यास इनाम दिले. हा स. १७०९ मध्यें निवर्तला. याच्यामागून फोंड सावंत गादीवर आला.

**३.** ( स. १७५५–१८०३ ) हा रामचंद्र सावंताचा मुलगा. गादीवर आल्यानंतर यानें मागें झालेल्या अपजयाचा वचपा काढून पोर्तुगीजांपासून गेलेला मुलूख परत मिळविला ( स. १७९१ ). जिवबादादा बक्षी यानेंच या सावंताला हाताशीं धरून संस्थानाला ऊर्जितावस्था आणली. हा स. १८०३ मध्यें निपुत्रिक मरण पावला.

हा शिंद्यांचा नातेवाईक असून सखुबाई शिंद हिचा जांवई होता. याचेकरितां महादजी शिंदे यांनीं दिल्लीच्या बादशाहकडून ' राजे बहादर ' हा किताब व मोर्चेलाचा अधिकार मागून घेतला. वस्तुतः सावंतवाडीकर हे पेशव्यांचे मांडलिक असल्यामुळें त्यांना कोणताहि बादशाही किताब पेशव्यांच्या परवानगीवांचून स्वीकारतां येत नसे. परंतु महादजी यांनीं मिळविलेला किताब सखुबाई शिंदे यांचे मार्फत परस्पर सावंतवाडीकर यांच्याकडे गेला, आणि यांनीं आनंदाच्या तोफा सोडून त्याचा स्वीकारहि केला. ही बातमी नाना फडणीसास कळली. त्यांना ही गोष्ट नापसंत पडून याचा राग आला, व त्यांनीं महादजी शिंद्यांकडे तकार केली. परंतु महादजीनें मोठ्या युक्तीनें उत्तर देऊन आपल्यावरील जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. परंतु नानांनीं याच्याकडून नजरेदाखल कांहीं रक्कम घेतल्यावांचून यास हा बादशाही मान उपभोगूं दिला नाहीं. यासंबंधाचें एक खाजगी पत्र शिंद्याकडील बातमीदारानें नानास लिहिलें आहे तें उपलब्ध आहे ( ऐ. टि. ४४ ).

**खेळोजी रुस्तुमजी भोसले**—हा नांदनजच्या ( बार्शी सोलापूर रस्त्यावर ) रुस्तुमजी भोंसल्याचा मुलगा होय. याला परसोजी नांवाचा एक धाकटा भाऊ होता. तो जिंतीकर भोंसल्यांचे घराण्यांत दत्तक गेला होता.

हा नांदनज मुक्कामीं वडिलार्जित वतनदारीवर होता. शाहूमहाराज मोंगलाईंतून परत येत असतां यास बरोबर घेऊन साताऱ्यास आले, व त्यांनीं यास आपले आप्त समजून नांदनज व भांबोरें येथील मोकासा अंमल देऊन राजपत्रें करून दिलीं. तेव्हांपासून हें घराणें स्वराज्याच्या अभ्युदयाचें ऋणी होऊन राहिलें आहे.

हा सातारा मुक्कामीं वारला असें म्हणतात. यास चार मुलगे होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें-शाहाजी, कक्काजी, रुस्तुमजी व सुभानजी अशीं होतीं. या चौघांत वरील दोनहि गांवांची वतनदारी वांटली गेली आहे. म्हणजे दोन्ही ठिकाणीं या चार भावांचे चार वाडे, चार विहिरी, चार मळे अशी व्यवस्था केली गेली असून अद्यापि वरीलप्रमाणेंच वतन-बाबीचे किंवा मानपानाच्या हक्काचे प्रथमतः वरील चार घरांचे नांवानें चार हिस्से करण्याची वहिवाट कायम आहे ( मं. समग्र सं. वृ. श. १८४१ पृ. ६८ ).

**खेळोजी विठोजी भोसले**—( मृ. स. १६३९ ) शहाजीचा हा चुलत भाऊ असून विठोजीचा पुत्र होय. हा मालोजी भोसल्याचा सख्खा धाकटा भाऊ. हा वेरूळ मुक्कामीं आपल्या वतन-गांवीं राहत असे. यास निजामशाहींतून मनसबदारी मिळत असे. खंडागळे यांच्या हत्तीवरून झालेल्या लढाईत हा व शहाजीराजे असे मिळून लुकजी जाधवाबरोबर लढले. त्यांत शहाजी जखमी झाला, खेळोजी पराभूत झाला व याचा भाऊ संभाजीला मारून आपल्या मुलाच्या म्हणजे दत्ताजी जाधवाच्या मृत्यूचा सूड त्यानें उगवला. पण मुर्तजा निजामशाहानें खेळोजीची बाजू घेतली. त्यामुळें सुरक्षितपणाकरितां लुकजी जाधवराव मोंगलांच्या आश्रयास गेला ( स. १६२१ आक्टोबर ). खेळोजी व इतर मालोजी वगैरे भाऊ यांच्यांत बिघाड होऊन वांटणी झाली ( स. १६२२ ). पुढें याचें शहाजीशीं भांडण होऊन शहाजीनें निजामशाही सोडली आणि हा शहाजहानला मिळाला. शहाजीप्रमाणेंच यानेंहि शहाजहानचाच पक्ष स्वीकारला ( स. १६२९ ). शहाजहाननें याला पंचहजारी केलें; परंतु लौकरच शहाजहानची नोकरी सोडून यानें आदिलशाहींत नोकरी धरली ( स. १६३३ ) व मोंगलांविरुद्ध लढूं लागला. त्या वेळीं याची बायको गोदावरीवर स्नान करीत असतां तिला मोंगलांनीं पळविलें. तेव्हां चार लाख रुपये दंड भरून तिला यानें सोडविलें. पुढें नोकरी सोडून खेळोजी आपल्या

जहागिरीच्या गांवीं जाऊन वेरूळच्या आसपास वाटेल तसा धुमाकूळ घालूं लागला. तेव्हां दख्खनचा सुभेदार औरंगजेबानें यास पकडून १६३९ आक्टोबरांत ठार मारलें.

याला आठ मुलगे व एक मुलगी अशीं नऊ अपत्यें होतीं. त्यांपैकीं वडील मुलगी अंबिकाबाई ही जाधवरावाचे घरीं दिली होती. संभाजी, खेळोजी, मालोजी, कबाजी, नागोजी, परसोजी, त्रिंबकजी व आठवा कक्काजी अशीं याच्या मुलांचीं नांवें होतीं ( मं. सप्तम सं. वृत्त. पृ. ६६ ). याशिवाय हिलाल नांवाचा याचा एक क्रीतपुत्र होता असें शिवभारतावरून दिसतें ( शिवभारत, १७.५३;२३.५५).

**खेंगार**—( ३ अभयदेव सूरि पाहा ).

**खैर्यत सिदी**—जंजिऱ्याचा सिदी. प्रथम राजपुरी येथें होता. नंतर हा जंजिऱ्यावरील अधिकारी झाला. स. १६७१ मध्यें शिवाजीचा पाडाव करणारांत हा होता.

**खोत्तिग राष्ट्रकूट**—( स. ९६५-६ राज्यारोहण ) मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या अमोघवर्ष राष्ट्रकूटाचा पुत्र. हा आपला भाऊ तिसऱ्या राष्ट्रकूटानंतर गादीवर आला. याच्या कारकीर्दीत राष्ट्रकूट सत्तेच्या नाशास सुरवात झाली. राष्ट्रकूट सत्तेस पहिला धक्का उत्तरेकडून परमारांनीं दिला. याच्या कारकीर्दीत परमारराजा शीयक किंवा श्रीहर्ष यानें मान्यखेटावर चाल करून तें शहर लुटलें ( स. ९७१ ). या पराभवानंतर हा लवकरच स. ९७२ च्या सुमारास मरण पावला ( राष्ट्रकूट १२४-१२५ ).

**खोलेश्वर**—यादवकाळीं बऱ्याच ब्राह्मणांनीं तरवार उचलली होती. त्यांपैकीं खोलेश्वर ही एक प्रख्यात व्यक्ति होती. हा सिंघण यादवाचा सेनापति असून मुद्गलगोत्रीय ऋग्वेदी ब्राह्मण होता. यानें बऱ्याच स्वाऱ्या गुजराथेवर करून वाघेलांना जिंकलें. सिंघणाच्या ताम्र्यांतील मुलूख वाढविला. याचा काल स. १२०० ते १२५० येतो. यानें संघक्रोश ( अजिंठ्याच्या डोंगरालगतचा भाग ) जिंकून तेथें आपली वस्ती केली. यानें शेंदुर्णी येथें बांधिलेल्या महादेवाच्या देवळाचें नांवहि खोलेश्वरच ठेविलें.

खोलेश्वरास राम म्हणून एक मुलगा होता. तो वीरधवळ वाघेलाशीं लढत असतां मारला गेला. दुसरा विचण ( विजल ? ) होता. तोहि पराक्रमी होता.

## ग

**गजदृष्टि चेर**—हा शेंगुत्तुवन या चेर वंशांतील राजाचा पुत्र. हा आपल्या बापाच्या वेळीं तोंडी येथें राजप्रतिनिधि होता. यानेंहि बऱ्याच लढाया मारल्या होत्या. शेवटीं पाण्ड्य राजानें याचा तलैआलंगानम् येथील लढाईत पराभव करून याला कैद केलें. नंतर चेरांच्या राज्याला उतरती कळा लागली. हा राजप्रतिनिधि असतां याच्या ताब्यांतील प्रदेश कोळी मलाईपासून तोंडीपर्यंत असून त्याच्या दोनहि बाजूंस चोल व पांड्य यांचीं राज्यें होतीं. चेरांचें राज्य म्हणजे हल्लींचा सर्व मलबार किनारा ( मलबार जिल्हा, त्रावणकोर व कोचीन संस्थानें ) होय. कन्याकुमारीपासून उत्तरेस मंगलोरपर्यंत व अरबी समुद्रापासून पूर्वेस सह्याद्रीपर्यंत हा प्रदेश होय.

**गजपतिघराणें**—१ कपिलेंद्र ( स. १४२९-३० ), २ पुरुषोत्तम, ३ प्रतापरुद्र ( स. १४९६-१५३९ ), ४ कथरुद्यदेव ( स. १५३९-४१ खून ).

हें घराणें ओरिसा ( कलिंग ) प्रांतांत राज्य करीत होतें. कपिलेंद्रानें चवथ्या भानुपासून राज्य घेतलें, व कटक राजधानी केली. या घराण्याला सूरिवंश असेंहि म्हणत असत ( सिवेल आणि आयंगार, पृ. ३७३ ).

**गजपति प्रतापरुद्र**—( सुमार शालिवाहन १५ वें शतक ) याच्या पदरीं कदंब नांवाचा कवि होता. यानें न्यायशास्त्रावर ग्रंथ रचला ( क. च. ).

**गजराबाई**—ही गोविंदराव गायकवाडाची राख. हिचा पुत्र कान्होजी.

**गजराबाई बांडे**—ही थो. शाहूची मुलगी होती. शाहूनें रघूजी बांडे याच्या मल्हारराव नांवाच्या मुलास आपली ही मुलगी दिली.

मरतेसमयीं शाहूनें हीस एक सनद दिली ती "सौभाग्यादि संपन्न गजराबाई बांडे यांसी इनाम धारादत्त व वंशपरंपरेनें परगणा नंदुरबार व परगणे सुलतानपुर, सुभे खानदेश पैकीं गांवें आहेत" सनदेची ता. १२-८-१७४६.

**गझनवी वंश**—(एप्रिल ९७७ ते ११८६ अखेर) गझनीचा यामीनी राजवंश गझनवी राजवंश या नांवानें प्रसिद्ध आहे. या गझनवी राजवंशाचे साम्राज्यांत पंजाब प्रांत महमूद गझनवीचे कारकीर्दीपासून असल्यामुळें या राजवंशास हिंदुस्थानच्या इतिहासांत महत्त्वाचें स्थान मिळालें आहे.

दहाव्या शतकांत बाल्खच्या सामान नांवाच्या राजघराण्यांतील पुरुषांनीं आपल्या राज्याचा विस्तार करून

त्यांत ट्रॅन्सॉक्झियाना, इराण व अर्वाचीन अफगाणिस्थानांत मोडत असलेल्या बहुतेक सर्व मुलखाचा समावेश केला. बाल्खच्या सामान राजघराण्याचें हें साम्राज्य जसें लवकर वाढलें तसें लवकरच विस्कळित होऊन लयालाहि गेलें. सामान राजे आपल्या दिमतीला असलेल्या गुलामांस उच्च पदास चढवून साम्राज्यांतील प्रांतांचे राज्यकारभारावर त्यांच्या नेमणुका करीत. अशा गुलामगिरीच्या हलक्या दर्जातून सरदार, अमीर व उमरावांच्या दर्जास गेलेल्या या गुलाम अधिकाऱ्यांपैकीं कांहीं त्यांच्या ताब्यांतील साम्राज्याच्या भागाचे मालक झाले.

गुलामगिरींतून उदयाला आलेल्या अशा तुर्की अधिकाऱ्यांपैकीं अलप्तगीन नांवाचा एक अधिकारी होता. त्यानें बंड करून गझनीस आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. अलप्तगीन व त्याचे वंशज पेंचांत सांपडले म्हणजे जरी कधीं कधीं, बुखाऱ्यास राजधानी करून राज्यकारभार करणाऱ्या सामानच्या राजवंशास, नोकरास किंवा मांडलिकास उचित असा मान देत तरी बहुशः स्वतःस स्वतंत्र राजे समजूनच राज्यकारभार चालवीत. स. ९६३ मध्यें अलप्तगीन वारला व त्याचा मुलगा इशाक गझनीचा अमीर झाला. त्याच्यामागून स. ९६६ मध्यें बलक्तगीन गादीवर आला तो अलप्तगीनचा गुलाम होता; व त्यानें बुखाऱ्याच्या सम्राटाकडून अधिकारसूत्रें मिळविलीं होतीं. स ९७२ मध्यें पिराई गझनीच्या गादीवर आला. तो प्रजेस अप्रिय झाल्यामुळें पदच्युत झाला. त्याची गादी अलप्तगिनानें आपल्या स्वतःच्या मुलीशीं लग्न करून देऊन उच्च पदवीला आणलेल्या सबक्तगिनास ९ एप्रिल ९७७ मध्यें दिली. यानेंहि बुखाऱ्याच्या सामानी सम्राटाकडून गझनीस सत्ताधिष्ठित होण्यास परवानगी मिळविली होती. परंतु पुढें त्यानें सम्राटास जुमानलें नाहीं व स्वतंत्रपणें राजसत्ता उपभोगिली.

सबक्तगीन हाच गझनीच्या यामीनी राजवंशाचा संस्थापक होय. त्यानें आपल्या अमदानींत हिंदुस्थानवर स्वाऱ्या करून पंजाबचा राजा महीपाल याजकडून काबूल प्रांत मिळविला व बुखाऱ्याचा सम्राट् नूर २ रा यास खुरासान प्रांतांत धुमाकूळ घालणाऱ्या इस्मायली नांवाच्या काफीर पंथाचा अध्वर्यु अबुअली सुंजूर याचा बंडावा मोडण्यास मदत करून खुरासान प्रांताचें राज्य मिळविलें व अशा प्रकारें राज्यविस्तार करून आपली सत्ता व दरारा सुप्रतिष्ठित केला. त्यामुळें व पुढें त्याचा मुलगा सुप्रसिद्ध सेनानी महमूद यानें आपल्या पराक्रमानें राज्यविस्तार करून सत्ता दृढमूल केल्यामुळें वंशपरंपरेनें गझनीचें राजपद त्यांच्या घराण्यांत कायम टिकविणें त्यांस शक्य झालें. म्हणूनच सबक्तगिनास नवीन राजवंश स्थापन केल्याचा मान मिळतो.

गझनवी राजवंशांत १७ राजे झाले व या घराण्याचें सुमारें २०० वर्षें साम्राज्य टिकलें. राज्यविस्तार करून परकीय राजांस भीति वाटेल अशी कारकीर्द फक्त महमूदची होय. झाला तो बहुतेक राज्यविस्तार महमूदनेंच केला. महमूदचे पश्चात् गझनीचे गादीचा दरारा कमी होऊन अंतस्थ व बाहेरील शत्रूंस गझनीचे राज्याविरुद्ध उघड उठाव करण्याचें धैर्य होऊं लागलें. महमूदचा मुलगा मसूद १ ला याच्या कारकीर्दीतच हिंदुस्थानांतील राजांनीं गझनवी साम्राज्याचें हिंदुस्थानांतील आसन डळमळीत करण्याचे प्रयत्न सुरू केलें. राजपद मिळावयाचें तें मृत राजाच्या थोरल्या मुलास किंवा तसा मुलगा नसल्यास ठराविक अनुक्रमानें पण अबाधित नियमानें वारसा हक्क चालू राहण्याची रूढि इतरत्र आढळते तशी गझनवी राजवंशांत नसल्यानें राजघराण्यांतील राजपुरुषांचाच बंदोबस्त करण्यांत तक्तनशीन राजपुरुषाची शक्ति खर्च होई. गादीचा तंटा केव्हां उत्पन्न होईल याचा नियमच नसे. निर्वेध व दीर्घकाल राज्योपभोग ज्यास घ्यावयास सांपडला असे गझनवी राजवंशांत तीन राजे झाले. महमूद २८ वर्षें, इब्राहिम झहिरउद्दौला ४० वर्षें व बहराम ३४ वर्षें. पैकीं महमूदचा बहुतेक काल राज्यविस्तार करण्यांतच गेला. इब्राहिम झहिरउद्दौलाच्या कारकीर्दींत शांतता होती. तह करून युद्धाचे प्रसंग त्यानें कमी केले होते. बहरामची कारकीर्द दीर्घ असली तरी राजसत्तेचा दरारा नव्हता. परकी शत्रू स्वाऱ्या करीत. अटाउद्दीन हुसेन जहानसुदा अथवा 'जगजाळ्या' यानें त्याच्याच कारकीर्दींत गझनी जाळून आसपासचा मुलूख उध्वस्त केला. सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, गझनवी साम्राज्याचा पाया सबक्तगिनानें घातला, महमूदनें त्याचा विस्तार करून दरारा वाढविला. मसूद १ ला यानें विस्तार व व्यवस्था बऱ्याच चांगल्या प्रकारें रक्षण केली. तरी त्याच्यामागें गादीच्या मालकीबद्दलच्या तंट्यामुळें व राजपदावरील राजपुरुषांचें अधिष्ठान नेहमींच डळमळींत राहूं लागल्यानें राजकुलाची इभ्रत व दरारा कमी होऊं लागला. बहरामच्या कारकीर्दीच्या अखेर निश्चितपणें ऱ्हासास सुरुवात झाली. खुस्रव मलिकचे कारकीर्दींत गझनवी वंश नामशेष झाला.

(१) सबक्तगीन (स. ९७६), (२) इस्माईल (स. ९९७), (३) महमूद यमिनुद्दौला (स. ९९८)'

( ४ ) मुहम्मद ( स. १०३० ), ( ५ ) मसूद १ ला ( स. १०३० ), ( ६ ) मौदूद ( स. १०४० ), ( ७ ) मसूद २ रा ( स. १०४९ ), ( ८ ) अलीअबू अलहसन अली बहाउद्दौला ( स. १०४९ ), ( ९ ) इझ्झुद्दौला अब्दुर रशिद ( स. १०५२ ), तुघ्रील ( कृतघ्न ) ( स. १०५२ ), ( १० ) फरूखझाद जलालुद्दौला ( स. १०५३ ), ( ११ ) इब्राहिम झहिरउद्दौला ( स. १०५९ ), ( १२ ) मसूद ३ रा ( स. १०९९ ), ( १३ ) शिरझाद कमालुद्दौला ( स. १११५ ), ( १४ ) अर्सलानशहा सुलतानुद्दौला ( स. १११६ ), ( १५ ) बहरामशहा यमिनुद्दौला ( स. १११८ ), ( १६ ) खुस्रवशाह मुहइझ्झुद्दौला ( स. ११५२ ), ( १७ ) खुस्रव मलिक ( स. ११६०-११८६ ).

**गझनीखान घोरी**—हा माळव्याच्या हूशंगशाहाचा मुलगा. याला मुहम्मदशाह असेंहि म्हणत. याचा वजीर महमूदखान खल्जी यानें यास ठार करून राज्य बळकावलें. तेव्हा माळव्यांत घोरीवंश संपून खल्जीवंश सुरू झाला ( स. १४३५ ). पण केंब्रिज हिस्टरींमध्यें दिलेल्या वंशावळींत याला मसूदखान नांवाचा मुलगा असून त्यानंतर मालवा येथें खल्जी घराणें राज्य करूं लागलें, असें दिलें आहे.

**गझनीखान फारुकी**—हा खानदेशच्या फारूकी घराण्यांतील हसन ( मलीक पहिला ) चा मुलगा. याला कैसरखान नांवाचा मुलगा होता ( कें. हि. ).

**२.** ( स. १५०८ ) खानदेशच्या फारूकी घारण्यांतील दाऊदखानाचा हा मुलगा. याला खानजहान नांवाचा एक भाऊ होता ( कें. हि. ).

**गणपतराव नारायण शौचे**—( मृ. स. १८४७ मे १२ ) हा यशवंतराव होळकरांचा दिवाण स्वतः फार खटपटी असून शूर होता. प्रत्येक मोहिमेत हा मदत करीत असे. यशवंतरावांचा सर्व पत्रव्यवहार हा करीत असे. यशवंतराव मरण पावल्यावर तुळसीबाईचा हा कारभारी झाला.

**गणपतराव भिकाजी रास्ते**—याची वडील कन्या गोपिकाबाई ही नानासाहेब पेशव्यास दिली होती. याला सहा भाऊ होते. यानें माळवा व कर्नाटकामध्यें अनेक लढाया मारिल्या. या घराण्यांतील मंडळींनीं वांई, सातारा, तालीकोट इत्यादि ठिकाणीं पेठ, घाट, वाडे, देवळें बांधिलीं. याचा वंशज सध्यां पुण्यांत आहे.

**गणपतराव शिवाजी विंचुरकर**—( मृ. स. १७८४ सप्टें. ९ ) हे विठ्ठल शिवदेवाचे नातू. हे महादजी शिंदे यांचे लष्करांत वारले. यांच्या मृत्यूचें वर्तमान सदाशिव दिनकर ह्यांनीं नाना फडणवीसास पुढें लिहिल्याप्रमाणें लिहिलें आहे:

" राजश्री शिवाजी विठ्ठल बापू यांचे पुत्र गणपतराव, वय पंचवीस सत्तावीस वर्षांत असतां, धीर, उदार, सबूर, आर्जव मितभाषणी, देखणा, मोहकता, गुणज्ञ, असा संपन्न आणि सरदारीचा डौलाचा आटोपही केला होता. बापूस विश्रांति होती. ग्रहप्रतिकूलतेंकरून अडीच महिने दुखणें झालें. काल भाद्रपद वद्य १० गुरुवारीं माध्यान्हीं निधनत्व पाऊन स्वर्गगामी झाले ( सप्टें. स. १७८४ ). स्त्री त्याची सहगमन केली. बापूस मोठें दुःख झालें. " ( ऐ. टि. ५, पृ. १-२ ).

**गणपति**—एक ज्योतिषी. पित्याचें नांव श्रीपति. भास्कराचार्यांच्या भावाचा हा मुलगा. हा यादवांच्या दरबारीं असावा.

**२.** ( स. १६८५ ) मुहूर्तगणपति ग्रंथाचा कर्ता. हा भरद्वाजगोत्री औदीच्या गुर्जर ब्राह्मण.

**गणपति काकतीय**—( स. ११९९-१२६० ) हा पहिल्या प्रतापरुद्र काकतीयानंतर गादीवर आला. याला छलमत्तीगंड अशी पदवी होती. सेनापति जयाच्या बहिणी नरसा व परमा यांच्याशीं यानें लग्न केलें.

जैतुगी यादवानें यास कांहीं अटींवर आंध्राचा राजा केलें होतें ( इंडि. अँटि. १४.३१६;२१.१९८).

याच्या मातेचें नांव बायमांबिका. याचा तिरुपुरांतक येथील शिलालेख शके ११८२ मधला आहे. तो राजवर्ष ६२ मधील आहे. त्यावरून हा स. ११९९-१२६० पर्यंत राज्य करीत होता असें दिसतें ( एन्शन्ट डेक्कन, भा. २, पा. २८२ ). यानें चोल, कलिंग, सेउण, कर्नाटक, लाट, वेलनाडु येथील राजांबरोबर युद्धें केलीं. देवगिरीच्या यादवांबरोबर स. १२३५ मध्यें याची लढाई झाली असावी. राजराज चोल तिसरा हा जरी दुर्बल होता तरी त्याचा याला फायदा झाला व यानें आपलें राज्य वाढविलें. पण पांड्य राजापुढें मात्र याचा टिकाव लागला नाहीं. याची कारकीर्द भरभराटीची गेली. यानें कर माफ करून समुद्रावरील व्यापारास मोकळीक दिली. यानें शैवांना देणग्या दिल्या, देवळें बांधलीं. याला मुलगा नसल्यामुळें याच्या दोन मुलींपैकीं रुद्रम्मा याच्या मागाहून गादीवर बसली ( एन्शन्ट डेक्कन, भा. २,पा.२९० ).

**गणपति कोट**—( स. १२५८-६३ ) अमरावतीच्या कोटांपैकीं तिसऱ्या कोटाचा मुलगा.

**गणपति नगराज**--हा पद्मावतीचा राजा असून याला प्रख्यात समुद्रगुप्तानें आपल्या मुलूखगिरींत जिंकून

मांडलिक बनविलें होतें. त्या वेळीं पद्मावती हें शहर बरेंच मोठें व प्रसिद्ध होतें. हल्लीं शिंदेशाहीमधील नरवर नांवाचें जें गांव आहे तेंच पद्मावती होय. कांहींच्या मतें समुद्रगुप्तानें यांचें राज्य खालसाच केलें असें आहे ( स्मिथ-अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया ).

**गणपांबिका**— ही काकतीय घराण्यांतील गणपतीची मुलगी. अमरावतीच्या बेट्ट कोटाशीं हिचा विवाह झाला.

**गणासबंध**—हा तेलगू कवि, जातीचा द्रविड ब्राह्मण होता. चिदंबराजवळ शाली नामक गांवीं याचा जन्म झाला. हा लहानपणींच विद्या शिकून विद्वान् झाला होता. यानें जैन लोकांशीं जे वाद केले ते सर्व तेवरम् नामक ग्रंथांत लिहून ठेविले आहेत. ह्याच्या कालाविषयीं बरोबर शोध लागत नाहीं ( क. च. ).

**गणिकानंद**—हा मोठा गणिती होता. याचा जन्म शा. श. च्या १४ व्या शतकांत झाला. यानें ज्योतिषावर एक ग्रंथ लिहिला व त्यास आपलें नांव दिलें ( क. च. ).

**गणेश**—( स. १८५७ ग्रंथकाल ) एक हिंदी कवि. हे लालू कवीचे नातू असून गुलाब कवीचे पुत्र होत. यांनीं वाल्मीकिरामायणाचें केलेलें भाषांतर वाल्मीकिरामायणश्लोकार्थप्रकाश नांवानें प्रसिद्ध आहे. याची कविता रसभरित आहे.

२. ताजकभूषण ग्रंथाचा कर्ता.

३. जातकालंकार ग्रंथाचा कर्ता.

**गणेशदास**—मराठी भूपचंद्राख्यान काव्याचा कर्ता ( मं. इ. शके १८३७ ले. १४७ ).

**गणेश दैवज्ञ**—( स. १४९८-१५७८ नंतर मृत्यु ) मोठा नामांकित ज्योतिषी. याचेच ग्रहगणितग्रंथ हिंदुस्थानांत विशेष प्रचलित आहेत. पिता केशव, माता लक्ष्मी, गोत्र कौशिक, वसतिस्थान पश्चिम समुद्रतीरचें नांदगांव. याचे ग्रहलाघव, लघुतिथिचिंतामणि, बृहत्तिथिचिंतामणि, सिद्धान्तशिरोमणिटीका, लीलावतीटीका, विवाहवृंदावनटीका, मुहूर्ततंत्रटीका, श्राद्धनिर्णय, छंदोर्णवटीका, तर्जनीयंत्र, कृष्णाष्टमीनिर्णय, होलिकानिर्णय, लघुपापपात ( पातसारणी ), पर्वनिर्णय. याचा ग्रहलाघव हा ग्रंथ पहिला ( स. १५२० ) आणि विवाहवृंदावनटीका हा ग्रंथ शेवटचा असावा ( स. १५७८ ).

याचा पिता केशव दैवज्ञहि नामांकित ज्योतिषी होता. याच्या विद्वत्तेची अद्यापहि ग्रहकौतुक ग्रंथ साक्ष देत आहे. पण त्याचा हा मुलगा त्यापेक्षांहि सरस निघाला. आणि याच्या ग्रहलाघव ग्रंथानें सर्वांचे ग्रंथ मागें पाडले. पूर्वीच्या गणकांनीं ज्याचापावांचून क्वचित् गणित केलें, पण यानें तर सिद्धान्तोक्त सर्वच गणित ज्याचापावांचून करून दाखविलें. असा हा शोधक आणि कल्पक होता. पण यानें विनय न सोडतां पूर्वजांचा गौरव करून आपलाहि मोठेपणा ग्रहलाघवाच्या शेवटीं सांगितला आहे.

याचा पिता केशव यानें एक ग्रहण वर्तविलें, तें बरोबर मिळालें नाहीं. यामुळें त्याचा उपहास झाला, तेव्हां त्यानें नंदिग्रामाच्या गणेश मंदिरांत बसून तपश्चर्या आरंभिली. त्या वेळीं तो वृद्ध होता. त्याची ती निष्ठा पाहून गणपतीनें स्वप्नांत दृष्टान्त दिला कीं, 'आतां तुझ्या हातून ग्रह शोधण्याचें काम व्हावयाचें नाहीं. मीच तुझ्या पोटीं अवतार घेऊन तें कार्य करीन.' त्याप्रमाणें झालेल्या पुत्राचें नांव गणेश ठेवलें. आजहि ज्योतिषी लोक गणेशदैवज्ञ हा ईश्वरी अवतार होता असें मानतात. ईश्वरानें अवतार घेऊन करावें इतक्या थोर योग्यतेचें याचें काम आहे यांत शंका नाहीं.

गणेश दैवज्ञाच्या पायास डोळे होते म्हणून त्यास चालतांना जमिनीकडे पाहावें लागत नव्हतें, आणि समुद्रकांठीं प्रचंड शिलाखंडावर बसून सारखा आकाशाकडे हा पाहत असे, या दोन्ही आख्यायिका याच्या गौरवपर असून याचें सतत आकाशाकडे लक्ष असे हें दाखविणाऱ्या आहेत. हा नुसता गणित करणारा नव्हता तर स्वतः वेध घेणाराहि होता. तसें यानें ग्रहलाघवांत म्हटलेंहि आहे. याचे ग्रंथ लवकरच लोकप्रिय झाले आणि गंगाधर मल्हारि, विश्वनाथ वगैरेंनीं ग्रहलाघवावर टीका केल्या आणि इतर ग्रंथावरहि टीका झाल्या. याचे इतर ग्रंथहि महत्त्वाचे आहेत ( भा. ज्यो. पा. २५९ ).

"यांनीं सोप्या युक्त्या बसवून गणित सुलभ केलें. परंतु त्या मानानें तें स्थूल होऊन पुढील चुकीचा पाया पडला. दुसरा परिणाम सिद्धान्त-ज्योतिष शिकण्याचा व वेध करण्याचा प्रचार नाहींसा होऊन शास्त्राच्या मूलसिद्धान्ताचें ज्ञान ज्योतिष्यास नाहींसें झालें." हे यावरील आक्षेप सामान्यतः खरे आहेत, पण जास्त विचार करतां बरोबर नाहींत असें ठरतें. अतिश्रमानें सिद्धांतावरून गणित करून जें फळ येणार तें थोड्या श्रमानें मिळेल तर कां घेऊं नये? युरोपांतल्या प्रमाणें आपल्या देशांत शोधकांची परंपरा लागली नाहीं, याचें कारण आपल्याकडील भिन्न स्थिति होय.

हें सर्व घराणेंच नामांकित विद्वान् असून त्यांची परंपरा पुष्कळ लांबपर्यंत टिकली असें दिसतें. गणेशाचा पुत्र

बल्लाळ, त्याचा पुत्र केशव. याचा भाऊ अनंत, पुतण्या नृसिंह इत्यादिकांचे ग्रंथ उपलब्ध आहेत. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता.

**गणेशनाथ**—मराठी कवि. भक्तमंजरी व महिपतीबुवा यांस समर्थकालीन लेखतात. शिवाजीमहाराजांची व याची गांठ पडली होती. गांव सारजी उज्जैनि. शिष्य–विठ्ठलनाथ. पदें आहेत ( सं. सू. ).

**गणेशयोगी**—( स. १७८७ ) हे महागाणपत्य होते. यांचा शिष्यसंप्रदाय मोठा आहे. यांची समाधि मोरगांवीं आहे. यांनीं गणेशविजय नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाचे अध्याय २२ असून एकंदर ओवीसंख्या ४५२२ आहे. यांनीं आपल्या गुरूचा नामोल्लेख व कालाचा उल्लेख कोठेंहि केला नाहीं.

यांनीं संस्कृतांत गणेशगीतेवर टीका लिहिलेली असून शिवाय प्राकृत समओंवी टीका केलेली आहे. याशिवाय गणेशगुह्यस्तोत्र, मयूरेशचरित्र, आणि ललिताचीं व इतर अनेक पदें, अभंग, श्लोक इत्यादि केलेलीं आहेत ( मं. त्रै. १२·४, ले. २५ ).

**गणेश विठ्ठल वाघमारे**—हा एक पेशव्यांचा सरदार असून नगरास किल्लेदार म्हणून होता.

स. १७७५ च्या सुमारास हा दादास मिळाला व पुढें महीवरील लढाईत पाडाव होऊन हरिपंताचे हस्तगत झाला. हरिपंतानें यास बंधमुक्त करून आपले फौजेंत तैनात देऊन जवळ बाळगिलें; परंतु यानें बसल्या बसल्या हरिपंताचे फौजेंत इतका कांहीं फितूर केला कीं, हरिपंताचे खाजगी नौकरसुद्धां यानें फितविले. इतकें केल्यावर यानें दादास सुरतेस पत्र पाठविलें कीं, 'वामनराव पटवर्धन देवाज्ञा पावले; आतां येथील सरदार आम्हीं मायेंत मेळविलें आहेत. मार्गशीर्ष शु।। ८ स हरिपंतास दगा करतों, तुम्हीं चाल करून जलद यावें.' ही फितुरी प्रगट झाली. हरिपंतानें गणेश विठ्ठलास शृंखला घालून पट्टा किल्ल्यावर पाठविलें व इतरांचें पारिपत्य केलें.

हरि भिड्याशीं इंग्रजांची वागणूक व गणेश विठ्ठलाशीं हरिपंताची वागणूक हा स्वभावविशेष ध्यानांत ठेवणें जरूर आहे ( म. रि. उ. भा. १, २१ ).

**गणेश विश्वनाथ बेहेरे**--( स. १७७७–८५ ) हा एक पेशव्यांचा सरदार होय.

फत्तेसिंग गायकवाड अहमदाबादेस मोर्चे लावून पेशव्यांचे महालांत उपद्रव करीत होता. तेव्हां हा व अंताजी नागेश हे गुजराथच्या बंदोबस्तास होते. ते फत्तेसिंगावर चालून गेले. पुढें पेशव्यांनीं फत्तेसिंगाच्या कराराची सनद देऊन अंताजी नागेश यास फत्तेसिंगाचा कारभार करण्यासाठीं पाठविलें. त्या वेळीं यानें व अंताजीनें फत्तेसिंगाचा रगडून कारभार करून त्यास नामशेष करून टाकलें ( स. १७७७ ).

जेव्हां केसो कृष्ण दातारानें राघोबादादांच्या तर्फेनें पेशव्यांचे मुलखांत उपद्रव केला, तेव्हां त्याचे बंदोबस्ताकरितां हरिपंतानें यास फौज, तोफा व गारदी देऊन पाठविलें ( १७७९ च्या सुमारास ).

स. १७८० मध्यें उत्तरेंत गॉडर्डशीं शिंदें-होळकर लढत असतां दक्षिणेकडून यानें इंग्रजांस दाबण्याची चांगली कामगिरी केली. यानें सुरत अठ्ठाविशीचे महाल लुटून प्रत्यक्ष सुरतेसच शह दिला. तेव्हां याचे बंदोबस्तास गॉडर्डनें लेबेल्श यास पाठविलें. वेल्शनें पार्नेरा, बुगवडा व इंद्रगड हे तीन किल्ले हस्तगत केले. सोनगडाकडील इंग्रज पलटणीला यानें चांगलीच जरब बसविली. पुढें स. १७८५ मध्यें टिपूशीं युद्ध चालू असतां नानानें याजबरोबर पांच हजार फौज देऊन पटवर्धनांचे मदतीस पाठविलें ( म. रि. उ. १, पृ. १ ).

**गणेश वेदांती**—हा अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला याच्या जवळ मराठ्यांच्या वतीनें वकिलीच्या कामावर होता. हा जातीचा महाराष्ट्र ब्राह्मण असून याचे पूर्वज वेदांतविषयांत निष्णात असल्यामुळें याचें वेदांती असें नांव प्रसिद्धीस आलें. यास पेशवेसरकारकडून बाराशें रुपयांची नेमणूक असे. हा मोठा परोपकारी व दयार्द्रबुद्धीचा होता. हा आपली सर्व नेमणूक गोरगरीबांस अन्नदान देण्यांत खर्च करीत असे. त्यामुळें सुजाउद्दौल्याच्या लष्करांत याची एखाद्या महान् साधूप्रमाणें प्रसिद्धी होती. स. १७६१ मध्यें पानिपत येथें मराठ्यांची व अबदालीची लढाई होऊन तींत श्रीमंत विश्वासराव वगैरे मारले गेले. त्या वेळीं त्यांची उत्तरक्रिया करण्याच्या कामीं या परोपकारी पुरुषानें अपार परिश्रम केले; व मोठमोठ्या मराठे वीरांच्या शवांस अग्नि देण्याचे कामीं काशीराज पंडितास फार मदत केली. श्रीमंत विश्वासराव पेशवे यांचें प्रेत शत्रूचे हस्तगत झालें असतांहि तें सुजाउद्दौल्याच्या मार्फत परत मिळवून, यानें चंदनादि काष्ठांनीं त्याचें विधिपूर्वक दहन केलें, आणि त्यांच्या अस्थि ब्राह्मणाबरोबर भागिरथीमध्यें टाकण्याकरितां पाठवून दिल्या.

तात्पर्य, मराठ्यांवर आलेल्या या अत्यंत दुर्धर व शोकप्रद प्रसंगीं काशीराज पंडित व गणेश वेदांती ह्या थोर

पुरुषांनीं अतिशय साहाय्य केलें. त्यामुळें यांचीं नांवें इतिहासांत अजरामर झालीं आहेत. गणेश वेदांती हा सुजाउद्दौल्याजवळ स. १७६३ पर्यंत असल्याचा दाखला सांपडतो. पुढें यानें सर्व संसार सोडून देऊन काशीवास केला ( जु. ऐ. गो. भा. ४ पृ. ३-४. )

**गणेशशेट**—शिवाजीचा गोव्यांतील वकील.

**गणेश संभाजी खांडेकर**—हा संभाजी तुकदेव खांडेकर यांचा मुलगा. हा कऱ्हाडा ब्राह्मण असून संगमेश्वर तालुक्यांतील बुरंबाड येथील राहणारा होता. हा प्रथम नानासाहेब पेशव्यांचे वेळेस उदयास आला; आणि पानिपतोत्तर काळीं याचा पराक्रम विशेष झळकला. प्रथम यास बुंदेलखंडांत झांशीची मामलत मिळाली. पानिपतचे पराभवानें तिकडील मराठ्यांचा अंमल ढासळूं लागला तेव्हां हा व याचा बंधु गोपाळ संभाजी ह्यांनीं तिकडे फार चांगला उद्योग केला. जानोजी भोसल्याचा कारभारी बाबूराव कान्हेरे ह्यानें गणेश संभाजीचा जम जानोजीकडे बसवून दिला. भाऊसाहेबांचा तोतया प्रथम हिंदुस्थानांत प्रगट झाला, त्यास गणेश संभाजीनें साह्य केलें, त्यावरून माधवराव पेशव्यांची याजवर मोठी गैरमर्जी झाली.

जानोजीनें ओरिसा प्रांताचा कारभार शिवभट साठ्याकडून काढून गणेश संभाजीस दिला ( स. १७६८ ). तें काम यानें सप्टेंबर १७७० पावेतों केल्याचें दिसतें. या अवधींत गणेश संभाजीचा इंग्रजांशीं पत्रव्यवहार झाला, तो पार्शियन कॅलेंडर्सच्या तीन भागांत पाहावयास मिळतोः 'Madhavarav Peshava perfidiously broke the treaty with Bhosle', असें गणेश संभाजीनें पत्रांत इंग्रजांस कळविलेलें आढळतें. जानोजीचा गणेश संभाजीबद्दलचा आदर खालील शब्दांत व्यक्त होतीः

'A man of great knowledge and tried courage, and of perfectly polite manners.'

स्वतः गणेश संभाजी लिहितोः—

'I have been called from a remote country, to take possession of the Government of Orissa, considering the share I have had in many transactions with the English gentlemen in Hindusthan.'

यावरून माधवराव पेशवे विरुद्ध इंग्रजांशीं आपलें बस्तान हा चांगलें बसवून देईल अशी जानोजीची अपेक्षा होती, पण ती सिद्धीस मात्र गेली नाहीं. सन १७७९-८० त माळव्यांत नरसिंगगडानजिक बाळाजी गोविंद खेरानें गणेश संभाजीवर छापा घातला त्यांत हा मारला गेला. याचा मुलगा मल्हार गणेश हा पुढें महादजी शिंद्याकडे राहिला. ( म. रि. म. वि. भा. ४, १७२, ३०१; ना. प्रां. इ. पा. १९४ ).

**गणोजी शिर्के**—हा शिवाजीमहाराजांचा जांवई होता. महाराजांच्या मुलीचें नांव राजकुंवर असून ती यास दिली होती.

गणोजी हा ज्या वेळीं संभाजीनें सावत्र आई सोयराबाईमुळें शिर्के कुलाशींच विरोध आरंभला तेव्हां मराठ्यांना सोडून उघडपणें मोगलांना जाऊन मिळाला. जिंजीच्या वेढ्यांत गणोजी हजर होता. त्या वेळीं खंडो बल्लाळानें यास वतनाचें व जहागिरीचें आमिष दाखवून वश केलें व शिकारीच्या निमित्तानें राजारामम्हाराजांस किल्ल्याबाहेर नेलें. थोडें अंतर चालून जातांच धनाजी आपलें सैन्य घेऊन तयार होताच, त्यांत नेऊन सोडलें. यापुढें गणोजी मराठ्यांना येऊन मिळाला. याचा मुलगा पिलाजी हाहि इतिहासप्रसिद्ध आहे.

**गदाधर प्रल्हाद नाशिककर**—( स. १७०८ ) जानेवारींत शाहूनें राज्याभिषेक केला त्या वेळेस प्रतिनिधिपद हें गदाधरभट्ट यांना दिलें. हा प्रल्हाद निराजीचा मुलगा. परंतु "गदाधर भट्टी कारभार, यथास्थित बंदोबस्त न होय" म्हणून शाहूनें याचें पद काढून स. १७११ त तें याचा भाऊ नारो प्रल्हाद यास दिलें. ता. ३०-११-१७१० रोजीं गदाधराचा शिक्का असून १-६-१७११ रोजीं नारो प्रल्हादचा प्रतिनिधिपदाचा शिक्का आहे.

हा शाहूला मिळाला. परशुरामपंत किन्हईकर ताराबाईला मिळाल्यामुळें प्रतिनिधिपद याच्याकडे आलें.

**गदाधरभट्ट**—( स. १६५० सुमार ) न्यायशास्त्रावरील सुप्रसिद्ध ग्रंथकार. याच्या बापाचें नांव जीवाचार्य असें असून याचा जन्म पूर्व बंगाल्यांत लक्ष्मीपस, बोग्र या जिल्ह्यांत झाला. हा वाडिआ येथें आला व हरिराम तर्कवागीशाचा शिष्य बनला. गुरूच्या मरणानंतर हा पाठशाळेचा मुख्य झाला. परंतु हा पंडितांच्या कुळांतील नसल्यामुळें तेथील विद्यार्थी याचा अधिकार मानिनात. तेव्हां यानें त्या पाठशाळेस रामराम ठोकला व दुसरी एक पाठशाळा काढली. आपल्या पाठशाळेभोंवतीं नवद्वीप येथील न्यायशास्त्राच्या अध्ययन व अध्यापनाची विशेष परंपरा यानें सुरू केली. यानें उत्तम बाग तयार केली. एखादा विद्यार्थी फुलें तोडण्यास आला कीं गदाधर बागेंत येऊन झाडांना उद्देशून तर्कशास्त्रावर प्रवचन देण्यास सुरुवात करी. तेव्हां याच्या विद्वत्तेनें मोहित होऊन पुष्कळ विद्यार्थ्यांनीं गुप्तपणें याच्या पाठशाळेंत नांवें नोंदली. लवकरच यानें रघुनाथ